
Historical Papers

Relating To

Mahadji Sindia



Edited By

G. S. Sardesai

HISTORICAL PAPERS

RELATING TO

MAHADJI SINDIA

WITH A FOREWORD BY

SIR JADUNATH SARKAR, M. A., D. Litt.,

Kt., C. I. E., HONY. M. R. A. S.

28610

EDITED BY

G. S. SARDESAI, B. A.

(Author of Marathi Riyasat

and Editor, Peshwa Daftar Selections)

954.043
Sar

PRINTED AT

The ALIJAH DARBAR PRESS, GWALIOR

PUBLISHED BY AUTHORITY

December, 1937

ARCHAEO

CENTRAL ARCHAEOLOGICAL
LIBRARY, NEW DELHI.
Acc. No. 28610.
Date. 11/7/60.
Call No. 954.043/Sar.

FOREWORD

BY

SIR JADUNATH SARKAR, Kt., C. I. E., D. Litt.

WITH the birth of a posthumous son, Madhav Rao II, to the murdered Peshwa Narayan Rao, on 18th April 1774, began a civil war in the Maratha State, which afterwards, by the Treaty of Surat (7th May 1775), widened into a deadly contest with the English and was ended only by the Treaty of Salbai on 17th May 1782. This long-drawn struggle for existence by a kingless State, torn by internal discord and menaced by relentless enemies on all sides, brought to the front two great personalities: Balaji Janardan Bhanu (better known as Nana Fadnis), the statesman and organiser, and Mahadji Sindia (popularly called Patil Bawa), the soldier and diplomat. The Maratha war of national defence was at first conducted by a Board of ministers at Poona, styled the Bara Bhai or "Twelve Brethren"; but the overthrow of Moroba Dada (11th July 1778) and Sakharam Bapu (27th February 1779) transformed the Board into the sole dictatorship of Nana Fadnis. That dictatorship continued throughout the 21 years' minority of Madhav Rao II and thereafter, with two interruptions (1796 and January-October 1798) and with greatly reduced powers and efficiency, till this minister's death on 13th March 1800. Thus, for the last quarter of the Eighteenth Century, Nana Fadnis was the pivot of Maratha affairs centring in Poona, as Mahadji was, in a lesser degree and for a shorter period, that of his nation's interests in Northern India.

An immense mass of correspondence is known to have passed between these two leaders during the eventful last two decades of their joint lives, 1774-1794. It long remained a problem of modern Maratha historical research to discover this body of State-papers. Towards the end of the Nineteenth Century, Sane and Rajwade began to print Marathi historical letters in profusion,

—even going back to the age before Panipat (1761). But the Nana-Mahadji correspondence could not be traced by them for some time. In 1908 Dattatreya Balwant Parasnis founded a historical monthly named the *Itihas Samgraha*, in which he printed all that now survives of the despatches received by Nana Fadnis from the Maratha envoys at Delhi and at Ahalya Bai Holkar's Court (Maheshwar). Here he also printed, in a most tantalising fashion, once in a year or two, a single despatch from Nana Fadnis's agent in Mahadji's camp, but gave no inkling as to the number and range of the documents belonging to this corpus of records, nor whether the whole of them was in his hands. This was the state of the knowledge that the outer public had on the subject till Parasnis's death on 31st March 1926.

When in October 1916 I stayed at Parasnis's house in Satara for five days and he showed me over his entire library and picture collection in detail, I noticed two clerks under him busy transcribing Marathi letters from Modi into Balbodh. He told me that these were the original letters relating to Mahadji Sindia and that he had undertaken, on behalf of Maharaja Sir Madhav Rao Sindia, to print them in fifteen volumes. I found about twenty bundles of these letters before the clerks and more were reported to be stored in boxes.

In January 1925 Parasnis found it necessary to draw me to his house at Satara again for the purpose of securing my expert opinion on the age, subjects and genuineness of the "Mughal paintings" he had collected, which he was anxious to sell. At the end of the visit, he presented me with volumes II and III of the privately printed Mahadji letters, this being the condition I had made for my visit : but he told me to keep the matter secret as the books belonged to the Gwalior Government. Inspection by Govind Sakharam Sardesai at once revealed the primary importance of these letters for Maratha history by reason of the flood of new light they threw on the last quarter of the Eighteenth Century.

The matter rested here till Parasnis's death in 1926. After that mournful event, the Gwalior Regency, on being moved by us, traced the fact that Parasnis had taken Rs. 63,150 from the late Maharaja Sindia on condition of printing ten volumes of historical letters and five volumes of biographies relating to this dynasty, and that Sindia's Government therefore had a claim to all the printed copies of these volumes. These were secured from his eldest son, but were found to consist of four volumes in Marathi, numbered II-V, and one volume in English giving merely reprints of English documents already available elsewhere. When a full set of these was presented by the Darbar to Sardesai and me, it was found out that, strangely enough, the first volume in Marathi, containing letters 1-151, had not been delivered to the Gwalior Government. Parasnis's son Amrit Rao said he had not a single copy of this volume among his father's effects, although he averred that the volume had been already printed, and the numbering of the letters in volume II from 152 onwards implied a first volume in Marathi, whose place could not be assigned to the volume of English contents. The Poona Press where the four Marathi volumes had been printed knew nothing of the whereabouts of such a first volume, nor had ever been approached by the late D. B. Parasnis for printing anything like it.

The matter remained in this state of baffling darkness for two years, when a private detective investigation set in train by Govind Sakharam Sardesai bore fruit. It was learnt that a certain press in Bombay which had gone into liquidation and whose assets had been placed under seal by order of the law courts, held unbound sheets of Marathi letters looking like the contents of volumes II-V. The point was soon verified. Here was lurking our missing first volume of Mahadji's own letters. The Gwalior Darbar was then approached, and on its paying Parasnis's debt to the press, it was supplied in 1932 with the stock of this volume (curiously enough only 40 copies as against the 100 copies printed of the subsequent four volumes). This first

volume bears 1915 as the date of printing, so that it took 17 years for the volume to see the light of day !

Thus far what Parasnis lived to print. Five large bundles of *MSS.* letters selected and laid aside by him for printing in five volumes in continuation of the first five, are still held by his son Amrit Rao, who has neither the means of printing them in fulfilment of his father's *prepaid* contract with the Gwalior Government, nor will hand them over to that Government for being printed by it. But the residue forming eighty-six bundles of the Menavali and other daftars, left untouched by him, was sold by his heir to the Bombay Government along with his library in return for a perpetual hereditary pension of Rupees 200 a month, which, if capitalised at 3½ per cent Government paper, amounted to a lump sum of Rs. 68,000. When the Bombay Government made this contract with a view to establishing the Satara Historical Museum, it had no knowledge of the contents of the Parasnis collection, nor any expert to advise it; it simply agreed to accept as its consideration for the pension only the bundles of *MSS.* and printed books entered in a typed list by the Parasnis family. Thus it has happened that the Bombay public has been deprived, by the other party to the contract, of some historical *MSS.* and letters of value (in English, Persian and Marathi) noticed by me in my life of D. B. Parasnis published in the *Modern Review* for June 1926 (Vol. XXXIX, p. 654). Even the originals of the printed Mahadji correspondence (5 volumes) have been denied to the Bombay Government, because a requisition which the late Education Minister of Bombay made to Parasnis's eldest son at our instance, has produced the reply—

"I cannot find it; 'tis not in the bond,"

viz., the typed list on which he takes his stand. The Gwalior Government, too, has failed to secure from him the originals of the five volumes reprinted here, so that it is impossible now to correct the text as printed by Parasnis or fill up the gaps in it. Rao Bahadur D. B. Parasnis conducted the

whole transaction by correspondence with the late Maharaja Sindia, and the Gwalior State officials did not take the precaution of making him deposit these *MSS.* originals with them as pledges for ensuring the prompt fulfilment of the contract for which they advanced the full money consideration to Parasnis.

On studying these five volumes, both of us at once realised how very necessary it is to throw this corpus of historical documents open to the public at a moderate price and under proper editorial care. The Gwalior Darbar, with its enlightened liberality in the cause of national history, at once agreed to our request to reprint the work and sell it at cost price. Govind Sakharam Sardesai, as was only to be expected from his lifelong, honorary and honourable devotion to Maratha history,—undertook to edit the papers, correct Parasnis's dates and misreadings, re-arrange all the letters in strict chronological order, add notes and supervise V. G. Dighe in preparing the English summaries and the copious English index and seeing the volume through the press. Thus Mahadji's letters have now, at long last, been brought out of "Gosha" in a garb worthy of them and made known to students of history. For this the public are deeply indebted to Khase Sahib Pawar, Sir Kailas Narayan Haksar and other high officials of Maharaja Sindia, who have evinced a personal interest in this work ever since 1926 and at last enabled our labours to reach fruition. The Alijah Darbar Press, too, has been helpful to the enterprise.

All the letters, despatches, statements of accounts, etc., which Nana Fadnis received as the head of the Poona administration during more than twenty years, were stored by his widow in his village retreat at Menavali in the Satara district and are therefore known as the Menavali daftar. V. K. Rajwade in the course of his country-wide tour of exploration, first studied them there. Then, in the early years of the present century this body of records was brought to Satara with a view to their being printed by the Sahasrakar Press (owned by Sahasrabuddhe and Karandikar), but before anything could be

done, Parasnis took charge of them for publication under his own care. What consideration was dangled before the original owners of these papers and what promises were made by Parasnis when he took them over from Karandikar are not known to the public. When I put these questions to Raghunath Pandurang Karandikar (Dada Sahib) in his Satara house at our last meeting, he smiled a knowing smile and put me off by saying that he preferred to keep it a secret out of regard for others, and he too is now dead. Thus the air of mystery which hangs over the matter cannot be as yet dispelled.

One volume of Mahadji letters supplementary to the five reprinted here, has been published by the Satara Historical Research Society (1934) by gleaning among the residue of the Menavali bundles which Parasnis's heir had handed over to Government. A second volume is in advanced preparation. These will practically exhaust this source on Mahadji Sindia as far as within the public reach. The material contained in these seven volumes should be studied, for completion of information, along with *Patren Yadi wagaire* (Sane's), Rajwade's *Sadhanen* Vol. XII, *Maheshwar Darbarchin Batami Patren* and *Dilli yethil Marathyanchin Rajkaranen* in Marathi and Khair-ud-din's *Ibratnamah*, the diary of Col. Camac's Campaign 1780-81, and the news-letters of the Lalsont Campaign, all three in Persian manuscript.

These letters reveal, in brilliant and true light, the heroic personality of Mahadji Sindia. He dominates the North Indian history of his time like a Colossus (as I have said elsewhere). But the general and rather hazy notion of his greatness that we possessed before, is here replaced by a masterly portrait showing the lineaments of his character in the minutest detail, with almost daily illustrations from his sayings and doings. The veil which the greatness of historic position places between a superman and posterity is here rent asunder; we see the innermost thoughts and secret aspirations, the anxieties and plans, the sorrows and joys, of Mahadji Sindia, as intimately as if we had been privlleged to enter the inner circle of his four

personal friends. The cross-currents of political intrigue—by the British Residents, the Mughal grandees, the Rajput princes and even the jealous rivals of his own nationality,—are unfolded before us with amazing frankness and fulness.

From such an intimate study the man emerges even greater than we supposed him before. We see here the appalling difficulties and obstructions,—some from the most unexpected domestic quarter,—that he was called upon to overcome and did succeed in overcoming. We see how defective his resources were, how his instruments and allies often played him false, how many an anxious crisis he had to face, how even sympathetic Residents like James Anderson and William Palmer predicted his sure downfall, and yet how in the end he triumphed over all. We see the intense religious feeling,—modern rationalists may call it superstition,—which formed the essence of his being. We see the deep family affection, the habitual meekness of spirit, the respect for venerable persons, which this strong and busy man of action displayed even at the height of his earthly glory.

These records prove that in establishing Maratha control over the Imperial Government of Delhi and wiping off the disgrace of Panipat, Mahadji Sindia had to labour alone, nay in the teeth of pin-pricks and covert opposition by the Court of Poona. The supreme glory of the Regency of the Empire of Delhi that he gained,—with the superlative titles of *Wakil-i-Mutlaq, Bakhshi-ul-Mamalik, Amir-ul-Umra, Alijah, Infant of the Throne,*—was to him but a crown of thorns: the Muslim peers and former captains of the decadent Delhi State and their North Indian Hindu underlings, the Rajput vassals, and even some British Residents,—exulted at each disaster, each rebuff that he met with and they counted the days for his sure extinction. And the Poona Government denied to him money and armed help in his sorest need, and even insulted him in public. The *Khilats* and costly presents that he had won from the Emperor for the Peshwa (in December 1784), were refused and left to rot at Ujjain for years together, as a brand of public humiliation put

संपादकीय उल्लेख

(लेखक—गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., रियासतकार)

या पुस्तकाच्या प्रकाशनाची पूर्व कहाणी बरीचशी अज्ञात असलेली सर जदुनाथ सरकार यांनीं वर आपल्या इंग्रजी पुरस्करणांत तपशीलवार दिली असल्यानें, त्याची द्विरुक्ति न करितां, अवांतर कित्येक बाबतींचा खुलासा करणें जरूर वाटतें. नाना आणि महादजी या उत्तर मराठशाहींतील दोन प्रमुख व्यक्ति असल्यामुळें त्यांजमध्यें बनलेला अस्सल पत्रव्यवहार वाचावयास मिळावा अशी उत्कंठा सर्वत्रच असणार. पैकीं नानानें महादजीस लिहिलेलीं पुष्कळ पत्रें या पूर्वी काव्येतिहास-संग्रहांत व इतरत्र प्रसिद्ध झालीं होतीं. पण खुद्द महादजीनें नानास लिहिलेलीं पत्रें आणि महादजीच्या छावणींतून नानाच्या हस्तकांनीं त्यास लिहिलेलीं पत्रें मेणवली येथील त्याच्या राहत्या वाडयांत होतीं तीं पुढें कै. पारसनीस यांनीं हस्तगत केलीं. नानाचे पश्चात् त्याची पत्नी जिऊबाई इनें नानाचें सगळें दफ्तर पुण्यांतून मेणवलीस नेऊन ठेविलें. नंतर इ. स. १८१८ सालीं पेशवाईची समाप्ति झाली, त्या वेळीं नानाचें दफ्तर पुण्यास असतें तर तें पेशव्यांच्या इतर कागदांबरोबर गव्हर्नर एल्फिन्स्टनचे ताब्यांत जाऊन हाल्लींच्या सरकारी दफ्तरखान्यांत समाविष्ट झालें असतें. पारसनीसांनीं इतिहास संग्रहाच्या द्वारें मेणवलीचें दफ्तर पुष्कळसें प्रसिद्ध केलें. त्यांतून महादजीचा पत्रव्यवहार तेवढाच त्यांनीं वेगळा कां ठेविला हें समजत नाहीं. असे कागद प्रसिद्ध करण्यास खर्च फार लागतो व तो ग्वाल्हेर दरबारकडून मिळवावा अशा उद्देशानें त्यांनीं हा पत्रव्यवहार कै. माधवराव महाराज शिंदे यांचे नजरेस आणिला असावा. आणि त्याचे पांच भाग गुप्त व खासगी रीतीनें उंची जाड कागदावर आकर्षक स्वरूपांत छापले, पण प्रसिद्ध केले नाहींत. या मालेस त्यांनीं Historical Papers relating to Gwalior State, Vols. 1—5, अशी संज्ञा दिली. त्या भागांचीं मराठी नांवें खालीलप्रमाणें नमूद आहेत :—

१ महादजी शिंदे यांचा अस्सल पत्रव्यवहार, भाग १ ला,

२ महादजी शिंदे यांचा अस्सल पत्रव्यवहार, भाग २ रा,

महादजी शिंदे यांजकडील राजकारणें, आपाजीराम दाभोळकर याचीं पत्रें, भाग ३ रा,

४ महादजी शिंदे यांजकडील राजकारणें, सदाशिव दिनकर याचीं पत्रें, भाग ४ था,

५ महादजी शिंदे यांजकडील राजकारणें, सदाशिव दिनकर याचीं पत्रें, भाग ५ वा.

पहिला भाग मुंबईस निर्णयसागर छापखान्यांत इ. स. १९१५ सालीं छापला असें नमूद आहे. बाकीचे चार भाग पुण्यास जगद्धितेच्छु छापखान्यांत छापले असून त्यांवर सनाचा आंकडा घातलेला नाहीं. या चार भागांच्या मुखपृष्ठांवर Private and Confidential अशी सूचना छापली आहे. बहुधा हे भाग इ. स. १९२५ सालचे मागें पुढें छापले गेले. या चार भागांच्या प्रत्येकीं सुमारें ८० प्रती पारसनीसांचे चिरंजीवांकडून ग्वाल्हेर दरबारास इ. स. १९३० सालीं मिळाल्या. पहिल्या भागाचा तर पत्ता नव्हता तो लागून त्याच्या ४० प्रती इ. स. १९३२ सालीं ग्वाल्हेरकरांस मिळाल्या. या पुस्तकांचा मुख्य उपयोग केवळ इतिहासाभ्यकांस आहे, एकांतही खासगी किंवा गुप्त असें कांहीं नाहीं. पांच भागांचे मिळून चाळीस संपूर्ण संच उपलब्ध झाले, त्यांतले कांहीं अल्प त्या दरबारनें विक्रीस काढिले, परंतु त्यांच्या जबर किंमती देण्याची ऐपत किती अभ्यासकांस असणार! अशा स्थितींत आमच्या विनंतीस मान देऊन ग्वाल्हेर सरकारनें पांचही भागांतील सर्व कागद एकाच पुस्तकांत पुनः प्रसिद्ध करण्याचें जोखीम अंगावर घेऊन तें पार पाडिलें, याबद्दल सर्व इतिहासप्रेमी वाचक त्यांचे सदैव ऋणी राहतील.

छपाईचें काम दरबारनें स्वीकारिलें आणि संपादनाचें काम मी विनामूल्य पत्करिलें. तथापि तें माझ्या एकट्याच्या शक्तिबाहेरचें होतें. पांचही भाग सुटे करून त्यांतले सर्व कागद एका कालानुक्रमानें पुनः जुळवणें, अर्थाच्या, भूगोलाच्या व इतर टीपा देणें, आणि प्रत्येक कागदाचा इंग्रजी मतलब थोडक्या शब्दांनीं पादटीपांत सांगणें हीं कामें महत्त्वाचीं असून, शिवाय ग्वाल्हेरच्या छापखान्यांतून येणारीं मुद्रितें वेळेवर तपासून परत करणें हेंही कांहीं कमी दगदगीचें नव्हतें. माझे मित्र रा. वि. गो. दिघे, एम. ए., यांनीं आपलीं इतर कामें सांभाळून या संपादनाचे कामीं माझें पूर्ण साह्य करण्याचें कबूल केलें, म्हणूनच पुस्तक सिद्ध झालें. पूर्वीच्या पांच भागांतील कालानुक्रम प्रत्येकाचा स्वतंत्र

होता, परंतु एकाच विषयाचा मजकूर पांच भागांत विभागला गेल्यानें अभ्यासकांची गैर सोय होणार ती दूर करण्यासाठीं सर्व कागदांचा नवीन कालानुक्रम बनवावा लागला. असें करितांना ज्या कागदांवर लेखकाचें नांव मुळांत नव्हतें, त्यांवर या आवृत्तींत आरंभींच लेखकाचें नांव कंसांत दर्शविलें आहे. संपादनाचें हें काम चालू असतांच गेल्या तीन महिन्यांत मी आजारी पडलों, तेव्हां सर्वच काम एकट्या दिघ्यांचे अंगावर आलें असतां तें त्यांनीं हौसेनें सांभाळिलें याबद्दल मी त्यांचा व्यक्तिशः आभारी आहें. विशेषतः शेवटची भरपूर सूची त्यांनींच इंग्रजींत बनविल्यामळें या पुस्तकाचा उपयोग बाहेरच्या अभ्यासकांस चांगला होईल.

पांचही भागांचीं मिळून एकंदर ६०८ पत्रें इ. स. १७७४ ते इ. स. १७९२ च्या कालांतलीं या पुस्तकांत छापलीं आहेल. या अठरा वर्षांच्या अवधींत महादजी व पुणें दरबार यांचे दरम्यान जे व्यवहार घडले, त्यांनीं ज्या मसलती केल्या व जीं राजकारणें लढविलीं, त्यांचें सत्य स्वरूप प्रगट करणारा असला दुसरा पत्रव्यवहार मराठींत नाहीं. मराठशाहीच्या उतरत्या काळांतील एका थोर व्यक्तीचें आत्मिक चित्रच हीं पत्रें डोळ्यांपुढें उभें करितात. गुजरातची मोहीम, दिल्लीच्या राजकारणांत प्रवेश, त्यामुळें उद्भवलेल्या अडचणी, राजपुतांशीं बेबनाव आणि त्यांतून उत्पन्न झालेले लालसोट, पाटण, मेडता इत्यादि ठिकाणचे रणसंग्राम अशीं हीं महादजीच्या पराक्रमाचीं प्रकरणें स्पष्टपणें समजून घेण्यास या पुस्तकांतील पत्रें हींच अव्वल दर्जाचीं साधनें होत. दरबारांतील कामें उरकण्याची महादजीची पद्धत, संकटकाळीं न डगमगतां योग्य योजना करण्याची त्याची दमदार हातोटी, त्याला विरोध करून अडविण्याची पुणें दरबारची वागणूक, अलीबहादर, तुकोजी होळकर, अनूपगीर गोसावी इत्यादींच्या कारवाया व तदंतर्गत नानाविध घडामोडी विशद करणारा हा पत्रव्यवहार अभ्यासेच्छूंस अत्यंत महत्त्वाचा वाटेल; आणि वीस वर्षांपूर्वींच कै. पारसनीसांकडून तो त्यांस उपलब्ध झाला नाहीं याबद्दल त्यांस जितकें वाईट वाटेल, तितकाच उशीरानें कां होईना, तो पुनः त्यांस योग्य संपादनाच्या स्वरूपांत हस्तगत झाल्याबद्दल आतां आनंद वाटेल, यांत संशय नाहीं.

अद्यापि या कागदांचें एक शल्य शिल्लक आहे. एवढचा प्रचंड पत्रव्यवहाराचीं मूळ अस्सल लिखितें अभ्यासकांस प्राप्य नाहींत. तीं हातासीं नसल्यामुळें संपादकांस मोठी अडचण उत्पन्न झाली. पुष्कळ स्थळांत वाचनाच्या चुका आढळल्या त्या त्यांस दुरुस्त करितां आल्या नाहींत, त्या तशाच अस्पष्ट किंवा

संशयित ठेवाव्या लागल्या. महादजीच्या या शेकडों पत्रांत कित्येक सबंद खुद्द त्याच्या हातचीं, निदान पुष्कळसे भाग त्याच्या स्वतःच्या हातानें लिहिलेले असले पाहिजेत. ग्वाल्हेरकरांस तर ते अत्यंत बहुमोल वाटतीलच, पण सामान्य वाचकांसही महादजीच्या तलवारीप्रमाणें त्याच्या लेखणीचाही प्रभाव त्यांत दिसेल. ज्यांच्या जवळ हे अस्सल कागद असतील ते अद्यापि जरी ते प्रकाशांत आणण्याची उदारबुद्धि दाखवितील तर राष्ट्रेतिहासावर त्यांचा मोठा उपकार होईल.

ADDITIONS AND CORRECTIONS

An explanation is due to the reader for the large number of mistakes occurring in the English summaries and editorial notes. The work was printed at Gwalior while the two editors resided very far off, at Poona and Kamshet, and occasionally references had also to be made to Sir Jadunath Sarkar who lived at a diametrically opposite corner of India, namely, Darjeeling. Hence some mistakes were overlooked and many more were, in the consequent confusion, not inserted by the press before the final printing of the successive formats. Moreover, it was only after studying the printed files that Sir Jadunath could supply us with many additions and corrections derived from the Persian and English sources known only to him. The verbal errors and obvious misprints, as well as the offences against English idiom which occur in the English summaries, have been left unnoticed in the following list, as any intelligent reader can correct them. As for the Marathi text, it should be borne in mind *that the original MS.* of these letters has been withheld by D. B. Parasnis's heirs from us, and hence we could attempt any correction of his numerous errors, omissions and misreadings and misprints only by guess. The evil has been aggravated by the breaking or displacement of types and the unfamiliarity of the compositors with English as compared with Marathi, besides the interruptions caused to this book by more urgent State business.

N. B.—**The reader is requested to insert the following corrections before beginning to study the book.**

Page 85, line 2, *for* Charles *read* Charles Stuart.

,, 194, English summary, *for* obstructed *read* effected.

,, 228, English summary, *for* help the Poona its extreme *read* help the Poona Darbar in its extreme need.

Page 290, English summary, *transfer* Poona *to the end of the preceding line.*

Page 293, English summary, *for* surrender to, *read* surrender Dada to.

Page 296, English summary, *for* accepts *read* admits.

,, 316 and 392, footnote, *correct thus*: Mahadji and Mirza Shafi met near Dholpur on 27th June 1783.

,, 329, English summary, *omit* not *in the 3rd line.*

,, 338, second footnote, *read* रवाद is a misreading for स्वाद, the first letter of the Arabic word *sahih* meaning 'signed and approved.'

Page 395, English summary, *read* Trimbak Rao Narayan's Jagir being restored to him. Make similar corrections on pages 413, 447, and 644.

Page 56, line 14 from the top and page 421, line 9 from the bottom *for* अब्दुलहयात *read* अब्दुलआहद.

Page 424, first footnote, date 4th March 1784.

,, 442, last footnote, *add* 'the meaning of गज is not clear.'

,, 452, English summary, *for* concern *read* enterprise.

,, 453, second footnote, *for* 8th Feb. *read* 1st Feb.

,, 478, footnote and English summary on page 479, Jeta Gujar is wrong; *read* गुजर जातीचा जमीदार *and* a Gujar Zamindar, respectively.

Page 479, footnote, *for* blood-poisoning *read* cholera morbus.

,, 487, footnote, *for* name of a gun *read* Rani Kishori, the widow of Suraj Mal Jat.

Page 489, footnote, *read* शुजादिलखान.

,, 495, line 6, *for* धुरमकसुद्धांबाद *read* गौड मकसुदाबाद.

,, 516, English summary, *for* desertio *read* hostility.

Page 545, footnote, Major Browne was appointed on 20th August 1782.

,, 573, footnote, पटाईत means a vassal chief.

,, 594, footnote, *add* Sir Eyre Coote died on 27th April 1783, when General Stibbert was appointed officiating Commander-in-Chief. In July 1785 General Sloper arrived from England as the permanent Commander-in-Chief. The second कोट may be a confused reference to Robert Kyd who acted as Military Secretary to the G. G. during the interval.

Page 600, last line, *for* offer *read* accord.

,, 629, footnote, इजमाइली means collective or total.

,, 630, footnote, जायदादवाले means holders of small land grants on condition of military service.

Page 648, letter No. 470, *add note* बसिटा is an Arabic word meaning mediators.

Page 652, footnote, *read* the post of a *Khawas* or a personal attendant, valet.

Page 653, footnote, Khush-hali Ram Bohra (of the Brahman Bohra caste) was a different person from Khush-hali Ram Haldia (a Bania). It was the latter who was murdered on 15th November 1784.

Page 659, footnote, *add* Anandibai Nimbalkar died about 20th August 1785.

Page 807, second paragraph *for*, सारंगपुर *read* सहारणपुर.

,, नुनीमकशर ,, नारनौल.

Page 820, letter No. 577, सुलकूत is a mistake for सूलकूल or peace with all, universal toleration,—the motto of the great Akbar.

Page 827, footnote, *read* राजानें बक्षिस दिलेल्या जमिनीची सनद.

Page 844, first footnote, *for* वांकडेपणा *read* fear, suspicion.

,, 886, footnote, दत्तू is correct, being the name of a *Khawas*.

Corrections of Dates

No. of letter	Incorrect date	Correct date
202	14th April 1782	3rd April 1782
207	23rd July 1782	12th July 1783
208	19th September 1782	9th September 1783
221	2nd February 1783	23rd January 1784
231	2nd June 1780	2nd June 1782
313	April 1784	End of May 1784
324	3rd June 1784	13th June 1784
	14th Rajab is a mistake for 24th Rajab	
339	End of September 1784	About 20th October 1784
346	December 1884	December 1784
363	March 1782	20th March 1785
415	16th September 1785	May 1786
431	January 1786	5th January 1786
470	May 1786 ..	10th March 1786
476	July 1786 ..	about 7th June 1786
477	June 1786 ..	July 1786
494	December 1786	January 1787
495	December 1786	About 20th December 1786
498	January 1787	December 1787
517	April 1788 ..	March 1789
575	20th July 1970	20th July 1790
577	11th August 1790	3rd October 1785
591	12th February 1791	19th February 1791
602	December 1791	20th December 1791

महादजी शिंदे

ह्यांचीं

कागदपत्रें

No. 1 27th April 1774.

पैवस्ती छ २ रावल अर्बा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना* गोसावी यांसी :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष:—आपण पत्रें दोन छ १७ व २७ मोहरमचीं पाठविलीं तीं छ ७ सफरीं पावलीं. श्रीमंतांनीं† दगा करून त्रिंबकरावमामास‡ धरलें. मोगल§ व भोसले व सरकारची फौज कूच करून श्रीमंतांवर गेले. त्यांस वर्तमान कळतांच कूच करून निघाले. सरकारची फौज व नवाब भोसले मागें आहेत. कदाचित् श्रीमंत पळत पळत खानदेशांतून नर्मदापार जाहले तरी होऊं न द्यावें. तुम्हीं व होळकर एक होऊन आडवें व्हावें. बलाबल पाहून हस्तगत करावें. न बने तरी तुम्हीं श्रीमंतांस न मिळावें. त्यांचा रूख चुकावून एकीकडे व्हावें. तुमचें लक्ष सरकार कामावर सदृढ, कधींही अंतर पडलें नाहीं. मोठीं मोठीं कामें तुम्हीं केलीं असतां, आतां येण्याचा प्रकार कांहीं दिसत नाहीं. राजश्री महादाजीपंत गुरुजी‖ तुम्हांस आणावयाकरितां पाठविले असतां दिरंगावर पडलें. अतःपर दिवसगतीवर न घालितां जलदी येऊन पोहचावें म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियास, मामा मुन्हेचा¶

---

*नाना फडणीस. †राघोबा दादा. ‡त्रिंबकराव पेठे.

§निजामअलीखान. ‖कारभाऱ्यांनीं शिंद्याकडे रवाना केलेला वकील, पहा यांचें पत्र ऐ. प. ले. १४२. ¶मुन्हा=मुकाबला,—मुन्हेचा=मुकाबला करणारा, युद्धांत उडी घेणारा; पुढाकार घेणारा.

सरदार, समागमीच्या सर्वत्रांस त्यांचा भरंवसा असें असोन सडे निघोन गेले. भोसले व मोगल कसे राहिले, याची पैरवी आपण कसी न केली ? अस्तु. होणाराप्रमाणें मामांची बुद्धि जाहली. उपाय नाहीं. मामा धरले गेल्यानें बाजी थोडकीसी कमी पडली. तत्रापि मोगल भोसले व सरकारची फौज मागें आहे. यांतून कोणी नामी सरदार आळा घालणारावाचून आळा बसणार नाहीं. याची पैरवी लौकर करावी. फौजेस आळा घालून पाठलाग करावा. लांबणीवर मनसबा गेल्यास वर्षाकाळ जवळ येतो, हें आपल्यास तपसिलें ल्याहावें असें नाहीं. सर्व आपणांस समजतें. श्रीमंत नर्मदापार येणार. खांदेशांत स्वारी आली. तापी चांगदेवावर मुक्काम आला. पाठलाग लांब राहिला. यामुळें स्थिर येतात. इकडेही कारकून व पत्रें येतात तीं राजश्री गुरुजी पाहतात. आडवें व्हावें, नर्मदा आलीकडे येऊं न द्यावें, या अर्थी आम्ही छ १२ सफरीं मुहुर्तेंकरून डेरेदाखल जाहलों. राजश्री तुकोजी होळकरही डेरेदाखल जाहले. श्रीमंतांकडे आम्हां उभयतांकडील कारकून गेले आहेत जे इकडे न यावें, आल्यास ठीक नाहीं, असें स्पष्ट सांगोन पाठविलें आहे. आम्ही उभयतांही लोकांचे समजाविसींत फसलों आहों. आजवर एकनिष्ठतेनें सेवा करून वडिलांनीं प्राणांच्या कुरवंड्या केल्या. आम्हीही सरकारकामावर प्राणाकडे पाहिलें न पाहिलें, साहा वर्षांचे मुलुखगिरींत मनसबा सुधरला कोणीं व नासला कोणीं, हें जगास ठावकें आहे. असें असोन मेहनत बरबाद* जाहली. लोकांच्या जाचणुकी परस्परें ऐकिल्याच असतील. असें असोन आपण शब्द लावून लिहितात, अपूर्व आहे ! साहा वर्षांची लोकांची समजाविसी होणें. पैका नाहीं. कर्जही मिळेना. लोक निकडी करून प्राणासीं गांठ घालतात. लोकांचा गुंता निर्गमांत आल्याविना कोणी एक गोष्ट घडत नाहीं. तत्रापि बाहेर निघालों. नर्मदे अलीकडे येऊं देऊं असें व्हावयाचें नाहीं. आमचें लक्ष आपणावेगळें नाहीं. जी गोष्ट आपण योजिली ती सबळ पडावी याचीच योजना होत आहे. याचा तपशील गुरुजीबाबा लिहितील त्यावरून कळेल. प्रस्तुत मोरो वेंकटेश श्रीमंतांकडील कारकून आले आहेत, त्यांजबरोबर स्नेह व दाब दोन्ही प्रकार सांगोन पाठविले आहेत. निश्चय कोणते अन्वयें त्यांचा प्रत्ययास येतो तशासारखी पैरवी करण्यांत येईल. रा॥ छ १५ माहे सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia assures Nana Fadnis of his loyal support in the latter's campaign against Raghoba and of his readiness for taking measures to prevent Raghoba's march beyond the Narmada.*

*बरबाद झाली=नासली; फुकट गेली.

No. 2 27th April 1774.

पौ छ ४ रोवल आर्बा सबैन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावें. विशेष:—आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बहिरजी ताकपीर* शेवगांवावर मुक्काम करून होते; त्यांजकडे कारकून व खिजमतगार पाठऊन मामांस शामील होणें ह्मणोन सांगून पाठविलें. त्याजवळ तुमचे परवानगीचा उजूर केला व श्रीमंतांची स्वारी येतांच जाऊन भेटले. ते स्वमतें गेले किंवा श्रीमंतांनीं धरून नेले, हें न कळे. आतां त्यांस लेहून सरकारफौजेंत येऊन मिळेत तें करावें. पुरंधराहून चार पांच पत्रें पाठविलीं, एकाही पत्राचें उत्तर नाहीं, यावरून अपूर्व वाटलें. तरी याउपरी जलदी येऊन पोहचावें ह्मणोन लिहिलें. एसियास चिरंजीव राजश्री बहिरजी ताकपीर यांजला तिकडे पाठवावयाचें कांहीं आगत्य नव्हतें. परंतु राजश्री साबाजी भोसले गंगथडी प्रांतांत येऊन घासदाणा घेऊं लागले; पुण्याकडे जावयाचा इरादा केला; हें वर्तमान कळलियावर श्रीमंतांनीं मुजरद जोडीबरोबर कागद पाठविले कीं, त्रिंबकराव विश्वनाथ भोसल्यांचा पाठलाग करून मुलकास उपद्रव होऊं न द्यावयाकरितां पाठविले; तुह्मी आपली फौज जलदी त्रिंबकराव यांस सामील करवणें. ते समयीं आह्मांस आवंतीस येऊन आठ दिवस जाहाले होते. समजाविसीविना फौज तिकडील कार्यावर न पडे. श्रीमंतांची पहिली आज्ञा मोडतां नये. यास्तव नवी फौज ठेऊन चिरंजिवांची रवानगी केली. बऱ्हाणपुरा इतके गेले नाहीं, तों मामा व भोसले भेटले. आह्मांकडे मामांचीं पत्रें आलीं कीं, ताकपिरास परतोन नेणें. चिरंजीव यांस देवदर्शनास जावयाचें होतें, याकरितां त्यांचें कुटुंब पाठवून देऊन लिहिलें कीं, देवदर्शन करून श्रीमंतांकडे जाणें. इतक्यांत दुईचा प्रकार जाहला. याजवरून चिरंजिवांचें जाणें मना करविलें. ते तिसगांवीं† मुक्काम करून होते. राजश्री माहादाजीपंत गुरुजी इकडे आले. यांनींही चिरंजिवांस पुरंधरास जावयाविसी कागद मागितले. त्या वेळेस दोन पत्रें पुरंधरास जाणें ह्मणोन दिल्हीं. तीं आपणाजवळ पावलींच असतील. आपण त्यांजकडे पाठविलीं कीं नाहीं, हें

*महादजीचा जांवई. †तिसगांव अहंमदनगरच्या ई० २५ मैल.

न कळे. येथून परभारें पुरंधरास जाण्याविशीं लिहिलें होतें, ह्मणोन चिरंजीव कूच करून तिकडे जात होते. रुईवर* मुक्काम जाहला. श्रीमंतांचीही स्वारी आली. गणोजी कदम व नारोपंत दिमत आलीबहादर उभयतां यांस न्यावयास आले. यांणीं ते दिवशीं टाळा दिल्हा. दुसरे दिवशीं श्रीमंत राजश्री आमृतराव† खासा आले. भेटून समागमें घेऊन गेले. न गेल्यास बसालतजंगाच्या पुत्राची गत होणार या भयानें गेले. त्यांस काहडून आणावयाची सोय कोणती ? बातनी भोवताली आहे, मर्जी अनन्वित, अशा पेचीं मनसबा चिरंजिवांचा पडला. चिरंजिवांकडील पत्रें येतात तीं वजिन्नस राजश्री गुरुजीस दाखवितों. आह्मांकडून कृत्रिमता जाहली नाहीं व पुढेंही होणार नाहीं. चिरंजीव तेथून काहाडावे या विवंचनेंत आहों. परंतु ते सहकुटुंब आहेत. याकरितां सोय बनेल तसी पाहून, त्यांस सूचना करून आपल्या फौजा पाठीमागें दूर आहेत त्या जवळ येत असी तजवीज करावी. चिरंजीव तिकडे गेले ह्मणोन आह्मांकडील संशय चित्तांत न आणावा. प्रस्तुत श्रीमंत बऱ्हाणपुरावर आले. इकडे मुधोजी भोसले पाठवावे, मागोन आपण यावें, असी योजना करितात. ऐसीयासी विरुधचा प्रकार दाखविल्यानें मुलकाची खराबी होती, याकरितां जसी सोय आडळण्यांत येऊन मुलकाची रखवाली व चिरंजिवांचें संरक्षण होईल तें केलें जाईल. यामुळें आपण कांहीं संशयांत न यावें. बहुतकरून चिरंजिवांसी सूचना जितकी करावयाची तितकी करीत आहों. स्थाईभाव आपणांसी समजला आहे व आह्मींही पत्रीं लिहिला आहे. रा छ १५ माहे सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji explains to Nana the circumstances in which his son-in-law, Bahirji Takpir was forced to join Raghoba near Burhanpur. He adds that Bahirji had been advised to quit Raghoba's camp at the first opportunity.*

No. 3 27th April 1774.

पैवस्ती चंद्र ४ रविलावल आर्बा.

श्री

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे सेवेसीं :—

विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत चंद्र १५ सफर मुक्काम उज्जेन जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष:—आपण दोन पत्रें

*रुई अहंमदनगरच्या नैर्ऋत्येस २० मैल. †अमृतराव रघुनाथ राघोबाचा दत्तक पुत्र.

चंद्र १७ व चंद्र २७ मोहरमचीं पाठविलीं, तीं चंद्र ७ सफरीं पावलीं. तीर्थस्वरूप यांनीं त्रिबक विश्वनाथ यांस दगा करून धरलें. उपरांत सरकारची फौज व भोसले व मोगल कूच करून तीर्थस्वरूपांवर गेले. तीर्थस्वरूप पळत पळत खानदेशांतून जाऊन नर्मदा पार होतील. सरकारची फौज व भोसले व मोगल पाठलागावर आहेतच. तुम्ही व होळकर एक होऊन, नर्मदा पार जाहाल्यास हस्तगत करावे. न बनल्यास रूख चुकवून इकडे सत्वर येणें म्हणोन आज्ञा. ऐसियास, मामांनीं उतावळी करावयाची नव्हती. असो. होणारासारखी मामांस बुद्धि जाहली. याउपरी आळा घाली असा सरदार, पाठलागावर फौज आहे त्यांत असोन, मोगल व भोसले एक विचारें मजबुतीनें वर्तेत, असें करावें. येथील वोढीचा प्रकार किती लिहावा ? परंतु श्रीमंत खानदेशांत आले, स्वारी पुढें येईल, याजकरितां चंद्र १२ रोजीं डेरे दाखल जाहले. असो. श्रीमंत नर्मदा उतरणार नाहींत. वरकड सविस्तर अर्थ राजश्री सखारामपंत* बापू व राजश्री बाळाजीपंत नाना यांचे पत्रीं लिहिले आहे. विनंती करतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia writing to Gangabai expresses his readiness to carry out the instructions sent out to him and informs her of his having moved into tents to prevent Raghoba's further progress beyond the Narmada.*

No. 4 16th May 1774.

पौ छ १३ रविलोवल आर्बा.

श्री

राजश्री सखारामपंत बापू* गोसावी यांस :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेषः—श्रीमंत राजश्री दादासाहेब लांब लांब मजलीनें अकस्मात् इंदुरास आले. घरास आल्यानंतर भेटणें प्राप्तच जहालें. जाऊं द्यावें तरी राज्यांत खुडूस† रहातें. जबरदस्ती करावी तरी नाश होतो. समागमें सामान म्हणावें तरी, तीन हजार फौज व दोन हजार गाडद्यांची फौज चांगली निघडद्याची राहिली. श्रीमंत शिबंदी सोडून देईनात व शिबंदी त्यांस न सोडी. तेव्हां अंदेशा प्राप्त

---

*याच मजकुराचें नानांस लिहिलेलें पत्र आहे तें येथें छापलें नाहीं. †शल्य.

जहाला. दोन्हीही प्रकार अयोग्य जाणून सामाचा प्रकार ठराविला. तूर्त खर्चास थोडें बहुत दिल्हें. पुढें शिबंदी राहिली ती वारावी येविसीं ऐवजाची त्वरा आपणांकडून व्हावी, म्हणजे मनसब्यास लांबण लागत नाहीं. करार मदार ठरला, त्याची यादी अलाहिदा पाठविली आहे, व राजश्री महादाजीपंत गुरुजी व विष्णु महादेव यांस सांगितलें आहे. ते लिहितील त्यावरून कळेल. सारांश, ऐवजाची जलदी करून ऐवज पाठवावा. रवाना छ ४ रविलोवल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Sakharam Bapu of Raghoba's arrival at Indore and of his (Mahadji's) having started negotiations to bring about a settlement with him and to disband his followers.*

No. 5 24th May 1774.

पैवस्ती छ १६ रावल

प्रहर दिवस सकाळचा. श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांस :—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष:—आपणाकडील दोन तीन पत्रें आलीं. येथील मजकूर कळत नाहीं ह्मणोन विस्तारयुक्त लेखन केलें. ऐशास, श्रीमंतांचें दर्शन होऊन कमबेश वीस रोज क्रमले. स्नेह अथवा निकर्ष हे दोन्ही प्रकार अयुक्त व असाध्य जाणोन साम लाविला. कोणेही प्रकारें रंग न पडे. वर्तमान वरचेवर राजश्री माहादाजीपंत गुरुजी यांस सांगत होतों. ते लिहितच असतील. इतके दिवस श्रम केल्याचें सार्थक दिसेना. तेव्हां अनेक प्रकारें बोध व हिताहित व आंदेशे धरून विनंती केली. त्यावरून मर्जी मार्गावर येऊन जाबसाल एकनिश्चयांत आणिला आहे. तीन अंश काम जालें. चतुर्थांश राहिला. तो आज उद्याचे दिवसांत शेवटास जाईल. उभयतां सरदारांनीं श्रीमंतांसमागमें देशास जावें. सेंधव्याचे मार्गें खानदेशांतून जाण्याचा विचार होत आहे. तिकडील फौजेची गांठ न पडावी ऐसी मर्जी आहे. जाबसाल लांबणीवर पडला ह्मणोन संदेहाविष्ट होऊन, राजश्री कृष्णराव बळवंत* व राजश्री वामनराव† वगैरे सरदार जलदी करून नर्मदा उतरतील, श्रीमंतांस वसवास होईल, याजकरितां यांनीं रेवा दक्षणतीरींच असावें. श्रीमंतांची स्वारी उभयतां

---

*ऊ० आपा मेहेंदळे. †पटवर्धन.

सरदारांसह कूच करून सेंधव्याचे मार्गे चालल्यानंतर त्यांस लेहून पाठवूं; ह्मणिजे चतुर्वर्ग सरदारांनीं परभारें आपणांस जाऊन मिळावें ऐसें ठरलें आहे. यास्तव आपण असतील तेथेंच मुक्काम असावा. श्रीमंत सरदारांसह सेंधव्याकडे चालले ह्मणिजे राजश्री आपा बळवंत वगैरे सरदारांस लेहून पाठवूं. ते परभारें आपणांस येऊन भेटतील. हेच अर्थ राजश्री गुरुजी व नागो राम व मोरो गिरमाजी व निळो गोपाळ यांनीं लिहिले आहेत, त्यावरून कळेल. रा छ १२ रावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Haripant Phadke of his having good hopes of conciliating Raghoba who on certain terms had agreed to repair to the Deccan. He advises Haripant to keep out of the latter's way so as to avoid the least cause for friction and not scare him away.*

No. 6 29th August 1774.

पैवस्ती चंद्र २९ जमादिलाखर खमस.

हस्ते प्यादे श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांस :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेषः—आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत इंदुरास गेल्यावर करार ठरविला, त्याची यादी व पत्रें पाठविलीं, त्यांचीं उत्तरें आपणावरच भार ठेऊन पाठविलीं. त्या अलीकडे कांहीं जाजती खर्चास ऐवज लागेल अशीं बोलणीं होतात, व जहागिरा व तैनातीचे व असाम्या सोडण्याचेही प्रकार कोणी बोलतात, असें परस्परें ऐकिल्यांत आलें. त्यास आपण तरी अशी गोष्ट कोणाचीही ऐकणार नाहींत. परंतु कोणी भीड घालील, यास्तव सूचनार्थ लिहिलें आहे. येविषयीं सविस्तर राजश्री महादाजीपंत गुरुजी यांस लिहिलें आहे, त्यावरून कळेल. दुरंदेशीनें सर्व अर्थ ध्यानांत आणून, उचित दिसेल तें कराल म्हणोन लिहिलें, तें व गुरुजीचे पत्रावरून सविस्तर कळलें. ऐशियास श्रीमंत कैलासवासी यांसी दगा जाहला, त्यापासून पाऊल वांकडें पडत गेलें. लाखो रुपये मसलतीस खर्च जाहले; परंतु उपयोग न पडला. श्रीमंत इकडे आल्यावर कोण घोळ जाहला, तो आपणांसी कांहीं लोपला नाहीं. परभारां ऐकिलेंच असेल. आपण चित्ता-

पासून मेहनत श्रम करितां, कीं श्रीमंतांचे राज्यांतील बखेडा तुटोन पूर्वानुसंधानाप्रमाणें सुरक्षित चालावें. त्यापक्षीं इकडील अन्य विचार नाहीं. परंतु श्रीमंत कर्नाटकांतून निघोन दरमजल इकडे आले. येथूनही पुढें जाऊं द्यावें, तरी घरकलहामुळें हिंदुस्थानी लोकांस फूस सांपडली. याच स्वारींत रोहिले व जाट वगैरे राजकारणें, मुलूक, पैका हस्तगत व्हावा, तो पातशाहा व वजीर यांनीं घेतला आणि मजबूत जाहले. तमाम सुभे जाहागिरा वाटल्या. दोन लाख फौजेनिशीं वजीर बुंदेलखंडच्या रोखें व नजफखान लाख फौजेनिशीं मारवाड, अजमेर, जयपूर आदिकरून मुलखांत येणार. हें खूळ त्यांत जाऊन मिळतें तरी भोसले, इस्माइलखान व गाइकवाड हे अनुकूलच आहेत. तेव्हां मोठा गाहाच होता. आम्हांवर याच प्रसंगीं दोन तीन वेळ कशी गुदरली, हें वर्तमान आपल्याही ऐकण्यांत आलें असेल. श्रीमंतांस कित्येक प्रकारें बोध करून मर्जी ठिकाणीं आणून, बऱ्हाणपुरानजीक घेऊन आलों. पुढेंही जसा प्रसंग पाहतों, त्याप्रमाणें राजश्री गुरुजी व आम्ही आपल्यास लिहितों. आपणही आम्हांवर भार ठेऊन लिहीत गेलां व लिहितां, त्यापक्षीं येथून लेहूं त्याप्रमाणें घडावें. म्हणजे येथें यांसी बोलूं तें प्रमाण पडून, पुढें श्रीमंतांस विनंती करूं तीस पेंच पडणार नाहीं. श्रीमंतांची मर्जी बहकिवणार चवघे आहेत. त्यांचीं मुलें माणसें सुटल्याचें वर्तमान येत नाहीं. तेव्हां ते मर्जीत अंतर पाडितात. याजकरितां वारंवार लिहितों. परंतु कोणा एकाचींही मुलें माणसें सुटल्याचें वर्तमान येत नाहीं. दुसरें, श्रीमंतांचे खर्चाची तंगचाई; श्रावण मासचा ऐवज देणें तो अद्यापि त्यांस पावत नाहीं; यामुळेंही हिसके बसतात. तरी समागमें मंडळी आहे त्यांचीं मुलें माणसें मोकळीं जाहल्याचीं पत्रें यावीं व गुरुजी लिहितील त्याप्रमाणें ऐवजही आधीं आधीं पाठवावा. सर्व राज्याचा भार आपणावर आहे. तेव्हां मनसबा सुधरून येश आम्हांस ये तेंच आपण करितील. ज्या गोष्टी उपयोगी पडावयाच्या त्याच आम्ही व गुरुजी लिहितों, त्याप्रमाणें घडावें. वरकड कित्येक साधक बाधक प्रकार गुरुजीसीं बोललों आहों, ते आपणास लिहितील. रवाना चंद्र २१ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji suggests to Sakharam Bapu the advisability of releasing from custody the families of the partisans of Raghoba and of making other friendly gestures to create an atmosphere favourable for his settlement and return.*

———

No. 7 3rd September 1774.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे विशेषः—इंदुराहून श्रीमंतांचे कूच करून धुळकोटपावेतों घेऊन आलों. येथून दरमजल तप्तीवर चांगदेव नजीक येतच आहों. तेथें तप्ती उतरून चांदवडचे सुमारास आलें पाहिजे. त्यास राजश्री हरिपंत फडके बोदड पिंपरीवर फौजसुद्धां मुक्काम करून आहेत. त्याजमुळें संशय घेऊन दरमजल येण्यास दिवसगत लागती. आपलीं पत्रें जलदी करण्याविषयीं वरचेवर येतात. याजकरितां राजश्री हरिपंत यांसी कूच करून आपणाकडे जाण्याविसीं पत्रें आम्हीं व राजश्री तुकोजी होळकर व राजश्री महादाजीपंत गुरुजी यांनीं लिहिलीं आहेत. आमच्या लिहिल्यावरून मशारनिल्हे कूच करून आपणाकडे येतीलच. कदाचित् आपल्या पत्राची प्रतीक्षा करितील तरी इकडील मनसब्यास लांबण पडेल. याकरितां आपणास पत्र लिहिलें आहे. तरी आपण मशारनिल्हेस पत्रें पाठवून फौज सुद्धां बोलावून घ्यावें. येथें बहुत प्रकारें मर्जी ठिकाणीं आणून हा विचार केला आहे. येथें कित्येक बारीक मोठे पेंच पडतात. याकरितां वारंवार आपणास लिहितों. परंतु आमलांत येत नाहीं. तेव्हां यांसी आमचें खरेंपण एकही पटत नाहीं. मुलें माणसें एकाचींही सुटल्याचें वर्तमान न आलें. नर्मदेवर चालतांच मुलें माणसें सुटल्याचें वर्तमान येईल असें आमचे बोलण्यांत. याकरितां यांसी आमचें खरेंपण पटून आमचे ठायीं विश्वास ठेवीत असें करावें. मुलें माणसें सर्वांचीं सोडून पत्रें पाठवावीं. हरिपंतांस फौजे सुद्धां घेऊन जावें म्हणजे श्रीमंतांचें येणें निर्वेध होऊन तिकडून येतील. आम्हीं विनंति येण्याविसीं करूं तीही कबूल करितील. हरिपंत कूच करून गेल्यावेगळे यांचा संशय दूर होत नाहीं. राजश्री नारो गणेश व राजश्री बाळाजी गोविंदही आपल्यापासीं पोंहोंचून, कित्येक अर्थ करण्या न करण्याचे आहेत, ते आपल्यासीं बोलतील. सर्व भार आपणावर आहे. त्यापक्षीं मनसब्याचा समारोप होऊन आम्हांस यश ये तेंच आपण करतील. रवाना छ २६ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*The recall of Haripant's army from the neighbourhood of the Tapti is urged by Mahadji upon the attention of Nana Fadnis so as to create an atmosphere of goodwill and friendliness.*

No. 8 9th September 1774.

पौ छ १४ साबान खमस

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः— आपण पत्र पाठविलें तें पावलें. तुम्हीं चांवडसास*श्रीमंतांस घेऊन येणार. त्यास, श्रीमंत मातुश्री बाईसाहेब गंगापुरीं राहतात. तें स्थळ त्यांस सोडणें नाहीं. तेव्हां उभयतांचें राहणें श्रीमंत आनंदवल्लीस राहिल्यानें जवळ पडतें हें ठीक नाहीं. याकरितां श्रीमंतांचे राहणें कचेश्वर कोपरगांव गंगातीर येथें व्हावें, हें उत्तम. तरी आपण श्रीमंतांसी बोलून पक्कें करावें. हे गोष्ट जरूर जाहली पाहिजे, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियास पहिलें श्रीमंतांसी बोलण्यांत आलें, तें आपणास लेहून पाठविलेंच आहे व राजश्री बाळाजी गोविंद आपणाकडे पाठविले तेहि आपणासी सविस्तर बोलतील त्यावरून कळेल. पहिलें बोलण्यांत आलें असतां हाली हा प्रकार बोलल्यास त्यांचे चित्तांत संशय येऊन येण्यास दिवसगत लागेल. तथापि जेथवर आमच्यानें होईल त्यास अंतर होणार नाहीं. कळावें. रा छ २ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji expresses misgivings if it would be agreeable to Raghoba to fix his residence at Kopargaum instead of at Chavdas near Gangapur. He assures that he would try to persuade Raghoba to accept the change.*

No. 9 27th September 1774.

पौ छ २७ साबान खमस.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावें. विशेष :—आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री नागो राम आले यांनीं साद्यंत

---

* चांवडस म्ह० आनंदवल्लीचें पहिलें नांव, नासिक जिल्हा.

मजकूर सांगितला तो कळला. त्यास, इतःपर श्रीमंतांच्या येण्यास दिवसगत न लागतां, घेऊन लौकर यावें ह्मणोन लिहिलें, तें कळलें. ऐसीयास येविशींचा मजकूर तरी, श्रीमंतांची मर्जी कसी आहे हे आपल्यास लोपली नाहीं. तथापि नाना प्रकारचा यत्न करून तापीतीरीं चांगदेवापाशीं उत्तर तीरपर्यंत घेऊन आलों. नदी उतरावयाचा गुंता आहे. उतरावयाची दिवसगत लागेल ती खरी. वरकड मजकूर आगोधरच लिहिले आहे. रा छ २० रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes in reply to Sakharam Bapu that he was exerting his best to hasten Raghoba's return.*

No. 10 10th October 1774.

पो छ २८ साबान खमस

हस्ते खिजमतगार.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण छ २१ रजबचें पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, श्रीमंतांकडील मसलतीस दिवस फार लागले. आपण आपले घरीं गेले, याकरितां मेहनत फार केली. परंतु स्वभावास उपाय काय? आपले प्रत्ययास सर्व आलेंच आहे. येविसीं राजश्री गुरुजीस लिहिलें आहे, त्याप्रमाणें चित्तांत आणून करावें. आतां परीक्षा पाहण्याचे दिवस राहिले नाहींत. सर्वही आपणास अनभवास आलें आहे. लौकर समारोप करावा. काय तें कळवावें म्हणोन. त्यावरून व राजश्री गुरुजीस लिहिलें त्यांनीं सांगितल्यावरून सविस्तर कळलें. ऐसीयास मसलत लांबवावयाची आम्हांस हौस नाहीं. अथवा इकडे घासदाणा अगर खंडण्या घ्याव्या, चार दिवस पोट परभारें भरावें, कांहीं गुंता म्हणावा, तरी नाहीं. दिवसगत लागल्यानें मनसब्याचे दिवस हेच आहेत ते निघून गेल्यावर केवढी नुकसानी होईल, आणि पेंच पडतो, हा ध्यानांत न ये सें नाहीं. परंतु करावें काय? स्वभावास आपण पुर्ते माहीतच आहां. येथपर्यंत घेऊन आलों. पुढेंही घेऊन यावें, लौकर समारोप करावा, याच उद्योगांत. दुसरें काम तें कोणतें? असें

असोन घोळ घालून दिवस लावणें हें ठीक नाहीं. कोणता प्रकार तो लौकर समजावा म्हणोन लिहिलें. त्यास श्रीमंतांचा सरळ प्रकार, परंतु आम्हीच घोळ घालून मसलत लांबवितों, हेच समज असल्यास उत्तम आहे. अस्तु. गुरुजींस सर्व ठाऊक आहे. हे मसलत लौकर समेटावी येविसींचें राजश्री गुरुजीसी बोललों आहों ते आपणास लिहितील; व येथून राजश्री बाळाराव गोविंद यांस लिहिलें आहे ते आपणास सांगतील. त्यावरून सविस्तर कळेल. इकडील कोणे गोष्टीविसीं चित्तांत संशय न आणावा. रवाना छ. ४ साबान. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji retorts to Sakharam Bapu why he could not be held responsible for the dilatory tactics adopted by Raghoba in returning to Poona. He adds that he was leaving no stone unturned in hastening his march back.*

No. 11 7th October 1774. (?)

पो छ. १२ साबान खमस.
(18th October 1774).

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन, स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेषः—आपण पत्र पाठविलें तें पावलें. आपण लिहीत गेले आणि आम्हीं न केलें असें तरी दिसत नाहीं. पैका कराराप्रमाणें दिल्हा. मुलें माणसें आपण लिहिल्याप्रमाणें सोडलीं असतां, वारंवार पत्रें येतात. सदाशिव रामचंद्र व हरिपंत भिडे यांचे घरचींच पत्रें घेऊन हल्लीं पाठविलीं आहेत. दोघांचींच सुटलीं असें ध्यानांत येईल, तरी सर्वांचीं सोडलीं. पत्रें मात्र कळावयाकरितां दोन घेऊन पाठविलीं. बाळाराव आले म्हणजे सर्वांची रुजुवात करून देऊं. तिकडील राजकारणें होतच आहेत. श्रीमंत करितात तें आढळतें. गाडद्यांस पैका दिल्हा असतां आसपासच आहेत. एकही गोष्ट जाहली कीं काय, हें ध्यानांत येतच असेल. याचे विस्तार बहुत वेळ लिहिले गेले. किती ल्याहावेत? आपला आमचा विचार दुसरा नाहीं असें समजोन करितों; आणि आपण या मसलतीचें

यश लौकर घ्यावें, हेच इच्छा आहे. श्रीमंतांचे स्वभाव पूर्वीपासून आपणास ठाऊकच आहेत. प्रस्तुत समागम जाहल्यापासूनही अनभव आलाच असेल. पुढेंहि फार येईल. याचा विचार पुर्ता करावा म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास इकडील प्रसंग पाहून आपणांस लिहीत गेलों. त्याप्रमाणें आपणाकडून घडत आलें व पुढेंहि घडेल. आपण लिहितात त्याप्रमाणें इकडूनही कित्येक गोष्टी घडोन आल्या व घडतील, हे परस्परे खातरजमाच आहे. मुलेंमाणसें सोडलीं नाहींत, याकरितां वारंवार बोभाट सांगतात, त्यावरून पत्रें लिहिलीं. सदाशिव रामचंद्र व हरिपंत भिडे यांचे घरचीं पत्रें पाठविलीं म्हणोन लिहिलें. परंतु पत्रें आलीं नाहींत. चुकोन राहिलीं असलीं तरी मागाहून येतील. कोण्हा कोण्हाचीं राहिलीं असलीं, तरी राजश्री बाळाजी गोविंद आपणांस सांगतील, त्याप्रमाणें सोडून देवावीं. गाडदी बऱ्हाणपूरचे मुक्कामाहून घालविले; राजकारणें करितात. त्यास श्रीमंतांचा स्थाईभाव आपणास समजलाच आहे. राजकारण केल्यास साध्य होणें दुरापास्थ. इंदुरापासून निघाल्यास राजकारणें करण्यांत कमी केली नाहीं. सिद्धीस कोणतीं गेलीं हें ध्यानांत न ये सें नाहीं. तापीतीरीं चांगदेवानजीक आल्याचें वर्तमान राजश्री गुरुजीनीं आपणास पेशजीं लिहिलें आहे, त्यावरून कळलें असेल. राजश्री हरिपंतांनीं कूच करून पुरंधरास जावें, भाद्रपद मासचा ऐवज द्यावा, तेव्हां तापी उतरोन चालावें म्हणोन येथें मुक्काम केले. त्यास, तापी उतरल्यावर हरिपंतांस लिहून पाठवूं व पैक्याचीही तजवीज होईल, कूच करावें, हेंच आमचें बोलणें आहे. दों चौ रोजीं कूच होऊन तापी उतरल्यानंतर, हरिपंतांस घाट चढून जावयास लेहून पाठवूं; व ऐवजाचीही तजवीज गुरुजीकडून करून देविली जाईल. हे मसलतीस लांबण न पडतां लौकर आटोपावी हेंच लक्ष आमचें. दुसरा अर्थ नाहीं. येविसींचे साधक बाधक प्रकार आहेत ते राजश्री बाळाजी गोविंद आपणास सांगतील, ते मनन करून उत्तर सत्वर यावें. वरकड कित्येक वर्तमान गुरुजी लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ शाबान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶ *In reply to the remonstrance of the Poona ministry about Raghoba's delay in crossing the Tapti, Mahadji urges that he was pressing the point earnestly and would offer no more concessions to Raghoba.*

No. 12 15th October 1774.

पौ छ २६ रमजान खमस

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष :—आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. ऐसियास येथून राजश्री नारो गणेश व राजश्री बाळाराव गोविंद पाठविले आहेत. आपल्यासी भेटून परस्परें वर्तमान कळलें असेल, व इकडीलही साद्यंत उभयतांनीं सांगितलें असेल. वरकड राजश्री महादाजीपंत गुरुजीस सुचविलें आहे. तपसीलवार लिहितील त्यावरून कळेल. रा छ ९ साबान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Sakharam Bapu of his having sent two persons to Poona to explain the situation to him personally.*

No. 13 28th June 1775.

पौ छ १७ जाखर सीत

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपला आमचा स्नेह अकृत्रिम असोन, या दिवसांत पूर्ववत्प्रमाणें दिसोन येत नाहीं. यास्तव राजश्री नारो शंकर* येथून आपणाकडे पाठविले आहेत. सर्व अर्थ आपणासीं बोलतील. यांसी नेहमीं आपणापासीं राहावयासीं सांगितलें आहे. हे तेथें राहातील. यांचे हातें इकडील जाबसाल घेत जावा. वरकड कोणी जाबसाल करील, तरी प्रमाणांत न मानावा. जाबसालाची बचबच जाहाली, याकरितां मशारनिले इकडील विश्वासुक जाणोन

*माहादजीचा कारकून, पहा ता० ३१ मे १७७७ चें पत्र, ले. ३८.

पाठविले असेत. हे बोलतील तें प्रमाण मानीत जावें. रा छ २९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having deputed Naro Shankar to Poona as his envoy.*

No. 14 10th September 1775.

नकल.

श्री

यादी* निा माहादजी शिंदे. सुा सीत सबैन मया व अलफ. छ १४ रजब, भाद्रपद.

देशीं सरंजाम थोडका आहे. स्वरूपायोग्य नाहीं. यास्तव सरंजाम जाहागीर कृपा करून देणार, ते देशीं जागा लावून द्यावी.

सालगुदस्तां पांचा लक्षांची जाहागीर द्यावी ऐसें बोलण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत करार करून दिल्ही जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

खत साडे सहा लक्षांचें लक्ष्मण नाईक चाबुकस्वार याचे नांवें दिल्हें आहे, तें कृपा करून माघारें द्यावें. सरदारी वोढीखालीं बहुत आली. ऐवज द्यावयास जागा नाहीं. यास्तव कृपा करून देवावें.

सदरहूपैकीं सूट रुपये ४,००,००० चार लक्ष दिल्हे जातील. येणेंप्रमाणें करार करावें.

देशीं मुलें माणसें ठेवावयास जागा नाहीं. यास्तव किल्ला चांगला जाहागीर-सुद्धां द्यावा.

एक किल्लयापुरता सरंजाम लावून दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

हिशेबाचा आजपर्यंत फडशा जाहला नाहीं. त्याचा फडशा करावा.

वाजवी रीतीनें हिशेबाचा फडशा करून दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

किरकोळ गांव व कुरणें वगैरे यांची याद आलाहिदा आहे, त्याप्रमाणें पत्रें करून देवावीं.

---

*पुण्याचें कारभारीमंडळ व माहादजी शिंदे यांमधील करार. मागणी शिद्यांची, जबाब कारभाऱ्यांचा.

जरुराती कार्याकारण किरकोळ कामें करून दिल्हीं जातील. येणेंप्रमाणें करार.

येणेंप्रमाणें पांच कलमें करार केलीं आहेत. त्यास सरकारलक्ष तुम्हीं परिछिन्न धरावें.

श्रीमंत राजश्री दादासाहेबांचें लक्ष सर्वात्मना धरूं नये. श्रीमंतांकडील राजाराम गोविंद* वगैरे जे असतील, त्यांचा पुर्तेपणें पक्का बंदोबस्त करावा. राजकारणें श्रीमंतांकडे कागदीपत्रीं असतील तीं बिलकूल मोडावीं. सिलसिला† काडीमात्र तिकडे नसावा. याप्रमाणें शफतपूर्वक मनांत धरून करावें; आणि आश्विनमासीं नर्मदा उतरोन, कार्तिक शुद्ध पौर्णिमेपर्यंत पुरंधरीं दर्शनास यावें. याप्रमाणें तुम्हांकडून व्हावें. सरकारांतूनही सदरहूप्रमाणें अंमलांत येईल. येणेंप्रमाणें करार करावें.

¶*This is an agreement between Mahadji Sindia and the Poona ministry It contains Sindia's several demands to which the ministers have recorded their replies.*

No. 15 28th March 1776.

पौा चंद्र १८ रविलावल सीत, चैत्र.

श्री

दंडवत विनंती उपरी. आपण स्वदस्तुर चिट्ठी पाठविली, ती पावून संतोष जाहला. याउपर संकल्प विकल्प कोणे गोष्टीचा राहिला नाहीं. येतों. वरकड कित्येक बारीक मोठें वर्तमान, राजश्री सदाशिव दिनकर‡ पाठविले आहेत, हे सविस्तर सांगतां कळेल. रवाना चंद्र ७ सफर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*This is a note from Mahadji to Nana Fadnis, despatching Sadashiv Dinkar to explain his attitude.*

No. 16 6th April 1776.

पौ चंद्र २८ सफर सीत चैत्र

श्री

पुा राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी, आपली स्वदस्तुरची चिट्ठी आली, त्याच क्षणीं कूच करून निघून यावें. त्यास, चिरंजीव बहिरजी ताकपीर मेवाडांत आहेत, त्यांनीं

---

*रघुनाथरावाचा सरदार. †संबंध, संधान. ‡नानाच विश्वासु वकील.

आमचें लक्ष सोडून चहूंकडे सूत्रें केलीं. आम्ही रेवा उतरून देशास चाललों म्हणजे त्यांनीं इकडे उपद्व्याप करावा हा विचार करून, येथून पेशजी त्यांचे कुमकेस पागा व पथकें पाठविलीं होतीं, त्यांतून एक दोघांस दगा केला, त्यावरून धनसिंग पाग्या म्हणोन आहे, तोच तेथून निघून आला. त्यानें ताकपिराचे बदनजरेचें वर्तमान सांगितलें. तें पत्रीं कोठवर लिहावें ? हा बंदोबस्त न करितां कसें यावें ? यामुळें दोन दिवस गुंता पडला. ताकपिराचे पारिपत्यास फौज पाठविली आहे. दुसरें, श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील वर्तमान काय येतें ? तेथून निघून इकडे येऊं लागल्यास, राजश्री हरिपंतास, पाठलाग करीत जलद यावें, आम्ही इकडे आहों, आल्यास गांठ घालतों, म्हणून पत्रें पाठविलीं आहेत. अनायासें असा प्रकार घडल्यास हाहि बंदोबस्त करावा असें आहे. याचें उत्तरहि लवकरच येईल, व ताकपिराचा बंदोबस्त थोडक्याच दिवसांत करून लवकर येतों. याउपरी इकडील येण्यांत संशय न मानावा. श्रीमंतांचें दर्शन घेऊन आपली आमची भेट व्हावी, भेटीनंतर बोलण्याचे अर्थ घडावे, हेंच मानस आहे. दुसरा विचार किमपि नाहीं. येविषयीं राजश्री सदाशिव दिनकर सांगतील व राजश्री नारो शिवदेव लिहितील, त्यावरून सविस्तर कळेल. रवाना चंद्र १६ सफर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his march being delayed by disquiet in Meywar caused by his son-in-law, Bahirji Takpir. He expresses his eagerness to reach Poona as early as possible.*

No. 17 4th June 1776.

पौा छ १९ रबिलाखर सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा माहादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष :—आपण राजश्री सदाशिव रघुनाथ कारकून पाठविले, त्यांचे सांगितल्यावरून सविस्तर अर्थ कळला. ऐसियास येविसींचे अर्थ राजश्री महादाजीपंत गुरुजी यांसीं बोलिलों आहों. हे लिहितां कळेल. सदैव पत्रीं तोषवीत जावें. रा छ १६ राखर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia informs Nana of his having learned all details from Sadashiv Raghunath deputed by the latter.*

No. 18 28th October 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. आपण सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें, तें पावलें. तेथें लिहिलें कीं, आपण व राजश्री भिवराव* भेटलां; उत्तम जालें. घाटाखालीं जाऊन तोतयाचें† पारपत्य लवकर होऊन बंदोबस्त होय तें करावें म्हणोन, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसीयास काल रविवारीं‡ लढाई जाल्याचें वर्तमान लिहिलेंच आहे. रात्रीं राजश्री हरिपंतांचे पुत्र व बच्याजीपंत बरवे यांचे पुत्र येऊन भेटले. तोतयाची जमीयत जिकडील तिकडे मारली गेली. राहिले ते चार चोहोंकडे पळून गेले. तोतया पळून कोंकणांत जात आहे. याकरितां आम्ही सडे स्वारीनिसीं आज बोरघाटानें उतरोन पाठलाग करीत जात असों. वरकड काल लिहिलेंच आहे. रवाना छ. १४ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having defeated the Pretender and undertaken his pursuit in the direction of Bhor Ghat.*

No. 19 30th October 1776.

पैवस्ती छ १७ रमजान सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री भिवराव पानसे यांचें पत्र सोमवारचें आलें. तोतया दोनशें माणसांनिसीं पळाला; पेणेकडे गेला; आम्ही पाटिलबावांकडे जातों; विचार करून खालीं जाऊं; म्हणोन लिहिलें. त्यास आपण लढाई मारली, तेव्हां ह्यांत दम कोठें राहिला ? या-उपरी घाटाखालीं जलदी उतरोन जावें. दादांची व गणेशपंताची §लढाई जाहली. त्यांत दादाकडील मोड जाहला म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास तोतयाची लढाई होऊन तोतया पळोन गेला. झुंजांत माणसें जखमीं जाहलीं. याकरितां लष्करांत येऊन, त्यांचा समाचार घेऊन, त्यांचा बंदोबस्त करून, दुसरे दिवशीं काल सोमवारीं कूच करून, बारा कोस घाटाखालीं खोपवलीपुढें

*भिवराव पानसे पेशव्यांच्या तोफखान्यावरील मुख्याधिकारी. †सदाशिवराव भाऊ याचा तोतया. ‡ता. २७-१०-१७७६ रोजीं. §गणेशपंत बेहरे.

एक कोस येऊन मुक्काम केला. राजश्री भिवराव यांस राजमाचीकडे पाठविलें. ते त्या मार्गे जाऊन राजमाचीनजीक गेले. माचीवरील रामराव येऊन भेटला. मशारनिल्हेनीं शंभर माणूस किल्लयावर ठेविलें. विसापुरास पंचवीस माणूस पाठवून, त्याच मार्गे उतरून पनवेलीचे मार्गे गेले. पनवेलीचे मार्गे लुगारे* पुढें गेले. त्यांनीं तट्टें घोडीं आणिलीं व पालीचे मार्गेही लुगारे गेले त्यांनींही घोडीं, उंटें, पालख्या, अबदागिरें आणिलीं. पानसे यांचें आमचें अंतर ते तिकडून गेल्यावरून पडलें. आम्हांपासीं माहितगार कोणी नाहीं. याजकरितां मुक्काम करून, फौज दोहीं मार्गे पुढें रवाना केली. रात्रींतून बातमी येईल त्यासारखें प्रातःकालीं कूच करून जाऊं. कळावें. तोतयाचे पाठलागावर फौज पाठोपाठ रवाना जाहली आहे. रवाना चंद्र १६ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*This is Mahadji's letter to Nana conveying more details of the defeat of the Pretender and of his pursuit.*

No. 20 30th October 1776.

पैवस्ती चंद्र १८ रमजान सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. आपण तोतयावर चालोन जाऊन पारपत्य केलें. तोतया पळोन गेला म्हणोन ऐकिलें. त्यास, आपण खालीं उतरोन वाटांची बंदोबस्ती करावी म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास श्रीमंतांच्या प्रतापापुढें तोतयाचा मजकूर तो किती ? तोतयाचें पारपत्य होऊन पळाल्यावर, दुसरे दिवशीं कूच करून बोरघाटाखालीं आलों. तोतया रातोरात पळोन गेला. एक पनवेलचे मार्गाची बातमी, दुसरी पालीचे मार्गाची बातमी आली. पानसे पनवेलचे मार्गे राजमाचीखालीं उतरोन गेले व फौज इकडील दोन्ही मार्गे रवाना केली. आम्हीही कूच करून त्याचे पाठीवर आहों. जिकडील बातमी येईल तिकडे लगट करून जाऊं. रस्त अद्यापि येत नाहीं. तरी ठाण्यास व चारणास ताकीद करून हर जिन्नस रस्त पोहचे अशी तरतूद सत्वर जाहली पाहिजे. रस्तेखेरीज महर्गता जाहली. आधीं आधीं ताकीद करून रस्त पाठवावी. रवाना चंद्र १६ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*The defeat and pursuit of the Pretender are described in this letter by Mahadji to Nana. A speedy supply of provisions is requested.*

---

*लूट करण्यासाठीं नेमलेले लोक.

No. 21 1st November 1776.

पौ छ १८ रमजान

पाहाटेची दाहा घटका रात्र.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष-तोतिया बेलापुराहून पळोन तरांडचांत बसोन ममईस जात होता. ते बातमी राजश्री राघोजी आंगरे यांस कळतांच, शंभर माणसांनिशीं तरांडचांत बसोन जाऊन, मोठे मेहनतीनें तोतया काल संध्याकाळीं गुरुवारीं धरला. त्याच वेळेस भावसिंग चोपदार व रामरतन परदेशी या दोघांबरोबर आपले कंबरेचें पेशकबज खुणेस देऊन पाठविलें. ते आज भृगुवारीं दीडप्रहर दिवसास आले. त्याच समयीं राजश्री बाळाराव गोविंद व राणेखान* आंगरे यांजकडे तोतयास आणावायस फौज सुद्धां पाठविले आहेत. आपणास कळावें म्हणोन लिहिलें असे. रा छ १८ रमजान. परांजपे वगैरे मंडळी सांपडली म्हणोन सांगतात. तपसीलवार मागाहून लेहून पाठविलें जाईल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia communicates to Nana the happy news of the capture of the Pretender by Raghuji Angre while he was running away to Bombay to seek the protection of the English.*

No. 22 3rd November 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. तोतयाचें पारपत्य आपण केलीयावरी तो राजमाचीहून पळोन गेला. आपण बोरघाटानें खालें गेले. राव भिवराव राजमाचीचे घाटानें गेले. तोतयाचे पाठलागास आपली सडी फौज गेलीच असेल. हस्तगत जाल्यास उत्तम. न जाहल्यास जमाव फुटोन त्याचा बंदोबस्त केलाच असेल. त्याजकडील बातमी येईल तसी तरतूद करावी. बोरघाटानें उतरला, ते समयीं वाटाडे नव्हते. यामुळें लष्करची हैराणगत जाली. घोडीं

*राणेखान भाई, शिंद्याचा एक प्रमुख सरदार.

जायां जाहलीं. भिवराव व विसाजीपंत लेले माहित असतां, माहितगार आपणाबरोबर दिल्हे नसतील, व आणखी कांहीं त्यांजपासून गोष्ट चुकली असली, तरी आपण मनांत आणूं नये. आपण बंदोबस्त जाल्याखेरीज माघारे यावयाचें न करावें. भिवराव चुकले तरी त्यांस सांगत जावें ह्मणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें.

तोतया राजमाचीहून पळोन बेलापुरास गेला. तेथें भाड्याचीं तरांडीं करून ममईस जात होता. त्यास, राजश्री राघोजी आंगरे यांस सासवडचे मुक्कामाहून तोतयाचे बंदोबस्ताविसीं लिहिलें व कारकुनाबरोबर सांगोन पाठविलें होतें. त्या सूचनेवरी त्यांनीं बातमी राखून, जातीनिसीं जाऊन, तोतया झाडून मंडळी सुद्धां धरून कुलाब्यास आणिला, आणि आह्मांकडे सांगोन पाठविलें. त्यावरून राजश्री बाळाराव गोविंद व राणेखानभाई आंगरे यांजकडे पाठविले आहेत. घेऊन येतील. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें तोतया हस्तगत जाहला. गुंता राहिला नाहीं. उभयतां आंगरे यांजकडे पाठविले आहेत. ते येत तोंपर्यंत येथें मुक्काम आहे. रा. भिवराव यांस राजमाचीचा जातां जातां बंदोबस्त करून तिकडून येणें ह्मणोन सांगितलें; त्यावरून राजमाचीकडून तोतयाचें ठिकाण लागावें या अर्थें कल्याणाकडे गेले. त्यां समागमें सडी फौज इकडील गेलीच आहे. भिवराव वगैरे यांजकडून एखादी गोष्ट चुकली, तरी चित्तांत दुसरा विचार येऊन बंदोबस्त न होतां माघारें येणें कसें घडेल ? तोतया येथें आणविला, तो आला ह्मणजे कूच करून येऊं. आंगरे यांनीं या समयीं चाकरी सरकारची चांगली केली. रा छ २० रमजान. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia sends Nana details of the capture of the Pretender and of his pursuit by Bhivrao Panse.*

No. 23 5th November 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री राघोजी आंगरे यांणीं तोतया धरला आणि आह्मांकडे सांगोन पाठविलें. त्याजवरून येथून रा॥ बाळाराव व राणेखान पाठविले. त्यांचा मुक्काम आंगरे यांणीं नागोठण्यास करविला. कारण आमचा मुलूक तुडवेल, तुह्मीं तेथेंच मुक्काम करावा, आह्मीं तोतया घेऊन येतों. त्याजवरून यांणीं मुक्काम करून निंबाजी विठ्ठल कारकून आंगरे यांजकडे पाठविले. त्यास आंगरे यांनीं

प्रस्थान केलें. दुसरे दिवशीं निधोन यावें, तों इंग्रेजांचें पत्र मुंबईहून आलें. त्याचें वर्तमान निंबाजी विठ्ठल यांणीं बाळाराव यांस लिहिलें. तें पत्र त्यांणीं येथें पाठविलें, आणि उभयतां कूच नागोठण्याहून आज करून कुलाब्यास गेले. उभयतांकडून पत्रें आलीं, तींच बजिन्नस आपणाकडे पाठविलीं आहेत. त्याजवरून सविस्तर कळेल. इंग्रेजांकडील वकील तेथें आहेत. त्यांचीं पत्रें जनरालास मुंबईस पाठवावीं कीं, तोतयाकडील तुह्मांपाशीं कोणी येऊन भलतेंच समजावितील; तरी तुम्हीं मुनास न आणावें. तुमचा आमचा स्नेह, त्यापक्षीं तुह्मी कोणाचें ऐकणारच नाहीं. तोतया कुलाब्यास आहे. त्यास आणावयास फौज पाठविली आहे. घेऊन येतील. याप्रमाणें पत्रें वकिलाचीं व सरकारचीं जलदीनें मुंबईस परभारें पाठवावीं, व एक पत्र हिकडे पाठवावें. इकडून त्यांजकडे पाठवून देऊं. आह्मी येथून पत्रें पाठवितों, परंतु जनराल कोण आहे, त्याचें नांव ठाऊक नाहीं. याकरितां आपणास लिहिलें असे. पत्रें सत्वर पाठवून द्यावीं. राघोजी आंगरे यांसही पत्रें सरकारचीं व आपलीं पाठवावीं कीं, तुह्मीं इंग्रेजाकडील संशय चित्तांत न आणावा. तोतयास घेऊन यावें. बाळाराव व राणेखान गेले. त्यांची भेट जाहाल्यावर काय मजकूर लिहिला येईल तसें लिहून पाठविलें जाईल. रा छ२२ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana Fadnis to write at once to the Governor of Bombay not to offer British protection to the Pretender.*

No. 24 8th November 1776.

पैवस्ती छ २६ रमजान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब डहाणूच्या सुमारें कल्याणापासून जवळ आहेत. त्यांचे पिच्छावरी रा गणेश विश्वनाथ फौज सुद्धां आहेत. श्रीमंतांजवळ सामान फार थोडकें आहे. या समयीं सहजांत काम व्हावयाचें आहे. आपण जाऊन हस्तगत करून आणिलीयास उत्तम. आपले जाण्यानें भडकतात असें असिलें, तरी फौज भिवराव यांजकडे पाठवून, काम होय तें करावें ह्मणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास आंगरे यांजकडे रा बाळाराव व राणेखान गेले. तेथें वातमी श्रीमंत दादासाहेबांकडील

आली, ते उभयतांनीं लिहिली. तें पत्रच बजिन्नस कासीदजोडीबरोबर पाठविलें आहे, त्यावरून कळेल. तारापुरावरी दीडशें माणसांनिशीं आहेत. मातबर फौज त्यांजपाशीं असती, तरी आह्मीच फौज सुद्धां जातों. सामान थोडकें, तेव्हां आह्मी येथून कूच केल्याची बातमी कळतांच पळोन जातील. पाण्यांत पळोन गेल्यास उपाय नाहीं. फौजेचा उपद्रव मुलकास लागोन खराब होईल. याकरितां राजश्री भिवराव व विसाजीपंत येथें आले आहेत, त्यांसमागमें फौज देऊन उदईक रवानगी करतों. श्रीमंतांजवळ सामान कांहींच नाहीं. तेव्हां यांची गांठ पडल्यास गुंता पडणार नाहीं. श्रीमंत राजश्री रावसाहेब पुण्यवान्, प्रतापी आहेत. सर्व खुळें वाताहत होऊन बंदोबस्त होईल. आंगरे यांची व इकडून उभयतां पाठविले त्यांची भेट जाल्यावरी पत्रें आलीं, तीं आपल्याकडे पाठविलीं आहेत. त्याप्रमाणें इंग्रजांस पत्रें मुंबईस परभारें पाठवावीं व एक पत्र इंग्रजांचे नांवें व एक पत्र आंगरे यांस खातरजमेचें पाठवावीं. मुंबईस पत्रें दोन तीन परभारें, आंगरे यांसी बरकसी* न करीत असीं जावीं. रवाना छ २५ रमजान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji communicates to Nana Fadnis the arrival of Raghunathrao at Dahanu and the measures that he (Mahadji) had taken to detach a force and capture him.*

No. 25 16th November 1776.

पैवस्ती चंद्र ६ सवाल सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यांसी सरकारचें पत्र पाठविलें आहे. आपणही त्यांची खातरजमा करून, तोतया मंडळी सुद्धां आणावयासी पाठविले त्यांचे स्वाधीन होऊन येई तें करावें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास आपण लिहिल्याप्रमाणें त्यांची खातरजमा केली व सरकारचेंही पत्र त्यांस प्रविष्ट केलें. त्यावरून राजश्री सरखेल मंडळी सुद्धां तोतयास घेऊन आले. त्यांच्या आमच्या भेटी काल शुक्रवारीं जाहली. तोतया धरल्या मंडळी सुद्धां आला. अतःपर एका दों दिवशीं येथून

---

*द्वेष, कलह.

कूच होऊन सत्वरच तिकडे येणें होईल. सरखेलही समागमेंच आहेत. भेटीनंतर सविस्तर कळेल. रवाना छ० ४ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of the arrival of Raghoji Angre with the Pretender in his camp and of their intention to proceed to Poona by quick marches.*

No. 26 17th November 1776.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपणाकडून या दिवसांत पत्र आलें नाहीं तर लिहीत असावें. यानंतर राजश्री राघोजी आंगरे यांनीं तोतया हस्तगत केला. त्यास आणावयाकरितां येथून राजश्री बाळाजी गोविंद व राणेखान पाठविले होते. ते आंगरे यांसी घेऊन पंधरावे दिवशीं खालापूरचे मुक्कामीं आले. भेटी जाहल्या. तोतया मंडळी सुद्धां बंदोबस्तांत आहे. आज मंदवारचा येथें मुक्काम, आंगरे यांचे बुनंगे यावे म्हणोन जाहला. उदईक रविवारीं कूच करून खालापुरास मुक्काम योजिला आहे. दरकूच घाटावर चढोन पुण्यास येत आहों. कित्येक मजकूर राजश्री नारो शंकर यांसी लिहिले आहेत, ते श्रवणारूढ करून, उपयुक्त असेल तें लिहावें व लिहवावें. रवाना चंद्र ५ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Sakharam Bapu from his camp at Khalapur that Raghoji and he with the Pretender were shortly marching towards Poona.*

No. 27 24th November 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी मंगळवार प्रतिपदा अगर बुधवारीं पुण्यास यावयाचा विचार होता. त्यास राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यांचे भेटीचा मुहूर्त पंचमी भृगुवारीं अठरा घटकांनंतर आहे. याकरितां हलक्या मजली करीत येत असों. भृगुवारीं सरखेल सुद्धां पुण्यानजीक मुक्काम होऊन भेट होईल. रवाना चंद्र १२ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji intimates to Nana his intention of arriving at Poona on the following Friday.*

No. 28 26th November 1776.

पैवस्ती छ १७ सवाल सबा.

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. तोतया मंडळी सुद्धां धरून आणिला. त्यांत लक्ष्मणपंत कोलटकर आहेत. त्यांस राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यांचे स्वाधीन करावें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास येविसीं राजश्री बाळाजीपंत नाना यांचेंही पत्र पेशजीं आलें होतें. त्याच समयीं सरखेल यांचें स्वाधीन मशारनिल्हेस करावयाचें केलें. परंतु कोलटकर यांची मर्जी येथेंच राहावयाची पाहिली. सरखेल यांजकडे न जात. तेव्हां समागमेंच आहेत. लोकांस निरोप द्यावयाकरितां एक दोन मुक्काम जाहले होते. इतःपर दरकूच दो मजलीनें येऊन पोहचूं. भेटीअंतीं सर्व कळेल. रवाना छ १४ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Sakharam Bapu that he was bringing Lakshmanpant Kolhatkar, Parvatibai's brother, a prisoner with him.*

No. 29 27th November 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील कितेक मजकूर समक्ष बोलून, पुढील कर्तव्याचा विचार आपले विचारें करावा. त्यास, राजश्री राघोजी आंगरे यांचे मुहूर्ताचा मजकूर शनवारचा ठरवून लिहिला. उत्तम आहे. भेटीनंतर कळेल, म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसियास शनिवारीं येतों. भेटीनंतर समक्ष बोलून सर्व अर्थ समजण्यांत येतील. रा छ १५ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji agrees to meet Nana and talk over all details with him on Saturday as suggested by the latter.*

No. 30 27th November 1776.

पैवस्ती छ १६ सवाल सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. कोंकणांतील किल्ले-कोटांचे बंदोबस्तास पथकें रवाना केलीं. त्यास, कुरवंडयापासून तळें, घोसाळें, अविचितगड सुभा व माहाड यांचा बंदोबस्त अगोदरच जाहला. राजश्री बाजीपंत* यांस फौज सुद्धां सुवर्णदुर्गाकडे रवाना केलें. त्यास, सुवर्णदुर्ग व अंजनवेलकरी येऊन रुजू जाहले. रत्नागिरिही आली. तेथें आपाभट व परांजपीण† होती. तीं दोघें सांपडलीं. विजयदुर्गावरी निशाण चढल्याचें पत्र आलें नाहीं. आलियावरी लेहून पाठवूं. वरकड बंदोबस्त जाहला. विजयदुर्गासही सूत्र येऊन सरकारचे लोक गेले. उशीर लागणार नाहीं. मुख्य तोतयाचें पारपत्य आपण केलें यामुळें जाहलें, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळोन बहुत संतोष जाला. ऐसियास श्रीमंत ईश्वरी अंश, त्यांच्या प्रतापेंकरून सर्वही गोष्टी घडणें त्या घडल्या. आह्मी सेवक. सेवा मात्र करावी इतकाच अर्थ जाणतों. परांजपीण व आपाभट यांस जरूर पुण्यास येत तें करावें. रवाना छ १५ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji acknowledges Nana's letter and declares his profound loyalty for the young Peshwa and his readiness to serve him faithfully.*

No. 31 6th December 1776.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण चिठी पाठविली ती पावली. तोतया पाहावयाकरितां चार मातबर पाठविणार; त्यास आपल्याकडील पूर्वील वळखीचे ब्राह्मण मंडळींत व मराठे असे असतील, ते उदईक प्रहर दिवसा येथें येत असे पाठवावे म्हणून लिहिलें. ऐसियास, जुन्या माणसांपैकीं येथें कोणी नाहींत. राजश्री

*बाजीपंत अण्णा जोशी. †रामचंद्रपंत परांजपे रत्नागिरीचा किल्लेदार याची बायको. आपाभट म्हणजे परांजप्याचा साथीदार सदाशिवभट दाते.

सुलतानजी लांभाते जुने, त्यास ते श्रीपंढरीच्या यात्रेसी गेले आहेत. रवाना छ २४ सवाल. बहुत काय लिहिणें, लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Mahadji having been asked by Nana to send some old men to examine the Prctender and declare whether he was real Sadashivrao or not, answers that there was none about him competent to do that mission.*

No. 32 21st December 1776.

श्री

दंडवत विनंती. उपरी आज आम्ही सडे येथून निघालों. घाटाखालीं मुक्काम होऊन उदयीक किल्लचानजीकच मुक्कामास येतों. राजश्री माहादाजीपंत गुरुजी यांसी बोलावून आणून, त्यांसीं बोललों आहों. गुरुजी व राजश्री बाळाराव गोविद उभयतांस किल्लचावरच राहावयास सांगितलें आहे. उदयीक किल्लचावरी येऊन राहतील. इकडील कामाकाजाचे फडशे एका दो दिवसांत आपण करून द्यावे. आमचे जाण्यास गुंता न पडे असें करावें. राजश्री राघोजी आंगरे वजारत-माब सरखेल यांचीही भेट उदयीक रविवारींच जाली पाहिजे. भेटीची पद्धत पूर्वीपासून आहे त्याप्रमाणें भेटीचा प्रकार घडला पाहिजे. रा छ. ९ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji offers to meet Nana the next day at the fort (Purandar ?).*

No. 33 23rd January 1777

पैवस्ती छ १८ जिल्हेज सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः--

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुलश जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः--आपण पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं येथें कितेक कामाकाजाचे जाबसाल बोलावयाचे आहेत. याकरितां राजश्री बाळाराव यांस पाठवून द्यावें. आपणही बिडास जाऊन तेथील गुंता उरकोन लौकर यावें ह्मणोन. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास रा नारो शंकर आपणापाशीं आहेत. कामा-

काजाचे जाबसाल आहेत, ते आपले ध्यानांतच आहेत. हालीं राजश्री नारो शिवदेव पाठविले आहेत. सविस्तर सांगतील. रा॥ छ १३ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji deputes Naro Shivdev to meet Nana and explain the full purport of his demands.*

No. 34 30th March 1777.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण स्वदस्तूरचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री जिवाजी गोपाळ यांजविषयीं लिहिलें तें कळलें. ऐसियास गुदस्ता करवीरकराकडील गृहस्त पाडाव सरकारांत आला, तो आटकाऊन ठविला होता. त्यास आम्हीं सोडविलें. तेव्हांच आपण जिवाजी गोपाळ यांजविषयीं सांगितलें, तें ध्यानांत आहे. आम्हांस या गोष्टीचें विस्मरण पडलें असें नाहीं. आधीं मशारनिल्हेचे सुटकेचा विचार, उपरांतिक तहाचें बोलणें. तहाचें न बनल्यास पारपत्य करून जिवाजी गोपाळ यांसी सोडवून आणवितों. त्यांजविषयीं आपण वारंवार लिहावें नलगे. रवाना चंद्र २० सफर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*Mahadji assures Nana of his entire readiness to effect the release of Jivaji Gopal.*

No. 35 23rd April 1777.

पैवस्ती छ १७ रावल सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेषः—आपण पत्र पाठविलें तें पावलें. तोफांची तयारी सरंजाम सुद्धां करविली आहे. आपलें कूच जाहलें ह्मणजे येऊन पोहचतील. सारांश, आपलें कूच व्हावें ह्मणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास तोफांची तयारी करविली, उत्तम आहे. येथेंही दुसरा अविलंब नाहीं. परंतु चिरजीव राजश्री कल्याणराव* यांचे

*हा कोण ?—ऐ. पत्रव्यवहार, लेखांक २९४ पहा.

शरीरीं सावकाश नाहीं, यामुळें गुंता जाहला. सावकाश वाटलें ह्मणजे लौकरच कूच करण्यांत येईल. वरकड राजश्री माहादाजीपंत गुरुजी यांचे पत्रावरून कळेल. रा छ १४ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia writes to Nana, explaining that the delay in his march was due to the illness of Kalyanrao.*

No. 36 25th April 1777.

पैवस्ती छ १७ रबिलावल सबा.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेषः—आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री मल्हारराव सुमंत यांजविसीं लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, सुमंताची वस्तभाव येथें कांहीं आणिली नाहीं. मोजदाद करून तेथेंच ठेविली आहे. जे जें सुमंताचें नांव घेतात त्यांची चौकशी होत आहे. चौकशी पुर्ती जाहली म्हणजे मागाहून साकल्य लेहून पाठवूं. सुमंत येथें राजश्री माहादाजीपंत गुरुजीकडे आल्यास चिंता नाहीं. चौकशी करून वाजवी तेंच होईल. गुरुजीस सविस्तर सांगितलें आहे. आपणांस लिहितील. रवाना छ १६ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji assures Nana of his anxiety to act justly and fairly in the case of the Sumant.*

No. 37 26th April 1777.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. पत्रावरून व राजश्री माहादाजीपंत गुरुजी यांचे पत्रावरून सविस्तर कळलें. संतोष जाहला. ऐसियास चिरंजीव कल्याणरायांचे शरीरीं कांहींसें सावकाश आहे. आराम जाहला ह्मणजे सत्वरच कूच केलें

जाईल. आपण सरकारच्या तोफांची तयारी करविली, त्यास राजश्री भिवराव पानसे यांसच तोफखान्यासमागमें देऊन आह्मांबरोबर द्यावें, ह्मणजे तोफा माफजतीनें* राहून तोफखान्याचे लोकही त्यांचे आळयांत राहून, आमचे सांगितल्याप्रमाणें कामकाज होत जाईल. यास्तव जरूर मशारनिलेची रवानगी करावी. आमचे उपयोगी जाणोन लिहिलें असे. रा छ १७ रावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana Fadnis to allow Bhivrao Panse to accompany him as the artillery officer in his campaign against Kolhapur.*

No. 38 31st May 1777.

पैवस्ती चंद्र २४ रबिलाखर सबा.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

विनंती सेवक नारो शंकर दिा महादजी शिंदे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत वैशाख वद्य ९ पावेतों यथास्थित असे. विशेष:— श्रीमंत राजश्री पाटीलसाहेब दरमजल कोल्हापुराकडे गेले. सालप्याहून कूच जाहाल्यास आज चार दिवस झाले. दो दिवसां थेट पोहोंचतील. राजश्री रामचंद्रपंत तात्या† व राजश्री बाजीपंत यांस सरकारांतून बोलावून घेतलें, अशीं पत्रें गेलीं म्हणून मजला वर्तमान कळलें. यास्तव सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. पाटीलसाहेबांची स्वारी त्या प्रांतास गेली. सरकारची फौज बोलावून घेतल्यास त्यांचे चित्तांत वैषम्य येईल कीं, आजपावेतों सरकारची फौज राहिली, आमचें कूच होतांच फौज बोलावून घेतली, हें भासेल. यास्तव आजपावेतों तसदी खाऊन फौज राहिली तशी एक महिना आणीख राहावी, अशी आज्ञा असावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. हे विनंती करावयास सेवकानें यावें, परंतु शरीर स्वस्त नाहीं, यास्तव न आलों. विज्ञप्ति.

¶*Mahadji's clerk Naro Shankar requests Nana to countermand the recall of Ramchandra Ganesh in order to avoid giving offence to Mahadji.*

---

*माफजत=निगा, बंदोबस्त. †रामचंद्र गणेश कानडे.

No. 39 26th June 1777.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री जिवाजी गोपाळ यांचे सुटकेविसीं लिहिलें. त्यास करवीरकरांकडील कारकून जाबसालास आला. त्यासी प्रथम जिवाजी गोपाळ यांजविशीं सांगतिलें. मशारनिले सोडले तरच तहरहचा जाबसाल होणें तो होईल. त्यावरून त्यांणीं सांगोन पाठविलें कीं, गोपाळभट श्रोत्री पुण्यांत आहेत, त्यांस या जाबसालाकरितां बोलाविलें आहे. ते तुह्मांपाशीं येतील. तुमचें त्यांचें बोलणें होऊन गोपाळभट श्रोत्री यांचें पत्र आलें, ह्मणजे जिवाजी गोपाळ यांस आपणापाशीं पाठवून देतों. याप्रमाणें त्यांचें बोलणें निश्चयाचें जालें. कारकूनही समागमें दिले आहेत. गोपाळभट श्रोत्री यावयाचा मात्र गुंता आहे. ते आले ह्मणजे आधीं हाच जाबसाल करून, मग पुढें तहरहचें बोलणें होणें तें होईल. श्रोत्री पुण्यांत आहेत. त्यांजला येसाजी शिंदे यांचें पत्र गेलें आहे. आपणही ताकीद करून रहिमतपुरास पाठवावें. श्रोत्री यांचे लिहिल्यावर बोलल्याप्रमाणें त्यांस सोडलें तरी उत्तम. नाहीं तरी बादबरसाद योजिला विचार केला जाईल. रा छ १९ जाावल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia assures Nana Fadnis of his efforts to negotiate the release of Jivaji Gopal from Kolhapur.*

No. 40 14th July 1777.

पेवस्ती छ १३ जमादिलाखर समान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी करवीरकराकडून तहाचा संदर्भ येऊन बोलणें लागलें आहे. त्यास पेशजीं राजश्री चिमापा* व सदाशिव दिनकर येथें आले होते. त्यांनीं पुसिलें ते समयीं त्यांसीं बोलण्यांत आलेंच आहे. करवीरकरांनीं साहुकाराचा वाजबी ऐवज निघेल त्याची निशा साहुकारी करून द्यावी. साहुकाराची खातरजमा पक्केपणीं करावी, व आपाजी शामजी अटकेंत आहेत ते सोडावे. उपरांत ठाणीं

*पानसे. पहा पत्र ले. ता. ९-११-१७८० चें.

द्यावीं. पांच लक्ष रुपये सरकारांत द्यावे. याप्रमाणें तह जाला तरी करावा. करवीरकरांची रीत चांगली नाहीं. बोलण्याचें तोंड गोड लावितील परिणामीं दगाबाजी करितील. तूर्त पांच लक्ष रुपये सरकारांत येतात यास्तव गरजेकरितां तह करावा. याअन्वयें उभयतांजवळ बोलण्यांत आलें आहे. त्यांनीं आपणांस सांगितलेंच असेल. हल्लींही मशारनिल्हेजवळ सांगितलें आहे, ते आपणांपाशीं बोलतील. सारांश, त्यांचें दगाबाजीचें बोलणें, बोलण्यांत एक व करण्यांत एक. येविषयींचा अनुभव आम्हांस आला आहे, व आपणांसही आहेच. हल्लीं ऐकण्यांत आलें जे, हुकेरीचें ठाणें राजश्री परशरामपंत भाऊ यांनीं घेतलें असतां आपण सोडवित ात म्हणून ऐसियास पक्का तह झाल्याखेरीज व साहुकाराचे व आपले रुपयाची निशा झाल्यावांचून ठाणीं एकंदर सोडूं नये. ठाणीं हातास आलीं म्हणजे लबाडी करील. यास फार जपावें. आपले ध्यानांत सर्व आहे. आपण समजोन करितील, परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. तहाच्या यादी ठरतील त्या एक वेळ पाहावयासी पाठवाव्या. उपरांत करार करावें. पक्के तऱ्हेनें होत असल्यास सरकार किफायत व बंदोबस्त चांगला तेंच आपण करतील. त्याची दगाबाजी फार. याजकरितां इतकें लिहिलें असे. रवाना छ ८ जमादिलाखर, हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of the faithless conduct of the Raja of Kolhapur and of the caution required in arranging final terms with him.*

No. 41 15th July 1777.

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसिः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री चिमापा आले, त्यांणीं सविस्तर सांगितलें त्यावरून कळलें. ऐशास येथूनही कित्येक यांसीं बोलोन रवाना केले आहेत, साद्यंत सांगतील. इकडील कोणेविशीं दुसरा अर्थ चित्तांत न आणावा. श्रीमंतांचे एकनिष्ठपणांत व राजश्री नानांचे भाऊपण्यांत आजपावेतों अंतर जालें नाहीं व पुढेंही व्हावयाचें नाहीं, हे खातरजमा असावी. श्रीमंतांचें कल्याण व नानांचें बरें तेंच आपलें लक्ष आहे. तेथें इकडून तुम्हांसीं दुसरा प्रकार नाहीं. लोकांचे बोलण्यावरी आपण जाऊं नये. येथेंही मनांत यावयाचें नाहीं. येविशीं चिमापाही बोलतील. रवाना चंद्र ९ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे. वरवर चित्तांत न यावे ते संशय येतात, हें अपूर्व आहे. हे विनंती.

¶*Mahadji requests Haripant to believe in his loyal and sincere co-operation and not to put faith in false reports to the contrary.*

No. 42 26th July 1777.

पैवस्ती छ २५ जाखर समान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना* गोसावी यांसः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—करवीरकरांकडील तहरहचा प्रकार होऊन आल्यास उत्तम. न जाल्यास त्यांचे पारपत्याची विचारणा आतांपासून करून तोफांची वगैरे सरंजामाची तर्तूद जाली पाहिजे. येविशीं राजश्री माहादाजीपंत गुरुजीशीं बोललों आहों. सविस्तर आपणांस लिहितील, त्यावरून कळेल. उत्तर पाठवावें, रा छ २० जमादिलाखर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks Nana to be prepared for effective hostilities against Kolhapur, if the present negotiations failed to produce the desired result.*

No. 43 25th August 1777.

श्री

राजश्री नारो शंकर यांसीः—

स्नेा महादजी शिंदे दंडवत. सुा समान सबैन मया व अलफ. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री गोविंदराव गायकवाड यांचे जाबसालाविषयीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं उभयतांस दाखविलीं व जबानींही मजकूर विदित केला. त्याचें उत्तर उभयतांनीं सांगितलें कीं, जे समयीं हरिपंतांनीं सरदारांस मध्यस्थीस दिलें, करारमदार यादी करून दिल्या, त्या वेळेस गोविंदराव आले नाहींत. खंडो आवजी मध्यस्थींत फिरतच होते, ते तसेच ओढत आले. बऱ्हाणपुरास हरिपंत आल्यावर मागें श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा आसरा तुटला. तेव्हां गोविंदराव शिकस्त खातां खातां मग आमदाबादेस उपयोगी पडले. तुमच्या वचनावर वेळेस आले नाहींत. तेव्हां आतां बहादरी कशाची ? पाटिलबावा त्यांस तोडूं नको सांगत नाहींत. राजश्री फत्तेसिंग गायकवाड सर्व प्रकारें एकनिष्ठ. सरकारचें लक्ष सोडीत नाहींत. प्रस्तुत बळवान, फौज फार, गड किल्ले मुलूख त्यांजकडे.

---

*याच मजकुराचें सखारामबापूस पत्र आहे तें येथें छापलें नाहीं.

सरकारांत पैका मातबर देत असतां, गोविंदरावामुळें इतका पेंच पडतो. त्यांचा आग्रह धरावा कारण काय ? तत्रापि भिडेनें कागद देत असतील तर सरकारची नुकसानी होती. आणीक फत्तेसिंगास जाब द्यावा तर दहा हजार फौज फत्तेसिंग यांजबरोबर. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस सामील झाले तर केवढी मसलत पडेल? अशीं संकटें जाणून व नफा जाणून करणें म्हणून लिहिलें. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास, राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर यांजकडील राजश्री खंडो आवजी आपणहून मध्यस्तींत फिरावयास आले नाहींत. राजश्री हरिपंतांनीं आपाजी गणेश आमदाबादकर यांचे विद्यमानें गोविंदराव गायकवाड यांसी संदर्भ लाविला. परंतु त्यांची खातरजमा पुरेना. तेव्हां हरिपंतांनीं राजश्री तुकोजी होळकर व आम्हांस मध्यस्त देऊन, खंडो आवजी यांस आणविलें. आम्हां उभयतांचें वचन घेऊन, बहादारीनें* खंडो आवजी आले. त्याजवर आमचे विद्यमानें, उभयतां गायकवाड यांचा करारमदार हरिपंतांनीं ठरावून यादी करून दिल्या. वाटणीचे करारापैकीं तूर्त सहा लक्षांचे महाल व एक दोन ठाणीं गोविंदराव यांसी खाली करून द्यावीं म्हणजे गोविंदराव यांनीं येऊन भेटावें. उभयतां गायकवाड यांसी पुरंदरास आणून, कराराप्रमाणें सरकारांतून वाटणीचे कागदपत्र देऊन फडशा करावा हा ठराव. त्यास सहा लक्षांचा मुलूख व एक दोन ठाणीं द्यावयास दिवसगत लागली. तों श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजांसह खंबाइतास आले. त्या गडबडींत खंडो आवजी यांची खातरजमा वरचेवर हरिपंतांनीं केली व होळकराकडून करविली; आणि गोविंदराव यांसी कागदपत्र कराराप्रमाणें निभाऊन देऊं, इकडील लक्ष रहावें म्हणून पाठवीत गेले. त्यावरून गोविंदराव यांनीं तिकडील लक्ष सोडून, इकडील लक्ष राखीत गेले. हरिपंत इकडे आल्यावरी आमदाबाद जाण्यांत बाकी राहिली नव्हती. गोविंदराव यांनीं जाऊन आमदाबाद राखिली. उपरांतिक उभयतांचीं पत्रें खातरजमेचीं गेलीं. खंडो आवजी पुरंदरास आल्यावर, त्यांस खातरजमेचें बोलून गोविंदराव यांसीं लिहवीत गेले. हल्लीं राजश्री अंताजी नागेश आल्यावरी असा प्रकार म्हणतात, उत्तम आहे. यांत कराराप्रमाणें कोणीकडून निभलें नाहीं हें उभयतांच ध्यानांत न येसें काय आहे ? गुजराथेंत असतांच खंडो आवजी आमचे बहादारीनें आणिले तसे लावून दिले असते, म्हणजे आमची बहादारी सहज उगवली असती. आमचे वचनावरी आले त्यांस ठेवून घेतलें. आतां दुसरा प्रकार केल्यास आमचें वचन

*जामीनगतीनें.

कसें राहतें ? फत्तेसिंग बलवान. श्रीमंतांकडे मिळाल्यास संकट व पैका येतो हा नफा जाणून करूं म्हणतील, तरी ज्यापक्षीं गोविंदराव यांची समजूत पडत नाहीं, त्यापक्षीं कलह तुटून खूळ मोडत नाहीं. उभयतांची समजूत कराराप्रमाणें करून, रुपया उभयतांपासून घेऊन, सरकार किफायत तें करावें. यांत खुळें तुटतात, पैकाही मिळतो. कराराप्रमाणें न होतां एकाचा पक्ष धरून केल्यास खूळ मोडत नाहीं. तिकडूनही संकटच आहे. याजकरितां वारंवार लिहिणें. सरकारांत पैका मिळे, पुढें सरकारकामास पेंच न पडे, आमचे बहांदरीचे वचनांत अंतर न ये, तें उभयतांनीं केल्यास सर्व गोष्टी उपयोगी आहेत. याप्रमाणें उभयतांसीं बोलून कराराप्रमाणें होय तें करणें. जाणीजे. बहुत काय लिहिणें हे विनंती. रवाना चंद्र २१ रजब.

¶*Mahadji writing to his agent Naro Shankar narrates the previous history of the dispute between Govindrao and Fatesinh Gaikwad and suggests the best course for effecting a profitable settlement.*

No. 44 2nd March 1778.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम* कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २ सफरपावेतों मुक्काम कोल्हापूर सैन्यांत स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों विशेष:—स्वामींकडून पत्रें येऊन सेवकाचा परामर्ष होत नाहीं, तरी सदैव पत्रीं सेवकाचा सांभाळ करीत जावा. यानंतर इकडील वर्तमान तरी, फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस शुक्रवारीं गांवांतून चार पांचशें प्यादा व दीनशें स्वार ऐसे बाहेर निघोन, आपल्या फौजेच्या चौक्या चौफेर आहेत, त्यांस उत्तरेकडील आंगास आपल्या चौक्यानजीक येऊन लढाई जाहली. तों आमच्या फौजांनीं त्यांजवर निकड करून त्यांचे मोर्चे गांवाबाहेर तीन्ही जागां होते, त्यांपैकीं दोन मोर्चे कापून काढून गांवाच्या कोटाजवळ घातले. लढाई चांगली जाहाली. त्यांजकडील जखमी चाळीस पन्नास पर्यंत जाहाले व ठारही चाळीस माणूस जाहालें. आपल्याकडील मातबरांपैकीं मल्हारराव पवार यांस तीन जखमा आहेत. हरजी शिंदे यास इटचाच्या† जखमा दोन आहेत. वरकड दाहा वीस आसामी जखमी आहेत. ठार दोन चार जाहाले.

---

*रामाजी अनंत दाभोळकराचा पुत्र, पेशव्यांकडून शिंद्यांचे दरबारीं काम कारणारा कारभारी. †इटा=Masculine gender, a sort of a spear—*Molesworth.*

सटवाजी भोसला खासा ते दिवसीं बाहेर होता. इतके दिवस भोसले दोन तीनशें राऊत घेऊन गांवाबाहेर राहात होते. कालची लढाई जाहाल्यापासून गांवांत गेले. त्यांचा या लढाईंत रेच चांगला मोडला. माहाकाली तोफ आल्यानंतर आठा चौ दिवसांत निकाल पडेल. फडणिसीचें कामकाज सही आम्हांपासून घ्यावें, बाकीचें कामकाज त्यांच्या कारभाऱ्यांनीं करावें, याप्रमाणें श्रीमंत पाटिलबावा यांणीं आपल्या कारभाऱ्यांस सांगितलें. आम्ही यजमानांचे मर्जीप्रमाणें चालतों. ज्याप्रमाणें आपली आज्ञा आहे त्याप्रमाणें वर्तणूक करितों. मुख्य गोष्ट, येथील मर्जी पाहोन वर्तणूक करावी यांतच उत्तम आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram writing from Sindia's camp at Kolhapur informs Nana of an action fought between the Scindia's forces and those of the Chhatrapati. Many were wounded.*

No. 45 21st March 1778.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २१ सफर पावेतों मुक्काम नजीक कोल्हापूर येथें स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून चंद्र ५ सफरचें पत्र आलें तें पावलें. बहुत संतोष जाहाला. ऐसेंच सदैव पत्रीं सेवकाचा सांभाळ करावा. यानंतर इकडील वर्तमान तर, माहाकाली तोफ पुरंधराहून आपण रवाना केली, ती येथें येऊन पोंचली. यानंतर हुताशनी करून तिसरे दिवशीं कोल्हापुरास चौफार मोर्चे बसविले. गांवच्या दक्षणेकडील आंगास तोफा लागू करून खासा मोर्चा तोफा यासीं करार करून मारगिरी केली. साहा दिवस मारगिरी जाहाल्यानंतर सातवे दिवसीं गांवांतून येसाजी शिंदा याणें बोलावयास गृहस्थ राजश्री पाटीलबावांजवळ पाठविला. मग यजमानांनीं आपणांकडून, राजश्री विशालगडकर प्रतिनिधि यांजकडील कारकून, आपाजीराव म्हणोन आहे, तो मोर्चे बसविल्याचे पूर्वी येक वेळ गांवामध्यें पाटीलबावांस पुसोन गेला होता. बरा शहाणा माणूस आहे, आपल्या सरकारच्या लक्षामध्यें आहे, यास्तव आंतून बोलावयास गृहस्थ आला होता त्याजबरोबर मशारनिल्हेस देऊन, आणखी जिवाजी बल्लाळ* शेणवी, राजश्री पाटीलबावा यांजकडील पाग्या आहे, त्यास बराबर देऊन पाठविलें होतें. त्यास त्याचें बोलणें पहिले वेळेस पांच

*जिवबा दादा बक्षी.

सात लक्ष रुपये घ्यावे आणि सलूख करावा ऐसें उत्तर मध्यस्त घेऊन आले. त्यानंतर यजमानांनीं त्याच वकिलाबराबर सांगोन पाठविलें कीं, वीस लक्ष रुपये व चिकोडी मनोळी तालुके, घोरपडचांकडील लाट रांगोळी हे दोन्ही गांव सरकारांत द्यावे म्हणजे तह करूं, ऐसें उत्तर पाठविलें. त्यावरून मागती जाबसाल आला कीं पंधरा लक्षपर्यंत (अपूर्ण).

¶ *Appaji Ram reports to Nana that the Kolhapur Raja after having been harassed by a severe artillery action, has started negotiations for peace (Incomplete).*

No. 46 28th April 1778.

पैवस्ती चंद्र ५ जमादिलाखर समान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः--

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें, व राजश्री बाबूराव केशव* आले, त्यांनीं सविस्तर सांगितलें, त्यावरून कळलें. ऐसियास ज्या पक्षीं आपण श्रीमंतांचे दौलतीचा बंदोबस्त करणार, यापरतें आम्हांस दुसरें अधिक नाहीं. आमचाही श्रीमंतांचे दौलतीविषयीं दुसरा प्रकार आपणांसीं नाहीं. येविषयींचा सविस्तर अर्थ मशारनिल्हेसीं बोलण्यांत आला आहे. ते लिहितील त्यावरून कळेल. करवीरचा गुंता बहुत करून उरकण्यांत आला आहे. राहिला तोही थोडक्याच रोजांत उरकोन तिकडे येत असों. रवाना चंद्र २९ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji informs Nana of his having communicated all his views with regard to the conduct of affairs to Baburao Keshav.*

No. 47 12th July 1778.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः--

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री चिमापा व सदाशिवपंत आले त्यांनीं वर्तमान सविस्तर सांगितलें, व राजश्री दिवाकरपंताचें

*उपनांव ठाकुर, राहणार लिंब नजीक सातारा. हा नाना फडणिसाचा विश्वासु हस्तक होता.

बोलणें तूर्त मागील सफाईचें जाहलें. कलकत्याचीं गाडराचीं पत्रें त्यांस आलीं तीं त्यांनीं दाखवून, त्यांचीं उत्तरें इकडील उपयोगींच (फाटलें) सरकारच्या राखून लिहिलें आहे. पुढील मसलतीचे प्रकार बोलण्यांत येतील ते आपल्यास कळतील, व गाडराकडे लाला फत्तेचंद मुनशी यांस रवाना केलें म्हणून लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास राजश्री दिवाकरपंताचें बोलणें सफाईचें जालें, उत्तम आहे. बोलल्याप्रमाणें वर्तणुकेंत आल्यास बरेंच आहे. गाडराकडे लाला फत्तेचंद रवाना केले, उत्तम केलें. वरकड जें बोलायाचें तें राजश्री चिमापापासीं बोललोंच आहों. ते आपल्याशीं बोललेच आहेत. रवाना छ १६ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji acknowledges and approves the action taken by Nana and communicated through Chimappa Panse with regard to negotiations proposed by Goddard.*

No. 48 23rd December 1778.

श्री

दंडवत विनंती उपरी. राजश्री भीवराव यांजकडील व मंडलेश्वरचीं पत्रें पाहण्यास पाठविलीं तीं पाहून माघारी पाठविलीं आहेत. भीवराव यांणीं लिहिलेप्रमाणें फौज व कोंकणांत फौज रवाना करावी व त्याची खर्चाची तर्तूद करून पाठवावी. आज कूच आपलें केव्हांसें होणार? आज कूच जालेंच पाहिजे. याउपरी पुढें जाण्यास विलंब लावणें ठीक नाहीं. पुढें फौज गेली त्यास व आपणास तफावत लांब हें उपयोगी नाहीं. पुढें जाऊन फौजेचा भरणा भीवरावाजवळ वरचेवर करीत जावा. आज मुकाम आपण कोठील नेमला तें लिहावें. रवाना छ ३ जिल्हेज, हे विनंती.

¶*Mahadji asks Nana not to delay the march of the armies against the oncoming British.*

No. 49 December 1778.

श्री

विज्ञापना. नारो गणेश* यांचें होळकराचें चांगलें असावें असें स्वामींचें मानस. त्यास प्रस्तुत होळकर आमचे नादीं आहेत. यादोपंत येथें आला होता, त्याजबा

*नारो गणेश होळकराचा दिवाण. हा मोरोबाच्या फितुरांत असल्याबद्दल कैद झाला होता. त्यास सोडण्याबद्दल हें पत्र हरिपंताचें नानांस असावें.

कित्येक प्रकारें सांगोन पाठविलें. त्यावरून यादोपंतांचें भाषण होऊन होळकरांनीं सांगितलें कीं, नारोपंताखेरीज माझा परिणाम नाहीं व हरिपंत सांगतील तसें ऐकेन. याप्रमाणें यादोपंताची खातरजमा केली. यादोपंतानें मजला लिहिलें होतें. स्वामींस कळावें म्हणोन लिहिलें असे. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke urges up on Nana the release of Naro Ganesh in order to please Holkar.*

No. 50 31st August 1779.

पैवस्ती चंद्र २० साबान समानीन.

(2nd September 1779.)

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. आम्हांस स्वारीस निघावयाचा मुहूर्त श्रावण वद्य एकादशीचा पाहिला आहे. त्याचे पुढें मुहूर्त पहावा तर मार्गशीर्ष मासपर्यंत नाहीं. याकरितां एकादशीचा मुहूर्त आहे. या मुहूर्तानें निघावें किंवा कसें ? राजश्री दिवाकरपंत म्हणत होते कीं, गाडर* पुण्यास येणार. त्यास येण्याविसीं सरकारचीं पत्रें गेलीं आहेत. तो येईल. आपण बाहेर निघाले असतां एक प्रकारचें दिसतें, याकरितां आपणांस लिहिलें असे. याचें कसें करावें तें लिहून पाठवावें. दुसरा प्रकार सुरतेकडील श्रीमंत दादासाहेबांकडील; व केसो कृष्ण† व हजार स्वार व गाडद दीड हजार याप्रमाणें घेऊन सोनगडचे मार्गें कोंडाई-बारीकडून खानदेशांत गुलजारखानाकडे‡ जातो, त्यास आपणांकडील भगीरथराव व होळकराकडील फौज कोंडाईबारीचे सुमारें गेल्यास, तिकडून कोणी आला तरी पारपत्य करतील व इकडून कोणी जाऊं पावणार नाहीं. आपण लवकर यावें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास हैदरखानाचे मसलतीस नबाब व भोसले येतात, व सरकारची फौज सरंजामी व हुजरात समागमें न्यावयाची तरतूद जाली असल्यास, आपलें बाहेर या मुहूर्तेंकरून निघणें ठीक आहे. मुहूर्तेंकरून निघावें. बाहेर निघाल्यावरी मग स्वारीस जावयाची तरतूद करून गेलेंच पाहिजे. नबाबा-

---

*General Goddard. †केसो कृष्ण दातार राघोबाचा पक्षपाती.

‡गुलजारखान पठाण राहणार रनाळें, खानदेश, हा राघोबाच्या पक्षांतील एक सरदार.

कडील फौज व भोसले यांकडील व सरकारच्या फौजा सरंजामी वगैरे कोणी समागमें देऊन कर्नाटकांत रवाना करावे. आपण पुण्यांत श्रीमंतांपासीं राहून पुरावा करावा, हा विचार आम्हीं ऐकिला होता. जर हा विचार असला तरी राजश्री हरिपंत-तात्यांनीं मुहूर्तेंकरून बाहेर निघोन राहावें. आपण डेरा मात्र बाहेर मुहूर्तेंकरून द्यावा व त्यांचे रवानगीची तरतूद आतांपासून व्हावी. याप्रमाणें करावें. आपण गेल्यासिवाय नबाब, भोसले वगैरे फौजेचा जथ पडणार नाहीं. याकरितां आपणच जावें असें असल्यास मग याच मुहूर्तानीं निघावें हें चांगलें. दोन विचार आहेत. यांत जो युक्तीस येईल विचार तो करावा. याच मुहूर्तानें बाहेर निघावयाचें ठरल्यास गाडर येणार, त्यास एक प्रकारचें काय दिसावयाचें आहे. गाडर आल्यावरी डेऱ्यांत बोलावयास येईल, चिंता नाहीं. श्रीमंत दादासाहेब निघोन जाणार ते कोणीकडे ? इंग्रजांपासून गेल्यावरी दुसरी जागा कोणती दिसत नाहीं. इंग्रज त्यांस जाऊंच देणार नाहींत असें दिसतें. केसो कृष्ण कोंडाईबारीनें येणार. फार चांगलें आहे. चिरजीव भगीरथराव व होळकराकडील व सरकारचीं पथकें मिळोन खानदेशांत गेलेच आहेत. गुलजारखानाजवळील लोक फुटले. त्याजकडे केसो कृष्ण येऊं लागल्यास मार्गांतच त्याचें पारपत्य करतील. येविसीं भगीरथराव वगैरे यांस पत्रें पाठविलींच आहेत. आम्हीं त्रयोदशीइतके निघोन येतों. तेथें आल्यावरी दिवाकरपंत यांस जरूर जाणेंच असलें, तरी मग आपले आमचे विचारें त्यांसी बोलून निरोप देणें तरी द्यावयास येईल. आम्ही येऊं तोंपर्यंत राहून घ्यावे. आम्हीही लवकरच येतों. पागा व उंटें चारणीस गेलीं तीं आणविलीं. लौकरीच येतील. कळावें. वरकड कित्येक मजकूर गंगाजीस सांगोन पाठविले आहे. सविस्तर सांगेल. उत्तर लवकर यावें. रवाना चंद्र १८ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana Fadnis approving the plans formed by the latter regarding the next campaign against Raghoba and the British and fixing an auspicious day for his own march.*

No. 51 7th October 1779.

पैवस्ती चंद्र ३० रमजान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. बारीकडे व गुजराथेंत फौजेची रवानगी लवकर व्हावी म्हणून आपणांकडून दोन तीन पत्रें आलीं. त्यास चिरंजीव भगीरथराव शिंदे

व होळकरांकडील राजश्री पाराशर दादाजी लासुरापासीं आहेत, त्यांस लेहून बारीकडे पाठवितों. सरकारचीं पथकें लासुरापासीं गुलजारखानाचे बंदोबस्तास राहतील. त्यांजकडे तोफा व लोक आपण रवाना करावे आणि गुलजारखानाचा बंदोबस्त करवावा. गुजराथेकडे फौज जावयास इकडून तर मार्ग नाहीं. बऱ्हाणपुरावरून माळव्यांतून पायागडाकडून गुजराथेंत जाण्याचा मार्ग ठीक आहे. तिकडून फौजेची रवानगी करावी लागेल. त्याची तरतूद बऱ्हाणपुरीं फौज आहे ती व आणखी करावयासी येईल. येविसीं राजश्री केसो अनंत यांस लिहिलें आहे. आपणांस सांगतील. रवाना चंद्र २६ रमजान. हे विनंती.

¶*Mahadji conveys to Nana directions about the routes and arrangements for forces marching into Gujrat.*

No. 52 9th November 1779.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री लक्ष्मणराव चिटणीस* व लाला† यांचीं पत्रें आलीं तीं पाहावयास पाठविलीं, तीं पाहिलीं. वर्तमान सविस्तर समजलें. इंग्रजाचे चित्तांत बिघाडाचें आहे. त्यास चिंता काय ? इकडील फौजेची सिद्धताच आहे. वसईचे उपराळ्यास फौज लवकर जाऊं द्यावी. या कामास दिवसगत नसावी. वसईस लेहून तेथील बंदोबस्त आधीं करावा. मैदानांत येतील तितकें बरें. चिंता नाहीं. हैदरखानाकडे कारकून त्रिंबकराव आपाजी येथून रवाना केले. आज तीन रोज जाले, आपणाकडे पाठविले आहेत. आलेच असतील. राजश्री सदाशिव दिनकर आले म्हणजे येथील तयारीस गुंता पडणार नाहीं. चिरंजीव भगीरथराव शिंदे व सरकारचीं पथकें, होळकराकडील फौज लासूरची रिकामी जाली, त्यांची रवानगी गुजराथेकडे करावी. ते तिकडे जातील. इकडे आम्ही आहोंत. आपलें उत्तर आलें म्हणजे चिरंजीव भगीरथराव यांसी पत्रें लेहून तिकडे जाण्याविसीं पाठविलीं जातील. रवाना चंद्र २९ सवाल. हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of the best method to meet the British opposition on the various fronts, and suggests definite duties being assigned to the several Maratha commanders.*

---

*गार्डकडे तहाची वाटाघाट करण्यास नानानें सुरतेस पाठविलेला आपला वकील.

†लाला सेवकराम हा मराठ्यांचा वकील कलकत्त्यास होता.

No. 53 16th November 1779.

पैवस्ती चंद्र ११ जिल्काद समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. गुलजारखानाकडील फौज मोकळी जाली, त्यापैकीं सरकारची फौज तेथें आहे, ती वसईकडे पाठवावयाकरितां इकडे आणविली आहे. भगीरथराव व होळकराकडील फौज तेथें आहे, त्यांस लेहून गुजराथेस रवाना करावी. दहा हजार फौजेची रवानगी व्हावी. वसईकडे पांचशें स्वार व हजार गारदी रवाना केले आहेत. आणखी फौज खानदेशची व येथून रवाना करूं. राजश्री विसाजी केशव यांणीं किल्लचाचा बंदोबस्त केला आहे. कोंडाईबारीवरी फौज नसली म्हणजे बडोदे आमदाबादेवरी जाऊन फैलाव करतील. दोहों तोंडावरी फौज असल्यास फैलाव करूं पावणार नाहींत. म्हणून लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास गुजराथेस फौज गेल्यावरी पायमाली होईल. राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांस बोभाट नित्य सरकारांत ल्याहावयास जागा होती. याकरितां कोणी सरकारच्या समागमें असता म्हणजे ठीक पडतें. याकरितां राजश्री विसाजी आपाजी सुद्धां तिकडे गेल्यास बरें, म्हणून लिहिलें होतें. हल्लीं आपण असें लिहिलें उत्तम आहे. चिरंजीव भगीरथराव शिंदे व पराशर दादाजी यांस पत्रें गुजराथेस जावयाविसीं लेहून पाठविलीं. दहा हजारांचे भरण्यास आणखी फौज रवाना त्यांजकडे करावयाची तजवीज केली आहे. रवाना होईल. फौजेचें जाणें तिकडे जाल्यानें पायमाली लिहितील व बोभाट लटके लिहितील, तें मात्र मनांत न यावें. पायमाली मागितल्यास आम्ही देणार नाहीं. आम्हां उभयतांकडील फौजा बडोद्याकडे जातील. गायकवाडांनीं फौज सुद्धां बाहेर निघोन, त्या फौजेनें व त्यांणीं एकत्र राहावें, म्हणजे आमदाबादेकडे फैलाव करूं पावणार नाहींत. बारीकडे आल्यास आम्ही समजून घेऊं. चिंता नाहीं. रवाना चंद्र ७ जिल्काद, हे विनंती.

¶*Mahadji communicates the best plan of action for the Maratha armies marching towards Gujarat and suggests measures to prevent complaints from the Gaikwad on account of damage to crops caused by the movements of troops.*

No. 54 17th November 1779.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साा नाा विज्ञापना ताा छ ८ जिल्काद सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:--सांडणीस्वाराबरोबर पत्र सादर जाहलें त्यांत आज्ञा जे. फिरंग्याचे तहनाम्याची नक्कल राजश्री पाटीलबावांकडे पाठविली आहे, त्याचें उत्तर लौकर येऊन फिरंग्याचे वकिलासीं बोललें पाहिजे, तर बाबांचें उत्तर लवकर पाठवणें. त्यास, सांडणीस्वारानें लखोटा बाबांकडे दिला. त्याचा जाब यादी तहनाम्याच्या सुद्धां दिल्हा तो सेवेसीं रवाना केला आहे. प्रविष्ट होईल. सेवेसीं श्रत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar forwards to Nana copies of the proposed treaty with the Portuguese.*

No. 55 17th November 1779.

पैवस्ती चंद्र ९ जिल्काद समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी:—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. गोंवेकर वकील नारायणराव येथें आहे. त्यास तहाचें बोलणें दोन तीन वर्षें लागलें आहे. त्यास फिरंग्यानीं तह करून पाठविला, त्याची नक्कल पाठविली आहे. पाहावी. त्यावरून समजेल व वकिलाचे बोलण्याचे भाव लिहिले ते कळले. जाते समयीं आपणांसीं बोलणें जालें होतें, याजकरितां सूचना लिहिली आहे. चौ दिवसांचा वायदा केला आहे. उत्तर सत्वर पाठवावें म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास गोंवेकर फिरंग्याचा व सरकारचा तह पेशजीं होऊन ठराव जाला असेल, त्याप्रमाणें वकिलासीं बोलावें. तहाच्या यादी माघाऱ्या पाठविल्या आहेत. रवाना चंद्र ८ जिल्काद, हे विनंती.

¶*Mahadji returns to Nana copies of the papers in regard to the Portuguese negotiations.*

No. 56 27th November 1779.

पैवस्ती चंद्र २० जिल्काद समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री बाळाजी रघुनाथ यांजकडून मुंबईहून पत्रें आलीं तीं पाहावयास पाठविलीं आहेत. त्यावरून कळेल म्हणून लिहिलें. त्यास पत्रावरून तिकडील वर्तमान कळलें. तिकडे फौजेची रवानगी चिरंजीव भगीरथराव व राजश्री पाराशर दादाजी यांस लिहिलें आहे. लौकरच जाऊन पोहोंचतील. आजही पत्रें आल्यावरी आणखी जोडी वायद्यानें रवाना केली आहे. जलद जातील. आणखी फौज चिरंजीवाकडे* पाठवावयाची योजना केली आहे, तेही जाईल. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांस आपलीं पत्रें या फौजेस सामील होऊन बंदोबस्त करावयाविसीं गेलींच असतील. रवाना चंद्र १८ जिल्काद. हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having despatched Bhagirathrao Sindia to move expeditiously towards Gujrat and asks him to write to Fatesinh to join Bhagirath.*

No. 57 3rd December 1779.

पैवस्ती छ २६ जिल्काद समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री लक्ष्मणराव यांनीं जबानी माणसाबरोबर सांगोन पाठविलें कीं, अशांत सुरत आठाविसींत फौज आल्यास फार उपयोग आहे. त्यास एक सरदार चांगला बरोबर फौज देऊन सुरत आठाविसींत पाठवावे. भगीरथराव शिंदे व पाराजीपंत यांस तों पायागडावरून जाण्याचीं पत्रें गेलींच असतील. दुसरीं आणखीं पत्रें पाठवावीं म्हणोन लिहिलें, तें कळलें. त्यास गुजराथेस जावयाविशीं चिरंजीव भगीरथराव शिंदे व पाराजीपंत यांस पत्रामागें पत्रें तीन चार जलद जाण्याविशीं गेलीं. उभयतां तिकडे जातील. इकडे फौज रवाना करावयाचें लिहिलें, त्यास गंगाजी आव्हाड आपणांकडे गेला

*भगीरथराव सिंदे.

आहे, तो आल्यावर इकडेही फौज रवाना केली जाईल. रवाना छ २४ जिल्काद. हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having despatched troops into Gujarat as desired.*

No. 58 4th December 1779.

पैवस्ती चंद्र १ जिल्हेज समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री नारायणराव विठ्ठल वकील गोंवेकर यांजकडील जाबसाल उरकोन फडशा करून दिल्हा. खातरजमेचें पत्र आपल्याकडील पाठवून द्यावें म्हणोन आपण लिहिलें होतें. ऐशास गोंवेकराकडील फडशा करून दिल्हा. उत्तम आहे. खातरजमेचे पत्राविसीं लिहिलें, त्यास गोंवेकराकडील कांहीं गडबडीचें वर्तमान ऐकतांच पत्र येथून पाठविलें जे, तुम्हीं सरकारांत करार मदाराचें बोलणें बोलत असतां, या गोष्टी करणें ठीक दिसत नाहींत. करारमदार ठरला आहे त्याप्रमाणें जाबसाल सरकारांतून होईल. तुम्हीं सरकारचा स्नेह तहाप्रमाणें निभावून दाखवावा, गोंव्यास लेहून पाठवणें, याअन्वयें राजश्री नारायण राव विठ्ठल यांसी पत्र पाठविलें. त्याचें उत्तर मशारनिल्हेनीं पाठविलें कीं, आपण सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी आम्हांस मान्य आहेत. परंतु फिरंगी लोक; त्यांची मर्जी एक प्रकार. त्याहीमध्यें खावंद नवा. त्याची आपली मर्जी मिळाली नाहीं. ऐंकण्यांत तरी मर्जी कठिण दिसती. इकडील विश्वास पडेना. तेव्हां दरम्यान होऊन निखालसपणें सरकारचा करार ठरला, असें कशावरून ल्याहावें ? यामुळें आपल्यास या गोष्टींत यावयासी संकट पडतें. आपण सांगतां तेव्हां आपली मर्जी राखिली पाहिजे. हें सर्व ध्यानांत आणून आज्ञा कर्तव्य ती करावी म्हणोन. त्यावरून त्यांस खातरजमा करून लिहिलें जे, करार अगोदर जाहला आहे त्याप्रमाणें निभावून-घ्यावयाविसीं राजश्री बाळाजीपंत नाना यांसी लिहिलें आहे. त्याप्रमाणें तुम्हां कडील जाबसाल करून देणार या गोष्टीस दरम्यान आम्ही आहों. करार ठरेल तो निभाविला जाईल. याप्रमाणें खातरजमा करून लिहिलें आहे. कळावें. येविसीं राजश्री आपाजी साबाजी आपणांस सांगतील. रवाना चंद्र २५ जिल्काद. हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana about his having become a guarantee for the proper execution of the treaty concluded between the Portuguese and the Peshwa.*

No. 59 About 8th December 1779.

पैवस्ती छ १ जिल्हेज [10-12-1779]

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ जिल्काद पावेतों मुक्काम जांबगांव येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष:—आपली आज्ञा घेऊन आलों ते समयीं राजश्री पाटीलबावापासीं बोलावयाचीं कलमें सांगितलीं होतीं, त्याजप्रमाणें येथें आल्यानंतर राजश्री सदाशिवपंत यांजला कलमांचा मजकूर सांगितला. त्यांच्या व आमच्या विचारेंकरून आज्ञेप्रामणें कलमें पुसोन, उत्तरें काय होतील त्याजप्रमाणें सेवेसीं लिहोन पाठवावीं, याप्रमाणें मशारनिल्हेचें आमचें बोलणें जाहलें. उपरांत खाशांची गांठ घातली. आज्ञेप्रमाणें विनंती केली. उपरांत दोन चार दिवस भाव समजण्यांत येऊं दिला नाहीं. तेव्हां एकांतीं गवसून संशयाचें मूळ वगैरे भाव निखालसपणें बोलावे येविसीं फार आग्रह केला. मजजवळ दुसरा विचार न धरावा, मजला दोही पक्षीं कल्याणाचें अगत्य आहे, हें जाणोन वारंवार विनंती करितों. त्याजवर बोलणें जाहलें त्याचा मजकूर संकलित गंगाजीबरोबर सांगितला....कलमांचीं उत्तरें समजावयाकरितां सेवेसीं लिहिलें असे, बितपसील:— कलमें

निखालसपणें आजपर्यंत चालिलें, अलीकडे संशय पडिले, यास्तव हल्लीं पुण्याचे मुक्कामीं आल्यावर निखालसपणें गांठ पडिली, तेथें भाव संशयाचा निघाला नाहीं, आणि परस्परें समजण्यांत संशयात्मक दिसतें. याजकरितां एकांतीं गांठून खुलासा काढून ल्याहावें ऐसी आपली आज्ञा म्हणोन पुसिलें. तेव्हां उत्तर जाहलें कीं, आम्हांकडे चाकरीचा प्रकार, तेव्हां फौज नेमून देतील त्याजप्रमाणें चाकरी करावी. एख्त्यारीमुळें फौज अधिक उणी ठेवावी आणि पेचांत यावें, सर्व काल घोर करीत असावें तें कामाचें नाहीं, ऐसें कित्येक प्रकारें वांकडें बोलणें जाहलें. तेव्हां विनंती केली जे, मी दोहो पक्षीं कल्याणइच्छक आहें. मजला न सांगावें ऐसा अर्थ नाहीं. तेव्हां खुलाशानें बोलले जे, संशयाचीं कारणें पुसतां, तरी ऐक. राजश्री नानांची पुरती निखालसता तोतयाची वगैरे चाकरी केली तरी जाहली नव्हती. इंग्रजांची लढाई होऊन सकारपूर्वकाचें* काम जाहल्यानंतर आम्हांविसीं संशय गेला. पुढें संशयाचें कारण कोणतें तरी दादा निघोन गेले. त्याजवर नवाबाचीं

*सखाराम बापू.

पत्रें आलीं, त्याजवरून व लोकांचें सांगणें ऐसे तीन प्रकार एके जागां जाहले. त्याची छान न होतां, चित्ताची दृढता बसोन कल्पविकल्प चालले. ते खरे कशावरून म्हणाल तरी इंग्रजांची मसलत आम्हांकडे व सलूख जाहला आमच्या विद्यमानें, व पहिल्यानें मुंबईस वकील गेले ते एक सरकारचा व एक आम्हांकडील ऐसे गेले. पुढें सुरतेस वकील गेले, तेव्हां आमचा वकील सरकारच्या वकिलाबरोबर नसावा ऐसें जहालें. तेव्हां संशय जाहला कां नाहीं ? कलम १

मसलतीमुळें....(खर्च) जाहला याजकरितां कांहीं सरकारांतून चालवावें, ऐसें बोलल्यावर सरकारांत ऐवज नाहीं ऐसा जाबसाल जाहला. तेव्हां दोन प्रकारची चौथाई म्हटली तरी होईल इतकें बोलणें होतें. पुढें सरंजाम व हिशोबाबद्दल बाकीवर मखलासी जाहली, त्यांत अर्थ एक, आणि मागाहून याद जाहली त्यांत अर्थ एक, ऐसें जाहलें. तेव्हां पेंचाची गोष्ट आम्हांकडे आणावी ऐसें जाहलें कीं नाहीं ? तेव्हां संशयाखेरीज हें कसें होईल ? कलम १

आपण धनगरसंमंधें मजकूर सांगितला, तो सर्व एकांतीं श्रुत केला. तेव्हां त्याचें उत्तर जाहलें जे, त्यांजला सुख कोणतें ? तत्राप बातमी वरचेवर राखीत आहों, खबरदारीस चुकत नाहीं, परंतु ईश्वर इच्छा प्रमाण, ऐसें बोलले; व याच कलमापैकीं बोलिले जे, आम्ही याचा मजकूर पेशजी ज्या गृहस्ताबरोबर निरोप तींही तऱ्हेचे सांगोन पाठविले होते, त्यास त्यांणीं तुम्हांजवळ त्यांपैकीं काय सांगितलें, त्याचे अर्थ आपल्याजवळ विलक्षण जाहले अथवा सांगणाऱ्यानें विलक्षण सांगितले असतील. बरें असो. खबरदारीस राहोन असतां पुढें होणें ते ईश्वरी सत्ता असे. कलम १

भांडेरीचा प्रकार आम्ही बोललों कीं, झांशी संस्थान राहिलें पाहिजे. तेथें खर्च भारी. भांडेर दिल्यास तेथील खर्चाची सोई कसी होईल ? हा विचार पाटीलबावांनींच पाहावा, ऐसें बोलले. त्याजवर उत्तर जाहलें जे, दादांचे मसलतीमुळें भांडेर दिली होती. त्यास, दादांची मसलत जाहली ऐसें नाहीं. दुसरें, तिकडे ग्वालेरी वगैरे कामामुळें फौजेचा भरणा इंगळे व खंडेराव हरि वगैरे यांचा केला आहे. त्याचे उपयोगी.....असो. त्यांचें मानस असेल तें खरें ऐसें बोलले. कलम १

असेर आम्हांस दिल्यास दोन तीन वर्षें होत आलीं. त्यास मकारपूर्वक* व सकारपूर्वकाचे फितुरामुळें पेंच. त्याअलीकडे एक विचार जाहल्यावर तर्तूद घडावी ते न घडली. हल्लीं नारोपंत पोंकसे† पाठविले. त्यांजबरोबर सरकारचीं

*मोरोबा दादा. †नारो शिवदेव.

पत्रें व जबानी आली. त्याप्रमाणें तर्तूद केली आणि रवानगी केली, तरी हस्तगत न होय. तेव्हां किल्लघावरचे लोक आहेत त्यांचीं मुलें माणसें यांचा बंदोबस्त होत नाहीं. तेव्हां चित्तांत संशय कोणाच्या आहे तो समजावा. कलम १

आम्ही सरकारचे कामांत पडत नाहीं, तत्राप राजश्री नानांचा व आमचा भाऊपणा याजमुळें एखादा आम्हांकडे येतो. त्याजला कारभारी म्हणतात कीं, पाटीलबावा कोठपर्यंत असतील ? तुम्ही तिकडे गेलेत तरी काय चिंता आहे ? बोलोन आकसांत धरितात. त्यांजला पेंचांत आणावें असें चालों लागलें. तेव्हां याचा विचार कसा ? संशयाचें घर जाहलें कीं नाहीं ? कलम १

आमचा कारभार जातीनसीं पाहावा ऐसें होतें. ती चाल मोडोन आमचें बोलणें दरबारीं गेलें म्हणजे कारभारीयांजवळ बोला. त्यांजवळ बोलल्यावर त्याची भवति न भवति होऊन त्याजवर तर्क कुतर्क व्हावे, त्याचा बाजार व्हावा, ऐसा प्रकार जाहला. तेव्हां चित्तांत संशय येऊन इतकें होऊं लागलें कीं नाहीं ? कलम १

आम्हांकडून अंतराय म्हणावा तरी सरकारचाकरी होत आली. दादांची मसलत बाजीराव यांचा पुत्र वचनेंकरून आणिला. तेव्हां त्याची कांहीं सोय करून देणें आली. ते मसलत बिघडली इतकाच अर्थ घडला. व दुसरें, एखादे वेळेस राग आल्यावर कांहीं अधिक उणें बोलतों, इकचें (इतकें) आम्हांकडे आहे. त्याचीही छान केल्यास कांहीं दोष नाहीं. त्यास आपल्याकडील संशयाचें मूळ न पाहतां आम्हांकडे शब्द लावून चार कामें करावीं, त्याजमध्यें एक बिघडलें तेंही मनांत बिघडावें ऐसें नव्हतें. ऐसें असतां संशय येणें त्यास काय म्हणावें? आम्ही दुसरा प्रकार धरला नवता. राज्याचें कल्याण व नानांचें कल्याण त्याच गोष्टी केल्या असतां त्याचा ऐसा फलादेश जाहला. ऐसें कित्येक वीतरागी भाषण जाहलें. दुसरें, आपलीं पत्रें कोंडाईबारीस जाण्याविसीं येऊं लागलीं. तेव्हां येथून निघोन देवदर्शन घेऊन बराणपुरचे सुमारें जावें, फौज दोहोंकडे पाठवावी, बाऱ्या धरून बसावें, इतकाच अर्थ बोलत आहेत. याजवरून अनुमान दिसतें जे, तूर्त देशीहून शहरमजकुरास गेल्यानंतर मग लक्ष इकडील येण्याचें दिसत नाहीं. कलम १

भोसले यांची फौज उंदरीचे सुमारें इकडे आली, त्याचा संशय प्राप्त जाहला. त्याचे तर्क वितर्क होत आहेत. मुंबईची बातमी आली. त्याजमध्यें भोसले यांचा सिलसिला लागला आहे म्हणोन लिहिलें आहे. कलम १

राहुरीचे मुकामीं दादांची बातमी सुरतेकडे मजल दरमजल गेले ऐसी आली. तेव्हां उरूस केला. ते समयीं दृष्टांत जाहला जे, पुढें न जावें, गांठ पडावयाची

नाहीं, देशींच राहावें. नगरास फितूर होईल. ऐसे दोन दृष्टांत जाहले. त्याचा एक दाखलाच जाहला. आपल्यास आज्ञा नवती, परंतु आतां राहणें ठीक नाहीं, हाही त्याजमध्यें उल्लेख निघाला. कलम १

सदरहूप्रमाणें येथील वर्तमान समजण्यांत आलें, तें स्वामींस कळावें म्हणोन लिहिलें आहे. आपण सर्वज्ञाण आहेत. जें कर्तव्य तें विचारेंच करितील. मजला भासतें कीं, ऐशाच प्रकारें हे निघोन गेले तरी परभारें स्वारीस जातील. इंग्रजांचे मसलतीस कांहीं दिवस तिकडे असतील. उपरांत हिंदुस्थानांत जातील ऐसें दिसतें. निखालसता जाहल्यास उत्तम, ऐसें भासतें. तत्राप मीं आपल्या बुद्धीनें लिहिलें आहे. स्वामी जें करितील तें चांगलेंच करितील. पत्र वाचून फाडून टाकावें. बहुत काय लिहिणें, कृपालोभ सदैव पत्रीं करीत जावा हे विज्ञापना.

¶*In this important letter Appaji Ram communicates to Nana the various items creating some irritation between Nana and Mahadji. The writer discussed the situation with Mahadji whose frank replies are forwarded herein for Nana's information.*

No. 60 10th December 1779.

पैवस्ती छ ३ जिल्हेज समानीन.

श्री

सेवेसीं विनंती. सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. छ १ जिल्हेज प्रहर रात्र सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—आज दोन प्रहरीं पुण्याहून राजश्री बावांस पत्र आलें, त्यांत मजकूर जे, राजश्री हरिपंत-तात्या व राजश्री परशरामपंतभाऊ, यांनीं मनसबा केला जे, शिंदे फार ओढितात, काय चिंता आहे? पाहून घेतों, असा मनसबा जाला आहे. असें पत्र आलें. यावरून बावांची मर्जी फारच विक्षेपास पावली. कल्पना चालली जे, राजश्री दिवाकरपंतासीं मनसबा पूर्वी केलाच आहे. त्याअन्वयें उंदरीवर भोसल्याचे फौजेचा जथ पाडिला आहे. नबाबांची फौज दहा हजार, औरंगाबादेचे रखवालीचें निमित्त करून गंगथडीस येत आहे. होळकरही तात्यांनीं मेळवून घेतले आहेत. वाफगांवींही फौज जमा होत आहे. हुजरात पंधरा हजार फौज जमा जाली. इतका जथ पाडिला तेव्हां पत्राचा मजकूर खरा. हे आम्हांस पाहून घेतात तर मी काय कुणबी लागलों आहें कीं काय? बरें, पाहून घेतात, चिंता नाहीं. गुजराथेंत रवानगी करण्यास

फौज जमा होतच आहे. त्वरा करून आणखी पागा आणविल्याच. उभयतां मनसबा करून आम्हांवर येतात, त्यापक्षीं आपणच पुढें व्हावें. उभयतांची गांठ वाटेस पडली उत्तम. गांठ न पडे तर पुण्यास जाऊन श्रीमंतांचे पायांवर डोई ठेऊन बंधूस रामराम करून, निघोन यात्रा करून उज्जनीस जावें. याउपर यांजवळ राहणें ठीक नाहीं. असा विचार जाला. पत्र कोणाचें आलें याचा शोध केला. नांव तों घेतलें नाहीं. परंतु राजश्री चिमापा व केशोपंत व आपाजी साबाजी त्रिवर्ग वेगळे करून पत्र आलें आहे तें कोणाचें आलें आहे, नांव घेत नाहींत. म्हणतात कीं, पत्र बजिन्नस आहे. चौकशी करितीलच तर पत्रच आहे. ज्याचें त्याजकडून आंगीं लावून देतों. त्याजवर रुष्ट होतील, तर मजला त्यांचें चालवावयास सामर्थ्य आहे. रुजू करून घ्यावयास चिंता नाहीं. अशा कल्पना होऊन, फौज व पागा जमा करावयाची ताकीद जाली. हें वर्तमान मी न लेहावें, परंतु नाशास गोष्ट आली असतां कसें न लेहावें ? जासूद येथें नाहीं म्हणून बावांजवळ जोडी मागितली आणि एका रोजाचे वायद्यानें रवाना केली असे. याचा विचा काय असेल तो श्रीमंतांनीं करावा. आधीं हें वर्तमान लिहिण्याविसीं परवानगीच नव्हती. मागाहून आज्ञा आल्यावरून विनंती केली असे. स्वामी येणार असा बावांजवळ निश्चय जालाच होता. त्यावरून आपले येण्यापावेतों मात्र सबुरी आहे. आल्यानंतर काय घडेल तें घडो. या मागें वर्तमानें मनस्वी येत होतीं कल्पनाही अनेक उठत होत्या. त्यांचीं उत्तरें यथामति होत होतीं. या समयीं बोलूं दिलें नाहीं. असा विचार होऊं लागल्यास मी तरी कोठवर काय करावें ? याचीं उत्तरें अगर बंदोबस्त श्रीमंत करितील तरीच होईल. या मागेंच संशय दूर व्हावयाचे नव्हते, गंगाजी आल्यावर संशय सुटला होता. आतां कोणाच्यानें कांहीं होत नाहीं! लाचार! असा प्रकार जाला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.*

¶*This free communication from Sadashiv Dinkar to Nana explains how misunderstandings and unpleasantness arose between Mahadji and Nana. The root of this affair was some news-letter received by Mahadji from Poona describing the hostile intentions of Nana towards him. This incident is typical of the frequent differences which produced annoy ance and vexation between the two and which often seriously affected the interests of the Maratha State.*

*हें पत्र इ. सं. ऐ. स्फु. ले. ४-१४ येथें पारसनीसांनीं छापलें आहे. याच मजकुराचें व याच तारखेचें दुसरें पत्र ऐ. प. १८५ पहा.

No. 61 11th December 1779.

पैवस्ती चंद्र ४ जिल्हेज समानीन

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री लक्ष्मणराव गोविंद यांचीं पत्रें आलीं तीं आपणांकडे पाठविलीं आहेत, त्यांवरून सविस्तर ध्यानास येईल. भगीरथराव शिंदे व पाराजीपंत यांस पायागडाकडून पाठवावयाची तजवीज जाली आहे. दुसरी फौज त्यांजकडे आपण पाठवितात ही गोष्ट सिद्ध जालीच आहे. परंतु लक्ष्मणरावांचे लिहिण्यांत तूर्त सोनगडाकडे फौज आली असतां यांजवरी दबाव पडून फैल करूं पावणार नाहींत. या करितां आमचे मतें भगीरथराव व पाराजीपंत व विसाजीपंत सुद्धां सारी फौज कोंडाईबारी* उतरून सोनगडपर्यंत जावें, म्हणजे इंग्रजांवरी दबाव पडोन नर्मदा उतरोन पलीकडे जाऊं पावणार नाहींत. सोनगडाकडे फौज गेली असतां, फत्तेसिंग पलीकडे, ही फौज अलीकडे, तेव्हां दोन्ही दबाव राहातात. याकरितां भगीरथराव व पाराजीपंत अशीं पत्रें जलद जावीं. आपलें उत्तर आलें म्हणजे विसाजीपंतास लेहून पाठवूं. बारीवरी फौज जावयाची ती गुजराथेंत पाठवावी. फत्तेसिंग व ते एकत्र होऊन पलीकडील बंदोबस्त राखतील, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. व सुरतेचे पत्रावरून बातमीचें वर्तमान समजलें. ऐसियास चिरंजीव भगीरथराव शिंदे व पाराजीपंत यांसी पत्रें गुजराथेस जावयाचीं लिहिलीं होतीं त्यावरून ते थालनेरानजीक गेले. पुढें कूच करून जाणार होते. कालच त्यांचीं पत्रें आलीं होतीं. परंतु आपण लिहिल्यावरून, फिरोन त्यांस बारी उतरोन सोनगडाकडे राजश्री विसाजीपंत सुद्धां जाणें म्हणून, आपलीं पत्रें येतांच, वाइद्यानें पत्रें देऊन जोडी रवाना केली. आपणही विसाजीपंतास लेहून पाठवावें. सुरतेचीं पत्रें पाहून माघारीं पाठविलीं आहेत. विसाजीपंत व पाराजीपंत व चिरंजीव सोनगडापर्यंत गेल्यावरी, इंग्रजांचा विचार समजेल तशी तरतूद होईल. रवाना चंद्र २ जिल्हेज. ही विनंती.

¶*Mahadji communicates to Nana a general plan of campaign to be followed in Gujrat by the various Maratha commanders.*

*कोंडाईबारी खानदेशांतून गुजराथेंत उतरण्याचें द्वार, धुळ्याचे पश्चिमेस ५० मैल. रेल्वे स्टेशन चिंचपाडाचे पूर्वेस १० मैल.

28610

No. 62 12th December 1779.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ३ जिल्हेजपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—सांडणीस्वारासमागमें आज्ञापत्र सादर जाहलें, त्यांत आज्ञा जे, बातमीचें पत्र सुरतेहून आलें तें राजश्री पाटिलबावांकडे पाहावयास पाठविलें आहे. राजश्री विसाजीपंत व भगीरथराव व पाराशरपंत यांची रवानगी कोंडाईबारीकडे जाहल्यास उत्तम. बावांसही लिहिलें आहे. ऐसियास लखोटा बावांस प्रविष्ट करून, उत्तर घेऊन सेवेसीं पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. इंग्रजांकडील बातमीही राजश्री लक्ष्मण राव यांचे पत्रावरून कळली. श्रीमंतांचा प्रताप व दैव थोरच आहे. भगीरथराव व पाराशरपंतास पत्रें रवाना केलीं. कोंडाईबारीस विसाजीपंतासहित जाणें असें लिहिलें म्हणून बावांनीं सांगितलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana Mahadji's reply to a news-letter from Surat which Nana had sent for Mahadji's information.*

No. 63 12th December 1779,

पैवस्ती छ ४ जिल्हेज समानीन.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ जिल्हेजपावेतों स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—प्याद्यावराबर पत्र सादर जालें. फिरंगी याचे मजकुराचें पत्र बावांस पाठविलें आहे, तें मनन करून पत्रार्थ बावांचे मनांत येईसें करणें म्हणोन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें बावांचें पत्र प्रविष्ट केलें. अर्थही समजाऊन दिला. पंताळीस हजार रुपये तह जाल्यामुळेंच जास्त पडले हेंही त्यांस समजलें. सरकारच्या तहनाम्याखेरीज तीन कलमें त्यांनीं लेहून आणिलीं आहेत, त्यांची रदबदली होते. याविसींचा त्यांचा व सरकारचा निश्चय जाला असल्यास गुंताच उरकला. रदबदल राहिली असेल तर येथून बावांनीं फिरंगीयांस ल्याहावें. निश्चय जाला असल्यास कांहीं ल्याहावयाचें प्रयोजन नाहीं, ऐसें बावांनीं सांगितलें. बावांचे पत्राचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. प्रविष्ट

होईल. आपाजी साबाजीविसीं आज्ञा आली, त्यास चार दिवस जाले, माझें शरीर डावे कुशींत तिडीक निघते यामुळें विकल आहे. बावांजवळ फार बसवत नाहीं. शरीर स्वस्थ जाल्यानंतर येविसीं बावांस विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana from Mahadji's camp his view about the dispute that had arisen with the Portuguese and the remedy suggested by Mahadji to settle it.*

No. 64 18th December 1779.

पैवस्ती चंद्र ११ जिल्हेज समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी :—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. जिवाजीपंत यांसी पत्रें व राजश्री कृष्णराव यांसी नवाबाचें पत्र आलें तें, ऐसीं पाहावयासी पाठविलीं आहेत. पाहून माघारी पाठवावीं. उत्तर येईल त्याप्रमाणें लेहूं, म्हणोन लिहिलें. त्यास पत्रावरून वर्तमान सविस्तर कळलें. उत्तर ल्याहावयाचा प्रकार राजश्री नारो शिवदेव यांस सांगितलें आहे. मशारनिल्हे लिहितील. त्यावरून कळेल. रवाना चंद्र ९ जिल्हेज. हे विनंती.

¶*Mahadji returns certain papers after perusal to Nana and says he has explained the affair to Naro Shivdev.*

No. 65 21st December 1779.

पैवस्ती चंद्र १३ जिल्हेज समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी:—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांचीं पत्रें पाहावयासी पाठविलीं तीं पावलीं. अवलोकन करून माघारी पाठविलीं आहेत, पावतील. भोसल्याकडील पत्रें इकडे आलीं, त्यांचे उत्तराविसीं लिहिलें, त्यास त्यांचीं उत्तरें तयार करविलीं आहेत. लवकरच रवाना होतील. कळावें. रवाना चंद्र १२ जिल्हेज. हे विनंती.

¶*Mahadji acknowledges letters from the Bhosla Raja and says he is preparing the replies.*

No. 66 29th December 1779.

पैवस्ती चंद्र २३ जिल्हेज समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः--

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. मार्गशीर्ष मास गेला. होळकराची फौज जमा होणार. तदनंतर जाणार. दिवस थोडे राहिले, याकरितां लवकर तरतूद होऊन फौज जाई तें करावें. तूर्त फौज वाफगांवीं होळकराजवळ आहे, ती तमाम मुलूख लुटत्ये. खळीं भरून नेतात. बंदोबस्त होत नाहीं. हीच फौज कोंडाईबारीकडे गेल्यास कामास पडेल. म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास होळकराकडे फौज तिकडे रवाना करावयाविसीं वरचेवरीं पत्रें येथून पाठवीत आहों. हल्लींही लिहिलें आहे, व ताकीद मुलकास उपद्रव न द्यावा व निक्षून करावी असेंही लिहिलें आहे. इकडील फौजेचे रवानगीची तरतूद जाली आहे. फौज जमा होत चालली. लौकरीच रवानगी होईल. वरकड राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रवाना चंद्र २० जिल्हेज. हे विनंती.

¶*Mahadji in reply to Nana informs him that he has written to Holkar to hurry up his despatch of troops.*

No. 67 6th January 1780.

पैवस्ती छ २९ जिल्हेज समानीन.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास*)

ताा छ. २८ जिल्हेज सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः— जासुदाबरोबर पत्र सादर जाहलें त्यांत आज्ञा जे, राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांचीं व राजश्री चिंतामण हरि यांचे कारकुनाचें पत्र आलें तें राजश्री पाटिलबावांस पहावयास पाठविलीं आहेत. तीं दाखवून माघारीं पाठवणें म्हणून. त्यास आज्ञेप्रमाणें बावांस पत्र प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें; व गायकवाड वगैरे तीन पत्रें बावांस दाखवून माघारीं पाठविलीं आहेत. सेवेसीं प्रविष्ट होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar returns to Nana certain letters after they had been shown to Mahadji.*

---

*पारसनीसांच्या आवृत्तींत सदाशिव दिनकर व आपाजीराम यांचीं पत्रें निरनिराळ्या भागांत छापलीं आहेत. परंतु या आवृत्तींत सर्वच पत्रें कालानुक्रमानें एकत्र लावल्यामुळें ज्या पत्रांवर लेखकाचें नांव नमूद नाहीं, त्यांस वरीलप्रमाणें निर्देश दाखविला आहे.

No. 68 6th January 1780

पैवस्ती चंद्र २९ जिल्हेज समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांचीं पत्रें आलीं, तीं पहावयास पाठविलीं आहेत व राजश्री चिंतामण दीक्षित यांचे कमाविसदाराचें पत्र आलें, तेंही पाठविलें आहे त्यावरून वर्तमान कळेल. राजश्री लक्ष्मणराव चिटणीस यांस निरोप दिल्हा. ते निघाले. याकरतां कमाविसदाराच्यानें दम धरवत नाहीं. यास्तव कोंडाईबारीकडे फौज लवकर जावी म्हणोन लिहिलें. त्यावरून व गायकवाड व कमाविसदार यांचे पत्रावरून सविस्तर मजकूर कळला. चंद्रराव पवार* याचें पारपत्य आमदाबादवाल्यांनीं केलें. उत्तम जालें. राजश्री विसाजी आपाजी व चिरंजीव भगीरथराव शिंदे व पाराशर दादाजी यांचें कूच गुजराथचे रोखें जाल्याचीं काल पत्रें आलीं. येथून जलद जाण्याविसीं वरचेवरी पत्रें जात आहेत. जलदच जाऊन पोंहचतील. बारीकडेही फौज रवाना करावयाची तरतूद जाली आहे. फौज रवाना होईल. येथून कूच करून जाण्याचा निश्चय जाला, येविसींचें राजश्री नारो शिवदेव यांणीं सांगितलेंच असेल. रवाना चंद्र २८ जिल्हेज हे विनंती.

¶*Mahadji intimates to Nana the preparations that were made for the Gujrat campaign. He was himself preparing to start in the near future, adds he.*

No. 69 10th January 1780.

पैवस्ती चंद्र ४ मोहरम समानीन

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बाळाजी गोविंद बुंदेले यांचीं पत्रें आलीं, तीं पाहावयास पाठविलीं आहेत त्यांवरून तिकडील वर्तमान इंग्रज येण्याचें कळेल. तिकडून इंग्रज येऊन सुरतकरांस मिळाल्यास

---

*राघोबाच्या पक्षांतील एक सरदार, धारच्या घराण्यापैकीं.

भारी पडेल. त्यास पवार वगैरे पथकें त्या प्रांतीं आहेत, तीं व बाळाजी गोविंद फौज सुद्धां एक केले असतां दहा हजार फौज सरकारची होईल. तेव्हां पातशाहा व नजफखान* यांजकडून भारी कुमक जाल्यास इंग्रजाचें येणें इकडे घडणार नाहीं, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास राजश्री बाळाजी गोविंद यांचे पत्रावरून तिकडील वर्तमान कळलें. पवार वगैरे पथकें सरकारचीं ग्वालेरीकडे गेलीं तीं व आम्हांकडील राजश्री अंबाजी इंगळे व राजश्री खंडेराव हरि मिळोन ग्वालेरीनजीक आहेत. गोहदकर जाट जमावानिशीं गोहदेहून तीन कोस अलीकडे आला. जमाव त्याचा भारी आहे. आपले फौजेस व त्यास साता आठा कोसांची तफावत. शह सोडून त्यांतील पथकें गेल्यानें मसलतीस पेंच पडतो. यांची त्यांची गांठ पडून फडशा जाल्यावरी मग पथकें तिकडे जातील. पातशाहा व नजफखान यांचीं सूत्रें पहिलीं इकडे होतीं. त्यास पातशाहापासीं कारभारी आबदुल हयातखान होता त्याचें लक्ष इकडे. त्याचे मारफतीनें पातशाहाकडील कागदपत्र येत जात होते. नजफखानाचें व आबदुल हयातखानाचें वैमनस्य. यामुळें नजफखानही इकडील सूत्र राखीत होता. हल्लीं नजफखान दिल्लीस जाऊन आबदुल हयातखान यास धरून अटकेंत ठेविलें. पातशाहा दिल्लीचे किल्ल्यांत, परंतु बंदोबस्त नजफखानाचा. तेव्हां पातशाहा परस्वाधीन असा प्रकार तिकडील तूर्त जाला आहे. नजफखानाचे हातीं जाटाचा व पातशाहाचा मुलूख लागल्यामुळें जबर पडला. पातशाहास आणून दिल्लीस बसविलें व नजफखानाचा बचाव करून राखिला, त्याअर्थीं पातशाहा व नजफखान यांणीं तें स्मरोन इकडील लक्ष राखावें, हें त्यांस उचितच आहे. परंतु या गोष्टीस आठ नऊ वर्षें जालीं. त्यांचें स्मरणांत आहे नाहीं, काय कळे? तशांत आबदुल हयातखानाचें लक्ष पुर्तेपणें होतें. त्याचा प्रकार तसा जाला. तेव्हां त्याजकडून भारी कुमक होणें कळतच आहे. ग्वालेरीकडे फौज गोहदकराचे शहापासून मोकळी जाली म्हणजे सरकारचीं पथकें व बाळाजी गोविंद यांजकडील जातील. रवाना चंद्र २ मोहरम. हे विनंतीं.

¶*In reply to Nana's suggestion that Mahadji should arrange to oppose the British march through Bundelkhand, he reviews the general Maratha position in north India particularly with reference to the Emperor and his minister Mirza Najafkhan.*

---

*मीर्झा नजफखान बादशाहाचा वजीर.

No. 70 10th January 1780.

श्री

(पत्र लेखक सदाशिवराव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—अंतरवेदींत इंग्रज बळावले. त्यांचे पारपत्यास पातशाह व नजफखान आल्यास होईल म्हणोन राजश्री पुरुषोत्तम महादेव हिंगणे यांणीं राजश्री पाटिलबावांस पत्र पाठविलें होतें. त्याचें उत्तर बावांनीं त्यांस लेहून पाठविलें. तो मजकूर त्यांनीं लेहून पाठविला. त्यास इंग्रज बळावलेच आहेत. एक कंपू कानपुरावर अगोदर आलाच आहे. दुसरा कंपू काशीस आला, तेथून कानपुरास येणार. हें वर्तमान सविस्तर राजश्री बाळाजी गोविंद यांनीं लेहून पाठविलें, तें पत्रच बावांस दाखवायास पाठविलें आहे. दाखऊन त्यांचे पारपत्याची पैरवी व्हावी. न जाल्यास ते कंपू सुरतकरांस मिळाल्यावर भारी पडेल असें बावांस सांगोन, सरकारचीं पथकें हिंदुस्थानांत आहेत तीं व उभयतां सरदारांची फौज बाळाजी गोविंद यांस सामील होय तें करणें म्हणोन आज्ञा पत्रीं सादर जाली. त्यास, येविसीं बावांस विनंती पत्राप्रमाणें केली. उत्तर जालें जे, बादशाहाचें अनुसंधान आम्हांकडे पुर्तेपणें जाल्यास दहा वर्षें जालीं. प्रतिवर्षीं पत्रें त्यांचीं येण्याकरितां येतच आहेत. परंतु कारभारीयांचे स्वाधीन. तो कारभारी पुर्ता आमचे लक्षांत होता, यामुळें नजफखानही अनुसंधान राखीत होता. बादशाहाचे कारभारी यांसीं नजफखानासीं द्वेष. दोन्ही समागमें असल्यास मसलत आपले फौजेखेरीज शेवटास कसी जाईल? या अर्थें पुरुषोत्तमपंतांस आम्हीं तसें उत्तर पाठविलें. तें त्यांच्या प्रत्ययास कां आलें नाहीं न कळे. आमचे लिहिल्याप्रमाणेंच तेथें वर्तणूक जाली. मोहिमेचीं निमित्तें करून बादशाहाचा कारभारी दिल्लीस आला. नजफखानही फौज सुद्धां दिल्लीस गेला. हा बलवान यानें मनसबा करून बादशाहाचे कारभारी यास धरून कैद केला. किल्ल्यास बंदोबस्त आपला केला. बादशाहा आंत आहे तो कैद दाखल आहे. अगदीं बंदोबस्त नजफखानाचा जाला. बादशाह काबूंत आला. खालशाचा मुलूख हातास आला. जाटाचा मुलूख अगोदरच घेतला होता. हें ऐलीकडेसच जालें असतां नजफखानाची दृष्टि कसी ठिकाणीं राहील? हें प्रत्यक्ष असतां पुरुषोत्तमपंत कसे समजले नाहींत? आमचें उभयतांचें जाणें हिंदुस्थानांत होऊन नजफखानाचें पारपत्य जाल्याखेरीज देहावर येत नाहीं. बाळाजी गोविंद यांचें पत्र पाहिलें. त्यास सांप्रत सरकारचीं पथकें व आमची फौज ग्वालेर प्रांतीं गेली.

त्यांनीं दहा बारा गढ्या घेऊन ग्वालेरीस गेले. हें पाहून गोहदकर जाट बाहेर निघोन दोन तीन कोस चालून आला. आपली फौज ग्वालेरीहून जवळपास आहे. त्यांचें व गोहदकर जाटाचें अंतर थोडकें आहे. अशा संधींत फौजेनें शह कसा सोडावा ? तेथून मोकळे जाले म्हणिजे सरकारचीं पथकें व आमची फौज बाळाजी गोविंद यांजकडे जातील. आम्हीं गुजराथेस जातों त्यापक्षीं त्या कंपूची काळजी आम्हांस नाहीं असें समजूं नये. बावांनींही आपले पत्राचें उत्तर लिहिलें आहे. त्यावरून विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana Fadnis of the actual state of affairs in north India and Delhi and conveys to him Mahadji's dispositions and arrangements made by him for opposing the march of British troops through Bundelkhand and Malwa.*

No. 71 12th January 1780.

पैवस्ती चंद्र ६ मोहरम समानीन.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ४ मोहरमपावेतों स्वामींचें कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—प्याद्याबरोबर पत्र सादर जाहलें. बलसाडच्या कमाविसदाराचें पत्र राजश्री चिंतामण हरि सरसुभा यांस आलें, तें राजश्री पाटिलबावांस पहावयाकरितां पाठविलें आहे. दाखऊन माघारें पाठवणें. अशांत फौज तिकडे लवकर जावी, म्हणोन पत्रीं आज्ञापिलें. त्यावरून बलसाडच्या कमाविसदाराचीं पत्रें बावांस दाखवून, माघारीं घेऊन पाठविलीं आहेत. फौजेचे रवानगीचा मजकूर, हे खासाच कूच करून त्या सुमारें जातात येविसीं राजश्री बावांनीं सेवेसीं लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of Mahadji's immediate march into Gujrat.*

No. 72 12th January 1780.

पैवस्ती चंद्र ६ मोहरम समानीन

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ४ मोहरमपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—प्याद्याबरोबर पत्र सादर जाहलें. तेथें आज्ञा जे,

राजश्री बापूजी होळकर यांचे मजकुराचें पत्र राजश्री पाटिलबावांस लिहिलें आहे, तें पावतें करून उत्तर घेऊन पाठवणें म्हणोन आज्ञा. त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावांस पत्र दाखवून त्याचें उत्तर त्यांनीं दिल्हें तें घेऊन सेवेसीं पाठविलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. बापूजी होळकर, राजश्री तुकोजी होळकर यांजकडे येतात म्हणोन सांगत होते. राजश्री विसाजी आपाजी व भगीरथराव व पाराशरपंत यांजकडील आज पत्रें सोनगीरचे मुक्कामाहून आलीं. राजपिंपळचाचे घाटास कोंडाईबारीचे सुमारें गेले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana where and how the various Maratha commanders in Gujrat were acting.*

No. 73 18th January 1780.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसा वी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांजकडील फौज किल्ले पायागडचे जिल्ह्यांत येऊन, इकडील ठाणीं उठवून देऊन, किल्लचापर्यंत अंमल केला. किल्लचांत मात्र इकडील बंदोबस्त आहे. त्यास गायकवाडाची व इकडील मुलकाची सरहद्द पूर्वीपासून आहे. परंतु आजपर्यंत त्यांजकडून इकडील माहालांत खलश जाहला नाहीं. सांप्रत त्यांजकडील फौज येऊन ठाणीं उठवून आपला बंदोबस्त करितात याचें कारण समजत नाहीं. किल्लेदाराचीं पत्रें येविशीं येतांच गायकवाड यांसीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांनीं फौज बोलावून घेऊन, इकडील अमलांतील नुकसान करून मालमवेसी नेली असेल, ती फिरून दिल्यास चिंता नाहीं. नाहीं तरी इकडूनही फौज पाठवून येविशींचा बंदोबस्त करणें लागेल. आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. रवाना चंद्र १० मोहरम. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana that Fatesinh Gaikwad had taken a hostile attitude and that it had become necessary to chastise him.*

No. 74 5th February 1780.

पौ छ ७ सफर समानीन

बराबर प्यादे बहिरजी. श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. पारनेऱ्याकडे इंग्रजाकडील लोक आल्याची बातमी आली. त्यावरून गणेश विश्वनाथ यांजबरोबर

फौज देऊन रवानगी केली म्हणोन लिहिलें, तें कळलें. त्यास मशारनिल्हची रवानगी तिकडील बंदोबस्तास केली, उत्तम केलें. आम्हीं दरकूच गुजराथेंत जात असों. कळावें. रवाना चंद्र २८. हे विनंती.

¶*Mahadji sends intimation to Nana of his having started on his campaign into Gujrat.*

No. 75 9th February 1780.

पैस्ती छ १४ सफर समानीन.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ सफरपावेतों मुकाम पाा धुळें येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष :— स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे, पत्र एकांतीं वाचून लिहिल्याप्रमाणें शोध करून उत्तर पाठविणें म्हणोन आज्ञा. त्यास येथील गृहस्ताचा भावगर्भ मनास आणितां, आपल्याविसीं मुख्यत्वेंकरून राणेखानभाई यांणीं मजपासीं एकच गोष्ट सांगितली कीं, मी राजश्री पाटीलबावा यांजपासीं आहें तोंपर्यंत श्रीमंत राजश्री नानाविसीं निखालसताच राखिली आहे, व पुढेंही खातरजमा तुम्हांस असावी कीं, येथें राजश्री नानाविसीं दुसरा अर्थ तिलप्राय वांकडा पडणार नाहीं व श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे कल्याणाविसीं येथून अंतर कदापि पडणार नाहीं. याप्रमाणें भाईंनीं खातरजमा केली, व राजश्री पाटीलबावांच्या बोलण्यामध्यें आपल्याविसीं दुसरा अर्थ किमपि नाहीं व एकनिश्चयें श्रीमंतांच्या पायांपासीं दुसरा अर्थ नाहीं. ज्या गोष्टीनें श्रीमंतांचें कल्याण व राज्याचा बंदोबस्त तीच गोष्ट होईल. इतर गोष्टीविसीं चित्तामध्यें विकल्प आणून राज्याचा नाश आम्हांपासून कधीं होणार नाहीं. या बोलण्यास साक्ष साहेब आहे. राजश्री बाळाराव व आबा व राणेखानभाई व रायाजी पाटील यांणीं पुर्तेपणीं खातरजमा केली. मुख्यत्वेंकरून राजश्री पाटीलबावांचे चित्तांत दिकत यावयाचें कारण हेंच कीं, राजश्री तुकोजी होळकर यांजकडील कारभारी यांणीं आपल्याकडील कांहीं खुणेच्या गोष्टी सांगितल्या, त्याजवरून परम विस्मयांत आहेत. सांगणाराच्या बोलण्यामध्यें आपण खासा जातीनसीं नाहींत इतकें वर्तमान पक्केपणीं ठिकाणीं लागलियानंतर सेवेसीं लिहिलें आहे. कच्चें पक्कें जें आहे तें श्रुत केलें आहे. वरकड सविस्तर अर्थ राजश्री नारो शिवदेव सेवेसीं येऊन

विनंती करितील, त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana Fadnis that upon minute inquiry there was no antagonism in Mahadji's mind towards him (Nana), and that Rane Khan and others were all supremely attached to Nana's interests and loyal to the Peshwa.*

No. 76 10th February 1780.

श्री

पुरवणीपत्र राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. आपण राजश्री नारो शिवदेव यांस चिट्ठी लिहिली, त्यांत मजकूर कीं, राजश्री कृष्णराव बल्लाळ नबाब निजामअलीखानाकडे गेलियावर हे बहुतां प्रकारें बोलले कीं, नक्षा इंग्रजाचे मसलतीचा तुम्हीं ठरविला असतां, इतके दिवस राहाणें ठीक नाहीं. इंग्रज ×× बाज. असा समय येणार नाहीं. याप्रमाणें बहुतां रीतीनें बोलणें जाल्यावर, नबाबांनीं सांगितलें कीं, नक्षा ठरविला त्याप्रमाणें आम्हीं करावें यांत गुंता नाहीं. परंतु हैदरखानाचे चित्तांत आमची दुष्मनगिरी फार आहे, तेव्हां इंग्रजास कसें तोडावें? हैदरखानानें दिल्लीचीं राजकारणें केलीं, त्याचीं पत्रेंच हल्लीं सांपडलीं. तेव्हां आम्हांस हैदरखानास पेंचांत आणणें प्राप्त. मागेंच हें करावें, तर तुमचें काम झालें, याकरितां उगेच होतों. श्रीमंतांसीं वांकडे करणें नाहीं. परस्परें कोणी कोणाचे दौलतीस वाईट करूं नये, अशी शपथ व्हावी. शपथ न जालियास कळेल तसें करावें. येविसीचे विस्तार बहुत आहेत. येविषयींचीं साधनें व खातरजमाही कृष्णरायांनीं फार केल्या; परंतु हैदरखानास जरब द्यावी, हेंच फार चित्तांत आहे. याकरितां इंग्रजास तोडीत नाहींत. हा सारांश त्यांतील लिहिला आहे. शपथ न दिली तर कबहाती* फार आहेत, तेव्हां करणें प्राप्त. त्यावरून कळलें. ऐसियास शपथ न दिल्यास कबहाती फार आहेत. त्यापक्षीं शपथ दिल्यास चिंता नाहीं. द्यावी. रवाना छ ४ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji communicates to Nana Fadnis his approval for passing an oath of fidelity to the Nizam, who was inclined to side with the British and whom it was necessary to win over to the allies' cause.*

---

*तंटा, भांडण.

No. 77 18th February 1780.

श्री

राजश्री आपाजी राम स्वामीचे सेवेसीं:—

छ विनंती उपरी:—तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांसी गांठ घालून बोलणें जाहलें. त्याचीं उत्तरें समजावयाकरितां सेवेसीं लिहिलें आहे म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. त्याचे जवाब सवाल येणेंप्रमाणें बितपसील *कलमें:—

आम्हांविसीं संशय, तोतयाचीं व इंग्रजांचीं वगैरे कामें जालीं याजमुळें गेला होता, परंतु अलीकडे दादा पळाले व नवाबाचीं पत्रें आलीं व लोकांचे सांगण्यावरून संशय चित्तांत आले. कशावरून तर, सुरतेस सरकारचा वकील गेला त्यासमागमें आमचा वकील नसावा. तेव्हां संशय जाला कीं नाहीं म्हणोन. त्यास नवाबांनीं कांहीं लिहिलें नाहीं व लोकांनीं कांहीं सांगितलें नाहीं. इंग्रजांकडे वकील पाठवावयाचा तो मजकूर पाटीलबावांस लिहिला, त्यांणीं पाठवावा म्हणोन लिहिलें. त्याजवरून रवानगी केली. पुढें कांहीं सिद्धांताचें बोलणें व्हावें, आपला कारकून जावा, तों इंग्रजांकडील साफ जाबसाल आला. लक्ष्मणरावही आणविले. साराच गुंता उरकला. मुळींच संशय नाहीं तेथें येणार कोठून? कलम १.

दोन प्रकारची चौथाई म्हटली तरी होईल असें बोलणें जालें होतें. पुढें बाकीचे मखलासींतील अर्थ एक, यादींतील अर्थ एक, तेव्हां पेचाची गोष्ट कीं नाहीं, म्हणोन. त्यास पहिली पावणेचार लक्ष्यांची मखलासी जाली याप्रमाणें पांचांची असावी. ती साऱ्याच ऐवजास चौथाई असें लिहिलें. त्यास जसें बोलण्यांत आलें होतें तसी यादी लिहिली. दिकत मनांत आणोन याद लिहिली नाहीं. खातरजमा असावी. ती याद फिरवून पहिल्या यादीप्रमाणें मालुमांत लिहून देऊं. कलम १.

आमचा कारभार जातीनें पाहावा ती चाल मोडून बोलणें दरबारीं गेलें. कारभारी भवति न भवति करितात, कुतर्क घेतात म्हणोन. त्यास आम्हीं चाल मोडली नाहीं; नवीही केली नाहीं. जी पहिल्यापासून आहे तीच आहे. कारभारी यांनीं तर्क कुतर्क घेतले असे कोणत्या कामांत? गैरवाजवी ज्याचें काम असतें, त्याचें मनाजोगें जालें नाहीं म्हणजे भलतेंच लिहितो. वरकड गुंता पडला नाहीं व पडावयाचा नाहीं. कलम १

*वर क्रमांक ५९ ता. ८-१२-१७७९ च्या पत्रास हे नानाचे जबाब आहेत.

आम्हांकडून सरकारचाकरी होत आली, त्यांत दादाची मसलत बिघडली व राग आल्यास कांहीं अधिक उणें बोलतों इतकेंच आहे. छान असावी व आपलीं पत्रें कोंडाईबारीकडे जाण्याविसीं आलीं, त्याजवरून येथून निघोन देवदर्शन घेऊन बराणपुराकडे गेल्यावर फौज दोहोकडे पाठवावी असें बोलतात. परंतु तिकडे गेल्यावर हिकडील येण्याचें अनुमान दिसत नाहीं म्हणोन. त्यास चार कामांत एक काम चुकत असतें, तें मनांत आणू नये हें खरें. परंतु चुकलेंच नाहीं मग मनांत आणावें तें काय? दादा गेला ही चूक आह्मीं मोजिली नाहीं. सर्व प्रकारें बंदोबस्त करून इमानावर विश्वास ठेविला. दगाबाजी केली. चिंता काय? दगाबाजाचा मनसुबा शेवटास जात नाहीं. उद्यां धरून आणूं. चिंता काय? असें असतां संशय कोणास आला, कोणाजवळ बोलण्यांत आलें? मुळीं नाहीं त्याची कल्पना कशास करावी? हिकडील सर्व प्रकारें स्वच्छता अंत:करणपूर्वक असतां, लबाड सांगतात त्याजवर जाऊं नये. आम्ही जन्माचा भाऊपणा मेळविला, तेथें अशा कल्पना कशा येतील? हें त्यांनीं ध्यानांत आणावें. कलम १.

धनगरासंमंधीं आम्ही एके गृहस्थासमागमें निरोप सांगून पाठविले. त्याचे अर्थ सांगणारानें विलक्षण सांगितले. असोत. म्हणोन मध्यस्ताजवळ बोलणें जालें. त्याची रुजुवात गंगाजीचे रूबरू केली. दोष कोणाकडे ठेविलाच नाहीं. तेव्हां ऐकिली एक, आतां म्हणतों एक, असें जालें नाहीं. यास्तव तपसील लिहिणें कशास? कलम १

ग्वालेरीमुळें वगैरे कामास तिकडे फौज आहे याजकरितां भांडेरीचा उपयोग होता म्हणोन. त्यास येविसींचा मजकूर नारोपंतांजवळ बोलण्यांत सविस्तर आला आहे. कलम १

अशेर आम्हांस दिल्यास दोन वर्षें जालीं असतां तें ठिकाण हस्तगत न होय. तेव्हां तेथील लोकांचे माणसांचा बंदोबस्त व्हावा कीं नाहीं म्हणोन. त्यास हा मजकूर संशय यावयाजोगा खरा; परंतु सदाशिवपंतासमागमें शपथपूर्वक चिठी पाठविली, तेव्हां मागील पुढील संशय राहिला कीं काय? कबिले लोकांचे धरावयाची तरतूद केली. प्रत्ययास येईल. कलम १

आमचा व नानांचा भाऊपणा तेव्हां एखादा आम्हांकडे येतो. त्याजला कारभारी म्हणतात कीं पाटीलबावा किती दिवस असतील? ऐसें बोलोन आकसांत त्याला घालतां म्हणोन. त्यास ऐसें बोलावयाचा संप्रदाय येथें कोणा-

चाही नाहीं. मग कारभारी कसे म्हणतील? लोकांचे सांगितल्यावर जाऊं नये. सरकारकिफायतीचीं वाजवी कामें हजारो सांगोन पाठवावीं. आम्हीं करावीं हीच इच्छा आहे. तेथें तपसील कशास? कलम १

कोंडाईबारीकडे जावें म्हणोन लिहिलें त्याजवरून हीं बोलणीं काय निमित्य? त्यांचे चांगले लौकिकाचा मनसुबा लिहितों, हा ध्यानांत येत नाहीं कीं काय? पाटीलबावा पुरःसर होऊन मनसुब्याची आंगेजणी करून, मोगल, भोसले, हैदर-नाईक यांसीं बोलणीं जालीं. पत्रें गेलीं. त्याची नमुदांची* गोष्ट हीच कीं, दहा हजार फौज फत्तेसिंगाकडे पाठवून उभयतां सरदारांनीं कोंडाईबारीकडे जाऊन फौज घांटाखालीं घालावी म्हणजे इंग्रजांस ताण बसेल. नबाव आदिकरून आपलाले कामास लागतील. सर्वांचे डोळे पाटीलबावांकडे आहेत. हें नमूद जालें म्हणजे सर्वांस गोष्ट मसलतीस लागणें प्राप्त. नाहीं तरी हाताचें पायावर घालितील. याजकरितां पै दर पै लिहीत गेलों. हे अर्थ त्यांचे ध्यानांत यावे. आलेच असतील. तेव्हां वाकडेपणाची जात कोठें राहिली? कलम १

राहुरीचे मुक्कामीं उरूस केला, त्यांत दृष्टांत कीं पुढें न जावें, गांठ पडावयाची नाहीं, त्याजवरून राहिलों. त्यांत एक नगरचा प्रत्यय आला. आतां राहणें ठीक नाहीं. त्यास तेव्हां राहणें बरसातीकरितां ठीकच होतें; आतां गेल्याखेरीज मसलत होणार नाहीं. मुळींच संशय नाहीं तेव्हां परिमार्जन करावें काय? कलम १.

एकूण दहा कलमें लिहिलीं आहेत. त्यांजवरून सर्व अर्थ समजण्यांत येतील.†

¶*Nana Fadnis writes to Appaji Ram his replies disproving the charges that Mahadji had communicated against Nana (see letter No. 59 above). The charges and Nana's defence against them are here communicated for Mahadji's information.*

No. 78 About 20th February 1780.

श्री

(श्री पत्रलेखक सदाशिव दिनकर.)

विज्ञापना ऐसीजे :—बडोद्याहून वर्तमान वरचेवर राजश्री बाळाजी महादेव यांजकडून राजश्री विसाजी आपाजीस येत असतें. ते सेवेसीं विनंती करीतच

---

*निदर्शन, प्रत्यय. †हें नाना फडणिसाचें पत्र छ १२ सफरचें असावें.

असतील. पहिलीं पत्रें विसाजी बापूंचीं बावांस आलीं, तीं सेवेसीं पाठविलीं. हल्लीं बापूंचें पत्र मांडवीचे मुक्कामाहून बावांस आलें व बाळाजी महादेवाचें पत्र अडीच बंद नक्कल करून बावांकडे पाठविलीं, तें पत्र व नक्कल अडीच बंद एकून साडेतीन बंद सेवेसीं पाठविले आहेत. त्यांवरून वर्तमान विदित होईल. बावांचें उत्तर विसाजीपंत व भगीरथराव यांस गेलें जे, तुम्हीं रेवापार होऊन लवकर अहमदाबादेस जाणें. जातों म्हणून त्यांनीं लिहिलेंच आहे. गेले असतील. राजश्री गोविंदराव गायकवाड यांचें पत्र राजश्री खंडो आवजीस आलें. त्यांतील मजकूर कळल्यावर विनंती करीन. खंडो आवजीचे कारकुनानें सांगितलें जे, आमचा कासीद विसाजी आपाजीचे लष्करांतूनच आला. त्यानें सांगितलें जे, विसाजीपंत व भगीरथराव नर्मदा उतरले असतील. पाराजीपंताचा मनसबा जावयाचा दिसत नाहीं. या उपरी होईल वर्तमान तें विनंती करीन. सुरत अट्ठाविसींतील ठाणीं बसवावयाकरितां इकडे राहावें तरी अहमदाबादेस अपाय होईल. यास्तव आपण अहमदाबादेस जलद जावें. सुरत अट्ठाविसीचा बंदोबस्त राजश्री गणेशपंत बेहेरे यांनीं करावा. राखावा. याप्रमाणें बावांचें व माझें पत्र त्यांस गेलें आहे. उत्तरें आलीं नाहींत. कोठें आहेत हेही खबर नाहीं. याउपरी त्यांचें उत्तर आल्यासारखी विनंती करीन. डांक स्वामींनीं रवाना केली ती भोंडगांव नजीक कोंडाईबारी येथें पावली. लष्कराबराबर सोनगडापावेतों आली. पुढील डांकेचे बंदोबस्तासीं राजश्री त्रिंबकराव फरासखानी यांस लिहिलें आहे. विनंती करतील. येविसीं त्यांस आज्ञा व्हावी. उद्यांचा मुक्काम कडूसऊनचा आहे. तेथून सुरत तेरा कोस आहे म्हणतात. सुरतेंत मोठी गलबल जाली. हवेल्यांस कडबे भरले म्हणोन ऐकतों. तिकडेही वर्तमान येतच असेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana the essential features of the Maratha march into Gujrat particularly their intended attacks on Ahmadabad and Surat.*

No. 79 21st February 1780.

पैवस्ती छ २० सफर समानीन

हस्ते डांक. **श्री**

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ माहे सफर मुक्काम व्यारे प्रांत गुजराथ स्वामींचे कृपावलोकने

करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—इसरवाडीचे मुक्कामींहून दिनचर्येचें वर्तमान पत्रीं विनंती करून डांकेबरोबर रवाना केलीं. इसरवाडी व नबाबपूर दोनीं गांव होळकरांनीं लुटले. जाळले. पेवें नेलीं. राजश्री पाटिल-बावांचे राऊत मारले. याजमुळें विक्षेप जाहला. सुलतानजी लांभाते* इसर-वाडीचे मुक्कामीं आले होते. नबाबपूरचे मुक्कामीं राजेश्री नारो गणेश व सुलतानजी लांभाते बावांकडे आले. दोन्ही तीन्ही गांव लुटले, जाळले, व राऊत मारले, येविषयीं बावांनीं त्यांस शब्द लावला. त्यांनीं उत्तर केलें कीं, आमचे येथें कारभारांत कांहीं बंद राहिला नाहीं. माझें कोणी ऐकेना. तेव्हां मी तेथें राहणेंही योग्य नाहीं. आपणाजवळ येऊन राहतों. चित्तास येईल त्यास तेथील कारभार सांगावा. बावांनीं म्हटलें, आपण मसलतीस चाललों. यास फौज आदिकरून साहित्य किती पाहिजे ? तुमची फौज किती ? मसलत कशी होईल ? त्यांनीं उत्तर दिलें जे, आम्हांजवळ दहा हजार फौज आहे, त्यांसच पोटास मिळत नाहीं ! द्यावें कोठून ? आणखी फौज कोठून ठेवावी ? आणखी बोलणें लुटलें नागविल्याचें फार जाहलें. बावांनीं ऐकूनच घेतलें. इसरवाडी नबाबपूर जाळल्या लुटल्याचा व राऊत मारल्याचा परिहार कांहीं जाहला नाहीं. इंग्रज व राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड एक होऊन अहमदाबादेस गेले याचा विचार काय ? इतकें बावांनीं नारोपंतास पुसिलें. त्यांनीं उत्तर केलें जे, आपली उभयतांची स्वारी तिकडे चाललीच आहे. दर मजल चालावें. आम्हीं समागमेंच आहों. बावांनीं म्हटलें, आपण जातों तत्रापि लांब राहिलों. दुसरें, राजश्री विसाजी आप्पाजी व पाराजीपंत व भगीरथराव रेवातीरीं आहेत, त्यांस रेवापार होऊन लवकर अहमदाबादेस जाणें म्हणून लिहून पाठविलेंच आहे. परंतु फौज थोडकी. इंग्रज, गायकवाडाचे शहास जाणें. सरंजाम पोख्त पाहिजे. पांच हजार फौज तुमची, पांच हजार आमची, एकूण दहा हजार फौज आणखी रवाना करावी. सोळा सोळा कोसांच्या मजली करून जाऊन त्यांत सामील होतील. उत्तम आहे म्हणून निरोप घेऊन गेले. उद्यां कडूस तापीतीरचा मुक्काम होईल. तेथून फौज पुढें रवाना करणार. गेल्यास कोणाची किती जाईल तें कळल्यावर विनंती करीन. नारो गणेश याचें बोलणें मजदेखत जाहलें नाहीं. ते गेल्यानंतर बावांस विचारलें. बावांनीं सांगितल्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The atrocities committed by Holkar's troops during their march through Khandesh and Gujrat and their denunciation by Mahadji are reported by Sadashiv Dinkar to Nana in this letter.*

*होळकराचा सरदार.

No. 80 24th February 1780.

श्री

सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १८ सफरपावेतों मुक्काम तापी उत्तर तीर नजीक मांडवी स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष :—फत्तेसिंग गायकवाड व इंग्रज मिळोन जाऊन अहमदाबाद घेतली. समागमें अमृतराव आहेत. आपल्याकडील कमाविसदार राघो भिकाजी यांनीं लढाईची तर्तूद चांगली केली होती, परंतु फत्तेसिंग गायकवाड यांनीं फितूर करून आंतील लोकांसीं राजकारण करून शहर घेऊन जलचरांस दिलें. फत्तेसिंग यांनीं इंग्रजांसी सलूख आंतून बहुत दिवस राखिला आहे. अहमदाबादकरांनीं लढाई फार चांगली केली. चार पांचशें माणूस इंग्रजांकडील हला जाहाली ते समयीं कापून काढिलें, व त्यांच्या तोफाही घेतल्या होत्या. परंतु गायकवाडांनीं फितूर केला व जलचरांचा मारही भारी, याजमुळें त्यांनीं व टोपीकर यांनीं शहर हस्तगत केलें. सविस्तर वर्तमान राजश्री सदाशिवपंत दाजी यांनीं सेवेसीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. राजश्री गणेशपंत बेहेरे यांची रवानगी स्वामींनीं केली आहे. त्यास ते पारनेरा किल्ल्यापावेतों आले. त्यास पुढें त्यांनीं येऊन सुरत अट्ठाविशींतील ठाणीं बसवावीं आणि नर्मदे अलीकडील बंदोबस्त सुरत प्रांतींचा करावा ऐसी आज्ञा आली पाहिजे. राजश्री पाटीलबावा दरमजल रेवा उतरोन पलीकडे जाणार. सेवेसीं श्रुत व्हावें म्हणोन लिहिलें असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana the capture of Ahmadabad jointly by the Gaikwad and the British, and the stout resistance offered thereto by Ragho Bhikaji, the commander of the garrison.*

No. 81 26th February 1780.

श्री

सेवेसीं विज्ञापना ऐसीजे :—उभयतांचें वैमनस्य येऊन स्थलांतर केलें होतें. मागतीं रहस्य होऊन पूर्वस्थानीं सन्निध वासास पुरुष (फत्तेसिंग) आला. उभयतां प्रकृति (अहमदाबादे) वरच आहेत. समाधान होण्याचें कारण ऐकितों कीं, प्रकृत (अहमदाबाद) पुरूषाचे स्वाधीन करावी. लक्ष चार रुपये पेशजीचे तीनशिवाय पुरुषानें मर्कटास द्यावे. आणि 'प्रकृत' आपले जमेस करून घ्यावी

असा स्नेह ठरला. पुढें तेथून चेर (शेर ?) होऊन माघारे, गेल्या मार्गे आपल्या दर्शनास यावें असें मानस मर्कटाचें, पुरुषाचे विचारें हें ठीक नाहीं. गेल्या मार्गे येऊं नये. आपली प्रजा श्रमी होते. याजकरितां मही दक्षिण तीरीं न येतां, उत्तर तीराचे मार्गे अमोद देहजबारी* यांवरून खंबाइताजवळ अथवा अलीकडे रेवा उतरोन, स्वामींचे दर्शन घ्यावें, असा परस्परें विचार होत आहे. पायागड, चांपानेर यांजकडे जाण्याचा प्रकार आपल्या व मागील 'सावकार' (पाटीलबावा) 'माल' (फौज) घेऊन येण्याचा विचार आहे असें समजलियावर तूर्त राहिला. प्रकृतीहून निघोन माघारे रेवा दक्षिण तीरीं सर्वत्रांचीं दर्शनें घ्यावीं असा निश्चय होत आहे. मग पाहावें. चांपानेराकडे गेलियास आपण सर्वत्र रेवा उतरतील. आपली प्रजा पीडा पावल्यास आपला सर्व प्रकारें नाश असें पुरुषाचे विचारें, आणि दुसरा प्रकार मर्कटास समजाविला आहे कीं, चांपानेर पायागडाकडे गेलियास सिंधूचा सन्निध वास सुटोन जलरहित देशांत जाणें घडतें. काल देश पाहतां दुर्घट विचारें पडणार. असे रीतीची मसलत सांगोन माघारें आगमन मर्कटाचें करून, स्वामींची त्यांची समक्षता दक्षिण तीरीं रेवाच्या करावी, म्हणजे आपण आजपावेतों केल्या कर्माचें सार्थक. मूळची प्रजा राहिली. नवीन संपादिली तिचा उपयोग होऊन, तूर्तचे कालीं जो लाभ जाहला तो जाला. पुढें प्रसंगानुसार घडेल प्रकार तसा पाहातच आहों. असा मनसबा पुरुषाचा आहे, व चित्तांत आणून माघारें आवाहान मर्कटाचें करावयाचें करीत आहेत. मग पाहावें. याप्रमाणें छ २० सफर मंदवार दोनप्रहरचें समजलें वर्तमान सेवेसीं श्रुत असे. पुढें समजेल तसें सेवेसीं विज्ञापना करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.†

¶*This letter is written in enigmatical terms and deserves clear elucidation. It describes for the information of Nana the combined movements and intentions of the British and Fatesinh Gaikwad in upholding the cause of Raghunathrao.*

---

*आमोद व देहज हीं दोन बंदरें भडोचच्या उत्तरेस आहेत.

†हें पत्र सांकेतिक आहे. प्रकृति म्हणजे अहमदाबाद, पुरुष म्हणजे फतेसिंग गायकवाड व मर्कट म्हणजे इंग्रज असा संकेत असावा, पण स्वामी म्हणजे रघुनाथराव दादा कीं काय ? पत्रलेखक सदाशिव दिनकर नसावा.

No. 82 26th February 1780.

श्री

राजश्री गणेश विश्वनाथ बेहरे गोसावी यांसी:-

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष :—तुम्हीं पत्र चिखलीचे मोक्कामचें पाठविलें तें पावलें. सुरत अट्टाविसींत आलों. आपले लिहिल्याप्रमाणें इकडील बंदोबस्त करितों. चिखलीचे ठाण्याचा बंदोबस्त करावयास एक दोन दिवस लागतील. पुढें स्वार व कारकून ठाणीं बसवावयास पाठविले आहेत. म्हणोन लिहिलें तें सविस्तर अवगत जाहलें. ऐसियासी चिखलीचे ठाण्याचा बंदोबस्त जाहलाच असेल. पुढेंही येऊन तापी उत्तर तीर व दक्षिण तीर सरकारचीं ठाणीं व गायकवाडाकडील सोनगड व्यारें वगैरे दुतर्फा अंमल असेल, त्याचा बंदोबस्त करणें. गायकवाडाकडील राजश्री त्रिबक शंकर व्याप्यांत आहेत त्यांस व अंबाजी आनंदराव यांसी तजविजीनें हस्तगत करून, ठाणीं, जागा, घ्यावी; आणि बंदोबस्तीनें ठेवावें. इकडील फौज आज नर्मदेपार उतरेल. इंग्रेज अद्यापि अहमदाबादेसच आहेत. गायकवाडाकडील सरकारचे ठाण्यांचा बंदोबस्त करणें जिम्मा तुमचा आहे. गायकवाडाचीं ठाणीं व उभयतां गृहस्थ यांचा बंदोबस्त आधीं करणें. फत्तेसिंग गायकवाड इंग्रजास सामील आहेत, त्यांजकडील माहालांचा व कारकून अंमलदार यांचा बंदोबस्त करावयासी आळस एकंदर न करणें. रवाना चंद्र २० सफर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji Sinde sends instructions to the Peshwa's Commander Ganeshpant Behre, assigning to him the task of capturing the Gaikwad's territory and officers, as he had deserted the Maratha cause and joined the British.*

No. 83 27th February 1780.

पैवस्ती छ ३ रविलावर समानीन हस्ते सांडणीस्वार.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २१ माहे सफर मुक्काम रेवा दक्षिण तीर, नजीक कडवा वड* स्वामीचे कृपा-

*कडवा वड यासच कबीरवड म्हणतात. हा वृक्ष प्रेक्षणीय असून पूर्वी अत्यंत विस्तृत होता.

वलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—सांडणीस्वारा-समागमें छ १२ माहे मिनहूचीं पत्रें सादर जालीं, तीं छ १८चे रोजीं तापी उत्तर तीरीं पावलीं. सराई येथील मुक्कामीं पावलीं. पत्रीं आज्ञा जे, हैदर नाईक याजकडील वकील राजश्री नरसिंगराव यांचे विद्यमानें नाइकांनीं तहाची यादी पाठविली, त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावांचे सल्हेनें तह करार करून तहनामा व निभावणीचीं पत्रें वकिलाबरोबर पाठविलीं. वकील तेथें जाऊन भेटून जाबसाल जाले. ते पाटिलबावांस कळावे याजकरितां वकिलांचीं पत्रें आलीं तीं पाहावयास पाठविलीं आहेत. बावांस दाखविणें. सांप्रत फौजा जिकडील तिकडे गुंतल्या जाणून हैदर नाइकानें तह फिरवून नवे तह जाहल्याचा मसोदा व निभावणीचे पत्रास मसोदा पाठविला. याप्रमाणें तहनामा व निभावणीचें पत्र पाठविल्यास तह करितों. न पाठविल्यास वकिलास निरोप देतों. तर काबू जाणून आज तहनामा पाठविणें प्राप्त. आम्हास नाइकाचे गुण ठाऊकच होते. पाटिलबावांस कळावें याजकरितां आम्हांस त्यांची थैली आली ती व वकिलाचीं पत्रें पाठविलीं आहेत तीं बावांनीं पाहावीं. बावांसही त्याची थैली आली ती पाठविली आहे. प्रविष्ट करणें. त्यावरून त्याचें इंगित समजेल. त्यांचीं उत्तरें पाठवून प्रत्युत्तरा-खालीं घालवितां आज समय नाहीं. प्रस्तुत त्याचे संमताप्रमाणें तहनामा व निभावणीचीं पत्रें पाठवावीं, हीच गोष्ट सिद्धांतांत येऊन, निभावणीचें पत्र बावांचें घऊन पाठवणें. ऐशास, बावांचे नांवाचा लखोटा थैली व पत्राचा निराळाच होता, तो प्रविष्ट केला. स्वामींचे नांवाची थैलीही दाखविली. दोही पत्रांचा अन्वय एकच आहे. वकिलाचीं पत्रें व तहनामा व निभावणीचे पत्रांचे मसोदे दाखविले. निभावणी पत्र द्यावें म्हणून विनंती केली. स्वामींचें पत्र बावांस होतें, त्यांत मजकूर, हिताहित आंदेशे काबूदाबू निभावणी पत्रच पाठवावें असें होतें. मीही विनंती केली. उत्तर जालें जे, आम्ही मसलतीस आलों. लांब पडलों. नाइकाचा जाबसाल आम्हांसी कधीं पडावा? हें उघडच आहे. श्रीमंत राजश्री नानांनीं पत्रीं विस्तार लिहिला तें येथें चित्तांत आणून, सरकारचें काम जाणून डोळेझांक करावी यांतही काम दिसत नाहीं. कां म्हणावें, तर थोरल्या दौलता वचनावर चालत असतात. तो बळकटीचा प्रकार, तहनामा निभावणीचीं पत्रें, वचन प्रमाण, एक वेळ जालें त्यावर चालत असावें. तें एकीकडे ठेऊन पुन्हा संधान केलें याचें कारण काय तें ध्यानास येत नाहीं. वचनाची सचोटी नाहीं; किंवा मागें लौकिक जाला तो खरा खोटा याचे परीक्षार्थ, अथवा बशर्ती हुंड्या पाठविल्या आहेत

तो पैका देऊं नये; अगर सरकारचे कारभारी यांचें व आमचें नेट व वचन पक्कें कीं चालीचें आहे; एक वेळ केलें तेंच कायम करितात कीं जसा प्रसंग पडेल तो साधून पुढें काबूवर नजर ठेवितात; आजचे कालीं आम्ही मसलतीस आलों, पुण्यांत फौजा नाहींत, असें मनांत जाणून इतक्याही अर्थाच्या परीक्षा म्हणून असा कावा केला हें कळत नाहीं. हैदर नाईक वचनाचा धड व कायम मिजाज असल्यास, एकदां करार मदार जाले ते निभाऊन, सारा कराराचा पैका देऊन इंग्रजांचे मसलतीस निघोन, आजपावेतों इंग्रजांस पक्का ताण देता. तें न करितां फेर पगडी बदलली, नफा अगर खुलासा जें एक वेळ बोलण्यांत आलें तें आलें. आतां आपले नफ्याचीं कलमें लिहून पाठविलीं. सरकारची नुकसानी हरएक कामांत दगाबाजी :—

१ पहिला करार ठरला असतां एक साल बारा लक्षांचे बुडवितो,

१ खंडणीचा ऐवज नक्त द्यावा असा करार असतां नाणें होन सवा चार रु।। प्रमाणें देईन म्हणतो,

१ इंग्रज, महंमदअलीखान वगैरे मुलूख सुटतील त्यांत निम्मे सरकारचा, त्याचे ऐवजीं धारवाड वगैरे सरकारांत द्यावें, त्याचा मोबदला त्यानें नवे मुलखांत घ्यावा. (हा) पहिला करार असतां आतां धारवाड वगैरे देऊन मोबदला घेणार नाहीं म्हणतो.

याखेरीज अदवानी वगैरे कलमें लिहीतच नाहीं! इंग्रजांचे मसलतीस दोन वर्षें तीन वर्षें लागतील तर लावावीं. माझे सलहेखेरीज तह करूं नये म्हणतो. यांतील चाल एकही कलमाची नीट दिसत नाहीं. असें असतां तहनामा सरकारांतून नवा पाठविला. आम्हींही निभावणीचें पत्र पाठवावें येणेंकरून वचनाची बळकटी व वचन निभावणीची शक्ति व पहिले लौकिकाची परीक्षा, इत्यादिक सदरीं विनविलें आहे, त्याप्रमाणें सर्वार्थ सिद्ध होतील. वरकड अर्थ असोत, एक वचनाची बळकटी व निभावणीची शक्ति, दोन अर्थ उणे पडले, तेथें सर्व गेलें. वर्चस्व त्याचें होईल. पत्रें निभावणीचीं पाठवून व न पाठवून अर्थ एकच होतो. त्यापक्षीं पत्रें पाठवूं नयेत. ही सलाह जाणून आम्ही त्यांस पत्र लिहिलें आहे. नरम गरम व अंदेशे आदिकरून शब्द लावून लिहिलें आहे; येणेंकरून देहावर येईल. तहनामा सरकारांतून दुसरा पाठविला तो त्याचे हातास गेला. निघत नाहींच त्यास उपाय नाहीं. जाणून त्याचाही मजकूर पत्रांत आणिला आहे. निभावणीचीं पत्रें एक वेळ दिल्हीं तींच मातबरपैकीं आहेत. दुसरीं द्यावयाचें

कारण नाहीं. स्वच्छ चित्तें खंबीर पक्का धरून इंग्रजांस ताण देईल, तर याच वर्षांत शेवट होतो. दोन तीन वर्षें मसलत लांबविण्याचें कारण काय? शर्त मशरूत* करून घेतो, तेव्हां कशा मतानें लांबवतील? आंतून इंग्रजांसीं संधान लाऊन पैका घेईल. बाहेर मसलतीचें नांव केलें तर वर्षांचीं वर्षें लागूनही शेवट होणार नाहीं. हैदर नाईक मसलतीस जाईल तर इंग्रज महंमदअलीखानाचे मुलखांत बसेल. त्याचा खासगत मुलूख आबाद लावणी होईल. इकडे इंग्रजांचें काय आहे? सरकारचा मुलूख उजाड राहिल्यानें पैका घुंडून वर्षांचीं वर्षें मसलतीस पैका लावावा, पहिला करार. कोणीकडेही तहाचा पैगाम लागल्यास सरकारांत लिहून पाठवून येथील आज्ञेनें सलूख करावा, असें कसें घडेल? आम्हीं त्यास पत्र चांगले रीतीनें लिहिलें आहे, त्यावरच समजूत पडेल. बजिदी निभावणी पत्रांविषयीं केली, परंतु पसंत न पडलें! थैलीचा आब, येथून थैली दिली ती व त्यांतील पत्राची नक्कल व राजश्री कृष्णराव नारायण वकिलीस गेले आहेत त्यांचीं पत्रें व नरसिंगराव वकील यांचीं पत्रें बाबांस दाखवून माघारीं पाठविलीं आहेत. स्वामींचे नांवची थैली हैदर नाइकाची, एकूण दोन थैल्या व स्वामींचे पत्राचें उत्तर, वकिलांचीं पत्रें थैलींतील पत्रांचे नकलेसहित पाठविलीं आहेत. सेवेसीं पावतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This important letter from Sadashiv Dinkar to Nana Fadnis discloses the main features of the secret offensive alliance established by Nana with Hyder Ali Khan who demanded the guarantee of Mahadji for the proper observance of the terms of the agreement by the Peshwa's Court. Mahadji refuses to give a written guarantee, and wrote to Hyder a strong remonstrance urging that papers had no greater value than a plighted word of honour.*

No. 84 श्री 27th February 1780.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे:—इंग्रज अहमदाबादेवर चालून गेले. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड त्यास सामील जाले हें वर्तमान पूर्वी विनविलें. त्याचें उत्तर सादर जालें जे, राजश्री पाटिलबावांची फौज, राजश्री विसाजी आपाजी व भगीरथराव यांचे मदतीस गेली म्हणजे अहमदाबादेचा उपराळा होईल. गायक-

---

*मश्कूर, महशूर, प्रसिद्ध, पक्की.

वाड त्यांस मिळून गेले. अहमदाबादकरांस शिबंदीचें देणें भारी हा पेंच. दुसरें, इंग्रजांचा दाब. गायकवाड सामील जाले या दाबाखालीं त्यांचा टिकाव होईल न होय. कदाचित् इंग्रजांनीं अहमदाबाद घेतली, अगर सरदारांच्या दबावानें भडोचेंत जाऊन राहिले, तर जेथें राहतील तेथें जकड बसवावी. अनमान करूं नये. जलदी जाल्यास लौकर गुंता उरकेल. ऐसियास अहमदाबादकर मामलेदार व शिबंदी, सिद्दी आरब यांनीं एकी करून लढाईची शर्त केली. अशी कोणी करणार नाहीं. बाहेर निघोन इंग्रज, गायकवाड एक असतां त्यांजवर कोसळले. आराब्यावर चालून जाऊन, तरवारीचें झुंज करून, सरदार मारणें; कमबेश हजार माणूस ठार व इतकेंच जखमी करणें; दोन तोफांचे कानेंत खिळे मारून साबुतीनें फिरून शहरांत जाणें; या कर्मास मातबराच्यानें हिंमत होणार नाहीं, तें त्यांनीं केलें. दोन वेळ बाहेर निघोन झुंजोन इतकें कर्म केलें, तेणेंकरून हांव-भरी जाले. इंग्रजांनीं दोन वेळ तोंडांत खाऊन माणूसही फार जायां जालें, येणे-करून खजील जाले. फिरून चालून येतील या आंदेशानें तोफांत लांकडाचे तुकडे भरून बार तयार करून ठेविले होते. तों तिसऱ्यानें शहरावर चालून आले. झुंज बरेंच केलें. त्याजवर इंग्रजांनीं कृत्रिम तोफा चालविल्या. लांकडाचे तुकडयांनीं माणूस फार जायां जालें. राहिले ते बेहिंमत होऊन पळून शहरांत गेले. त्याज-मागें इंग्रज व गायकवाडाचे लोक शहरांत शिरले. भद्रापुढेंही शहरवाल्यांनीं बरीच केली. शहरांत शिरल्यानंतर मग काय करितात? शहर घेतलें. तसें भद्रही घेतलें. सिद्दी आरब फार मारले गेले. मामलेदार निघोन लोणावाड्या-कडे गेले. जसे ते इंग्रजांसीं झुंजले असा पाठीमागून उपराळा असता, तर शहर वांचून इंग्रजांचेंच पारपत्य होतें. उपराळ्याविषयीं बावांनीं राजश्री विसाजीपंत व भगीरथराव व पाराजीपंत यांस फार लिहिलें, परंतु फत्तेसिंगराव गायकवाड यांचे खतऱ्यामुळें* संशयांत राहिले. बावा कोंडाईबारी उतरल्यानंतर दरमजल तापी उत्तरतीरास आले. तेथें अहमदाबाद गेल्याचें वर्तमान ऐकून, एक मुक्काम करून सुरतेच्या तलाव्यास† फौजा पाठविल्या. पांच हजार फौज खडी करून विसाजी आपाजीकडे बक्षीबरोबर रवाना केली, तितका मात्र मुक्काम केला. दुसरे रोजीं कूच करून दर मजल चाललेच आहेत. सदाशिव मल्हार बक्षी पांच हजार फौज घेऊन गेले, ते व विसाजीपंत बापू वगैरे त्रिवर्ग एकत्र होऊन, घाट उतरून भडोच, जंबूसर परगण्यांत दंगा आरंभिला. बावांचा मुक्काम आज

*खतरा=दहशत. †टेहेळणीस.

कडव्या वडाजवळ आहे, उदईक बावाप्याचे घाटावर मुक्काम होईल. परवां घाटपार होणार. दरमजल अहमदाबादेस जातात. इंग्रज गायकवाडांसीं गांठ घालावी हेंच मानस आहे. सोनगड व्यारे येथें मुक्काम जाले असतां रक्षणच केलें. गुजराथेंत नर्मदापावेतों त्यांचे महालांस उपसर्ग दिला नाहीं. राखलेच. गायकवाड देशावर येऊन अनुसंधान लावितील, प्रतीक्षा केली. कांहीं दिसत नाहीं. दहा अकरा पत्रें बावांचीं त्यांस गेलीं. त्यांपैकीं एक उत्तर आलें जे, पत्र पाठविलें तें पावलें. इकडील वर्तमान परस्परें कळलें असेल. संधानाची जाती नाही. राजश्री त्र्यंबक शंकर सोनगड व्याऱ्यांत असतात. त्यांस राव गायकवाडांनीं लेहून पाठविलें होतें जे, सरदारांचें साधन करणें. आमचा इंग्रजांचा बिघाड जाला, या वर्तमानावरून गायकवाड आम्हांकडे येतील असें वाटत होतें. आज वर्तमान विसाजीपंत बापू व बक्षीकडून आलें जे, गायकवाडाचा रुसवा जाला होता. मागतीं इंग्रजांनीं समजावून नेले. यावरून बावांस अंदेश जाला जे, कोणे मतांत आहेत कळत नाहीं! विश्वास धरूं नये! परवां नर्मदा पार जाल्यानंतर काय सलाह ठरते पाहावें. इंग्रजांनीं अहमदाबाद घेतली. पुढें मनसबा कर्तव्य कसा म्हणून बावांस विनंती केली. उत्तर केलें कीं येथें काय सांगावें? तुम्ही बरोबरच आहां. होईल तें दृष्टीस पडेल. सरकारांतून एक करावें. राजश्री गणेशपंत बेहरे थोडके असतील तर आणखी फौज पाठवून बळकट करून सुरतेस प्रांतास ताण खुष्कींतून द्यावा. दर्यांतून आरमारें घालून तोही मार्ग बंद करावा. आम्ही नर्मदा पार आहों. चहूंकडून ताणून जकड बसविली तर लौकर आयास येतील. येविसीं जलदी व्हावी म्हणून बोलले. त्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. नर्मदा पार उद्यांच छ २२ चे रोजीं जातात.

¶*Sadashiv Dinkar gives graphic details of the heroic fight which the garrison put in before they lost Ahmadabad. He moreover communicates to Nana the plan of action formed by Mahadji and the encouragement he was giving to all commanders to wage a grim contest.*

No 85 28th February 1780.

पैवस्ती चंद्र ३ रबिलावल समानीन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

छ विनंती. सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २२ सफरपावेतों मुक्काम लष्कर नर्मदा दक्षण तीर स्वामींचे कृपेंकरून

सुखरूप असों. विशेष :—सेवेसीं विनंतीपत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर चंद्र १२ सफरचें आलें. त्याजवरून परम आनंद जाहाला. हल्लीं येथील वर्तमान तरी अमदाबाज इंग्रजांनीं घेतली. शहर लुटून फस्त केलें. आंत सुभा राघो भिकाजी सरकारचा होता त्यानें लढाईची शर्त केली. तेथील शिद्दी आरब जमादार होते ते दोन चार ठार पडिले. उपरांत फत्तेसिंग यांणीं फितवा करून इंग्रजांबराबर जाऊन शहर घेतलें. राजश्री पाटीलबावा दरकूच करून जातात. उदईक बाबापीराच्या घांटावर नर्मदा उतरोन महीवर जाणार. तूर्त अहमदाबाद गेली याजमुळें मसलत भारी पडली. समागमें फौज वीस हजार आहे. होळकरांबरोबर फौज पांच हजार पाराशर पंतसुद्धां आहे. रोज धरणीं पारणीं होळकर यांचे घरीं होत आहेत. बरोबरी सरदार समागमें असतां, काम पडिल्या फौज हजार पांचशें उभी राहील, ऐसा विचार होळकरांकडील आहे. स्वामींनीं पत्र पाठविलें त्यांतील आशय जे चिमापाखेरीज करून येथील मंडळींतून घडणार नाहीं म्हणोन आज्ञा, त्यास स्वामींच्या चित्तांत चिमापाचा भास आहे. परंतु चिटचा ज्याच्या स्वदस्तूरच्या सांपडल्या त्यांच्या नकला करून राजश्री नारो शिवदेव घेऊन गेले आहेत. सेवेसीं येऊन पावतील. सविस्तर विनंती करतील त्याजवरून श्रुत होईल. मुख्य गोष्ट हे सरदार थोर आहेत. यांजपासून स्वामिकार्यास अंतर होणार नाहीं. वरकड सविस्तर येथील मजकूर राजश्री सदाशिवपंत यांणीं सेवेसीं लिहिले आहे, त्याजवरून सेवेसीं श्रुत होईल. बहुत काय लिहिणें. सदैव पत्रीं कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana further details of the fall and plunder of Ahmadabad and the plans of future action contemplated by Mahadji.*

No. 86 9th March 1780.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २ रबिलावल पावेतों मुक्काम प्रांत वाघोडें नजीक बडोदें सात कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष :—उभयतां सरदारांकडील फौजा सडचा करून सदाशिव मल्हार बक्षी यांजबरोबर देऊन देखील राजश्री विसाजी

आपाजी व भगीरथराव शिंदे व पाराशरपंत सुद्धां पुढें महीवर रवाना केले. त्यास यांचा मुक्काम महीवर गेला ते दिवशीं इंग्रजांचा मुक्काम महीपलीकडे तीन कोसांवर होता. तेथून दुसरे दिवशीं कूच करून महीवर आले. तोफा उतरावयास घाट खणोन, नीट करून, मग कूच करून पुढें येतील. आपले फौजांचा व टोपीकरांचा दाखला मुकाबला जाहाला. इंग्रज मही उतरून आलीकडे आले. पुढील फौजा सडया आहेत. त्यांसी व आपल्या फौजेस तफावत आठ दहा कोसांची आहे. इंग्रजांचे रोंख दोन आहेत: एक बडोद्यास जाऊन आश्रयानें लढाई द्यावी किंवा पुढें समूर यावें ऐसा मजकूर आहे. आतां दोहो चोहो दिवसांत त्यांची आपली गांठ पडेल. फत्तेसिंग गायकवाड अहमदाबादेस मागें राहिले आहेत. समागमें गोंदबा दिवाण* त्यांनीं आपला इंग्रजांसमागमें फौज सुद्धां दिला आहे. अमृतराव ही समागमें आहेत. अहमदाबादेंत ठाणें इंग्रजांनीं फत्तेसिंगाचें बसविलें. इंग्रजांनीं त्याच्या कुमकेस शहरचे रखवालीस एक पलटण ठेविलें आहे. हा कालपर्यंत गायकवाड यांजकडील जाबसाल किंवा अनुसंधान सामील व्हावयाचें किमपि नाहीं. फत्तेसिंग यांनीं इंग्रजांचा पगडीबद्दल भाईचारा केला, त्यापक्षीं टोपीकरांची व आपल्या फौजेची लढाई जाहाल्याशिवाय त्याजवर जरब बसेल तेव्हां गायकवाड उमजतील; तोंपर्यंत उमजत नाहींत. ऐसा प्रकार गायकवाडाचा असतां काल देशीहून पतकें कागलकर जाधव व खानदेशांतील राऊळ व होळकरांकडील बारगळ ऐसीं तीन पतकें देशीहून कोंडाईबारीनें आलीं. त्यांजबराबर पांढरे याचें पतक गायकवाडांकडील तीनशें स्वारांचें देशीहून आलें. त्याजला सरकारचें दस्तक श्रीमंतांचें नांवचें दिलें होतें. तें बडोद्यापावेतों हीं पतकें व ते समागमें आले. बडोद्यानजीक येतांच उभयतां सरदारांकडील पतकें आपल्या लष्करचा सुमार धरून चाललीं आणि ते बडोद्यास गेले. त्या वेळेस गायकवाडाकडे जातों हा मजकूर या पतकास कळों दिला. तोंपर्यंत आपल्याकडील पतकास कांहींच समजों दिलें नाहीं. ऐसा प्रकार आहे. (अपूर्ण)

¶ *Appaji Ram writes to Nana that the British were returning southward from Ahmadabad, and Mahadji northward so that the two armies were within twenty miles of each other facing for an encounter. The letter is incomplete.*

*गोविंद गोपाळ कामतेकर, सारस्वत ब्राह्मण. यांचे वंशज बडोद्यास आहेत.

No. 87 15th March 1780.

श्री

राजश्री गणेश विश्वनाथ गोसावी यांसीः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष :—तुम्ही तापी दक्षिण तीरीं सुरतेनजीक आलां म्हणोन वर्तमान ऐकिलें, परंतु तुम्हांकडून पत्र येऊन कांहीं वर्तमान कळत नाहीं. त्यास, तुम्ही कोठें आहां, फौज किती आहे, सुरत अट्ठाविसींत तिकडील अंमल बसवून सुरतेची बंदी कसकसी चालली तें लिहून पाठविणें. इकडील वर्तमान तरी, इंग्रज व राजश्री फत्तेसिंग गायकवाड बडोद्याचे आसऱ्यानजीक आहेत. आम्हांस त्यांस साहा साता कोसांची तफावत आहे. पुढें मैदानांत आल्यास गांठ घालावयासी येईल. भडोचकडून इंग्रजास सरंजाम येतो. त्यास तुम्हीं सुरतेचे हद्दीस कांहीं फौज ठेवून, तुम्हीं तापी अलीकडे येऊन, नर्मदा दक्षिण तीरीं कडव्या वडानजीक राहाणें, आणि अंकलेश्वर वगैरे महालचा बंदोबस्त करणें; व भडोचकडे सडी फौज पाठवून भडोचेकडील सरंजाम इंग्रजास येऊं न पावे तें करणें. वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. पत्र पावतांच लिहिल्याप्रमाणें करावें. रवाना चंद्र ८ रबिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji inquires of Ganeshpant Behere whether he was able to establish his influence in the Surat district and suggests to him to stop supplies reaching the British armies through Broach.*

No. 88 18th March 1780.

श्री

सेवेसीं विनंती. सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २१ माहे रबिलावल मुक्काम मौजे पांच देवळें पो वाघोड, प्रांत गुजरात, नजीक बडोदें. स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—डांकेबरोबर पत्रें छ १८ सफरचीं सादर जाहलीं, तीं कोंडाईबारीवर दहवेलींत महादजी नाईक पोटकर जासूद व आप्पाजी सदाशिव कारकून डांकेचे यांजवळ पावलीं. त्यांनीं मुजरद जासूद जोडीबरोबर रवाना केलीं, तीं राजश्री राघोपंत गुरुजीबरोबर छ ५ रबिलावल याच मुक्कामीं पावलीं. मजकूर पत्रीं

निरनिराळे आज्ञा जाल्या त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावांस सांगितलें. उत्तरें जालीं तीं कलमबंदीवरून श्रुत होतील :—

मौजे इसरवाडी व नबाबपूर होळकरांनीं लुटून जाळून पेवें खणून नेलीं हें वर्तमान कोंडाईबारी खालीचे मुक्कामींहून विनंती केलीच होती. उत्तर सादर जालें जे, मुलूख सरकारचा खराब करितात हें ठीक नाहीं. येणेंकरून नाश होतो. तर पाटिलबावांनीं होळकरांस चांगले रीतीनें सांगावें. नर्मदा दक्षिण तीर व उत्तर तीर, दोन जिल्हे निरनिराळे आम्हांस, होळकरांस, सरकारांतून नेमून द्यावे. पाटिलबावांचें म्हणणें तर, हें अगोदर कळतें तर धारेवट बांधून दिला असता. आतां मसलतीचे तोंडावर हें करणें बरोबर नाहीं. दोघे सरदार मसलतीस गेले. बोलले कीं तो दाब आहे. आंत कसेंही असो. बाहेर आहे तसा दाब राखून मसलत करावी. आज्ञेप्रमाणें बावांस सांगितलें. उत्तर जालें जे, आम्ही हेंच इच्छितों. सरकार काम व्हावें. सांगावयास चुकत नाहीं. ऐकून एकदा वर्तल्यास बरेंच आहे. परंतु "वचस्येकं मनस्येकं" असें काय करावें? आतां समागमें आलों. शत्रूची गांठ पडली. याचा शेवट श्रीमंतांचे प्रतापेंकरून होईल. धन्याचें पुण्य समर्थ आहे. होळकरांस सांगावयाचे रीतीनें सांगत गेलों. पुढेंही सांगूं. उचित असेल तें करतील.

सुरत अट्ठाविसींतील ठाणियांविषयीं आज्ञा जाली, त्यास तिकडील बंदोबस्त राजश्री गणेश विश्वनाथ यांजकडे सोंपविला आहे. ते चिंतामण हरि यांचे कमाविसदाराचे स्वाधीन ठाणीं करतील.

जयसिंगराव जाधव यांजकडील घोडीं, मुरारराव यांजबद्दल राजश्री विसाजी आप्पाजी यांचे स्वाधीन करीन म्हणून पूर्वी विनंती लिहिली होती. उत्तम आहे म्हणोन आज्ञा आली. ऐशास मशारनिल्हे घोड्यांची खाणावळ मागतात. ती कोण देतो? तगादा नित्य होतो. त्यांचें मानस आहे जे, एक घोडें खाणावळीचे ऐवजीं ठेऊन वरकड घोडीं द्यावीं असें म्हणणें. रदबदलीकरितां ठराव होईल ती विनंती करीन.

बाबाजी जामदाराविषयीं आज्ञा आली. त्यास, त्यानें होळकरांकडे जावयाचे उद्योगास खता केला नाहीं; परंतु पाटिलबावांनीं आज्ञा दिली नाहीं. नारो शिवदेव यांजबरोबर देशीं जाणें म्हणून वस्त्रें दिलीं असतां गेला नाहींस, तर आतां आम्हांजवळच राहाणें, होळकरांकडे जाईन म्हणाल्यास पारिपत्य होईल, असा दाटून जाब देऊन ठेविला आहे. होळकराकडे जाऊं दिला नाहीं.

त्रिंबकराव नारायण* सेवेसीं आले असतील. चिंतो विठ्ठल, † सदाशिव रामचंद्र,‡ यांचा मजकूर नारो शिवदेव यांनीं विनंती केलीच असेल.

हैदर नाइकाकडील थैल्या व पत्रें पूर्वी सांडणीस्वारांसमागमें सादर जाहल्याबद्दल त्यांचीं उत्तरें त्या सांडणीस्वारासमागमें रवाना केलीं. बावापीराचे घाटापासोन वाटेस लाविले. सेवेसीं पावले असतील.

दुर्लभ शेटीचे येथें गोळे मिळाले नाहींत. तोफखान्यांत शोध करून गोळे मिळाले ते बैलांवर घालून पाठविले म्हणून आज्ञा आली. ते बैल अगर गोळे येथें पावले नाहींत.

पाटीलबावा इकडे मसलतीस आले तर अखत्यार यांजवरच असावा. गायकवाडांनीं जाबसाल हुजूर लाविल्यास त्यास उत्तर जाऊन, तोड मोड कुल-अखत्यार बावांकडे राखावी, येणेंकरून वजन राहील, असें राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं विनंती भोंडगांवचे मुक्कामीहून केली होती, त्याचें उत्तर सादर जालें जे, तशींच उत्तरें जातील. वजन राहील तीच गोष्ट घडेल. गायकवाड इंग्रजांस भेटल्यावर, त्यांचे वकिलाकडून पत्रें पाठविलीं आहेत कीं, औघड प्रसंग पाहून तुम्हीं इंग्रजांस भेटलां, परंतु तुमचें लक्ष सर्व प्रकारें सरकारांत, त्यापक्षीं पाटिलबावांस भेटावें यांतच कल्याण आहे. गोपाळराव रामचंद्र याच कामाकरितां रवाना केले. बावांनीं त्यांची खातरजमा पडेल असें करून मेळवून घ्यावें. सरकारचीं कामें त्यांजकडे आहेत, तीं ज्यांत किफायत तशा रीतीनें करून घेऊन, सरदार लक्षांत राही असें करावें म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणें बावांस श्रुत केलें. उत्तर जालें जे, आमचा गायकवाडांचा दावा नाहीं. सरकाराचे सरदार तेही आहेत, लक्षांत वर्तावें. त्यास तों जातीनें कांहीं मन घालावयाचें नाहीं. कारभारी गोंदबानें सुरतेपासून इंग्रजांकडे आंग दिलें. धन्यास समजाविलें कीं, आम्ही राजश्री हरिपंत तात्यासमागमें चाकरीस असतां उफराटा सरकारांतून आम्हांस रु।। मागतात. सरकारचे सरदार नवे सरंजाम घेतात. त्या अर्थीं आम्हींही गुजराथ जहागिरींत द्यावी असें समजाऊन आपले घोरणीं लाविलें. इंग्रजांकडे पक्कें अनुसंधान लाऊन आपण दरबारखर्चाचे ऐवजीं गांव खेडीं घेऊन, सरदारास त्यांजकडे फसविला आहे. मनसबा करणें तो गोंदबानें करावा. ते इंग्रज एकशरीर जाले. इतका नाश गोंदबानें केला. असो. आम्ही जामगांवीं असतां

*नारो शंकर राजेबहाद्दराचा पुत्र. †रायरीकर. ‡रामचंद्रबाबाचा लेक.

फौजा पुढें रवाना केल्या, त्या राजश्री विसाजी आप्पाजी समागमें रेवा तीरास आल्या. होत गेलें वर्तमान आम्हांस लिहीत होते. सरकारांत लिहीत गेले. बाळाजी महादेव यांचीं पत्रें सरकारांत येत गेलीं. चाल समजली असेल. आम्ही जामगांवींहून निघाल्यावर दहा बारा पत्रें, फत्तेसिंग यांस पाठविलीं. उत्तरच आलें नाहीं. विसाजीपंताचीं पत्रें आम्हांस येत होतीं, तीं सरकारांत पाठवीत असतां, उत्तरीं गायकवाडांची शिफारसच येत होती. त्यावरून सरकार लक्षांत असतील असें समजून, सोनगडव्यारेपासून नर्मदेपावेतों गायकवाडाचा मुलूख राखला. कारण कीं, राजकारण लावतील, येऊन भेटतील, आजपावेतों त्यांचे राजकारणाची वाट पाहिली. शेवटीं आपण होऊन संदर्भ लाविला असतांही त्यांचे गांवीं नाहीं ! इंग्रज व गोंदबा एकशरीर. मग राजकारण कां लावतील ? इंग्रज आपण मिळून झुंजावयास येऊन, पक्का खंबीर नेट धरून आहेत. तथापि आम्ही मनसब्याचे रीतीस चुकत नाहीं. देहावर आले, उत्तम. निदान श्रीमंतांचें दैव थोर आहे. त्यांचे प्रतापेंकरून होणार तें होईल. सरकारांत मात्र एकनिष्ठता त्यांचे बोलणारांनीं समजाविली तीच खचित आहे. झाडून मुलूख सरकारचा अहमदाबाद डभई सुद्धां त्यांनीं घेतली असतां, वाकडें मनांत येत नाहीं, हें अपूर्व वाटतें. सरकारचा मुलूख त्यांनीं घेतला, तेव्हां हरामखोर असें ध्यानांत येत नाहीं. तेव्हां सरकार आज्ञेवरून अहमदाबाद वगैरे अगदीं देश घेतला असेल त्याचा विशाद होत नाहीं त्यापक्षीं मसलतच नाहीं, मग आम्हांस गोवून पाडावयाचें कारण काय लिहून पाठवावें, उज्जनीस जाऊन. ज्या पक्षीं सरकारचा नाश तुकसानी केली ही हरामखोरी गोंदबानीं गायकवाडानीं केली, त्यांचें पारिपत्य करावें अशी मर्जी असेल, तर देशीं गांव, खेडीं, गृहस्थ, कारकून व फौज गुजरायें-तील महाल यांची जप्ती बेमुलाजा करावी. म्हणजे आम्ही श्रम करितों ती सरकारची चाकरी. गायकवाडास प्रतिकार न केल्यास आम्ही मोकळे जाणावें. शब्द लाऊं नये. गोपाळराव रामचंद्रही अद्यापि आले नाहींत.

राजश्री राघोपंत गुरुजी* स्वामींची आज्ञा घेऊन आले ते याच मुक्कामी पावले. पाटिलबावांची त्यांची भेटी होऊन, मजकूर सविस्तर त्यांनीं विदित केला. त्यांस उत्तरें होतील तीं सेवेसीं विनंती करतील. आसेर किल्ल्याचा बखेडा जाल्याप्रमाणें किल्ले ग्वालेरीकडीलही कांहीं उपश्रुत पत्रीं यांस आली आहे.

*उपनांव ठोसर.

पत्र आलें आहे तें मजला दाखवणार ऐकतों. फार करून एक दो रोजांनीं ग्वालेर व गायकवाडचे मजकुराकरितां मुजरद जोडी रवाना करावयास सांगतील. जोडी रवाना होईल. इकडील डांक तुटली. महेश्वराकडून सोय पडल्यास डांक बसवावयाची आज्ञा जाहल्यास उत्तम आहे. सेवेसीं श्रुत होय. मागाहून जोडी रवाना होईल. तिजबरोबर इंग्रजांकडील मजकूर विनंती करण्यांत येईल. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar sends full details of the campaigning in Gujrat, of the treachery of Fatesinh Gaikwad and his minister Gondba, and Mahadji's remonstrance against him. Mahadji deprecates Nana's support to Fatesinh Gaikwad.*

No. 89 22nd March 1780.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना, येथील क्षेम तागाईत चंद्र १५ रबिलोवलपावेतों मुक्काम लष्कर नजीक बडोदें आठ कोस अलीकडे स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष:— इकडील वर्तमान तरी इंग्रज बडोद्यास मुक्काम करून दाहा अकरा रोज होते. तेथून फत्तेसिंग गायकवाड फौजे सुद्धां कूच करून चार कोस विश्वामित्रीच्या उत्तर तीरानें आपल्यापासून तीही कोसांवर येऊन मुक्काम करून राहिले. आपल्या फौजांचे छबिने* इंग्रजांचे गोटापासून कोसावर राहात असतात. आपलेकडील छबिन्याचे लोकांची व त्यांजकडील लोकांची दोन तीन दिवस गोळागोळी होते. त्यांनीं नदीचा आश्रा करून अवघड जागीं राहिले आहेत. आपल्या फौजा रोज तलाव्यास† जात असतात. अद्यापि लढाईचा योग पडला नाहीं. दोहो चहो दिवसांत युद्ध प्रसंग होईल. आपल्या लष्करांत महर्गता चार शेर धान्य रुपयाचें जाहालें आहे. साल मजकुरीं गुजराथ प्रांतीं पर्जन्य अगदीं नाहीं, याजमुळें फौजेस पाण्याचा पेंच व वैरणीचाही पेंचच आहे. याजकरितां चोहींकडून मसलतीस विलगच आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूचें पारपत्य होईल. परंतु चार दिवस वोढीचे आहेत. मुख्यत्वेंकरून लढाईचा प्रसंग इंग्रजांकडून करणार फत्तेसिंगच आहेत. गायकवाड यांजकडे अनुसंधानही राजश्री पाटीलबावांनीं करून

---

*रातपाहरा. †टेहेळणीस.

पाहिलें. परंतु त्यांचा निश्चय एकच कीं टोपीकरांचा स्नेह केला आहे, त्यापक्षीं आतां श्रीमंतांच्या इष्टत्वाची इच्छा नाहीं. याजप्रमाणें उत्तर आलें; व त्याजकडेस सरकारचा कारकून आला आहे म्हणोन ऐकितों. त्यास, येथें मनस्वी वर्तमानें ऐकितों व गायकवाड सामील होत नाहीं, त्यापक्षीं दिसण्यांतही येतें. याजकरितां राजश्री पाटीलबावा बहुत खट्टे आहेत. वरकड तपशीलवार वर्तमानें राजश्री विसाजीपंत आठवले व राजश्री सदाशिवपंत वकील सरकारचे यांनीं तपशीलवार सेवेसीं लिहिलें आहे, त्याजवरून श्रुत होईल. माझ्या बुद्धीनें या समयीं या सरदाराचा उपराळा जर कांहीं होईल, तरी श्रीमंतांचें कल्याण व आपला भाऊपणा दोनही होतात. यांत आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes plainly about the position of the two opposing armies in the vicinity of Baroda. Mahadji is reported to have tried to win over Fatesinh Gaikwad from the British but failed. Extreme scarcity of food and fodder in Gujrat is also reported.*

No. 90 26th March 7018.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचें सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत चंद्र १९ रबिलोवलपावेतों मुक्काम लष्कर नजीक बडोदें स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—इकडील वर्तमान तरी इंग्रज व फत्तेसिंग गायकवाड एकत्र होऊन अहमदाबाद घेऊन, तेथें बंदोबस्ताकरितां एक पलटण इंग्रजांकडील ठेऊन, शहर इंग्रजांपासून आपला जिमा करून घेतला. शहरांत गायकवाडांनीं आपल्या तर्फेचा मातबर माणूस ठेऊन बंदोबस्त केला. उगेच नांव मात्र टोपीकरांचें आहे. राजश्री पाटीलबावांची स्वारी कोंडाईबारी उतरोन आली, हें वर्तमान इंग्रजांनीं ऐकोन अहमदाबादेस मसलत करूं लागले. मग गायकवाड यांनीं मसलत दिल्ही जे, तुम्ही माघारे नर्मदेवर जलद जाऊन पोंहचत नाहीं तरी उभयतां सरदार फौज सुद्धां घेऊन बडोद्यास लागतील. फौज आल्यावर बडोदें दम धरून लढणार नाहीं. यास्तव कूच करावें. त्याजवरून इंग्रजांनीं कूच करून आमच्या फौजा नर्मदा उतरोन उत्तर तीरास आल्या, तों तेही कूच दरकूच महीवर आले. आम्हीं बडोद्याचे

सुमारें येऊं, तों त्यांनीं अगोदरच शहर जवळ केलें. येथें आल्यानंतर राजश्री पाटीलबावांनीं सडया फौजा करून पुढें रवाना केल्या. तेथें इंग्रजांचे मुक्काम आकरा रोज जहाले. उपरांत तेथून कूच करून विश्वामित्री नदीचे पाण्यानें पांच कोस पुढें आले. आपल्या सडया फौजा पुढें होत्या. त्याची बातमी येतांच, खासे उभयतां सरदार सडे होऊन फाल्गुन शुद्ध १४* स रविवारी सडे होऊन पुढें आले. फिरंग्यांस व आपल्या फौजेंस अंतर तीही कोसांचें आहे. नित्य आपल्या फौजा सडया पुढें जात असतात. त्यांची व इंग्रजांचे फौजेची गोळागोळी होते. इंग्रजांचीं पलटणें नऊ आहेत व तोफा चाळीस समागमें आहेत. गायकवाड यांची फौज पांच हजार आहे, व अमृतराव यांची हजार याप्रमाणें सरंजाम त्रिवर्गांचा आहे. फत्तेसिंग याजकडे राजश्री पाटीलबावा यांनीं आपल्या तर्फेनें सलुखाचें अनुसंधान लाविलें होतें. त्याचे मुद्देही कबूल करावे, याप्रमाणें आपाजी साबाजी याजबरोबर खिजमतगार देऊन पाठविले होते व इंग्रजांकडेसही गेले होते. परंतु गायकवाड यांचा एकच निश्चय कीं, इंग्रजासीं पगडीबद्दल भाईचारा केला आहे, तो टाकून तुम्हांकडे यावें. तेव्हां तूर्त तुम्हांस पैका द्यावा, त्यापक्षीं आम्हांस† फत्तेसिंग गायकवाड बिलकुल इंग्रजांस सामील असतां अझून त्यांजकडील फौज सरकारचीं दस्तकें घेऊन येतात. तेव्हां घरची दुही ऐसें लौकिकांत दिसतें. पेशजीं कोंडाईबारी वगैरे जेथें वाटा बारीच्या असतील त्या, सालेर मुलेरची बारी ऐशा झाडून बंद कराव्या, येविषयीं पत्रें सेवेसीं वकिलानें आपल्याकडील पाठविलीं होतीं. परंतु अद्याप बंदोबस्त कांहींच जाहला नाहीं; व येथून राजश्री पाटीलबावा यांनीं राजश्री मणेशपंत बेहेरे यांस चार पांच पत्रें पाठविलीं कीं, तुम्ही सुरत अट्ठाविसीमध्यें येऊन ठाणीं आपलीं बसवावीं, जीं सरकारचीं ठाणीं इंग्रजांनीं घेतलीं होतीं तीं व फत्तेसिंग यांजकडील ऐशीं झाडून सरकार अमल बसवावा, आणि कोंडाईबारीचा बंदोबस्त राखावा, म्हणजे मराठी फौज देशीहून येऊं पावणार नाहीं. घाट बंद केल्यानंतर गायकवाडाकडे फौज जाणार नाहीं, शिंद्याकडील व होळकरांकडील फौज येणें ती महेश्वराकडून येईल, ऐसें दोन चार वेळ लिहिलें, परंतु पत्रांचीं उत्तरेंही येत नाहींत, ऐसें राजश्री पाटीलबावा म्हणत होते. तेव्हां आप्त फितूर ऐसें लौकिकांत दिसोन येतें. ही गोष्ट श्रीमंतांच्या कल्याणाची दिसत नाहीं. याजमुळें राजश्री पाटीलबावा बहुत खट्टे आहेत. यांचा निश्चय श्रीमंतांची चाकरी करावी हा पक्का खंबीर आहे. परंतु मसलत अवघड पडली. महर्गता बहुत जाहाली आहे. रुपयाचें धान्य चार शेर प्रमाणें आहे. पैक्याची ओढ भारी आहे. ईश्वरी सत्तेनें आणि श्रीमंतांचे पुण्येंकरून फत्ते होईल.

*१९ मार्च १७८०. †येथील कांहीं मजकूर गळाला असावा.

इंग्रजांचीं पलटणें सात व तोफा पस्तीस व मराठी फौज फत्तेसिंग सुद्धां चार पांच हजार आहे. मुख्य गोष्ट या सरदारास यश आलें तरच गोष्ट उत्तम आहे. नाहीं तरी ठीक दिसत नाहीं. पत्रीं विस्तार फार लिहिला म्हणोन स्वामी म्हणतील, तरी सेवकास जेंदृष्टीस पडिलें व भाव येथील बोलण्यांत व मसलतींत दिसतें तें न ल्याहावें, तरी स्वामी तिकडून शब्द ठेवितील. घरच्या दुहीनें ती दौलत श्रीमंतांची पेंचांत आली आणि पुढें तैसेंच जाहल्यानें विरुद्ध दिसतें. याजकरितां मर्जीस येईल त्या रीतीनें या सरदाराचे पुस्तपन्यावर* असिल्यानें सरकारचा नक्ष राहील व स्वामींच्या स्नेहांत अंतर दिसणार नाहीं. मीं सेवेसीं इतकें ल्याहावें ऐसी योग्यता नाहीं. परंतु जेथें स्वामींचें अकल्याण व श्रीमंतांचे दौलतीस विरुद्ध, तेथें सूचना लिहिल्याशिवाय उगेंच बसवणार नाहीं. पत्राचें उत्तर आलें पाहिजे. इतकें कृत्य व्हावयास कारण गोंदबा दिवाण. यार्णे फत्तेसिंग यांचे बुद्धीस भ्रंश करून समजाविलें कीं, शिंदे होळकर यांनीं जागिरी व किल्ले घेतले आणि आम्हां-पासीं कारभारी रुपये मागतात. तेव्हां आपण इंग्रजांस मिळावें म्हणजे पुण्यांतील कारभारी पैका मागतील त्यांस द्यावयास नलगे. इंग्रजांकडील येथें मेस्तर फार्मर व इष्टुर चारलिस† ऐसे दोघे जण ओलीस होते, त्यांस आजच राजश्री पाटीलबावांनीं वस्त्रें देऊन निरोप दिला. इंग्रज आज फत्तेसिंग सुद्धां बडोद्यास येऊन दाखल जाहाले. आपल्या फौजेस व त्यांस आठ दाहा कोसांची तफावत आहे. गोविंदराव गायकवाड यांस पत्रें आजच पाठविलीं कीं, तुम्हांपासीं जितका सरंजाम असेल तितक्यानिसीं येऊन पोचणें. म्हणोन उभयतां सरदारांचीं पत्रें रवाना जालीं. नारो गणेश व विसाजीपंत लांबहाते यांची समजूत करून कारभारांत आणिलें. या उभयतांचे आपल्या मंडळीच्या चिटचा पेशजी राजश्री पाटीलबावा यांस आणून लांभाते यांनीं दाखविल्या होत्या, त्याजमुळें उभयतांचें विरुद्ध पडिलें होतें. ते काल राजश्री तुकोजी होळकर राजश्री पाटीलबावांच्या डेऱ्यास मसलतीविषयीं आले होते, तेव्हां सख्य करून दिलें. उदईक सडे होऊन खासा स्वारी पुढें जाणार. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram recounts to Nana particulars of the campaign in Gujrat, showing the strong and weak points of the two sides and suggesting remedies for a successful termination. The difficulties and the trials of Mahadji are fully described. The two British*

*पाठपुरावा, साह्य. †Mr. Farmer and Stuart Charles.

officials Farmer and Charles who had been taken as hostages at Talegam the previous year, were released and sent back by Mahadji.

No. 91 1st April 1780.

पैवस्ती छ १४ रबिलाखर.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २५ रबिलावल मुक्काम नजीक पायागड, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटीलबावा यांनीं बोलावून विनंती-पत्रें लिहावयास आज्ञा करीत गेले त्याप्रमाणें तीन चार रवानग्या सेवेसीं केल्या. तात्पर्य, गायकवाडांची शिफारस दर पत्रीं येते. साधनक्रम त्यांसीं राखावा त्याप्रमाणें राखीत असतां, मुद्देदेखील कबूल करीत असतां, गोंदोबांनीं इंग्रजांचें आर्जव करून, दरबारखर्च गांवखेडीं घेऊन, राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांस बगलेंत मारून, आपण मनसब्याचे बाजीकार* होऊन, झुंजावयास कंबर बांधून सिद्ध आहेत. ते झुंजतात म्हणून भ्यालों असें नाहीं. बाहेर गोड बोलतात. पत्रें लिहितात. तेथें त्यांचे बोलणार मातबर, व यांजकडील बाळाजीपंत रानडे समजावितात तें मान्य होऊन पक्का विश्वास त्यांजवर. ते बजिन्नस इंग्रजांस मिळाले. अहमदाबाद व गुजराथ डभई सुद्धां घेतली असतां, रानडा फौजा तिकडून पाठवितो. त्यास परवानगी व दस्तकें सरकारांतून मिळतात. कोंडाईबारी बंद करावी, आमच्या देखील फौजा येऊं न द्याव्या, असें लिहीत असतां, गायकवाडाच्या फौजा येतात. सध्या दोन हजार फौज येते. रानडा घेऊन येईल अगर रवाना करील, त्यांनीं सर्वस्वें सरकाराचा नाश केला तो ध्यानास आणूं नये. त्याचे मध्यस्तावर व कारकुनावर विश्वास धरून ते सांगतील त्याप्रमाणें करीत जावें. सरकारचा हरामखोर त्याचें पारिपत्य व्हावें, देशीं व गुजराथेंत जप्त्या व्हाव्या, तें न होतां उलटी कुमकेस फौज येती. पत्रीं शिफारस येती. यावरून मजसीं भाषणें जालीं व होतात. त्याच अन्वयें राजश्री विसाजीपंत बापू यांसींही होत आहेत. विनंती करीत असतील. प्रस्तुत बापूंनीं विनंतीपत्र सेवेसीं लिहिलें आहे, त्यावरून साकल्य वृत्त निवेदन होईल. सरकारची डांक सोनगडापावेतों आली. तेथेंच राहिली. त्यांतील एक जोडीबरोबर पत्रें छ ८ सफरचीं मात्र

---

*उत्पादक, पुरस्कर्ते.

आलीं. इकडे पत्रच येत नाहीं. राजश्री नारो शिवदेव कोंडाईबारीवरून गेले, त्यास दीड पावणे दोन महिने होत आले, पत्र येत नाहीं. मार्ग दूर म्हणावा तर साहुकरी जोडया साहा साता दिसांच्या वायद्यानें अलीमोहनचे* रानांतून आल्या. असें असतां वर्तमान कळत नाहीं, पत्र कां येत नाहीं असें म्हणतात. तर उत्तराची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the treacherous intrigues carried on by Govind Gopal Kamtekar, the minister of Fatesinh Gaikwad, and supported from Poona by Balaji Ranade. Nana Fadnis is taunted with having facilitated the wiles of Gaikwad rather than putting them down at the source.*

No. 92 7th April 1780.

पैवस्ती चंद्र १३ रविलाखर.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र १ रविलाखरपावेतों मुक्काम लष्कर नजीक बडोदें स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—सेवेसीं विनंती पत्र तिसरे सफरचें पाठविलें, त्याचें उत्तर चंद्र चवदावे सफरचें पाठविलें, तें चंद्र पंचविसावे रबिलोवलीं पावलें. त्यांत आज्ञा जे श्रीमंतांचे पायापासीं एकनिष्ठता व दौलतेस अनहित गोष्टी हे तर पाटीलबावांपासून घडणार नाहीं; व आमचा भाऊपणा निखालस आहे, तेव्हां इतर वाईट पडेल ही शंका नाहीं. साहेबांचे साक्षीनिसीं बोलणें हें प्रमाण आहे, यांत संशय नाहीं. ही खातरजमा आहे. परंतु हैदरनाईक वगैरे परराज्यांत लौकिक होऊन पत्रें येतात, तितक्यांचींही निराकरणें करावयाचीं करीतच आहों वगैरे कित्येक मजकूर लिहिला व दस्ताऐवजाची आज्ञा केली. ऐसियास दस्ताऐवजाच्या नकला राजश्री नारो शिवदेव जाते समयीं घेऊन गेलेच आहेत; व येथील कित्येक बारीक मोठें वर्तमान मशारनिल्हेनीं सांगितलें, त्याजवरून सर्व श्रुत जाहालेंच असेल. त्याजअलीकडील वृत्त तरी दोन तीन पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. प्रस्तुत कालचें वर्तमान इंग्रजांचा

---

*हें छोटाउदेपुरचें पूर्वीचें नांव.

मुकाबला होऊन एक मास होत आला. रोज गोळागोळी व कहीसीं* लढाई होतच आहे. चंद्र २७ रबिलोवलीं† पाहांटेस सडे फौजेवर इंग्रजांचा छापा आला. बातमी अगोदरच चार पांच घटका आली, त्याजमुळें सावध होऊन बाहेर उभे राहिले. तोफांचा मार इंग्रजांकडून होऊं लागला. दोन तीन घटका मार जाहला, उपरांत हतेर लागलें. आपल्याकडील दहा पांच भले माणूस ठार व चाळीस पन्नास जखमी मनुष्य जाहलें. त्यांजकडील दोन चार मातबर सरदार व टोपीवाले व तुरकस्वार तीस पस्तीस पर्यंत ठार जाहाले व सें सव्वासें जखमी जाहाले. दोन घटका लढाई चांगली जाहाली. झाडी फार याजमुळें पायाचीं माणसें व आग भारी याजमुळें संभाळून, माघारे गोटांत दोन कोस गेले. याप्रमाणें लढाई जाहाली. पाणी चहूंकडे सभोंवतें नाहीं. याजकरितां आपले फौजेचा आझून भवता वेढा बसला नाहीं. दुसरें, फतेसिंग त्यांजकडे, याजमुळें सर्व माहितगिरी या मुलुखाची व रस्त बडोदें वगैरे मुलखांतून त्यांजकडे येते. आपल्याकडे माळव्याची मात्र रस्त येते. फतेसिंग यांजकडील बहुत प्रकारें राजकारणें लाविलीं, परंतु अझून कांहीं साध्य नाहीं. दुसरा पेंच, गोहदेस कंपू दोन आले. गोहदवाला बाहेर निघाला. अंबाजी इंगळे व खंडेराव हरि व सरकारचीं पतकें यांची सडी फौज जाहाली आहे. परंतु त्यांचें सामान भारी पडलें त्याजमुळें तिकडील विवंचनाही पडली आहे. दुरोख शह पडले याजमुळें फार विवंचनेंत. आपल्यासही पत्रें हमेशा राजश्री विसाजी आपाजी व सदाशिव दिनकर यांजकडून राजश्री पाटील-बावा आपणास पत्रें लिहवितात व आपणही लिहितात, त्यांजवरून सविस्तर अर्थ ध्यानास येतच असतील. मुख्य गोष्ट, या प्रसंगीं सरकारांतून कुमक जाहालियास सर्व गोष्टी उत्तम आहेत. राजश्री सदाशिव रामचंद्र व राजश्री चिंतो विठ्ठल यांजविसीं लिहिलें, त्यास महादाजीपंत गोगटे व नारो गोपाळ व त्रिबकजी भालेराव हे त्रिवर्ग येथें लष्करांत बरोबर होते, त्यांस त्यांचीं फितुराचीं पत्रें सांपडलीं. त्याजवरून त्रिवर्गास माळव्यांत नवलाईस जप्ती करून रवानगी केली व सदाशिव रामचंद्र यांसही माळव्यांत उज्जनीस मुलें माणसें आहेत तेथें जाऊन राहाणें म्हणोन आज्ञा जाहाली. बाकी चिंतोपंत मात्र राहिले आहेत. त्यास नारो शिवदेव यांजबरोबर कित्येक मजकूर सांगोन पाठविले आहेत. त्यास, त्यांचीं उत्तरें निखालसतेचीं आलीं म्हणजे तेही गोष्ट बोलावयास येईल. व

*कही=सामान आणणाऱ्या टोळचा. †ता. ३ एप्रिल स. १७८०.

नारोपंत आल्यास घडण्यांतही येईल असें दिसतें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ सेवकावर करीत असिलें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Appaji Ram sends full details of an indecisive action fought on 3rd April near Baroda between the two armies, giving reasons why the ministerial army failed to gain decisive advantage. Sadashiv Ramchandra, Chinto Vithal and some of their followers were arrested by Mahadji and deported to Ujjain as they were found to be carrying on secret intrigues with Raghoba in the enemy's camp.*

No. 93 18th April 1780.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी सालमजकुरीं फौज व गाडदी वगैरे सरंजाम भारी करावा लागला, याकरितां मागेंपुढें न पाहतां जितकी तर्तूद होईल तितकी केली. त्यास पैक्याची अडचण; नित्य लढाईशीं संबंध; आणि ऐवजाचा तोडजोडीचा विचार याउपरी राहिला नाहीं. त्यास, या समयीं आपलेकडील आपले महालचे दहकचा ऐवज आल्यास उपयोगीं पडेल म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास आम्ही इकडे इंग्रजाचे मसलतीवरी आलों. येथेंही वोढीचाच प्रकार आहे तो आपले ध्यानांत नाहीं असें नाहीं. परंतु सरकारांतही भारी मसलत पडली. निकडीचा प्रसंग आपण लिहिला, त्यावरून वोढींत वोढ करून दहकचा ऐवज आम्हांकडे ठरेल त्याची निशा राजश्री नारो शिवदेव यांजकडे करून देवितों. आम्हांकडे दहकचा आकार काय ठरेल तो नारो शिवदेव यांजकडे लिहून पाठवावा. रवाना चंद्र १२ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia agrees to pay the Dahakpatti (one-tenth of an aggregate income) on his saranjam for meeting the crisis which had threatened the existence of the State.*

No. 94 18th April 1780.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी हैदरखानाकडील पत्रें आलीं, त्यांत फरासिसी जाहाजें आल्याचें वर्तमान व हैदरखानांनीं मुलूख पाठीशीं घालून, इंग्रज व महमदअलीखान

यांचा तालुका तिकडे दोहो अडचा करोडीचा आहे, त्यांत शिरोन मुलूक काबीज केला. त्यावर लढाई मारून इंग्रजाचें पारपत्यही केलें. पुढें आर्काटही घेतलें. तेथेंही करोड दीड करोडीची मालमत्ता सांपडली. फौज हुशार. पैका पदरीं फार. पुढें चेनापट्टण व त्रिचनापल्ली वगैरे भारी मकानें घ्यावयाचा इरादा त्यांचा. यामुळें दर पत्रीं लिहितात कीं, दोन वर्षें लागोत, तीन वर्षें लागोत, इंग्रजाचें पारपत्यच करावें. त्यास, ही गोष्ट खरी आहे. परंतु सरकारांत साहा वर्षें मसलत सतत पडली. माहाल मुलूक चहूंकडे गेला. बाहेरील पैका कोठें यावयास जागा राहिली नाहीं. खर्च दीड दोन करोडीचा, आणि दाहाव्या हिश्शासही जमेस ठिकाण नाहीं. सर्वही माहितगारी आपणास आहेच. पुण्यापासून वीस कोसांवर बोरघाट, घराजवळ मसलत. तेव्हां भारी फौज नेहमीं असावी. अशा अडचणी आहेत. याचा विचार कसा करावा? हैदरखानाशीं वचन गुंतलें आहे. तेव्हां त्यास सोडून करतां येत नाहीं. त्याची सर्व प्रकारें सोय. तेव्हां त्याचे मनांत ही गोष्ट यावयाची नाहीं. नबाबाकडील व भोसले याकडील पर्याय व राजश्री कृष्णराव नारायण यांजबरोबर हजार फौज देऊन हैदरखानाकडे रवाना करावयाचें केलें आहे, ह्मणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, आपण लिहिले प्रकार इतकेही खरेच आहेत. परंतु एक इंग्रजाचें पारपत्य जाल्याशिवाय कोणतेही गोष्टीची सोय नाहीं. श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. चिंता नाहीं. राजश्री कृष्णराव नारायण यांची रवानगी हैदरखानाकडे करावयाची केली. उत्तम केलें. आपण मशारनिलेसीं बोलावयाचे प्रकार बोललांच असाल. त्याचें उत्तर काय येतें, व पातशाई सरदार सारीं जंगीं जाहाजें (?) आहेत. त्यांचा कागद थैली आली. त्याचें उत्तर आपण लिहून पाठविलेंच आहे. त्याजकडून खोत (थोर?) येणार. तो आल्यावरी त्याचें बोलणें काय? सरकारउपयोगी व गेल्या जागा व मुलूक हस्तगत होतो असें असल्यास मनास आणावें. सरकारउपयोगी होतें असें पक्कें असेल तरी हैदरखानासही लेहून पाठवावयास येईल. रा छ १२ राखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji advises Nana Fadnis to turn to the best advantage Haidar's signal triumphs over the English. He expresses his conviction that no peace with the English could be lasting unless their power was completely crushed.*

No. 95 15th April 1780.

पैवस्ती छ१३ रबिलाखर समानीन.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ चैत्र शुद्ध १ मुक्काम नजीक पायागड पूर्वेस चार कोस स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—डांकेबरोबर छ २३ चीं पत्रें सादर जालीं, तीं दहिवेलीस आप्पाजी सदाशिव कारकून व महादजी पाटेकर नाईक जासूद यांजवळ पावलीं. तेथून कारकून मजकूर डांकेच्या जोड्या व हीं पत्रें घेऊन निघाला. तो राजपिंपळ्यास आला. त्यास राजपिंपळेकरांनीं आश्रय दिला. परंतु रेवाउत्तरतीरचा मार्ग चालवावयाची त्याची सोय नाहीं. याजकरितां तेथून फिरोन माघारा कुकरमुंढ्यास गेला. तेथून अनुसंधान करून आखराणीस आला. आखराणीकर संस्थानिकाचीं दोन माणसें कासदाच्या जोड्याबरोबर देऊन तीं पत्रें इकडे रवाना केलीं. तीं छ २५ रावल याच मुक्कामीं पावलीं. वाचून राजश्री विसाजीपंत बापू यांजकडे घेऊन गेलों. त्यांनीं पाहिल्यानंतर ते व मी राजश्री पाटिलबावांकडे गेलों. पाटिलबावांस पत्र होतें तें दिलें. वरकड मजकूरही पत्रान्वयें त्यांसीं बोलण्यांत आले. त्याचीं उत्तरें जालीं तीं कलमबंदीवरून विदित होतील.

गायकवाड इंग्रज मिळोन अहमदाबादेस गेले. माघ शुद्ध ९ स अहमदाबाद घेतली,* हें वर्तमान बावांस आलेंच असेल. भाद्रपद मासीं पुण्याचे मुक्कामीं बोलण्यांत आलें कीं, उभयतां सरदारांची वीस हजार फौज सुरतेच्या दोहों तोंडावर जावी म्हणजे गायकवाड येऊन मिळतील, त्यांचा फैलाव होणार नाहीं. त्या करारप्रमाणें फौजा गेल्या असत्या, तरी इतका नाश न होता. आतां नाशही जाला व ते फैलाव करून भारी पडले. असो. होणार तें जालें. याउपरी उभयतां सरदारांनीं जाऊन गांठ घालावी, पारपत्य करावें, त्या मसलतीचा जिमा पाटिलबावांचा आहेच. ते सर्व करितील. तुम्हींही सांगणें म्हणोन आज्ञा. त्यास, इत्थंभूत पत्राप्रमाणें सविस्तर मजकूर बावांसीं बोलण्यांत आला. उत्तर जालें जे, इतकाही अर्थ खरा, परंतु फौजा इकडे ते समयीं कां न आल्या ? व गायकवाड, फौजा न आल्यामुळें इंग्रजांसीं मिळाले, किंवा अगोदर अनुसंधान इंग्रजांसीं करून आपले तहरह सुरतेसच निश्चयास आणून त्याप्रमाणें मिळाले, हे मजकूर बहुत वेळ तुम्हांसीं बोलिलों. तुमचींही पत्रें सरकारांत किती गेलीं त्याजवरून

* तारीख १३ फेब्रुवारी संवत् १७८०. पहा वर ले. ८० व ८५.

वर्तमान कळलेंच असेल. वारंवार लिहिणें काय? आम्ही इकडे आलों. इंग्रज गायकवाड यांची आमची गांठ पडली. रोज युद्धप्रसंग त्यांचा आमचा चाललाच आहे. होणें तें श्रीमंतांचे प्रतापेंकरून होईल.

होळकर वीस हजार फौजेचे सरदार असतां फौजेची व कारभाराची ही गत! केव्हढी सरकार नुकसानी आहे? ह्या चार गोष्टी चांगले रीतीनें पाटिलबावांनीं त्यांसीं बोलोन वीस हजार फौज परिछिन्न बरोबर जमा करवावी. इंग्रजांची मसलत मातबर, चाळीस हजार फौज उभयतां सरदारांची मिळोन जरूर असली पाहिजे. तरीच मसलत होईल. गैगुजर केल्यानें परिणाम नाहीं. सविस्तर पाटिलबावांसीं बोलणें म्हणोन आज्ञा. त्यास, होळकरांची फौज असावी. आहे ती आहे. बावांचीही फौज आहे. मसलत कशी? पुढें उपसंहार कसा? हें सेवेसीं राजश्री विसाजीपंत बापूनीं विनंती केली आहे, त्यावरून साकल्य विदित होईल. बावांनींही पत्रें लिहिलीं आहेत, त्यावरून विदित होईल. उत्तरें सादर जालीं पाहिजेत. आणखी मजकूर राजश्री भगीरथराव व विसाजीपंत बापू यांचें परस्परें सख्य व वर्तन इत्यादिक होतें. त्याचीं उत्तरें बापूंनींच लिहिलीं होतीं. विस्तार आतां करावयाचें कारण नाहीं. प्रस्तुत प्रसंग युद्धाचा. याची समेटा-समेट होऊन श्रीमंतांचे प्रतापेंकरून शेवट लागेल तो खरा. होळकरांस पत्र इसर वाडीचे वगैरे मजकुराविषयीं निषेधयुक्त आलें, तें बापूंचे व माझे मतें या प्रसंगीं उचित न जाणून दिल्हें नाहीं.

माझे शरीरीं किंचित् समाधान नाहीं. बापूंजवळच आहें. यांजवळ सेवा करितों. लिहिणें बापूंनीं लिहिलें आहे. मी न लिहिलें याची क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana, from Sindia's camp near Pawagad, news about the fighting with the English.*

No. 96 19th April 1780.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

श्री

विज्ञापना:—परवां चैत्र वद्य १ चे दिवशीं इंग्रजांचें कूच होऊन पांचदेव-ळ्यावर आला. आपल्या फौजा सभोंवतालीं मात्र होत्या. मात्र तोंड लागलें नाहीं. त्यांचा मुक्काम जाहल्यावर आपल्या फौजा मागें फिरल्या. त्या संधींत

राजश्री चिंतो विठ्ठल इंग्रजांकडे चालले. त्यांस आद कोसावरून बावांचे राऊतांनीं धरून आणून भाईंचे हवालीं केलें. सांगितलें जे, इंग्रजांकडे जात होते, आद कोसावरून आणिले. यास्तव दोन दिवस त्यांजवर चौकी होती. आज राऊत बरोबर देऊन पालखींत घालून बुणग्यांत पाठविलें. उज्जनीस रवानगी केली. तेथें सहकुटुंब चौकींत राहावें म्हणोन सांगितलें आहे. या उपर होईल ते विनंती करीन हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana how the attempt of Chinto Vithal to effect his escape in the confusion of the march of the army was foiled and the latter was dispatched to Ujjain a prisoner.*

No. 97 20th April 1780.

(सदाशिव दिनकराचें पत्र)*

विज्ञापना ऐसीजे :—फार्मर वगैरे दोन्ही इंग्रज सोडिले या अन्वयावरून मजकूर विस्तारयुक्त पत्रीं आज्ञापिला होता. तीं पत्रेंच बावांनीं पाहून उत्तर केलें जे, आमची विकृति कारभारी यांस फार आली, म्हणून जामगांवींच आमचें पारिपत्य करीत होते. तो डाव चुकला. आम्ही इकडे आलों. दंश चित्तांतील कसा जातो? इकडे आमचे पारिपत्याचे योग घडले पाहिजेत म्हणून आम्हांस ईर्षा देव देऊं लिहितात कीं, जिमा मसलतीचा कबूल केला असतां आतां कुमक कां मागतात? त्याहावयाचें कारण काय? जे ईर्षा येऊन झुंजांत झडतील. आंतून गायकवाडासीं संदर्भ आहेच. इंग्रज त्यांनीं मेळवून घेतलेच आहेत. एक होऊन तोफखान्यानें इंग्रज सडकील. फौजेनें गायकवाड दमवील. येणेंकरून यांचें पारिपत्य होईल. हा मनसबा कारभारी यांनीं आरंभिला. परंतु ज्याचे निष्ठेंत भंग नाहीं तो कधींच अपेश पावणार नाहीं. दीड पावणे दोन महिने इंग्रज गायकवाडाजवळ दो कोसांवर आमचा मुक्काम. सोबती अस्तनींत. आंगसूत्रें अनुसंधानें सोबत्यांनीं खेळविलीं. चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र, महादाजी गोगटे, नारो गोपाळ, त्रिंबकजी भालेराव यांनींही कोणेविषयीं कसूर केला नाहीं. बातम्या मनस्वी पाठवून छापे आणिले, दगे केले. तेणेंकरून इंग्रज गायकवाडच फजित पावत गेले. झुंजांत उभय पक्षीं मरतीलच. आम्हांकडे ठार घोडें माणूस अगर जखमी दर झुंजास आमचेंच मरत गेलें! इतर कोणाचें माणूस घोडें मेलें नाहीं. होळकरांकडील पेंढारेयानें चार दिवस मेहनत केली.

---

*पहा का. सं. प. मा. ले. २६२.

शेवटीं त्यांसही मना केलें कीं, तुम्हीं कोंठें जाऊं नये, कांहीं करूं नये. अशा जुटी घरामध्येंच पडल्या! हें सविस्तर राजश्री विसाजी आपाजीसही ठाऊक आहे. असो. याप्रमाणें संगत असोन आम्ही तों भ्याडच; झुंजाचे समयीं हींव ताप येत असतो! अशा आम्ही इंग्रजांवर चालून काय जावें? इंग्रजच चालून आला, तेव्हां श्रीमंतांचे प्रतापेंकरून फजित पावला. आम्हांकडील तरवार अगर गोळी चालावयास शक्तिच नाहीं! श्रीमंतांचे कृपेंकरून इंग्रजांचे खासेच फौजेचे आल्याचीं माणसें सरदारच मरत गेले. गायकवाड झुंजास पुढें येते तर त्यांचेही मरते. पाठीमागें राहिल्यावर त्यांजवर कोण जातो? असें दोन महिने होत असतां, दरम्यान दोन तीन वेळ आपण होऊन गोंदबांनीं कारकून मध्यस्थ पाठवून राजकारणेंही लाविलीं. शेवटीं निश्चय केला कीं, इंग्रजांचें कूच होऊन पुढें चालले ते दिवशीं क्षेपनिक्षेप आम्हीं फुटून येतों. तुम्हीं आम्हीं एक होऊन इंग्रजांचें पारपत्य करूं. या करारावरून त्यांचे मुद्दे आम्हीं कबूल केले. बशर्त करार म्हणून याद मखलासी करून दिली. त्याप्रमाणें गायकवाडांकडून अमलांत यावें. त्यास, आम्हीं सडे पांचदेवळयावर असतां इंग्रजांचें कूच करऊन आम्हांवर गफलतींत घेऊन आले. आम्ही तळ सोडून निघालों. त्यांनीं ओढचापलीकडे मुक्काम केला. आमच्या फौजा सभोंवत्या असतां कही अगर रसद मिळेना. इंग्रजाचे फौजेंत रसद अगर वैरण मिळेना. दोन शेर धारण जाली. झाडपाला घोड्या उंटांस घालतां निदान तोही मिळेना. घोडीं उपाशीं मरूं लागलीं. निदान त्यांच्याच लिदा फोडून जाळिल्या. ही दशा जाली! आम्हीं बेजरब गळां पडावें म्हणोन रात्रीस स्वारी करून गेलों. बाजवा लोकांस दिल्याप्रमाणें लोक आपआपले बाजूस गेले. आम्ही उभयतांनीं पाठीमागें गेलों म्हणजें इशारतीप्रमाणें हरहर महादेव करावा या इराद्यानें गेलों. ईश्वर सर्वांचा आहे. ते दिवशीं इंग्रजांचे अनुकूल कालानें आम्हांस चकवून, फेर पाडून, सारा रात्र दिवस, पाण्याचा तोटा पाडिला. तेणेंकरून काबू साधला नाहीं. फिरून मागले मुक्कामास येणें प्राप्त जालें. सतत दहा प्रहर घोड्याची स्वारी करून मध्यरात्रीं मुक्कामास आलों. तिसा कोसांची मजल जाली. येतांच भोजन केलें. तों तोफा मागां राहिल्या, त्या आणावयास गेलों. रात्र खपवून प्रहर दिवस चढतां तोफा घेऊन मुक्कामास आलों. तों इंग्रज तयार जाल्याचें वर्तमान कळतांच पुन्हा तयार होऊन स्वारी करून गेलों. इतका तगादा पडला असतां झुंज कसें होतें? उगेच उभें राहून मुक्कामास आलों. एक रोज दम खाऊन दुसरे दिवशीं मागतीं चहूंकडून हल्ला करावयास जावें मनसबा होता. इंग्रजांस दो रोजाचें स्वारीचें वर्तमान

तिसा कोसांचे मजलीचें व तोफा सांभाळून न्यावयाचें मागतीं स्वारी करून गेल्याचें कळतांच, अर्ध रात्रीस कूच करून माघारा मठावर* गेला. आम्हांकडे वर्तमान कळल्यावर पाठीमागें फौजा गेल्या. गायकवाडाचें पत्र आलें जे, कारकून पाठवून देणें. त्यावरून केसो अनंत पाठविले. त्यास सहा घटका रात्रीस गोटास नेऊन गोंदबांनीं जाबसाल केला जे, इंग्रज तुमचे पाठीमागें येतच होता. आम्ही अंदेशे, नानाप्रकारचीं भयें, त्याचे पोटांत घालून माघारा फिरविला. यास आम्ही सुरतेस पावते करितों. तुम्हीं आडवे अगर याचे पाठीमागें येऊं नये. आमचे मुद्याची यादी बशर्तीची करून दिली आहे. बशर्ती काढून निखालस मुद्दे कबूल करून द्यावी. उत्तर केसोपंतानें दिलें जे, तुम्ही सरकार उपयोगी काय पडलां? करारप्रमाणें आम्हांस येऊन मिळून इंग्रजांचें पारिपत्य करितां, तर तुमचे मुद्देही वाजवी कबूल होते. इंग्रज कोणे वसवास खतऱ्यानें निघाला तो तपशील बोलत चालला. तेव्हां गोंदबाच म्हणतो कीं, इंग्रज फार खजील जाला. सुरतकर मुंबईकर मजला हंसतील. माझी फजिती जाली. हें गाडराचें बोलणें गोंदबाच बोलून, आमचे मुद्दे करार करा, बशर्ती काढा, म्हणतो. केसोपंतानें साफ जाब दिला जे, इंग्रज सुरतेस जातो, जाऊं देणें. तुम्हीं पोहोंचाऊन देणें. आम्ही पाठीमागें पुढें येऊं, काबू पाहूं, कळेल तसें करूं, डभई बडोदें पाहूं. याचा शास्त्रार्थ तुम्ही कां सांगतां? इतकें बोलणें होऊन पाहाटेचे सहा घटका रात्रीस गोटाबाहेर करून दिला. दिवसा ठेविल्यास पुण्याहून गोपाळ रामचंद्र निसबत गायकवाड, गोविंदराव देशमुख चांभारगोंदेकर निसबत राजश्री माधवराव आपा, राजश्री हरिपंततात्याकडील एक आणखी कारकून, ऐसे चौघे कारकून व दोन हुजरे सरकारचे फत्तेसिंगाकडे राजकारणास आले आहेत. त्यांसीं गांठ पडेल म्हणून केसोपंतास पाहाटेचे रात्रीसच काढून दिला. असो. गोंदबांनीं वाजवीच काढून दिले. पुण्याहून पत्रें तुम्हांस येतात कीं, राजकारणाचा अखत्यार पाटिलबावांचा. मग सरकारांतून कारकून हुजरे कां पाठवावे बरें? राजकारण करून पहावें म्हणोन पाठविले, तर त्यांनीं आम्हांसीं भेटून गायकवाडासीं भेटावयास जावें तें कांहींच नाहीं! किती दिवस त्याचे लष्करांत आले, भेटले. आम्हांस चिट्ठी देखील नाहीं! सुरतेस गेले. श्रीमंत दादासीं भेटले. दहा रोज तेथें राहून बाब्मासीं† दादासीं, राजकारणें करून आले. तर सुरतेस गणेशपंतानीं कसें

*बडोद्याजवळ एक स्थळ. नक्की थांग लागत नाहीं.

†बॉंडम जो पुढें मुंबईचा गव्हर्नर झाला.

जाऊं दिलें ? तेथून इकडे कसे येऊं दिले ? हें आम्हांस ठीक दिसत नाहीं. असो. धनीपणा कारभाऱ्यांकडे आहे. आमचें पारपत्य त्यांचे मनोमानसीं आहे म्हणून असीं कारस्थानें चाललीं आहेत. करोत. इंग्रज नर्मदेचे उत्तरतीरीं असतां मोहीम आमचे गळां आहेच. रेवापार दक्षणतीरास जातों. सुरतेस छावणी करील तिकडे कारभारी यांनीं सांभाळून घ्यावा. आम्ही चाकरी धन्याची जाणतों. त्यांसीं बैमानी करणें नाहीं. थोर जाल्यास बलावितील तेव्हां जाऊं. तंवपावेतों रेवा उतरणें नाहीं. दुरून चाकरी करूं. कारभारी यांसही ममता करून चालवणें, तर दुरून चाकरी सांगावी. यांतच निखालसी समजूं. अगदींच आम्हीं नसावें असें मानस असल्यास उत्तम. आणके छायेस पोट भरूं. परंतु याउपर रेवापार होणें नाहीं. याप्रमाणें लेहावयास आज्ञा केली. त्यावरून विनंती केली असे. हेंच बोलणें सविस्तर राजश्री विसाजीपंत बापूंनींही विनंती पत्रीं लिहिली असेल त्यावरून विदित होईल. राजश्री विसाजी कृष्ण यांजकडील कारकूनही गोपाळराव यासमागमें एकूण चौघे सुरतेहून श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून, बाढमाकडून, मनसबा काय करून आले असतील ते जाणत. मजकूर गोंदबासीं बोलून गाडरासीं बोलले. त्यानें उत्तर केलें जे, दादासाहेबांचें पत्र वाचून मजला कबूल नाहीं. सबब गोविंदराव व आणखी एक गृहस्थ दोघे पुन्हा सुरतेस दादासाहेबांचें पत्र आणावयास गेले आहेत. मोहीम सांगितली. आम्हांस दोष लाऊन चित्तास येईल तसें लिहितात. आधीं लिहिणेंच उचित नव्हे. तत्रापि असो. दोष लाऊन लेहावें, वीरेस घालून करावें, आमचे बगलेंत आग आहे ती विझवून मेहनतेविषयीं वीरेस घालावें, साहित्य सरकारकाम करून घ्यावें ही वाट आहे. तें न करितां आमची पारपत्याचीच विवंचना होत आहे. नाहीं म्हणतील तरी गोंदबा स्पष्ट सरकारचे नाशास प्रवर्तला. जाली हकीकत मागें लिहीतच गेलों. विसाजी आपाजी लिहीत गेले, खरें वाटलें नाहीं. सांप्रत पासिनोर चांडोद करनाळी* व राजपिंपळ्याचा हिस्सा गोंदबानें धन्यास न पुसतां इंग्रजास सनदा दिल्या, आणि डभई किल्ला परगणा आपले बायकोचे चोळीबद्दल घेतला. इंग्रज कूच करून मागां गेला असतां, डभई त्याजपासून खालीं करून गोंदबानें आपला अमल बसविला. दाणादुणा वगैरे जिन्नस कुल डभईतील इंग्रजानें भडोचेस नेला. तेव्हां गोपाळराव वगैरे चौघे गृहस्थ पुण्याहून आलेले गोंदबाजवळ आहेत. तेथील बोलणार समजावीत असतील कीं, डभई अहमदाबाद

*चांडोद, करनाळी, राजपिंपळा हीं स्थळें बडोद्याजवळ नर्मदाकांठीं आहेत.

सरकारांत देतील, तर आम्हांपासून याद करार करून नेली आहे कीं, अहमदाबाद डभई आम्हांकडे ठेवावी; सरकारचा पैका मागूं नये. कोणेही प्रकारें इंग्रजांतून गायकवाड काढावा, या अर्थें बशर्त इंग्रजांचे पारिपत्यास तुम्ही अलबत मिळाल, पारिपत्य कराल ऐशी बशर्ती घालून याद दिली असतांही आले नाहींत. तेव्हां हरामखोर कीं हिंदु हें समजावें? त्यांचा विश्वास धरून त्यांजकडे कारकून पाठवून राजकारण लाविलें तेव्हां त्याजपेक्षां आम्हीं हरामखोर ठरविलें! तेव्हां गायकवाड इंग्रजांकडे राजकारण लाविलें. गुडघा दिला. आम्हांस तोंडघशीं द्यावें. ही मसलत कारभारी बुडवितात. धन्याचें हित करितात. सुखें करोत! आम्हांस लिहितात, एक वर्ष लागो, दोन वर्षें लागोत, नेस्तनाबूत इंग्रज करावा. सलूख करणें तर नबाब, भोसले, नाईक व सरकार चौघांचे संमतें करावा. आपण आंतून गृहस्थ पाठवून राजकारणें दादासाहेबांचीं, इंग्रजांसीं, गायकवाडासीं करितात. कसेंही करून आम्ही तोंडांत खावी हे मनोरथ सुफल होत. याउपर आम्ही नर्मदा उतरत नाहीं. गाडर सुरतेस छावणीस जातो. कारभारी यांनीं दादांस इंग्रजांस मिळवून घेतलाच आहे. तेव्हां दोन नाहींत. इंग्रज बेमानही लिहितात हें तर आमचे समाधानार्थ. कदाचित् गोष्ट खरी जाली तर कारभारी यांनीं इंग्रज व दादांस सांभाळून घ्यावा असें म्हणतात. उत्तर वीस बेवीस रोजांत यावें म्हणोन बोलले आहेत. तर उत्तर जलद पाठविण्याविसीं व येथें जलद पावण्याविसीं आज्ञा जाली पाहिजे. आढळलें वर्तमान शिवाजी जासूदही विनंती करील. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana a strong protest expressed by Mahadji against the back-biting and lack of confidence shown in him by the ministerial party at Poona. He also threatens to resign his command, if his services where not approved.*

No. 98 24th April 1780.

पैा छ ४ जमादिलावल समानीन. ह॥ डांक.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १८ रबिलाखर मुक्काम पायागड उत्तरेस स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:—राजश्री पाटीलबावा व सुभेदार इंग्रजावर चालून गेले. बाजवा वांटून दिल्या होत्या, ते लोक आपआपले बाजूस गेले.

सरदारांनीं मागें जावें म्हणजे चहूंकडून तोंडें लागावीं असें होतें. सरदार चुकले फेर बहुत पडला. दोघेही फुटले. दिवस निघाल्यानंतरही वेगळेच जात असतां, इंग्रजांची कही घेऊन पलटणें निघालीं होतीं. अकस्मात् होळकरांचे लोक पुढें चालले होते. त्यांची व कहीची गांठ पडली. त्यांनीं धन्यास सांगोन पाठविलें. सुभेदारही गेले पांच सातशें पावलें. दहावीस उंटें घोडीं कहीचीं पाडून आणलीं. किंचित् लढाई जाहली. पंधरावीस इंग्रजांचे मारले. यांचेही तीन चार पागे मारले गेले. दहापांच घोडे पडले. नंतर इंग्रजांनीं सावली* जवळ करून आसरा धरून मार धरिली. तों संध्याकाळ जाहला. इतक्यांत बावाही हजोरला† पावले. परंतु विकल. रात्रीस व चारही प्रहर दिवस घोडे माणसास पाणी मिळालें नाहीं. अगोदर तीन चार हजार घोडे वैरण पाण्याचे अडचणीमुळें मेले. या दिवशीं घोडे फार मेले. संध्याकाळ जाहला म्हणोन माघारे मुक्कामास आले. एक दिवस दम खाऊन पुन्हा जावें विचार केला. तों मध्यरात्रीं इंग्रजांचें कूच होऊन माघारा बडोद्यास चालला. वर्तमान यांस लागतांच फौज पुढें रवाना केली. खाशानींही जावें. मठापावेतों‡ इंग्रज गेला म्हणोन ऐकिलें. आज मजला बावांचें बोलाऊं आलें आहे. जातों. होईल वर्तमान विनंती करीन. लष्करांत बोलवा फार उठली आहे जे, देशीं मातबर खूळ जाहलें आहे. बावांस स्वामींचें पत्र आलें आहे जे, लौकर येणें. हेंच वर्तमान आहे किंवा आणखीही आहे हें गेल्यावर कळेल ते विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes from Sindia's camp to Nana how an attempt to surprise the enemy failed owing to the party under Mahadji having lost its way in darkness. He further informs that the enemy was falling back upon Baroda owing to shortage of supplies.*

---

* बडोद्याचे पूर्वेस तालुक्याचें ठिकाण.

† या व पुढील पत्रांतील 'हजोरला' व 'हजरेला' हे शब्द मोडींत मुळांत काय आहेत तें कळत नाहीं. असें स्थळ गुजरातेंत नाहीं. हजिरीची जागा म्हणजे मुक्कामाचा तळ असा अर्थ कदाचित् होऊं शकेल.

‡ मागील पत्र पहा. मठ गांवाचा थांग लागत नाहीं. कदाचित् मोडी वाचनांत चूक असेल.

No. 99 25th April 1780.

पैवस्ती छ. २७ रबिलाखर समानीन.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १८ रबिलाखर मंगळवार मुक्काम पायागडाचे उत्तरेस तीन कोस सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—राजश्री विठ्ठलराव आण्णा यांचे विद्यमानें अजूरदार कासद जोडीबरोबर पत्रें वायद्यानें सादर जाहलीं, तीं साडे-सात रोजांचे वायद्यानें पावलीं. राजश्री पाटिलबावांस पत्र पावतें केलें. मीं आपलींही पत्रें दाखविलीं. उत्तर लेहावयाची चिटणिसास आज्ञा जाहली. इतक्यांत खुद्द स्वारी कूच करून बावा व होळकर फौज व तोफांसहित इंग्रजांवर गेले. बाजवा वांटून दिल्या होत्या. कोणी आपले बाजूवर गेले. बावा व होळकर पाठीमागें जावे, त्यांस फेर बहुत पडला. चुकले. मध्यें कहीची गांठ पलटणा-सहित पडली. तेथें थोडकीशी लढाई जाहली. बावा मागेंच होते. होळकर पुढें गेले होते. त्यांचीच पलटणांची गांठ पडली. हे थोडके, इंग्रज फार दोन तीन पलटणें. हे पांच सातशें असतांही गांठ घातली. कांहीं उंटें, तट्टें, घोडीं, यांनीं पाडून घेतलीं. इंग्रजांनीं कही सुद्धां सावलीचे आसऱ्यास जाऊन लढाई दिली. जमले. मग यांचा इलाज चालला नाहीं. तथापि झुंज जाहलेंच. पंधरावीस माणूस इंग्रजांचें दोन तीन गोरे व कहीवाले मिळून मारले. होळकरांकडील तीन चार पागे व बरींच माणसें पडलीं. संध्याकाळ जाहला. तों बावाही हजरेला* तेथें पावले. अठरावीस घटिका रात्रीस कूच करून गेले होते. रात्र व तमाम दिवस घोड्यांस पाणी मिळालें नाहीं. फौज धुळपत राहील म्हणोन हाजरीची अवाई घातली. यामुळें झाडून लोक बरोबर गेले. या देशांत पाण्याचा तोटाच आहे. मिळत नाहीं. वैरणही सरली. येणेंकरून घोडीं गळालीं. तीन चार हजार घोडे अगोदरच मेले. या स्वारींत रात्रींपासून संध्याकाळ पावेतों पाणी मिळालें नाहीं. यामुळें घोडे फार राहिले. लाचार होऊन फिरून आले. मध्य रात्रीं बावा व सुभेदार सडे मुक्कामीं येऊन दाखल जाहले. उजाडतां तोफा व फौज पावली. एक दिवस दम खाऊन दुसरे दिवशीं फिरून जावें, तों इंग्रजांचे लष्करांत रसदबंदी व कहीचीही बंदीमुळें ताण बसला. तीन शेर धारण जाहली ! सबब त्याचें कूच होऊन माधारा बडोद्याकडे रातव्यानें निघाला. रवमठा† पावेतों

*मागील पानावरील टीप पहा.

†असें गांव नाहीं. रवाळ नांवांचें गांव आहे तें कदाचित् असूं शकेल.

गेला. वर्तमान सरदारांस समजल्यानंतर फौजा पाठीमागें लाविल्या. आपणही जाणार. गेले असतील. वर्तमान आलें नाहीं. तो दर मजल चालला तर त्यांसही पाठीमागें जाणें प्राप्त. फिरून येतील, तेव्हां जाब बोलतील. कासद उपवासी मरूं लागले. विकल जाहले. सबब रवाना केले आहेत. स्वारीचा शेवट काय तो समजतो ! स्वारी फिरून आल्यानंतर जाब घेऊन डांकेबरोबर रवाना करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar continues his description of an action which Mahadji and Holkar fought with the British near Savli.*

No. 100 1st May 1780.

पैवस्ती चंद्र १२ जमादिलावल समानीन.

बराबर शिवाजी गांगरा.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २५ रबिलाखर मुक्काम नजीक तलाव* तालुके चांपानेर, पायागडाचे उत्तरेस चार कोस, स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—डांकेबरोबर व छुट्या जोड्यांबरोबर पत्रें सादर जालीं तीं पावलीं. बितपशील :—

१ चंद्र १८ सफर	१ चंद्र १७ रबिलावल
१ चंद्र २३ सफर	१ चंद्र २१ रबिलावल
१ चंद्र २९ सफर	१ चंद्र २९ रबिलावल
१ चंद्र ५ रबिलावल	----
	७

सदरहू रवानग्यांपैकीं डाकेंत आले त्यास खोळंबा पडला, सबब लांबणीनें पावले. छुट्या जोड्या सोळा सत्रा दिवसांनीं अठरा दिवसांनीं पावले. प्रसंग लढाईचा व मी व्यथिस्त सबब जाबसाल वरचेवर जाले नाहींत. छुट्या जोड्यांस जाब लौकर न मिळत, खर्चावांचून हैराण होत, नाहक उपवासी मरत, म्हणून रसीदा देऊन दोन जोड्या छुट्या रवाना केल्या. पावल्या असतील.

---

*मूळ प्रतींत मलाव असें आहे. रायण या नांवाचा तलाव चापानेर खालीं होता तो आतां आजवा तलावांत सामील झाला आहे. कदाचित् रायण बद्दल मलाव असें चुकीचें वाचलें गेलें असेल.

चंद्र १ रबिलाखरचीं पत्रें राजश्री विठ्ठलराव मोरेश्वर गोळे यांचे विद्यमानें अजूरदार जोडीबरोबर रवाना जालीं, तीं सुरतेवरून येऊन साडेसात रोजांनीं येऊन पोहोचलीं. पत्रें बावांचीं बावांस दिलीं. माझींही पत्रें बावांनीं पाहिलीं. झुंज व स्वारीमुळें जाब लौकर होईनात. कासद जोडी उपाशी मरूं लागली, सबब जाब पावती देऊन रवाना केली. पावली असेल.

सदरहू रवानग्यांतील मजकूर एक; त्याचा जाब एके कलमांत दिला. निराळेंही उत्तर जालें तें कलमबंदीवरून विदित होईल.

फार्मर व दुसरा इंग्रज ओलीस होता त्यास बावांनीं सोडून गाडराकडे पाठविले. पाठवावयाचें नव्हतें. पाठविले तेव्हां सरकारचें काम मातबर जाणून सोडिले असतील. याचें उत्तर बावांनीं दिलें जे, दोघे वोली ठेविल्यानेंच अर्थ सरतो असें नाहीं. त्यांचे हातें संदर्भ लावावा. राजकारण करावें. भास पुण्यांत जाला तर राजकारणाची जात इंग्रजांनीं ठेविली नाहीं. तळेगांवीं तहनामा करून देऊन बदलले. त्यांची प्रमाणिकता कोठें राहिली? सुरतेस गाडर आल्यावर त्यानें कारकून मातबर पाठवावयाकरितां सरकारांत लिहिलें, तेच समयीं राजकारण आमचे गळां घालून आमचाच कारकून पाठविला असता, तर जावसाल होऊन राजकारणाची तऱ्हा पडती. समयीं श्रीमंत दादासाहेबांकडे आम्ही मिळालों, कृत्रिम बुद्धीनें आम्हीं आपला हरि बावाजी मारविला, असें ध्यानास आणून परभारें सरकारांतून मातबर पाठविले. त्या वेळेपासून राजकारण तुटलें असतां, आतां करावयाचें प्रयोजन काय? येहसान* करूनच पाठविले. मातबर काम करून द्यावयाजोगे असते तर तळेगांवाचा तह कां फिरता? नाकारे जाणूनच पाठविले. झुंजाची मारावयाची हिंमत धरून चालून आलों, मग पाठीमागें कां पाहावें? वोली पाठविल्या त्याबरोबर आपाजी साबाजी पाठवून बातमी व त्यांची हिंमत व फत्तेसिंगराव गायकवाड यांचा खुलासा घ्यावा इतका अर्थ होता. चालना करून गायकवाडांनीं संदर्भ लाविला, त्याचाही अनुभव घेतला. कृत्रिमाची राशी! त्यांत सरकारचा आश्रय सांपडला. मदिरापानीयांस आधार लागल्यास देहावर राहात नाहींत. तद्वत् विचार त्यांचा जाला! वर्तमान होत गेलें तें तुम्हांकडून व राजश्री विसाजी आपाजी यांकडून सरकारांत पावत असतां, गायकवाडाचे बोलणाराचा इतबार,—दरबारीं मातबर वर्तणूक कशीही असो, बोलणार प्रमाण बोलतो, ही खातरजमा होऊन गायकवाडावर कृपाच राहिली. त्यांजकडील

*कृपा, मेहरबानी.

लोकांचे जफ्तीकरितां किती वेळ लिहिलें ! त्याचें उत्तर जफ्ती कैली असें आलें. परंतु जफ्ती केली नाहीं. जाली असती तर वर्तमान गायकवाडाचे लोकांस येतें. बेहिंमत होऊन रदबदल्या लाविते. उठून येते. सहजच जथ विसकटता. वेंगास येते. आसरा सरकाराचा, बोलणार मातबर. त्याचे विश्वासावर पुस्तपन्हा* होत गेला.

त्रिबकराव नारायण यांजकडे सरकारचा ऐवज नजर व कर्जपट्टी पुष्कळ येणें. तर्तूद यांच्यानें होत नाहीं. त्यास, डौल मशारनिल्हेकडे आहे तसे आहेच. कारभार याचे डौलापैकीं एका गृहस्थास सांगावा. त्यानें डौल चालवून सरकारचा पैका द्यावा, चाकरी करावी, असें ठराविलें जाहे.त्याचें म्हणणें आहे जे, पाटिलबावांनीं पैक्यांत महाल अटकाविले आहेत, त्यास ऐवज त्यांचा देतों, महाल बावांनीं सोडून द्यावे, म्हणोन पत्रीं आज्ञा आली. त्यावरून बावांस विनंती केली. उत्तर जालें जे, आम्हांस पैक्यासीं गरज आहे. व्याज सुद्धां पैका आमचा द्यावा. महाल आपले घ्यावे. पैक्याचे ऐवजीं महाल घेतले होते तो पैकाच साहुकाराचे पदरीं पडला म्हणजे महाल सोडून देऊं.

शिवाजी विट्ठल व पवार मंडळी यांजकडून कर्जपट्टीबद्दल ऐवज येणें त्याजविषयीं बावांस हटकिलें. उत्तर जालें जे, सरकार कामाकरितां तैनातीस जुने पद्धतीप्रमाणें मागून घेतले त्यांचा आब राहावा, सरकार चाकरी घडावी व पैकाही द्यावा, याजकिरतां रदबदल्या त्यांच्या करून पाहिल्या. शेवटीं गुणानुवाद दृष्टीस आले. सरकार चाकरी व पैका देण्याचे अर्थ कसे ह्या बुद्धि त्यांच्या कळल्या. सरकारचा पैका मागणें तो तगादा करून घ्यावा. आम्ही रदबदल कोणाचीही करीत नाहीं.

हैदरनाईक याजकडे तहनामा सरकारचा व निभावणीपत्रें पाठविलीं असतां, त्यानें काबू पाहून एक दोन कलमांची आड धरून तहनामा नवा करितों. समय जाणून तहनामा पाठविला. निभावणीपत्र पाटिलबावांचें पाठविणें अशी सांडणीस्वाराबरोबर आज्ञा आली. त्याचें उत्तर पाठविलें होतें. पुन्हा तीन चार पत्रीं आज्ञा आली जे, हें पत्र पाठविलें तें कामाचें नाहीं. खानांनीं मसोदा पाठविला तो मुजरद जोडीबरोबर कामाचे कागद सुद्धां पाठविला आहे. पावला असल्यास त्याप्रमाणें पाठविणें. नसला पावला तर, हल्लीं मसोदा आम्हीं आपले पत्राचा

*पाठपुरावा, साह्य. पहा टीप पृ. ८४.

पाठविला आहे याप्रमाणें बावांचें पत्र जरूर पाठविणें. ऐशास पत्राविषयीं बावांस बहुत वेळ हटकिलें. एक वेळ स्वामींचे पत्राचे मसोद्याप्रमाणें देणें म्हणून आज्ञाही दिली. इतक्यांत आसेरचा बोभाट आला जे, किल्लेदारावर शिबंदी चढली होती, सरकारांतून खर्चास आलें, व सारे जमादारांस खातरजमेचे कागद आले, या वर्तमानावरून मना जालें. रात्रौ स्वारी इंग्रजांवर जाऊन तीस कोस मजल करून बावा माघारे आल्यावर, मागतीं जाऊन चार रोज सडे स्वारींत राहून, विनंती करून, स्वामींचे पत्राचे मसोद्याचे अन्वयें पत्र घेऊन थैली पाठविली आहे. त्याची नक्कल आलाहिदा आहे, त्यावरून ध्यानास येईल. त्रिंबकराव यांचे वकील व हैदरखानाचे नरसिंगराव यांस पत्रें पाठविलीं आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar asks Nana not to attach great significance to the release by Mahadji Sindia of Mr. Farmer and Mr Stuart the gentlemen taken as hostages at Talegaum. He encloses a letter addressed to Haidar from Mahadji guaranteeing the new engagement entered with him by the Paishwa's government.*

No. 101 2nd May 1780.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २६ रबिलाखरपावेतों मुक्काम लष्कर मलावाचा* तलाव नजीक पायागड स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींनीं चवदावे सफरचीं पत्रें, येथून सेवेसीं जासूद जोडी पाठविली तिजसमागमें आलीं तीं व पांचवे रबिलावलचें व एकवीस रबिलावलचें व आठरावे रबिलाखरचें ऐसें पावोन परम संतोष जाहला. ऐसेंच निरंतर सेवकावर कृपा करून पत्रीं सेवकास दर्शनाचा लाभ दिला पाहिजे. आठरावे रबिलाखरचें सेवकास पत्र पाठविलें, त्यांत मजकूर बळवंतराव पटवर्धन व गोपाळ जोसी या उभयतांस मोरो हरि व विष्णु नरहर व दादा पोतनीस व वासुदेव भट कर्वे यांणीं सर्वांनीं मिळोन मशारनिल्हेच्या बुद्धीस भ्रंश करून, लालची दाखवून, स्वामींस व राजश्री

*आजवा. पहा टीप पृ. ९९.

हरिपंत तात्यांस दगा करावा ही मसलत केली होती. तें राजकारण कळल्यानंतर बळवंतराव प्रमुख सर्वांस कैद करून बंदोबस्त केला, व या राजकारणांत श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई यांसही सामील करून घेतलें होतें. त्यास श्रीमंत रावसाहेब यांचा प्रताप व दैव थोर व त्यांच्या चरणासीं स्वामींची निष्ठा बलवत् याजमुळें या गोष्टी बाहेर आल्या. नाहीं तरी दुष्टांनीं मुळासच हात घातला होता. स्वामींचे निष्ठेची परीक्षा दोन चार वेळ सेवकाच्या दृष्टीस पडली व सर्व जनांनींही पाहिली. जेथें ईश्वरी कृपा आहे तेथें अशा दुष्टांच्यांनीं काय व्हावयाचें आहे ? बाईसाहेबांनीं एक वेळ तोतयाचें राजकारण करून सारें ब्राह्मण्य बुडवावयास सिद्ध जाहली होती, परंतु त्या वेळेस आपण उद्योग करून हें संकट आपल्या हातून ईश्वरें पार पाडिलें. ईश्वरी कृपा श्रीमंतांवर व आपल्यावर आहे, त्यापक्षीं जे फितूर करतील तेच मारले जातील यांत संशय नाहीं. यानंतर इकडील वर्तमान तरी, नारो गोपाळ व महादाजीपंत गोगटे व त्रिंबकजी भालेराव यांचीं पत्रें बजिन्नस इंग्रजांकडे पाठवीत होते तीं सांपडलीं. त्यांत मजकूर इतकाच होता कीं, सोमवारीं तुह्मीं येऊन छापा घालावा, याप्रमाणें फारसी कागद लेहून जो पारसी घेऊन जात होता तोच बजिन्नस सांपडला. त्याजवरून त्रिवर्गांस कैद करून किल्ले मंदोसर येथें पाठविलें, आणि सदाशिव रामचंद्र व चिंतो आनंत देवस्थळे यांचे पुतणे चिमणाजीपंत, हरिपंत देवस्थळे यांचे बंधु, यांस ताकीद केली कीं, तुम्हीं तूर्त उज्जेनीस जाणें. त्याजवरून सदाशिव रामचंद्र यांणीं चिरंजिवाचे मुंजीकरितां निरोप घेऊन उज्जेनीस गेले. हे गेल्यानंतर मध्यें पंधरा दिवस गेले. उपरांत दुसऱ्यानें इंग्रज कूच करून, राजश्री पाटीलबावा यांचा मुक्काम पांचदेवळचावर एक मासपर्यंत होता तो तळ इंग्रजांनीं घ्यावा या तर्तुदीनें, कूच करून तयार होऊन आले. उपरांत बावा तळ सोडून फौजसुद्धां बाजूस उभे राहिले. आपल्या फौजांतील जागजागां लोकांनीं ढासणें* धरून उभे राहिले होते. इंग्रज तोफा मारीत मारीत जागा सोडवीत तळावर आले. तोंडावर आपले लोक होतेच. तों इतक्यामध्यें चिंतो विठ्ठल तयार होऊन पुढें साऱ्या लोकांच्या जाऊं लागले. तोंपर्यंत कोणासही समजलें नाहीं. त्यांच्या गाडद्यांच्या गोळ्या आपल्या लोकांवर येत, त्याच्या माऱ्याच्या आंत मशारनिल्हे निसंग चालले. तेव्हां आपले लोकांनीं धरून आणिले. चवकसी करितां इंग्रजांकडे पळोन जात होते. उपरांत कैद करून उज्जेनीस रवाना केले. त्याजप्रमाणें येथील हरामखोरांचें वर्तमान जाहलें.

*ढासण—हातघाईची व आणीबाणीची जागा.

सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें असे. दुसरा मजकूर, गोपाळराव रामचंद्र, फत्तेसिंग गायकवाड यांजकडील वकील, पुण्यांत होता. तो येथें फत्तेसिंग गायकवाड यांजकडे येऊन एक मास जाहला. त्यास हालीं आठ दिवस जाहले, वर्तमान आलें कीं, पुण्याहून श्रीमंतांकडून फत्तेसिंग गायकवाड यांजकडे श्रीमंतांकडील कारकून एक व स्वामींकडील एक व राजश्री हरिपंततात्यांकडील एक व दोन हुजरे ऐसे आले. ते येते समयीं सुरतेस सांबाकडे* जाऊन मग गायकवाडाकडे आले. तेथें दोन तीन दिवस राहून, फिरोन मागती सांबाकडे गेले. म्हणोन वर्तमान येथें बावांजवळ आहे. याजवरून राजश्री पाटीलबावा बहुत संकोचांत आहेत कीं, यांस परस्परें अनुसंधानें करावयाचीं होतीं व सलूख करावयाचा आहे, त्यापक्षीं आम्हांस दाखला कां नसावा? मसलतीचा जिमा आमचा म्हणोन आम्हांस वारंवार कारभारी लिहितात, आणि आंतून राजकारणें याप्रमाणें करितात! तेव्हां आम्हीं तरी सरकारची व कारभाऱ्यांची नुकसानी काय केली आहे? असा विशण्य† मानून उगेच राहिले. याजकरितां जी गोष्ट करावयाची मर्जी असेल, ती बावांच्या अन्वयें जाहल्यास फार गोड पडेल असें मला भासतें. इंग्रज कूच करून माघारां तीन मजला चालून आला होता, तो फिरून बडोद्यानजीक मठ म्हणोन गांव आहे तेथें मुक्काम करून राहिला आहे. येथें बातमीचें वर्तमान असें आहे कीं, सांबाकडील पत्रें गाडरास येतात कीं, तुम्हीं सत्वर सुरतेस येणें. त्याजवरून सुरतेस जाणार. मग त्यांतील अर्थ काय असतील ते समजण्यांत आले नाहींत. आपल्या फौजाही सुरतेपावेतों पाठलाग करीत जाणार. वरकड सविस्तर मजकूर कच्चे पक्के बावांच्या बोलण्याचे भावगर्भ व दिनचर्येचें वर्तमान राजश्री सदाशिवपंत दाजी यांणीं सेवेसीं लिहिलें आहे, त्याजवरून सेवेसीं श्रुत होईल. दुसरें, स्वामीकडील मनस्वी वर्तमानें येथें ऐकतों कीं, प्रतापगडचा किल्ला बदलला आहे व आणखीही गृहस्थ मंडळी सांपडली आहे. यास्तव सेवकास पत्राचें उत्तर ल्याहावयास सविस्तरें लेखकास आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram congratulates Nana on his lucky escape from attempts on his life by conspirators and requests Nana not to carry on negotiations with the enemy over the head of Mahadji, who, he adds, felt the neglect bitterly and could not be expected to put heart in his work.*

*सांब–रघुनाथराव दादा. †विषण्ण–विशाद, खद.

No. 102 19th May 1780.

पैवस्त छ २५ जावल समानीन

हा डांक. श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण हस्ताक्षर पत्र पाठविलें तें पावलें. त्यावरून व राजश्री विसाजी आपाजी यांस संकल्पविकल्पाचे निवृत्तीचा मजकूर लिहिला त्यावरून सविस्तर कळला. ऐसियास येविशींचें मशारनिल्हेसीं बोलण्यांत आलें आहे. हे लिहितील त्यावरून कळेल. सारांश, श्रीमंतांचे पायासीं व आपले भाऊपण्यासीं अंतर जालें नाहीं व पुढेंही व्हावयाचें नाहीं. आपणाकडूनहि तसेंच असावें. रा छ १४ जावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji assures Nana of his doubts having been cleared by the explanation conveyed to him in his (Nana's) letter.*

No. 103 3rd June 1780.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २९ जमादिलोवल पावेतों मुक्काम लष्कर नजीक तलाव मलावाचा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—स्वामींकडून नवव्या रबिलाखरचें पत्र आलें त्या दारभ्य अलीकडे पत्र येऊन परामर्ष होत नाहीं, तरी निरंतर पत्रीं सांभाळीत असावें. यानंतर राजश्री पाटीलबाबा छावणीस जाण्याकरितां माघारे फिरोन, वैशाख वद्य दशमीस* हलोल† म्हणून गांव आहे तेथें मुक्काम केला. तेथून पायागड‡ समीपच दोन कोसांवर होता. त्यास मजल-दरमजल उज्जनीस जावें हाच निश्चय जहाला आहे. किंचित् जातील किंवा न जातील याची भ्रांत आहे. पहिल्यानें बऱ्हाणपुरास छावणीस जावें हाच निश्चय होता. परंतु त्या मार्गानें पाणी फौजेस मिळावयाजोगें नाहीं. मुजरद अलीमोहनच्या§ मार्गें सरकारची डांक आहेच. अलीमोहन व येथून जासूद

---

* २८ मे १७८०. † हालोल जि० पंचमहाल.

‡ पावागड चांपानेर जवळचा किल्ला. हीं स्थळें प्राचीन आहेत.

§ अलीमोहन हें छोटाउदेपुरचें जुनें नांव.

जोड्यांपासून पाण्याचा शोध आणविला, परंतु पाणी नाहीं. याजमुळें अवंतिकेसच जावें ऐसाच निश्चय ठरला आहे. आणि दाहोदची बारी पार गेल्यानंतर पुढें महेश्वरावरून बागपुरास जावयाचा मार्ग आहे. कदाचित् त्या मार्गें गेले तरी जातील. पक्का विचार अद्याप ठरला नाहीं. बहुतकरून अवंतिकेसच जातील ऐसें दिसतें. बऱ्हाणपुरास छावणीस जावें किंवा कोंडाईबारीस जावें हें बोलणें राजश्री सदाशिवपंत दाजी व आम्ही एक दोन वेळ विनंती केली व मजखेरीजही मशारनिल्हेनीं राजश्री पाटीलबावांस व जवळील मुत्सद्दी मंडळी यांस फार तऱ्हेनें समजाविलें. परंतु मुख्यांची मर्जी उज्जनीस जावयाचीच झाली. येविसींचीं भाषणें परस्परें फार जाहलीं त्याचा तपशील पत्रीं लिहितां येत नाहीं. कांहीं लिहिणें तो राजश्री सदाशिवपंत सेवेसीं लिहितील, त्याजवरून श्रुत होईल. त्यास अवंतिकेस राजश्री बावा गेल्यानंतर मजला निरोप मागून देशीं कन्येचे लग्नाकरितां यावयाचें आहे. त्यास मागेंच निरोप मागून वैशाख मासीं लग्नाकरितां यावें, तरी चाकरीचे दिवस, खावंद मोहीमसीर असतां निरोप मागोन घरीं जावें तेणेंकरून ठीक दिसत नाहीं. याजकरितां वैशाखमासचा लग्नाचा विचार राहिला. त्यास स्वामींस विनंती लिहिली आहे, तरी जशी आज्ञा येईल त्याजप्रमाणें वर्तणूक करीन. तूर्त देशीं आलियास घरीं थोडें बहुत काम आहे तें उरकोन ध्यावयास येईल; आणि पुढें चातुर्मास्य येथेंच सरदारांपासीं राहावयाची मर्जी झाली, तरी मार्गशीर्ष मासीं येण्यास विलग पडेल. कां कीं पुढें दिवस मसलतीचे व उज्जनीहून पुण्यास जाणें पल्लाही लांब. साठ गांवें पुणें उज्जनीस अंतर आहे. तेव्हां देशीं जाऊन फिरोन मागती चाकरीस येण्यास हेलपाटा फार पडतो; व मी सेवेसीं समीप आल्यास येथील कित्येक विचार व मजकूर सर्व ध्यानास येतील. त्यास जशी स्वामींची आज्ञा येईल त्याजप्रमाणें सेवक वर्तणूक करील. पेशजीं सेवकानें राजश्री विसाजी आपाजी यांच्या पत्राबरोबर डांकेच्या जासुदासमागमें मीं सेवेसीं पत्र लिहिलें आहे. त्यांत किंचित् असेरीचा मजकूर मशारनिल्हेचें व राजश्री पाटीलबावांचें भाषण जहालें, त्याचा गोषवारा लिहिला, त्याजवरून श्रुत होईल. व हल्लीं येथील खुलासा उगाच परस्परें मुत्सद्यासीं शोध, त्यांत हीच लालूच आहे. तेव्हां येविसीं पक्की खातरजमा जाहाल्यास पुन्हा दुष्ट कल्पना न निघोत ऐसें पक्कें जाहाल्यास मग कराराप्रमाणें प्रेत्न करून द्यावयास येईल. ही सूचना सेवेसीं लिहिली आहे. हा मजकूर श्रुत कोणासही न व्हावा. येथील विचार कारस्थानीचे फार आहेत, ते स्वामींस माहीतच आहेत. जोंपर्यंत काम होई तोंपावेतों लवण भंजन यथास्थित होतें; मग त्या गांवचें स्मरण राहत नाहीं.

याजकरितां सूचना मात्र लिहिली आहे. क्षेत्रास दाखल जाहाल्यावर सविस्तर मजकूर होईल तो सेवेसीं लिहीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram informs Nana of Mahadji's decision to retire to Ujjain for cantoning during the monsoon rejecting the advice pressed upon him by Nana to take his quarters at Barhanpur, or at Kondai Bari on the borders of Gujrat and Khandesh.*

No. 104 7th June 1780.

(पत्र आपाजीरामाचें)

श्री

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र ३ जमादिलाखरपावेतों मुक्काम लष्कर नजीक तांडा पोा दाहोद यथास्थित असे. विशेष:—स्वामींनीं विसावे जमादिलोवलचें पत्र पाठविलें तें एकुणतिसावे जमादिलोवलीं पावोन परम संतोष जाहला. ऐसेंच सेवकावर कृपा करून पत्रीं संभाळीत असावें. यानंतर येथील वर्तमान तरी राजश्री पाटीलबावा यांचा छावणीचा निश्चय उज्जनीस जावें ऐसा जाहाला. आलाहिदा पत्रीं उज्जनीस जावें अथवा बऱ्हाणपुरास जावें ऐसें लिहिलें होतें. त्यास आतां निश्चय अवंतिकेस जावयाचा ठरला. वरकड स्वामींनीं पत्रें छ एकुणसावा व विसावा जमादिलोवलीचीं राजश्री सदाशिवपंत यांस लिहिलीं होतीं, तीं मींही पाहिलीं. परंतु त्यांतील अर्थ छावणीचा वगैरे कित्येक लिहिलें होतें तो प्रकार कांहींच तूर्त घडत नाहीं. पुढें भगवत् इच्छेनें बाजत बरसात काय घडेल तें खरें. मीं राजश्री बावांस विनंती एकांतीं गांठून केली कीं उज्जनीस जाणें हें मनसुब्यास विलग फार पडतें. परंतु ईश्वरें त्यांच्या बुद्धीस काय प्रेरणा केली आहे ती कळत नाहीं. आपलाच हेका करून अवंतिकेस जाणें ठरलें. जवळील मंडळी हिचेंही ऐकत नाहीं व कोणी निष्ठुरपणें बोलतही नाहीं. सर्व खुशामतीच्या गोष्टी सांगतात; व बेमुर्वत बोलावें असा दाबही कोणाचा नाहीं. उज्जनीस गेल्यानंतर कोणी कारभारी किंवा शाहाणा माणूस स्वामींकडे पाठवावा अशी कल्पना आहे. मग घडेल तें खरें. मुजरद जोडी रवाना केली आहे त्यास आलाहिदा पत्रीं मी खासगत मजकूर आपला लिहिला आहे. त्यास स्वामी म्हणतील कीं, चार महिने स्वारीस जाऊन जहाले नाहीं तों घरीं येण्याविषयीं लिहितां, तरी कन्येचे लग्नाकरितां येणें प्राप्त आहे. आणि कदाचित् सरदार हिंदुस्थानांत चालले तरी पुन्हा देशीं जाऊन येण्यास

विलग पडेल व येथून निरोपही घेऊन येणें तेंही ठीक नाहीं. याकरितां दुरंदेश जाणोन विनंती लिहिली आहे. जशी आज्ञा येईल त्याजप्रमाणें वर्तणूक करीन. परंतु ज्या पक्षीं राजश्री बावांची मर्जी देशीं येण्याची नाहीं, तेव्हां एक वेळ मजला घरास आलें पाहिजे. उपरांत पांच वर्षें देशीं येणें न जाहालें तरी पेंच नाहीं. पत्राचें उत्तर ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram communicates to Nana the decision of Mahadji to proceed to Ujjain for the monsoon camp. He requests permission to go to Poona to celebrate the marriage of his daughter.*

No. 105 17th June 1780.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं: —

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १३ जमादिलाखर पावेतों मुक्काम लष्कर नजीक बदनावर* प्रांत माळवा येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :— स्वामींकडून पत्र येऊन बहुत दिवस वर्तमान कळत नाहीं, तेणेंकरून चित्त सापेक्षित असे. तरी सदैव पत्रीं सेवकाचा परामर्ष करीत असलें पाहिजे. यानंतर राजश्री पाटीलबावा जेष्ठ वद्य सप्तमीस उज्जनीस दाखल होणार. मुक्काम मजकुरापासून अवंतिका पंधरा कोस आहे. राजश्री विसाजी आपाजी यांची रवानगी देशीं जाण्याची जाहाली. याच मुक्कामाहून मशारनिल्हे देशास गेले. वरकड येथील सविस्तर वर्तमान मशारनिल्हेस जें समजण्यांत आलें होतें तितकें सांगितलेंच आहे व पंत मशारनिल्हे यांच्या जासुदजोडीबरोबर पत्र अलाहिदा सेवेसीं रवाना केलें आहे, त्याजवरून सविस्तर वृत्त येथील विदित होईल. व मशारनिल्हेची समक्ष गांठ पडेल ते समयीं वर्तमान कच्चें पक्कें श्रुत करतील; त्याजवरून निवेदन होईल. इंग्रजांनीं कल्याणास मोर्चेबंदी करून लढवीत होते. त्याजवर राजश्री बाजीपंत अण्णा यांणीं तोफा लावून गाडद्यांची व तोफांची मारगिरी केली. ते समयीं इंग्रजांकडील लोकांनीं निकड करून आपल्या फौजेस मागें हटविलें, व आणखी कुमक मुंबईहून जनरल याणें पाठविली, तीही त्याच समयीं येऊन पोंहचली. याप्रमाणें येथें गोविंद राम वकील याचें पत्र आलें आणि स्वामींचीं पत्रें आलीं नाहींत, याजवरून चित्त बहुत खिन्न आहे. यास्तव सविस्तर

*रेल्वे स्टेशन रतलामचे दक्षिणेस.

ल्याहावयासी पत्रीं आज्ञा जाहली पाहिजे. सविस्तर वर्तमान होईल तें सेवेसीं मागाहून विनंती लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports his arrival at Badnawar on way to Ujjain with Sindia's army and asks for information about the enemy's movements against Kalyan.*

No. 106 27th July 1780.

पो छ ७ साबान.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १ रजबचें पत्र पाठविलें, तें छ २० रोज माहे मिनहूस पावलें. हैदरखानाचें निभावणीपत्र आल्याच्या पूर्वी, त्याजकडील आपले नांवाची थैली व लाखोटे आले, ते पाठविले आहेत. पावतील. मागाहून पत्र आलें कीं, हैदरखान बेंगरुळाहून पुढें गेले. सरकारचे वकिलास निरोप दिल्हा. हैदरखानाकडील मीर फौज सुद्धां चेनापट्टण तालुक्यांत पुढें गेले. त्यांणीं कालाहस्ती वगैरे संस्थानांत धूम केली. सविस्तर राा सदाशिव दिनकर यांस लिहिलें आहे, ह्मणोन लिहिलें व मशारनिल्हे यांचे पत्रावरून सविस्तर कळों आलें. हैदरखानाकडील थैली व लाखोटे पाठविले ते पावले. छावणीस बऱ्हाणपुरास यावें हाच निश्चय होता. त्यास, नजफखानाची फौज जैपूर प्रांतीं आहे ती व जैपुरकराची फौज मिळोन, रामपुरा व टोंक वगैरे माहाल होळकराकडील होते, तेथील अंमलदार उठवून देऊन त्यांणीं आपला अंमल केला. तेथून कोटें बुंदीचे सरहद्देस आले. माळव्यापर्यंत अंमल उठवीत यावें हा त्यांचा विचार ह्मणून अमलदारांचीं पत्रें आलीं व राा आंबाजी इंगळे व खंडेराव व सरकारचीं पथकें सरंजामी ग्वालेरीकडे होते, यांणीं जाटानें ग्वालेरीचा मुलूक दाबला होता त्यापैकीं दाहा वीस गढ्या घेऊन ठाणीं बसवीत गोहदेनजीक गेले. त्यावरून जाटानें इंग्रजाशीं राजकारण करून, दरमाह ऐशी हजार रुपये इंग्रजास कबूल केले, व मुलूक सुटेल त्यांत नव आणे इंग्रजांस द्यावे, सात आणे आपण घ्यावे, असा करारमदार करून, इंग्रजांस मदतीस आणिलें. उपरांतिक गोहदवाला जाट इंग्रज सुद्धां यांचे मुकाबल्यास आला. हे गनिमी काव्यानें सभोंवते फिरत गेले. लढायाही यांच्या त्यांच्या जाहल्या. परंतु जाटास तिकडील राजेरजवाडे व भूमे सामील जाले.

इंग्रज सुद्धां तो भारी जाहला. आगीचें बळ विशेष. यामुळें आपले फौजेचा काबू चालला नाहीं. जाट व इंग्रज ग्वालेर मागें टाकून, नरवरानजीक अंत्रीवरी* आले. पुढें माळव्यांत यावयाचा इरादा आहे. इंग्रजाचा कंपू इटाव्याहून आणखी येणार आहे. याप्रमाणें इंगळे व खंडेराव हरि यांचीं पत्रें आलीं. याचा विचार न करितां पुढें देशीं यावें, तरी दोघे दोहीकडून मुलूक घेत पुढें येतात. याकरितां उज्जनीस छावणीस येणें प्राप्त जाहलें. येथें आल्यावरी पातशाहा व नजफखान यांजकडील पत्रांसहित राा पुरुषोत्तम महादेव हिंगणे यांचें पत्र आलें. त्या पत्राची नक्कल, व इकडील प्रकार व गुजराथची मसलत उभीच आहे तों हिंदुस्तानांतील ह्या मसलती उत्पन्न जाहल्या, याचा विचार कसा करावा? चहूंकडे मसलती उभ्या राहिल्या, तेव्हां चवघांनीं चहूंकडे कंबर बांधून मसलती आटोपाव्या, येणेंकरून राज्याचा बंदोबस्त होऊन राज्य राहतें, येविशींचा सुचला विचार तो राजश्री सदाशिव दिनकर यांस सांगितला. त्यांणीं आपणास लिहिला व आह्मीं लिहून पेशजीं पत्रें आपणाकडे पाठविलीं आहेत, त्यावरून सविस्तर कळेल. त्याचें उत्तर येईल तसें केलें जाईल. हल्लीं आंबाजी इंगळे यांचीं पत्रें आलीं कीं, जाट व इंग्रज अंत्रीस छावणी करणार होते ते राहिले. अंत्री माघें टाकली. कूच करून पुढें आले. सिपरी शाहबाद† या रानांत छावणीस येणार. इटाव्याहून इंग्रजांचा कंपू निघाला. लौकरच येऊन यांस सामील होईल. सिपरी शाहबादेस आल्यावरी माळव्यांत यावयास बाकी काय राहिली? भूपाळबाले वगैरे यांचीं संधानें इंग्रजांशीं आहेतच. पातशाहा व नजफखान यांणीं लिहिलें त्याप्रों इकडून न घडलें, तरी पातशाहा व नजफखान व इंग्रज एक होतात; तेव्हां हिंदुस्तान झाडून हातचें जाऊन माळवा जातो. यास्तव पेशजीं लिहिलें आहे त्याप्रमाणें आपण व नबाब, भोसले मिळोन, सुरत व मुंबईकडील तोंड राखावें. एक वर्ष इंग्रजांस आपण ठासून राखल्यास, आह्मी, पातशाहा व नजफखान वगैरे यांचीं राजकारणें आलीं आहेत, त्यांस सामील करून घेऊन, हिंदुस्तानांतून इंग्रज इकडे येणार त्यांचें पारपत्य करून, पुढें अंतरवेदींत जाऊन, इंग्रजांचा नीर‡ काढीत काशीपर्यंत जाऊन इंग्रजांस ताण बसवितों. हिंदुस्तानांतील इंग्रज हाकीत बंगाल्याकडे चालविले ह्मणजे त्यांस त्यांचें घर संभाळणें कठिण पडेल. सुरत मुंबईचे इंग्रज सहजच हलके पडले. चेनापट्टनाकडून मदत यावी, तरी तिकडे हैदरखानानें ताण बसवावयास प्रारंभ केलाच आहे. याप्रमाणें तिकडून व इकडून जाल्यास

*सं. ग्वाल्हेर. †ग्वालेरच्या द० २० मैल. ‡पिच्छा पुरवणें.

बंदोबस्त होतो. हे सल्ला चांगली दिसती. यास्तव लिहिली असे. याचें उत्तर काय तें सत्वर पाठवावें. देशीं आम्हीं यावें अशीच मर्जी असल्यास आमचा येण्याविशीं गुंता नाहीं. परंतु आह्मी देशीं आल्यावरी माळवा राहणें कळतच आहे. सारी भिस्त या मुलकावरी. तो मुलूकच गेल्यावरी फौजेचा विचार समजलाच आहे. सरकारचाकरी करितां आपण बोलावितात, तो प्रकार मुलूकच गेल्यानंतर कसा घडतो ? जातीनिशीं समागमें राहूं यांतच उपयोग असें असल्यास तसेंच ल्याहावें. गुजराथ व हिंदुस्तान दोन मसलती आहेत. आह्मीं उभयतां इकडे आहों. त्यास कोण कोणी मसलती कराव्या तें लिहावें. येविशीं राा सदाशिव दिनकर यांस सांगितलें. मशारनिल्हे लिहितील त्यावरून सविस्तर कळेल. उत्तर सत्वर पाठवावें. राा छ २४ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji explains to Nana that his presence was vitally necessary at Ujjain in order to meet the growing pressure of the English in Malwa and Bundelkhand and to prevent the Bengal army passing through those regions to join their comrades under Goddard in Gujrat.*

No. 107 31st July 1780.

पैवस्ती चंद्र ७ साबान.

श्री

सेवेसीं विनंती. सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २८ रजब मुक्काम उज्जैन स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटीलबावा यांनीं बोलावून आज्ञा केली जे, राजश्री आंबोजी इंगळे यांचें पत्र आलें कीं, गोहदकर जाट व इंग्रज यांनीं नरवरानजीक अंत्रीवर येऊन छावणीचा सरंजाम केला असतां, तेथूनही कूच करून सिपरीवर आले. तेथें छावणीचा सरंजाम होत आहे. पुढें चाल करावयाची उमेद आहे म्हणोन लिहिलें आहे. यावरून ते हावभरी जालेसे दिसतात. नरवरापासोन सिपरी पावेतों तालुका वाघोलकर जाधवाकडे, त्याजकडून व झांशीकडून वर्तमान येत असेलच. सिरोंजेपासोन सिपरी कोलारस तीस पस्तीस कोस होईल. येथून सिरोंज ऐशी कोस, एकूण उज्जनीपासून एकशें पंधरा कोसांवर शत्रु या पर्जन्य कालांत हिंमत वाढवून आले, तेव्हां दसऱ्यापावेतों किती मुलूख

घेतील? आम्हीं उज्जनींत, होळकर इंदुरांत असतां, इतकी हिंमत वाढवून प्रसार करीत आले, तेव्हां आम्ही देशीं गेल्यानंतर काय करतील न कळे! सरकारचीं पत्रें येतात जे, उभयतां सरदारांनीं कोंडाईबारीस छावणीस यावें, तर साहेबचाकरीस उजूर नाहीं. आधीं खावंदाचें घर रक्षावें हा मुख्य पक्ष. कारभारी ह्मणतील तें खरें, मान्य. विचारदृष्टि पाहतां सुरत मुंबईस इंग्रज आहेत तिकयांस देशीं व गुजराथ प्रांतीं मोहीम, त्यांस कुमक खुष्कींतून येत नाहीं. विलायतीस लढाई लागली, तिकडील तिकडेच गुंतले. कलकत्त्याहून जलमार्गें कुमक येईल तर मधें हैदरनाइकाची लढाई चेनापट्टणावर या बरसातेंत सुरू जाली. दक्षणेस खुष्की नाहींच. जलमार्ग हैदरनाइकानें धरिला. पूर्वेकडील जिमा नवाब भोसले यांचा. दोहींकडील वर्तमान सरकारांत येत असेल. दोघांनीं पूर्वेस वेध लाविला असेल. परंतु दृष्टोत्पत्तीस मकसुदाबादेहून* अयोध्येवरून अंतरवेदपावेतों मार्ग मोकळा. तिकडून कंपूचे कंपू येतात. यावरून मकसुदाबादेस वेध लागला न लागण्याचें लक्षण समजतें. हा मार्ग मोकळा जाणून इंग्रजांनीं हिंमत धरून भारी मनसबा आरंभिला. अंतरवेद रोहिलखंड हाताखालीं घातलेंच. द्रव्यलोभ दाखऊन, पातशाह मेळऊन तोरा हाताखालीं घालावा, मग नजफखान सामील जाले उत्तम, न जाल्यास तोरा आपणाजवळ असतां करतात काय, मारून घेऊं, अशी हिंमत धरून साधन करीत होते. पातशाह व नजफखान समजलेच होते. सरकारचे फौजेची कुमक इच्छितात. आधीं सरकारचीं पत्रें येविसीं त्यांस गेलींच होतीं. आम्हीही गुजराथेंतून पत्रें पाठविलीं. दोहों आधारांवर पातशाह व नजफखानांनीं इंग्रजांसीं बिगाडाची हिंमत धरिली. तत्रापि आमच्या फौजा येऊन सामील होतील, भरंवसा पुरत नाहीं. देशीं इंग्रजांची लढाई. साऱ्या दक्षणी फौजा देशीं जातील. असा आंदेश चित्तांत आणून आंतून इंग्रजांचें सूत्र लाऊन ठेविलें आहे. आम्हीं त्यांस सामील जाल्यास ते इंग्रजांसीं बिगाड करितील. आम्हीं सामील न जाल्यास इंग्रज, पातशाह व नजफखान एक होतात. एकूण हिंदुस्थानांतून इंग्रजांस वाट मोकळी. इंग्रज गोहदकर एक होऊन दक्षणेस चाल धरली. मुलूख घेऊन मागें टाकून पुढें चालत येतात. आम्हीं देशीं आल्यानंतर इकडे यांस अटकाव नाहींच. निःसंदेह नर्मदेपावेतों दसऱ्यासच येतात. जितका मुलूख मागें टाकितील तितका त्यांचा जालाच. पुढें चाल करावयाची हिंमत वाढली, ते सुरत मुंबईकरांची कुमक आली. याचा परिणाम दृष्टींत यावासा आहे.

*मुर्शिदाबाद.

सिपरी कोलारस येथून शंभर कोसांवर शत्रु आले असतां, आम्हीं दक्षणेस गेल्यास पळून गेले म्हणतील. मग हावभरी होऊन लांब लांब मजली करीत येतील. आम्ही उभयतां सरदार व लहान मोठे सारेच एक खावंद कायम असतां सर्वत्रांची कायमी हें आबालवृद्धांस कळतें. आम्हांस न कळावेंसें नाहीं. परंतु मनसब्याचें धोरण चांगलें असावें. परिणाम लावणार श्री किंवा खावंदाचें प्रारब्ध. हिंदुस्थानांतून खुष्कीची वाट इंग्रजांची बंद करावी हा उत्तम पक्ष आहे. आम्हीं देशीं गेल्यापासून एकरुखी मसलत पडत गेली. सारे एकत्र जाल्यानें शेवट होत गेला. आतां तो प्रकार राहिला नाहीं. गुदस्तां देश व गुजराथ व हिन्दुस्थान तीन प्रकार जाले, तेच यंदां सबळ होत चालले. त्यांत एक गोष्ट श्रीमंतांचे दैवेंकरून मोठी जाली कीं, हैदरनाईक, श्रीमंतांचे तहनामा करारांत आला त्याप्रमाणें त्यानें वचन सांभाळून इंग्रजांवर मोहीम केली. येणेंकरून इंग्रजांची मसलत उणी जाली. नवाब हैदरखानाप्रमाणें, तसेच भोसले निखालसपणें खोलून नेमणुकेप्रमाणें मोहीम करिते, तर श्रीमंतांस सारे लहान मोठे सरदारांसहित एक पश्चिमेकडील मुंबई सुरतेचे इंग्रजांची मोहीम एकच राहाती. हैदरखानांनीं मात्र दक्षिणेचे तोंड राखिलें. नवाब घरींच आहेत. भोसल्यांची फौज बंगाल्यास गेली, वदंता ऐकतों. छावणी कोठें आहे कळलें असेल. आम्ही इंदूर उज्जनीस आलों, तर देश, गुजराथ व हिंदुस्थान तिहींचे चिमटचांत शह राखून आहों. लहान मोठे दौलतींत आहेत तितक्यांनीं स्वामीसेवेचे पोटीं आपलें कल्याण समजून श्रम करावे. विखरली मसलत जिकडील तिकडे आटोपावी. हिंदुस्थानांतून इंग्रजांची चाल पडली. हें तोंड भारी; थोडक्या फौजेनें हें तोंड धरवत नाहीं. आम्ही उभयतां सरदारांनीं पातशाह व नजफखान मेळवून घेऊन, आणखी संस्थानिक व राजे राजवाडे आपले करून घ्यावे, आणि इंग्रजांचे गळां पडावें, तरीच इकडील बंदोबस्त होईल. हुजरात व सरंजामी लहान मोठे तिकडे आहेत. तितक्यांनीं सुरत मुंबईचें तोंड राखन, होऊं सकल्यास गुजराथेस राजश्री गोविंदराव गायकवाड यांची रवानगी केलीच आहे त्यांचें साहित्य करावें. सुरत मुंबईचें तोंड भारीच आहे, तें हुजरातसरंजाम्यांनीं राखावें. पुढें वाढूं देऊं नये. दोघां सरदारांतून एकानें गुजराथ आटोपावी. गोविंदराव गायकवाड, आपण एक होऊन मसलत करावी. एकानें हिंदुस्थानची मसलत पातशाह, नजफखान मेळऊन घेऊन करावी. हिंदुस्थानांतील इंग्रज मागें घातले तर मोठीच गोष्ट जाली. श्रीमंतांचे दैवेंकरून होईल. न होईल तर पुढें तरी वाढूं देऊं नयेत. येणेंकरून सुरत मुंबईकरांची कुमक होणार

नाहीं. देश व गुजराथची मसलत हलकी जाईल असें मनसब्यानें वाटतें. कारभारी यांनीं विचार पाहावा. लिहिला मनसबा ध्यानास आला, तर कोणें कोणती मसलत करावी, ठराव करावा. एक प्रसिद्धच आहे, आम्ही देशीं जावें, देशच्यांनीं हिंदुस्थानांत यावें हें ठीक दिसत नाहीं. साधनेंही लागत नाहींत ? देशीं आहेत त्यांस माहितगारी जाग्या जुग्याची व माणूस कोठील कसें, साधनें कसकशीं, हें ठाऊक आहे. त्यांनीं तिकडीलच मसलत आटोपावी. हिंदुस्थानची माहितगारी साधनांची व जाग्याजुग्याची आम्हां उभयतांस आहे. त्यांत नवी गुजराथ मिळाली. गुदस्तांची स्वारी गुजराथेंतही गेली होती. किंचित् दृष्टींत असेलच. दोन मसलती दोघांस नेमाव्या. ज्यास जी कबूल असेल ती पृथक् पृथक सांगावी. म्हणजे काळजी धरून आपल्याला जिम्याचें काम करितील. शरकतींत* पुसावयासही जागा नाहीं. आम्हांस पुसतील तर गुजराथ अगर हिंदुस्थान दोहींतून जी मसलत सांगतील ती कबूल आहे. इतकेंही सोडून देशींच या म्हणतील तर तेंही मान्यच आहे. कोठेंही चाकरी करावी. देशीं जाणें एक प्रकारें बरें; सांगितली चाकरी करावी. डोईवर† घ्यावें लागत नाहीं. हिंदुस्थानची मसलत शिरोपस्थाईची बरी नाहीं. कोणीही काम माहितगारी व वळणाखेरीज होत नाहीं. यावरून सुचलें ल्याहावयास सांगितलें. लौकर पुण्यास लेहून उत्तर विसा रोजांत आणवणें इतकें लिहिलें. मनन करूनही देशींच यावयाचो आज्ञा आली तर, जों गोहदकर, इंग्रज व नजफखानाची फौज जवळ आली नाहीं तों अगोदर निघोन जाऊं. येणेंकरून पळून गेल्याचा आरोप दूर होईल. आम्ही गेल्यावर ते मुलूख घेत येतच आहेत. येऊन तेथें जातीनें अगर ऐवजाप्रमाणें जाऊन सामील होऊं सर्वांप्रमाणें राहूं. कदाचित् लिहिली मसलत पसंत पडून इकडीलच मसलतीस संमत पडलें, तर जी मसलत सांगतील त्याचीं साहित्यें साधनें आहेत तीं, आजपासून करावीं लागतील तरी त्वराच होईल. महत्साधनें अल्प यत्नेंकरून साधत नाहींत यास्तव अगोदर जपलें पाहिजे. हिंदुस्थानांतून इंग्रज कंपू एकामागें एक येऊं लागले, याजकरितां हिंदुस्थानांतील मसलत भारी, उभयतांनींही असावें असेंच काम आहे. कदाचित् सरकारची मर्जी दोघांस दोन मसलती योजण्याचीच जाली, तर गुजराथची मसलत करणारानें इकडील मसलत करणाराची कुमक करावी. खावंदाचीही मदत असावी. म्हणोन सांगितल्यावरून विनंती केली असे. बावांनींही सेवेसीं पत्र लिहिलें आहे. मनन होऊन मनसब्यास उपयोग असेल त्या-

*एकत्र भागीदारी. †स्वतःच्या जबाबदारीनें वागणें.

प्रमाणें उत्तर लौकर सादर जालें पाहिजे. मसलतीस दिवस राहिले नाहींत. उत्तर येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं म्हणतात म्हणून जाबाची प्रतीक्षा आहे. जाब लौकर द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his talk with Sindia in which the latter expressed great anxiety over the enemy's thrust in the direction of Malwa and suggested the absolute necessity of stopping further advance of the enemy from that quarter.*

No. 108 13th August 1780.

पैवस्तो छ २५ साबान इहिदे समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरी :—गोहदकर जाट व इंग्रज एकत्र होऊन नरवरानजीक आले. जैपुरकराची व नजफखानाची फौज टोंक व रामपुरा होळकराकडील माहाल घेऊन अलीकडे कोटयाचे सरदेवरी आले. गुजराथची मसलत उभी आहे तों हया दोन मसलती उत्पन्न जाल्या. पातशाहा व नजफखान यांजकडील पत्रें आलीं, त्यांचा मजकूर सविस्तर आपणास दोन तीन पत्रीं पेशजी लेहून पाठविला आहे. आपले पत्राचीं उत्तरें यावीं त्याप्रमाणें करावें हे प्रतीक्षा करीत होतों. तों आज छ १२ साबानीं राा आंबाजी इंगळे यांचे फौजेंतून पत्रें आलीं कीं ग्वालेरचा किल्ला इंग्रजांनीं दगा करून श्रावण शुा चतुर्थीस* घेतला. दक्षणेकडे उरवईचे जागा किल्ल्याची होती तिकडून रात्रीं किल्ल्यावरी पलटणें चढवून दगा केला. किल्लेदार रघुनाथराव रामचंद्र गोळी लागोन ठार पडला. त्याच्या बायकामुलें होतीं त्यांनीं पोटकटारी करून घेतली म्हणोन वर्तमान आलें. किल्लेदाराकडे येथून खर्चास पाठविलें. सावधानीविसीं वरचेवरी लिहीत असतां बेफाम राहिले, त्यामुळें दगा होऊन जागा गेली. इंग्रजांस मोठा थांगा† जाला. तेथील मजबुदी करून पुढें यावयाचा विचार त्यांचा आहे. जैपूरकर व नजफखानाची फौज ऐशी नव्वद कोसांवरी येथून आहे. याप्रो इकडील वर्तमान. केसोपंत दातार श्रीमंत दादासाहेबांकडील व पलटणें सुलतानपूर, नंदुरबार येथें येऊन अंमल

---

*४ आगस्ट ७८०. †थारा, सोईची जागा.

बसविला. गुलजारखान व चंदरराव पवार ते सारे एकत्र होणार हेंही वर्तमान आलें. आपलें पत्र राजश्री सदाशिव दिनकर यांसी आलें कीं पाटीलबावांस घेऊन कोंडाईबारीकडे यावें. त्यास आम्ही तिकडे आलों म्हणजे ग्वालेरीकडील इंग्रज माळव्यांत येऊन बंदोबस्त करीत पुढें देशीं येतील याचा विचार कसा करावा? कोंकण पट्टींत इंग्रजांचा उपद्रव तो एक शह, दुसरा, खानदेश व गुजराथ. तिसरा, ग्वालेरीहून कंपू येतात ते वै जैपुरकर व नजफखान, याप्रमाणें तीन मसलती यऊन सध्याच ठेपल्या. ह्या जिकडील तिकडे थोपवून न राखतां सारे एकत्र जालों तरी एका तोंडावरी राहूं. दोन तोंडें मोकळीं. इकडून आटपीत येतील तेव्हां मुलुकचा मुलूक त्यांचे हातीं जाऊन भारी पडतील. मग कांहींच होणें नाहीं. याकरितां आपले विचारें येईल तरी एक सल्ला आहे. खानदेश व गुजराथ दोन तोंडें होळकरांनीं सांभाळावीं. आपण कोंकणपट्टीचें तोंड सांभाळून ठासून राहावें, आणि होळकरांकडील उपराळा राखावा. आपणाकडे निकड पडल्यास होळकरांनीं उपराळा करावा. आम्ही ग्वालेरीकडून कंपू येतात ते व जैपुरकराची व नजफखानाची फौज आली अशीं दोनीं तोंडें आम्ही सांभाळतों. इंग्रज चहूंकडून वेष्टीत चालले, या समयीं चवघांनीं चहूंकडे मसलती आटोपल्यास बंदोबस्त होईल. नाहीं तरी कळतच आहे. इकडील कांहीं होऊ, तुम्ही यावें, असेंच विचारास आल्यास तसेंच ल्याहावें. म्हणजे इकडील आटपाआटप करून येऊं. मग इकडील आशा कशास धरावी? ग्वालेरचा किल्ला घेतला, इंग्रज पुढें येतात, म्हणून सरदार निघोन देशीं गेले हें लौकिकांत होईल. असो. दोहींतून कोणता विचार तो स्पष्ट लेहून सत्वर पाठवावा; त्याप्रों केलें जाईल. वरकड रा॥ सदाशिव दिनकर यांनीं लि॥ आहे त्यावरून कळेल. रा॥ छ १२ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reports the loss of the important fortress of Gwalior to the enemy and laments the folly of leaving the northern dominions unprotrected while concentrating the whole Maratha army in Gujerat. He himself offers to hold the enemy in check on the northern front.*

No. 109 13th August 1780.

पैवस्ती चंद्र २५ साबान इहिदे समानीन.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १२ साबान मुक्काम उज्जैन स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान

यथास्थित असे. विशष :—राजश्री पाटीलबावा यांनीं बोलाऊन आज्ञा केली जे, आम्हांस वरचेवर आज्ञा कोंडाईबारीस यावें म्हणून येते. गोहदकर जाट व इंग्रज एक होऊन सिपरी कोल्हारावर छावणी केली. ते येथून शंभर कोस; व नजफखानाची फौज व जयपूरकराची फौज एक होऊन होळकरांकडील रामपुरा व टोक तोडा हे महालचीं ठाणीं होळकरांचीं उठून त्यांनीं आपलीं कायम केलीं. असें असतां आम्ही देशीं गेल्यास इकडे विलग. हा देश राहाणार नाहीं. शत्रु घेतील आणि कुमक सुरत ममईवाल्या इंग्रजांची होईल. देश आमचा गेल्यानंतर फौज आम्हाजवळ राहाणार नाहीं. सडे खावंदाजवळ राहिल्यानें चाकरी जातीनें काय घडणें तें घडेल. याजपेक्षां कलकत्याहून दक्षणेस जावयास इंग्रज निघतात, त्यांस वाट अंतरवेदींतून पडली ही वाईट. हीच वाट मना केली म्हणजे सुरत ममईकरांची कुमक होणार नाहीं. पातशाहा व नजफखान यांस आम्ही मेळऊन घ्यावें, इंग्रजांचें पारपत्य करावें. ही मसलत चांगलीसी वाटून पुण्यास लेहून दोन जोड्यांबरोबर पत्रें पाठविलीं. त्यांचे उत्तराची प्रतीक्षा करीत होतों, तों आज वर्तमान आलें जे, श्रावण शुद्ध ४ शुक्रवारीं रात्रौ ग्वाल्हेरचा किल्ला गोहदकर जाट व इंग्रजांनीं दगा करून घेतला. आंबूजी इंगळे कुटुंब सुद्धां किल्ल्यावर होते. ते सडे माणसें मात्र उतरून खालीं येऊन रात्र दिवस करून शाहाबादेस आले. किल्लेदार रघुनाथराव रामचंद्र गोळीनें ठार जाले. बायको त्यांची हें वर्तमान ऐकून, पुत्र लहान होता त्यास मारून टाकून, आपण कटारी मारून घेऊन मेली. भावजया होत्या त्यांनीं कटाऱ्या मार मारून घेऊन मेल्या. ही गति जाली. किल्ला शत्रूनें घेतल्यानंतर आम्ही येथून दक्षणेस गेल्यास शत्रू बद-राह* जाले, त्यांस किती हिंमत येईल ? पळून गेले म्हणतील आणि पर लाऊन चालून येतील. खानदेशचें वर्तमान ऐकिलें. इंग्रज व केसो कृष्ण यांनीं सुलतानपूर नंदुरबारचीं ठाणीं घेतलीं व थालनेर घेणार, तेव्हां अगदीं खानदेश ते आटोपितात. एकून उत्तरेकडे व खानदेशांत, देशीं, कोकणांत चहूंकडे मसलत पडली. आम्ही सारेच देशीं एके जागां जाल्यानें चहूंकडील मसलता कशा आटोपतात ? विचारास आलें तर कारभारी यांनीं देश कोंकणाची मसलत सांभाळावी. नवाब भोसले यांची देखील फौज आणावी. सुरत, ममईकर इंग्रजांस ठासून राखावें. खानदेशांत सरकारचे माहाल व आणिखी आहेत. होळकरांचेही महाल आहेत. त्यांपैकीं सुलतानपूर, नंदुरबार इंग्रजांनीं घेतले, तेही सोडविले पाहिजेत. याजकरितां

*कुमार्गी, वाईट चालीनें जाणारे.

होळकर यांस खानदेशांत नेमावें. त्यांनीं आपले महाल सोडऊन इंग्रजाचें पारपत्य करावें. सरकारचाकरी करून आपले महालही राखावे. आम्हांस इकडील चाकरीविसीं आज्ञा आल्यास पातशाहा, नजफखान व राजेरजवाडे मेळऊन घेऊन इंग्रजांसीं गांठ घालितों. खावंदांचे प्रतापेंकरून चाकरी घडोन येईल ती खरी. अमकेंच करूं असें म्हणावयाचें नाहीं. प्रारब्ध धन्याचें, कष्ट सेवकाचे. त्या प्रतापेंकरून होणार तें होईल. वर्तमान जलद पुण्यास लिहिणें. पंधरा रोजांत उत्तर आणवणें. लिहिल्या अन्वयेंच ध्यानास येऊन ठराव केला. समय तर नाजूक आला. जीवाभ्य श्रम प्राप्त वेगळे वेगळे जाले आहेत ते अंगीकारून देश कोंकणची मसलत कारभारी यांनीं आटोपली, तर फार उत्तम आहे. होळकरांसही पत्र पाठऊन खानदेशची मसलत त्यांजकडे लावावी. आम्हांस हिंदुस्थानांत जाण्याची परवानगी पाठवावी. म्हणजे पातशाहा, नजफखान व राजेरजवाडे आणिखीही उपयोगी अनुपयोगी राजकारणें असतील तीं साधून साहसास लागतों. हें मर्जीस नये, देशींच यावें असाच आग्रह असेल, तसेंच लिहितील तर लाचार! इकडील सर्व निराशा करून, आटोपून सडे खावंदाजवळ येऊं. सर्वांत आम्हीही आहों. परंतु शत्रू हा देश घेऊन नर्मदापार येतात. सुरत ममईकर इंग्रजांस बळ येऊन ते हे एकत्र होऊन दौलत घेतात. आम्ही सारे लाचार होऊं. कोणाच्यानें कांहीं होणार नाहीं असें खोलून लिहिणें. त्यावरून विनंती केली असे. विनंतिपत्राचे अर्थ व मसलतांचीं संधानें ध्यानांत येऊन, सलाह उत्तम लेहून, उत्तरें त्वरेनें रवाना करावयाविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. फार निकड जाली, अवधि राहिली नाहीं. आजपासोन पंधरावे रोजीं उत्तर येथें पावे ऐसी आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji in forceful language further explains the necessity of his encampment in Malwa and aks Sadashiv Dinkar to impress upon Nana how essential it was to check the British advance through Malwa to the south.*

No. 110 14th August 1780.

दर जबाब भेट.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र.)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री विसाजीपंत चंद्र १२ साबानीं आले, भेट जाली. तुम्हांकडील सविस्तर वर्तमान कळोन संतोष जाला. सारांश, राजश्री पाटिल-

बावांचा सर्वांविसीं भरंवसा. त्यांसी दुसरा अर्थ, विलक्षण कल्पना उत्पन्न व्हाव्या असें जाणत नाहीं. त्यास ईश्वर किंवा परस्परें चित्त साक्ष आहे. सामान्याच्या मिथ्या क्षुद्र गोष्टीचे संघष्टणाचे तैशानें* मात्र पाटिलबावांचे बोलण्यांत अशी तऱ्हा नसावी या अर्थें भाव येत गेले. परंतु दुरंदेशी यास्तव करण्यांत जी ऐक्य-भावना† आहे त्यांत अंतर पडलेंच नाहीं. त्याचा अनुभव निरंतर आहे. तेव्हां परिहार परस्परेंही करावा लागत नाहीं. यंदा पाटिलबावांनीं श्रम फार केले. मसलत शेवटास जावी याविषयीं कस्तींत कमी जालें नाहीं. करणेंही दुरंदेशी युक्तीचें. निरंतर शत्रूशीं सन्मुखता, सर्वांविसींचे अडचणींत पाटिलबावा होते. म्हणूनच सर्वांचा आब ताब राहून इंग्रज जरबेस येऊन, माघारा हटून गेल्यावर, मनसब्याचे जातीनें माळव्यांत यावयाची सल्ला ठरली. तें वृत्त व मसलतीचा सिलसिला सोडला नाहीं. गोंविंदराव गायकवाड यांस ठेविलें. बाजतबर्सात मसलतीचा नेट चांगला आहे अशी सलाबत शत्रूसही राहिली. प्रसंगीं युक्तीस चांगलें तें केलें. पुढें कर्तव्य व प्राप्त त्याचा मजकूर आलाहिदा लिहिला आहे. व यापूर्वीही लिहिला आहे. त्याप्रमाणें अमलांत येणें, तो लवकर यावा. उत्तरें सत्वर यावीं. सारांश श्रीमंतांचे दौलतीचे कल्याणाविषयीं व येथील संपादिले ऐक्याचे कायमीविषयीं अर्थें प्राणेसी पाटिलबावांचा दुसरा प्रकार नाहीं. असें ऐकोन संतोष व नवाब व हैदरअलीखान यांस लिहून पाठवायाविषयीं भूषण वाटतें. सर्व विस्तार पत्रीं लिहिले गेलेच आहेत. म्हणोन पत्रीं आज्ञा सादर जाली. याचें उत्तर निराळे पत्रीं विनविलेंच आहे, त्यावरून विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. नवाब बंदगानअली यास थैली व हैदरखान यास थैली एकूण दोन थैल्या व राजश्री मुधोजी भोसले यांचे पत्राचा लाखोटा ऐसें पाठविलें आहे. तिहींच्या नकला पाठविल्या आहेत. राजश्री दिवाकरपंत यांसही पत्र तें खुलेंच पाठविलें आहे. अवलोकनांत येईल. तेथें लाखोटा होऊन नवाब व हैदरखान व भोसले यांजकडे रवानगी करावयाविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar acknowledges Nana's letter expressing his entire confidence in Mahadji and extolling his services to the State. The writer returns the letters intended for Haidar Ali, Nizam Ali and the Bhosla Raja of Nagpur, with a request to forward them.*

*तैश—त्वेष, आवेश. †महादजीची दूर दृष्टि अथवा स्तुति करणें यांत.

No. 111 19th August 1780.

पैवस्ती चंद्र २ रमजान इहिदे समानीन.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १८ साबान रविवार प्रहर रात्रीं मुक्काम उज्जैन स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—महादजी घुले व बाळोजी उगले प्यादे यांजबरोबर चंद्र २७ रजबचें पत्र सादर जालें, तें चंद्र ११ साबानीं पावलें. तेथें आज्ञा जे, इंग्रजांकडील कांहीं पलटणें सोनगडाकडे आलीं आहेत, मागूनही येणार आहेत. चंद्रराव पवार फत्तेपुरांत शिरला आहे. तो गुलजारखानास सामील करून खूळ करणार. राजश्री पाटीलबावा कोंडाईबारीकडे आले म्हणजे खुळें मोडतील. तर तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून इकडे येत तें करणें. राजश्री नारो शिवदेव यांची रवानगी केली; लौकरच पोंहचतील. मुंबईकडे इंग्रजांचा सरंजाम भारी होत आहे. सारांश, बावांचें येणें कोंडाईबारीकडे व्हावें. ऐशास आज्ञेप्रमाणें बावांस विनंती केली. पत्रही दाखविलें. उत्तर जालें जे, आम्ही कोंडाईबारीकडे जावें म्हणून आज्ञा येते. जावें. परंतु हिंदुस्थानांत गोहदकर जाट व इंग्रज एक होऊन शिपरी कोलारसपावेतों येऊन छावणी केली. तिकडून नजफखानाची फौज व जैपुरकरांची फौज मिळून येऊन, जयपूर प्रांतांतील रामपुरा व टोकतोडा होळकरांकडील घेऊन आपला अमल बसविला. होळकरांचा अमल उठविला. हें वर्तमान येतांच मुजरद जोडी पुण्यास रवाना केली. मागाहून वर्तमान आलें जे, गोहदकर जाट व इंग्रजांनीं दगा करून ग्वालेरचा किल्ला घेतला. किल्लेदार मारले. पडले. आंबूजी इंगळे कबिले घेऊन शाहाबादेस आले. याही वर्तमानाचीं पत्रें आम्हीं आपले मुजरद जोडीबरोबर साता रोजांचे वायद्यानें पुण्यास रवाना केलीं. राजश्री पुरुषोत्तम महादेव यांचें पत्र पातशाहा, नजफखान यांचे राजकारणाविसीं सरकारांत आलें, तेथून आम्हांकडे आलें तें व एक पत्र मशारनिल्हेचें व पातशाहा व नजफखानाचीं पत्रें आम्हांस आलीं. त्यास पुरुषोत्तमपंताचे पत्राची नक्कल व सरकारांतून मशारनिल्हेचें पत्र आलेलें तें बजिन्नस पुण्यास रवाना केलीं. त्याबरोबरील पत्रीं सविस्तर लेहून पाठविलें आहे जे, 'इकडे मसलत अशी उभी राहिली आहे, आम्ही पातशाहा नजफखानास सामील जाल्यास ते आम्ही इंग्रजांवर जातों. आम्ही देशास कोंडाईबारीस गेल्यास, पातशाह, नजफखान, इंग्रज, राजेरजवाडे एक होऊन माळवा घेऊन दक्षणेस येतात. इकडील तोंड मसलतीचें भारी आहे तें आटोपावें.

विचारास आल्यास एका सरदारास इकडे नेमावें. त्यानें पातशाह, नजफखानास मेळऊन घेऊन इंग्रजांवर मोहीम करावी. एका सरदारानीं गुजराथ आटोपावी, अगर कोंडाईबारीवर जाऊन सुरतेस शह द्यावा. कारभारी यांनीं मुंबईचें तोंड आटोपावें. ही सलाह उत्तम जाणून लेहून पाठविली. ती मर्जीस नच ये, तर आणि देशींच यावें असीच आज्ञा आली तर, तीही मान्य; येऊं. त्याचाही प्रकार लिहिलाच आहे. दिसले सुचले अर्थ लेहून अखत्यार कारभारीयांवरच ठेविला. लिहितील तसें करावें. हें दोन तीन जोड्यांबरोबर लेहून पाठविलें. आतांही तोच निश्चय आहे. हिताहित विचार करून उत्तर पाठवितील त्याप्रमाणें वर्तणूक करूं. याच म्हणतील तर पूर्वी लिहिल्याअन्वयें जाऊं. मग इकडे कांहीं हो. असें उत्तर जालें. उत्तराची प्रतीक्षा करितात. दोहींकडून अडचणी आहेत. तथापि स्वामींचें पत्र दोही मनसब्याचें मनन होऊन पक्केपणें सलाह लेहून येईल तसें करावें असा निश्चय बोलतात. तर दोही अर्थाचें मनन होऊन उत्तराची आज्ञा होऊन लौकर येथें येऊन पोंहचे तें करणार स्वामीं समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पुरुषोत्तम महादेव यांचें पत्र स्वामींनीं पाठविलें तें व बावांस त्यांचें पत्र आलें होतें त्याची नक्कल व शिवाजी विट्ठल व पवार यांजकडील कर्जपट्टीचे मजकुराचें पत्र व स्वामींचे पत्रांचीं उत्तरें ऐशीं छ १९ रजबीं नरहर मिरध्याचे जोडीबरोबर राजश्री विसाजीपंत बापूकडून पुण्यास नवा रोजांचे वायद्यानें पोहचावयाचा करार करून रवाना केले ते तेथें पावले नाहींत. गत काय जाली असेल श्री जाणे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writing to Nana reiterates Mahadji's plea for staying in Malwa to oppose the growing pressure of the English and awaits replies to his previous letters on the same subject.*

No. 112 20th August 1780.

पैवस्ती ४ रमजान शहिदे समानीन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र १९ साबान पावेतों स्वामींचे कृपावलोकनेकरून मुक्काम श्रीअवंतिका यथास्थित असे. विशेष:—स्वामींनीं पत्र दुसरे रजबचें पाठविलें तें पावोन फार संतोष जाहला. पेशजीं विनंतीपत्र सेवेसीं पाठविलें होतें

त्यांत देशीं येण्याची विनंती लिहिली होती. त्यावरून याच पत्रीं आज्ञा जाहली जे, घरीं येऊन फिरोन सत्वर जावें. त्यावरून येथें राजश्री बाळारावजीस पुसिलें कीं, मजला देशीं घरीं जावयाचें आहे; राजश्री पाटीलबावांस पुसोन आज्ञा देवावी. त्याजवरून त्यांनीं मसलत सांगितली जे, येथून पुण्यास पत्रें आजुरदार जोड्या दोन तीन देऊन रवाना यजमानांनीं केल्या आहेत, त्यांचीं उत्तरें आल्याशिवाय तुम्हीं देशीं जाणें ठीक दिसत नाहीं व राजश्री नारो शिवदेव यांची रवानगी श्रीमंत राजश्री नानांनीं केली आहे, तेही श्रावण अखेर येथें येऊन दाखल होतील. उपरांत मशारनिल्हेचें बोलणें व पत्रांचीं उत्तरें असे दोन्ही भाव समजल्यानंतर मग निरोप घेऊन जावें व राजश्री सदाशिवपंत यांनींही याप्रमाणेंच सांगितलें. राजश्री पाटीलबावा यांजपासीं सहजामध्यें गोष्ट काढली. त्यांनीं उत्तर केलें कीं, आमचा सिद्धांत देशीं जाण्याचा किंवा हिंदुस्थानांत याची मसलत पुण्यास पत्रें पाठविलीं आहेत, यांचीं उत्तरें आल्यानंतर मग निरोप देऊं. स्वामींनीं पत्रीं आज्ञा केली जे, उभयतां सरदार छावणीस उज्जनीस आले, याजमुळें सर्वत्र लौकिक मसलत टाकून गेले असा जाहला. त्यास येविसीं वाघोड्याचे मुक्कामीं राजश्री सदाशिवपंत यांनीं बहुत प्रयत्न केला जे, आपण ज्या पक्षीं गुजराथ प्रांतीं छावणी करीत नाहीं, तेव्हां कोंडाईबारीवर छावणी करावी; म्हणजे सारी मसलत दाबाखालीं राहील. हीं बोलणीं माझ्या समक्ष दहा पांच वेळ जाहलीं, परंतु ती गोष्ट खातरेस न आली. निदान बऱ्हाणपुरीं छावणी होती तरी भ्रम राहता. येविषयीं बहुत मेहनत केली, परंतु ईश्वरी इच्छेपुढें उपाय नाहीं. येथें येऊन दोन मास जाहले, अद्याप मसलतीची किंवा राजकारणांची तर्तूद किमपि नाहीं. जेव्हां विनंती करावी त्या वेळेस उत्तर होतें कीं, आम्हांस जी चाकरी सांगाल ती करूं; मसलत मनसबा आम्हांस कांहीं कळत नाहीं. तूर्त ऐशआरामीवर नजर आहे. सायंकाळ जाहला म्हणजे भोजन करावें आणि माडीवर जनानखान्यामध्यें जावें. प्रातःकालीं चार घटका दिवस उठावयास येतो. उपरांत देवपूजा व पुराण, गंध लावणें याजखालीं दोन प्रहर होतात. उपरांत भोजन करून निद्रा करावी. सायंकाळच्या चार घटका दिवसास उठावें. उपरांत दरबार होतो. त्याजमध्यें कांहीं विनोद, थोडा बहुत कारभार व खलबत होत असतें. याजप्रमाणें येथील वर्तणूक आहे. मग पुढें भगवंत काय करील तें पहावें. एव्हढे मातबर सरदार, यांस यश अपेश याचा जरी मान नाहीं, तेव्हां पुढें यांचे हातून मोठीं कामें होणें कळतच आहे. आजपर्यंत मी स्वामींस विनंती इतकी

निक्षून लिहिली नव्हती, परंतु येथील प्रकार एक रीतीचा दिसतो, याजकरितां लिहिणें प्राप्त जाहलें. थोरपणाची रीत हीच असते जे, जो अभिमान धरावा तो शेवटास न्यावा. ती तर गोष्ट मनांत आणूं नये. दुसऱ्याचें व्यंग त्याचें मात्र वर्णन करावें. आपल्या गुणदोषांचे लोप करावे. हें आज आठ महिने पाहतों. याविषयीं मी एक दोन वेळ विनंती केली कीं, ही गोष्ट आपणास उचित नाहीं. तेव्हां आमचें समाधान केलें जे, आमची प्रकृत बोलावें इतकीच मात्र आहे. परंतु स्वामिसेवेसीं अंतर होणार नाहीं. यानंतर इकडील वर्तमान दरबारीं पेशजीं राजश्री सदाशिव दिनकर यांनीं व राजश्री पाटीलबावांनींही स्वामींस लिहिलें आहे, त्याजवरून श्रवण होईल. आजपर्यंत हिंदुस्थानांत इंग्रजांस बसावयास स्थल नव्हतें. हल्लीं ग्वालेरचा किल्ला इंग्रजांनीं दगा करून श्रावण शुद्ध चतुर्थीस घेतला. याजमुळें त्यांस या प्रांतीं यावयास मजबुदी जाहली. तर यांत भगवंत इच्छा कांहींच समजत नाहीं. सुलतानपूर नंदुरबार येथें केसोपंत दातार यांजबरोबर दोन पलटणें देऊन सुरतेहून रवाना केला. त्यानें सोनगड व व्यारें हीं ठाणीं इंग्रजांची बसवून पुढें खानदेशांत आला. कोकरमुंढ्यास मोर्चे बसविले आहेत म्हणोन बातमी आहे. त्यांनीं दोन टोळ्या केल्या आहेत. एक टोळीनें थालनेर बाापुराकडे यावें, व एक टोळी चांदवडाकडे जावी, याप्रमाणें विचार आहे. हें वर्तमान स्वामींस लिहिलें कमाविसदाराचें गेलेंच असेल. आपली फौज खानदेशांत गणेशपंत बेहरे व राजश्री विसाजी आपाजी यांसमागमें जी फौज होती, ती आतां खानदेशांतच आहेत म्हणोन ऐकिलें. त्यास त्यांजला आज्ञा जाहली तरी उत्तम आहे, म्हणजे मेहनत करून पारपत्य शत्रूचें करतील. पत्र अवलोकन एकांतीं करून फाडून टाकावें. दुसऱ्याचे दृष्टीस पडल्यास षट्कर्णीं होईल. यास्तव सूचनार्थ लिहिलें आहे. हें लिहिणें मजला युक्त नव्हे, परंतु एक धन्याचे कार्यावर जें दृष्टीस पडेल तें यथाज्ञानें सुचवीत जावें, हा सेवाधर्म आहे. पत्राचें उत्तर लिहावयास आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram writing from Mahadji's camp draws a rather dismal picture of Mahadji's love of ease and pleasure in the midst of a serious campaign with no clear intention of immediately meeting the danger ahead.*

No. 113 22nd August 1780.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २१ साबानपावेतों मुक्काम श्रीअवंतिका येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून पत्र येऊन बहुत दिवस वर्तमान नव्हतें. त्यास हल्लीं राजश्री पाटीलबावा यांस व राजश्री सदाशिवपंत दाजी यांस मुजरद प्याद्यासमागमें पत्रें आलीं, त्यांजवरून सविस्तर लेखनार्थ कळला. यानंतर इकडील वर्तमान सविस्तर आलाहिदा पत्र पेशजीं कासीदजोडीसमागमें सेवेसीं पाठविलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. प्याद्याबराबरील पत्राचें उत्तर वकिलांनीं लिहिलें आहे, त्याजवरून अवगत होईल. हल्लीं स्वामींकडील दुसरी जोडी कासदांची पत्रें घेऊन आली. त्यांचींही उत्तरें राजश्री बावांस पुसोन मशारनिल्हे लिहितील. स्वामींकडील सदैव पत्रें येतात त्यांजसमागमें सेवकासही पत्र ल्याहावयास आज्ञापिलें पाहिजे. वरकड होईल वृत्त तें मागाहून तपसीलवार लेहून पाठवीन. इकडील बारीक मोठें वृत्त कार्याकारण प्याद्याजवळ सांगितलें आहे, तें एकांतीं श्रुत करतील. बहुत काय लिहिणें कृपा सेवकावर केली पाहिजे हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram acknowledges the several letters from Nana and intimates in reply some oral messages sent by the writer about the state of things at Mahadji's camp.*

No. 114 27th August 1780.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी:—

दंडवत विनंती. उपरी आपण दोन चिट्ठ्या पाठविल्या, त्या पावल्या. खानदेशचे कमाविसदाराचें पत्र व सोनगडाकडील डांकेचें पत्र पाहावयास पाठविलीं, तीं पाहून वर्तमान सविस्तर कळलें. कोंडाईबारीकडे फौज जावी. तिकडे फौज गेल्याशिवाय तिकडील उपद्रव चुकत नाहीं. याजकरितां फौज लवकर रवाना करावी. गुलजारखानाचे पारपत्यास फौज गेली आहे, ती कोणाची किती हें पाहावयास एक कारकून प्रामाणिक व दोन खिजमतगार पाठवावे म्हणजे कळेल, म्हणोन लिहिलें. त्यास, चिरंजीव राजश्री भगीरथराव शिंदे व होळकरा-

कडील राजश्री पाराजीपंत व सरकारचीं पथकें गेलीं, तीं एकत्र होऊन गुलजारखानाचे पारपत्यास गेले आहेत. आसेरीपासीं फौज आहे त्यास पत्रें चिरंजीव राजश्री भगीरथराव यांजपासीं जावयास पत्रें गेलीं आहेत, ती फौज चिरंजिवापासीं सामील होईल. होळकराकडील व सरकारची फौज गुलजारखानाचे पारपत्यास लासुरानजीक राहतील. चिरंजीव भगीरथराव आसेरचे फौज सुद्धां कोंडाईबारीकडे जातील. येविसीं चिरंजिवांस लेहून पाठवितों. कारकून इतबारी, खिजमतगार फौजेंत पाठवावयाविसीं लिहिलें, त्यास आसेरीपासीं फौज आहे म्हणून भगीरथराव शिंदे आपले पथकानिशींच पाठविले. हल्लीं आसेरीची फौज त्यांत जाऊन मिळेल. मग कोणाची फौज किती हें आपणच कोणी पाठवून मनास आणावें. होळकराचे व सरकारचे फौजेपेक्षां अधिक किंवा कमी तें समजेल. रा छ २६ साबान बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In reply to Nana's inquiry, Mahadji informs that the detachment at Ashirgad had been ordered to join Bhagirathrao Sinde and jointly to proceed against Guljar Khan Pathan.*

No. 115 22nd September 1780.

श्री

पुा राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

विनंती उपरी. कोंडाईबारीकडे राजश्री गणेशपंत बेहरे व भापकर आहेत. परंतु त्यांजपासीं जमियत थोडकी. त्यास आणखी च्यार पांच हजारपावेतों सरकारची फौज त्यांजपासीं पाठवावी व होळकरास बारीवरी पाठवावें. यांणीं त्यांणीं मिळोन सोनगडापाशीं जावें. म्हणजे सुरतेस पायबंद बसेल. दाहुदेकडून पलटणें लुटून (निघून ?) माळव्यांतून इकडे येणार, तीं येऊं पावणार नाहींत. कदाचित् त्या मार्गें निघालीं तरी पायागड तिकडे आहे. तेथील सावधानीविशीं किल्लेदारास लेहून पाठविलें आहे. परंतु आम्ही इकडे लांब आहों. उपराळा होणार नाहीं. त्यास गणेशपंत बेहरे वगैरे सरकारचे सरदार असतील, त्यांणीं किल्ल्याकडील संधान राखून तसाच प्रसंग पडल्यास उपराळा करावा. म्हणून आपलीं पत्रें जावीं. माळव्यांत गड किल्ला नाहीं. मैदान रान. जमियतीही नाहीं. आमचें लक्ष पुढील मसलतांवरी. याकरितां लिहिल्याप्रमाणें फौज मातबर आधीं पाठवून तिकडील बंदोबस्त जरूर राखावा. येविशीं राजश्री पांडुरंग रघुनाथ ना

राजश्री नारो शिवदेव यांसही सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. रवाना चंद्र २२ रमजान. हे विनंती.

¶*Mahadji advises Nana Fadnis to reinforce Behere and Bhapkar at Kondai Bari with more troops, and asks Holkar to take up his post at Kondai Bari so as to prevent the enemy from descending into Malwa and attacking him in the rear.*

No. 116 3rd October 1780.

श्री

पुा राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री गोविंदराव गायकवाड यांची रवानगी गुजराथप्रांतीं केली. त्यास, त्यांचें जाणें लवकर व्हावें म्हणून लिहिलें. त्यास, गोविंदराव गायकवाड यांसमागमें देशची फौज चार हजार व तिकडील दोन हजार, सिवाय आरब, शिंदी वगैरे दोन हजार, याप्रमाणें जमाव होऊन महीकांठीं गेले. पाणी महीस फार आहे, यामुळें पलीकडे जाणें जालें नाहीं. उतार जाला म्हणजें महीपार जाऊन तिकडे ताण बसवितों, म्हणून त्यांचीं पत्रें आलीं. येथूनही वरचेवरी पुढें जाण्याचीं जातच आहेत. मशारनिल्हेनीं देशींहून चार पांच हजार फौज आणविली आहे. पांढरे वगैरे त्यांचे वळणाचे लोक त्यांजकडे यावयास सिद्ध आहेत. दसरा जाल्यावरी त्यांकडील लोक देशींहून येतील. त्यांस बऱ्हाणपुरावरून जाणें म्हणून ताकीद असावी. या मार्गें लावून द्यावें. रवाना चंद्र ४ शवाल. हे विनंती.

¶*At the suggestion of Nana, Mahadji reinforced Govindrao Gaikwad and sent him into Gujrat from Malwa with a party of troops collected from various quarters. He was waiting for a ford on the Mahi to cross into Gujrat, writes Mahadji to Nana.*

No. 117 3rd October 1780.

पोा चंद्र १३ शवाल.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण राजश्री नारो शिवदेव यांस पत्रें पाठविलीं, त्यांवरून सविस्तर मजकूर कळला. ऐसियास दसऱ्याचे मुहूर्तें हिंदुस्तानांत

फौजेची रवानगी करतों. फौज दरमजल पुढें जाईल. मागाहून स्वारीही बाहेर निघेल. पातशाहा व नजफखान व राजेरजवाडे यांस पत्रें पाठविलीं कीं, फौजा पुढें रवाना जाल्या. मागाहून आह्मीं येतों. इंग्रजांचें पारपत्य करणें जरूर आहे. तरी तुह्मीं आपलाले जमावा सुद्धां येऊन सामील होणें. पातशाहा व नजफखान यांचेही चित्तांत इंग्रजांचें पारपत्य करणें, परंतु त्यांच्यानें सतंतर होत नाहीं. सरदार येतील न येतील हा आंदेशा त्यांस, याकरितां येथून आह्मी येतों, तुम्हीं इंग्रजांशीं बिघाड करावा, कोणेविशीं आंदेशा न घ्यावा, ह्मणून खातरजमेचीं पत्रें वचनप्रमाण सुद्धां पाठविलीं. आह्मीं इकडील मसलतीस प्रारंभ केला. होळकरांस खानदेश व गुजराथची मसलत करावी असें सांगोन पाठविलें. तेही करतील. आपण फौज जमा करून मुंबईकर इंग्रजांस ताण बसवावा. हैदरखान यांणीं चेनापट्टणाकडे जाऊन इंग्रजांस ताण बसविला आहे. तथापि आपलीं पत्रें वरचेवरी जात जावीं व नबाब भोसले यांणींही आपलाले मसलतीवरी जाऊन इंग्रजांवरी जरब बसवावी. येविशींचीं आपलीं पत्रें निकडीचीं नबाब व भोसले यांसी जात जावीं. वरकड राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रा छ ४ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana Fadnis that his preparations for renewing the operations were fairly completed; and asks him to urge Bhonsle and Holkar to exert themselves wholeheartedly.*

No. 118 3rd October 1780.

पैवस्ती चंद्र १४ शवाल. श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री नारो शिवदेव आले. आपल्याकडील निखालसतेचा तपशील विस्तारयुक्त बोलले, तो समजला. याउपरी इकडील कल्पनेचा अर्थ राहिला नाहीं. आपणही संकल्प विकल्प चित्तांत किमपि आणूं नये. रवाना चंद्र ४ शवाल. इकडे संकल्प करूं दिला नाहीं. तुम्हांकडूनही नसावा. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji assures Haripant Phadke of having his doubts and suspicions cleared by Naro Shankar and requests him to evince the same cordiality towards him as before.*

No. 119 3rd October 1780.

[ो छ १४ शवाल. श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण राजश्री नारो शिवदेव यांसी छ १९ रमजानचीं पत्रें पाठविलीं, तीं मशारनिल्हेनीं दाखविलीं, त्यांवरून सविस्तर कळलें. तिकडून खानदेशांत यावें, आह्मीं इकडून यावें, तेथें भेटी होऊन निश्चय ठरेल त्याप्रमाणें करावें. त्यास मुहूर्ताचा निश्चय ठरेल त्याप्रमाणें लौकर लेहून पाठवावें. आह्मी येतों. उभयतां सरदार इकडे आल्यानें पातशाहा व नजफखान यांस वाटेल कीं आह्मांकडे कोणी सरदार येत नाहीं असें समजून, इंग्रजांशीं सलुखाचें संधान लाविताल. याजकरतां पाटीलबावांचीं पत्रें पातशाहास व नजफखानास जावीं कीं तुह्मीं इंग्रजांशीं बिघाड करावा आणि त्यांचे तंबीची पैरवी व्हावी. आह्मी उभयतां सरदारांतून एकजण तिकडे येतों. याप्रमाणें पत्रें लौकर जावीं. राा पुरुषोत्तम महादेव यांजकडे पत्रें पाठवून, पातशाहा व नजफखान यांचीं आणशफतपूर्वक पत्रें मसलतीविशीं घ्यावीं व त्यांकडेही खातरजमेचीं पत्रें पाठवावीं. आतां दिवस राहिले नाहींत ह्मणोन लिहिलें. त्यास दसऱ्याच्या मुहूर्तें फौजेची रवानगी हिंदुस्तानांत करितों. पातशाहा व नजफखान यांस पत्रें खातरजमेचीं पाठविलीं कीं, फौज रवाना केली; मागाहून स्वारीही लौकरच येऊन पोंहचेल. इंग्रजांचें पारपत्य करणें जरूर. तरी तुह्मीं तयारी करून इंग्रजांचें पारपत्यास नमूद होणें ह्मणोन. व फौजेची रवानगी जाली हें ऐकून त्यांची खातरजमा होईल. आपली आमची भेट होऊन परस्परें बोलणें व्हावें आणि आपलाले मसलतीवरी जावें. त्यास आपण फौजेचा जथ तळेगांवावरी पाडावा. आपण मुहूर्तेंकरून बाहेर निघोन खडकीपाशीं राहावें ह्मणजे तळेगांवावरी जथ लौकर पडेल. फौजेचा जथ पडला ह्मणजे आपला कोणता मुहूर्त निघावयाचा तो निश्चयेंकरून लेहून पाठवावें. ह्मणजे आह्मी येथून निघोन लांब लांब मजली करीत येतों. इकडील येण्याचा गुंता नाहीं. देशीं जातों ही गोष्ट इकडे प्रगटांत आल्यास, हिंदुस्तानी लोकांस, सरदार माळव्यांत आहेत, इकडे येतील, हा भरंवसा आहे तो जाऊन, इंग्रजांशीं संधान लावतील. यास्तव फौज रवाना दसऱ्यास करोन आह्मी मागाहून येतों, असीं सर्वांस पत्रें गेलीं आहेत, त्यास विरुद्ध पडेल. याकरितां देशीं येण्याची गोष्ट येथें तेथें गुप्त असावी. फौजेनें दरमजल हिंदुस्थानांत जावें. मागाहून सरदार येतात हा दबाव राहील. आपलें पत्र अमके

मुहूर्तानें निघोन येतों असें आलें ह्मणजे निघोन येऊं. आपणाकडे यावयास बाहेर स्वारी निघेल ते दिवशीं, हिंदुस्तानांत सर्वांस पत्रें, राजश्री नाना खानदेशांत आले, त्यांच्या भेटीकरितां जरूर जाणें ह्मणून गेलों; त्यांची आमची भेट होतांच दक्षणचे बंदोबस्ताचा विचार त्यांशीं बोलून जलद माघारे येतों याप्रमाणें पाठवावीं लागतील. आपणही निघे तोंपावेतों येण्याचा विचार प्रगटांत न आणावा. तळेगांवावरी फौजेचा जथ पाडून मुंबईचे मसलतीवरी जाणें हेच आवाई घालावी. फौजेचा जथ पडला ह्मणजे फौज सारी तळेगांवावरी ठेवून आपण सडे यावें. निघते समयीं सांगावें कीं, उभयतां सरदारांस घेऊन येतों. सरदार व आपण सारे मिळोन, मुंबई व सुरतकराचें पारपत्य करणें आहे. याप्रमाणें येतांना सांगोन यावें. डाकेबरोबर आपले मुहूर्ताचा निश्चय लेहून आला ह्मणजे आह्मी येतों. आह्मीं मुहूर्तानेंच निघावें, तरी हिंदुस्तानांत फौज रवाना केल्यावांचून इकडील राजकारणें बळावत नाहींत. याकरितां फौजेची रवानगी करून हिंदुस्तानाचे मसलतीस आरंभ केला. आपणासही तिकडे तसाच बंदोबस्त केला पाहिजे. त्याची बळकटी पुर्ती खातरजमेची तेथील करून, अमके मुहूर्ताची चिठी आपली येतांच, आह्मी बाहेर निघोन येतों. आपली आमची गांठ पडतांच बोलणें होऊन जिकडील तिकडे आपआपले कामास जावें, हा डौल घडला पाहिजे. आपलें तेथून निघणें व आमचें येथून निघणें होईल, तेव्हांच घरच्यांस देखील कळावें. पत्राचें उत्तर लौकर यावें. येविशीं राजश्री नारो शिवदेव यांसी बोललों आहों. लिहितील त्यावरून कळेल. रा छ ४ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji accepts Nana's suggestions to meet him in Khandesh but asks him to keep the whole subject a close secret. He offers to complete his plans in the north and then start for a few days personal talk with the ministers somewhere about mid-way.*

No. 120 13th October 1780.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत छ १४ शवालपावेतों मुक्काम श्रीअवंतिका येथें स्वामींचे कृपेंकरून

सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून तेरावे रमजानचें पत्र आलें तें पाहून बहुत संतोष जाहला. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून सेवकाचा परामर्ष करीत असलें पाहिजे. यानंतर चिंतो विठ्ठल किल्ले मंदोसर येथें अटकेस होते, त्यांची रवानगी पुण्यास करावयाविसीं मंदोसराहून आश्विन शुद्ध द्वितीयेस उज्जनीस आणिलें. तों मशारनिल्हेनीं पुण्यास न पाठवावें या अर्थें पांच सात उपोषणें केलीं. तदनंतर बहुतच निकर्ष रवानगीविसीं केला. तों तेच रात्रीं आश्विन शुद्ध त्रयोदशीस भोमवारीं रात्रौ दुसरे पाहाऱ्याचे चवकीचे बारगीर पीरखान याजकडील पागेचे होते त्यांस फितवून, त्यांचे सूत्रें शहरचा आब्दलपुरा ह्मणोन आहे त्या पुरियांत जतीयाचे घरीं पळोन गेले. तों शोधास पागा वगैरे स्वार आसमंतात् तीस तीस कोसांवर जाऊन आले, परंतु कोठें ठिकाण न लागे. तों तिसरे दिवशीं, बाबूराव ह्मणोन चिंतोपंतांचे मेहुणे आहेत ते संध्याकाळच्या प्रहर दिवसास सांपडले. त्यांची चवकसी करितांच दिनास्तीं चिंतोपंतच जती याचे घरीं सांपडले. तेथून धरून आणोन पायांत बेडी घातली आणि चवकसीनें ठेविलें. पळोन गेल्याचे दुसरे दिवशीं चिंतोपंत यांचे स्त्रीनें व कन्येनें विष-प्रयोग करून निधन पावलीं. याप्रमाणें वृत्त जाहलें. वरकड वृत्त राजश्री नारो शिवदेव यांणीं सेवेसीं लिहिलें आहे त्याजवरून निवेदन होईल. दसऱ्याचे मुहूर्त-करून हिंदुस्थानचे फौजेचे रवानगीचे डेरे बाहेर जाहले आहेत. अद्याप सरदार कोणी डेऱ्यादाखल जाला नाहीं व फौजेचीही तर्तूद होत आहे. आंतून विचार आंबाजी इंगळे यांची रवानगी हिंदुस्थानांत करावी ह्मणोन आहे. परंतु निश्चयांत येऊन घडेल तें खरें. इंगळे मजकूर यांणीं ग्वालेरचा किल्ला टाकून आले असें असतां, मागतीं रवानगी हिंदुस्थानांत त्यांचीच व्हावी असें आहे. उपरांत होईल वृत्त तें मागाहून लेहून पाठवीन. बहुत काय लिहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana an attempt made by Chinto Vithal to escape from custody at Ujjain. He was traced and kept under close watch in heavy shackles. His wife and daughter put an end to their lives by poison.*

No. 121 9th November 1780.

पो छ १९ जिलकाद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ २७ शवालचें पत्र पाठविलें तें पावलें. वसईकडे व कल्याण प्रांतांत इंग्रजांचीं पलटणें व सरंजाम आल्यावरून येथून

त्यांवर राजश्री चिमापा पानसी व भवानी शिवराम व रास्त्यांकडील फौज व मुसा नारंन* तोफा गाडदी देऊन रवानगी केल्याचा मजकूर व करवीरकरांकडील सटवाजी भोसले आल्याचा मजकूर विस्तारें राजश्री नारो शिवदेव यांस लिहिला आहे, त्यावरून कळेल. आह्मी आश्विन वद्य सप्तमीस निघोन गारपिरानजीक राहिलों. दुसरे दिवशीं कूच करून खडकीवर येऊन मुक्काम केला. फौजेसही बलावणीं गेलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं येऊं लागली. बाकीचीही लौकरच जमा होईल. आपणही दसऱ्याचे मुहूर्तें डेरे बाहेर दिल्हे ह्मणून वर्तमान कळलें. उत्तम केलें. आतां मसलतीस दिवस राहिले नाहींत. याकरितां आपण खुद्द बाहेर निघोन, फौजा लौकर जमा होत तें करावें. येथील अडचणीचे प्रकार सविस्तर नारोपंतांनीं सांगितलेच असतील, व आपलेही ध्यानांत आहेत. तथापि, श्रीमंतांचे दैवेंकरून होईल तेथवरी करीतच आहों ह्मणोन लिहिलें. त्यावरून व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रावरून सविस्तर कळलें. ऐसियास, वसईकडे कल्याण प्रांतांत इंग्रजांचीं पलटणें आलीं, त्यांजवरी फौज व तोफा गाडदी रवाना केले, उत्तम केलें. करवीरकरांकडून सटवाजी भोसला निघोन आला, हेही गोष्ट बरीच जाली. करवीरकरांकडील तहाचा जाबसाल लागला आहे. तूर्तचे प्रसंगीं जाहल्यास करावें ह्मणजे राजश्री परशरामपंत भाऊ फौज सुद्धां मोकळे जाहाले. आपण खडकीवरी मुक्काम केला, उत्तम केलें. फौज जे जमा होत जाईल, त्याचा जथ तळेगांवावरी पाडावा. वसई व कल्याण प्रांतांत फौजा व गाडदी रवाना केले, त्यांची कुमक वरचेवरी जसी बातमी येत जाईल तसी करीत जावी. कार्तिक वद्य द्वितीयेचा मुहूर्त आमचा बाहेर निघावयाचा आहे. द्वितीयेस बाहेर निघतों. ग्वालेरीकडे फौज रवाना केली व जैपुरच्या सुमारेंही फौज तीन हजार रवाना केली. ग्वालेरीचे इंग्रजांस आणखी चार पलटणें येऊन सामील जालीं. इंग्रज व गोहदवाला मिळोन नरवरानजीक आल्याचें वर्तमान आलें आहे. फौजा पुढें पाठविल्या, परंतु त्यांचा पुस्तपन्हा जाला पाहिजे. याकरितां आपली आमची भेट होऊन माघारें लौकर येणें जाल्यास इकडील मसलतीस उपयोगी. हैदरखानानीं चेनापट्टणाकडे जाऊन इंग्रजांचें पारपत्य चांगलें केलें. आपली आमची भेट होतांच बोलणें होऊन, आपण देशची मसलत आटोपल्यास आह्मी हिंदुस्तानांत जाऊन, इंग्रज ग्वालेरीहून पुढें आले त्यांचें पारपत्य करून बंदोबस्त करूं, होळकर इंदुराहून निघाले. मातुश्री अहिल्याबाईची व त्यांची समजूत पडली नाहीं.

*Noronha was a Portuguese gunner in Nana's employ.

महेश्वरास जातात, किंवा खानदेशांत सरकारचाकरीवरी जातात, कीं काय मनसबा करितात, तें पाहावें. प्रतिपदेस आह्मी बाहेर निघाल्यावरी, होळकरांचा प्रकार समजेल त्यासारखें दरकूच यावयाचें ठरेल. त्याप्रमाणें मागाहून लेहून पाठवूं. मग आपण खडकीहून कूच करून यावयाचें करावें. येविशीं राजश्री नारो शिवदेव लिहितील, त्यावरून कळेल. रा छ ११ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji accords his approval to the plans formed by the Poona ministry to oppose the British expedition from Bombay in the vicinity of Kalyan and agrees to meet Nana in Khandesh as intimated.*

No. 122 17th November 1780.

पैवस्ती छ २ जिल्हेज सुरुसन इहिदे समानीन, मार्गशीर्ष.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १९ जिल्काद पावेतों मुक्काम श्रीअवंतिका येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—स्वामींचें पत्र स्वदस्तूर राजश्री पाटीलबावांस आलें. त्यांतील अर्थ, सत्वर देशीं यावें येविसीं लिहिलें, त्याजवरून राजश्री बावांनीं कार्तिक वद्य द्वितीयेस भोमवारीं डेरेदाखल व्हावें याप्रमाणें निश्चय ठरवून, स्वारीचा सरंजाम तयार करून प्रातःकाळीं निघावें, तों अगोदर इंदुवारीं दोन प्रहरीं घरांतून निघण्याविसींची प्रतिकूलता जाहली. तेव्हां त्या मुहूर्तावर प्रस्थान करावयाचें राहिलें. पुढें फिरोन वद्य दशमी भोमवारीं डरेदाखल होणार, याप्रमाणें निश्चय ठरला आहे. कळावें. यानंतर ग्वालेरीहून सहा पलटणें बराबर शंभर गोरा व बारा तोफा व दहा हत्ती व शंभर उंट याप्रमाणें सरंजाम वगैरे लढाईचें जंगी सामान बराबर घेऊन, इंग्रज भूपाळच्या रस्त्यानें जावें या तरतुदीनें निघोन दरमजल येत आहेत, याप्रमाणें येथें बातम्या कमाविसदाराच्या लिहिल्या आल्या व मुजरद इंग्रजांनीं राजश्री पाटीलबावांचे नांवचें पत्र पाठविलें. त्यांत लिहिलें कीं, तुमचा आमचा स्नेह असावा; आम्हांस वाटेनें रहदारीचा बंदोबस्त करावा; आणि आमच्या सरंजामास कमाविसदारानीं

रसद पोंहचवावी; दरम्यान खलेल करूं नये म्हणोन ताकीद असावी. हें न जाह-ल्यास मुलखास उपद्रव लागेल. याजप्रमाणें पत्रच आलें. त्याजवरून तूर्त देशीं जाऊं नये, हीं पलटणें आलीं आहेत यांचें पारपत्य करावें, आणि मग देशीं यावें याप्रमाणें तऱ्हे दृष्टीस पडते. अद्यापि ठराव होऊन आपणास ल्याहावें असें उत्तर कांहीं मुख्यांनीं सांगितलें नाहीं, परंतु रंग दृष्टीस पडला त्याजवरून लिहिलें असे. कोंकणप्रांतीं वसईस इंग्रजांनीं खुषकीनें व जलमार्गें दोनी मारगिऱ्या साधून निकड केली आहे म्हणोन स्वामींचीं पत्रें आलीं. त्याजवरून चित्तास खेद जाहला, तो पत्रीं कोठवर ल्याहावा? आणि आमच्या चित्तास खेद वाटून फलही काय? ज्यांच्या चित्तास गोष्ट लागून तरतूद होऊन कोणतीही मसलत करावी, ती तर गोष्ट घडेल तेव्हां खरी. मुख्य गोष्ट, श्रीमंत राजश्री रावसाहेब यांच्या दैवेंकरून काय घडेल तें खरें. आम्हांपासीं चार वेळ करार केले कीं, राजश्री नानांचा इकडील येण्याचा निश्चय ठरला म्हणजे आम्ही सत्वर निघोन खानदेशांत जातों. इकडील हिंदुस्थानच्या फौजांचा सरंजाम तयार करुन रवानगी करून सत्वर देशीं येतों. याप्रमाणें निश्चयाचे जाबसाल जाले असतां, अद्यापि हिंदुस्थानचे फौजांची रवानगी जाली नाहीं. पांच हजार फौज अंबाजी इंगळे याजबरोबर नेमली आहे. परंतु अद्यापि लोकांचे पदरीं पैका पडून जाणें होत नाहीं. याप्रमाणें सदाशिव मल्हार यांचाही रवानगीचा प्रकार असाच आहे. रवानगी होऊन चार मजला कूच करून गेले म्हणजे मागाहून सेवेसीं लेहून पाठवीन. राजश्री तुकोजी होळकर यांणीं फौजची तयारी करून, चित्तांत मसलत करून महेश्वरास अहिल्या-बाईकडेस जावें; बनल्यास स्नेह करावा; ज्यापक्षीं सोईस न ये त्यापक्षीं बाईस मठीं बसवावें ही तरतूद आज दोन महिने होत आहे. परंतु बाईचा नेट भारी, यांचा उपाय नाहीं, असें पाहून फौज धरून कार्तिक शुद्ध प्रतिपदेचे मुहूर्तेंकरून डेरेदाखल जाहले. एक मजल कूच करूनही गेले. तत्रापि बाईकडील संधान नम्रतेचें कांहींच येईना. तेव्हां सुलतानजी लांमहाते यांजला पुढें बाईकडेस महेश्वरास शिष्टाईस पाठविले आहेत. मागाहून आपण खासा फौज सुद्धां मर्दान्याचे घाटानें रेवा उतरावी आणि जाते समयीं महेश्वरास सडे जावें, बाईची भेट घ्यावी, मर्जी पाहून वर्तणूक करावी, नाहीं तर कूच करून फौज सुद्धां कोंडाईबारीकडे जावें, असा ठराव जाल्याचें वर्तमान राजश्री पाटीलबावांनीं मजपासीं सांगितलें त्याजवरून लिहिलें आहे. गणेश विश्वनाथ बेहरे यांणीं, नंदुरबारेस पलटणें दोन आलीं होतीं त्यांचें पारपत्य करून, पिच्छा राखून बारीकडे जात आहेत. मशार.

निल्हेचा दाब पलटणांवर बसोन मोड होऊन माघारे गेले. कळावें श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writing to Nana from Ujjain expresses his disappointment at the dilatory tactics of Mahadji, who was proceeding to the Deccan, trying to meet Ahalyabai Holkar on the way.*

No. 123 25th November 1780.

पो छ ६ जिल्हेज इहिदे समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. पांच सात पत्रें राजश्री नारो शिवदेव यांजकडे डाकेबरोबर पाठविलीं, व आपणांसही दोन तीन पत्रें पाठविलीं. परंतु उत्तर अद्याप येत नाहीं. मार्गशीर्ष मास आला. इंग्रज वसईनजीक सुरतेहून येऊन पोहोंचले. मुंबईकर तों तत्परच आहेत. याउपरी कोणतेही गोष्टीची अवधि राहिली नाहीं. आमच्यानें होईल तेथवरी करीतच आहों. श्रीमंतांची दौलत रक्षणें आपल्याकडे आहे. जलदीस मोल आहे. सर्व भार आपणावर आहे म्हणोन लिहिलें त्यावरून सविस्तर कळलें, व राजश्री नारो शिवदेव यांस पत्र लिहिलें त्यावरूनही कळलें. ऐसियास आम्ही कार्तिक वद्य दशमीस मुहूर्तेंकरून बाहेर निघालों. अंतरवेदींतून पांच सहा पलटणें अलीकडे आलीं, तीं नरवरवरून सिपरीस आलीं. पुढें माळव्यांत येऊन सुरतेकडे जावें, हा त्यांचा विचार आहे. पेशजीं इंग्रजांकडील पत्र आलें. त्यांणीं त्याची नक्कल आपणाकडे पाठविली, त्यावरून वर्तमान कळलेंच असेल. पलटणावरी फौज रवाना केली. आठदहा रोजांत पलटणाचा व फौजेचा मुकाबला होईल. येथून डांक बसविली आहे. जर सिपरीहून पलटणें पुढें आलीं, तरी येथून सडे जाऊन, गांठ घालून, त्यांचें पारिपत्य करून, मग भेलशावरून हांड्याचे घांटें रेवा उतरून आपणाकडे यावें, हा एक मनसबा आहे. फौज पुढें गेली, याकरितां इंग्रज मागें सरोन ग्वालेरीकडे गेले तरी फौज त्यांचे तोंडावरी राहील. फौज पोंचल्यावर काय बातमी येईल त्याप्रमाणें करावें लागेल. इंग्रजी पलटणें पुढें न आलीं, तरी आपणाकडे येण्याचा गुंता नाहीं. वसईकडे कुमकेस राजश्री रामचंद्र गणेश व बाजी गोविंद फौज देऊन रवाना केले. उत्तम केलें. तिकडील बातमी

राखून, वसईचा उपराळा करून, स्थळाची मजबुती राहे तें करावें. इकडील पलटणाचा सुमार पाहून येतों. वरकड राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रवाना चंद्र २७ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reports the advent of British regiments into Bundelkhand and their determination to proceed onward. Mahadji prepares to oppose them on the way.*

No. 124 27th November 1780.

पोवस्ती छ ८ जिल्हेज इहिदे समानीन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ २९ जिल्काद पावेतों मुा श्रीअवंतिका येथें स्वामींचे कृपेकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून सत्ताविसावे शवालचें पत्र पावोन लिहिला मजकूर कळला. त्या दारभ्य अलीकडे पत्र येऊन सांभाळ होत नाहीं; तरी सदैव पत्र लिहावयास आज्ञापिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा कार्तिक वद्य दशमीस भौमवारीं डेरे दाखल जाहाले. हिंदुस्तानची रवानगी आंबाजी इंगळे यांजबरोबर पांच हजार फौज देऊन केली. ते कूच करून तीन चार मजल निघोन, ग्वालेरीच्या रोखें पलटणें पुढें येतात त्यांचे मुकाबल्यास गेले. इंग्रजांचीही फौज तोंडावर गेल्यानंतर दक्षणेस पुढें पेशकदमी* करितात किंवा माघारे ग्वालेरीकडे जातात हें समजेल. त्यासारखें जें कर्तव्य तें करावें ऐसा विचार आहे. इकडील इंग्रजांचा रोंख पाहावा, गांठ घालावी, असा विचार आहे. उपरांत खानदेशांत यावें असा बेत दिसतो. तूर्तच येण्याचा विचार देशीं घडत नाहीं. येथून रामजी पाटील जाधव स्वामींकडेस राजश्री पाटीलबावांनीं रवाना केले आहेत, हे सविस्तर मजकूर सांगतील त्याजवरून निवेदन होईल. राजश्री तुकोजी होळकर मर्दान्याचा घाट रेवा उतरून पार जाहाले. देशीं येणार. मग कोंडाईबारीकडे जाणार किंवा स्वामींकडे येणार, हा निश्चय पक्का समजण्यांत आला नाहीं. यास्तव संदिग्ध वनता लिहिली आहे. मजला देशीं यावयाचें होतें, याजकरितां स्वामींची आज्ञा आणोन निघोन यावें या विचारें आज्ञापत्रही आणविलें होतें. परंतु येथें यजमानांचे विचार

*पाऊल पुढें टाकणें, पुढें कूच करणें.

नारो शिवदेव आल्याखेरीज जाऊं नये ऐसें होतें. तदनंतर मशारनिल्हे आल्यावर एक दोन वेळ पुसिलें. तेव्हां उत्तर केलें कीं, आमचा देशीं किंवा हिंदुस्थानांत जाण्याचा विचार ठरला म्हणजे तुम्हांस निरोप देऊं असें होतें. त्यास अद्याप येथें प्रथम दिवसच आहे. ज्याप्रमाणें बोलण्यांत व लिहिण्यांत येतें, त्याप्रमाणें करण्याची जात दृष्टीस पडत नाहीं. येविसीं बोलणीं राजश्री नारो शिवदेव व सदाशिवपंत यांचे व मुख्यांचे वाद प्रतिवाद बहुत जाहाले, परंतु अमलांत येईल तें खरें. तिकडील वर्तमान वसई वगैरे सविस्तर ल्याहावयास लेखकास आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram informs Nana that Mahadji had despatched Ambaji Ingle to march against the British regiments towards Gwalior, that he had postponed his own march into Deccan and deputed Ramji Patil Jadhav to meet Nana and explain the situation personally.*

No. 125 1st December 1780.

पैवस्ती छ १३ जिल्हेज इहिदे समानीन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत चंद्र ४ जिल्हेज पावेतों मुक्काम श्रीअवंतिका येथें स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष :—स्वामींकडून पत्र येऊन परामर्ष होत नव्हता, त्यास हल्लीं बेविसावे जिल्कादचें पत्र कृपा करून पाठविलें, तें पावोन परम समाधान जाहालें. असेंच निरंतर पत्रीं सांभाळीत असावें. यानंतर पत्रीं आज्ञा कीं, राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं मजकूर लिहिला आहे त्यावरून कळेल. कार्तिक मास गेला; इकडे तींहीं ठिकाणीं इंग्रजांची लढाई लागली; अद्याप उभयतां सरदारांकडील मसलतीचा निश्चय नाहीं. ईश्वरें निर्मिलें असेल तैसें घडेल. आषाढ मासापासून लिहीत गेलों. दिवसगत लागल्यामुळें दौलत पेंचात आली. याजउपर जें सरदारांचे थोरपणास उचित तें करतील म्हणोन आज्ञा. त्यास येविषयींचा मजकूर येथील बोलण्याचा, एक दोन वेळ पेशजीं सेवेसीं पत्रीं सूचनार्थ

विज्ञापना लिहिली होती व येथील तपशीलवार अर्थ करण्याचे वारंवार राजश्री नारोपंत व सदाशिवपंत यांनीं विनंती लिहिलीच असेल. मुख्य गोष्ट, या सरदारांनीं तूर्त ईर्षा सोडिली असें दिसतें. देशीं वसईसारख्या जाग्यास मोर्चे लाविले, त्यापक्षीं कोंकणपट्टी राहाणें कळतच आहे. असें असोन देशीं जाण्याची निकड दिसत नाहीं. वरकड हल्लींचीं पत्रें स्वामींचीं आलीं, त्यांत लिहिण्याची व इषार्तीची परमावधि जाहाली. ऐसेंही असतां कालाचे दिवस घालवितात. राजश्री तुकोजी होळकर आज दीड महिना इंदुराहून निघाले, परंतु अद्याप रेवातीरीं आहेत. रेवा उतरोन दक्षिण तीरास मर्दान्याच्या घांटें गेले. बाईकडेस अनुसंधान भेटीचें सुलतानजी लांबहाते यांचे विद्यमानें लाविलें आहे म्हणोन आजच बातमी आली. या दीड महिन्यामध्यें सुरतेकडेस गेले असते तरी इंग्रज माघारे येते. त्यास पायबंदच नाहीं तेव्हां त्यांनीं निकड वसईस लाविली. येविषयीं बोलणीं आमचीं वकील सुद्धां बहुत जालीं, परंतु प्रत्ययास येत नाहींत. तेव्हां आमचीं बोलणीं मिथ्या पडलीं. वरकड आमचे बोलण्याचा विषय तो कोणता? आपल्या नांवें पत्रें स्वामींस आज चार महिने लिहीत गेले काय आणि करण्यांत गोष्टी आल्या कोणत्या? हा अभिमान ज्यांचा त्यांस नाहीं, तेव्हां आमचा सेवकाचा उपाय कोणता? अद्यापि मन घालून करितील तरी कोणतीही एखादी गोष्ट घडेल. उभयतां सरदारांची चित्तशुद्ध नाहीं. होळकर देशीं जावयास निघाले त्या वेळेस राजश्री पाटीलबावांचें संमत घेऊन जावें, ती तर गोष्ट घडली नाहीं. आकस्मात् निघोन देशीं जावें ही तऱ्हा करून महेश्वरास जाऊन बाईचा कारभार उरकावा या संधानांत होते. परंतु ती गोष्ट घडली नाहीं. तेव्हां आतां देशीं जावें असा मजकूर आहे. मग काय घडेल तें पाहावें. वरकड इकडील तपशीलवार वर्तमान दरबारीं वगैरे राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून विदित होईल. राजश्री शिवाजी विठ्ठल यांसी बोलावणें जलदीचें पाठविलें आहे. त्यास येथें विचार आहे कीं, इकडील मसलत मशारनिल्हेच्या जिम्मेस करून, आपली फौज सभागमें देऊन हिंदुस्थानांत रवानगी करावी आणि आपण देशीं यावें असा विचार आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶ *Appaji Ram laments the attitude of perfect unconcern showed by Mahadji to the fate of Bassein. He writes strongly about the want of cordial understanding between the two chiefs, Sindia and Holkar.*

No. 126 1st December 1780.

पौ छ १३ जिल्हेज इहिदे समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १९ जिल्काद व छ २२ रोजचीं दोन तीन पत्रें पाठविलीं, तीं पावलीं. इंग्रेजांची मसलत येऊन ठेपली. वसईवरी इंग्रेजांनीं निकड केल्याचा मजकूर लिहिला, तो सविस्तर कळला व राजश्री नारो शिवदेव यांसीं लिहिलें त्यावरून कळलें. ऐसियास कार्तिक मासींच येथून निघोन आपणाकडे यावें हा विचार होता. परंतु सिपरीवरी पांच सहा पलटणें आलीं, त्यांचा बंदोबस्त न करितां आले, तरी ते माळव्यांत येतील, याकरितां फौज तिकडे रवाना करावयाचा गुंता पडला. फौज रवाना करून आम्ही वद्य दशमीस डेरेदाखल जालों. सिपरीवरील पलटणें पुढें सुरंजेचे मैदानांत आलीं तरी जाऊन गाठ घालावी; त्यांचें पारपत्य करून तिकडून हांडयाचे घाटें नर्मदा उतरून यावें; हा विचार करून, आपणाकडे पत्रें लिहून पाठविलीं. तों हल्लीं आपणाकडील निकडीचीं पत्रें आलीं. त्यास, इकडील बंदोबस्त न होतां आपलेकडे यावें, तेंही ठीक नाहीं. सिपरीवरी सहा पलटणें आलीं, तीं तेथेंच आहेत. आणखी नऊ पलटणें काल्पीपासीं उतरोन अलीकडे आलीं, या पलटणांचे कुमकेस येतात. सारे मिळोन मग पुढें यावें म्हणोन बातमी आली. याकरितां इकडील बंदोबस्तास राजश्री शिवाजी विठ्ठल यांसमागमें येथून आणखी फौज द्यावी, त्यांचें पथक, व पवार, व बळवंतराव धोंडदेव* यांस देऊन पाठवावें, इकडील फौजेनें व यांणीं एकत्र राहून इकडील बंदोबस्त राखावा, या अर्थें शिवाजी विठ्ठल यांसी बोलावूं पाठविलें आहे. आले म्हणजे त्यांसीं बोलून, त्यांणीं कबूल केल्यास त्यांचे गळां घालून, आम्ही आपणाकडे येतों. रवाना छ ४ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. वरकड नारो शिवदेव लिहितील त्याजवरून कळेल. हे विनंती.

¶*Mahadji explains the postponement of his march to the south, as the pressure of British advance into Malwa grew stronger and required all his energies to meet the danger.*

---

*उपनांव नागांवकर, पेशव्यांचा सरदार.

No. 127 1st December 1780.

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. ऐसियास वद्य दशमीस डेरेदाखल जालों. सिपरीवरी पलटणें आलीं. त्यांजवरी फौजा रवाना केल्या. राजश्री शिवाजी विठ्ठल व पवार वगैरे सरंजामी यांस बोलावूं पाठविलें आहे. इकडील पोख्त बंदोबस्त करून यावें हेच निश्चय आहे. यविसीं राजश्री नानांस लिहिलें आहे व राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ ४ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji communicates his plans to Haripant informing him of his dire need to oppose the advance of the British troops.*

No. 128 31st December 1780.

श्री

पुरवणी राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी फरासिसाचे पातशाहाकडून मुसा मुंतीन पत्रें घेऊन गोव्यांत येऊन तेथून हल्लीं पुण्यास आला. भेट झाली. बोलणें त्याजकडील एकून घेऊन मागाहून लिहून पाठवूं. गाडराकडील पलटणें व सरंजामाची सर्व तयारी कल्याणास होऊन तीन कोसांचें कूच केलें. गाडर मुंबईहून निघून तीही दिवसीं पलटणांत येणार.....श्रीमंत राजश्री दादासाहेब आपले कुटुंबासुद्धां बाजीराव बर्वे व सटवाजी भोसले वगैरे सरंजाम घेऊन नवसरीस आले. तेही गाडरास सामील होऊन, घांटावर येऊन मसलत पडावी हा इरादा त्यांचा आहे. आमदाबाद इंग्रजांनीं गायकवाडाकडे दिली व तेथील व भडोच सुरत वगैरे जागांचीं पलटणें काढून आणिलीं, आणि नवे माणूस तेथें ठेवून कवाईत वगैरे शिकवून जागा राहावयास ठेवितात. सरकारांतील ओढीचा प्रकार काय लिहावा? कांहीं तरतूद करावयास जागा राहिली नाहीं. मसलत तों भारी आहे. म्हणन लिहिलें तें कळलें. त्यास, मुसा मुंतीन फरासिसांचे पातशाहाकडून आला. त्याचें बोलणें होऊन फरासिसांचा इरादा काय हें समजलेंच असेल. चाळीस

जहाजें फरासिसांचीं येतात, तीं लौकरच येऊन पोंहचतील, असें नबाब हैदरखानानीं पेशजीं लिहिलें होतें. परंतु फिरून त्यांचें लिहिलें येतात, तें खरें किंवा लटकें हें आलें नाहीं. इंग्रजास चहूंकडून ताण बसला. कलकत्ता खालीं आहे. अशांत फरासीस कलकत्त्याकडे येऊन ताण बसवितील, तरी कलकत्ता त्यांचे हस्तगत होई असा वक्त आहे. मुंबईकडे फरासिसांचीं जहाजें आलीं, त्यांपैकीं कांहीं मुंबईच्या तोंडावरी राहून कांहीं सुरतेकडे आलीं आहेत. त्यांजवरी इंग्रजांचीं जहाजें सुरतेहून त्यांजवरी गेलीं. त्यांची त्यांची लढाई होत आहे म्हणून वर्तमानें ऐकिलीं. आपले पत्रांत हा मजकूर कांहींच नाहीं. फत्तेसिंग गायकवाड यांजकडे आमदाबाद वगैरे जागा इंग्रजांनीं दिल्या. आतां गायकवाड इंग्रजांस सामील होणार किंवा सरकारचे लक्षानरूप वर्तन करणार, याचाही शोध आपण केलाच असेल. फरासिसांचें वर्तमान खरें असलें, तरी मग गाडरास पायबंद मोठाच बसला. घांटावरी यावयाचा विचारच पडेल. तत्रापि आपण फौज जमा करण्याची तरतूद करावी. कोंडाईबारीकडे राजश्री गणेश विश्वनाथ बेहरे वं भापकर आहेत. त्यांकडे आणखीं फौज पाठवून बारीकडील बंदोबस्त करवावा. आपणांपाशीं फौज जमा झाली असेल ती बोरघांटाचे सुमारें जाऊं द्यावी. सरकारांत ओढीचा प्रकार हा खराच, परंतु मसलत येऊन पडल्यास उपाय नाहीं. श्रीमंतांचे दैवेंकरून आजपावेतों पार पडत गेलें, पुढेंही त्यांचेच पुण्येंकरून पार पडेल. चिंता नाहीं. रवाना छ ४ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji comments on the arrival of French warships in Indian waters and advises Nana to move troops to Bhorghaut and Kondai Bari to counteract Goddard's activities.*

No. 129 31st December 1780.

श्री

छ* विज्ञापना. महेश्वरीं बोलणें बाईचें जालें तें आलाहिदा पत्रीं लिहिलें आहे. आपण कित्येक प्रकार बाईस समजावून सांगोन सांगितला घाट घडोन येईल ऐसें करणें म्हणोन आज्ञा. त्यास मी बहुत प्रकारें युक्ती प्रयुक्तीनें सांगितलें,

*नाना फडणिसांचा इंदूरचा वकील नारो शिवदेव याचें हें पत्र पुण्यास नानास.

परंतु बाईचें बोलणें एकच कीं, दोन तऱ्हा सरकारांतून सांगोन आल्या, त्यांमधील एक मीं कबूल सामर्थ्य नसतां केली. त्याजमध्यें कारभारीयांचा येऊन पेंच पडला. तोही तूर्त कबूल करून जमेच्या अजमासें पैका द्यावा ऐसें बोलणें असतां, भवति न भवति होऊन ठरावांत गोष्ट आली. त्यास ही चलबिचल तुमच्या सांगण्यांत आली. तेव्हां जो ठराव जाला त्याचाच निर्वाह करितां संकट पडलें. तेव्हां दुसरी तऱ्हा कसी होते ? राजश्री नानांनीं लिहिलें जे, सरदारीचा आब व सरकारचाकरी होय तो अर्थ करावा. त्यास इतकें कबूल केलें हें दोहीकरितांच केलें. नाहीं तरी माझा कारकून, हिशेब मजला घ्यावयासी पेंच काय आहे ? तत्राप मसलतीकरितां तूर्त सरकारमर्जीच रक्षावी याजवर नजर दिली आहे. नाहीं तर, कारभारी मी येऊन पैका लागेल तो लावावयास सिद्ध आहें. हेंही सरकारमर्जीस्तव राहून जो ठराव जाहाला त्याजप्रमाणें करावें, त्याजप्रमाणें पत्रें गेलीं आहेत. त्याजखेरीज दुसरें कांहीं घडावयाचें नाहीं, असें बोलणें जाहालें. स्वामींची आज्ञा मजपासीं जाली होती कीं, ही गोष्ट बाईनीं या समयीं ऐकावी हें उत्तम आहे. कदाचित् त्यांच्या सोईस न पडे, तरी आम्हांस सरकारांतून परिछिन्न बोलल्याप्रमाणें बंदोबस्त करणें प्राप्त आहे. याजकरितां स्वामींच्या मर्जीप्रमाणें विनंती केली. परंतु मातुश्री बाईची मर्जी तऱ्हेस जाईल ऐसें दृष्टीस पडलें, याजकरितां सेवेसीं विनंती लिहिली आहे. तूर्त या बखेडयांनीं सरकारकामाचा मात्र नाश होतो, इतकें मात्र दिसोन आलें. त्याहीमध्यें गुलजारखान व बाजीराव व सटवाजी भोसले व राजश्री अमृतराय, प्यादे व स्वार दोन अडीच हजार घेऊन आलीमोहोनच्या रानांत आले. माळव्याकडे येणार ही बातमी अहिल्याबाईजवळ आली. त्याजवरून बाईनीं फौजा व पेंढार ऐसें जमा करीतच आहेत व नव्या फौजा ठेवणार. तेव्हां हाही नवा खर्च उपस्थित जाहाला; व राजश्री पाटीलबावा यांचाही भाव, पहिला ठराव जाहाला त्याजप्रमाणें करावें, दुसरा प्रकार केल्यास ठीक नाहीं, असा आहे. यास्तव पहिल्या कराराप्रमाणें जाहल्यास दोहीकडील मर्जी राहाते ऐसा प्रकार आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Shivdeo reports to Nana the stubborn attitude of Ahalyabai who was not willing to accede to the proposal of Nana for surrendering her power into the hands of any one else.*

No. 130 21st January 1781.

हैदरखानास पाटीलबावांनीं पत्र लिहिलें त्याची नक्कल.

नवाब अजम हैदरआली खान बहाद्दर सलहुताला यांसीः—

छ साहेब मेहरबान करमफर्माय मुखलिसां बाजद षौक मुमकात मसरत आयात इतिहाद मा आसरबाद येथील खुषी जाणोन आपली शादमानी हमेशा कलमीं करीत आलें पाहिजे. दिगर. आपण खत पाठविलें तें पावलें. कलमीं केलें जे, आरकाट फत्ते जाहाल्याचा मजकूर वगैरे पेशजीं मफसल लिहिलें आहे, त्यावरून मालूम जाहालें असे. जनरल कूट नामें फिरंगी सरदार, बंगाला व चेनापट्टण व मुंबई व सुरत या चारी जागेचा खुद्द मुख्तीयार आहे. इकडे इंग्रजांची फौज गारद जाहाली हे खबर पोहोंचल्यावरून खुद्द जनरल कूट मजकूर भारी जमावानिसीं चेनापट्टणास येऊन पोहोंचून, चेनापट्टणांत पहिले होते गोर्नदोर व फौजेच्या सरदारास तगीर करून, ताजा सरदार फौजेचा आणि गोर्नदोरही ताजा मशारनिल्हे करून, पहिली जमियेत हाल आपले हमराही जमियेत सहित जंगी सामान तयार करीतच आहे. याशिवाय कूट मजकूर बंगाल्याहून येते वख्तीं नागपूरचे भोसले बंगाल्याकडे नमूद जाहाले असतां, त्यास मखफीनें* कांहीं देणें घेणेंचें करून भोसल्यांचा आपला सलूख करून घेतला आहे. मोगलांकडे तो फिरंगी सरदार जाऊन बसून सलुखाचा करारमदार जाहाला आहे. कूट मजकूर चेनापट्टणास आल्यावर इकडे तमाम मुलूक व मातबर मकानासहित ठाणीं पडलीं ते व आपली फौजेची हकीकत पाहून मुंबईचे गोर्नदोरास व बंगाल्याकडून त्याचे रोखें आले आहेत ते सरदार जनरल गाडर यासीं किसी वजेनें श्रीमंतांसीं सलूख करून घेऊन, तिकडील इंग्रजी जमियत इकडे येत ऐसें खत लिहून, एक जहाजही पाठविलें आहे, म्हणून चेनापट्टणाहून तहकीक बातमी आली. आपणांस मालूम व्हावें म्हणून कलमीं केलें असे. जनरल कूट चहूंकडे जमाव बोलावून, भारी जमाव करून मुकाबल्यास निघणार आहे. निघालिया खुदाचें फजलेंकरून त्याची तंबी होईल. इंग्रज मकरी व माहूतलब आहेत. त्यांचें चलन वगैरेस आपण वाकफ आसां. कलमीं करावें ऐसें नाहीं. हल्लीं आणखी एक जहाज तयार करून करनल

*अंतस्थ रीतीनें.

गाडर यांस आमदाबाद वगैरे गुजराथेचे तालुके तमाम सोडून दरोबस्त इंग्रजी जमियत सुद्धां जाहाजावरून येऊन चेनापट्टणास पोहोंचणें म्हणून खत लिहून पाठविलें आहे. इंग्रजी तमाम फौज जमा करून इकडेच लढाईचें आजम माा केलें आहे, याकरितां तिकडे खाली मैदान राहात आहे. सुरत वगैरे मकानें घेऊन, बंगाला वगैरे तिकडे भारी पायबंद बसे तें करून, करारापमाणें आमलांत यावें म्हणोन कित्येक गड किल्ले तसरूफांत आल्याचा तपशील कलमीं केल्यावरून मुफसल मालूम जाहालें. त्यास आपण इंग्रजांची फौज गारद केली व आरकाट फत्ते केली या मजकुराचे खलिते पेशजीं आले होते, त्याचे जाब पाठविले आहेत. पोहोंचले असतील. चहूंकडून इंग्रजांची तंबी करावी असा नक्षा ठरिला, त्याप्रों आपण इंग्रजांवरी मोहीम करून इंग्रजांची फौज गारद केली, व आरकाट घेऊन, आणखी तिकडील मुलूक व गड किल्ले घेऊन ठाणीं कायम केलीं; आणि चेनापट्टणावरी शह देऊन इंग्रजांचे तंबीची कस्त करीत आहां, हे खबर ऐकोन न्याहत खुसी असे. बंगाल्याहून जनरल कूट सरदार मुखतार होऊन आला. भारी जमियत करून जंगी सामान तयारी करीत आहे. आपल्यासीं मुकाबला घेणार त्यासीं काय मुजाका आहे? इंग्रजांचे तंबीची कस्त करितां तेव्हां खुदाचे फजलेकरून इंग्रजांचे बरे वजेनें तंबीच होईल हे खातरजमा आहे. मुंबईकर, गाडर एक होऊन वसईकडेस गेले हे खबर आल्यावरून आम्ही देशीं यावयाचा इरादा करून डेरे दाखल जाहलों, तों अंतरवेदींतून कुमक* नामें सरदार व पलटणें ग्वालेर प्रांतांत आलीं. ते सुरतेस जाऊन गाडरास सामील होणार ऐसी बातमी आली. त्याजवरून त्यांचे पारपत्यास फौज भारी रवाना जाहाली आहे. पलटणाचें पारपत्य करून अंतरवेदींतून इंग्रजांस काढून त्या फौजेनें पुढें बंगाल्याकडे जावें, असा कस्त आहे. वसईकडे उपराळचास सरकारच्या फौजा नजीक जाऊन पोहोंचल्या असतां किल्लेदारानें हरामखोरी करून वसई इंग्रजांचे हवालीं केली याची हल्लीं खबर आली आहे. त्यास इंग्रज दगाबाज आहे. त्याचें पारपत्य करावें हाच कस्त आहे. हल्लीं तरी इंग्रजांनीं दगा करून वसई घेतली, तेव्हां सलुखाचा पैगाम त्यांनीं केला तरी होणार नाहीं. इंग्रजांची तंबी जरूर करणें हाच पक्का खंबीर आहे. खानदेशात सुरतेकडून पलटणें व फौज आली होती, ती सरकारचे फौजेनें व होळकराचे

*Camac. या संबंधाची पत्रें का. सं. प. या. यांत या वेळचीं आहेत तीं पाहावीं, जसें ले. ३०५ वगैरे.

फौजेनें गारत करून फौज कोंडाईबारीनें सुरतेवरी, मुंबईवरी, व गाडर वसई नजीक आहेत त्याचे मुकाबल्यास सरकारच्या फौजा आहेत. आम्हींही देशीं सत्वरच जाऊन पोहोंचतो. इंग्रजांची तंबी बरेवजेनें होईल. सुरतेस गाडर व मुंबईकर यांजला भारी पायबंद असतां, इकडील इंग्रजी जमाव चेनापट्टणाकडे पोहोचूं शकणार नाहीं. इंग्रजांसीं सलूख करूं नये, तंबीच चहूंकडून करावी, असा पेशजीं करार ठरला आहे, त्याप्रमाणें आपण मेहनत करितात. इकडूनही तोच कस्त आहे. चवघांनीं चहूंकडून इंग्रजांसीं तंबी करावी. त्यास आपण चेनापट्टणाकडे मसलतीवरी जाऊन लढाई सुरू केली, व सुरत मुंबईकडे सरकारच्या फौजा जाऊन लढाई सुरू जाहाली. हिंदुस्तानाकडील पलटणें आलीं, त्यावरी इकडील फौज जाऊन पोहोंचली. याचप्रमाणें भोसले व मोगलाकडील मसलती घडाव्या करारांत आल्या असतां त्यांनीं कराव्या हें त्यांस उचित होतें. परंतु हा काल त्यांजकडून होत नाहीं. आपणाकडून व इकडून इंग्रजांची तंबी जाल्यावरी मग त्याची खातरजमा पडून काय करणें तें करतील; तरी चिंता नाहीं. दोहींकडून पारपत्य होतच आहे. हमेषा आपली षादमानी कलमीं करून दिलषाद करीत जावें. ज्यादा काय लिहिणें असे ?

¶ *This is a copy of a letter of an earlier date addressed by Mahadji to Haidar Ali assuring the latter of the firm attitude of the Maratha Court in the war against the British and asking Haidar not to relax his efforts against the enemy.*

No. 131 27th January 1781.

पौा छ १२ सफर इहिदे समानीन
बराबर डांक माघ शुा १३. श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस:—

दंडवत विनंती. उपरी आपण छ ३० जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, "राजश्री रामजी जाधव आपणाकडून आले ते येऊन भेटले. सविस्तर बोलणें जाहलें. समय जाणोन, आपण होळकराची खातरजमा करून सरकारउपयोगीं पडावें, येविशीं सांगोन पाठविलें, त्यावरून होळकराकडील वाकडे व रखमाजी दादाजी आले. त्यांचें बोलणें, खावंदाची चाकरी

एकनिष्ठेनें करून दाखवावी, हें ऐकून, त्यांची खातरजमा करून, होळकरास खातरजमेचीं पत्रें पाठविलीं. केसोपंत दातार याचें पारपत्य जाहलें. याउपरी दोन हजार फौज व पेंढारी दरोबस्त गणेशपंत बेहरे यांसमागमें देऊन सुरत अट्ठाविशींत पाठवून तुह्मीं कल्याणाकडे यावें. पुढें होईल तें लिहिण्यांत येईल. आपण देशीं यावें किंवा हिंदुस्थानची मसलत करावी याचा विचार तर, तिकडून पलटणें येतात त्यांचें पारपत्य राजश्री शिवाजी विठ्ठल ठेविले असतां होतें, व पातशाहा नजफखान वगैरे मेळवून पुढें अंतरवेदपावेतों मसलत करतील असें असल्यास, त्यांस तिकडे ठेवून आपण इकडे यावें. हें होत नाहीं त्यापक्षीं आपण तिकडे जाऊन, आलीं आहेत पलटणें यांचें पारपत्य सहजांत होईल. हें करून पातशाहा व नजफखान वगैरे मेळवून घेऊन, इंग्रजांची तंबी, पुढें येतात त्याचे मागें दुसरे येतात त्यांची करून, बंगाल्यावरी शह बसे असें केल्यानें हेही गोष्ट मोठीच आहे. अंतरवेदींतील मुलूख व बंगाला मारल्याशिवाय इंग्रजांची मसलत शेवटास जाणार नाहीं. शिवाजी विठ्ठल वगैरे पथकें आपण बरोबर घेऊन जाऊन भारीच मसलत करावी. दोनी प्रकार लिहिले आहेत. ज्यांत सरकारकाम होय ते गोष्ट करावी. कोणता प्रकार ठरेल तो लौकर व्हावा ह्मणोन'' त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास होळकराची खातरजमा करून, सरकारच्या फौजा कल्याणाकडे आहेत तिकडे जावयास लिहिलें. उत्तम आहे. होळकर फौज सुद्धां सरकारच्या फौजेंत जाऊन सामील होत तें करावें. सरकारच्या फौजा व होळकर एकत्र असतां, गाडर वगैरे इंग्रज असरा सोडून मैदानांत आल्यास चिंता नाहीं. राजश्री शिवाजी विठ्ठल यांस इकडील बंदोबस्तास ठेवून आह्मीं देशीं यावें ह्याच विचार योजिला होता. परंतु मशारनिलेची सरदारी फारच गळाट्यांत आली. माणूस पदरीं ओढीमुळें राहिलें नाहीं. तीन चार हजार फौज त्यांची खासगत असावी, तरच त्यांचें स्वरूप. शिवाय तैनाती. त्यास, तूर्तच्या प्रसंगीं त्यांच्यानें पलटणें येतात त्यांचें पारपत्य होऊन पातशाहा व नजफखान वगैरे मेळवून घेऊन पुढें मसलत करतील, हें व्हावयाचें नाहीं. याकरितां पुढें राजश्री आंबाजी इंगळे फौज सुद्धां पाठविले. ते सिपरी-अलीकडे दहा बारा कोसांवरी जाऊन पोंहचले. त्यांचे मागें राजश्री सदाशिव मल्हार बक्षी पांच सहा हजार फौज देऊन पाठविले. पुढें फौजा पाठविल्या यांची व पलटणांची गांठ पडून पलटणाचें पारपत्य जालें, अगर माघारें रेटीत चालविलें, ह्मणजे पुढें गेल्या फौजा त्यांस तिकडेच राहण्याचें लेहून पाठवून

आह्मीं देशीं यावें, याकरितां मुक्काम करून राहणें जाहलें होतें. आपण व होळकर मिळोन देशची मसलत संभाळावी. आह्मांस हिंदुस्थानांत जावयास सांगावें. पातशाहा व नजफखान वगैरे यांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचीं पत्रें आलीं. आह्मी तिकडे गेल्यास सारे अनकूल होतील, असें पूर्वी आपणास लिहिलें होतें. त्यास देशीं यावें असीं पत्रें येत गेलीं. त्यावरून यावयास बाहेर निघालों, तों पलटणें सिपरीवरी आलीं. इकडील बंदोबस्त न करितां आलों, तरी इंग्रजांस राजेरजवाडे सामील होऊन इकडे येतात, त्यांचे पारपत्यास जावें, तरी आह्मी लिहीत असतां तिकडे गेले, असी दुग्धा पडली. यामुळें इकडील मसलतीवरी जातां न ये व देशींही येतां न ये. त्यास हल्लीं आपलीं पत्रें असीं आलीं, त्यावरून कूच करून इकडील मसलतीवरी जातों. आह्मी इंग्रजांचे पारपत्यास दरकूच येतों, तुह्मीं तिकडून यावें, ह्मणून पातशाहा नजफखान वगैरे सर्वांस पत्रें पाठविलीं आहेत. मागें आपणास लिहिलें होतें, त्या वेळेस याप्रमाणें उत्तर आलें असतें, तरी हिंदुस्थानचे मसलतीवरी मागेंच जाणें जाहलें असतें. याउपरी दरकूच जातों. पलटणांचें पारपत्य करून, हिंदुस्थानचा बंदोबस्त होऊन इंग्रजांस ताण बंगाल्यापर्यंत बसे असीच तर्तूद होईल. वरकड राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. पलटणांचें पारपत्य जाल्यावरी पुढें जे मसलत ठरेल, त्याप्रमाणें आपणांस लेहून पाठऊं. रवाना छ २ सफर. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji learns from Nana of the approval of his plan of campaign and informs the latter of his moving towards the Gwalior sector to oppose the enemy's advance and drive them back towards Bengal.*

No. 132 January 1781.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी:—

छ दंडवत विनंती उपरी. होळकरांकडील कारभाराचा व कारभारी यांचा मजकूर सविस्तर राजश्री नारो शिवदेव यांस सांगितला आहे, ते सांगतील त्याप्रमाणें करावें (हे विनंति?) तर याप्रमाणें चिटी श्रीमंतांस बाबांचे हातची

राजश्री मामांनीं* घेतली आहे. त्या उपरांत बाबांचें व माझेंही बोलणें जाहलें कीं, बाईच्या कामाचा निश्चय पुण्यांत ठरला त्याप्रमाणें आतां सरबरा† करावयाचें मात्र बाईकडे राहिलें. तेव्हां नानांनीं‡ महेश्वरास जाऊन तेथून पुण्यास जाऊन कर्तव्य कोणतें त्याविषयींची आज्ञा व्हावी, म्हणजे त्याप्रमाणें उज्जनीस लिहून पाठवीन. तेव्हां उत्तर केलें कीं, नानांनीं महेश्वरास जावें, तेथें बाईच्या विचारें व बाई सांगतील त्याप्रमाणें करावें. तेंच सांगणें आमचें. होळकरांकडील मजकूर राजश्री नानांनीं लिहिला कीं, कोंडाईबारीकडे होळकरांस न पाठवावयाचें कारण सुरतेंत श्रीमंत दादासाहेब व गायकवाड, यांस तिकडे पाठविल्यानें न कळे कशी बुद्धि होईल? त्यास, त्यांनीं हा विचार केला हें उत्तम केलें. परंतु बाईचा इतल्ला§ फौजेंत असावा, तो न ठेवितां महाल मुलूख बाईनीं आटोपावे; वीस लक्ष रुपयांची सरबरा मात्र करावी आणि फौज त्यांनीं ठेवून चाकरी करावी. त्यास जिकडे फौज तिकडे दाब व कर्तृत्व. त्यांत बाबूराव वैद्य व बाईकडील एखादा विश्वासु याप्रमाणें इतल्ला जरूर ठेवावा. येणें करून सरकार उपयोग व बाईचा मनोदय दोन्ही गोष्टी यथास्थित घडतात. नारोपंत नानांनीं महेश्वरास जाऊन, बाई सांगतील त्याप्रमाणें डौल धरून करावें. याप्रमाणें बाबांनीं आज्ञा केली. मुक्कामीं गेल्यावर सविस्तर लिहून पाठवीन. तांतडीमुळें उगीच सूचनार्थ विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The paper reports the arrangement effected by Nana's agent with Ahalyabai Holkar about the management of her military administrative matters.*

No. 133 15th February 1781.

श्री

[राजश्री पाटीलबाबांचें पत्र हैदरनाइकास त्याचा मसोदा.]

नरसिंगराव‖ वकील व कृष्णराव नारायण व आपणांकडील त्रिंबकराव आपाजी व रास्ते यांकडील गोविंदराव व गणपतराव पोंहचून मफसल मजमून¶ मालूम जाला. श्रीमंतांकडील करारनामा व आपले निभावणीचें खत हीं मशारनिल्हे हुमायूनीं दाखविले. त्यांत एक दोन कलमांचा तकरार होता. याकरितां

*अहिल्याबाईचे मातुल. †तरतूद, व्यवस्था. ‡नारो शिवदेव. §संबंध, मध्यस्थी. ‖हैदराचा वकील पुण्यांत. ¶मजकूर.

श्रीमंतांकडून लेहोन पाठविणेचा करारनामेचा मसविदा व आपले नांवचे निभावणीचे खताचा मसविदा ऐसे ठरावून मशारनिल्हे हुमा यांजकडे दिले आहे; आणि कराराप्रमाणें बेशर्त रोखाही सावकाराचा पाठविला आहे. मफसल* मशारनिल्हे हुमायांनीं लेहून पाठवितील, त्यावरून मालूम होईल. मसविदा पाठविला आहे, त्याप्रमाणें श्रीमंतांकडून करारनामा व आपलें निभावणीचें खत येथें येऊन पोंहचतांच शर्तीरोख्याप्रमाणें सावकार पैसे पोहोंचावितील. इकडे आम्ही इंग्रजांचे मोहिमेस कूच करून जात असों. इंग्रजांनीं श्रीमंतांकडील मुदेमाफीक कबूल करून सल्याचा पैगाम करतील, तर इकडील इतल्याशिवाय सलुखा न करावा म्हणून मुफसल लिहिलें त्यावरून मशारनिल्हे यांनीं लिहिल्यावरून मालूम जालें. त्यास पेशजीं नरसिंगराव वकील यांचे विद्यमानें आपणाकडील तहाची याद कलमबंदीवार सरकारांत आली. त्याप्रमाणें श्रीमंतांकडील करारनामा कलमवार अहदशर्तेनसीं करून दिला. नरसिंगराव वकील यांनीं आपले वचनासी कायमी शाबुती बहुता प्रकारें सांगितली. त्यावरून आम्ही वकील मशारनिल्हे यांसी रूबरू बोलून पक्केपणें खातरजमा केली, व निभावणीचें खत अहदशर्तेनसीं पाठविलें, तेंच आमचें कायम आहे. अहदशर्त व करारमदार एकदांच होतात. कायममिजाज† आहेत, ते त्याचीच निभावणी करितात. बार बार आहदपैमान होत नाहींत. कायममिजाजी पक्की समजून, करारा-प्रमाणें आम्हीं मातबर फौज व तोफखाना जंगी सामान घेऊन इंग्रजांचे मसलतीस आलों. मुफासला‡ त्यांचा आमचा थोडा राहिला. गांठ पडून तंबी होईल. जर करितां त्यांजकडून सलुखाचा पैगाम आला तरी आपणांस इतल्ला दिला जाईल. याप्रमाणें पहिलाच करार आहे. आम्ही कराराप्रमाणें इंग्रजांचे मसलतीस आलों. आपण अद्याप मकानावरच आहां. मसलतीची जात अशी ठरविण्यांत आली आहे कीं, चहोंकडून इंग्रजांस ताण बसावा. तें घडत नाहीं तरी ऐसें नसावें. आपणाकडून इंग्रजांचे तंबीची जलदी अशी व्हावी कीं फार दिवस न लागेत. म्हणजे थोड्या दिवसांत फडशा होईल. तहनाम्याचा व निभावणीचे पत्राचा आक्षेप केला. त्यास निभावणीचीं पत्रें पेशजीं दिलींच आहेत. त्यांत तफावत होणार नाहीं. तहनाम्याचा मजकूर तर, जाबसाल मामलतीचा आहे. एक दुसरें कलम कमज्यास्त जाल्यास सरकारांतून निभावितील; अंतर करणार नाहींत. आम्ही सांगूं. आपण कांहीं खतरा§ न आणितां कराराप्रमाणें ऐव-

*सर्व. †एक वचनी. ‡अंतर §संशय.

जाचा भरणा सरकारांत पटून द्यावा व इंग्रजाचे मोहिमेची जलदी करावी. हमेशा आपली शादमानीस* कलमी करीत जावें. छ २१ सफर.

¶*This is the draft of a letter addressed by Mahadji to Haidar conveying his guarantee to the engagement entered by the Poona Darbar with Haidar.*

No. 134 18th February 1781.

पैवस्ती चंद्र ८ रबिलावल इहिदे

समानीन हस्तें डाक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. आपण चंद्र २ सफरचें व चंद्र ११ रोजचीं ऐसीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. गाडर इंग्रज कांहीं पलटणें घेऊन होता व कांहीं पलटणें वज्रजोगणीजवळ अडचणींत होतीं. ते सारे एके ठिकाणीं होऊन तीन मजली अलीकडे आले. हें वर्तमान येतांच, राजश्री हरिपंत दहोवलीवरी होते, ते तेथून कूच करून इंग्रजांवर पुढें गेले. बदलापुराअलीकडे गांठ पडली. लढाई होत आहे. राजश्री तुकोजी होळकरही माघ शुद्ध पंचमीस येऊन श्रीमंतांचें दर्शन घेतलें, व आमची भेट जाहली. शुद्ध शष्ठीस निरोप घेऊन कोंकणांत इंग्रजांवरी गेले. राजश्री रघुनाथराव नीळकंठ मिरजकर पांच हजार फौज सुद्धां आले. त्यांचीही रवानगी हरिपंताकडे केली. राजश्री परशरामपंतभाऊ मागाहून येणार. आपणाकडे मसलतीचे मजकूर लिहून पाठविलेच आहेत. माघमास निघोन गेला. हिंदुस्थान व सुरत दोन मसलतींतून कोणता निश्चय तो ठरावून लौकर इंग्रजांवरी जरब बसेल असें करावें. आतां दिवस थोडे राहिले, याकरतां सुरतेकडेच लौकर यावयाचें करावें. कोणतीही मसलत लौकर व्हावी. उत्तर सत्वर पाठवावें. म्हणोन लिहिलें तें कळलें. व राजश्री नारो शिवदेव यांस आपण पत्रें लिहिलीं, त्यांजवरून सविस्तर मजकूर कळों आले. ऐसियास सिपरी-वरील पलटणें आलीं, त्यांवरी फौज रवाना केली. त्यांची व इंग्रजांची गांठ पडून तेथेंच राहतात किंवा पुढें चाल करतात हें समजल्यानंतर, फौजेनेंच इकडील बंदोबस्त होतो असें दिसोन आल्यास देशीं यावें, नाहीं तर पलटणावरी जाऊन त्यांचें पारिपत्य करून मग देशीं यावें, याकरितां मुकाम जाहले. फौज पुढें गेली.

---

*क्षेम, कुशल.

त्याची गांठ एक दोन मजलीनें पडावी, तों सिपरी इंग्रजांनीं घेऊन कूच केलें, हें वर्तमान आलें. तेव्हां तिकडे कूच करून जाणें प्राप्त जालें. पलटणें पुढें येतात, त्यांचें पारिपत्य न करितां सुरतेकडे जावयाचा प्रकार कसा घडतो ? दरकूच त्या पलटणांवरी जात असों. यांचें पारिपत्य जाल्यानंतर देशीं येतों. गाडर अलीकडे आला. याकरितां राजश्री हरिपंत फौज सुद्धां त्याजवरी गेले. होळकरही तिकडे गेले. व मिरजकर यांसही आपण पाठविलें. फार उत्तम केलें. फौजेचा जथ भारी जाहला आहे. मैदानांत फौजेची गांठ पडल्यास श्रीमंतांचे पुण्यप्रतापें-करून इंग्रजांचें पारिपत्यच होईल. आमची व पलटणांची गांठ पांच सहा रोजांनीं पडेल. श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. यांचें पारपत्य करून तिकडे येऊं. वरचेवरी तिकडील वर्तमान लिहून संतोषवीत जावें. इकडील होईल वर्तमान तें वरचे वरी लिहिण्यांत येईल. रवाना चंद्र २४ सफर. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his marching towards Gwalior to oppose the enemy and his consequent inability to abandon his present position in face of the enemy's threatening movements. He approves of Nana's plans to encounter the enemy in the Konkan.*

No. 135 February 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—पातशाहा व नजफखान यांनीं इंग्रजांचा वकील काढून दिला. सरदारांची वाट पाहतात. इकडील कौलनामा व बेलभंडाराचा जिमा आम्हीं घेतला, तेव्हां नजफखानांनीं कौलनामा व नानकुराण देतों म्हणून कबूल केलें आहे. हातास आलें म्हणजे पाठवून देतों म्हणोन राजश्री पुरुषोत्तम महादेव यांनीं राजश्री पाटिलबाबांस लिहिलें आहे. त्यास, या गोष्टी श्रावण मासींच लिहून पाठविल्या होत्या कीं, भाद्रपद—निदान अश्विनपावेतों—तिकडील राजकारणें बळावून लागलेच मसलतीवर नमूद व्हावें. त्यास हे दिवस येऊन पोहोंचले. ! असो. अद्यापही राजश्री शिवाजी विठ्ठल यांची व पातशाहा नजफ-खान यांची लगत करून देऊन मसलत होत असल्यास चांगलेंच आहे. इंग्रजांचा वकील नजफखानांनीं काढून दिला, परंतु लाचारीकरितां आंतून बारीक संधान राखीत असतील. इकडून कोणी पातशाहापासीं गेल्यावर उघडे होऊन मसलत

करितील. साऱ्याच मसलतीचे समय निघोन गेले. एक सरकारावरच येऊन मसलत पडली. वसई इंग्रजांनीं घेतल्यावर गाडर अडचणीचे जागां डोंगरांत वज्रजोगणीजवळ राहिला आहे. बाहेर निघत नाहीं. इकडील फौजा साहा कोसांचे अंतरानें शहावर उग्याच अटकून राहिल्या आहेत. खर्च मुबलग चढतो. इकडील शह टाकून फौज तर दुसरीकडे पाठवितां येत नाहीं, अशी तिडण पडली आहे. या समयीं इंग्रजांवर जरब बसे असें व्हावें, तें कांहींच दिसत नाहीं. हें कसें दिसतें पाहावें. म्हणोन पत्रीं आज्ञा सादर जाली. ऐशास, पातशाहा व नजफखान दिल्लींतच आहेत. मोहिमेचे तरतुदेंत आहेत. सीख आणणार. कौलकरार लेहून द्यावयास परवानगी जाली. तयार जाल्यास पाठवून देतों. हें वर्तमान पुरुषोत्तमपंतांनीं लेहून पाठविलें होतें. मशारनिल्हेचीं पत्रें सेवेसीं येत असतात. वर्तमानेंही लिहिलीं असतील. इकडून सरदार, कोणी सरदार, पातशाहा नजफखानाजवळ जावा, तर पूर्वी शिवाजी विठ्ठल यांजकडील चिमाजीपंत आले होते ते समयीं दोन लक्ष देतों, त्यांची दोन हजार फौज ठेवणें, अशी रदबदल मात्र बाबा करीत होते. चिमणाजीपंत बापूचे बोलावण्यामुळें गेले. मागतीं त्यांजकडील कारकून वासुदेवपंत व राजारामपंत आले. येथेंच आहेत. व तीही मसलत त्यांचे गळां घालावयाची नाहीं. पुसूं जातां ते वोढगस्त आहेत, त्यांस आटोपणार नाहीं, असें उत्तर होतें. देशीं जावयास निरोप द्या म्हणावें तर तेंही होत नाहीं. बापूंचा बेत स्वामींचें दर्शन घेऊन जवळ राहावें असें असतां पातशाहा नजफखानाकडे जावयास योग्य कोण? शिपरीचे पलटणावर आंबुजी इंगळे पाठविले. चार हजार फौज व पांच हजार पेंढार जवळ आहेत. ते जवळपास जाऊन पेंढारियांनीं एक वेळ इंग्रजांची रसद मारून आणिली म्हणतात. एकदां वर्तमान आलें जे, इंग्रजांचें ठाणें कोणे जमीदारानें नेऊन गढींत ठेविलें. त्या गढीस आंबुजी इंगळे लागले. तों बुढाडोंगराहून शेदीडशास कुंपणी म्हणतात, एक कुंपणी इंग्रज गढींतील ठाण्यास कुमक जात होती. वर्तमान इंगळ्यास कळतांच गढी सोडून कुंपणीवर गेले, ते मारले. त्यावरून दोन पलटणें शिपरीहून पुढें आलीं आहेत. बुढाडोंगर घेऊन पुढें येणार. बातमीचें पत्र शाहडोऱ्याहून रंगोपंत सुभेदार शिरवळकर यांच्या पुत्रांनीं पत्र शिवाजी विठ्ठल यांस पाठविलें, तें बापूंनीं इकडे पाठविलें. तेंच सेवेसीं पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. शिरोंजेंतही इंग्रजांचा दाब पडला. उजाड होणार ऐकितों. महेश्वरीहून त्रिंबकजी इंगळे, आंबुजी इंगळ्याचा बाप अहिल्याबाईनीं दीड हजार फौजेनें रवाना केला, तो राजगडपावेतों गेला. आंबुजीस मिळाला असेल. मागाहून सदाशिव मल्हार

बक्षी बाबांनीं रवाना केले. चार पांच हजार फौज समागमें दिली. तेही शाहजापुरापलीकडे गेले असतील. इंगळे व हे एकत्र जाल्यावर होईल वर्तमान तें विनंती करीन. शिपरीवर साहा पलटणें होतीं. आणखी चार पलटणें कुमक येऊन सारे मिळोन दाहा पलटणें जाल्याचें वर्तमान ऐकितों. बाबांचा मुक्काम उज्जनीचे पूर्वेस तीन कोस उडाशावर आहे. पौर्णिमा जाल्यावर येथून कूच होणार. बळवंतराव धोंडदेव यांस, पत्र बाबांचें, आंबुजी इंगळ्यास सामील होण्याकरितां गेलें. त्यावरून ते देवरीहून निघोन पथक सुद्धां भेलशापुढें गेले. वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of the little progress that had taken plac in the enegotiations of Mahadji with the Delhi Court and writes to him of the enemy advancing in the direction of Sironj owing to the feeble opposition offered by Mahadji.*

No. 136 3rd March 1781.

पैवस्ती छ २२ रबिलावल इहिदे
समानीन हस्तें डाक

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः--

दंडवत विनंती. उपरी सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर लिहून पाठवावें. इंग्रज सिपरीवरी होते, ते सुरंजेस आल्याची बातमी आली. त्यावरून फौज सुद्धां कूच करून मजल दरमजल सुरंजेनजीक आलों. इंग्रजांचा मुकाम शहरापासोन एक कोसावरी दक्षणेस होता. पहिले रोजीं फौजेची त्यांची थोडीशी झटपट जाली. इंग्रजांचीं पलटणें माघारी हटवून गोटांत घातलीं. तोफा लांब पल्यांच्या व बाणांचा सरंजाम आम्हांसमागमें आहे. मैदानांत टिकाव होणार नाहीं म्हणून रात्रीं कूच करून, माघारे शहरालगते अडचणीचे जागांत जाऊन राहिले. बहीरबुलंगें शहरांत घालून सडे शहरचे आसऱ्यानें राहून गोळागोळी करीत आहेत. इकडून तोफा लागू केल्या. तोफांची व बाणांची मार होत आहे. चहूंकडून फौजा उभ्या करून इंग्रज घेरले आहेत. थोडक्याच दिवसांत त्यांचें पारिपत्य करून, इकडील बंदोबस्तास फौजा टाकून आम्ही आपणांपाशीं येतों. गाडर घांट चढून वरती आला. त्याचे तोंडावरी सरकारच्या फौजा व

होळकर आहेत म्हणून ऐकिलें. त्यास, कोकणांत रान अडचणीचें, यामुळें फौजेची काबू चालली नसेल. आतां मैदानांत इंग्रज आला. सर्वांनीं मिळोन निकड केल्यास श्रीमंतांचे पुण्यप्रतापें इंग्रजांचें पारिपत्य होईल. इंग्रज घाटांवर आला, याकरितां देशीं गडबड जाहली असेल. परंतु फौजेचा जथ चांगला आहे. आपण हिंमत धरून सर्वांस दिलासा देऊन, इंग्रजांचा पुढें फैलाव होऊं न द्यावा. आम्ही येथें निकड करून लौकर यांचें पारिपत्य करून जलदीनें येतों. रवाना चंद्र ७ रबिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his having brought the enemy to bay near Sironj.*

No. 137 7th March 1781.

पौ छ २८ रावल इहिदे
समानीन अस्तमान हा डांक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. इंग्रज शहरचे आसऱ्यास जाऊन राहिला. तोफा व बाणांचा मार देत आहों. लौकरच यांचें पारपत्य करून आपणाकडे येतों म्हणोन पेशजीं आपणास पत्र लिहिलेंच आहे. आज पहांटे दीड प्रहर रात्र राहतां, इंग्रजानें कूच करून माघारा चालल्याची बातमी आली. त्यावरून फौजांची चिकाटी त्याचे मागें बसवून गोपालपूर—चंदेरीचे सुमारें आठ कोस आहे–तेथवरी मारीत मारीत आलों. इंग्रजांकडील तीनशेंपर्यंत कांहीं गोरे व तुरुक स्वार व दोन तीन सरदार व पलटणाचे प्यादे ठार मारिले. दारूगोळ्याचे छकडे व बंदुखांचे गाडे, उंटें व घोडीं लुटींत आलीं. बुलंगे झोंबडले. गट बांधून जातात. येथपर्यंत येतां अस्तमान होत आला. घेरून उभा केला आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून या पलटणांचें पारपत्य जालें. घाबरले आहेत. एका दों रोजांत पुर्तेपणें यांचें पारपत्य करून लौकरीच आम्ही आपणाकडे येतों. आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहिलें पाहिजे. स्वारींतून पत्र लिहिलें आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठवूं. रा छ ११ रावल गुरुवार संध्याकाळ. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of the retreat of the English troops from Sironj, having sustained a defeat from his army.*

No. 138 7th March 1781.

पौ छ २८ रावल इहिदे
समानीन अस्तमान हा डांक.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना ता छ ११ रावलपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :— इंग्रजांचीं पलटणें सात आठ व तोफा वगैरे सरंजाम सुद्धां कुमक नामें सरदार सुरंजे पावेतों आला. त्यावरून आह्मी उजनीहून कूच करून सुरंजेनजीक आलों. इंग्रज गांवचे आसऱ्यास मुकाम करून होता. त्याभोंवत्या फौजा उभ्या करून, दहा दिवसपर्यंत तोफांची व बाणांची मार देत होतों. त्यावरून घाबरा होऊन, रात्रीं दोन प्रहरां कूच करून माघारा चालला. पाठीमागें फौजांची चिकाटी होतीच. सुरंजेपासून गोपालपूर चंदेरीचे रोंखावरी आठ कोस आहे, तेथपर्यंत मारीत मारीत आलों. इंग्रजांकडील बहीरबुलंगे लुटले. छकडे, उंटें, घोडीं, बंदुखांचे गाडे याप्रमाणें आले. सभोंवता घेरला आहे. आज तर संध्याकाळ जाला, भोंवते उभेच आहों. स्वामींच्या पुण्यप्रतापेंकरून या पलटणांचें पारपत्य करितों. आज त्यांजकडील सरदार व गोरे व तुरुप स्वार व पलटणाचे प्यादे मिळोन तीनशें माणूस मारलें. पडलें. इकडीलही घोडीं माणसें जखमी व ठार जाहालीं. सविस्तर मागाहून विनंती लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadji writes to the Peshwa of his having surrounded Camac's force near Sironj and driven it back.*

No. 139 8th March 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—अश्विनमासीं भेटी होत्या तर बंगाल्यावर शह पडावयाची मसलत होती. आतां दिवस पहिले नाहींत हें खरेंच. त्यास, इंगळे व बक्षी व गोसावी बैरागी व खेचीचा राजा मिळोन तुमचेच हिशेबावरून अठ्ठावीस हजार जमाव जाहला, परंतु बिना पाटीलबाबा खुद्द गेल्याखेरीज पलटणांचें पारपत्य होणार नाहीं असें दिसतें. याकरितां पाटिलबाबांनीं जलदीनें जाऊन पारपत्य करावें हें चांगलें. आग्र्याचीं पलटणें फरासिसी आहेत किंवा इंग्रजी

आहेत ? इंग्रजी असलीं तर बहुत सावधतेनें पुढें लढाईवर ठेवीत जावीं. जवळ ठेऊं नयेत. पुढें रवाना जाहलीं यांची गांठ पडोन कसें होतें हें पाहूं नये. लौकर जाऊन पारपत्य करावें हें चांगलें. सिपरीवरील पलटणांचें पारपत्य तरी लौकर व्हावें म्हणोन श्रीमंतांचें पत्र आपले नांवें सादर जाहलें, तें श्रीमंत राजश्री पाटिल-बाबांस दाखविलें. त्याचें उत्तर केलें कीं, पलटणें सिप्री घेऊन पुढें येत चालले. आंबोजी इंगळे वगैरे यांची रवानगी फौज सुद्धां इकडे केली असतां, यांच्यानें पलटणींचें पारपत्य होईल किंवा पुढें येतात ते रेटून माघारा घालवावे हें घडा-वयाचें नाहीं. इंग्रज दिवसेंदिवस चाल करीत आले. परभारें वर्तमानें येऊं लागलीं कीं, सिरोंज भेलसें घेऊन, भोपाळकर यांस सामील करून घेऊन, नर्मदा उतरावी हे बातमी ऐकतांच कूच करून लांब लांब मजलीनें येऊन सिरोंजेवर इंग्रजांसीं गांठ घातली. तेथें दहा अकरा दिवस तोफांची गोळागोळी होऊन इंग्रज पळाला. ते दिवशींचें वर्तमान लढाईचें श्रीमंतांस लिहिलेंच आहे. त्याउपरचें वर्तमान वरचेवर जात आहे. पलटणें लढवई मजबूत. आठ पलटणें, चौदा तोफा, तीन गरनाळा, दीडशें दोनशें तुरप स्वार; याखेरीज नरवरवाला याची कुमक या-प्रमाणें भारीच सरंजामानें चाल केली होती. परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापें शत्रूंस हात समजोन जीव घेऊन पळत चालला आहे. यांचें पारपत्य जाहल्यानंतर मग विचार दुसरे मसलतीचा. हिंदुस्थानचे मसलत करावयाचे दिवस राहिले नाहींत. सिपरीवरील पलटणांचे पारपत्यास जावयाचीं आधींच पत्रें याप्रमाणें येतीं, तर इतके दिवसांत या पलटणांचें पारपत्य घडोन दुसरा विचार सुचता ! असो. ज्या कालीं जें घडणार तें घडतें. पलटणें जीव घेऊन पळतात यांचेंही पारपत्य लवकरच घडेल. याप्रमाणें उत्तरें जाहलीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana Mahadji's victory in an action with Camac's force and says the season was too far advanced to carry the war into the enemy's country.*

No. 140 21st March 1781.

पौा छ १२ राखर इहिदे समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. आपण छ ३० सफरचें पत्र पाठविलें, तें छ १८ रावलीं नजीक नवी सराय प्रांत आहिरवाडा येथील मुकामीं पावलें. आपणच

लौकर जाऊन सिपरीवरील पलटणांचें पारपत्य करावें. नंतर पुढें जी मसलत ठरेल ती लिहून पाठवावी. पवार व राजश्री शिवाजी विठ्ठल वगैरे पथकें सरकारचीं तिकडे आहेत, तीं घेऊन जाऊन पारपत्य लौकर होय तें करावें. या गोष्टीस अवकाश पडला असतां इकडून कांहींच होत नाहीं असें त्यांस समजून हांवभरी होतात. हे सर्वही आपले ध्यानांतच आहेत. गाडर दाहा पलटणें सुद्धां बराबर तीस तोफा वगैरे सरंजाम भारी घेऊन खोपोलीस येऊन, अर्धी पलटणें घांटमाथ्यावर व अर्धी खालीं येऊन राहिला आहे. राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर त्यांपासून तीन कोसांवरी अलीकडे फौज सुद्धां आहेत. नित्य तोफा घेऊन जाऊन मारगिरी करितात. परस्परें लढाई रोज होती. इंग्रज घांट चढल्यावर श्रीमंतही पुरंदरास गेले व पुणेंही रिकामें करविलें. राजश्री परशरामपंतभाऊही बारा हजार फौजेनिशीं आले. सारी फौज पन्नास हजारपावेतों व गाडदी सात हजार वगैरे सरंजाम चांगला इकडील आहे. परंतु अडचणीची जागा सोडून अद्यापि पुढें येत नाहीं. मैदानांत आल्यानंतर श्रीमंतांच्या प्रतापें काय घडेल तें खरें. सविस्तर नारोपंतांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. सिपरीवरील पलटणांचें पारपत्य आपण खुद्द जाऊन करावें, तरच होईल. जलदीनें जावें. ह्मणोन लिहिलें त्यावरून व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिलें त्यावरून सविस्तर कळलें. ऐशियास इंग्रजांचे मोहल्यावरी पुढें फौज पाठविली असतां इंग्रजांपाशीं आगीचें बळ भारी. आठ पलटणें इंग्रजांचीं व दोन गोहदकर जाटाचीं, एकूण पलटणें दाहा व वीस तोफा, व गोहदकर जाटाकडील व नरवरकराकडील स्वार सात आठशें व तुरुप स्वार मिळोन हजार स्वार याप्रमाणें जमून सुरंजेस आले. त्यावरून आह्मीं फौज सुद्धां व तोफखाना समागमें घेऊन, लांब लांब मजली करीत, सुरंजेनजीक येऊन गांठ घातली. इंग्रज गांवाअलीकडे मैदानांत मुकाम करून तो रात्रीं कूच करून सुरंजेचे आसऱ्यास अडचणीचे जाग्यांत जाऊन राहिला. आठ दाहा दिवस तोफांची व बाणांची मार दिल्ही. दोन तीन वेळ तोफांवरी चालोन आले, परंतु मोडून माघारे घातले. चहूंकडून घेरा घालून रसद बंद केली. गांवांतील दाणादुणा होता तो सरला. यामुळें घाबरा होऊन छ १२ रावलीं गुरुवारीं अर्धरात्रीं कूच करून चालला. रस्ता सोडून चंदेरीचे रोखें चालला. ते दिवशीं मार्गांत गांठ घालून मारामार केली. तोफांची व बाणांची मार देत चालविला. दारूच्या गाडया व गोळे यांचे छकडे व उंट व तट्टें, डेरे, राहुटया व पालख्या साहा व तुरुपस्वारांचीं घोडीं याप्रमाणें इकडे आले. तीनशें चारशें माणूस त्या दिवशीं मारलें. इकडील घोडीं चाळीस पन्नास ठार व जखमी जाहलीं

व लोक जखमी जाहले. हें वर्तमान तेच दिवशीं लेहून आपणाकडे पाठविलें आहे. ते दिवशीं दाहा आकरा कोस गेला. दुसरे दिवशीं चंदेरीची वाट अडचणीची, निभाव न होय, असें जाणून, मैदानांतून आहिरवाडयांत सिपरीचे मार्गें चालला. फौजांची चिकाटी माघ होती. रोज उंटें, तट्टें, छकडे, गाडया पाडापाड करीत, चार मजलीनें येथें आला. महतपुरची गढी आहे, जागा अडचणीची, तोफा बाहेरून लागू न होत, असी पाहून, गढीचे आसऱ्यास जाऊन मुकाम केला. चार रोज जाले, येथें मुकाम करून आहेत. सभोंवत्या फौजा उभ्या आहेत. जागा अडचणीची यामुळें तोफांचा लाग नाहीं. गांवांत चौ पांचा रोजांचा दाणादुणा त्यांचे हातीं लागला. बाहेरून बंदी केली आहे. एका दों रोजीं खायास मिळेना म्हणजे कूच करील. त्या समयीं निकड करून या पलटणांचें पारपत्य करितों. कानपुराकडून एक कंपू यांचे कुमकेकरितां येत आहे म्हणोन राा गंगाधर गोविंद व रघुनाथ हरि यांचीं पत्रें आलीं आहेत. त्यास, ते येऊन न पोहोंचले तोंच यांचें पारपत्य होईल. चिंता नाहीं. होईल वर्तमान तें वरचेवरी लिहिलें जाईल. गाडर घांट सोडून (फाटलें आहे.) तळेगांव या रानांत आल्यास, सर्वांनीं मिळोन तर्तुदीनें निकड करून, त्याचें पारपत्य होय तें करावें. एकतोंडी लढाई करणें ठीक नाहीं. घोडें माणूस जायां होईल. आघाडी व पिछाडी व दोन बाजूंस दोन टोळचा, याप्रमाणें चार टोळचा करून, चहूंकडून ताण बसवून जरब बसे तें करावें. वर्तमान वरचेवरी लेहून पाठवीत जावें. या पलटणांचें पारपत्य जालें म्हणजे इकडील बंदोबस्तास फौज ठेवून आह्मीही लौकरच येऊन पोहचतों. महतपुराहून इंग्रजानें कूच करून, गढचागढचाचे थांग्यानें, कुलारसचे गढींत इंग्रजांचें ठाणें होतें त्या आसऱ्यास येऊन मुकाम केला. हें रान.....
इंग्रज गट बांधून चहूंकडून तोफा देऊन येथपर्यंत आला. मैदान रान यामुळें फौजेचा काबू चालला नाहीं. बाणांची व तोफांची मारगिरी नित्य मजलीनें व मुकामावरी होतच आहे. पुढें रान अडचणीचें पाहून, निकड करून, याचें पारपत्य पुर्तेपणें होय, तेच तर्तुदींत आहों. होईल वर्तमान तें मागाहून लिहून पाठवू. आपणाकडील ही वरचे वरी वर्तमान लिहीत जावें. राा छ २५ राावल. वरकड राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes how he was harassing the enemy in his retreat and advises Nana to follow the same harassing tactics in opposing Goddard's force in Konkan.*

No. 141. 24th March 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसेजे :—कालाबाग नवी सराईचा कमाविसदार कोण आहे तो लष्करांत भेटलाही नाहीं. तेव्हां त्याची माहितगिरी कशावरून बोलावी ? शहाडोऱ्याचे कमाविसदार विठ्ठलराव रंगनाथ सिरवळकर व महितपुरकर कमाविसदार कृष्णाजी तानदेव यांजकडील कारकून हे दोन महालचे कमाविसदार लष्करांत भेटले. त्यांचें वर्तमान सविस्तर बावांस विनंती करून सांगितलें. चार दिवस समागमें राहणें म्हणून बावांनीं आज्ञा दिली, त्यावरून ते राहिले आहेत. यादवराव हरीस बावांनीं सांगितलें कीं, सरकारचे महाल आहेत ते तुम्हीं सोडावे. त्यांनीं उत्तर केलें कीं, महालीं ठाणीं इंग्रजांचीं होतीं, तीं आम्हीं चंदेरीवाल्याची भीड आणून ठाणीं इंग्रजांचीं उठवून आपलीं बसविलीं ! याचा खर्च हिस्सेरसीदीप्रमाणें चंदेरीवाल्यास दिला म्हणजे ठाणीं सोडतील. यावरून कांहीं पैका शहाडोरे व महितपूर येथें हिस्सेरसीद ठराऊन पैका देऊन तेथून ठाणीं सोडावीं, याप्रमाणें बोलण्यांत बावांनींच त्यासीं आणिलें होतें म्हणून ऐकिलें. दुसरे दिवशीं छापा पडला. आतां प्रसंगानुसार काय घडोन येईल तें खरें. यादवराव हरि पछोरेस आहेत. ते बावांकडे अद्याप गेले नाहींत. या प्रांतीची रीत बालंबाल पाहून वर्णिली आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar writes to Nana how the various Kamavisdars of the Peshwa's districts in Malwa had begun evading payment of revenue owing to the disturbed conditions of the district.*

No. 142 31st March 1781.

विज्ञापना ऐसीजे :—ग्वाल्हेर इंग्रजांकडून गेली तेव्हां गोहदकर सामील होऊन सोबत देतील न देतील हा विचार इंग्रजांस पडला. यामुळें माघारा फिरून चंदेरीस झाडींतून झांशीकडून होऊन अंतरवेदींत जावें या विचारें माघारा फिरला, किंवा छाप्याचे दिवशीं बारा तोफा, दोन हत्ती वगैरे उंटें, तट्टें नेलीं यामुळें हावभरी होऊन माघारा फिरला, हा पुरता विचार समजत नाहीं. काल शनवार चंद्र ५ रबिलाखरचे रोजीं सिंदनदी उतरून पचावलीस मुक्काम करून होता. याउपर एक दोन कूच जाहल्यावर कळेल. चंदेरीचे झाडींत शिरला तर फौजा चालावयास

अडचण मोठी. तो झाडींत शिरल्यानंतर बावा विचार काय करतात हा कळेल त्या सारखी विनंती करीन. राजश्री लालाजी बल्लाळ कोटेकर* जालमसिंग हाडे यास घेऊन आले. लालाजी बावा पुढें येऊन बावांसीं भेटले. जालमसिंगजी मागें शहाबादेस आले होते. एक दों रोजां येणार म्हणोन सांगतात. त्या बराबर च्यार हजार फौज, पांच हजार प्यादा, तुरुपस्वार व सहा तोफा, पन्नास सुतरनाला, दहा कैच्या बाणांच्या याप्रमाणें सरंजाम सांगतात. ते आले म्हणजे इंग्रजांवर एक वेळ हल्ला करावा असा विचार आहे. घडोन येईल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar writes to Nana of the sudden change of route which the retreating enemy had effected and of the arrival of Zalim-singh of Kotah with military aid for Mahadji.*

No. 143 March 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—कारभारी बुणग्याहून यजमानाकडे आले होते, त्यांच वर्तमान सविस्तर मागाऊन विनंती करीन. प्रस्तुत दिवसांतून एक दोन स्थळीं फिरावें लागतें. रात्रीं सडचा फौजेचीं तट्टें, मागें कोस दोन कोस पाठऊन, आपण सडे घोडे राऊत रात्रींचे फिरत असतात. ते प्रातःकाळीं चार घटका दिवस चढे-तोंपर्यंत त्या स्थळीं राहून, इंग्रजांचे कूच मुकामाची बातमी आल्यानंतर मग तेथून निघून, कोस आद कोस ओढचावर येऊन, लाधलेलीं उंटें, तट्टें व घोडचा-वरील जीन आणखी चार सहा घटका तसेच राहत असतात. दोन चार बातम्या इंग्रजांचा मुक्कामच आहे हे आल्यानंतर मग उष्णाची संधि, तेव्हां त्यांचें यावयाचें घडत नाहीं असें समजून, जीन घोडचावरील उतरावें. तें लवकर लवकर स्नान भोजन करून मागतीं सिद्ध असावें. सायंकाळ होतांच बुणगे लावून देऊन आपण मुक्काम सोडून रानांत आडवाटेवर बसावें. सांप्रत अशा रीतीनें प्रसंग प्राप्त आहे ! यामुळें सरकारच्या पत्राच्या मालुमात जमा धरून उत्तरें लिहा-वयास फावलीं नाहींत. राजश्री आबा चिटणीस यांजवळ तीन प्रहर पावेतों बसून निकडीनें उत्तरें व एक दोन पत्रें देऊन पाठवावयाची आज्ञा होती, त्याप्रमाणें बावांचीं पत्रें घेऊन पाठविलीं आहेत. प्रविष्ट होतील.

---

*उपनांव पंडित गुळगुळे.

राय गव्हाण व बाबूराव राम यांविषयींचे मजकुराकरितां सरकारचीं पत्रें आपले नांवें सादर जालीं, तीं बावांस दाखविलीं. उत्तरें घेऊन मागाऊन विनंती करीन.

परगणे जयनाबाद* येथील सरकारचे अमलाचा ऐवज शिंदे यांजकडील कमाविसदार देत नाहींत व पत्रें देतात तींही कमाविसदार मानीत नाहींत. त्यास, एक लक्ष दोन हजार रुपये शिंदे यांनीं घेऊन बाकी ऐवज सरकारांत द्यावा. हें सविस्तर पत्र श्रीमंत राजश्री पाटिलबावांस दाखविलें. त्यांनीं उत्तर केलें कीं, उज्जनीचे मुक्कामीं जयनाबादचा मजकूर बोललां होतां, त्याप्रमाणें कमाविसदार आपले विद्यमानाचा उभा करून एक लक्ष दोन हजार रुपये आम्हांस देत जावे. बाकी ऐवज सरकारांत घ्यावा. वारंवार जयनाबादच्या ऐवजाची किरकिर आम्हांसही सोसत नाहीं. मृग सालापासून तुमचे विद्यमानेंच मामलत सांगतों. मामलेदार उभा करावा. त्यावरून विनंती केली कीं, पुढील सालाचा जाबसाल याप्रमाणें लिहून पाठवितों, परंतु गतवर्षाचा व यंदाचे पैक्याची काय वाट ? त्यावरून बोलले कीं, गुदस्ताचा ऐवज मोरोपंताचे विद्यमानें रुजू व्हावा तें जालें नाहीं. तसेंच राहिलें. यंदां दोनशें रुपये दरमहा राजश्री नारो कृष्ण यांस देण्याविषयीं विनोबास सनद करून दिली, त्याप्रमाणें पाहत आहे. पुढें आखरसालीं हिशेब कितेब आल्यानंतर पैका ठरेल तो देऊं. मागती बोलले कीं, अशी किरकिर कामाचीच नाहीं. राजश्री नारोपंत नाना यांस लिहून पाठवणें कीं, बोलल्याप्रमाणें आपण मामलेदार उभा करून लिहून पाठवावें. मृगसाल जवळ आलेंच आहे. सनदा करून पाठवून देतों. एक साल देणार नाहीं. पांचसाला दहासाला मामलत सांगूं.

खंडेराव त्रिंबक यांची बाकी जयनाबादेकडे येणें त्याचा पट पाठविला, तो आज्ञेप्रमाणें बावांस दाखविला. त्यांनीं उत्तर केलें कीं, जयनाबादची मामलतच तुमचे विद्यमानें सांगतों. मग दुसरें तिसरें खटलें आम्हांस कशास पाहिजे ? एक लक्ष दोन हजार रुपये सालाबाद आम्हांस देत जावे, बाकी सरकारांत घ्यावे. मग खंडेराव त्रिंबक यांची बाकी देवावी. अगर जसें कळेल तसें करावें. यंदां कांहीं मिळत नाहीं. साफ उत्तर जालें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana that the dread of the repetition of a surprise attack at night kept Mahadji always on the watch and move, and prevented him from transacting any routine business. He mentions the affair of Zainabad which had irritated Mahadji.*

*जि० बऱ्हाणपुर.

No. 144 March 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—पापन (पाफम) नामें इंग्रज ग्वाल्हेरीस होता, त्यानें इकडील पलटणें पळत येतात हें वर्तमान ऐकोन किल्ल्यावरील अजबाब* घेऊन दोन कुंपणी सुद्धां शहराबाहेर येऊन राहिला होता. त्याजवर कपूरसिंग व पदमसिंग गुजर तिकटोलीकर, सिमथरवाल्याचे भाऊबंद, यांनीं ग्वालेरकर जमीदारांचे विद्यमानें लाग लाऊन, पांच सातशें माणूस जळून पडलें. त्यांनीं पापन (पाफम) इंग्रज सुद्धां दोन्ही कुंपणी (कंपनी) कापून काढून किल्ल्यावर जाऊन निशाण भगवें चढविलें. किल्ल्यावर माणसें होतीं तीं गांवकरी जमीदारांस मिळूनच होतीं. दोन्ही कंपनी कापून काढतांच ते येऊन भेटले. किल्ला स्वाधीन केला. तेथें सरकारचें निशाण चढवून कपूरसिंग व पदमसिंग यांनीं बावांस पत्र लिहिलें. दुसरें वर्तमान आलें होतें कीं, दोन पलटणें बुणग्यावर छापा मागती घालावयाकरितां इंग्रजानें रवाना केलीं आहेत; त्यांचा शोध आणावयाकरितां बावांनीं बातमीदार इंग्रजांचे लष्करांत पाठविले होते, ते आले. त्यांनीं सांगितलें कीं, इंग्रजानें छापा घालून तोफा व हत्ती वगैरे उंटें, तट्टें नेलीं, यामुळें हावभरी होऊन माघारे फिरावयाचा मनसबा केला. या गोष्टीस गोहदकराकडील दोन पलटणांचा सरदार संमत देईना. त्यानें साफ सांगितलें कीं, माघारे तुम्हांबरोबर फिरावयास आम्हांस आमचे धन्याची आज्ञा नाहीं. त्यावरून इंग्रजांचीं व त्याचीं भाषणें जालीं कीं, बरोबर तुम्हीं असल्यानें तरी लढाईचा उपयोग तुम्हांपासून आहे नाहीं समजलेंच आहे. असले नसले सारखेच ! मी मनसबा करितों, दुसऱ्याचे भरंवशावर करीत नाहीं, अशा रीतीनें बोलणीं जालीं. त्यावरून गोहदकरांकडील दोन पलटणें उठून गेलीं. याप्रमाणें वर्तमान आलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶Sadashiv Dinkar writes of the desertion by the Jat Rajah of Gohad of his allies the English.

No. 145 1st April 1781.

वडिलांचे सेवेसीं :—बापूनें† चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ६ रविलाखर मुक्काम कचनारची सराई वडिलांचे

---

*सामानसुमान. †शिवाजीपंत बापू विट्ठल शिवदेवाचा पुत्र.

आसीरवादें सुखरूप असे. विशेष :—काल चंद्र ५ शनिवारचे दिवशीं डांकेबरोबर विनंतीपत्र पाठविलें, तें पावोन इकडील वर्तमान निवेदन जाहलें असेल. इंग्रजांचें कूच कोलाऱ्याहून होऊन शेसईस गेला म्हणून वर्तमान लिहिलें होतें. त्याजवर मागतीं श्रीमंत राजश्री पाटिलबावा यांची चिटी राजश्री रावजीस आली कीं, कोलाराहून कूच करून शेसईस जाणार होता, तो माघारा बुणग्या सुद्धां फिरोन, पचावलीचे घांटावर सिंध नदी उतरून ऐल तिरीं येऊन मुक्काम केला. पाठीमागें राजश्री अंबाजी इंगळे वगैरे फौजा आहेत. तुम्हीं बुणग्यांत सावध असावें. आमचा मुक्काम होईल तेथून चिटी लिहून पाठवूं. याप्रमाणें चिटी आली. त्याजवर रावजीच्याही एक दोन बातम्या आल्या. त्याचेंही वर्तमान हेंच. काल शनिवारीं पचावलीस आला, तेथून आज कूच करतो, किंवा मुकाम एकाद दुसरा करील हें पहावें. तूर्त बुणगे घेऊन रावजी व रायाजी पाटील येथें आहेत. बावांकडील चिटी येईल त्याप्रमाणें करतील. इंग्रज माघारा फिरला, तो जिकडे जाईल तिकडे त्याचे पाठीमागें बावांचें कूच होईल. तेव्हां डांकेची सोय कशी पडेल पहावें. इंग्रजानें कूच याच सुमारें केलें तर रावजी बुणगे घेऊन खेचीवाडयाकडे होतील. जसा विचार होईल त्याप्रमाणें लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Shivaji Vithal informs Nana Fadnis of the enemy having retraced his steps and crossed the Sindh River.*

No. 146 7th April 1781

पैवस्ती छ २६ रदिलाखर समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी इकडील वर्तमान तरी शिरोंजेवरी इंग्रजांस जरब बसविली. त्यावरून इंग्रज तेथून कूच करून माघारा चालला. ते दिवशीं फौजेची चिकाटी बरीच बसली. तें वर्तमान तेव्हांच आपणाकडे लिहून पाठविलें, त्यावरून कळलेंच असेल. इंग्रजांबरोबर आहिरवाडयांतील आहीर व कित्येक जमीदार भुमे* जाऊन मिळाले, ते आहेत. त्यांणीं माहितगारीनें, जागां जागां, थांग्या थांग्यानें कूच करून, कुलारस सिपरीहून सहा कोस अलीकडे तेथें गढी आहे, त्या आसऱ्यास जाऊन इंग्रजानें मुकाम केला. मागीं जातांना रोज त्यांजकडील पाडा-

*माहितगार लोक.

पाड होत गेली. सुरोंजेपासून तीन सरदार मारले पडले व गोरे व तुरप स्वार मारले. पलटणाचे प्यादे पांचशें सहाशेंपर्यंत ठार व शिवाय जखमी फार त्यांजकडील केले. कुलारसचा आसरा धरून मुकाम त्याचा जाला. यामुळें कोसावरी मुकाम सडे फौजेनिशीं करून, चोहो बाजू च्यार फौजेच्या करून, रात्रंदिवस आपलाले बाजूवरी राहून, दाणा चारा जाऊं देऊं नये, याप्रमाणें बंदोबस्त करून होतों. बुलंगे व तोफखाना सात आठ कोसांचे तफावतीनें मागें होते. सडे स्वारीच्या तोफा सडे स्वारींत होत्या. त्यास, इंग्रज काबूबाज. आमावास्येच्या* दिवशीं रात्रौ प्रहर रात्र होतांच, आम्हीं होतों त्या तोंडावरी छाप्यास आले. बातमी येतांच आम्हीं हुशार जालों. बाजूच्या फौजांस खबर नाहीं. त्या टोळचा जिकडील तिकडेच राहिल्या. काळोखी रात्र यामुळें सारी फौज जमली नाहीं, व पलटणें किती आलीं व कोणीकडे गेलीं, हें कळलेंच नाहीं. आम्हांकडे पलटणें आलीं त्यांची आमची गोळा गोळी होत गेली. बुलंग्यास सांगून पाठविलें. त्यावरून बुलंगे तयार होऊन मागें जात होते. तिकडे तीन च्यार पलटणें कोणास न कळतां दुसऱ्या रस्त्यानें बुलंग्याकडे गेलीं. बुलंगे व तोफखाना निघोन गेला. च्यार पांच तोफा, नदीचे खळचाची अडचण, रात्रीचा समय, यामुळें आटकून राहिल्या. त्या इंग्रजांनीं जाऊन गांठल्या. आम्हांपासून सात आठ कोस मागें. सूर्योदय जाहाल्यावरी आम्हापाशीं वर्तमान आलें. त्यावरून आम्हीं त्या पलटणांचे मोहल्यावरी राहून फौज तिकडे पाठविली, परंतु गांठ न पडली. तोफा घेऊन गेले. दुसरे दिवशीं फौजा साऱ्या एकत्र जाल्याशा पाहून, रात्रीस पलटणें निघोन फिरोन कुलारसास गेली. त्यांचा पिच्छा करीत कुलारसानजीक आलों. तेथें इंग्रजांस घेरलें आहे. रात्रीं दगा करून चोरटेपणानें तोफांवरी दगा केला. तरी चिंता काय ? कुलारसाभोवते गांव जाळून लुटून टाकले. त्यांस दाणा वैरण न मिळे असें केलें आहे. रस्ता कोणीकडून येऊं पावत नाहीं. खायास मिळेनासें जालें म्हणजे कूच करतील. तेव्हां निकड करून इंग्रजांचें पारिपत्य करितों. चिंता नाहीं. गोहदकर जाटाचे वकील आले आहेत. येऊन सामील व्हावें हें त्याचे मानस आहे. दतियेकर राजा बाहेर निघाला; इकडे येत आहे. राजश्री गंगाधर गोविंद व रघुनाथ हरि यांस दहा बारा पत्रें पाठविलीं व कारकून पाठविले, परंतु अद्यापि येत नाहींत. कानपुराकडून दोन तीन पलटणें इटाव्यापाशीं उतरोन नरवरानजीक आलीं म्हणोन वर्तमान आहे. चिंता नाहीं. अंतरवेद खालीं आहे.

*ता. २४ मार्च १७८१

तिकडे फौज पाठवून अंतरवेदींत हंगामा करावा हा विचार केला आहे. नजफखान व पातशाहा यांजकडेही पत्रें पाठविलीं आहेत. होईल वर्तमान तें मागाहून लिहिलें जाईल. रवाना छ १२ राखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.*

¶*Mahadji gives Nana details of the surprise attack delivered by the enemy under cover of darkness. He adds that he had, however, continued pursuing the enemy with his harassing tactics.*

No. 147 8th April 1781.

श्री

वडिलांचे सेवेसीं बापूनें† चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १३ रबिलाखर पावेतों मुक्काम नजीक बुढाडोंगर वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असें. विशेष :—इकडील दिनचर्येचें वर्तमान, इंग्रजांचा मुक्काम पचावलीस आहे. श्रीमंत राजश्री पाटीलबावा फौज सुद्धां मुक्काम मजकुरीं आहेत. एकजागां राहत नाहीं. दिवसा रात्रींतून एखाद दुसरें स्थळांतर करीत असतात. इंग्रजानें कूच केलें म्हणजे निकड करून गांठ घालावी हा विचार होत आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें घडून येईल तें खरें. काल चंद्र १२ मिनहूचे दिवशीं रात्रीं इंग्रजांचे कांहीं बुणगे कुलारसाहून त्यांचे लष्करांत येत होते, त्यांवर पेंढारी जाऊन पोंहचले. त्यांनीं दहावीस तट्टें, कांहीं बैल, दोन चार रांडा, याप्रमाणें काल घेऊन आले. परवां सात उंटें कुलारसाहून त्यांचे लष्करांत येत होतीं तीं भरसलीं (भरलेलीं?)—त्या सुद्धां इंगळ्याकडील पेंढारी घेऊन आले. एक डेरा मात्र साऱ्यांनीं पाहिला. वरकड सलिते ‡ कशाचे असतील, काय असेल ते जाणत. याप्रमाणें दिनचर्येचें वर्तमान आहे. रस्त नरवराकडून इंग्रजांचे लष्करांत येणार म्हणून बातमी आहे. त्यावर राजश्री सदाशिव मल्हार बक्षी यांबरोबर दोन तीन हजार फौज देऊन तिकडे रवानगी जाली. मागाहून आणखी फौज पाठवावयाची तरतूद करितात. जालें वर्तमान सेवेसीं निवेदन व्हावें व पुढें होईल तें विनंती करीन. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shivajipant Bapu Vinchurkar gives an account of an encounter between Mahadji and the English near Kolaras.*

---

*बुंदेलखंडांतील या मोहिमेची बरीच नवीन माहिती इंग्रजी ग्रंथांत नाहीं अशी या मराठी पत्रांत सांपडते हें अभ्यासकांचे लक्षांत येईल.

† ल० १४६ ची टीप पहा. ‡ सलिता—उंटावरचा खोगीर.

No. 148 10th April 1781.

पौा छ १७ राखर इहिदे समानीन चैत्र.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ अवगत जाला. आपण घाटाखालें उतरोन गेल्याचें वर्तमान ऐकिलें. त्यास प्रस्तुत मुकाम कोणे स्थळीं आहे? इंग्रजांची बातमी येत असेल. इंग्रेज.....दगा करावयासी चुकणार नाहींत. यासाठीं सावधानी राखोन फौजेचीही हुशारी असावी ह्मणोन लिहिलें, त्यास आह्मी घाटाखालें आलियावरी, एक मुकाम मात्र, मागून फौज उतरून येणें होती यास्तव, तळवटीं केला. दुसरे रोजीं कूच करून बुनगे मागें ठेवून, राजश्री परशरामपंतभाऊ सहवर्तमान, खोपोलीचे आणि पनवेलीच्या मधीं रस्तीयावरी चौक ह्मणोन गांव आहे, त्या स्थळीं येऊन राहिलों. या जागाहून पनवेली पुढें पांच कोस, मागें खोपोली सा कोस आहे. इंग्रजांचे बातमीस कासीद माणसें गेलीं आहेत, आणि सभोंवताल्या रावतांच्याही चौक्या आहेतच. इंग्रजांची रसद पनवेलीस भरत आहे. निमे सिमे भरोती जाली असें वर्तमान, जो कोण्ही तेथून येथें येतो तो सांगतो. पनवेलीच्या तोंडावर इकडील राजश्री पाराशर दादाजी व राजश्री परशरामपंतभाऊकडील लोक मिळोन च्यार हजार फौज मौजे बारवाई येथील तळ्यावर उतरविली आहे. दोहीं तोंडींही सावधानी असे. रा छ १५ राखर. बहुत काय लिहिणें लोभ असों दिल्हा पाहिजे. हे विनंती.*

¶*The writer gives a description to Nana Fadnis of the position of the Marathas and the English at Chauk near Panvel.*

No 149. 17th April 1781.

(शिद्यांनीं हैदरखानास पत्र लिहून पाठविलें त्याची नकल.)

नवाब अजम हैदरआलीखान बहादर सलामहु ताला.

छ सोा मेहेरबान करमफर्माय मुखलीसा बाजद शौक मुलाकात मसरत अयात इत्तीहाद माअसरवाद† येथील खुशी जाणून आपली शादमानी हमेशा कलमी

*हें पत्र कोंकणांतील मोहिमेचें तुकोजी होळकरानें लिहिलेलें असावें. महादजी शिद्याचें नव्हे. †किताब.

करीत जावी. दिगर आ मेहेरबांकडून छ २४ मोहरमचें खत आलें, तें नेकवख्तीं* पोहचून खुसी हासील जाली. नरसिंगराव वकील व एखलासदस्तगाहा कृष्णराव नारायण व इकडील त्रिंबकराव व रास्ते यांजकडील गोविंदराव व गणपतराव पोहचोन मुफसल मजमून मालूम जाला. श्रीमंतांकडील करारनामा व आपले निभावणीचें खत मशारनिले यांणीं दाखविलें. यांत एक दोन कलमांची तकरार होती. याजकरितां श्रीमंतांकडून पाठविण्याचा करारनामा व त्या निभावणीचे पत्राचा मसीवदा ऐसे मशारनिले हुमायाजकडे दिल्हे. त्याप्रमाणें करारनामा व निभा वणीचीं खतें येऊन पोहचतांच सावकाराकडे पैसे पोहचवीत असों, आणि इंग्रेजांकडील मोहिमेस कूच करून जात असों. आज दोन सालांपासून चेनापट्टण-कराचा दोस्तीचा इरादा खुद्द एक पालखी व दाहा जवानांनसीं येण्यास अर्जू. लेकीन जात मकरी† त्याची चाल खुशकींत न व्हावी म्हणोन श्रीमंतांशीं सलूख केला. आह्मी चेनापट्टणाकडे गुंतल्यावर इंग्रेज, साष्टी, जंबूसर वगैरे मकानें देऊन मुदेमाफक कबूल करितील. यास्तव लिहिलें कीं, इकडील मसलत व इतल्या-खेरीज सलूख न करावा. म्हणोन आमोहिबीं‡ कलमीं केलें. ऐसियास आ-मेहेरबांकडील नरसिंगराव वकील श्रीमंत खुदायवंदन्यामत§ यांचे हुजूर असतां सलुखाचा जबाबसवाल करूं लागले. ते वख्तीं आ मेहेरबांकडील कलमांची याद आली, त्याबरहुकूम सरकारांतून करारनामा ठराविला. एक अदवानी वगैरेस इजा न द्यावी इतकें कलम ज्यास्त. वरकड आ मेहेरबीं मंजूर केल्या-प्रमाणें कलमें असतां हालीं दुसरा मसीवदा ठरावून पाठविला, यांत व त्यांत एक दोन कलमांची तफावत भारीच आहे. तेव्हां करारांशिवाय नवी गोष्ट जाली. सरकारचे वचनाची कायेमी कशी आहे हें अंइदजवारांत येईल. एक वख्तीं सलूख व सफाई जाली त्याबरहुकूम निभावणींतच यावें, हे येथील रवेशच|| आहे; आणि ज्या दौलतींत आहादे, शर्त व वचनाची मजबुती, तेच दौलत कायम आहे. तेथें आमदही¶ आहे व खिसाराही‡‡ आहे. लेकिन करारांत अंतर इकडून येणार नाहीं. श्रीमंत साहेबांसी व नवाब बहादूर यांसीं दोस्ती व पक्का सलूख जाला. जुदाई|| राहिली नाहीं. याचा लौकिक अटक रामेश्वरापावेतों जाला. त्यांत जुजका† कामावर नजर ठेवणें हें खानदानास व उमदेपणास लाजम‡ नाहीं. ऐसें जाणून,

---

* योग्य वेळीं. † कुटिल, फंदी. ‡ आप्त, स्नेही. § श्रीमंत.
|| चाल, रीत. ¶ आवक उत्पन्न. ‡‡ नुकसानी. || भेद.
† क्षुद्र. ‡ योग्य.

आमोहिबीं मसविदे पाठविले, त्यांबरहुकूम करारनामा व निभावणीचीं खतें पाठविलीं आहेत. आ मेहेरबां चेनापट्टणाकडे गेल्या आवलच ईजानेब* गुजराथप्रांतीं फौजसह नमूद व्हावें, हें नवाब आ मेहेरबांचे नजरेस यावें ऐसें दिलांत आणून, दरकूच करून येऊन इंग्रेजाचा मोकाबिला आज दीड महिना दररोज लढाईचा मुकदमा होत आहे. अवलचे करारास दोन कलमांची तफावत येती. एक, नवा मुलूख सुटेल तो पट्टणास लगता सबब आ मेहेरबांनीं घेऊन त्याचे माविजा† सरकारचे लगता मुलूक द्यावा. दुसरें पेशकसीचें एक साल कमी पडतें. सरकारांतही पांच साहा सालांचा खिसारा. आपली दोस्ती जाली, सलाह तदबीर एक‡. तेव्हां इकडील खिसारीयाची काळजी आ मेहेरबांस आहे. तेव्हां दोही कलमांची एख्त्यारी आ मेहेरबांवरच सरकारांतून आहे. उमदेगीस लाजीम तेंच आपण करितील. दोस्ती जालियावर दुसरा ख्याल§ काय दिलांत आणावयाचा आहे? करारा-प्रमाणें पैक्याचा भरणा आंमेहेरबां करितीलच. आजीबाद चेनापट्टणाकडे पोक्त सरंजामानसीं जाण्यास दिवसगत न लागावी. अरसा|| न्याहायेत¶ कमी राहिला. इंग्रेजाची जात मकरी. दक्षणेवर त्यांनीं नजर राखिली. एकासीं गोड बोलून एकास खालीं करावें, बाद राहिले तेही कबज्यांत आणावे, असाच प्रकार करून, बंगाला व चेनापट्टणाचा वगैरे दखल केला. त्याबरहुकूम दक्षणची तदबीर करितां त्याचे नजरेवर धुवा आला आहे. त्यास ही विलायत घोडचांची व शिपाई लोकांची आहे. तमाम वतनदार देशमुख व पाटील पटवारी व रयत सर्व शिपाई एका महिन्यांत लाख घोडा जमा करीन म्हटल्यास होईल. तेव्हां टोपीवाले पायेचीं माणसें. त्या गरिबांनीं काय करणें? त्याचें दिन इमान सुटलें, तेव्हां त्यास कमबक्ती आली. ऐसें जाणून खुदायतालाचे फजलनें सर्व साहेब रियासत याचा एका जाला. त्याचे चालीचा नक्ष पक्का जाला आहे. साष्टी व जंबूसर वगैरे मकानें देतों, ऐसें राजकारण आहे. व आणखी लाविल्यासही ते मकरी. सबब दिलांत हा ख्याल येणारच नाहीं. खातरजमा असों द्यावी. एक पालखी व दाहा जवानानिशीं चेनापट्टणकर गोरोंदोज पट्टणास येतो, या भुलथापीवर आमेहरबांनीं नजर न राखावी. जें होणें तें तरफेजच्या सलाह तदबीरनेंच होईल. बाजे मरातब एखलास त्रिंबकराव आपाजी यांसी कलमी केलें, ते जाहीर

* दरबारी पत्रांतील लेखक आपणांस या शब्दानें संबोधितो. † ऐवजी.
‡ सल्लामसलत. § विचार. || अवधि. ¶ अत्यन्त.

करितील त्याजवरून वाज होईल. रा छ २२ राखर. लिहिणें ज्यादा काय ? मोर्तब केलें.

¶*This is a letter from Mahadji Sindia to Hyder Ali describing the Maratha doings in the various theatres of war and mentioning how the English were being overcome all round.*

No. 150 27 h April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—छ २ जमादिलावल शुक्रवारचे दिवशीं दोन प्रहरां श्रीमंत राजश्री पाटिलबावांजवळ बसलों होतों. समय निद्रेचा, बहुतकरून लोकांची भीड नव्हती. आबा मात्र होते. त्यावर खिजमतगारांस बाहेर लावून देऊन बोलूं लागले कीं, आलें वर्तमान तुम्हांस कळवावें, परंतु कशास ? आम्हांस ज्यापक्षीं गरज नाहीं तेव्हां कशास बोलावें ? एक श्रीमंतांसीं भाऊपणा जाला, यामुळें बरें वाईट तें दोघांचें हें समजून बोलावें. परंतु त्याचे अर्थ तेथें कसे निघतील, श्रीमंतांचे चितांत कल्पना काय येईल, याकरितां आमचें बोलण्याचें काम नाहीं. इतकें बोलून उगेच राहिले. त्यावर विनंती केली कीं, काय आज्ञा करणें ती करावी. ज्यापक्षीं भाऊपण्यामुळें बरें वाईट तें दोघांचें असें अंतःकरणीं दृढ आहे, त्यापक्षीं ऐकिलें वर्तमान कां बोलूं नये ? त्यावरून हास्यवदन करून उगीच राहिले. त्याजवर राजश्री पुरुषोत्तम महादेव यांजकडून पत्रें दिल्लीहून आलीं तीं व झांशीहून एका गृहस्थाचें पत्र आलें तें आबांनीं वाचून दाखविलें. मजकूर श्रीमंतांस लिहावा म्हणून आबांनीं आज्ञा केली. त्याउपर चौघे गृहस्थ आणखी आले. मग उठून बिऱ्हाडास आलों. त्यावर राजश्री आबांस विचारलें जे, यजमान व आपण उभयतांच बसून काय बोलणार होते तें कांहींच समजलें नाहीं, याचें कारण काय ? त्यावरून आबांनीं कलमदानांतून चिट्ठी काढून मला दाखविली. कोणी भिक्षुकानें बालबोध अक्षरानें बावांस उगीच सूचना संज्ञिक लिहिलें होतें जे, आपण सिरोंजेवर इंग्रजांचें पारपत्य केल्याचीं वर्तमानें आलीं त्यांचा संतोष हकारपूर्वक* व महिमाजीस† नाहीं. बाह्यात्कारें संतोष मानीत असतात. परंतु

*हरिपंत फडके. †मोठे कर्तृत्ववान, नानाफडणीस.

आंतून उभयतांचा विचार होतो जे, इकडील पलटणांचें पारिपत्य करून त्रिंबक शेटीस शिशुसंनिध ठेवून दुकानचा कारभार आपण करावा. शत्रूचीं पारिपत्यें करावीं. जोंपर्यंत सोबती येऊं न पोंहोचत, त्या आधींच गुंता उरकून टाकावा. एक सोबती सन्निध आहे तितका पक्ष हरप्रयत्नेंकरून तोडून कार्य गांठावें, या विचारांत आहेत. ऐसियास ये समयीं कोणेही प्रकारें आपलें येणें देशीं व्हावें हें उत्तम. नाहीं तर कांहीं विचार ठीक दिसत नाहीं. आपलें अन्न खातों म्हणून सूचना आपणास लिहिली आहे. याप्रमाणें चिट्ठींत मजकूर लिहिला होता. सत्य मिथ्या श्री जाणें. चिट्ठींतील पहिला मजकूर सेवेसीं कळविण्याकरितां विनविलें आहे. श्रुत होय हे विज्ञापना*.

¶S dashiv Dinkar informs Nana Fadnis of Mahadji having received a secret communication from some unknown person mentioning how Nana Fadnis felt awfully jealous of the victories obtained by Mahadji. The news naturally irritated Mahadji.

No. 151 28th April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—चंद्र ३० रबिलावलचीं आज्ञापत्रें सादर जाहलीं डांकेबराबर, ते चंद्र ३ जमादिलाखर गुरुवारीं अवसीचे दिवशीं दोहो घटका रात्रीं पावलीं. त्यांत आज्ञा जे, हल्लींचीं पत्रें डांकेबराबर रवाना केलीं आहेत. जेथवर डांक बसेल तेथवर पावेल. येथून दहा जोडचा पाठविल्या, त्या दहा कोसांवर बसतील. जेथवर पुरतील तेथवर बसतील. पुढें लष्करांतून बसवाव्या. बावांनीं चार जोडचा तैनातीस दिल्या म्हणून तुम्हीं लिहिलें. त्याच जोडचा डांकेंत बसवाव्या. डांक बसवून धना कासीद फडनाईक करून पाठविला आहे, तो तुम्हांकडे पत्र घेऊन येईल. त्यास कागद दस्तकें लागतील ते देवविणें. पत्र दोही दिवसांचे अंतरानें लिहीत जाणें म्हणून पत्रीं आज्ञा. ऐसियासी, धना फडनाईक डांक बसवीत कचनारचे सराईंत बुणगेयांत आला. नव जोडचा डांकेंत उज्जनी-

---

*सांकेतिक पत्र. त्रिंबकशेट कोण असावा ? शिशु म्हणजे पेशवा सवाई-माधवराव असावे. दुकान म्हणजे राज्य. सोबती एक महादजी शिंदे व दुसरा होळकर.

पासून यथपावेतों बसल्या. एक जोडी राहिली ती शाडौरांत बसेल. पुढें बावांनीं चार जोड्या दिल्या, त्या डांकेंत बसविणें म्हणून आज्ञा. त्यास बावांनीं चौ जोड्यांची परवानगी राजश्री आबा चिटणीस यांजकडे दिली. त्यांपैकीं एक जोडी गोवर्धन मिरध्याकडील उज्जनीस पत्रें देऊन सेवेसीं रवाना केली. तीन जोड्या आहेत, त्या डांकेंत बसवावयाकरितां द्याव्या म्हणून आबांसीं बोलून, जोड्या त्यांनीं दिल्या म्हणज डांकेत बसवितों. आतांच लष्करांतून कासीद आला.

रावजीकडे चिट्ठी होती त्यांत लिहिलें होतें जे, इंग्रज कोलाराहून कूच करून शेसई, कोलाराहून तीन कोस उत्तरेस, तेथें मुक्कामास गेला. मागाहून बावांचें कच जालें. शेसईची गढी मातबर आहे. तेथें दाणा बेगमीचा असेल तावदकाळ इंग्रज मुक्काम करील. दाणा तेथील सरला म्हणजे कूच करून सिपरीस जाईल. पुढें पहावें. सिपरीपावेतों लष्कर असल्यास हर प्रकारें डांकेची पुरवणी चालेल. परंतु सिप्रीचे पुढें कूच जालें, तर मग जोड्याही येथून मिळावयाच्या नाहींत व कागद घेऊन डांक निभावयाची नाहीं. जोरतलबी* असेल त्यास हमराहा† याप्रमाणें या मुलुखाची रीत आहे. आतां बुणगे लष्करचे येथें कचनारचे सराईस मुक्काम करून असतां इकडून जाणार सडचा फौजेंत जातात. तिकडूनही येणार येतात. त्यांत कांहीं लुटले जातात. एक सांडणीस्वार राजश्री रावजीच्या सडे स्वारींत पाठविला होता तो गुम‡ जाला आहे. परवांचे छाप्यापासून अशी हवा बदली आहे. कहीवर दांडगे येतात. अशी अवस्था प्राप्त आहे. सिप्रीपावेतों लष्कर असतां डांक चालेल. कमाविसदारांस बावांचीं पत्रें व दस्तकें वाटेचीं घेऊन देतों. सिप्रीपुढें जाणें जाल्यास मग डांक बसावयाची नाहीं. पत्रें निभावायचीं नाहींत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana the arrangements he was making for the despatch of the dawk through the war-zone from Malwa to Poona.*

No 152 April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना. राजश्री रावजींनीं बुणग्याची निवड करून अत्राब§ कारखाना व पांच हत्ती त्यांत कांहीं मस्त¶ जालेत एक दोन ते व दोन तीन म्हातारे कमकुवत

---

*दांडगाई करणारा. †रस्ता खुला. ‡नष्ट. §सोबतीच्या बरोबर. ¶दांडगाई करणारा.

असे पांच हत्ती उज्जनीस रवाना केले. लक्षुमण-बाण* तोफ उज्जनीहून आणविली. ती शिरोंजेस ठेविली होती, ती माघारी उज्जनीस रवाना करविली. बारा तोफा छाप्यांतून वांचल्या होत्या, त्या शहाजापुरास रवाना केल्या. तेथें राहून आज्ञा मागाऊन येईल त्याप्रमाणें त्यांनीं करावें. गोरगरीब फार करून उज्जनीस गेले व जात आहेत. याप्रमाणें सांप्रत काळीं वर्तमान आहे. रावजी व पाटील एक विचार करून श्रीमंत राजश्री बावांचे आज्ञेप्रमाणें कारखाना रवाना केला. पुढें पहावें. छाप्याचे दिवसापासून लोकांचें सत्वच गेलेंसें जालें आहे. लोक इंग्रजांवर झड घालीत नाहींत. यामुळें लोकांवर बावा रुष्ट! लोकांस गुळ नाहीं गुळ से बोल नाहींत, यामुळें ते बावांवर रुष्ट! अशा तऱ्हा आहेत. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें शत्रूचें पारिपत्य घडून येईल तें खरें. पैका नाहीं तो नाहीं, परंतु मानसन्मान शद्धगौरव देखील करणें नाहीं! तेव्हां आमचे जीव कसे झड घालतील, याप्रमाणें बोलत असतात. या गोष्टी मुख्यांचेही श्रवणीं गेल्या आहेत. यापुढें कोणती तऱ्हा करतील पहावें. जालें वर्तमान सेवेसीं निवेदन व्हावें. पुढें होईल तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the increasing tension between Mahadji and the men fighting under him.*

No. 153 April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—इंग्रजांबरोबर खरें खुरें सामान किती आहे हा शोध घेऊन लिहिणें म्हणून श्रीमंतांची आज्ञा. त्यास, इकडील बातमीदार जातात येतात त्यांच सांगण्याचें प्रमाण नाहीं; आणि इंग्रजांचे लष्करची कैद भारी. बाहेरील माणूस बहुतसें त्यांचें लष्करांत जाऊं पावत नाहीं. तत्रापि कोणी एखादा जाऊन येतो. तो तहकीत आपले बुद्धीनें सांगतो. ती बातमी व तुरुक स्वार वगैरे माणसें इंग्रजांचे लष्करचीं धरलीं आहेत त्यांचे सांगण्यांत, सहा पलटणें इंग्रजांचीं, दोन गोहदकराची कुमक, एकूण आठ पलटणें, चौदा तोफा, तीन गरनाळा, दोनशें तुरुक स्वार इतका जमाव खरा खुरा आहे, म्हणून बातमीदार सांगतात. त्यांची बातमी व इंग्रजांकडील धरलेत, सांपडलेत, कोणी आपले बुद्धीनें उठोन पळोन आलेत, त्यांचे सांगण्यांत याप्रमाणें आहे. इकडील दहा तोफा,

---

*लक्ष्मणबाण हें तोफेचें नांव.

एक गरनाळ एकूण अकरा. व खंडेराव हरि यांकडील तोफ एक, एकूण बारा तोफा वगैरे छाप्याचे दिवशीं माणसें, गाडीवान, भिस्ती, कोणी वाणी असे धरून नेले होते, ते लष्करांत येऊन तेथून सोडून दिले. त्यांचे सांगण्यांतसदरहू प्रमाणें जमाव आहे. आणखी दोन पलटणें रसद घेऊन सिप्रीनजीक आलींत. त्याबरोबर आठ तोफा आहेत. म्हणून सदोबा भाऊ कडील चिट्ठींत लिहिलें होतें. त्यासुद्धां इंग्रजांचा जमाव पाहतां, दहा पलटणें, कंपेष पस्तीस चाळीस तोफा, इतका जमाव जाहला. विना हल्ल्याचे लढाईखेरीज त्यांचें पारिपत्य घडेलसें दिसत नाहीं. कोणी कोणी असेंही सांगतात कीं, इंग्रज ग्वालेरीस जातो. दिवस उष्णकाल या मुलखांत भारी. यामुळें माघारा फिरोन ग्वालेरीस जाणार. कोणी म्हणतात कीं, सिप्रीस जाऊन तेथें छावणीचे डौल घालणार. याअन्वयें बातमीदार सांगतात. कुलारसाहून कूच जाहल्यावर कळेल त्यासारखी विनंती करीन.

राजश्री रघुनाथ हरि झांशीकर यांजकडून वकील पाटिलबावांकडे बोलावयास आला आहे. त्याचें बोलणें जे, आम्ही सर्व प्रकारें खराबींत आलों. पैका पदरीं नाहीं, यामुळें फौजेंत बंद नाहीं. याकरितां लाचार होऊन राहिलों. आतां येणार आहेत. पत्रें त्यांचीं बावांस आणलीं होतीं तीं देऊन, त्यांचीं उत्तरें येण्याविषयींचीं घेऊन वकिलानें झांशीस रवाना केलीं आहेत.

राजश्री शिवाजी नारायण महेश्वरास होते, ते सांप्रत सागरास राजश्री विसाजी गोविंद यांजकडे पाठविले आहेत. त्यांचीं पत्रें येतात. विसाजीपंतांकडील कांहीं फौज होती तेही दिसत नाहीं. विसाजीपंत मंडल्याकडे गेले.

राजश्री गंगाधर गोविंद व बाळाजी गोविंद यांजकडे व दतियेकराकडे, आनंदराव देशमुख यांनीं दिवाण निाा भगीरथराव शिंदे यांस पाठविलें. त्यांचीं पत्रें आलीं होतीं कीं, दतियेकर मात्र यावयाकरितां मुहूर्तेंकरून डेरेदाखल जाहले आहेत. वरकड गंगाधरपंत व बाळाजीपंत यांकडील कोणी येतां दिसत नाहीं. दतियेकर डेरेदाखल जालेत, ते कधीं येतात तें पाहावें.

पातशाहा व नजफखान यांकडे दिल्लीस मीर अलीनकीखान यांचे पुत्राची रवानगी जाहली. ते गेले. स्वारी या प्रांतीं आली आहे. इंग्रजांसीं गांठ पडोन लढाया होतात. या समयीं आपणाकडील कांहीं फौज इंग्रजांचे पारिपत्यास येऊन सामील व्हावी. इकडील इंग्रजांचें पारिपत्य जाहलें म्हणजे अंतरवेदीहून बंगाल्यापावेतों इंग्रजांचे मुलखांत जरब पोंहचवून पारिपत्य करावयास येईल, याप्रमाणें

बोलावयास पाठविलें आहे. सारांश, या समयीं कांहीं त्यांकडून फौज यावी याकरितां पाठविलें आहेत.

जालमसिंग कोटेकर शहाबादेस येऊन राहिले आहेत. येणार म्हणून पत्रें येतात जातात. येतील तेव्हां खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the actual strength of the British forces. He also mentions the number of the allies of Sindia.*

No. 154 April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—इंग्रजांस कुमक तीन पलटणें व नऊ तोफा व पांच हत्ती याप्रमाणें कानपुराहून आले. त्यांचा मुक्काम कंचीसराय, नरवरापुढें अठरा कोस, तेथून काशीद सोडून आले. ते कुमक या पलटणास येणार. सांप्रत ज्या पलटणांची गांठ आहे त्यांचे पारपत्याची तरतूद ईश्वर घडवीत नाहीं. आणखी कुमक आल्यानंतर पुढें कसें होईल तें पहावें.

गोहदकराचीं दोन पलटणें गेलीं म्हणून दोन चार बातम्या बावांकडे आल्या. त्यावरून पूर्वी विनविलें होतें तेंहीं वर्तमान लटकें. या उपर जातील तर नकळे. प्रस्तुत आहेत.

दतियेकर यांजकडे राजश्री आनंदराव देशमुख माजी दिवाण निसबत भगीरथराव शिंदे यांस रवाना केलें. त्यांचें पत्र आलें होतें कीं, दतियेकर यावयास मुहूर्तेंकरून बाहेर निघाले आहेत, लवकरच येतील.

बावांकडील तोफा इंग्रजानें नेल्या त्यांपैकीं कांहीं मोठ्या तोफा व चार पांच हत्ती कुलारसांत गढीचे आसऱ्यानें दोन पलटणें रखवालीस ठेवून ठेविले आहे, हे बातमी बावांजवळ आली. त्यावरून बापूजी मल्हार निसबत आंबोजी इंगळे यांबराबर दोन हजार फौज देऊन कुलारसावर रवाना केले. गोसावी दोन हजार व बैरागी हजार त्यांचे कुमकेस दिले. ते आज मागील दीड प्रहर रात्रीं येथून गेले. त्यांनीं एक पेठ कुलारसाची जाळली. त्यावर तोफा चालों लागल्या. पंचवीस गोसावी व दहा बैरागी वर पडले. कांहीं बारगीर, शिलेदार पडले. कुलारसाजवळ राहिले आहेत. यांजवळ तोफा नाहींत. आंतून इंग्रजांकडून तोफा चालतात. तेव्हां हल्ला करतील किंवा माघारे फिरतील पाहावें. कुला-

रसापलीकडे राजश्री सदाशिव मल्हार बक्षी, चौपांचा कोसांवर, नरवराकडून रस्त येणार त्या बातमीवर आहेत. त्यांसही चिट्ठी बावांची गेली कीं, तुम्ही व बापू मल्हार सामील व्हावें. त्यांची त्यांची भेट जाल्यानंतर काय विचार ठरून घडोन येईल ते विनंती करीन.

ग्वाल्हेरीचें वर्तमान पूर्वी बुणग्यांतून विनविलें होतें. त्यावर सडे स्वारींत आलों. येथून बावांनीं शोध आणावयाकरितां माणसें पाठविलीं होतीं. शोध आला. तें वर्तमान लटकें. इंग्रज तेथें आहे तो बहाल आहे.

गोहदकराचा वकील बावांकडे बोलावयास आला होता जे, कोणी मातबर आपल्याकडील पाठवावा. त्यावरून गिरमाजी मल्हार यांस तिकडे पाठविलें.

राजश्री खंडेराव हरि यांची रवानगी भेलशास जाली. तेथून दोन तोफा मातबर आहेत त्या काढायास सांगितल्या. शहाजापुरास पाठविणार.

भुपाळकराचे दोन अडीचशें स्वार बावांकडे कुमक आले होते. त्यांनीं बोलणें लाविलें कीं, आम्हांस ठेवितां तर खर्चास द्या, नाहीं तर निरोप द्या. ह्यावरून खंडेराव हरि या बरोबर रवाना केले. एकूण गेले. इंग्रजांस कुलारसाहून घाट दूर होता. कुलारसापुढें भाऊ बक्षी फौज घेऊन रस्तेचे वाटेवर राहिले होते. त्यावरून रणोदचे सुमारें भुम्यांनीं कूच करविलें. रणोद कसब्यांत दाणा पुष्कळ व तेथून खोडची घाटी दोन तीन कोस. तिकडून नरवर जवळ. आधीं रणोद कसब्यांतच गल्ला फार आहे सांगतात. दुसरें, रस्त यावयास खोडची घाटी मोकळी, तेव्हां भक्षायास मिळेल. आठ पंधरा रोजांची निश्चिति आहे. तों कुमकही तीन पलटणें नव तोफा येतात. तेही खोडच्याच घाटानें येतील किंवा कोणे मार्गानें येतील. ते आल्यानंतर इंग्रज विचार काय करतो, मागें फिरतो किंवा घाट उतरून झांशीकडे जाईल हें कळत नाहीं. बातमी पुरती येत नाहीं. त्याचे लष्करांतून तथ्य बातमी कोणी घेऊन येत नाहीं. इंग्रजांचे लष्करांत कैद भारी. नवे माणूस आढळल्यास, बातमीदार असेल असें जाणोन पारपत्य देहान्त करितात. त्या दहशतीनें कोणी लष्करांत जात नाहीं. कुमक आल्यावर कूच करील तेव्हां विचार समजेल. गुबार* भारी दिसतो. माघारा न फिरावा यांतच उत्तम. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar describes the relative position of the British and the Maratha armies near Kolaras together with their present intentions and movements.*

*संशय.

No. 155 Last week of April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—तुम्ही चोहींकडील बातमी चांगली राखीत नाहीं. गोविंदराव गायकवाडाचें वर्तमान आम्हीं तुम्हांस श्रावणमासीं लिहिलें होतें, त्याचीं उत्तरें आलीं. ते गोविंदराव हल्लीं दावडीस पंधरा रावतांनिसीं येऊन दाखल जाहले. तसेंच राजेरजवाडे अलीकडे लिहिलेत त्यांचेंही हल्लीं लिहिल्यावरून कळलें. गोसावी व बैरागी व आगऱ्याचीं चार पलटणें यांचें मात्र वर्तमान यावयाचें तेंही येईल. अद्याप तरी राजेरजवाडे इकडे आले व कोण येणार कोण व इंग्रजांस मिळाले कोण व मिळणार कोण ही पक्की बातमी घेऊन लिहून पाठवावी. शिवाजी विठ्ठल, बळवंतराव धोंडदेव, पवार मिळाले. उत्तम जाहलें. परंतु यांची फौज किती हा शोध घेऊन लिहून पाठवावें. दिनचर्येचें वर्तमान बारीक. शोध घेऊन लिहीत जावें. म्हणून श्रीमंतांनीं आपले नांवें पत्र सादर केलें तें श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस दाखऊन विनंती केली कीं, उज्जनीस असतां आंबोजी इंगळे यांबराबर अमके गोसावी आठ हजार व बैरागी चार हजार व खेची राजा पांच हजार याप्रमाणें जमाव जाहला, लिहून पाठवावें त्या आज्ञेप्रमाणें पुण्यास पत्रें गेलीं. हल्लीं हें पत्र श्रीमंतांनीं लिहिलें. याचा भाव ध्यानांत आलाच असेल. त्यास जितकें दृष्टचावलोकन असेल तितकें समक्ष पाहून लिहावें. दूर असेल तें आपणास विनंती करून, पुसून आज्ञा होईल त्याप्रमाणें श्रीमंतांस लिहीत असावें. याअन्वयें पत्रें श्रीमंतांस जात गेलीं. त्या बातम्या साऱ्याच पोकळ निघाल्या. यामुळें शद्ध आम्हांकडे श्रीमंतांनीं लिहिला. त्यावरून बोलले कीं, गोसावी बैरागी व खेची येऊन इंगळचाकडे सामील होणार होते, याकरितां तुम्हांकडून लिहविलें त्यावर इंगळे याजवळ जथ पडत नाहीं हें समजून स्वारी इकडे आली. सांप्रत गोसावी अडीच हजार व बैरागी हजार नवशें व खेची राघोगडकर बारा तेराशें स्वार व कांहीं चार पांचशें माणूस पायींचें यांखेरीज चंदेरीवाले दीड हजार स्वार, सात आठशें प्यादे व सांप्रत सिमथरकर गुजर हजार स्वार व तीन चारशें माणूस पायींचें याप्रमाणें हजारीं गणती आहे. इतके येऊन सामील जाहले. राजा जलमसिंग हाडे कोटेकर शहाबादेस आले. सरंजाम चांगला पोक्त सांगतात. आल्यानंतर कळेल. दतियेकर येणार. गोहदकराचा वकील आला होता. इकडे

येतो म्हणतात. त्यावरून गिरमाजी मल्हार त्याकडे रवाना केले आहेत. आल्यानंतर कळेल. याप्रमाणें बोलले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana how Sindia's strength was being increased by the arrival of fresh allies.*

No. 156 30th April 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—जालमसिंग हाडे कोटेकर येथून पांच कोसांवर आले आहेत. उदईक छ ७ मिनहूस भोमवारीं बावांच्या त्यांच्या भेटी होणार. सरंजाम त्यांचा चांगला आहे म्हणून सांगतात. येथें आल्यानंतर दृष्टीस पडेल. राजश्री गंगाधर गोविंद व रघुनाथ हरि व दतियेकर वगैरे एकूण सारे मिळून पांच सात हजार फौज झांशीहून निघून इकडे यावयाकरितां एक मजल सात आठ कोस आले आहेत, म्हणून बातमी आली. पत्र कोणाचें आलें नाहीं. तेथें आलेंच असेल तर आज उद्यां पत्रें येतील.

राजश्री पुरुषोत्तम महादेव यांचीं पत्रें दिल्लीहून आलीं, तो मजकूर छ ३ मिनहूचे रवानगींत विनविला आहे. त्यावरून पातशाहा नजफखानाकडील मसलतीस सामील होऊन इंग्रजांचें पारिपत्य व्हावयाचा अर्थ ध्यानांत आला असेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the arrival of Zalim Singh of Kotah as an ally of Sindia.*

No. 157 2nd May 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना. इकडील वर्तमान छ ६ मिनहूचे दिवशीं डांकेबराबर विनंती पत्रें सेवेसीं पाठविलीं त्यांवरून निवेदन जालें असेल. मसलतीचा विचार पुढें काय कर्तव्य योजला आहे तो कांहींच लिहीत नाहीं, अशी कल्पना चित्तांत येईल. त्यास, मसलत करण्याचे अर्थ कालचे पत्रीं विनविले आहेत, त्यांवरून ध्यानास आलेच असतील. जालमसिंग हाडे कोटेकर आल्यानंतर एखादी मातबर लढाई

करावी अशी योजना करीत होते. तेही आले. भेटी त्यांच्या यांच्या काल जाहल्या आज उदईक खलबत होऊन बोलणें काय होईल तें कळल्यावर विनंती करीन. त्याचे मतें कांहीं तोफा बावांनीं आणवाव्या. त्यावरून तीन चार तोफा सराईस आणून ठेविल्या आहेत. आज उद्यां सल्ला काय ठरते पाहावें. इंग्रजांस मराठ्या फौजेचें भय अंतःकरणीं नाहीं. यांनीं लढाईस जावें तर यांजपासीं तोफा नाहींत. इंग्रजांजवळ तोफा! तेव्हां त्यांचा मुक्काम असतां यां यानें कांहीं मातबर लढाई होईल असा अर्थ नाहीं. कूच जाल्यावर चालते स्वारींत लढाईची तरतूद व बाणांची मारगिरी करावी, तें एक दोन वेळ जालें, तेणेंकरून पारपत्य होत गेलें. तें वरचेवर विनवीत गेलों. एके दिवशीं बावांस विचारलें कीं, इंग्रज तर सिप्री कोलारस धरून राहिला. भक्षायास मिळत नाहीं म्हणावें, तर एक एक पलटण वेगळालें जाऊन, भुम्याचे माहितगारीनें रस्त आणीत असतात. आपली फौज उपाशीं मरते. यांस पैका नाहीं! तेव्हां पुढें कसी तरतूद योजली? नित्य बातमीचें वर्तमान मात्र जात आहे. परंतु मसलतीचा विचार काय योजला? इंग्रज ग्वालेरीकडे गेला तर आपले छावणीची तरतूद कोणे स्थलीं योजली? कदाचित् गोहदकर येऊन त्यांस सामील जाला, किंवा इंग्रज सिप्री कोलार धरून रा ि ला, तेव्हां आपण मसलत काय योजली? श्रीमंतांस काय विनंती त्याहावी? याचें उत्तर केलें कीं, इंग्रज ग्वालेरीकडे गेला तर त्याचेमागें आपणही जातच आहों. मग चिंता नाहीं. इकडे सिप्री कोलार धरून राहिला, तर याच प्रांतीं भेलशाचे सुमारें अगर अहिरवाडचांत छावणी करणें प्राप्त. गोहदकर येऊन इंग्रजांस मिळाला तर पुढें काय विचार? तेव्हां याचें उत्तर केलें कीं, मसलत आहे. पाहावें. श्रीमंतांचे पुण्येंकरून काय घडेल तें खरें. छावणीस या प्रांतीं राहणें जालें तर मोठा पेंच पैक्याचा आहे. पैका नाहीं यामुळें लाचारी आहे. ग्वालेरीकडे गेलें तर पैकाही मिळेल, फौजही जमा होईल, मग चिंता नाहीं. इकडे राहिल्यास अडचण. असो. छावणी तर महिना दीड महिना राहिली आहे. तोंपावेतों काय घडतें तशासारखा विचार. इतक्यांत मसलतीचा निश्चय काय लिहावयाचा? तूर्त लढाई रोबकार* रात्रंदिवस आहेच. इंग्रजांचे डौल छावणीचे कोणे सुमारें होते त्या सारिखा पुढें विचार ठरेल, त्याप्रमाणें श्रीमंतांस त्याहावयास येईल. याप्रमाणें उत्तर जालें. सारांश, सांप्रत दिनचयचे लढाईचाच प्रसंग होत आहे. याउपर छावणीचे सुमारास इंग्रज कोणीकडे जातो, गोहदकर

*समक्ष, पुढें ठेपलेली.

इंग्रजांकडे येतो, किंवा यांजकडे येतो, हे सारे विचार दृष्टीस पडल्यानंतर, यजमान व कारभारी मिळोन काय मसलत ठरावतात, कसा विचार करतात, तेव्हां कळेल. प्रस्तुत यजमान एके स्थलीं, भाई एके स्थलीं, दिवाणजी बुणग्यांत, याप्रमाणें आहेत. जालमसिंग आले. बुंदेले आले. खेची, चंदेरीकर, सिमथरकर, दतियेकर हे सारे आले. याउपर आतां या प्रांतीपैकीं यावयाचे बहुतकरून एक गोहदकर राणा मातबर. तो कोणीकडे स्नेह करतो कळेल. बावांचे अंत:करणीं एक वेळ मातबर लढाई करावी. हडडे आले म्हणजे निश्चय लढाईचा करावा. त्याप्रमाणें हाडे, बुंदेले, झांशीकर, खेची, चंदेरीवाले, सिमथरकर, दतियेकर सारे मिळाले आहेत. यापुढें विचार ठरून होईल वर्तमान तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar conveys Mahadji's message to Nana that the cantonment of the Maratha army for the monsoon was not yet determined and that it would depend upon the movements of the British.*

No. 158 13th May **1781.**

(आपाजी रामाचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे. श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांनीं मला व गंगाजीस बोलावून दरबार बरखास्त करून आपण व आबा उभयतां बसून बोलूं लागले, कीं मसलत इंग्रजांची देशींही आहे, त्यास देशीं इंग्रजांचीं पलटणें किती व इकडे इंग्रजांचीं पलटणें किती ? देशीं दहा पलटणें त्यांजवर लढाईचा सरंजाम, सरकारची हुजरात व होळकर व परशरामपंत भाऊ वगैरे एकूण पंनास साठ हजार फौज व शिवाय दहा हजारपावेतों गाडदी याप्रमाणें सांप्रत जमा असतां इंग्रज बोरघाट चढून वरता आला, त्याचे पारिपत्याचा विचार मसलतीवर पडला. इकडे सांप्रत चौदा पलटणें, कंपेश चाळीस पावेतों तोफा, यांखेरीज काल्पीकडून चार पलटणें आणखी येणार. तेव्हां देशच्या पलटणांची दुप्पट मसलत प्राप्त आहे. आमचा सरंजाम सांप्रत पंधरा हजार फौज बराबर आहे. याशिवाय दोन तीन हजार पेंढारी. इतक्या सरंजामानें सिरोंजपासून कोलारस-पावेतों इंग्रज मारीत आणले. प्रताप श्रीमंतांचा. त्या उपर छाप्याचा प्रकार जाला. तेव्हांपासून इंग्रज आपले जागां हुशारी मानून, मागाहून चार पलटणें

कुमक येऊन पोंहचली व आगखी काल्पीकडून पलटणें येणार. या मसलतीचा विचार कसा करावा ? पैका नाहीं, मसलत या प्रकारची येऊन पडली. छावणीचे दिवस आले. इंग्रज सिप्री, कोलारस धरून राहिला, तेव्हां आपलीही छावणी या प्रांतीं इंग्रजांचे मुकाबल्यावर होऊन, देशीहून आणखी दहा बारा हजारपावेतों फौज चांगली बोलावून बाद बरसात पलटणांचें पारिपत्य करावें याचा विचार कसा करावा म्हणून बोलले. त्याचें उत्तर केलें कीं, आजपावेतों देशी पलटणांवर लढाया जाहल्या, तेंही वर्तमान वरचेवर येतच जावें. गाडर बोरघांट चढून अडचणीचे जाग्यांत राहिला, तेथें फौजेचा इलाज नाहीं. मैदानांत येता, तर पारिपत्य श्रीमंतांचे पुण्यप्रतापें यथास्थित घडतें. आश्विन मासापासून आपले निश्चय देशीं जाण्याचे होत गेले, त्याप्रमाणें पत्रें गेलीं आलीं. शेवट आपणच म्हणों लागले कीं, सिप्रीवरील पलटणांचें पारिपत्य करावयास एका महिन्याचें काम आहे, तें उरकून मग देशीं जावें. शेवट याच विचाराची दृढता आपली दिसून आली. त्यावरून नाना आपल्यासीं असेंहि बोलले जे कोणते मसलतीस निघणें तें लवकर निघून मसलत आटोपावी. त्यावर आपलीं उत्तरें अशींहि होत गेलीं कीं आंबोजी इंगळे व बक्षी पाठविले आहेत. यांची पलटणांची गांठ पडून यांनीं पलटणांस रेटलें तर उत्तम जालें; नाहीं तर आपण जाऊन महिन्या पंधरा दिवसांत पलटणांचें पारिपत्य करून देशीं जावें. असे विचार करितांच रिकामे दिवस चार पांच महिने उज्जनीस घालविले. शेवट देशींहि जाणें जालें नाहीं व इकडेही निघणें जालें नाहीं. तेव्हां म्हणाले कीं आम्ही इकडे निघावयास बहुत वेळ नारोपंत नानासीं बोललों, परंतु त्यांची चिकाटी देशीं चलावयाविषयींची भारी दिसून आली. या.....मुळें फौजेचाही सरंजाम मातबर न जाहाला. तुम्ही आम्हांस कोणेहि प्रकारें मसलतीवर घालवून आपण स्वच्छ उज्जनीस बसले. याचें उत्तर केलें कीं, इकडे पलटणें किती आलीं आहेत याची बातमी देखील आपणास नव्हती. चार पलटणें आहेत. बहुतकरून इंगळे व बक्षी यांनींच पारिपत्य करावें. नाहीं तेव्हां आपण जाऊन एका महिन्यांत गुंता उरकून देशीं यावें असें आपणच बोलत होते. शेवट मसलतीस निघणें होईना, याकरितां एक रोजीं दाजी* आपणांस असेंहि बोलले कीं, राग आल्यावांचून कोणतेंही कार्य घडत नाहीं. आम्हीही छातीच करितों जे आपणास राग यावा आणि धन्याची चाकरी घडून शत्रूचें पारिपत्य व्हावें. अशी भवति न भवति उज्जनींत पांच

*नारो शिवदेव.

सहा महिने होत गेली. त्यावर महेश्वरास जाऊन पुन्हां स्वारी उज्जनीस आल्यावर, तेव्हां बातम्या आल्या जे, पलटणें चाल करून भेलशास येणार. तेव्हां आपण तेथून निघाले याचा शद्ब आम्हांवर काय ? तेव्हां बोलले जे, होणार त्यासारखें घडत आहे. आतां मसलतीचा विचार आपण आम्हांस पुसतात. यांतील क्षेत्रफळ काय योजिलें आहे तें बोलावें. वरकड मसलतीचा विचार आम्हांस पुसावासा काय आहे ? उज्जनींत आठ महिने विचार होत होते, तेव्हां आमचे सांगितल्याप्रमाणें ऐकिलें ! अशी भवति न भवति बोलण्याची होऊं लागली. तेव्हां म्हणाले कीं देशीं गेलों असतों, तर तिकडून यावयाचा विचार होता हें समजलेंच होतें ! महेश्वरास जातांच वर्तमान इंग्रजांस देशीं जातात हें कळलें, म्हणून सिप्री घेऊन चाळीस कोस शिरोंजपावेतों चाल करीत आला. जर देशीं गेलों असतों तर मागोमाग अम्मल बसवीत देशींच येता. बरें जालें जे, लवकर इकडे येऊन गांठ घातली. यांनीं कलकत्यापासून आंतरवेदीचे मार्गानें माळव्यांतून देशीं जाण्याचा रस्ता बांधिला. ही वाट त्यांची देखिलीशी जाली. यावें उत्तर केलें कीं पलटणें येतात यांचें पारिपत्य जाल्याखेरीज रस्ता बंद कसा होतो ? रोबकार पलटणें आलीं आहेत. यांचें पारिपत्य यथास्थित जाल्यास फिरून या मार्गाचें नांव कोणी घ्यावयाचें नाहीं. इंग्रजांचे मुकाबल्यावर छावणी या प्रांतीं करणें प्राप्त. पैक्याची अडचण म्हणून आपण म्हणतात. याचा अर्थ कीं सरकारांतून कांहीं उपराळा व्हावा त्यास सरकारांत पैका आहे नाहीं हें आपले ध्यानांतच आहे. येविषयीं श्रीमंतांनीं आपणांस देखील दोन चार वेळां पत्रें लिहिलीं. त्यांचीं उत्तरें देखील येथून गेलीं नाहींत. याउपर आबांशीं बोलले कीं, तुम्हीं यांसीं एकांतीं बसून बोला. त्यावरून ते बोलूं लागले, कीं सरकारांत अडचण तो प्रकार समजलाच आहे, परंतु ही एक तोड योजिली आहे. सविस्तर राजश्री नानांस* उज्जनीस लिहून पाठवावें. त्यांचें जाणें पुण्यास जाल्याखेरीज कांहीं घडत नाहीं. त्यावरून त्यांस म्हटलें कीं, तुम्हीं सविस्तर अर्थें यजमानाचे नांवें पत्र लिहावें, तें उज्जनीस पाठवितों. उत्तर पाठवितील तें प्रविष्ट करीन. त्याउपर फिरून बावांपासीं आलों. आबांनीं त्यांस सांगितलें कीं, हे म्हणतात नारोपंत नानास बावांनीं आपलें पत्र सविस्तर मसलतीचे अर्थ लिहावे. त्याचें उत्तर लिहून पाठवितील. त्यावरून बावा बोलले कीं, आम्ही तुमचे पत्रांवर हवाला देऊन लिहितों. सविस्तर मजकूर तुम्हीं लिहिणें. त्यावरून त्यांचे विचारें मसुदा

*नारो शिवदेव यास.

जाहला. याप्रमाणें सेवेसीं पत्रें विनविलीं आहेत. उत्तर येईल तें विनंती करीन. कच्चें वर्तमान निवेदन जालें पाहिजे याजकरितां इतकें तपशिलेंकरून लिहिलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

सेवेसीं गंगाजी आव्हाड कृतानेक विज्ञापना. सविस्तर पुरवणी पत्रें निरनिराळीं विनविलीं आहेत. मनन होऊन उत्तरें येतील त्याप्रमाणें यांसीं जाबसाल करूं. कच्चें वर्तमान सेवेसीं निवेदिलें आहे. येथील सर्व अर्थ ध्यानांत आहेच. उत्तरें पाठवावयाविषयींची आज्ञा लवकर व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

(तारीख चंद्र १८ जमादिलावल प्रातःकाळची रवानगीची तारीख लखोटचावरी होती.)

¶ *Appaji Ram reports to Nana his long conversation with Mahadji reviewing the operations in the north and in the south and comparing the results obtained so far in each sphere.*

No. 159 16th May 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री बाळारावजी चंद्र २१ जमादिलाखर गुरुवारचे दिवशीं सूर्योदयीं येथें येऊन, श्रीमंत राजश्री पाटीलबावा निजलेच होते तों पलंगाजवळ जाऊन बसले. त्यावर बावा उठल्यानंतर, दरोबस्त खिजमतगार देखील बाहेर काढून देऊन, आसपासचे तमाम लोक दूर दूर करून, उभयतांचें खलबत सहा घटका दिवस आला तोंपर्यंत जाहलें. रावजींनीं बिन्हाड राजश्री शिवाजीपंत बापू यांचे गोटांत छाया पुष्कळ, त्यांनीं मंडप वगैरे केले आहेत, येतांना तेथें जागा चांगली पाहिली होती, त्या जागेवर राहावयास गेले. त्यावर येथून तमाम लष्करची मंडळी भेटीस गेली. मी व गंगाजीही भेटीस गेलों होतों, परंतु लोकांची दाटी होती म्हणून कांहीं निघालें नाहीं. परस्परें उभयतांचे खलबताचा शोध केला कीं, कोणे रीतीचीं बोलणीं जाहलीं, सिद्धांत काय ठरला? त्यास बकार पूर्वकांनीं* ये कामांत बारांजवळ येथील बोलण्याचे भाव सांगितले कीं, यजमानासीं बोलणें जाहलें. प्रथम यजमानांनीं प्रश्न केला कीं, मसलत या रीतीची येऊन पडली; पैका नाहीं; लोक उठोन जावयाचे लागास आले आहेत; लोक उठोन गेल्यावर आपण कोणत्या ऐवजावर येथें राहून मसलत

*बाळाराव यांनीं.

करावी ? तेव्हां सहजच दौलत पेचांत आली, असा प्रसंग येऊन पडला आहे. बारांतील विचार सर्व तुमचे ध्यानांत आहे. तुमचें शरीर प्रतिकूळ यामुळें सारी मेहनत माझे जातीवर. अशानें दौलत चालावयाचा परिणाम काय ? याचा विचार पुढें कसा करावा ? त्याचीं उत्तरें केलीं कीं, मसलत आपण कबूल केली, तेव्हांच आम्हीं विनंती केली होती कीं, हिंदुस्थानची मसलत आपण एकटया जातीवर कबूल करावयाचा प्रसंग नाहीं. आपला विचार आपले ध्यानांत आहे. श्रीमंत राजश्री नानांनीं आपणास देशीं बोलाविलें व राजश्री नारो शिवदेव आपणांसीं बोलतच होते कीं, ज्यापक्षीं आपली मर्जीच इकडील मसलत कबूल करावयाची आहे, त्यापक्षीं वरचेवर देशीं जाऊन नानांची आपली भेट जाहल्यानें परस्परें स्वच्छता होऊन जनापवादही दूर होईल, व त्यांचे आपले समक्ष ज्या मसलतीचे करण्याचा ठराव होईल त्या मसलतीवर जावें, यांत आपली नुकसानी काय होती ? तें मर्जीस न आलें. आपण म्हणतील कीं, आम्ही देशीं गेल्यावर आमचें येणें घडतेंना. तेव्हां माळवा जाता. मग कोणत्या ऐवजावर गोष्ट घडावी ? त्यास माळव्यांत पलटणें येऊन माळवा घेते, याचें निमित्य तुम्हांकडे तर लागतें ना. इंग्रजांची चाल जरब पाहून, तुमचे मनोदय रक्षून इकडील मसलतीवर पाठविते. तेव्हां सहजच पुरवणी त्यांस करावी लागती. व त्यांनीं न केली असतां तुम्हांसही बोलावयास जागा होती. ते आतां राहिली आहे कीं काय ? असो. जाहलें तें समर्थ. आपण इकडे पलटणाच्या पारिपत्यास आले. शिरोंजेवर पलटणांसीं गांठ पडून श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें व तुमचे साहेबाचे आशीर्वादानें ते पळाले; तुम्हीं पाठलाग त्यांचा करीत दोन तीन मजली आलां. इंग्रजांस तुमची दहशत गालीब* पडोन त्यांचा कदम दिवसोंदिवस मागें सरला गेला. त्यावरून आपण हावभरी जाहले. तेव्हां ही विनंती केली कीं, आपण सिंदनदी उतरून पुढें एकाएकीं जाऊं नये. फौजा पलटणापाठीमागें लावाव्या. फार जाहलें तर भाईबरोबर सरंजाम देऊन इंग्रजापाठीमागें लावावे. या दाबाखालींच इंग्रज ग्वालेर प्रांतीं जाईल, अथवा न गेला तर पुढें काय विचार करतो हें समजेल, त्यासारखा विचार करून करणें तें करावयास येईल. तेव्हांही ऐकिलें नाहीं. त्यास या गोष्टीचा शद्ध मजकडे आहे कीं काय ? आतां मसलत जड जाहली, आपले फौजेस पैका नाहीं व इतक्या फौजेनें पलटणांचें पारिपत्यही पुर्तेपणें होत नाहीं. दिवस छावणीचे आले. तेव्हां या प्रांतीं छावणी करून जवळ फौज

*जबर.

आहे यांस पैका देऊन, आणखी फौज देशीहून दहा हजारपर्यंत आणून बाद बरसात पलटणांचें पारिपत्य करावें. यास पैका पाहिजे व मेहनतीस माणूस एखादा पाहिजे. त्यास जो करील तो धन्याचे दौलतीवरच करील. पैका सावकार देईल तोही धन्याचेच दौलतीवर देईल. माझें शरीर प्रतिकूळ, एव्हडी गोष्ट उघडीच आहे. जेणेंकडून दौलतीस उपयोग पडत असल्यास माझा आग्रह नाहीं. दिवाणगिरीचा अभिमान म्हणावा तर मला आपण दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं नाहींत. काम जें मला सांगितलें तें केलें व पुढेंही आज्ञा कराल तें करीन. माझे पदरीं संग्रह किंवा पुढें हव्यास कोणासाठीं करावा हे अर्थ सर्व धन्याचे दृष्टींत आहेत. असल्या आयुष्यें खाईन तें माझें, राहील तें धन्याचें. याचा विचार आपला आपणच पाहावा. पूर्वी कारभार त्यांजकडे होता तेव्हां त्यांजपासून काय काय घडलें तें सर्व आपले ध्यानांत आहेच. पुढेंही करणें तें आपलें व दौलतीचें कल्याण पाहून करावें. कदाचित् असें चित्तांत आलें असेल कीं, बाळाराव नाकर्ता, याच्यानें दौलत चालेना, यामुळें दुसऱ्यास कारभार सांगावा लागला, तर या गोष्टीस मी मागें सरावयाचा नाहीं. नाकर्तेपण कबूल करून कारभार सोडीन हें घडावयाचें नाहीं. पैक्याची पाहिजे तितकी तोड लावीन, करीन, परंतु नाकर्तेपणाचा बट्टा अंगीं लाऊन घेणार नाहीं. वरकड दिवाणगिरीचा अर्थ मजकडे किती हें पुरंदरावर साऱ्या राज्यास समजलें. त्याचा खेद माझे अंतःकरणीं असावा, तर मजकडे दिवाणगिरीच नाहीं. धनी सांगतील तें काम करावें इतकाच अर्थ, त्यापक्षीं मला खेदही नाहीं. मला दौलतींतील विचार पूर्वी घडले व पुढें प्राप्त आहेत ते सर्व आपले ध्यानांत आहेत. ज्यांत कल्याण असेल तें करावें. त्यावरून यजमानांनीं उत्तर केलें कीं, तुम्हीं बोललां इतक्याही गोष्टी खऱ्याच आहेत. त्यास भाईस बोलावून आणून आपण त्रिवर्ग बसून, घरांतील विचार शोधून मग करणें तें करावयाचा निश्चय करावा. तुमचे शरीरानें फार घालविलें. त्या उपर औषध उपायाचीं बोलणीं जाहलीं. याप्रमाणें उभयतांचें बोलणें होऊन बाळोबा पागनीस यांस भाईकडे पाठविलें. ते भोजन करून भाईकडे गेले. उदईक भाई येणार. ते आलेनंतर काय सिद्धांत ठरतो हें कळल्यानंतर विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय. रावजी बापूचे गोटांत उतरले आहेत. त्यांचे शरीरीं समाधान नाहीं. स्नान देखील होत नाहीं. कांहीं ज्वरांश जाहला आहे. याकरितां बावांचे बचोब्याच्या पाठीमागें बंगला लौकर तयार करितात, कारखाना आज सुरू जाहला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the anxious deliberations held by Mahadji with his Diwan Balarao Govind on the gravity of the situation and the scanty means at his disposal in opposing the British advance.*

No. 160 17th May 1781.

पैवस्ती चंद्र २८ रजब इसन्ने समानीन
बराबर डांक.

(सदाशिव दिनकराकडून नानास)

विज्ञापना ऐसीजे :—छ २२ जमादिलाखरचें आज्ञापत्र सादर जाहलें तेथें आज्ञा कीं, राजश्री पांडुरंग रघुनाथ* यांणीं विस्तारें करून मजकूर लिहिला तो कळला. त्यास राजश्री पाटीलबावांची बातमी देशीं चांगली असेलच. तेव्हां इकडे पलटणें किती व तिकडे पलटणें किती हें समजण्यांत आलें तें खरेंच आहे. परंतु सरकारांतही बातम्या चहूंकडून येत असतात, त्यांवरून पाहतां, सहा पलटणें सिप्री कोल्हारास त्यांत दीडशें गोरे असतील. काल्पीकडे दोन पलटणें आलीं. ग्वालेरीचीं दोन असतील. त्यांत सरदारही गाडरासारखा जुवामर्द कोणी नाहीं. इकडील पलटणें गाडराबराबर बारा होतीं तीं सर्वांनीं पाहिलीं आहेत. त्यांच्या पुस्तगर्मीस† साहित्य पोहोंचवावयासी घाटापासून बारा कोसांवर पनवेल तेथें मुंबईकर इंग्रजांचें साहित्य पन्नास तोफा व गरनाळा व दारूगोळा सरंजाम मुबलग, त्यांत बेवीसशें गोरा आणि उभयतां सरदारांची गांठ गुदस्तां पडली होती, तो गाडर सरदार, असें असतांही घाटांत अडचणीची जागा धरूनच राहिला. अडचणीच्या जाग्यास कितीही फौज असली तरी काय व्हावयाचें ? तथापि राजश्री हरिपंत यांनीं तोफा घेऊन जाऊन गोटावर मारगिरी दररोज केली. त्यांकडील सरदार व माणूसही जायां जाहलें. राजश्री तुकोजी होळकर व परशरामपंतभाऊ यांनीं कोंकणांत उतरून, निकड करून त्याचीं माणसें मारलीं व रस्त दरोबस्त बंद केली. इंग्रज घाबरा जाहला. लाचार होऊन शिकस्त खाऊन घाट उतरून माघारा चालला. त्यास पल्ला पोहोंचावयाची जागा बारा कोस, तथापि तिहींकडून निकड करून तोफा त्याच्या घशांत नेऊन इकडून मारगिरी भारी केली. तीन दिवसांत तिहीं लढायांनीं सोळाशें माणूस इंग्रजांचें ठार पडलें. मोठे सरदार दोन तीन ठार पडले. जखमीही अडीच हजार पावेतों जाहले. इकडीलही माणूस हजार बाराशें ठार, जखमी जाहलें. व त्यांकडील तोफांपावेतों इकडील फौजेची उठावणी जाहली. त्यामुळें बाराशें घोडे ठार जखमी मिळोन जाहले. जें जाहलें तें सर्वत्रांनीं पाहिलें आहे. प्रताप श्रीमंतांचा. सरकारांत पैक्याची

*नारो शिवदेवाचा मदतनीस. †पाठराखणीस, उपराळ्यास.

ओढ कोण्या रीतीची ! असें असतां होळकर खेरीज करून चाळीस हजार फौज जमा करून मसलत कशी जाली हें एकीकडे राहून, इकडे फौज किती व तिकडे फौज किती याचाच विचार जाला. त्यास, पुणें श्रीमंतांच्या तख्ताची जागा, येथून घाट वीस कोस, तीन चार मजलांचें काम, त्यांत कशी बनते न बनते तेव्हां पोक्त सरंजाम करणें प्राप्त. त्याप्रमाणें कामही घडून आलें. याशिवाय चार पलटणें सोनगडाकडे आहेत. त्यांच्या तोंडावर गणेशपंत व भापकर सात आठ हजार फौजेनसीं राहून झटे खात आहेत.* हेच इंग्रज वीस पंचवीस मजलांनीं यावया जोगा मुलूख असता तर वीस पंचवीस हजारच फौज बरोबरी करून इंग्रज आयास आणावयास पुरती. हे विस्तार लिहिणें योग्य नाहीं. परंतु त्यांनीं लिहिलें त्या अर्थीं कळावयाकरतां लिहिलें आहे. खुद्द पाटीलबावा मसलतीवर गेले तेव्हां पातशाहा नजफखान व राजे रजवाडे अनकूल होऊन भारी जथ पडून, इंग्रजांचें पारपत्य होऊन मोठाच मनसुबा घडावा असें होतें. त्यास नजफखान वगैरे तूर्त उपयोगी पडावयाजोगीं राजकारणें दिसत नाहींत. जे विचार बोलले यावरून मसलतही भारी पडावयाजोगी दिसते. व गुदस्तांपासून मसलतीच्या तर्तुदा होणें तशाच राहिल्या. असो. ज्या कालीं जसें होणार तसें होतें. अद्याप तरी छावणी इंग्रजांचे शहावर पाटीलबावांनीं करावी तरच पुढें मसलतीस बळ पडेल व चोहो महिन्यांत नजफखान वगैरे राजकारणें चांगलीं बळवावीं तरच मसलत होईल. एक तोड योजली आहे त्यासाठीं नारोपंतानीं पुण्यास जावें. येविषयींची भवति न भवति, त्यास तोडीची पुरवणी आलाहिदा लिहिली, त्याचें उत्तरही अलाहिदा लिहिलें आहे. तुम्हीं तूर्त यावयाचें करूं नये. सरकारचीं कामें वगैरे आहेत तीं करून घेऊन लिहून पाठवणें. उत्तर जाईल त्याप्रमाणें करावें. इतका इतिहास ल्याहावयाचें कारण नाहीं. आम्हांस होईल तेथवर करतों. दैव श्रीमंतांचें व सर्व संभाळणें पाटिलबावांकडे आहे. त्यास ही पुरवणी पाठविल्यास विक्षेपास मात्र. त्यांचें बोलणें एक होळकराकरितां पडतें. कारण कीं, त्यांचें कामकाज जाल्याची तारीफ लिहिण्यांत येती. परंतु कामकाज किती जालें ही बातमी त्यांची येतच आहे ! जातीवर त्यांनीं मसलत डोईवर घेऊन करावी असें असतां काम त्यांच्या स्वरूपाप्रमाणें जालें नाहीं. राजश्री परशरामपंतभाऊ अगोदर घांट उतरून गेले. त्यांजकडे सरंजाम सुभेदाराप्रमाणें नसतां त्यांनीं कसें काम-काज केलें तें सर्व ध्यानांत आहे. त्यापेक्षां कांहीं विशेष जालेंसें भासत नाहीं.

*झटत किंवा झोंबत आहेत.

इकडे तरी एकटे याजवर मसलत. यांजपासी फौज गोसावी सुद्धां किती आहे ती वरचेवर लिहिलियांत येतच आहे. इंग्रजांचीं पलटणें किती याचा तपसील हल्लीं चिरंजीव पांडुरंगपंत यांनीं लिहिला आहे त्याजवरून विदित होईल. वरकड सरकारांत मुलूख राहिला नाहीं. फौज भारी हें सर्व जनास समजलें नाहीं असें नाहीं. होळकरांपेक्षां त्यांजकडे जागीर अधिक आहे असें नाहीं. त्या समयीचें निमित्य सांगावयास जागा, तरी गुदस्तां मुलकापैकीं बाईकडे ऐवज किती पडला त्याची यादी राजश्री बाबूरावजी यांजपासीं देणार. हे तेथें आल्यावर सर्व ध्यानांत येईल. मागील फौजेच्या पेंचांत आले म्हणावें तरी तें सर्व वर्तमान स्वामींस विदित आहे. आतांही चार महिने मसलत करून घरीं येऊन स्वस्थ बसले. वरकड फौजेस निरोप दिलाच असेल. आतां पागा व सरंजाम यांजवर तूर्त काम चालवितील. यांची छावणी जाली. पुढें मसलत डोईवर असें असतां त्यांस पत्रें हिंमत देऊनच लिहिण्यांत यावीं. मागील मजकूर राजेरजवाडे व नजफखान बोलण्यांत आले, परंतु कालावर प्रकार आहेत. राजकारणाचे यत्नास आळस नाहीं. परंतु मागील बोलण्याचे भाव करून लिहूं नये. पुढील मसलतीचेच अर्थ लिहिण्यांत यावे. सुचली विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This does not appear to be a complete letter. The writer Sadashiv Dinkar summarises the contents of Nana's letter to him, refuting the arguments that Mahadji had urged. He advises Nana to realise Mahadji's difficulties and not to exasperate him by an unpleasant remonstrance.*

No. 161 27th May 1781,

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—चंद्र २२ जमादिलावलचीं पत्रें जांबेच्या मुक्कामींहून श्रीमंतांचे पत्रासहवर्तमान सादर जाहलीं. तीं चंद्र ३ जमादिलाखरचे दिवशीं सडे स्वारींत पचावलीचे मुक्कामीं पावलीं. पत्र श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस होतें, तें प्रविष्ट केलें, व आपले नांवें होतें तें दाखविलें. इंग्रज छावणी करतील त्यांचे मोकाबल्यावर पाटिलबावांनीं छावणी केल्यास मसलतीस चांगलें पडेल व छावणी जाहल्यानें पातशाहा व नजफखान वगैरे राजेराजवाडे यांस

वाटेल कीं, पाटिलबावांची छावणी इंग्रजांचे मुकाबल्यावर जाहली, तेव्हां विना इंग्रजांचें पारपत्य केल्याखेरीज सोडीत नाहींत. असें समजून सर्व अनकूल पाटिलबावांस होतील. कदाचित् इंग्रज मागें हटून सिप्री, कोलार अगर नरवर अथवा ग्वालेर येथें छावणीस गेले, त्यामुळें पाटिलबावांचे चित्तांत येईल कीं, इकडे पांच सात हजार फौज ठेवून आपण उज्जनीस छावणीस जाऊन, बरसात आखेर होतांच तरतूद करून, मागती मसलतीवर यावें. तर पाटीलबावा उज्जनीस आल्यानें इंग्रज चातुर्मास्यांत पुढें चाल करतील. राजेरजवाडे कित्येक सामील होतील व कित्येक तमाशबिनी करतील. इकडील फौजेचा जथ लवकर पडणार नाहीं. तेव्हां मसलत भारी व जड पडेल. याकरितां पाटिलबावांची छावणी इंग्रजांचे मोकाबल्यावर व्हावी हें चांगलें म्हणोन श्रीमंतांनीं आपले पत्रीं आज्ञापिलें. तें बावांनीं ऐकून उत्तर केलें कीं, असें समजून पूर्वी तुम्हांकडून पत्रें लिहिविलीं आहेत. इकडे छावणी राहून देशींहून आणखी दहा बारा हजार बोलावून बादबरसात इंग्रजांचें पारिपत्य यथास्थित करावें असें चित्तांत आहे. पैक्याची अडचण यामुळें होईल तर खुद्द तेथवर करीतच आहों. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें करून घडोन येईल तें खरें. याप्रमाणें उत्तरें जाहलीं. मागील रवानग्यांची हल्लीचे रवानगी सुद्धां पाटिलबावांकडील उत्तरें घेऊन पाठवावयाचीं तीं राजश्री आबा चिटणीस यांणीं कांहीं लिहिलीं आहेत. साऱ्या रवानग्यांचीं उत्तरें घेऊन मागाहून लवकर सेवेसीं पाठवितों. श्रीमंतांचे पत्राचीं उत्तरें येत नाहींत, म्हणोन दोन तीन पत्रीं आज्ञापिलें. ऐसेयासीं बावा पूर्वी बोलले तोही मजकूर सेवेसीं विनविला आहे. त्याउपर परवानगी घेतली. लिहिणार आबा व अलीकडे दरोबस्त कारभारही आबा. त्या कारभारामुळें अवकाश थोडका व अंतःकरणीं व्यावृत्ति फार, येणेंकरून दिवसगतीवर पडलें. सांप्रत आज्ञापत्र माझे नांवें आलें जे, बावांकडील जाब यावयास दिरंग असल्यास तुम्हींच बावांस पुसोन उत्तरें सांगत जातील तीं लिहित जाणें. त्यास येविसीं भाषणें आबासीं चांगलींच केलीं. याउपर मागील रवानग्यांचीं उत्तरें घेऊन जलद सेवेसीं पाठवितों व पुढें पत्रें येतील त्यांचीं उत्तरें यांणीं लवकर न लिहिल्यास आज्ञेप्रमाणें मीच बावांस पुसोन उत्तरें करतील ते विनंती करीत जाईन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that Mahadji was not falling back during the monsoon but had resolved to canton where he was, facing the enemy.*

No. 162 May 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—पत्रीं आज्ञा सादर जाली कीं, इंग्रजानें पैगाम लाविला आहे कीं, आमचीं हत्यारें बंदुका घेऊन सोडून द्यावें व ग्वालेरचा किल्लाही देतों, याप्रमाणें त्यांनीं पैगाम लाविला आहे, हें वर्तमान उज्जनींत ऐकिलें. परंतु तुमचे पत्रीं कांहींच नाहीं हें काय? ऐसीयासीं हें वर्तमानच लटकें! त्यांचा पैगाम नाहीं. तत्राप श्रीमंतांचे पुण्यप्रतापें अशी रदबदल त्यांजकडून आल्यानंतर किल्ला घेतील. हत्यारें घेऊन कापून काढतील. तळेगांवचें स्मरण आहे. आजपावेतों तर ही गोष्ट येथें ऐकिल्यांत आली नाहीं. यापुढें ऐकण्यांत आल्यानंतर विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that the report of British overtures for peace was not true.*

No. 163 May 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना :—राजश्री बळवंतराव धोंडदेव यंदा आपले सरंजामानिसीं सरकार आज्ञेप्रमाणें श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस सामील होऊन राजश्री आंबोजी इंगळे यांबराबर इंग्रजांनजीक कोस आत कोसाचे अंत्र्यानें राहून मेहनत करीत असतात. सांप्रत आंबोजी इंगळे यांबराबर दुसरा कोणी मेहनत करीत नाहीं. त्यापेक्षां चार कदम बळवंतराव आपलें पथक सुद्धां पुढें आघाडीस राहून इंग्रजांवर झड घालीत असतात. आजपावेतों वीस पंचवीस घोडीं व पंधरा वीस माणसें तर जखमी जालीं. मेहनत सरकारचाकरीमुळें या रीतीची करून कारभारी सदाशिव खंडेराव यांचा पक्ष धरून, बळवंतराव यांचे मेहनतीचें स्वरूप न करितां उलटे यजमानास विपर्यास भासवून, मर्जीची क्रूरता दाखवीत असतात. मनस्वी बोलतात. तुमचा सरंजामच चांगला नाहीं, चिंता काय आहे? असें दाब घालून बोलत असतात. बळवंतराव यांचा प्रकार नूतन यामुळें आपले जागां व्यग्र आहेत. राजश्री शिवाजीपंत बापू यांचे घरीं एक दोन वेळ जाऊन प्रस्तावा करीत होते व मजपासीं बोलत होते. बापूंनीं त्यांची खातरजमा केली कीं, चिंता न करावी. राजश्री नारोपंतनाना यांस लिहून सरकारचें पत्र खातरजमेचें

तुमचे नांवें आणवितों. त्यावरून बापूनीं आपणास लिहिलें आहे व मला लिहावयास सांगितलें त्यावरून विज्ञापना लिहिली आहे. तरी येविषयीं सरकारचें पत्र आलें पाहिजे म्हणून बापूचें मानस आहे. सेवेसीं श्रुत होय विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar brings to Nana's notice the conspicuous services rendered by Balvantrao Dhondadev and not properly recognised by Mahadji.*

No. 164 May 1781.

(सदाशिव दिनकराकडून नानास पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—अहल्याबाई आपलें सांगतात, तुकोजीबावा आपलें सांगतात, येविषयीं हें पुरतें समजून घेतल्याखेरीज कांहींच ध्यानांत येत नाहीं; व या लढ्यामुळें सरकारांत भारी फौजेची चाकरी होऊन येत नाहीं. हें मोठेंच नुकसान सरकारचें. याजकरितां येथून कोणी शहाणा गृहस्थ पाठवून बाईचें वर्तमान सविस्तर समजून घेऊन, जिकडील जसें दिसेल तसें सांगून, उपयोग पडे तें करावें असें आहे. येविषयीं राजश्री पाटिलबावांनींही चार गोष्टी बाईकडे उचित रीतीनें सांगून पाठवाव्या, म्हणून श्रीमंतांचें आज्ञापत्र आपले नांवें सादर जालें, तें श्रीमंत राजश्री पाटिलबावा यांस दाखविलें. त्याचें उत्तर बावांनीं आज्ञापिलें जे, आम्ही महेश्वरास जाऊन बाईस उचित रीतीनें समजून सांगितलें व त्यांनींही उत्तरें केलीं तीं सविस्तर पूर्वी तुम्हांकडून श्रीमंतांस लिहविलीं आहेत. पुरतें समजून घ्यावयाकरितां बाईकडे कोणी शहाणा गृहस्थ पाठविणार. उत्तम आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates Mahadji's approval of the proposal of deputing a mediator to settle the dispute between Tukoji Holkar and Ahalyabai.*

No. 165 17th June 1781.

(सदाशिव दिनकरांचें पत्र नानास)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री राघो मल्हार यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें जेष्ठ वा ११ रविवारचे दिवशीं जाहलीं. राजश्री बाळाराव वगैरे समस्त मंडळी

प्रसंगीं होतीच. रावजीकडे मुजमू सांगावी असें यजमानाचे बोलण्यांत आहे. विशिखासी* या गोष्टीचा संकेत जाहला आहे. मुख्य रावजीच्या शरीरानें फार घालविलें. ही सनद मोठी यामुळें कोणाचाही पक्षपात चालला नाहीं. भाई व रावजी तिघांचें खलबत जाहलें. त्यांत परस्परें काय बोलणीं जाहलीं असतील तीं कळेनात. रावजीची मर्जी राखावी असें आहे. घडेल तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar reports the appointment of Ragho Malhar as Mahadji's Diwan.*

No. 166 20th June 1781.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण चंद्र ३ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. गाडर चंद्र २३ रविलाखरीं घांट उतरून खालीं गेला. त्याचे पाठीवर राजश्री हरिपंत फौज सुद्धां खालीं उतरून जाऊन, खालापुरावर इंग्रज जात असतां लढाई केली. त्यावरी खालापुराहून चौकावर गेला. ते दिवशींही इकडून हरिपंत व बाजूकडून राजश्री परशरामपंतभाऊ व अघाडीकडून राजश्री तुकोजी होळकर मिळून तिहींकडून निकडीनें लढाई जाहली. त्यावर तेथून कूच करून इंग्रज पनवेलीस गेला. ते दिवशीं मातबर लढाई जाहली. त्याजकडील ठार व जखमी फार जाहले. पलटणाचे गोरे सरदार दोन तीन ठार पडले. एक तोफ पाडाव करून आणली. याखेरीज बंदुका वगैरे जिन्नस वाटेनें टाकीतच गेले. पनवेलीजवळ इंग्रज जाऊन, नदी पुढें करून, तोफा मांडून राहिला आहे. इकडील-ही फौजा त्याच्या नजीक भोंवतालीं आहेत. पुढें कांहीं फौज या तोंडावरीं ठेवून व तीन चार हजार गारदी घाटांत ठेवून, बाकी फौज वसईपासून सुरतेपावेतों मुलूख ताराज करावयाचा विचार केला आहे म्हणून लिहिलें, तें सविस्तर कळून संतोष जाहला. ऐसियासी, इंग्रज माघारा कूच करून जातांना दोन तीन दिवस बराच लगट केला, त्यामुळें घाबरा होऊन पनवेलीनजीक गेला. श्रीमंतांचे प्रतापेंकरून इंग्रजावरी जरब चांगलीच बसली. घांट उतरून खालीं माघारा गेला, ही गोष्ट मोठीच जाहली. पनवेलीसच राहणार किंवा कोठें जाणार, तें लिहून पाठवावें. वसईपासून सुरतेपावेतों मुलूख ताराज करावयास फौज रवाना

*विशिख=मुसलमान म्ह० राणेखानभाई.

करणार, ही तर्तूद फार चांगली आहे. सुरतेपर्यंत मुलूख ताराज करून कोंडाई-बारीपाशीं फौज छावणीस रहावी म्हणजे सुरतेवरी शह राहील. पर्जन्यकाळीं कोंकणांत फौज रहावयाची सोय नाहीं, याकरितां गारदी घाटांत ठेवून घाटांचा बंदोबस्त करवावा व फौजेचा मुक्काम तळेगांवावरी असला पाहिजे. इकडील वर्तमान राजश्री पांडुरंग रघुनाथ निसबत राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रावरून कळतच असेल. रवाना चंद्र २७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji congratulates Nana upon the victory obtained over Goddard at Chauk and advises him to canton the Maratha armies at Talegaum.*

No 167 20th June 1781.

पैवस्ती चंद्र २१ रजब इसन्ने
समानीन हाा डाक.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १४ जाावलचें पत्र पाठविलें तें पावलें. गाडर पनवेलीस गेल्यावरी, नदीपुढें व खाडी पाठीमागें देऊन, तोफा मांडून राहिला आहे, व गलबतेंही खाडींत आणलीं. कांहीं सरंजाम गलबतावर चढवितो व पुढें छावणी कोठें राहील पाहावें. लढाया निकडीच्या जाहल्यामुळें इंग्रजाचा नाश फार जाहला. तीन चार लढाया मिळोन बाराशें माणूस ठार, दोन हजार जखमी, व हजारपावेतों पळून गेलें. एकून चार पलटणांचा नाश जाहला व टोपीकर सरदार चार मातबर पडले. याशिवाय दफेदार व मयर (?) वीस पंचवीसपावेतों ठार पडले. व चार सरदारांत पारकल सरदार गाडराचे बराबरीचा होता, तो मेला. असा नाश जाहला. याकरितां घाबरा होऊन गेल्यामुळें गाडरास अभिमान फार पडला आहे कीं, आपण नामोहरम होऊन दिकत खादली. याकरितां श्रावण भाद्रपद मासीं घांट चढून वरतें यावें, या तर्तुदींत आहे. तूर्त पनवेल जागा अडचणीची. पन्नास हजार फौज उगीच कोंकणांत बसून काम नाहीं. घोडे फार खराब जाले. पाणी नाहीं. याकरितां दहा हजार फौज वसईपासून सुरतपावेतों पाठवून, इंग्रजांनीं मुलूक तूर्त आपले कबजेंत आणिला असें मानिलें आहे, तो मुलूक जाळून लुटून लावणी होऊं नये असें करावयाची तर्तूद करतों. व

करवीराहून सटवाजी भोसले सुरापुरास गेले, व बाजीराव बर्वे व नरसिंगराव गोविंद हे तेथें आहेत. जमावही त्यांणीं कांहीं केला आहे. त्यावर व करवीरकरावर दाब असावा याकरितां राजश्री परशरामपंतभाऊ तिकडे जातील. राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर आठ पंधरा दिवस कोंकणांत राहून वरते येतील. श्रावणमासीं इंग्रज जलदी करणार. याकरतां होळकर व हुजरात वगैरे मिळून वीस हजार फौज छावणीस तळेगांवनजीक ठेवणें प्राप्त. सालमजकुरीं छावणी इंग्रजाचे शहावरी आपण तिकडे केल्यानें सारे फौजेचा जय राहून, राजेरजवाडे व पातशाहा नजफखान आदिकरून सर्वांस समजेल कीं, मसलतीवरी नेट देऊन राहिले, तेव्हां इंग्रजाचें पारपत्य केल्याखेरीज सोडीत नाहींत. असें समजून आपल्यास अनुकूल होतील. छावणी केल्यास मसलतीस उपयोग चांगला. सर्व दूरंदेशी आपले ध्यानांत आहे. ह्मणून लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास श्रीमंतांचे प्रतापेंकरून गाडर इंग्रज घांट उतरोन माघारा गेला. जातीनें लढाया दोन तीन निकडीच्या जाल्या, त्यामुळें त्याजकडील नाश फार जाहला. जरब चांगलीच बसली. पनवेलीस टिकेल असें दिसत नाहीं. मुंबई अगर वसईचे आसऱ्यास छावणी करतील. फिरोन घांट चढून वरतें यावयाचा इंग्रजांस विचारच पडेल. तथापि आपली मजबुदी असावी. वसईपासून सुरतेपर्यंत मुलूक जाळावा लुटावा, ही तजवीज आपण योजिली, फार चांगली. फौजेची रवानगी केलीच असेल. मुलूक लागूं देऊं नये. घाटाचा बंदोबस्त करावा व लिहिलेप्रमाणें तळेगांवावरी हुजरात, होळकर यांची छावणी करवावी. मग चिंता नाहीं. इकडील वर्तमान तर, कलकत्याहून इकडील इंग्रजांस कुमक आली. त्यामुळें कोलारस, सेसई, सिपरी ह्या जागा धरून राहिले आहेत. तेव्हां छावणी करणें प्राप्तच आहे. अलीकडे तीन चार लढाया चांगल्याच जाहल्या. दर लढाईंत इंग्रज नामोहरम होऊन मुडदे व जखमी टाकून निघोन गेले. आतां मैदानांत लढाईस येत नाहींत. फौजा सभोवत्या आहेत. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें इंग्रजांचें पारपत्य होईल. चिंता नाहीं. रा छ २७ जाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji expresses gratification at the victory of the Poona army in Konkan and advises Nana how to pursue the advantage obtained over Goddard.*

No. 168 June 1781.

पैवस्ती चंद्र १० रजब इसने.
(ता. ३-७-१७८१.)

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—अलीकडे श्रीमंतांचीं पत्रें येतात त्यांतील अर्थ बावांचे अंतःकरणीं व्यंग येत असतात. चंद्र २८ व चंद्र २९ जमादिलावलचीं पत्रें बावांचे नांवें पुरवणी एक व आपले नांवें पुरवण्या चौदा, त्यांतून कार्याकारण दोन तीन पुरवण्या ठेवून बाकी पत्रें बावांस दाखविलीं. होळकर व अहल्याबाई यांचे मजकुराविषयीं दोन पुरवण्या आल्या त्या पाटिलबावांस दाखविल्या. त्यावरून बोलले कीं, बाईस आम्ही शिकवून हा खेळ आम्ही करतों असें त्यांचे चित्तांत आलें आहे. याचें भविष्य आधींच करून याकरितां नारो शिवदेव महेश्वरास पाठविले ते गेलेच आहेत. आम्ही बाईस सांगून दौलतीचा नाश करवितों असें असल्यास नारोपंतास आढळल्या व्यतिरिक्त राहाणार नाहीं, तेव्हां ते आम्हांस लिहितील. उगेच निमित्य आम्हांवर घालीत असले तर सुखरूप घालोत. महेश्वरास आम्ही गेलों, तेथील जें वर्तमान जाहलें तें पुण्यास लिहिलें. असें असतां आतां असें लिहितात जे, तुकोजीबावानें मोठी मेहनत करून सरकारचाकरी चांगलीच केली. त्यांची खातरजमा केल्यासारिखें न जाहल्यास ईश्वराचाही शद्ध लागेल व चांगलें सांगत असतां बाई न ऐकत तर सरकारांतून याचा विचार करणें प्राप्त. पाटिलबावांनीं बाईस चांगले रीतीनें सांगावें. त्यांनीं सांगितलें असतां ऐकतील, उगेच राहून नाश करावयाचा हा काल नाहीं. सरकारची दौलत पेंचांत आली, या समयीं अशा गोष्टी केल्यानें दौलतीस अपाय, मग विचार कळतच आहे! त्यास ह्या गोष्टी आम्ही करितों! असो. चिंता नाहीं. आजपावेतों केल्या नाहींत! उचित रीतीनेंच सांगावयाचें तें सांगितलें असतां उलटें आम्हांवर निमित्त देतात; यास चिंता नाहीं. बाईचें बोलणें आजपावेतों तर बोललों नाहीं, परंतु आतां बोलतों, आणि या पत्राचीं उत्तरेंही देतों. चार दिवस सबुरी करावी. व आम्हांस म्हणूं लागले कीं पत्रांतील अर्थ समजला, याचीं उत्तरें मी सांगेन त्याप्रमाणें लिहिणें. सारांश, बाईविषयींचा आरोप यांजकडे लागू करून लिहितात यामुळें व आणखीही पत्रांतील भाव लिहिण्याचे दोष व्यंगोक्तीनें लिहीत असतात, असें समजोन कांहीं कांहीं तर्कवितर्क चालवीत असतात. बोलत असतात जे, पत्रीं लिहितात कीं तुमचे लिहिल्यावरून होळकरांची

खातरजमा आमचे म्हटल्यावरून केली, त्यांचें स्वरूप राही तेंच केलें पाहिजे. त्यास, खातरजमा आमचे म्हटल्यावरून केली हें खरें, किंवा आंतून पाराजीपंत व वाकडे यांचे विद्यमानें व विसाजीपंत आठवले यांचे हातून कारस्थान खेळत होतें तें आम्हांस कांहीं समजलेंच नव्हतें कीं काय ? उगीच निमित्य देऊन नाकांत काड्या घालतात. आतां याचीं उत्तरेंही योजून सांगतों. याप्रमाणें बोलत असतात. पत्रांचीं उत्तरें काय देतात तें सविस्तर घेऊन मागाहून सेवेसीं पाठवितों. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that Mahadji was displeased with Nana for the vacillating policy observed by him on the subject of a reconciliation being obstructed between Ahalyabai and Tukoji. Mahadji disowned all responsibility about it.*

No. 169 16th August 1781.

(सदाशिव दिनकराचें नानास पत्र)

श्री

विज्ञापना ऐसीजे :—सेसईच्या इंग्रजांकडून फोर्डसाहेब व मुनसी येथें आल्याचें वर्तमान पूर्वी विनविलें आहे. त्यावर त्यांचें व श्रीमंत राजश्री पाटिलबावांचें बोलणें जाहलें. इंग्रजानें याद लिहून आणली होती, त्यांत कलमें :—

१ श्रीमंतांचा आमचा तह करून द्यावा.

१ हैदरखानाचा आमचा सलूख करून द्यावा. कदाचित् त्याचे मर्जीस सलुखाचा विचार न आल्यास आमची त्याची लढाई सुरू आहेच. तुम्हीं आमची कुमक करावी. हेंही तुम्हांस अनकूल न पडेल तर आपले घरीं स्वस्थ असावें. तिकडील उपराळा करूं नये.

१ तुम्हीं अंतरवेदींत येऊं नये. आपल्या मुलखांत असावें.

१ चंदेरीकर राजा आम्हांजवळ आहे, तो गरीब आहे. त्यापासोन एक पैसा न घेतां त्याचे राज्याचा बंदोबस्त करून द्यावा.

१ गोहदकरासीं वांकडें करूं नये. त्यापासून अंतर दिसोन आल्यावर मग काय करणें तें करावें.

१ नरवरकर आम्हांस सामील जाहला, या अदावतीमुळें आम्हीं अंतरवेदींत गेल्यावर त्यावर दृष्ट फिरवाल, तर हें होऊं नये. सिप्री, कोलारस, सेसई ह्या जागा त्यास द्याव्या.

याप्रमाणें यादींत कलमें लिहून आणलीं होतीं. व इष्टन* कलकत्तेकर याचें पत्र कर्नल मेवरास† आलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं, तुमचा व पाटिलबावांचा सलुखाचा जाबसाल लागला आहे, उत्तम आहे. तुम्ही मुखत्यार आहां जें कराल तें आम्हांस मान्य आहे. तें पत्र बजिन्नस त्यांचे मोहरेनसीं होतें, तें पाटिलबावांस दाखविलें. त्याचीं उत्तरें पाटिलबावांकडील जाहलीं.

श्रीमंतांचा सलूख आमचा करून द्यावा असें म्हणतां, तर आम्ही तळेगांवावर तुमचीं पलटणें वांचऊन काढून दिलीं. ते समयीं त्यांनीं इमानप्रमाण केलें कीं, याउपर आम्ही सरकारच्या जाग्याजुग्यासीं उपद्रव करूं नये. असें असतां गाडरानें अमदाबाद घेतली. वसई, कल्याण वगैरे जागा घेतल्या. यामुळें आतां तुम्हांकडील बोलणें तहाचें बोलूं गेल्यास आमचा विश्वास सरकारांत पडावयाचा नाहीं. याकरतां तुम्हीं अहमदाबाद, वसई व कल्याण वगैरे जागा सरकारच्या घेतल्या आहेत त्या साष्टी सुधां सोडून द्याव्या, म्हणजे मग तुम्हांकडील सलुखाचें बोलणें आम्ही सरकारांत बोलूं. तोंपर्यंत आम्हांस तुम्हांकडील गोष्ट सरकारांत बोलण्याची उजागरी नाहीं. याचीं उत्तरें इंग्रजांचे मातबर बोलले कीं, ही गोष्ट इष्टिनसाहेबांचे आज्ञेखेरीज निश्चयांत कसी येते ? आम्ही त्यांस लिहितों. उत्तर येईल तें तुम्हांस सांगूं. त्यावरून पाटीलबावा बोलले कीं, उत्तम आहे. तुम्हीं आपल्या सरदारास लिहून उत्तर आणऊन आम्हांस लिहून पाठवणें. त्याप्रमाणें आम्हीं सरकारांत लिहून पाठऊं. त्याचीं उत्तरें येतील तीं तुम्हांस सांगितलीं जातील.

नरवरकरांस नवें कांहीं मिळत नाहीं. सिप्री, कोल्हारस, सेसई ह्या जागा जाधवाच्या आहेत. ते घेतील. नरवरकरानें आपल्या जागां स्वस्थ असावें. त्यास उपद्रव देणार नाहीं.

अंतरवेदींत येऊं नये म्हणोन. त्यास, आम्हीं आपल्या मुलखाचाच बंदोबस्त करूं. तुमच्या मुलखांत येणार नाहीं.

हैदरखानाचा सलूख करून द्यावा असें म्हणतां, तर तिकडे पत्रें पाठवायाविसीं सरकारांत पत्रें लिहितों. तेथून हैदरखानाकडे पत्रें जातील व येथून आम्हीही लिहितों. त्यांचे विचारास आल्यास तुम्हांस लिहून पाठऊं. विचारास न आलें तर तसेंच तुम्हांस सांगितलें जाईल.

*Warren Hastings. †Col. Muir.

चंदेरीकर गरोब आहे. त्याजपासून कांहीं न घेतां त्याचा बंदोबस्त करून द्यावा म्हणोन. तर त्यास आम्हांकडे पाठऊन द्यावें. तुमच्या सांगितल्याअन्वयेंच बंदोबस्त करून देण्यांत येईल.

गोहदकर जाटास उपद्रव देऊं नये म्हणोन. तर आम्ही आपल्याकडून त्यासीं वांकडें कारणार नाहीं. त्यापासून अंतर देखल्यावर मग त्यासीं समजोन घेऊं. त्याचें उत्तर इंग्रजांकडील मातबरांनीं केलें कीं, गोहदकर मात्रागमनी आहे. सांप्रत आम्हांस त्यापासून सहा लक्ष रुपये घ्यावयाचे. त्यांत दीड लाख घेतले. बाकी साडेचार घ्यावयाचे, ते आम्ही इकडून जातांना त्याजवळोन घेऊन आपल्या मुलखांत जातों. पुढें तुमच्या त्याच्या विचारास येईल तसें करावें. तूर्त त्यास आम्ही जातांच उपद्रव देऊं नये. तेव्हां पाटीलबावा बोलले कीं, देणार नाहीं.

याप्रमाणें जाबसाल होऊन इंग्रजांकडील मातबर निरोप घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the terms of peace offered by the British to Mahadji and the replies given by the latter on each item. The negotiation thus started ultimately resulted in the treaty of Salbai.*

No. 170 10th September 1781.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी भोसल्यांची बंगाल्यांत फौज गेली होती, त्यांचे तोंडावरी कलकत्याहून सात आठ पलटणें आलीं होतीं. भोसल्यांची फौज माघारी आल्यामुळें तीं पलटणें, गुडलुरांत जनरल कूट होता त्यास जाऊन सामील जालीं. उपरांत तेथून कूच करून चेनापट्टणाकडे जातांना, हैदरखानाची त्यांची लढाई निकडीची जाली. इंग्रज चेनापट्टणाकडे जात आहेत. हैदरखान फौजे सुद्धां त्यांचे पिच्छावरी आहेत म्हणून लिहिलें, तें सविस्तर कळलें. त्यास, बंगाल्याकडील पलटणें जनरल कूट यास जाऊन मिळाल्यामुळें त्यांचा जमाव भारी जाहला. हैदरखानाची फौज चहूंकडे बंदोबस्तास गेली. सारी जमियत एकत्र असती, तरी त्याजवरी जरब पेशजींचे लढायांप्रमाणेंच बसती. हल्लींचे लढाईंत बरोबरीची लढाई जाहली. चिंता नाहीं. त्रिचनापल्ली वगैरे जागां जमियत आहे, ती एकत्र करून इंग्रजांवर जरब हैदरखान बसवितील. कलकत्तेकर इस्टिनाचें वर्तमान * त्या

*काशी येथील चेतसिंगाच्या बंडाव्यांत हेस्टिंग्सच्या जिवावर संकट आलें त्याचें.

इंग्रजांस कळल्यावरी त्याची हिम्मत राहणार नाहीं. तिकडील वर्तमान वरचेवरी येईल तें लिहून पाठवीत जावें..सुरत मुंबई व श्रीमंत दादासाहेबांकडे बर्वे, सटवाजी भोसले व मानाजी शिंदे गेल्याचें लिहिलें. त्यास, दोघे तिघे कुभांडी जाऊन मिळाले, हें ठीक न जालें. कोंडाईबारीकडे गणेशपंत बेहेरे व भापकर आहेतच. होळकरास फौजे सुद्धां स्वारीकडे पाठवून सुरतेस पायबंद बसवावा, म्हणजे, तेथील पलटणें फुटून दोहदचे वाटेनें येणार नाहींत. हें जरूर करावें. राजश्री हरिपंत तात्या व परशरामपंत भाऊ बोरघांटावरी रवाना करावयाची तर्तूद जलदीनें जाली पाहिजे. रवाना चंद्र २१ रमजान. हे विनंती.

¶*Mahadji advises Nana Fadnis about the conduct of the war against the British particularly in Gujarat.*

No. 171 10th September 1781.

पैवस्ती छ ७ सवाल इसन्ने
समानीन हा डाक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः--

दंडवत विनंती. उपरी. आपण छ १५ साबान व छ २ रमजान येणेंप्रमाणें दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. इंग्रजाचे शहावरी आपण छावणी केली. उत्तम केलें. पुढील मसलतीस उपयोग तोच विचार आपण चांगला केला. पुढें इंग्रजांचें पारपत्य करून श्रीमंतांचे दौलतेचें कल्याण तेंच आपण करतील. वरकड इकडील कितेक मजकूर राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिले आहेत, त्यांजवरून ध्यानांत येतील, ह्मणोन लिहिलें तें व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रावरून सविस्तर मजकूर कळला. ऐसियास इकडील वर्तमान वरचेवरी राजश्री पांडुरंग रघुनाथ यांचे पत्रावरून कळतच असेल. इंग्रजांस गोहदकर जाट व नरवरकर राजा मिळाले ह्मणन या रानांत इंग्रज ठरले. अलीकडे दाहा बारा लढाया होऊन इंग्रजावर जरब बसली. गोहदकर जाट खुद्द आपले जमियत सुद्धां इंग्रजांत सामील होऊन लढाईस आले, त्या सुद्धां रेच मोडला. त्या दिवसापासून आसरा सोडून लढाईस मैदानांत येत नाहींत. गोहदकर जाट इंग्रजांपासून निराळा फुटोन, पांच सात कोसीं पलीकडे राहून, राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे विद्यमानें जाबसाल लाविला जे, इंग्रज जबरदस्त, आमचे मुलकांत येऊन राहिले, तेव्हां त्यांजपाशीं आपले बचावाकरितां राहणें प्राप्त जाहलें. इंग्रज आसरा धरून राहिले, येणेंकरून आपला काबू चालत नाहीं व ते आमचे मुलकांत आहेत, तेव्हां आह्मांस

त्यांतून निघोन आपणाकडे येतां येत नाहीं. त्यास, हरप्रकारें करून, इंग्रजांस सांगोन त्यांचें कूच यमुनापार जावयाचें केलें, तरी आपण पाठलाग करूं नये. यमुनापार गेले ह्मणजे मग आपण जाऊन गांठ घालावी. आह्मी आपणांत सामील होतों. यमुनेअलीकडील मुलूक पाठीमाघें पडून त्यांचे अमलांत हांगामा पडतो. याप्रमाणें इंग्रजांनीं कूच केलें तर पाठलाग न व्हावा, येविशीं अभय होऊन खातर-जमा जाली, तरी इंग्रजांशीं बोलून पाहतों. ह्मणोन त्यास एक वेळ येथील आसरा सोडून निघाले ह्मणजे हा मुलूक आपले काबूंत येऊन, गोहदकर व नरवरकर त्यांतून अलग होतात. हा विचार जाल्यास मसलतीचे उपयोगी जाणून, शिवाजी-पंत बापूकडे जाबसाल लावविला. गोहदकराकडील भले माणूस शिवाजीपंत बापूकडे आले. बापूकडील राजश्री चिमणाजी खंडेराव यांस गोहदकरानें बोला-विलें ते जाऊन याचें त्याचें बोलणें होऊन करार मदार जाहला. अठरा रोजांनीं इंग्रजांनीं कूच करून यमुनापार जावें; न गेले तरी जाटानें इकडे येऊन सामील व्हावें; असें निश्चयांत आणून चिमणाजी खंडेराव आले. अठरा रोजांपैकीं साहा रोज बाकी राहिले आहेत. बोलण्यांत आलें त्याप्रमाणें जाल्यास, यमुनापार गेल्यावरी महिन्या पंधरा दिवसांत यमुनेअलीकडील बंदोबस्त करून, अंतरवेदींत उतरावयास येईल. कदाचित् ही गोष्ट न घडली, तरी ज्या गोष्टीनें या पलटणांचें पारपत्य होय तें करणें प्राप्तच आहे. कलकत्याहून इष्टिन काशीस आला होता. काशीकर राजास भेटीस बोलावून रुपये मागों लागला. त्यावरून याचा त्याचा कलह जाहला. काशीकर चेतसिंग राजा याणें इष्टिनाचें पारपत्य केलें. दरोबस्त त्याचा वित्तविषय लुटोन घेतला. इष्टिन जखमी होऊन पळोन जात होता. फौज राजाची मागें लागली. इष्टिनाचा कबिला देखील धरला. याप्रमाणें काशीहून दोन तीन पत्रें आलीं. वर्तमान खरें आहे. बजिन्नस तेथील वर्तमानाचें पत्र आलें त्याची नक्कल पांडुरंग रघुनाथ यांणीं आपणाकडे पाठविली आहे, त्यावरून कळलेंच असेल. काशीकर राजानें इंग्रजाचें पारपत्य केलें, ही मोठीच गोष्ट जाहली. हें वर्तमान या पलटणांस कळल्यावरी, जातात किंवा दम धरून राहतात, हें समजेल. त्या सारखी पैरवी * होईल. रा छ २१ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Sindia informs Nana of his having received secret overtures from the Rana of Gohad and gives an account of the affray at Benares between Chetsing and Hastings.*

*बंदोबस्त.

No. 172 11th September 1781.

पैवस्ती छ ९ सवाल

इसन्ने समानीन.

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांस :—

दंडवत विनंती. उपरी. कलकत्याहून इष्टिन इंग्रज काशीस आला होता त्याचे भेटीस चेतसिंग काशीकर गेला. त्यास जास्ती रुपये मागूं लागला. व बिजेगड किल्ला काशीकराचा आहे, तो खाली करून देणें. त्याचें उत्तर चेतसिंगानें केलें कीं, आम्हांकडे जागा तेवढीच आहे, ती तुम्हीं मागूं नये. परंतु इष्टिनाचे विचारास न आलें. पाहाऱ्यांत द्यावयासी सांगितलें. तेव्हां चेतसिंगापाशीं चार माणूस चांगले होते व भाऊ त्याचा मर्द होता. त्यानें मारामार करून, चेतसिंगास काढून घेऊन निघाले. त्याजवरी याची त्याची लढाई होऊन, इष्टिन जखमी जाला. वरकड गोरे व तेलंग मारले. इष्टिन पळोन चिनाडगडास गेला. कोणी म्हणतात, जखमा लागून ठार पडला. चारशें पांचशें नावा वगैरे माल सर्व काशीकर राजानें लुटून घेतलें. इष्टिनाचा पाठलाग करून, चिनाडगडांत घेरला आहे हेंही वर्तमान आहे. तिकडील वर्तमानाचीं पत्रें काशीहून आलीं त्यांची नक्कल राजश्री पांडुरंग रघुनाथ यांनीं आपणांकडे पाठविली आहे. त्यावरून सविस्तर कळेल. फरकाबादेस पलटणें होतीं, तीं पठाणांनीं मारून काढून दिलीं. कालपींत इंग्रज होते ते निघोन गेले. यमुनापार व गंगापार तमाम भुमे व जमीदार यांणीं दुंडी करून, इंग्रजांस जागां जागांत मारतात लुटतात. सेसईंत इंग्रज आहेत, यांणीं गोहदकर जाट याचे विद्यमानें जाबसाल लावून अठरा रोजांचा करार केला, त्यापैकीं बारा तेरा रोज जाले; चार पांच रोज राहिले आहेत. जाट गोहदकर व नरवरकर त्यांत मिळाले. ते कोणेही प्रकारें त्यांतून फोडून, मग यांचें पारपत्य करावें याकरितां जाटानें अठरा रोजांची रदबदली केली, तेच मंजूर केली. हा करार करून जाटही इंग्रजांतून निघोन ग्वाल्हेरीस आपले जमियत सुद्धां गेला. इंग्रजच सेसईंत आहेत. हल्लीं काशीचें वर्तमान त्यांजकडेही आलें आहे. यामुळें गलबलले आहेत. गोहदकराचे विद्यमानचा जाबसाल राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे मार्फत जाटाचा जाबसाल. याकरितां चार पांच दिवस गेले म्हणजे या पलटणांवरी निकड करून पारपत्य करून तसेच पुढें जातों. काशीकर राजा व फरकाबादकर पठाण व सुजातदौलाचे लेकाकडे पेशजी कागद पाठवून राजकारणाचा सिलसिला* राखलाच होता. काशीकर राजानें इष्टिनाचें पारपत्य

*संदर्भ.

चांगलें केलें, यामुळें इंग्रजांचा जागा जागांचा धर सुटला. हें वर्तमान आल्यावरी चेतसिंग राजाकडे कागदपत्र व कारकून रवाना केले आहेत कीं, आम्ही जलदच तिकडे येतों. येथून या पलटणांचें पारपत्य करून अंतरवेदींत उतरलों म्हणजे सर्वांस भरंवसा पुरोन सामील होतील. नजफखान यांजकडील भला माणस येऊन करारमदार करून गेला. नजफखान दिल्लीहून निघोन आग्र्यास येणार आहेत तेही येतील. याउपरी होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. गाडर व मुंबईवाल्याचें कोशल होऊन गाडर सुरतेस आला. श्रीमंत दादासाहेबांकडे सटवाजी भोसला व बाजीराव बर्वे गेले. त्यावरून दादासाहेब बाहेर निघोन पांच सात कोस अलीकडे आले आहेत. गाडरांनीं व त्यांनीं कोंडाईबारीनें यावें; मुंबईवाल्यानें वसई कल्याणास पलटणें नेलीं आहेत, तीं घेऊन बोरघांटाकडे यावें; तीन चार पलटणें दाहुदेवरून सिपरीचे पलटणास कुमक पाठवावी; हा मनसबा त्यांनीं केला आहे. म्हणून आपण राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें. त्यास सुरतेहून पलटणें दाहुदेवरून माळव्यांत आल्यानें दरोबस्त माळवा खालीं. आम्हांस पायबंद मागील बसला म्हणजे पुढील मनसब्यास विलग पडेल, हें ठीक नाहीं. तरी, आपण सोनगडापासीं फौज मातबर सरदार होळकरासारिखे पाठवून सुरतेस पायबंद बसवावा, म्हणजे पलटणें फुटोन दाहुदेकडे येऊं पावणार नाहींत. बोरघांटावरी राजश्री हरिपंततात्या व राजश्री परशरामपंतभाऊस पाठवावें. कोंडाईबारीकडे फौज आधीं पाठवून दाहुदेकडून पलटणें न येत तें करावें. रवाना छ २२ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writing to Haripant Phadke communicates details of the affair of Chetsingh and advises measures to prevent British succour reaching to Malwa through Gujarat.*

No. 173 21st September 1781.

पौ छ १८ सवाल इसन्ने समानीन
हा डांक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. प्रस्तुत हैदरखानाचा ताण व जरब इंग्रजांवर भारी आहे. याकरितां कोणेही प्रकारें श्रीमंतांशीं व हैदरखानाशीं परस्परें संदेह पडून फाट पडावा, या युक्तींत व प्रेलांत इंग्रज फार

लागले आहेत. गाडरानें येथें राजकारणें लावून पाहिलीं; परंतु येथून उत्तरें साफच केलीं कीं, जें होणें तें हैदरखान व सरकार मिळून होईल. तेव्हां इकडील बोलणें सोडून हैदरखानाशीं कर्नेल कुटानें बोलणें लाविलें व पत्रही त्यास स्नेहाविषयीं पाठविलें. त्याचें उत्तर हैदरखानानीं कर्नेल कुटास लिहून पाठविलें कीं, श्रीमंत आह्मी एक. तुह्मांशीं सलूक करणें नाहीं. आह्मांकडे इंग्रजांचें राजकारण लागलें होतें, तो इतल्ला आह्मीं हैदरखान यास केला होता. त्याकडे राजकारण लागलें त्याचा मजकूर त्याणींही आह्मांस लिहिला. इंग्रजांचे मसलतीविषयीं हैदरखानच उपयोगी पडले व पडतील. वरकडानीं करार केले होते, त्यांचा विचार समजलाच आहे. आंतून इंग्रजांशीं स्नेहही केले. असो. चिंता नाहीं. प्रस्तुत आपलेकडे इंग्रजांचें बोलणें कांहीं लागलें आहे ह्मणोन वर्तमान कळलें. त्यास, ज्यांत दौलतेस उपयोगी व हैदरखानास संशय न पडे, तेंच आपण करतील. सर्व दूरंदेशीचे अर्थ आपले ध्यानांत आहेत, तेथें विस्तारें काय ल्याहावें? ह्मणोन लिहिलें तें व कितेक राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिलें, त्याजवरून सविस्तर कळलें. ऐसियास इंग्रजांचें चहूंकडून चवघांनीं पारपत्य करावें या मसलतीचे बाजीकर* नवाब व भोसले होऊन देवाजीपंत पुण्यास आले. आपला त्यांचा विचार होऊन मग आह्मांस बोलाविलें. भोसले आह्मांस सचंतर मसलत सांगा ह्मणतात. त्यास बंगाल्याची मसलत भोसल्याकडे सांगावी हें आपले व सर्वांचे विचारास आलें. त्या वेळेसच आह्मी आपणाशीं बोललों, भोसले यांच्यानीं बंगाल्याची मसलत होणार नाहीं. बंगाल्याकडे आपला एक सरदार पाठवावा, ह्मणजे बंगाल्याचे इंग्रजांस ताण बसून सरकारउपयोगी मनसुबा होईल. नवाब व भोसले व सरकार मिळून देशच्या इंग्रजांचें पारपत्य करावें. परंतु ही सल्ला विचारास न आली. देवाजीपंतांनीं बंगाल्याकडील मसलतीचा जिमा आपला करून घेतला. त्यावरून भोसले परकी सरदार होत्साता बंगाल्याची मसलत कबूल केली. ते करतील हे खातरजमा आपली होऊन देवाजीपंतांनीं गढेमंडल वगैरे मुद्दे घातले, ते करून दिल्हे. नवाबानीं राजबंदर शिकाकोलाकडील मसलतीचा जिमा केला. त्यावरून आदवानी वगैरे जागा नवाबाची इंग्रजांनीं घेतली असतां, इंग्रजांपासून हैदरखानानें घेऊन दाबली होती, ती नवाबाकडे सोडून देविली. कराराप्रमाणें आपलाले मसलतीवर जाऊन इंग्रजांचें पारपत्य करावें हें न होतां, नवाब आपले घरीं स्वस्थ इंग्रजांशीं आंतून स्नेह राखून बसले. भोसल्यांची

*पुढारी.

फौज बंगाल्याकडे जाऊन इंग्रजांपासोन रुपये घेऊन माघारे आले. यामुळें कलकत्याहून पलटणें, चिनापट्टणाकडे हैदरखानांनीं जनराल कूट याजवर जरब बसविली, याकरितां त्याचे कुमकेस पाठविलीं, व या इंग्रजांचे कुमकेस पलटणें कलकत्याकडून आलीं. यामुळें हैदरखानाकडे व इकडे मसलत भारी पडली. नवाब, भोसले आपलाले मसलतीवर कायम असते, तरी दोहीकडेही मसलती भारी न पडत्या. परकी सरदार बोलतात त्याप्रमाणें करतील, हा मोठा भरंवसा आपणास होता. परंतु प्रथम आह्मीं सांगितलें होतें, तें आतां आपले प्रत्ययास आलें असो. चिंता नाहीं. हैदरखान परकी असतां इंग्रजांचे मसलतीचे उपयोगी पडले. इंग्रजांनीं त्यांस लोभही दाखविला, परंतु करारावर कायम राहून इंग्रजांस ताण बसविला. ऐसें असोन, आपण आह्मांस पेशजीं लिहिलें होतें कीं, इंग्रजांकडील सलुकाचा पैगाम आला आहे, सरकारांत वोढ मोठी; पैक्यास ठिकाण नाहीं. पुढें मसलत येऊन पडल्यास फौजेची तरतूद कैसी होती? हैदरखानास सल्ला पुसावी तर घरचा खजाना फार! आपला मुलूक मागें टाकून नवा मुलूक व पैका मिळाला. परभारें मसलतीचा खर्च वारितो. या मसलतीमुळें त्यास किफायत जाहली व होत आहे. मसलत लांबल्यास त्यास पेंच बसावयाचा नाहीं. इंग्रजांकडील सलुकाचा पैगाम आला, तर त्यास इतल्ला दिल्ह्याखेरीज करूं नये, ऐसें बोलण्यांत आहे. याचा विचार कसा? ह्मणोन आपलीं पत्रें आलीं. त्यांचें उत्तर आपणास पेशजीं आह्मीं लिहिलेंच आहे जे, हैदरखान कराराप्रमाणें कायम राहून इंग्रजांवर जरब बसविली, त्याजकरितां इंग्रज आपल्याशीं सलुकाचें बोलतात. त्यास हैदरखानाचे इतल्याखेरीज करणें ठीक नाहीं. इंग्रज..... इकडे सलुकाचें बोलणें लाविलें ह्मणजे हैदरखानाचे चित्तांत संशय येऊन यांचें तुटेल, तेव्हां हैदरखान यांशीं स्नेह करून इकडे पेंच पाडावा, हे त्यांची तऱ्हा आहे. हैदरखानाचे चित्तांत संशय आल्यावर इंग्रज आपण एक होतील, तेव्हां दौलतीस मोठा पेंच पडेल, मग संभाळणार नाहीं. याप्रमाणें आह्मींच आपणास लिहिलें असतां, आह्मी इकडे इंग्रजांशीं सलूक करून तोफा घेऊन माघारे येऊं, हे गोष्ट आह्मांकडून घडेल न घडेल, हा विचार आपले चित्तांत न येतां, जे सल्ला आह्मीं आपणास लिहिली होती, तीच आपण आह्मांस लिहितात. अपूर्व आहे! गुजराथीचे मसलतीमुळें खर्चाचे पेंचांत येऊन वोढगस्त प्रकार जाला. दुसरें, देशीं जाणें ह्मणोन फौजेचीही तरतूद नव्हती. तशांत इंग्रज शिरोंजेपावेतों आले. तेव्हां जो सरंजाम होता तितकियानसीं येऊन गांठ घातली. इंग्रजांस गोहदकर जाट व नरवरकर राजा मिळाले. याकरितां मसलत लांबली. आसरा धरून

बसले. तत्रापि पर्जन्यकालांत सडे फौजेनशींच इंग्रजांचे नजीक चौ कोसांवरी राहिलों. दो बाजूनें फौजा व तोंडावरी आह्मी आहों. गोहदकर व नरवरचे राजाचा मुलूक त्यांस पाठीमागें. तिकडूनही रस्त येती ते जाट व नरवरकर पोहचावितात. याकरितां जाटाचे मुलकांत फौजा पाठवून हंगामा केला. तेव्हां जाटानें पैगाम लाविला कीं, इंग्रजांस यमुनापार जाऊं द्यावें, ह्मणजे आह्मी त्यांचे काबूंतून सुटून आपणास येऊन सामील होऊं. आपला मुलूक मागें टाकून त्यांचे मुलकांत जाऊन लढाई पाडावी ह्मणोन. त्यावरून इंग्रज कोणेही प्रकारें आसरा सोडून मैदानांत निघावे, मग जाऊन गांठ घालून पारपत्य करावें, या अर्थें बोलणें जाटाकडील आलें. त्याचा नाद मात्र आहे. येविशीं पेशजीं आपणास सविस्तर लिहिलेंच आहे. सलूक करून तोफा घ्याव्या आणि माघारे यावें, हे गोष्ट कसी घडेल? तोफा कांहीं इंग्रजांनीं लढाईंतून जबरदस्तीनें नेल्या असा अर्थ नाहीं. बुणग्यांतून रात्रीं दगा करून नेल्या. त्यास इंग्रजांचें पारपत्य करणें, तेव्हां तोफा जातात कोठें? हीं पलटणें येथें आटकलीं, यांची कुमक करावी या अर्थें कलकत्याहून जरनेल इष्टिन काशीस आला. तेथील राजास रुपये व किल्ले मागूं लागला. त्यावरून काशीकर राजे यांची त्यांची लढाई होऊन इंग्रजांची शिकस्त जाहली. इष्टिन जखमी होऊन पळोन चिनाडगडास गेला होता, तों काशीकर राजानें जाऊन चिनाडगड घेऊन इष्टिनास धरून आणिलें. येविशीं पेशजीं आपणांस लिहिलें आहे. इकडील इंग्रजांचें पारपत्य थोडक्या दिवसांत होऊन येईल. चिंता नाहीं. सुरतेस गाडर आला. पलटणें पावागडाकडून माळव्यांतून यांचे कुमकेस येणार, असें वर्तमान ऐकिलें. त्यास, होळकर व सरकारच्या फौजा पाठवून, इंग्रजांस सुरतेनजीक ताण बसवावा ह्मणजे माळव्यांत येऊं पावणार नाहींत. माळव्यांत आले तर मागील पायबंदामुळें हा शह सोडून तिकडे जावें लागेल. याकरितां तिकडे फौज पाठवावयाचा विचार जलदीनें जाहला पाहिजे. काशीकडील वर्तमान पहिलें लिहिलेंच आहे. इष्टिन पळोन चिनाडगडांत गेला होता, तो धरला ह्मणून हल्लीं वर्तमान आलें आहे. कासीदजोडचा काशीस गेल्या आहेत. वर्तमान आल्यावरी लिहिलें जाईल. सुरतेकडील बंदोबस्त आधीं करावा. रा छ २ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji disowns his having made advances to the English for peace and asks Nana to protect his rear.*

No. 174 26th September 1781.

राजश्री नारो शिवदेव गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. राजश्री नानांचें पत्र तुह्मांस आलें, तें तुह्मीं पाहण्यास पाठविलें. त्यांतील मजकूर कीं, सरकार व नवाब निजामअलीखान व हैदरखान व भोसले चौघां मिळोन इंग्रजांची मसलत करावयाची तिगस्तां ठरली. त्यांत निजामअलीखान तों स्वस्थ भागानगरांत राहून, इंग्रजांचा वकील मातबर आपणाजवळ ठेवून घेतला. आपण मसलतीचा नक्ष ठरविला असतां मसलत न केली ी गोष्ट एकीकडे ठेवून, सरकारांत नवेंच बोलणें पहिल्या कराराखेरीज स्वराज्याचें बोलतात. भोसल्यांनीं तों पैका ंग्रजांपासून घेऊन फौज आपली माघारी आणली. पैका घेतला तेव्हां आंतून करारमदार इंग्रजांशीं कांहीं केलेच असतील. दोघांनीं तों याप्रमाणें केलें. पुढें चाल कोणती धरतील हें पहावें. राहतां सरकार व हैदरखान यांजवर मसलत पडली. त्यांत चेनापट्टणाकडे इंग्रजांचा मुलूख भारी. हैदरखानानें आपला मुलूख पाठीशीं घालून, इंग्रजांचे मुलखांत जाऊन मुलूख काबीज केला. पैकाही खंडण्या घेऊन मेळविला. पहिला पैका पदरीं फार, यामुळें त्यास या मसलतीची हुशारी. सरकारांत पैका नाहीं. मसलत वीस कोसांवर पुण्यापासून. आपलाच मुलूख मारावा, जाळावा, तेंहि आजपावेतों जालें. परंतु अशानें मसलतीचा शेवट लागन जरबेने तह व्हावयाचा नाहीं. ओढीमुळें सरकारची दौलत पेंचांत आली. पुढें लांबल्यास अगदींच पेंच बसेल. याकरितां इंग्रजांवर जरब, विना बंगाल्याचा मुलख मारल्याखेरीज बसत नाहीं, हा मनसबा मात्र आह्मांस समजतो. परंतु याची तर्तूद फौजेची करावी. येथीलच तर्तूद ओढीमुळें कशी होईल हें समजत नाहीं. पाटीलबावांनीं जाऊन बंगाला मारावा, तरी सिपरी कोलारसावर पलटणांचा जमाव भारी होत चालला. तेव्हां पतकरले मसलतीस गुंतणें प्राप्त. त्यास नजफखान वगैरे राजेरजवाडे यांसीं राजकारणें पक्कीं करून दसऱ्यापावेतों जमाव आपले जवळ पाडन, या पलटणांचें पारिपत्य करून बंगाल्याची मसलत होईल, असें निश्चयात्मक असल्यास चांगलेंच आहे. परंतु परक्यांसी राजकारणें. भरंवसा काय? याकरितां फौजेची तर्तूद होऊन गेली तर इंग्रजांचे घरांत मसलत पडेल, तेव्हां हीं पलटणेंच आहेत तींच माघारीं तिकडे जाऊं लागतील. मुलूख त्यांचा मारला जाईल. आयास येतील. त्यास, बंगाल्याकडील राजकारण एकाचे विद्यमानें आहे, कीं फौज आम्ही च्यार रुपये खर्च करून ठेवून जातों, परभारें मिळवन मसलत करितों. त्यास या कालीं

ही गोष्ट बरी आहे. परिणामास जाणें ईश्वराधीन. करून पहातों म्हणोन. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास चौघां मिळून तिगस्तां इंग्रजांचे पारिपत्याची मसलत ठरत होती, तेव्हांच आम्हीं सर्वांस सांगितलें, भोसले यांचा व इंग्रजांचा दांडामेडा आहे. यांच्यानें इंग्रजांची मसलत होणार नाहीं. नवाबाकडून होणें दुरापास्त! सरकार व हैदरखान दोहींकडेच मसलत पडेल. याकरितां भोसले व नवाब व सरकार मिळोन गाडर इंग्रजाची मसलत सांभाळावी. हिंदुस्थानांत जावयास आह्मांस निरोप द्यावा. बंगाल्याची मसलत करणें जिमा आमचा. त्या वेळेस चित्तास न आलें. त्या समयीं आह्मांस हिंदुस्थानांत जावयाचा निरोप दिल्हा असता, तरी इतका फैलावा इंग्रजांचा न होता. बंगाल्यास ताण बसता ह्मणजे देशींही मसलत भारी न पडती. उभयतांनींच मसलतीचा नक्षा ठरविला असता. याप्रमाणें निदर्शनास आणून दाखविलें. हैदरखान याचा इतका भरंवसा नव्हता. परंतु त्यानें कराराप्रमाणें करून दाखविलें. इंग्रजांवर जरब चांगलीच बसविली. उभयतांनीं मसलतीचा असा प्रकार केल्यामुळें इकडे व सरकारांत मसलत इंग्रजांची भारी पडली. विना बंगाला मारल्याशिवाय इंग्रजांची मसलत आटोपत नाहीं ही गोष्ट खरी आहे. नजफखान वगैरे राजेरजवाडे यांचीं राजकारणें कागदीं पत्रीं होतीं. हल्लीं इंग्रजांचे छातीवरी छावणी सडे फौजेनिशीं लगती केली. अलीकडे लढाया दहा बारा जाहल्या. दर लढाईंत इंग्रजांवरी जरब बरीच बसत गेली. मुडदे त्यांचे पडले व जखमी जाहले, ते लढाईंतून टाकून माघारे मुकामावरी गेले. आजपावेतों त्यांजकडील तेलंगे प्यादे पंधरा सोळाशें व गोरे च्याळीस पन्नास व तुरुकस्वार पन्नास साठ व च्यार पांच पलटणांचे सरदार ठार मारले, पडले. कमपेश दोन पलटणें कमी जाहलीं. पलटणांतील तेलंगे व तुरुकस्वार बेजार जाहले आहेत. इकडे तेलंगे व गोरे व तुरुकस्वार निघोन आले. कित्येक बंदुका घेऊन व टाकोन पळोन अंतरवेदींत जातात. नरवराकडून व सिकरवाराकडून इंग्रजांस रस्त गोहदकर जाट व नरवरकर त्यांस मिळाल्यामुळें येती. त्यांचे बंदोबस्तास कन्हेरियाकडून नरवराकडे जाऊन रस्त मारावी ह्मणून राजश्री सदाशिव मल्हार व गंगाधर गोविंद बुंदेले व शिवराव हरि झांशीकर ऐसे पाठविले. ते करेरियानजीक जाऊन राहिले. तिकडे स्वारी करून रस्तेचा बंदोबस्त करतील. सिकरवाराकडे राा अंबाजी इंगळे यांजकडील फौज पाठविली आहे. आम्ही च्यार पांच महिने सडे फौजेनिशीं आहों तसेच इंग्रजांचे लगते मुकाम करून आहों. इंग्रज जाग्याचे आसऱ्यानें आहेत. छावणीस माघें न जातां इंग्रजांभोंवते बरसातीचे दिवसांत दक्षिणी राहिले, तेव्हां बादबरसात

इंग्रजांचें पारिपत्य करतील हें इकडील राजेरजवाडे वगैरे सर्वांस समजलें. त्यावरून वकील नजफखानाकडील वगैरे आले आहेत. या मसलतीस येऊन सामील व्हावें अशा तऱ्हेनें सर्वांशीं बोलणीं होत आहेत. बोलतां गोड बोलतात. पर्ज्यनकाळांत तर कोणाचेंच येणें होत नाहीं. बादबरसात कोण अनकूल होतो, कोण न होतो, हें कळेल. नवाब, भोसले यांचा स्नेह सरकाराशीं असतां, त्यांनीं प्रकार असा केला! पुढें कोणती चाल धरतील हा अंदेशा येऊन पडला! हे तर हिंदुस्थानी आहेत. असो. केवळ यांचेच भरंवशावर आहों असा अर्थ नाहीं. तिगस्तां गुजराथचे स्वारीमुळें सरदारी फारच पेंचांत आली. त्याजवरी उज्जनीस छावणीस आलों. त्या वेळेस लिहून पाठविलें व तुम्हांस सांगितलें. त्याप्रमाणें इकडे येणें जालें असतें, तरी इतकें भारी न पडतें. देशीं जावयाचें याकरितां फौजेचा भरणा नव्हता. अकस्मात् मसलत येऊन पडली, तेव्हां येणें प्राप्तच जालें. हे मसलत आमचे माथां आहे. श्रीमंतांचे पायांशीं आमची निष्ठा आहे. तरी या पलटणांचें पारिपत्य करून बंगाल्यांत ताण बसवावा हेच तर्तूद आहे. सरकारांतून उपराळा व्हावयाचा प्रकार तुम्हांस पत्रें येतात त्यावरून समजला. असो. चिंता नाहीं. मसलत आम्हांवरी आहे त्यापक्षीं यावत्प्राण मेहनत करणें आम्हांकडे. होणें जाणें श्रीमंतांचा प्रताप. हैदरखानास सरकारचीं पत्रें वरचेवर जाऊन त्यास इंग्रजांचे मसलतीवरी हमवार* राखावा. गाडर इंग्रजाचा मनसबा काय, ह्याची पैरवी आतांपासून असावी. नवाब व भोसले यांजकडील अर्थ समजन चुकला. परंतु कागदोंपत्रीं आजपावेतों स्नेहाचा सिलसिला चालला तसाच चालावा. बोलण्यांत व लिहिण्यांत वांकड तूर्तचे प्रसंगीं दाखवूं नये. इंग्रजांचें पारिपत्य जाल्यानंतर मग चिंता नाहीं. इंग्रजांस हैदरखानाकडून ताण बसला व या पलटणांसही जरब बसल्यामुळें अंदेशांतच आहेत व या पलटणांचें पाऊल माघें पडलें, म्हणजे बंगाल्यापर्यंत मोकळें. याकरितां इंग्रज सलुखाचा संदर्भ लावतील त्याजवरी जाऊं नये. इंग्रज लबाड आहेत. यांचा विश्वास धरूं नये. इंग्रजांशीं बोलणें लागलें म्हणजे हैदरखान हातचा गेला असें समजावें. इंग्रजांचा त्याचा दांडामेडा आहे. दोघे एक होऊन सरकाराशीं विरुद्ध करतील, तेव्हां दौलतीस मोठाच पेंच पडेल. याकरितां जें करणें हें समजोन करणें. बंगाल्याकडील प्रकार लिहिला, त्यास ही गोष्ट कोण करणार तें समजलें! त्यांच्यानें† बंगाल्याची मसलत होणें व घरचा पेंच सांभाळणें होणार नाहीं. यास्तव भोसले

*कायम. †होळकरांकडून.

यांचें संधान आहे तेंच असावें. तूर्तचे कालीं करणें ठीक नाहीं. हें केल्यास उघड होऊन भोसले जाऊं लागतील. नवाब ते एक होऊन वांकडी चाल धरल्यास ठीक नाहीं. जे बोलतात त्यांस लावून मात्र ठेवावें. रवाना चंद्र ७ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji writes to Naro Shivdeo to advise Nana not to entertain overtures of peace from the English as they had been driven into a position of hopeless embarrassment and would soon make an unconditional surrender if resistance continued unrelaxed.*

No. 175 26th September 1781.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. सुरतेकडील वर्तमान पेशजीं आपणास दोन तीन पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून कळलेंच असेल. हल्लीं महेश्वराहून गंगाजळनिर्मळ मातोश्री अहिल्याबाई होळकर यांचीं पत्रें येथें आलीं कीं, गाडर सुरतेस आल्यावरी भडोच वगैरे जागांचीं पलटणें जमा करोन, सुरतेहून निघोन बडोद्याकडे आला. राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांस फौज सुद्धां बरोबर घेऊन दाहुदेवरून माळवे प्रांतीं येऊन गडबड करावी, उपरांतिक सेसईचे पलटणांस सामील व्हावें; माळव्यांतील रान मोकळें पाहून गाडरानें हा विच्यार केला आहे. माळव्यांत येऊंच लागला, तरी याची तजवीज कसी करावी, तें लिहून पाठवावें म्हणोन. त्यास, येविशींचें पेशजीं आपणास लिहिलें आहे, त्यावरून सुरतेकडे फौज रवाना केलीच असेल. नसली केल्यास, फौज चांगली मातबर जलदीनें सुरतेनजीक पाठवून शह द्यावा. म्हणजे त्यांस पायबंद बसून माळव्यांत येऊं पावणार नाहींत. विजयादशमीचे मुहूर्तें आम्ही कूच करून, सेसईस पलटणें आहेत त्यांजवरी जाणार आहोंत. काशीस इष्टिन कलकत्याहून आला होता त्याचें पारिपत्य काशीकर राजानें केलें. त्याचीं पत्रें, पुढें लवकर यावें म्हणोन आलीं आहेत. याकरितां या पलटणांचें पारिपत्य करून पुढें अंतरवेदींत जाऊं. अशांत आपण जलदी करून गाडरास ताण बसवावा. समय हाच आहे. माळव्यांत पलटणें आलीं म्हणजे आम्हांस पुढील मनसबाचा पेंच पडेल. माळव्यांत येऊं लागल्यास माघारे फिरावें लागेल. यास्तव आपण लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त करून माळव्यांत

इंग्रज येऊं न पावेत, तें करावें. रवाना छ ७ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks Nana to move troops towards Surat so as to keep Goddard engaged and prevent him entering Malwa and attacking him (Mahadji) in the rear.*

No. 176 27th September 1781.

पो चंद्र १८ सवाल इसने समानीन

हस्ते डांक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. सुरतेकडील वर्तमान, माळव्यांत दाहुदेवरून पलटणें येणार आहेत. माळव्यांत येऊं लागले तरी याची तजवीज कशी करावी तें लिहून पाठवावें, म्हणून मातुश्री अहल्याबाई होळकर यांनीं महेश्वराहून लिहून पाठविलें व पावागडाहूनही बातमी हल्लीं आली आहे कीं, गाडर डभईपासून तीन कोसांवरी आला. फत्तसिंग गायकवाड भाद्रपद वद्य ७ सप्तमीस* जाऊन भेटला. गाडर व गायकवाड यांचा मनसुबा जाहला आहे कीं, पावागड प्रांताचा बंदोबस्त करून दाहुदेवरून माळव्यांत येणार आहेत म्हणून. त्यावरून हें पत्र आपणास लिहिलें आहे. त्यास येविषयीं आपणच पेशजीं आम्हांस लिहिलें होतें व गाडर डभईकडे आल्याची बातमी कळलीच असेल. तेव्हां आपण फौजा सुरतेकडे रवाना केल्याच असतील. सुरतेनजीक फौजा पाठवून सुरतेस ताण बसविला ह्मणजे गाडर माळव्यांत येऊं पावणार नाहीं. पर्जन्यकाळामुळें आम्हीं चहूं कोसांचे तफावतीनें इंग्रजांपासून मुक्काम करून होतों. त्यास आज विजया-दशमीचे मुहूर्तें कूच करून, पुढें इंग्रजाचे पारिपत्यास जातों. काशीकर राजानें कलकत्तेकर इष्टिनाचें पारिपत्य केलें. त्याचीं पत्रें आम्हांस आलीं आहेत कीं, फौजा पुढें लवकर याव्या. त्यावरून काल्पीपाशीं उतरावयास राजश्री सदाशिव मल्हार व राजश्री गंगाधर गोविंद बुंदेले फौज देऊन पाठविले आहेत. कोंचेनजीक गेले. पुढें जातील. आम्हीं या पलटणाचें पारिपत्य करून अंतरवेदींत उतराव-याचा मनसबा केला आहे. आपण सुरतेकडे फौज पाठवून ताण न दिला, तरी माळव्यांतील रान मोकळें पाहून गाडर चाल करील. माळव्यांत येऊं लागला

*१० सेप्टेंबर सन १७८१.

तरी मोठा पेंच पडेल. तेव्हां इकडील मसलत शेवटास जाऊन अंतरवेद वगैरे सुटावयाचा समय आहे, तें सर्व सोडून माघारें यावें लागेल. यास्तव आपण आधीं लिहिल्याप्रमाणें फौजा पाठवून बंदोबस्त करावा. आम्हांस माघील पेंच न पडे तें लवकर जालें पाहिजे. मातुश्री अहल्याबाईसही माळव्याकडील बंदोबस्ताविषयीं पत्रें लिहावीं. रवाना चंद्र ८ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having renewed the offensive on the conclusion of rains and asks Nana to take measures to prevent Goddard's march into Malwa.*

No. 177 17th October 1781.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. गुलजारखानाचे पारपत्यास फौजा पाठविल्या, त्यांणीं गुलजारखानाचें पारपत्य यथास्थित करून, फिरोन कोणी खूळ न करी असें व्हावें. त्यास, त्याचें पारपत्य तर यथास्थित जाहलें. दहा हजारांचे गांव गुलजारखानास द्यावे. गढींतील तोफा व जेजाला वगैरे सरंजाम त्यास नेऊं द्यावा. फिरोन खूळ व सुभा व्हावयास जागा पाहिजे. त्यास, सरकार व होळकर व शिंदे तिहींकडील फौजा जाऊन काम तर सिराच* जाहलें. असो. तूर्त ठाणें साहेबखान टोके याचे स्वाधीन होत नाहीं. जकिरा हातास यावयाचा नाहीं. उलटे दहा हजारांचे गांव द्यावे ह्मणतात ह्मणून येथें बोभाट आला आहे. याचें उत्तर त्यास कसें ल्याहावें? ठाणें सरकारचें हल्लीं ठेविलें याची शिबंदी यास पुढें मागतील, ती यांणीं कोठून द्यावी? ठाणें नाहीं. जकिराही गेला. ठाणें हाताखालीं नाहीं याचें याणीं कसें करावें? रवाना छ २८ सवाल. हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana asking him to inflict severe punishment on the rebel Gulzar Khan Pathan, so that he may not create trouble again.*

---

*उत्तम.

No. 178 16th October 1781.

पैवस्ती चंद्र ४ जिल्काद.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः--

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ शवाल मुक्काम रांजणगांव देवाचे. स्वामींचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें. विशेष. कोरेगांवींहून विनंतिपत्र सेवेसीं पाठविलें तें प्रविष्ट जालें असेल. तेथून स्वार होऊन चाललों, तों राजश्री बाजी विठ्ठल मामा यांची भेट शिकारपूरचे दरम्यान जाली. वर्तमान पुसलें. त्यांजवळ अहल्याबाई यांचीं पत्रें स्वामींस व राजश्री तात्यांस होतीं तीं दाखविलीं. त्यांतील अर्थ जे, दौलत खराब होते, अद्यापि बंदोबस्त होत नाहीं. तर त्वरेनें बंदोबस्त व्हावा; व जबानींही मामा बोलले जे, दोन वर्षें क्रमलीं असतां बंदोबस्त होत नाहीं. यांत दौलत खराब, सरकारचाकरी घडत नाहीं हें चांगलें नाहीं. आपले मनोदयाप्रमाणें बंदोबस्त लवकर व्हावा यास्तव पाठविलें आहे. यावरून मनांत आलें जे, स्वामींजवळ एक निश्चय होऊन सेवकाची रवानगी जाली. त्या अर्थाची सिद्धता राजश्री पाटीलबावा यांजवळ मार्गीं बाईची भेट न घेतां परभारा गेल्यास संशय होईल, यास्तव, भेटी घेऊन समाधानार्थ भाषण करून पुढें जावें असा बेत करून चाललों. मामा प्रकर्ण घेऊन आले. हा जाबसाल नवाच स्वामींजवळ पडेल. तेव्हां भवति न भवति होईल. हें वर्तमान बाईकडे जाईल. मी कांहीं न बोलतां कां गेलों असाही संदेह घेतील, तर ही गोष्ट चांगली नाहीं जाणून मामांस सांगितलें कीं, आजचा मुक्काम रांजणगांवचा आहे तेथें चलावें. मुक्कामीं बोलूं. तें यांनीं मान्य करून तळेगांवांस गेले. दुसरे दिवशीं मजला मुक्काम करणें प्राप्तच होता. राऊत आले नव्हते, आणि भिजलों. पांघरुणें वाळवावयाचीं होतीं सबब मुक्काम केला. तों मामाही आले. बोलणें चाललें. त्यांत यांचा आशय मनोदयाप्रमाणें बंदोबस्त करून देऊन दौलत रक्षावी, सरकारचाकरी घ्यावी, असा मनोदय बाईचा आहे. मीं उत्तर केलें जे, राजश्री तुकोजीबावा देशीं आले ते समयीं बाई व राजश्री पाटिलबावांचीं पत्रें आलीं कीं, तुकोजीबावांस बहकूं देऊं नये. समेटून घेऊन सरकारचाकरीवर पडत तें करावें. तो समय आम्हांस कसे संकटाचा होता? इंग्रजानें वसई घेऊन पुण्यावर येतो. एक एक रावताची गरज. मग हे तों थोरले सरदार. परंतु मागील स्मरणही होतें.

कसें पाऊल टाकतील? असें मनांत आणून तुकोजीबावांस लिहून पाठविलें कीं, फौज सुरतेकडे लावून देऊन खांसा तुम्ही थोडक्यांनिसीं यावें. राजश्री हरिपंत-तात्यांस सामील व्हावें. हीं पत्रें गेल्यावर त्यांसही आपले करण्याचें स्मरण होतेंच. फौज निराळी फोडितात, आम्हांस थोडक्यानें बोलाविलें, कारण काय? असा संदेह घेऊन लिहून पाठविलें कीं, आमची खातरजमा सहसमागमीं जाली. त्यास, हुजूर येऊन, भेटी घेऊन, चाकरीवर जाऊन सेवा करून दाखवूं. ऐशीं त्यांचीं पत्रें आलीं. तेव्हां खातरजमा न केल्यास बहकतील. यास्तव कागदीं पत्रीं खातरजमा व शपथा व बेलभंडार करणें प्राप्त जालें. त्या अन्वयेंकरून संदेह त्यांचे दूर करून आणिले. श्रीमंतांची भेट करवून कोंकणांत राजश्री तात्यांकडे पाठविले. तुकोजीबावांनींही इंग्रजांवर मेहनत बरीच केली. वर्तमान लोपलें नाहीं. तात्यांसमागमें चाकरी करून माघारे आले तसे वाफगांवीं आहेत. मसलत अखेर जाली नाहीं. नित्य नवी उशासीं इंग्रज पंचवीस कोसांवर उभाच आहे. तसें आपणासही सिद्ध होऊनच असलें पाहिजे. या अर्थीं हुजरातची फौज व तोफखाना व गाडद सरकारची सिद्ध आहे. तुकोजी बावा सरदार लौकिकाचे, दाबाचे हुजूर आहेत, ही शोहरत बरीच. परंतु आंतून त्यांचा घरचा बंदोबस्त नाहीं. याजकरितां ते निरंतर हटकीत आहेत. बंदोबस्त न जाल्यास कामावर काय पडतात? तो कसा करून द्यावा? यांनीं तों सहसंगीं खातरजमा करून घेतली. याचा विचार करून बाईकडे जाबसाल लाविला. ह्याचा ठराव निखालस अद्यापि होतच नाहीं. एक तों इंग्रजांची मसलत अखेर जाली नाहीं, आणि त्यांजवळ शपथा गुंतल्या. खावंदांजवळ आल्याची खातरजमा जाली असतां बंदोबस्त न केल्यास शद्ब लागतो. तिकडून अंतर पडल्यास मग शद्ब देवाचा नाहीं, मग मागसास कोण मानितो? एक वेळ त्यांचा बंदोबस्त करून द्यावा. मग त्यांच्यानें अंतर पडल्यास कळेल तसें करावें. ही सचोटी त्यास दोन वर्षें फेर* पडली, ती तुटली नसतां आपण पत्रें घेऊन आलेत. त्यांचे जाबसाल दरबारीं काय होतील? बाई वृद्ध. करतेपणा दुरंदेशी आंगीं असतां त्यांनीं तुम्हीं विचार कसा केला नाहीं? पत्रें घेऊन आलां हीच समज तुम्हां सर्वांची, किंवा विवेक व खावंदाचे समयावर वचनें यांस दिलीं तीं निभावलीं पाहिजेत, याची नजर कांहीं आहे कीं आपलाच हेका करावा? मुख्य दैव तर लहान थोर सर्वांस लागलें. राज्यभार मनसब्यावर दुरंदेशीवर चालत असतो. हे अर्थ बाईचे व संगीयांचे

*तफावत.

कसे आहेत! देश काल वर्तमान आज मसलतीचे समय समजन चार दिवस समजेवर घ्यावयाचें आहे कीं नाहीं असें विचारलें. याचें उत्तर मामांनीं दिलें कीं, ते बायको शाहणी आहे. तुम्हीं सांगितले प्रकार मनांत आणूनच दोन वर्षें काढलीं. पुढेंही श्रीमंतांची मर्जीचें संरक्षण अगत्यच आहे. आबदाब राहून चार दिवस आणखी काढावे अशी मर्जी असल्यास अधैर्य नाहीं. सरकारचाकरी होत नाहीं व गृहकलहाचा दुर्लौकिक फार जाला हें सल मातुश्री-चित्तांत जालें. याजकरितां उतावळी करितात. वाफगांवीं मनसबे आमचे बंदोबस्ताचे मनस्वी करून दावघावही दाखवितात. बातम्या बाईच्या जातात त्यावरून उतावळे होतात. यास कोणीं काय म्हणावें? आम्ही हिताहित आंदेशाचेही उल्लेख करून पाहिले. तों हिम्मत बाईची आहेच. मी मल्हारबाची सून आहें. हात बांधून तर घेणार नाहीं. खावंदांचे निष्ठेंत अंतर करावयाचें नाहीं. तन्मुळें चार दिवस आणखी लोटावयाचे असल्यास दौलत कोठें जात नाहीं. परंतु दरबारची ममता आमचे ठायीं आहे असें तों समजलें पाहिजे. खावंद लहान, कारभारी श्रीमंत राजश्री नाना एकवचनी आहेत. त्यांचे भरंवशावर आजपावेतों कालहरण जालें खरें, बंदोबस्त अद्यापि होत नाहीं याचीं कारणें कळत नाहींत. न जाणो त्यांच्या पक्षावर पडून आमची उपेक्षा जाली, अगर मसलत जाणून करीत असिले तर आम्हांस त्यांतील कांहीं समजावें तें नाहीं. स्तब्ध प्रकार होऊन राहिला यांत काय समजावें? कागद पत्र किंवा निरोप आंदेशाचे कांहींच नाहीं यामुळें धीर पुंरत नाहीं. नाना खेरीज विश्वास कोणाजवळ आमचा नाहीं. त्यांनीं हिताहित व पुढें आमचें बरें कसें करितात हें समजल्यास चार दिवस टाळाही देतां येईल. मी उगीच बसली असतां वाफगांवकरांनीं कुबुद्धि करावयाचा दाखला दरबारीं आहे नाहीं कळे काय! त्यांच्या बातम्या ऐकून विफलता येते. उगेच बसून त्यांचे हातून आबरू गमावणें हें घडणार नाहीं. त्यास कुबुद्धि-करितां वर्जावें. त्यांनीं उगीच मनसबा करून येत (?) करितील तर चिंता नाहीं. बदला होईल. या कटकटींत जीव नाहीं. परीक्षा त्यांस पाहावयाची असेल तर देणें पडेल. याचा शद्व सरकारचा नसावा असेंही बोलणें बोललीं. टाळा देऊन चार दिवस लोटतील असेंही वाटतें. अंतःकरण श्रीमंत नानांजवळ आहे. त्यांचा जिव्हाळा पक्का आढळल्यावर विश्वास त्यांचे वचनावर ठेऊन आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी असेंही मानस बाईचें आहे. ऐकून मी उत्तर केलें कीं, दौलतीचीं कामें दूरदृष्टीनें पाहून केल्यासच परिणाम आहे. यास्तव विवेका-

वर घेऊन चालाल तर आम्ही सांगतों, तें त्यांनीं मान्य केल्यावर सांगितलें जे, श्रीमंतांचें अंतःकरण तुम्हांजवळ आहे. त्यांस मिळवून घेण्यास तुमचेंच संमत जाल्यावरून शफतेस गुंतलों. आणिलें त्याप्रमाणें त्यांचा बंदोबस्त करून द्यावा. सेवा घ्यावी. त्यास प्रतिबंध तुमचा, ही सरकार नुकसानी मनांत आणून तुमची वांकडी गोष्ट सांगणें ठीक नाहीं. त्यांनीं आज सेवेविषयीं निखालसीची परीक्षा कोठें दिली आहे? या अर्थी तुमचें वर्चस्व राहून डौल त्यांस निखालस करून द्यावे. ते दौलतीचें रूप काय करितात, सरकार चाकरी कशी करितात, सरकार देणें कसें वारतात, हें पाहणें प्राप्त आहे. एक वेळ बंदोबस्त करून दिला म्हणजे धन्याचें वजन व आमचें बोलणें पार पडलें. मग बंदोबस्त करून दिल्याचें सार्थक तुकोजी बावांच्यानें होईना तर खावंद आम्ही काय करितों, ही परीक्षा होय, तावत्काळ बाईंनीं विवेकावर घेऊन स्वस्थ घरीं असावें. चार परगणे, खरगोण, इंदूर, देपाळपूर, मल्हारगड चार परगणे बाईकडे आहेत. त्यांचा पैका सरदारीकडे देत जावा. डौलाचे खर्चाचा विचार तर गांवखेडीं नेमून पहिलेच दिलीं आहेत त्यांजवर चालवावा. याप्रमाणें तूर्त गाडा चालून तुकोजीबावांकडे सारा अकत्यार ठेवावा. मामांनीं उत्तर दिलें जे, तुम्ही बरें म्हणतां. बाईस लिहून पाठवितों. श्रीमंत नानांचे विश्वासावर आजवर लोटलें तशी पुढें खातरजमा व आमचें बरें कसें करितात हें समजल्यावर, विश्वास वचनीं ठेऊन तूर्त टाळा द्यावा. इतकें बाईचें बोलणें ऐकिलेंच आहे. आतां हें वर्तमान लिहितों. चौ परगण्यांचा पैका डौलाकडे, तर काय देतील तितक्यावर आपले डौल सांभाळतील तर न कळे. वरकड माळव्यांत कमाविसदार तुकोजीबावांचे आहेतच. पैसा राजश्री तुकोजीबावांनीं घ्यावा. दारीं फिर्यादी न आल्यास कोणी बोलावूं जात नाहीं. असेंही करितां बाईकडे फिर्यादी आला तर न्याय बाईंनीं करावा, तो मान्य व्हावा. व सरसालामध्यें दहा हजार पावेतों वराता बाईंनीं केल्यावर कमाविसदारांनीं अमान्य करूं नयेत. असें जाल्यास हुकूम आपला राहिला असें वाटून, कबूल करितील तर करितील. कधीं बोलण्यांत आलें नाहीं. लिहून पाठवितों. माझे चित्तांत यांस माघारें न्यावें. मामांचें म्हणणें जे, पुण्यापावेतों आलों. आतां श्रीमंतांची भेट न घेतां गेलों तर शद्ध लावतील. मसलत चांगली आहे. ऐकल्यानें तूर्त मर्जीचें पादन घडून काम होतें हा मजकूर लिहून पाठवितों. मनसबा चांगला आहे. मान्य करावा. म्हणून यांचें पत्र बाईकडे रवाना जालें. मागाहून मीही जातों. बाईची गांठ पडून अर्थ बोलण्यांत येतील ते विनंती करीन. मान्य जाली तर

उत्तमच जालें. त्याअन्वयें मामांस लिहून पाठवितील. तेव्हां आज्ञेप्रमाणें मान्य म्हणून बाजीपंत यांनीं सेवेसीं विनंती केल्यास याची खातरजमा व बाईस खातरजमेची चिठ्ठी द्यावी लागेल. म्हणजे स्वामींचे हस्ताक्षरावर विश्वास ठेऊन आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितील. मान्य नच होत तर मी पाटिलबावांकडे जातच आहें. तेथें ठराव होणें तो होईल. येथवर आले त्यापक्षीं दर्शन घ्यावयास येतच आहेत. पत्रें त्यांनीं दिलीं आहेत तीं दाखवितील. उत्तरार्थी आज्ञा होईल त्याप्रमाणें लिहून पाठवितील. कोरेगावींहून विनंतिपत्र पाठविलें त्याचें उत्तर सादर करणार धनी समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना. मामांचें बोलणें असेंही आहे जे. दर्शन होतांच खातरजमेची चिठ्ठी स्वदस्तुरची मिळाली तर दसऱ्याचेच दिवशीं निघून लांब लांब मजली करून कासारबारी इतका तुम्हास मेळवितों. हे विज्ञापना.

¶*In this detailed report Sadashiv Dinkar summarizes to Nana Fadnis his talks with Baji Vithal Mama, a special agent deputed by Ahalyabai to the Poona Darbar to settle the dispute between herself and Tukoji Holkar for the control of the administration of the affairs of the Holkar fief. Tukoji's contention was that with the management of the Saranjam estate in the hands of the Bai, his army was starved and he was in consequence unable to fulfill the several demands of service made on him. The Bai opposed the contention and resented any loss of her controlling power. The sympathies of the Poona Darbar were with Tukoji, while Mahadji Scindia favoured the Bai's cause.*

No. 179 20th December 1781.

श्री

पुरवणी राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. आपण राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें कीं, सेषईचे इंग्रज माघारे गेले. नजफखान वगैरे कोणी अद्यापि मातबरांतील सामील होत नाहींत. पाटीलबावांनीं देशची फौज नेऊन मसलत करावी, तर तेही तरतूद कोठें दिसत नाहीं. सरकारांत तर कोणेही गोष्टीची ताकद राहिली नाहीं. नवाब, भोसले, नक्ष्याप्रमाणें आपणाकडून कांहीं घडलें नाहीं हें चित्तांत आणून, व हैदरखानाचाही संदेह कीं, पुढें कोणे वेळेस काय करील याचा अंदेशा चित्तांत

आणून इंग्रजांस मिळून हैदरखानावर चाल करावी, येविषयींचीं उत्तरें बहुता प्रकारें, येथून राजश्री कृष्णराव बल्लाळ गेले, त्यांनीं काईल करून बोलले. याचें उत्तर करतात कीं, आमची पेषकशी बहुता दिवसांची हैदरखानाकडे राहिली, ते त्यांणीं देऊन खातरखा सलूख आम्हासीं करावा, तर इंग्रजांवर मसलत करूं. हैदरखान आमची दुपमनी राखीत असतां इंग्रजांशीं तोडणें सलाह नाहीं. हें नवाबाचें बोलणें हैदरखान ऐकणें कळतच आहे. आम्हांस म्हणतात कीं, इंग्रजांशीं सलूक करावा. दौलत बुडवूं नये. हैदरखानाचें पारपत्य करावें. गेला मुलूख इंग्रज देतील हैदरखानाकडीलही. नफा होईल. आम्ही तों साफच सांगतों कीं, तुम्हीं लिहिल्यावरून हैदरखानाशीं वचनीं गुंतलों, तेव्हां हें घडणार नाहीं. तुम्हींही असें सांगूं नये. त्यास बोलतात कीं, इंग्रजांचे मसलतीकरितां समयावर नजर देऊन वचन दिलें. ते इंग्रज तुम्हासीं सलूक करितात, व हैदरखानासीं बोलावें कीं, नवाबासीं तुम्ही सलूक करीत नाहीं, तर हीच तोड लावून हैदरखानासीं बिघडावें. अशीं ते आपलीं साधनें बोलतात. आम्ही आपलीं बोलतों. नवाब, भोसले, इंग्रज एक जाले असतां हैदरखान पेंचांत येईल हाही पेंच. मग पुढें आम्हांस जसें सांगतील तसें ऐकावें; नाहीं तर मग जें होईल तें होवू. असे विचार पडले आहेत. याचे घराऊ रीतीनें श्रीमंतांचे दौलतेस कोणतें चांगलें? हैदरखानास तुम्ही व सरकार मिळून इंग्रजांसीं सलूक करावा, म्हणजे अवघेच पेंच उलगडतात, असेंही सुचविलें आहे. परंतु त्याची समज एक प्रकारची पडली आहे. हें सविस्तर पाटीलबावांसीं बोलून, काय सांगतात तें लिहून पाठवावें म्हणून. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास इंग्रज सेषईहून कूच करून यमुनापार गेल्यावरी, कूच करून त्याचे मागें यमुनातीरास जावें, हा विचार आगाऊच ठरला होता. त्यास, कूच करावें तों फौजेंतील लोकांचा राडा पडला. म्हणून चार दिवस कुचास गुंता जाला. हल्लीं कूच करून मजल दरमजल दतियानजीक आलों. पुढें यमुनेवरी जात आहों. आम्ही इंग्रजांचे रुखावर कूच करून आलों. पुढें फौजा यमुनातीरपर्यंत गेल्या. याकरितां इंग्रज यमुनापैलतीरीं मुक्काम करून आहेत. नजफखान वगैरे यांकडील भले माणूस येऊन, बोलून चालून, करार मदार करून गेले आहेत. अमलांत येईल तेव्हां खरें. देशीहून फौज आणवावयाचा प्रकार तरी, सरदारी आधींच ओढगस्त, तशांत मसलतीवर मसलती येऊन पडत गेल्या. यामुळें ओढीचा प्रकार काय लिहावा? या मसलतीस निघून एक वर्ष होत आलें. मेहेनत लोकांस मोठी पडली. लढायांत लोक पडले व जखमी जाले. घोडीं फार पडलीं. गोसावी व बैरागी व पलटणें ठेविलीं. यांशिवाय इकडील

राजेरजवाडे वगैरे जे आले, त्यांस ठेवून खर्चास देणें लागलें. छाव ी इंग्रजांचे शहावर जाली, याजमुळें मोठा पेंच बसला. पुढें मसलत उभीच आहे. याकरितां गोसावी, बैरागी वगैरे जे ठेविले ते आहेतच. आजपावेतों कर्ज वाम करून दिवस घालविले. ओढीचे प्रकारामुळें देशीहून फौज आणवावयाची तरतूद होऊन न आली. नवाब व भोसले इंग्रजांचे मसलतीस बाजीकार होऊन नक्षा ठरविला असतां, भोसले यांनीं इंग्रजांपासून रुपये घेऊन माघारे आपले घरास आले. नवाब इंग्रजांसीं स्नेह राखून आपले घरीं स्वस्थ बसले. मसलत पडतां, सरकार व नवाब हैदरखान दोहोंवर पडली. वरकड तमाशाच पाहत राहिले. राजश्री कृष्णराव बल्लाळ यांस आपण नवाबाकडे पाठविलें, त्यांसी नवाब अशा गोष्टी सांगतात. यांत स्नेह व सरळपणा समजलाच आहे. हैदरखान सरकारलक्ष्यांत आहे ही गोष्ट त्यांस मोठी असह्य. हैदरखान व सरकार मिळून आपल्यास जक देतील. याकरितां आपले विद्यमानें इंग्रजांसीं सलूक करून, हैदरखानासीं व सरकारासीं विरुद्ध पाडावें, हे त्यांचे चित्तांतील अर्थ आहेत. खोटेपणाचे अर्थ. तेव्हां नवाब, भोसले, इंग्रज एक जाले असतां, हाही मोठा पेंचच आहे. चेनापट्टणाकडे इंग्रजांचा जमाव भारी जाहला. हैदरखानास मसलत ती भारीच पडली आहे. सरकारावरी गाडर वगैरे मसलत उभीच आहे. आम्ही कूच करून या प्रांतें आलों. येथून यमुना पंचवीस कोस. पुढें फौजा यमुनातीरपर्यंत गेल्याच आहेत. पलटणें माघारीं गेलीं तीं यमुनेपलीकडे. खासा इष्टिन काशीहून निघून लखनऊस यणार. आम्ही या मसलतीस गुंतलों. कोणास कोणाचा उपराळा व्हावयाचा नाहीं. या प्रकारच्या मसलती येऊन पडल्या आहेत. त्यास इंग्रजांशीं सलूखच करणें तर, हैदरखान याचे हातून जाल्यास उत्तम. येविशीं हैदरखानाकडे आगाऊ आपण सूचना केलीच आहे. आतांही शाहणा गृहस्थ त्याजकडे पाठवावा, कीं नवाब, भोसले, इंग्रज एक. तुम्ही आम्ही व पाटीलबावा तिघे तिहींकडे मसलती यऊन पडल्या, तेव्हां कोणी कोणाचा उपराळा करावा हा विचार घडत नाहीं. ल्या पक्षीं तूर्त समयावर नजर देऊन, इंग्रजांसीं सलूक करून, मसलत समेटावी हें चांगलें. इंग्रजांचा सलूक जाल्यावर तुम्ही आम्ही सारेच मोकळे जालों. तुमचा आमचा स्नेह, तेव्हां तुमचे आमचे विचारें, जे सरकारलक्षांत नसतील त्यांचीं पारपत्यें करून बंदोबस्त करूं. याप्रमाणें सांगून गृहस्थाची रावानगी जलद करावी. हैदरखान याचे विद्यमानें बोलणें लागून सलूक जाहल्यास बरें तिकडे सलुखाचा जाबसाल इंग्रजांचा नसल्यास, त्याचें संमत घेऊन, सरकारांत सलुखाचा प्रसंग करून सलूक करावा. चेनापट्टण, सुरत, मुंबई व हिंदुस्तान

वगैरे इंग्रजांवरी हुकूम इष्टिनाचा. त्यास दक्षण्यांशीं सलूक करावा याकरितां इष्टिनानें, इंद्रसेन म्हणून त्याचा कारभारी शाहणा माणूस आहे, तो काशीहून आम्हांकडे रवाना केला आहे. तो इटाव्यास आला. पुढें आपल्या फौजा आहेत. यास्तव त्यानें पत्र पाठविलें आहे कीं, मार्गाचा बंदोबस्त करून पाठवावा, म्हणजे आपल्यापाशीं येतों. त्यावरून मार्गाचा बंदोबस्त करवून त्यास लिहिलें आहे. येईल. मेवर * सेसईत असतां त्याचें बोलणें सलुखाचें होतें. त्यास, पुण्यास श्रीमंतांस लिहून पाठवूं. त्यांचे विचारें सलूख करावा असें आलें, तरी तुम्हांस लिहून पाठवूं. सलुखाचें विचारास न आलें, तरी तुम्ही आपले जागां मुख्त्यार, आम्ही आपले जागां मुख्त्यार. तुमचे विचारें येईल तसें तुम्हीं करणें, आमचे विचारें येईल तसें आम्ही करूं. याची अवध दोन महिन्याची बोलण्यांत होती. या बोलण्यावरून मेवरानें गाडरास पत्रें लिहून, जोडी रवाना केली आहे कीं, तूर्त तुम्हीं लढाईचा इरादा न करणें. सलूख न ठरला तरी मग तुम्हांस लिहूं तसें करणें. येविशीं पेशजीं आपणास लिहिलेंच आहे. दोन महिने होऊन गेले, पुण्याकडील पत्रांचे जाब काय आले म्हणून मेवराचीं पत्रें आलीं आहेत. इष्टिनाकडून इंद्रसेनही येत आहे. त्याचें बोलणें कसें आहे, सलूख करून सरकारच्या जागा, वसई वगैरे त्याजकडे आहेत त्या व मुलूख सोडून द्यावा, असें पक्कें दिसून आल्यास आपणास लिहून पाठवूं. सलूख करून मसलत समेटावी हें आपले विचारें आलें, तरी इंद्रसेन येत आहे, त्याचे बोलण्यांत ठीक असलें, तर त्यासच आपणाकडे पाठवून देऊं. दार मदार करणें तो सरकार व हैदरखान मिळून करावा. वरकडांचे विद्यमानें करणें ठीक नाहीं. रवाना छ ४ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana that the Nizam's proposal for arbitration for ending the hostilities was not to be accepted as such a step, he feared, would lead to an estrangement with their one effective ally, Haidar Ali. Mahadji, on the contrary, favours negotiations with the British either through Haidar or by the Poona Court with the consent of Haidar. If the Poona Court approved, he himself offers to negotiate a treaty, having already received advances from the Governor-General, whose agent Anderson was on his way to his (Mahadji's) Camp.*

*Col. Muir.

No. 180 20th December 1781.

पैवस्त छ २७ मोहरम इसन्ने समानीन
हस्तें डांक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. आपण छ २७ जिल्कादचें पत्र पाठविलें, तें छ १७ जिल्हेजीं पावलें. इंग्रजांस अडचणींतून काढावें; गोहदकर व नरवरकर त्यांतून निराळे व्हावे; वरकड राजेरजवाडयांचीं अनुसंधानें तुटावीं; आपला मुलूख पाठीमागें टाकून, यमुनापार मैदानांत काढून लढाई त्यांचे मुलखांत पाडावी, हें मसलतीस चांगलें पडावयाकरतां व त्यास संदेह न पडावा याकरितां, तोफा, हत्ती घेऊन यमुनापार जावयाचें ठरवून बोलणें होऊन गेलें. हें मसलतीचे रीतीनें चांगलें केलें. परंतु नवाब हैदरअलीखान बहादूर कांहीं अंदेशा चित्तांत आणतील, याकरितां त्यांचे वकिलाची खातरजमा करून, नवाब मवसूफ यांस पत्रेंही खातरजमेचीं लिहिलीं. त्यांजकडील वकील आपणाजवळ आहे. त्यासीं बोलून खातरजमेचीं पत्रें त्यांस लिहिलींच असतील. त्यास, इंग्रज यमुनापार जातांच त्यांजवर नमूद व्हावें म्हणजे मसलत गांठावयाकरितां केलें असें होऊन, खातरजमा त्यांची होईल. मसलतीस चांगलें पडेल. (.....फाटलें) आणून कसें करतील कळत नाहीं ! मसलतीचे अर्थ सर्व आपले ध्यानांतच आहेत. चांगलें तेंच आपण करतील. इष्टिन कलकत्तेकर यास काशीचा राजा चेतसिंग यानें पेंचांत आणिलें होतें. परंतु त्याचे फौजेंत फितूर करून फौज फोडली, यामुळें राजा निघून रेवा-मुकुंद-पुराकडे आला. इष्टिनानें काशीस येऊन बंदोबस्त करीत आहे, म्हणून बातमीवरून वर्तमान कळलें. त्यास, आधींच सर्व दौलतदार इंग्रजांचा अंदेशा करून स्नेह राखितात. हल्लीं दाबाचे पोटीं इष्टिन राजकारणें करून, मिळवून घेऊन मजबूदी करील, मग भारी पडेल. याकरितां आपण जलदीनें त्याजवरी नमूद जाले असतां, राजकारणें त्याकडे होऊं पावणार नाहींत. मसलतीस चांगलें पडेल. दूरंदेशी सर्व आपले ध्यानांत आहे. तेथें विस्तारें काय लिहावें ? सविस्तर राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल, म्हणून लिहिलें. त्यावरून व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रावरून सविस्तर कळलें. ऐशियास इंग्रज कूच करून गेल्याचें वर्तमान व नवाब हैदरअलीखान बहादूर यांचे चित्तांत अंदेशा न यावा, याकरितां त्यांचा वकील येथें आहे त्यासीं बोलून, नवाब मवसूफ यांसी खातरजमेचीं पत्रें लिहून पाठविलीं. व पुण्यांत राजश्री नरसिंगराव तमाजी व नूरमहमदखान यांसही लिहिलें आहे.....येविशींचा

मजकूर आपणांस पेशजीं लिहिला आहे त्यावरून कळलाच असेल. आपण त्यांजकडील वकिलासीं बोलून, त्यास पत्रें लेहून पाठविलीं, उत्तम केलें. इंग्रज यमुनापार जातांच त्याजवरी नमूद व्हावें हाच येथील विचार होता. परंतु सरदारी वोढगस्त. गुदरतां इकडे येतेसमयीं गुदरत व सालमजकूर दुसालां, माळवा वगैरे महालचा झाडून ऐवज घेतलाच होता. सुरंजेपासून इंग्रजांसीं लढाई शुरू जहाली. तेव्हांपासून कर्जबामावरी चरितार्थ! मसलत लांबली. गोसावी, बैरागी, व पलटणें व इकडील लोक नवे ठेविले. इंग्रजांसीं लढाया सात आठ निकडीच्या करून त्यांचा रेच मोडला. लढाईंत लोक पडले व जखमी जाले. घोडीं फार पडलीं. इंग्रज आसरा धरून राहिले. पर्जन्यकाल आला तेव्हां छावणी करणें प्राप्त. छावणीमुळें खर्चाचा पेंच भारी बसला. गोसावी, बैरागी व पलटणाचा दरमाहा व फौजेचा रोजमुरा द्यावयास ऐवज नाहीं. शह सोडून जातां न ये. नाइलाज जाणून पेस्तर सालापासून दुसाला ऐवजाच्या वराता, सावकारास महालावरी लावून (फाटलें आहे).....दिवस घालविले. हल्लीं कूच करावयाचे समयीं लोकांनीं, मागील हिशेबाचा फडशा व पुढें नालबंदी द्यावी व पडत्या घोड्याचा राडा घातला. पाहिल्या अर्थी लोकांकडे शद्ब काय? या स्वारींत लोकांवरी मेहनत पडली अशी कधींही पडली नाहीं. सात आठ महिने घोड्यावरी जीन ठेवून रात्रंदिवस इंग्रजांभोंवते उभे. कितेक पडले. जखमी फार जाले. घोडीं पडलीं ते पायउतरा जाले. याची तोड पाडल्याशिवाय कूच न होय. महिना पंधरा दिवस हाच राडा पडला. शेवटीं राजश्री आबाजी नाईक वगैरे सावकार यांचे गळां पडून, बारा पंधरा लाख रुपये कर्ज घेऊन, मोघम थोंडे थोंडे लोकांस देऊन, तूर्त तोड पाडली आणि कूच केलें. ते दरकूच दतियानजीक आलों. राजश्री सदाशिव मल्हार वगैरे यांसमागमें मोघम फौज देऊन पेशजीं पुढें पाठविले, ते यमुनेअलीकडे जगमनपूरचे घांटाचे सुमारें आहेत. इंग्रजांचीं पलटणें इकडून गेलीं, तीं इटाव्यानजीक यमुनापैलतीरीं आहेत. इष्टिनास काशीकर राजे चेतसिंग यांनीं चिन्हाडगडांत घेरून पेचांत आणिला होता; परंतु मीर्जा आमानीनें* बंगाल्याहून फौजे सुद्धां जाऊन इंग्रजांची कुमक केली, व राजाचे घरांत फितूर जाहला. याजमुळें राजांनीं (पुढें मजकूर नाहीं).....येऊन भेटला तो समागमें आहे. दरकूच येथपर्यंत आलों, पुढें येतात, हें इंग्रजांनीं ऐकन, पलटणें माघारीं गेलीं, तीं यमुनेपलीकडे मुक्काम करून आहेत. इष्टिन काशीहून लखनौस

*असोफ-उद्दौला, अयोध्येचा वजीर.

येणार आहे म्हणून बातमीचें वर्तमान आहे. चिंता नाहीं. इकडील मसलतीवरी आम्ही नमूद आहों, त्या पक्षीं करणें प्राप्तच आहे. रवाना छ ४ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हें विनंती.

¶*The absence of fighting in his sector is herein explained by Mahadji to Nana as due to his financial difficulties which, he says, prevented his crossing the Jumna on the heels of the retiring British forces.*

No. 181 23rd December 1781.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ७ मोहरमपावेतों मुक्काम अवंतिका येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप पावलों. विशेष:—आपण सांगितल्याप्रमाणें श्रीमंत मातुश्री अहिल्याबाईस सविस्तर निवेदन केलें. आपली चिट्ठी बाईस होती ती दिली. त्याजवर उत्तर जाहालें जे, पहिले राजश्री बाबूराव वैद्य यांजबरोबर राजश्री नानांनीं सांगोन पाठविलें, त्याजप्रमाणेंच ऐकोन बाबूरावजीची रवानगी केली. बाबूराव तेथें गेल्यावर तेथें भवति न भवति होऊन ठरावून लिहिलें आलें, आणि हल्लीं तुम्हांबरोबर दुसरे सांगण्याचा प्रकार आला, तेव्हां बोलणेंयांत चलबिचल जाहली. तेव्हां खंबीर कोणता जाणावा? राजश्री पाटीलबावांचीं व आमचीं पत्रें पेशजीं गेलीं आहेतच; आणि राजश्री नानांस कांहीं लोपलें आहे ऐसा प्रकार नाहीं. सर्व श्रुतच आहे. असें उत्तर जाहालें तें सेवेसीं लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें? सेवकावर पत्रीं कृपा करीत जावी हे विज्ञापना.

सेवेसीं विनंती सेवक राघो बल्लाळ सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे:—स्वामींची आज्ञा घेऊन आलों, तो मुक्काम मजकरपर्यंत सुखरूप पावलों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports his interview with Ahalyabai on his way to Sindia's camp.*

No. 182 December 1781.

सेवेसीं विज्ञापना.* इंग्रजांचा सलूख शिंदे यांनीं करून घेतला. आपला इतल्ला नाहीं व मतलबही कांहीं सिद्ध नाहीं. नवाबांस व आपल्यास गांठून

*हें पत्र नागपुराहून पेशव्याच्या वकिलानें नानास लिहिलेलें दिसतें.

सलूख केला आहे, म्हणून पुण्याहून पत्रें बळवंतराव यांचीं आलीं; व नवाबाकडूनही पत्रें यांस आलीं जे, करपरदाज* यांनीं शिंदे यांच्या हातून इंग्रजांचा सलूख केला. त्यांत तुम्ही व आम्ही नाहीं. पुढें याची तजवीज कोणती करावी म्हणन ? त्यावरून यांचीं उत्तरें त्यांस व त्यांचीं उत्तरें यांस येत जात आहेत. उभयतां समदुःखी इंग्रज सलुखाविसीं जाहले आहेत. यांचीं व नवाबांचीं लिहिलीं परस्परें जाऊन येऊन, यांनीं कलकत्यास विश्वंभर पाठविला आहे. विश्वंभराचा भाऊ मृत्यु पावला म्हणून गेला. परंतु.....याप्रमाणें निश्चय होऊन रवानगी जाहाली आहे. त्याप्रमाणें कटकच्या मार्गें कलकत्यास गेला आहे. शिंदे यांच्या विद्यमानें तह जाहला, ही मोठी गोष्ट वाईट जाहली, ऐसें येथें व नवाब मानीत आहेत. बाह्यात्कारें मात्र बोलण्यांत आणितात, सलूख कोणीकडून जाहला तरी आम्हांस मोठा संतोष जाला. चित्तांत दुःख मोठें जाहलें आहे. याचप्रमाणें नवाबांस जाहलें आहे. जितका प्रेम नवाबाकडे आहे तितका आपणाकडे यांचा नाहीं, हें चालींतच उघडपणें दिसत आहे. इंग्रजी सलूख शिंदे यांनीं केला, पुढें कसें करावें ? कोणती चाल धरावी ? या मसलतीस मोयनुद्दौला नागपुरास येणार होते. परंतु यांच्या लिहिल्यावरून किंवा आपल्या बुद्धीनें न आले. यांच्या दुखण्याच्या बाहाण्यानें नागपुरास येऊन मसलत पुढील ठराऊन जावें ही योजना त्यांची होती. परंतु आले नाहींत. कागदीं पत्रीं लिहूनच ठराव जाहलासा दिसतो. मोयनुद्दौला नागपुरास आल्यावर पुण्यांत काय भासेल ? सोळा महाल येणें आहेत ते येणार नाहींत. याजकरितां त्यांचें येणें नागपुरास यांनीं होऊं दिल्हें नाहीं. येण्याचें फळ कागदीं पत्रीं उगविलें असें जहालें आहेसें दिसतें. विश्वंभर शिवभद्र या समागमें इमानुद्दौला यास पोशाक पैठणी तिवट व पासोडी व शालजोडी व बन्हाणपुरी कच्चा रंगाचें तिवट व शेला व किनखापी व जामेवार याप्रमाणें सणंगें व जवाहीर सिरपेंच व जिगा हे दोन दागिने व त्याची बिबी आहे तिजला पातळ पैठणी, व पैठणी लुगडें, व किनखाप व शालजोडी, हीं सणंगें व तन्मनी दागिना, याप्रमाणें बिबीस दिलीं. व बेणीराम शिवभद्र यास पोशाक पैठणी शेला तिवट व किनखाप व जामेवार व कंठी व शिरपेंच व हत्ती दिला. मानुद्दवला यास घोडे दोन. एक घोडा घरचे घोडीस घोडा वळू होता त्याच्या पोटचा जाला तो बरा मध्यम प्रतीचा.....विश्वंभर यास रवानगीचीं वस्त्रें चार व घोडी एक दिली. त्यास रवानगीचें भाषण चार दिवस-

*हेस्टिंग्स.

पर्यंत वाड्यांत बागेंत स्वस्थपणें प्रहर सहा घटिका बसोन केलें आहे. त्याणेंही आज्ञेप्रमाणें जाऊन घडवितों म्हणून कबूल करून गेले आहेत. पुढें काय तेथें गेल्यावर घडवितात हें कळत नाहीं. *छोटासाहेब पेशजीं रवाना केला आहे, तो याच कामाकरितां असेल असें भासतें. इष्टिन यांस पत्रें विश्वंभराबरोबर लिहिलीं आहेत व मागूनही लिहीत आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana learns from his Nagpur agent how the news of peace having been concluded through Mahadji's agency had caused uneasiness at the courts of Nagpur and Hyderabad and what measures were being pursued there to defeat it.*

No. 183 December 1781.

(सदाशिवराव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—नवाब निजामअल्लीखान यांचें पत्र राजश्री पाटिलबावांस आलें आहे त्याची नक्कल घेऊन पाठवून द्यावी. तिगस्तां श्रावण मासीं नवाबांनीं पांच सात पत्रें आम्हांस पाठविलीं कीं, इंग्रजांची जात लबाड आहे, याकरितां श्रीमंत व आम्ही व हैदरअलीखान व भोसले चौघांनीं एक होऊन, श्रीमंतांनीं अहमदाबादेपासोन मुंबईपावेतों मसलत करावी व आम्ही शिकाकोल राजबंद्रीकडे करूं, व हैदरअल्लीखान यांनीं चेनापट्टणाकडे करावी, व भोसले यांनीं बंगाल्याकडे करावी. याप्रमाणें निश्चय करून लौकर उत्तर पाठवावें. हें होत नसल्यास आम्ही पाहूं तसें करूं. येविषयीं बहुत विस्तारेंकरून पत्रें येत गेलीं.† त्यावरून राजश्री पाटिलबावांस जामगांवींहून बोलाविलें. ते पुण्यास आल्यावर या मसलतीचा निश्चय ठरते समयीं नवाबांकडील पत्रें आलीं होतीं तींही दाखविलीं. राजश्री दिवाकरपंत‡ यांसही याजप्रमाणें नवाबांनीं पत्रें लिहिलीं. त्यावरून हैदरखानास मिळून घेऊन मसलतीचा ठराव जाहला. उत्तरेंही नवाबांस लिहिलीं. त्याचीं प्रत्योत्तरेंही उत्तम म्हणून आलीं. त्यांवर पाटिलबावा व होळकर मसलतीवर निघाले म्हणजे आम्ही निघतों अशीं पत्रें येत गेलीं. उभयतां सरदार निघोन गुजराथ प्रांतीं गेल्यावर आम्ही नवाबांस पत्रें पाठविलीं कीं, इंग्रजांचा वकील चेनापट्टणाहून तुम्हांकडे बोलावयास आला आहे, त्यास निरोप देऊन

*Forester. †यावरून चौकडीचे कारस्थानाचा मूळ उत्पादक निजाम होय हें स्पष्ट आहे. ‡देवाजीपंत चोरघोडे भोसल्यांचा दिवाण.

फौज सुद्धां शिकाकोल राजबंदरीकडे जावें. त्यांवर त्यांचीं पत्रें येत गेलीं कीं, हैदरखानानें आदवणी तालुक्यांत हंगामा सुरू केला आहे ती फौज उठवून नेल्या-खेरीज आमची खातरजमा पटून इंग्रजांचे मसलतीस शिकाकोल राजबंदरीकडे जावयाचें कसें घडेल ? दोन शह संभाळणें कठिण. यापूर्वी एक दोन वेळ लिहिलें होतें कीं, हैदरखानाचे मनांत आम्हांसीं लबाडी करावयाची असल्यास इंग्रजांची व हैदरखानाची दोन्ही मसलती संभाळूं. परंतु हें लिहिणें उगेच बाह्यात्कारें दाबाचें. हैदरखानाचा उपद्रव अदवानीचा दूर जाहल्यावर आम्ही इंग्रजांचे वकिलास निरोप देऊन, शिकाकोल राजबंदरीवरील मसलतीस जातों अशीं पत्रें येत गेलीं. त्यावरून हैदरखानास येथून लिहून पाठवून आदवानीकडील फौज उठवून नेविली. खानही मसलतीवर चेनापट्टणावर गेले. तेव्हांही फिरोन नवाबांस लिहून पाठविलीं. त्यांचीं उत्तरें येऊं लागलीं कीं, आतां बरसात आली व इंग्रजांचा वकील उगाच आहे, त्यांसीं कांहीं आम्ही वांकडें राजकारण करीत नाहीं. त्यावर बरसातही गेली. त्यावर लिहों लागले कीं, पूर्वी सखारामपंतांनीं व आम्ही जाबीतजंग कर्नाटकचे मसलतीस जावयाचे समयीं नवाबांनीं बोलणें घातलें कीं, निजामनमुलकाचे वेळेस स्वराज्याचा अंमल चालत होता त्याप्रमाणें घ्यावा असा दस्ताऐवज उभयतांचा आला, तर जाबतजंगास राजश्री हरिपंताकडे कर्नाटकचे मसलतीस पाठवूं. तेव्हां उभयतांनींही आंतील कुन्हे निजामनमुलकाचे वेळेस जशी ज्या महालीं वहिवाट स्वराज्याची जाहली असेल त्याप्रमाणें चालावें असें लिहोन पाठविल्यावर जाबीतजंग हरिपंताकडे रवाना केले. पुढें सरकारचा व नवाबांकडील दोघे अमीन महालांतून जाऊन, कच्चीं दप्तरें पाहून, जी बेरीज स्वराज्याकडील निघेल ती कुलखर्च सुद्धां धरून ठराव करावा, त्याप्रमाणें अंमल पुढें चालता करावा. याप्रमाणें नवाबांनींच लिहून पाठविलें कीं, आम्ही नानाजी शंकर यास पाठवितों, तुम्ही आपणाकडील कोणी पाठवावा. त्यावर गुरुजीस येथून पाठविलें. पुढें इंग्रजांचा दंगा जाहला तेव्हां माघारे आले. पेशजीं ठराव जाहला त्याप्रमाणें आम्ही मान्य असतां अलीकडे नवें बोलणें काढिलें कीं, अगोदर जमीदार महालोमहालचे भागानगरास आणून त्यांपासून निजाम-नमुलकाचे वेळचे स्वराज्याची बेरीज लिहून घेऊन अंमल चालता करावा, मग अमीन जाऊन सुरुवात करावी. ही गोष्ट कबूल केली, तर आम्ही मसलतीवर जाऊं. ही गोष्ट जर कबूल करावी, तर जमीदार त्यांचेच अमलांतील कमी बेरजा लिहून दिल्यावर त्याची पुरवणी करणें प्राप्त. त्यास, तेव्हां सरकार नुक-सानी स्वराज्याचे अमलाची भारी होते असें जाणून आम्ही लिहीत गेलो कीं.

पहिल्यानें करार ठरला त्याप्रमाणें आम्ही मान्य असतां हल्लीं नवें बोलणें निघतें हें ठीक नाहीं. याचें उत्तर लिहिलें कीं, आमचे मर्जीकरितां कबूल करावें. तथापि तूर्त मसलतीवर नजर देऊन जर इंग्रजांची मसलत आपण करीत असले, तर हेही गोष्ट करूं म्हणोन लिहिलें. त्याचें उत्तर करतात कीं, बशर्ती मसलतीची आम्ही करीत नाहीं. तुम्ही कबूल करावें. ही गोष्ट ऐकावयास येईल. परंतु अलीकडे दोन तीन महिने आम्हांस खिसाऱ्याकरितां* कांहीं द्यावें असें म्हणतात. सरकारांत आहे नाहीं हें समजलेंच आहे. याचीं उत्तरें आम्ही लिहितों कीं, तुम्ही नानकुराण दिलें आहे व रूबरूही बोलिलां आहां कीं, श्रीमंत अठरा वर्षांचे होत तों नफा नुकसान पाहाणार नाहीं. श्रीमंतांचे दौलतीस कुवत असेल तितकें साहित्य करूं. या वचनाचें स्मरण धरून उचित तें करावें. परंतु आंतील अर्थ पाहतां इंग्रजांची मसलत आपण होऊन करविली, आणि मसलत तर आपलेकडून करण्यांत न आली. तेव्हां हीं निमित्यें ठेऊन बहाणे लावीत असावें, परंतु मनामध्यें आपल्यावर शद्ध आला येविषयीं फिकिरींत आहेत. इंग्रजांचे मसलतीस हैदरखानास कसेंही करून मिळवून घ्यावें असें नवाबांनीं आम्हांस लिहिलें होतें. हा दस्तऐवज गुंतला. पुढें हैदरखानाचा सरकारचा स्नेह जाहला, याविषयींची शंका मनांत असेलसें वाटतें. ही सविस्तर माहितगिरी राजश्री पाटिलबावांसही असावी याकरितां लिहिलें आहे. आम्ही इंग्रजांचे मसलतीविषयीं गुंतलों हें ध्यानांत आणोन स्वराज्याचे अमलाचें व खिसाऱ्याचें द्यावें हे बाहाणे लावून बोलतात, आंतून पाहतां शरमतात, व इंग्रजांची जरब भारी हेंही पोटांत आहे. मसलत करतील असें दिसत नाहीं. ज्यास मसलत होत नाहीं तो बहाणे काढून लावितो. स्वराज्याचा लढा असें करतां तीन चार लाखांचा फेर. हे काढून शिकाकोल राजबंदरीकडील मसलत केली असतां दीड क्रोडीचा मुलूख हातास येईल. असें असतां तें न करण्यामुळें हेंच काढून बसले. तथापि मसलत करितात असेंच आहे तर त्याचीही तोड काढूं. परंतु अलीकडे आम्हांस खिसारा जाहला याकरितां कांहीं द्यावें म्हणजे करूं, हें नवेंच बोलणें निघालें आहे. त्यांतीलही अर्थ श्रीमंतांचे घरांत कांहीं राहिलें नाहीं तेव्हां कबूल करणार नाहींत, हें निमित्य ठेऊन मसलत न करावी. दुसरें, आम्हीं नवाबांस लिहिलें कीं, इंग्रजांची मसलत करते समयीं आपला मद्दा कांहीं नव्हता. ज्याचें त्याणें आपापली मसलत संभाळावी, नफा नुकसान पाहूं नये, अशीं लिहिलीं येत गेलीं. तेव्हांच कळतें तर इंग्रज तह करीत

*खिसारा=नुकसानी.

होते; परंतु तुमचे लिहिलेवरून मसलत ठरविली. असें असतां आतां हें लिहिणें उचित नाहीं, तथापि ध्यानांत येत नाहीं. वरकडांस दिलें आम्हांस कां देत नाहींत याचेच विस्तार लिहितात. नवाबही दूरंदेशी आहेत. भलतेंच पाऊल पडणार नाहीं असें दिसतें. म्हणोन श्रीमंतांचें पत्र आपले नांवें सादर जाहलें तें श्रीमंत राजश्री पाटिलबावांस दाखविलें. व पृथक इ।। पासोन पत्राअन्वयें बोलण्याचे करार मदाराचे जाबसाल कुल समजाविले. त्यावरून उत्तर केलें कीं, आम्ही जामगांवास असतां तेव्हांपासोन नवाबांचे मसलत करण्या न करण्याचे पर्याय बोलत गेलों. ते समयीं श्रीमंतांचे ध्यानांत आलें नाहीं. पुढेंही नवाब शिकाकोल राजबंदरीकडील मसलत करितील हें दिसत नाहीं. सरकारचे स्नेहास या समयीं एक हैदरखान उपयोगी पडोन इंग्रजांस जरब चांगली दिली व पुढेंही मसलत करीतच आहे. नवाबाचा अर्थ पहिलेच समजला होता. आम्हांस पत्र लिहिलें त्यांत आपला दाब दर्शऊन मसलतीचे पर्याय लिहिले, तो मजकूर अगदींच टाकून उत्तर पत्राचें दिलें तें सांगितलेंच आहे, त्याप्रमाणें श्रीमंतांस लिहोन पाठवावें. पत्राची नक्कल मागितली आहे, त्यास, मुनशीचे शरीरीं समाधान नाहीं, बुणग्यांत आहेत. त्यास समाधान जाहल्यावर तें पत्र काढून त्याची नक्कल पाठवायास येईल. एक नक्कल मागें पाठविली म्हणोन बोलत होते. मागतीं मुनसी जवळोन नवाबाचे पत्राची नक्कल घेऊन मागाहून सेवेसीं पाठवितों. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar discusses with Mahadji the insincere conduct of the Nizam in the alliance and reports to Nana Fadnis the discussion.*

No. 184 December 1781.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे:—नवाब निजामअल्लीखान यांचें पत्र राजश्री पाटिलबावांस आलें त्याचें उत्तर लिहावें कीं, आपले मसलतीनें इंग्रजांचे मसलतीचा नक्षा ठरला असतां, त्याप्रमाणें सरकारांतून गुदस्तांपासून इंग्रजांची लढाई सुरू जाहली आहे व नवाब हैदरखान बहादर यांनींही खूब इंग्रजांवर जरब बसविली व भोसल्याची फौज बंगाल्याकडे गेली हीं वर्तमानें आपल्यास परस्परें कळतच

असतील. आपलेकडून हा कालपावेतों शिकाकोल राजबंदरीकडे जाऊन मसलतीवर नमूद न जाहली व इंग्रजांचा वकीलही जवळ आहे. सरकारांत तों आपलेकडील खातरजमाच आहे, परंतु वरकड कित्येकांस अंदेशे पडतात याकरितां वकिलांस निरोप देऊन शिकाकोल राजबंदरीकडे इंग्रजांस ताण देऊन मुलूख हस्तगत करावा, असा समय फिरोन येणार नाहीं. इंग्रजांची जात मक्री व वचनप्रमाण कौलकरार याचें प्रमाण नाहीं. एकास भुलथाप देऊन एकाची दौलत घेतात, हे सर्व दर्जे त्यांचे आपणासही वाकफ आहेत. श्रीमंतांची व आपली जुदागी* नाहीं हा लौकिक सर्वत्र जाहला आहे, व एक दौलतेस पेंच पडला असतां दुसरी दौलत राहील असें होणार नाहीं. कित्येक आपले व सरकारचे जाबसाल करारांत आले असतील, त्यांत सरकारांतून तफावत पडली नाहीं व पडणार नाहीं. आपणाकडूनही त्याच प्रमाणेंच आहे. फार लिहावें तर आपण दुरंदेशी व काईम-मिजाज आहेत. याप्रमाणें उत्तर जावें म्हणोन मसोदा-पत्र श्रीमंतांचें आपले नांवें सादर जाहलें, तें श्रीमंत राजश्री पाटिलबावा यांस दाखविलें. त्याचें उत्तर बावांनीं केलें कीं, त्यांनीं पुष्कळच लिहिलें होतें, त्याचे पत्राचें उत्तर या मसोद्याअन्वयें द्यावें म्हणोन श्रीमंतांनीं लिहिलें होतें. त्यास नवाबाचें पत्राचें उत्तर आम्ही यापूर्वीच दिलें कीं, इंग्रजांचे मसलतीचा नक्षा आपलेच मसलतीनें ठरला असतां त्याप्रमाणें सरकारांतून व हैदरखानाकडून इंग्रजांची लढाई गुदस्तांपासून सुरू जाहली व भोसल्यांची फौज बंगाल्याकडे गेली हीं वर्तमानें आपणाकडे येतच असतील. आपण सिकाकोल राजबंदरीकडे इंग्रजांस जरब देऊन पारपत्य करावें तें अद्याप घडत नाहीं हें काय? आपलें बोलणें आहे जे, श्रीमंत बारा वर्षांचे होत तोंपावेतों नफा नुकसान न पाहतां दौलतीस कुवत असेल तितकें साहित्य करीन. याप्रमाणें अमलांत यावें. येईल अशीच सरकारची खातरजमा आहे. याप्रमाणें उत्तर दिलें. मसोदा आतां आला. उत्तर आधींच असें लिहिलें म्हणोन बोलले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of Mahadji having replied to the Nizam's letter in the spirit of the draft sent from Poona urging him to take the field immediately against the British.*

---

*दुजाभाव.

No. 185 1781

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—इंग्रजांचे मसलतीमुळें फौज व गारद वगैरे सरंजाम भारी करावा लागला, याकरितां मागें पुढें न पाहतां जितकी तर्तूद होईल तितकी केली. त्यास पैक्याची अडचण, परंतु जितक्या रीति करावयाच्या तितक्या आपले घरदाराकडे न पाहतां करावयाचें तें केलें. गाडर घाटावर आला असतां खर्च तोडणें ठीक नाहीं, नित्य लढाईसीं संबंध, आणि ऐवजाचे तोडजोडीचा विचार याउपर राहिला नाहीं. त्यास राजश्री पाटिलबावांनीं आपले महालचे दहिये* कच्चा ऐवज देतील तर होळकरांपासूनही घ्यावयास येईल. एक पत्र पाटिलबावांचें आम्हांस यावें कीं सरकारांत ऐवजाचा ओढ भारी, त्यास हैदरखानाकडील दरबार खर्चाचा ऐवज ज्यास आला असेल त्यांनीं सरकारांत द्यावा. आम्हांसही येईल तो सरकारांत देऊं. परंतु ही गोष्ट जरूर करावी. अशा अन्वयें पत्र आल्यास खटपट करून पाहूं. महिना दीड महिना यावर लोटावयास येईल. आम्ही आपला ऐवज द्यावयास तयारच आहों. परंतु वरकडांकडील यावयाकरितां एक दोन पत्र याप्रमाणें जरूर यावीं. कांहीं कोठें तोड चालेना यास्तव सुचतें तें लिहितों. या गोष्टी तुम्ही पाटिलबावांजवळ असते तर घडवितेत, परंतु तुमचें येणें उजनीस जाहलें. तथापि तुम्ही पाटिलबावांजवळ जाऊन बोलून करावें. लिहिलेप्रमाणें एक दोन पत्रें पाटिलबावांचीं जरूर यावीं म्हणजे ठीक पडेल. म्हणून श्रीमंतांचें पुरवणीपत्र आपले नांवें सादर जाहलें. त्या सुद्धां आपण श्रीमंत राजश्री पाटिलबावा यांस पत्र लिहून इकडे पाठविलें. त्यास आपलें पत्र बावांस प्रविष्ट करून श्रीमंतांचें पुरवणी पत्र आपले नांवें सादर जाहलें तें दाखऊन, बोलून श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें हैदरखानाकडील दरबारखर्चाचा ऐवज सरकारांत घ्यावयाकरितां श्रीमंतांचे नांवें एक विनंतिपत्र व श्रीमंत राजश्री नानांचे नांवें एक पत्र एकून दोन पत्रें पाटिलबावांचीं घेऊन पाठविलीं आहेत. प्रविष्ट होतील. मसलतीमुळें सरकारांत पैक्याची वोढ यामुळें श्रीमंतांनीं हैदरखानाबाबत दरबारखर्चाचा ऐवज सरकारांत घ्यावयाचें योजिलें उत्तम आहे. ते आपला ऐवज सरकारचे खर्चास देतात व आम्हांस येईल तो आम्हीं ही सरकारांत देऊं. वरकड ज्यांस ज्यांस हैदरखानाबाबत खर्चाचा ऐवज आला असेल, त्यांजपासून घेऊन सरकारचे उपयोगी पडावा यांत आम्हांस संतोषच आहे. कोणी-

*दहकपट्टीचा.

कडूनही सरकारचें कार्य होऊन मसलतीस उपयोग पडावा. एक सरकारची सलाबती असल्यानें असे दरबारखर्च मेळवायास जागा बहुत आहेत. ज्यांस ज्यांस दरबारखर्चाचा ऐवज आला असेल त्यांजपासून घ्यावा. याप्रमाणें पाटीलबावा बोलले, व दहियेक पट्टीविषयींचा मजकूर बावांसी बोलून त्यांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें तें पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana how Mahadji readily consented to the levy of Dahakpatti and surrender of his share of Nuzzar received from Haidar, in order to help the Poona its extrem .*

No. 187 End of 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे :—चंद्र ४ रविलाखरचें आज्ञापत्र सादर जाहलें. त्यांत आज्ञा जे, श्रीमंतांचीं पत्रें राजश्री पाटीलबावा यांस आहेत तीं देऊन व आपली नांवाचीं पुरवणीपत्रें श्रीमंतांनीं लिहिलीं आहेत हीं दाखवून, उत्तरें घेऊन पाठवणें. व हदरखानाबाबत दरबारखर्चाचा ऐवज श्रीमंतांनीं सरकारांत घ्यावयाचा योजिला याकरितां पुरवणी पत्र लिहिलें, तेंच बजिन्नस पाठविलें आहे; व याकरितां आम्हीं पत्र बावांस लिहिलें आहे तें दाखवन आपलें पत्र माघारें आपले जवळ घेणें. कारण कीं त्यांत नांवनिसी लिहिली आहे. मागें पुढें आपलें पत्र दस्ताऐवजीं त्यांजवळ नसावें म्हणोन. ऐसियास, आपलें पत्र बावांस होतें तें त्यास दिल्यानंतर चिटणीस माघारे देतील हा संशय. यामुळें आपलें पत्र दिलें नाहीं. सरकारचें पुरवणी पत्र आपले नांवें होतें तेंच दाखवून, आपले पत्राचा मजकूर मात्र बावांस सांगितला कीं, नानांनींही उज्जनीहून लिहिलें आहे कीं, हदरखानाबाबत दरबारखर्चाच्या असाम्या राजश्री कृष्णराव काळे व रास्ते व राजश्री हरिपंततात्या व श्रीमंत राजश्री नाना वगैरे–त्यांत नाना आपला ऐवज सरकारांत देतच आहेत. आपलें पत्र गेल्यानें साऱ्यां जवळोन दरबारखर्चाचा ऐवज हैदरखानाबाबतचा घ्यावयास येईल. त्यावरून बावांनीं उत्तर केलें कीं, आमचा भ्रम धरूंच नये. आम्हांस बहुमान म्हणा, किंवा दरबारीचे म्हणा, चार हत्ती वस्त्रें काय दिलीं असतील तितकींच. दरबारखर्च रास्ते वगैरे यांनीं करार करून घेतला असेल. श्रीमंत राजश्री नानांनीं पत्र लिहिलें आहे जे, आपलें पत्र आलें म्हणजे साऱ्यांजवळून ऐवज घेऊन त्याजवर महिना दीड महिना लोटावयास

यईल. तेव्हां ऐवज दहा लक्ष पावेतों उणा पुरा असेल. आमचा भ्रम असल्यास एक पैसा नाहीं. रास्ते यांचे मध्यस्तींत होते, त्यांणीं कोणकोणचा दरबारखर्च करार करून घेतला असेल त्याचा शोध श्रीमंतांनीं करून, तूर्त मसलतीचा प्रसंग आहे तों ऐवज घ्यावा. पहिला पट्टीचा ऐवजाविषयीं लिहिलें. त्यास आम्हीं इकडे इंग्रजांचे मसलतीवर आलों. इंग्रजांचें सामान भारी. आपले फौजेनें आयास येतील हें घडावयाचें नाहीं. याकरितां गोसावी व बैरागी व खेची व चंदेरीवाले व सिमथरकर गुजर हल्लीं नवे आले ते एकून साऱ्यांस दरमहा करून ठेविले आहेत. तेव्हां राजे रजवाडे येऊन मिळाले, भेटले. लोकांत लौकिक दिसावयाचा मात्र. अर्थ आंतून पाहतां दरमहा साऱ्यांनीं करून घेतले. त्याप्रमाणें त्यास ऐवज नक्त द्यावा लागतो. अशा रीतीच्या ओढी इंग्रजांचे मसलतीमुळें येऊन पडल्या आहेत. करणें प्राप्त. करतों. या समयीं दहीयक पट्टीचा ऐवज काढून मिळेल. आम्ही देतों म्हटल्यास होळकरांपासून घ्यावयास जागा होते. याचें उत्तर मीं केलें कीं, नानांनीं* उज्जनीहून लिहिलें आहे जे, आपलेकडे हिंदुस्थानचा कारभारच आहे समजून घ्यावयास येईल, परंतु या प्रसंगीं आपण दहियक पट्टीचा ऐवज दिल्यास होळकरांपासोन घेतील. त्यावरून बोलले कीं, सरकारचें कार्य होतें यास्तव आम्ही श्रीमंत राजश्री नानांस पत्र लिहून देतों. हें पत्र उज्जनीस राजश्री नारोपंत नाना यांजकडे पाठविणें. ते पाहून पुढें पाठवितील. याप्रमाणें बोलोन पत्र श्रीमंतांचे नांवें दिलें तें पाठविलें आहे. आज निकड केल्यानें ऐवज सरकारांत यांजकडून मिळतो हें ध्यानांतच आहे. तथापि आपण पुरवणी लिहिली त्याचे भाव ऐकून संतोषयुक्त होऊन श्रीमंतांस पत्र लिहून दिलें, तें पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

याविषयीं आपण बावांस पत्र लिहिलें होतें तें माघारें पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. ही विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana Fadnis that Mahadji had addressed letters urging other saranjamdars to show a spirit of sacrifice to help the state in its hour of need by accepting the levy of Dahakpatti.*

*नारो शिवदेवानें.

No. 188 18th January 1782.

पैवस्ती चंद्र २६ सफर इसन्ने समानीन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती. सेवक आपाजी राम दाभोळकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत चंद्र ३ सफरपावेतों मुक्काम लष्कर नजीक उदगांव प्रांत झांशी नजीक दतिया येथें स्वामींचे कृपेंकरून वृत्त सेवकाचें यथास्थित असे. विशेष. स्वामींची आज्ञा घेऊन आल्यातागाईत पत्र येऊन परामर्ष घेत नाहीं. तरी सदैव कृपापत्रीं सांभाळ करीत असलें पाहिजे. यानंतर दरबारी मजकूर तर, इंग्रजांकडील वकील इंद्रसेन म्हणोन राजश्री सदाशिव मल्हार यांजबरोबर आला. त्याचे बोलण्याचे भाव अद्यापि पक्के समजण्यांत आले नाहींत. परंतु उगाच मुख्यांच्या बोलण्यांतील रंग दिसोन आला जे, आपले मुद्दे सर्व इंग्रज कबूल करील ऐसें दिसतें. परंतु हैदरखानाचा मात्र तह करण्याचा संशय आहे. त्यास आम्हांस पुसों लागले कीं, याचा विचार कसा करावा? त्याजवरून मी उत्तर केलें जे, हा प्रकार सर्व आपणांस माहीत आहे. तेव्हा फिरोन बावा म्हणूं लागले कीं, तुम्हीच तिकडील अर्थांस अलीकडे माहीत आहां. तुम्हीच बोला. त्याजवरून मी बोललों जे, हा मजकूर श्रीमंत राजश्री नानांस लिहून पाठऊं. उत्तर येईल त्याप्रमाणें विनंती करूं. त्याजवरून फिरोन जाबसाल जाहला कीं, हा मजकूर तुम्ही तूर्त कांहींच लिहूं नये. तेव्हां आम्हीं ऐकोन मात्र घेतलें. त्यास काल इंग्रजांकडे मेजवानीस तमाम आपल्या येथील पथके, पागे व सरदार व राजश्री शिवाजी विठ्ठल बापू व राजश्री कृष्णाजी पवार वगैरे सर्वांस बरोबर घेऊन, खासा मुत्सद्दी मंडळीसहित जाऊन, वस्त्रें घेऊन आपल्या डेऱ्यास आले. दुसरे दिवसीं इंग्रज इंद्रसेन आपल्या डेऱ्यास आला. चार सहा घटका खलबत होऊन मागतीं आपले डेऱ्यास गेले. याप्रमाणें येथील मजकूर आहे. परंतु येथील मर्जी सलूख करावा असी आहे. आम्हांस व वकिलांस सांगितलें जे, कर्णेल इपटीण* कलकत्त्याहून मागें पुरंदरास आला होता, त्या वेळचा तहनामा पाहिजे. त्यास पुण्यास लिहून पाठवून तहनाम्याची नक्कल आणवावी. त्याजवरून पेशजीं सेवेसीं याच मुक्कामीहून लिहिलें आहे व हल्लीं ही विनंती लिहिली असे. तरी नक्कल तहनाम्याची पाठवावयास आज्ञा जाहाली पाहिजे. आम्हांस आज्ञा केली कीं तुम्ही बोला. त्याजवरून मी बोललों जे, साष्टी, वसई, कोंकणपट्टी, दरोबस्त

*Col. Upton.

गुजराथ व अंतरवेद व श्रीमंत राजश्री दादासाहेब सुद्धां आमचे हवालीं करावे, व मागून श्रीमंत राजश्री नानासाहेब व रावसाहेब यांच्या कारकीर्दीस तह होता त्याप्रमाणें उभयपक्षीं चालावें व हैदरखान सुद्धां तह करावा. त्यास मला सुचलें तितकें बोललों. याजपेक्षां गैरमाहितगारीमुळें चुकलें असेल तें ल्याहावयासीं आज्ञापिलें पाहिजे. हा मजकूर दृष्टीस पडला तितकाच सेवेसीं लिहिला. पुढें होईल वर्तमान तें मागाहून सविस्तर लेहून पाठवीन. मुख्य गोष्ट, मन घालून कोणतीही गोष्ट यथास्थित घडेल, परंतु सरकारकामाची कळकळ दिसत नाहीं. बोलण्यांत गोष्टी बहुत येतात, घडत एकही नाहीं. आपण आज्ञा केली त्याप्रमाणें नवाब, भोसले, हैदरखान, फरासीस व होळकर, इतकींही प्रकरणांचीं नांवें सांगितलीं त्याजप्रमाणें विनंती लिहीन. झांशीवाले राजश्री रघुनाथ हरि येथेंच लष्करांत आहेत; व बुंदेल्यांकडील प्रस्तुत कोणी येथें नाहींत. सरकारच्या पथकांची गणती घ्यावयाची होती, त्यांपैकीं माझ्या येण्याचे पूर्वी राजश्री पाटील-बावांनीं आपल्याकडील जनार्दनपंतास व पांडुरंग रघुनाथ यांजला गणती घ्यावयास सांगितली. त्याजवरून राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे पथकाची गणती पागा व शिलेदार मिळोन तेरासे अडसष्ट उत्तम मध्यम कनिष्ठ सुद्धां भरले. राजश्री बळवंतराव धोंडदेव यांजकडील पागा सिलेदार मिळोन उत्तम व मध्यम व कनिष्ठ सुद्धां साडेपांचसें चंदेरी मसलतीस जदीद सुद्धां हजिरीस भरले. वरकड पवारांची गणती व्हावयाची आहे. त्यास पर्जन्य लागला यामुळें गणती घेतली नाहीं. तेही एका दोहो रोजीं घेऊन मागाहून हजिरीच्या यादी पाठवून देऊं. वरकड वर्तमान सविस्तर पांडुरंग रघुनाथ यांणीं लिहिलें आहे, त्याजवरून विदित होईल. आपणास रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत, तरी स्वीकारून पावलियाचें उत्तर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana Fadnis the peace parleys that were going on between Mahadji and Anderson.*

No 189 19th January 1782.

पैवस्ती चंद्र २४ सफर इसन्ने समानीन
हस्तें डांक.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिले कीं, इंग्रजांचें पारपत्य विना बंगाला मारल्याखेरीज होत नाहीं. त्यास पाटील-

बावांकडून बंगाल्याची मसलत होत असल्यास फार चांगलें आहे. पांच चार हजार फौज येथूनही तरतूद करून पाटीलबावांकडे पाठवूं; अथवा अंतरवेदींतच मसलत करून बंदोबस्त करावा असें असल्यास, बंगाल्याकडे होईल तरतूद तेथवर करून येथून पाठवूं. येविशीं बोलून मनांतून संतोषानें कसें करावयाचें हें पुसून, लौकर लिहून पाठवावें म्हणून. त्यावरून कळलें. ऐशियास इंग्रजांचीं पलटणें इटाव्यानजीक इकडून माघारीं गेलीं तीं आहेत. वरकड पलटणें अंतरवेदींतील झाडून कानपुरीं जमा जालीं आहेत. इष्टिन काशीस आहे. आम्ही दतियानजीक आलों. पुढें यमुनातीरास जात असों. यमुनेस पायाब* नाहीं. पूल बांधल्याखेरीज पलीकडे फौजा उतरावयाची सोय नाहीं. फौजा यमुनेनजीक आल्या. अंतरवेदींत उतरतील याकरितां पलटणें पलीकडे जमा जालीं आहेत. इष्टिनानें इंद्रसेन† इंग्रज, कौंसलांतील मातबर माणूस मुख्त्यार करून सलुखाचें बोलावयास पाठविला, तो येऊन पोहोंचला. भेट मात्र जाली. बोलणें जालियावरी आपणाकडे लिहून पाठवूं. पांच चार हजार फौजेची तरतूद करून आपण पाठवितील. परंतु तैनाती फौज उपयोगी पडणें कळतच आहे. कलकत्त्यांतील जमियत हैदरखानाकडे गेली व इकडे अंतरवेदींत आली आहे. बंगाला खालीं आहे. अशांत बंगाल्याकडे फौजेची रवानगी केल्यास उत्तमच आहे. इकडून इंग्रजांस आमचा शह म्हणून, काशी, लखनौ वगैरे पलटणें कानपुरीं जमा जालीं आहेत. आपणाकडून फौज बंगाल्याकडे गेली, तरी तुरुत शह इंग्रजांस पडेल. आपण सल्ला लिहिली उत्तम आहे. येविशीं राजश्री पांडुरंग रघुनाथ निसबत राजश्री नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ ४ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana about the overtures of peace he had received from the English and approves Nana's plan of attacking Bengal.*

No. 190 8th February 1782.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. कर्नेल गाडर याचें पत्र आपणास आलें, त्यांतील मजकूर व आपण त्यास उत्तर लिहिल्याचा मजकूर लिहिला, तो सविस्तर कळला. ऐसियास हदरखानाकडील वकिलास पुसून,

*पायउतार. †David Anderson.

गाडरास मातबर पाठवून द्यावयाविसीं उत्तर पाठविलें, उत्तम आहे. गाडरा-कडील मातबर आल्यावरी त्याचे बोलण्यांतील आशय काय ते आपणांस समजतील, त्याप्रमाणें लिहून पाठवावें. येथें इष्टिनाकडून इंद्रसेन म्हणून इंग्रज मातबर माणूस आला. त्याचे बोलण्याचा मजकूर आलाहिदा पत्रीं आपणांस लिहून पाठविला आहे. आणखी याशिवाय बोलणें होईल तें लिहून पाठवूं. रवाना छ २४ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji inquires about the terms offered to the Poona Darbar by Goddard. It should be noted here that the Company's government had been brought to the verge of ruin and was anxious to conclude peace. It opened negotiations simultaneously with Sindia as well as with the Poona Darbar.*

No. 191 8th February 1782.

पैवस्ती छ १४ रबिलावर.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. इष्टिन इंग्रज कलकत्तेकर यानें काशीचे मुक्कामीहून इकडे सलुख्याचे जाबसालाकरितां इंद्रसेन इंग्रज यास मुख्त्यार करून रवाना केला, तो आला. भेट जाहली. दोन चार बैठकी होऊन करनेल इपटेनचे बोलण्या-पासून आजपावेतों भवति न भवतीचीं बोलणीं पुष्कळ जाहलीं. त्याजवरी त्यानें उत्तर केलें कीं, आजपर्यंत दुतर्फा गोष्टी जाहल्या त्या जाहल्या. याउपरी इष्टिन साहेबाचे चित्तांत श्रीमंतांशीं तह पक्का करून परस्परें स्नेह चालावा, याकरितां मजला आपणाकडे मुख्त्यार करून पाठविलें आहे. आपणाकडे श्रीमंतांची मुख्त्यारी आहे. आपण आपले जाबसाल असतील ते बोलावे. आम्हांकडील जाबसाल असतील ते आम्हीही बोलूं. याप्रमाणें इंग्रज बोलतात. त्यास, इंग्रजांचे मसलतीचा नक्षा नवाब व भोसले व नवाब हैदरखान बहादूर यांचे विचारें सरकारांत ठरला असतां, नवाब व भोसले यांजकडून नक्षाप्रमाणें जाहलें न जाहलें, तें ध्यानांतच आहे. इंग्रजांचे मसलतीस शरीक* होतां हैदरखान मात्र जाहले. तेव्हां त्यांस टाकून इंग्रजांशीं सलूख करावयाचा नाहीं. सलुखाचा जाबसाल हैदरखान सुद्धां जाहल्यास करावा. येविशीं आपल्या लिहिण्यांत आहे. परंतु नवाब व भोसल्या-

*मदतनीस.

कडून नक्षाप्रमाणें मसलत न जाहली, म्हणून त्यांस टाकून इंग्रजांशीं तहाचें बोलणें केवळ एक हैदरखानाचेंच बोलूं जातां ठीक दिसत नाहीं. याकरितां नवाब व भोसले व हैदरखान सुद्धां बोललें पाहिजे. आपल्यास मुख्य सरकारचे मुद्दे हैदरखान सुद्धां हासील जाहले पाहिजेत. सरकारचे जाबसाल आहेत, तेव्हां बहुतकरून माहीतच आहेत. कर्नेल इपटेन याचे विद्यमानें पुरंदरीं तहाची याद ठरली, ती माहीतगिरी पुर्तेपणें नाहीं. तळेगांवचे तहाची याद जाहली तिची नक्कल येथें आहे. जाबसालाचा प्रसंग जसा पडेल तसा जाबसाल करावा लागेल. याजकरितां इपटेणचे तहाची यादीची नक्कल पाठवावी. हैदरखानाकडील जाबसालाची माहीतगारी आम्हांस नाहीं. तेव्हां त्याकडील जाबसाल कोणे रीतीनें बोलावा, येविशींचा खुलासा हैदरखानाकडील आपण मनास आणिलाच असेल. नसल्यास खानाकडे लिहून पाठवून, त्याजकडील उत्तर येईल त्याअन्वयें लिहून पाठवावें, त्याप्रमाणें यांसीं बोलावयास येईल. नवाब व भोसले यांजकडील करार मदार सरकारांत जाले, त्यांच्या यादीच्या नकला पाठवाव्या म्हणजे त्यांजकडीलही जाबसाल ध्यानांत राहतील. इंग्रजांचे मसलतीचा नक्षा पुण्याचे मुक्कामीं सरकार सुद्धां चौघां मिळून ठरला, त्या यादीचीही नक्कल पाठविली पाहिजे. रवाना छ २४ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji asks Nana to supply him with copies of treaties concluded between the allies and also that concluded by Col. Upton at Purandhar. He also inquires about the expectations and demands of the several members of the alliance to help him in his negotiations with the English envoy, Anderson.*

No. 192 8th February 1782.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ दंडवत विनंती उपरी. आपण छ १७ मोहरमचें पत्र पाठविलें तें छ १६ सफरीं पावलें. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. प्रस्तुत मुक्काम कोठें आहे? पुढील मसलतीचा विचार काय केला? सिपरीवरील पलटणें कोठपावेतों गेलीं? इष्टिन काशीस आहे, तिकडील वर्तमान काय? व पातशाहा नजफखान वगैरे यांजकडील राजकारणाचें कोणाचें कसें? हें सविस्तर लिहून पाठवावें. प्रस्तुत इकडील वर्तमान तर, गाडरानें कल्याण-

जवळील पलटणांची गल्ला दारूगोळ्याची बेगमी व चाळीस तोफा वगैरे तयारी केली. मंबैकरानें गलबतावर सामानाची तर्तूद लढाईचे सरंजामाची करून, माहागिऱ्या सावकाराच्या वगैरे धरून, त्यांवरही सामान व रुवाचें भातें भरून तयारी केली आहे. बारीक रीतीनें बातम्या जागांजागां ऐकण्यांत येतें कीं, गाडरानें घांटाकडे येऊन फौजेचा शह धरावा, मंबैवाल्यांनीं रेवदंड्यावर जावें. त्यावरून येथूनही पाईचे माणूस रेवदंड्यास रवाना केले. फौजेची वगैरे तर्तूद करीत आहों. राजश्री सखाराम पानसी याबराबर तोफा व गाडदी व कांहीं फौज देऊन बोर-घाटाकडे रवाना केलें. पुढें जसा रंग दृष्टीस पडेल त्याप्रमाणें राजश्री हरिपंत तात्याही फौज सुद्धां जातील. राजश्री तुकोजी होळकरांकडील मजकूर पूर्वी लेहून पाठविलाच आहे, त्याप्रमाणें आपण गंगाजलनिर्मल अहिल्याबाई होळकर यांस सांगोन पाठविलेंच असेल. बाईंनीं सरबरा माळव्याचे माहालांवर लौकर करून पाठवावी. येथें होळकरांची खातरजमा सरकारांतून करवून, दहा बारा हजार फौज त्यांनीं ठेवून रेवदंड्याचा उपराळा करावा, याप्रमाणें केलें आहे. सरकारचे मसलतीस चांगलें तेंच आपण करतील. फतेसिंग गायकवाड यांजकडील दोन हजार फौज व आमदाबाज, भडोच, डबई वगैरे जागांचीं पलटणें पांचसा जमा करून सुरतेपुढें आलीं; सोनगडास येणार; पुढें खानदेशांत येणार; अशा बातम्या येतात. याकरितां राजश्री गणेशपंत बेहरे यांकडे येथून आणखी फौज दोन हजार रवाना केली. होळकरांकडील सरंजामी मशारनिल्हेकडे सामील करविले. बाजीराव बर्वे व सटवाजी भोसले यांचा मजकूर ऐकल्यावरून त्यांचे पारपत्याविसीं अहिल्याबाईस वगैरे पत्रें पाठविलीं आहेत म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, पलटणें माघारीं यमुनापार गेलीं. आम्ही कूच करून दतिया नजीक आलों. कासीचा राजा येऊन भेटला. पलटणें अंतरवेदींत येतांच फौजा मागें दरकूच येतात, हें वर्तमान इष्टिनास कळतांच कानपुरीं पलटणें सारीं जमा केलीं, आणि सलुखाचे जाबसालास, इंद्रसेन म्हणून इंग्रज यास इष्टिनानें मुखत्यार करून रवाना केला, तो येणार आहे. आम्हीही पुढें यमुनातीरास जातों म्हणोन पेशजीं आपणास लिहिलें आहे, त्यावरून कळलेंच असेल. त्याजवरी इंद्रसेन इंग्रज येऊन भेटला. तीन चार बैठकी होऊन बोलणीं जाहल्याचा मजकूर आलाहिदा लिहिला आहे, त्यावरून कळेल. इंद्रसेन आल्यावरी दतिया नजीक मुक्काम होता तेथून कूच केलें. कालपीचे सुमारें जावें, तरी जातांना सरकारचे महाल बुंदेले यांजकडील खराब होतील. कालपीकडे यमुनेस पायाब उतार नाहीं.

इंग्रजांचा जमाव पलीकडे नजीक, यामुळें पूल बांधण्याची सोय तिकडे पडणार नाहीं. याकरितां गोहदकर जाटांचे मुलकांतून हटाव्याचे सुमारें जाण्याचा विचार करून, जाटानें पंचमहाल वगैरे मुलूक ग्वालेरचे किल्याकडील वगैरे दाबला आहे, हा इंग्रजांस सामील होता, याचें पारपत्य जातां जातां करून जावें म्हणून इकडे आलों. पंचमहालांतील गढ्या चार पांच फौज तोफा पाठवून घेऊन ठाणीं बसविलीं. दोन चार गढ्या राहिल्या, त्यांजवरी फौज पाठविली आहे, त्या सुटतील. पंचमहाल वगैरे जागा घेऊन बंदोबस्त करावयास कांहीं फौज व तोफा ठेऊन आम्ही पुढें जात असों. गोहद येथून अठरा कोस आहे. ग्वालेरचे किल्याचा व गोहदचा बंदोबस्त करून जाट गोहदेस आहे. लुगारे व पेंढारी पाठवून तमाम जाटाचे मुलकाची ताखताराजी* करविली. यमुनातीरीं गेल्यावरी अंतरवेदींत उतरण्याची तरतूद होईल. इष्टिन काशीस होता, तो सारा जमाव कानपूर व लखनऊस ठेवून आपण सडा कलकत्याकडे गला म्हणून वर्तमान आलें आहे. पातशाहा व नजफखान दिल्लीस आहेत. अनुपगीर गोसावी याची रवानगी फौज सुद्धां इकडे करणार, असें दिल्लीहून लिहिलें आलें आहे. नजफखानही बाहेर निघोन आगऱ्यास येणार होता, परंतु त्यास आराम नाहीं, वाखा फार आहे म्हणून वर्तमान आलें आहे. मागाहून आणखी वर्तमान येईल तें लिहिलें जाईल. राजकारणें सर्वांचीं आहेत. अमलांत येतील तेव्हां खरीं ! गाडर व मंबैकर, इकड इष्टिनानें मातबर सलुखाकरितां पाठविला तो बोलत असतां, तिकडे गडबड करतील असें दिसत नाहीं. तत्रापि आपण रेवदंड्यास कुमक पाठवून बंदोबस्त केला, व बोरघाटांवरही फौज रवाना केली, व होळकरांकडून तर्तूद फौजेची करविली, उत्तम केलें. अहिल्याबाई होळकर यांनीं फौजेचे खर्चाची सरबरा माळव्याचे माहालांवर लौकर करून पाठविण्याचा मजकूर लिहिला. त्यास माळव्यांतील माहाल सरंजाम्यांकडे किती आहेत व परभारें तुकोजीबावांनीं माळव्यां तील माहालांवरी कमावीसदार पाठविले ते माहाल त्यांजकडे आहेत, बाकी बाईकडे माहाल किती राहिले, याचें आपण पुर्तेपणें मनास आणूनच बाईंनीं सरबरा करावी म्हणून लिहीत असतील. पहिलें आपण जी तोड ठरवून लिहून पाठविली, त्याप्रमाणें बाईंस आम्हीं लिहून पाठवून कबूल करविलें. तें राहून, नित्य नवे नवेच जाबसाल निघतात यामुळें बाई आम्हांस शद्ध लावून लिहितात. असो. बाईकडे जे माहाल माळव्यांतील

*विध्वंस.

असतील, त्यांपैकीं बाईंचा खर्च आगत्या आगत्य असेल तो वजा होऊन, बाकी जो ऐवज राहील तो पाठवून देतील. राजश्री गणेशपंत बेहरे यांजकडे आणखी फौज दोन हजार पाठवून कोंडाईबारीकडील बंदोबस्त करविला. उत्तम केलें. बाजीराव बर्वे महेश्वरास आले, त्यांजसमागमें लोक होते, त्यांस मातुश्री अहिल्याबाईंनीं निरोप देऊन बर्वे यांस मात्र ठेऊन घेतलें. सटवाजी भोसला पळून गेला. येविसीं बाईंनीं आपणांस लिहिलेंच असेल. दोघे बखेडखोर होते तेथून निघाले. दोघांचे दोन प्रकार जाहाले हें ठीकच जाहलें. सटवाजी भोसला पळोन देशीं गेला म्हणोन ऐकिलें, तो कोणीकडे गेला त्याचा शोध आपण करविलाच असेल. रा॥ छ २४ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia writes to Nana not to be apprehensive on account of Goddard's activities at Bombay and Kalyan. He thinks Goddard would not be impolitic enough to engage in hostilities when the Governor-General was keen on peace and had sent an envoy to bring it about.*

No. 193 9th February 1782.

पैवस्ती चंद्र २९ रबिलावल इसन्ने समानीन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत छ २५ सफरपावेतों मुक्काम लष्कर नजीक चिनोर प्रांत ग्वालेर येथें यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं, तरी सदैव पत्रीं सांभाळीत असावें. यानंतर इकडील दरबारी मजकूर तर, राजश्री पाटीलबावांची भेट जाहल्यानंतर येते समयीं आज्ञा केली होती त्याप्रमाणें मजकूर तपशीलवार आम्ही व राजश्री राघोपंत गुरुजी मिळून बावांस सांगितला, नंतर आपलें पत्रहि दिलें. पत्र दिल्यानंतर आणखीही दोन चार बैठका जाल्या, तेव्हां पत्रांचीं उत्तरें मागितलीं, व पुढें मसलतीच्या तऱ्हा करण्याच्या कोणत्या म्हणून पुसल्या. त्यास उत्तर करीत गेले कीं, मसलत पक्की ठरेल ती सांगुं, त्याप्रमाणें लिहावें. त्याजवर आठ पंधरा दिवसपर्यंत वरचेवर उत्तरें देण्याविषयीं सूचना करीतच गेलों, परंतु सिद्धांत कांहींच सांगेनात. तेव्हां हल्लीं दोन चार दिवस फारच निकड केली. तेव्हां सांगितलें जे, श्रीकाशीहून इंग्रज इष्टिन यांज-

कडून वकील इंद्रसेन आला आहे. त्याच्या बोलण्यांतील भाव हाच जे, कलकत्त्याहून पेशजीं पुरंदरचे मुक्कामीं कर्नल इपटीन आला होता, त्या वेळेस तहनामा जाला आहे, तो तहनामा तुम्हांस माहीतच आहे, व अलीकडे तळेगांवचे मुक्कामीं दुसरा तहनामा जाहला, तो तर तुमचेच विद्यमानचा जाला आहे. त्यास तुमचे मुद्दे काय असतील ते बोलावे, त्याप्रमाणें उत्तर करून सिद्धांत करूं. याप्रमाणें वकिलाचें बोलणें जालें. त्याजवर राजश्री पाटीलबावांनीं उत्तर त्यांजपासीं केलें जे, सरकारचे मुद्दे आम्हांस माहीत आहेत, परंतु हैदरखान नाईक यांच्या तहाचे मुद्दे काय असतील ते आम्हांस माहीत नाहींत व विना हैदरनाईक यांच्या तहाशिवाय सरकारचा तह घडत नाहीं. याप्रमाणें स्पष्ट उत्तर दिलें. तेव्हां त्यास हैदराच्या तहाविषयीं विचार पडल्यानंतर, त्याच्या बोलण्यांत आलें कीं, तुम्ही हैदरखानाचें बोलणें बोलतां, विना तह सरकारचा होत नाहीं. त्यापक्षीं काय मुद्दे असतील ते आम्हांस समजल्याखेरीज आम्ही तहामध्यें दुसऱ्याचें बोलणें कबूल कसें करावें ? याचें पक्कें बोलणें तुम्हीं आम्हांसीं बोलावें म्हणजे उत्तर करूं. असा भाव वकिलाच्या बोलण्यांत आला. याजकरितां आम्हीहि राजश्री नानांस पत्रें लिहितों व तुम्ही व बापू वकील असे हा मजकूर लिहून पाठवा; आणि सरकारच्या बोलण्याचा घाट व कर्नल इपटीण याच्या गुजारतीच्या तहनाम्याची नक्कल व हैदरखानाकडील तहाचे भाव तीन्ही मजकूर तेथून समर्पक लिहून आणवावे म्हणून उभयतांस बोलावून सांगितलें. त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. तरी तहनाम्याची नक्कल व हैदरखानाकडील मुद्दे व आपल्या सरकारचे तहाचे मुद्दे काय लिहावयाचे असतील ते स्वामींनीं लिहावयास आज्ञा करावी. वरकड कित्येक बोलणीं येथें बोलावयास सांगितलीं होतीं, तीं बोलून उत्तरें लिहून मागाहून रवाना करीन. स्वामी म्हणतील कीं तुम्हांस दिवस जाऊन फार जाहले आणि अद्यापि उत्तरें यावयास दिवसगत ? तरी तूर्त येथील प्रसंग एक प्रकारेंचा जाहला आहे, तो पत्रीं लिहितां येत नाहीं. संकल्प विकल्प अद्याप समाप्त जालेले नाहींत. मला भरवसा बहुत होता कीं, मी गेल्यानंतर आम्हांपासून सरकारच्या दरकाची चाकरी घेतील, परंतु ती गोष्ट कांहींच तूर्त दिसण्यांत येत नाहीं. पुढें काय घडेल तें पहावें. वरकड उभय पक्षीं ऐक्यतेचे भाव जे जामगांवचे मुक्कामीं बोलण्यांत व दिसण्यांत होते, तेच अद्यापि आहेत. त्यांत कांहीं कमी नाहींत व सरकार नुकसानी किंवा नफा याचें मनन असावें तीही गोष्ट दूरच आहे. वरकड बंदोबस्त, तरतूद व फौजेची आबादी वगैरे सर्व बंदोबस्त, एक दैव श्रीमंतांचें आहे तेणेंकरून सर्व संकटें पार पडतात. मसलत विचार कांहीं समजण्यांत येऊंच

देत नाहींत. आपले जागीं विचार करितात एक आणि आम्हांस सांगतात एक असा प्रकार आहे. मुख्य गोष्ट सर्व प्रकारें यांच्या सोबतीस राहिल्यानें आम्हांकडे मात्र नाकारेपणा येईल असें दिसतें. पत्र एकांतीं अवलोकन करून उत्तर लिहावयास आज्ञा करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports commencement of peace negotiations between Mahadji and Anderson. He laments the total neglect into which the interests of the Poona Darbar had fallen by the disregard shown to them by Mahadji.*

No. 194 9th February 1782.

(आपाजी रामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ २५ सफरपावेतों मुक्काम लष्कर येथें यथास्थित असे. विशेष. राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें कीं, इंग्रजांकडील भोसल्यांच्या संधानाची बातमी आली आहे, हें वर्तमान पुण्यास लेहून पाठवा. त्याजवरून आम्हीं पुसिलें जे, आपण वृत्त सांगावें म्हणजे लेहून पाठवूं. त्याजवरून बजिन्नस आपला वकील काशीच्या राजापासीं नेहमीं ठेविला आहे त्याजला बोलावून आमच्या समक्ष वर्तमान पुसिलें. तेव्हां त्याणें जें वर्तमान राजाच्या वकिलानें तेथें भोसल्याचे घरीं पाहिलें व ऐकिलें तें सांगितलें. त्यांतील मजकर हाच कीं, भोसल्यांनीं गुदस्तां बंगाल्याची मसलत कबूल करून आपणापासून दिवाकरपंत गेल्यावर केली, तिचा शेवट अंतीं सलूख होऊन, पन्नास लाख रुपये भोसल्यांस इंग्रजांनीं एक सालीं फौजेचा खर्च दिला, आणि पगडीबद्दल भाईचारा केला; व तहामध्यें ठराव केला जे, हैदरखानाचे पारपत्यास आमचीं पलटणें झाडून रवाना करावीं लागतात तरी तुम्हीं आम्हांसीं श्रीमंत पंतप्रधान यांच्या सांगितल्यावरून बिघाड करूं नये व हल्लीं त्या सिलसिल्यावरून काशीहून इष्टिणानें भोसल्यांस लेहून पाठविलें जे, तुम्ही गुदस्ताप्रमाणें फिरोन फौजा कोणी एक मातबर सरदार देऊन बंगाल्यास पाठवणें. ती फौज व आम्ही एक होऊन इकडे मसलत पडली आहे ही करूं. याप्रमाणें बातमी राजांकडील वकील तेथून आला त्याणें सांगितली. इष्टिनाची मसलत दक्षणियांची तंबी करावी असी होती, परंतु काशीच्या राजानें मध्यें गलबल केली यामुळें इंग्रजांचे इभ्रतीस गोष्ट कमी पडली; व कलकत्त्यास नवा मुखत्यार विलायतेहून येतो असें वर्तमान पक्कें आहे, त्याजवरून इष्टिनाची

मसलत, भोसले आपण एक होऊन, इकडील अंतरवेदींतील पलटणें कार्याकारण ठेऊन, बाकी झाडून पलटणें घेऊन कलकत्त्यास जाणें. हा निश्चय ठरोन आपण खासा श्रीकाशीस आला होता तो पुन्हां कलकत्त्यास गेला. याप्रमाणें वर्तमान सांगितलें, त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. व राजश्री बावांनीं मसलत ल्याहावयासी सांगितली त्याजवरून लिहिली आहे. भोसल्यांस श्रीमंतांचे नांवाचीं पत्रें पाठवावीं कीं, कोंकणपट्टींत गाडरानें दगा करून गुदस्तां वसई घेतली व घांट चढोन घांटमाथ्यास आला होता. त्यास सरकारच्या फौजांनीं जरब दिली तेव्हां घांट सोडून पुन्हां कल्याणास गेला. त्यास हल्लीं पुन्हां गडबड करून घांटावर यावें हा मानस त्याचा आहे. त्यास सरकारच्या फौजा तमाम रवाना होतच आहेत, व राजश्री हरिपंततात्याची रवानगी इंग्रजांचे पारिपत्यास केलीच आहे. तरी तुम्ही कोणी एक खासा दहा हजार फौजेनिसीं गाडराचे पारिपत्यास रवाना करावा. याप्रमाणें भोसल्यांस पत्रें मुजरद पाठवावीं म्हणजे वर्तमान खरें किंवा खोटें हें समजेल, व या लिहिल्यावरून पुढें मसलत भोसले काय करितात हेंही समजेल म्हणोन सांगितलें. त्याजवरून लेखन केलें आहे; व इंग्रजांकडील वकील आला आहे त्याच्या बोलण्यांतील भाव दुसरा लिहावयास सांगितला, तोही लिहिला आहे. भोसले व नवाब व हैदरखान व सरकार मिळोन तुमचा तहनामा जाहला कीं, चौघांनीं मिळोन इंग्रजांचें पारिपत्य करावें. ऐसा ठराव जाहला असतां आम्हांसीं भोसले व नवाब यांचा तह कसा जाहला आहे तो तुम्हांस खातर-जमा पाहिजे तर बजिन्नस दाखऊं. यास्तव श्रीमंतांचे सरकारांत तह या उभयतांनीं कसा केला आहे तो तुम्हीं समजून घ्यावा व आम्हांपासीं उभयतांच्या तहाच्या यादी आहेत त्याही पाहाव्या, म्हणजे सहजच निखालसता भोसले नवाब यांची तुम्हांस समजेल. यास्तव येविसींच्या निखालसतेचा कांहीं विषय कागदोपत्रीं असल्यास ल्याहावयासीं आज्ञा करावी ऐसें येथील मानस आहे म्हणोन. मग यांतील भावगर्भ काय असतील ते असोत. आपण म्हणतील कीं, तुम्हीं ऐसें कच्चें वर्तमान कसें लिहिलेंत? तरी त्यांची मर्जी लेहून पाठवा याप्रमाणें दोन वेळ सांगितलें. त्याजवरून लिहिणें प्राप्त जाहलें. प्रस्तुत कारभारसंबंधें आम्हांसीं संकोच फार चालतो. ग्वालेर तालुका सरकारचा परंतु आम्हास किमपि दाखला नाहीं. सरकारचीं संस्थानें वोडसें व दतिया वगैरे येथील जाबसाल आमचे विद्यमानें व्हावे, ते परस्परें करून फडशे करतात. आम्ही दुरोन पाहतों. आम्ही आल्यातागाईत कागदास शाई लागावयाचा प्रसंग पडला नाहीं. पुढें ईश्वर

इच्छेनें काय घडेल तें पाहावें. येथील मुत्सद्दी मंडळी जी आहे ती आपणास विदितच आहे. एक अविध* मात्र आपल्या कार्याविसीं हळहळ करतो. राजश्री आबा चिटणीस यांचें मानस कऱ्हाडची असामीविसीं पेशजीं रदबदली करीत होते, तेव्हां आपण करून दिली नाहीं. तेव्हां बाळाराव होता, याजमुळें यांचा हात चालला नाहीं. हल्लीं करून घ्यावी हें मानस आहे. ही गोष्ट मजपासीं मशारनिल्हे कांहीं बोललेच नाहींत, परंतु माझ्या ऐकण्यांत आली. त्यास प्रस्तुत मी येथें आल्यापासून दोन चार वेळ आपल्या कामकाजाविसीं सांगितलें, परंतु एकही गोष्ट प्रत्ययास येत नाहीं. याजकरितां कोणी आपणास असामीविसीं लिहितील, तरी परिछिन्न तूर्त कबूल करूं नये. कांहीं आपलीं खासगत कामें जाहल्यानंतर मग करून देणें तरी द्यावीं, आणि येविसींचा इतल्ला† मजला थोडासा असावा. वरकड कितेक कामकाजें सरकारनिसबतीचीं पडतात, त्यांजविसीं वकिलास लिहिलीं येतच आहेत. तेव्हां मजलाही पत्र त्याहावयाची आज्ञा असावी. मला माझें काम माझ्या हातून राजश्री पाटीलबावांनीं घ्यावें म्हणजे दुसऱ्या कारभाराची इच्छा नाहीं. तें ज्यापक्षीं घडत नाहीं तेव्हां उगेच कालहरण करावें त्यांत स्वरूप राहत नाहीं. यास्तव सूचना लिहिली आहे. येविसीं मर्जी हा प्रकार लिहिला म्हणोन रुष्ट न व्हावी. येथें खरी गोष्ट जो बोलेल व सरकारलक्ष राखील, तो मर्जीस येत नाहीं. या गोष्टीस माझा उपाय काय? राजश्री शिवाजी विठ्ठल यांची गणती मी येण्याच्यापूर्वीच राजश्री पांडुरंग रघुनाथ यांणीं व जनार्दनपंत या उभयतांनीं घेतली. त्यास शिवाजी विठ्ठल सर्व प्रकारें सरकारचाकरीस हजर असतां, प्रत्यक्ष ग्वालेर तालुक्याचे महाल ठाणींठुणीं त्यांचीं व आपलीं बसवावीं, ती तर गोष्ट किमपि घडत नाहीं. सर्व इतबार आंबाजी इंगळे यांजवर आहे. ते सांगतील ती गोष्ट प्रमाणांत पडते. बाकी विश्वास कोणावरही नाहीं. मागती मशारनिल्हेचें आचरण पाहतां पांच रुपये कमाविसीचे मिळाले तर त्यांजपैकीं तीन सरकारांत सांगावे, दोन आपण खावे, याप्रमाणें येथील रीत आहे, या प्रांतांत आंबाजीची जरब ग्वालेरचा किल्ला गमाविल्यापासून दरोबस्त नाहीं, आणि येथील तरी कुल अखत्यार त्याजवर आहे. याचा परिणाम काय लागेल तो पाहावा. मुख्य गोष्ट, या दौलतींत बरा वाईट चार गोष्टी रगडून सांगाव्या असा राउजी‡ होता. आतां तरी कोणी रगडून गोष्ट सांगायाजोगा नाहीं व कोणाचें चालतही नाहीं. पत्रें वाचून एकांतीं पाहावीं. षट्कर्णी जाहल्यास

*राणेखानभाई. †खबर. ‡बाळाराव.

येथें आम्हांस विचार पडेल. पत्राचें उत्तर ल्याहावयासी आज्ञा जाहली पाहिजे. राजश्री शिवाजीपंत बापू यांणीं मजला दोन तीन वेळ बोलावून मुजरद सांगितलें कीं, श्रीमंत राजश्री नानांस आम्हांविसीं चार गोष्टी समजून ल्याहाव्या कीं, यांची सर्व प्रकारें वर्तणूक जी आहे ती प्रत्यक्ष दृष्टीस पडते. त्यास मशारनिल्हेचें मानस स्वामींच्या भेटीस देशीं यावें हें फार आहे. येथें राहोन स्वरूप नाशमात्र आहे. तेव्हां धन्यापासीं जावें, मग काय घडेल तें घडो. खराबीमध्यें फार आले आहेत. याजविसीं काय आज्ञा येणें ती यावी. इतकी चाकरी स्वामींपासीं होती तर कृपाळु होऊन सर्व प्रकारें गौरवच धनी करते. येथें मतलबी प्रकार फार चालला. मनुष्यावर दृष्टि नाहीं. सर्व लोभानें या थरास आणिलें. पुढेंही काय घडेल तें पाहावें. मशारनिल्हेचें मानस दोन महिने यांजपासीं कालक्षेप करावा. उपरांत निरोप मागून देशास जावें असें आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करतील. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana Fadnis the treacherous conduct of the Nagpur Bhonsla in the late war as revealed to him by the agent of Raja Chetsingh of Benares. He once more repeats his lamentations about the disregard shown by Mahadji to the interests of the Poona Court.*

No. 195 14th February 1782.

(आपाजी रामाचें पत्र नानास)

सेवेसीं विज्ञापना ऐसीजे. गव्हर्नर इष्टिन कलकत्तेकर याजकडून मातबर इंग्रज इंद्रसेन नामें करून सलुखास आला. दोन चार बैठका झाल्या. एक दुसरे बैठकेंत आगतस्वागतच जालें. एक दोन बैठकेंत मामलतीचे जाबसाल होऊं लागले. त्याचे बोलण्याचे भाव कर्नल इप्टेन कलकत्त्याहून आले होते, त्याचे तहाचा भाव दिसूं लागला. इकडील बोलणें तळेगांवावर तह मुंबईकर यांसीं बोलून गाडर इंग्रेज याणें माघारें जावें असें ठरलें असतां सुरतेस आला. पुढें लढाई सुरू झाली. तहाचें बोलणें गाडरानें घातलें, परंतु नमुदामध्यें कांहींच आलें नाहीं. त्यांत तळेगांवीं तह जाहला त्याप्रमाणें तहाचा जाबसाल तुम्हाकडून घडला नाहीं. तो तह तुम्हाकडूनच अमलांत आला नाहीं, सबब आम्हास बहुत खर्च झाला. हैदरखान यासी सलूख करणें आला, त्याजवळ आमचा करारमदार इमान गुंतलें. तेव्हां त्याचे सलुखा सुद्धां सलूख करावा, अंतरवेदीचा अमल सोडून द्यावा, प्रयाग काशी आम्हास द्यावी, ऐसा जाबसाल आपणांकडून होतात. तिकडे

पुण्यास गाडराकडून वकील येतो ऐसें आपलें लिहिलें आलें. त्याजवर मजला व वकिलांस आपणांस पत्रें लिहावयासीं राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें जे, गाडराकडून वकील येणार तो नवाब निजाम अल्लीखान यांचे व भोसले यांचे संधानें असेल; त्यास हैदरखानाखेरीज सलुखा करणें ठीक नाहीं. मागें चवघांनीं मसलत करावी असें ठरलें असतां हैदरखान मात्र नमुदांत आले आणि सारी मसलत सरकारावर पडली. उभयतांनीं तमाशा पाहिला. येविषयीं आम्ही पहिल्यानें सांगितलें होतें, त्याचा अनुभव आलाच आहे. त्याजप्रमाणें आतांही होईल. हैदरखानाखेरीज सलूख केला तरी कामाचा नाहीं. यास्तव तुम्हीं लिहावें ऐसें सांगितलें. इतक्यांत पुण्यास वकील आले ऐसें पुण्याहून वकिलाचें लिहिलें आलें. त्याजवरून दुसरी लिहावयास आज्ञा जाली जे, येथें इंद्रसेन इष्टिनाकडून आला आहे, हा मातबर आहे. याजवळ इंग्रजी कंपनीचे मुखत्यारीचें पत्र आहे. येथें आमच्या बोलण्याखेरीजची खातरजमा नसल्यास याजबराबर आपल्याकडील एखादा देऊन पुण्यास रवानगी करूं. गाडराचे बोलण्यांत हैदरखानाचे सलुख्याचें निघावयाचें नाहीं. नवाबाचें अनुमत आहे तेव्हां ही गोष्ट घडणें कठिण. आम्हांकडून हैदरखानास दरम्यानगिरी देवविली आहे, त्यास आम्ही देत नव्हतों, तेव्हां सरकारचा आग्रह दरम्यान आलों. हैदरखानाखेरीज सलुखा केल्यास सरकारास धक्का आहे. हैदरखानाचे अनुमताखेरीज सर्वथैव सलुखा करावयाचा नाहीं, ऐसें लिहावयास आज्ञा जाली, त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. चंद्र १ रबिलावल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports further peace discussions between Mahadji and Anderson. While Anderson favoured an agreement based on the treaty of Purandhar, Mahadji insisted on a settlement based on the convention of Talegaon and to which Haidar Ali should be a party.*

No. 196 15th February 1782.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी गौरनेर (गव्हर्नर) इष्टिन इंग्रज कलकत्तेकर यांजकडून इंद्रसेन इंग्रज सलुख्याचे जाबसालाकरितां आला. भेटी होऊन बोलणें होत

आहे. येविसीं पेशजीं आपणांस लिहिलें आहे, त्यावरून कळलें असेल. सांप्रत ऐकल्यांत आलें कीं, गाडर इंग्रज याजकडून उद्रिष्टीन* वगैरे सलुख्याचे जाबसाल बोलावयाकरितां पुण्यास आले आहेत. त्यास, नवाब व भोसले व गाडर हे आंतून एक आहेत. सरकारांत सलुखाचें बोलणें लावून हैदरखानाची व सरकारची तूट पाडावी हा त्यांचा इरादा आहे. येविषयीं घरचे व बाहेरले आपणांस सलुखाची सल्ला देतील; परंतु हैदरखानाशीं तूट पडल्यानें परिछिन्न पेशवाईस पेंच पडतो. हैदरखान तुटला म्हणजे नवाब व भोसले एकच आहेत; हरएक निमित्य उभें करून पेंच पाडतील. इष्टिन इकडे आम्हांस समीप होता, यामुळें इंग्रजांचे घरचे कितेक बारीक मोठे अर्थ समजण्यांत आले आहेत. त्यांचा मजकूर लिहितां विस्तार फार आहे. सारांश, कोणेही तऱ्हेनें हैदरखानाचा व सरकारचा पेंच पाडावा, आपला मतलब सिद्धीस न्यावा, हा विचार उभयतांचा पुर्तेपणें आहे. सलुखा करणें त्या पक्षीं, इष्टिनाकडील मातबर येथें आला आहे, सरकारांत सलूख करावा हें उत्तम. हैदरखान सुद्धां सलूख करावा. हें बोलणें यांसीं लाविलें आहे. डौलांत येईल. गाडराकडील बोलावयासी आले, त्यांसीं सलुखाचें न बोललें तरी तूर्तच लढाई सुरू होईल, हा आंदेशा आंपण चित्तांत आणतील, तरी पेशजीं मेवराचीं पत्रें गाडरास गेलीं, त्यावरून लढाई आजपावेतों मना जाहली, याचा इतल्ला पूर्वी आपणांस दिल्हा आहे. इष्टिनाकडील मातबर येथें येऊन सलुखाचें बोलत असतां, गाडर लढाईस हमवार† होणार नाहीं. नवाब व भोसले यांचे संदर्भावरून गाडरानें सलुखाचें बोलणें लाविलें आहे, तें सरकारउपयोगीं ठीक नाहीं. इंग्रजांचे मसलतीचा नक्षा ठरला, त्या समयीं उभयतांकडून मसलती व्हावयाच्या नाहींत, मसलत पडतां सरकार व हैदरखान दोंच जागां पडेल, म्हणून आम्ही बोललों होतों, त्याप्रमाणें प्रत्ययासही आलें. दरज‡ पडावयाकरितां त्यांनीं उद्योग करून पाहिले. त्यास, सरकार व हैदरखान एक, यामुळें कोणतीही दरज आजपावेतों त्यांची चालली नाहीं. आतां हा उद्योग आरंभिला आहे. मुख्य हैदरखानाची तूट न पडे असें व्हावें हें उत्तम. हैदरखानाचे निभावणीस सरकारांतून दरम्यान आम्हांस दिलें आहे. त्यास टाकून सलुखाचा विचार केल्यास वचनांत अंतर पडतें व दौलतीस पेंच पडतो, याची दूरंदेशी चित्तांत आणावी. इष्टिनाकडील मातबर येथें आला आहे. त्यासीं हैदरखाना सुद्धां तहाचें कोणे तऱ्हेनें बोलावें तें लिहून पाठवावें. त्याप्रमाणें यांस पक्केपणें बोलण्यांत येईल.

*Watherstone. †सज्ज, तयार. ‡तफावत, भेद.

अथवा यांस तेथेंच पाठवावें असें आपल विचारास आलें, तरी पाठवावयास येईल. इंग्रजांचा तह करणें तो दुसऱ्याचे विद्यमानें न करितां सरकारांत करावा हें चांगलें. उभयतांचे विद्यमानें तह करून इंग्रज व ते एक करावे अशीच आपली मर्जी असली, तरी आम्हांकडे कोणे गोष्टीचा शद्व नाहीं. वरकड राजश्री पांडुरंग रघुनाथ निसबत राजश्री नारो शिवदेव यांस सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ २ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

पैवस्ती छ १९ रबिलावल सन इसन्ने समानीन मया व अलफ. फाल्गुन वद्य ५ पंचमी.

¶*Mahadji, in this letter to Nana, insists on the immediate dismissal of the agent sent by Goddard to Poona. Goddard's agent, he suggests, may try to bring about a division among the allies, not being authorised to negotiate a general peace; while Anderson, who had been sent by the G. G., possessed full powers and was already negotiating with him.*

No 197 22nd February 1782.

पौा छ २८ रबिलावल
इसन्ने समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी इष्टिन काशीहून निघून कलकत्त्याकडे गेला, यामुळें अंतरवेदींतील राजकारणें येथें आलीं आहेत. नजफखान व वजिराचे लेंकाकडील लोकांचीं सूत्रें इकडे येण्याविषयीं लागलीं आहेत. त्यांस, विना थोडा बहुत पैका दिल्याखेरीज लोकांची फोडाफोड होणार नाहीं. त्यास येथें पैक्याचा अर्थ आहे नाहीं, तो आपल्या ध्यानांतच आहे. राजकारणें तर या रीतीचीं, प्रस्तुत काळीं अंतरवेदचे मसलतीस मोठाच उपयोग व्हावयाचीं आहेत. त्यांचीं उत्तरें तुटक सांगावीं तर भ्रम जातो. अनकूल करून घ्यावीं तरी पैका नाहीं अशी अडचण. येविशीं सरकारांतून कांहीं पैक्याचा उपराळा व्हावा, तर तेथीलही ओढगस्तीचा प्रकार ध्यानांतच आहे. परंतु अशा राजकारणाचा समय पुढें आपण होऊन करूं जातां घडावयाचा नाहीं. याकरितां कांहीं पैक्याची सोय होऊन राजकारणें अनकूल करून घेतल्यास, अंतरवेदचा मुलूख सुटून हीच जागा

पुढें पैक्यास होईल. अंतरवेदचा बंदोबस्त जाहल्यावर पुढें जो मनसबा केला तो होईल. इतकेही मनसबे एका पैक्याचे लाचारीमुळें विलग पडतात. चार रुपये कर्जवाम घेऊन मसलत करावी, तर सावकारही कोणी मातबर समागमें नाहीं. आबाजी नाईक वानवळे वगैरे समागमें होते, त्यांजपासून कर्ज घेतलें आहे, तेंच त्यांस पावलें नाहीं. तेव्हां पुढें सावकारापासून अर्थ होणें कळतच आहे. (एक ओळ फाटली).....बंगालची मसलत तुम्ही करीत असल्यास कांहीं पैक्याची मदत करूं. त्याजवरी त्याजकडील बोलण्याचा निश्चय काय जाला तो कळला नाहीं. जर या समयीं हैदरखान याजकडून पैक्याची मदत होऊन आल्यास, सध्यां अंतरवेदींत मसलत पाडून, कितेक मोठीं राजकारणें करून, पुढें मातबर मसलत करावयास येईल. हैदरखानाकडून तूर्त ऐवजाची तजवीज न घडल्यास, आपण तरी हरतजवीज करून, आम्हांस कर्जादाखल ऐवज पंचवीस लक्ष–निदान वीस लक्षपावेतों–सावकाराकडून देववावा. दों वर्षांनीं ऐवज सावकारास पावता होईल. परंतु हा समय जाऊं देऊं नये. ऐवजाचा प्रयत्न इकडे करून पाहिला, कोठें साध्य न होय, यामुळें लाचारी जाणून लिहिलें असे. उत्तर येईल त्यासारखा विचार करण्यांत येईल. वरकड राजश्री पांडुरंग रघुनाथ निा रा नारो शिवदेव लिहितील त्यावरून कळेल. रा छ ९ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his assistance being sought by parties at the Imperial Court and asks for a loan of twenty-five lakhs of rupees to enable him to undertake the enterprise.*

No. 198 22nd February 1782.

(आप्पाजी रामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना ऐसीजे, विनंती. सेवकाचें वर्तमान चंद्र ९ रबिलावल पावेतों मुक्काम लष्कर नजीक चिनोर पंचमहाल प्रांत नरवर तालुके ग्वालेर येथें यथास्थित असे. विशेष. लष्करांत आल्यावर एक दोन पत्रें तपशीलवार सेवेसीं लिहिलीं आहेत. आपण राजश्री पाटीलबावांस पत्र लिहिलें होतें व राजश्री हरिपंततात्यांनीं पत्र दिलें होतें, त्यांचीं उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत. हल्लीं राजश्री पाटीलबावांनीं आपल्यास लिहिलें आहे व वकिलाकडूनही लिहविलें आहे; व मजलाही लिहावयासी सांगितलें जे, इंग्रजांकडील वकील आला आहे, याजवळ

तहाचें बोलणें हैदरनाईक सुद्धां बोलत आहों. पुण्यांत गाडराकडून वकील आला आहे, त्याजवळ हैदरनाईक सुद्धां तहाचें बोलणें बोलावें. येविषयीं राजश्री नानांस लिहिलें आहे तेही बोलतच आहेत. हैदरनाईक सुद्धां तह जाहल्यास बरें आहे. हैदर सुद्धां तहाचें बोलणें न घडलें, त्या अर्थी इंग्रजांस जरब दिल्याखेरीज मसलत होत नाहीं. जरबेचा प्रकार म्हणावा तरी दोन मसलती, एक बंगाले व एक अंतरवेद, अंतरवेदींतील सूत्रें आलीं आहेत. नजफखान यांजकडील लोकांचीं व मीर्जाआमानी वजीर यांजकडील लोकांचीं आलीं. परंतु पैका खर्चास द्यावयास पाहिजे तेव्हां गोष्टी घडाव्या. आम्हांजवळ द्रव्याची कमती. कासीचा राजा आला. त्याचें स्थळ गेल्यामुळें विलगता त्याचीही जाहली. पातशाहा व नजफखान यांची निखालसता नाहीं. त्याजमुळें तेंही संधान पुर्तेपणें एकही पक्कें हातास लागत नाहीं. जें करणें तें आपले जोरावर करावें लागेल. यास्तव द्रव्याचे साहित्याखेरीज विलग पडलें आहे. तरी हैदरनाईक यांजकडे राजश्री नानांनीं बंगाल्याचे मसलतीस ऐवजाविषयीं बोलणें लाविलें आहे, त्याजपैकीं पंधरा वीस लक्षांची सोई जाहल्यास बरें आहे. अथवा सावकाराकडून कर्ज आम्हांस देविलें तरी पुढें दोहों वर्षांउपरांत ऐवज सावकारास देऊं. पैक्यामुळें विलग पडलें आहे. आम्हांजवळचे सावकार म्हणावे तरी आबाजी नाईक वानवळे वगैरे यांजपासून ऐवज घेऊन सालमजकूर व पेस्तर सन सलास व आर्बाचे रसदे-सुद्धां वराता देऊन ऐवज घेतला आहे. तत्रापि योजना करितों, परंतु घडत नाहीं. याजकरितां ऐवजाची तरतूद जाहल्यास मसलतीस सोय पडेल. यास्तव राजश्री नानांस तुम्हीं लिहावें ऐसें सांगितलें. त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. फडनिसीचे कामाविषयीं व कारकुनीचे यादी मागील ऐवजाची व पुढील दरसालचे गांव लावून द्यावे याजविषयीं वारंवार पुसत आहें. बंदोबस्त करून देतों म्हणून बोलतात. घडेल तें खरें. आपण फडनिसीचे दरक चालविण्याविषयीं व कारकुनीचा ऐवज उगऊन घेण्याविषयीं मजला एक दोन वेळ पत्रीं लिहावयासी आज्ञा जाहली पाहिजे. आपले पत्राचें व रा तात्यांचे पत्राचें उत्तर पाठविलें आहे म्हणून लिहिलें, त्यास पत्रें तयार जाहलीं म्हणजे राजश्री बावांची विनंती करून घेऊन दुसरें खाजगी बरोबर पाठवीन. कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram conveys to Nana Mahadji's request not to entertain proposals of peace which did not include Haidar and his request for a loan to enable him to pursue schemes of conquest in the Doab and Bengal.*

No. 199 31st March 1782.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १७ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. इंग्रजांचे वकील चहूंकडे मुख्त्यारनामे दाखवून बोलतात. नवाब भोसले यांचे मतें आपले हातें व्हावें तें तर ठीक नाहीं. इतकेही वकील व सरदार बंदरवाले इंग्रज इतक्यांचे अधिकारी इष्टिन, ते आपले जवळ आहेत. त्याजकडून इंद्रसेन सलुखाचा जाबसाल बोलावयास आपल्याकडे आला आहे. त्यासी युक्तीनें बोलून, इष्टिनाची व आपली गांठ पडून, पक्का तह सरकारचा तळेगांवावरील तहनाम्याप्रमाणें व हैदरखानाचा तह होत असल्यास फार चांगली गोष्ट आहे. वरकडांचे मनसुबे सहजांत विरघळून जातील. इष्टिनानें काशीहून पुढें यावें व आपणही पुढें जाऊन खाशाचे भेटीचा योग करून सलूख पक्का ठरवावा. एक सरकारचा सलूख आतां कबूल करतील. परंतु हैदरखानाचा जाबसाल जाहल्याखेरीज करितां न ये. याकरितां हैदरखान सुद्धां सलुखाचें बोलणें निश्चियांत आणावें. म्हणजे वरकड आपले जागांच राहतील. सर्वांवरी दाब पडेल. कोणाचीच गरज चालणार नाहीं. सलूख करण्याचे प्रकरणीं ही मोठी गोष्ट आहे, म्हणून विस्तारें लिहिलें, तें कळलें. ऐसियास इष्टिन काशीहून लखनौस येणार. म्हणून पूर्वी बातमी आली होती. त्यावरून आपल्यास लिहिलें होतें. त्या अन्वयावरून ही मसलत लिहिली. त्यास, इष्टिन यानें इंद्रसेनास इकडे रवाना करून, आपण खासा कलकत्त्यास गेला. तेव्हां आपण लिहिली मसलत ती सहजच राहिली. इंद्रसेन येथें आल्यावरी त्यासीं बोलण्याची भवति न भवति होऊन, त्याचे बोलण्याचे भाव आलाहिदा व आम्ही आपले जाबसाल याप्रमाणें जाले तर सलूख होईल, ते यादीची नक्कल पाठविली आहे, त्यावरून कळेल. इंद्रसेनानें कलकत्त्यास लिहून पाठविलें आहे. उत्तर काय येतें पहावें. यादीचा भाव मनास आणून आपण लिहितील, त्याप्रमाणें यासीं बोलावयास येईल. वरकड राजश्री पांडुरंग रघुनाथ निसबत राजश्री नारो शिवदेव लिहितील, त्यावरून कळेल. रवाना छ १६ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his having sent a draft of the proposed treaty for his approval.*

No. 200 31st March 1782.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी येथील ओढीचा प्रकार आलाहिदा पत्रीं लिहिला आहे, त्यावरून कळेल. सारांश, पैक्याचे लाच्यारीमुळें मसलतीचें पाऊल पुढें पडत नाहीं. याजकरितां नाविलाज जाणून मसलत होत नाहीं; आणि शिबंदी तर चढती. हें दुप्पट नुकसान आहे. यास्तव आपण हरतजवीज करून, या समयीं इकडील उपराळा करावा. निदान पक्ष, कर्जाऊ ऐवज सावकाराकडून आम्हांस देवावा. त्यास ऐवज पुढील दोन सालें, सन सल्लास व अर्बा, खाऊन चुकलों. तिसरे सालावारी ऐवज लावून द्यावयास येईल. याही तोडीवर ऐवजाची सोय आपण पुढें होऊन सावकाराकडून करून देवावी. उपेक्षा करावयाचा समय नाहीं. रवाना छ १६ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji repeats his earnest request for a loan from the Poona Court.*

No 201 31st March 1782.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १७ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. इकडील मसलतीचा व ओढीचा प्रकार आपल्यास विस्तारेंकरून लिहिला होता. त्याचें उत्तर आपण लिहिलें कीं, आपणावर खर्चाचा व छावणीचा कसाला गुदरला असतां इतकेंही सोसून मसलत केली व पुढें करणार, ही योग्यता आपलीच होय. श्रीमंतांचे दौलतीस चांगलें तेंच आपण करीत आहेत म्हणून. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास आपले घरांतील विचार पाहतां, पैक्याचे ओढीमुळें मसलत मनोदयानरूप घडत नाहीं. गुदस्तां गुजराथची मसलत पडली, व गुदस्तांपासून इकडील मसलतीवरी आलों, तेव्हांपासून मसलतीचे खर्चामुळें सरदारींत ताकद राहिली नाहीं. मागील सावकारांचें देणें तसेंच असतां, पुढील दोन सालांचा ऐवज मामलेदाराजवळून घेतला, व अलीकडे सावकारांपासून कर्जवाम घेऊन आजपावेतों दिवस लोटले. आतां कर्जही मिळत नाहीं; मसलत तर प्राप्त. साल मजकुरीं मसलतीचे दिवस अखेरीस आले. तेव्हां छावणी इकडे करून बादबरसात मसलत करावी यास पैका किती पाहिजे? हल्लींच लोकांचे देण्याचा गवगवा

बहुत आहे. गोसावी व बैरागी व पलटणें यांस दरमाहाचा दरमाहा रुपया द्यावा लागतो. हें वर्तमान परस्परेंही आपल्यास कळलेंच असेल. पैक्याची लाचारी आणि यमुना उतरून परकी मुलखांत मसलत करणें. लोकांस तर पैका दिल्या-खेरीज पुढें पाऊल ठेवीत नाहींत. अशा अडचणीमुळें याच प्रांतीं दिवस व्यतीत होतात. उपाय नाहीं. या समयीं आपणाकडून पैक्याची मदत जाहल्यास या प्रांतीं छावणी होऊन बादबरसाद अंतरवेदची मसलत घडेल. पठाण व गंगापारचे रोहिले, व शीख व वजिराचे घरांतील वगैरे राजकारणें आहेत, परंतु यमुना उतरल्याशिवाय अनकूल होत नाहींत. येविसींचे अर्थ पूर्वी आपल्यास लिहिलेच आहेत. सरकारांत ओढ, तेव्हां मदत कोठून करावी, असें आपण म्हणतील. तर सरकारांत ओढ हें प्रमाण. तत्राप कर्जवाम घेईन म्हटल्यास तेथें सोय आहे. येथील विचार म्हणावा, तर समागमें मातबर सावकार कोणी नाहीं. मुलूख परकी आणि मसलत तों प्राप्त. यामुळें नाविलाज जाणून आपल्यास लिहिलें आहे. तरी अंतःकरणपूर्वक इकडील मसलतीस पैक्याची मदत निदान पंचवीस लक्षपावेतों आपण केली, तर छावणी या प्रांतीं होऊन पुढें मसलत होईल. रवाना छ १६ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji again repeats an urgent request to be supplied with money to enable him to take offensive measures in north India to keep up the old Maratha prestige.*

No. 202 14th April 1782.

पैवस्ती चंद्र १९ जमादिलाखर इसन्ने समानीन (3-5-1782).

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः —

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ माहे रबिलाखरपावेतों मुक्काम चिन्होर प्रांत ग्वालेर पंचमहाल येथें लष्करांत समस्त सुखरूप असों. विशेष. स्वामींकडून सेवकाचें पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं, तरी निरंतर पत्रीं सेवकास लाभ दिला पाहिजे. यानंतर इकडील दरबारी मजकूर, इंग्रजांकडून इंद्रसेन वकील आला आहे. त्याचें बोलणें राजश्री पाटीलबावांसीं जाहलें, तें माझ्या समजण्यांत आलें तें व

मुख्यांनीं सांगितलें तें पेशजीं स्वामींस पत्र लिहून डांकेबरोबर सेवेसीं रवानगी केली आहे, त्याजवरून श्रुत होईल. हल्लीं इंग्रजांचे वकिलाचें बोलणें जहालें त्यांतील भाव, राजश्री बावांनीं सांगितले, कीं आमचें वकिलाचें बोलणें दहा पांच वेळ जाहलें, त्याचीं उत्तरें जाहलीं तीं ऐका. कर्नल इपटिन कलकत्याहून पुरंदरास आला होता, ते समयीं तह जाहाला त्याप्रमाणें हल्लीं तह करावा. त्या तहामध्यें साष्टी खेरीज करून बाकी तह करावा ऐसें ठरलें होतें व अंतरवेदीचें तों कलम मुळींच लिहिण्यांत आलें नव्हतें. तें खेरीजकरून बाकी आज तागाईत जो मुलूख व किल्ले कोट ठाणीं सरकारचीं घेतलीं आहेत तीं झाडून सरकारांत घ्यावीं. याप्रमाणें वकिलांच्या बोलण्यांत आलें आहे; व राजश्री बावांच्या बोलण्यांत आहे, कीं पगडीवाल्यांचा पक्ष इंग्रजांनीं करूं नये, व टोपीवाल्यांचा पक्ष श्रीमंतांच्या सरकारांतून होणार नाहीं. याप्रमाणें तहामध्यें बोलणें जाहलें, तेव्हां वकिलानें उत्तर केलें कीं, पगडीवाल्यांपैकीं नवाब, भोसले, हैदरखान या तिघांचा पक्ष आम्ही करीत नाहीं, परंतु महमदअल्लीखान याचे आम्ही चाकर म्हणवितों, त्यापक्षीं सुजादौलाचा लेक व महमदअल्लीखान या दोघांचा, आम्हांस तुम्हीं यांजवर जरब दिल्यास, पक्ष करावा लागेल; यांसीं तुमचें विरुद्ध नसावें. याप्रमाणें बोलणीं जाहलीं. त्यास येविषयींचा मजकूर राजश्री पाटीलबावांनीं स्वामींस लिहिला आहे व राजश्री जाधव यांस लिहिला आहे त्याजवरून श्रुत होईल. मजला जितकें वर्तमान कळलें तितकें लिहिलें आहे. महमदअल्लीखान व सुजादौला याचे लेकाचा पक्ष धरावयाचें कारण हेंच जे, भोसले व नवाब व हैदरखान या तिहींसुद्धां सलुखाचें बोलणें लागलें, तेव्हां इंद्रसेन वकील यांनीं उत्तर केलें कीं, भोसले, नवाब यांचा तों आमचा सलूख आहे. तेव्हां तुम्ही यांजविषयीं काय समजोन बोलतां? त्यास इकडून उत्तर जाहलें कीं, ते आम्हांसी त्रिवर्ग मिळून आम्हांस तुमच्या पारपत्याची मसलत दिली. या गोष्टीस बाजीकर नवाब ऐसे असतां तुम्हांस मिळाले. ही गोष्ट त्यांनीं फार उत्तम केली. परंतु श्रीमंतांच्या सरकारचें वचन या तिघांसीं गुंतलें आहे कीं तह करणें किंवा बिघाड करणें तो तुम्हांस इतल्ला देऊन केला जाईल. ऐसें वचन सरकारचें त्रिवर्गांपासीं गुंतलें आहे. तेव्हां तहाच्या बोलण्यांत तिघांस घेऊन बोललें पाहिजे. बिनासलूख तुमचा आमचा घडणार नाहीं. त्यास ही गोष्ट वकिलानें कबूल केली, परंतु हैदरखानाविषयीं गोष्ट अवघड पडली आहे. ही गोष्ट घडणें कठिण दिसतें. आजपर्यंत आम्हांसी गोष्टी फार बोलत होते; परंतु आतां सारा भाव बोलण्यांत आला

तो सेवेसीं लिहिला आहे, त्याजवरून विदित होईल. वरकड होईल वृत्त तें सेवेसीं मागाहून लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana progress of peace negotiations between Mahadji and Anderson, about the article which stipulated that the Marathas were to renounce all connection with Europeans of other nationalities, while the English bound themselves not to interfere in the affairs of native chiefs with the exception of the Nawabs of Karnatak and Oudh.*

No. 203 30th April 1782.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी राजश्री नारो शिवदेव आपणाकडे पाठविले आहेत. इकडील सविस्तर वर्तमान मसलतीचें वगैरे आपणास सांगतील, त्यावरून कळेल. मशारनिल्हेनीं आपणापाशीं राहून इकडील कामें काजें येतील तीं व जाबसाल करीत जावें, येविसीं यांस सांगितलें आहे. आपणही इकडील जाबसाल यांचे हातें पूर्ववत् घेत जावा. रवाना चंद्र १५ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji sends Naro Shivdeo to Poona with instructions.*

No. 204 30th April 1782.

राजश्री नारो शिवदेव गोसावी यांस—

दंडवत विनंती. उपरी इंग्रजांचे मसलतीमुळें इकडे छावणी करणें प्राप्त आहे. त्यास ओढीचा प्रकार आहे तो तुम्हांस लोपला नाहीं. येविषयींचें सांगणें तें राजश्री बापूजी रघुनाथ व गंगाजीस सांगितलें आहे. तुम्हांस लिहितील त्यावरून कळेल. तरी तुम्हीं देशीं जाऊन, इकडील मसलतीचे वगैरे सविस्तर अर्थ राजश्री नानांस समजावून उत्तर लौकर पाठवावें. तुम्हीं नानापाशीं राहून इकडील जाबसाल व कामेंकाजें पूर्ववत्प्रमाणें करीत जाणें. रवाना चंद्र १५ जमादिलावल, बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Naro Shivdeo is asked to explain several outstanding questions to Nana Fadnis.*

No. 205 30th April 1782.

पैवस्ती चंद्र १४ रमजान सन सल्लास. श्रावण.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नोा महादजी शिंदे दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री सखारामराव घोरपडे आम्हांपाशीं आहेत हें आपणास ठाऊकच आहे. यांचे तीर्थरूप राणोजी घोरपडे सेनापती यांसी देवआज्ञा जाहली. उपरांतिक सखारामराव याचे वडील बंधु राजश्री सुबराव घोरपडे यांचा व यांचे सापत्नबंधु संताजी घोरपडे यांचा कजिया लागला आहे. त्यास संताजी घोरपडे यांचा पक्ष राजश्री परशरामपंत भाऊ व राजश्री व्यंकटराव इच्चलकरंजीकर करून, सुबराव घोरपडे यांस उपद्रव करितात, म्हणून ऐकिलें. त्यावरून आपणास लिहिलें असे. तरी आपण परशरामपंतभाऊंस व इच्चलकरंजीकरांस सांगून, संताजी घोरपडे यांनीं गैरवाका समजावल्यावरून सुबराव घोरपडे यांस उपद्रव देतात, तो न देत तें करावें. उभयतांचा कजिया असला तरी, आम्ही देशीं आल्यावरी, आपले आमचे विचारें त्याचे मनास आणून, विल्हे लावावयास येईल. तोंपर्यंत सुबराव घोरपडे यांजकडे गांव, खेडीं व राहावयाच्या जागा आहेत त्या राखाव्या. संताजी घोरपडे गैरवाका समजावतील तें न ऐकावें. येविसीं परशरामपंतभाऊ व इच्चलकरंजीकरांस निक्षून सांगावें. सखारामराव घोरपडे आम्हांपाशीं (आहेत) यांचें अगत्य आम्हांस तेंच आपणास आहे. रवाना छ० १६ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to watch the interests of Subarao Ghorpade, a brother of one of his captains.*

No. 206 19th July 1782.

राजश्री नारो शिवदेव गोसावी यांस—]

दंडवत विनंती. उपरी किल्ले अशेरीचा मजकूर राजश्री नानांनीं तुम्हांस लिहिला, त्याजवरून तुम्हीं लिहिलें तें कळलें. त्यास, सरकारांतून मुलें माणसें राहावयाकरितां आम्हांकडे किल्ला देविला. तीन वर्षें किल्लेदारानें सरकारची आज्ञा व राजश्री नानांचीं पत्रें न मानलीं. त्यामुळें आम्ही खर्चाचे पेंचांत आलों.

हें सर्व नानांचे ध्यानांत असोन, येथून आमचें संमत घेऊन मग बोलणाराचा भाव ध्यानांत आणावा, इतका संदेह कशास असावा? बोलणार काय बोलतो तें मनास आणून लिहिलें असतें, तरी खुलासा समजता. ज्या पक्षीं किल्ला आम्हांकडे देविला, तो आमचे स्वाधीन व्हावा असें अंतःकरणापासून आहे, त्यापक्षीं इकडील संमताची वाट न पाहतां, बोलणारासीं बोलून मग आम्हांस लिहिते, तरी चिंता नव्हती. याउपरी बोलणाराचें बोलणें ऐकून घेऊन, इकडील संदेह मनांत न आणतां, त्यासीं बोलावें, याप्रमाणें तुम्हीं नानांस लिहून पाठवावें. रवाना चंद्र ७ साबान. हे विनंती.

¶*Mahadji asks for an unconditional surrender of the fort of Aseerghur already given to him.*

No. 207 23rd July 1782.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ माहे साबानपावेतों स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील दरबारी वर्तमान तरी, मीर्जा सफी यांजकडून अनुपगीर गोसावी येथें येऊन चार महिने बसले होते. त्यांतील कारण हेंच कीं राजश्री पाटिलबावांचा व पातशाहाचा घरोबा व नजफखान वजिरी करीत होते, तेही भाऊपण्यादाखलच होते. याजकरितां मीर्जा सफी, नजफखानाचे भाचे, याचे मतें ज्याप्रमाणें पहिले पासून दक्षणी सरदार यांचा घरोबा आहे त्याप्रमाणें पुढें चालावा, आणि पातशाही वजिरी आपले नांवें करून घ्यावी हेंही मानस होतें. याजकरितां नेहमीं कागदोपत्रीं सिलसिला चाललाच होता. त्यास हल्लीं भेटी होण्याचा निश्चय होऊन, येथील किल्ल्याचे मोर्चाची बंदोबस्ती करून, भेटीस मीर्जा सफी यांचे जावें हा निश्चय ठरोन, अनुपगीर गोसावी पुढें रवाना केले. इकडील व किल्ल्यांत शाहापासीं आनंदराव नरसी म्हणोन कारकून ठेविला आहे. तोही पातशाहाजादा याजबरोबर होताच. त्यास सफी, फौज व तोफखानासुद्धां पातशाहाजादा समागमें घेऊन व बेगम, नजफखानाची बहीण, हीसुद्धां आगऱ्यास मुलुखाचे बंदोबस्ताकरितां आले होते, तेथून कूच करून चमेलीवर आले. येथून यांचीही स्वारी सडी पांच हजार फौजेनसीं तयार होऊन, तिसरे दिवसीं चमेलीवर गेले. तेथें

यांच्या व त्यांच्या भेटी जेष्ट वद्य १४* स जाहल्या; आणि परस्परें बोलणीं होऊन निखालसता यांची व सफीची जाहली. मग उपरांतिक पातशाहाजादा याच्या भेटीचा समारंभ आषाढ शुद्ध १ जाहला. तेच वेळेस निरोपही पातशाहाजादा याचा घेतला. परस्परें बहुमान वस्त्रें, जवाहीर, हत्ती घोडेसुद्धां जाहला. आंतील बोलणीं त्यांचीं यांचीं काय जाहलीं, तीं कळलीं नाहींत. परंतु सफीचा व राजश्री पाटिलबावांचा पगडीबद्दल भाऊपणा जाहला. स्वामींस कळावें म्हणोन सेवेसीं लिहिलें आहे. येविसीं तपसीलवार वकिलांनींही लिहिलें आहे, त्याजवरून सर्व श्रुत होईल. यानंतर आमचा गांव कसबे आकोलनेर नगर हवेलींत आहे, त्यास तेथील देशमुखी भोसले यांची आहे. त्यास आजतागाईत देशमुखीचा रुसूम मोघम देत आलों. या गोष्टीसही वर्षें अठावीस तीसपर्यंत जाहलीं. परंतु हा कालपर्यंत शेंकडा रुपया दोन रुपये ऐसें कांहीं खंडून दिलें नाहीं. हल्लीं भोसल्याचे तर्फेनें नवा कमावीसदार देशमखीचा बंदोबस्ताकरितां आला आहे, त्याणें बहुत उपद्रव मांडिला आहे. म्हणोन चिरंजीव राजश्री वेंकटराव यांणीं लिहिलें होतें. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. तरी सेवकावर कृपा करून राजश्री बळवंतराव वकील भोसल्याकडील दिवाकरपंत यांचे भाचे पुणियांत आहेत, त्यांस आपण समक्ष सांगावें कीं, हा गांव आमचा आहे. त्यास तुमचा भोगवटा पेशजीपासून चालत आला आहे त्याप्रमाणें हल्लीं तुम्हीं पैका रुसुमाचा आपला घ्यावा. याप्रमाणें आज्ञा जाहली म्हणजे आमचे मागील वहिवाटीस ठीक पडेल. याखेरीज कडेकरासही देशमुखीचा रुसूम द्यावा लागतो. ऐसा प्रकार आहे. भोसल्याकडील वकील सरकारांत नेहमीं असतां हल्लीं भोसले रुसुमाकरितां सर्व प्रांतांत दंगा करितात. येविसीं बंदोबस्त करणार स्वामी समर्थ आहेत. येविसीं चिरंजीव वेंकटराव तपसीलवार विनंती करतील. त्याप्रमाणें कसबे मजकूरचा बंदोबस्त होऊन येई तो अर्थ स्वामींनीं केला पाहिजे. आम्हांस या पायांखेरीज दुसरा अनुसंग आहे नाहीं, हेंही स्वामींस विदित आहे. तेथें विस्तारें लिहावें ऐसा अर्थ नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports a meeting between Mahadji Sindia and Mirza Shafi. The Mirza was seeking Sindia's support against his opponents at Delhi.*

---

*9th July 1782.

No. 208 19th September 1782.

(आपाजीरामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना तागाईत छ ११ माहे सवालपावेतों मुक्काम ग्वालेर यथें सुखरूप असो. विशेष :—राजश्री पाटीलबावांनीं इंग्रजांचा व सरकारचा तह जाहला ते समयीं इंग्रजांचा तहनामा आपणापासीं घेऊन श्रीमंतांचा तहनामा इंद्रसेनापासीं दिल्हा. ते वेळेस इष्टिनापासून कलकत्त्याहून कंपनीच्या मोहरेनसीं कौंसलदाराचे दस्तकानसीं पांच कलमें करार करून आणावीं आणि तीन कलमें इंद्रसेनानें येथें करून द्यावीं याप्रमाणें ठरोन मग तहनामा दिल्हा. त्यांपैकीं हल्लीं कलकत्त्याहून कलमें लेहून आलीं तीं बितपसील :—

जाहजांचें कलम साबक* दस्तुर चालत आलें आहे त्याप्रमाणें चालावें म्हणून एक. कलम. १

दुसरें कलम गायकवाडांचें होतें. तें इंग्रजांनीं लिहिलें कीं श्रीमंतांचा व इंग्रजांचा तह जाला त्यास अतःपर श्रीमंतांकडील कोणी सरदार किंवा मुत्सद्दी अगर सावकार वगैरे कोणी आल्यास आपण त्यास आश्रा देणार नाहीं व त्याची कुमक करणार नाहीं. याप्रमाणें गायकवाडांचे कलमाचा मजकूर लिहिला आहे. बाकी तीन कलमें कलकत्त्याहून लेहून यावयाचीं आहेत. कलम. १

श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजांकडे गेले तेव्हां इंग्रजांनीं दस्ताऐवज लेहून घेतले असतील ते माघारे द्यावे, ऐसा करार पांचा कलमांतील आहे. त्याचें उत्तर अद्याप आलें नाहीं. कलम. १

श्रीमंतांची व इंग्रजांची दोस्ती जाहली तेव्हां श्रीमंतांचे सरकारांत किंवा इंग्रजांस कुमकेची दरकार लागली तरी परस्परें फौजेचे खर्चास काय द्यावें हें कलम लेहून कलकत्त्याहून यावयाचें तें अद्याप आलें नाहीं. कलम. १

श्रीमंतांचा व इंग्रजांचा तह जाहला त्या तारखेपासून सा महिन्यांत टिपूमिया यास श्रीमंतांनीं सांगावें कीं, इंग्रजांचा व सरकारचा तह जाहला, त्यास सरकार चालीप्रमाणें तुम्हीं तह कबूल करावा, आणि इंग्रजांचा व महमदअल्लीखान यांचा मुलूख व पाडाव सोडून द्यावे, आणि सरकारच्या कराराप्रमाणें वर्तणूक करावी. ही गोष्ट टिपूमियानीं कबूल केल्यास उत्तम. कबूल न करीत, तरी सरकार व

*पूर्वापार.

इंग्रज सामील होऊन टिपूमियाचें पारिपत्य करावें, आणि जो मुलूख हैदरखानानीं श्रीमंतांचा किल्लेकोट सुद्धां घेतला आहे तो सरकारांत घ्यावा, आणि इंग्रज व महमदअलीखान यांचा मुलूख यांणीं घ्यावा. बाकी जो मुलूख फक्त हैदरखानाचा आहे, तो निमे इंग्रज व निमे श्रीमंत यांणीं आपलाले मुलुखाचे लक्ता नवा मुलुख सुटेल तो घ्यावा. हें कलम अद्याप लेहून यावयाचें आहे. कलम. १

एकूण पांच कलमांपैकीं दोन कलमें इंद्रसेनापासीं लेहून आलीं आहेत. त्याजमध्यें गायकवाडांचे कलमांचा उद्धार स्वामींच्या लिहिल्या अन्वयें आला नाहीं. राजश्री पाटीलबावा म्हणतात कीं, एकले गायकवाडच कशास त्याहावे ? कोणीच सरकारचे सरदार किंवा मुत्सद्दी अगर सावकार इंग्रजांकडे गेले असतां त्यांची पासदारी* करूं नये व त्याजला आश्रा देऊं नये. याप्रमाणें स्पष्ट लिहिलें असतां सरकारची मर्जी या लिहिण्यास खुष नाहीं; परंतु येविसींचें मनन पुर्तेपणें करावें. मग हें कलम लिहिलें हें ठीक नाहीं ऐसेंच असिलें, तर गायकवाडाचाच मात्र अन्वय लेहून आणऊं. श्रीमंत दादासाहेब यांचे दस्ताऐवजाचें कलम लेहून आणवावें त्यास, ज्यापक्षीं दादासाहेब तुम्हांपासीं गेले तेव्हां दस्ताऐवजाचा जाबसाल आधीं श्रीमंतांस पुसावा. जर त्यांणीं म्हटलें कीं, दस्ताऐवज आमचे इंग्रजांचे घरीं आहेत, तरी कलम लिहिलें आहे त्याप्रमाणें लेहून आणवूं. आणि श्रीमंतांनीं म्हटलें कीं, आमचे दस्ताऐवज इंग्रजापासीं कांहीं नाहींत, ऐसें उत्तर आलें तरी गुंताच उरकला. याप्रमाणें दस्ताऐवजाचें उत्तर सांगितलें. परस्परें फौजा कुमकेस याव्या त्यास खर्चास काय द्यावें याचा निर्णय लेहून यावा कीं, इंग्रजांनीं पांच पलटणें सरकारांत कुमकेस पाठविलीं तरी त्यास खर्चावयासी अमुक द्यावें ऐसें असावें. ज्याप्रमाणें तुम्ही पांच पलटणांस खर्चावयासी द्याल, त्याप्रमाणें आपली फौज इंग्रजांचे कुमकेस पाठविली असतां, पांचा पलटणांच्या खर्चाच्या अन्वयें पांच हजार फौज आपली पाठविली असतां खर्चावयासी त्याबराबर देतील. तेव्हां आम्ही विनंती केली कीं, फौजेचा खर्च आणि पलटणांचा बराबर कसा होईल ? तेव्हां त्याचें उत्तर केलें कीं, पांचा पलटणांनीं फौजेपेक्षां कामकाज अधिक केलें असतां त्यास कोणी जास्ती देणार नाहीं, आणि फौजेचें काम कमी जाहलें असतां त्याचा पैका कोणी कमी करणार नाहीं. पलटणांप्रमाणें फौजेच्यानें काम होणें कठिण आहे. यास्तव जो करार ठरेल तो परस्परें चालेल. याप्रमाणें उत्तर

* तरफदारी.

जाहलें. टिपूमियांनीं सरकारच्या तहाप्रमाणें ऐकिल्यास उत्तम आहे. न ऐकिलें तर परिछिन्न श्रीमंतांनीं व इंग्रजांनीं सामील होऊन पारिपत्यच करावें आणि जे मुलूख किल्लेकोट सुटतील ते निमेनिम वांटून घ्यावे, ऐसा करार ठरला आहे. त्यास, स्वामींच्या लिहिल्यांत पेशजीं आलें होतें कीं, खानाकडील मुलूख सुटेल त्यापैकीं दोन हिसे श्रीमंतांनीं घ्यावे आणि एक हिसा इंग्रजांनीं घ्यावा. त्यास याचें उत्तर इंद्रसेनानें राजश्री पाटीलबावांपासीं केलें कीं, नवाब तुमच्या सिकमांतील* ऐसें असतां निराळी वांटणी देऊं म्हणतां हें ठीक नाहीं. तुमच्या सिकमांतील जे आहेत त्यांस तुम्हीं आपले मुलखापैकीं वांटणी द्यावी, आणि जे आमच्या सिकमांतील आहेत त्यांस देणें तर आम्ही आपले मुलखापैकीं देऊं. त्याची रदबदली आम्ही तुम्हांपासीं करीत नाहीं व तुम्हीं आम्हांपासीं ही गोष्ट न बोलावी. याप्रमाणें उत्तर केलें. याचें कारण काय, तरी नवाबांस वांटणी निराळी दिली म्हणजे आधीं सिलसिला†इंग्रजांसीं आहेच; आणि तहनाम्यांत नवाब, भोसले यांणीं व इंग्रजांनीं परस्परें सिलसिला अगर वकील देखील ठेऊं नये याप्रमाणें कलम उगविलें आहे, त्यास ह्या कलमानें बाध पडेल ती गोष्ट न घडावी. आणि आतां ही गोष्ट घडत नाहीं ऐसें उत्तर राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें. हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports his discussion with Mahadji Sindia over certain new articles which the Poona court desired to be included in the treaty and which had been referred to Calcutta for ratification.*

No. 209 22nd September 1782.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १४ सवालपावेतों मुकाम उमेदगड प्रांत ग्वालेर येथें लष्करांत समस्त सुखरूप असों. विशेष. राजश्री पाटीलबावांनीं आम्हांस व वकील पांडुरंग रघुनाथ यांस बोलावून बोलिले कीं, इंग्रजांकडील तहाची कलमबंदी राजश्री नानांकडे गेल्यावर दोन वेळ त्यांचीं उत्तरें आलीं. त्यांत तह करावा ऐसें तर लिहितात, परंतु कलमबंदीचे तपसील ऐकावे तों तह कर्तव्य कीं न कर्तव्य

*शिकम=पोट, त्यांतील. †सूत्र, संबंध.

हे दोन्ही समजत नाहीं आणि इंद्रसेन तों निरोपाची उतावळी करितो. अलीकडे फरासिसांचे राजकारणाची याद कलकत्त्याहून त्यापासीं आली, त्यावरून त्याणें आम्हांकडे शद्ब लाविला कीं, तुमच्या सरकारांतून फरासिसांसीं राजकारण चाललें आहे आणि तुम्ही आम्हांसी सलुखाची भवति न भवति बोलतां. यांत ऐसें दिसोन येतें कीं सरकारचें लक्ष तुमच्या जाबसालाकडे नाहीं. ऐसें आहे. त्यापक्षीं मजकडे इष्टिनाचा शद्ब आणूं नये. उगेच नादीं लावून आपण मजला ठेऊन घ्यावें, अथवा मीं राहावें, ह्या दोनी गोष्टी ठीक नाहींत. अतःपर कोणता निश्चय करावयाचा तो करून मजला उत्तर द्यावें. याप्रमाणें त्याची निकड फार आहे. आपल्या घरांतील विचार पाहतां जाबसालाखालींच दिवस घालवितात, परंतु स्पष्ट खोलून एकही लिहीत नाहींत. तेव्हां त्यावरी उत्तर काय करावें? पूर्वी रामजी पाटलाकडील पत्रें पाहोन त्याचीं उत्तरें आलीं. त्या कलमबंदीची याद पोहोंचून तेथून निदान पक्षाची याद आली. त्याचीं उत्तरें पूर्वी येथून रवाना केलीं आहेत, तीं पाहून सविस्तर अर्थ ध्यानांत आलेच असतील. इंग्रजांसीं तह कर्तव्य असा निश्चय असल्यास, पूर्वी लिहिलें आहे त्याप्रमाणें तहनामा शिक्यानसीं व एक डौल याप्रमाणें दोन्ही यादी पत्र पावतांच तेथून रवाना कराव्या, म्हणजे पूर्वी लिहिल्या अन्वयें जाबसाल उरकून घेऊं. तह करावयाचा नसल्यास स्पष्ट उत्तर यावें म्हणजे इंद्रसेनास निरोप देऊं. याउपर त्याचे ठेवावयासी पराकाष्ठा जाली. सरकार व हैदरखान मिळोन फरासिसांस तहनामा करून दिल्हा, त्या यादीची नक्कल कलकत्त्यास गेली. तेव्हांपासून इष्टिन इकडील मसलतीच्या तर्तुदेंत विशेष आहे. पूर्वी सुजातदौलाचे वेळेस मटाटीण* फिरंगी लखनौस मुखत्यार होता, त्याची बदली जाहली होती. हल्लीं त्याणेंच इकडील मसलत कबूल करून लखनौस कलकत्त्याहून आला आहे. चार कंपू अंतरवेदींत तयार जाहले आहेत. त्यांत दोन कंपू आम्हांवर पाठविणार. दोन कंपू धरण्यापरण्याचे मार्गे भोसल्यांचे मुलुखांतून गाडरास कुमक जाणार, याप्रमाणें बातमी पक्की आहे. यास्तव आपली सावधता अगोदर असली पाहिजे. प्रस्तुत या प्रांतीं आम्ही आहों, यामुळें चार राजेरजवाडे दबून आपले जागां आहेत. उद्यां इंग्रजांचीं पलटणें आल्यावर सारे त्यांत हमराह† होऊन इकडे मसलत भारीच पडेल. तेव्हां आम्ही इकडील मसलतीस गुंतलों आणि धरण्यापरण्याचा मार्ग अगदीं मोकळा राहिला, त्या

*Middleton. †सामील.

मार्गें पलटणें निर्वेध गाडराकडे जातील. याकरितां तिकडील बंदोबस्त राखावा. नाहीं तरी इंग्रजांचे कंपू गाडराजवळ जाऊन पोहोंचल्यानंतर मग देशीं मसलत भारी पडेल. पूर्वी येथून एक दोन वेळ लिहिलें आहे, जे, इंग्रजांची मसलत पुर्तेपणें शेवटास न्यावयाची असल्यास बंगाल्याकडे फौजेची रवानगी होऊन दसरा दिपवाळीच्या दिवसांत बंगाल्यांत हंगामा सुरू होय ऐसें घडावें. त्याचें उत्तर कांहीं आलें नाहीं. त्यास येविसींचा सिद्धांत कसा जाहला तो कळवावा. विना बंगाल्याकडील मसलत जाहल्याखेरीज इंग्रज जरबेंत येत नाहींत. हे विचार तेथेंही होतच असतील. आमचे विद्यमानें तहाचें बोलणें म्हणोन तह करावाच करावा, अथवा न करावा हे दोन्ही आग्रह आम्हांकडून नाहींत. ज्यांत श्रीमंतांच्या दौलतेस चांगलें दृष्टीस पडत असेल तें करावें. परंतु येविसींचा निश्चय सत्वर आम्हांस कळावा म्हणजे त्याप्रमाणें विचार करावयास येईल. याउपर लिहिण्याची पराकाष्ठा जाहली, आतां उत्तर मोघम येऊं नये. याप्रमाणें राजश्री पाटीलबावा बोलले व आम्हा उभयतांस सांगितलें जे तुम्हींच पत्रें तपसीलवार लिहून पाठवणें. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. अतःपर जी गोष्ट करणें तिचें उत्तर मनन करून सत्वर ल्याहावयास आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia, through Nana's agent, asks him to ratify the treaty negotiated between him and Anderson; or if the treaty was distasteful to him, to prepare for renewal of hostilities.*

No. 210 8th October 1782.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी इंग्रजांचा वकील मेस्तर जानसेन बराबर वीस हात्ती व तीस पालखीनिसीन याप्रमाणें घेऊन नवाबाकडे येत आहे. त्यास नवाब सरकारचे पेटचांत, असें इंग्रजाचे तहांत असतां, परभारें यावयाचें कारण काय? याचा इतल्ला इंग्रजांकडून राजश्री पाटीलबावांस आहे किंवा नाहीं? असता तर लिहिते म्हणून पूर्वी तुम्हांस लिहिलेंच आहे. हालीं वकील भागानगरास आला. नवाबही निरोप घेऊन गेले. भागानगरीं गेल्यावर त्यांची भेट होऊन बोलणें काय होईल पाहावें. नवाब सरकारचे पेटचांत, त्यापक्षीं परभारें वकील यावयाचें कारण

काय, याचा शोध करून लिहून पाठवावें; म्हणून राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास, इंग्रजांकडे नवाबाचा मुलूक इजारा आहे. त्याचे जाबसालाकरितां इंग्रजांनीं जानसेन यांसीं नवाबाकडे पाठविलें आहे. तत्रापि परभारें कोण्ही नवाबाकडे तुमचा न पाठवावा, गेला असेल तो बोलावून घ्यावा, नवाबाकडील जाबसाल असेल तो आमचे विद्यमानें व्हावा, येविसीं राजश्री सदाशिव मल्हार यांसी सूचना लिहिली आहे. मशारनिले इंग्रजांसीं याअन्वयें जाबसाल करीत आहेत. उत्तर येईल तें लिहिलें जाईल. रा छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji in reply to Nana's query writes that the visit of Johnson to Hyderabad had no political import but was directed purely to settle some financial transactions.*

No. 211 8th October 1782.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. भूपाळच्या राजकारणाचा मजकर पेशजीं लिहून पाठविला आहे, त्याचें उत्तर कांहींच लिहून आलें नाहीं, तरी पाटीलबावांस पुसून या कलमाचें उत्तर लिहून पाठवावें. हासील कलमाचें उत्तर लिहीत नाहींत. पाल्हेरें द्यावयाचीं पत्रें. मजकूर बहुत चांगला लिहितां व राजपुरी जंजिरा श्यामलाचा तो सरकारांत घेतल्यास व त्यासंबंधीं राजकारण सरकारांत आल्यास त्याची पासदारी इंग्रजांनीं राखूं नये व मदत करूं नये, याप्रमाणें तुम्हीं पाटीलबावांशीं बोलावें. पाटीलबावांनीं इंग्रजांशीं बोलून करून घ्यावें. परस्परें दुष्मनाची कुमक करूं नये, असें कलम तहांत आलें असें म्हणतील, तर हेंच बळकट पाहिजे, म्हणजे जालें. म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास भूपाळचे राजकारणाचीं सूत्रें आलीं आहेत व आणखीही लाविलीं आहेत. या प्रांतीं आल्यापासून इंग्रजांशीं मसलत पडली, तेव्हां सर्व लहान मोठे संस्थानिक यांसी लावून ठेवणें प्राप्त होतें. इंग्रजांची मसलत जाहल्यानंतर ग्वालेर, गोहद घेऊन जाटाचें पारपत्य जरूर करणें पडलें. तेंही श्रीमंतांचे प्रतापें जाहलें. स्वारी फिरतेसमईं भूपालचीं राजकारणें आहेत, तीं पक्कीं करून लिहिलें जाईल. राजपुरी जंजिरा शामलाचा, तो सरकारांत घेतला;

व त्याचें राजकारण आल्यास इंग्रजांनीं हिमायत* पासदारी न करावी येविशीं लिहिलें, त्यास परस्परें दुष्मनाची कुमक करूं नये, हें कलम इंग्रजांचे तहनाम्यांत आहेच. इंग्रजांचेही तहनाम्यांत लेहून दिल्हें, तेंच करार म्हणोन बोलणें आहे. रवाना छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji, in this letter to Nana, expresses his opinion of there being no necessity to add a special article in the treaty regarding the conquest of Janjira by the Poona Government.*

No. 212 27th October 1782.

पैवस्ती चंद्र २६ जिल्हेज सलास समानीन.
कार्तिक मास.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १९ जिल्काद मुक्काम शहर बऱ्हाणपूर, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज्ञा घेऊन पुण्याहून निघालों ते दिवशीं वाघोलीस मुक्काम केला. रात्रीस पाऊस आला. दुसरे दिवशीं कोरेगांवास आलों तों भिमेस नाव चालूं लागली सबब उतरावयास विलंब जाला. तेथेंच राहिलों. रात्रीस तेथेंही पर्जन्यवृष्टि मातबर जाली, म्हणून रांजणगांवावर गेलों. तेथें दोन रोज खोळंबलों. पुढें दरमजल दिवसां वाट चालतां व रात्रीं पर्जन्यवृष्टि होत गेल्यामुळें आश्विन शुद्ध ७ चे दिवशीं मोजे वारीस पावलों. तों राजश्री रामजी पाटील आपले घरीं मोजे पानवडीस होते. त्यांस निघावयाची निकड होती व राजश्री रायाजी पाटील यांनीं निकड फार केली. परंतु दोन रोज दसरा व नवचंडींत घरीहून निघूं नये या अर्थीं दसरा घरीं करून, बुधवारीं निघून गुरुवारीं वारीस आले. शुक्रवारीं त्यांनीं व मी समागमें निघून बारा कोसांच्या मजली करीत काल येथें पोंहचलों. आजचा दिवस येथें मुक्काम आहे. उदईक येथून निघून दरमजल पुढें जाऊं. शरीरप्रकृतीचा अर्थ स्वामींस विदित आहे. स्वामींचे कृपेंकरून येथवर आलों. पुढें निर्वाह करणार कृपा आपली समर्थ आहे. राजश्री विश्वासराव रामचंद्र सेवेसीं आले आहेत. ते माझे कामास अंतर करणार नाहींत. राजश्री सदाशिवबावा देव आळस करितील, यास्तव त्यांस आज्ञा होऊन, मोजे

---

*मदत व तरफदारी.

जिगांव परगणे जळगांव येथील मोकदमावर माझे कर्जाकरितां सरकारचा रोखा मसाला व जासूद गेले आहेत. तें काम शेवटास जाऊन सेवकाचें कर्ज उगवे तें करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana Fadnis about the delay in his journey from Poona to Sindia's camp.*

No. 213 29th October 1782.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २१ जिल्कादपावेतों मुक्काम मेटोली नजीक ग्वालेर येथील लष्करांत स्वामींचे कृपावलोकनेंकरून समस्त सुखरूप असों. विशेष. स्वामींनीं चंद्र १ रमजानचें पत्र सेवकास पाठविलें त्यांत लिहिलें जे, चंद्र २९ जमादिलावलचें पत्र एक व चंद्र ३ रजब, चंद्र १५ रजब व चंद्र २० रजब ऐसीं पत्रें चार पाठविलीं तीं पावलीं म्हणून सेवकास लिहिलें, त्याजवरून परम आनंद जाला. मध्यें बहुत दिवस पत्र येऊन परामर्ष होत नव्हता याजमुळें चित्त स्वस्थ नव्हतें, आणि पत्रें पावतात कीं नाहीं हाही संशय होता. याजकरितां हल्लींच्या पत्रावरून निःसंशय जाला. स्वामींनीं पत्र पाठविलें त्यांत आज्ञा केली जे, इंग्रजांसीं तह करणें हें काम लहान नाहीं. तोडजोडीचें बोलणें बोलून त्याप्रमाणें निभावणींत आलें पाहिजे. कित्येक जाबसाल पत्रीं कोठवर लिहावे? याकरितां राजश्री रामजी पाटील व सदाशिव दिनकर यांसीं सविस्तर बोलून राजश्री पाटिलबावांकडे लवकरच रवानगी करितों. येऊन पोंहचल्यावर सविस्तर राजश्री पाटिलबावांसीं बोलतील. तदोत्तर सरकार काम व पाटिलबावांचा नक्ष ऐसें असेल तेंच करितील. सविस्तर नारो शिवदेव यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. म्हणून पत्रीं लिहिलें त्याजवरून व मशारनिल्हेच्या पत्रीं मजकूर तपशीलवार लिहिले होते ते पाहोन सर्व कळों आलें. हल्लीं आश्विन शुद्ध सप्तमीस राजश्री नारोपंत येऊन दाखल जाहले. त्यानंतर चार पांच बैठका खलबताच्या जाहल्या. त्यांत राजश्री पाटिलबावांचें व मशारनिल्हेचें बोलणें अनेक प्रकारचें इंग्रज प्रकर्णीं जाहलें. त्यांतील मुख्य भाव इंद्रसेनाचे बोलण्यांतील निघाला कीं, जो तहनामा पेशजीं तुमचा वचनाचा जाला तो बजिन्नस तुम्ही पुण्यास पाठविला; व आम्ही कलकत्त्यास

तहनामा पाठविला तो कौंसलदारांनीं पाहून त्याजवर कोंपनीची मोहर करून मजकडे पाठविला आहे. तुम्हांकडील मात्र गुंता आहे असें इंद्रसेनाचे बोलण्यांत पक्केपण आलें. तेव्हां अतःपर सरकारमर्जीप्रमाणें तहाचा जाबसाल कांहीं घडावा असा कांहीं रंग दिसत नाहीं. तत्रापि नारोपंत येथें आल्यानंतर दादासाहेब इंग्रजांनीं सोडून द्यावा येविषयींचें व हैदरखान मजकुराचें वगैरे आणखी कलमें स्वामींनीं लिहिलीं आहेत, त्यांचीं उत्तरें जाहलीं. त्याचे जाबसाल तपशीलवार सेवेसीं वकिलांनीं लिहिले आहेत, त्याजवरून ध्यानास येतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports about the English being not prepared to accede to the additional terms proposed by the Poona Court.*

No. 214 October 1782

श्री

छ सेवेसीं विज्ञापना. इंग्रजांकडील तहनामा राजश्री नारो शिवदेव आल्यानंतर पेशजीच्या तहनाम्यांत कलमें कांपेश आहेत तीं नीट करण्याविसीं व आणखी कलमें नऊ स्वामींकडून लिहिलीं आलीं, त्यांचे एकंदर जाबसाल राजश्री पाटीलबावांसीं बोलून, इंद्रसेनासीं सदाशिव मल्हार यांनीं बोलून, त्यांतील जाबसाल होत नाहींत किंवा होतात त्याचा बितपशील कलमवार :—

साष्टीचें कलम होत नाहीं हें बोलणें निश्चयांत आलें. कलम. १

.....च्या मुलखांतील इंद्रसेना.....वसूल घेतला असेल तो माघारा द्यावा म्हणोन लिहिलें होतें तें घडत नाहीं. कलम. १

हैदरखान दहा लक्ष रुपयांचा मुलूख द्यावयाचें कलम लिहिलें होतें, तें घडत नाहीं. कलम. १

चंदावरचें कलम घडत नाहीं. याप्रमाणें बोलण्यांत आलें. कलम. १

सरकारांतून तह इंग्रजांसीं जाहाला याप्रमाणें हैदरखानानें ऐकिल्यास उत्तम. न ऐकिल्यास त्याचें पारिपत्य वर लिहिल्याअन्वयें करावें. कलम. १

वरकड कलमें, श्रीमंत कैलासवासी यांच्या वेळेस तहनामे जाहाले त्याप्रमाणें दुतर्फा चालावें म्हणोन लिहून द्यावयाविसीं लिहिलें. त्यास, पहिले कलमबंदींत सुदामतप्रमाणें लिहून घेतलेंच आहे. कलम. १

महमदअल्लीच्या मुलखाची चौथ सरकारची आहे त्याप्रमाणें त्यानें द्यावी, म्हणोन कलमबंदींत लिहून घ्यावें म्हणोन आज्ञा. त्यास, तें घडत नाहीं. कलम. १

पूर्तकलाची कोठी राहील. दुसरे टोपीकरांसीं स्नेह करूं नये ऐसें स्पष्ट आहे. याखेरीज होत नाहीं. कलम. १

गायकवाडाचें कलम लिहिलें कीं, सुदामतप्रमाणें चालत आलें असे त्याजप्रमाणें गायकवाडांनीं वर्तावें, म्हणोन कलमबंदींत होतें. त्यास, गायकवाडाचा जाबसाल इंग्रजांनीं निखालस कलमबंदींत लिहोन दिला आहे. हल्लीं विशेष कांहीं ल्याहावयाचें नाहीं. कलम. १

हैदरखानाकडील मुलखाचा जाबसाल तरी, सरकार व इंग्रज हे उभयतां मिळोन त्यांजकडील मुलूख सोडवावा. त्यांत सरकारचा सरकारांत येईल. महमदअल्लीचा व इंग्रजांचा ते घेतील. राहिला हैदरखानाचा, त्यापैकीं सुटेल तो उभयतांनीं वांटून घ्यावा. कलम. १

भोसले यांकडील बंगाल्याची चौथ व कटकचा जाबसाल आहे, त्यास त्यांची आमची वहिवाट चालत आहे. त्याचें कलम तहनाम्यांत ल्याहावयाचें प्रयोजन नाहीं. कलम. १

नवाबाचे मक्त्याचा जाबसाल आम्हांकडे आहे. त्याप्रमाणें त्याची आमची वहिवाट चाललीच आहे. मक्त्याचा प्रकार आम्हांस पुरविला तरी ठेऊं, न पुरविल्यास सोडून देऊं. हा जाबसाल त्यांचा व आमचा मामलतीचा आहे. याकरितां सरकारांत, तुमच्या आमच्या तहनाम्यांत ल्याहावयाचें प्रयोजन नाहीं ऐसें इंग्रज म्हणतात. याप्रमाणें स्पष्ट उत्तर जाहालें. कलम. १

काशीच्या राजाची तोड निघेल तैसी पाडून कलम ल्याहावें म्हणोन लिहिलें. त्यास, प्रथम इंद्रसेन येथें आला, ते समयींच त्यानें बोलणें लाविलें कीं, काशीच्या राजास तुम्हीं लष्करांतून काढून द्यावा म्हणजे आम्ही भेटीस येऊं. त्यावरून येथून इंद्रसेनास सांगोन पाठविलें कीं तुम्हांस येणें तरी यावें, नाहीं तरी न यावें. परंतु जो कोणी आम्हांपासीं आला त्यास आम्हीं काढून कसा देऊं? आणि ऐसी रीत कोठें नाहीं. त्यावर इंद्रसेन येऊन भेटल्यानंतर बोलणें याविसीचें जाहलें कीं, तुमची आमची दोस्तीच जाहाली, तरी मग दोस्तीच्या पोटीं तुमच्या आमच्या विचारेंकरून घडेल तसें करावयास येईल. कदाचित् तुमचा आमचा तह न जाहाला, तरी आमचा आम्हांपासीं आहे तसा आहे. कलम. १

मुंबईकरांचें पत्र शिक्यानिसीं आणून द्यावें. याप्रमाणें इंद्रसेनासीं बोलोन पत्र आणून देऊं याप्रमाणें बोलण्यांत आलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे दस्त-ऐवजी कागदपत्र इंग्रजांजवळ आहेत व मुलुखाची वांटणी सोळा आण्यांपैकीं व आणखीं कागदपत्र आहेत ते इंग्रजांनीं द्यावे. त्याचें उत्तर जाहालें कीं, पहिला तहनामा इंद्रसेनाचे विद्यमानें जाहला. त्यांत कलम लिहिलें आहे कीं, दस्त-ऐवजीं कागदपत्र जे असतील ते पेशजीचे व हल्लींचे ते रद्द असत म्हणोन लिहोन घेतलेंच आहे व हल्लींही बोलून कलमाचा फडशा करून घेऊं म्हणोन बोलण्यांत आहे. कलम. १

जाहजाच्या आमदरफ्तीचे कामांत साबक दस्तुर चालत असेल त्याजप्रमाणें करून घ्यावयाचें आहे तें करून घेऊं. याप्रमाणें बोलण्यांत आलें. कलम. १

सरकारचे किल्लेकोट जकेरासुद्धां* घ्यावयाचें बोलणें होईल तेथवर करून घ्यावें म्हणोन लिहिलें. त्यास जेथवर होईल तेथपर्यंत करून घेऊं. याप्रमाणें करारांत आलें. कलम. १

श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या जाबसालाविसीं इंद्रसेनाचें बोलणें कीं, दादासाहेबांस आम्ही तुमच्या स्वाधीन करूं यांत लौकिक चांगला दिसत नाहीं. त्यास तुमचा व आमचा तह जाहला म्हणजे तुम्ही आपल्याकडील मातबर माणूस दादासाहेबांकडे समजुतीस पाठवावा, म्हणजे आम्ही त्यांस निक्षून सांगोन तुमच्या हस्तगत होय ऐसें करूं. याजपेक्षां जाजती लिहिण्यांत जाबसाल येत नाहीं. याचा वाद बहुत जाहाला. परंतु इंद्रसेनानें उत्तर केलें कीं, याजखेरीज दुसरा पर्याय घडणार नाहीं. म्हणोन राजश्री पाटीलबावांच्या बोलण्यांत आलें. कलम. १

हैदरखानाच्या पारपत्यास नवाब सामील न जाहाले आणि हैदरखानास सामील जाहाले, तरी उभयतांचे पारपत्यास सामील होतील. परंतु सामील जाहाल्यानंतर नवाबाच्या मुलखाचीही वांटणी इंग्रजांस द्यावी लागेल. याप्रमाणें इंद्रसेनाचें बोलणें आहे म्हणोन राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें. कलम. १

श्रीमंत पातशाही सेवक, याकरितां पातशाही मुकदम्यांत कोणी खलेल करील अथवा वाईट करील, त्याचें पारपत्य सरकार व इंग्रज मिळोन करावें. याप्रमाणें कलम लिहिलें असतां उपयोगी पडोन.....परभारा पातशाहासीं राज-

*सामुग्री.

कारण करूं पावणार नाहीं व आपला कदम सर्व पातशाहींत राहातो म्हणोन कलम लिहिलें. त्यास पातशाहीपैकीं एक सुजातदौला याचा लेक मीर्जा अमानी मात्र त्यांनीं आपले पेटचांत समजोन त्याविसींचें मात्र तहनाम्यांत कलम लिहोन घेतलें असतां, आपण सगळ्या पातशाही मोकदम्यांत त्यास परिक करावें येणें-करून ते वाटेदार ऐसें होतें. यास्तव लिहोन घेणें युक्त नाहीं. पातशाही मोकदम्यांत कोणी वाईट करील त्याचें पारिपत्य सरकारच्याच चित्तास येईल तसें घडेल. इंग्रजांस यांत सामील करून घेणें ही गोष्ट ठीक नाहीं. कलम. १

याखरीज आणखी जाबसाल तपशीलवार राजश्री नारो शिवदेव यांनीं लिहिले आहेत, त्याजवरून विदित होईल. शेवटीं, निदान पक्ष जाबसाल राजश्री पाटीलबावांनीं केला कीं, हल्लीं कलमें लिहिलीं आहेत याप्रमाणें जाहालीं तरी व दादासाहेब आपल्या हातीं आला म्हणजे तहनामा इंद्रसेनापासीं देऊं; नाहीं तरी उगाच देणार नाहीं. म्हणोन निक्षून भाषण जाहालें. कलम. १

सदरहू जाबसालापैकीं जें करून द्यावयाचें लिहिलें आहे.....आधीं पूर्वी कलमबंदीची याद करार जाहाली.....तो तहनामा शिक्यानिसीं सरकारांतून आल्याशिवाय घडत नाहीं. बोलण्यांत मात्र आले आहेत. परंतु सारा मुद्दा इंद्रसेनाचा बोलण्याचा कीं, आधीं तहनामा पेशजीं पारशी येथून पाठविला आहे, त्याप्रमाणें यावा. आमचा कलकत्त्याहून त्या बरहुकूम आला त्याप्रमाणें तुमचाही तहनामा यावा. उपरांतिक हीं कलमें करून द्यावयाचीं त्याचा ठराव तुमचा आमचा होऊन, त्याप्रमाणें कंपनीच्या मोहोरेनिसीं कलकत्त्याहून दुसरा कागद आणवून देऊं. मग तुम्हांकडील तहनामा घेऊं. परंतु आम्ही तहनामा पाहिल्याखेरीज मला भरंवसा पुरत नाहीं. यास्तव कलमबंदीच्या यादीप्रमाणें तहनामा शिक्यानिसीं पाठवावा, म्हणजे आपले जाबसाल लिहिल्याअन्वयें करून घेऊं. मग तहनामा द्यावयास येईल. याजप्रमाणें राजश्री पाटीलबावांचे बोलण्यांत ठरलें आहे. सेवेसीं पत्रें लिहिलीं आहेत. याचीं उत्तरें लिहावयास आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana learns from his agent Appaji Ram of the English not being prepared to accede to the additional articles suggested by him.*

The student's attention is invited to numerous letters on the treaty of Salbye printed in Kavyetihas-sangraha Patre-Yadi for the years 1781-1783.

No. 215 5th November 1782.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे:—आश्विन वद्य ३० मंगळवारीं महेश्वरास पावलों. ते दिवशीं संध्याकाळ जाला. दुसरे दिवशीं अन्नकूट समारंभ त्यांचे घरीं जाला. त्यांत सगळा दिवस गेला. द्वितीयेचे दिवशीं मातुश्री अहल्याबाईंची भेटी जाली. ोलण्याचा प्रसंग जाला. राजश्री रामजी पाटील खडखडीत बोलणें बरेंच बोलले कीं, आज खावंदांचे दौलतेचा प्रकार आपले ध्यानांत असतां, आपणास काळजी दिसत नाहीं. राजश्री तुकोजीबावांचा प्रकार केवल अडचणीचा जाला. जेथें घोड्यास चंदी नाहीं, तेथें चाकरी कशी घडते? मसलत नित्य नवी बाज खाते. तोडियाला कोडियाने तयार असिलें पाहिजे. याची सरबराई आपणाकडून होत नाहीं! यावरून काय समजावें? आपले येथें जो खर्चाचा मार्ग चालतो तो चालतच आहे. त्यांत कमी होत नाहीं. सरकारचाकरींत मात्र कमती पडतें. याचा विचार करून, आपले खर्चांत अडचण सोसून, तुकोजीबावांची मदत होऊन, सरकार चाकरी घडे असें होणें चांगलें. याचीं उत्तरें बाईंनीं केलीं कीं, माझा खर्च दानधर्म आदिकरून होतो. तो किती होतो हें तुम्हांस ठाऊकच नाहीं. माझें मी जाणें! तुम्हांस भ्रम असेल कीं, सरंजामापैकीं खर्च होतो, तर सरंजामाचा हिशेब पाहणें. स्वदेश तुकोबांनीं आटोपलाच आहे. माळवा राहिला, त्याचा रुपया झाडून ते घेतात. आजपावेतों त्यांजकडे रुपया किती पावला, तो काय जाला, फौज किती ठेवितात, खावंदाची चाकरी कशी करितात, हें मजला सर्व ठाऊक आहे. राजश्री बाबूराव वैद्य येथून रवाना केले; त्यांजबरोबर माळव्याचा हिशेब पाठविला. त्यांत ऐवज तुकबाकडे किती पडतो, आम्हांकडे किती पडतो, असें स्पष्ट लेहून पाठविलें. त्याजवर दोन वेळ आणखी हिशेब पाठविले. ते सरकारांत पाहिले असतां, त्यांस म्हणत नाहींत, कीं तुम्हांस चंदीची अडचण कां पडली? ते म्हणतात तसें ऐकून आम्हांस सांगून पाठवितात. पत्रें पाठवितात. परनिष्ठपणें त्यांस आम्हांस सांगत नाहींत. अशी भवति न भवति फार जाली. असेही वर्ण निघाले कीं, तुकोजीबावा सरदार, भिन्न वांटेकरी होत असें नाहीं. माझीच सरदारी. तेही मीच रूपास आणिले. त्यांचें विरुद्ध मजला कां असावें? त्यांस माझे ठायीं विरुद्ध नसावें. एक विचारें असते तर, मजला त्यांजवाचून आप्त काय होते? संग्रह ज्याचा करावा, तो उपयोगी पडावा. दौलत निष्कपट

चालावी हें मुख्य तात्पर्य. त्यास दौलत कशी, खावंदांची चाकरी कशी करावी हें ज्यांचे गांवीं नाहीं त्यांचें कर्तृत्व काय वर्णावें? सरदारी खुद यखत्यारी करावयाची इच्छा मात्र बाळगतात. करावी कशी ही वाटच ठाऊक नाहीं. मजसीं स्पर्धा चालवावी, माझी नेमणूक करावी. माझा बंदोबस्त केला म्हणजे कृतकृत्य जालें. राजेरजवाडे यांस पत्रें पाठविलीं कीं, पैसा बाईकडे न देणें. रांगडे लोक मात्रागमनी. इतक्या पत्राचे आसऱ्यानें फिरून गोष्ट सांगतात! आम्हांस म्हणतात, तुकोबांकडे रुपया दिल्हा; त्यांस म्हणतात बाईकडे ऐवज दिल्हा; असा लपंडाव खेळतात. बत्ता कोणाचा बुडतो हें ज्यांचे समजांत येत नाहीं त्यांनीं करावें काय? मजसीं वाद काढून, सरकारचे जासूद कारकून पत्रें आम्हांस महालास पाठविलीं कीं, रुा महेश्वरीं न देणें. तर हाही मुलूख रांगडा, हरामजादा, आमल आश्रा सांपडला म्हणजे फेरपगडीस तयार. हीं पत्रें चालते गाडचास खीळ घालावी तसा विचार होतो! दैव माझें असेंच ओढवलें कीं, पाऱ्हेरे देत जावें. प्राप्त जाल्यास उपाय काय? नेमणूक करून घ्या म्हणतात. येवढी गोष्ट अनकूल पडणार नाहीं. येऱ्हवीं सर्व त्यांचेंच आहे. तुम्ही राजश्री पाटिलबावांकडे जातच आहां त्यांचे विचारें करणें तें करावें (अपूर्ण).

¶*Sadashiv Dinkar reports his interview with Ahalyabai in which the lady stoutly opposed the demand of Tukoji Holkar for a full control of the saranjam and declined making concessions.*

No. 216 6th November 1782.

पैवस्ती चंद्र १९ जिल्हेज सलास समानीन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र २९ जिल्कादपावेतों मुक्काम बिल्हारीची गढी, नजीक गोहोद, येथें लष्करांत समस्त सुखरूप असों. विशेष. स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, याजकरितां चित्तास स्वस्थता वाटत नाहीं. तरी ऐसें नसावें. निरंतर सेवकावर कृपा करून पत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान, राजश्री नारो शिवदेव येथें येऊन पाऊण महिना जाहाला. आल्यानंतर राजश्री पाटीलबावांसी बोलणीं इंग्रजप्रकरणीं बहुत जाहालीं. पेशजीं

येथून इंद्रसेनासीं सलुखाचे जाबसाल ठरोन, कलमबंदी तहनामा करून, राजश्री पाटीलबावांनीं एक याद रामजी पाटील यांजकडे पाठविली, व एक नक्कल करून राजश्री पांडुरंग रघुनाथ यांजपासीं दिली, ती मशारनिल्हेनीं स्वामींकडे रवाना केली. त्याचीं उत्तरेंही समर्पक आलीं. त्याजवरूनच येथल्या करण्याची खातरजमा जाहाली; व हल्लीं मशारनिल्हे आले यांचींही बोलणी समक्ष बहुत जाहालीं. परंतु त्यांत एकच निश्चय ठरला जे, तुम्ही आलां, तुमच्या मतलबाचीं कलमें काय असतील लिहून द्यावीं; त्याप्रमाणें इंद्रसेनासीं बोलन त्यांजपैकीं जीं होतील तीं करून देऊं. जीं कलमें न होत, त्यांचीं उत्तरें तशींच सांगों. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांचें बोलणें जाहालें. पेशजीं जो तहनामा आमच्या विद्यमानें होऊन पुण्यास श्रीमंतांकडे पाठविला आहे, त्याजप्रमाणें तहनामा शिक्यानिसीं हुजुरून यावा; म्हणजे हल्लींचीं कलमें जीं तुमच्या बोलण्यांत आहेत, त्यांचा आलाहिदा तहनामा दुसरा करून इंद्रसेनासीं बोलून, कलकत्त्याहून कंपनीच्या मोहरेनिसीं करून आणून तुमच्या हवालीं करूं. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें व इंद्रसेनासीं बोलणें जाहालें. पेशजीच्या तहनाम्याखेरीज हीं बोलणीं घडत नाहींत, व तहनामाही करून देत नाहीं, याप्रमाणें इंग्रजांच्या वकिलाचें बोलणें जाहालें. त्याजवरून पेशजीं दोन रवानग्या स्वामींकडे तहनाम्याच्या व जीं कलमें तहनाम्यांत कमपेश होतीं तीं राजश्री पाटीलबावांसीं बोलोन, पक्केपणांत आणून घडतात कलमें कोणतीं, किंवा घडत नाहीं कोणतीं, याचा तपशील पेशजीं लिहिला आहे त्याजवरून श्रुत होईल. मुख्य गोष्ट यांतील हीच कीं, जे समयीं तहनामा पहिल्यानें इंद्रसेनासीं राजश्री पाटीलबावांनीं केला, त्या करण्यांत सर्व मुत्सद्दी श्रीमंतांच्या घरची आपल्या आंगीं ऐसें जाणोन तह केला. परंतु त्यांतील गुणदोष मनांत आणून या गोष्टी केल्या असत्या, तरी इतका विचार कांहींच नव्हता व सरकार कामही यथास्थित होतें. परंतु त्या गोष्टी प्रथमच गेल्या. त्यापक्षीं तहच करणें तेव्हां राजश्री पाटीलबावा सांगतील त्याप्रमाणें कबूल करणें प्राप्तच आहे. याचे तपशील वारंवार सेवेसीं आम्हीं लिहीत गेलोंच होतों. हल्लीं कांहीं नवीन प्रकार ल्याहावा असा अर्थ नाहीं. इंद्रसेनास इष्टिनाचें पत्र आलें कीं, तुम्हीं आज वरीसभर राजश्री पाटीलबावांपासीं जाऊन बसलां आहां; अद्याप सलुखाचा जाबसाल कांहींच घडोन येत नाहीं. तरी ही गोष्ट ठीक नाहीं. सलूख होत असिला तरी उत्तम; नाहीं तरी तुम्ही निरोप घेऊन उठोन यावें. कदाचित् निरोप द्यावयास अनमान करूं लागले,

तर जसें कळेल त्या रीतीनें निघोन यावें. अतःपर तेथें तुम्हीं राहोन पुणेंयांत परस्परें राजकारणें श्रीमंत पेशवे हैदरखानासीं व फरासिसांसीं करितात. ह्या बातम्या आमच्या सुरत मुंबईहून वरचीवर येतात. ऐसें असतां तुम्हीं लिहितां कीं, राजश्री महादजी शिंदे हेच श्रीमंतांच्या दौलतीचे मुक्त्यार आहेत. हे करितील तेंच परिणामास जाईल. असें वारंवार लिहितां. याप्रमाणें स्पष्ट लिहिलें आलें. तेंच पत्र बजिन्नस इंद्रसेनानें सदाशिव मल्हार यांजला दाखविलें. त्याजवरून त्यांची जावयाची निकड फार आहे; आणि बोलण्यांत भाव दाखविला जे, ज्या पक्षीं राजश्री पाटीलबावांस.....सलूख करणें तरी सत्वर करावा. नाहीं तरी आम्हांस निरोप द्यावा. पेशजीं तहनामा आमच्या विद्यमानें जाहाला, त्याची नक्कल आम्हीं कलकत्त्यास पाठवून पक्की कलमबंदी करून कंपनीच्या मोहरेनिसीं आपणासीं आणून ठेविली आहे. याजप्रमाणें तुम्हांकडील तहनामा श्रीमंतांच्या शिक्याचा येथें यावा, म्हणजे हल्लीं जीं कलमें कमपेश लिहोन दिलीं आहेत, त्याप्रमाणें दुसरा तहनामा कंपनीच्या मोहोरेनिसीं करून आणून देऊं. ज्याप्रमाणें करार केले आहेत त्याजप्रमाणें निभाऊन देऊं. ऐसें इंद्रसेनाच्या बोलण्यांत पक्केपणा आहे. खासा इष्टिन कलकत्त्याहून काशीस यावयाकरितां निघोन दाहा पंधरा मजली खुष्कीच्या वाटेनें येत आहे. बराबर दोन कंपू आहेत. वरकड जंगी सामान बराबर बहुत आहे. हें वर्तमान इंद्रसेनाचें लिहिलें आलें व काशीच्या राजाचेंही लिहिलें आलें. मग पुढें काय घडेल तें पाहावें. यास्तव राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें कीं, या मजकुराच्या रवानग्या दोन तीन सत्वर कराव्या. त्याजवरून तपशीलवार वर्तमान सेवेसीं राजश्री नारो शिवदेव यांनीं व आम्हीं लिहिलें आहे. त्याजवरून श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports his discussions with Mahadji over the terms of the treaty lately concluded. He informs Nana that Anderson pressed for an immediate ratification of the treaty and reserved the new articles brought forward for a fresh engagement.*

No. 217 November 1782.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावांचीं पत्रें स्वामींस आलीं तीं राजश्री रामजी पाटील व मजला दाखवून आज्ञा जाली जे, बावांनीं लिहून पाठविलें कीं

पाा इंदूर, खरगोण, देपाळपूर व मल्हारगड हे चार महाल मात्र बाईकडे. वरकड झाडून माळव्यांत कमाविसदार राजश्री तुकोजी बावांचे आहेत. त्यांजपासून पैका तुकोबांनीं घ्यावा. बाईकडे चार महाल त्यांपैकीं खर्चाची नेमणूक वजा करून, बाकी रुपया तुकोजीबावांकडे बाई देतील असें लिहिलें आहे. तर हाच सिद्धांत बावांनीं करून होळकरांकडील कारभार उरकावा. त्या पत्रांच्या नकलाही घ्यावयास आज्ञा जाली. तीच वंदून निघून आलों. महेश्वरीं आल्यावर बावांचीं पत्रें बाईस व स्वामींस आलीं व राजश्री नारो शिवदेव यांजकडून बावांनीं पत्र लिहविलें, तीं पत्रें पाहिलीं. त्यांत चौमहालांचा मजकूरच नाहीं. दरोबस्त डौलाचोच भानगड आहे. तीं पत्रेंही महेश्वरींहून सेवेसीं आलीं असतील अगर येतील. त्यांतील अर्थ ध्यानांत यावेसे आहेत. आम्हां उभयतांस आज्ञा जाल्याप्रमाणें चौमहालांचा मजकूर बोलण्यांत येईल. हीं पत्रें पाहिल्यावरून ध्यान दुसरेंच आढळलें. तेथें गेल्यानंतर होईल वर्तमान विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter again refers to the dispute between Ahalyabai and Tukoji Holkar.*

No. 218 14th December 1782.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २४ जिल्हेज मुक्काम कसबे सिपरी प्रांत नरवर स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—ताजपूर व तराणे नजीक शाहजापूर येथील मुक्कामींहून विनंती पत्रें डांकेंत रवाना केलीं, तीं प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जालें असेल. तराण्याहून दरमजल इकडील नव कोस दाहा कोस म्हणजे सरासरी देशचे दिढा कोसाचा कोस होतो,—याप्रमाणें मजली करीत चंद्र १७ माहे मिनहूचे रोजीं राजश्री रामजी पाटील व मी कोलारसाचा मुक्काम केला. ते दिवशीं राजश्री पाटिलबावांचीं पत्रें आम्हां उभयतांस निरनिराळीं पत्रें माहे मिनहूचीं कासदाबरोबर आलीं. मी तर पुढें मुक्कामास आलों होतों. रामजी पाटील मागाहून येत असतां मार्गी बुढा डोंगराजवळ यांस दोन पत्रें दिल्हीं. तीं पाटिलांनीं पाहून मजकूर ध्यानास आणिला. तों लिहिलें आहे जे, तहास फार दिवस लागले म्हणून इंद्रसेन इंग्रज निरोपाची जलदी करूं लागला. त्यासीं बोलण्यांत आलें जें, रामजी पाटील व सदाशिव दिनकर येतात, त्यांजबरोबर

सरकारचा तहनामा शिक्यानिसीं आहे ते घेऊन येतात. इंद्रसेनासीं तहाचा करार होऊन, आमचीं व राजश्री नारो शिवदेव यांचीं पत्रें पुण्यास गेलीं आहेत, त्याप्रमाणें तह कौलनामा सरकारचा शिक्यानिसीं तुम्हांबरोबर असल्यास तुमचें येणें लष्करांत ठीकच आहे. तहनामा सरकारचा तुम्हांजवळ नसल्यास तुमचें येणें लष्करांत ठीक नाहीं. बऱ्हाणपूर उज्जैन अगर जेथें पत्रें पावतील तेथेंच मुक्काम करून राहणें; आणि पुण्यास लेहून पाठवून तहनामा सरकारचा शिक्यानिसीं आणवून मग लष्करांत येणें. तहनाम्याखेरीज तुम्ही उभयतां लष्करांत आलेत तर तहनामा नाहीं असें कळल्यावर इंद्रसेन उठोन जाईल. आमच्या रवानग्या पुण्यास तीन चार जाल्या आहेत. तुम्हींही पुण्यास लेहून पाठवून तहनामा सरकारचा आणवून मग येणें. लिहिलेप्रमाणें पत्रें आल्याखेरीज इकडे न येणें. पत्रें पावतील तेथेंच मुक्काम करून राहाणें. हीं पत्रें पाहून पाटिलांनींच सेवेसीं विनंतीपत्रें लेहून व बावांचे पत्राची नक्कल लाखोटयांत घालून, लाखोटा उज्जनीस नारो हरि सरकारचा कारकून डांकेचा आहे त्याजकडे रवाना केलें. नारो हरीस लेहून पाठविलें कीं, पत्रें जलद सरकारांत पावलीं पाहिजेत. हीं पत्रें उज्जनीस रवाना करून रामजी पाटील कोलारसीं मुक्कामास येऊन पत्रें सेवकांस दाखविलीं, न येणें. सरकारचा तहनामा तुम्हांजवळ नाहींसें कळल्यावर इंद्रसेन उठोन जाईल, असें दरडाऊन लिहिलें असतां, तेथेंच मुक्काम करून राहाणें प्राप्त जालें. राहिलों. बावांस उत्तर लेहून पाठविलें जे, पूर्वी आपण इंग्रजांचे तहनाम्याची नक्कल सरकारांत पाठविली होती. त्यांत कलमें निरनिराळीं होतीं. त्यांत कमजास्त अर्थ पडले होते. याजकरितां श्रीमंतांनीं दोन यादी तयार केल्या. एक यादी इंग्रजांचे तहनाम्याची कलमबंदीचा झाडा करून त्यांत सरकार अन्वयास प्रतिकूळ तें गाळावें व अनुकूळ तें लेहून द्यावें अशी एक. दुसरी यादी जास्त कलमें लेहून घ्यावयाची. या दोन्ही यादी आम्हांबरोबर द्याव्या असें होतें. परंतु ग्वालेर व पुढें पल्ला दूर. आम्हां उभयतांस पोंहचावयास दिवस होईल म्हणून दोन्ही यादी पुढें रवाना केल्या. कारण कीं, या यादींवरून इंद्रसेनासीं जाबसाल सुरू होईल. आम्हां उभयतांस आज्ञा केली कीं, यादी पुढें गेल्या आहेत. त्यावरून इंद्रसेनासीं बोलणें चालेल, तों तुम्हीं जलदीनें जाऊन पोहोचून, तहाचे कलमांची भवति न भवति करून, सरकारअन्वयें तह करार करून लेहून पाठवणें; म्हणजे सरकारचा तहनामा पाठवून देऊं. अशी आज्ञा होऊन मागाहून आज्ञा दिल्ही. त्याप्रमाणें उभयतांहीं लांबलांब मजली करून येत असतां, पत्रें पावतील तेथेंच

मुक्काम करून राहाणें म्हणून पत्रें आलीं. त्यावरून येथेंच मुक्काम करून राहाणें प्राप्त जालें. राहिलों. आपण इंद्रसेनासीं बोलून तहनाम्याचीं कलमें सरकार-अन्वयें करूनच करार ठराऊन लेहून पाठविलें असल्यास तहनामा येईल, तो परभारा आपणाजवळ येईल. आम्ही येथें निरर्थक किती दिवस बसावें येविसीं आज्ञा काय ते करावी. अशीं पत्रें बावांकडे रवाना केलीं. मागाहून दुसरीं पत्रें याच अन्वयें पाठविलीं आहेत. उत्तर काय येतें पाहावें. सिपरी व कोलारस हा प्रांत इंग्रजांनीं बजाऊन लुटून फस्त केला. लोकांस अन्न इकडील माणसास मिळत नाहीं! वस्त्र तर राहिलेंच नाहीं! अशी दशा या प्रांताची जाली. कोलारसांत वैराणी फार. सिपरी गांव मोठा म्हणून येथें येऊन उभयतांही मुक्काम करून राहिलों. असो. येथील हवा निपट नाकारी. आधीं सीत या प्रांतांतच भारी. येथें दगड चुन्याचीं घरें, यामुळें सीताचा अतिशय. पाणीही दुष्टच आहे. हवा मानत नाहीं. पाणी जाचतें. जामगांवीं मूतखडयाची व्यथा निर्माण जाली. त्याच अवस्थेंत गुजराथची स्वारी जाली. घरीं गेल्यावर श्रीदेवाचे आंगाऱ्यानें खडा बंद जाला होता, तो येथें सिपरींत पडों लागला. हेंही वर्तमान बावांस व नारोपंतास लेहून पाठविलें आहे. तहनाम्याचीं कलमें करार कसकशीं बावांनीं ठराविलीं, हें त्यांनीं सेवेसीं लेहून पाठविलीं असतील, त्यावरून ध्यानास येतील. तहनामा पाठवायाचा तो आम्हांकडून आल्यास आम्ही उभयतां घेऊन लष्करास जाऊं. परभारां गेल्यास बावांचें पत्र बोलावूं येईल तेव्हां लष्करास जाणें होईल. या हवेचा व पाण्याचा ऋणानुबंध किती दिवस असेल तो श्री जाणें. बावांचें पत्र सेवकास प्रथम चंद्र १२ चें आलें तेंच बजिन्नस सेवेसीं पाठविलें आहे. त्यावरून अर्थ विदित होईल. याप्रमाणें नारोपंताचें व पुन्हां बावांचें दुसरें पत्र आलें आहे. उज्जनीहून थोरल्या तोफा एक तर पुण्यांतच ओतली ती, व उज्जनींतील आणखी मिळून चार पांच तोफा आम्हांपुढें रवाना जाल्या होत्या, त्या येथून काल परवां गेल्या आहेत. बावांजवळ पोंहचतील. गप्पा ऐकिली जे, ग्वालेरची गीर्दनवाई सोडून बावांची फौज गोहदचे आसपास ती चौ कोसीं गढीस मोर्चे लावून आहेत. गोहदकर जाट सहकुटुंब ग्वालेरीस आहे. पांच हजार फौज, पांच हजार माणूस जवळ आहे. गोहदेस कारभारी दोन हजार प्यादा घेऊन आहे. जाटावर सिबंदी फार चढली यामुळें व जाटाचा चुलता गोहदचा वांटेकरी आहे, त्यास जाट कांहीं देत नाहीं. त्याणें हा प्रसंग पाहून बावांस येऊन भेटला. त्यांनीं गोहदेंतील सिबंदी फोडली. लोक उठउठून जातात. बावा थोरल्या

तोफा पावल्यानंतर गोहदेस मोर्चे लावणार. अशा इकडील लोकांच्या गप्पा ऐकिल्या. खरें खोटें श्री जाणें. हिंदुस्थानी माणूस लबाडही फार असतें. नजफखानाकडील अमदानी दाहा हजार फौजेनसीं वृजामध्यें आला. त्यास माचेडीवाला राजा सामील जाला. जयपूरकर राजा पन्नास साठ हजार जमा होऊन चालून गेला. त्यासीं आमदानीसीं युद्ध जालें. आमदानीस ठार मारला अशीही गप्पा ऐकिली. बातम्यांत वर्तमान येत असेल तें प्रमाण. आमदानीनें मथुरा लुटली ऐकतों. सत्यमिथ्या श्री जाणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana of his having made a halt at Sipri at the desire of Mahadji who thought that his arrival in his camp without the ratified treaty would so displease the English ambassador as to make him withdraw. He details news about the siege of Gohad.*

No. 219 16th December 1782.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २९ जिल्हेज मुक्काम सिपरी प्रांत नरवर स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—चंद्र २४ माहे मिनहूचे मुक्कामचें विनंतिपत्र उज्जनीस रवाना केलें. तेथून डांकेत सेवेसीं पोंहचून वर्तमान विदित जालें असेल. उज्जनीहून कूच करून ताजपूर तराणेयास मुक्कामास आलों. तेथून विनंतिपत्रें कासीदाचे स्वाधीन केलीं कीं, उज्जनीस राजश्री नारोपंत निसबत डांक यांजवळ पोंहचावणें. तेथून डांकेत पुण्यास रवाना होतील असें सांगून कासीद बिदा केले. त्यांनीं उज्जनीचा मार्ग सोडून, लष्करांत जाऊन राजश्री नारो शिवदेव यांजकडे पत्रें दिलीं. त्यांनीं पाहून पत्रें माघारीं सेवकाकडे पाठविलीं. त्यांनीं पत्र सेवकास लिहिलें आहे तें व तीं पत्रें बजिन्नस सेवेसीं पाठविलीं आहेत. पाऊन वर्तमान विदित होईल. राजश्री पाटिलबावांचीं पत्रें राजश्री रामजी पाटील यांजला व मजला दोन आलीं, तीं कोलारसाचे मुक्कामीं पावलीं. त्यांपैकीं एक पत्र बावांचें व नारोपंताचें ऐसीं चंद्र २४ चे रवानगीत पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें आम्ही उभयतांनीं बावांस व नारोपंतांस पाठविलीं जे, इंग्रजांचे कलमबंदीची यादी आम्हीं उभयतां पुण्यांत असतां पाठविली

होती, त्यांत कलमें अधिक उणीं करावयाचीं होतीं ती यादी व दुसरीं कलमें निराळीं लिहून घ्यावयाची याद, एशा दोन्दी यादी आम्हांबरोबरच द्याव्या. परंतु ग्वालेर लांब, आम्हां उभयतांस पोंहचावयास दिवसगत होतील, याजकरितां यादी पुढें रवाना केल्या. मागाहून आम्हां उभयतांची रवानगी केली. आज्ञा जाली जे, यादी पुढें गेल्या आहेत; तुम्ही लांब लांब मजली करून जलद जाऊन पोंहचून, त्या यादीप्रमाणें इंद्रसेनाचा तह बावांस सांगून, करार करवून, कलमवार लिहून पाठवणें; म्हणजे सरकारचा तहनामा शिक्यानिसीं पाठवून देऊं. श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें आम्ही उभयतांनीं मजली लांब लांब करून निकडीनें आलों. तों आपलीं पत्रें आलीं कीं आम्ही इंद्रसेनासीं बोललों आहों जे, सरकारचा तहनामा उभयतांबरोबर आहे, घेऊन येतात. तुम्हांजवळ सरकारचा तहनामा असला तर लष्करांत येणें. तहनामा तुम्हांजवळ नसल्यास पत्रें जेथें पावतील तेथेंच मुक्काम करून उभयतांही राहणें. पुण्यास श्रीमंतांस लिहून पाठवून तहनामा सरकार शिक्याचा आणवून मग लष्करांत येणें. तहनाम्याखेरीज तुम्ही येथें आलां, तर तहनामा नाहीं असें इन्द्रसेनास कळल्यावर उठून जाईल, यास्तव न येणें. अशी आज्ञा आल्यावर येथेंच राहणें प्राप्त जालें, राहिलों. परंतु आमचे रवानगीचे समयीं आज्ञा सदरीं लिहिल्याप्रमाणें जाली. ते समयीं तहाचीं कलमेंच करार ठरलीं नाहींत. मग तहनामा आम्हांजवळ कशाचा? आतां तहनाम्याकरितां श्रीमंतांस विनंतिपत्र पाठवावें तसें मोघम पाठविलें आहे. कलमबंदीच्या यादी पुण्याहून पुढें पाठविल्या होत्या, त्या कलमाचे करार कसकसे ठरले याची माहितगिरी असती, तरी कलमवार तपशिलें लिहितों. ती माहितगारी आम्हां उभयतांस नाहीं, त्या पक्षीं लिहावें काय? आपलीं पत्रें तहनाम्याकरितां गेलीं आहेत, त्यावरून तहनामा सरकार पाठवितील तर परभारां आपणाजवळ येईल. आम्हीं येथें किती दिवस बसावें अशीं पत्रें उभयतांचीं कोलारसाचे मुक्कामीहून बावांस व नारोपंतांस गेलीं. दुसरीं पत्रें येथून पाठविलीं त्यांपैकीं रामजी पाटील यांचें पत्र बावांस पावलें म्हणून नारोपंतांनीं लिहिलें. माझे पत्राची रसीद नाहीं याचें कारण श्री जाणें. दोन पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें अद्यापि आलीं नाहींत. प्रतीक्षा करीत येथें रानांत गैरवळणीं उभयांही राहिलों असों. बावांचे आज्ञेखेरीज लष्करांत जातां येतच नाहीं. कोलारसाचे मुक्कामीं असतां दुसरें पत्र रामजी पाटील यांचें बावांस गेलें होतें कीं, गोविंदभट जोशी व हकीमजी व माधवराव उज्जनीहून आम्हांसमागमें आले आहेत. आम्हीं तर आज्ञेप्रमाणें

मुक्काम करून राहिलों. या समागमीं यांची रवानगी करितों. पाहाडगडा-पावेतों पावते करितों. आपण फौज पाठऊन पाहाडगडाहून यांस घेऊन जावें. हें पत्र रामजी पाटिलाचेंच गेलें होतें तें पावलें. त्याजबरोबर माझें पत्र नव्हतेंच. हें पत्र बावांस पोहोंचून उत्तर आजच आलें. त्यांतही लिहिलें आहे जे, पुण्याहून तहनामा येई तोंपावेतों तेथेंच राहणें. येथें न येणें. पुण्याहून तहनामा आल्यावर येणें. अगोदर न येणें. हें पत्र मात्र बावांस पावलें. माझें पत्र नव्हतें. यावरून नारोपंतानीं लिहिलें आहे. पाटिलांचीं व माझीं पत्रें बावांस व नारोपंतांस दोन गेलीं तीं पाटिलबावांस पावलीं नव्हतीं. तीं पावल्यावर नारोपंतांसही पावतील. त्यांचीं उत्तरें येतील त्या अर्थाची विनंती सेवेसीं करीन. पाटिलबावांनीं लिहिलें असतांही आम्ही उभयतांनीं लष्करास जावेंच, तर मार्गाची अवस्था एक प्रकारचीच आहे. येथून नरवर इकडील बारा कोस. त्या मार्गें लष्कर कांहीं जवळ आहे. त्यास नरवरावरून मार्ग चालत नाहीं. पाहाडगडावरून मार्ग नुराबादपावेतों चालतो. पुढें वीस कोस लष्कर. तो मार्ग चालत नाहीं. गोहदकराचे लोक मार्ग लुटतात. लश्करांत नुराबादेहून वर्तमान कळल्यावर तेथन फौज आल्यावर जाणारास घेऊन जातात. फौजेखेरीज वाट चालत नाहीं. आम्ही बावांची आज्ञा नसतां गेलों तर नुराबादेपावेतों जाऊं. लष्करांतून फौज पाठऊन आम्हांस नेतो कोण? दुसरें, नुराबादेस गेलों तर तुम्ही आल्याचा बोभाट जाला म्हणून आम्हांस इंद्रसेनाचा अगर आणखी पेंच पडला असें निमित्य ठेऊं लागतील, तर तेंही वाईट. यास्तव येथें राहिलों. खर्च उभयतांबरोबर भारी. येथें गैरवळण रानांत कोणास कर्ज मागावें? हवेचा विचार तर इकडील शीत ऊष्ण दोन्ही भारी. सध्यां शीत प्रबल. राहणें येथें किती दिवस पडतें? बाहेर रानांत कोठें रहावें म्हणून गांवांत राहिलों. इमारती मोठ्या मोठ्या व गरिबांचीं घरें एकूण झाडून दगड, चुना, भित, जमीन, माळवद,* माडी अगदीं दगड, चुना, खपरेलें देखील दगडाचीं तीं अशीं गार लागतात. लांकूड मातीचें दर्शन नाहीं! हवा पाणी दुष्ट!! शरिराची अवस्था पूर्वीं विदितच आहे. थंडी व गारव्यानें विकल केलेंच आहे. मजली लांब लांब करून आल्यामुळें गरमी जाली, किंवा कशानें विकार जाला न कळे. पूर्वीची व्यथा मुतखड्याची राघोगड खिचीचा येथील मुक्कामींहून लागली आहे. याजपासून पार पडावयास तारक स्वामींचे पाय समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar reports to Nana Fadnis his detention on the way and adds that he was suffering from the effects of the extreme cold of north India.*

* धाबें, माळा.

No. 220 December 1782.

इंग्रजांचे तहाचे जाबसाल इंद्रसेनानें केले.

(१) हैदरखानांनीं महमदअल्लीचा मुलूख सोडून द्यावा व सरकार दरखान मिळोन तह करावा. कलम.

सरकारच्या तहाचीं कलमें.

(१) साष्टीचा जाबसाल घडत नाहीं. कलम.

(१) अहमदाबादेचा जाबसाल इंद्रसेन बोलतो कीं, फत्तेसिंग गायकवाड यांसीं आमचें वचन गेलें आहे, त्या पक्षीं अहमदाबाद शहर गायकवाड यांजकडे राहूं द्यावी. हा जाबसाल आम्हीं ऐकिला नाहीं. तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, कलम त्यांत लिहून पाठवितों. आम्हींही म्हटलें कीं, पुण्यास लिहितों. सारांश अहमदाबादचा जाबसाल मळमळित आहे. कलम.

(१) वसई वगैरे कोंकण प्रांतीचा मुलूख व किल्ले घेतले आहेत, ते गुजराथ प्रांतीच्या जागा अहमदाबादखेरीज करून वरकड सोडितात. कलम.

(१) अंतरवेदचा जाबसाल इंद्रसेन बोलतो कीं, जसे नवाब, भोसले, हैदरखान हे तिघे तुमच्या पेटचांत, त्याप्रमाणें सुजादौलाचा लेक व महमदअली हे दोघे आमच्या पेटचांत. त्यापक्षीं तुम्ही यांसीं बोलूं नये. आम्हीं त्रिवर्गासीं बोलणार नाहीं, व त्यांचा पक्षही करणार नाहीं. असे जाबसाल होऊं लागले. तेव्हां हा जाबसाल अगदींच मोघम ठेविला. पुढें मागें समजून घ्यावयास येईल. कलम.

(१) श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा दार मदार कर्नेल इपटिणच्या तहांत लिहिला आहे, त्याप्रमाणें आतांही मान्य. इपटिणच्या तहाप्रमाणें आपण त्यांचें चालवावें. पुढें मागें याउपर आम्ही त्यांचा पक्ष करणार नाहीं. कलम.

¶*This paper contains discussion between Mahadji and Anderson regarding certain articles in the treaty.*

No. 221 2nd February 1783.

श्री

(आपाजीरामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २९ सफरपावेतों मुक्काम बहादरपुरानजीक ग्वालेर यथास्थित असे. विशेष :—स्वामींनीं, फडणिसीवे

दरकाविषयीं युक्तीनें बोलावें आणि काम चालवावें, (व) तुम्ही येण्याविषयीं लिहिलें, त्यास तूर्त येऊं नये. तेथें असावें. पुढें लेहून पाठऊं त्याप्रमाणें करावें. होळकर-प्रकर्णीं मजकूर राजश्री पाटीलबावांस लिहिला आहे, व पूर्वीही चार पांच वेळ लिहिलीं गेलीं, परंतु अद्याप गोष्ट ठरावांत आली नाहीं. त्यास मसलतीचे दिवस, फौजेची तयारी झाली पाहिजे. विना पैक्याशिवाय फौज जमा कसी होईल? याजकरितां पूर्वी लिहिलें त्याप्रमाणें तुम्हीं पाटीलबावांसीं बोलून बाईस पत्र पाठवावें, आणि ठरावांत आणून लेहून पाठवावें. राजश्री पाटिलबावांनीं पूर्वीच पत्रें पाठविलीं कीं, होळकरांची खातरजमा करावी, ती केली. तें निभावणें त्यांजकडेच आहे. दुसाला तिसाला फौज वहिवाटून रसदा घेऊन मसलत करावी लागते. हे अनुभव पाटिलबावांसही आहेत. बाई हिशेब पाठवितात त्यांत रदकजें वगैरे वजा जाऊन बराबर. यानें काम सरकारचें काय होतें? बोलावयास जागा नाहीं. याकरितां पूर्वी पाटिलबावांनींच लिहिलें होतें. चार माहालीं मात्र बाईकडील मामलेदार, वरकड ठिकाणीं तुकोजी बावांकडील असतां बोभाट कां? त्यास जे तुकोजी बावांकडील मामलेदार माहालीं आहेत, तेथील वहि-वाटीस बाईंकडील अडथळा नसावा, म्हणजे यांस सांगावयास येईल. मसलतीचे दिवस येऊन पोहोंचले हें ध्यानांत आणावें. म्हणोन विस्तरें सेवकास आज्ञा केली. त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावांसीं हे मजकूर सर्व बोललों. तेव्हां त्यांचें उत्तर विचार करून सांगतों असें म्हणाले. त्याजवर एक दोन वेळ गांठ घालून पुसिलें, परंतु उत्तरें यथास्थित त्याहावयाजोगीं जालीं नाहींत. मागतीं त्यांतच एक वेळ बोलले कीं आमच्यानें बाईस केवळ चार माहालांची वहिवाट तुम्हीं करावी आणि बाकी माहालची वहिवाट तुकोजीबावा करतील, ऐसें आमच्यानें बाईस सांगवत नाहीं. जे समयीं मल्हारजी होळकर यांस देवाज्ञा जाली, तेव्हां आमच्या हातीं मालजी होळकर यांस व बाईंस दिलें, आणि आम्हांस त्यांच्या हातीं देऊन परस्परें भाऊपण्याची निखालसता करून स्वामिसेवा एकनिष्ठेनें करावी याप्रमाणें शपथक्रिया आम्हांपासून घेऊन देहविसर्जन केलें. त्यास बाईंनीं नेमणुकेप्रमाणें कालक्षेप करावा आणि तुकोजीबाबांनीं सर्व दौलतीचा कारभार करावा हें उत्तम कीं काय? अस्तु. आम्हांस सरकारचाकरी करावी इतकें समजतें. हा बंदोबस्त सरकारमर्जीप्रमाणें करणें तो हुजुरूनच व्हावा. आमच्यानें कांहीं होत नाहीं. असींही भाषणें जालीं. त्यास विना बंदोबस्त आम्ही देशीं आल्या-खेरीज राजश्री नानांची आमची समक्ष गांठ पडेल तेव्हां होईल. तूर्त बाईचें

महत्व ज्याप्रमाणें मागाहून चालत आलें आहे त्याप्रमाणें बंदोबस्त करून सरकार काम चालवावें. मग पुढें पाहातच आहेत. अशीं उत्तरें होतात. यांतील मुख्य भाव हाच कीं तुकोजीबावांकडे कोणे गोष्टीचा इतल्ला* नसावा; फक्त चाकरी मात्र करावी. याप्रमाणें मानस आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram writes to Nana of Mahadji's unwillingness to mediate in the dispute between Tukoji and Ahalyabai. He was not prepared to advise the Bai to renounce the conduct of administration in favour of Tukoji.*

No. 222 4th March 1783.

पो छ २६ जमादिलावल

सुा सल्लास समानीन मया व अलफ.

श्री

सेवेसीं महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना. तागाईत. चंद्र २९ रबिलावल मुक्काम नजीक ग्वालेर जाणोन यथास्थित असों विशेष. कंपनी आंग्रेजांकडील तहाचें बोलणें होऊन तह जाहला, येविषयीचें सविस्तर वर्तमान, राजश्री केसो अनंत सेवेसीं पाठविले आहेत, विनंती करतां श्रुत होईल. कोणेविषयीं मागील पुढील चित्तांत संशय न आणितां इकडे यावयाचें करावें. आम्हांकडून यामध्यें दुसरा विचार जाहला नाहीं व पुढेंही व्हावयाचा नाहीं. मशारनिल्हे विनंती करतील, ते मान्य करून येणें व्हावें. यांत सर्व गोष्टी उत्तम आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji writes to Raghoba about the final conclusion of the treaty with the Company and requests him to come away without any fear.*

No. 223 5th March 1783.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री महादजी शिन्दे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत

---

*राजकारणाचें सूत्र किंवा संबंध.

असलें पाहिजे. विशेष. पेटा भडोचकडे अंमल पाा जंबूसर व आंकलेश्वर व आमोद व हासोट व देहजबारे येकूण पांच माहाल येथील पहिल्यापासून चालत आला आहे. त्यास आपण येविसीं पत्र लिहिलें त्यांत व माहालीहून आम्हांकडील कमाविसदारांनीं तेथील वहिवाट लिहिली, त्यांत फेर बहुत दिसोन येतो. याजकरितां आपणास लिहिलें असे. तरी येविसीं आपण पांच महालचे कमाविसदारांस सरकारचीं पत्रें येथें पाठवावीं कीं, तेथें महालचे देसाई व कानगो अमलाच्या वहिवाटीस माहीत आहेत; दाखले मोकाबले त्यांस रुजूच आहेत; ते सुदामत सांगतील त्याप्रमाणें तुम्ही भडोचकर कमाविसदाराकडे अंमल देणें आणि ठाणीं भडोचेकडे चालवणें. याअन्वयें पत्रें पाठविलीं पाहिजेत. येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांस सांगितलें आहे, ते सविस्तर लिहितील. रवाना चंद्र १ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to issue orders to the Kamavisdars Broach not to default in the payment of his share.*

No. 224 18th March 1783.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी आपण पत्र पाठविलें तें पावलें. टिपूची मसलत सरकारांतून करणें प्राप्त. त्यास, सरकारचे मातबर सरदार राजश्री तुकोजी होळकर त्यांच्या घरच्या अडचणींमुळें गळाठा, याकरितां गंगाजळनिर्मळ अहिल्याबाई यांस लिहून मसलतीवरी उपयोग घडे तें करावें म्हणून लिहिलें होतें. त्यांचें उत्तर आपण लिहिलें कीं, येथून अहिल्याबाई यांस लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, फौजेची सरबरा* होऊन सरकारचाकरी घडावी उचित आहे. स्वदेश व माळवा मिळोन फौजेची सरबरा व्हावयाचा विचार व्हावा. स्वदेश व माळव्यापैकीं महाल तुकोजीबावांकडे आहेत, त्यांजवरी फौजेच्या खर्चाची योजना त्यांनीं कशी केली ते समजावी. त्याप्रमाणें इकडीलही महालावरी तजवीज होऊन येईल. सरकारावरी मसलत प्राप्त, त्यापक्षीं स्वदेश व माळवा येथील महालांवरी चार रुपये कमजादा घेऊन मसलत करावी. तिकडील महालांची रीत पडेल त्या अन्वयें लिहून पाठवावें; त्याप्रमाणें बाईस त्याहावयास येईल. म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास, होळकरांची मातबर सरदारी तेव्हां स्वरूपा-

---

* तजवीज.

नुरूप फौजेची तयारी असावी. त्यास ऐवजाची व्यवस्था पाहतां तूर्त तीस लाख रुपये पाहिजेत. त्यास, महाल पहातां यांकडे व त्यांकडे कमकसर बराबरच दिसतात. याअन्वयें पंधरांची तर्तूद तुकोजीबावांस करावयास सांगितली. बाकी पंधरांची तर्तूद अहिल्याबाई यांनीं करून पाठवावी. त्यास, बाईंकडे महाल वहिवाटतात त्यांचा रसदेचा ऐवज थोडा, भरणा अधिक, असें मनांत आणूं नये. दुसाला रसदा घ्याव्या व जमीदार व मामलेदार यांचे हक्क मुशाहिरे वगैरे याचा ऐवज साधून व कर्जाऊ तर्तूद करणें जाली तरी करून, पंधरा लक्षांची तर्तूद करून पाठवावी, याअन्वयें अहिल्याबाई यांस लिहून पाठविलें आहे व इकडील महालांची वहिवाट लिहून ताळेबंद पाठविले आहेत. याच अन्वयें आपणही अहिल्याबाई यांस लिहून सदरहूअन्वयें तर्तूद लवकर होऊन येई असें घडावें. याउपर मसलतीस अवकाश राहिला नाहीं. याकरितां लिहिल्याअन्वयें अमलांत यावें म्हणून लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, आपलीं पत्रें येविशीं येत गेलीं, त्यांवरून गंगाजलनिर्मल मातुश्री अहिल्याबाई होळकर यांसी, मसलतीचा समय आहे, राजश्री तुकोजी होळकर यांणीं देशचे महाल वगैरे त्यांजकडे आहेत त्यांजवर त्यांणीं पंधरा लक्षांची तर्तूद केली आणि सरकारचाकरीस जावयाची तयारी केली आहे. आपणांकडूनही ऐवजाची रवानगी व्हावी म्हणून लिहिलें. त्याचें उत्तर, त्यांजकडे महाल आहेत किती आणि आम्हांकडे किती हें सर्व बाळाजीपंत नाना यांसी लिहून माहीत केलेंच आहे. तुकोजी होळकर यांजकडे जागा आहेत. त्यांजवर त्यांनीं तजवीज केली असल्यास कोणते रीतीनें केली, तें लिहून पाठवावें. त्याअन्वयें आम्हांकडे महाल आहेत त्यांची तडजोड महालकऱ्यांसीं बोलून करूं. सरकारावर मसलत, त्या अर्थीं तुकोजी होळकर यांणीं महालकऱ्यांकडे ज्या रीतीनें तोडजोड केली असेल त्याप्रमाणें येथील महालकऱ्यांसीं तोडजोड करूं म्हणोन उत्तर लिहिलें. त्यास, तुकोजी होळकर यांजकडे स्वदेश व माळवा मिळोन महाल आहेत, त्यांजवर कोणे रीतीनें तोडजोड केली, तें लिहून पाठविलें, म्हणजे त्याअन्वयें अहिल्याबाई यांसींही लिहावयासी येईल. हल्लीं बाईंस, मसलतीची वेळ आहे, या समयीं जशी तर्तूद होईल तशी करून पाठवावी, असें लिहिलें आहे. आपलींहीं पत्रें, होळकरांनीं कशी तोडजोड केली ही लौकर यावीं. त्याप्रमाणें बाईंस लिहून पाठवूं. राा छ० १४ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his having addressed letters to Ahalyabai to accommodate Tukoji with funds for the equipment of his army.*

No. 225 March 1783.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—इंग्रजांचें बोलणें आहे जे, राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांचा करार तहनाम्यांत ठराव तुमचा आमचा जाला आहे जे, तहनाम्या-अगोदर बाकी टाकी तुमची गायकवाडाकडे असेल ती माफ. पुढें करार मदारा-प्रमाणें शिरस्त्याप्रमाणें पैका घेणें अगर चाकरी घेणें ती घेत जावी. असा करार ठरला असतां, सांप्रत गायकवाडापासून पेशजीचें बाकीपैकीं ऐवज घेतला हें काय ? आम्हीं त्यांस उत्तर दिल्हें जें, तह ठरला आहे त्याप्रमाणेंच वर्तणूक होईल, *बेज्या होणार नाहीं. गायकवाडापासोन पैका घेतला असेल तो सालाबादचा ऐवज तहनाम्यापासोन अलीकडे घेतला असेल. तुमचा आमचा तह जाला ही शोहरत† ऐकून गायकवाडानें अहमदाबाद तालुक्यांत व्यारा म्हणजे पट्टी करून रयतेवर जोर जुलूम करून, पैका घेतला असेल तो त्यांनीं मागितला, घेतला असेल. तह जे तारखेस जाला तोंपावेतों मुलुखाचा वसूल मागणार नाहींत. तह जाल्याचा बोभाट ऐकून, पट्टी करून, मुलूख उज्याड करून, पैका घेतला असेल तो घेणें वाज-वीच आहे. मागितला, घेतला असेल, असें उत्तर आम्हीं दिलें. त्यास, गायक-वाडापासून रुपया घेतला असेल त्या समयीं मागील बाकीचे ऐवजाचा तगादा होऊं नये. पैका घेतलाही असला तर यादीबुदी करून दिल्या नसल्यास आतां यादी करूं न देतां, व्याऱ्याचें कलम लावल्यास चिंता नाहीं. सालाबादप्रमाणें चाकरी घ्यावी, पैका घ्यावा, हीं दोन्ही कलमें यादीस धरून रुपया घेतल्यास इंग्रजाची कक्षा चालणार नाहीं. पूर्वी आम्हीं लेहूनही पाठविलें होतें जे, गायक-वाडापासून रुपया घेणें तर व्याऱ्याचें निमित्त लाऊन रुपया घेतल्यास चिंता नाहीं. त्यांस स्मरण असेल नसेल. सारांश, यादी गायकवाडास दिल्ही नसेल तर आतां व्यारा म्हणजे पट्टीचें कलम लावावें. पेशजीचे बाकीचें कलम लागूं नये. यादी दिल्ही असेल त्यांत, ‡पेशजी बाकीचें कलम लिहिण्यांत आलें असेल तर, जाबसाल पडेल. तसें जालें न पाहिजे. म्हणून राजश्री पाटिलबावांनीं विनंती त्याहा-वयास सांगितल्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter contains a complaint from Anderson about the Poona Darbar not acting in conformity with the late treaty and having committed a breach in asking for past arrears from Fatesing Gaikwad.*

*गैर रीतींची, दुसऱ्या प्रकारची. †प्रसिद्धी, माहिती ‡मागच्या पैकीं.

No. 226 March 1783.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—छ ७ सफरचे रवानगीचे पत्रांचीं उत्तरें मागतों. होत नाहींत. राजश्री सदाशिव मल्हार इंग्रजांकडील वकील यास समाधान नाहीं, सबब गुंता पडला आहे. त्यास समाधान जाल्यावर जाब होतील. छ १९ सफरचीं पत्रें प्रविष्ट केलीं. जाब होतील ते मागाहून रवाना होतील. फौजा बाहेर निघाल्या. महादेवाकडे चालल्या. कंपू अद्याप येत नाहीं. बावांस हटकिलें. उत्तर जालें जे, जागांजागांच्या बदल्या जाल्या. जुनीं माणसें सरदार फौज मामलेदार सारे फिरून नवे आले यामुळें गुंता पडला, व इष्टिनाची बिबीही विलायतेस गेली, तिजला पोंहचवावयाकरितां इष्टिनही जलीपावेतों गेला. सबब अटकाव जाला. इष्टिन कलकत्यास आला असेल. याउपर कंपू येईल असें बावा बोलले. एक कानपुरास करनल रन म्हणून आला. त्याजबरोबर दोनशें गोरा व आठ पलटणें आलीं, ऐकतों. तो तेथेंच राहणार म्हणतात. मुंबईकडून पलटणें आलीं तीं भिंडेजवळ आहेत. ब्रह्मावर्तपावेतों इतके दोन जमाव इंग्रजांचे आहेत. तिसरा जमाव ऐकण्यांत येत नाहीं. हे विज्ञापना.

¶*This is Mahadji's reply to the complaint from Poona that there was no sign of an English force moving out to join the Maratha troops marching against Tipu as agreed in the late treaty.*

No. 227 March 1783.

पै।। छ. १५ रबिलाखर.

श्री

(सदाशिव दिनकराचें पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—छ १७ सफर व छ १९ सफरचे पत्रांचे जाब मागावयास राजश्री पाटिलबावांकडे जाऊन विनंती केली. उत्तर जालें जे, दोही रवानग्यांचें तात्पर्य. सरकारची फौज महादेवाचे रानांत चालली. इंग्रजांचा कंपू लौकर रवाना करणें व इंग्रजांनीं टिपूसीं परभारा सलूख करूं नये, असें लेहून पाठविलें आहे. याचें उत्तर विचारून लिहिलें पाहिजे. त्यास, इंग्रजांचा सलूख परभारा होण्यास एक विद्यमान फरासीस अगर टिपूचे संधानावर, तर दोहीविसीं

बोलण्यांत पक्कें आलें आहे. सलूख श्रीमंतांचे विद्यमानें होणें तर होईल, अगर लढाई तों सिद्धांत जालाच आहे. टिपूकडे पत्रें गेलीं आहेत. त्यांचीं उत्तरें अद्यापि आलीं नाहींत. उत्तरें येतील तीं लेहून पाठऊं. पत्रीं लिहितात याचाच विचार पडतो. दुसरें एक वर्तमान ऐकिलें आहे जे, पुण्याहून कोणी संधान मुंबईकरांकडे लाविलें. त्यांतील भाव काय जे, सरकारचा इंग्रजांचा सलूख आमचे विद्यमानें इष्टिनासीं जाबसाल होऊन ठरावांत आला. यांतीलच करार आहे जे, टिपूसीं सलूख होणें तो श्रीमंतांचे विद्यमानें व्हावा. हा अर्थ सिद्ध जाल्यास आम्हांस यश येऊन वर्चस्व आमचें होतें. तें न व्हावें याजकरितां मद्रासकर व मुंबईकर इंग्रज एक होऊन, टिपूसीं बोलून सलूख करवावा म्हणिजे आम्ही दरम्यानच राहून वर्चस्व होणार नाहीं. या अर्थें मुंबईकरांसीं राजकारण लाऊन त्यांजकडील दोघे गृहस्थ मातबर टिपूकडे पाठविले आहेत. त्यांची नांवनिसीही कळली आहे. असें वर्तमान आश्चर्यवत् ऐकिलें गृहस्थ मुंबईकरांकडील टिपूकडे गेले खरे. मद्रासकरांचें त्यांचें बोलणें होऊन एक संधान करूनच गेले असतील. याचें अनुसंधान आदि, मध्य, परिणाम तिन्ही प्रकार दिसत नाहीं. यावरून शाश्वत वाटलें नाहीं. परंतु वर्तमान ऐकिलें. राजकारणाचा प्रकार न कळे. कळवावें म्हणून तुम्हांजवळ बोलतों. आम्हीं आजपावेतों वर्तणूक स्वबुद्धीनेंच केली नाहीं. राजश्री नानांचे विचारें कागदींपत्रीं बळकटी होऊन तह जाला. आधीं तर जें वचन नानांचे बोलण्यांत आलें, त्यांत फेरफार होत नाहीं. आम्हांसीं कृत्रिम करणार नाहींत हा निश्चयच. नानांनीं आम्हीं धन्याच्या कामांत मन घालून भानगड केली. श्रीमंतांचे पक्षीचे आम्ही दोघे. इंग्रजांकडील बाजीकार इष्टिन. मध्यस्थ, इंद्रसेन. इतके संमत मिळून निश्चय जाला त्याच रीतीनें शेवटास जावा. त्यांत प्रत्यय बोलण्यांत बळकटीच आहे जे, परभारा टिपूसीं सलूख होऊं नये. श्रीमंतांचे विद्यमानेंच व्हावा. यांत अंतर पडणें नाहीं. असें असतां मुंबईकर व मद्रासकर टिपूसीं आपण होऊन बोलावयास गेल्यास इष्टिन कसा मानितो? दुरापास्तच आहे. जर करितां मुंबईकर व मद्रासकरांची भानगड इष्टिनास मान्य जाली तर बरें. केला घाट सिद्धीस गेला यांत सरकारचें काम तरी जालें. आधींच इंग्रजांचे बोलण्यांत आलें आहे जे, तहनामे परस्परें दिले घेतल्यानंतर पुण्याहून टिपूस पत्र गेलें आहे कीं, तुम्हासीं बिघाड करीत नाहीं. तुम्हांवर फौजबंदी करून चालून येत नाहीं. हें पत्र बजिन्नस आम्हांस टिपूनें पुणेकरांचें दाखविलें म्हणतात. हा अर्थ चित्तांत आहे तो प्रतिबाधक होण्याचा आहे. तसें हेंही त्यांचे चित्तांत आलें

कीं, पाटिलबावांचे विद्यमानें करारमदार ठरला असतां, आतां पुणेकरांनीं मुंबईकर व मद्रासकर यांचे मार्फत सूत्र लाविलें, तस्मात् यांचे वचनास बंद नाहीं; आणि आपसांतही यांची एकवाक्यता, एकोपा स्वच्छ नाहीं, असें मनांत भरलें तर केवढा नाश होईल! गोष्ट विकोपास गेली तर कसी आवरेल? नानांचे दूरअंदेशींत इतका तर्क न यावासा नाहीं, आणि ऐकण्यांत तर गोष्ट आली. यावरून एकोणीस विश्वे तर नानांस विदित नसतां दरम्यानच आमचे स्नेही असतील त्यांनीं केली असेल म्हणून तुम्हांस कळवितों. तुम्हीं लिहिल्यानंतर वर्तमान नानांस ठाऊक असल्यास चोरणार नाहींत. साधकबाधक निवडून क्रम चालविला असेल तसा लिहितील. विदित नसेल तर शोध करितील. ठिकाणीं लाऊन लबाडास शिक्षा करितील. केल्या कर्मास आजपावेतों श्रम किती लागले व पुढें सिद्धीस न्यावयास श्रम किती आहेत! त्यांत एक निमित्त थोरलेंच टिपूस पत्र गेलें आहे जे, तुम्हांसीं बिघाड करीत नाहीं. फौजबंदी करून तुम्हांवर चालून येत नाहीं. याचेच परिहारास विचार पडतो. दुसरेंही निमित्त हें जालें तर अवघडच! मनसबा करणारांनीं समजूनच मुंबई मद्रासकरांचे विद्यमाने सूत्र लाविलें असेल. आमचे विरुद्धामुळें कर्म आचरले असतील. त्यास, मार्ग घरांतच उदंड होते व आहेत. बाहेरले शत्रूस दरज* दाखवणें युक्त नाहीं. त्यांत हा थोरला मनसबा. वर्तमान नानांस कळवणें. उत्तर प्रमाणभूतच लिहितील. म्हणोन बावांनीं सांगितल्यावरून विनंति केली असे. मनन होऊन उत्तर सादर करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. मुंबईहून गृहस्थ गेले त्यांचीं नांवें बावांनीं सांगितलीं, मिस्तर कलंदर व मिस्तर हास एकूण दोन गोरे. याबरोबर दोन कारभारीही गेले आहेत म्हणून सांगितलें. हे विज्ञापना.

¶*Mahadji inquires through Sadashiv Dinkar about the truth or otherwise of a rumour of attempts being made at Poona of bringing about a settlement with Tipu directly without informing sindia.*

No. 228 July 1783.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—हैदरखान यानें इंग्रजांवर जरब बरीच बसविली, त्यामुळें इंग्रजांनीं इकडे पैगाम लाऊन सलूख केला. हैदरखान† मेल्यावर टिपूवर

---

* फूट, भेदभव. † हैदरअली तारीख ७ डिसेंबर सन १७८२ रोजीं मरण पावला.

सरदारी आली. तो हिंमत बांधील कीं सोडील भ्रम होता. इंग्रजांनीं बिदनूर सारखी जागा घेतली. तेव्हां टिपूनें चेनापट्टणाचे तोंडावर फौज ठेऊन, जुंबीश* न खाय असा बंदोबस्त करून, आपण खासा येऊन बिदनुरांत इंग्रजांस मारगिरी-खालीं कायल† करून, जबरदस्तीनें किल्ला घेतला. यावरून पराक्रमी बापासमान मर्द समजला. बिदनूर घेतल्यावर त्याचें वर्तमानच कळत नाहीं. कोठें आहे, काय करितो, फरासीस मदतीस आणिले, पुढें काय करील हा वचक होता. यामुळें इंग्रजांनीं फरासीस मेळऊन घेऊन बाहेर शोहरत केली, हें खरें वाटत नवतें. तों स्वामींचीं पत्रें व टिपूचें पत्र थैली व नूरमहमदखान याचें पत्र राजश्री पाटिलबावांस पत्रें आलीं. मुद्देयांची यादी आली. त्यांत आरकाट तालुक्यापैकीं त्यागगड व रावतनलूर व त्याखालीं पांच लक्ष रुपयांचा मुलूख इंग्रजांनीं द्यावा, अयाज गुलाम आमचे स्वाधीन करावा, हे दोन मुद्दे शिरोभागाचे. वरकड तीन मुद्दे सामान्यच, खुलस दोन किल्ले व पांच लाख रुपयाचा मुलूख याजवर आला. हिंमत व पराक्रम पाहतां, बिदनूर घेतल्यावरून मजबूतच दिसोन आला असतां, पांच लक्षांचाच मुद्दा घालून यादी पाठविली, याचें कारण समजलें नाहीं. मोहीम कोठवर करावी, कंटाळा आला, किंवा लढाईस हिंमत पुरेना, अथवा फरासीस इंग्रजांत मिळाले खरेच, आतां आपला परिणाम नीट नाहीं, अथवा फरासीस आपण एकच आहों, मसलत मारूं. हिंमत आहेच. राजकारण लाविलें त्यापक्षीं हा मुद्दा घालून इंग्रजांची हिंमत कशी आहे, थाक‡ काढावा? तर्कें करून पाहतां आंगीं सामर्थ्य असतां पांचा लाखांचे मुलखाचा मुद्दा न घालिता. यावरून फरासीस यांतून फुटून इंग्रजांस मिळाले असतील, तर थोडके मुद्यावर गांठागांठ करून घ्यावी असें असेल. वर्तमान तत्वता विदित असेल. जर करितां त्याची हिंमत कच्ची जाली असली, तर इंग्रजांचा सलूख जाला हें चांगलें. यांस अनुकूल होऊन टिपूवर मसलत करणें हें बरें. फरासीस मेळऊन घेतले ही अवाई इंग्रजांनीं घातली, तेव्हांपासून शेर जाले. टिपूस तुच्छ मोजितात. पांचा लाखांचे मुद्यावरून फारच शेर होऊन पाटिलबावांस त्यांजवर मोहिमेविसीं फार दाटी मांडिली आहे. सलूख करावयास इंग्रज आले ते समयीं श्रीमंतांनीं सलूख करून मेळवून घ्यावें, इतकाच मतलब त्यांचा होता. हैदरखानास आम्ही पाहून घेऊं असें बोलणें त्यांचें होतें. बावांचे मनांत कीं, आम्ही हिंदुस्थानांत येऊन लढाया करितों आणि

* माघार, पराभव. † कुठित. ‡ शोघ, थांग.

होळकर सरंजाम खाऊन रिकामे बसले आहेत. त्यांचा पक्षपात राजश्री हरिपंत तात्या करितात. दोघेही स्वस्थ घरीं आहेत. यांजवर मसलत उभी करावी. या अर्थीं हैदरखानानें मुलूख इंग्रज व महमदअल्लीखानाचा घेतला आहे तो व पाडाव* श्रीमंतांनीं खानास लिहून सोडून देवावे हें कलम यांनीं होऊन लेहविलें. तात्पर्य कीं, होळकरांनीं ही मसलत करून मुलूख, पाडाव सोडून देवावे. त्यास होळकरांच्यानें ही मसलत होती, अगर सरकारची फौज होळकर मिळूनही इंग्रजांचे कंपू समागमें घेऊन मसलत घडूं शकल्यास उत्तम आहे. सरकारांत मुलूख राहिला नसतां मसलत कशावर होते? होळकरांचे घरचा बंदोबस्त नाहीं. त्यांच्यानें ही मसलत होवत नाहीं आणि इंग्रजांनीं तर येथें निकड मसलतीची केली. नाहीं म्हणतां बिघाड होऊन लढाई सुरू होईल. असे पेंच आहेत. यास तोड काय? एक तोड सुचते. बावांचे मतें राजश्री नारो गणेश होळकराचे कारभारांतून निघावे. दुसरा दिवाणकरून वडीलपणा बाईकडे देऊन, त्यांचे आज्ञेप्रमाणें राजश्री तुकोजी-बावा वर्तल्यास बाई डोईवर घेऊन मसलत करिते, ती आम्ही एक होऊन, सरकार-चाकरी म्हणिजे मसलत करूं असें बावा म्हणतात. ही परीक्षा पाहण्याचे अर्थीं चार दिवस नारो गणेश घरीं बसवून, बावा व बाई एक करून मसलतेचा तरतूद कसा करितात पाहावें. सिद्धीस नेल्यास सरकारकाम जालें. आजपावेतों घेंगशांतच† काल व्यतीत होतो. काम कांहींच होत नाहीं. सुचली विनंती केली. याचें कारण इंग्रजांनीं यांस टिपूचे मोहिमेची निकड केलीच आहे. यांच्यानें नाहीं म्हणवत नाहीं. समागमें तिकडे येत आहेत. मिळून तिकडे आल्यानें कसें हें ध्यानांत येत असेल. मजलाही कल्पना आली ती निराळे पुरवणींत विनविलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Poona of the English envoy pressing Mahadji to urge the Poona Court to send an expedition against Tipu without loss of time as agreed in the treaty. Sadashiv Dinkar suspects that this was one of Mahadji's manauvres to bring Tukoji Holkar and along with him the Poona Court into discredit.*

No. 229 May 1783.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

विज्ञापना ऐसीजे:—छ १२ जमादिलाखरचें पत्र सादर जालें. त्यांत आज्ञा जे, राजश्री पाटिलबावांनीं सांगितलें कीं, सरकारांतून रास्ते, मिरजकर

*युद्धांत पकडलेले लोक. †घोटाळा, गोंधळ.

हे उभयतां दहा हजार फौजेनसीं टिपूचे कुमकेस रवाना होणार, तेही तयारी करितात, म्हणोन जागांजागांचे वकिलांचीं वर्तमानें लिहिलीं आलीं व इंग्रजांचेही घरीं वर्तमान आलें आहे. यावरून इंद्रसेनानें वर्तमान आम्हांस सांगोन पाठविलें. त्यास तह जाला असतां टिपूचे कुमकेस फौजेची रवानगी होते ही शोहरत ठीक कीं काय? कदाचित् इंग्रज मुलूख सोडवीत चालले, या समयीं सरकारची फौज पाठऊन सरकारचा मुलूख सोडवावयास लागावें असा विचार आंतून होऊन बाह्यात्कारें टिपूचे कुमकेची शोहरत केली असल्यास ठीक नाहीं. या गोष्टीनें इंग्रजांस मात्र संदेह येईल. याकरतां टिपूचे पारपत्यास फौज जाते ही शोहरत होऊन फौजेची रवानगी घडावी. सरकारचा इंग्रजांचा तह जाला यांत दुसरी गोष्ट घडावयाची नाहीं याप्रमाणें इंद्रसेनासी खातरजमा केली, याप्रमाणें बोलले. व दिडा महिन्यांत याचें उत्तर फौज तिकडे रवाना जाल्याचें यावें याप्रमाणें सांगितलें, व त्यांनींही स्वामींस लिहिलें आहे त्यावरून निवेदन म्हणोन लिहिलें, तें कळलें. त्यास, सरकारांतून दहा हजार फौजेची तर्तूद होऊन फौजेची रवानगी व्हावी म्हणोन उभयतांस ताकीद होऊन रवानगी होणार. तेही तयारी करतात, ही येथें संभूतही नाहीं. मिरजकर यांचे घरीं राजश्री परशरामपंतभाऊ यांचे कन्येचें लग्न, ते निरोप घेऊन निकडीनें लग्नाकरितां गेले. रास्ते येथें आहेत. फौजेचे तर्तुदेचा प्रकार तर, सरकारांत पैक्याची ओढ कोणे प्रकारची हेंही सर्व ध्यानांत आहेच. आंतून एक मसलत करावी, बाहेर एक शोहरत दाखवावी, हा प्रकार येथील नाहीं. व येथें संभूतही नसतां तिकडे बातम्या गेल्यावरून लिहिलें, यावरून अपूर्व वाटलें. तह जाला यांत दुसरी गोष्ट घडावयाची नाहीं याप्रमाणें इंद्रसेनाची खातरजमा केली, उत्तम केलें. फौज तिकडे दिडा महिन्यांत जावी म्हणोन लिहिलें, त्यास टिपूचीं कशीं उत्तरें येतात तेंही समजतील, त्यासारखें ल्याह्यावयास येईल व करावयास येईल. कदाचित् फौज पाठवावी असीच मसलत पडली, तर सरकारचा प्रकार ध्यानांतच आहे. होळकरांस मसलतीस पाठवावें तर त्यांचे घरी बखेडा आहे. येविसीं वारंवार विस्तारें लिहिलेंच आहे. तेव्हां त्याचाही बखेडा उरकल्यावर एखादी मसलत सांगावयास व रगडून बोलावयास ठीक पडतें. त्यास, तोही बखेडा लौकर उरकत नाहीं, यामुळें मोठे सरदार घरीं उदास आहेत. सरकारचा पैका मध्येंच जातो. कोठें बोलावयास जागा नाहीं. सरकारकाम नासतें, याकरतां त्यांचा बंदोबस्त जाला असतां फार उपयोग आहे. ध्यानांत येत नाहीं त्यास काय उपाय? परंतु याउपर उपेक्षा होऊं नये. लिहिल्या-

अन्वयें जरूर घडावें. न घडल्यास मसलतीचे दिवस आहेत हें ध्यानांत आणावें, म्हणोन आज्ञापिलें. त्यास, हा मजकूर सविस्तर राजश्री पाटीलबावा यांसीं बोललों. उत्तरें जालीं कीं, टिपूचे कुमकेस रवाना होते म्हणून पुण्याहून वगैरे बातम्या आल्या, त्यावरून आम्हीं लिहिलें व तुम्हांकडूनही लिहिविलें होतें. परंतु तह जाला असतां टिपूचे कुमकेस फौज जाणार नाहीं ही खातरजमाच होती. परंतु ऐकिलें वर्तमान न लिहावें तेंही ठीक नाहीं, याकरितां लिहिलें. नूरमहमदखानासी बोलून टिपूकडे पत्रें गेलीं आहेत. त्यानें ऐकिल्यास उत्तम. न ऐकिल्यास तिकडील मसलतीवर फौजेची रवानगी जलद घडावी, याप्रमाणें बावा बोलले आहेत. आंतून एक मसलत करावी, बाहेर एक शोहरत दाखवावी, हा प्रकार येथील नाहीं म्हणोन स्वामींनीं पत्रीं आज्ञापिलें. हीं अक्षरें ऐकून बहुधा थोडकासा संकोचही मनांत पावले, असें ते समयीं दृष्टीस आलें. वरकड होळकराविसींच्या मजकुराचें उत्तर निराळीं विनंतिपत्रें विनविलीं आहेत, त्यावरून ध्यानास येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of his having exposed to Mahadji the falsehood of the rumour of a force being sent from to join Tipu, and of his having explained to him the difficulty Poona of preparing an expedition owing to disputes in the Holkar's family.*

No. 230 May 1783.

सेवेसीं महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ २५ जमादिलाखर मुक्काम नजीक ग्वालेर यथास्थित असे. विशेष, आपणांकडून राजश्री धोंडो खंडाजी व त्रिबक भवानी पत्रें घेऊन आले. उभयतांनीं आज्ञेप्रमाणें साद्यंत सांगितलें, त्यावरून कळलें. व राजश्री केसो अनंत आपणांपासीं पोंहचल्यावर कलमांची याद व पत्र पाठविलें तें पावलें व केसो अनंत यांणींही सविस्तर लिहिलें, तेंहीं कळलें. त्यास, यादीचे कलमाकलमावर जाबसाल लिहून, याद करार करून, राजश्री त्रिबक भवानी यांसमागमें याद देऊन व समक्ष यांसीं बोलून सेवेसीं पाठविले आहेत. सविस्तर विनंती करतील, ते श्रवण करून मजल दरमजल स्वारी इकडे यावी. स्वारी येण्यास दिवसगत नसावी. राजश्री धोंडो खंडाजी यांस येथें ठेवून घेऊन, मशारनिल्हेची रवानगी केली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia invites Raghoba to his protection.*

No. 231 2nd June 1780.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः--

दंडवत विनंती उपरी. इंद्रसेन यास दीड लक्षाची जागा द्यावयाचा करार पेशजी जाहला, त्यास दीड लक्षाची जागा नेमून सनदा पाठवून द्याव्या म्हणून आपणांस पूर्वी तीन चार पत्रीं लिहिलें होतें. त्यांचीं उत्तरें आलीं कीं, जागा निवडून सनदा मागाहून पाठवून देतों म्हणोन. त्यास, सनदा आल्या नाहींत. इष्टिनापासीं कामकाजांत इंद्रसेन आहे, याजकरितां बोलल्याप्रमाणें त्यास जागा नेमून सनदा करून दिल्हयानें उपयोगीं आहे यास्तव लिहिलें असे. तरी काल्पीचे लगती दीडलक्षाची जागा नेमून सनदा करून द्याव्या, येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांस सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. लिहिल्याप्रमाणें सनदा अगत्य आल्या पाहिजेत. रवाना चंद्र १ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to grant a Jagir to Anderson, the English envoy, for his valuable services in negotiating the late treaty.*

No. 232 9th July 1783.

पवस्ता छ ६ रमजान आर्बा
समानीन हा डाक

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ दंडवत विनंती उपरी. आपण छ २१ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून भास्कर शंकर व बाबाजी बल्लाळ कारकून पत्र घेऊन आले. त्यांचें म्हणणें इंग्रजांचा सलूख राजश्री माहादाजी शिंदे यांचे विद्यमानें जाहला. त्यास आम्हांकडील बोलण्याचा ठराव जाहलाच आहे. त्यास आम्हांस ईश्वराचे सेवेहून दुसरें अधिक नाहीं. मातुश्री बाईसाहेबांचें दर्शन घेणें व गोदातीरीं राहावें असें मनांत आहे. याजकरितां तुम्हांकडील निखालसता असावी. तह ठरला त्यापक्षीं आम्हांस संदेह राहिला नाहीं. स्वारी कोंडाईबारीचे सुमारें येतच आहे. परंतु लौकिकाकरितां तिकडून हरि बल्लाळ व एक दोन मातबर सरदार यांची रवानगी करावी व खर्चाची सोय करून पाठवावी. त्यांची भेट जाल्यानंतर सविस्तर बोलण्यांत येईल. म्हणून अन्वयें निखा-

लसपणाचें व देशीं गोदातीरीं यावयाचे निश्चयाचे भाव दिसोन आले. त्यावरून खातरजमेची गोष्ट न बोलावी तर कोणीकडे राजकारण काय करतील, कोठें जातील, हें समजत नाहीं. याजकरितां तहाचे ठरावांत आपलेकडील जाबसाल करारांत आले असतील त्यास येथून दिकत पडणार नाहीं. खातरजमा असावी. स्वामींनीं श्रीमंत राजश्री रावसाहेबांस व दौलतीस विरुद्ध तें करूं नये याप्रमाणें माारनिले बराबर सांगून पाठविलें आहे; काय घडेल पाहावें म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, इंग्रजांचें तह जाल्याचें वर्तमान श्रीमंत दादासाहेबांस कळतांच धोंडो खंडाजी व त्रिंबक भवानी दोघांची रवानगी इकडे केली. इकडून राजश्री केसो अनंत इंद्रसेनाचीं पत्रें देऊन सुरतेस रवाना केले. उपरांतिक उभयतां येथें आले. त्यांजबराबर सांगून पाठविलें कीं, आम्हांस सुरतेच्या सावकाराचें पाऊण लक्ष रुपये देणें आहे तें द्यावें व मार्गाच्या खर्चाचा बंदोबस्त करून पाठवावा व खातरजमेचें पत्र पाठवावें; म्हणजे तुम्हांकडे येतों. त्यावरून खातरजमेचें पत्र व सावकाराचें देण्यामुळें गुंता पडत असल्यास हवाला घेऊन श्रीमंत दादासाहेबांस घेऊन येणें व मार्गानें खर्चास दरमहा पंचवीस हजार रुपये देत जाणें, याप्रमाणें केसो अनंत यांस पत्रें पाठविलीं व उभयतां त्यांजकडून कारकून आले, त्यांसींही सदरहू अन्वयें बोलून, एकास येथें ठेऊन एकास सुरतेस रवाना केला आहे. केसो अनंत तेथें पोंहचल्यावरी निघावयाची तयारीची तरतूद श्रीमंत दादासाहेबांनीं केली. ऐवजाविसीं केसो अनंत यांणीं इकडे लेहून पाठविलें त्याचें उत्तर आलें म्हणजे निघावें असा विचार होता. तों पुण्याहून भास्कर शंकर आपणाकडून दादासाहेबांकडे गेले. त्यांचे बोलण्यांत कीं, तुम्हीं शिंदे यांजकडे जाऊं नये, इकडे यावें. इकडील कोणेविसीं संशय न धरावा. खर्चाविचास व कर्ज जाहालें असेल तें आम्हीं देऊं. गोदातीरीं राहावयाची मर्जी असल्यास गोदातीरीं राहावें. त्यावरून भास्कर शंकर यांसीं दादासाहेबांनीं बोलून, हा बोलतो तें खरें किंवा लटकें हें समजावें, सबब भास्कर शंकर यांसमागमें बाबाजी बल्लाळ शागीर्द देऊन पुण्यास रवाना केलें. त्याचें उत्तर यावें, मग इकडे येणें अथवा पुण्याकडे जावें हा विचार करून, केसो अनंत यांसीं पहिल्या बोलण्यापेक्षां कांहीं अधिक आगळें बोलूं लागले, म्हणोन केसो अनंत यांचीं पत्रें आलीं. त्यास भास्कर बाबाजी यांसीं बोलून आपण रवाना केल्याचा मजकूर लिहिला, त्यास उत्तम आहे. दादासाहेब शिंदे यांजकडे गेले म्हणजे ते भारी होतील, याकरितां त्यांस तिकडे जाऊं देऊं नये. पुण्यास अथवा गोदातीरीं, जसी दादासाहेबांची खातरजमा पाहिजे

तसी करून आणावें, हा विचार पुण्यास सर्वांचे विचारें होऊन भास्कर इकडून गेला. तिकडून बाबाजी आला. असा क्रम असतां, आपण लिहिलें कीं, उभयतां कारकून दादासाहेबांकडून बोलावयास आले, त्यावरून अपूर्व वाटलें. असो. दादासाहेबांनीं पुण्यास जाऊं नये, इकडेच यावें असा आग्रह नाहीं. कोणेही प्रकार इंग्रजांचे घरांतून काढून आपले घरांत आणावे. याकरितां इंद्रसेनासीं भवति न भवति बहुत जाहाली. तेव्हां त्याणें आग्रह सोडून, मुंबई, सुरतेस पत्रें दिल्हीं. हें वर्तमान दादासाहेबांस परभारें कळल्यावरी दादासाहेबांनीं इकडे येण्याचा संदर्भ लाविला. त्यावरी आपणांकडून पैगाम गेला. त्यावरून दोहींकडील नाद राखून दिवसगतिवरी घातलें आहे. दादासाहेब आम्हांकडे आले म्हणजे आम्ही भारी होऊं, पुण्याकडे गेल्यानें हलके होऊं, हे विचार तेथें होतात म्हणून ऐकतों. येथें गांवींहीं नाहींत! हल्लीं आपण उभयतां कारकुनांची खातरजमा करून पाठविलेच आहेत. त्याप्रों तिकडे आले म्हणजे उत्तम आहे. आम्हीं सरकार-चाकरी इतकी जपून केली व करीत असतां, आपणास समजावणारांनीं समजवावें, आपलेही ध्यानांत यावें, हें आश्चर्य आहे. आम्ही भारी पडूं याचे विचार होतात, त्यास माघें जे सरकार कामें केलीं तीं ध्यानांत न राहतां, पुढें आम्हांकडून दुसरी गोष्ट घडेल हा संदेह चित्तांत येतो, हें अपूर्व आहे!! रा छ ८ शाबान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reproves Nana Fadnis for his deceitful conduct in inviting Raghoba to Poona rather than surrender to him and for supplying a false report of the situation. He resents that the Poona Darbar should continue to look on him with eyes of suspicion despite his valuable services to the State.*

No. 233. 9th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. आपण छ ९ व छ १२ जाखरचीं पत्रें पाठविलीं, तीं पावलीं. पूर्वी टिपूकडील मजकुराचीं पत्रें येथून लिहिलीं होतीं, त्यांचीं उत्तरें आलीं कीं, टिपूस इंग्रज जरबेंत आणून मुलूक घेतात असें नाहीं. बिदनुरांतील अधिकारी याणें इंग्रजांकडे फितूर केल्यामुळें बिदनूर घेतलें. तों मातबर सरंजामानिशीं टिपू येऊन शहर घेतलें म्हणोन लिहिलीं आलीं; तो मजकूर पेशजी लिहून पाठविलाच आहे. हल्लीं किल्लघास मोर्चे टिपूनें लावून मार भारी केला

तेव्हां किल्लाही घेतला. दोन हजार इंग्रज व चार हजार माणूस बिदनूर किल्लयांत इंग्रजांकडील होतें. त्यांणीं कौल घेऊन हत्यारें ठेवून बाहेर निघाले. त्यांस कैदेंत ठेविलें आहे. बिदनूर घेतलें. आतां चेनापट्टणाकडे उठून जावें हा इरादा आहे म्हणोन टिपूचीं व सरकारचे वकील आनंदराव निंबाजी व गणेश केशव यांचीं पत्रें आलीं. त्यांतील सविस्तर मजकूर कळावयाकरितां राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिला आहे, त्यावरून कळेल. याप्रमाणें वर्तमान आहे. तेव्हां इंग्रज, महमदआलीखान याचा मुलूख सोडून देणें हें लिहिलें असतां, कसें मानील पहावें. परंतु आपण लिहिल्यावरून, त्यांजकडील नूरमहमदखान वकील येथें आहेत, त्यांसीं बोलून टिपूस पत्रें लिहून पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें कशीं येतात तीं आल्यावर समजेल. त्यासारखी तर्तूद म्हणोन लिहिलें त्यावरून व राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रावरून सविस्तर कळलें. ऐसियास, केवळ एक बिदनूर घेतल्यानेंच इंग्रज शिकस्त जाहले असा अर्थ नाहीं. बिदनूर घेतलें व फरासीस सामील होणार, इतक्यावर गर्वारूढ होऊन सरकारचें सांगितलें न ऐकावें, यांत त्यांचा नफा नाहीं. दोस्तीचे रीतीनें आपण सांगून पहावें, न ऐकल्यास तिकडून इंग्रज मसलत करीतच आहेत. इकडून आपण सरकारची फौज पाठवून ताण बसवावा. दोन शह त्यासही सांभाळणें कठिणच आहे. नूरमहमदखानाचीं पत्रें त्याजकडे गेलीं, त्यांचीं उत्तरें आलींच असतील. तो मजकूर इकडेही लेहून पाठवावा व पुढील तर्तुदीचा काय निश्चय जाहला तोही कळवावा. इंग्रजांनीं कराराप्रमाणें सरकारचा मुलूक व ठाणीं, किल्ले सोडून दिल्हे व श्रीमंत दादासाहेबांसही स्वाधीन केलें. आतां महमदआलीचा व इंग्रजांचा मुलूक सोडून देवावा हें कलम त्यांचें राहिलें. त्याचा वायदाही जवळ आला. त्यास कराराप्रमाणें सरकारांतून पार पाडून दिल्हें पाहिजे. टिपूनें ऐकल्यास उत्तम; न ऐकल्यास आतांपासून त्या मसलतीची तर्तुद असावी. वायदा टळून गेल्यास इंग्रजांचा शद्ध आपल्यावर होतो, यास्तव लिहिलें असे. रा छ ८ शाबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia asks the Poona minister not to relax in the preparations for the expedition against Tipu despite the latter's success against Bednore. The English having fulfilled to a word the articles of the late treaty, it was incumbent on the Maratha Government not to be backward in its performance of the stipulated terms.*

No. 234 9th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी आपण छ ९ जाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. सरकारच्या मुलकाच्या सोडचिटच्या इंग्रज देतात त्या घेऊन, ठाणीं, मुलूक व किल्ले सरकारांत स्वाधीन करून घ्यावे, येविशीं आपणांस लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, उत्तम आहे, ठाणीं, मुलूक व किल्ले यांच्या सोडचिटच्या पाठवून द्याव्या म्हणोन लिहिलें. त्यास, पेशजी तहनामे परस्परें दिल्हे घेतल्यावर, इंद्रसेन याणें सरकारचे किल्ले, मुलूक, ठाणीं सोडून द्यावयाविशीं मुंबईवाल्यांस पत्र लेहून दिल्हें, तें राजश्री केसो अनंत यांजबराबर सुरतेस रवाना केलें व परभारा सदरहू अन्वयें इद्रसेनाचीं पत्रें त्यांस गेलीं. त्यावरून मुंबईवाल्यांनीं किल्ले, ठाणीं बहुत करून खालीं करविलींच होतीं. परंतु दरम्यान इंग्रजांचीं जहाजें व सरदार धुळपांनीं पाडाव करून नेले यामुळें त्यांस संदेह येऊन अडथळा पडला. त्यावर सांप्रत आपणांकडून पत्रें आलीं. त्यांत इंग्रजांचीं जहाजें व सरदार धुळपांकडून सोडून देविले म्हणोन लिहिलें. परंतु मंबईवाल्यांचीं पत्रें इंद्रसेनास येतात, त्यांत जहाजें व सरदार चीजवस्तसुद्धां धुळपांनीं सोडून दिल्हयांचीं पत्रें येत नाहींत. असें असतां हल्लीं फिरोन इंद्रसेनानें मुंबईवाल्यांस पत्र लिहिलें आहे कीं, इंग्रजी जहाजें व सरदार चीजवस्तसुद्धां धुळपांकडून सोडून देविलीं म्हणोन सरकारचीं पत्रें पाटीलसाहेबांस आलीं आहेत. तेव्हां जहाजें व सरदार सुटून तुम्हांपाशीं आलेच असतील. तुम्ही कराराप्रमाणें सरकारचीं ठाणीं, किल्ले, मुलूक सोडून द्यावे, याप्रमाणें परभारा लिहिलें आहे. येथून केसो अनंत यांसही लिहिलें आहे. ठाणीं, किल्ले, मुलकास इतके दिवस दिकत न पडती, परंतु जहाजामुळें इंग्रजांस संदेह येऊन दिवसगत लागली. याउपर त्यांजकडून दिकत पडणार नाहीं. परंतु आम्ही येथें ऐकतों कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेब व ठाणीं मुलूक हाताखालीं घालावा; टिपूकडीलही स्नेहाचा नाद राखावा; पुढें पहावें तसें करावें; याप्रमाणें सरकारांत विचार होतात. त्यास, दादासाहेब व मुलूक हस्तगत करून पुढें तहाचे निभावणीविशीं मध्यस्तास फजीत पाडावें असें असल्यास, याचा विचार आधीं कळावा हें चांगलें. रा छ ८ शाबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having smoothed over the difficulty in the restoration of forts and territories by the English caused by the capture of English merchantmen and sailors by Dhulap at sea. He advises the Poona minister not to act contrary to the spirit of the treaty.*

No. 235 9th July 1783.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

दंडवत विनंती. उपरी आपण छ १२ जाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. रास्ते व मिरजकर दहा हजार फौजेनिशीं टिपूचे कुमकेस सरकारांतून रवाना होणार असें ऐकिलें. त्याजवरून आपणांस लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, टिपूचे कुमकेस फौज इकडे इंग्रजाचा तह होत असतां कसें पाठवावयाचें घडेल? ही मसलतच नाहीं. टिपूनें कराराप्रमाणें न ऐकल्यास मसलत इंग्रज व आपण मिळोन करावयाची. त्यास तूर्त बरसात आली व टिपूकडील उत्तरेंही येणें. बरसातींत इंग्रज टिपूवर गालेब* होतात असें नाहीं. बरसात गेल्यावर मसलतीचे तर्तुदेचा प्रकार तर सरकारांत वोढ कोणे प्रकारची हेंही सर्व आपले ध्यानांतच आहे. मातबर सरदार होळकर, त्यांजकडील तर्तूद होण्याचें सविस्तर राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें; व सरकारचेही फौजेची तर्तूद करून मसलत करावयास येईल. तहनामा इंग्रजांकडील आपणांकडे पाठविला आणि इकडे टिपूचे कुमकेस फौज पाठवणें याचा अंदेशा आपण कसा न केला? असो. सविस्तर राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें आहे म्हणोन लिहिलें, त्याजवरून सविस्तर कळलें. ऐसियास, सरकारची फौज टिपूचे कुमकेस, इंग्रजाचा तह जाहला असतां जाणार नाहीं ही येथीलही खातरजमाच आहे. परंतु वर्तमान ऐकिल्यावरून आपणांस लिहिलें होतें. आपण नूरमहमदखानासीं बोलून त्याचीं पत्रें टिपूकडे पाठविलीं, त्यांचे जाबसाल आलेच असतील. आपले सांगितलेप्रमाणें टिपूनें ऐकिल्यास उत्तमच आहे; न ऐकिल्यास फौजेची तर्तूद करून मसलत करणें प्राप्तच आहे. तह जाल्यांत टिपूकडील मुलकाचें कलम करारांत आलें आहे, त्याप्रमाणें वायदा न टळतां तर्तूद जाहली पाहिजे. होळकराविशींचा मजकूर लिहिला, त्यास त्याचें उत्तर अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. रा छ ८ शाबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजें हे विनंती.

¶*Mahadji again alludes to the charge of violating the treaty brought against the Poona Darbar by the British and accepts the false nature of the report.*

---

* वरचढ.

No. 236 9th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती उपरी. सरकारची फौज व सरदार, टिपूकडील मसलतीवर जाऊन पोंहचल्यास इंग्रजही अनकूल होऊन साऱ्याच गोष्टी सुगम पडतील, येविशीं आपणांस येथून लिहिलें होतें. त्याचें उत्तर राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं आलें कीं, सरकारांत पैक्याची वोढ कोणे प्रकारची, मागील फौजाचे गवगवे, तसेंच वरकड किरकोळी सरंजामी, त्यांस नेहमीं चाकरी छावण्याची. त्यांत मातबर फौजेचे सरदार म्हणावयासी होळकर, यांची तयारी स्वतंत्रपणें व कांहीं सरकारची फौज मिळून संचणी करावी, तरी त्यांचे घरीं नित्य फाके. सरदारी कर्जभरी होऊन गेली. पांच रुपये कोणी द्यावे अशी पत राहिली नाहीं. मुलकी-पैकीं पैका यावा, एक हातीं प्रकार असावा, तेव्हां घालमेल ज्या समयीं जशी पाहिजे तशी करून तडजोड होती. सरकारांतूनही नेटून बोलतां येतें. पूर्वी हे देशीं आले तेव्हां यांची खातरजमा करून सरकारकामावर पाडावें अशीं राजश्री पाटीलबावांचीं व बाईंचीं पत्रें आलीं, व सरकारांतही मसलत; मातबर सरदार उदासीन ठेवतां नये. तेव्हां यांची सर्व प्रकारें खातरजमा करून सरकारमसलती-वर आणिलें. वचनें गुंतलीं त्याअन्वयें बाईंस दोन वर्षें लिहीत गेलों; परंतु पांच रुपये यांस खर्चास न आले. महालची वहिवाट एक हातीं यांजकडून होऊन पांच रुपयांची तोडजोड चालवावी या अर्थें येथून राजश्री केसो कृष्ण महेश्वरास पाठ-विले. बाईंकडे दोन तीन लाखांचे महाल आहेत, त्यांची वहिवाट बाईंनीं करावी. वरकड महालीं यांजकडून वहिवाट व्हावी. तें न होतां महाल रदकर्जास सावकारा-कडे गुंतले आहेत, म्हणून वगैरे बयाज लावून बाई लिहितात. त्यास, सरकारांत मसलत असतां आज रदकर्जी महाल गुंतवून टाकावे, यांत सरकारकामाचा उपयोग व सरदारीचें रूप राहतें असा अर्थ घडत नाहीं. एकहातीं सरदारी मामलती असल्याखेरीज सरकारकामावर तरी काय पडणार? यांची ही अवस्था. बाईची त्या प्रकारची. असें आपलें सरदारीचें स्वरूप व सरकार मसलतसीर, हें ध्यानांत येऊं नये; तेव्हां आज मसलतीचे समयीं थोरली सरदारी असोन कांहींच फळ नाहीं. श्रीमंतांचे दैवें मसलतीची समेट जाल्यावर सरदारीचे पोटीं कर्ज-दारांचेही पर्याय काढणें तसे स्वस्थ काळांत काढतील. आज सर्व गोष्टी एकीकडे ठेवून सरकारकामाचा उपयोग व्हावा ही गोष्ट चांगली. येथें प्रकार जसजसे होत गेले तसतसे वरचेवर लिहीत गेलों. याकरितां बाईंस लिहून, मागील दुसाला

ऐवज बाईकडे गेला असेल तो रवाना करवावा, व महालांची वहिवाट यांजकडून होईल, त्यास सावकाराची अगर कोणतीही दिकत काढूं नये, हिसके मारूं नयेत. असें जाहलें असतां येथील वचन राहून, आज फौजेची तर्तूद होण्याविशीं नेटून सांगून करवितां येईल. वरकसी तोड करून फौजेची संचणी करतील; व सरकारचीही फौज म्हणजे एक जथ्यानें स्वतंत्र, एका मसलतीचा उपयोग जाला, हें एक मोठें काम आहे. याखेरीज दुसरा प्रकार, फौजेची तर्तुदीचा सरकारांत मातबरी जे आहे नाहीं, हें ध्यानांतच आहे. फौजेची तर्तूद तरी जाहली पाहिजे, आणि प्रकार असा! तेव्हां याचा विचार कसा करावा, हें ध्यानांत आणावें. होळकराचें प्रकरण सविस्तर रामजी पाटील व सदाशिव दिनकर यांजबराबर सांगून पाठविलें. त्यांणीं सांगितलेंच असेल व पाटीलबावांचे सर्व ध्यानांतही आहेच. सारांश, ज्या गोष्टीनें श्रीमंतांचे दौलतीचा उपयोग, व येथील वचनें गुंतलीं आहेत त्यांस युक्त, तेंच करतील. घोडें एका हातीं, लगाम एकीकडे, असे जातीचे सरदारींत खावंदाचें काम व सरदारीचें स्वरूप होतें असें नाहीं. सरदारीचें ओझें वागविणें, सरकारचाकरीचा उपयोग करणें, आपलें स्वरूप जतन करणें, तोडजोड राखणें, या गोष्टी दुहातीं असतां, प्रसंग कसकसे सांभाळावे लागतात, या दुःखाचे अनुभव सर्व पाटीलबावांचे अंगीं अनभवले आहेत. तेव्हां या सरदारीचे पेंचाचा विस्तार येथून लिहावासा नाहीं. यास्तव सदर्हू लिहिल्याअन्वयें मनांत आणून, याप्रमाणें बंदोबस्त होऊन येई, सरकारमसलतीचे उपयोगीं हंगामसीर पडत, असें करणें. याचा साक्षेप आदिकरून अमलांत लौकर येई तें करावें. नहाक पका मध्यें जातो; सरकारची चाकरी नाहीं; मसलत नाहीं; ऐवज सरकारचा येणें त्यास ठिकाण नाहीं. हें मनांत आणून पहावें कीं, सरकारची केवढी नुकसानी होते. याकरितां पूर्वी राजश्री पाटीलबावांनीं व अहिल्याबाईंनीं लिहिलें कीं, माळव्यांतील महालांत दोन तीन महालीं मात्र आम्हांकडील महालकरी आहेत; बाकी राजश्री तुकोजी होळकर यांजकडील असतां बोभाट कां? त्यास, हेही गोष्ट बरी सांगून मसलत करावयाजोगी आहे. याचप्रमाणें बाईस पाटीलबावांनीं सांगून पाठवावें कीं, माळव्यांतील दोन तीन महालीं तुम्हाकडील मामलेदार आहेत. त्या मसलती तुम्हीं विल्हे लावून, आपले डौलाचे खर्चापुर्ता ऐवज घेऊन, बाकी सरदारीकडे पाठवून द्यावा. राहिले महालीं तुकोजी होळकराकडील महालकरी आहेत; त्यांची वहिवाट ते करतील. याप्रमाणें लेहून पाठवून करवावें. या समयीं या दुईनें सरकारचें काम नासतें, दौलत पेचांत येती, असें आहे. उत्तर

सत्वर पाठवावें. म्हणजे होळकरास सांगून, तर्तूद फौजेची करवून, हंगामीं मसलतीवर जात, असें करवूं म्हणोन. त्याजवरून सविस्तर कळलें. ऐसियास, पेशजीं आपण मातोश्री अहिल्याबाई होळकर यांजकडे राजश्री बाबूराव वैद्य पाठविले. त्यांसीं सरदारीचा बंदोबस्त होऊन सरकारचाकरी घडावी येविशींचें सविस्तर बोलून, मशारनिल्हेची रवानगी आपणांकडे केली. त्यावरून आपण राजश्री तुकोजीबावांसीं बोललां. त्यांनीं सांगितलेंच, आमचा आग्रह नाहीं; बाईंनीं सारें आटोपावें. लागेल पैका तो द्यावा. आम्ही चाकरी करूं. या बोलण्याचीं पत्रें पुण्याहून बाईंकडे गेलीं व इकडेही आलीं. त्यावरून बाईंनीं मान्य केलें. दरोबस्त देशचे महाल व माळवा येथील वहिवाट बाईंनीं करावी. पैका सरदारीचे खर्चास देऊन सरकारचाकरीचा उपयोग घडावा. वावगा खर्च होऊन पैका उडविल्यास सरकारचाकरी घडणार नाहीं व सरदारीचाही बोज राहणार नाहीं. याकरितां एक कारकून बाईंकडील व एक सरकारचा, या उभयतांचे इतल्यानें मात्र खर्च व्हावा. वरकड फौज ठेवणें, सरकारचाकरी करणें, हें तुकोजीबावांकडे. याप्रमाणें बाईंनीं आपणांस लिहिलें. त्याचें उत्तर आलें म्हणजे पैक्याची तर्तूद व महालचा बंदोबस्त करावा, याप्रमाणें निश्चय होता. परंतु पहिल्या बोलण्याची उलटी खाऊन आपलीं पत्रें बाईंस आलीं कीं, देशचे महाल तुकोजीबावांकडे आहेत, त्यांची वहिवाट ते करतील. माळव्यांतील महालांची वहिवाट बाईंनीं करून वीस लक्ष रुपये फौजेस सरबराईस पाठवावे. त्यास, माळव्यांतील महाल सरंजामाकडे किती व बाकी मामलतीचे वहिवाटेंत किती, त्यांची जमा काय, त्यांपैकीं सरदारीकडे खर्च व रदकर्जी तुकोजीबावांचेच विद्यमानचे, यांचे झाडे पूर्वी बाईंनीं आपणांकडे एक दोन वेळ लिहून पाठविले. त्यावरून ध्यानास आलेंच असेल. बाईंनीं झाडे महालचे पाठविले, त्याजवरून तपशील तुकोजीबावांनीं लाविला. ती यादी पूर्वी आपण इकडे पाठविली, परंतु त्याची छान तेथें केली नाहीं. ज्याप्रमाणें होळकराचे कारभारी आपणांस समजावितात, त्याप्रमाणें आपण लिहितात. असो. आपण यादी पाठविली त्यावरून बाईंस लेहून पाठविलें. बाईंनीं त्याचा तपशीलवार झाडा उगवून मागतीं लेहून पाठविलें, ती यादीच बजिन्नस आपणांकडे पाठविली आहे; पहावी. सावकारापासून पैका होळकरांनींच देशीं सरदारीचे खर्चास घेऊन माळव्याचे महालावर रदकर्ज लावून दिल्हें. ते आतां म्हणतात कीं, हें स्वारीकडे नाहीं, महेश्वराकडे आहे. तें आपण वेदवाक्यतुल्य ऐकोन, होळकराचे घरीं चंदी देखील मिळत नाहीं, फाके होतात,

म्हणोन आपलीं पत्रें येतात. त्यास पलीकडे पथरगडाची कारकीर्द राहिली, परंतु देशीं आम्ही व होळकर आल्यापासून त्यांणीं फौज किती बाळगली, सरकार-चाकरी कोणकोणती केली, हें साऱ्यांस ठावकीच असेल, आपलेही ध्यानांत असेल. असें असतां, पैका कोणीकडे जातो हें त्यांस न पुसावें, त्यांचे घरीं चंदीचे देखील नागे पडतात म्हणोन ते सांगतात व आपण ऐकतात, यास मात्र उपाय नाहीं! होळकराचें चित्तांत सरकारचाकरीचें निमित्य बाईवर ठेवून, कोणेही प्रकारें बाईस संपुष्टांत घालावें म्हणजे चित्तास आल्याप्रमाणें वर्तणूक करावयासी येईल. चित्तांत नाहीं. त्यास, पूर्वीपासोन होळकरांचे घरची चाल सर्वत्रांस माहीत आहे. कैलासवासी सुभेदार असतां, गौतमाबाई कारभार करीतच होती. ती वारल्यावर पुढें अहिल्याबाई वहिवाट करूं लागली. ही चाल त्यांचे घरची पहिलेपासून आहे; नवी नाहीं. असें असतां हल्लीं तुकोजीबावांचे म्हटल्याप्रमाणें बाईनीं तुकडा खाऊन पडलें असावें, असे भाव स्पष्ट तर आपले लिहिण्यांत येतात. त्यास, जिकडे धनीपणा आहे तेथें छान असावी. एक पक्षीं कल देऊं नये. तें न होतां एकच पक्षाचीं पत्रें येतात, यास उपाय नाहीं! उत्तम पक्ष, ज्याप्रमाणें पहिले-पासून होळकरांचे घरची चाल आहे, त्याप्रमाणें बाईनीं सारी वहिवाट करून, चाकरी तुकोजीबावांनीं करावी. यांत बाईचें महत्व व सरदारीचें स्वरूप व सरकारचाकरी, तिन्ही गोष्टी घडतात. बाईचा अपमान केला असतां, पुढें सरकारचाकरीचा उपयोग होणें ही गोष्ट समजलीच आहे. परंतु अहिल्याबाई होळकरांची सून, तिची अवस्था याप्रमाणें करितात, इतका लौकिक मात्र होईल. यांत सरकारचा लौकिक राहत नाहीं. इतकें असोन ही गोष्ट खामखा करावीच करावी, असा आपला आग्रह असल्यास, आमुच्यानें बाईस असें सांगवणार नाहीं कीं, तुम्हीं पोटास घेऊन स्वस्थ बसावें. आम्हीं असेंही सांगितलें तरी, केवळ बाई ऐकावयाजोगी नाहीं. त्यांत होळकरांचा आमचा भाऊपणा. एखादी बरी गोष्ट असल्यास बाईस सांगावी, तुकोजीबावांस सांगावी. रीतीची गोष्ट अस-ल्यास न ऐकत, तरी समजोन सांगावयासी येईल. गैररीतीची गोष्ट सांगितल्यास तीही ऐकणार नाहींत. आम्हांसही सांगणें उचित नाहीं. बाईनीं महेश्वरचे खर्चाची बेगमीची जागा ठेवून वरकड झाडून वहिवाट तुकोजीबावा करतील अशीं पत्रें हल्लीं येतात. यांत शाश्वत कोणतें समजून आम्ही बाईस काय लिहावें? गैर रीतीची गोष्ट सांगितल्यास ती कशी ऐकतील? भाऊपण्याची जागा,

आम्हासही सांगणें उचित नाहीं. ज्या गोष्टींत बाईचें महत्व राहून सरदारीचें स्वरूप राहे तें करावें. रा छ ८ साबान बहुत काय लिहिणें.

¶*In this long and important letter Sindia censures the Poona ministry for its partiality to Tukoji Holkar and declines to mediate in the dispute of the Holkars as he was pretty well sure that Ahalyabai would spurn the advice of making over the entire administration to Tukoji and reduce herself to a mere cypher.*

No. 237 11th July 1783.

पैवस्ती छ २० रमजान सन अर्बा समानीन

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी. कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे लग्नाची सनगें पोशाख पाठविले असेत, यांची यादी अलाहिदा आहे. त्याप्रमाणें घेऊन उत्तर पाठवावें म्हणोन लिहिलें, तें कळलें. त्यास, आपणांकडून सणगांची यादी आली, त्याप्रमाणें एकूणीस सणगें पावलीं. कळावें. रवाना छ १० साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji acknowledges receipt of clothes sent from Poona for his acceptance on the occasion of the Peshwa's marriage.*

No. 238 11th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी सुजातदौला याचा पुत्र मीर्जा जंगली व जाबतेखानाचा लेक गुलाम कादर व हाफीज रहमताचा लेक तुरमतखान रोहिले वगैरे येथें आले. त्याविशीं आपणांस लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, मातबर माणसें श्रीमंतांचें घर जाणोन आलीं, तेव्हां त्यांची बरदास्त करणें प्राप्त. परंतु सरकारचा प्रकार आपले ध्यानांतच आहे. तेव्हां संस्थानिकांनीं सरकारची जागा दाबली आहे ती, अगर त्यांकडील नवी सोडवून खर्चाचे बेगमीस लावून द्यावयाची तोड योजिली,

ही बरीच आहे. त्यास, संस्थानिकांनीं सरकारची जागा कोणकोणती दाबली आहे, किती बेरजेची, व संस्थानिक कोणते, हें लेहून पाठवावें, म्हणजे समजून लिहून पाठवूं म्हणोन. ऐसियास इकडील संस्थानिकांपैकीं सरकारांत जागा आहेत त्यांखेरीज करून, संस्थानिकांपासून काबू चालेल तशी जागा सोडवून, मीर्जा जंगली वगैरे यांचे खर्चाचे बेगमीस लावून द्यावी असा विचार आहे. जसी त्याची तोड निघेल तसें ल्याहावयास येईल. रा॥ छ १० साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji writes to Nana on the arrival of certain Rohila chiefs at Poona how their claims can be adjusted.*

No. 239 11th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. आपण राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं सुरतेस इंग्रजाकडील कंपू आहे त्याचा मजकूर लिहिला, तो सविस्तर कळला. ऐसियास, इंद्रसेन याचे बोलण्यांत कीं, त्या कंपूस इकडे येऊन फार दिवस जहाले. सहा वर्षे कंपूतील माणसांस जाहालीं. तीं राहिलीं तरी मसलतीचे उपयोगीं पडावयाचीं नाहींत. याकरितां तो कंपू गाडराबराबर गेला त्याच मार्गानें फिरोन माघारा येणार. त्यास दस्तकें द्यावीं. त्यावरून येथून दस्तक दिल्हें. सरकारचे दस्तकाकरितां सुरतेहून आपणांस पत्र आलें, त्यावरून आपण लिहिलें. त्यास, दस्तक दिल्ह्यास चिंता नाहीं. प्रस्तुत बरसातीमुळें कंपूचा मुक्काम तेथेंच आहे. सरकारांतून टिपूचे मसलतीस फौज कधीं रवाना होणार, तो निश्चय लेहून पाठवावा, म्हणजे इंद्रसेनास सांगून कंपूचे सरदारांस व मुंबईवाल्यांस पत्रें पाठविलीं जातील. सरकारचा व इंग्रजाचा तह जाहला, त्यापक्षीं इंग्रजांकडील वकील सरकारांत यावा ह्मणून लिहिलें. त्यास, टिपूचे मसलतीस फौज रवाना करावयाचा निश्चय जाहला ह्मणजे इंद्रसेनाचा भाऊ अथवा दुसरा कोणी पुण्यास येईल. येविशीं राजश्री नारो शिवदेव यांस सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. रा॥ छ १० शाबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji requests Nana to grant a permit to the division of British troops which had accompanied Goddard to surat to march back to Bengal thrrough Maratha territory.*

No. 240 16th July 1783.

पैवस्ती छ २० रमजान.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १५ माहे साबानपावेतों मुक्काम ग्वालेर येथें स्वामींचे कृपेंकरून समस्त मंडळी सुखरूप असो. विशेष. स्वामींनीं कृपा करून श्रीमंतांच्या लग्नाचीं सणगें तिवट पैठणी व शेला जाफरखानी एकूण दोन सणगें पाठविलीं आहेत, तीं उत्तम समयीं पावोन बहुत संतोष जाहला तो पत्रीं कोठवर लिहावा? स्वामींनीं स्मरणपुरस्कर आदर केला, येणेंकरून स्वामिसेवा एकनिष्ठेनें करतों त्याची साफल्यता धन्यांनीं केली. राजश्री पाटिलबावांस व घरांत बायकांकडे सणगें पाठविलीं, तीं यादी हस्तें दिली. सणगें पाहून बहुत खुष जाले. मुत्सद्यांस राणेखान व रायाजी पाटील व राजश्री आबा चिटणीस यांसही यादीप्रमाणें ज्याचीं त्यास प्रविष्ट केलीं. राजश्री माधवराव गंगाधर नवे दिवाण जाले आहेत त्यांस वस्त्रें नव्हतीं. याजकरितां येथील मुत्सद्दी म्हणत होते कीं, दिवाणास वस्त्रें कां पाठविलीं नाहींत? त्याचें उत्तर आम्हीं केलें कीं मुख्यांस व घरांत बायकांस व बाळाबाईस सणगें पाठविलीं, आणि यांसच कां न पाठविलीं हें आम्हांस काय कळे! तरी तुम्हीं येथें सणगें घेऊन द्यावीं असेंही म्हणत होते. त्यास राजश्री नारो शिवदेव यांनीं आम्हांस पुसिलें कीं याचा विचार कसा करावा? त्यास मशारनिल्हेच्या व आमचे मतें ठरलें कीं, आपले आज्ञेखेरीज येथें सणगें देणें ठीक नाहीं. असा निश्चय करून, आबा वगैरे यांचीं वस्त्रें देऊन सांडणीस्वार पत्रें घेऊन सेवेसीं रवाना केले आहेत. वरकड तपशीलवार वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram informs Nana of his having distributed clothes received from Poona among Sindia's family and Sardars according to the accompanying list.*

No. 241 17th July 1783.

पा॥ छ २० रमजान सन अर्बा समानीन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

आज्ञाधारक रायाजी पाटील दंडवत विज्ञापना. तागाईत छ १६ माहे शाबान मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर जाणोन स्वामींचे कृपेंकरून यथास्थित

असे. विशेष :—श्रीमंतांचे लग्नाचीं वस्त्रें साडेतीन सणगें पाठविलीं, ते घेऊन उत्तर पाठवणें म्हणोन आज्ञा सादर जाली. त्यास आज्ञेप्रमाणें सणगें साडेतीन स्वामींनीं कृपा करून पाठविलीं तीं पावलीं. सदैव पत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶ *Rayaji Patil acknowledges the receipt of the clothes sent to him on the occasion of the Peshwa's marriage.*

No. 242 30th July 1783.

पौा छ २६ रमजान अर्बा
समानीन हस्ते डांक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष :—आपण छ १५ रजब व छ १ साबानचीं पत्रें पाठविलीं, तीं पावलीं. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून भास्कर शंकर व बाबाजी बल्लाळ आले. त्यांबराबर त्यांणीं सांगोन पाठविलें कीं, आह्मी श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचें दर्शन घेणार व गंगातीरीं स्नानसंध्या करून राहणार. येविशींचा मजकूर पूर्वी लेहून पाठविलाच आहे. त्यास, मशारनिल्हे श्रीमंतांपाशीं जाऊन बोलल्यावर श्रीमंतांनीं पत्र पाठविलें कीं, आह्मी निश्चयेंरूप येतों. राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर व रास्ते पांडुरंगराव याणी कोंडाईबारीपावेतों येऊन खातरजमा करावी, ह्मणजे गंगातीरीं येऊन राहूं. त्यावरून लिहिल्याप्रमाणें रवानगी करितों. दुसरे पत्रांत रवाना केले ह्मणोन लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास, श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील मजकुराचीं पूर्वी पत्रें आपणांकडून आलीं, त्यांचीं उत्तरें येथून पेशजी पाठविलीं आहेत, त्यांवरून सविस्तर कळलेंच असेल. श्रीमंतांकडे आपण भास्कर शंकर यांस पाठविलें, त्यावरून त्यांणीं देशीं यावयाचा निश्चय करून आपणांकडे पत्रें पाठविलीं, व सुरतेहून कूच सोनगडचे सुमारें केलें. आपणही इकडून त्यांस आणावयाकरितां रवानगी केली. उत्तम केलें. यांची त्यांची भेट होऊन पुढें कोठपर्यंत आले, श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांची भेट घेऊन गंगातीरींच रहावयाचा किंवा कोठें निश्चय जाहला, तें लिहून पाठवावें. रा छ २९ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji learns from Poona of Raghoba having decided to put himself under the protection of the Poona Darbar and inquires about his whereabouts.*

No. 243 30th July 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

दंडवत विनंती उपरी. इंग्रजाकडील तरांडीं मुंबईहून मंगरुळाकडे जात होतीं. त्यास धुळप आडवे होऊन, तरांडीं व वरील सरदार व लोक सुद्धां धरून नेलीं. तीं सोडून देवावयाविशीं आपणांस लिहिलें होतें, त्याचें उत्तर आपण लिहिलें कीं, इंग्रजांचा तह जाला, हें समुद्रांत धुळपास कळलें नव्हतें. याकरितां लढाई करून तरांडीं व सरदार व लोक सुद्धां दस्त करून लेहून पाठविलें. मुंबईकरांचें पत्र सोडून देण्याविशीं आलें. त्यावरून तरांडीं सोडून देण्याविशीं धुळपास लिहून सरदार सुद्धां सोडून देविलीं. तीं गलबतें सरदार सुद्धां मुंबईस येऊन पावलीं म्हणोन मुंबईकरांचें पत्रही सरकारांत आलें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियासी, इंग्रजांची लढाई महकूफ होऊन दोन वर्षें जालीं व सलुखाचा पैगाम लागून दीड वर्ष होत आलें असतां धुळपांस समुद्रांत कळलें नाहीं व सरकारांतून त्यांस पत्रें जात नसतील असें नाहीं. असो. आपण धुळपांस लिहून पाठविल्यावरून तरांडीं सरदार सुद्धां सोडलीं तीं मुंबईस आलीं. परंतु तरांडयावरील तोफा वगैरे जिन्नस कांहीं धुळपांकडे राहिली ते आलीं नाहीं म्हणोन मुंबईकराचें पत्र इंद्रसेनास आलें. त्यावरून इंद्रसेन यांणीं सांगून पाठविलें, याकरितां लिहिलें असे. तरी धुळपांस निक्षून लिहून, तरांडयावरील तोफा वगैरे चीजवस्त जी राहिली असेल ती झाडून मुंबईस पावती होय तें करावें. रवाना छ २९ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to restore to the English the guns and other articles captured by Dhulap at sea.*

No. 244 31st July 1783.

पौा चंद्र २० रमजान अर्बा

समानीन हस्तें डाक.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी किल्ले ग्वालेरीस चार महिने मोर्चे लावून जेर केलीच होती. मोर्चे आसलीवर जाऊन एक मोर्चाही त्याचा घेतलाच होता. श्रावण शुद्ध द्वितीया गुरुवारीं मागील सहा घटका रात्रीं हल्ला करून लोक वर

चढले. त्यांचे मोर्चे उधळून दिल्हे. ते निघून महालांत शिरून गोळी वाजविली. तेथेंही लोकांनीं हल्ला करून दों घटकांत जागा घेतली. आपलें ठाणें कायम जालें. सविस्तर राा नारो शिवदेव लिहितील. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असे. रवाना छ १ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of the capture of the Gwalior fort on 31st July.*

No. 245 21st August 1783.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना तागाईत छ २२ रमजानपावेतों स्वामींचे कृपेंकरून सोमावलीची गढी प्रांत ग्वालेर येथें लष्करांत सुखरूप असों. विशेष. राजश्री पाटिलबावांनीं स्वामींस मातुश्री अहल्याबाई यांजकडील मजकूर ल्याहावयास सांगितला व वकिलासही सांगितलें, त्याजवरून तपसीलवार वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. मातुश्री अहल्याबाई यांचीं पत्रें आलीं कीं, सरकारचे व तुकोजी होळकर यांचे जासूद पत्रें घेऊन माळव्यांतील कमाविसदारांस परभारा आले आहेत कीं, तुम्हीं माहालचा पैका सरदारीकडे देणें; बाईकडे दिल्यास मजुरा पडणार नाहीं. ऐसियास, राजश्री बाळाजीपंत नानाचें बोलणें व तुमची मध्यस्ती गुदस्तापासून आहे जे, प्रस्तुत गाडराचे लढाईचा प्रसंग रुबकार आहे. या समयीं बांईनीं दूरंदेशीचा विचार करून तूर्त वांकडे न दाखवितां माळव्यांतील माहालांवर फौजेची सरबराई करावी. त्याजवरून सारे माळव्यांतील महालकरी बोलावून आणून, त्यांत डौलाचा खर्च वजा होऊन, उरला ऐवज फौजेचे सरबराईस पाठवावा ऐसा विचार होता. परंतु फार करून माळव्यांतील माहालीं तुकोजीबावांचेच महालकरी आहेत. ते विना त्यांच्या पत्राखेरीज आम्हांकडे कसे येतात? याजकरितां त्यांचीं पत्रें त्यांजकडील कमाविसदारांस द्यावीं, म्हणजे सारे महालकरी एकत्र करून, जो ऐवज आकारेल त्यांत डौलाचा खर्च वजा होऊन, बाकी ऐवज फौजेचे सरबराईस पाठवितों. याप्रमाणें पुणेंयासही लिहिलें व तुम्हांकडेही लिहिलें असतां ती गोष्ट तिकडूनच घडली नाहीं; आणि सांप्रत वर लिहिल्याअन्वयें परभारां सरकारचीं पत्रें व जासूद महालकरी यांकडे आले आहेत. अस्तु. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें असे. याप्रमाणें बाईनीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें. त्यास पूर्वी

आपलीं पत्रें राजश्री नारो शिवदेव यांस आलीं कीं, गुदस्तां व सालमजकूर दोहों सालचा ऐवज पाठवून द्यावा. याकरितां येथून बाईकडे कारकून सरकारचा रवाना जाहाला आहे. तरी येविसीं राजश्री पाटिलबावांनीं बाईस लिहोन पाठवून सदरहू लिहिल्याअन्वयें घडे तें करावें. त्यावरून येथून बाईकडे पत्रें पाठविलीं. त्याचीं उत्तरें आलीं. तोही मजकूर आपणांस लिहोन पाठविला. ऐसें असतां साऱ्या गोष्टी एकीकडे राहून, बाईचा अपमान करावा असें असलें तरी ही गोष्ट सर्वथैव लौकिकविरुद्ध, व ती ससभ्य (?) पडिलीयावर तिकडूनही ठीक नाहीं. येविसींची दूरंदेशी पाहून जें कर्तव्य तें करावें. पुढें मागें आम्हांवर शद्ध ठेऊं नये. बाईकडे माळव्यांतील महालपैकीं, इंदूर व देपालपूर व मल्हारगड एकूण तीन व नेमाडपैकीं खरगोण बत्तिसी एकूण चार महाल आहेत. वरकड देश व माळव्याचे महाल तुकोजीबावांकडेच आहेत. चार महालपैकीं डौलाचा खर्च वजा होऊन बाकी ऐवज राहील तोच पाठवावा ऐसें असल्यास बाई पाठवून देतील. परभारें कमाविसदारांस लिहिल्यानें युक्त दिसत नाहीं. याप्रमाणें मजकूर त्याहावयास आज्ञा केली. त्याजवरून सेवेसीं लिहिला आहे. झांशीची मामलत राजश्री बाबूराव यांकडे सांगोन सनदा दिल्या त्यावरोबर आम्हांसही आज्ञा होती कीं, याचा बंदोबस्त करून द्यावा. तीं पत्रें व सनदा मशारनिल्हेकडील कारकून येथें घेऊन आला. पत्रें दिलीं. सनदा दाखविल्या. उपरांतिक त्यास बाबूराव यांची कामकाजाची विचारली. त्याजवरून त्याणें गोपाळराव बरव्याचे कारकीर्दीपासून इत्थंभूत वर्तमान सांगितलें. व हल्लीं सरकारांतून झांशीची मामलत सांगितली. रसद सवा लाख रुपये व शर्त अमल सावकार निशा पुण्यांत दिली आहे तेव्हां त्यांस विचारलें कीं, तुम्हीं मामलतीचा बंदोबस्त करावयाची तरतूद कशी योजिली? तुम्हांबरोबर देशीची जमयेत किती आहे? याचें उत्तर त्यानें केलें जे, देशची जमयेत आम्हांपासीं कांहीं नाहीं. परंतु चारपांचशें माणूस पाईचें आणविलें आहे. अंतरवेदीतील जमेदार वगैरे लोकांचीं सूत्रें व खुमान गुमान यांचेंही बोलणें आहे कीं, तुम्ही मामलत केल्यास तुमचें साहित्य आम्ही करूं. याप्रमाणें जमेत केल्यास होईल. तेव्हां ऐसें वर्तमान त्यांजकडील आहे. त्यास आम्ही सांगितलें कीं, रघुनाथ हरि म्हणतात, आमचें फाजील आहे व शिबंदीचा पैका मागतील तो हिसेब करून द्यावा लागेल. तेव्हां येविसींची सावकारी निशा तुम्हांकडील सिद्ध असावी. कारण काय? तरी किल्लेकोटाचें काम आहे. त्यांजला पक्कें समजल्यानंतर जाबसाल तोडून टाकावा तरच उत्तम. याजकरितां

तुम्हीं बाबूराव यांसी लिहोन पाठवावें आणि उत्तर आणवणें. याप्रमाणें मशारनिल्हेच्या कारकुनास सांगितलें. पत्र लिहिवलें. आणि राजश्री पाटिलबावांचें म्हणणें आहे कीं, कारकुनानें वर्तमान तरतुदीचें व माहितगारीचें सांगितलें, तेव्हां थोडासा संशय वाटला. कारण काय, बंदोबस्त करून दिल्ह्यास इकडील शिबंदीनें परिणाम कसा लागेल ? रांगडे बदमामली. हल्लीं ज्यांजकडे सरकारचीं स्थळें आहेत ते रांगड्यांत निमग्न आहेत. आणि यांची तर भिस्त सारी या लोकांवर दिसते. इकडील लोक किल्लेकोटावर ठेविल्यानंतर मग बंदोबस्तास पार नाहीं प्रस्तुत या प्रांतीं तमाम रांगडे एकत्रच आहेत. तेव्हां राजेरजवाड्यांस विश्वास नाहीं. येविशीं जमयेत स्वदेशी असल्याखेरीज परिणाम लागणार नाहीं, आणि बाबूराव याची खातरजमा पक्की असल्यास तैसेंच ल्याहावें, म्हणजे लिहिल्या-अन्वयें बंदोबस्त करून घ्यावयास येईल. त्याच्याच बोलल्याप्रमाणें बंदोबस्त करून स्थलें मशारनिल्हेचे स्वाधीन केल्यास एकादी गोष्ट अपायाची स्वस्थानास घडेल. याजकरितां तपशीलवार ल्याहावयास सांगितलें, त्याजवरून विज्ञापना लिहिली आहे. बाबूराव यांची माहीतगारी आम्हांसही थोडी बहुत आहे. मशारनिल्हेकडील कारकून व भला माणूस मराठा गोविंदराव म्हणोन आला होता. त्यास घराऊ रीतीनें पुसिलें तेव्हां त्याचे बोलण्यांत अर्थ दुसरा कांहीं दृष्टीस पडला नाहीं. जें वर्तमान सांगितलें त्यांत छाण करून जसी आज्ञा होईल त्याप्रमाणें उत्तर ल्याहावयास आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter from Appaji Ram to Nana refers once more to the dispute between Ahalyabai and Tukoji and to the administration of the Suba of Jhanshi.*

No. 246 August 1783.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—श्रीमंतांचें पुरवणीपत्र आपले नांवें सादर जालें जे, येथें ऐकण्यांत आलें आहे कीं, चंदेरीवाला व खेची यांणीं सरकारचे महाल दाबले आहेत ते तूर्त त्यांकडे राखोन, त्या महालांपैकीं खर्चास त्यांनीं घेत जावें असा करार राजश्री पाटिलबावांनीं आंतून केला आहे म्हणोन ऐकतों. त्यास, सरकारचे महाल संस्थानिकांस गुंतऊन खर्चास देवावे हें ठीक दिसत नाहीं. सालमजकुरीं महालच्या रसदा घेतल्या ते कमाविसदार बुडाले. त्यांचे बोभाट येथें येतात.

अद्याप त्यांचीं ठाणीं सुटलीं नाहींत. तेव्हां पेस्तर सालची रसद येणें कळतच आहे. पाटीलबावा त्या प्रांतीं आहेत, तेव्हां सरकारच्या कामाचा बंदोबस्त आधीं होत असावा. तूर्त मसलतीकरितां उगेच असावें. सरकारचे महाल कोणास जिरणार आहेत ? असें मागें लिहिलें आलें होतें. परंतु आंतील पर्याय असा ऐकण्यांत आला यास्तव लिहिलें आहे, म्हणोन छ २८ जमादिलावलचें आज्ञापत्र सादर जाहलें. तें श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस दाखविलें. त्यांनीं उत्तर केलें कीं, महतपूर सोडऊन दिलें. ठाणें खुटावद खेचीकडे आहे. त्यास प्रस्तुत इंग्रज या प्रांतीं आहेत तोंपर्यंत खेचीसीं बोलतां येत नाहीं. लवाड आहेत. इंग्रजांकडे अनुसंधान लावितील. याकरितां येथून इंग्रज माघारा कूच करून गेला म्हणजे ठाणे देवितों. शाहाडौरा येथील मामलत, दिनकर बाबूराव फडणीस परगणे मजकुरीं सरकारांतून होते, त्यांणीं पंधरा हजार रुपये रसद पाटिलबावांचे सरकारांत कबूल करून, मामलतीच्या सनदा वस्त्रें यांजकडून घेऊन शाडौऱ्यास गेले. त्या महालाकरितां विनंती बहुत वेळ केली, परंतु ध्यानास न आलें. पंधरा हजार रुपये रसद घेऊन मामलेदार पाठविला. कमावीसदारी दिनकरपंत सरकारचे फडणीस त्यांनींच केली. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*In this letter from Sadashiv Dinkar to Nana occupation of certain outposts in Malwa by Mahadji is explained.*

No. 247 August 1783.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—मुंबईचा कंपू ग्वालेरीस येऊन किल्ला पाहून लष्करास आले. राजश्री पाटिलबावांसह मंडळी आडवे भेटीस जाऊन, परस्परें भेटी होऊन, इंग्रजांस आपले डेऱ्यास घेऊन आले. आदरसन्मान वस्त्रें साडे तीन सर्वांस, दोन सरदार गाडर वगैरे यांस दोन शिरपेंच देऊन बिदा केलें. दुसरे रोजीं बावा त्यांचे डेऱ्यास जाऊन सन्मान घेऊन आले. इंग्रजानें दुसरे रोजीं कूच करून खितोलीस मुक्कामास गेला. तेथून गोहद दीड कोस होती. राणा संदर्भ लावील म्हणून संदेह चित्तांत येऊन, गोहदेच्या आसपास चौक्यांची खबरदारी बरीच केली होती. इंग्रजानें खितोलीवर एक मुक्काम करून, दुसरे रोजीं रातव्यानें* कूच करून भिडेस गेला. बहीर बुणगे मागाहून जात असतां कांहीं झांबडाझांबड जाली. वर्तमान राजश्री पाटिलबावांस कळलें. त्यावरून खिन्न होऊन दत्तू खिजमतगार

*रात्रीं.

व इंद्रसेन धाकटा याजकडील मुनशी यांस शें दोनशें स्वार बरोबर देऊन रवाना केले. लूट लबाड कोणीं केली त्याची तहकिकात करावी, भिंडेस इंग्रज मुक्काम करून आहे त्याजवळ जाऊन बहुता प्रकारें परिहार करून समाधान करावें, वस्तवानी काय गेली असेल तिची याद करून ठिकाणीं लागल्यास द्यावी, न लागे तिचा रुपया द्यावा आणि संतोष करावा, असें सांगितलें आहे. पेंढारी यांनीं लूट केली, बोभाट आहे. कोणी शिलेदार पथक्यांचींही नावें घेतात. दत्तू खिजमतगार आल्यावर कळेल वर्तमान तें विनंती करीन. असेंही ऐकण्यांत आलें जे, सुरत मुंबईकर इंग्रजांनीं बोलणें बोलून गेले कीं, आह्मी यमुना कालपीस उतरून, पैलतीरीं अंतरवेदींत मुक्काम करून कलकत्त्यास लेहून पाठऊं, तेथून आज्ञा आल्याप्रमाणें वर्तणूक करूं, असें येथें बोलून गेले आहेत. यमुनातीरीं कालपीजवळ अंतरवेदींत मुक्काम करून राहण्यांत अर्थ काय असेल न कळे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. हा कंपू भिंडेजवळच मुक्काम करून आहे. धाकटे इंद्रसेनास त्यांचें बोलाऊं आलें होतें. गेला. डेरे बुनग्या सुद्धां गेला. कांहीं दिवस त्यांजवळ राहील. याचें कारण काय असेल न कळे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the reception of British officials by Mahadji near Gwalior. Mahadji and Goddard exchanged visits on the latter's return journey to Bengal from Surat.*

No. 248 6th September 1783.

पौ छ २ जिल्काद आर्बा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती. उपरी. इंद्रसेन याणें पांच कलमें कलकत्त्याहून लेहून आणवावीं व तीन कलमांचा जाबसाल येथेंच करून द्यावा, याप्रमाणें करार केला. कलमवार पूर्वी आपणांस लिहिलेंच होतें. त्याचीं उत्तरें बितपशील :—

कलकत्त्याहून पांच कलमांचें पत्र इष्टिनापासून कंपनीचे मोहर सुद्धां आणून द्यावयाचा करार, त्याचा तपशील. हैदरखान यांणीं महंमद आलीखान व इंग्रज यांचा मुलूक घेतला आहे व पाडाव* इंग्रजांकडील त्यांजकडे गेले आहेत. त्यास, श्रीमंत पेशवेसाहेब यांणीं हैदरखानास सांगावें. त्याप्रमाणें हैदरखानानीं ऐकिलें

*युद्धांत पाडाव केलेले कैदी.

तर, श्रीमंतांचे दोस्तींत खान राहतील तोंपर्यंत, इंग्रजांनीं खानाशीं कोणेही प्रकारें खलश* करूं नये. कदाचित् न ऐकून विरुद्ध केल्यास, इंग्रजांनीं व पेशवेसाहेब यांणीं सामील होऊन मुलूक सोडवावा. त्यापैकीं महंमद आलीखान व इंग्रज यांचा मुलूक उभयतांकडे राहील. श्रीमंत पेशवेसाहेब यांचा मुलूक यांजकडे राहील. शिवाय मुलूक हैदरखानाचा सुटेल, त्यापैकीं निमे पेशवे व निमे इंग्रज याप्रमाणें मुलूक वांटून घ्यावा. आपआपले मुलकाचा लगता घ्यावा. आणि हैदरखान सलुखाचे तहास आले, तरी पेशवे साहेब इंग्रजांस घेऊन तह करतील; परभारें इंग्रजांशीं बोलतील. इंग्रजांनीं बोलूं नये व सिलसिला राखूं नये. पेशवे यांचे दोस्तींत शफतपूर्वक इंग्रजांनीं कायम असावें. याप्रमाणें कलम ठरावांत आलें. त्यास, छ २१ रावलची† तेरीख तहनाम्यावरी आहे. तेव्हांपासून सहा महिन्यांत, महमदअली व इंग्रज यांचा मुलूक व पाडाव सोडून दिल्ह्यास, इंग्रजांनीं त्यासीं खलश करूं नये असा करार. त्यास छ २१ रमजानीं सहा महिने जाहले; कराराप्रमाणें अमलांत आलें नाहीं. त्यापक्षीं त्याजवरी मसलत करणें प्राप्त. येविशींचा ठराव वर लिहिला आहे. त्याप्रमाणें आपणाकडून कलम सरकारचे मोहरेनिशीं लेहून यावें, ह्मणजे इंग्रजांकडीलही सदरहू अन्वयें लेहून येईल.

श्रीमंत कैलासवासी यांचे कारकीर्दीत तहनामे जाहले आहेत, त्याप्रमाणें साबक‡ दस्तुर जहाजें वगैरे दुतर्फा चालत आल्याप्रमाणें चालावें. तिजारतीस§ साबक दस्तुर तहनाम्यांत लिहिलें आहे. जहाजांस साबक दस्तुर ल्याहावयाचें राहिलें तें लिहून द्यावें, याप्रमाणें करार. त्यास, लिहिल्याप्रमाणें साबक दस्तुराचें कलम कलकत्त्याहून कंपनीचे मोहरेनिशीं लेहून आलें. याप्रमाणें आपणाकडून सरकारचे शिक्यानिशीं लेहून आलें म्हणजे इंद्रसेनास देऊन त्याजवळून घेऊं.

कलम १.

श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचे दस्ताऐवजी कागद इंग्रजांपाशीं असतील ते झाडून द्यावे व चुकोन राहिल्यास रद्द असेत, याप्रमाणें करार. त्यास हें कलम इंद्रसेनानें कलकत्त्यास लेहून पाठविलें. त्याचें उत्तर आलें कीं, दादासाहेब त्यांजवळ आलेच आहेत. त्यांचे दस्ताऐवजी कागद आह्मांपाशीं काय आहेत, ते त्यांस ठाऊक असतील. त्यांचे हातची याद दस्ताऐवजी कागदांची पाठवून द्यावी. आह्मांपाशीं कागदपत्र असतील ते देऊं.

कलम १

*कलह. †२४ फेबुवारी १७८३. ‡पूर्वीचा रिवाज. §व्यापार संबंधी.

गायकवाड यांणीं पूर्ववत्प्रमाणें श्रीमंत पेशवे यांसीं वर्तणूक करावी. न केल्यास इंग्रजांनीं आसरा देऊं नये, मदत करूं नये, याप्रमाणें करार. त्यास सदरहू कलमाचा जाबसाल इंद्रसेन याणें कलकत्त्यास लेहून पाठविला. तेथून कंपनीचे मोहरेनिशीं लेहून आलें कीं, श्रीमंत पेशवे यांचे राज्यांतील सरदार वगैरे कोणी यांस इंग्रजांनीं आसरा न द्यावा व मदत करूं नये. या अन्वयें आपणाकडून सरकारचे शिक्यानिशीं लेहून यावें, ह्मणजे इंद्रसेनास देऊन त्याजवळून घेऊं.

कलम १

कुमक परस्परें काम पडल्यास करावी. फौजेचे खर्चाचे अजमासें परस्परें द्यावें घ्यावें, याप्रमाणें करार. त्यास, सदरहू कलमाचा जाबसाल कलकत्त्याहून आला कीं, खर्चाचा जावसाल मोघम ठीक नाहीं. आह्मांकडून पलटणें कुमकेस येतील, त्यांस त्यांणीं काय द्यावें; व आह्मांस काम पडल्यास फौज बोलावूं, तेव्हां फौजेसही आह्मीं काय द्यावें याचा ठराव असला ह्मणजे पुढें लढा पडणार नाहीं. ह्यास येविशीं त्यांस कसें बोलावें. यांचे ठरावाचा प्रकार कसा, तो लिहून पाठवावा. त्याप्रमाणें यांसीं बोलून निश्चयांत आणावयास येईल.

इंद्रसेन याणें येथेंच तीन कलमें करून द्यावयाचा करार, त्याचा तपशील :–

श्रीमंत राजश्री दादासाहेबांचें कलम तहनाम्यांत, अगोदर मुलूक व ठाणीं द्यावीं, उपरांतिक दोन महिन्यांत दादासाहेबांस द्यावें, असें लिहिलें आहे. त्यास, हल्लीं इंद्रसेनासीं बोलून दादासाहेबांस व मुलूक ठाणीं एकदांच द्यावीं याप्रमाणें पक्कें करून घेतलें आहे. याप्रमाणें आपणास पूर्वीं लिहिलेंच होतें. त्यास, श्रीमंत राजश्री दादासाहेब आपणापाशीं आले व मुलूक ठाण्यांच्या सोडचिटच्या आपणापाशीं मुंबईकरांनीं पाठविल्या, तेव्हां या कलमाचा लढा इंग्रजांकडे राहिला नाहीं. इंद्रसेनानें करारप्रमाणें पार पाडलें. कलम १

तहनाम्याप्रमाणें वर्तणूक करावी असें मुंबईवाल्याचें पत्र आणून द्यावें असा करार. त्यास, येविशीं इंद्रसेन याणें कलकत्त्यास लेहून पाठविलें. त्यावरून मुंबईवाल्यास पत्र देण्याविशीं कलकत्त्याचें आलें; तें इंद्रसेनानें मुंबईस पाठविलेंच आहे. हल्लीं इंद्रसेनाचें पत्र घेऊन पाठविलें आहे, तें त्याजकडे पाठऊन द्यावें. ह्मणजे कराराप्रमाणें मुंबईवाल्याचें पत्र येईल. कलम १

वसई व आरनाळा येथील तोफा, रेहकले* पेशजीं ठाण्यांत होते, त्याप्रमाणें द्यावे असा करार. त्यास, येविशीं इंद्रसेनानें परभारें मुंबईवाल्यांस लेहून पाठविलें

*तोफगाडे

आहे, व हल्लींही पत्र मुंबईवाल्यांस इंद्रसेनानें दिल्हें, तें पाठविलें आहे. त्यांकडे पाठवावें ह्मणजे कराराप्रमाणें तोफा, रेहकले देतील. कलम १

सरदहू आठा कलमांचे जावसाल लिहिल्यावरून ध्यानास येतील. कलकत्त्याहून पांच कलमांचा कागद कंपनीचे मोहरेनिशीं यावयाचा करार, त्यापैकीं सावक दस्तुर व गायकवाड दोन कलमांचा कागद, कंपनीचे मोहरेनिशीं इंद्रसेनाजवळ आला आहे. तीन कलमांचा जाबसाल लेहून यावयाचा, त्यास आपणाकडून वर लिहिल्याअन्वयें पांच कलमांचें पत्र सरकारचे मोहरेनिशीं यावें, ह्मणजे त्यांजकडील आणवून घेऊन, आपलें त्यांस द्यावयास येईल. साहा महिन्यांत इंग्रजांचा व महंमदआलीचा मुलूक व पाडाव टिपूनें सोडन द्यावे असा करार. त्यास साहा महिने छ २१ रमजानीं होऊन चुकले. अद्यापि त्याजकडून मुलूक व पाडाव सुटत नाहींत. तेव्हां त्याजवरी मसलत करणें प्राप्तच आहे. येविशीं इंग्रजांची निकड बहुत आहे. कराराप्रमाणें इंग्रजांनीं श्रीमंत दादासाहेब व मुलूक ठाण्यासुद्धां दोन मुद्दे सरकारचे पार पाडून दिल्हे. टिपूकडील जाबसाल सरकारांतून पार पाडून देणें राहिला, त्याची तर्तूद आपण केली असेल. फौजेची रवानगी जलद घडावी. इंग्रजही कराराप्रमाणें टिपूचे मसलतीस सामील होतील. इंद्रसेनाचीं पत्रें दोन, एक तोफा रेहकल्याविशीं व दुसरें तहनाम्याप्रमाणें वर्तणूक करूं ह्मणून, सरकारांत मुंबईकरांनीं पत्र लेहून द्यावें त्याजविशीं, अशीं मुंबैकरांस घेऊन पाठावलीं आहेत. मुंबईस रवाना करावीं. रवाना छ ८ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*This paper contains Mahadji's replies to the additional articles suggested by the Poona Ministry for inclusion in the treaty. Mahadji urges the Ministry to dispatch at once a force to the south to co-operate with the English against Tipu.*

No. 249 7th September 1783.

पैवस्ती चंद्र २ जिल्काद आर्बा समानीन

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. आपण चंद्र १० रमजानचें पत्र पाठविलें तें पावलें. बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी वरचेवरी वर्तमान लिहून पाठ-

वीत जावें. वसई आर्नाळा येथील तोफा रेहकल्यांविशीं व आमदाबादेविशीं व राजश्री तुकोजी होळकर यांचे मजकुराविशीं व फरासिसांकडील वगैरे सविस्तर पुरवण्या लिहून राजश्री नारो शिवदेव यांस पाठविल्या आहेत, त्यांवरून ध्यानास येईल. तोफा रेहकल्यांविशीं इंद्रसेन याचें पत्र मुंबईकरांस पाठवावें, व होळकराचें घरांतील तूर्त समेट होऊन मसलतीवर उपयोगी पडत, तें गंगाजलनिर्मळ अहल्याबाईस लिहून, लौकर अमलांत यावें म्हणून लिहिलें, व राजश्री नारो शिवदेव यांचे नांवें पुरवण्या लिहून पाठविल्या, त्यांवरून सविस्तर कळलें. ऐसियास तोफा रेहकल्यांविशीं इंद्रसेनाचें पत्र मुंबईकरांस पाठविलें आहे. होळकरांकडील वगैरे मजकूर आलाहिदा पुरवण्या लिहिल्या आहेत, त्यांवरून कळेल. रवाना चंद्र ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana of his having secured letters from Anderson to the Government of Bombay for restoring several guns and tumbrils captured at Bassein and other places.*

No. 250 *7th September 1783.

॥ २ जिल्काद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती. उपरी. दिल्लीस सरकारचा अखबारनवीस आहे. त्यास, अबदुल अहदखां यांणीं बोलावून, बोलण्यांत आणलें कीं, पेशजी विसाजीपंत† वगैरे सरदार, हिंदुस्थानांत येऊन सल्तनतीच्या‡ कामावर मुक्त्यार जाले होते, त्यांनीं या प्रांतांत सरकारचा अंमल बसविला होता. ते माघारे गेल्यावर सुजातदौले व नजफखान यांनीं इटावे व सिकोहाबाद व मेरट वगैरे महालीं सरकारचीं ठाणीं उठवून आपला अंमल बसविला. असो. हल्लीं मीर शफीखान राजश्री महादजी शिंदे यांजकडे गेले आहेत. त्यांची भेट जालियावर बहुत आदर मुदारत§ करून मेळवून घ्यावें. त्यांचे चित्तांत कांहीं वांकडें असें दाखवूं नये. अकृत्रिम दोस्ती चालावी, याअन्वयें त्यांसीं गोडी दाखवावी. तोडजोडीनें शहाजादे यांस आपल्या

---

*या पत्राची तारीख १७ सेप्टेंबर १७८२ अशीही असूं शकेल.

†विसाजीपंत बिनीवाले यांच्या १७७०-७१ च्या दिल्लीच्या स्वारीचा हा उल्लेख आहे. ‡दौलतीचा. §आदर सत्कार.

हस्तगत होत असें घडावें, व शहाजादा हवालीं करून घ्यावयाविशीं पातशाहाचा शुकाही* इकडून येईल, याप्रमाणें अबदुल अहदखान बोलिले. अथवा, शिद्यांनीं यविशीं खानमजकूर यांस व मजला पत्रें पाठवावीं म्हणजे शहाजादा हवालीं करण्याविशीं पातशाहाचा शुका पाठविण्यास गुंता नाहीं. याप्रमाणें दिल्लीस सरकारचा अखबारनवीस आहे त्यानें लिहिलें. हें वर्तमान तिकडेही लिहिलें आलेंच असेल. परंतु येथें लिहून आलें, यास्तव लिहिलें आहे. राजश्री पाटील-बावांस कळवावें, आणि गुप्तच राखावें. जाहिराण्यांत आणूं नये. गुप्त असावें. नाहीं तर, अखबारनिसास पेंच पडेल, असें त्यानें लिहिलें आहे. म्हणोन राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें, तें कळलें. ऐसियास, पूर्वी हिंदुस्तानांत आलों होतों, तेव्हां इटावें वगैरे जागा घेऊन सरकारचा अंमल अंतरवेद वगैरे बसविला, आणि दिल्लीस येऊन दिल्ली रोहिल्यांपासून घेतली, पातशाहास आणून दिल्लींत बसविलें. अबदुल अहदखान जावतेखानापाशीं होता, तो येऊन भेटला. त्यास पातशाहापाशीं आम्हींच ठेविला. पातशाहा दिल्लीस आल्यानंतर, रोहिल्यांवरी मोहीम करून रोहिल्यांशीं लढाई जाहली. रोहिले मोडले. फत्तरगड घेतल्यावर, सुजातदौलाकडील येलचखान व अनुपगीर गोसावी आले. वजिरानें व आपण मिळोन गंगापारचा मुलूक व अलीकडील मुलकाचा बंदोबस्त करून, निम्मेप्रमाणें वांटून घ्यावा, व रोहिल्यांकडील वगैरे मामलती होतील त्यांचीही वांटणी निम्मे-प्रमाणें, असा करारमदार जाला असतां, सरकारांतून मुक्त्यार होऊन आले होते त्यांचे विचारें न येतां, माघारे दिल्लीस आले; आणि पातशाहापासून श्रीमंत कैलासवासी नारायणरावसाहेब यांचे नांवें बक्षीगिरीचा करारमदार करून घेतला होता. त्यास, विसाजीपंत व होळकर एक होऊन जावतेखानास बक्षी-गिरी द्यावयाचें घाटूं लागलें. अबदुल अहदखानही याच गोष्टीचे संमतांत मिळाले. यामुळें विसाजीपंत व होळकर यांचें व आमचें वांकडे पडलें. याकरितां आम्ही दिल्लीहून माघारे फिरोन आलों. विसाजीपंत व होळकर कडा कुरा सोडून घ्यावया-करितां रामघांटापर्यंत गेले. तिकडून सुजातदौला फौज व पलटणें सुद्धां आले. तेव्हां विसाजीपंत व होळकर निघोन तडीक माघारे आले. मागें सुजातदौल्यानें इटावें वगैरे जागा घेऊन अंमल आपला बसविला. यमुनेअलीकडील मुलूक होता, तेथें नजफखानानें अंमल बसवून बंदोबस्त केला. त्या दिवसापासून नजफखान बळावला. तो मेला †तरी त्याची जमियत, फौज व पलटणें जीं आहेत, तींच

*आज्ञापत्र. †ता.६-४-१७८२ रोजीं नजफखान मरण पावला.

आहेत. मीर्जा सफी वगैरे यांचाच बंदोबस्त आहे. पातशाहाजादा बहुमानार्थ समागमें घेऊन फिरतात. एक पातशाहाजादा हाताखालीं घातल्यानें बंदोबस्त होतो असा अर्थ नाहीं. या कामास फौज मातबर पाहिजे. तेव्हांच बंदोबस्त होईल. पहिले स्वारीस जीवाभ्य श्रम करून अंतरवेद सोडविलीं, व करोडी रुपयांच्या मामलती व करोडी रुपयांचा मुलक सरकारांत यावा, असेंच केलें होतें. त्याचा प्रकार कोणीकडून कसा जाहला, हें समक्ष सांगितलें व आपण परभारेंही एकिलेंच आहे. ध्यानांत नसेल असें नाहीं. असो. तूर्त पातशाहाजादा व मीर्जा सफी भेटीकरितां आले. भेटून ते माघारे गेले.* सर्वांसीं राजकारणाचे नाद लावून ठेविले आहेत. तोंडचे गोष्टीनें होत नाहीं. फौज मातबर त्यांजपाशीं आहे, व पलटणें चाळीस व तोफखाने मातबर जमियतेनशीं जबरदस्त आहेत. यामुळें इंग्रज देखील त्यांजवरी हात टाकूं पावत नाहींत. त्या कामास वरीस दोन वर्षें मेहनत करावी लागेल. तेव्हां युक्तियुक्तीनें तें राजकारण सिद्धीस. जाईल. कळावें. रा छ० ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती

¶*To Nana's suggestion that he (Mahadji) should offer protection to the Shahzada and thus secure control of the imperial administration, Mahadji replies that such a task required time and efforts of an extraordinary kind.*

No. 251 7th September 1783.

पौ छ २ जिल्काद आर्बा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी. सरकारचा व इंग्रजांचा तहनामा जाला, त्यांत हैदरखानाकडील कलम लिहिलें आहे कीं, इंग्रजांचा घेतला मुलूख व पाडाव सोडावे. त्यास, सदरहूअन्वयें खानाकडील नूरमहमदखान येथें आहेत, त्यांसही चार गोष्टी समजाऊन सांगून, आह्मीं आपलें पत्र टिपूस पाठविलें, व नूरमहमदखानाकडून लिहविलें आहे. जाब आल्यावर समजेल. त्यास, फरासीस† आले

---

*मीर्झा शफी व महादजी यांची भेट धोलपुरजवळ अटेर येथें ता. ९-७-१७८२ रोजीं झाली.

†A French fleet under De Suffrein visited Indian waters and landed a small force early in 1782.

असतां टिपू एकाएकीं ऐकेल असें दिसत नाहीं. तथापि हैदरखानानीं इंग्रजांचा मुलूक सोडून द्यावा व पाडाव सोडावे; तसेंच, हैदरखानाचेही मुलकापैकीं कोठें इंग्रजांनीं घेतला असेल तो, व हैदरखानाकडील इंग्रजांकडे कोणी असतील ते, इंग्रजांनीं सोडावे हें परस्परें कलम आहे. तेव्हां करारांत असेलच. परंतु लिहिण्यांत आलें नाहीं, याकरतां लिहिलें आहे. व टिपूस कांहीं तरी उगेच लौकिकार्थ इंग्रजांनीं जागीर व एखादा किल्ला द्यावा असें म्हटल्यास, कांहीं तोड इंग्रजांशीं बोलून काढावी लागेल. येविशीं राजश्री पाटीलबावांस सूचनार्थ सांगावें हें उगेंच लिहिलें आहे. टिपू या पल्यावर आला, तरचा विचार. नाहीं त्यापक्षों मसलत प्राप्तच आहे. उगेंच सूचनार्थ लिहिलें आहे. ह्मणोन राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें तें कळलें. ऐसियास आपण तहाचे अन्वयें मुलूख व पाडाव सोडावयाविशीं नूरमहमदखान यांसी चार गोष्टी समजावून सांगून, आपलें पत्र टिपूस पाठविलें व नूरमहमदखान यांजकडून लिहविलें आहे. त्याचीं उत्तरें आलींच असतील. त्यांतील भाव काय तो लिहून पाठवावा. फरासिसाचा मजकूर तरी, विलायतेस फरासिसाचा व इंग्रजांचा सलूख* जाहल्याचें वर्तमान आहे. तेव्हां फरासीस आले ते माघारे जातील अथवा इंग्रजांस सामील होऊन टिपूवरच मसलत करतील. तहाचे तारखेपासून साहा महिन्यांत टिपूनें मुलूख व पाडाव सोडून द्यावे, ते गोष्ट न जाहली. छ २१ रमजानीं साहा महिने होऊन चुकले. आत फरासिसांचा व इंग्रजांचा सलूख जाहला, हें वर्तमान टिपूस समजल्यावरी सलुखाचा पैगाम† टिपूनें आपणांसीं लाविला, तरी इंग्रज ऐकणार नाहींत. साहा महिन्यांत करारांप्रमाणें टिपूनें ऐकिलें असतें, तरी इंग्रजांस त्यासीं बोलावयास जागा नव्हती. वाइदा टळला, त्या अर्थीं सरकार, आपण मिळोन, टिपूचें पारपत्य करावें, असा निश्चय इंग्रजांचा आहे. तेव्हां इंग्रज टिपूस जाहगीर व एखादा किल्ला द्यावयाचें कबूल करतील, हें कळतच आहे. वाइदा होऊन गेला, याउपरी फौजेची रवानगी टिपूवरी जलद व्हावी. फौज निघोन त्या सुमारें चालली ह्मणजे आह्मांकडील कंपू सामील होतील, फौजेस दिवसगत नसावी, याप्रमाणें इंग्रजांकडील निकड आहे. तरी फौजेची रवानगी भाद्रपद मासीं व्हावी, ते न जाहली. दसऱ्यास तरी रवानगी जरूर जाहली पाहिजे. फरासिसांचा व इंग्रजांचा सलूख जाहला. फरासिसांचा आसरा टिपूस होता तो तुटला. याउपरी इंग्रजां

*इंग्रज फ्रेंचाचा युरोपांत तह जाल्याची बातमी जुलै १७८३ मध्यें एथे येऊन पोहोंचली. †सूत्र.

टिपूवरी जरब बसवून त्याजकडील मुलूक घेतील. आपली फौज न पोहचतां, ते मुलूक घेतील. त्यांत वांटणी इंग्रज देणार नाहीत. फौज सामील जाहल्या दिवसापासून मुलूक सुटेल त्याची वांटणी घ्या ह्मणतील. याकरितां फौजेची तर्तूद जाहली पाहिजे. फौज सरकारची आतांपासून टिपूचे मसलतीवरी गेली, ह्मणजे तहनाम्याप्रमाणें सचोटी राहून, कराराप्रमाणें मलूक सुटेल त्याची वांटणी सरकारांत येईल सरकारची फौज अशांत न गेली, तरी फरासिसांचा इंग्रजांचा सलूख जाहलाच आहे. दोघे एक होऊन, टिपूस जरबेंत आणून, जितका मुलूक टिपूकडे आहे तितका घेतील. मग सरकारचा मुलूक टिपूकडे आहे तो व टिपूचा मुलूक सुटेल त्याची वांटणी द्या ह्मटल्यास, इंग्रज देणार नाहींत. मग आह्मी मध्यस्त ह्मणून आपण आह्मांस लेहूं लागतील, यास्तव आपणास लिहिलें आहे. तरी फौज दसऱ्यास निघोन तिकडे जाऊन पोंहचली ह्मणजे कराराप्रमाणें इंग्रजांसीं बोलावयास जागा राहील. फौज लौकर न गेल्यास इंग्रजांसीं बोलावयास जागा राहणार नाहीं. पुढें आपण आह्मांवरी शद्व ठेवतील यास्तव लिहिलें असे. रा॥ छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji urges Nana not to miss the opportunity of making war on Tipu in co-operation with the English as Tipu's European ally the French had made peace with the English and had withdrawn from the contest.*

No. 252 7th September 1783.

पौ छ २ जिल्काद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस:—

दंडवत विनंती. उपरी. मुसा भुसी फरासीस आपले जमावानिसीं गुडळुरास आला. त्याचें पत्र पूर्वी आह्मांस आलें. त्याची नक्कल करून राजश्री पाटीलबावांस पाहावयाकरतां पाठविली, त्यावरून कळलेंच असेल. प्रस्तुत दुसरें पत्र त्याचें आलें, त्याचीही नक्कल करून पाठविली आहे. पाटीलबावांस दाखवावी. त्यावरून कळेल. टिपू आपले सरंजामानसीं मजबूद. त्यांत फरासीस आले यामुळें टिपूचीं व फरासिसांचीं पत्रें हिंमतीचीं येतात. मुसा भुसीकडून एक टोपीकर मुसा मलवो, पालखीनिसीन, याबराबर श्रीमंतांचें लग्न जालें याकरतां कांहीं जिन्नस देऊन पाठविला, तो येथें आला. श्रीमंतांस जिन्नस आणिला तो नजर केला. मुसा मलवो लौकरच निरोप घेऊन मुसा भुसीकडे जाणार. त्यांणीं लग्न

जाल्याकरतां जिन्नस मातबराबरावर पाठविला, तेव्हां श्रीमंतांकडूनही लग्नाचीं वस्त्रें मुसा भुसीस पाठविणें प्राप्त. याकरतां व फरासिसांची फौज व सरंजाम तोफा वगैरे काय आहे याचीही बातमी कळावी यास्तव, एक कारकुनाबरावर वस्त्रें देऊन, मुसा मलवो यावरावरच रवानगी केली. याचें लिहिलें आलियावर समजेल. फरासिसांकडे व टिपूकडे नवाब निजाम आलीखान यांचेही वकील गेले आहेत. काय मसलत घडेल पाहावी. त्यास, इंग्रजांचे व सरकारचे तहनाम्यांत कलम हैदरखानाचें लिहिलें आहे, त्याप्रमाणें टिपूनें ऐकिल्यास बरेंच जालें. न ऐकिलें तर मसलत करावयाची. त्यास सुरतेस कंपू आहे येविशीं पूर्वी तुह्मांकडूनच लिहून आलें, कीं गरज असल्यास राहील; नाहीं तर इंग्रज त्यास बोलाऊन घेतील. त्यास पुढें मसलत प्राप्तच दिसते, तेव्हां कंपूंतील सरदारांस लिहून पाठऊं. तेव्हां त्यांणीं येऊन सरकारचे फौजेस सामील व्हावें. येविशीं इंद्रसेनासीं बोलून, त्याचें पत्र सरदारांस घेऊन पाठवावें, ह्मणोन राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें, तें कळलें. ऐसियास, फरासीस व इंग्रज व वलंदेज,आस्पहानी* या चौघां टोपीकरांचा परस्परें विलायतेस सलूख जाहल्याचें पत्र विलायतेहून कलकत्यास इष्टिनाकडे आलें. त्याणें त्याची नक्कलच इंद्रसेनाकडे पाठविली. त्यावरून इंद्रसेनानें नक्कलच पाहावयास पाठविली. त्यावरून कळलें. त्यास, हें वर्तमान मुसा भुसीकडेही कळलेंच असेल. यांचा त्यांचा सलूख जाहला तेव्हां फरासीस टिपूकडे आले, ते त्यास सामील राहातील हें कळतच आहे. आपणांकडे फरासिसांकडील मातबर आले. त्यांसीं बोलावें कीं, तुमचा व इंग्रजांचा सलख विलायतेस जाहला ह्मणोन ऐकतों. त्यास, तुह्मांस विलायतेहून पत्रें आलीं असतील अथवा येतील. तुमचे पातशाहाचा हुकूम तुम्हांस काय येतो, उपरांतिक तुमचा पक्का विचार समजेल त्यासारखें तुह्मांसीं बोलूं. याप्रमाणें बोलावें ह्मणजे फरासिसांकडील नाद राहतो; आणि सलूख टोपीकरांचा जाहला हे गोष्ट खरी असल्यास, तसाच खुलासाही त्यांजकडील निघेल. इंग्रजांचा व फरासिसांचा सलूख जाहला, तेव्हां इंग्रज टिपूवरी जरब बसवून मुलूक सोडवून घेतील. इंग्रजांचा करार टिपूचे पारपत्याचा जाहला, तो पक्काच आहे. टिपूनें सलूखाचा पैगाम† परभारें इंग्रजांसीं केला, तरी सलूख करीत नाहींत. कराराप्रमाणें सरकार व आपण सामील होऊन पारपत्यच करावें. मुलूक सोडवून कराराप्रमाणें वांटून घ्यावा हेच खंबीर आहे. तरी आपण टिपूचे मसलतीवरी

*स्पॅनिश Spaniards. †बोलणें, संधान.

फौज पाठवावयाची जलदी करावी. सरकारचे फौजेचें कूच होऊन, तिकडे फौज गेल्याचीं पत्रें आलीं ह्मणजे इंग्रजही कंपू पाठवितील. रा छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें लीभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs Nana that, peace had been finally established between the French and the English in Europe, and that it would be advisable for the Peshwa's government to start operations against Tipu in co-operation with English at once.*

No. 253 7th September 1783.

पौ छ० २ जिल्काद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती. उपरी. होळकरांचे घरीं बखेडा यामुळें सरकारचाकरीस अंतर पडतें. बखेडा दूर होत नाहीं. चार महालीं बाईंकडील कमाविसदार आहेत, त्यांची वहिवाट बाईंनीं करावी. बाकी रदकर्जाचे महाल सुद्धां वहिवाट तुकोजीबावा करितील. त्यास बाईकडून अडथळा होऊं नये, असें सांगितलें असतां सरकार-चाकरी घडते. यांजकडून भारी फौज धरवून मातबर मसलत सांगावयास ठीक पडतें. याअन्वयें पत्रांच्या रवानग्या बहुत केल्या, परंतु उत्तरच न येई. हल्लीं लिहिलें आहे तरी, लिहिल्याप्रमाणें पाटीलबावांनीं बाईंस चांगले रीतीनें लिहून पाठवून, लवकर अमलांत येई तें करावें. म्हणजे यांजपासून भारी फौज धरवन सरकारमसलतीवर उपयोगीं पडत तें करूं. सरकारकार्यावर नजर ठेवून करावें. म्हणोन राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिलें तें कळलें. ऐसियास होळकरप्रकर्णी पूर्वी आपलीं पत्रें आलीं, त्यांचीं उत्तरें लिहून पाठविलीं आहेत, त्यांवरून कळलेंच असेल. प्रथम बाईंनीं सारी वहिवाट करून फौजेस खर्चास द्यावें अशीं पत्रें आलीं, त्याजवरून बाईंनीं मान्य केलें. फिरोन दुसऱ्यानें देशचे महालची वहिवाट तुकोजीबावांनीं करावी, माळव्याची वहिवाट बाईंनीं करून महेश्वरचे डौलाचा खर्च वजा जाऊन, बाकी ऐवज फौजेस पाठवावा, हेंही बाईंस लिहून मान्य करविलें असतां, तुकोजीबावांनीं माळव्याचे महाल सुरंज व पाटण व बुंदी वगैरे देशीं विल्हे लावून बाईंस लिहून पाठविलें. तेव्हां बाईंकडे माळ-व्यांतील महाल राहतात ते किती, त्याचा पर्याय लिहून पाठविला. असें असोन, बाईंनीं महेश्वरचे खर्चाचे बेगमीची जागा ठवून, वरकड झाडून वहिवाट तुकोजी-

बावा करितील अशीं पत्रें येतात. यांत शाश्वत कोणतें समजून आम्हीं बाईस काय लिहावें ? उत्तम पक्ष, ज्याप्रमाणें पहिलेपासून होळकरांचे घरची चाल आहे त्याप्रमाणें बाईनीं सारी वहिवाट करून, चाकरी तुकोजीबावांनीं करावी. यांत बाईचें महत्त्व व सरदारीचें स्वरूप व सरकारचाकरी, तीन्ही गोष्टी घडतात. बाईचा अपमान केला असतां, पुढें सरकारचा उपयोग होणें ही गोष्ट समजलीच आहे. तुह्मी पोटापुरतें घेऊन स्वस्थ बसावें असें आमच्यानें बाईस सांगवणार नाहीं. असेंही आम्हीं सांगितलें, तरी ती कशी ऐकतील ? होळकरांचा आमचा भाऊपणा. रीतीची गोष्ट असल्यास न ऐकेत, तर समजोन सांगावयास येईल. गैररीतीची गोष्ट सांगितल्यास तीही ऐकणार नाहींत; आम्हांसही सांगणें उचित नाहीं. ज्या गोष्टींत बाईचें महत्त्व राहून सरदारीचें स्वरूप राहे आणि सरकार-चाकरीही घडे, तें करावें. पूर्वीपासून होळकराचे घरची चाल ह्मणावी, तरी कैलासवासी मल्हारजीबावांचे कारकीर्दीस गौतमाबाई कारभार करीत होती. त्यांचे माघें सुभेदार असतांहि मातुश्री अहिल्याबाईच वहिवाट सारी करीत आली, अशी चाल आहे त्या चालीप्रमाणें हल्लींही बाई सारी वहिवाट करून फौजेचे सरबराईस* पैका पाठवितील. बाईच्या हातें वहिवाट जाहल्यानें सरदारीचें स्वरूप राहील आणि सरकारचाकरीही घडेल. सालमजकूरचा माळव्याचे महालचा अजमास बाईकडून आणविला होता, तो आला. त्याची नक्कल पाठविली आहे त्याजवरून कळेल. रवाना छ० ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनं ी.

¶*This is of the same purport as No. 236. It refers to the dispute in the Holkar family which Mahadji was requested to settle. He disapproves of Nana's proposal to set aside Ahalyabai's management.*

No. 254 7th September 1783.

पवस्ती चंद्र २ जिल्काद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती उपरी. सरकारचा व इंग्रजांचा सलूख जाला. त्यास, तहनाम्यांत सरकारचीं घेतलीं ठिकाणें, इंग्रजांनीं सरकारांत आमदाबाद वसई वगैरे सुद्धां द्यावीं असा करार असतां, मुंबईकरानीं मुलखाच्या चिटया पाठविल्या, त्यांत आमदाबादची सोडचिटी पाठविली नाहीं. त्यावरून येथून मुंबईकरांस

*तयारी, तरतूद.

लिहिलें कीं आमदाबादची चिटी आली नाहीं व फत्तेसिंगाकडील महालच्याही चिट्या पाठवून द्याव्या. याचें त्यांणीं उत्तर पाठविलें कीं, आमदाबाद फत्तेसिंग गायकवाड याचे ताब्यांत आहे, व तेथें इंग्रजी फौजही नाहीं; व फत्तेसिंगाकडील महालच्या सोडचिटच्या फत्तेसिंगाकडे दिल्ह्या. हा मजकूर राजश्री पाटीलबावांस सांगावा. पूर्वी लिहिण्यांत येत गेलें कीं, वसई, आमदाबाद वगैरे घेतला मुलख, ठाणीं, किल्ले सुद्धां इंग्रजांनीं माघारीं द्यावीं व तहनाम्यांतही असतां आमदाबादेविसीं मुंबईकरांनीं असें लिहिलें. त्यास, गायकवाडाकडील मुलखाच्या सोडचिट्या येथें पाठविते तरी, आमदाबाद सरकारची सोडून दिल्ह्यावर गायकवाडाचा मुलूख त्याचा त्याजकडे देतों, अशी गायकवाडास अट होती. ते चिट्या गायकवाडाकडे परभाऱ्या दिल्ह्या आणि आमदाबादेविसीं उत्तर असें लिहिलें. हें कळावयाकरितां लिहिलें आहे. गायकवाडासही पत्रें सरकारचीं, सरकारचे खिजमतगाराबराबर आमदाबाद सोडून देणें म्हणोन पाठविलीं आहेत. त्याजकडील गमाजी पाटील आले आहेत. तेही म्हणतात कीं, आमदाबादचा दखल सरकारांत देतों. याअन्वयें त्यांणीं फत्तेसिंगास लिहिलें आहे. याप्रमाणें वर्तमान सांगावें व सतरागांव परगणा सरकारचा इंग्रजांकडे गेला होता, त्याची सोडचिटी सरकारांत यावी, ते गायकवाडाकडे पाठविली. याकरितां पाटीलबावांनीं इंद्रसेनासीं बोलावें कीं, करारांत असें असतां मुंबईकरांनीं गायकवाडाकडे सोडचिटी दिल्ही. मुंबईकरांची रीत या प्रकारची आहे म्हणोन राजश्री नारो शिवदेव यांस लिहिलें, तें कळलें. ऐसियास, फत्तेसिंग गायकवाड सरकारचे चाकर, त्यांजकडे आमदाबाद. तेव्हां इंग्रजांचें पत्र गायकवाडास आपण आमदाबादेविसीं मागावें हें ठीक नाहीं. इंग्रजांचें ठाणें असतें तरी, इंग्रज चिटी वरकड ठाण्यांच्या दिल्ह्या, तशा हेही देते. गायकवाडाकडे आपण सरकारचीं पत्रें देऊन खिजमतगार पाठविले आहेत व त्यांजकडील गमाजी पाटील आमदाबाद सरकारांत देतों म्हणोन आपणांसीं बोलतच आहे. आमदाबाद वगैरे सरकारचा मुलख फत्तेसिंगाच्यानें ठेववतो असा अर्थ नाहीं. असें असोन आमदाबाद सरकारांत न द्यावी, असा त्याचा विचार असल्यास, फार चांगलें. इतकेंच निमित्त ठेवून त्याचे पारपत्याचा विचार केल्यास सरकारचा नफाच होईल. यांत नुकसान होणार नाहीं. गायकवाडाचे पारपत्याची योजना केल्यास मसलत भारी पडावयाची नाहीं. इंग्रज कांहीं त्याची कुमक करणार नाहींत. येविसीं चित्तांत अंदेशा नसावा. इंग्रजांनीं ठाणीं मुलूख सोडून सरकारांत दिल्हा असतां गायकवाडाची प्राज्ञा

काय आमदाबाद ठेवितील ? सतरागांव परगण्याविसीं इंद्रसेनाचें पत्र मुंबईकरांस घेऊन पाठविलें जाईल. सरकारांतून गायकवाड यासही सतरागांव परगण्याविसीं लेहून पाठवावें. रवाना छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji replies to the request from Poona about Ahmedabad being demanded from Fatesinh Gaikwad through the English, that there was no need of approaching the English on the subject.*

No. 255 7th September 1783.

पौ छ २ जिल्काद.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:--

दंडवत विनंती उपरी. इंद्रसेन यास खाजगत दिडा लक्षाची जागा बसुली, सुरतेनजीक द्यावयाचा करार जाहला. त्यास, त्याच्या सनदा पाठवून द्याव्या, म्हणोन पूर्वी आपणांस दोन तीन पत्रें पाठविलीं. त्यांचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. इंद्रसेन प्रामाणिक, शहाणा. केल्या कराराप्रमाणें त्याणें अमलांत आणून दिल्हें. तो जाबसालांत आहे. तेव्हां आपले तर्फेनें अंतर पडों देणार नाहीं. सरकारउपयोगीं पडेल. पूर्वी आपण लाख रुपयेपर्यंत ठरावांत आणावें, असें लिहिलें होतें. त्यास, दिडाचा ठराव करून आपणांस लिहिलेंच आहे. उत्तर न आलें. याकरितां हल्लीं लिहिलें आहे. तरी, दिडा लक्षाचा महाल सुरतेनजीक नेमन सनदा इंद्रसेन याचे नावें पाठवून द्याव्या. राजश्री शिवाजी विठ्ठल यांजकडील उरपाड परगणा इंग्रजांकडील सुटला, तो त्यांचा त्यांजकडे द्यावा. मशारनिल्हेची सरदारी फारच गळाठ्यांत आली, याकरितां वारंवार आपणांस लिहितों. सरकारचाकरीचे उपयोगीं. अशा समयास त्यांजकडे महाल दिल्ह्यानें कांहींसा सांवर सरदारीस बसून सरकारचाकरी घडेल. तरी उरपाडची सनद त्यांजकडे देवावी. येविसीं अनमान नसावा. छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji repeats his request for the grant of a Jagir to Anderson, the Company's ambassador, who negotiated the treaty, and for Orpad being restored to Shivaji Vithal.*

No. 256 7th September 1783.

पौ छ २ जिल्काद.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती. उपरी. इंग्रजांचे तहनाम्यांत हैदरखानाचें कलम लिहिलें आहे, त्याप्रमाणें टिपूनें ऐकिल्यास उत्तम; न ऐकल्यास मसलत करणें प्राप्त. त्यास, पेशजी इंद्रसेनानें करार केला कीं, हैदरखानानें कराराप्रमाणें न ऐकिल्यास, खानाचा मुलूक सरकार व इंग्रज मिळोन सोडवून, वांटून घ्यावयाचें व जहाजाचे सावक दस्तूर लेहून घ्यावयाचें, वगैरे पांच कलमांविशीं कलकत्त्याहून इष्टिनाचें पत्र इंद्रसेनानें आणून द्यावें, असा करार करून कलकत्त्यास इंद्रसेनानें लिहून पाठविलें आहे, ह्मणोन पेशजी लिहिलें होतें. त्यास फार दिवस जाहले. इंद्रसेनानें इष्टिनाचें पत्र सदरहू पांच कलमांविशीं आणून दिल्हें किंवा नाहीं, हें कांहींच लिहिलें नाहीं. तरी इष्टिनाचें पत्र इंद्रसेनाजवळ आलें असल्यास, इंद्रसेनासीं बोलून, पत्र घेऊन लौकर पाठवावें. आलें नसल्यास लौकर आणवावें. पुढें मसलत करणें तेव्हां अगोदर हैदरखानाकडील मुलूक सुटेल त्याचे वांटणीचा व परभारें सलूख करणार नाहीं, वगैरे मजकूर करारांत येऊन, त्याप्रमाणें कलकत्याचा दस्तऐवज पक्का आणून द्यावयाचें ठरलें होतें, तो आलाच असेल, लौकर पाठवून द्यावा ह्मणोन राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून कळलें. ऐसियास, पांच कलमांपैकीं दोन कलमांचा जाबसाल पक्का होऊन इष्टिनाचें पत्र आलें. तीन कलमांचा जाबसाल होऊन यावयाचा आहे. त्याचा मजकूर आलाहिदा पत्रीं उगवून लिहिला आहे. त्याप्रमाणें हैदरखानाचे लेंकावरी फौजेची तयारी सरकारांतून होऊन रवाना जाहली ह्मणजे व पांच कलमांचें पत्र सरकारचे शिक्यानिसीं होऊन यावें, तें आलें ह्मणजे त्यांस देऊन, त्यांचें पत्र इष्टिनाचे दसकतानिसीं व कंपनीचे मोहरेनिसीं घेऊं. अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. रा छ ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana about the English not having yet ratified the new article relating to the partition of Tipu's territory in case of the latter's refusal to abide by the late treaty.*

No. 257 8th September 1783.

पैवस्ती छ २ जिल्काद अ५ा.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

दंडवत विनंती उपरी. विलायतेस इंग्रजांचा व फरासीस व वलंदेज व इस्पहानी यांचा सलूख होऊन परस्परें तहनामा जाहला. त्याची नक्कल इष्टिनाकडे कलकत्यास आली. त्यांणीं येथें पाहावयाकरितां इंद्रसेन याजकडे पाठविली. ती पाहून फारसी नक्कल करून आपणांस कळावें म्हणोन आपणांकडे पाठविली आहे. त्यावरून कळेल. जहाजाचा सावक दस्तूर व सरकारचे राज्यांतील सरदार व सावकार वगैरे कोणी इंग्रजांकडे गेल्यास, त्यांची पासदारी* व हिमायत† करूं नये. आसरा देऊं नये. दोन कलमांचा जावसाल कलकत्याहून लिहून आला त्याची नक्कल पाठविली आहे. आपण वसई आरनाळा येथील तोफांकरितां इंद्रसेनाचें पत्र मुंबईकरांस पाठवावें म्हणून लिहिलें, त्यावरून इंद्रसेन यास सांगितलें. त्याणें परभारें मुंबईकरांस लिहिलें होतें. त्याजवरून मुंबईकरांस आपण पुण्याहून पत्र लिहिलें त्याची नक्कल व मुंबईकरांनीं आपणांस उत्तर लिहिलें त्याची नक्कल, अशा दोन्ही नक्कला पाठविल्या त्या, बजिन्नस इंद्रसेन याणें दाखविल्या. त्यास मुंबईकरांच्या पत्राची नक्कल घेऊन आपणांकडे पाठविली आहे. तोफा वसई आरनाळचापैकीं मुंबईस आल्या असतील, त्या बरसात जाहल्यावरी करारा-प्रमाणें देऊं म्हणून पत्रांत स्पष्टच लिहिलें आहे. हल्लीं आपण लिहिल्यावरून इंद्रसेन याचेंही पत्र पाठविलें आहे. विलायतचा तहनामा व दोन कलमांचें पत्र कलकत्याहून आलें व मुंबईकरांचे पत्राची नक्कल एकूण तीन नकला फारसी पाठविल्या आहेत, त्यांवरून सविस्तर कळेल. रवाना छ १० सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji forwards for Nana's information two important papers—one containing a copy of the treaty of peace in Europe between England and France, and the other ratifying two additional articles suggested by the Poona Govt.*, (1) *one relating to the mutual intercourse of shipping and* (2) *the other about not giving protection to each other's subjects.*

*मानसन्मान. †साह्य.

No. 258 9th September 1783.

श्री

(आपाजीरामाचें पत्र)

छ सेवेसीं विज्ञापना तागाईत चंद्र ११ माहे सवालपावेतों मुक्काम ग्वालेर येथें समस्त मंडळी सुखरूप असो. विशेष :—इंद्रसेनापासून तीन कलमें लिहून घ्यावीं आणि त्यांनीं तिहीं कलमांची निभावणी करावी, याप्रमाणें करार ठरल्याप्रमाणें श्रीमंत दादासाहेब कराराप्रमाणें सरकारांत येऊन दाखल जाले. बाकी दोन कलमें राहिलीं, तींही या अन्वयें घडतील असें होतें. त्यास हल्लीं दहावे रमजानचीं पत्रें स्वामींचीं राजश्री नारो शिवदेव यांसीं व एक पत्र राजश्री पाटिलबावांसही आलें. त्यांत मजकूर लिहिला कीं, वसई अरनाळा येथील तोफा व रेहकले अद्याप सरकारांत आले नाहींत, व इष्टिनाचें पत्र मुंबईकरांस यावें तें अद्याप आलें नाहीं, म्हणून आज्ञा. त्यास, येविषयीं राजश्री सदाशिवपंत दाजी व आम्ही राजश्री पाटिलबावांची गांठ घालून ज्या पुरवण्या स्वामींच्या आल्या होत्या त्या बजिन्नस वाचून दाखविल्या. त्यांचीं उत्तरें तपशीलवार मशारनिल्हेनीं लिहिलीं आहेत, त्याजवरून विदित होईल. तोफा रेहकल्याविषयीं मुंबईकरांस पत्रेंही दोन्ही इंद्रसेनापासून घेऊन पाठविलीं आहेत. येऊन पावतील. वरकड पुढील इंग्रजांचे व सरकारचे कराराप्रमाणें मसलत करण्याचे अर्थ तपशीलवार राजश्री पाटीलबावांनीं व वकिलांनीं सेवेसीं लिहिले आहेत, त्याजवरून श्रुत होतील व मीही आलाहिदा पुरवणी लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. सरकारचा मुलूख व किल्ले इंग्रजांचा तह जाहल्यानंतर सुटेल, त्यास गुजराथपैकीं महाल सरंजामी यांजकडे पेशजी होते येविषयीं विनंति सेवेसीं पूर्वीच लिहिली होती. त्याचें उत्तरही स्वामींनीं दिलें तें पावलें. त्यास हल्लीं राजश्री पाटिलबावांनीं उरपाड महाल मशारनिल्हेकडे पेशजी होता, त्याप्रमाणें सरकारांतून चालता करणें म्हणून आम्हांस व वकिलास लिहावयासी सांगितलें, त्यावरून मशारनिल्हेनीं सेवेसीं पेशजीं लिहिलेंच असेल. हल्लीं फिरून आम्हांस सांगितलें कीं येविषयीं तुम्हीं लिहावें. तूर्त सरकारचे सरंजामी यांजपैकीं सरकारचाकरीचे उपयोगी पडावें असें पथक शिवाजी विठ्ठल यांचें आहे. येथें खराबींत आहेत. परंतु चार माणसें मशारनिल्हेचे पथकांत आहेत याजप्रमाणें येथील सरदारींतही नसतील. त्यास मशारनिल्हेचे महाल देशीं आहेत त्यांस होळकरांचा उपद्रव बहुत लागतो, याजमुळें बहुत श्रमी आहेत. दोन चार वेळ

आम्हांस बोलावून सांगितलें कीं, आम्हांस चाकरी करून फळ नाहीं त्यापक्षीं श्रीमंत राजश्री नानांनीं आपणापासीं न्यावें. जर सरकारचाकरीचे उपयोगी असलीं तर ठेवावें; नाहीं तर आहे तोही सरंजाम सरकारांत लावावा आणि निरोप द्यावा. यास्तव येविषयींचा विचार व्हावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram informs Nana of letters having been addressed by Anderson to the Government of Bombay for restoring to the Poona Durbar guns and ammunition captured at Bassein and other places.*

No. 259 9th September 1783.

(आपाजीरामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना तागाईत छ ११ माहे सवालपावेतों मुक्काम ग्वाल्हेर येथें समस्त मंडळी सुखरूप असो. विशेष :—राजश्री पाटीलबावांनीं आम्हांस व राजश्री पांडुरंग रघुनाथ यांसी बोलावून सांगितलें कीं, तळेगांवचे स्वारीस श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजांपासून आले. तेव्हां त्यांची रवानगी झांशीस करावी हा सिद्धांत जाहला. ते समयीं झांशीस दाखल होत तोंपर्यंत खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा ऐसें ठरलें. तेव्हां तमाम मुत्सद्यांपासून व सरदारांपासोन पंचवीस हजार रुपये दर असामीस घ्यावे याप्रमाणें ठरोन, ऐवजाचा जिमा आम्ही आपला करून श्रीमंतांची रवानगी केली. तेव्हां श्रीमंतांची ऐवजाविसीं निरास न होय याजकरितां राजश्री आबाजी नाईक वानवळे यांची निशा दिल्ही आणि मशारनिल्हेचे नांवें पन्नासा हजारांची चिटी श्रीमंतांनीं घेतली. ती चिटी अद्याप त्यांजपासींच आहे. यास्तव हा मजकूर तुम्हीं उभयतां राजश्री नानांस लेहून पाठवावा कीं, श्रीमंतांजवळ निशेची चिटी आहे ती मागोन घ्यावी आणि आम्हांकडे पाठवून द्यावी. नाहीं तर मागें पुढें नाईक मशारनिल्हेस उपद्रव गैरवाका कोणी श्रीमंतांस समजाऊन करतील. याजकरितां ती चिटी आणवावी म्हणोन सांगितलें. श्रीमंत सुरतेस होते तेव्हां एक वेळ नाइकास लिहिलें कीं, तुमचा दस्ताऐवज आम्हांजवळ आहे, तरी चिटीबराबर ऐवज आम्हांकडे पाठऊन आपलें खत घेऊन जाणें. ऐसें पत्र आलें होतें. याजकरितां हल्लीं सेवेसीं हा मजकूर ल्याहावयासी सांगितला, त्याजवरून विनंती लिहिली आहे. तरी येविसींचें उत्तर ल्याहावयासी आज्ञा जाली पाहिजे. हा मजकूर राजश्री पाटीलबावांनीं

पूर्वी लिहिलाच आहे व राजश्री नारो शिवदेव यांणींही लिहिला आहे. त्याजवरून विदित जाहलेंच असेल. बहुत काय लिहिणें. कृपालोभ सेवकावर केला पाहिजे हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram requests Nana on behalf of Mahadji to secure from Raghoba letters of credit given him in* 1779, *allowing him to draw sums up to Rs.* 50,000.

No. 260 9th September 1783.

श्री

(लेखक आपाजीराम)

छ सेवेसीं विज्ञापना तागाईत चंद्र ११ माहे सवालपावेतों मुक्काम ग्वाल्हेर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटिलबावांनीं आम्हांस व वकिलास बोलावून सांगितलें, कीं तहनामा श्रीमंतांचा व इंग्रजांचा जाहल्यास सहा महिन जाले, परंतु अद्याप सरकारचें पत्र टिपूकडे या मजकुराचें जाऊन त्याप्रमाणें त्याचें उत्तर आलें नाहीं; आणि तहनाम्यांत करार आहे कीं, सरकारची व इंग्रजांची दोस्ती होऊन तहनामे परस्परें दिले त्या तारखेपासून सहा महिन्यांत खानाकडील जाबसाल सरकार कराराप्रमाणें कबूल करून इंग्रजांचा व महमद-अलीखान याचा मुलूख व पाडाव सोडून द्यावे, आणि श्रीमंतांच्या तहनाम्या-प्रमाणें वर्तणूक करावी. ही गोष्ट खानांनीं कबूल न केली, तरी परिछिन्न पारिपत्य इंग्रजांनीं व श्रीमंतांनीं सामील होऊन करावें. येविषयींच्या पत्राच्या रवानग्या दहा पांच केल्या, परंतु त्यांचीं उत्तरें यथास्थित येत नाहींत. तेव्हां पुढें इंग्रज बदमामलीस आले असतां आम्हांस तुम्ही म्हणों लागाल कीं, तुमची मध्यस्ती असतां इंग्रज बेमानी करितात ही गोष्ट काय ? तर आम्हांकडे शद्ध नाहीं. आम्ही तह जाल्याचे पूर्वीच लिहीत गेलों कीं, सरकारची मर्जी असली, तरी यथें तहाचें बोलणें लागलें आहे हें विल्हेस लावूं. जरी मर्जी नसली तर वकिलास निरोप देऊं. असें लिहिलें असतां तेव्हां गोष्ट तह करावा म्हणोन करारांत येऊन लिहिलें आलें. त्याजवरून इंग्रजांचा व श्रीमंतांचा तह होऊन परस्परें तहनामे दिल्हे, व तहनाम्यांत ज्या गोष्टी होत्या त्यांपैकीं श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचें कलम घडून देशीं आले, वगैरे जाबसालही कराराप्रमाणें विल्हेस लागतील. परंतु इंग्रजांचा व श्रीमंतांचा सलूख जाहला ये गोष्टीची वार्ताही पुण्यांत नाहीं, व टिपूमियाकडे पत्रें जाऊन त्यांचीं उत्तरेंही आलीं नाहींत, यावरून परम आश्चर्य

वाटतें. तहनाम्यांत करार आहे कीं, शड्मासांत टिपूकडील जावसाल करारा-प्रमाणें विल्हे लागला तरी उत्तम आहे; नाहीं तरी पारिपत्य करावें हें स्पष्ट आहे. तेव्हां ही गोष्ट विलग आहे. इंग्रजांची मुदत भरल्यानंतर मग सलूख टिपूसीं करूं म्हटल्यास ऐकणार नाहीं. परिछिन्न पारिपत्य इंग्रजच करतील. यास्तव जरूर हा मजकूर लेहून पत्राचा जाब टिपूच्या मजकुराचा सत्वर यावा. हैदरखान असतां फरासीस येऊन खानास सामील जाले, परंतु इंग्रजांचें पारिपत्य खानाच्यानें जाहलें नाहीं. आतां फरासीस व इंग्रज यांचा तह विलायतेस होऊन, फरासिसांसीं व इंग्रजांसीं तह जाहल्याचा तहनामा कलकत्त्यास इष्टिनापासीं आला. त्याची नक्कल बजिन्नस इंद्रसेनाकडे इष्टिनानें पाठविली, तीच बजिन्नस पाहावी, आणि तिची नक्कलही पुण्यास पाठवितों म्हणजे सर्व समजेल. कदाचित् तुम्ही म्हणाल, मुसाभुसी याच्या पत्राची नक्कल हल्लीं आली ही पाहावी. तरी त्या गोष्टीवर जाऊं नये. इंग्रजांची बातमी खोटी पडणार नाहीं. यास्तव हा मजकूर आम्ही लिहितों, व तुम्हींही उभयतां तपशीलवार ल्याहावें. मग तेथील मर्जी असेल त्याप्रमाणें करतील. परंतु मग हैदरखानानें मुलूख सरकारचा कृष्णेपर्यंत घेतला आहे तो झाडून इंग्रज घेतील, मग आपणास बोलूं देणार नाहींत. यास्तव जरूर हा मजकूर ल्याहावा; आणि दसऱ्याकारणें सरकारची फौज हुजुरात सुद्धां व सरंजामी पटवर्धन व रास्ते वगैरे सरंजामी झाडून रवाना कर्नाटक प्रांतीं करावे, म्हणजे सर्वही गोष्टी तहनाम्याप्रमाणें घडतील आणि सरकारांत श्रीमंतांच्या बेमानी येणार नाहीं. इतके दिवस सर्वांसी चोरी इंग्रजांसीं तह करण्याविसीं होती. परंतु ज्यापक्षीं श्रीमंत दादासाहेब आपल्याजवळ आले, तेव्हां उघड सलु-काच्या गोष्टी बोलावयासी व पुढील मसलती करण्यास बाद नाहीं. ऐसेंही असोन सरकारचे मर्जीस ही गोष्ट न ये, तर आमचा उपाय काय? जें श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून घडणें तें घडेल. परंतु अतःपर होळकरांचे वगैरे खिसे *काढून मसलतीस फौज न पाठवावी हें ठीक नाहीं. सरकारचे किल्लेकोट मुलूख सोडून दिल्हा असतां अद्याप ठाणीं बसत नाहींत, ही गोष्ट नुकसानीची कोणाची येविसींची काळजी कोंणास नाहीं. हा मजकूर दोन चार वेळ ल्याहावयासी सांगितला म्हणोन सेवेसीं लिहिला आहे. याचें उत्तर ल्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram writes to Nana informing him that Mahadji severely accuses the Poona Ministry for their long delay in not preparing to march against Tipu on the expiry of the interval of six months allowed to him for making peace with the English.*

*सबबी, हरकती.

No. 261 9th September 1783.

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना जे :— इंद्रसेनास दिढा लक्षाचा वसुली सरंजाम लावून द्यावा याप्रमाणें येथील आज्ञा स्वामींस ल्याहावयाविसीं पेशजीं जाहली होती. त्याचें उत्तर स्वामींनीं लिहिलें कीं, आजपर्यंत जो वकील बोलावयासीं येतो, त्यास जहागीर द्यावयाचा सांप्रदाय नाहीं. इंग्रजांचे वकील पेशजीं आले परंतु जहागीर दिल्ही नाहीं. हा सर्व प्रकार राजश्री पाटीलबावांस ठाऊकच आहे. तेव्हां यांसही द्यावयाची नाहीं. परंतु तहाप्रमाणें इंग्रज मुस्तकीन* चालतात ही पाटीलबावांची खातरजमा इंग्रजांनीं केली असेल, तेव्हां दिढाची जहागीर द्यावयाची कबूल केली असेल. परंतु त्यांच्या चाली कशा याचे अनुभव पूर्वी आले आहेत व पाटीलबावांचेही ध्यानांत असतीलच. परंतु इंग्रज मुस्तकीम तहाप्रमाणें चालतात ऐसी खातरजमा जाहली असलियास, त्यांणीं नानकुराण† सुद्धां क्रिया पत्रांत लेहून पत्र दिल्हें असल्यास, पन्नास, पाऊण लाख, निदान लक्ष रुपये पावेतों जहागीर सरकार ऐवजाखेरीज गायकवाडाचे मुलकापैकीं लावून द्यावयाचें बोलून पाहावें. मागें तह जाहले, परंतु कोठेंही निश्चयाचें बोलणें जाहलें नाहीं. उदिष्टीन साष्टी सुद्धां बोलत होता, परंतु इंद्रसेन आल्यामुळें यास निरोप दिल्हा. त्यास साष्टीचेंही त्याच्यानें जाहलें नाहीं. असो. पाटिलबावांनीं लिहिल्यावरून गायकवाडाचे मुलकापैकीं सरकार ऐवजासिवाय लाख रुपयांची जहागीर देण्याचें बोलून लेहून पाठवावें म्हणोन आज्ञा. त्यास येविसींचा मजकूर लिहिल्याअन्वयें मुख्यांसीं बोललों. त्याचें उत्तर केलें कीं, राजश्री नानांनीं लिहिला प्रकार तो खराच आहे, परंतु आमच्या बोलण्यांत आलें आहे त्याप्रमाणें निभावणी जाहली पाहिजे. तरी दिढा लक्षांची जहागीर सुरत आठाविसीपैकीं किंवा हल्लीं माहाल सरंजामापैकीं सुटतील त्याजपैकीं दिढाची जहागीर वसुली लावून द्यावी. ही जहागीर दिल्ही असतां इंद्रसेन सरकार उपयोगीं बहुत पडल. मातबर माणूस, प्रामाणिक, ऐसें जाणोन आम्हीं त्यासीं कबूल केलें आहे. गायकवाडांकडील मुलकापैकीं लावून द्यावी एसें म्हणणें व लिहिणें आहे, त्यास आज गायकवाडाचे माहालापैकीं इंद्रसेनास जहागीर लावून दिल्ही असतां तो घेणार नाहीं. कारण काय म्हणाल, तरी गायकवाड इंग्रजांकडे मिळाले होते म्हणोन त्यांजकडील मुलकापैकीं जहागीर देविली, तेव्हां ती गोष्ट त्यांस कबूल होणार नाहीं व आपणही देऊं नये. ईश्वर इच्छेंकरून या जाहागिरीच्या

*कायम, निश्चित. †नान=भाकर, कुराणाच्या शपथेनें भाकर देणें.

दसपट मुलूक पुढें गायकवाडापासून घ्यावयासी येईल. तूर्त केल्यानें ठीक दिसत नाहीं. याजकरितां सरकारपैकींच दिढाची जागा वसुली लेहून द्यावी, याप्रमाणें त्याहावयासी सांगितलें. त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. मुतालकीच्या कारभार-संबंधीं पेशजीं स्वामींस विनंती लिहिली होती, त्याचें उत्तरही आलें. परंतु त्याचें प्रतिउत्तर मागतीं सेवेसीं गेलें नाहीं, म्हणोन हल्लीं दुसरें पत्र आलें. तेथें आज्ञा कीं, पेशजीं तुम्हांस पत्र लिहिलें होतें, त्या पत्राचें उत्तर आलें नाहीं हें समजत नाहीं. किंवा पत्र पावलें असतां उत्तर त्याहावयाचें राहिलें हें कळत नाहीं. याकरितां खालीं लिहिलें आहे. तर लवकर उत्तर लेहून पाठवावें. त्यास येविसीं चार पांच वेळ मुख्यांसीं बोललों कीं, आपण आम्हांस आज्ञा करितात त्याप्रमाणें पत्रें श्रीमंत राजश्री नानांस लिहितों. त्यांचीं उत्तरें येतात त्यांचे जाब येथून मिळत नाहींत, तेव्हां सेवकाकडे मात्र दोष येतो. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं सांगितलें कीं वरकड जाबसाल सारे लेहून पाठवावे. मागाहून याही जाबसालाचें प्रति-उत्तर तुम्हांस सांगू, त्याप्रमाणें लेहून पाठवावें म्हणोन सांगितलें. त्यास येविसींचा फिरोन उपक्रम काढून काय सिद्धांत होईल त्याप्रमाणें मागाहून सेवेसीं लेहून पाठवीन. वरकड कारभार संबंधीं येथें वहिवाट होते तिचा दाखला आम्हांस कळत नाहीं म्हणोन सेवेसीं पेशजीं लिहिलें होतें. त्यास स्वामींचें उत्तर आलें कीं तुम्हीं समयास सुचवीत जावें. हे सरकारचे दरकाचे जाबसाल असतां तुम्हांस समजत नाहीं हें चांगलें नव्हे. त्यास येविसीं येथें विनंती आंगीं जाबसाल लावून करावयासीं गेलों, तरी मर्जी ठिकाणीं राहणार नाहीं. कुली कारभार संबंधी* करतात त्यांचा दाखला आम्हांस लोक देत नाहींत. इतकेंही असोन आम्हीं शोध बारकाईनें करावा, तरी तेंही पक्कें समजण्यांत येत नाहीं. प्रत्यक्ष आमच्या रूबरू कारभार करीत असतात, आणि जेथें सरकारी जाबसाल असतो, तेथें आमचा संकोच करून ती वेळ चुकवून दुसरे समयीं विल्हेस लावितात. याजमुळें दरबारास प्रसंग पाहून बातमी आणोन मग जात असतों. ऐसे प्रकार येथें घडतात. तेव्हां सेवकानें तरी काय करावें? अब्रूस मात्र घटती आहे. वरकड सर्व अर्थ समजलेच आहेत. जोंपर्यंत श्रीमंत थोर होत, तोंपर्यंत येथील कारभाराची पद्धत याप्रमाणेंच आहे. यांत कमी व्हावयाचें नाहीं. परिछिन्न आमचा संकोच करितात. मुतालकी-चा कारभार सर्व आंबाजी इंगळे करितात. कांही शेष राहिला तो वरकड मुत्सद्दी करतात. ऐसी तऱ्हा येथील आहे. अलीकडे चंद्र १५ रज्जबचीं§ पत्रें आलीं.

*आप्त किंवा जवळचे लोक. § १६ जून १७८३.

त्यांत वकिलाचे पत्रीं स्वामींनीं लिहिलें कीं, श्रीमा राजश्री दादासाहेब यांजकडून ज्या तारखेसीं पत्रें व आणखी दुसरा शिष्या ऐसे पुण्यासी येऊन बोलणें होऊन करारांत गोष्ट आली कीं, राजश्री हरिपंततात्या व तुकोजी होळकर व रास्ते व पांडुरंगराव यांस कोंडाईबारीस पाठवून द्यावें म्हणजे आपण येऊन दाखल होतों. याप्रमाणें श्रीमंतांचें बोलणें पक्केपणांत येऊन, लिहिल्या अन्वयें मंडळी रवाना करतों म्हणोन पत्रीं आज्ञा. तें मशारनिल्हेनीं येथील मुख्यासच वाचून दाखविलें. त्याजवरून बहुत संतोषी जाले, परंतु अंतरयामीं जें दुःख मंडळी सुद्धां काय जालें असेल तें ईश्वर जाणे. बहुत विस्मयांत पडोन उत्तर केलें कीं, बरें, काय चिंता आहे! कोणें प्रकारें सरकार काम जालें हीच गोष्ट आम्ही विशेष मानितों. त्यास येविसींची बंदोबस्ती पक्की असावी. लाख पन्नास हजार रुपये अधिक उणे लागल्यास खर्च करावे, परंतु बाजी शेवटास जावी, यांतच उत्तम आहे. हे प्रकार मीं सेवेसीं ल्याहावे इतकी माझी योग्यता नाहीं. परंतु चित्तांतील उल्हास याजमुळें लिहोत आहें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram intimates to Nana, Sindia's disapproval of Nana's suggestion of granting a Jagir to Anderson in Gaikwad's territory. He laments his not being taken into confidence by Sindia in conducting the state business.*

No. 262 9th September 1783.

पैवस्ती छ २ जिल्काद अर्बा.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ माहे सवालपावेतों मुकाम ग्वाल्हेर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून समस्त सुखरूप असों विशेषः—स्वामींनीं छ पंधरावे रजबचीं पत्रें पाठविलीं, त्यांत एक बंद कलमबंदीचा व एक वर्ख पुरवणी ऐसीं होतीं. त्यांतील मजकूर धुळपांनीं तरांडियावरील सरदार व लोकां सुद्धां दस्त* केले ते, तहनामा जाहला त्यापक्षीं सोडून द्यावयाचे. त्यांत मुंबईकरांचें पत्रही आलें, त्याजवरून तेव्हांच धुळपास लेहून तरांडी व सरदार लोक सुद्धां सोडून दिले. येविसीं राजश्री पाटिलबावांस उत्तर लिहिलें आहे म्हणोन आज्ञा. त्याजवरून राजश्री पाटिलबावांचें

*कैद.

पत्रही पाहिलें व पत्रीं आज्ञा केली होती त्याप्रमाणें वर्तमान सांगितलें. पेशजीं टिपूचे कुमकेस फौज रवाना होते हें वर्तमान येथें कळल्यानंतर स्वामींस त्याहावें म्हणोन राजश्री पाटीलबावांनीं सांगितलें, त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली होती. त्याचें उत्तर स्वामींचें आलें कीं, येथें हें वृत्तच नाहीं, आणि येविसींचीं पत्रें पेशजीं आलीं होतीं, त्यांचीं उत्तरें मागेंच लिहून पाठविलीं आहेत, त्याजवरून कळलेंच असेल म्हणोन आज्ञा. त्यास, स्वामींच्या लिहिल्यावरून राजश्री पाटील-बावांसीं बोलणें येविसींचें फार जाहलें. तेव्हां उत्तर जालें कीं, आम्हीं ऐकिलें वर्तमान तें तुम्हांस सांगितलें व पत्रेंही त्याहावयासीं सांगितलीं होतीं. तेव्हां लाचारी कबूल केली. पेशजीं स्वामींस अनूपगीर गोसावी यांचा मजकूर लिहिला होता. त्याचें उत्तर आलें कीं, सरकारची जागा येथें न कळवितां देणें हें ठीक नाहीं व तुम्ही जवळ असतां तुम्हांसही कळत नाहीं हेंही चांगले नव्हे. बरें, तुम्हांस कळल्यावर पुसून काय उत्तर होतें तें तुम्हीं लेहून पाठवावें, तेंही लिहिलें नाहीं. असो. तुम्हांस सुचेल तें वरचेवर बोलत जावें. त्यास चांगलें दिसत असेल तेंच ते करीत असतील. परंतु परभाऱ्या सनदा करून देणें हें चांगलें नव्हे, म्हणोन माझ्या पत्रीं लिहिलें. त्यास प्रथम जाबसाल मजपासीं जाहला तो सेवेसीं लिहिलाच होता. फिरोन वर्तमान कळलें तें सेवेसीं लिहिलें. कळलें वर्तमान तें न त्याहावें तरी तिकडूनही ठीक नाहीं. परस्परें कारभार करितात त्याचे जाबसाल पुसूं लागल्यानंतर मर्जी अप्रसन्न होते आणि भाषणही मनस्वी होतें. तेथें उत्तरही करावयास सेवकास सुचतें. परंतु धनी समजून उत्तर करील त्यासीं बोलावयासीं कांहींच दिकत पडत नाहीं. ते अर्थ येथें कांहींच नाहींत. जी गोष्ट आपण केली ती सूक्त किंवा असूक्त याची छान करूं नये आणि जो जाबसाल तोडजोडीचा बोलेल त्याजवर मात्र रागें भरावें, असे अर्थ येथील आहेत. याजकरितां जाबसाल युक्तीनें पुसावा लागतो. जेथें धनीपणा आहे तेथें कोणतीही गोष्ट करणें ती विचारेंकरून करावी म्हणजे बरें पडतें. त्यास तो अर्थ येथें किमपि नाहीं. गोसावी याच्या विद्यमानें, मीर्जा सफी याचें राजकारण पातशाहाकडील होतें. याज-करितां गोसावी याचा मनोदय राखणें यांस प्राप्त जाहलें. हे अर्थ आम्हांस पहिलेच कळों दिले असते तरी तैसीच विनंती सेवेसीं लिहितों. प्रतरणा करून कारभार करतात, तो आंगीं लावून जाबसाल पुसूं लागल्यास मर्जी ठिकाणीं राहत नाहीं. ऐसेंही असोन स्वामींची मर्जी स्पष्ट जाबसाल बोलून उत्तरें लिहीत जावीं

ऐसी असली, तरी त्याप्रमाणें वर्तणूक करूं. येविसींची आज्ञा येईल त्याप्रमाणें पुढें करीत जाऊं. हल्लीं दिल्लीस अकबरनवीस सरकारचा आहे, त्याणें अबदुल हयातखान पातशाहापासीं कारभारी आहे त्याचीं भाषणें जाहल्याचें वर्तमान श्रीमंतांस लिहिलें. तो मजकूर स्वामींनीं येथें राजश्री पाटिलबावांस लिहिला. त्याचेंही उत्तर बावांनीं आपल्या पत्रीं लिहिलें आहे व वकिलासही त्याहावयासीं सांगितलें आहे. त्याजवरून ते लिहितील त्याजवरून श्रुत होईल. झांशी प्रकर्णीं येथें एखादा जाबसाल पडतो. त्यास हल्लीं येथें राजश्री बाबूराव भास्कर याजकडून राजश्री त्रिंबकराव काळे म्हणोन गृहस्थ येथें झांशीचे बोलण्याविसीं आज दोन महिने येऊन बसले आहेत. त्यांस आम्हीं बोलावून पुसिलें कीं, तुम्ही येथें सरकार आज्ञेवरून आलां आहां किंवा आपलेच मतें आलां तें सांगणें. त्याजवरून मशारनिल्हेनीं उत्तर केलें कीं आम्हांस सरकारची आज्ञा नाहीं, परंतु सालगुदस्ता राजश्री बाबूरावजीचे नांवें झांशी सुभ्याच्या सनदा सरकारांतून श्रीमंत राजश्री नानांनीं पाठविल्या, आणि राजश्री पाटिलबावांसही मशारनिल्हेचे कामाचा बंदोबस्त करून देण्याविसीं पत्र पाठविलें कीं, बजिन्नस आम्ही घेऊन सैन्यांत आलों. दोन तीन महिने राहून उद्योगही बहुत केला, परंतु कार्य जाहलें नाहीं. आणि तेथूनच राजश्री पाटिलबावांनीं राजश्री रघुनाथ हरि यांजविसीं लिहिलें कीं, मशारनिल्हेकडून झांशीचें कामकाज दूर करून बाबूराव भास्कर यांस सांगितलें आहे. येविसीचा बंदोबस्त करून देणें म्हणोन सरकारची आज्ञा व आपणही पत्र लिहिलें. त्यास येविसींचें मनन करून उत्तर यावें म्हणजे पुढील गोष्ट करणें ती करावयासी येईल. याजवरून पुन्हां श्रीमंत राजश्री नानांस अंदेशा पडोन, मागतीं रघुनाथ हरि यांचे बहालीचीं पत्रें आलीं. तेव्हां आमचे श्रम व्यर्थ गेले. याजकरितां हल्लीं येथील बंदोबस्त करून घ्यावा आणि सरदाराचें पत्र श्रीमंतांस पाठवावें म्हणजे आमचें कार्य होईल व इतका उद्योग आम्ही करूं तोंपर्यंत मागती दुसऱ्या सनदाही आणवितों म्हणोन सांगितलें. त्यास येविसींचा विचार ध्यानास आणोन कोणती गोष्ट करणें किंवा न करणें याचें मनन होऊन स्पष्ट उत्तर यावें, म्हणजे त्याजप्रमाणें येथील प्रसंगांत बोलावयासी येईल. मोघम गोष्ट ठेविली असतां इकडील रांगड्यांचे प्रकार विलक्षण आहेत. या दोघांच्या प्रतिस्पर्धेनें स्थलास अपाय होऊं शके. प्राचीन आहेत. यांजकडे ठेवणें तर बमय* यांस स्पष्ट लिहिलें यावें कीं, तुम्ही सरकार आज्ञेखेरीज शिंद्यांकडे

*सह, सुद्धां.

जावयाचें कारण काय ? आणि जर बाबूराव यांजकडे काम सांगावयाचें असिलें, तरी झांशीकरास स्पष्ट लिहिलें यावें. अतःपर मोघम जावसाल असों नये. मग जैसी मर्जी असेल तैसें घडेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram repeats his complaint that Sindia took important decisions without his knowledge and denied him even the proper functions of his office. He adverts to the transfer of Jhanshi from Raghunath Hari to Baburao Bhaskar.*

No. 263 9th September 1783.

छ सेवेसीं विज्ञापना तागाईत छ ११ माहे सवालपावेतों मुक्काम ग्वाल्हेर येथें सुखरूप असों. विशेष :—आणखी फडणिसीसंमधे कामकाज एखादें पडत आहे तेव्हां यादीवर मखलासी किंवा एकुणात करणें ती आम्ही करितों. तेंही दिवाणाचे मर्जीस येत नाहीं. सरकारचे दिवाण येथें नाहींत, त्यापक्षीं आम्हांकडील कागदोपत्रीं दिवाणाचें चिन्ह होणें तें राजश्री पाटिलबावांनीं करावें हें मानस आमचें, आणि माधवराव गंगाधर यांचें मानस आहे कीं, ज्या पक्षीं सरकारांतून दिवाण येथें नाहीं तरी चिंता काय ? जें काम सरकार निसबतीचें पडेल त्या कागदोपत्रीं तुम्हीं मखलासी मात्र करावी. बाकी एकुणात किंवा 'देवावें' करणें तें आमचें असावें, नंतर राजश्री पाटिलबावांचे हातचा करार व्हावा; ऐसें बोलणें त्यांचें आहे. त्यास येविसीं देशींहून स्वामींची आज्ञा घेऊन सैन्यांत आलों, त्या कालीं हे मजकूर सर्व सेवेसीं निवेदन केले आहेत. त्यास सरकार निसबत काम पडतें तेव्हां मखलासी किंवा एकुणात करणें ती आम्ही करीतच आहों. बाकी दिवाण सरदार यांचीं चिन्हें यादीवर करणें तीं राजश्री पाटिलबावांनीं करावीं, किंवा त्यांच्या दिवाणांनीं केल्यास उपयोगी पडतील, हे अर्थ सर्व ध्यानास आणोन, जैसी आज्ञा यईल त्याप्रमाणें वर्तणूंक करूं. याविसीं हमेशा कटकट पडते, तरी येविसींचें उत्तर यथास्थित यावें. आमच्या समजेंत आहे कीं, ज्यापक्षीं सरकारांतून दिवाण येथें नाहींच, त्याअर्थीं दिवाणगिरीचें चिन्ह करणें तें मुख्यांनीं करावें, किंवा आम्ही करावें, ही गोष्ट सरकारनक्षास बरी दिसते. मग जैसी स्वामींची मर्जी असेल त्याप्रमाणें पुढें वहिवाट करूं. ही पुरवणी व वैद्यांचे मजकुराची पुरवणी ऐशा दोन्ही अवलोकन करून ठेवाव्या. बहुत लौकिकांत गोष्ट येऊं नये. शट्कर्ण जाल्यानंतर आम्हीं मशारनिल्हेची नालस्त लिहिली ऐसें होईल. यास्तव सूचनार्थ विनंती लिहिली आहे. श्रीमंतांचे लग्नाचीं वस्त्रें स्वामींनीं राजश्री पाटिलबावांसीं

पाठविलीं व राणेखान व रायाजी पाटील व आबा चिटणीस यांसही वस्त्रें आलीं, परंतु माधवराव दिवाण यांस वस्त्रें न आलीं. याजमुळें कोणी कोणी आम्हांस पुसों लागले कीं, दिवाणास वस्त्रें कां न पाठविलीं ? तेव्हां आम्हीं उत्तर केलें कीं, वस्त्रें कां न आलीं हें आम्हांस समजत नाहीं. तुम्हांस त्यांचा बहुमान करणें तरी वस्त्रें आम्हांपासीं आणोन द्यावीं; आम्हीं त्यांस देऊं. मग राजश्री नारो शिवदेव यांणीं व आम्हीं विचार केला कीं, ज्यापक्षीं सरकारचीं वस्त्रें आलीं नाहींत तेव्हां आम्हीं येथें देणार कोण ? सरकारआज्ञेप्रमाणें ज्यांचीं त्यांस वस्त्रें दऊन जाब घेऊन पाठवावे म्हणजे जाबसाल उरकला. हा मजकूर जाल्यानंतर राजश्री पाटिलबावांनीं आपल्या येथील साडे तीन सणगें आणोन, आम्हांस व राजश्री पांडुरंग रघुनाथ यांस बोलावून आमच्या समक्ष लग्नाचीं वस्त्रें श्रीमंताचीं म्हणोन दिल्हीं. सेवेसीं कळावें म्हणोन विनंती लिहिली असे. हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram repeats his former complaint and reports that dresses of honour despatched from Poona on the occasion of the Peshwa's marriage were properly distributed by Mahadji.*

No. 264 17th September 1783.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

दंडवत विनंती. उपरी. इंद्रसेन यास दीड लक्षाची जागीर द्यावयाचा करार पेशजी जाला आहे. दीड लक्षाची जागा नेमून सनदा पाठवून द्याव्या, ह्मणून पूर्वी आपणांस तीन चार पत्रीं लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, जागा निवडून सनदा मागाहून पाठवून देतों ह्मणोन. त्यास सनदा आल्या नाहींत. इष्टिनापाशीं कामकाजांत इंद्रसेन आहे, याकरितां बोलल्याप्रमाणें त्यास जागा नेमून सनदा करून दिल्ह्यानें उपयोगीं आहे. यास्तव काल्पीचे लगतीं दीड लक्षाची जागा नेमून सनदा करून द्याव्या, येविशीं राजश्री सदाशिव दिनकर यांस सांगितलें आहे, लिहितील, ह्मणोन विस्तारें लिहिलें, तें कळलें. त्यास, पांच कलमें इंद्रसेनानें कलकत्याहून दस्ताऐवजीं आणून द्यावयाचीं कबूल केलीं, त्यास एक वर्ष जहालें. दोन कलमें मात्र ज्यांत विशेष जीव नाहीं अशीं लिहून आणिलीं. मुख्यत्वें हैदरखानाकडील कलम व परस्परें कुमकेचें दोन कलमें यावीं, तीं आलीं नाहींत. आपलीं पत्रें वारंवार येत गेलीं कीं, टिपूवर फौज जावी. तेव्हां कलम करारांत

आलें असतां लिहून न आलें. तेव्हां इंग्रज फौज शहावर गेली ह्मणजे परभारें तह टिपूशीं करितील. मग ह्मणतील कीं, आमचा दस्ताऐवज कोठें आहे? हही आपणांस लिहिलें. त्याचीं उत्तरें खातरजमेनें फौज जावी ह्मणोन आल्यावरून फौज रवाना केली. इंग्रजांनीं परभारें तह टिपूशीं केला असें असतां जागिरीच्या सनदा पाठवाव्या असें आपण लिहितात. त्यास, टिपूकडे सरकारचा मुलूक असेल, तो त्याजकडोन इंग्रजांनीं सरकारांत देवावा; व कुमक परस्परें करावयाचें ठरावांत आलें, त्याप्रमाणें दस्ताऐवजीं इंग्रजांनीं लिहून द्यावें. हीं दोन्ही कलमें जालीं ह्मणजे लिहून पाठवावें. सनदा पाठवून देऊं ह्मणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांसीं बोलण्यांत आलें आहे. लिहितील. रा छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*This letter again refers to the question of the grant of a Jagir to Anderson which Mahadji was pressing on the attention of the Poona Ministry and to which the latter demurred.*

No. 265 End of September 1783.

॥ श्री ॥

(पत्रलेखक सदाशिव दिनकर).

विज्ञापना ऐसीजे :—कर्नल पापन*साहेब इंग्रज, ज्यानें ग्वाल्हेर घेतली होती तो माघारा कलकत्यास गेला होता, तो पुन्हां कलकत्याहून निघोन ब्रह्मवर्तास आला. येथें येतो ह्मणून पूर्वी विनंती केली होती. ऐकण्यांत येतें कीं, विलायतीस इंग्रज फरासिसांचा सलूख जाला ह्मणतात. हें वर्तमान कलकत्यास आलें. त्यावरून कर्नल मजकुराची रवानगी इकडे केली. कारण कीं, टिपूमियाचा सलख फरासिसांचे विद्यमानें करितों हें राजश्री पाटिलबावांस बोलावयाकरितां येत आहे. आम्ही दसऱ्याचे मुहूर्तावर बावांचा निरोप घेऊन निघतों. तोंपावेतों यऊन जाबसाल होऊन कळल्यास विनंती करीन. गोहदकर जाटाचा मामा कलकत्यास गेला होता, तोही पापनसाहेब इंग्रजाबरोबर आहे ह्मणतात. येथें आल्यावर काय तें कळेल. हा मजकूर बावांस विचारिला. त्यांनीं सांगितलें जे, पापनसाहेब भिंडेस इंद्रसेनाजवळ आला. इंद्रसेनास समाधान नाहीं, सबब सारेच राहिले. इंद्रसेनास समाधान वाटल्यानंतर समागमें येतील. उपरांतिक

*Popham.

आशय त्याचा कळेल. बाहेर ऐकण्यांत येतें कीं, हैदरखानाचे मोहिमेस सुरत मुंबईत कंपू आहेत, ते घेऊन श्रीमंतांचे फौजेबरोबर जावें. यास कंपूची सरदारी देऊन पाठविला आहे असें लौकिकीं आहे. ते भिंडेहून आल्यावर असेल तें कळेल. टिपूमियाची थैली पत्र बावांस व नूरमहमदखानाचा लाखोटा, स्वामींचीं पत्रें बावांस व सेवकास होतीं, त्यास बावांचीं पत्रें थैली बावांस दिली. त्याचे जाबसालास इंग्रजांची गरज, ते भिंडेस राहिले. सबब येथून राजश्री सदाशिव मल्हार माजुल* बक्षीची रवानगी करणार होते, तों इंद्रसेनानें भिंडेहून लिहून पाठविलें कीं बक्षीस पाठवूं नये. आम्ही पापनसाहेब सुद्धां तेथें येतों. कूच करूं नये. यावरून तूर्त कूच होणें राहिलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Poona of Col. Popham coming to meet Mahadji at Gwalior. He gives it as his surmise that this visit was in connection with the peace negotiations with Tipu.*

No. 266 5*th* October 1783.

(पत्रलेखक सदाशिव दिनकर.)

विज्ञापना ऐसीजे :—गोहदकर जाटानें गोहद खालीं करून देतों ह्मणून पैगाम केला होता. त्यावरून राजश्री पाटिलबावांनीं कारकून गोहदेस पाठविला. तो जाऊन जाटासीं भेटून माघारा आला. जाटानें यादीवर रवाद† करून दिला कीं, गोहद खालीं करून देतों. तितकी दाखऊन कांहीं मुद्याची यादी आहे ती उदईक दाखवीन. इतकें बोलून कारकून राहोटीस गेला. हें वर्तमान पूर्वी विनविलेंच आहे. दुसरे दिवशीं कारकून मजकुरानें बावांकडे येऊन बोलिला जे, यादबूद कांहीं नाहीं. जाटाचें म्हणणें आहे जे, मी बहुतांचा शत्रु आहें. तुम्हां पावेतों पावणें होणें कठिण. आपण कूच करून बहादरपुऱ्यास मुक्काम करावा. तेथून शें दोनशें लोक घेऊन गोहदेपासून दों कोसांवर सडी स्वारी यावी. मी बाहेर निघोन थोडक्यानिसीं तेथें भेटी घेईन. नंतर गोहद खालीं करून देतों, असें म्हणतो. यावरून बावांस संदेह आला कीं, सडे कां बोलावितो, याचा निश्चय करावा. इतक्यांत मीर्जा शफी ‡मारल्याचें वर्तमान व गोसावी याचें पत्र आलें. त्यावरून खासाच स्वारी करून डिगेस जाणार होते. परंतु जाट लबाड. काय

---

*माकुल असावें. माकुल ह्मणजे शाहणा, जाणता, माहीतगार.

†रवाद=अनुमोदन. ‡Murdered on 23rd September 1783.

खूळ करील ? याजकरितां आंबुजी इंगळे यांची रवानगी डिगेस करून, आपण खासा बुनग्या सुद्धां दसऱ्याचे दिवशीं कूच करून बहादरपुऱ्यावर मुक्कामास जावें, तेथून बनेल तसा पुढें विचार करावा, असा निश्चय बावांनीं केला आहे. पुढें होईल ते विनंती करीन. दसऱ्याचे दिवशीं कूच करावा असें होतें. इतक्यांत वर्तमान कळलें जे, आमदानीनें पांच हजार फौज धवलपुरास आंबुजी इंगळे याचे बंदोबस्ताकरितां पाठविली. दुसरें वर्तमान इंग्रजांचें आलें जे, आम्ही ग्वालेरीस लष्करांत येतों, कूच करूं नये. त्यावरून मुक्काम आहेत. इंग्रजांची वाट पाहतात. आंबुजी इंगळे यांची रवानगी गोसाव्याचे संमतें आमदानीवर करणार होते तें मवकूफ केलें. वर्तमान ऐकण्यांत येतें जे, अफरासियाबखान, नजफ कुलीखान, सारे आमदानी मध्यें मिळाले. गोसावी निराळे होते, त्यांसही आमदानीनें मेळवन घेऊन, मथुरा वगैरे साता लक्ष्यांची जागीर अनुपगिरीस दिली. अनुपगिरीकडून बजहुदीखान बावांकडे येत आहे. तो आल्यानंतर वर्तमान कळेल तें विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana about the Jat Rana still holding out at Gohad and about the murder of Mirza Shafi and developments in imperial affairs.*

No. 267 21st October 1783.

पो छ १५ जिल्हेज आर्बा.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष, टिपूमियाकडील मुद्यांची यादी पाठविली आहे, त्याप्रमाणें इंद्रसेनासीं बोलून करून घ्यावें म्हणजे टिपूचा संतोष राहील. ही गोष्ट जाहल्यानें यांत सरकारउपयोगी आहे म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, इंद्रसेनासीं बहुतां प्रकारें सांगितलें; परंतु करार मदाराचीं लिहिलीं पहिलेच विलायतेपर्यंत गेलीं, यामुळें यांचे हातीं गोष्ट राहिली नाहीं. येविशीं अलाहिदा लिहिलें आहे, त्यावरून कळेल. दोन जागे व पांच लाखांचा मुलूख यांचा विषय फार नाहीं. थोडक्यास टिपूस संतोष वाटून आपल्या पेटयांत राहतो. यांत सरकारउपयोग ही गोष्ट खरीच आहे. इंग्रजांकडून तर ही गोष्ट घडत नाहीं. तेव्हां टिपूनें सरकारचे दोस्तीवर नजर देऊन, कराराप्रमाणें महंमदआलीचा

व इंग्रजांचा मुलूख व बंदवे सोडून द्यावे, आणि तूर्त इंग्रजांचा खलश* तोडावा. पुढें श्रीमंतांचे दोस्तींत कायम आहे तरी सर्व गोष्टी घडतील. याप्रमाणें नूर-महंमदखान यांसीं बोलून या पल्लव्यावर आला तरी फार चांगलें जाहलें. पांच लक्षांचे वरी त्याचा संतोष राहून तोड पडत असल्यास, सरकारचे मुलखपैकीं सालाबाद ऐवज सरकारांत द्यावयाचा ठराव जाला आहे, त्यापैकीं पांच लक्ष रुपये टिपूस रयात† सरकारांतून करावे, हेही एक तोड आहे. या तोडीवर आल्यास करावें. येविशीं नारो शिवदेव यांसही सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. या जाबसालाचीं पत्रें टिपूस जाऊन उत्तर यावयासी दिवसगत लागेल, याकरितां आलाहिदा लिहिलें आहे. त्याप्रमाणें पत्र पावतांच फौजेचे डेरे बाहेर देऊन, फौज बाहेर निघाल्याचीं पत्रें पाठवावीं. म्हणजे कंपूचा सरदार करनेल पापन कलकत्त्याहून आला, तो येथें आहे, कंपू सुद्धां फौजेस सामील व्हावयास येईल. तोंपर्यंत लिहिल्याअन्वयें टिपूकडे पत्रें जातील, त्यांचीं उत्तरें येऊन पोंचतील. वर लिहिले तोडीवर टिपूस मान्य जालें, तरी इंग्रजांकडील चेनापट्टणास सरदार असेल त्याजकडे महमदआलीच्या व इंग्रजांचे मुलकाच्या जाग्यांच्या सोडचिठ्या पाठवून द्यावयास लागावें, आणि इकडे लिहून पाठवावें. चेनापट्टणवाल्याचेंही इष्टिनाकडे लिहिलें येईल. मग कंपू तिकडे जावयास येईल व तो माघारा जाईल. सारांश, आधीं फौज बाहेर काढावी आणि टिपूकडेही पत्रें पाठवावीं. इकडे कंपूविशीं पत्रें यावीं. होळकर बाहेर निघाल्यास उत्तम. नाहीं तरी सरकारची फौज सरंजामी जमा करून, बाहेर त्यांचा मुक्काम करवावा. कंपूचा सरदार कोण, काम पडल्यास कोणास लिहावें, असें आपण लिहिलें होतें. त्यास, कंपूची सरदारी करनेल पापन यांसी देऊन इष्टिनांनीं पाठविला आहे. फौज बाहेर निघाल्याचीं आपलीं पत्रें आलीं म्हणजे पापन कंपू सुद्धां येऊन पोंचेल. आधीं फौज बाहेर काढून पत्रें पाठवावीं. रवाना छ २४ जिलकाद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *As the English declined to grant the condition of the cession of territory on which Tipu was prepared to make peace, Mahadji suggests to Nana that if that was the condition on which peace depended the Poona Darbar should make the sacrifice with an eye to future contingency of securing Tipu as an ally.*

---

*संशय. †महरबानी दाखल.

No. 268 21st October 1783.

पैवस्ती छ १४ जिल्हेज आर्बा ह्॥ डाक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. आपण टिपूकडील मुद्यांची याद पांच कलमांची पाठविली ती पावली. यादीप्रमाणें इंद्रसेन यासीं बोलून करून घ्यावें. अर्काटचे तालुक्यापैकीं त्यागगड व रावतनळूर दोन्ही किल्ले, एक पहाडी व एक जमी* व मुलूख पांच लक्षपर्यंत टिपूकडे इंग्रजांनीं द्यावा हा मुख्य मुद्दा. वरकड किरकोळी आहेत. त्याप्रमाणें जाल्यास टिपूवर उपर राहून आपले उपयोगी पडेल म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास पूर्वी इंग्रजांकडील तहाचे जाबसाल होत होते; तेव्हां आपण लिहिलें होतें कीं, महंमदअलीचे मुलकापैकीं पंचवीस लक्षांची जागा इंग्रजांनीं हैदरखानास द्यावी, निदान दहा लक्षांची तरी जागा द्यावी; त्यावरून इंद्रसेनासीं जाबसाल केला. त्याचें उत्तर त्याणें साफ केलें कीं, आम्हांस एक खेडें हैदरखानास द्यावयास अनकूल पडत नाहीं. हे त्याच वेळेस हैदरखानाचें कबूल करीत नाहींत, तह करणें असल्यास तहनाम्याची याद कलमबंदीची पाठविली आहे त्याप्रमाणें करावा, नाहीं तर तसेंच लिहावें, इंद्रसेनास निरोप देऊं. इंद्रसेन गेल्यावरी आपण बंगाल्याकडे फौज पाठवावी, आम्ही या तोंडावरी मसलतीस आहोंच, याप्रमाणें आपणांस लेहून पाठविलें. त्या उपरांतिक आपलीं पत्रें आलीं कीं, हैदरखानाचे मुद्दे इंग्रज कबूल करीत नाहींत, त्यापक्षीं हैदरखान महंमदअल्लीचा मुलूख सुप्रवर्तीनें सोडणार नाहीं. तेव्हां त्याजवर मसलत करणें प्राप्त. या गोष्टीस इंग्रजांनीं सामील असावें. येविसीं इंग्रजांसीं बोलून शफतपुरसर पक्कें करून घ्यावें आणि तह करावा. त्याजवरून आपल्या लिहिल्याप्रमाणें इंद्रसेनासीं बोलून पक्कें करून घेऊन तहनामा दिल्हा, घेतला. तहनाम्याचे तारखेपासून दोन महिन्यांत सरकारचा मुलूख व किल्ले, ठाणीं सोडून द्यावीं, तदनंतर दोन महिन्यांआंत श्रीमंत राजश्री दादासाहेब यावे. उपरांतिक दोन महिन्यांत हैदरखानाकडील जाबसाल सरकारचे सांगितल्याप्रमाणें सलुखानें कराराप्रमाणें महंमदअल्लीचा व इंग्रजांचा मुलूख व बंदवे सोडून दिल्ह्यास उत्तम. इंग्रजांनीं त्यासीं खलश करूं नये. सरकारचें सांगितलें हैदरखानानें न ऐकिलें, तरी सरकार व इंग्रज मिळोन त्याजवरी मसलत करावी. ऐकतो न ऐकतो हा जाबसाल सहा

*जमी = भुईकोट.

महिन्याआंत समजावा. सहा महिने होऊन गेल्यावरी मग सलुखाचा जाबसाल त्याणें केला, तरी आपण बोलूं नये. आम्हीं ऐकणार नाहीं. सहा महिने होतांच सरकारचे फौजेची तयारी व्हावी. आम्हांकडील कंपू फौजेस सामील होतील. याप्रमाणें बोलणीं होऊन करार मदार जाहला. जालें वर्तमान आपणांस वरचेवर तपशीलवार लिहितही गेलों. इंद्रसेनानें कलकत्यास दारमदाराचा मजकूर लिहून पाठविला. तेथून विलायतेस इस्टिनाचीं लिहिलीं गेलीं. इंग्रजांनीं करारा-प्रमाणें सरकारचा मुलूख व किल्ले, ठाणीं, दोन महिन्यांत द्यावयाविसीं मुंबई-वाल्यास पत्रें पाठविलीं. यांणीं ठाण्या ठाण्यास चिठ्ठ्या देखील पाठविल्या असतां, श्रीमंत दादासाहेब व ठाणीं मुलूख चौ महिन्यांत एकदांच हस्तगत व्हावीं अशीं आपलीं पत्रें आलीं. त्यामुळें चार दिवस अधिक आगळे लागले. परंतु बोलल्या-प्रमाणें मुलूख, ठाणीं, किल्ले व श्रीमंत दादासाहेब दोन्ही कामें इंग्रजांनीं करून दिल्हीं. टिपूकडील जाबसाल ऐकतो न ऐकतो, दोहींतून काय तें स्पष्ट सहा महिन्यांत समजलें पाहिजे. याकरितां नूरमहमदखानासीं बोलून त्याचीं पत्रें व सरकारचीं पत्रें टिपूस वरचेवरी पाठवून उत्तर आणवावें. ऐकल्यास बरेंच जालें. न ऐकल्यास तिकडील मसलतीवरी फौजेची तरतूद आतांपासून असावी. इंग्रजांनीं आपल्याकडून अमलांत आणून दिल्हें. आपल्याकडून मुदतीपुढें दिवसगत लागली तरी इंग्रजांचा शब्द आपल्यावर होतो. म्हणून आपणांस वारंवार लिहून पाठविलें असतां सहा महिन्यां अगोदर जाबसाल होऊन न यावयास कारण काय? श्रीमंत दादासाहेब व वसई वगैरे ठाणीं मुलूख इंग्रजांकडून येतील न येतील हा अंदेशा पडून, टिपूस महंमदअल्लीचा व इंग्रजांचा मुलूख, बंदवे सोडून द्यावयाविसीं स्पष्ट लिहिण्यांत व नूरमहंमदखान यासीं बोलण्यांत आलें नसेल. दादासाहेब व किल्ले, ठाणीं मुलूख हस्तगत जाहले तरी मग स्पष्ट बोलावें. अगोदर टिपूसीं स्पष्ट लेहून स्नेह कां तोडावा? यामुळें या मजकुराचीं पत्रें गेलीं नसतील तर नकळे. आम्हीं मध्यस्त असतां अंदेशा चित्तांत यावा असा प्रकार नव्हता. अस्तु. श्रीमंत दादासाहेब सुरतेहून निघोन अलीकडे आले व ठाणीं सरकारचीं बसत चाललीं, अशी खातरजमा दिसोन आली असेल. तेव्हां नुरमहंमदखान यासीं बोलणें शुरू होऊन टिपूकडे स्पष्ट पत्रें गेलीं असतील. त्यावरून त्याज कडील पत्रें व याद आली. तहनामा दिल्हा घेतल्याचीं पत्रें येथून आपणांस पोहोंचतांच त्याजकडे पत्रें रवाना जालीं असतीं, तरी पत्रांचीं उत्तरें व हल्लीं याद मुद्याची आली, ती तेव्हांच येती. पुण्याहून पत्रें पंधरा दिवसांत टिपस पोहोंचन, पंधरा

दिवसां जाब येतो. एक महिना जातां येतां पुण्यापर्यंत. तेथून इकडे पंधरा दिवसांनीं पत्रें येतात. दीड महिना, निदान दोन महिन्यांत तरी येतीं. आपणांकडून या अंदेशामुळें पत्रें जावयास दिवसगत लागली, किंवा फरासीस त्यास सामील होते म्हणून त्यास लिहीत असतां त्याचे खातरेस न आलें, हें समजत नाहीं. असो. हल्लीं मुद्याची याद पाठविली, त्यास हाच जाबसाल त्याजकडील सहा महिन्यांआंत आला असता, तरी इंग्रजांसी बोलावयास जागा होती. आठ महिने होऊन गेले, तत्रापि आपण लिहिल्यावरून इंद्रसेन यासीं बोललों. त्याणें उत्तर केलें कीं, "तुमचा आमचा करार मदार होऊन ज्या गोष्टी लिहिण्यांत व बोलण्यांत आल्या, त्याचीं लिहिलीं विलायतेस गेलीं. आमच्यानें हा जाबसाल कबूल करवत नाहीं. पांच लाख रुपयांचा व दोन जाग्यांचा विषय बहुतसा नाहीं. ही गोष्ट मान्य करावी म्हणून बहुतां प्रकारें सांगितलें. माझे हातीं गोष्ट राहिली नाहीं. सहा महिने होतांच फौज सरकारची निघावी, त्यास दोन महिने अधिक जाहले. आम्हीं आपला कंपू सुरतेस ठेविला आहे. करारप्रमाणें टिपूवरी मसलत करावी. आमचे कंपू तयार आहेत. सरकारचे दोस्तींत टिपू पक्का असला तरी महंमद अली सुद्धां आमचा मुलूख व बंदवे सोडून देवावे. नाहीं तरी फौज रवाना करावी. आम्हीं सिद्ध आहों." याप्रमाणें स्पष्ट यांचें बोलणें आहे. सुरतेस कंपू आहे व कानपुरीं कंपू आहे, त्याचा सरदार कर्नेल पापन करून इष्टिनानें येथें पाठविला, तो येऊन भेटला. सरकारची फौज निघाली म्हणजे पापन कंपू सुद्धां, आपण लेहून पाठवतील तेथें येऊन फौजेस सामील होईल. टिपूचें पारपत्य करावें हाच खंबीर पुरतेपणें आहे. पापन कंपूचा सरदार करून पाठविला, या उपरी इंग्रजांकडील गुंता नाहीं. टिपूकडील मुलूख आपलाले सोडवून घ्यावे व त्याजकडील त्याचा मुलूख सुटेल तो निमेनीम वांटून घ्यावा. याप्रमाणें करारांत गोष्ट आली ती पक्कीच आहे. आमची येविसीं खातरजमा आहे. पेशजीं कलमाचीं पत्रें पाठविलीं आहेत, त्याप्रमाणें सरकारचे शिक्यानिशीं कलमाचें पत्र आलें म्हणजे इंग्रजांचें घेऊन पाठऊन देऊं. दस्तऐवजाविसीं खातरजमा असावी. हंगामाचे दिवस जातात. या मसलतीकरितां आमचे कंपू खर्च खात उगेच बसले आहेत. चेनापट्टणाकडील जमाव भारी तिकडे आहे. या उपरी मसलतीस विलंब कामाचा नाहीं. हें बोलणें निकडीचें इंग्रजांकडील आहे. याकरितां आपणांस हें पत्र लिहिलें आहे. तरी पत्र पावतांच फौजेची तयारी करवून, त्या सुमारें दहा पांच कोसीं कूच करवावें आणि इकडे लेहून पाठवावें. त्याप्रमाणें कंपू येऊन सामील

होतील. यादीप्रमाणें इंग्रजांकडून जाबसाल टिपूचा होत नाहीं, येविसीं नूर-महमदखानास स्पष्ट सांगावें व टिपूसहो लेहून पाठवावें. सरकारचे दोस्तीवर नजर देऊन सलुखांत रहाणें तरी इंग्रजाचा मुलूख महंमदअली सुद्धां सोडून देऊन खलश तोडावा हें चांगलें. याप्रमाणें स्तष्ट लेहून पाठवावें आणि फौज बाहेर काढावी. म्हणजे इंग्रजांस भरंवसा पुरेल. नाहीं तरी फौजेस दिवसगत लागली, तरी इंग्रज फरासीस एक जालेच आहेत. उभयतां मिळोन त्यास जरबेंत आणून त्याजकडे मुलूख जो आहे तो दरोबस्त हाताखालीं घालतील. मग आपल्यास सरकारचे मुलुखा सुद्धां बोलावयास जागा राहणार नाहीं. हे करतील, अथवा टिपूसीं सलूख करून तूर्त त्यास आपले पेटचांत* मेळवून घेतील. टिपूचे सलुखाचा जाबसाल फरासीस इंग्रजांसी बोलतात. परंतु आपले तहनाम्यांत टिपूनें परभारें सलुखाचा पेगाम इंग्रजांसीं केला, तरी इंग्रजांनीं करूं नये, सलूख होणें तो सरकारांत व्हावा, सलुखाचें न ऐके तरी इंग्रज, सरकार मिळोन पारपत्य करावें, असें करारांत आहे. यामुळें इंग्रज मान्य करीत नाहींत. सहा महिन्यानें तर टिपूवरी मसलत व्हावी. त्यास आठ महिने जाहले, अद्याप सरकारचे फौचेची तयारी नाहीं. यामुळें इंग्रजांस संशय येऊन, इष्टिनानें करनेल पापन यास दुअर्थी पाठविला आहे. करारप्रमाणें फौज निघाली म्हणजे कंपू घेऊन फौजेसमागमें याणें जावें. फौजेचा विचार लांबणीवरी दृष्टीस पडला, तरी तसेंच इष्टिनास लेहून पाठवावें. मग चेनापट्टणाकडे इंग्रजी जमाव, फरासीस एकत्र जालेच आहेत टिपूसी सलूख करतील, अथवा जरबेंत आणतील. जशी काब† पहातील तसें करतील. आम्हीं आपले तर्फेनें करारप्रमाणें तुमचा मुलूख, किल्ले दादासाहेब सुद्धां दिल्हे. व कंपूचा सरदार तुम्हांकडे पाठविला. मुदतीपुढें दोन महिने तुमची प्रतीक्षा केली असतां करारप्रमाणें तुम्हांकडून अमलांत न आलें. तेव्हां लाचार जाणून कळेल तसा टिपूकडील जाबसाल समजून घेऊं म्हणतात. टिपूसीं त्याणीं सलख करून मेळवून घेतला तरी वाईट. त्यास जरबेंत आणून त्याजकडे मुलूख जागा आहेत त्या घेतल्या तरी वाईट. अशी गोष्ट जाल्यानें ठीक नाहीं. सहा महिने जाहल्यावरी पुढें अशा गोष्टी पडतील याचा विचार तरतूद अगोदर असावी, म्हणून आपणांस वरचेवर लिहीत असतां न जाहलें. हल्लीं हें पत्र शेवटचें लिहिलें आहे. लिहिल्याप्रमाणें फौजेची तरतूद करून बाहेर काढावी. हें न जाहल्यास इंग्रज टिपूकडील प्रकार कळेल तसा करितील. आम्हीं मध्यस्त म्हणून आम्हांवरी

*पक्षांत. †समय, संधि.

शद्ब ठेवाल, याकरितां खोलून लिहिलें आहे. याउपरी आम्हांकडे शद्ब नाहीं. इतःपर पत्र पावतांच फौजेचे डेरे बाहेर करवून फौज बाहेर काढावी. रवाना छ २४ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji asks Nana to lis'en to no overtures from Tipu but straightway dispatch a force against him. He adds that the Company's force was ready to co-operate with the Marathas*

No. 269 21st October 1783.

पौ छ १५ जिल्हेज आर्बा.

रामजी पाटील यांणीं आणून दिल्हा.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस :—

छ दंडवत विनंती उपरी. टिपूवरी मसलत करणें लागती, त्यास बाईस लेहून राजश्री तुकोजीबावा यांचे सरदारीचा बंदोबस्त पेशजीचे लिहिल्याप्रमाणें होऊन यावा म्हणजे मसलतीस सिद्ध होतील. चार महालची वहिवाट बाईनीं करून, डौलाचा* खर्च जाऊन उरला ऐवज चार महालपैकीं सरदारीकडे द्यावा. वरकड दरोबस्त महालची वगैरे वहिवाट तुकोजीबावांनीं करून सरकारचाकरी करावी. याप्रमाणें आम्ही तुकोजीबावांस सांगतों. आपण याप्रमाणें बाईस लेहून करवावें. म्हणजे तुकोजीबावांस सांगून टिपूचे मसलतीचे कामीं पडत असें करवितों, म्हणून वारंवार आपलीं पत्रें येतात. त्यावरून बाईस आम्हीं लेहून पाठविलें. त्यांचीं उत्तरें बाई लिहितात कीं, आमचे घरची चाल पूर्वीपासून कशी आहे ती तुम्हांस ठाऊक असून, पुण्याहून पत्रें येतात त्याच अन्वयें तुम्हीं लिहितां. अपूर्व आहे! पूर्वचालीप्रमाणें दरोबस्त महाल मुलकाची वहिवाट आम्हांकडे असावी. तुकोजीबावांकडे फौज ठेवणें, चाकरी करणें हें त्यांनीं करावें. यांत पूर्व चालीस विरुद्ध न पडतां आमचें स्वरूप रहातें आणि सरकार चाकरीही घडती. पूर्व चाल सोडून चार महालचीच वहिवाट करून असावें असें म्हणतील, तरी कसें घडेल? कैलासवासी सुभेदार असतां व त्यांचे अलीकडे वहिवाट होत आली त्यास तुम्ही माहीतच आहां. असें असोन तुमचे सर्वांचे विचारें पूर्व चाल सोडून नवीन चाल करावी असाच विचार असल्यास आम्हांस मान्य होणार नाहीं. याप्रमाणें महेश्वरचीं पत्रें आलीं. बाईकडील प्रकार असा. राजश्री तुकोजी-

*कारभाराचा.

बावांनीं पूर्व चाल ध्यानांत आणोन बाईची मर्यादा राखन, पूर्व चालीप्रमाणें चालावें तें होत नाहीं. पहिलेपासून होळकरांचे घरची चाल चालत आली आहे, त्याप्रमाणें बाईचे हातें दरोबस्त महालची वहिवाट व्हावी. महेश्वरचे डौलाचा खर्च वजा होऊन बाकी ऐवज फौजेचे सरबराईस बाई देतील. तुकोजीबावांनीं फौज सुद्धां सरकार चाकरी करावी. याप्रमाणें जाहल्यास बाईचें मान महत्व रहातें आणि सरदारीचा बंदोबस्त होऊन सरकार चाकरीही घडती. येविसीं आपणास चार पांच पत्रीं लिहून पाठविलें आहे, त्यावरून सविस्तर कळलेंच असेल. बाईकडे पूर्व चालीप्रमाणें वहिवाट असल्यानें नुकसानी ते काय होती, हें काहीं समजत नाहीं. देशचे महाल दरोबस्त त्यांजकडेच आहेत. माळव्यांतील महालच्या बहुतेक करून देशीं विल्हे लावून रुपये घेतात. असें असून सरकार-चाकरी कां घडत नाहीं ? बाईचें निमित्य करून गळाठ्याचा प्रकार सांगतात, आणि आपण ऐकून बरोबरीची सरदारी, चाकरी घडत नाहीं म्हणन लिहितां, अपूर्व आहे ! हिंदुस्तानांतून आल्यापासून मातबर फौज ठेवून चाकरी कोणती केली ? देशीं आल्यावरी प्रथम तोतया, दुसरें कोल्हापूर, तिसरें राजश्री मोरोबा-दादा, चवथें तळेगांव, उपरांतिक गुजराथ, इतक्या मसलतींस त्यानीं फौज किती बाळगिली, आमची फौज किती होती, सरकार चाकरी कोण कोणाकडून कसकशी जाली, हें सर्व आपले ध्यानांत नसेल असें नाहीं. गुजराथेंतून आल्यावरी होळकर इंदुराहून देशीं गेले. आम्ही इकडे इंग्रजांचे मसलतीवर आलों. तीन वर्षें होत आलीं. फौज किती, पलटणें किती, तोफखान्याचा खर्च काय, हें आपणांस पर-स्परें कळतच असेल. होळकर देशीं गेल्यापासून फौज किती बाळगिली, चाकरी कोणती केली, हें ठाऊकच आहे. पंधरा हजार फौजेनसीं होळकरांनीं सरकार-चाकरी करावी. सरंजाम त्यांजकडे आहे त्यापैकीं महाल मुलख कोणीकडे गेला आला म्हणावा, तरी तेंही दिसत नाहीं. फौज दरवर्षास किती ठेवून चाकरी कोणती केली हें आपणांस लोपलें नसतां, ते आपणास चंदी मिळत नाहीं फाके होतात म्हणून सांगतात, आणि आपण ऐकून बाईचें घरकलहामुळें त्यांजकडून चाकरीचा उपयोग घडत नाहीं म्हणून लिहितात, हें आश्चर्य वाटतें ! महाल मुलक त्यांजकडे आहे तो आहेच. तेव्हां रुपया जातो तो कोणीकडे, हे कोणीच पुसत नाहीं. बाईकडे रुपये राहिले म्हणावें तरी इ।। पासून सालमजकूरपर्यंत बाईनीं ऐवजाचे जमाखर्चाचे झाडे आपणांकडे पाठविले, त्यांत बाईनीं वावगा खर्च करून रुपया उडविला, किंवा तुकोजीबावा सरदार व नारो गणेश कारभारी

यांचे विद्यमानचा खर्च आहे, हें झाडचावरून ध्यानांत आलेंच असेल. असें असोन सरकारचाकरीविशीं आपल्याच्यानें निक्षून कां सांगवत नाहीं हें नकळे ! इकडील बंदोबस्ताविशीं आड घालून सरकार चाकरी होळकरांनीं करूं नये व आपण त्यांस कांहीं म्हण् नये हें बरेंच आहे ! होळकरांची व आमची दोन्ही सरदाऱ्या बरोबर. सरकार चाकरी आम्हांकडून आजपावेतों जाली असेल, त्याप्रमाणें त्यांजकडून व्हावी ते न जाली. याची कसर राहिली त्या ऐवजावरी तूर्त होळकरांनीं टिपूचे मसलतीवरी पंधरा हजार फौज सुद्धां जावें. सांप्रत बाईकडे महाल आहेत त्यांत महेश्वराचे डौलाचा खर्च जाऊन, ऐवज किती यावयाचा तो समजलाच आहे. असो. त्या ऐवजाचे बदले दोन हजार फौज कमी ठेवून, बारा तेरा हजार फौजेनिशीं मसलतीवरी जावें. बाईचा व त्यांचा घरकलह आहे. त्यास आम्ही देशीं आल्यावरी आपल्या आमच्या विचारें त्याचाही विचार होईल. घरच्या लढचाकरितां तुकोजीबावांनीं सरकार चाकरी बुडवून घरीं वसावें हें उचित नाहीं. आपण त्यांस सांगून टिपूचे मसलतीवर जात तें करावें. रा छ २४ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reprimands Nana for sheltering the indolent Tukoji Holkar and not exacting work from him. He calls it a lame excuse for Tukoji to complain that Ahalyabai's management was depriving him of the means of supporting his army. Mahadji contends that leaving aside a small sum, which the lady utilised for her personal expenses, the entire revenue was going to Tukoji who had thus no fair cause to complain.*

No. 270 23rd October 1783.

(लेखक आपाजी राम)

सेवेसी विज्ञापना येथील कुशल ता॥ छ २६ जिल्काद पावेतों आपले कृपेकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—राजश्री जनार्दनपंत वैद्य यांची रवानगी स्वामींनीं केली, ते समयीं मशारनिल्हेनीं विनंती केली की, सरकार संबंधें सनदी कामकाज जें पडेल येविसीं आम्हांस आज्ञा असावी. परस्परें जाहल्यानें कामाचा दाखला रहात नाहीं. तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, येविसीं आपाजीराम यांचें लिहिणें येत नाहीं. त्यास येविसींचा मजकूर पेशजीं एक दोन वेळ सेवेसीं लिहिला

होत. व समक्षही येविसींची विनंती केली असेल, ऐसें भासतें. मुख्य गोष्ट तरी, आधीं येथें कामकाज सरकारच्या दरकदारापासून घ्यावें ही रीत येथील मुख्याच्या गांवींच नाहीं. त्याजमध्यें सरकारांतून येविसींची उपेक्षा जाहल्यानंतर मग तर कांहींच घडावयाचें नाहीं. ऐसा प्रकार आहे. मग जसी मर्जी स्वामींची असेल त्याजप्रमाणें वर्तणूक करूं. यांत दरकाचें स्वरूप राखणें हें धन्याकडेच आहे. सरकारचीं पथकें येथें राजश्री पाटिलबावांचे तैनातीस आहेत, यांचा जाबसाल सरकारसंबंधें पडतो, तो परस्परेंच विल्हेस लागतो. तेव्हां त्याजला आम्हांसीं कारण तें काय? विना कामाखेरीज कोणी कोणास पुसत नाहीं. हे अर्थ सर्व स्वामींच्या ध्यानांत असतीलच. परंतु सुचली विनंती सेवेसीं लिहिली आहे. येथें फडणीससंमंधें कामकाज राजश्री पाटीलबावा घेते म्हणजे सर्वांवर दाब असता, व सरकारकामें चार होणें तीं नक्षानें होतीं. असोत. तूर्त आमचाच लाभकाळ नाहीं. तदनुरूप सर्व गोष्टी घडतात. येविसीं परिणाम लाविणार स्वामींखेरीज अन्य कोणी आहे असा अर्थ नाहीं. राजश्री नारो शिवदेव दिपवाळी जाहल्यानंतर राजश्री पाटिलबावांचा निरोप घेऊन देशीं स्वामींकडेस येणार, ऐसा सिद्धांत मशारनिल्हेनीं केला आहे. स्वामींस कळावें म्हणोन लिहिलें असे. खासगत विनंती पेशजीच्या पत्रीं लिहिली आहे तें पत्र पावलेंच असेल. हल्लींही पुन्हां विज्ञापना आहे कीं, येथें तूर्त विशेष कामकाजही नाहीं, त्यापक्षीं आज्ञा जाहल्यास देशीं यावें असा विचार आहे. स्वामींच्या दर्शनासही दोन वर्षें जालीं, याजकरितां सूचनार्थ विनंती लिहिली आहे. मग जसी आज्ञा होईल त्याजप्रमाणें वर्तणूक करूं. आज्ञेव्यतिरिक्त कोणतीही गोष्ट करावयाची नाहीं. राजश्री पाटिलबावा दिल्लीकडील राजकारण राखून मीर्जा सफी व पातशाहाजादा यांच्या भेटीस गेले होते. त्या तागाईत सफीकडील कागदोंपत्रीं सिलसिला चाललाच होता. अलीकडे आफराशाबखान, नजीबखानाचा चेला, याच्या व मीर्जा सफीच्या भेटी होऊन आमदानीचे भेटीस उभयतां गेले,तेथें मीर्जा सफीस* आमदानीनें भेटीच्या समारंभांत दगा करून मारिला. सफीचा व राजश्री पाटिलबावांचा पगडीबदल भाऊपणा जाहला होता. तेव्हां हें वर्तमान लिहिलें आल्यानंतर कूच करून जावें आणि आमदानीचें पारिपत्य करावें असा मजकूर होता. तों अनुपगीर गोसावी याची बातमी लिहिली आली कीं, हें वर्तमान ऐकोन आपली स्वारी इकडे येईल, तरी चार दिवस डेरेदाखल असावें. मागून लिहून

*तारीख २३ सेप्टेंबर १७८३ रोजीं शफीचा मृत्यू झाला.

पाठवूं त्याप्रमाणें करावें. तेव्हां यांतील बारीक मनास आणितां, मीर्जा सफीच्या मारण्याविषयीं आमदानीस सामील आफराशाबखान व अनुपगीर वगैरे सरदार मोगले आमदानीच्या कुटांत होते. तेव्हां आप्त फितूर जाणून तिकडील मसलत तूर्त जाण्याची राहिली. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं मागाहून लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports the murder of Mirza Shafi and adds that Sindia was closely watching the events at the Emperor's Court.*

No. 271 23rd October 1783.

॥ श्री ॥

(पत्रलेखक आपाजीराम)

सेवेसीं विज्ञापना येथील क्षेम तागाईत चंद्र २६ जिल्कादपावेतों यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटिलबावांचे बोलण्यांत आलें कीं, वारंवार मसलतीच्या कामांत होळकरांचे घरचीं तपसिलें लिहिलीं येतात. त्यास ज्या पक्षीं त्यांच्यानें बाईच्या बंदोबस्ताखेरीज चाकरी घडत नाहीं, तरी होळकरांस स्पष्ट सरकारांतून ताकीद व्हावी कीं, तुम्ही वारंवार खिसा* बाईचा सांगतां, ही गोष्ट ठीक नाहीं. तुम्हांस स्वामीचाकरी करून दाखविणें, त्यापक्षीं फौज धरून सत्वर कर्नाटक प्रांतीं जावें. टिपूचें पारिपत्य करून आल्यानंतर तुमच्या सरदारीचा बंदोबस्त करून दिला जाईल. ही गोष्ट ज्यापक्षीं घडत नाहीं, तेव्हां आम्हांस आज्ञा करावी कीं, बाईकडून फौजेचा बंदोबस्त करवून, दहा पंधरा हजार फौजेनिसीं बाई-कडील फौजेची रवानगी सरकारचाकरीवरी करितों. मग सरकारचाकरी बाईनें केल्यानंतर मग सर्वांचीं स्वरूपें बाहेर पडतील. समयास घरचीं गाणीं काढावीं आणि आम्हांस हटवावें, तरी ह्या गोष्टीनें हटणार नाहीं, ही एक तोड. या-खेरीज पटवर्धन व रास्ते व आनंदराव गोपाळ व हिंदुस्थानचीं पथकें खंडेराव त्रिंबक† वगैरे सरंजामी पथकें सरकारचीं झाडून, त्यांजमध्यें मातबर सरदार एक करून सरंजामी फौज झाडून त्याजबरोबर द्यावीं. शिवाय पागा व इतलाख‡ फौज ठेऊन राजश्री हरिपंत तात्यांची रवानगी करावी. ही गोष्ट न घडे त्यापक्षीं इतर सरदार कोणी सरकारकाम करावयाजोगे असतील त्यांस पाठवावें, आणि बशर्त मसलत करून सरकारकाम व्हावें, यांतच उत्तम आहे. आम्हांस श्रीमंतांनीं

*सबब. †ओढेकर. ‡पगारी.

वाढविलें, लाखों रुपयांचे सरंजाम दिले, आणि बरोबरीचे सरदार करून ठेविलें. दौलतीस वांटेदारही केलें. असें असतां सरकारचें काम होऊंच नये, आणि आम्ही खुशाल आपले घरीं बसावें, यांत परिणाम कोणाचाही लागणार नाहीं. इतकेंही असून कोणतीही गोष्ट घडून मसलत होत नाहीं असेंच असल्यास तसेंच लिहावें. म्हणजे त्याजप्रमाणें इंद्रसेनासीं बोलावयास येईल. अतःपर तो राहत नाहीं. तेव्हां फिरून त्याजपासीं मुदत करून पत्रें पाठविलीं आहेत. यांचीं उत्तरें तपसीलवार समर्पक यावीं तरच परिणाम आहे. नाहीं तरी मागें पुढें आम्हांवर कोणी शद्व ठेवितील तरी आम्हांकडे दोष किमपि नाहीं. सर्व गोष्टी आम्ही पेशजीं चार पांच वेळ लिहिल्या असतां, तेव्हांच आम्हांस स्पष्ट उत्तर लिहिलें असतें कीं इंग्रजांसीं सलुखा करावयाचा नाहीं, तरी या गोष्टीचा आमचा आग्रह किमपि नव्हता. आतां मात्र लौकिकांत गोष्ट वाईट दिसते कीं, पाटिलबावांचे विद्यमानें सरकारचा व इंग्रजांचा सलुखा होऊन, सरकारचीं कामें करारप्रमाणें विल्हेस लागलीं, आणि इंग्रजांकडील जाबसाल कांहींच घडूं नये, याजमुळें लौकिक वाईट दिसतो; आणि आमच्या वचनांत हिंदुस्थानामध्यें बेमानी नव्हती, ती या कारभारांत यावयास करिते. तेव्हां आम्ही खोटे पडल्यानंतर सरकारचे उपयोगाचे काय? यांतच सर्व गोष्टी आहेत. हे अर्थ सर्व थोडे थोडे ऐकण्यांत व बोलण्यांत दृष्टीस पडले. यास्तव तपसीलवार विनंती सेवेसीं लिहिली आहे. याचें उत्तर मनन होऊन लिहावयास आज्ञा करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji, through Appaji Ram, asks Nana not to mind Tukoji Holkar's excuses, but to dispatch him or Haripant immediately against Tipu.*

No. 272 13th November 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. आपण छ ४ जिल्कादचीं पत्रें पाठविलीं तीं छ १ जिल्हेंजीं पावलीं. टिपूनें न ऐकल्यास आश्विन मासीं फौजेची रवानगी करणेंच आहे. राजश्री हरिपंत बाहेर निघणार. त्यास या सुमारें कंपू आला पहिजे. सुरतेचे कंपूस हिंदुस्तानांत नेणार. तेव्हां इकडे दुसरा कंपू मसलतीस कोठून येईल, किती दिवस लागतील, हें आपण इंद्रसेनासीं बोलून लिहून पाठवावें. टिपूनें ऐकिलें नाहीं तरी आश्विन मासीं फौज त्याजवरी जाईल. त्यास कंपू त्यासुमारें फौजेस

येऊन सामील जाला पाहिजे. त्याचें उत्तर इंद्रसेनासीं बोलून लिहून पाठवावें. फौज बाहेर निघणार त्या अर्थी इंद्रसेन याचे भावास* इकडे पाठवावें. त्याचे आपले विचारें चांगलें दिसेल तें करावें म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें ऐसियास, टिपूकडील जाबसाल सहमहिन्यांत व्हावा, न जाहल्यास फौज तिकडे रवाना करावी, फौजेनें व इंग्रजांनीं सामील होऊन टिपूवरी मसलत करावी, असा करार होता. तो होऊन दोन महिने अधिक जाहले. सरकारचे फौजेची रवानगी नाहीं, यामुळें कलकत्याहून इष्टिनानें इंद्रसेनाकडे लेहून पाठविलें; व कंपूचा सरदार करनेल पापन करून पाठविला. सरकारची फौज निघाली म्हणजे करनेल पापन कंपू सुद्धां लेहून पाठवाल तेथें सामील होईल. फौज लौकर न निघाली तरी तसेंच लिहून पाठवावें. मग चेनापट्टणाकडे इंग्रजी जमाव व फरासीस एकत्र जालेच आहेत. टिपूकडील सलुखाचा संदर्भ फरासीसांचे मारफतीनें लागलाच आहे. टिपूशीं सलूख करतील अथवा जरबेंत आणतील. जशी काबू पाहतील तसें करतील. आम्हीं आपले तर्फेनें कराराप्रमाणें तुमचा मुलूख, किल्ले, दादासाहेब सुद्धां दिल्हे व कंपूचा सरदार तुम्हांकडे पाठविला. मुदतीपुढें दोन महिने तुमची प्रतीक्षा केली असतां कराराप्रमाणें तुम्हांकडून अमलांत न आलें, तेव्हां लाचार जाणून कळेल तसा टिपूकडील जाबसाल समजून घेऊं, असें इंग्रजांचें बोलणें आहे. त्यास, टिपूसीं सलूख करून मेळवून घेतला तरी वाईट, अथवा त्यास जरबेंत आणून त्याजकडे मुलूख जागा आहेत त्या घेतल्या तरी वाईट, अशी गोष्ट जाहल्यानें ठीक नाहीं. याकरितां फौज जलद बाहेर काढावी आणि लेहून पाठवावें. फौज बाहेर निघाल्याचीं पत्रें आपलीं आलीं म्हणजे करनेल पापन कंपू सुद्धां येऊन पोंहचेल. येविशीं पूर्वी तपशीलवार एक दोन पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून कळलेंच असेल. सांप्रत आपलीं पत्रें, फौज आश्विन मासीं बाहेर निघोन टिपूवरी जाईल, कंपू त्यासुमारें फौजेस येऊन सामील जाला पाहिजे, म्हणून आलीं. त्यावरून इंद्रसेनास सांगितलें कीं, फौजेची तयारी पुण्यांत जाहली. दसऱ्याचे मुहूर्तें निघोन टिपूवरी जाणार. तुम्हीं कानपुराचा कंपू आणवून करनेल पापन याची रवानगी करावी म्हणोन. त्यास इंग्रजांच्या बातम्या चहूंकडील येतात. पुण्यांतील वर्तमान कच्चें मुंबईस कळतें. तेथून कलकत्यास जातें. त्यावरून फौजेची तर्तूद अद्यापि नाहीं, डेरे मात्र दसऱ्यास दर वर्षास बाहेर देत असतात

*James Anderson succeeded David Anderson about this time at Sindia's Court.

तसे देतील. दिवसगतीनें आम्ही खर्चाखालीं येतों. तुमची अद्यापि फौजेची तर्तूद नाहीं. तेव्हां पापन यास कलकत्यास जावयास निरोप द्यावा हाच आग्रह पाहिला. कराराप्रमाणें तुम्हांकडून फौज जाऊन मसलत जाली नाहीं इतकें निमित्य ठेवून, पापन कलकत्यास जातांच चेनापट्टणाकडे लेहून पाठवून टिपूशीं सलूख करावा अशी तऱ्हा बोलण्यांत दिसून आली. तेव्हां परभारें टिपू व इंग्रज एक जाल्यानें ठीक नाहीं. याकरितां इंद्रसेनाचो खातरजमा आम्हीं केली कीं आमचीं पत्रें पुण्यास गेलीं आहेत, त्यांचे जाब लौकरच फौज निघाल्याचे येतील. फौज न निघाल्याचीं उत्तरें आलीं तरी आम्ही गोहदचे बंदोबस्तास फौज ठेवून टिपूचे मसलतीवरी चालतों. पुण्याचे जाब ये तोंपर्यंत पापन यानें कानपुरास जाऊन कंपूची तयारी करावी. जाब येतांच आम्हीं लेहून पाठवूं त्याप्रा ो कंपूसुद्धां यावें. असें बोलून इंद्रसेन याणें आपला भाऊ ठेवून कलकत्यास गेला. त्यास व पापन यास निरोप दिल्हा. पंचवीस रोजांनीं कंपू सुद्धां येतों, असा करार करून पापन गेला. कंपू त्याचा कानपुरीं तयारच आहे. पंचविसां रोजांनीं येईल. तोंपर्यंत आपलीं पत्रें फौजेचें त्यासुमारें कूच जाहल्याचीं यावीं. नाहीं तरी आम्ही इंग्रजांशीं बोललों, त्याप्रो इकडील बंदोबस्त राखून येणें प्राप्त. येविशींचें सविस्तर राजश्री नारो शिवदेव यांसीं बोललों आहों. सविस्तर लिहितील त्यावरून कळेल. रवाना चंद्र १७ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia expresses his disappointment at the delay shown by ihte Poona Ministry in preparing an expedition against Tipu as the English had, in consequence, cancelled their offensive plans and showed anxiety for an understanding with him.*

No. 273 22nd November 1783.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी :—

दंडवत विनंती उपरी. आपण पत्र छ २६ जिलकादचें पाठविलें, तें छ १८ जिल्हेजीं पावलें. टिपूनें फरासिसांचे विद्यमानें इंग्रजासीं सलुखाचें राजकारण लाविलें आहे व महंमदअलीचा भाऊ लढाईंत हैदरखानाकडे पाडाव आला होता तो कैदेंत होता, त्यासही मोकळे करून सलुखाचे राजकारणास इंग्रजांकडे पाठविलें व कोडयालकर* इंग्रजाकडेही सलुखाचा संदर्भ लाविला आहे, अशी बातमी

*Kodyal is the port of Mangalore.

आहे. त्यास टिपूनें करारापो्ा न ऐकिलें तर मसलत सरकार व इंग्रज मिळोन टिपूवरी करावी असा करार आहे. त्याप्रमाणें टिपूनें न ऐकिलें तर फौज रवाना होईल. त्यास आंतून इंग्रजांकडे टिपूचा सलुखाचा पैगाम असला तरी मसलतीस विरुद्ध पडेल, याजकरितां इंग्रजांचा दस्तऐवज सरकारांत असावा. त्यास आपण लिहिलें कीं, सरकारांतून पांच कलमांचा करारनामा शिक्यानिशीं आला म्हणजे इंद्रसेनास दाखवून कलकत्याहून कंपिनीचे मोहरेनिसीं कलमांचा करारनामा आणवूं. त्यास टिपूकडील संधानें आंतून सलुखाचीं अशीं लागलीं असतां, करार होऊन आला नसतां, फौज टिपूवरी नमूद जाली आणि त्यांणीं आंतून संधान केलें, तरी आमचा करार कोठें आहे असें म्हणतील. याकरतां आपण इंद्रसेनासीं बोलून, त्याजकडून कलकत्यास लिहवून, पांच कलमांचा करारनामा कंपिनीचे मोहरेनिसीं आणवून आपण पाहून लिहून पाठवावें. त्याची नक्कल पाठवावी म्हणजे येथून सरकारची यादी कराराची पाठवूं. पूर्वी आपलीं लिहिलीं पांच कलमांची आलीं, त्यांत अगोधर अगर मग तरी सरकारांतून लिहून द्यावीं हें लिहिलेंच नाहीं. लिहिलें असतें तर तेव्हांच उत्तर पाठविलें असतें. असो. हल्लीं लिहिल्याप्रो्ा करावें, म्हणजे सरकारचाही त्याप्रो्ा शिक्यानिशीं पाठवून देऊं. हे गोष्ट जरूर करावी. वरकड पत्राचीं उत्तरें मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. पूर्वी ये विषई आपण खातरजमेनें लिहिलें कीं, इंद्रसेनानें पांच कलमें कलकत्याहून कंपिनीचे मोहरेनसीं व दस्कतानसीं आणून द्यावयाचें कबूल केलें. तेव्हां हा मजकूर कांहींच लिहिण्यांत न आला; आणि पत्र तों बशर्तीचें आलें होतें. असो. त्यास पूर्वी आपण लिहिल्याप्रो्ा पांच कलमांचें पत्र कलकत्याचें लिहून आपल्याजवळ आणून लिहून पाठवावें म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास टिपूनें फरासिसांचे विद्यमानें इंग्रजांसीं सलुखाचें राजकारण लाविलें, हे गोष्ट खरी आहे. आपले पत्रापूर्वीच येथें वर्तमान आलें. त्यावरून आपणांस लिहून पूर्वी पाठविलें आहे त्यावरून कळलेंच असेल. चेनापट्टणाहून सलुखाचे राजकारणाचा मजकर कळला. त्यास इष्टिनास लिहिलें आलें, त्यावरून त्यानें चिनापट्टणवाल्यास उत्तर पाठविलें कीं, श्रीमंत पेशवेसाहेबांसीं व आंगरेज कंपनीसीं सलूख होऊन तह जाहला. त्यांत टिपू त्यांचे पेटचांत. त्यांणीं टिपूस सांगून महंमदअलीचा व इंग्रजांचा मुलूख व पाडाव सोडून देवावे. पेशवेसाहेब यांचे सांगितल्याप्रो्ा टिपूनें ऐकन महंमदअलीचा व इंग्रजांचा मुलूक जागा व पाडाव सोडन दिल्ह्या-वरी इंग्रज लोकांनीं टिपूसीं खलश करूं नये. पेशवेसाहेब यांचें न ऐकिलें तरी

पेशवेसाहेब यांजकडील फौज व इंग्रजी फौज सामील होऊन टिपूचें पारपत्य करावें. आपलाले मुलूक सोडवून घ्यावे. याशिवाय त्यांजकडील सुटेल त्याचा करार निमेचा ठरला आहे. त्यास इंद्रसेन यास लेहून पाठवूं. करारप्रों फौज श्रीमंत पेशवेसाहेब यांजकडील मसलतीवरी आली म्हणजे त्याचें पारपत्यच करावयाचें आहे. फौज त्यांजकडील न आली तरी मग लेहूं तसें करणें. म्हणोन चेनापट्टणाकडे लेहून पाठविलें आणि इकडे करनेल पापन पाठविला, त्याज बरोबर सांगोन पाठविलें व इंद्रसेन यास लेहून पाठविलें जे, टिपूकडील सलुखाचा पैगाम आला आहे; त्यास श्रीमंतांकडील फौज टिपूचे मसलतीवरी तहनामा जाला त्या दिवसापासून सहा महिन्यांनीं जावी. त्यास आठ नऊ महिने जाले, अद्यापि फौज तिकडे मसलतीवरी निघत नाहीं. आम्हीं खर्चाचे तहबारीखालीं किती दिवस यावें. आह्मांकडील कंपू फौजेस सामील व्हावा असा करार आहे. याकरितां करनेल पापन कंपूचा सरदार करून पाठविला आहे. त्याजकडील फौज चालली म्हणजे पापन याची रवानगी कंपू सुद्धां करणें. फौज याउपरी निघावयास ढील असली तरी तसेंच लेहून पाठवणें. टिपूकडील सलुखाचा पैगाम लागलाच आहे. कळेल तसा जाबसाल उरकला जाईल म्हणोन. त्यास पापन येथें आल्यावरी त्यासीं बोलणें जाल्याचा मजकूर पूर्वी दोन तीन पत्रीं लेहून पाठविला आहे. करारप्रों फौज सरकारची निघाली म्हणजे करनेल पापन याणें कंपू सुद्धां फौजेस सामील होऊन जावें. याप्रों जाल्यास टिपूशीं सलूख करूं नये. लढाई शुरू करावीहाच विचार इंग्रजांचा आहे. फौज न निघावयाचा विचार असिला, तरी करनेल पापन याणें माघारें कलकत्यास जावें. मग त्यांणीं टिपूकडील कळेल तसा जाबसाल उरकावा हा त्याचा विचार. त्यास टिपूचा जाबसाल परभारें जाहल्यानें ठीक नाहीं. फौज जाईल हा भरंवसा इंग्रजांस येईना. तेव्हां आम्हीं त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं आपला कंपू तयार करून आणवणें. सरकारची फौज तिकडे जाण्याविसीं पुण्यास लेहून पाठवितों. त्याचें उत्तर येई तोंपर्यंत कंपू घेऊन येणें. फौज सरकारची न निघाली तरी आम्ही गोहदचे वगैरे बंदोबस्तास फौज ठेऊन तुम्हांसमागमें येऊं, अशी खातरजमा केली. उपरांतिक पापन कंपू घेऊन यावयास गेला. आपण फौजेची तयारी करून फौज बाहेर काढावी. दोन चार कुचें फौजेचीं होऊन मिरजेपर्यंत जावीं. म्हणजे यांजकडील कंपू कानपुरीं तयार आहे तो येऊन पोंहचेल. फौजेची तयारी न जाहली, कंपू कानपुराहून आला, म्हणजे आम्ही त्यासीं बोललों तेव्हां येणें प्राप्त. परंतु इकडील बंदोबस्तही राहिला

पाहिजे. त्यास, कराराप्रों टिपूचे मसलतीवरी फौज पाठवावयाचें चित्तापासून आहे किंवा नाहीं, याचा खुलासा जसा असेल तसा स्पष्ट लेहून पाठवावा; त्या प्रों इंग्रजांस सांगावयास येईल. फौज टिपूवरी पाठवावयाची नसली तरी तसेंच ल्याहावें, म्हणजे टिपूकडील सलुखाचें राजकारण इंग्रजांकडे लागलेंच आहे, ते सलूख करतील. अथवा त्यास जरबेंत आणिलें तरी त्याजकडील मुलूख इंग्रजांकडे जाईल. येविसींचा विचार कोणता तो करून जलद लेहून पाठवावें. टिपूनें कराराप्रों न ऐकिलें तरी सरकार व इंग्रज मिळोन टिपूवरी मसलत करावी हा करार पक्का इंग्रजांकडील आहे. टिपूकडील सलुखाचें संधान लागलें म्हणन आमचा करार कोठें आहे असें म्हणणार नाहींत. टिपूकडील सलखाचा पैगाम लागला, तो त्यांस करणें असतें तरी इकडे करनेल पापन कंपूची तयारी करून कशास पाठविते? टिपूनें परभारें सलुखाचा पैगाम इंग्रजांकडे लाविला तरी इंग्रजांनीं सलूख टिपूशीं करूं नये असें कलम करारांत आहे. त्यांत चलबिचल व्हावयाचें नाहीं. कराराप्रों आपल्याकडून फौज टिपूचे मसलतीवरी न गेली, तरी आम्ही कराराप्रों तुमचीं कामें अमलांत आणून दिलीं, तुम्हांकडून अमलांत येत नाहीं, असा शद्ब लावून मग टिपूकडील कळेल तसें करतील. पांच कलमांचा मजकूर तरी पांच कलमांपौा साबक दस्तूर व सरकारचे सिकमातील* सरदार वगैरे कोणास आसरा देऊं नये, पास करणार नाहीं, अशीं दोन कलमें कलकत्याहून लिहून आलीं. मोहरेनिशीं त्याच्या नकला पारसी पूर्वी पाठविल्या आहेत. राहिलीं तीन कलमें, त्याप्रों टिपूकडील कलम करारांत आलें त्याप्रों ठीकच आहे. सरकारचें लिहिलें त्यास द्यावें व त्याचें लिहिलें सरकारांत घ्यावें. त्यास सरकारचे शिक्यानिशीं लेहून आम्हांकडे पाठवावें. इंग्रजांकडील मोहरेनिशीं घेऊन सरकारचें त्यास देऊं. परस्परें कुमकेचे व श्रीमंत दादासाहेबांकडील दस्तऐवजी दोन कलमांचा मजकूर पूर्वी लिहिला आहे. त्याचीं उत्तरें येतील तशीं त्याजपासून करून घेतलीं जातील. दोन कलमांची फर्द इंग्रजांकडील होऊन आली, त्याप्रों सरकारचे शिक्यानिशीं व टिपूचें कलम लिहिल्याप्रों लेहून मोहरेनिसीं पाठवावें. पांच कलमांचा जाबसाल आपणाकडून लेहून आला म्हणजे इंग्रजांकडील आरज्य जवळ घेऊन पाठवून देऊं. टिपूकडील कलम जें करारांत आलें तें पक्केंच आहे. येविसीं संशय न घेतां फौज टिपूचे मसलतीवरी पाठवावी. फौज निघाल्याचीं पत्रें आलीं म्हजजें कंपू सुद्धां करनेल पापन येईल, त्यास पाठवून देऊं. टिपूचे

*पोटांतील. ताब्यांतील शिकम=पोट.

मसलतीवरी फौज पाठवावयाची नसली तरी तसेंच उत्तर पाठवावें. त्याप्रमाणें इंग्रजांस सांगितलें जाईल. याउपरी फौजेस ढील जाहल्यास मग आह्मांकडे शब्द नाहीं. येविशीं राजश्री रामजी पाटील जाधव यांस सांगितलें आहे. उत्तर लवकर पाठवावें. रा छ २६ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji once more urges Nana to dispatch a force against Tipu or if he (Nana) was averse to hostilities, let him know his decision.*

No. 274 29th November 1783.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी :—होळकरांची सरदारी मातबर असतां घरचे दुईमुळें कांहींच तोड पडून निकाल पडेना. गंगाजलनिर्मल आहिल्याबाईनीं फौजेची सरबरा व सरकारांतून सावकार मामलेदारांची घालमेल केल्यानें ठीक कसें पडतें, याच बोलण्याखालीं इतके दिवस गेले. मसलत तर नेटली. याकरितां देसचे माहाल गुदस्तां तिसाला पैका घेऊन विल्हे लाविले, त्यांची घालमेल करूं नये. माळव्याचे माहालांवर वगैरे मिळोन फौजेची सरबरा बाईनीं करावयाचा ठराव करून, राजश्री तुकोजी होळकर यांची खातरजमा करून, फौजेची तरतूद करावयास लाविलें. लिहून पुसून जाब येणें जाणें यास आवकाश राहिला नाहीं. याकरितां तोड पाडली. याप्रमाणें बाईसही आपण सांगोन पाठवून लौकर आमलांत येई तें करावेंम्हणोन लिहिलें, तें कळलें. ऐसियास, दोन तोडींतून कोणती ती कसून करावी म्हणून आपण बाईस लेहून पाठविलें. त्यावरून बाईनीं सर्व आटोपून फौजेची सरबरा करावी हें मान्य करून, आपणाकडे राजश्री बाबूराव विश्वनाथ वैद्य पाठविले. त्याजवरी माहाल मुलूख स्वदेश, माळवा आदिकरून सर्व बंदोबस्त बाईनीं करावा; आणि फौज वगैरे सरदारी खर्च सुद्धां वीस लक्ष रुपये सालमजकुरीं द्यावे. देशचे माहालांवर गुदस्तां सहा लाख रुपये घेतले ते पेस्तर सालीं द्यावयाची साहुकार मामलेदारांची खातरजमा बाईनीं करावी, असा ठराव आपण करून बाईस लेहून पाठविलें व आम्हांसही लिहिलें. त्यास, या ठरावाप्रों आम्हीं बाईस लेहून पाठविलें, त्यावरून त्यांणीं कबूल केलें. आपण

ठरवल्याप्रमाणें बाईस मान्य. फौजेंत इतल्ला* असावी इतका मात्र जाबसाल बाईकडील होता. त्याजविसीं पेशजीं आपणास लिहून पाठविलेंच आहे. हल्लीं आपण याप्रमाणें लेहून पाठविलें. त्यास, एक वेळ तेथून गोष्ट निश्चयांत आली असतां, फिरोन दुसरे विचार होऊं लागल्यास, बाईच्या विचारास येईल न येईल हें पाहावें. आपण तूर्त मसलतीचा प्रसंग पाहून राजश्री तुकोजी होळकर यांची खातरजमा करून, त्यांजला फौजेचे तरतुदीस लाविलें, उत्तम आहे. देसचे माहालांची घालमेल करूं नये; तेथील देखरेख तुकोजी होळकर यांजकडे आसावी; माळव्याचे महालांवरी बाईनीं फौजेची सरबरा करावी; त्यास माळव्यांतील माहाल सरंजामाकडे आहेत ते वजा होऊन, बाकी दरोबस्त माळव्यांतील माहालांचा बंदोबस्त बाईनीं करून, जो माहालचा ऐवज होईल तो फौजेस पाठवावा, येविसीं बाईस लेहून पाठविलें आहे. परंतु पहिलीं पत्रें आलीं त्यांवरून तसें लिहिलें. हल्लीं आपल्या पत्रावरून याप्रों लिहिलें. यामूळें बाई चित्तांत कित्येक कल्पना आणून संशय घेतील. त्यास आपणही बाईस खातरजमा करून ल्याहावें. एतद्विषयींचें राजश्री पांडुरंग रघुनाथ निसबत राजश्री नारो शिवदेव यांस सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. रा छ ४ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*This again refers to the vexed question of the dispute between. Ahalyabai and Tukoji about the management of Holkar's mahals The Poona Darbar arrived at a decision and requested Mahadji to persuade Ahalyabai to accept it.*

No. 275 5th December 1783.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

विज्ञापना ऐसीजे :—छ १० जिल्हेजचीं पत्रें श्रीमंतांचीं पुण्याहून आलीं. तीं पत्रें उज्जनीहून जोडीबरोबर राघोगडचे मार्गें म्यान्यास आलीं. तेथें आपलें वर्तमान शाहाडौरे याचें ऐकून तेथें गेले. तेथें ऐकिलें जे, आपली स्वारी शिरोंजेस गेली. तेव्हां शाहाडौरेयाहून मागें फिरून येथें आले. पत्रें दिलीं. त्यांत दोन पत्रें राजश्री पाटिलबावांचे नांवें व स्वामींच्या नांवें पुरवण्या निराळे निराळे मजकुराच्या छ ८ मोहरमीं मजला पावलीं. तीं छ १० मोहरमीं बावांचीं पत्रें

---

*खबर.

नेऊन दिलीं. मजकूर छ ४ जिल्हेजचीं पत्रें स्वामींनी नरवरचे मुकामींहून पुण्याचीं पत्रें पाठविलीं. त्यांत बावांचीं पत्रें होतीं. त्याप्रमाणेंच तात्पर्य, पांच कलमांचें व कार्तिक वद्य ५ चे रोजीं राजश्री हरिपंत डेरेदाखल होतात. इंग्रजांचा कंपू कोणे मुकामीं येऊन यांस सामील होतो हें पक्कें करून लेहून पाठवावें. मुख्य कलम हैदरखानाचें. टिपूनें फरासिसांसीं सलुखाची भानगड इंग्रजांचे सलुखाची लाविली आहे. कदाचित् फरासिसांचे विद्यमानें टिपूचा सलूख इंग्रजांसीं जाला, तर इंग्रज म्हणतील आमचा दस्ताऐवज पांच कलमांचा कोठें आहे ? याजकरितां तें कलम अगोदर आलें पाहिजे. याप्रमाणें मजकुराचीं पत्रें नेऊन दिलीं. त्यांचे जाब होतील ते मागाहून रवाना करीन. दरबारांत राजश्री सदाशिवपंत भाऊ फडनिसासीं गांठ पडली होती. त्यास राजश्री एकनाथपंतांचे पत्राचा मजकूर दादोपंताचे जाबसालाचा सांगितला. त्यांनीं पत्र दाखवणें म्हटलें होतें. याजकरितां सायंकाळीं पत्र घेऊन फडनिसाचे घरास गेलों. ते वाडचांत गेले, ऐकून राजश्री आपाजीराम यांकडे गेलों. त्यांचे राहोटीजवळून गेलों आणि त्यांचे येथें न गेल्यास संशय घेतील याजकरितां गलों. भेटी जाली. त्यासीं केशो अनंत निसबत आबा चिटणीस जे सुरतेस श्रीमंतांस आणावयास गेले होते ते माघारे आले, त्यांची आपाजीराम यांची भेटी जाली, त्यांजपासोन रावजींनीं वर्तमान ऐकिलें तें त्यांनीं सांगितलें जे, केशोपंत सुरतेस जाऊन श्रीमंतांची भेटी घेतली. बावांचें आज्ञेप्रमाणें श्रीमंतांस विनंति केली. उत्तम आहे. आम्ही चालतों म्हणून श्रीमंतांनीं उत्तर केलें. नंतर पुण्याहून राजकारण शागिर्दांच्या हातून श्रीमंतांकडे लागलें कीं, आपण इकडे यावें, शिंद्यांकडे जाऊं नये. हें ऐकून श्रीमंतांनीं शागिर्दास उत्तर केलें, कोणाचे भरंवशावर देशीं जावें ? राजश्री नाना व हरिपंत प्रामाणिक आहेत. आजपावेतों या दोघांनीं शपथक्रिया दिली नाहीं. वरकडांनीं शफता देऊन बदमामली केली. मीही त्यांसीं तसाच वर्तलों. आतां हे दोघे शपथक्रिया देतील तर त्यांचे भरंवशावर देशास जाऊं. हें वित्त घेऊन भास्कर शागीर्द पुण्यास जाऊन तात्यांसीं भेटला. वर्तमान सांगितल्यावरून त्यांचे घरीं पंधरा वीस दिवस मनसबा होत होता. होळकर, मिरजकर, रास्ते, पांडुरंगराव हे तात्यांचे संमतांत येऊन मनसबा पंधरा वीस दिवस होत असतां श्रीमंत राजश्री नानांस कळत नवतें. कोणे द्वारें श्रीमंत राजश्री नानांस वर्तमान कळलें; तेव्हां आश्चर्य करून संदेहही प्राप्त जाला. तात्या नित्य घरास येत तर गांठ पडूं न द्यावी. पडली तर कांहीं बोलूं नये. यावरून तात्यांस समज पडला जे, आम्हीं मजकूर घाटितों हा कळल्या-

वरून विषाद आला आहे. एके रोजीं बेलबागांत श्रीमंत नानांस तात्यांनीं गांठून श्रीविष्णूजवळ बसोन वर्तमान श्रुत केलें कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेबांस इकडे आणावयाचें घाटितों, हें मान्य करावें. शिद्यांकडे श्रीमंत गेले तर काय अनर्थ करितील न कळे. राज्यच बुडेल. यास्तव त्यांस इकडे आणितों. आपणास मान्य असावें. स्वामींसीं दगा करूं तर याच श्रीविष्णूची शफत आहे. नानांनीं बरें म्हटल्यावर घरीं येऊन, शिष्यासीं खलबत केलें कीं, दोन लक्ष रुपये नख्त कर्ज वारावयास देतों, लाख रुपयांची जागीर देतों, व पंचवीस हजार रुपये दरमहा तहनाम्याप्रमाणें देत जाऊं. आपण धनी खावंद. आम्ही सेवक. सेवा घ्यावी. नानांचें लक्ष विश्वास शिद्यांकडे आहे. त्यांस ही गोष्ट नावडे, तर स्वामींची मर्जी रक्षणें आम्हांस प्राप्त. आपली मर्जी आहे कीं, श्रीमंत राजश्री मोरोबादादांस मोकळे करून कारभार सांगावा, तर त्यांसीं मजसीं परम द्वेष. त्याचें परिमार्जन व्हावें. त्यांनीं मजवर कृपा करून कारभार चाकरी घेतल्यास त्यांचेच लक्षांत चालेन, नानांचा पक्ष सोडून देईन. हें वर्तमान घेऊन शिष्यांनीं येऊन श्रीमंतांस विनंती केली. श्रीमंतांनीं मजला कच्चें वर्तमान सांगून आज्ञा केली कीं, पाटील-बावा पंचवीस हजार दरमहा देणार. कर्ज वारीत नाहींत. पुणेंकर दोन लक्ष कर्ज वारावयास देतात. दरमहा पंचवीस (हजार) देऊन लाख रुपयांची जागीर देतात. यास्तव तूर्त आम्ही देशास जातों. तुमचें संधान आहेच. परगणा बडव्याचा घाट नीट करून ठेवणें. पुणेंकरांकडे अंतर आढळल्यास बडव्यास आलोंच समजावें. पुण्याचें वर्तमान शागिर्दापासोनही शोधिलें. श्रीमंतांनीं कच्चें सांगितल्याप्रमाणें त्यांनीं सांगितलें. आणखी बारीक मोठें सांगावयाचें आहे तें मग सांगेन. फिरून केशोपंतांची गांठ पडल्यावर बारीक मोठें पुसोन घेऊन तुम्हांस सांगूं. तुम्हीं हें वर्तमान कोंठें कळूं न द्यावें. वर्तमान ऐकिलें तें पत्तेवार स्वामींस कळावें म्हणून विनंती केली. मोठें भय पंचायतीचें. रुजुवात करूं जातां सर्वांस भय पत जाण्याचें. तेथें मजला रुजुवात करून मागितल्यास कशी होईल ? ऐकिलें तें सेवकबुद्धीनें विनविलें. खरें खोटें श्री जाणें. हे विज्ञापना. वर्तमान ऐकिलें लिहिलें. खरें असावयाची भ्रांति वाटते. कदाचित् खरें असल्यास मजला आज्ञा काय ते करावी. मग यांसीं वाईट कां व्हावें ? उठून घरास जावें हें बरें. उत्तराची आज्ञा व्हावी हे विज्ञापना.

¶*This letter from Sadashiv Dinkar reports among other things an important interview between the agent of Sindia and Raghoba at Surat and explains why Raghoba chose to surrender himself to the Poona Ministry.*

No. 276 21st January 1784.

पौ छ ३० रविलावल आर्बा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. आपण छ २७ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री हरिपंत कार्तिक वद्य पंचमीस डेरेदाखल जाहाले. कांहीं फौज जमा जाली व होत आहे. राजश्री परशरामपंत भाऊ मिरजेहून डेरेदाखल जाले. त्यांचीही फौज जमा होत आहे. येथून त्यांजकडे कांहीं तोफाही पाठविल्या व येथें जी फौज जमा जाली ती नरसिंगराव उद्धव यांचे चिरंजीव राजश्री यशवंतराव याजबरोबर देऊन पंचवीस तीस कोसीं रवाना केली आहे. मागाहून हरिपंतही फौज सुद्धां शंभुमहादेवाचे सुमारें जातील. आपली थैली टिपूचे नांवें आली ती व तेथून टिपूस पत्रें लेहून सविस्तर मजकूर नूरमहमदखानासीं बोलून पत्रें टिपूकडे गेलीं आहेत, त्यांचे उत्तराची प्रतीक्षा आहे. कबूल होत नाहीं असीं उत्तरें आलीं म्हणजे फौज टिपूचे मसलतीवरी जाईल. इंग्रजांचा कंपू लौकर इकडे येऊन फौजेस सामील होय असें करावें. सुरतेस कंपू होता तोही हिंदुस्थानांत येत आहे, त्यास इंग्रजांचें पत्र जाऊन तोही कंपू फौजेस सामील होय असें करावें. सरकारांतून फौज रवाना होवयास ढील* जाली नाहीं. इंग्रजांचा मात्र खंबीर पक्का असावा, त्यांत चलबिचल होऊं नये हें पक्कें करून घ्यावें. हरिपंत फौज सुद्धां माहादेवाचे रानांत जातात. पुढें मिरज नजीक राहिली. हैदरखानाचे तालुक्यास अंतर थोडें. निकडीनें गेल्यास पांच सहा दिवस लागतील; आणि कंपू कानपुराहून येण्यास दोन महिने मोठे निकडीनें आले तर यावयास लागतील. याकरितां कंपू जलद रवाना करावा. टिपूकडून अलीकडे बातम्या आल्या, त्यांत चिनापट्टणाहून दोघे मातबर कौसलदार व सात पालखीनिसीन तह करावयास निघाले. ते बेंगरुळास दाखल जाले. जर पूर्वी मतलबाची याद पाठविली त्याप्रमाणें होत असल्यास सरकारांतून तह करूं; नाहीं तर आम्ही परभारें तह करितों म्हणोन सरकारांतून रास्त्यांकडील राजश्री आनंदराव निबाजी पूर्वी तेथें आहेत, त्यांजवळ टिपूनें सांगून पत्र लिहविलें व बातम्याही आल्या. त्यास इकडे बेदिकत कलम उभय पक्षीं ठरलें. इंद्रसेनानें करार करून आणून द्यावयाचें कबूल केलें असतां आलें नाहीं, आणि टिपूकडे चेनापट्टणाहून मातबर इंग्रज बोलावयास आले, ते परभारें तह करणार, याप्रमाणें टिपूच सांगून लिहवितो. असें असतां

*दिरंगाई.

फौज यावी येविसींचें वारंवार आपण लिहितात. त्यास फौजही जमा जाली. तोफखाना गाडद सुद्धां हरिपंत वानवडीवर गेले. पुढें पल्लाही लांब फार नाहीं. माहादेवापावेतों गेले म्हणजे उघाड मसलत जाली. टिपूच्याही बातम्या सरकारांतून मसलत होत्ये ह्या गेल्याच आहेत, आणि इंग्रजांकडील तो प्रकार याप्रमाणें, यांत आंदेशे फार निघतात. तत्रापि आपण वारंवार खातरजमेनें लिहितात यावरून माहादेवाचे रानांत लौकर जाऊन पोहोंचतील. गुंता नाहीं. कंपू लौकर येऊन पोंहचावा. इंद्रसेनाची खातरजमा आपण केली, चांगलें केलें. येणेंकरून परभारें इंग्रज सलूख करणार नाहींत व आपले बोलल्याप्रमाणें सरकारांतून फौजही गेली, यावरून त्यांस भरंवसा पुरेल. सारांश, इंग्रजांनीं परभारां तह करूं नये हें करारांत आहेच हें मात्र पक्कें असावें. कंपूची रवानगी लौकर येऊन पावे असी करावी. हे विसींचा मजकूर लेहून पाठविला आहे व यापुढील मसलतीचे कित्येक मजकूर राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळला असेल. त्याचें मनन होऊन उत्तर लौकर पाठवावें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, नूरमहमदखान* यांसीं बोलून टिपूकडे पत्रें रवाना केलीं होतीं, त्यांचें उत्तर आज पावेतों आलेंच असेल. त्याचा मजकूर लेहून पाठवावा. आपण फौजेची तरतूद करून राजश्री नरसिंगराव उद्धव यांचे चिरंजीव याजबरोबर कांहीं फौज देऊन पुढें रवाना केले. सिद्धटेकापर्यंत गेले. राजश्री हरिपंत तात्याही फौज सुद्धां बाहेर मुकाम करून आहेत. राजश्री परशरामपंतभाऊ डेरेदाखल जाले. त्यांजकडे तोफा रवाना केल्या. याप्रमाणें फौजेची तरतूद करून टिपूवरी मसलत करावयाचा विचार केला. फार उत्तम आहे. इंग्रजांचा कंपूही लौकर पाठवावा म्हणून लिहिलें. त्यास, इंग्रजांचें म्हणणें आमचा कंपू तयार आहे, परंतु टिपूकडे तुमचीं पत्रें गेलीं त्याप्रमाणें ऐकून त्याणे महमदअलीचा व आमचा मुलूक व बंदवे सोडून दिल्यास बरेंच जालें. कराराप्रमाणें त्यास कबूल नाहीं असें पत्राचें उत्तर आलें म्हणजे कंपू दरमजल येऊन फौजेस सामील होईल. पत्राचें उत्तर आल्यापूर्वीच कंपू रवाना केला. फौज व कंपू एकत्र जाल्यावरी मग टिपूनें कराराप्रमाणें मुलूक व बंदवे सोडून देतों म्हणून संदर्भ लाविला तरी ऐकूं नये. मसलत करावी असें पक्कें असावें. येविसीं पुण्यास लेहून उत्तर आणवावें म्हणजे कंपू येऊन पोंहचेल. त्यास, टिपूकडे पत्रें गेलीं त्यांचें उत्तर काय येतें, ऐकतो न ऐकतो हेंही समजलें पाहिजे. त्याचें उत्तर आल्यापूर्वीच कंपू आला, मग त्याज-

*टिपूचा पुणें दरबारीं वकील.

कडील सलुखाचें उत्तर आलें तरी इंग्रज ऐकणार नाहींत. याकरितां आम्ही इंद्रसेनाचा भाऊ येथें आहे त्यासीं बोलून तूर्त तोड ठरविली आहे कीं, सरकारचे फौजेची तरतूद जाहाली; मिरजपर्यंत फौजा पोंहचल्या दाखलच आहेत. परंतु टिपूचे पत्राचा जाब यावा इतकाच गुंता आहे. त्यास, तूर्त तुम्हीं मुंबईकरांस लेहून तेथें जीं पलटणें असतील त्यांची रवानगी होऊन सरकारचे फौजेस सामील करावी. पलटणें व फौज एकत्र जाली, पुढें येतात, असें टिपूस कळल्यावरी, या दबावानें वाटेवरी येऊन कराराप्रमाणें मुलूक व बंदवे सोडून देऊन सलूख केला, तरी गुंताच उरकला. सरकारची फौज माघारी येईल. मुंबईचे पलटणांस मुंबई जवळच आहे. आपले ठिकाणास पलटणें जातील. फौज व पलटणें एकत्र जालीं असतां टिपू ऐकत नाहीं असें पत्र पुण्याचें आलें म्हणजे कंपू त्याच क्षणीं चालावा. याप्रमाणें निश्चय करून इंद्रसेन याचें पत्र मुंबईकरांस पाठविलें आहे. मुंबईचीं पलटणें व फौज मिरजेपावेतों जावीं. तोंपर्यंत टिपूकडील पत्राचें उत्तर येईल तसें लेहून पाठवावें, त्याप्रमाणें होईल. पुढील मसलतीचे विचार व नवाबाकडील व टिपूकडील व सरकारचे सविस्तर अर्थ राजश्री नारो शिवदेव यांचे पत्रीं लिहिले ते सविस्तर कळले. त्यांचें उत्तर आलाहिदा लिहिलें आहे त्यावरून कळेल. टिपूचा व इंग्रजांचा तह परभारें होणार नाहीं येविसींचें इंग्रजांसीं बोलण्यांत व लिहिण्यांत पक्कें आहे. याप्रमाणें राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्राबरोबरही लिहून पाठविलें आहे. रवाना छ २७ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes in reply to Nana of letters having been addressed by Anderson to the Government of Bombay to send a detachment to act in concert with the Maratha force operating against Tipu.*

No. 277 23rd January 1784.

(आप्पाजी रामाचें पत्र नानास)

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २९ सफरपर्यंत मुक्काम लष्कर बहादरपुरा नजीक ग्वाल्हेर येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटिलबावांसीं युक्तीनें बोलावें आणि फडनिसीचे दरकाचें काम चालवावें म्हणोन आज्ञा. त्यास आजपर्यंत स्वामींचे आज्ञेप्रमाणें

व येथील मर्जी रक्षूनच वर्तणूक सेवकानें केली आहे. परंतु कोणी कल्पना ऐसी घतली कीं, हे यांचीच खुशामत करून येथें राहतात. तरी ह्या गोष्टीस उपाय काय ? यास्तव पेशजीं सेवेसीं विनंती लिहिली होती कीं, निक्षून पुसोन जाबसाल करावे किंवा मर्जीचें लक्ष धरून बोलत जावें ? त्यास हल्लीं आज्ञा केली त्याजप्रमाणें वर्तणूक करूं. स्वामींचे आज्ञेखेरीज दुसरी गोष्ट घडावयाची नाहीं. प्रस्तुत गोहोदेस वेढा घातला आहे. अद्याप बाहेरून मारगिरी तोफांची सुरू केली नाहीं. मग आणखी कितेक दिवस लागतील तें न कळे. राजश्री परशरामभाऊ यांजकडेस तोफा पाठविल्या. त्यांची तयारी होऊन कोल्हापुरचे रोखें जाणार. नरसिंगराव उद्धव यांच्या पुत्राबराबर फौज देऊन दोहों तिन्ही दिवसांचे वाटेवर पुण्यापासून तयारी होत आहे. कंपू आला म्हणजे फौज सिद्धच आहे म्हणोन सरकारच्या लिहिण्यांत आलें. त्याचे अर्थ येथें जाहले जे, परशरामपंतभाऊ कोल्हापुरचे मसलतीस पाठविले, याजकरितां तोफा त्यांजकडेस पाठविल्या. नरसिंगराव यांचे पुत्राची रवानगी पेशजीं करकंमकर तेल्यानें बखेडा केला होता, त्याच्या पारपत्यास पुन्हां खूळ उत्पन्न जाहलें म्हणोन फौजेची रवानगी केली. कर्नाटकचे मसलतीस अद्याप फौज जावयाची सुस्ती आहे असें म्हणतात. तेव्हां त्यांसीं उत्तरेंही केलीं. परंतु बोलण्यांत भाव असे येतात. वरकड होईल वर्तमान तें सेवेसीं लेहून पाठवूं. स्वामींस पेशजीं विनंती देशीं येण्याविसीं लिहिली होती. त्याचीं उत्तरें ल्याहावयाची आज्ञा जाहली कीं, तूर्त यावयाचें नाहीं. त्यास आज्ञा शिरसा वंदन करून स्वस्थ आहों. येथें विशेष कामकाज नव्हतें, आणि महर्गता फार. आठा शेरांची धारण. तेव्हां उगेंच राहून सरकार चाकरीचा उपयोग घडत नाहीं. यास्तव विनंती लिहिली होती. त्यास हल्लींचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं. स्वामींकारणें रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. हे स्वीकार करून सेवकास उत्तर ल्याहावयाची आज्ञा जाहली पाहिजे. श्रीमंत दादासाहेब* कैलासवासी जाहल्याचें वर्तमान स्वामींचें लिहिलें आलें, त्यास श्रीमंत रावसाहेब यांचे पुण्यप्रभावेंकरून सर्वही गोष्टी घडतात. परंतु पाठीमागें बाई† राहिली आहेत येविसींचा मात्र बंदोबस्त पक्का असावा. ही सूचना सेवकानें ल्याहावी असी योग्यता नाहीं. परंतु सुचली विनंती तिची संज्ञा लिहिली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes of the little credit given by Mahadji to the reports of the Poona Ministry having dispatched a force against Tipu. He refers to Raghoba's death and suggests Nana to keep Anandibai under close surveillance.*

*राघोबा दादाचा मृत्यु ता. ११-१२-१७८३. †आनंदीबाई दादाची स्त्री.

No. 278 23rd January 1784.

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबांचे सेवेसीं:--

छ विनंती सेवक आपाजी राम दाभोळकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २९ सफरपर्यंत मुक्काम लष्कर बाहदरपुरा नजीक ग्वालेर येथें स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :— साहेबांकारणें रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसीं पाठविले आहेत. हे स्वामींनीं स्वीकार करून सेवकास पत्रीं लेखन करावयासी आज्ञापिलें पाहिजे. राजश्री पाटिलबावा यांणीं गोहोदेस वेढा भोंवताला वसविला आहे. गोहोदवाला बहुत कायल* केला आहे. शहरांत तीन शेरांची धारण बंदीमुळें जाहली आहे. स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून हेंही कार्य सत्वरच थोडक्याच दिवसांत घडोन येईल. वरकड अधिकोत्तर विज्ञप्ति ल्याहावी ऐसी नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram sends to the Peshwa seasonal greetings and informs him of Mahadji having closely invested Gohad.*

No. 279 23rd January 1784.

सेवेसीं विनंती सेवक स दाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ२९ सफर मुकाम नजीक बहादरपुरा ताा ग्वाल्हेर स्वामींचे कृपावलोकानें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पाटीलबावांनीं बोलाऊन सांगितलें ज, राजश्री धारराव निंबाळकर यांचा व खंडेराव आपाजी निंबाळकर यांचा वाद आहे, त्यास वादामध्यें खंडेराव व आपाजी निंबाळकर एकदोन वेळ खोटे जाले असतां कटकट करितात, त्यांस ताकीद व्हावी म्हणून आमचीं पत्रें श्रीमंत राजश्री नाना यांस पाठविलीं व धारराव यांचे बंधु राजश्री बापूजी निंबाळकर यांनीं दावा करून मौजे वाटार येथील माणसें मारलीं, तोडिलीं, व गांवांतील घरांस आगी लाविल्या. मजरेवाडीस आग देऊन बायका नागव्या उघड्या करून चिरगुटें वस्तभाव नेली, बायका तोडिल्या असें धारराव यांनीं सांगितल्यावरून कळलें. व्यंकटराव निंबाळकर असतां खंडेराव आपाजी निंबाळकर खोट जाले व पुढें वाद होतो. त्यास बापूजी निंबाळकर वादास उभे असतां खंडेराव व आपाजी यांनीं असा दावा व नाश केला. कर्म न करावयाचें केलें.

*त्रस्त, कुण्ठित.

त्यापक्षीं उभयतांस कैद करून ठेवावें. आम्ही देशीं आल्यानंतर धाररावही येतील. समक्षच यांचें त्यांचें मनास आणून फडशा पाडावा. तों पावेतों उभयतांही भावाबंदा सुद्धां कैद असावे; व त्यांस ताकीद होऊन दाव्यांत घोडीं व वस्तभाव वगैरे नेली असेल त्याची यादी नुकसानाची बापूजी निंबाळकर समजावितील, त्या प्रमाणें उभयांकडून देवावें, म्हणून आतांही आम्हीं पत्र लिहिलें आहे. तुम्हींही लेहून देणें. त्यावरून विनंती केली असे. त्यास बावांनीं पत्र लिहिलें आहे त्यावरून अर्थ ध्यानास यईल. त्या अन्वय कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. वाद दरबारीं हो तों, फडशा सरकारांत होईल, त्याप्रमाणें उभयतांनीं वर्तणूक करावी. तें न होतां खंडराव व आपाजी निंबाळकर यांनीं बेहुकमी करून नाश केला त्यापक्षीं कृपा करून पारपत्य करणार धनी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji asks Nana not to decide the dispute between them Nimbalkar brothers in the absence of Dhar Rao but keep it pendig till his return to the south.*

No. 280 11th February 1784.

पैवस्ती छ ८ रबिलाखर अर्बा समानीन.

हस्ते डांक.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १९ रबिलावल, मुक्काम गोहदेचे पश्चिमेस अडीच कोस, स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—छ २७ जिल्हेज व छ १९ मोहरमचे पत्रांचे जाब, राजश्री पाटीलबावा यांचे जाबसहवर्तमान छ ४ रविलावलीं रवानगी केली, ते प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जालें असेल. छ ७ सफराची रवानगी बराबर जाब व सदरी दोन रवानग्यांपैकीं गुजराथचे महाल पैकीं भडोचकर इंग्रज सुदामत अमल घेत होता, याचे जाब जाल्यावर रवानगी होईल. गोहदकराचे जाबसालाकरितां हिंमतबहादूर अनुपगीर गोसावी यांजकडील अली नकीखानाचा पुत्र व जहुदीखान ऐसे दोघे आले आहेत. गोसावी यानें परभारा गोहदकरास लेहून पाठविलें आहे जे, आम्ही येऊन कर्तव्य काय? पाटीलबावा गोहद घेतल्याखेरीज कांहीं एकत नाहींत. गोहद खालीं करून तुम्ही बाहेर निघाल्यानंतर जाबसाल काय होणें तो होईल, असें त्यास साफ लिहिलें; आणि इकडे वकीलही पाठविले आहेत. बावा गोहद घेतल्याखेरीज बोलणें ऐकत

नाहींत. राण्यास वकील येथें आल्याचें वर्तमान कळलें, त्यावरून आश्रा धरून दम धरिला आहे. बावांचे विचारें, गोसावीबावांचे वकिलास गोहदेजवळ आपले फौजेंत पाठवावें, गोहदकरांचे कारभारी यांनीं बाहेर येऊन, त्यांच्या त्यांच्या भेटी होऊन, परस्परें बोलण्याचे अर्थ समजून, तात्पर्य ध्यानास यावें. काम उरकलें उत्तम; नाहीं तर नाद कामाचा काय? स्पष्ट लढाई करीत असला, त्यासच सिद्ध व्हावें. या अर्थें वकील मजकुरास गोहदेस आपले फौजेंत पाठवणार. पुढें होईल ते विनंती करीन. गोहदेंत धारण दोन अडीच शेर पावेतों जाली होती. आतां सवंगाई बरीच आठ नव शेरांपावेतों जाली ऐकतों. जाटानें आपला गल्ला काढिला. सलूख जाल्यावर गल्याचा पैका होणार नाहीं, म्हणून साहुकार बेपारी यांनीं महागाईंत विक्री करून पैका करावयाचे बुद्धीनें माल काढून विकतात, म्हणोन इतकी सवंगाई जाली म्हणतात. राजश्री रायाजी पाटील व जिवाजी बल्लाळ बक्षी दोघे सडे फौजेंत जुंझाचे मोहल्यावर आहेत. रायाजी पाटील यांस समाधान नाहीं म्हणोन त्यांजकडे गेलों होतों. जिवाजी बल्लाळ यांजकडेही जाऊन भेटी जाली. त्यांस गोहदचें विचारलें. त्यांणीं सांगितलें, गोहदेंत वरकड सामान सरंजाम फार आहे. दाणा अगदीं नाहीं. पोटामुळें अजीज* जालों म्हणतात. जाट भेटतो, गोहद खालीं करून देतों म्हणतो. माझी कांहीं सोय करावी. अबरूनें बाहेर काढावें. अबरूंत खता होऊं नये असें म्हणतो. बावा ऐकत नाहींत. जाटानें आम्हांस येऊन भेटावें; नंतर त्याची सोय करणें ते बोलून करूं म्हणतात. त्यास विश्वास पडत नाहीं. बावा कोणाचें ऐकत नाहींत. श्रीमंतांचें पत्र येईल त्या आज्ञेवर समारोप करतील, तर मग जाटास वचन प्रमाण देऊन बाहेर काढितील. कांहीं जागाजुगा देतील तर न कळे. असें बोलत होते. रात्रीस मोर्चावर बाहेरले जाटाचीं माणसें येऊन कांहीं गूलगलबाही केला होता. तोफाही होत असतात. रायाजी पाटील व्यथिस्थच सडे फौजेंत आहेत. व्यथा त्यांस पहिलीच आहे. कधीं बरी, कधीं भारी, तसी आतांही आहे. जड आहे. औषध उपाय होत असतो. स्वामींचे कृपेंकरून आरोग्य होईल. सेवेसीं श्रुत होय से विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the beleaguered place of Gohad being on the verge of surrender.*

---

*दीन, शरण.

No. 281 19th February 1784.

पैवस्ती चंद्र १५ रबिलाखर आर्बा

समानीन. हस्ते डाक.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रविलावल मुक्काम गोहद नजीक दोन तीन कोस स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—चंद्र ७ सफर व चंद्र १९ सफरीचीं पत्रें सादर जाहलीं त्यांत राजश्री पाटीलबावांस पत्रें सादर होतीं ती प्रविष्ट केलीं. त्यांचे जाब निरंतर मागतों. प्राप्त जाहल्यावर रवाना करीन. पाटीलबावांनीं मजकूर ऐकला तो सेवेसीं विनंती लेहावयास सांगितल्या. वरून पुरवणी निराळी विनविली आहे. उत्तर सादर करण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana of his having delivered his letters to Mahadji.*

No. 282 24th February 1784.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २ रविलाखर मुक्काम नजीक गोहद स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—प।। भडोच हा महाल मोगलांकडे होता तेव्हां प।। जंबुसर, आंकलेश्वर, अमोद, हसोट, देहजबारे या महालांत तो मोगल अंमल घेत होता. भडोच इंग्रजांकडे आली. इंग्रज मोगलांप्रमाणें अंमल घेत होते. सांप्रत भडोच राजश्री पाटिलबावांकडे आली. बावांकडील कमाविसदार सुदामदीहून* जाजती मागतात. तर सुदामदीप्रमाणें अंमल घेत जाणें अशीं पाटिलबावांचीं पत्रें पाठवणें म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावा यांस विनंती केली. उत्तर जालें जे, भडोचेहून आमचे कमाविसदाराचें पत्र आलें आहे. सदरहू पांच महालीं अंमल चौथाई म्हणून खंड बेरजा आहेत, व दोन महालीं प।। जंबूसर वगैरे दोन महालीं निमे जकात आहे. महालीं ठाण्यांत कारकून राहून निमे जकात घेत जावी, सुदामत अशी चालत आहे, असें पत्र आलें. याची माहितगारी सरकारांत नाहीं. आम्हांसही नाहीं. अमलाचा फेरफार होत असतो. जमीदार नेहमींचे आहेत त्यांस दाखला असतो. तहकिकातही†

*पूर्वीहून. †खरेंखोटें.

त्यांजपासून होऊन पुढें कामें चालतात. त्यास येविषयीं सरकारचीं पत्रें कमाविसदार जमीदारास यावीं कीं, सुदामत अंमल चालत असतील त्याप्रमाणें चालवणें. अशीं पत्रें सरकारचीं येथें आलीं, म्हणजे भडोचेस पाठऊं. सुदामत जमीदारांजवळ तहकीक होईल त्याप्रमाणें सरकारचे कमाविसदारांनीं अंमल चालवावा. आमचे कमाविसदारानें अंमल करावा. येविषयीं आम्हीं राजश्री नाना यांस पत्र लिहिलें आहे. तुम्हीं लिहून देणें. त्यावरून विनंति केली असे. सुदामत तहकिकात होईल त्याप्रमाणें उभय पक्षीं चालावें, हें बावांचेंही म्हणणें आहे. ताकीदपत्रें देण्याविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय. पा भडोच येथील कमाविसदाराचें पत्र बावांस आलें, त्यांत पांचा महालांत सुदामत अंमल चालतो त्याचा तपशील लिहिला आहे. वितपशील :—

१ पा जंबुसर येथें ३२००० ऐन मालाची चौथाई याचा गुतका.*

१ शहरांत ठाणें बसवून जकातीचा निमे अंमल घ्यावा.

१

१ देहजबारे मालाची चौथाईचा गुतका रुपये ३०००

१ पा आमोद

१७००० ऐन मालाची चौथाई याचा गुतका

१ शहरांत ठाणें बसवून जकात निमे घ्यावी

१

१ पा। आंकलेश्वर मालाचा गुतका ४६००

१ पा। हसोट मालाचा गुतका २३००

कण रुपय ५८९०० आठावन्न हजार नवशें मालाची चौथाई गुतका व दोन महालीं कसब्यांत ठाणें बसवून जकातीचा निमे अंमल घ्यावा, असें लिहून आलें आहे. सरकारचें पत्र बावांस आलें, त्यांत अठरा हजार गुतका भडोचेचा व तीन हजार रुपये सुकडी† सरकारचे कमाविसदाराची, ऐकून एकवीस हजार लिहिले आहेत. सुदामदीचा दाखला जमीदारांच्या येथें असेल. त्यांजवळ दाखला पुरेल

---

*A monopoly, farm or rent, an income of variable amount sold or let for a fixed sum. †A fee or a perquisite.

त्याप्रमाणें पुढें चालेल. यास्तव सुदामत असेल त्याचा दाखला पाहून पुढें चालवणें, अशा ताकिदा कमाविसदार जमीदारांस आल्या म्हणिजे कमाविसदार दाखला पाहून चालवितील असें बावांचें बोलणें आहे. त्यावरून विनंती केली असे. उत्तराविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*This paper contains Mahadji's suggestion about the joint revenue collection from the district of Broach. Mahadji's Kamavisdars were charged with making collections in excess.*

No. 283 26th February 1784.

पैवस्ती छ ११ रबिलाखर अर्बा समानीन
हस्ते डांक.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ ४ राखरपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून डीग, लष्कर नजीक गोहोद येथें सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तरी राजश्री पाटिलबावांनीं गोहोद भोंवत्या फौजेच्या व पलटणांच्या चवक्या बसवन रस्त बंद केली, याजमुळें लढाईखेरीज राणा जेर जाहला. नंतर फाल्गुन शु॥ पंचमीस* किल्ला सोडून राणेखानभाई व बाळाजी अनंत पागेनीस व जिवाजी बल्लाळ बक्षी यांचे विद्यमानें येऊन भेटला. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून हें यश राजश्री पाटिलबावांस तीन वर्षें श्रम केल्याचें ईश्वरें दिल्हें. येणेंकरून या प्रांतीं तमाम संस्थानिकांवर दबाव बसला. येणेंकरून पुन्हां असी लबाडी करून मसलत पाडावी असा वकूब यांच्या गढ्यांमध्यें कोणांत राहिला नाहीं. सारांश, श्रीमंतांचे पुण्याचें वर्णन करावें असी गोष्ट ईश्वरें ही घडविली. वरकड वर्तमान तफसीलवार मागाहून सेवेसीं होईल तें लिहून पाठवीन. स्वामींनीं मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले, ते उत्तम समयीं पावोन बहुत संतोषेकरून स्वीकारिले. असेंच निरंतर सेवकावर कृपा करून पत्रीं सांभाळिलें पाहिजे. पेशजीं स्वामींस खासगत देशीं येण्याचा मजकूर सेवेसीं लिहिला होता, त्याचें उत्तर सेवकास आलें कीं, तूर्त यावयाचें करूं नये; त्याजवरून स्वस्थच आहों. परंतु देशींहून आल्यास सवा दोन वर्षें जाहलीं, आणि घरीं सर्व प्रकारें बखेडे; तेव्हां सर्व संकटापासून

* 25th February 1784.

पार पाडणार स्वामीच आहेत. आम्हीं एक खावंदाची चाकरी मात्र यथाज्ञानें करावी इतकें मात्र समजतें. यास्तव एक वेळ आज्ञा जाहल्यास, मर्जीस आलें तरी आज्ञा देशीं यावयाची जाहल्यास उत्तम आहे. वरकड सेवक ज्यापक्षीं स्वामी-चाकरीवर आहे त्यापक्षीं सर्व निर्वाह सेवकाचा करणें स्वामींवितरिक्त आन्य नाहीं. जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. सरकार मर्जीखेरीज दुसरी गोष्ट घडणार नाहीं. सर्व अर्थ ध्यानांत आणून जे आज्ञा करणें ती करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports Gohad having surrendered to Mahadji.*

No. 284 25th February 1784.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ रबिलावलचे.....लष्करानजीक गोहद येथें स्वामी-कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.....चें पत्र पाठविलें, तें पाविलें. रा.....जाहला. पत्रीं आज्ञा कीं टिपूचे मसलतीवर लौकरच शंभू महादेवाचें रानांत.....म्हणाले कीं, फौज मिर्जेपर्यंत जावी, इंग्रजाचा कंपू कानपुरीं आहे, तो फौजेस सामील होईल. त्यास शंभमहादेवीहून मिरजे नजीक आला आहे. अंतर नाहीं. तेथून टिपूचे मुलकाचा पल्ला जवळ. पांच साहा दिवसांत टिपूचे मुलकांत फौज जाईल. कंपू कानपुरीं आहे, तो हिंदुस्थानचे मार्गें लवकर आला तर किमान पक्ष दोन महिने लागतील. याजकरिता तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून कंपू लौकर येऊन फौजेस सामील होय ऐसें करावें. वरकड सविस्तर मजकूर राजश्री सदाशिवपंत यांचे पत्रीं लिहिले आहेत, त्याजवरून कळेल. खुमानगुमान यांजकडील नजराण्याची याद पाठविली आहे पावेल. झांसीचे मामलतीची घालमेल सालमजकुरीं करावयाची नाहीं. त्याणीं सालमजकुरीं रसदेचा एवज थोडा बहुत सरकारांत दिल्हा आहे. शंभुमहादेवापासून हैदरखानाचा तालुका पांच साहा दिवसांची वाट, आणि कंपू लौकर आला तरी दोन महिने पाहिजेत. पूर्वी राजश्री पाटीलबावांचीं पत्रें आलीं कीं, दहा बारा कोस फौज जाऊन.....शंभूमहादेव पुण्यापासून चालून गेला.....नजीक याकरितां कंपू लौकर पाठवावा.....

पाटिलबावांसीं बोलून लौकर.....म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रों (गोष्ट पाटिलबावा) चे कानावर घातली. आज्ञापत्र वाचून दाखविलें. त्या वेळस फौजे ी तर्तूद होऊन, राजश्री हरिपंताची रवानगी जाहाली. ही गोष्ट मागें श्रावण-भाद्रपदमासीं घडती तर मसलतीचे उपयोग फार पडते. ती गोष्ट न घडली. इंग्रजांचा तहनामा होऊन एक वर्ष जाहालें, आणि बोलणें चालणें या माहिती जाहल्यास दोन वर्षे जाहालीं. जे समयीं तहाचा ठराव जाहाला, त्यांणीं परस्परें तहनामे घ्यावे हा सिद्धांत जाहाला, तेव्हांच इंग्रजांचें बोलणें आहे कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह होऊन परस्परें तहनामे दिल्हे घेतले, त्या तारखेपासून साहा महिन्यांत टिपूकडील जाबसाल काय असेल तो स्पष्ट कळावा, म्हणजे त्याप्रों मसलत करावयासीं ठीक पडेल. सरकारचा व इंग्रजांचा करार ठरला आहे, त्याप्रों टिपूनें कबूल केल्यास उत्तम आहे. नाहीं तर सरकार व इंग्रज मिळोन पारपत्यच करावें, ऐसा ठराव बोलून तहनामे दिल्हे. त्यास एक वर्ष जाहालें आतां टिपूनें परस्परें फरासिसांचे विद्यमानें इंग्रजांसीं सूत्र लावून तह करितो, हें पक्कें समजल्यानंतर आतां आपलीं पत्रें येतात तरी, जो करार आमच्या..... ईश्वर अंतर पडूं देणार नाहीं. टिपूचें व इंग्रजांचें परस्परें बोलणें..... विद्यमानें होते व फरासिसाचा.....अतःपर टिपूचा.....तर्तूद होऊन रवाना कराव्या.....परंतु आमचे लिहिले प्रों.....वकिलाकडून वकूब लावून हे मजकूर लिहवीत गेले, परंतु खातरजमाच पुरेना. आतां आनंदराव निंबाजीचीं वगैरे पत्रें लोकांचीं आलीं, तेव्हां निकडीचीं पत्रें येऊं लागलीं. ऐसें बहुत विस्तारें करून भाषण दोन तीन वेळ जाहालें. शेवटीं पत्राचे जाब काय लिहावे म्हणोन मागतीं पुसूं लागलों. तेव्हां उत्तर केलें कीं, हल्लीं इष्टीण कल-कत्त्याहून येत आहे. त्याची आमची भेट जाहल्याखेरीज कंपू रवाना होत नाहीं. इष्टीण कासीस दाखल जाहाले. इंद्रसेन पुढें जलमार्गें येतच आहे. त्यास आमच्या भेटी जाहल्यानंतर पुढें कंपूची रवानगी होईल. इतका अवकाश आहे. भेटीच्या समारंभाचीहि तर्तूद होत आहे. गोहद हस्तगत जाहल्याचा मजकूर पूर्वी डांके-बरोबर विनंती पत्रीं लिहिला आहे. हल्लींही लिहिला आहे कीं, राणा गोहदेहून वस्तवानी बमय सरंजाम सुद्धां, खेरीज तोफा व दारुगोळा जकेरा करून बाकी हत्ती घोडे सुद्धां त्यास बक्षीस केले. त्याजकडील कारभारी केला..... वस्तवानीसुद्धां.....हस्तगत करून बंदोबस्त केला.....ही मसलत ठरोन गोहद.....लाविले. ज्याप्रमाणें देशीं.....होतो. त्यास या

जाग्या.....मिर्जेपेक्षां.....पाणी खंदकामध्यें. नदी..... आणि मिर्जेचा खंदक.....किल्यास इतकीच गोष्ट कमी आहे. मुख्य श्रीमंतांचें पुण्य थोर. येणेंकरून गोहदेस रसद बंद केल्यामुळेंच राणा हातघाईस येऊन अजीज जाला. लढण्याची हिंमत त्याजमध्यें महर्तगतेमुळें राहिली नाहीं. स्थळ हस्तगत जाहल्यावर मोजदाद करावयास कारकून पाठविले. त्यास राण्याच्या संग्रहीं दोन मण गहूं मात्र निघाले. दारूखाना बहुत करून जळून उडाला. यामुळें जागा हस्तगत लौकर जाहाली. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports Sindia being displeased at the belated demand of the Poona Darbar for British troops to join it in its attack on Tipu's territory. He felt that the Poona Darbar delayed too long in the matter.*

No. 285 25th February 1784.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

छ विज्ञापना ऐसीजे :—इष्टिन* कलकत्त्याहून निघोन काशीस येणार. तेथून काल्पीस यावें. राजश्री पाटिलबावांच्या त्याच्या भेटी होणार. यांतील खुलासा काय असेल तो पुसूं जातां कळूं देत नाहींत. परस्परें ऐकण्यांत येतें जे, इष्टिनाचें पातशाहाचें संधान एक जालें. करारांत आलें आहे जे, बादशाहास दरमहा इष्टिनानें बांधून द्यावा. तो दरमहिना नख्ती देत जावा. पातशाहीचा बंदोबस्त इष्टिनानें करावा. वजारतचें पद इष्टिनास द्यावें. हा घाट फार दिवस चालत आहे. प्रस्तुत वजारत मीर्जा अमानीकडे आहे, म्हणोन बादशाहाचा मुलूख आपण अनभवितों, परंतु बंदोबस्त बादशाहीचा काहींच नाहीं. आपण आक्रमशक्ति आंगीं आणून, वजारत करून, मीर्जा अमानीस ज्ञानमठीं† बसवून, बादशाहीचा बंदोबस्त करावा. मूळचें कारण ऐकण्यांत आलें आहे जे, इंग्रजांचा सरदार विलायतेस, ज्याजकडून इष्टिन कलकत्त्यास आहे, इष्टिन कलकत्त्यास असल्यापासोन इतका मुलूख मेळवून अंमल करितो, त्याचा रुपया व सौदागरीही होते, त्याजवर रुपया मिळतो तो आपणच घेऊन बसला आहे. विलायतेस कांहीं पाठवीत नाहीं. सबब विलायतचा सरदार इष्टिनावर इतराज आहे. याचे

---

*गोहद सर होण्यापूर्वीचें हें पत्र आहे. †गुंडाळून ठेवून.

बदलीवर दोघे इंग्रज पाठविले. त्यांस त्यानें कलकत्त्यांत घेऊन मारमारून टाकिलें. हें विलायतवाल्यास विषम आहे. हें इष्टिन समजूनच आहे. इंग्रजी काम चालतें तों चालतें. विलायतवाल्यानें फारच गलबल केल्यास, कोठें आश्रा पाहिज म्हणून बादशाहींत शिरून, वजारत करून, थोरले डोले हाताखालीं घालन, स्तोम वाढविल्यास विलायतवाले इंग्रज काय करूं शकतात? हा घाट खरा खोटा कोण जाणे! काल्पीवर इष्टिनाच्या भेटी व्हाव्या हा सिद्धांत जाला आहे. याचें कारण आणखी दिसत नाहीं. तूर्त उपस्थित दिल्लीकडीलच संधान असेलसें दिसतें. संज्ञकरून मोघमांत असेंही ऐकण्यांत येत आहे जे, टिपूवर मोहीम करणें पडत नाहीं. राजकारणानेंच श्रीमंतांचे विद्यमानें सलूख घडावा. याचें साधन तर कळण्यांत येत नाहीं. राजश्री सदाशिव मल्हार* इंग्रजांचे वकिलींत आहेत त्यांजकडे गेलों. आणखी मजकूर बोलून मग विचारिलें जे, सरकारची फौज बाहेर निघाली. शंभुमहादेवपावेतों जात आहे. कंपूची वाट पहात आहेत. अद्यापि कंपू कलकत्त्याहून येत नाहीं. कारण काय? असें विचारिलें. देशीं असतां सेवेसीं विनंति करून तीनशें रुपयांचा गांव साळशी महालपैकीं सदाशिव मल्हार यांचे कुलकर्णाचाच गांव, सदाशिव मल्हार यांस इनाम करून दिला. इनामपत्रें करून दिलीं. तेव्हां मामलत राजश्री बाळाजी गणेश परांजपे, राजश्री लक्ष्मणपंत देशमुख यांचे व्याही, यांजकडे होती. त्यांचे नांवें सरकारचें पत्रही सादर आहे. तीं इनामपत्रें वगैरे तसींच सदाशिव मल्हार यांजवळ आहेत. परंतु गांव यांचे हातास आला नाहीं. बाळाजी गणेश यांची मामलत निघोन दुसरा मामलेदार देवदुर्ग तालुक्यास जाला. तेव्हांपासोन सदाशिव मल्हार यांची सफाई जाली आहे, व यांचे इच्छाहि आहे जे, हल्लींचे मामलेदारास सरकारचें पत्र सादर होऊन गांव आपले स्वाधीन व्हावा, आणि इनामपत्राचे सालापासोन ऐवजही प्राप्त व्हावा. या अर्थें स्नेह आप्तकी कळवावी, हा चित्तांतील भाव. मजसीं भाषण केलें कीं, तुमचा आमचा द्वैतार्थ नाहीं. कंपू येत नाहीं तुम्हीं विचारिलें, याचा अर्थ बारीक आहे. तुम्हांसीं पडदा नाहीं. जर कोठें न बोलाल तर सांगतों. मीं मान्य केलें. तेव्हां त्यानें सांगितलें जे, टिपूवर मसलत करावयाचें प्रयोजनच लागणार नाहीं. मनसब्यानेंच श्रीमंतांचे विद्यमानें टिपूसीं सलूख होईल. महिना दीड महिन्यांत इंद्रसेन कलकत्त्याहून माघारा येतो म्हणजे मनसबा होईल. तेव्हां आपणच प्रगटांत येईल. तोंपावेतों तुम्हीं कोठेंही बोलूं नये.

* ऊर्फ भाऊ बक्षी.

येविसीं शफत देणें. तेव्हां मीं उत्तर केलें कीं, तुम्ही सरकारहिताचें बोलतां, ही गोष्ट श्रीमंतांस कळल्यास पेंच काय? तुम्हीं हिंदु असें श्रीमंतांस तों कळावें. राजश्री नारो शिवदेव एकोप्यांतच आहेत. त्यांसींही पडदा नाहीं. श्रीमंत व नारो शिवदेव या दोघांखेरीज तिसरेयास कळणार नाहीं, अशी शफत दिली. मग त्यानें सांगितलें जे, मी श्रीमंतांचा अंकित असें कळवावें. श्रीमंतांखेरीज व नारोपंताखेरीज सहसा इतरांस न कळे असें करणें. जर ही गोष्ट बाहेर आली, तर सारा मनसबा बुडून फजिती होईल, तें होऊं नये. मीं शफतपूर्वक खातरजमा केली. त्यांचे म्हणण्यांत एक आलें जे, इंद्रसेनास दीड लक्षाची जागीर द्यावयाची त्याच्या सनदा श्रीमंतांनीं पाठऊं केल्या, त्या लौकर आल्या पाहिजेत. हें साधन उपयोगी आहे. सदाशिव मल्हार यानें इंद्रसेन माघारा येतो इतकेंच सांगितलें. द्वारांतरें वर्तमान इष्टिन काल्पीवर येतो, बावांची त्याची भेटी होते, हें पत्रेवार ऐकिलें तें विनंति केली. प्रत्ययास दृष्टीस येईल तीही विनंति करीन. सारांश, टिपूवर मोहिमेचा घाट खरा असें म्हणवत नाहीं. महिना दीड महिन्यांत काल्पीवर इष्टिनाची बावांची भेट ऐकतों. भेटी अगोदर कांहीं चाल ती दृष्टीस येत जाईल, तरी विनंती करीत जाईन. दीड महिना आतां जातो. ऐकिलें वर्तमान विदित व्हावें म्हणून विनंति केली. निदर्शनास येईल तें खरें. फौजबंदीचा विचार सबूरीनेंच असावा असें भासतें. गोहदवाला राणा सहकुटुंब बाहेर निघोन गोहद खालीं करून देतों म्हणून बोलणीं लागलीं आहेत. इतके दिवस अवकाश अवकाशानें बोलणीं होत होतीं. आतां दाट बोलणीं होतात. आंत भक्षावयास दाणा नाहीं आणि सारे लोक फुटले. जाटाचे भावाबंदांचीं कुटुंबें गोहदेंतून निघोन आपले फौजेंत आलीं. चार रोज जाले. राणा कधीं निघतो पहावें. मुंबईकर कंपू बावांची भेटी घेऊन गेला, तो आजपावेतों भिंडेजवळ मुक्काम करून होता. चार रोज जाले जे, कूच करून इटाव्यास गेला. चमेल व यमुना या नद्यांच्या वेहडांत रांगड दांडग्यांनीं कंपूची गाळण लुटफाट फार केली. कंपूचें कांहीं चाललें नाहीं. निघोन गला असें ऐकिलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत व स्वामींखेरीज तिसरे कोणास वर्तमान कळूं नये, हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes about a meeting soon taking place between Mahadji and Hastings. He gives it as his opinion that the Company's Government was not keen on prosecuting hostilities with Tipu.*

———

No. 286 February 1784.

(सदाशिव दिनकराचें पत्र नानास)

छ विज्ञापना ऐसीजे, दर रवानगीचे जाबाविषयीं मी नित्य राजश्री पाटिलबावा यांजकडे जाऊन जाब मागतच होतों. कोणे एका प्रसंगांत असल्यास गांठ पडणें कठिण पडली, तर बोलणें तसेंच राहातें. निवळ गांठ पडल्यास कांहीं खुषतबाई* जाब आज उद्यां असेंच होत असतें. हल्लींच्या दोन्ही रवानग्या निकडीच्या आल्यावरून निवळ गांठ, तरी पंचविसा असामींस कमी नाहीं. बोलले कीं, इंग्रजांचा तह आमचे विद्यमानाचा शेवटास जावा हें कोणाचेंही मानस नव्हतें, म्हणोन हिसके किती बसले? आतांही तो घाट शेवटास न जावयाचीं साधनें निरनिराळीं आरंभून क्रम चालविले. कड लागती तर आम्हांस तोंडघसीं द्यावें, हा खुलासा धाकट्या मोठ्या सर्वांचा. म्हणून मुंबई, मदराज व आणखीकडे राजकारणें आंतून लाऊन, आमचें राजकारण स्तिमित टाकून, परभारा दुसरीकडून शेवट करावयाचा उद्योग केला तो सुफल न जाला. आणि लांबण पडल्यामुळें टिपूचा परभारा सलुकाचे ऐकोन आम्हांस शद्ब लाऊन लिहिलें. तहनामे दिले घेतले त्याच दिवसांत फौजेची तरतूद करून रवाना केली असती, तर इंग्रजांवर आमचा उपर† किती होता? सहा महिन्यांचा करार सलुकाचा. पुढें लढाई सुरू करून टिपूचें पारिपत्यच करावें असाच विचार असतां फौज बाहेर निघेना. तेव्हां कलकत्त्याहून पापन इंग्रज मनसबा करून पाठवणारांनीं पाठविला कीं, आमच्यानें फौजबंदी होत नाहीं असें म्हणवावें, आणि परभारा सलूख टिपूसीं करावा, असा मनसबा करून आला होता. आम्हीं पुढें रंग पाहून अंगावर घेऊन बोललों जे, मी तह केला तसा मोहिमेसही मीच चालतों, तुमचा कंपू येऊं देणें. त्यांहीं गोहदेचा मुद्दा घातला कीं, गोहद सर जाली नाहीं तों तुमचें चालणें कसें होईल? आम्हीं जाब दिल्हा जे, देशीं फौज फार आहे. जवळची फौज गोहदेवर ठेऊन आम्ही तुम्हांबरोबर चालतों. कंपू घेऊन येणें. भरून गोष्ट सांगितल्यावर पापन शरमिंदा होऊन बहुमान न घेतां गेला. इंग्रज अरजू करीत होते ते समयीं फौज बाहेर काढिली असती, तर त्यांसही बरोबर चालणें प्राप्त होतें. तें न केलें. ढील पाडिली. आतां विलग आढळतें. तो शद्ब आम्हांकडे लिहितात. तर आम्हीं कृत्रिम बुद्धीनें चाललों असल्यास शद्ब लागेल. निष्कपट, एकनिष्ठेनें वर्तलों असल्यास ईश्वर आम्हांस पार पाडील. आमचे निष्ठेंत गलबल असेल, तर त्याचें

*खूषखबर. †दाब.

फलही आम्हांस येईल, निष्ठा धड असल्यास ती पार पाडील. राजभार मोठा बहुतांच्या हातें चालावा, तितक्यांचीं मतें स्वच्छ राहून साधनास लागतील, तरीच चालेल. हें स्पष्ट समजलें असतां आम्हांस पुढें करून घाट घडविला. तहनामे दिले घतले. येथवर करून आतां मनांत हरएकानें विकल्प मनांत आणून, आमचा कार्यभाग सिद्धीस न जावा या अर्थें, पृथक् पृथक् निरनिराळे साधनास लागून, परभारीं संधानें टिपूकडे लावविलीं. टिपू व इंग्रज हे आपले मित्र कीं शत्रू? यांसीं परभारीं निरनिराळीं राजकारणें लाविल्यानें सिद्धीस जाऊन, आपला घोर तुटेल किंवा वाढेल याचा विवेक न करितां, द्वारांतरें साधनें चालविलीं. शत्रू संधीच पाहात असतात. बहुमत ध्यानास आल्यानें घरफुटींत शत्रूस शिरावयास जागा होतो. हींच द्वारें नाशाचीं. नाश आढळला तेव्हां आम्हांस शद्ब लाऊन लिहितात. तर निष्ठा ज्याची त्यास कामास येईल. आरंभिला तो क्रम सोडूं म्हटल्यास मोठा नाश होतो. यास्तव उपेक्षा करणें ठीक नाहीं. इष्टिनाची भेट होते. इंद्रसेनाचे हातें आजपावेतों शिलसिला चालला, तो मोडन आतां परभारा सलूख करण्याचें कसें स्थापितात हें सर्व कळेल. केल्या करारा-प्रमाणें पार पडावें, कसेंतरी हेंच शेवटास जावें म्हणजे सुटलों. पुढें कोणत्याही कर्मांत पडावयाचें नाहीं. श्रम सायास जीवाभ्य करावे, कर्जभरी व्हावें, त्याचें फल शाबासी मिळावी, कर्जाचा पेंच साऱ्यांनींच उलगडावयाची चाल धरावी, ते उफराटे उपमर्दाची चाल धरूं लागल्यास परिणाम कसा लागतो? यास्तव कशांतच पडूं नये तें बरें. अशीं भाषणें जालीं. राजश्री आपाजी रामही या खलबतांत होते. विनंति करितील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his conversation with Mahadji in which the latter complained of the want of confidence shown towards him by the Poona Ministry and of their efforts to defeat the ends of the treaty negotiated by him.*

No; 287 4th March 1784.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ११ रबिलाखर मुक्काम नजीक गोहद प्रहर रात्रीपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री त्रिंबकराव नारायण राजेबहादर व त्यांचे चिरंजीव राजश्री रंगराव या उभयतांस सरकारवाड्यांत बसवून गड किल्ले ठाणीं यांच्या सोडचिठ्या त्यांजपासोन लेहून घेतल्या हें वर्तमान श्रीमंत राजश्री

पाटिलबावांस कळलें. त्यावरून विक्षेप फार जाला. मजला बोलाऊन नेऊन भाषण केलें तें सविस्तर श्रीमंतांचे पत्रीं विनंती केली आहे. पत्रावलोकनीं वर्तमान ध्यानास येईल. जालें वर्तमान कळावें म्हणोन विनंती केली असे. राजश्री नारो शिवदेव पुण्यांत आहेत. राजश्री रामजी जाधव तेथें कशास पाहिजेत? येण्याविषयीं त्यांस पत्र लिहिणें म्हणून राजश्री आबास सांगितलें. आज तों रागामध्यें पत्र लिहावयास सांगितलेंच. उद्यां मना करितात कीं लिहितील न कळे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports Mahadji having taken offence at the humiliation of Trimbakrao Raje Bahadur by the Poona Ministry.*

No. 288 4th March 1784

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ११ रबिलाखर मुक्काम नजीक गोहद प्रहर रात्र स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—चंद्र ४ रबिलाखरीं गोहदकर राणा राजश्री पाटिलबावांसीं भेटून बावांचे लष्करांत डावे बाजूस येऊन राहिला. हें वर्तमान तेच दिवशीं विनंतिपत्रीं लिहून पत्र डांकेंत रवाना केलें. पाऊन वर्तमान विदित जालें असेल. राण्याचीं कुटुंबें गोहदेंत होतीं तीं बाहेर निघोन, ठाणें सरकारचें गोहदेंत बसलें. राण्याचा विचार कसा ठरेल तो विनंति करीन. आज यच समयीं बावांनीं बोलाऊन नेऊन सांगितलें जे, राजश्री त्रिंबकराव नारायण जाबसालाकरितां पुण्यास सहचिरंजीव बोलाऊन नेले होते, ते तेथेंच होते. पथक त्यांचें राजश्री हरिपंततात्याबरोबर चाकरीस गेलें होतें, तें त्यांनीं माधारे पुण्यास चाकरीस पाठविलें. तें पुण्यास पावलें. नंतर माघ वद्य १० चे रोजीं उभयतांसही त्रिंबकराव व रंगराव या दोघांस वाड्यांत बोलाऊन नेऊ चौकींत ठेविलें आणि किल्याच्या व महालच्या सोडचिट्या त्यांजपासोन लेहून घेतल्या. यावरून त्यांची सरदारी काढिली असें जालें. याचें कारण कोठें फंदफितूर त्यांजपासोन जाला असेल, तर आम्हीं मध्यस्त होऊन चार रुपये सरकारांत देविले. त्या भरण्यास त्यांचे घरांत जागा काय निघाली ती सर्वांस कळली. बाकी कर्ज घेऊन सरकारचा भरणा केला. त्यासही आम्हींच दरम्यान येऊन साहुकारापासोन कर्जे देविलीं. त्याचा भरणा अद्यापि होतोच आहे, हेंही उघडच आहे. असें असतां आम्हांस कळूं न देतां, एकाएकीं त्यांस कैद करून, गड, किल्ले,

ठाणीं यांच्या सोडचिटच्या लेहून घेतल्या. अपूर्व वाटलें! हरामखोरांचीं पारपत्यें मागें जालीं त्यास आम्हीं सर्दांच्या मतांत होतों. यांजपासोन हरामखोरी जाली असती, तर आम्हांस लेहून पाठविते, तर आम्हांस यांचें अगत्य पडतें कीं, सरकारचे हरामखोर म्हणून पारपत्य करितों. हरामखोरी त्यांचे पदरीं पडती, तर आम्हांस लेहून पाठविते. लेहून पाठविलें नसतां हें कृत्य जालें. तस्मात् आमचे विद्यमानचे ते सरदार कामाचे नाहींत, म्हणून सरदारी त्यांची काढिली. त्यास आमचे विद्यमानचे कामाचे नाहीं त्यापक्षीं कोणतेही कामांत आमचें विद्यमान नसावें. जालें तितकें जालें. पुढें आम्हीं कामांत कशास पडावें? इंद्रसेन येथें आहे त्यासही निरोप देतों. पुढें कोणतेही कामांत पडत नाहीं. शफत देखील केली. येथवर बोलले. वर्ण निघाले तितकी विनंती केली. आजच कांहीं बोलणें बोलावें, तर विक्षेपाची प्रथम घटिका. म्हणून उगाच राहून उठून राहोटीस आलों. वर्तमान विदित व्हावें म्हणून विनंती केली असे. उदईक विक्षेप निवळन आणिखी भाषण होतें, किंवा हाच विक्षेप राहतो. मज देखतां राजश्री सदाशिव मल्हार यांस बोलाऊ पाठविणें म्हणून बोलले. इंद्रसेनास देखील सांगून पाठवावें असें होतें. सदाशिव मल्हार यांस समाधान नाहीं. रात्रीस येतील न येत न कळे. यापुढें होईल ती विनंती करीन. मुंबईकर, मदराजकराकडील सूत्रांचें वर्तमान बावांनीं ऐकून मजला सांगितलें, ती विनंती पूर्वी केलीच आहे. विनंतिपत्र पाऊन विदित जालें असेल. तो अर्थ सिद्ध असें चित्तांत येईल. आज बोलण्यांत आला नाहीं. उद्यां येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana that Mahadji took the arrest of Trimbakrao Raje Bahadur and the sequestration of his property as a censure upon himself and his policy. He felt great umbrage and talked of withdrawing himself from all state business.*

No. 289 8th March 1784.

छ विज्ञापना ऐसीजे :—गोहदकर राणा करोली संस्थानपैकीं सबलगडचे तालुक्यांत होता. तेथें रहावयास कारण करोलीचें बिजेपूर राणास देणार होते. याजकरितां यांनींच लोक बरोबर देऊन तेथें पाठविला. अंबुजी इंगळे यांनीं बिजेपूर घेतल्यावर रा॥ पाटिलबावा यांनीं इंगळ्यास बोलाऊन घेतलें. ते आले. नंतर येथून इंगळ्याची रवानगी बादशाहाकडे जाली. फौज त्याबरोबरची

इंगळ्याबरोबर गेली. राणाजवळ दोन खिजमतगार बावांचे व दोन कासद इतके होते. राणानें कुबुद्धि उत्पन्न करून, अगोदर जवळील लोकांचीं कुटुंबें लाऊन दिलीं. नंतर आपण निघोन गेला. मागाहून कुटुंब, हत्ती, रथ वगैरे कारखाने-सुद्धां नेलीं. जवळ खिजमतगार व कासद होते त्यांपैकीं एक कासद पळाला. तो इकडे बावांजवळ वर्तमान सांगावयास आला. दोन खिजमतगार व एक कासद यांस मुस्का बांधून घेऊन चमलतीरास गेला. कासद इकडे पळून आला. त्यानें वर्तमान सांगतांच, बावांनीं दोन हजार फौज पाठविली, व अमदानीस, करोलीकर राजास पत्रें मुजरद कासदाबरोबर रवाना केलीं. फौज व कासद शोध घेत चमलेवर गेले. तों राणा सहकुटुंब चमलतीरास पावला. पूर मातबर होता. करोलीकर राजा माणिकपाल याचा बंधु न्याहालपाल, करोलीहून येऊन चमेल पैलतीराहून नावा दोन घेऊन येऊन, राणास सहकुटुंब पार घेऊन गेला. राणा पार उतरून कुटुंबें पुढें करोलीस लाऊन दिलीं. आपण स्नानसंध्या करीत नदीवर होता. तों या तीरीं बावांची फौज पावली. राणाचे लोक, हत्ती, घोडे असे नावेवर बसत होते, ते यांनीं धरून आणिले. नावा माघाऱ्या हांकून दिल्या. त्यांत कासद बसून पार जाले. तसें जलदी करून करोलीस पोंहचोन राजास पत्र दिलें. राणा पैलतीरीं स्नानसंध्या करतांना बावांची फौज येऊन, पैलतीराहून आपले लोक, हत्ती, घोडे धरले ऐकून तसाच निघोन चालून करोलीस चालला. गेला. पोंहचला. न्याहालपाल यानें आपले हवेलीस नेलें. तेव्हां करोलकर राजास कळलें नाहीं. मागाहून कबिले याची भीडभाड* आली. तेव्हां माणिकपाल राजा, करोलकर राजा यास वर्तमान कळलें कीं गोहदकर राणा सकुटुंब आपले येथें आला. बावांचे दरबारीं वर्तमान चिटणीस व भाई सांगत होते कीं, करोलकर राजा आमचे कास-दास म्हणत होता, एक कडें सोन्याचें व शंभर रुपये देतों. पत्राचें उत्तर बावांस लेहून देतों कीं, राणा आमचे येथून निघोन गेल्यानंतर कासद आम्हांजवळ पावला, असा जाब देतों. तूं घेऊन जाणें. कासदानें ऐकिलें नाहीं. राजश्री शिवाजी विठ्ठल यांजकडील कमाविसदार, सबलगडचा रघुनाथपंत नामेंकरून, राजा-जवळ बसला होता. त्यानें सख्त रदबदली केली. तेव्हां माणिकपाल राजानें राण्याची खबर आणऊन, त्याचीं भोजनें जाल्यानंतर राणा व माधोराम वगैरे कारभारी यांस एके हवेलींत नेऊन ठेविलें. कुटुंबें एके हबेलीं ठेविलीं. सारा जमाव, चाळीस पन्नास माणूस, दो हवेल्यांत घालून वरती आपली चौकी मातबर

*जमाव, मंडळी.

ठेविली. वरकड जमाव राण्याचा बाहेर काढून हांकून दिला. याप्रमाणें राणासह कारभारी व मंडळी माणिकपालानें हस्तगत करून, बावांस पत्र लिहिलें कीं, राणा अशा प्रकारें येथें आहे. पुढें आज्ञा येईल तसी वर्तणूक होईल. मागाहून बुधसिंग दिवाण व रघुनाथपंत कमाविसदार सबलगडकर यांस रवाना करणार. ते आल्यानंतर राणाची रदबदल करितात कीं माणिकपालाविसीं बोलतात, आल्यावर कळेल. वर्तमान कळेल ती विनंति करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. रघुनाथपंत आले. त्यांनीं वर्तमान सांगितलें जे, राणाजवळ दोन तीनशें माणूस आहे. बुधसिंग दिवाण आल्यावर वर्तमान सांगेल. बावांनीं कृपा केल्यास राणास बावांचे हवालीं करावा, माणिकपाल राजाचें मानस आहे. बुधसिंग आल्यावर वर्तमान कळेल. राणा आपले हातांतून गेला, तो मागतीं हातीं येईल तेव्हां खरा. तोंपावेतों काय विघ्नें उभीं राहतील न कळे. बावांचे दैवानें साध्य होईल तर न कळे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar reports to Nana the flight of the Rana of Gohad to Keroli.*

No. 290 19th March 1784

(**पत्रलेखक आपाजीराम**)

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल तागायत छ २६ रविलाखरपर्यंत स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष :—खासगत कारकुनीचा मजकूर स्वामींनीं पुरवणींत लिहिला कीं, मागील सालें फार राहिलीं आहेत, येविसीं पूर्वी दोन चार वेळां लिहिलेंच आहे. राजश्री पाटिलबावांसी बोलून जाब आणावा. उत्तर होईल ते लिहूं.....त्यास आज्ञेप्रमाणें पूर्वी.....सात वेळ हा मजकूर बोलण्यांत आला.....यथास्थित होईना. तेव्हां..... .....निकड केली. ते समयीं उत्तर.....गोहोदचे मसलतीवर आहों.....करीन. तूर्त ऐवज घ्यावा.....मुळें राहिलीं नाहीं. येविसीं.....लिहिलें होतें, परंतु तें पत्र पावलें नसेल ऐसें वाटतें. हल्लीच्या आज्ञेवरून पुन्हां बोलून काय जाबसाल होईल त्याप्रमाणें सेवेसीं विनंति लिहीन. प्रस्तुत स्वामींचे कृपेंकरून, गोहोदही सुटली आहे. या समयीं खासगत जाबसालांची निकड करून काम करून घ्यावें, तों पुण्याहून राजश्री त्रिंबकराव नारायण यांची जप्ती केल्याचें वर्तमान बजिन्नस मशारनिल्हेचें पत्र गोपाळराव येथें आहेत

त्यांजला लिहिलें आलें. त्यांणीं तो मजकूर मुख्यांचे कानावर घातला. राजश्री सदाशिवपंत यांस बोलावून चौघां मध्यें गाण्याचे समारंभांत गवई..... व त्या समयींचे जवळ बसणारे लोक पुष्कळ होते. तेव्हांच रागें भरोन बहुत विलक्षण भाषणें केलीं, आणि शफत वाहून घेतली कीं, अतःपर आपण सरकारचे कारभारांत किंवा मनसुबांत पडूं तर आपणांस साहेबांची शफत आहे. ज्यापक्षीं आमचें करणें कारभाऱ्यांचे खातरेस येत नाहीं, त्यापक्षीं जीं कामें आमच्या हातून सेवटास गेलीं आहेत तीं कामें.....उत्तम आहे. आम्हीं चाकरी..... खुशाल घरीं बसले.....आम्हांसीं विरुद्ध करावें, हे इंग्रजांचें राजकारण व तह आपल्या.....त्यास इंद्रसेनाचा भाऊ धाकटा आहे त्यासही निरोप देतों. याउपर बिघाडलें तरी आम्हांकडे दोष नाहीं. अशीं भाषणें क्रोधायमान होऊन केलीं तो मजकूर स्वामींस लिहिला आहे. त्याजवरून श्रुत होईल. दुसरे दिवसीं आम्हांस बोलावून हा मजकूर सांगितला. तेव्हां इतके दिवस परस्परें सरदारांच्या व सरकारच्या स्वच्छता नाहींत ऐसें येथील म्हणण्यांत होतें, तें आतां स्पष्ट जाहालें. असें दिसण्यांत मुख्याचे येऊन आम्हांस काईल केलें; आणि स्वामींचीं पत्रें राजश्री पाटिलबावांस व राजश्री सदाशिवपंतास पहिल्या रबिलाखराचीं व दुसऱ्या रबिलाखराचीं आलीं. परंतु त्यांत त्रिंबकरावांचा मजकूर कांहीं लिहिला नाहीं. त्याजवरून अद्यापही सेवकास वर्तमान खरें वाटत नाहीं. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana Fadnis his interview with Mahadji in which the affair of Trimbakrao Narayan was again alluded to.*

No. 291 19th March 1784.

(पत्रलेखक आपाजीराम)

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र २६ रबिलाखरपर्यंत स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष :—स्वामींनीं सत्रावे रबिलाखरचें पत्र पाठविलें, तेथें आज्ञा केली कीं, खुमानगुमान याजकडील नजराण्याची याद पाठविली आहे म्हणोन पूर्वीं लिहिलें होतें; त्यास ती याद हल्लीं पाठविली आहे. पावेल. त्यास जोधपूरची याद एक आणि नजराण्याबाबद झाडा एक, एकूण दोन यादी पाठविल्या, त्या पावल्या. त्यास पेशजी टिक्याच्या यादीविसीं राजश्री पाटिलबावांनींच पुसिलें कीं टिक्याचा दाखला तुमचे कागदोपत्रीं आहे किंवा नाहीं? त्याजवरून स्वामींस टिक्याचा व नजराण्याचे यादीविसीं लिहिलें होतें. परंतु

हल्लीं आम्हांस न कळतां, खुमानगुमान याचा जाबसाल विल्हेस सातां लक्षावर फडशा करून त्याजला हत्ती, वस्त्रें देऊन, तो ऐवज आबाजी नाईक वानवळे यांचे रदकर्जास लावून दिल्हा. याप्रमाणें येथील प्रकार आहेत. तेव्हां येथें नित्य प्रसंग येतो, तो मागल्यास बरा म्हणवितो. याचा तपसील पत्रीं काय लिहावा ? हल्लीं गोहद सुटली. आतां दतियेकर व नरवरवाले व खेचीवाले व करोलीवाले व चंदेरीवाले इतक्यांचीं पारपत्यें करावीं, पैका मिळवावा हे विचार होत आहेत. मग ईश्वरइच्छनें काय घडेल तें पहावें. सारांश गोष्ट हीच कीं, आतां उघड बोलूं लागले, कीं होळकरांचा पक्ष कारभारी वळावीत आहेत. परंतु याचा अनुभव एक वेळ आला असतां, पुन्हां त्यांचेच ठायीं विश्वास मानून आमचीं केलीं मोडूं लागले. तेव्हां असी मात्र गोष्ट न घडावी कीं पुन्हां आम्हांस चिटचा जलद न याव्या कीं, पत्र पावतांच आधीं स्वार व्हावें आणि मग चिटी वाचावी. अशी मात्र गोष्ट न घडावी. अशीं भाषणें बहुत दिवस होतात. परंतु केवळ आमच्या समक्ष बोलून आम्ही ल्याहावें ऐसें नव्हतें. आतां ल्याहावें अशीच मर्जी दृष्टीस पडली, म्हणून विनंती सेवेसीं लिहिली आहे. वारंवार सूचना ऐसी ल्याहावयासी सेवकास योग्य नव्हे, परंतु येथें मानअपमान कांहींच राहिला नाहीं. याचा विस्तार पत्रीं ल्याहावयासी चित्ताची प्रशस्तता होत नाहीं. याजमुळें कुन्हें* मात्र सूचनार्थ लिहितों. हें सर्व ध्यानांतच असावें. आणखी कित्येक बारीक नाजक मजकूर एकतों, ते पत्रीं लिहितां येतच नाहींत. कारण काय ऐसें स्वामी म्हणतील, तरी तें पत्र कोणाचे दृष्टीस पडेल, अगर वाटेंत डांक मारली गेली तरी आमच्या प्राणांसींच गांठ पडेल, यास्तव लिहिलें नाहीं. याजकरितां एक वेळ समक्षता व्हावी हा हेतु आहे. वरकड घरगुती वगैरे मजकर आमचे खासगत विलग पडले आहेत, याजकरितांच देसीं येण्याचा अर्थ आहे असें नाहीं. एक स्वामींची कृपा सेवकाचे ठिकाणीं पूर्ण आहे तरी कोणासही मोजीत नाहीं. जे दिवशीं कृपेंत अंतर, ते दिवशीं त्राता कोणी नाहीं. हे सर्व अर्थ मनन व्हावे आणि जे आज्ञा करणें ते करावी. मुख्य गोष्ट, या सरदाराचें साधन आजपर्यंत स्वामींनींच राखिलें, त्याचा शेवट या गोष्टीमुळें विलग दिसोन आला. याजमुळें विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana that Mahadji was greatly irritated by the favour he (Nana) continued to show to Tukoji Holkar despite the lack of exertions on the part of the latter.*

*मर्म, खोच, किल्मिष.

No. 292 20th March 1784.

पैवस्ती छ चंद्र ७ जमादिलावल सन आर्बा

समानीन चैत्र मास

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रबिलाखर मुक्काम नजीक गोहद स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—चंद्र १ व चंद्र २ रबिलाखरचीं पत्रें सादर जालीं, तीं चंद्र १६ माहे मिनहूस पावलीं. त्यांत राजश्री पाटिलबावांस पत्रें होतीं तीं प्रविष्ट केलीं. राजश्री आनंदराव निंबाजी यांचे पत्राची नक्कल व मुंबईकर जनराल याचे पत्राची नक्कल बावांनीं पाहून त्यांतील मजकूर कीं, चेनापट्टणकर व मदराजकर इंग्रजांनीं मातबर टिपूकडे पाठवून सलूख केला. कोडेयालचा* किल्ला, मंगरूळ किल्ला, होनावर वगैरे किल्ले टिपूचे, टिपूच्या स्वाधीन केले. मंगरूळचे किल्ल्यांतील इंग्रजांचा किल्लेदार जमियत सुद्धां किल्ला सोडून निघोन गेला. टिपूचे लोक मंगरूळचे किल्ल्यांत दाखल जाले. वरकड किल्ल्याच्या सोडचिटचा इंग्रजांनीं दिल्या. आपाजीराम चेनापट्टणास गेला होता. बोलणें इंग्रजांसीं करून आल्याप्रमाणें अमलांत आलें. पुण्याकडील वर्तमान टिपूनें आनंदराव निंबाजी यास सांगितलें कीं, राजश्री हरिपंततात्या पंढरपुरावर आले. मागाहून श्रीमंत व मदारुल-माहामही† येणार. हें वर्तमान आनंदराव निंबाजीचे पत्रावरून बावांस कळलें. मुंबईकर जनराल याचे पत्राची नक्कल आधीं वाचलीच जाईना. सारांश स्वामींचे पत्रीं होता त्याप्रमाणें मजकूर समजले कीं, मदराजकराकडील मातबर टिपूकडे येऊन कोडेयाल किल्ला टिपूचे हवालीं केला. पुढें अधिक आढळेल तें लेहून पाठवूं, असें लिहिलें होतें. यावरूनही सलुखाचेच भाव समजले. तेव्हां राजश्री सदाशिव मल्हार यांस बोलाऊन आणून, इंद्रसेन याजकडे पत्राप्रमाणें मजकूर सांगोन पाठविला. मशारनिल्हेनीं इंद्रसेनासीं बोलून, उत्तर आणून, पाटिलबावांस श्रुत केलें. जाबाकरितां माझी बजिदी होतीच. पेशजीच्या तीन रवानग्यांची व हल्लीं दोन रवानग्यांचीं उत्तरें मागतां मागतां, काल बावांनीं उत्तर दिल्हें जे, पहिले रवानगीपैकीं जंबूसर वगैरे गुजराथचे माहालीं भडोचेकडील इंग्रजांपासोन सुदामत अमलाचे मजकुराचा जाब राहिला

*इंग्रज व टिपू यांचा मंगळूर एथें तह ११ मार्च १७८४ रोजीं झाला. कोडियाल बंदर हें मंगळूरचेंच दुसरें नांव. † नाना फडणिसाचा किताब.

होता, तो दिला आहे. श्रीकाशी आदिकरून त्रिस्थळींचे यात्रेचे बंदोबस्ताकरितां आज्ञा जाली, तोही बंदोबस्त माफीचा करून दिल्हा. जाब राहतां कंपू लौकर रवाना करणें व अलीकडे परभारां सलूख इंग्रजांनीं टिपूसीं केला याचे जाब देणें. त्यास परभारें सलूख केल्याचा मजकूर इंद्रसेनास सांगोन पाठविला होता. त्यानें उत्तर सांगोन पाठविलें कीं, परभारां सलूख व्हावयाचा नाहींच. तत्रापि तुमचीं पत्रें आलीं, यावरून मी, इंद्रसेन, आमचे जेष्ठ बंधूस लेहून पाठवितों. जाब येईल तो सांगेन. इष्टीनही श्रीकाशीस आले. एक दो रोजांनीं इंद्रसेनही काशीस येतील. मीर्जा अमानी* लखनऊहून इष्टिनाचे भेटीस गेले. सारे एकत्र होऊन आपले भेटीस येतात. लौकरीच भेटी होतील. टिपूनें सलूख कबूल केल्याचें पत्र पुण्यास पाठविलें, तेव्हां त्यानेंही परभारा सलूख न करावा, आणि केला, याचें बोलणें टिपूचे वकिलासीं केलें असिलें, तर उत्तर त्याचें कळावें. भाषण जालें नसल्यास आतां त्याचे वकिलासीं बोलून दोष त्याचे पदरीं घालावे. असें उत्तर इंद्रसेनाचें आलें. इष्टीन, इंद्रसेन दोघेही काशीस आले आहेत. यांचें पत्र त्यास गेलें! त्यांचें उत्तर काय येतें? यथास्थित मतलबाप्रमाणें आलें तर जाब देऊं. नाहीं तर इष्टिनाची गांठ लवकरच पडते. इंद्रसेनही तेथें आहेच. त्यासीं बोलून जाब लेहूं. अगोदर काय लिहावें? सांगितला मजकूर तुम्हींच लेहून पाठविणें असें सांगितलें. त्याप्रमाणें विनंति केली असे. स्वामींचेही पत्रीं आज्ञा होती कीं, कलकत्त्यास लेहून पाठऊन चेनापट्टण व मदराजकराचे मातबर टिपूकडे आले आहेत ते माघारे जावे, आणि कलकत्तेकरांचा मातबर रवाना करणें. त्याजबरोबर आम्हींही मातबर देऊन टिपूकडे रवाना करूं. त्याअन्वयें कलकत्त्यावाल्यांकडे पत्रें रवाना करविलीं. त्यांचें उत्तर समर्पक आल्यावर सारे पत्रांचें जाब एकदांच देऊं असें बावा म्हणतात. जाब देतील तेव्हां रवाना करीन. आणखी बोलणें बावांचें जालें, त्याची पुरवणी निराळी विनविली आहे. त्यावरून अर्थ साकल्य विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes of Mahadji having been perturbed by the treaty concluded by the English directly with Tipu. He asked an explanation from Anderson for thus suddenly going back on the stipulations of the late treaty of Salbye.*

---

*असोफउद्दौला.

No. 293 20th March 1784.

पैवस्ती चंद्र जमादिलावल आर्बा चैत्र.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रबिलाखर मुक्काम नजीक गोहद स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—चंद्र २ रबिलाखरचें पत्र सादर जालें. मजकुराचा हवाला सरकारचे पत्रावर लिहिला. पत्रें चंद्र १६ रोजीं पावलीं. राजश्री पाटीलबावा यांस पत्रें श्रीमंतांचीं होतीं तीं प्रविष्ट केलीं. जाबाचा प्रकार येथील विदितच आहे. पेशजींच्या तीन रवानग्यांचे पत्रांचेही जाब राहिले आहेत. दोन रवानग्यांचे जाब आतांचे चंद्र १ व चंद्र २ रबिलाखर इतके जाब मागतों. फार खलबतांत दिवस जातात. खलबत नसलें तर भलतें काम घाशीत बसावें ! त्यापुढें दुसरें मोठें अगर नाजूक कांहींच नाहीं. त्यांतच कांहीं हटकिलें, तर थटचांत न्यावें, मग आज उद्यां म्हणावें. फारच दाटी करून गांठावें, तर बातम्याचे निमित्त करून उल्हाणीं व विक्षेप नानाप्रकारचीं छचें बोलण्यांत आणून विपर्यास दाखवावे, ही रीत समजलीच आहे. हा नित्य संबंध आहे. तपशील किती विनवावा ? हल्लीं चंद्र १ व चंद्र २ रबिलाखरच्या पत्रांत इंग्रजांनीं टिपूसीं सलूख परभारा केला ही अडचण. याजकरितां प्रातःकाळीं गांठून, वारंवार म्हणून, भीड* दूर करविली. त्यांत कारीगर† ठळतच नाहीं. त्या निराळे उभे रहाणार व बसणार. जवळपास एकूण पंचविसांस कमी नसतील, जास्त होते. त्याजदेखतां भांनगड दोनप्रहरपर्यंत जाली. आमचे सोबती राजश्री आपाजीरामही होते. दोनप्रहरपावेतों भाषणांत जे तपशील निघाले आहेत, तो किसा‡ किती लेहावा ? पुष्कळ विस्तार आहे. त्यापैकीं संकलित संकलित मजकूर श्रीमंतांचे पत्रीं विनविले आहेत. बावांनीं उत्तर दिलेंच नाहीं. इंग्रजांनीं परभारा सलख केला असें लिहिलें आहे, तें आम्हीं इंद्रसेनास सांगोन पाठविलें. त्यानें उत्तर दिल्हें जे, हे गोष्ट सहसा घडावयाची नाहीं. तुमचीं पत्रें आलीं याजकरितां मी पत्रें इंद्रसेन आमचे जेष्ठ बंधूस लेहून पाठवितों. जाब आल्यावर सांगेन. इंद्रसेनानें पत्र जेष्ठ बंधूस लिहिलें आहे. त्याचा जाब यथास्थित आल्यास तुम्हांस जाब लिहून देऊं. यथास्थित इंद्रसेनाचें उत्तर न आलें, तर इष्टीन काशीस आला, मागाहून चौ रोजीं इंद्रसेन काशीस आला असेल. इष्टिनाचे आमचे भेटीचा प्रकार ठरला आहे. भेटी लौकरच होणार. त्यासीं बोलून, निश्चयांत आणून

*गर्दी. †हजाम. ‡विक्षेप.

मग तुम्हांस जाब देऊं. अगोदर लेहावें काय? सांगितला मजकूर तुम्हींच लेहून पत्रें रवाना करणें. बावांनीं सांगितल्यावरून मींच श्रीमंतांचे सेवेसीं विनंति-पत्रें लेहून जोडचा रवाना केल्या. त्या पत्रावरून लिहिण्यांतील संकलितार्थ गर्भार्थ सविस्तर विदित होतील. श्रीमंतांचे पत्रीं आज्ञा होती जे, पत्रें पावतील तीं तेरीख लेहून पाठवणें. त्यास, चंद्र १ व चंद्र २ चीं पत्रें चंद्र १६ तेरखेस पावलीं. एकूण चौदा रोजा पंधरा रोजांनीं पत्रें येथें पावलीं, तीं बरींच आलीं. कधीं अठरा दिवसां, कधीं वीस, पंचवीस, कधीं अधिकही दिवस लागले आहेत. चौदा पंधरा रोजांनीं पत्रें बरीं आलीं. सबनिसाकडून राजश्री नारोपंतांस पत्रें पाठविण्याविषयीं ताकीद फार येते. तो घाबरा होतो. पुण्याहून पत्रें डांकेंत रवाना होतात, तीं किती दिवशीं उज्जनीस पावत असतील न कळे. उज्जनीहून जोडी छुटी इकडे येते, तीस दहा अकरा रोज लागतात. चाकर जोडचा दहा अकरा रोजांनीं पावतात. म्हणोन नारोपंतांनीं दोन तीन जोडचा अजूरदार पाठविल्या. एक दोन इनामी आल्या. अजुरा तर मजवर लिहिला नाहीं. इनाम लिहिला. त्या आशेवर साहा रोजांनीं जोडचा येऊन पोहचल्या. बावा इनाम देतात कळलेंच आहे. कागद लागोलाग डांकेचा चालावा. नवे रोजीं उज्जनीहून खेप्या पुण्यास जातो. डांकेवर कागद सातवे दिवशीं तरी पोंहचावा. तिकडून विलंब करून उज्जनीस कागद पावत असेल. नारोपंतास ताकीद लिहिल्यास त्यानें काय करावें, असें सरकारांत व सबनिसास समजलें पाहिजे. म्हणजे डाकेसच ताकीद होईल. नारोपंतास निकड करणार नाहींत. आणखी पुरवण्या निराळ्या विनविल्या आहेत. त्यांचीं देखील उत्तरें पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *This letter of Sadashiv Dinkar to Nana is of the same purport as the above. The writer's remarks on the manner in which Mahadji conducted official work are significant*

No. 294 End of March 1784.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—बाहेर वर्तमान ऐकिलें जे, इष्टीन काशीहून निघोन लखनऊस आला. इंद्रसेन समागमें आहे. तीस चाळीस हजार भीड, हजार बाराशें गोरा, ऐसे पोख्त सरंजामानसीं आला आहे. मीर्जा आमानी, सुज्याउद्दौला यांचे घरचा बंदोबस्त करावा, नंतर राजश्री पाटिलबावांची भेटी घेऊन पुढें दिल्लीच्या बंदोबस्तास जावें, असा मनसबा त्याचा आहे. असें ऐकून संदेह जाला कीं, टिपूसीं

सलूख इंग्रजांनीं केल्याचें वर्तमान आलें, तीं पत्रें येथून गेलीं. त्याची भवति न भवति न करितां, दिल्लीचे मनसब्यास उद्युक्त इष्टीन आहे. यांत भाव अनेक मनांत येऊन बावांकडे गेलों. वर्तमान विचारिलें कीं, बाहेर असें ऐकितों. आपली इंग्रजांचीं बोलणीं पक्केपणें जालीं आहेत. इंद्रसेन प्रामाणिक. त्याचे बोलण्यांत अंतर नाहीं. टिपूचा सलूख आपले विद्यमानें व्हावा, परभारां होऊं नये, येविसीं आपली खातरजमा त्यानें केल्यावरून, आपण श्रीमंतांस वारंवार खातरजमेनें लेहून पाठवून मोहमीवर फौज बाहेर काढविली. ती मेडचावर जाऊन बसली.* इंग्रजांचे कूचीं रवानगी जलद करावी अशीं पत्रें आपणास आलीं. त्याची तरतूद कांहीं नाहीं. यावरून संदेह घेऊन पत्रें श्रीमंतांचीं येतात कीं, परभारां सलख टिपूसीं करितील, आपणास म्हणतील तुम्हांसीं तहनाम्यांत करार केला आहे, त्याप्रमाणें मुलूख व बंदवे त्याचे आम्हीं सोडिले. त्याजपासोन आम्हीं आपले सोडून घेतले. तुमचे करारावेगळें काय केलें? अशीं पत्रें पुण्याहून येतात. यांचे प्रमाणिकतेवर त्यांचें लिहिणें संदेहात्मक आपणास वाटतें. टिपूचें पत्र तह कबूल करण्याचें आलें. त्याची भवति न भवति करून सलूख करावा, तें अद्यापि होतच नाहीं. बोलणें व्हावयाचेंच आहे. तों तिकडे परभारां सलूख टिपूसीं केला. राजश्री आनंदराव निंबाजीचें बजिन्नस पत्र आलें. मुंबईकर जनराल याचें पत्र आलें. दोहीं पत्रांच्या नकला आपणाकडे आल्यावरून आपण व इंद्रसेन यांजकडून पत्रें इष्टीन व इंद्रसेन यांस पाठविलीं. त्याची भवति न भवति व आपले संदेह दूर न करितां, दिल्लीच्या मनसब्यास उद्युक्त असल्यास समजावें काय? उत्तर बावांनीं केलें कीं, आणभाष, इमान प्रमाण बळकटीची जात जितकी असते ती जाहली, परभारां सलूख होणार नाहीं असें अम्हां जवळ म्हणतो, इंद्रसेन याचे पत्रांचीं उत्तरें अद्यापि आलीं नाहींत. आल्यावर काय तें समजेल. आमचा जाबसाल न करितां परभारां दिल्लीचा मनसबा करितील, तेव्हां शद्ध त्यांस लावावा. लोकांच्या गप्पा तुम्हीं ऐकिल्या, प्रमाण काय? दिल्लीचा मनसबा त्यांस हस्तगत जाला, खरें कशावरून? दैव श्रीमंतांचें आहे. इंग्रजांनींच सर्व जय पदरीं बांधून ठेविला आहे कीं काय? बाहेरल्या खबरांवर न जाणें. पत्रीं न लिहिणें. पुन्हां मी म्हटलें कीं, आज पावेतों आम्हीं बाजारू गप्पा ऐकन लिहिल्या नाहींत; लिहिणार नाहीं. आपणापासून ऐकून घेऊन मग लिहितों. कदाचित् रुजवातीचा प्रसंग पडल्या रुजू पडे, तरीच आमची स्थीत राहील. बाजारू गप्पा

*ढाला दिल्या.

लिहिल्यांत स्थीत नाहीं, जाणनच लिहीत नाहींत. आनंदराव निंबाजी व मुंबईकर जनराल यांच्या पत्रावरून बावांस इंग्रजांचे वर्तनाचा विकल्प होऊन चकित आहेत. जाबसाल इंग्रजांसीं बरे निकडीनेंच घातले आहेत. इंद्रसेन येथें आहे. चौथे पांचवे दिवशीं बावांकडे येऊन खातरजमा करीत असतो. दरबारास येतो हें कळत असतें. त्याचे जाबसालांत मजला अगर राजश्री आपाजीराम यांस घेत नाहींत. तो गेल्यानंतर मी विचारावयास जातों. तेव्हां बावा खातरजमा करून बोलत आहेत कीं, इंद्रसेन म्हणतो, जो करार तुम्हांसीं ठरला आहे त्याप्रमाणेंच शेवटास जाईल. इष्टिनाचें पत्र चेनापट्टण मदराजकरास गेलें आहे कीं परभारां सलख टिपूसीं करावयाचा नाहीं. पाटिलबावांचे विद्यमानें श्रीमंतांचे मारफत सलुखाचें ठरलें आहे, तो करार शेवटास जाईल. मंगरूळ व कोडेहालचे किल्ले टिपस दिल्हे, ते दाण्याचे व पाण्याचे व हवेच्या अडचणीमुळें दिल्हे. त्याचे जागे त्यास दिल्हे, तेव्हां आमचा व महमदअल्लीखानाचा मुलूख माघारा घ्यावा कीं नाहीं ? बंदवे द्यावे घ्यावे हें जालें आहे कीं काय ? हें सहसा होणार नाहीं. याचा प्रत्यय आपणास येईल असें बोलतात. मनांत चरका लागला आहे कीं इंग्रजांची चाल खोटी असें सरकारांतून लिहीत होते. परंतु इंद्रसेन थोरला भरून बोलूं लागे, व कराराप्रमाणें वसई वगैरे किल्ले व मुलूख सरकारचा माघारा दिल्हा, श्रीमंत कैलासवासी दादासाहेब दिल्हे, यावरून त्याचे बोलण्याचा विश्वास येऊन सरकारांत खातरजमेनें लिहीत गेलों. फौज बाहेर काढविली असतां परभारां शिलसिला चेनापट्टण मदराजकरांकडून चालविला. यावरून इंग्रज बेइमान असें प्रत्ययास आलें असें बावा समजले. कशावरून स्वामी आज्ञा करितील तर स्वामी यथें असतां बोलणीं होत होतीं, व नंतरही तोच धारा चालला होता. गोहद सर जाल्यापासोन तर विशेषच जालें. आनंदराव निंबाजी व मुंबईकर जनरालाचे पत्राच्या नकला आल्यापासोन केवळ ताल ताल जाणे, तो धारा बोलण्याचा राहून, सरळ क्रम चालतो. स्वभाव तर जातच नाहीं, परंतु अंतर आहे. माझा धारा बोलण्याचा पहिलेपासून आहे तोच चालला आहे. त्याचें सहन होऊन किंचित् मार्गावर चालत असतें. दिल्लीचें राजकारण बळाऊन, इंग्रज मोठे हिमतीनें काशीपावेतों इष्टीन आला त्याचे उपमर्दास बावा लागले. गोसाव्याचे विद्यमानें अफरासियाबखानाकडे राजकारण दाट चाललें आहे कीं बादशाह आपले काबूंत ठेऊन, इंग्रज दरम्यान शिरूं देऊं नयेत असा शिलसिला*

*सूत्र, संधान.

चालला आहे. त्याचा तपशील निराळे पुरवणीवरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports Mahadji having received a rude awakening by the recent treaty concluded by the English with Tipu without his knowledge. He began now watching jealously Hastings' arrival at Lucknow, and set afoot intrigues to counteract Hastings' measures.*

No. 295 March 1784.

(पत्रलेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—नवाब निजाम अलीखान यांजकडून राजश्री पाटिलबावा यांचे येथें राजश्री बाबाराव गोविंद तीन चार वर्षें वकिलीस होते. नवाबाकडून खर्चास येईना. पाटिलबावांनीं द्यावें, तर यांस त्यांचे राहण्या जाण्याची आस्था सारखीच. त्यापक्षीं येथूनही कांहीं मिळालें नाहीं. दहा पंधरा हजार रुपये बाजारच्या सावकारांचें कर्ज खादलें. खर्चास पाठवण्याविसीं नवाबास मशारनिल्हेनीं बहुत वेळां लिहिलें, परंतु तिकडूनही आलीकडे कांहीं येईना. कुटुंब समागमें होतें. पुढें येथें सड्या स्वारीचा प्रसंग जाहला. समस्तांचीं कुटुंबें ग्वाल्हेरीस गेलीं. तेव्हां त्यांणींही आपलें कुटुंब ग्वालेरीस पाठविलें. मागाहून राजश्री सदाशिव मल्हार येथून इंग्रजांकड गेले. त्यांबराबर बाबाराव गोविंद यांणींही पाटिलबावांचा निरोप घेऊन ग्वालेरीस गेले. तेथून पुढें देशीं येतील. इंग्रजांकडे नवाबाचे शिकाकोल राजबंदराकडील कांहीं जाबसाल उगवणें आहेत. त्या निमित्तानेंच नवाबांनीं वकील येथें सरकारचे इंग्रजांचे तहाचे समयीं पाठविले होते. परंतु तो प्रसंग बनला नाहीं. त्यावर बाबाराव आजपावेतों येथें होते. हल्लीं कलकत्तेकर खासा इंग्रज लखनऊस येणार. बनल्यास सदोबा भाऊबराबर तेथवर कस्त* करीन, आपणही भाऊस येविसीं सांगावें, याप्रमाणें पाटिलबावांसीं बोलून त्यांजकडून सदाशिव मल्हार यांस सांगोन त्यांचे समागमे गेले. उगेच उठोन जाण्यांत लौकिक ठीक दिसत नाहीं, या अर्थी ही लखनऊची तोड काढून येथून निकाल पाडला. वर्तमान सेवेसीं निवेदन व्हावें, यदर्थी विनविलें असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes that Babarao Govind, Nizam's envoy in Sindia's camp. was returning south.*

---

*कष्ट.

No. 296 11th April 1784.

पैवस्ती चंद्र १३ जमादिलाखर व अर्बा

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. होळकर बराबरीचे सरदार घरीं बसले असतां ठीक नाहीं. माळव्यांतील माहालचा ऐवज यांसी खर्चास आला नाहीं. बाई रदकर्ज वगैरे खर्च माहालास लावून तपसील लेहून पाठवितात. सरकारची मसलत तों राहूं देतां येत नाहीं. याकरितां साडेदहा लक्षांची तरतूद सावकारांची खातरजमा करून देविली, तेव्हां स्वारीस निघणें जालें. तयारी करून फौजेस जाऊन सामील जाले. येथून अहिल्याबाई यांसी लिहिलें कीं, माळव्यांतील महालचा पैका सावकारांस तीन वर्षें भोगला आहे. त्यापैकीं अर्धें साल व सालमजकूर भरसाल एकूण दीड सालाचा ऐवज पाठवून द्यावा म्हणजे हा ऐवज सावकारास पावेल. सरकारांतून खातरजमा सावकाराची केली, तो ऐवज पावला म्हणजे उपयोगी पडतील, याप्रमाणें बाईंस लिहिलें आहे व आपणाकडेही येविसीं लिहिलें आहे. तरी आपण बाईंस लेहून ऐवजाची रवानगी करवावी म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, आपण लिहिल्यावरून मातुश्री अहिल्याबाईंस येथून पत्रें पाठविलीं होतीं. त्यांचीं उत्तरें आलीं कीं, माळव्यांतील माहालचे आजमास सालाचे सालास पुण्यास व आपल्याकडे लेहून पाठवीत गेलों; तेव्हां ऐवज आहे नाहीं हें सर्व माहीत असोन, सालमजकूर भरसाल व मागील निमें एकूण दीड साल मिळोन साडेदहा लक्ष रुपये पाठवून द्यावे असें पुण्याहून लिहितात व पुण्याचे पत्राचे अन्वयें आपणही लिहितां, याचा भाव काय ? मसलतीमुळें ऐवजाची तजवीज करणें तरी स्वदेश, खानदेश, माळवा सुद्धां महालचा अजमास करून त्यापैकीं महेश्वर व स्वारींतील कारखाने जातीचा खर्च वजा होऊन बाकीं ऐवज राहील, त्यापैकीं सावकाराचे रदकर्जी थोडाबहुत ऐवज देणें तो सर्वांस सारखा हिसेरसीद नेमून, बाकीचा ऐवज मसलतीस घ्यावा; देशचे महालची वहिवाट होईल तशी इकडे लेहून पाठवावी, त्याप्रमाणें इकडेही तजवीज घडावी; तें कांहींच न होतां साडेदहा लक्षांची तजवीज इकडील महालांवर कशी होईल ? दौलतींत सर्व ठिकाणीं एकसारखा जाबसाल जाहल्यास कांहीं अवघड पडत नाहीं. कोठें कसें, कोठें कसें, अशा रीतीनें सावकारांची व मामलेदारांची समजोती पडोन कोणी

ऐवज देतील हें घडणार नाहीं. तिकडील देशांतील व खानदेशचे महालची वहिवाट समजल्यानंतर त्याप्रमाणें इकडेही तजवीज घडेल म्हणोन. त्यास दौलतींत सर्वां ठिकाणीं एकसारखा जाबसाल असावा असें बाई लिहितात तें वाजवीच आहे. साडेदहा लक्ष रुपये आपण सरकारांतून सावकाराची खातरजमा करून देविले, त्याचा ऐवज तिकडील देशांतील व खानदेश सुद्धां व माळवा मिळोन साडेदहा लक्षांची व्यवस्था होऊन बाईस लेहून पाठवावें. तिकडीलही वहिवाट होईल त्याप्रमाणें बाईकडूनही तजवीज घडेल. रवाना छ २० जमादिलावल बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji on behalf of Ahalyabai writes that the lady pleaded her inability to supply ten lakhs of rupees to Tukoji for the equipment of his army, but agreed to share a part of the burden.*

A new phase of Mahadji's career begins here, when he under-takes the management of the Emferor's affairs.

No. 297 12th April 1784.

पैवस्ती चंद्र १३ जमादिलाखर अर्बा समानीन
वैशाख शु० १४ ह॥ डाक

राजश्री बाळाजीपंत नान गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. पातशाहाकडे इंग्रजांचें राजकारण लागलें आहे. दरमहा कबूल करून पातशाहास आपले करून घेणार अशा वातम्या आल्या आहेत. त्यास प्रस्तुत तों पातशाहींत बखेडा पडला आहे. तेव्हां इंग्रजांसही राजकारण करावयास जागा जालीच आहे. पेशजी पाटीलबावांनीं लिहिलें होतें कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह झाल्यावर पातशाहासीं परभारें राजकारण करणार नाहींत. तह न जाहला तरी कळेल तसें करतील. त्यास, इंग्रजांचा व सरकारचा तह जाला तेव्हां इंग्रजांनीं पातशाहासीं राजकारण हरगीज* लावूं नये. पाटीलबावांनीं इंग्रजांसीं बोलून येविसींचा बंदोबस्त पक्का करावा व पातशाहीचे बंदोबस्ताची पैरवी† जाली पाहिजे. येविसीं तुम्हीं पाटीलबावांसीं बोलून उत्तर होईल तें लेहून पाठवावें. पातशाहास खर्चाची अडचण. इंग्रज पैका कबूल करून

*बिलकूल. †व्यवस्था.

आपले लगामीं लावून घेणार, येविषयीं सरकारांत बातम्या आल्या. त्यास इंग्रजांचें राजकारण पातशाहासीं जाल्यास चांगलें नाहीं व पुढें पेंच फार आहेत. याकरितां सरकारांतून बंदोबस्त पाटीलबावांनीं करावा. इंग्रजांचा पाय नसावा, सरकारांतून बंदोबस्त व्हावा, हें पातशाहाचेही चित्तांत आहे. परंतु इकडून न होय त्यापक्षीं लाचारीनें इंग्रजांसीं संधान करतील, असेंही आहे. याकरितां याची तरतूद जरूर व्हावी म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांस लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास पातशाहींत नजफखान मेल्यापासोन बखेडा होऊन बहुनायकी जाली. पातशाहास खर्चास मिळेना यामुळें पातशाहानें इंग्रजांकडे राजकारण लाविलें कीं, दरमहा आम्हांस खर्चास ऐवज देऊन तुम्हीं सर्व बंदोबस्त करावा. त्यावरून इंग्रजांचा पातशाहासीं सिलसिला राजकारणाचा चालला. ही गोष्ट बातमीवरून आपण लिहिली ती खरी आहे. पातशाहानें आपण होऊन इंग्रजांसीं सिलसिला लाविला आहे, त्यामुळें इंग्रजांकडूनही बोलणें होत आहे. पातशाहाचा कारभार रुक्ष, शिखांचा दंगा विशेष, चार सरदार आहेत, ते एकांत एक नाहींत. दिल्लीचें राजकारण आपले हातीं रहावें याकरितां पूर्वी पातशाहाजादा व मीर्जा सफीसीं* भेटून खातरजमा केली होती, त्यास तो प्रकार तसा जाहला. ते समयीं तिकडील बंदोबस्ताचा विचार करावा तर गोहदचे कामास टाकतां नये असें जाहलें. त्या संधींत पातशाहाकडून इंग्रजांकडे सिलसिला चालला आहे. ते पर्याय मोडून पातशाहाकडील राजकारण आपले लक्षांत आणावें. या गोष्टीस पैक्याची व फौजेची अनुकूलता सध्याच असली पाहिजे. आम्हांकडील प्रकार लेहून समजवावा असा अर्थ राहिला नाहीं. गुजराथची मोहीम करून आल्यावरी इंग्रजांची मोहीम पडली. त्याजवर ग्वालेर व गोहद हीं कामें जालीं. दिल्लीकडील बंदोबस्त सरकारांतून पाटिलबावांनीं करावा असें आपले लिहिण्यांत. त्यास देशीहून निघाल्यापासून आजपर्यंत मसलतीच पडत गेल्या. यामुळें वोढीचा प्रकार विशेष जाहला आहे. पातशाहास खर्चास दरमहाच्या दरमहा अविछिन्न पावला पाहिजे; व तेथील सरदारांची सरबरा करून, लक्षांत लावून घेऊन, पातशाहाचे मर्जीप्रमाणें शीख वगैरे बंदोबस्त होऊन आला पाहिजे. मुलखांत अवर्षणामुळें पैसा प्राप्त व्हावयाचा नाहीं. दुसरीकडे राजकारण जाऊं न देतां बंदोबस्त करावयास पैका पाहिजे. येविसींची

*मिर्झा सफी व महादजी यांची भेट ता: ९ जुलई १७८२ रोजीं अटेर येथें झाली.

तरतूद सरकारांतून होऊन आल्यास सरकारचाकरीस अंतर व्हावयाचें नाहीं. येविसीं सदाशिव दिनकर यांसही सांगितलें आहे, लिहितील. उत्तर सत्वर पाठवावें. रवाना छ २१ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In this important letter Mahadji discusses with Nana Fadnis the situation at Delhi. He was prepared to undertake the great enterprise of bringing the Emperor under Maratha tutelage, provided he was assured of ample resources in money and men from Poona.*

No. 298 Early 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—इंग्रजांकडील पांचा कलमांच्या यादी पारशी सरकारांतून सादर जाल्या होत्या, त्या राजश्री पाटिलबावांजवळ दिल्या. त्यांत शक* निघाली जे पूर्वी तहनामे जाले त्याजवर शिक्का सरकारच्या तहनाम्यावर बाजूस दस्तकाप्रमाणें होता तो पाहून इंग्रजांनीं शिक्का खालता केला. आतां यादीच्या माथ्यावर शिक्का सरकारचा जाला आहे, त्याचा संदेह इंग्रज घेतील व कलमाकलमांमध्येंही कोठें कोठें कमजास्त त्याचे मसोदे इंग्रजांनीं करून दिले आहेत, त्याप्रमाणें यादी पारशी साफ लेहून दिल्या आहेत. या यादी सरकारांत पाठऊन, याप्रमाणें सरकारच्या यादी तयार होऊन, बाजूस शिक्के होऊन याव्या असें बावांनीं सांगून, यादी पारशी सेवकाजवळ दिल्या त्या पाठविल्या आहेत. पहिल्या यादी शिक्का होऊन आल्या त्या राजश्री आबा चिटणिसाजवळ आहेत, त्या यादी कामाच्या नाहींत, द्याव्या, पाठवून देईन म्हणून मागितल्या. बावांनीं उत्तर केलें कीं, इंग्रजांस दाखवावयास जवळ ठेविल्या आहेत. आतांचे मसोद्याप्रमाणें यादी आल्या म्हणजे पहिल्या दोन्ही यादी माघाऱ्या देऊं. नवे मसोदे त्यांनीं दिल्हे तेच पाठविले आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar requests Nana to send a fresh draft containing the five articles to be ratified by the English.*

---

*शंका.

No. 299 Early 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री नारो शिवदेव राजश्री पाटिलबावांची आज्ञा घेऊन सेवेसीं आले आहेत. किरकोळ कामांपैकीं राजश्री त्रिंबकराव नारायण यांस बावांनीं निरोप देऊन पुण्यास पाठविलें. पावले असतील. पवाराचा जाबसाल आम्ही त्यांत लिहीत गेलों. येऊन फडशा केला नाहीं. सरकारांतून त्यांस निकड बसवून ऐवज घ्यावा. शिवाजी विठ्ठल चाकरीवर आहेत. सरंजामापैकीं उरपाड गेली. खानदेश पाऊस नाहीं. फौजा दंग्याखालीं गेल्या. माळवा मात्र राहिला. ते ग्रहस्थ खराबींत आहे. त्याजवर कृपा करावी असें बावा म्हणतात. वरकडचा चिंतो विठ्ठल आदिकरून जाबसाल राजश्री नारोपंत नानास बावांनीं सांगितले आहेत, विदित करतील. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana Mahadji's advice to resuscitate old Sardars like Trimbak Rao Raje Bahadur and Shivaji Vithal.*

No. 300 March 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री त्रिंबकराव नारायण यांचे मजकुराचीं पत्रें दोन तीन गेलीं. उत्तर एकाचेंही येत नाहीं म्हणोन राजश्री पाटिलबावा यांनीं विचारिलें. मीं विनंती केली कीं, सरदारीचीं वस्त्रें राजश्री रघुपतराव यांस दिलीं ही गोष्ट प्रथम कशी जाली नकळे! दरबारी वस्त्रें दिलीं तीं फिरवणें हें अवघड. आपली मर्जी त्रिंबकराव यांजकडे सरदारी बहाल करावी, या गूढार्थामुळें जाब तटले असतील. जाब येतील ते विचारून येतील. त्यावरून बावांनीं उत्तर दिल्हें जें, चाकरी खावंदाचे मर्जीवर आहे. त्रिंबकराव यांजकडे दोषच होता तर आम्हांस लेहून पाठवावयाचें होतें. आमचें संमत घेऊन मग त्रिंबकराव यांची सरदारी काढून रघुपतराव यांस दिल्यास चिंता नव्हती. पहिले जामगांवींहून आम्ही गुजराथेस गेलों, ते समयीं लौकिक मुलूखभर जाला. इंग्रजांस वर्तमान कळल्यावर ते बहकून मसलत वाहडली. तोच प्रकार त्रिंबकरावाची सरदारी काढून रघुपतराव यांस सांगितल्यामुळें कारभारी यांची आमची दुही प्रसिद्ध

जाली, तर दुही नाशास मूळ आहे. याजकरितां सरदारी त्रिंबकराव यांची यांजकडे बहाल करून, वस्त्रें देऊन पूर्ववत् बंदोबस्त करून दिला, म्हणजे दुलौकिक उभय पक्षीं दूर होईल, आणि कामें चांगलीं चालतील असें लेहून पाठऊन उत्तर आणवणें. मीं उत्तर केलें कीं, आज्ञेप्रमाणें मीं पत्रें पाठविलींच आहेत. आतां आपलें पत्र या मजकुराचें नांवें पाठवितों. त्याचें प्रत्युत्तर जालें जे, सांगितल्या-अन्वयें मजकूर तुम्हींच लिहिणें. आम्ही तुमचे पत्रावर हवाला देऊन मजकूर लिहितों. त्यावरून विनंती केली असे. बावांनींही मजकूर आपले पत्रीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. उत्तर पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana that Mahadji was peremptorily demanding the restoration of Trimbak Rao Raje Bahadur to his Jagir.*

No. 301 March 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—नवाब निजामअल्लीखां यांजकडील बोलणीं आनंदीबाई निंबाळकर व राजश्री बाबाराव वकील यांचे विद्यमानें सिलसिला चालला आहे. वर्तमान ऐकिलें ती विनंती केली. सांप्रतचें वर्तमान ऐकण्यांत आलें आहे जे, आनंदीबाई व बाबाराव यांनीं बावांस प्रश्न केला कीं, इंग्रजांचा आपला सलूख जाला तो पक्केपणें आहे. मीर्जा शफीची आपली शपथ जाली होती तो मारला गेला. आतां अफरासियाबखान त्याचे स्थानीं आहे. त्याचें आपलें राजकारण गोसावी याचे विद्यमानें चाललें आहे. दोन्ही सिलसिले आहेत. त्यांत इंग्रजांचा पाय बादशाहींत न पडावा हें चांगलें. अफरासियाबखान आपण एक होऊन बादशाहीचा बंदोबस्त करावा. त्यांत दक्षणचा बंदोबस्त आम्हांकडे चालतो तसा चालावा. यांत अंतर पडों नये. स्नेह आमचा श्रीमंतांचा चालतो, तोच आपला आम्ही जाणतों. आपणही त्याच अन्वयें आमचे ठायीं स्नेह चालवून, आमचे कामांत मन घालून यथास्थित चाले तें करावें. श्रीमंतांकडून साठ लक्ष रुपयांचा मुलूख आम्हांकडे आला आहे तो माघारा देऊन आपलेही मर्जीचें संरक्षण होईल. हीं बोलणीं बावांनीं ऐकून घेतलीं. जाब दिला नाहीं. श्रीमंतांचा मुलूख

माघारा दिल्यांत आमचा संतोष आहे इतकें उत्तर दिलें. पुढें ऐकण्यांत येईल ते विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the talks of the Nizam's Vakeel with Mahadji Sindia.*

No. 302 March 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—नवाब गाजुद्दीनखान वजीर यांची बेगम व चिरंजीव जियाउद्दीनखान व हुसेन बक्ष काल्पींत आहेत. त्यांस पुण्यास न्यावयाकरितां वजिराकडील तिरंदाजखान साहित्यपत्रें सरकारचीं राजश्री पाटिलबावांस घेऊन लष्करास आले. भेटी घेऊन पत्रें दिलीं. पाटिलबावा मनावर घेईनात. सा महिने तिरंदाजखान येथें होते. नंतर सरकारचें पत्र सेवकास सादर जालें. त्यावरून आज्ञेप्रमाणें पाटिलबावांस हटकिलें. उत्तर जालें जे, आम्हीं श्रीमंतांचे आज्ञेवरून तिरंदाजखानांचे साहित्यार्थ कारकून व स्वार समागमें देऊन काल्पीस पाठवावें, (तर) राजश्री बाळाजी गोविंद यांस सरकारचीं आज्ञापत्रें सादर असतां त्यांनीं बेगम व चिरंजिवास पुण्यास रवाना न केलें; ते आमचे पत्रास मानून आमचे कारकून स्वारांसमागमें त्यांस रवाना करितात हें होणार नाहीं. तेव्हां आणखी स्वार पाठऊन बेगम वगैरे यांस बलात्कार करून आणणें प्राप्त होईल. बाळाजी गोविंद विषाद मानितील, सरकारांत नालीश लिहितील, तेव्हां निषेधपत्र येईल. यास्तव आम्ही मन घालीत नाहीं. तेव्हां बाळाजी गोविंद यांजकडील राजश्री पांडुरंग नारायण येथें आहेत, त्यांस बोलाऊन आणून सरकारचें आज्ञापत्र सेवकास सादर होतें तें दाखऊन बावांचें बोलणेंही सांगितलें. त्यांनीं आज्ञापत्राची नक्कल घेऊन बाळाजीपंताकडे पाठविली. वर्तमान बावांचे बोलण्याचें लिहिलें. त्याचें उत्तर पांडुरंगपंतांस आलें. त्यांनीं मजला सांगितलें कीं, आम्हांस बेगम वगैरे यांस किमपि संबंध नाहीं. ते आपले जाहागिरींत खर्च करीत येथें राहिले आहेत. आम्हीं त्यांस जा कशास म्हणावें व ज्याचे ते नेऊं लागल्यास नको कां म्हणावें ? तिरंदाजखान यांनीं सुखरूप घेऊन जावें. आम्हीं मुजाहीम होणार*

---

*हरकत करणार.

नाहीं. हें वर्तमान पाटिलबावांस सांगितलें. त्यांनीं ऐकून एक कारकून व पन्नास स्वार तिरंदाजखानासमागमें देऊन काल्पीस रवाना केले. बाळाजी गोविंद यांस पत्र रवानगीविसीं लिहिलें कीं, तुम्ही बारबरदार* व स्वार, प्यादे आपले समागमें देऊन, बेगम व चिरंजीव व खोजा यतमाद यांस तिरंदाजखानासुद्धां पुण्यास पोंहचाऊन देणें. नवाबाकडील अमील बेहतराम जाहागीरींत आहे, त्यास ताकीद लेहून दिली कीं स्वार कारकून तिरंदाजखान यांस पुण्यापावेतों खर्चास ऐवज लागेल तो देऊन कबज तिरंदाजखानाचें घेणें. खान मशारनिल्हे व कारकून स्वार काल्पीस जाऊन सवा दीड महिना जाला. कारकुनानें लेहून पाठविलें होतें जे, बाळाजी गोविंद आम्हांस घेऊन जा म्हणतात. बेगमच्या वाडयांत दोनशें माणूस बरकंदाज यांनीं आपलें घालून तिरंदाजखानास धोंडेमार केली. बाहेर गोष्टी सालसपणें सांगतात. आम्हांस बाळाजीपंत म्हणतात, बेगम, नवाब बिकानेरीं आहेत त्यांजवळ जाईन म्हणते. पुण्यास जात नाहीं. तुम्ही बलात्कार करितां ती प्राण देईल. वाटेंत मेली अगर गेली, तर तुम्ही जाणा. आम्ही बारबरदार व स्वार, प्यादे देत नाहीं. असें म्हणत असतां, जोरजुलूम करून आम्ही बाहेर काढून, त्यांस घेऊन निघाल्यावर, बाळाजी गोविंद यांजकडील जमियत येऊन, वाटेंत कजिया करून घेऊन गेल्यास कसें करावें ? आधीं तर काल्पींतच वाडयांत दोनशें बरकंदाज मदतीस घातले आहेत. लढाई पडल्यास खूनखराबी होईल असा प्रसंग येऊन बसला आहे. हें वर्तमान बावांस कळूं दिल्यास त्यांस तर कजिया पाहिजेच. काय बखेडा होईल फौज पाठवितील, दंगा होईल, सबब बावांस कळूं न देतां, दरम्यानच कागद युक्तीनें बावांचे घेऊन जासूद पाठऊन दाब घातला आहे. बेगम वगैरे बाहेर निघोन आली उत्तम. न आली आणि कजिया जाला तर वर्तमान बावांस कळल्यावर कसें होईल श्री जाणें. वर्तमान श्रवण असावें. बाळाजीपंत काय बनाऊन लिहितील यास्तव विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana that the Begum of Gazi-ud-din and his family had been forcibly detained at Kalpi by Balaji Govind in spite of government orders to allow her to proceed to Poona.*

---

*वहातुकीचीं जनावरें.

No. 303 April 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—होळकरांस साडे दाहा लक्ष रुपये सावकाराकडून देविले, त्यांची खातरजमा सरकारांतून केली. त्याप्रमाणें रुपया त्यांचा पावला पाहिजे. याकरितां अहिल्याबाईस सरकारचें पत्र व आमचें पत्र पाठविलें आहे. राजश्री पाटिलबावांचीं पत्रें वरचेवर अहिल्याबाईस पाठवून साडे दाहा लक्ष रुपये यांचा भरणा लवकर होय तें करणें म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें बावांस हटकीत गेलों; परंतु अद्यापि पत्र बाईस गेलें नाहीं. म्हणत होते कीं, सरकारचें व श्रीमंत राजश्री नानांचें पत्र बाईस गेलें असतें तर मजकूर बाई लेहून पाठेविती. बाईचें पत्र आलें नाहीं तस्मात् सरकारांतून पत्रें बाईस गेलीं नसतील, तर आम्हींच लेहून फल काय ? त्रिंबकरायाचे मजकुरावरून तर आतां उत्तरच होत नाहीं. पुढेंही हटकीतच आहें. उत्तर जाल्यास विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of Mahadji not having yet addressed letters to Ahalyabai for the repayment of the loan advanced to Tukoji Holkar by the Peshwa at Poona.*

No. 304 12th April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावांनीं मजकूर सांगितले ते लिहिले. तीं पत्रें बावांनीं वाचून पाहून, मग रवाना करणें म्हणोन सांगितल्यावर रवानगी केली. अक्षतृतीयेचे दिवशीं या मुक्कामीहून कूच होऊन आलापूर सोमावलीकडे, आगऱ्याचे रुखावर मुक्काम करून राहावें. राजश्री सदाशिव मल्हार यांची रवानगी लखनऊस इष्टिनाकड करावी, असा ठराव जाल्यावरून अगोदरचे रवानगींत विनंती केली होती तो मजकूर राहिला. अद्यावत मुक्काम येथेंच आहेत. सदाशिव मल्हार यांचेंही जाणें राहिलें. याचें कारण बावांस विचारलें. उत्तर जालें जे, इंग्रजांनीं मजकूर असेच सांगोन पाठविले असतां यांस पाठवणें सलाह* नाहीं. पुरतें मत त्यांचें समजेल त्याप्रमाणें करावें असा रंग येथें जाला आहे.

---

*युक्त.

फौजेंत कांही हाल नाहीं. तो तपशील किती विनवूं ? महागाई दहा बारा शेर सहा आठ महिने फौजेस रुपया मिळत नाहीं. एक फौज म्हणावयास पलटणांचा भरणा फार दिसतो. बेवीस पलटणें म्हणतात. कमबेश काय असतील ते असोत. त्यांस मात्र आजपावेतों रुपया पावत गेला. आतां त्यांसही रुपया मिळत नाहीं. इंग्रजांनीं चाल अशी घातली ही ठीक दिसत नाहीं. पुढें कसा प्रकार घडेल पाहावें. होईल वर्तमान तें विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the postponement of the visit of Mahadji's envoy to Hastings at Lucknow.*

No. 305 16th April 1784.

(पत्र लेखक आपाजीराम)

छ सेवेसीं विज्ञापना येथील कुशल ताा छ २५ जमादिलावलपर्यंत यथास्थित असे. विशष :— इंग्रजांचा व सरकारचा तह जाहाला, त्याजमध्यें कलम लिहिलें कीं, इंग्रजांनीं महंमदअल्लीखान व मीर्जा आमानी या दोघांखेरीज पगडीवाल्यांसीं राजकारण करूं नये याप्रों करार.....राजकारण इंग्रजांकडे..... श्रीमंतांचे सरकारांत.....प्रमाणें काय करणें.....असतां टिपूसीं सलूख.....खासा इष्टीण दिल्लीचीं राजकारणें करावयाकरितां कलकत्याहून लखनौस आला. जोंपर्यंत लखनौस आला नव्हता, तोंपावेतों आम्हांसीं बोलण्यांत वर वर येई कीं, इंग्रज कोणतीही गोष्ट करणें तरी आमचे इतल्याशिवाय करणार नाहींत. टिपूचा सलूख जाहला असिला तत्रापि फिरेल असें बोलण्यांत होतें. परंतु हल्लीं तऱ्हा असी दिसोन आली कीं, इंग्रजांनीं मतलब करून घ्यावया पुरता मात्र सलूख सरकारांसीं केला. टिपूचा सलूख पक्का जाहला. तेव्हां इष्टीण कलकत्त्याहून दिल्लीचें राजकारण हाताखालीं घालावयाकरितां आला, हे अर्थ उघड दृष्टीस पडतात. तेव्हां आजपर्यंत बोलणीं होतीं त्याचा परिणाम काय घडेल तो पहावा. पातशाहाचें आंतून संधान ज्या कालीं राजश्री पाटिलबावांपासीं लागलें होतें, तेव्हां त्या गोष्टीची गोहदेचे मसलतीमुळें उपेक्षा जाहाली.....मजबूत करावयाकरितां.....भरवसा येत नाहीं. पात.....नें म्हणत होता कीं,.....चा बंदोबस्त करावयाचा.....व लिहिणीं व आर्जबागे येत गेलीं. तेव्हां मनोधारण दिल्ली-

श्वराचें राखावयासी सोय न पडली. आतां अनूपगीर गोसावी याच्या विद्यमानें आणखीही एक दोहोंकडून सूत्रें केलीं आहेत, कीं पातशाहांनीं इंग्रजांस वश परिछिन्न होऊं नये. मग श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून काय घडेल तें पहावें. हल्लीं राजश्री सदाशिव मल्हार यांची रवानगी इष्टिणाकडे लखनौस होत आहे. मग ईश्वर काय घडवील तें खरें. कुमकेस फौज देसीहून यावी हें मानस येथील आहे. मग मर्जीस येईल त्याप्रों करावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana about the suspicions roused in the mind of Mahadji by the deceptive attitude of the English, as shown by the arrival of Hastings at Lucknow within easy reach of Delhi and the treaty concluded by him with Tipu without Maratha mediation as required by the treaty.*

No. 306 16th April 1784.

पैवस्ती छ १३ जमादिलाखर अर्बा समान. ह॥ डांक.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २५ जमादिलावलपर्यंत मु॥ लश्कर नजीक गोहोद येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं सत्रावे रबिलावलीं पाठविलें, तें तिसरे रबिलाखरीं पावोन बहोत आनंद जाला. त्या पत्रीं आज्ञा कीं, राजश्री पाटिलबावांस सांगून इंग्रजांचा कंपू लौकर यावा. लांबचा पल्ला आहे. फौजेस सरकारच्या सामील व्हावयास कंपूस किमान पक्ष दोन महिने लागतील, याजकरितां तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून, कंपू लौकर येऊन पोहोंचे तें करावें म्हणोन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रों दोन चार वेळ बोलणें जाहालीं. तेव्हां त्यांत मुख्य भाव दिसोन आला कीं, इष्टीण खासाच कलकत्याहून येत आहे. त्याच्या गांठी जाहल्यानंतर कंपूची रवानगी होईल. यावयास पक्ष लागेल असेंही बोलण्यांत आलें. येथें मजकूर वरवर बोलण्यांत येतो कीं, सरकारचा सलुखा जाहल्यास वर्ष जाहालें आणि तहनामे परस्परें दिले घेतले ते समयींचे करार आहेत, कीं षड्मासानंतर टिपूचे पारपत्यास फौजा रवाना सरकारच्या

व्हाव्या, म्हणजे कंपूही येऊन पोहोंचेल. ती गोष्ट जोंपर्यंत टिपूकडील निखालस जाबसाल येत तोंपर्यंत आमलांत येऊं पावलीच नाहीं. आतां टिपूनें इंग्रजांसीं सलूख केल्याचें वर्तमान पक्कें पुण्यास समजलें, तेव्हां आम्हांस निकड होऊं लागली, कंपू येऊन दाखल व्हावा. यांतील हा.....तां टिपूचा व इंग्रजांचा..... सलूख. ही गोष्ट पक्की जाहाली. तेव्हां कांहीं निमित्यें ठेवावीं आणि मसलतीस हिसका द्यावा हें मानस इंग्रजांचें. तेव्हां आतां अनेक कल्पना यांच्या व त्यांच्या बोलण्यांत निघतात असें समजण्यांत आलें. इंग्रजांचा व राजश्री पाटिलबावांचा तहनाम्यामध्यें करार आहे. त्या गोष्टीस अंतर पडेल असें हल्लीचे मसलतीमध्यें दिसण्यांत येत आहे. मग ईश्वर काय घडवील तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram asks the Poona Court on behalf of Mahadji not to entertain hopes of assistance from the English against Tipu, as their attitude betrayed lack of sincerity to the alliance.*

No. 307 17th April 1784.

पैवस्ती चंद्र १३ जमादिलाखर आर्बा समानीन, बराबर डांक.

छ सेवेसीं विनंती सेवक सज्ञाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २६ जमादिलोवल मुक्काम नजीक ग्वाल्हेर स्वामींचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :— सरकारचे रवानगीचे पत्रांचे जाब फार तटले ते द्यावे, म्हणून राजश्री पाटिलबावा यांजकडे जाऊन जाब मागतों, परंतु होत नाहींत. मातबर मजकर दोन, एक दिल्लीचें राजकारण, दुसरें इंग्रजांकडील मजकूर. त्यांपैकीं दिल्लीचे राजकारणाचें उत्तर दिल्हें, तें घेऊन पाठविलें आहे. इंग्रजांकडे पत्रें पाठविलीं आहेत व येथेंही जाबसाल इंद्र-सेनासींही चालले आहेत. निश्चयांत आल्यावर जाब देऊं म्हणतात. अहिल्याबाई होळकर यांजकडील साडेदहा लक्षांचेंही उत्तर बावांनीं दिल्हें, तें पाठविलें आहे. वरकड मजकुराचीं बोलणीं बावांचीं जालीं व दिनचर्या हे मजकूर निरनिराळे पुरवण्या विनविल्या आहेत. अवलोकनांत यतील. उत्तराविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री राधाकृष्ण वकील

निसबत रणजितसिंह जाट कुंभेरकर यानें सेवेसीं विनंतीपत्र लाखोटा दिल्हा आहे, तो पाठविला आहे. याचे उत्तराविषयीं आज्ञा जाली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of his having replied to his queries in separate letters.*

No. 308 April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री रायाजी पाटील यांस दुखणें गोहदेवर सडे स्वारींतच भोग* राहिला. पंधरा रोज तेथेंच लोटले. मग वर्तमान राजश्री पाटिलबावांस कळलें. तेव्हां बावा खासा तेथें जाऊन निषेध करून घेऊन आले. येथेंही दीड महिना जाला. मोठी विपत्ति भोगली. पुनर्जन्म जाला. अद्यापि खड्गांगशाईच आहेत. इतके दिवस भरंवसा नवता. आतां भरंवसा वाटतो. बरे होतील. त्यांनी विनंती केली आहे कीं, मी पुण्याहून श्रीमंतांची आज्ञा घेऊन आलों, तेव्हां रायाजी जाधव यांचा पुत्र आमचा जांवई, यास हणमंतराव जाधवानें जखमी करून बोटें तोडलीं. तो तुम्हीं पुण्यांत श्रीमंतांजवळ आहे, त्याची वांटणी करून द्यावी म्हणोन श्रीमंतांस विनंती केली. ती मान्य होऊन आज्ञा जाली कीं, तुम्हीं जाणें. याची वांटणी करून देतों. येथें आल्यावरही स्मरणार्थ विनंतिपत्र पाठविलें. राजश्री नारोपंत नानांस जाते समयीं बहुत प्रकारें सांगितलें, परंतु अद्यापि त्याची वांटणी जाली नाहीं. तूर्त खर्च खात पुण्यांत बसला आहे. शक्ति त्याची श्रीमंतांस अविदित असें नाहीं. किती दिवस त्यानें खर्च खात बसावें? न्याय अन्याय श्रीमंतांस समजला आहे. आपण श्रीमंतांस वारंवार स्मरण देऊन त्याची वांटणी करून देविली पाहिजे. असें पाटलांचें बोलणें ऐकून विनंती केली असे. उत्तर पाठवावेयाविसीं आज्ञा जाली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar seeks Nana's favourable attention on behalf of the son-in-law of Rayaji Patil.*

---

*भोग=भोक्तृत्व, दुखणें.

No. 309 April 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :— इंग्रजांकडील पलटणें व मामलतीवर जागांजागां लोक होते, कानपुरीं कंपू होता, असे सर्वत्रांची बदली जाली. नवे आले. कानपुरास कर्नेल रण* म्हणून आला. त्याजबरोबर दोनशें गोरे व आठ पलटणें सामान-सरंजामानशीं आला आहे. वर्तमान ऐकण्यांत आलें जे, इष्टिणाचे चित्तांत मीर्जा अमानी याचें सर्व हरण करावें. या साधनाचा उद्योग फार दिवस आहे. मीर्जा अमानीजवळ इलमास खोजा आहे, तो लाखों रुपये बाळगून आहे. त्याचे स्वाधीन जितका मुलूख, अंतरवेदींत इटावें वगैरे मीर्जा अमानीकडे आहे तो, व गंगापारचा एकूण करोड रुपयांवर जास्त इजारेयानें मुलूख आहे. स्वार व पायदळ मिळून पंचवीस तीस हजार जमाव, तोफखाना बाळगीत असतो. त्यास संपुष्टांत आणावयास इंग्रज फार दिवस जपले आहेत. डावपेंच करीत असतात. मीर्जा अमानी व इलमास खोजा हेही सावध आहेत. गुदस्तां पैवस्तां इंग्रजांनीं डावपेंच केले असतां सांभाळून राहिला. इंग्रजांचा काबू चालला नाहीं. यंदा कर्नेल रण कानपुरास आला आहे. तो खोजाचे धरावयाचे विचारांत आहे. तो हस्तगत जाला म्हणिजे मग मीर्जा अमानीजवळ पुंजी कांहींच नाहीं. सहजांत हातीं लागेल. यास्तव खोजाचे लागावर आहे. बातम्या मीर्जा अमानी व खोजा यांस असतीलच तेही सावधच आहेत. मीर्जा अमानी एक दीड मास शिकारीचें निमित्त करून लखनऊहून शंभर सवाशें कोस सहकुटुंब गेला. तिकडेच आहे. अद्यापि आला नाहीं. खोजा अगोदर सावध आहे. त्यानें राजश्री बाळाजी गोविंद बुंदेले यांसीं संदर्भ लाऊन, सूत्र करून, काल्पींत हवेल्या मागून घेऊन, त्यांत कबिले व वस्तभाव आणून ठेविली. आपण फौज, तोफा, सामान घेऊन अंतरवेदींत गंगापार फटकून आहे. जितका मुलूख त्याजकडे इजारा आहे त्याचा पैका इंग्रजांस देणें पडतो. मीर्जा अमानीचे कांहीं ऐवजाची वरात खोजावर केली, ती इंग्रजांनीं त्याजकडे पाठविली. त्यानें माघारी टाकून इंग्रजांचीं माणसें उठवून दिलीं. ते कर्नेल रणाकडे आलीं. हा भुलावा† देतो जे, आम्हीं खोजास पैका मागत नाहीं. मीर्जा अमानीसच मागूं म्हणतात. असे घाटपेंच डावपेंच परस्परें लागले आहेत. काय घडतें पाहावें. सारांश, मीर्जा अमानीस कैद करावा, देश व दौलत सर्व लुटून घ्यावी, या तजविजेंत इंग्रज आहेत. लोक उघड बोलतात. दक्षणेस कंपू जावयाची

*Rand. †भूलथाप.

तजवीज कोठेंही ऐकण्यांत येत नाहीं. या उपर कंपू अगर पलटणें आलीयास वनंती करीन. आधीं कलकत्त्यांतच तजवीज कंपू दक्षणेस पाठवावयाची नाहीं. कौसल होईल त्यांत पलटणें कंपू दक्षणेस पाठवावयाचा मनसबा सिद्ध जाला तर पाठवितील. तवपावेतों कंपू तेथून पुण्यास रवाना करावयाची तजवीज नाहीं असें कलकत्त्याचें वर्तमान ऐकतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Poona that there were rumours of the English having decided to despoil the Vazir of his riches, and that their military movements were directed to this end.*

No. 310 April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :— राजश्री पाटीलबावा यांनीं बोलावून सांगितलें जे, इष्टिणाचें पत्र लखनऊहून टिपूचा सलूख केल्याचे मजकुराचें टिपूच्या तहनाम्याचे नकलेसहित आलें, व धाकटा इंद्रसेन येथें आहे, त्यानें पुणेकरांकडे अंतरें, श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांची वस्तभाव लुटून सरकारांत नेली, फत्तेसिंग गायकवाड यास बाकी साबकची* माफ असतां तगादा करून घेतली, फौज सा महिन्यांवर बाहेर निघाली नाहीं, टोपीकरांत आम्हीं अगर गोवेंकर फिरंगी दोघांखेरीज तिसरे टोपीकरांसीं सिलसिला नसावा करार असतां, गोपाळ बल्लाळ देव नाशिककर यास फरासिसाकडे वकील करून पाठविला, टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें, अशीं अंतरें बोलून दाखविलीं. यावरून अंदेशे चित्तांत आले कीं, टिपूचा सलूख आमचे विद्यमानें व्हावा करार असतां परभारा सलूख करून बादशाही राजकारणांत शिरले. यावरून यांचें मत समजत नाहीं. दस्तावेज कागदीं बिघाडाचा लिहिला नाहीं. इंद्रसेन अंतराचीं कलमें बोलतो हें काय ? यावरून राजश्री सदाशिव मल्हार यांची रवानगी लखनऊंत इष्टिणाकडे करीत होतों. त्यास, राहून राहून तुम्हांकडून या वर्तमानाचीं पत्रें श्रीमंत राजश्री नाना यांस पाठविलीं कीं, इंग्रजांनीं चाल करण्याची लिहिण्याची बोलण्याची अशी दाखविली, यावरून बिघाड असें म्हणतां येत नाहीं. नाहीं म्हणतां इंद्रसेन असें बोलणें आम्हांसीं बोलून गेला, यावरून संदेह येतो. याचा विचार कसा करावा ?

---

*मागील.

हीं पत्रें तुमचीं गेलीं. आम्हीही याच विचारणेंत होतों. आज प्रातःकाळींच इंद्रसेन आम्हांकडे येऊन बोलणीं स्नेहाचीं व टिपूकडील सलुखाचीं, कीं ही गोष्ट आम्हांकडून जाली खरी. आणखी बोलणीं होयाचीं आहेत. याकरितां सदाशिव मल्हार यांची रवानगी लखनऊस करावी. येविषयीं इंद्रसेनसाहेब यांचेंही संमत आहे. याचा विचार कसा करावा? मसलतीची जात साम, दाम, भेद तीन प्रकार मनसब्याचे आहेत. याचे तपशील कळलेच आहेत. तिन्ही प्रकार विफल जाल्यास शेवटील प्रकार दंड म्हणजे युद्ध. ज्यांत शत्रु नाहीं कीं आपण नाहीं, तोंपावेतों साम, दाम, भेदांतच वर्तत असावें. याअन्वयें राजकारण तोडूं नये, याकरितां सदाशिव मल्हार यांस पाठवितों. साध्य मतलब तर आमचे, एक टिपूचा परभारा सलूख केला, व हल्लीं दिल्लीचा मनसबा बादशाही बंदोबस्ताचा उपस्थित करून कलकत्त्याहून निघाले. आशकारा* आमचे भेटीं घातला तो श्रीकाशीपावेतों होता. तेथून लखनऊस परभारा जाऊन, वजिराचे सर्व हरणाची बुद्धि धरून, दिल्लीचा मनसबा आरंभिला. शाहाजादा दिल्लीहून पळऊन लखनऊस नेला. वजिरास घेऊन इष्टीण आडवा जाऊन, अदब कवाईत यथा पद्धत करून, मान सन्मानेंकरून घेऊन येऊन, वजिराकडून आदर तार्तम्य रीतीप्रमाणें करऊन, चौत्रा, नजर, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे घेऊन, इष्टिणानें आपणही घरास नेऊन, नजर जवाहीर, वस्त्रें, हत्ती, घोडे दिले. फार आदर व खुषामत करून जवळ ठेविलें आहे. कडाकुरा व प्रयाग महाल खालशाचे, परंतु वजिराजवळ होते ते शाहाजाद्याच्या खर्चांत नेमून दिविले. तिन्ही महाल, इसकाटसाहेब† इंग्रज प्रयागीं आहे त्याचे हवाला करून, शाहाजाद्याचे खर्चास गोपाळदास साहुकार काशीचा दाखविला. त्याजपासून इसकाटसाहेबानें शाहाजाद्यास खर्चास देवीत जावें. याअन्वयें तिन्ही महाल हाताखालीं घालून, शाहाजाद्यास बगलेंत ठेविला आहे. हीं दोन्ही अंतरें इंग्रेजांकडेसच आहेत. दोन्ही मतलब आमचे कसे साधतात? दरम्यान इंद्रसेन प्रामाणिक. त्याचे प्रामाणिकतेवर इंग्रजांचा सलूख केला. कराराप्रमाणें कै० दादासाहेब, किल्ले, मुलूख त्यांनीं दिले असतां, टिपूचे सलुखांत अंतर दाखऊन, बादशाही मनसब्यास हात घातला. हीं बोलणीं इंद्रसेनासींच होतील. तो परिहार अगर साधन कोणे प्रकारें करितो? मार्गावर असेल तर त्याचें एक कलम दिडा लक्षाचे जहागिरीचें आपल्याकडे राहिलें आहे, त्याचा शद्ब लाविला तर जाबसाल करारांत आलाच आहे. त्याचे मतें सुरतेजवळ महाल लाऊन द्यावे. सरकारची

*आवई. आमचे भेटीस येतों असा पुकारा केला. †Scott.

मर्जी कालपी नजीक महाल द्यावे. इतकें अंतर दरम्यान आहे. त्याच्याही सनदा पाठवितों म्हणून सरकारचीं पत्रें आलीं. मागाहून सनदाही येत्या. टिपूचा सलूख त्यांनींच परभारा केला. सरकारची फौज त्यांच्या म्हटल्याप्रमाणें मोहिमेवर लांब गेली. कंपू त्यांनीं न पाठविले आणि परभारा सलूखही केला. यामुळें आम्हीं पुन्हा सरकारांत लिहिलें नाहीं. करार जाला त्यांत अंतर नाहीं. सनदा हातास आल्या नाहींत म्हणून शद्ब लावील. यास्तव तुम्हीं लेहून पाठविणें, दिडा लक्षाचे महाल कोणते नेमिले असतील त्यांच्या बेरजा भरण्यास लागाव्या. याची याद व सनदा लौकर आल्या पाहिजेत. आम्हीही लिहितों. सनदा श्रीमंत राजश्री नानांनीं जलदी करून पाठवाव्या. आम्हांजवळ याव्या. सदाशिव मल्हार यांसीं बोलणें यथास्थित होऊन दोन्ही मतलब आपले साधत, बादशाही मनसबा त्यांनीं सोडून द्यावा. टिपूच्या मनसब्याची तोड मुख्य, तर त्यांनीं पलटणें कंपू आमचे फौजेस शामील करून टिपूचें पारपत्यच करावें. ती गोष्ट त्यांच्यानें होणार नाहीं. आम्हीं त्यासीं सलूख केला असें पत्रीं लिहिलें, तहनाम्याची नकल पाठविली, त्यापक्षीं कंपू देणार नाहींत तर मध्यम पक्ष, आपला मुलूख टिपूकडे जुना नवा असेल तो सोडून देवावा. कनिष्ट पक्ष, मुलखाचा पैका दरसाल देत जावा. टिपूचा सलूख परभारा केला हा दोष इंग्रजांकडे खरा. तो त्यांनीं पदरीं घेऊं लागले, तर वारंवार दोषी म्हणण्यांतच फल नाहीं. लाजऊन तोड लाऊन घेऊन, कलम उगवून घ्यावें आणि सलूख राखावा. हे जाबसाल होतील तेव्हां इंद्रसेनाचें कलम दीड लक्षाचे जागिरीचें आपणाकडे राहिलें आहे त्याचा शद्ब ते लावितीलच. ता सोसून अखेर देणें लागेल. याकरितां सनदा जलद आल्या पाहिजेत. आपले दोन्ही मुद्दे लिहिल्याप्रमाणें हासल* जाल्यास दिडा लक्षाची जागीर देण्यांत येईल. मुद्दे हासल न जाल्यास सनदा त्यास प्राप्त कशा होतील? आम्हीं काय निमित्त देऊं? इष्टिणाचे तहनाम्यांत एक तों साष्टी सरकारांत माघारी द्यावी; त्याऐवजीं तीन लक्ष रुपयांचा मुलूख इंग्रजांस द्यावा; व कंपिनीच्या सरकारचा स्नेह जाला सबब तीन लक्षांचा मुलूख कंपिनीस द्यावा; अशीं दोन कलमें आहेत. त्यांपैकीं साष्टी सुटली नाहीं, त्यापक्षीं तीन लक्षांचें कलम बातल† पडलें. तीन लक्ष कंपिनीचे तो मुलूख इंद्रसेन मागों लागला. त्याची रदबदली फार जाली. इंद्रसेनाचें म्हणणें कीं, कंपिनीची नुकसानी आम्हीं कशी करावी? असा आग्रहच त्याचा पाहिला. कांहीं देऊनही पाहिलें, तत्रापि तोड

*कबूल †रद्द.

पडेना. कांहीं घेईना. तेव्हां मोठ्या युक्तीनें त्यास प्रबोध परस्परें पडद्यानें करऊन, दीड लक्ष रुपयांची जागीर त्यास जातीस सुरतेलगती द्यावी असा करार ठरऊन, कंपिनीचें तीन लक्षांचें कलम सोडविलें. अशा करारानें दीड लक्षाची जागीर द्यावी लागती. आपले वचनाची प्रामाणिकता ठेऊन जागीर दिल्यास उपर त्याजवर राहील. जर करितां दोन्ही मतलब, दिल्लीचा व टिपूकडील, लिहिल्याप्रमाणें करारांत आले, तर सनदा त्यास देऊं. ते समयीं सनदा आणवितों म्हणून लांबण घातली, तर त्यास प्रमाण वाटणार नाहीं. तूर्तच दिल्या पाहिजेत. यास्तव सनदा आम्हांजवळ लौकर आल्या पाहिजेत. सदाशिव मल्हार जातात. दोन कलमें आपलीं सदरीं लिहिल्याअन्वयें साध्य न जालीं, तर बिघाडच ठरला. मग दिडा लक्षाच्या सनदा इंद्रसेनास आम्ही कसे देऊं ? मीं विनंती केली, कंपिनीचे स्नेहांत तीन लक्षांचा मुलूख करार केला आहे, तो सोडवण्याकरितां दीड लक्ष रुपयांची जागीर इंद्रसेनास द्यावी. हें कलम पहिले कलमबंदींत लिहिलें असेल. बावांनीं उत्तर केलें कीं, करारच ठरला आहे, पहिले कलमबंदींत लिहिलें असावें. कदाचित लिहिलें नसेल तर राहिलें असेल. करार याप्रमाणें ठरला आहे. तो पार पाडिला पाहिजे. यास्तव सनदा लौकर पाठवाव्या. यदर्थीं बावांनींही स्वामींस पत्र दिलें तें पाठविलें आहे. त्यावरून वर्तमान विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports an interview he had with Mahadji in which he was informed that his agent would soon visit Hastings at Lucknow charged with two objects,—inducing the Company to cease interference in the affairs of Delhi and modifying the late treaty with Tipu in favour of the Marathas. If these negotiations succeeded, the promise of the grant of a Jagir to Anderson was to be executed.*

No. 311 April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—दिल्लीचे राजकारणाविषयीं राजश्री पाटिलबावा यांस वारंवार उत्तेजन देत आहें कीं, इंग्रजांचा पाय बादशाहींत शिरल्यास खुष्की-वाल्यांस कोणासही जागा राहात नाहीं, यास्तव त्यांचा शिरकाव न होतां आपले

हाताखालीं दिल्ली घालावी, अशी आज्ञा येते, व बावांचेही चित्तांत अस्था होतीच. म्हणून मीर्जा शफी यांसी भेटून स्नेह करून सूत्र लाऊन ठेविलें होतें. तो मृत पावल्यानंतर अनूपगीर गोसावी हिमतबहादूर त्या मंडलांत पाटिलबावांचे आश्रयानें ठाकूरकी जगऊन आहे, त्यानें अफरासियाबखानासीं अनुसंधान चालविलें. अफरासियाबखान, नजबकुलीखान व गोसावी हे एक विचारें आहेत. बादशाहाजवळ अबदुल अहदखान सलाहकार आहे, त्याचा नजफखानाचा बांकच होता. आतां अफरासियाबखान वगैरे मंडळीसींही बांकच आहे. बादशाही बंदोबस्त करावयाची आस्था अफरासियाबखान वगैरे यांस आहे. गोसावी यानें बावांचें व अफरासियाबखानाचें सूत्र लाविलें. बादशाहाचे बुद्धीस भेदक अबदुल अहदखान आहे. त्यानें सूत्र लावून, बादशाहाचा पुका पाठऊन, कलकत्त्याहून इष्टिणास घेऊन आला. इष्टीग कलकत्त्याहून चालला, तेव्हां रूढ केली कीं, पाटिलबावांचे भेटीस जातों. कागदीं पत्रीं असेच मजकूर येऊं लागले. त्यावरून बावांसही औत्सुक्य होतें. श्रीकाशीहून परभारा लखनऊस गेला. तेव्हां मनसबा फुटला कीं परभारा दिल्लीस जातो; व दक्षणेस टिपूसीं परभारा सलूख केला अशीं स्वामींचीं पत्रें येऊं लागलीं. राजश्री आनंदराव निंबाजी व मंबईकर जनराल यांच्या पत्राच्या नकला आल्या. त्यावरून खचित प्रत्यय आल्यावरून येथील इंद्रसेनासीं जाबसाल बावांनीं घातले कीं, आम्हांस दरम्यान जामीन श्रीमंतांचे येथें गोऊन, जाबसाल लाऊन, मोहमीवर तुम्हीं फौज काढविली; त्यावरून आम्ही खातरजमेचें लिहून, फौज बाहेर काढून पंढरपुरावर गेली असतां, तुम्हीं परभारा टिपूसीं सलूख केला. आम्हांस लबाड पाडिलें! अशीं खट्टीमिठीं बोलणीं इंग्रजांसीं लाविलीं. याचो होय न होय न करितां परभारा दिल्लीस जातो. असें ऐकून बावांनीं अफरासियाबखान यास गोसावी याचे विद्यमानें धीर दिला कीं, हरतऱ्हा करून पातशाहास हस्तगत करावें. सूत्रांत ठेवावें. इंग्रज शिरूं न पावत आणि तोरा* आपले हातीं राहे तें करणें. बादशाह नच ऐके तर कैद करावा. शेवटीलही इलाज लाचारीस प्राप्त, परंतु इंग्रजांचे हातास जाऊं न द्यावें. अविधास, गोसावी मंडळी यांस तर अगत्यच! ही सलाह त्यास पसंत होऊन यत्नास लाविलें. बादशाह व अद्दल अहदखान यांजभोंवते अवर्ण† आपलें केलें आणि बावांस लेहून पाठविलें कीं, आम्ही बादशाहास आग्ऱ्यास घेऊन येतों; आपण भेटीस यावें. इंग्रजांचा वकील मीर्जा शफीजवळ होता, तो आतां दिल्लीस आहे. त्यास परिछिन्न यवनांनीं

*मोहरा. †आवरण, वेष्टन.

ताकीद केली कीं, इष्टीण दिल्लीस यावयाचें प्रयोजन काय? त्यानें माघारा जावें. तुम्हीं येथून उठून जाणें. हें वर्तमान त्यानें इष्टिणास लेहून पाठविलें. त्यावरून इष्टीण इंद्रसेन आदिकरून सर्व विमनस्क आहेत, म्हणोन राजश्री सदाशिव मल्हार याचा कारकून इंद्रसेनाबरोबर कलकत्त्यास गेला होता, तो बरोबरच आहे, त्यानें लेहून पाठविलें. आणखीही त्यानें लिहिलें आहे जे, इष्टिणाचे मंडळीचा मनसबा होता कीं, लखनऊस जाऊन मीर्जा अमानीचें सर्व हरण करून ज्ञानमठीं बसवावा. काशीपावेतों हाच विचार होता. काशीहून निघोन लखनऊस येतां मार्गीं विचार पडला कीं, मीर्जा अमानीचें सर्व हरण केल्यास, पाटीलबावा म्हणतील कीं स्नेह करून सर्व हरण करावें अशी इंग्रजांची चाल आहे. असें ते उमजल्यास वाईट. यावरून आतां विचार केला आहे जे, हिशेबीं आमचा ऐवज निघेल तोच मागावा. लखनऊस आल्यावर पैगामही* मीर्जा अमानीस केला आहे. काय होतें पहावें. खोजा इलमास पैकेकरी व फौजेचा तुमदार† आहे. आणखी एक दोघे व मीर्जा अमानीची आई यांनीं इंग्रजांचीं भविष्यें समजून, आपले ठिकाणीं खबरदारही आहेत. सांप्रत वर्तमान आलें आहे जे, मीर्जा अमानीची आई वारली, याउपर तेथें काय तऱ्हा पडते कळेल. अफरासियाबखान यानें बादशाहाचा षुका पाटिलबावांस पाठविला आहे कीं, आम्ही आगऱ्यास येतों. तुम्हीं तेथें भेटीस येणें. त्यावरून बावांनीं विचार केला आहे जे, अक्षतृतीयेस कूच करून ग्वालेरीपलीकडे, आलापूर सोमावली, करोलीच्या लगत्यास, ढवलपुरचे घांटाचे सुमारें आहे, तेथें मुक्काम करावे. येथें चारा पाणी नाहीं. आलापूर सोमावलीकडे चारा पाणी आहे. चार रोज गुजराणा करावी. आगऱ्याची खबर बादशाहाची आली म्हणज धवलपुराजवळ चमेल उतरून, आगऱ्यास जाऊन बादशाहाची मुलाजमत करावी. सदाशिव मल्हार यास इष्टिणाकडे लखनऊस विदा करावें, असा मनसबा केला आहे. सदाशिव मल्हार स्वार होऊन गेले व बावांचें कूच जालें म्हणजे विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports Hastings' diplomacy having received a set-back at Delhi by the clever manoeuvres of Mahadji; he declared his support to the party of Afra-siyab Khan and was going to visit the Emperor near Agra.*

---

*संधान. †संग्राहक, बलवान.

No. 312 April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—दिल्लीच्या राजकारणाविषयीं आज्ञा सादर जाली कीं, पातशाहाकडे इंग्रजांचें राजकारण लागलें आहे. दरमहा कबूल करून पातशाहास आपलें करून घेणार अशा बातम्या आल्या आहेत. त्यांत प्रस्तुत तों पातशाहींत बखेडा पडला आहे. तेव्हां इंग्रजांसही राजकारण करावयास जागा जालीच आहे. पेशजीं पाटिलबावांस लिहिलें होतें कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह जाल्यावर पातशाहासीं परभारें इंग्रज राजकारण करणार नाहींत. तह न जाला, तर कळेल तसें करितील. त्यास इंग्रजांचा व सरकारचा तह जाला, तेव्हां इंग्रजांनीं पातशाहासीं हरगीज राजकारण लाऊं नये. पाटिलबावांनीं इंग्रजांसीं बोलून येविसींचा बंदोबस्त करावा व पातशाहीचे बंदोबस्ताची पैरवी जाली पाहिजे. येविषयीं तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून उत्तर होईल तें लेहून पाठवणें. पातशाहास खर्चाची अडचण. इंग्रज पैका कबूल करून आपले लगामीं लाऊन घेणार. येविषयीं सरकारांत बातम्या आल्या. त्यास इंग्रजांचें राजकारण पातशाहासीं जाल्यास चांगलें नाहीं व पुढें पेंच फार आहेत. याकरितां सरकारांतून बंदोबस्त राजश्री पाटिलबावांनीं करावा. इंग्रजांचा पाय नसावा. सरकारांतून बंदोबस्त व्हावा हें पातशाहाचेही चित्तांत आहे. परंतु इकडून न होय, त्यापक्षीं लाचारीनें इंग्रजांसीं संधान करितील असेंही आहे. याकरितां याची तरतूद जरूर व्हावी. ऐशास आज्ञेप्रमाणें हा मजकूर राजश्री पाटिलबावांसीं बोललों. पत्रही बजिन्नस दाखविलें. उत्तर जालें जे, आम्हीं तीन चार वर्षें मोहिमेंत श्रम मेहनत कोणे प्रकारचे करितों, दीर्घ आयास कर्जदारी किती जाली, वर्तमानें वरचेवर कळत असतां आमची खबर कोणी घेतो ? फौजेनें अगर पैक्यानें मदत कोणी करितो ? होळकर आम्हांपेक्षां मातबर असून, हिंदुस्थानांतील सहा वर्षांची स्वारी करून आल्यावर, दरसाल फौज किती ठेऊन चाकरी कोणे प्रकारची करितात ? कसकसे अनुभव दाखविले आहेत ? त्यांस सरंजामाचा हिशेब व चाकरीचें कोणीच म्हणूं नये ! चालत्यावर दोन गोण्या लादाव्या तशी गति आमची जाली. त्यांनीं सर्व प्रकारें जमीन धरून राहिले. त्यांची मदत सरकारांतून साहुकारांची खातरजमा करून साडेदहा लक्ष रुपये देवावे. चाकरी मन घालून करण्याचा विचार कर्कंबापासोन* आजपावेतों जाला. तेच पुढेंही अनुभव येतील ! त्यांजवर ममता.

*करकंब येथील स. १७७८ च्या प्रकरणापासून. खरे ले. २१५८ पहा.

आम्हीं जोवाभ्य श्रम करीत असतां मदत अगर परामर्श करणें एकीकडे. उफराटे दोष लाऊन पत्रें येतात. पातशाहाचें राजकारण करा म्हणोन लिहितात. तर पैक्यावेगळें तें राजकारण कसें होतें? आम्हीं मसलतेमुळें किती पेंचांत आलों? कर्ज देखील मिळेना येथवर दशा आमची. बादशाहास खर्चास रुपया पाहिजे. सध्यां फौज तिकडे जावी ती कोणती पाठवावी? स्वारी हिंदुस्थानची. फौज आम्हांबरोबर तैनाती पतकें तरी बरोबर असावीं? त्यांपैकीं राजश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंडदेव व पवारांपैकीं निमे येथें कृष्णाजी पवार मात्र आहेत. सदाशिव पवार निमेचे व धारकर पवार, त्रिंबकराव नारायण व वोढेकर इकडील तैनाती असतां हुजूर ठेऊन घेतले. अशी दशा आमचे हिंदुस्थानचे स्वारीची! मोहीमशीर असोन राजकारणाचे हुकूम येतात. असो. आमची क्रिया शुद्ध धन्याचे पायाशीं असेल, तर ईश्वर याही राजकारणाचा परिणाम लावील. अशीं बोलणीं भानगडीचीं फार जालीं. विस्तार किती लेहावा? समर्पक उत्तर होतें न होतें काय लिहावें? मर्जीस ठीक पडेल तितकें रुचकर. भाकड-कथा लिहिणें वृथा आहे. उत्तर होईल तें लिहिणें अशी आज्ञा, यास्तव संकलित विनंती केली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Herein Mahadji reiterates his complaint of lack of resources and support from Poona for undertaking the heavy responsibilities of setting right the imperial affairs at Delhi.*

No. 313 April 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—बावांनीं सांगितलें जे, डांकेंत आमचे लखनऊहून मजकूर पत्रांत लिहिला आला आहे जे, इष्टिणानें शाहाजादा लखनऊस आणून, खर्चाचा बंदोबस्त करून दिल्हा. प्रांत कडा व कुरा व प्रयाग हे माहाल त्याचे खर्चांत नेमूं लागले. ते समयीं शाहाजाद्यानें म्हटलें, कडा व कुरा हे माहाल आमचे खर्चांत नेमून देतां; परंतु हे माहाल शिद्यांकडील करार मदारांत आहेत. सलाह पोक्त करून मग आम्हांकडे नेमावे. याचें उत्तर इष्टिणानें केलें कीं, विचार करून उत्तर देऊं. शाहाजाद्यास उत्तर असें दिल्हें. यांचे चित्तांत आहे जे, आम्ही व वजीर तुमचे हमराह* आधाडीस असों. मग चिंता काय आहे?

*हर प्रकारें, सर्वस्वी.

सध्या कालपी तालुका, कडा, कुरा याजवळ यमुनापार तीरींच आहे, त्यास आपण वेध लावावा असें वर्तमान आलें आहे. ऐकिलें सांगतों. अखबार येतो त्यांतील वर्तमान प्रमाण मानावें, न मानावें, दोन्ही प्रकार आहेत. लटकेंही होतें, तेव्हां म्हणतील कीं, कल्पित सांगितलें. यास्तव सांगतां अनमान होतो. इतके दिवस इंग्रज प्रामाणिक वाटत होते. टिपूचा सलूख परभारां करितील असें सरकारांतून लिहीत होते. आम्हीं खातरजमा करून लिहीत असतां परभारां सलूख करून आमचे लिहिण्यास अप्रामाणिकता आणिली. यावरून प्रामाणिक वाटत नाहींत. दाखवितील कांहीं, करतील कांहीं, असें भासलें. यांसीं जपूनच असावें. यास्तव ऐकिलें वर्तमान सांगतों. वर्तमान कळल्यावरून सावधता करणें प्राप्त होतें. खबरदारी जालियावर इतरांस विचार पडतो असेंही आहे. तेथील मामलेदारीची रीत परस्परें दरबारीं श्रुत असेल. आम्हीं तपशील लेहावे उचित नाहीं. कुवेयांत असेल तेथें डोलांत घागरींत तेंच येईल, अशी दशा. मग खबरदारी व सावधता कोण करितो? मामलतेचें काय समजावें? यास्तव ऐकिलें वर्तमान सुचविलें आहे. परगणे हमीरपूरबद्दल रुपया, पवाराचे जप्तीबद्दल मनस्वी खर्च लेहून, सरकारचा बुंदेले रुपया देत नाहींत. धटाई करून स्वस्थ आहेत. अशा चाली यांच्या असतां सरकारांतूनही तगादा होत नाहीं. असें सांगितल्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes about the growing estrangement between Mahadji and the English.*

No. 314 1 May 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—चंद्र ११ जमादिलावलचीं पत्रें सादर जालीं. लखोट्यावर तेरीख चंद्र २२ होती. तीं पत्रें येथें चंद्र १० जमादिलाखरीं पावलीं. राजश्री पाटिलबावांस पत्रें, नवाबाचे भेटीस स्वारी निघाली; श्रीमंतांचें राहणें पुण्यांत जालें; इंग्रजांकडील मातबर टिपूचे मुलखाच्या व बंदवे यांच्या सोडचिठ्यासहित पाठऊन द्यावा; मुंबईस जनराल कलकत्तेकरांनीं नवा पाठविला*, त्यानें वसईचा जंगी सामान बहुतकरून वसईस पाठविला; साष्टी तहनाम्यांत इंग्रजांकडे

*R. H. Boddam was appointed Governor of Bombay on 1st January 1784.

राहिली तेव्हां बोलूं नये; परंतु साष्टीची देशमुखी श्रीमंतांची वतनी जागा ती इष्टिणाचे भेटींत सोडऊन घ्यावी; या मजकुराचीं होतीं तीं बावांस पावतीं केलीं. सेवकाचे पत्रींही हे मजकूर आज्ञापिलेच आहेत. जास्त मजकूर बितपशील :—

१ पांचा कलमांच्या यादी दोन सरकार शिक्कयाच्या फिरल्या त्याचे मसोदे पाठविले म्हणून पेशजीं तुम्हीं लिहिलें परंतु आले नाहींत. तर ते पाठऊन देणें.

१ त्रिंबकराव नारायण यांची सरदारी काढून रघुपतराव यांस दिली हें वर्तमान बावांनीं ऐकून शपथपूर्वक सेवकाजवळ बोलले. त्यावरून सेवकानें विनंतीपत्र चंद्र ११ रबिलाखरचें सेवेसीं पाठविलें, त्याचें उत्तर सादर जालें.

१ मौजे वेळास तालुके बाणकोट हा गांव आमचा वतनी आहे तो इंग्रजांपासोन सोडवून घ्यावा. शेवटीं मोबदलाही कबूल करणें.

१ इंग्रजांचें करणें मायावी, त्यांस जपून असावें. विश्वासावर जाऊं नये.

सदरहूप्रमाणें मजकूर जास्त होते. रवानगीचीं पत्रें बावांनीं सांगितल्याप्रमागें तयार जालीं. त्यांची रवानगी करावी इतक्यांत हीं पत्रें सादर जालेलीं पावलीं. तीं पत्रें बावांचीं व सेवकाचीं बावांस दाखविलीं. त्रिंबकराव नारायण यांचा मजकूर उगवून आज्ञापिला होता, तो साकल्य आरंभापासोन शेवटपावेतों लेखकांनींच वाचून दाखविला. तो श्रवण करून मजला बावांनीं सांगितलें कीं, तुमची रवानगी जाऊं देणें. मी त्रिंबकराव नारायणाचे मजकुराचें विचारिलें कीं, आपण सांगितल्याप्रमाणें मीं विनंती केली व आपणही माझे पत्राचा दाखला देऊन आपले पत्रीं मजकूर लिहिला आहे, त्याचें उत्तर श्रीमंतांचें आलें, याचा विचार काय? बावा बोलले जे, हें कृत्रिम दरम्यानच आहे. शोध होईल, ठिकाण लागेल. आम्हांस कर्तव्य तें आम्हीं पत्रीं लेहून दिलें व तुम्हांसही सांगितलें. तुम्हीं लिहिल्याप्रमाणेंच घडलें पाहिजे. तीं पत्रें रवाना करणें. राजश्री रामजी पाटील यांस बोलाऊं किती पत्रें गेलीं, अद्यापि येत नाहीं. आतांही मुजरद पत्र पाठऊन त्यांस बोलाऊन आणितों. कृत्रिमाचें ठिकाण लागेल. अशी बजिदी जाली. त्यावरून रवानगी केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is Sadashiv Dinkar's letter to Nana referring among other topics to the affair of Trimbak Rao Narayan Raje Bahadur being restored to his Jagir.*

No. 315 2 nd May 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री त्रिंबकराव नारायण राजेबहादर यांचें वर्तमान राजश्री पाटिलबावांनीं ऐकलें जे, उभयतां पितापुत्र सरकारवाडयांत चौकींत ठेविले. गड, कोट, किल्ले, ठाणीं यांच्या सोडचिठ्या त्यांजपासून लेहून घेतल्या. डौल* राजश्री रघुपतराव यांजकडे दिले. राजश्री केशो कृष्ण दातार व चांगोजी कदम यांजकडे देखरेख कारभार सांगणार. हें वर्तमान ऐकून सेवकास बावांनीं बोलावून नेऊन भाषण करून मजकूर ऐकविला. वर्ण बोलले तितकेच विनंतिपत्रीं लिहोन चंद्र ११ रबिलाखरीं जोडी रवाना केली ती पाऊन वर्तमान श्रुत जालें असेल. नंतर परवांचे रोजीं चंद्र १ व चंद्र २ रबिलाखरचे पत्रांचे जाब लेहावयास सांगितले. त्या प्रसंगांतच वर्तमान आलें जे, राजश्री सदाशिव रामचंद्र यांचे वाडयांत त्रिंबकराव नारायण व रंगराव हे उभयतां व भवानी कुवर व मुलें लेकरें, बायकादेखील एके जागां ठेविले. सभोंवती चौकी आहे. पागा, हत्ती वगैरे कारखाने घेऊन केशो कृष्ण व चांगोजी कदम यांचे स्वाधीन केली. गड, कोट, किल्ले यांच्या सोडचिठ्या त्यांजपासोन घेऊन केशो कृष्ण व चांगोजी कदमाचे हवालीं केल्या. रघुपतराव यांस परळीहून उतरून आणविलें. सरदारोचीं वस्त्रें त्यांस द्यावीं. हें वर्तमान ऐकून बावांस फार विक्षेप होऊन मजसीं बोलले जे, तुम्ही म्हणत होतां ही गोष्ट घडली खरी कशावरून? आतां लटकी कशी म्हणावी? रघुपतराव होळकरांचा पक्ष, त्रिंबकराव आमचा पक्ष. प्रस्तुत होळकरांचा भाऊपणा, मजला त्यांची मर्जी दरकार आहे म्हणतील. तसें न ऐकतां थोर मसलतीच्या उपयोगी कसे पडतील? आमचा संकोच रिकाम्याचा काय कामाचा? ते समयीं रघुपतरायाचें पारपत्य दोष पदरीं घालून जालें. त्रिंबकराव यांचे पदरीं दोष कोणता? दोष असता तर आम्हांस लेहून पाठविते, तर आम्हीं हरामखोराचें पारपत्य न करावेंसें काय होतें? विश्वास आम्ही पारपत्य करूं असा न पुरला, म्हणोन होळकरांचे मर्जीकरितां कैद केलें; तर वर्तमान तर लेहून पाठवावें. चंद्र १ व चंद्र २ रबिलाखरचीं पत्रें चौदा पंधरा रोजांनीं येथें पावलीं. त्यांत कांहींच लिहिलें नाहीं. बारीक मोठें वर्तमान लिहून पाठवीत असतात. आमचे विद्यमानची त्रिंबकरावाची सरदारी. स्वारी भरोभर(?)आमचे हातची. सरकारचे भरण्यास आमचे विद्यमानचीं कर्जे देखील. असें असतां

*कारभार.

आम्हांस कांहीं कळूं न देतां, कैद करावयास कारण आमचा उपमर्द करावा. आणखी निमित्त दिसत नाहीं. असेच ज्यापक्षीं उपमर्द होऊं लागले, तर कामें कशीं चालतील ? चाल पडून जागांजागां तट पडूं लागतील त्याचीं निमित्तें आम्हांवर योजूं लागतील. त्याची भवति न भवति करितां लौकिकांत वाईटच पडेल. श्रम सायास करून व कर्जभरी होऊन आणखी निमित्तास पात्र कशास व्हावें ? जाले तितकी सेवा घडली त्याचाच शेवट जाला म्हणिजे लक्ष. याउपर हावभरी कां व्हावें ? ज्याजपासोन सेवा घेण्याची उमेद सरकारांत विश्वासपूर्वक असेल, ते जें करतील तें गोड पडून साहित्यही त्यांचें पुरत जाईल. आमचे सर्व कर्मास दूषणाची योजना होऊं लागल्यास उपमर्द दिसतो. त्रिंबकरावाचे कैद करून सरदारी काढण्यांत उघडच जालें. इतकें स्पष्ट कळत असतां देशीं जाण्याची उमेद धरावी युक्त नाहीं. त्रिंबकराव यांची सरदारी करार होऊन, वस्त्रें त्यांस होऊन डौल त्यांचे यथापूर्वक त्यांचे त्यांजकडे जाल्यासच अपलौकिक दूर होऊन कामें चालतील. अशीं विषादाचीं व प्रस्ताव्याचीं भाषणें जालीं. उत्तर करावें तर आधीं हें वर्तमानच कळलें नाहीं. माहितगारी असल्यास परिहाराचें बोलणें बोलावें. रुचकर होईल तें कळतच आहे. उगेंच तरी प्रसंगांस बोलावें, कांहीं कळलेंच नाहीं म्हणून ऐकूनच घेतलें. वर्तमान विदित व्हावें यास्तव विनंती केली असे. संक्षेपावरून विस्तारही ध्यानास येईल. त्रिंबकराव यांजवरून विक्षेप फार जाला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar reports how very deeply Mahadji resented the imprisonment of his protege Trimbakrao Narayan Raje Bahadur by Nana as a personal affront. Sadashiv Dinkar writes this letter after a discussion he had with Mahadji on the subject.*

No. 316 20 th May 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांजकडे जाऊन विनंती केली कीं, आजपावेतों सात आठ रवानग्यांचे जाब तुंबले; होत नाहींत. श्रीमंत उत्तराची प्रतीक्षा करितात. मनसब्याचीं उत्तरें यास्तव उत्तरें जलद रवाना जालीं पाहिजेत. उत्तर जालें जे, वरकड जाब गेलेच आहेत. एक इंग्रजांकडील मजकूर टिपूचे मसलतीचा त्याचें उत्तर जावें, त्यास अगोदरच्या रवानग्या आल्या, त्यांत

टिपूसीं परभारा सलूख इंग्रजांनीं केला हे मजकूर. नंतर टिपूचें पत्र सलूख कबूल केल्याचें पुण्यास आलें त्याचीं नकलेसहित पत्रें इकडे आलीं. हे दोन्ही मजकूर पैदर पै* आम्हीं इंद्रसेन यास लिहीत गेलों. धाकटा इंद्रसेन येथें आहे, त्याजकडूनही पत्रें गेलीं व जात आहेत. त्याचीं उत्तरेंच येईनात. मध्यें इष्टिण काशीस आला तेव्हांची शोहरत† आमचे भेटीची घातली. तेव्हां भेटींतच निश्चय होईल असें कल्पनेंत आलें. पुढें पाहिलें, तों इष्टीण लखनऊस गेला. वजिराची माया मात्रा गुंडाळून, दिल्लीचें राजकारण बादशाहातचे बंदोबस्ताचें आढळांत आलें. आमचा सिलसिलाही दिल्लीकडे चाललाच आहे हें त्यांस समजलें. इष्टिणाचें राजकारण दिल्लीकडे चाललें हेही जाबसाल इंद्रसेनास लेहून पाठवीत असतां, उत्तर त्यांचें न येतां, जाबांत तुम्हांस काय लिहून द्यावें? प्रस्तुत त्यांनीं मजकूर सांगोन पाठविले कीं, तुमचे आमचे करार आहेत, त्यांत श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांस खुशबख्त‡ व रजाबंद राखावे. ते देशास जातांच मृत पावले व वस्तवानी तत्कालच लुटून नेली. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांस पेशजीची बाकी माफ करावी असा करार. त्यास पेशजीं बाकीचा तगादा करून रुपया घेतला. दोस्ती आमची तुमची जाली. आम्हांखेरीज गोवेंकर फिरंगी यांसीं मात्र सिलसिला तुमचा राहावा. त्यांनीं तुम्हांसीं ठेवावा. त्याखेरीज इतर टोपीवाल्यांसीं कोणा एकासीं तुमचा सिलसिला नसावा. असा करार असतां, फरासिसांकडे वकील पुण्याहून गोपाळ बल्लाळ देव नाशिककर पाठविला आहे. तहनामे दिले घेतले त्यापासून सहा महिन्यांत टिपूनें सलूख कबूल केला उत्तम. मुदत ठरल्यावर मग सलुखाची रदबदल त्याची ऐकूं नये. टिपूचें पारपत्यच करावें. या करारावर आम्ही तुमची वाट पाहत असतां, सा महिन्यांची मुदत गुजरली, तरी तुमची फौज बाहेर निघेना. याचें कारण आंतून सिलसिला टिपूचा तुमचा सलुखाचा आहे. सबब दम खाऊन राहिलां. फौज बाहेर काढीत नाहीं असें जालें. लटकें म्हणावें, तर टिपूचें बोलणें, पुण्याचा वकील आनंदराव निंबाजी टिपूजवळ आहे, त्यासीं जालें कीं, इंग्रजांचा आमचा दार मदार सलूख परभारा होतो. परंतु श्रीमंतांचो आमची दोस्ती, बेलभंडार, त्यापक्षीं आम्हांस श्रीमंतांसीं बिघाड करावयाचा नाहीं. फिरून गोष्ट सांगावयाची नाहीं. पेशकशीचा रुपया दुसाला देणें राहिला, तो खर्चाचे पेंचामुळें राहिला. तो सोईसोईनें देईन. बुडवावयाचा नाहीं. श्रीमंतांचें पत्र खातरजमेचें आलें म्हणजे ऐवजही पावता करीन. या

*लागोपाठ, एका पाठीमागून एक. †आवई, जाहिराणा. ‡संतुष्ट.

अन्वयेंच नूरमहमदखान टिपूचा वकील पुण्यांत आहे त्यास पत्र टिपूचें गेलें. त्यानें कारभारी यांस वर्तमान सांगितलें. त्यावरून श्रीमंतांचें पत्र टिपूस खातरजमेचें गेलें. असे मजकूर धाकटा इंद्रसेन येथें आहे त्याजकडून बोलविले. कागदीं पत्रीं लेख येतात, तर दस्तावेज धरावा, तें तर नाहीं. नाहीं म्हणतां बोलतात. असा धरसोडीचा प्रकार दाखविला. त्यांचा प्रश्न जाला त्याचें उत्तरही केलें पाहिजे तें केलें, आणि करीतच आहों. याचा स्पष्टार्थ निश्चयात्मक येईल तोही सांगूं. परंतु हीं कलमें बोलण्यांत आणिलीं, यावरून भाव त्यांचे ध्यानांत आणणें प्राप्त. चाल इमानी बेइमानीची दृष्टीस पडते. यावरून आपले सावधतेस चुकूं नये. सरल वृत्ति म्हणावी तर दिल्लीचें राजकारण आरंभिलें आहे. शाहाजादा दिल्लींतून इंग्रजांनीं काढून नेला. तो गंगापार रामपुरा रोहिलखंडांत आहे, तेथें नेला. तेथून लखनऊस आणणार, असेंही वर्तमान आहे. इष्टिणानें आम्हांस पत्र पाठविलें आहे, त्यांत लिहिलें आहे जे, तहनाम्यांत नववें कलम आहे, त्याप्रमाणें टिपूसीं आम्हीं सलूख केला असें पत्रीं लिहिलें, व तहनामा टिपूसीं ठरला त्याची नक्कलही पाठविली. येथें इंद्रसेन बोलतो कीं, तहनाम्यावर सा महिन्यांची मुदत टळून गेली असतां तुमची फौज पुण्याहून निघेना, तेव्हां आम्हीं लाचार होऊन सलूख केला. तुमची फौज बाहेर निघाली या दाबानें त्यानें आम्हांसीं सलूख केला. आम्हीं लाचार होऊन कबूल केला. अशा बहुरंगाचीं बोलणीं व चाली त्यांच्या दिसतात. बोलणीं अद्यापि स्पष्ट बिघाडाचीं बोलत नाहींत. तेव्हां आपणासही बिघाड असें स्पष्ट बोलणें सलाह नाहीं. चाल तर दिल्लीचे राजकारणास उद्युक्त जाले. जयपूर, मारवाड, मेवाड आदिकरून राजेरजवाडे यांजकडे पत्रें व वकील पाठविले आहेत. चाल खोटी दिसोन येते. वर्तमान कारभारी यांस कळावें, पुढें पैरवी* याची कशी करावी हें वर्तमान लेहून पाठवणें. तेथून सलाह लिहितील त्याप्रमाणें करावयास येईल. बळकटीची जात आण, शपथ, क्रिया, दस्तावेज इतकें करून घेतलेंच आहे. यावर मात्रागमन केल्यास मनांत कोणी कोणाचे शिरत नाहीं. बोलल्याप्रमाणें मुलूख सोडून दिल्हे; किल्ले दिले; कैलासवासी श्रीमंत दादासाहेब हवाला केले. येथवर खरेपणाही दाखविला. आतां असे फंद दिसतात. याची सूचना असावी म्हणून सांगतों, लेहून पाठवणें.

*तजवीज.

त्यावरून विनंती केली असे. सेवकाचे पत्रावर हवाला देऊन बावांनींही पत्र दिलें तें पाठविलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana his discussions with Mahadji about the curious situation arising out of the separate treaty concluded by the English with Tipu and their aggressive activities in Delhi and Rajputana.*

No. 317 23 rd May 1784.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

छ विज्ञापना ऐसीजे :—चंद्र २ जमादिलाखरचीं पत्रें सादर जालीं. पत्राचे लाखोटयावर तारीख चंद्र १२ जमादिलाखरची होती. तीं पत्रें चंद्र ३ रजबीं प्रहर दिवसास येथें पावलीं. त्यांत पत्रें बितपशील :—

२ सेवकाचे नांवें आज्ञापत्रें.
२ होळकराचे साडे दहा लक्षांचे मजकुरांचीं सेवकाचे नांवें.
१ आनंदीबाई निंबाळकर यांचे मजकुराचें सेवकाचे नांवें.
१ त्रिंबकराव नारायण यांचे मजकुराचें सेवकाचे नांवें.

६

१ राजश्री पाटिलबावांचे नांवें.
१ आनंदराव निंबाजी याचें पत्र.
६ मुंबईकर जनरालाचे पत्राच्या नकला पारसी ३, हिंदवी ३.
११ टिपूमियाचे मसलतसंबंधीं पत्रें सेवकाचे नांवें.
८ बावांस दाखवावयाच्या.
३ दाखवावयाच्या नाहींत.

११

१९

२५

एकूण पंचवीस पत्रें पावून बावांचें पत्र प्रविष्ट केलें. सेवकाचे नांवें पत्रें होतीं त्यांपैकीं तीन पत्रें दाखविलीं नाहींत. वरकड

दाखविलीं. आनंदराव निंबाजीचें पत्र व मुंबईकर जनरालाच्या पत्रांच्या नकला दाखविल्या. तात्पर्य, टिपूचा सलूख परभारा जाला हें बावांस कळावें, तर बावांनीं इष्टिणाचे पत्रावरून परभारा सलुखाचें वर्तमान सेवेसीं पेशजी व हल्लीं सेवकाकरवीं विनविलें आहे. पेशजीचीं विनंतिपत्रें पाठविलीं असतील त्यांवरून व हल्लींचे विनंतिपत्रावरून विदित होईल. बावा पत्रें ल्याहावयास सांगतात त्याप्रमाणें लिहितों. तहनाम्याचे समयीं बावांचें म्हणणें राजश्री नारो शिवदेव यांनीं ऐकिलें नाहीं. त्यावरून नारोपंतावर व मजवर बावांची मर्जी नाखूष जाली. हें वर्तमान स्वामींस श्रुत आहेच. इत्थंभूत नारोपंतांनीं विनंती केली असेल, तथींपासोन बावांचा पडदाच चालत होता. बोलण्याचे प्रसंग होत, तेव्हां मजकडून प्रत्युत्तर कांहीं होत असतें नसतें, त्याचा दाखला राजश्री आपाजीराम यांस आहे. तेही बावांचा निरोप घेऊन देशास गेले. राजश्री बाबूराव भास्कर यांसही आज्ञेप्रमाणें घेऊन गेले. दर्शनांतीं माझे उत्तराचा अन्वय विदित करितील, अगर न करीत. हल्लींचे पत्रीं आज्ञा आली कीं, कच्चे पक्के मजकूर तुम्हांस लिहितों, परंतु बावांस दाखवावयाचे दाखवीत जावीं, दाखवावयाचे नसल्यास दाखवूं नये. तुम्हीं सारींच दाखवितां, असें करीत न जाणें. ऐशास पहिलेपासोन धारा आसाच चालत आहे जे, दाखवावयाचें पत्र दाखवावें, न दाखवावयाचें दाखवीत नाहीं. बावांचें म्हणणें होत असतें कीं, तुम्हांस पत्रें येतात तीं अगदींच आम्हांस दाखवीत नाहींत. चित्तास येतात तीं दाखवितां, बाकी दाखवीत नाहींत, ठेवितां, असें म्हणोत, परंतु दाखवावयाचींच दाखवितों. पुढें येखादे समयीं कलम निघोन प्रसंग पडेल असा मजकूर समजतो, ते मजकुराचें पत्र दाखवणें पडतें. बावांनीं जाबसाल एखादा केला, त्याचें उत्तर तेच समयीं इकडून होत असतें. तेव्हां बावा म्हणतात कीं, तुम्हींच येथें उत्तरें करितां. आशय बावांचा कीं, आम्हीं सांगतों तें तुम्हीं लिहीत जावें. उत्तर आणवून मग आम्हांस सांगत जावें. यास्तव सांगतात तें विनंती करीत असतों. न लिहितां तह जाल्याचें दूषणाचें पुढें आणतील, यास्तव लिहीत असतों. त्याचाही संदेह चित्तांत येतो कीं, तहनामे हुजूरचे आणविले ते समयीं स्वामींस पत्रें बावांनीं कसीं लिहिलीं, व नारोपंताकरवीं कसीं लेहून तहनाम्याची यादी व डौल आणवून पुढें प्रसंग कसा केला, आपलें पत्र कसें गुंतलें आहे? हें ज्यांस स्मरण नसेल, अगर स्मरत असतां विसरत असतील, तर मजकडून विनंतिपत्रें लेहवितात याचें तरी स्मरण धरतील कीं विसरतील? तर यांत माझी स्थीत कसी राहील असें चित्तांत येतें.

स्पष्ट बोलणें ठीक नाहीं जाणून लिहीत असतों. येविसीं आज्ञा जसी येईल तसें वर्तन होत जाईल. सेवक सावधपणें म्हणतही असतो कीं, मी लिहितों. पत्र आपलेंही असावें. तें बावांचेही चित्तास येऊन पत्र देवितात तर घेऊन पाठवितों. न दिल्यास हाटकतां येत नाहीं. येविसीं आज्ञा सादर होईल ते प्रमाण. मर्जी-प्रमाणें बोलल्यास बावांस गोड वाटतें. मर्जीखेरीज बोलल्यास बेमर्जी होत असते. तर सेवकास स्वामींची मर्जी प्रधान. इतरांचे मर्जीसीं गरज नाहीं. जाबसालाचा प्रसंग आल्यास बोलायाचा आजमासही नाहीं. परिछिन्न उत्तरही करितों. झांशीचे हिसेरसिदीचे प्रसंगीं येथें बोलणीं पडलीं, ते समयीं व आतांही बोलणीं पडतात. संस्थान सरकारचें जाणून निर्भीडपणेंही बोलावयास अंतर होत नाहीं. पुरवणी झांशीकराकडून न जाल्यास शद्बही लागतो. पुन्हां प्रसंग पडल्यास युक्ति-प्रयुक्तीनें जाबसालास अंतर करावयाचें नाहीं. ऐकोत वा न ऐकोत. ऐकतही आहेत व नाहींही ऐकत, दोन्ही होतात. सेवाधर्मास न चुकावें हा निश्चय. सेवकाचा धर्म व क्रिया स्वामींचे पाय साक्षी. ही स्वामीचरणींच असो. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. हल्लींचे पत्राचे उत्तराविसीं हटकिलें आहे. सेवकाचे नांवाचीं पत्रें बावांस दाखविलीं. त्यांतील मालुमाती जमा धरावयास तीं पत्रें राजश्री आबा चिटणीस यांनीं मागून घेतलीं. दिल्हीं. जाब तयार जाले म्हणजे रवाना होतील. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana mentioning pointedly some of the difficulties in his intercourse with Mahadji and protests that he never neglected his master's interests.*

No. 318 25th May 1784.

पैवस्ती छ २ साबान सन खंमस समानीन.
आषाढमास, बराबर डांक.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष.—पातशाहास खर्चाची अडचण, इंग्रज पैका कबूल करून आपले लगामीं लावून घेणार. इंग्रजांचें राजकारण पातशाहासीं जाहल्यास चांगलें नाहीं व पुढें पेंच फार आहेत. याकरितां पातशाहाचें राजकारण इंग्रजांचे

हातीं न जाय असा बंदोबस्त करावा म्हणोन पूर्वी आपणांकडून दोन तीन पत्रें आलीं. त्यास नजफखान मेल्यापासून पातशाहींत बखेडा होऊन बहुनायकी जाहली. पातशाहास खर्चास मिळेना. यामुळें पातशाहानें इंग्रजांकडे राजकारण लाविलें कीं दरमहा आम्हांस खर्चास ऐवज देऊन तुम्हीं सर्व बंदोबस्त करावा. त्यावरून इंग्रजांचा व पातशाहाचा सिलसिला राजकारणाचा चाललाच होता. पातशाहाचा कारभार रुक्ष, शीखांचा दंगा विशेषच. सरदार आहेत ते एकांत एक नाहींत. असा प्रकार असतां दिल्लीचें राजकारण आपले हातीं राहावें याकरितां पूर्वी पातशाहाजादा व मीर्जा सफीस भेटून खातरजमा केली होती. परंतु मीर्जा सफी मारला गेला, तत्रापि पातशाहासीं राजकारणाचें संधान इकडून चाललेंच होतें. पातशाहाकडून इंग्रजांकडे सिलसिला चालला, ते पर्याय मोडून पातशाहाकडील राजकारण आपले लक्षांत आणावें या गोष्टीस पैक्याची तरतूद पाहिजे, येविसीं पूर्वी आपणास लिहिलेंच आहे. इकडील सिलसिल्यामुळें पातशाहाचे कागदपत्र इकडे येतात. तिकडे इंग्रजांसींही सिलसिला होताच. इंग्रजांस पातशाहाचा कारभार दुलग दिसोन आला. यामुळें इंग्रजांनीं पातशाहास न कळतां पातशाहाजादा यासीं संधान केलें. त्यावरून पातशाहाजादा दिल्लीहून रात्रीं निघोन लखनौस इष्टिण आहे त्याजपासीं गेला. त्यांणीं त्याची मुदारत* बहुत तऱ्हेनें करून आपल्याजवळ ठेऊन घेतला. वजिराकडून पातशाहाजादा याचे खर्चाबद्दल कडा, कुरा व प्रयाग हे महाल लावून घेऊन पातशाहाजाद्यास खर्चास इंग्रज देतात. पातशाहाजादा इंग्रजांपासीं गेला येणेंकरून पातशाहास पेंच व आपल्यासही ठीक नाहीं. पातशाहानीं आग्ऱ्यास यावें, आम्हीं इकडून जावें हें संधान होतेंच. त्यास, हल्लीं पातशाहाचा शुका व अबदुल हयातखान व अफराशाबखान यांचीं पत्रें आलीं कीं, आम्हीं आग्ऱ्यास येतों, तुम्हींही आग्ऱ्यास यावें. पातशाहा सुद्धां दिल्लीचें मंडळ सारें आग्ऱ्यास येणार. तेव्हां तेथें जाऊन त्यांचे मनोदयाप्रमाणें बंदोबस्त होऊन आपले हातीं राजकारण राखलें पाहिजे. पातशाहास खर्चास दरमहाचा दरमहा अविछिन्न पावला पाहिजे, व तेथील सरदारांची सरबरा करून लक्षांत लावून घेऊन पातशाहाचे मर्जीप्रमाणें सीख वगैरे बंदोबस्त होऊन आला पाहिजे. या गोष्टीस पैक्याची अनुकूलता असावी. आम्हांकडील प्रकार आपणांस लेहून समजावावा असा अर्थ राहिला नाहीं. देशीहून निघाल्यापासून पांच वर्षें जालीं, मसलतीवरी मसलती पडत गेल्या. आजपर्यंत मोहिमेवरीच आहें. यामुळें वोढीचा

*आदर-सत्कार.

प्रकार जाहला तो लिहितां पुरवत नाहीं. दुसरीकडे राजकारण जाऊं न देतां बंदोबस्त करावयास पैका पाहिजे. येविषयींची तरतूद सरकारांतून होऊन आल्यास सरकारचाकरीस अंतर व्हावयाचें नाहीं. सरकारांतून या गोष्टीची उपेक्षा जाल्यास आम्हांस शक्त राहिली नाहीं. तेव्हां पातशाहाचे मर्जीप्रमाणें बंदोबस्त होऊन आपले हातीं राजकारण रहाणें कळतच आहे ! पातशाहा आग्र्यास आल्यावरी इकडून बंदोबस्ताचा प्रकार वोढीचे लाचारीमुळें न घडल्यास पातशाहाजादा इंग्रजांनीं नेऊन बगलेंत ठेविला, तेव्हां पातशाहास कळेल तसा आपला बचाव करून जिकडून बंदोबस्त होईल तिकडून करणें प्राप्त. पातशाहाचें राजकारण आपले हातीं रहावें याचें साधन करतां करतां हल्लीं नमुदावरी* गोष्ट आली. पातशाहाची भेट होऊन बंदोबस्ताची तरतूद होऊं लागली म्हणजे पातशाहाजादा इंग्रजांनीं नेला ते गोष्ट माजी पडेल. पातशाहा व आम्ही एक जाल्यावरी इंग्रज पातशाहाजाद्यास पाठवून देतात किंवा काय विचार करतात तो समजेल. पातशाहा आपले हातीं असल्यास चिंता नाहीं. पैक्याची तरतूद होऊन आल्यास सर्व गोष्टी घडतील. याची पैरवी होऊन उत्तर सत्वर यावें. येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांस सांगितलें आहे. लिहितील त्यावरून कळेल. रवाना चंद्र ५ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana Fadnis of his overtures to the Emperor to counteract the designs of the English at Delhi, following the advices of the Poona Darbar to that effect, and begs financial support from Poona as his own resources were inadequate for such a daring plan.*

No. 319 27 th May 1784.

पैवस्ती चंद्र २ साबान सन खमस समानीन आषाढ मास, बराबर डांक.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ७ रजब मुक्काम नजीक गोहद स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—राजश्री पाटिलबावा यांनीं सेवेसीं विनंतिपत्रें लेहावयास सांगितल्यावरून पुरवण्या निरनिराळ्या विनविल्या आहेत.

---

*जाहिरातींत.

त्यांवरून इंग्रज व दिल्लीच्या मनसब्याचे अर्थ साकल्य विदित होतील. उत्तरें जलद सादर व्हावीं, बावांचें म्हणणें आहे. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. स्वारी नवाबाचे भेटीस गेली* तें वर्तमान बावांचे पत्रीं लेख आला होता. सांप्रतचे पत्रीं वर्तमान नवाबाचे भेटीचें कांहीं आलें नाहीं. स्वामींचे मुक्काम कोठें आहेत, नवाब कोठें आले, भेटी कोठें कधीं होणार, हें कळत जावें. राजश्री आनंदराव निंबाजी यांचे पत्रीं टिपूचें बोलणें लिहिलें होतें कीं, श्रीमंतांचा आमचा स्नेह चालावा. यावरून बावांनीं समाधान मानून बोलले कीं, नवाबाचे भेटीचा उद्योग केला, मोठी गोष्ट केली. टिपूचाही आशय स्नेहाचा आलाच आहे. हेंही सूत्र बळकट जाल्यास चांगलें आहे. इंग्रजांनीं काबू† केली कळली. आपणही सावधतेस चुकूं नये, उचित आहे. साधन जाल्यास करणें सलाह आहे. वर्तमान वरचेवर कळत जावें, असें बावा बोलले. वर्तमान विदित व्हावें याकरितां विनंती केली असे. हल्लींचीं पत्रें चंद्र २ जमादिलाखरचीं सादर जालीं. त्यांचे लाखोटचावर दस्तूर गैरवळणी व लाखोटाही पोकळ होता, यावरून दरम्यान फुटला असेल असा संदेह जाला. याकरितां लाखोटचाचा कागद पाठविला आहे. दस्तूर अवलोकनांत येईल. थेटचेंच असल्यास उत्तम. नाहीं तर चौकशी आज्ञा जाली पाहिजे. येथून उज्जनीस राजश्री नारोपंत कारकून निसबत डांक यास येविसीं निषेध लिहिला आहे, त्याचें दस्तूर नव्हे. कोठें कर्म जालें असेल न कळे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji through Sadashiv Dinkar asks information about what passed between Nana and the Nizam in their visit, and advises Nana to secure the friendship of the Nizam and Tipu, if possible, as a counterpoise to the growing power of the English.*

No. 320 About May 1784.

श्री

(लेखक सदाशिव दिनकर.)

विज्ञापना ऐसीजे:—दर बैठकेस राजश्री त्रिंबकराव नारायण राजे बहादर यांचा मजकूर निघतो. प्रथम वर्तमान आलें कीं, त्रिंबकराव यांस पुत्रासहित

---

*नाना फडणीस व निजाम यांची भेट यादगीर येथें १६ मे १७८४ रोजीं झाली त्याचा हा उल्लेख आहे. †संधि साधली.

कैद करून सरदारी राजश्री रघुपतराव यांस सांगितली. ते दिवशीं राजश्री पाटिलबावांनीं सेवकास चोपदारामागें चोपदार चार पाठऊन बोलाऊन नेऊन मनस्वी भाषण केलें. वर्ण बोलिले तित्तके चंद्र ११ रबिलाखरचे* पत्रीं विनविले आहेत. तेंच दर बैठकीस निघतें कीं, माझे विद्यमानचें काम तें आम्हांस कळूं न देतां, यांची सरदारी काढून रघुपतरायास दिली; तर इतक्यावर आम्हांस कोणेही कामांत यावयाचें नाहीं. साहेबांची आण आहे. इंद्रसेनास निरोप देतों. रामजी पाटलास बोलाऊन घेतों. एके दिवशीं सहन होवलें नाहीं, तेव्हां बोललों कीं, हें बोलणें प्रथम जालें तें लेहून पाठविलें आहे. त्याचें उत्तर येईल त्यांत सर्व समजेल. वारंवार आम्ही कोणेही कामांत येत नाहीं, इंद्रसेनास निरोप देतों असे वर्ण साहेबांचे †आणेपावेतों निरंतर निघत असतात. युक्त काय? आपले विद्यमानचें काम असतां आपणास लिहिलें नाहीं म्हणतात, तर बारीक मोठें वर्तमान कच्चें आपणास कळावयाकरितां आपणास पत्रें येत असतात अथवा मजला पत्रीं आज्ञा येते. हें वर्तमान पत्रीं लेख कां येत नाहीं? कळलें असेल तें काय कळवावयाचें असें असेल, किंवा आणखी कांहीं तरी निमित्त मातबर असेल तर ही गोष्ट घडली. एरवीं सहसा हें न होतें. श्रीमंत आधीं हें करणारच नाहींत. केलें असेल तर आपलेकडे न ये असें करून केलें असेल. पत्राचे उत्तरापावेतों गूढ आहे. उत्तरही येईल. उत्तर कां येत नाहीं म्हणों लागले. म्हटलें ज, ही गोष्ट होऊन गेली यावरून आपली मर्जी फार नाखूष जाली. राज्याचा भार आपणावर असतां स्पष्ट वर्ण निघाले कीं, कोणेही कामांत येत नाहीं इंद्रसेन यास निरोप देतों, यावरून तेथें विचार पडला असेल कीं, जालें कृत्य कसें फिरवावें, विचारूनही पाहावें. दरबारचे कारभार फिरूं लागल्यास ठीक आहे कीं लौकिकांत बरें दिसेल. अशी तऱ्हा जाली असेल म्हणून विलंब लागला आहे. शेवटीं काय निमित्त केलें हेंही लेहून पाठवितील. सर्व होईल. आपण वारंवार उच्चार शपथेपावेतों करणें, हें तरी कसें तें विचारावें. इंद्रसेनास निरोप देणें व पुढें कोणतेही कामांत न येणें. शपथपूर्वक तर हा विधि कीं निषेध? आपल्यावर दौलतीचा भार. कृत्येंही मोठीं मोठींच केलीं. लौकिक सूर्यासारखा जाला. त्याच लौकिकांत देहाचा शेवट न होतां दरम्यानच सारें सोडिल्यास करावें तरी काय? राहावें बसावें कोठें? करावें काय? हे दौलतीचे पसारे कसे चालतील? सारेंच सोडिलें तेथें दौलतेचे बखेडे कशास ठेवावे म्हटलें तर एकट्यास निश्चित

*Dated 1784, No. 288. †वडिलांच्या शपथा घेण्यापावेतों.

बसूं कोण देतो ? बसणें जालें तर मन उगेंच बसत नाहीं, कल्पना करीत असतें. इंद्रियद्वारा कांहीं व्यवसायाच्या क्रिया करवीत असतें. निचेष्टित बसूं देत नाहीं. क्रियाकर्म करावयास लावीत असतें. यास उपाय काय ? कारभार व्यष्टि-समष्ट्यान्वयें कीं कल्पना करणें आपणाकडे, सिद्धीस नेणें न नेणें ईश्वराकडे, असें चालतच आहे. आपण एका त्रिंबकरायावरून सर्व उपेक्षा धरून राजाप्रजा-सहित व्यथेंत पडल्याचें श्रेय घेणें, खावंदांचीं कामें नासतील तिकडे न पाहणें, याचें फल काय येणार आहे ? इतकें कांहीं करूं नये. दिल्लीचा मनसबा, इंग्रजां-कडील बंदोबस्त करणें, तो करावा. त्रिंबकराव नारायणाचे मजकुराचें पत्र गेलेंच आहे. उत्तरही येईल. असें बहुता प्रकारें बोललों आहे. बरें म्हटलें. उचित दिसेल तें करितील. सरदारी त्रिंबकरायाकडे द्यावी तरीच आमचें स्वरूप राहील व कामें स्वच्छ चित्तें करावयास प्रशस्त वाटेल असें बोलतात. वर्तमान विदित व्हावें म्हणोन विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji appeared greatly excited over his protege Trimbak Rao having been dispossessed of his Jagir and offered to retire from politics. To this Sadashiv Dinkar made a spirited reply which contained sound reasoning.*

No. 321 May 1784.

(पत्रलेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—इंग्रजांनीं राजश्री पाटिलबावांसीं लबाडी व बेइमानी केली खरी. परभारा सलूख टिपूसीं करणार नाहीं असें यांसीं बोलत गेले. त्यावरून बावा स्वामींस पक्की खातरजमा करून वारंवार पत्रें पाठवीत गेले. इंद्रसेन इमानी, लटकें बोलत नाहीं, असें समजून लिहीत गेले. कंपू पाठ-वावयाचा वाइदा केला असतां न पाठविला, आणि टिपूचा सलूख परभारां केला, तो मजकूर इष्टिणानें पत्रीं बावांस लिहिला; व तहनामा टिपूचा ठरला त्याची नक्कल पाठविली. स्वामींसही मुंबईकरांनीं लेहून पाठविलें. तें बावांनीं प्रमाण न मानावें, तर इष्टिणानेंच बावांस पत्रांत स्पष्ट लेहून पाठविलें. त्यावरून बावांनीं मजला आज्ञा केली, इंग्रज इमानी म्हणत होतों, यांचे खातरजमेवरून आम्ही सरकारांत परभारां सलूख होणार नाहीं असें लिहीत गेलों. शेवटीं टिपूशीं परभारां सलूख करून आम्हांस पत्रीं देखील लेहून पाठविलें. आतां बादशाही मनसब्यांत शिरले. तेव्हां बेइमानी मात्रागमनी खरे. इमानाची बळकटी, आण शफत, लेख

यापुढें बळकटीची जात नाहीं. त्याप्रमाणें इष्टिणाचें पत्र आम्हांजवळ आहे कीं, तुम्हांसीं बेइमानी करीन तर इंग्रजांचे वीर्याचा नव्हे. कौमाचा* नसेन. असें असतां मात्रागमन करूं लागल्यास यांची बळकटी काय करून घ्यावी? असें वर्तमान बावांनीं सांगोन विनंतिपत्रें सेवकाकडून रवाना करविलीं, तीं केलीं. बावांस संकोच फार जाला आहे जे, आम्ही इंद्रसेन व इष्टिणाचे प्रामाणिकतेचे खातरजमेचे भरंवशावर लिहीत गेलों. त्यानीं मात्रागमन केलें. आम्हांस कलंक लाविला. ही तर गोष्ट जाली ते कुबुद्धीनें जाली नाहीं. मनसबा चुकत असल्यास सर्वत्र एकोप्यानें संभाळून नेत असतात. राज्याचा मनसबा एकटचाच्यानें होत नसतो. एकटचाच्यानें जाल्यास आम्हीं हिंमत सोडिली नाहीं. यावत्प्राण स्वामिसेवेस अंतर करावयाचें नाहीं. याचा साक्ष देव आहे. कृत्रिम म्हणत असल्यास फलही होईल. वलयांकित पृथ्वीचें राज्य, यास सारें एक मत असल्यासच कामें साधतील. आपआपले दोष उघड जाले ते झांकून आतां तमाशबीन† होऊं लागतील, तर धन्याचे सलामतीवरच‡ साऱ्यांचें कल्याण, असें समजून निरनिराळीं मतें करूं लागल्यास फलही पुढें. आम्हीं निष्कपट व निष्ठा राखीत असलों तर धन्याचा प्रतापच यश देईल. वोढ जाली, पैका जवळ नाहीं, इतकी कमती पडली. जातीनें आज पांच वर्षें मसलतीवर मसलती करीत असतांही मेहनत करावयास नाहीं म्हणावयाचें नाहीं. असें बावांचें म्हणणें विदित व्हावयाकरितां विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports how very greatly Mahadji had been disillusioned by the English going back upon their word and acting in a manner destructive of the spirit of the late treaty. The real cause of Mahadji's disillusionment appears to be not their independent settlement with Tipu, but their interference with imperial affairs, which Mahadji regarded as his own sphere of influence.*

No. 322 May **1784.**

(पत्रलेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांची स्त्री, पलवेकर पाटिलांची कन्या, गरोदर आहे. पांच साहा महिने जाले. ऐकतों. यास्तव साऱ्याच बायका

*कोम=विवाहित स्त्री. †तमाशा पाहणारे. ‡सामर्थ्यावर.

उज्जनीस वाटे लावाव्या. बादशाही मनसबा लांबच लांब आगऱ्यास येऊं म्हणतात. पेषखान* निघावयास एक मास पाहिजे. बाहेर निघाल्यावर आगऱ्यास यावयास दिवस पाहिजेत. लौकर निघाले तर ज्येष्ठ शुद्धांत. नाहीं तर वद्यांत निघाले तर आगऱ्यास पोंहचतील कधीं? मृग लागल्यावर चमेल वाढेल. उतरावयाचें संकट. येथें लष्करांत चहूंकडून वेपारी रसद आणितात, तर दहा बारा शेरांची धारण गल्लयाची आहे. चारा मिळतच नाहीं. चमेलपार तीन वर्षांचे अवर्षणामुळें मुलूख वैरान जाला. मातबर मातबर शहरें कृताकृत† वसत्या आहेत. दाणा, चारा, पाणी कसें मिळेल? चमेलपार गेल्यास पर्जन्य कालांत पुन्हां चमेल उतरणें होत नाहीं. महागाई अतिशय. जवळ रुपया नाहीं. आपण हिंमत धरून उतरलों. दाणा, वैरण, लांकूड मिळणें कठिण. आधींच ती चौ वर्षांची मोहीम, यांत फौज गळालीच आहे. दाणा, चारा न मिळाल्यास पुढें गति काय हें तर उघडच दिसतें. पुढें मनसबा काय होईल कळत नाहीं. याच मोहिमेमध्यें लोकांस पोटास नाहीं. वस्त्रें लोकांनीं विकायापावेतों गती जाल्या आहेत. पैका मागण्याची निकड करितील तें भासतें. कधीं धरणें लोकांचें बसलें, गवगवा जाला, हें दृष्टीस आलें नवतें. एक रोज याच मुक्कामीं हेंही पाहिलें. बादशाही मनसबा तर मोठा. कसा विचार करितील न कळे. संस्थान करोलींत कांहीं घासदाणा घेतीलसें वाटतें. नरवर संस्थान फार करून आटपलेंच आहे. राजाकडे पन्नास हजार रुपये वसूल असेल कीं नसेल. यापैकीं पोहरी तालुका आहे तो घ्यावयाची आज्ञा सरकारची आहे. राजश्री अंबूजी इंगळे फौज सुद्धां गेले. पोहरीस मोर्चे लाविले आहेत. पोहरी सुटली मग शाहाबाद घ्यावयाची आहे. पुढें होईल वर्तमान तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that Mahadji had been wo rried over the difficulties of finding resources to meet the current demands of his army in his forward move.*

No. 323 May 1784.

(पत्रलेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—बाहेर बाहेर वर्तमान ऐकतों जे, अफरासियाबखान वाण्याचा पोर, नजफखानानें धरून आणिला, मुसलमान करून चेला केला.

---

*प्रवासाचें सामान. †जितक्यास तितकी.

हिंमत व जुरतीचा* माणूस नाहीं. इंग्रजांचा सिलसिला राखितो. उपबल† त्यास हिंमतबहाद्दर अनुपगीर गोसावी याचें आहे. त्याचे नेटावर मनसबे होतात. जातीचा खमीर कच्चा ऐकतों. इंग्रजी पलटणें पथरगडाकडे होतीं तीं दिल्लीस आलीं म्हणतात. या बाजारी गप्पा ऐकिल्या. त्या गप्पाच निवडतात कीं प्रत्ययास येईल पाहावें. बादशाहा अफरासियाबखानासीं राजी नाहीं. मुखदाक्षिण्यास्तव इकडे अफरासियाबखानाकडे बोलतो. अंतःकरण इंग्रजांकडे आहे असेंही ऐकण्यांत येतें. परंतु जर बादशाहाची बावांची भेटी जाली, तर पर्जन्यकालांत चमेल भरल्यावर पुन्हां उतरून इकडे येणें होतच नाहीं. छावणी प्राप्तच जाली. हे छावणीस राहिल्यासच इंग्रजांचें अनुसंधान तुटलें तर तुटेल. छावणीची हिंमत यांची, तर फौज सबल व खर्चास रुपया दोन असावीं, ते दोन्ही नाहींत हें प्रसिद्ध आहे. आतांच पागाच्या चंदीची खडखड पडते. मोद्यास‡ पैका मिळत नाहीं. दशा राजश्री नारोपंत नानांनींच विदित केली असेल, त्या पेक्षां आतां जास्त आहे. वर्तमान कच्चें श्रवण व्हावें. बाहेर आवाच्या गोष्टी सांगितल्या त्या सांगोत, आंतील वर्तमान या प्रकारचें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar given the origiu of Afrasiab Khan and describes the difficulties of Mahadji.*

No. 324 3rd June 1784.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १४ माहे रजबपावेतों मुक्काम उज्जन येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींची आज्ञा देशीं येण्याविषयीं आली, तेव्हां राजश्री पाटिलबावांचा निरोप जेष्ठ वद्य ७ सप्तमीस घेऊन अवंतिकेस येऊन दाखल जाहलों. पुढें राजश्री पाटिलबावांनीं महेश्वरास जाऊन मातुश्री अहल्याबाईची भेट घ्यावी आणि पुढें जावें म्हणून सांगितलें. त्याजवरून बाईची भेट घेऊन दरकूच सेवेसीं येऊन पोंहचतों. यानंतर इकडील दरबारीं वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांनीं गोहद घेतल्यानंतर छावणीस उज्जनीस यावें हा मजकूर होता. त्यास कलकत्त्याहून इष्टिण लखनौस येऊन दाखल जाहला, याजमुळें

*हिंमतीचा. †साह्य. ‡मोदी=वाणी.

गोहदेनजीकच राहणें प्राप्त जाहलें. त्यास हल्लीं राजश्री सदाशिव मल्हार यांची रवानगी इष्टिणाकडे जाहली आहे. त्यांचें बोलणें होऊन मशारनिल्हेचीं पत्रें राजश्री पाटिलबावांस आलीं म्हणजे छावणीचा किंवा उज्जनीस येण्याचा निश्चय काय ठरणें तो ठरेल. याप्रमाणें आमच्या समक्ष वर्तमान जाहलें, तें सेवेसीं लिहिलें असे. वरकड मजकूर कित्येक बोलावयासीं येथून सांगितले आहेत, ते समक्ष निवेदन करूं. राजश्री बाबूराव भास्कर यांजला देशीं येण्याविषयीं स्वामींचीं पत्रें आलीं व सेवकासही पत्र मशारनिल्हेचें रवानगी देशीं करण्याविषयीं आलें, त्यावरून राजश्री पाटिलबावांस मशारनिल्हेनीं स्वामींचें पत्र दाखवून आम्हां-बराबरच स्वार होऊन आले. मशारनिल्हेस येथें लोकांचें देणें बहुत होतें, परंतु स्वामींचे पत्राचे अन्वयें झाडून कर्जदारांस निक्षून ताकीद करवून, मुक्काम मजकूर समागमें पावेतों घेऊन आलों. रावजी लष्करांत तीन महिनेपर्यंत होते. पेशजी सरकारच्या सनदा झांशी सुभ्याच्या आल्या, त्या समयीं लोकांचें कर्ज घेतलें त्याज-पैकीं व हल्लीं लष्करचें देणें त्याची व्यवस्था कार्याकारण करून, ज्याची निकड बहुतच होती आणि विषयही थोडा असें होतें, त्याचा फडशा करून दिला. येविषयीं चिरंजीव राजश्री व्यंकटराव यांनीं दोन हजार रुपयांची आम्हावर हुंडी केली.तेव्हां आम्ही त्या गोष्टीचा आक्षेप धरला. मागतीं चिरंजिवाचीं दुसरीं दोन पत्रें आलीं कीं राजश्री बाबूराव भास्कर यांजला श्रीमंतांनीं दोन हजार रुपये देऊन आम्हास आज्ञा केली कीं, तुम्ही लश्करांत ऐवज मशारनिल्हेस कार्याकारण लागेल तो देऊन त्याची रवानगी देशीं सत्वर होय तें करावें. त्याजवरून येथें स्वामींचे आज्ञेप्रमाणें चिरंजिवाचें पत्र आलें. तेव्हां मशारनिल्हे देशीं येतात असा करार करून घेऊन, दोन हजार रुपये देऊन लोकांचें देणें कार्याकारण होतें त्याचा फडशा करून, समागमें मशारनिल्हे घेऊन मुक्काम मजकूर पावेतों आलों. आणखी दोनशें रुपये वाटेनें खर्चावयासी लागतील, तेहि देणें प्राप्त जाहलें. वरकड मशारनिल्हेचें कच्चें पक्कें वर्तमान सविस्तर भेटी अंतीं श्रुत करीन. सारांश, बाबूरावजी झांशीच्या प्रकर्णीं बहुत पेचांत आले आहेत. त्याचा विस्तार पत्रीं कोठवर त्याहावा ? भेटी नंतर सविस्तर निवेदन करीन. येविषयीं मशारनिल्हेनींही सेवेसीं आलाहिदा पत्रें लिहिलीं आहेत, त्याजवरून सर्व अर्थ समजण्यांत येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram informs Nana of his having left Sindia's camp to return to Poona accompanied by Baburao Bhaskar (Mehendale?).*

No. 325 25th June 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांनीं सांगितल्याप्रमाणें पत्रें सिद्ध करून चंद्र ५ रजबीं नेऊन बावांस वाचून दाखविलीं. ऐकून घेऊन रवाना करणें म्हणोन सांगितलें. बसलोंच आहों तों दिल्लीकरांचीं पत्रें आलीं पारसी, तीं मीर्जा रहीमबेगांनीं वाचून दाखविलीं. मजकूर लिहिला होता कीं, चंद्र १ रजबीं बादशाहा डेरेदाखल जाले, व चंद्र ५ चे रोजीं कूच आहे. आगऱ्यास येतात. आपण लौकर येऊन मुलाजमत करावी अशी आज्ञा आहे. हीं पत्रें ऐकून मजला पुसूं लागले कीं, पुढें विचार कसा करावा ? मीं उत्तर केलें कीं, आपण मनसबा करून पत्रें लेहविलीं, मीं लिहिलीं. आतांच आपण पाहिलीं. त्यांत स्पष्टच लिहिलें आहे जे, बादशाहाचे भेटीस जावें हा ठराव जालाच आहे. गेलेंच पाहिजे. तेव्हां बोलले कीं, भेटीस तर जातों. भेट घेऊन, एक वर्ष त्यांजवळ राहून, बंदोबस्त केला पाहिजे. यास पैका पाहिजे, तो आम्हांजवळ नाहीं. सरकारांतून मदत जाली तरीच आमचें टिकणें होईल; नाहीं तर टिकाव होणार नाहीं. मी म्हटलें, यावें उत्तर मला होत नाहीं. आपणास कांहीं लोपलें नाहीं. आपलें घर समजलें आहे, तसें धन्याचेंही घर समजलेंच आहे. देशीं गेल्यावर सर्व बंदोबस्त आपणच केला, त्यावरून पुढील अर्थ ध्यानांत आहेत. मसलतीचे प्रकार साधले नासले, हल्लीं फौजबंदी होऊन राजश्री हरिपंततात्या आपले निकडीनें निघोन श्रीपंढरपुरापुढें गेले. त्यांस खर्च काय जाला असेल ? टिपूचा सलूख परभारा जाला, कंपू शामील न जाले, तेव्हां मोहीम कशी होते ? हे सर्व अर्थ आपले ध्यानांत आहेत. हीं पत्रेंही जाऊन जाब आपले व माझे पत्रांचे येतील. आपल्यासीं प्रतरणा कोणेही प्रकारें नाहीं. तेव्हां म्हणों लागले कीं, इष्टीण इंग्रज व बादशाही मनसब्याचे आम्हीं सांगितल्यावरून तुम्हीं पत्रें लिहिलीं आहेत. याचा दाखला परभारा तुम्हांस आहे कीं नाहीं ? आम्हीं मनसबे सांगितल्यावर विश्वास येईल कीं नाहीं ? याकरितां एक पुरवणी निराळी तुम्हीं आपली लिहिणें. त्यावरून विश्वास येईल. याचें उत्तर मीं केलें कीं, दोन्ही मनसब्यांचे मजकूर आपण सांगितले ते प्रसिद्ध जाले आहेत. अन्यथा नाहींत. यथार्थच आहेत. आज्ञेप्रमाणें निराळी पुरवणी लिहितों. आमचे सांगितल्यावर विश्वास येणार नाहीं हा विकल्प चित्तांत येतो, याचें आश्चर्य आहे. कारणें ध्यानास येत नाहींत. येथील पत्रांचीं

उत्तरें येतात तीं श्रवणीं पडतात, ते समयीं आपणास विषाद येत असतो. तर जसजशीं पत्रें आपलीं जातात तशी वर्तणूक तेथें होत असतां वारंवार विकल्प चित्तांत येतात. कोणी लिहितात किंवा सांगतात त्याचा शोध न होतां, हरएक मतलब नवाच लिहिला जातो. तो तेथें ठाऊक नसतां अश्रुत नवाच दृष्टीस पडल्यावरून तेथें संदेह होतो. त्याचा परिहार तर लिहिला पाहिजे. परिहार लिहितां बाधक अर्थ आपणास भासतात, ते तेथील प्रश्नाचें उत्तर लिहून पाठवितात. परिहार न लिहावा तर वाईट. लिहितां वास्तविक असेल तें लिहितात. त्यावरून विषम वाटत असेल, तर जनरीत आहे जे, जेथें ऐक्यता आहे तेथें किकल्प वाढवून परस्परें विरोध पाडून नाश करावे. यास्तव कदाचित् मनांत संकल्प उठला, त्याचा विचार आधीं आपलेच मनांत करून मोडावा. मोडायाची तोड न लागे, तर बाहेर बोलावा. मग इतरांचें सांगितलें प्रमाण मानून, दूषणें लिहून पाठवावीं. त्याचीं उत्तरें तशींच येतील, त्याचें विषमही मानूं नये. तिकडून विकल्प लिहिण्यांत येत नाहीं. मसलत अधिक उणी दृष्टीस आल्यास सलाह लिहीत असतात. छद्मबुद्धीनें लिहीत नाहींत. येथून लिहिलें गेल्याचें उत्तर तर लिहिलें पाहिजे. त्याचा विषाद येतो. थोरले राज्याच्या भानगडी, त्यांत असे विकल्प शिरले तर हेच नाशास मूळ आहेत. ज्या दौलतेंत विकल्प परस्परें जाले, तेथें नाशच दृष्टीस पडले आहेत. विकल्प ज्यांनीं तोडिले तेच सुख पावून नांदले आहेत व लौकिकांतही कीर्ती जाल्या आहेत. असे तपशील फार बोलण्यांत आले. तेव्हां म्हणों लागले जे, ह्या गोष्टी वरचेवर होत नाहींत. स्वच्छ बोलणें जालें पाहिजे. तुम्ही आम्हीच बसोन बोलूं. पुरवणी आपली खासगत आम्ही सांगोन लेहविलें, हें प्रमाण कीं अप्रमाण या अर्थें लिहून पाठवणें. त्यावरून बादशाही मनसबा व इंग्रजांचा मजकूर बावांनीं लेहविला, तो लष्करभर प्रसिद्ध जाला आहे. गुप्त राहिला नाहीं. परस्परेंही श्रवणास येतच आहे. टिपूचा सलूख परभारा केला. दाखला स्वामीजवळ आला. येथें इष्टिणानें बावांस पत्रीं लेहून पाठविला. तहनाम्याची नक्कल पाठविली. यापरती प्रसिद्धि कोणती ? बादशाही मनसबाही उघडाच जाला आहे, परंतु बावांचे मर्जीकरितां पुरवणी निराळी विनविली आहे. त्याचें उत्तर बावांस दाखवावें लागेल. यास्तव बावांस विकल्प सदृश न होय अशीच आज्ञा जाली पाहिजे. बोलणें बावांचें एकांतीं जाल्यास विनंती करीन. या पुरवणीचें उत्तर दाखवायाचें नाहीं. यांत आज्ञा होणें ते सादर व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. या बोलण्याचे समयीं राजश्री माधवराव गंगाधर

होते. याउपरही एकांतीं बोलणें होईल. त्यांचेच हातून या बोलण्याचा सिलसिला बावांनीं चालविला आहे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Poona an important discussion he had with Mahadji in which the writer tried successfully to clear up the various points of doubt and suspicion that had arisen in the latter's mind, and to assure him that the Poona Darbar was most sympathetic towards him and his schemes.*

No. 326 June 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांनीं आज्ञा केली कीं, इंग्रजांनीं कलमें श्रीमंत दादासाहेबांचे व गायकवाड व फरासिसांकडे वकील पाठविले, टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें, अशीं कलमें बोलण्यांत आणिलीं; पैकीं गायकवाडाचें कलम आम्हींही त्याची तन्हा रुपया मागावयाची पेशजीं लेहून पाठविलें. काल तुम्हांकडूनही लेहविलें आहे. फरासिसांकडे वकील पाठविला व टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें, हें प्रमाण कशावरून म्हणावें? भेदबुद्धीनेंही म्हणतील, चुकणार नाहींत. मसलतीच्या वाटेनें पाहतां इंग्रजांची चाल खोटी. पुढें रिपु होतील असें समजून टिपूनें श्रीमंतांचें सख्य राखणें सलाह जाणून, आनंदराव निंबाजी यांसी बोलून व नूरमहमदखान यास लेहून खातरजमेचे पत्राची दरखास्त केली असेल तर सलाह बरी दिसते. बाह्यात्कार न दिसतां अंतस्थ त्याचा सलूख राहावा हें चांगलें आहे. नवाबाचा स्नेह श्रीमंतांचा प्राचीन चालतो. आतां स्वामींची नवाबाची भेटी जाली मनसबा थोरला आहे. डोईवर घेणें तर कळतच आहे. खुळांत शिरणार नाहींत. भोसल्याचा थाक *लागत नाहीं. असो. श्रीमंतांचा पुण्यप्रताप आहे तर श्रीहरि पार पाडील. इंग्रज लबाड, बेइमान काबूची खरे. टिपूचा सलूख साधल्यास करणें सलाह आहे असें लेहून पाठवणें. त्यावरून विनंती केली असे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes that Mahadji had realized the advantage accruing to the Poona Darbar from establishing an understanding with Tipu in order to neutralise the Company's growing strength, but advises Nana to proceed in the matter most cautiously.*

---

*अंत.

No. 327 About June 1784.

श्री

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री त्रिंबक नारायण यांचे मजकुराचें उत्तर सेवकास सादर जालें, तें राजश्री पाटिलबावांस दाखविलें. त्यांत स्पष्ट आज्ञा होती कीं, राजश्री रामजी पाटील यांचे नांवें पत्र बावांचें आलें तें त्यांनीं दाखविलें. त्यांत लिहिलें होतें कीं, त्या डौलाचा बंदोबस्त सरकारउपयोगी पडे असा करावा म्हणोन श्रीमंत राजश्री बाळाजीपंत नाना यांस सांगणें. हें पत्रच आम्हीं पाहिलें असतां आशंका घेतली. तेव्हां रामजी पाटील यांनीं खातरजमा केली कीं, पाटिलबावांकडील गुंता पडणार नाहीं. पडावयाचा नाहीं. जिमा माझा आहे. आपले नांवें पत्र बावांचें पाहिजे तर आणून देतों. अशी वारंवार खातरजमा केल्यावरून राजश्री रघुपतराव यांस वस्त्रें सरदारीचीं दिलीं. पाटिलबावांनीं लिहिलें व रामजी पाटील यांनीं जिमा घेऊन खातरजमा केली, तेव्हां आम्हीं हें कृत्य केलें. या मजकुरावरून बावांची मर्जी रामजी पाटील यांजवर फारच नाखूष जाली. सम विषम वर्णही फार निघाले. आतां दर बैठकेस जिकर होतच आहे. समक्ष ऐकितों, परस्परेंही वर्तमान ऐकितों कीं, रामजी पाटील यांस दोन खिजमतगार पाठऊन आणवावें आणि रूबरू पुसावें कीं, कोणाचे सांगितल्यावरून हें कार्य तुम्हीं करून आमचा आब उणा केला? असें पुसून प्रतिकार करावा. हेंही वर्तमान लष्करभर जालें, मी समक्षही ऐकतों. एक रोज मजपासीं बोलणें जालें. बावा बोलले जे, रामजी पाटील यांस आणून पारपत्य केलें म्हणजे आम्ही यांत नाहीं स्पष्ट होईल. त्याचें उत्तर मीं केलें कीं, आपण आपले सफाईकरितां सेवकाचें पारपत्य केलें, तत्रापि हुजूर खावंदांचे घरीं जी गोष्ट जाली ती कशी फिरेल? खावंदांचे केल्यास दोष कसा येईल याचा विवेक आपणासही करावा लागेल. आपले संमताखेरीज खावंदानें केलें नाहीं त्यास दोष आणणें उचित नाहीं. बावांनीं उत्तर एकच केलें कीं, सरदारी त्रिंबकराव नारायण यांजकडे जाल्यासच आमचें स्वरूप व लौकिक. बावांनीं अर्थ असाही काढिला कीं, दाजी रदबदल करितो याचा आशय असाही असेल कीं, दोन्ही स्थापावे तर हें कसें होतें? यास कांहीं पत्र आलें असेल. मीं उत्तर केलें कीं, खावंदाचें केलें फिरणार नाहीं हीच माझी रदबदल जाली. दोन्ही स्थापावे माझें म्हणणें नाहीं. श्रीमंतांची आज्ञा नसतां मी पदरचें बोलेन तर पारपत्यास पात्र होईन. असें निरंतर होत असतें.

सांप्रत चंद्र २ जमादिलाखरचीं* पत्रें सादर जालीं. त्यांत त्रिंबकरायाचे मजकुराची आज्ञा पहिलेच पत्राप्रमाणें रामजी पाटलास पत्र आलें व पाटलांनीं जिम्मा करून घेऊन रघुपतरायास सरदारी देवविली, त्याचे साधनाकरितां रामजी पाटलाचीं पत्रें बावांस गेलीं आहेत. यावरून बावांनीं फारच राग केला. दत्तू खिजमतगारास सांगोन पाठविलें कीं, दोन खिजमतगार तयार करून पाठवून, बेमुलाहिजा रामजी पाटलास आणवणें. मजला सांगितलें कीं, तुम्हीं लेहून पाठवणें कीं, त्रिंबकराव यांजकडे सरदारी सांगावी. आम्हीही पत्र देतों. लेखकास सांगोन पत्र देवविलें तें दिलें. तें सेवेसीं पाठविलें आहे. हे विज्ञापना.

¶*This is Sadashiv Dinkar's letter to Nana telling him that to Mahadji's excitement over the imprisonment of Trimbak Rao Raje Bahadur, was added the surprise of being informed that the step had been taken by the Poona Darbar with the consent of his (Mahadji's) agent, Ramji Patil. Mahadji threatens to punish his agent for over-riding his instructions.*

No. 328 About July 1784.

श्री

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजेः—राजश्री रघुपतराव नारायण राजेबहादर यांजकडील कारकून गंगारामपंत संगमनेरकर सरकारचें पत्र राजश्री पाटीलबावा यांस व रघुपतराव यांचीं पत्रें बावांस व मुत्सद्दी मंडळीस घेऊन येथें आला होता. त्यानें मुत्सद्दी यांचे घरोघर फिरला. कित्येकांनीं भेटी घेतल्या नाहींत. कोणी भेटले, त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, याउपर आमचे येथें येऊं नये. बावांची भेट आमचे हातून होणार नाहीं. शेवटीं राजश्री माधवराव गंगाधर यांची भेटी घेऊन सरकारचें पत्र व रघुपतराव व चांगोजी कदम यांचीं पत्रें हवाला केलीं. त्यांनीं बावांस वर्तमान श्रुत करून पत्रें वाचून दाखविलीं. आज्ञा जाल्यास कारकुनास दर्शनास घेऊन येईन अशी विनंती केली. उत्तर जालें जे, कारकुनास दरबारास आणूं नये. आपले घरीं सदाशिव दिनकर याचे साक्षीनें त्या कारकुनास सांगावें

*23-4-1784.

कीं, राजश्री त्रिंबकराव नारायण यांस सरदारी सांगोन नजरेचा ऐवज सरकारांत घेतला तो व आणखी खर्च पडला इतक्या ऐवजास त्रिंबकराव यांजवळ जागा नाहीं. आम्ही दरम्यान येऊन कर्जे घेऊन देविलीं तेव्हां भरणा करून दिला, तो रुपया अद्यापि ज्याचा त्यास पावला नाहीं. सरकारचें पत्र आणिलें तें ठेऊन घ्यावें. वरकड पत्रें कारकुनाचे हवाला करून तुम्ही माघारा जागें, म्हणोन सांगून परिछिन्न त्यास वाटेस लावणें. यावरून माधवरावजींनीं मजला बोलावून नेऊन, राजश्री राजारामपंत निसबत राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे व माझे साक्षीनें, कारकून मजकुरास बावांचे आज्ञेप्रमाणें उत्तर सांगितलें. पत्रें आम्हीं ठेऊन घेतलीं. तुम्हीं स्वार होऊन जावें, राहूं नये, अशी बावांची आज्ञा आहे. कारकुनानें दर्शन घेऊन जाबसाल समक्ष करण्याविषयीं रदबदल केली. रावजींनीं उत्तर दिल्हें जे, बावांची मर्जी तुम्हांसी भेटावयाची नाहीं. आम्ही पुन्हा विनंती केली तरी बोलावणार नाहीं. राजश्री रामजी पाटील यांचे पत्रावरून कळलें म्हणोन रघुपतराव व चांगोजी कदम व केशो कृष्ण यांचे पत्रीं लिहिलें आहे तें पत्र बावा मागतात. कारकुनानें सांगितलें जे, रामजी पाटील यांचें पत्र आम्हांजवळ नाहीं. परभारा पाठऊं म्हणोन आमचे यजमानांनीं सांगितलें. पाटलाचें पत्र आम्हांजवळ नाहीं इतकें भाषण जालें. वर्तमान स्वामींस विदित व्हावें म्हणून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that Mahadji refused an interview to the agent of Raghupat Rao Raje Bahadur, Trimbak Rao's rival.*

No. 329 5th September 1784.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं —

दंडवत विनंती उपरी :—इंद्रसेनास दीड लक्षाची जागीर द्यावयाचा करार आहे, त्यास तुम्हीं लिहून पाठवून सनदा महालांच्या आणवाव्या. आम्हीही लिहितों. सदाशिव मल्हार यांस लखनऊस पाठवितों. दोन मनसबे आपले, एक बादशाही मनसबा इंग्रजांनीं सोडावा; दुसरें, टिपूच्या मनसब्याची तोड, मुख्य त्यांनीं आपलीं पलटणें आमचे फौजेस सामील करून टिपूचें पारपत्य करावें. ती गोष्ट त्यांच्यानें टिपूसीं सलूख केल्यामुळें होणार नाहीं, तर दुसरा पक्ष टिपू-

कडे आपला मुलूख जुना व नवा गेला आहे तो इंग्रजांनीं त्याजकडून सोडून देवावा. कनिष्ट पक्ष, मुलकाचा पैका दरसाल देत जावा. हे मुद्दे त्याजकडून हासल जाले तर सनदा त्यास देऊं. नाहीं तर देणार नाहीं. सनदा लौकर आणवाव्या म्हणोन पाटीलबावांनीं सांगितल्यावरून विस्तारें लिहिलें, तें सविस्तर कळलें. त्यास आजपर्यंत इंग्रजांचे वकील येत गेले, परंतु कोणास जागीर दिल्ही नाहीं, व तह होते समयीं कोठें लिहिण्यांतही आलें नाहीं. परंतु राजश्री पाटीलबावांनीं लिहिलें कीं, इंद्रसेन सरकार उपयोगी आहे, बहुत कामें करील, यास्तव जागीर द्यावी लागते. त्यावरून जागीर द्यावयाचें कबूल केलें. असें असतां इंग्रजांनीं परभारें करारमदार असतां टिपूसीं तह केला, तेव्हां जागीर देऊन फल काय? हल्लीं पाटीलबावांनीं लिहिलें कीं, सदाशिव मल्हार लखनऊस पाठवितों. दोन मनसबे, एक पातशाही मनसबा इंग्रजांनीं सोडावा दुसरें टिपूच्या मनसब्याची तोड. एक त्यांनीं आपलीं पलटणें फौजबरोबर देऊन टिपूचें पारपत्य करावें. हें त्यांणीं टिपूसीं सलूख केल्यामुळें कबूल न केलें, तर दुसरें, जो मुलूक नवा जुना टिपूनें सरकारचा घेतला आहे, तो इंग्रजांनीं सोडवून द्यावा. तिसरें, मुलकाचे ऐवजीं पैका घ्यावा. त्यास पलटणें याउपरी त्यांचीं येणें हें ठीक नाहीं. मसलतींतच टिपू व ते एक जाले नंतर आम्हांस म्हणतील कीं, पातशाहाचा हुकूम आला. त्यांस धरावें कोंठें? व वाटणी मुलकाची घेतील तेव्हां अधिक घरांत शिरतात. याकरतां शराकत* इंग्रजांची कामांची नाहीं. दगा आहे. आपणही पलटणें मागूं नयेत. उगीच तहनाम्यांत परस्परें कुमक करावी असें आहे त्याप्रों द्यावी. उत्तम पक्ष, टिपूनें सरकारचा मुलूक घेतला आहे तो इंग्रजांनीं सोडवून द्यावा, हें जालें तर चांगलें; आणि मुलकाचे ऐवजीं पैका द्यावा हें ठीक नाहीं. मुलूक टिपूनें सरकारचा घेतला आहे तो माधारा इंग्रजांनीं देविला व साष्टी सरकारांत दिल्ही, तर मग इंग्रजांनीं टिपूसीं करार असतां परभारें तह केला हें काढूं नये. असें जाल्यास करून, लिहून पाठवावें; म्हणजे जागीर द्यावयाचें लिहून पाठवूं. पूर्वी इपटेन† पुरंदरास आला होता. त्याणें सरकारचीं कामें साष्टी वगैरे करून देतों असें कबूल करून गेला होता. त्यास दुसरीकडे कामास पाठविला. तें तसेंच राहिलें. हल्लीं इंद्रसेन बोलण्यांत आहे. त्यास पांच कलमें कलकत्त्याहून दस्ता- ऐवजीं आणून द्यावयाचीं कबूल केलीं. त्यास एक वर्ष जालें. दोन कलमें मात्र, ज्यांत विशेष जीव नाहीं असीं लिहून आणिलीं. मुख्यत्वें हैदरखानाचें कलम व

*दोस्ती. †कर्नल अष्टन.

परस्परें कुमकेचीं दोन कलमें यावीं, तीं आलीं नाहींत. पाटिलबावांचीं पत्रें वारंवार खातरजमेनें येत गेलीं कीं, फौज जावी. तेव्हां कलम करारांत आलें असतां लिहून न आलें. तेव्हां इंग्रज फौज शहावर गेली म्हणजे परभारें तह टिपूसीं करतील, पुसावयास गेलें तर आमचा दस्ताऐवज कोठें आहे म्हणतील, हेंही पाटिलबावांस लिोंा, त्याचीं उत्तरें खातरजमेनें फौज जावी म्हणून येत गेलीं. त्यावरून फौज रवाना केली. इंग्रजांनीं परभारें तह केला असतां जागिरीच्या सनदा पाठवाव्या असें पाटिलबावांचें बोलणें लिहिलें. त्यास सरकारचा मुलूक टिपूकडे असेल तो त्याजकडून देवावा व कुमक परस्परें करावयाचें ठरावांत आलें त्याप्रमाणें दस्ताऐवजीं इंग्रजांकडून लिहून द्यावें. हीं दोन्हीं कलमें जालीं म्हणजे लिहून पाठवावें, म्हणजे सनदा पाठऊन देऊं. म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें. त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांसीं बोलण्यांत आलें आहे. लिहितील. रवाना छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Nana tells Mahadji that he would regard Anderson's services worthy of a Jagir only if, by his mediation, the Co.'s government would agree to an alliance of mutual assistance and would make Tipu give up his late conquests of Maratha territory.*

No. 330 5th September 1784.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरी :—इष्टिणाचें पत्र लखनऊहून टिपूचा सलूख केल्याचें व टिपूचे तहनाम्याची नकल याप्रमाणें आलें. धाकटा इंद्रसेन येथें आहे. त्याचें बोलणें पुणेंकराकडे अंतरें, एक श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांची वस्तवानी लुटून नेली; व फत्तेसिंग गायकवाड यास मागील बाकी माफ असतां तगादा करून घेतली; व फौज बाहेर सहा महिन्यांवर निघाली; व फरासिसांकडे सरकारचा वकील गेला; व टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें. अशीं अंतरें बोलून दाखविलीं. यावरून यांचे करण्या बोलण्याची व लिहिण्याची जात समजत नाहीं. या लिहिण्यावरून बिघाड असेंही म्हणतां येत नाहीं. आज प्रातःकाळीं इंद्रसेन आला होता. त्याचें म्हणणें कीं, टिपूचे सलुखाची गोष्ट आम्हांपासून जाली खरी.

सदाशिव मल्हार याची रवानगी लखनऊस करावी असें इंद्रसेनाचें म्हणणें आहे. मसलतीची जात साम, दाम, दंड, भेद हे प्रकार आहेत. हे विफल जाल्यास शेवटील प्रकार दंड म्हणजे युद्ध. यास्तव राजकारण तोडूं नये. याकरतां सदाशिव मल्हार यांस पाठवितों. इंग्रजांनीं टिपूसीं परभारें सलूख केला हें त्यांचे पदरीं घातलें व हल्लीं आमचे भेटीस येण्याची शौरत घालून लखनऊस आले. पातशाहाकडे संधान लाविलें व पातशाहजाद्यास फिताऊन नेलें. त्यास जागीर देणार. त्याची चाल ठीक नाहीं. म्हणोन राजश्री पाटीलबावांनीं ल्याहावयास सांगितलें, त्यावरून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास, इष्टिणाचें पत्र राजश्री पाटीलबावांस आलें व टिपूचे तहनाम्याची नकल आली, ती पहावयाकरितां पाठवावी म्हणून पूर्वी लिहिलें आहे त्याप्रों पाठवावी. धाकटा इंद्रसेन याचें बोलणें कीं, पुणेंकराकडे अंतरें, एक दादासाहेबांची वस्तवानी लुटून नेली. त्यास इंग्रजांचा व सरकारचा तह जाला, तेव्हां तहनाम्यांत श्रीमंत कैलासवासी दादासाहेबांचें कलम लिहिलें आहे कीं, बेफिसाद* तुम्हांजवळ राहिले तर पंचवीस हजार रुपये दरमाहा खर्चास देत जावे. त्यास, दादासाहेब देशीं आले. गंगातीरीं राहिले. तेथें कराराप्रमाणें स्वस्थ असावें परंतु तसें घडलें नाहीं. नानाप्रकारचे खेळ करूं लागले व राजकारणें केलीं. तीं दस्ताऐवजीं त्यांचे अंगीं लाविलीं. तत्रापि करारावर नजर देऊन पंचवीस हजार रुपये दरमहा खर्चास देत गेलों. याशिवाय दानधर्मास ऐवज लागला तो दिल्हा. पुढें काल जाला. ही ईश्वरी इच्छा! यास उपाय काय? काल जालियावर क्रियेस वगैरे खर्च लागला, तो दरमहाशिवाय सरकारांतून दिल्हा. पुढें श्रीमंत मातुश्री आनंदीबाईचा बंदोबस्त खर्चाचा, दादासाहेब चालवीत होते त्यापेक्षां अधिक करून दिल्हा. त्यांनीं स्वस्थ असावें तें न करितां राजकारणें करूं लागलीं. तींही दस्ताऐवजीं धरलीं. तेव्हां बंदोबस्त करणें प्राप्त. तथापि खर्च उत्तम प्रकारें चालतो. इतका बंदोबस्त असतां हल्लींही राजकारणें चाललींच आहेत. श्रीमंतांचे प्रतापें कळतात म्हणून बरें आहे. यांत कराराशिवाय सरकारांतून काय केलें हें पाटीलबावांनीं ध्यानांत आणावें. दुसरें, गायकवाडाचें त्यास, गायकवाडाचें कलम तहनाम्यांत आहे, त्याप्रोंच सरकारांतून आहे. त्याजपासून मागील बाकीपैकीं ऐवज घेतला नाहीं; व तह जाल्या आलीकडील फौज चाकरीस यावी त्याबाबद व सालाबादी ऐवज घ्यावयाचा करार आहे तो याप्रमाणें ऐवज त्याजपासून घेतला. सरकारचे जाबसाल गायकवाडाकडे,

*फितुरी न करितां.

आमदाबाद वगैरे परगण्यांत तह जाल्यावर स्वाऱ्या करून रयतेपासून ऐवज घेतला, तो त्याजकडे यावयाचा. याशिवाय सतरागांव वगैरे येथें सरकारचा अमल बसावयाचा तो अद्यापि बसला नाहीं. हे जाबसाल त्याजकडे राहिलेच आहेत. पूर्वी राजश्री पाटीलबावांनीं रा॥ रामजी पा॥ जाधव यांस पत्र आम्हांस दाखवावयाकरितां लिहिलें, त्यांत मजकूर कीं, फत्तेसिंगाकडील गमाजी पाटील पुण्यास आला. त्याचे घरीं मेजवानीस जातात हें काय? गायकवाडाची चाल समजली असतां उपेक्षा कां? त्याचें पारपत्य केलें असतां इंग्रजांस वाईट वाटावयाचें नाहीं. येविसीं खातरजमा असावी. आम्हांजवळ इंग्रजांचा वकील असतां गोहोदकराची मसलत करतो कीं नाहीं म्हणोन विस्तारें लिहिलें होतें. आणि हालीं गायकवाडाकडे मागील एक रुपया न घेतां, सालमजकूरचा ऐवज फौजेचे चाकरीचा मागील शिरस्तेप्रों॥ व सालाबादी ऐवज तोही सालमजकुराचा मिळोन ठराव केला. गायकवाडांनीं सतरागांव वगैरे सरकारचे महाल सोडले नाहींत, हें करारास अंतर त्यांजकडे असतां इंग्रजांनीं उगेच लटकेंच बाकीचें निमित्य ठेवून बोलले. यास काय म्हणावें? इंग्रज लटकीं निमित्यें ठेवावयास पहातात हा अर्थ यांत दिसतो व आंतून गायकवाडास गोड वाटावें ह्या चाली त्यांच्या आहेत. पाटीलबावांचे ध्यानांत यावयाजोग्या आहेत. तिसरें, फौज बाहेर निघाली नाहीं. त्यास तहनामे जाल्यानंतर पाटीलबावांचीं पत्रें आलीं कीं, टिपूस लिहून पाठवावें. त्याणें करारापों॥ ऐकिल्यास उत्तम. नाहीं तरी सरकारची फौज टिपूवर रवाना व्हावी. इंग्रजी पलटणें सामील होतील. त्यास तहनामे होतांच टिपूस पत्रें तहनाम्याप्रों॥ ऐकावें म्हणोन पाठविलीं. त्यावर पापन पाटीलबावांजवळ आला. मसलत करितां कीं नाहीं? सरकारांतून फौज न गेली तर काय तें आम्हांस सांगा. तेव्हां पाटीलबावांनीं त्याची खातरजमा केली कीं, सरकारची फौज न गेली तर आम्ही तुम्हांबरोबर येतों. त्यावरून चाळसां दिवसांचा करार करून, कंपू आणावयास गेला. इकडे पाटीलबावांचीं पत्रें आलीं कीं, असा करार केला आहे. फौज लौकर जावी. न गेली तर आम्हांस इकडील मसलत आटोपून यावें लागेल. त्याचीं उत्तरें येथून गेलीं कीं, फौज रवाना करतों. त्याप्रमाणें रवाना केली. कंपूस कोठें ठिकाण नाहीं. पाटीलबावांनीं टिपूस पत्र लिहिलें कीं, तह ठरला याप्रमाणें ऐकावें. नाहीं तर इंग्रजांस सामील होऊं. मग ऐकणार नाहीं. त्याचें उत्तर कबूल म्हणून आलें. त्याची नकल पाटीलबावांकडे पाठविलीच होती. मग परभारें तह टिपूसीं करावयाचें कारण काय? त्यावर दुसरीं पत्रें

पाटीलबावांचीं आलीं कीं, फौज दहाबारा कोशीं जावी त्याप्रमाणें गेली. तत्रापि पलटणें न आलीं. फिरोन पत्र आलें कीं, मिर्जेपर्यंत फौज जावी. त्याप्रमाणें पंढरपूरचे सुमारें गेली. पापनास यावयास उशीर लागेल म्हणून मुंबईकरांस पलटणाविसीं इंद्रसेनाचें पत्र पाठविलें, तें त्यांजकडे पाठविलें. मुबईकरानें उत्तर पाठविलें, त्याची नकल पाठविलीच होती. मुंबईकराचीं पलटणें आलीं नाहींत. फौज आजपर्यंत तसीच आहे. याचा खर्च किती बसला हें पाटीलबावांनीं ध्यानांत आणावें. यांत फौज जाण्यास विलंब लागला किंवा इंग्रजांचीं पलटणें न आलीं हें पहावें. फौज जावयास मात्र निकड केली आणि पलटणांस ठिकाण नाहीं. असो. तहनाम्यांत करारमदार कीं, टिपूसीं करारमदार करणें तो सरकाराशिवाय करूं नये असें असतां परभारें सरकारचे इतल्याशिवाय टिपूसीं तह कसा केला? आपले दोष उच्चारीत नाहींत. दुसऱ्याचे मात्र दोष नसतां बळेंच आंगीं लावितात. ह्या चाली त्यांच्या आहेत. चवथें, फरासिसांकडे सरकारचा वकील गेला, त्यास श्रीमंतांचें लग्न जालें ते समईं फरासिसांकडून आहेर आला होता. याजकरितां त्यासही सरकारांतून वस्त्रें गोपाळ बल्लाळ याजबराबर देऊन फरासिसांकडे रवाना केला. हा मजकूर पूर्वी तुम्हांस लिहिला होता. स्मरणांत नसेल. कारकून राजकारणासाठीं गेला नाहीं. त्यास वस्त्रें दिल्हीं म्हणजे निरोप घेऊन येईल. पांचवें, टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें, त्यास याचा मजकूर कीं, टिपूवर मसलत करावी, याकरितां सरकारची फौज पाठविली असतां, इंग्रजांनीं परभारें टिपूसीं सलूख केला. हें टिपूनें लिहिलें असतां, आम्हीं राजश्री पाटीलबावांचे खातरजमेचीं पत्रें येत, त्यांजवर टिपूचें लिहिणें प्रमाण मानिलें नाहीं. मुंबईकरानींच सरकारांत पत्र पाठविलें कीं, टिपूचा तह जाला. तेव्हां इंग्रजांचा करार परभारें तह होऊं नये असा असतां त्यांणींच परभारें तह करून सरकारांत लिहिलें. तेव्हां टिपूस खातरजमेचें पत्र न लिहिलें तर कसें, हें पाटीलबावांसच पुसावें. टिपूस खातरजमेचें पत्र लिहिलें, त्यांत लिहिलें आहे कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह जाला, त्यांत तुम्हांकडील कलम ठरलें आहे त्याप्रमाणें तुम्हीं कबूल म्हणोन लिहिलेंच आहे. वरकड तुमचा आमचा दारमदार आहे, तोच आहे. पेषकसीचा* ऐवज राहिला आहे तो पाठऊन द्यावा. यांतही इंग्रजांचा दारमदार आंत लिहून पत्र दिलें आहे. यांत इंग्रजांकडील दोष यावयाचा नाहीं असें समजोन दिल्हें आहे. यांत सरकारांतून कराराशिवाय कांहीं केलें नाहीं. इंग्रजांनीं करा-

*खंडणीचा.

चयाचें तसें केलें. सदाशिव मल्हार यांस लखनऊस पाठविणार, उत्तम आहे. माारनिले गेलेच असतील. त्यांचें व इंग्रजांचें बोलणें होईल तें माारनिले पाटील-बावांस लिहितील. त्यांतील मजकूर लिहून पाठवावा. इंग्रजांची चाल पाटील-बावांस कळलीच आहे. त्यापक्षीं करणें तें समजूनच करितील म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास इंग्रजांचीं बोलणीं जालीं तीं आपणांस कळावीं याजकरितां राा सदाशिव दिनकर यांसीं बोलण्यांत आलीं. दादासाहेब व गायकवाडांबाबत जाबसाल इंद्रसेनानें केला त्याचीं उत्तरें समर्पक त्यासीं जहालीं होतीं. फरासीस यांजकडे श्रीमंतांचे लग्ना-बाबद वस्त्रें देऊन गोपाळ बल्लाळ यास पाठविलें, येविसींची माहितगारी नव्हती. हल्लीं आपण लिहिल्यावरून समजलें. टिपूवर फौज दिवसगत लागली, याजवरून जाहीरदारींत फौज निघाली नाहीं हें निमित्य ठेऊन, परभारें टिपूसीं मद्रासकराचे विद्यमानें तह करावा हा बेत करून पापन येथें आला. त्याचें उत्तर फौज न निघाल्यास चिंता नाहीं; तुमचा कंपू यावा. आम्हींच इकडील मसलत समेटून टिपूच्या पारपत्यास चालतों. याप्रों पापनासीं उत्तर जाहलें असतां, लाजवाब* होऊन चाळिसा दिवसांत कंपू घेऊन येतों म्हणोन करार करून गेला. उपरांत मद्रासकराचे विद्यमानें टिपूसीं परभारा तह जाला म्हणोन वर्तमान आलें. पापन येथें चाळिसा दिवसांत कंपू घेऊन येतों म्हणोन करार करून गेला. त्या-वरून फौज बाहेर निघावी म्हणोन आपणांस लिहिण्यांत येत गेलें, व इंद्रसेन यार्णी मंबईकरास सरकारची फौज निघाली म्हणजे. तुम्हीं आपल्याकडील पलटणें सामील करणें म्हणून पत्र दिल्हें, तेंच आपणाकडे पाठविलें. इंग्रजांनीं परभारा टिपूशीं तह, सहा महिन्यांत फौज निघावयाचा वायदा टळला इतकेंच निमित्य ठेवून केला. इंग्रजांची चाल आपले ध्यानांत आहे. सहवासामुळें येथेंही समजली. सदैव पत्रीं सविस्तर लेहून तोषवावें. राा छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji receives from Nana a long letter containing the refutation of several charges urged by the Company's government against the Poona Darbar, and of acting in contravention of the late treaty. He expresses it as his opinion that little reliance was now to be placed on the word of the English.*

*निरुत्तर.

No. 331 5th September 1784.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस :—

दंडवत विनंती उपरी :—टिपूकडील आशय स्नेहाचा आलाच आहे. हेंही सूत्र बळकट जाल्यास चांगलें आहे. इंग्रजांनीं काबू केली आहे. आपणही सावधतेस चुकूं नये. टिपूचें साधन जाल्यास करणें सलाह आहे. म्हणून राजश्री पाटीलबावांनीं ल्याहावयास सांगितलें, त्यावरून लिहिलें तें सर्व कळलें. त्यास टिपूचें पत्र आलें होतें कीं, खातरजमेचें पत्र पाठवावें म्हणजे पेषकशीचा ऐवज पाठवितों. त्याजवरून सरकारांतून टिपूस खातरजमेचें पत्र पाठविलें कीं, सरकारचा व इंग्रजांचा तह जाला, त्यांत तुम्हांकडील कलम ठरलें आहे त्याप्रों कबूल म्हणून तुम्हीं लिहून पाठविलेंच आहे. वरकड तुमचा आमचा दारमदार आहे तोच आहे. पेषकशीचा ऐवज राहिला आहे तो पाठवून द्यावा. याप्रों सरकारचें पत्र खातरजमेचें पाठविलें. त्याचें उत्तर आलें. त्यांत आणखीं दोन कलमें लिहिलीं आहेत कीं, याप्रों पत्र यावें. त्यास, तीं कलमें दौलतीस चांगलीं नाहींत म्हणोन करार केलीं नाहींत. पत्रांचें उत्तर पाठविलें कीं, हीं कलमें व्हावयाचीं नाहींत. यावरून पूर्वी खातरजमेचें पत्र पाठविलें तें तसेंच राहिलें. तेव्हां पैका येणें कळतच आहे. जाजती कलमें व्हावयाचीं नाहींत असें लिहून पाठविलें आहे. त्याचें उत्तर आलें नाहीं. आल्यावर समजेल त्याप्रों पाटीलबावांस इतल्ला* होईल. पहिलें पत्र लिहिलें आहे व हल्लीं पाठविलें आहे त्याप्रों कबूल करून, पेषकशीचा ऐवज पाठविला तर बरेंच जालें. संधान ठीकच आहे. परंतु टिपूची चाल ठीक नाहीं. उजम† भारी आहे. व वर्तणूक मनस्वी आणि क्षेत्र चांगलें नाहीं. अलीकडे नूरमहमदखानास टिपूचें पत्र आलें कीं, एके दिवशीं पंनास हजार हिंदु बायकांमुलें सुद्धां बाटवून मुसलमान केलें. असी गोष्ट पूर्वी पातशाहा व वजीर मोठमोठे जाले, परंतु जाली नाहीं, परंतु खुदाचे फजलेंकरून‡ जाली, व याप्रों नवाबाचे लष्करांत टिपूचे वकील आहेत त्यांसही टिपूनें लिहिलें आहे. नवे§ गज व रुपयांचे व मोहरांचे शिक्के आपले नांवें नवे केले. तख्त करावयास लाविलें आहे व संवत्सर महिने यांचीं नांवें पहिलीं मोडून नवीं केलीं, याप्रों वर्तमान आहे. त्याशीं सख्य केलें असतां काईम राहून त्याप्रों चालेल असें वाटत नाहीं. पुढेंही गांवचे गांव

*माहीत होईल, खबर कळेल. †गर्व, उद्दामपणा. ‡रुपेनें.

§गज—a raised railing, probably for the throne.

बाटवीत चालला आहे. साठ पलटणांचे साठ हजार माणूस कवाइती नवें तयार करीत आहे. याप्रों बातम्या चहूंकडून आल्या व येत आहेत. राजश्री हरिपंत सुरापूर तालुक्यापावेतों फौजे सुद्धां पुढें आले. इंग्रज परभारें तह करणार नाहींत ही खातरजमा होती. यावरून कांहीं फौज व पेंढारी टिपूचे तालुक्यांत जाऊन दोन तीन ठाण्यांचे गांव मारले. तों मागाहून मुंबईचें पत्र इंग्रजांचें सरकारांत आलें कीं, टिपूचा व इंग्रजांचा तह जाला. त्याची नकल पूर्वी पाठविलीच आहे. हें वर्तमान आलियावर हरिपंतास आम्हीं लिहून पाठविलें कीं, तुम्हीं टिपूचे मुलकाचे सरदेवरी* गेलेत, परंतु मुंबईकरांचें पत्र, तह टिपूचा जाला म्हणोन आलें. तेव्हां तुम्हीं त्याचे तालुक्यांत पुरता मजबूत मनसबा ठरल्याखेरीज उपद्रव करूं नये, व टिपूचे वकिलांस सांगितलें कीं, पेंढारी चुकोन गेले त्यांस ताकीदही केली. हें लिहिलें वकिलाचें टिपूस गेल्यावर टिपूनें वकिलास लिहिलें कीं, याचा मोबदला मातबर करावयाचा आहे. याचें उत्तर आम्हीं वकिलास सांगितलें कीं, काय चिंता आहे ? अलीकडे एक दोन बातम्या टिपूकडील आल्या कीं, बाजत बरसात मसलत सरकारचे तालुक्यांत आपला मुलूख पाठीशीं घालून पुढें पाडावी. तेव्हां टिपूची मसलत सामान्य नव्हे. तरतूद तर करणें प्राप्त. सरकारांत वोढ कोण्या प्रकारची, अशा तिडणी आहेत. श्रीमंतांचे दैवेंकरून कारस्तानी† व तर्तूद होईल तेथवर करीतच आहों. याप्रों टिपूकडील मजकूर आहे. सविस्तर पाटीलबावांस सांगावें म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास, टिपूकडील आशय स्नेहाचा आहे असें ऐकिल्यांत आलें होतें. त्यावरून येथूनही राजश्री सदाशिव दिनकर यांसीं सूचना ल्याहावयासी सांगितलें व आपणही टिपूचें लिहिलें खातरजमेचें पत्र पाठवावें म्हणोन आलें. त्यावरून खातरजमेचें पत्र पाठविलें असतां, पेषकशीचा ऐवज टिपूनें न पाठविला, आणि पत्रांत आणखी दोन कलमें लिहून पाठविलीं. यावरून व त्याचे वर्तणूक व हिंदूचे मुसलमान केले व करितो तख्त केलें आहे; शिक्का व गज नवा केला; यावरून त्यास उजम भारी व चालही नीट नाहीं हें समजल्यांत येतें. चिंता नाहीं. श्रीमंतांचे ताले शिकंदर आहेत.‡ यामागें ज्यास उन्मद जाहला त्याचीं पारिपत्यें जाहलीं आहेत. पुढेंही श्रीमंतांचे घराशीं बदसलूख करतील त्यांचें पारपत्य होईल. दोन कलमें जाजती टिपूनें लिहिलीं तीं व्हावयाचीं नाहींत म्हणोन आपण उत्तर टिपूस पाठविलें, त्याचें

*सरहद्दीवर. †मसलत. ‡ग्रह उच्चीचे आहेत

प्रत्युत्तर आलेंच असेल. त्यावरूनही टिपूचा आशय पुर्तेपणें ध्यानांत आलाच असेल. लेहून कळवावें. रा छ १९ शवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji learns from Nana of the revolting atrocities committed by Tipu on his Hindu population and of his threat to invade Maratha territory on the conclusion of the rains. He requests further information.*

No. 332 6th September 1784

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावांची स्त्री, हंगेपलवेवाली, गरोदर आहे, व कन्या नरसिंगराव देशमुख पुणेंकर यांचे पुत्र लाडोजी शितोळे यांस दिली, ती गरोदर होती. तीं उभयतां समागमेंच आहेत. त्यास कन्या प्रसूत जाली. पुत्र जाला. पूर्वील पत्रीं विनंती केलीच आहे. स्त्रीचे कांहीं दिवस, महिना दीड महिना बाकी आहेत. असाही विचार आहे कीं, बुनग्या सुद्धां ग्वालेरहून कूच करून चमलतीरास जावें. तेथें ऐलतीरीं बुनगे ठेवावे. आपण सडे होऊन चमल उतरून बादशाहाकडे जावें. पुत्रकामना आहेच. जोतिषांनीं पुत्र होईल असें सांगितलेंही आहे. यामुळें दृष्टि पाठीमागें कुटुंबांत राहील कीं काय पहावें. आपले फौजेचे खर्चाकरतां स्वामींस प्रश्न केला होता. त्याचें उत्तर साफ रुक्ष आलें. पहिलें लिहिण्यांत होतेंच कीं, खर्चाची मदत न जाल्यास आमचें टिकणें बादशाहाजवळ होणार नाहीं. भेटी घेऊन माघारें येऊं असें म्हणतच होते. त्यास खर्चाचा साफ जाब आला, इतकें निमित्त ठेऊन, भलतेसा निकाल पाडून, बुनग्यांत माघारे येतील कीं टिकून बादशाहाजवळ राहातील पहावें. होईल वर्तमान तें विनंती करीन. बादशाहाजवळ टिकून राहातीलसें वाटत नाहीं. याहीवर न कळे. बादशाहा आगऱ्यास आले. तेथून खैरातीखान याजबरोबर खिलत,* हत्ती, घोडा पाठविला, तो बावांनीं घेतला. त्याचा मजकूर तपसीलवार निराळे पत्रीं विनविला आहे. खैरातीखानाची आस्था कीं, बादशाहा आगऱ्यास यांचे भेटीस येऊन बसले. वाट पाहातात. यांनीं लौकर चालावें. या अर्थें बजीदी† फार करूं लागला. म्हणून ग्वालेरीहून कूच केलें. तीन चार कोस आगऱ्याचे सुमारें

*पोषाख. †आर्जवें.

×××

गेले. तेथें पाऊस लागला. मातबर पर्जन्य आणि झड बसली. जागा बरोबर, पाण्यास उतार नाहीं. धारण चौ शेरांची जाली. रसद येईना. तळावर चिखल भारी जाला. तळें साचलें. चमेलची खबर आली कीं, पात्र वर येऊन उभय तीरीं कोस कोस पसरली. नावा बंद जाल्या. खैरातीखानास अगोदरच बिदा केलें होतें. नंतर पावसाची झड बसली. तळाचे जाग्यावर चिखल भारी व पाणी तुंबून तलाव जाला. स्त्री गरोदर, तीस मानेना. धारण चार शेर जाली. तोही दाणा मिळेना. मग लाचार होऊन तेथून कूच करून पुन्हां ग्वालेरीजवळचे तळावर येऊन मुक्काम केला. दिवस स्त्रीचे नवमास पूर्ण भादवी पौर्णिमेस जाले. आज वद्य सप्तमी, दिवस अधिक जाले आहेत. प्रसूत जाल्यावर कन्या पुत्र काय होईल पहावें. दसरा येथें जालाच तों चमेलही उतरेल. मग मनसबा कळेल तो विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana that Mahadji who had proceeded a few marches towards Agra, had to retire to Gwalior waiting for the rains to subside before proceeding to visit the King at Agra.*

No. 333 12th September 1784.

पैवस्ती छ २० जिल्काद सुरू सन
खमस समानीन, अश्विन मास.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २६ सवाल मुक्काम नजीक किल्ले ग्वालेर स्वामींचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—आज्ञापत्रें छ १७ साबानचीं सादर जाहलीं, त्यांत राजश्री पाटिलबावा यांचे पत्रांचीं उत्तरें होतीं तीं प्रविष्ट केलीं. सेवकाचे नांवें पत्रें सादर होतीं त्यांपैकीं दाखवायाचीं होतीं तीं दाखऊन उत्तरें प्रत्येत्युरें जाहलीं, तीं पुरवण्या निरनिराळ्यांत विनविलीं आहेत. त्यां-वरून विदित होतील. दोन तीन मजकूर बावांचे सेवकाचे पत्रीं एकान्वयें होते. त्यांपैकीं इंद्रसेन इंग्रजांचे जागिरीचे मजकुराचें उत्तर बावांनीं दिलेंच नाहीं. सेवकासच उत्तर लेहावयास सांगितलें, तें निराळे पुरवणींत विनविलें आहे. दोन मजकुराच्या मालुमाता* बावांचें पत्रीं जमा धरून उत्तरें लिहिलीं आहेत. याज-

*आलेल्या पत्रांचा सारांश.

करितां मीं मालुमाता जमा धरिल्या नाहींत. मालुमाता व उत्तरें बावांचे पत्रावरून विदित होतील. त्यांपैकीं मजसीं उत्तरें जालीं तीं विनंतिपत्रीं किंचित् विनविलीं आहेत. स्वामींची स्वारी छ २० साबानीं दाखल जाहली हें वर्तमान बावांचे पत्रीं लिहिण्यांत आलें नाहीं. त्यावरून विस्मो करीत होते कीं, स्वारी पुण्यास दाखल जाल्याचें वर्तमान आम्हांस लिहिलें नाहीं, मग इतर वर्तमान न लिहिण्याचें मनांत कशास आणावें? तर लिहिण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of his having replied to the several queries of the latter in separate letters from himself and from Mahadji.*

No. 334 12th September 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—छ १७ साबानचीं पत्रें सादर जालीं. त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावा यांसही पत्रें होतीं तीं प्रविष्ट केलीं. त्यांनीं उत्तरें केलीं तीं तपशिलावरून विदित होतील. त्रिंबकराव नारायण यांचे मजकुराचें पत्र सेबकास सादर जालें. त्याच अन्वयें पाटीलबावांसही पत्र होतें. त्याची मालुमात चिटणिसांनीं जमे धरून, उत्तर लिहिलें आहे जे, पूर्ववत् सरदारी त्रिंबकराव यांजकडे द्यावी. मजसीं भाषण केलें कीं, आम्हांस कांहीं ठाऊक नाहीं. आमचे चित्तांतच सरदारी त्रिंबकरावाची काढणें असती, तर श्रीमंतांस व श्रीमंत राजश्री नाना यांस पत्रें लेहून उघड काम करावयास गुंता काय होता? कोणी दग्यानें पत्र रामजी पाटलास लिहिलें, तें नानांनीं कसें मंजूर केलें? सरकारांत पत्रें लिहितों तीं रामजी पाटीलच देत असतां कामें न जालीं, हें काम कसें केलें? तस्मात् चित्तांतून करावयाचे निमित्तास रामजी पाटलाचें पत्र पुढें केलें. पत्रामागें पत्र या मजकुराचीं येतात. त्यांचीं उत्तरें आम्हीं करितों कीं, आम्हांस न कळून लिहिणारानें पत्र लेहून आणिलें, तें आम्हीं वाचून न पाहतां विनंती केली असेल. वर्तमान लिहिणारे तुम्हांसीं बोललों असतां, त्याच पत्राचें निमित्त लेहून पाठवीत असतात. आम्हीं पत्रच रामजी पाटलास लिहिलें, तर रामजी पाटील येऊन समक्ष जाबसाल कां करीत नाहीं? चोरटीं कर्में केलीं असतां काय बोलतील? हरामखोरांचें प्रमाण मानिलें. यावरून मनांतून करावयाचें असेंच समजावें. रामजी पाटलानें हें कर्म जिमा घेऊन करविलें, त्यास कैद करून आपला जाबसाल

भरून घ्यावा. त्यानें जिमा केला तसा पार पाडील, हें देखील तुम्हासीं बोललों, यावरून समजावें. आम्हांस हें किमपि ठाऊक नाहीं. चांगोजी कदमाचें साधन रामजी पाटलानें लिहिलें होतें. त्याचें उत्तर आम्हीं लेहविलें होतें कीं, चांगोजी कदम त्रिंबकरावाचे डौलांत घातल्यानें बंदोबस्त होतो तर उत्तम आहे. इतकें आम्हीं सांगितलें. मग पत्र लिहिणारानें कसें लिहिलें तें किमपि ठाऊक नाहीं. सरदारी त्रिंबकराव यांजकडे पूर्ववत् बहाल व्हावी; वस्त्रें द्यावीं; यांत आमची स्थित आहे. इंद्रसेन इंग्रज यास दीड लक्ष जागीर करार केली, त्याचे सनदाविसीं बावांनीं स्वामींस पत्र लिहिलें होतें. मजकडूनही विनंतिपत्र लेहविलें होतें. त्याचीं उत्तरें बावांस व मजला एकच अन्वयाचीं सादर जालीं कीं, इंग्रजांनीं परभारें टिपूसीं तह केला असतां जागिरीच्या सनदा पाठवाव्या असें पाटिलबावांचें बोलणें लिहिलें. त्यास, सरकारचा मुलूख टिपूकडे असेल तो त्याजकडून देवावा, व कुमक परस्परें करावयाचें ठरावांत आलें त्याप्रमाणें दस्ताऐवजीं इंग्रजांनीं लिहून द्यावें. हीं दोन्हीं कलमें जालीं म्हणजे लिहून पाठवावें, म्हणजे सनदा पाठऊन देऊं. हें पत्र बावांस दिलें. याचें उत्तर मजसीं केलें कीं, चूक त्यांनीं आपली मानून घेतली. पुढें टिपूसीं बिघाड करितात, टिपूचें कलम लिहून देतात, हें लिहिलें असतां असें उत्तर लिहिलें. यावरून राजकारणच सरकारांतून तोडिलें; जोडावयाचेंच नाहीं. तेव्हां आम्हीं याचा जाब कशास द्यावा? तें राजकारणच तोडितों. सदाशिव मल्हार यासच उठून आणितों, असें उत्तर मजसीं केलें. जाब लेहून दिला नाहीं. आंतील वर्तमान ऐकतों कीं, बावा इंग्रजांसीं तोडीत नाहींत. दीड लक्षाची जागीर आपणापासून देऊन इंग्रजांची रजावंदी* राखितात. जागीर द्यावयास प्रांत इकडेच दिसतो असें ऐकण्यांत येतें. वर्तणुकेंत येईल तें खरें. मागाहून सदरहू दिडा लक्षाचे जागिरीच्या मालुमाती बावांचे पत्राची व सेवकाचे पत्राप्रमाणें जमा धरून, उत्तराचा हवाला सेवकावरच देऊन, दोन्ही पत्रें पाठविलीं तीं हीं पाठविलीं आहेत. मजला उत्तर हेंच सांगितलें जे, इंग्रजांची दरकार नाहीं. त्यापक्षीं आम्हीही त्यांचें राजकारण तोडितों. सदाशिव मल्हार यास बोलावून घेतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is Sadashiv Dinkar's letter informing Nana how Sindia was insistent on Trimbakrao Raje Bahadur being restored to his saranjam and adding that Mahadji felt dissatisfied with the refusal of the Poona Darbar to the grant of a Jagir to the English envoy Anderson and was no longer going to insist on it.*

*खुषी, संतोष.

No. 335 27th September 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १७ साबानचें पत्र सादर जालें. त्यांत आज्ञा जे, राजश्री पाटिलबावांचे सांगितल्यावरून तुम्हीं पत्रीं मजकूर लेहून पाठविला कीं, सरकारांतून वारंवार पत्रें येत गेलीं कीं दिल्लीचें राजकारण इंग्रजांचे हातास जाऊं नये; तेथील बंदोबस्त आपले हातीं राहावा. त्यास, आम्ही हिंदुस्थानांत आल्यावर इंग्रजांची लढाई व सलूख जाला. नंतर ग्वालेर व गोहदची मसलत जाली. रुपया काय खर्च जाला तो हिशेब पाहिल्यावर समजेल. दिल्लीचे राजकारणाचें मनन होऊन, मीर्जा शफी व पातशाहाजाद्याची भेट घेतली. त्यास मीर्जा शफी मारला गेला. इंग्रजांनीं सरकारचे कुमकेस कंपू न पाठविला. भेटीकरितां इष्टिण येतो असी शोरत* घालून काशीस आला. तेथून लखनऊस जाऊन बादशाहाचें राजकारण केलें. असो. सदाशिव मल्हार इंग्रजांकडे रवाना केले. शाहाजादा इंग्रजांकडे गेला, हें बादशाहास जड वाटून आम्हांस षुके पाठविले जे, आम्ही आगऱ्यास येतों, तुम्हीं भेटीस येणें. या अन्वयें अबदुल अहदखान व अफराशाबखान यांचीं पत्रें आलीं. यावरून भेटीस जाणें प्राप्त. आजपावेतों पत्रोपत्रीं संधान होतें. आतां जातीनें जावें लागतें. यास पैका पाहिजे. बादशाह बाहेर निघाले. आम्ही न गेलों तर बादशाहास पेंच पडेल. यास्तव आगऱ्यास जाऊन भेट घेतों. पुढें टिकून बंदोबस्त करणें पैक्यावांचून होत नाहीं. पैका मिळत नाहीं. बादशाहास दरमहाचा दरमहा खर्चास दिलें पाहिजे. याची सोय सरकारांतून जाली पाहिजे. फौजेसही खर्चास पाहिजे. याचीही सोय जालियास आमचा पाय टिकून राहील, यश देणार श्रीमंतांचें दैव. सरकारांत पैका आहे नाहीं हेंही जाणत आहों. यास्तव तोड सुचली आहे हें लिहून पाठवणें म्हणोन विस्तारें लिहिलें, तें सर्व कळलें. पांच वर्षें पाटिलबावा मसलतीवर आहेत हें खरेंच. रुपया खर्च काय जाला तो हिशेब पाहिल्यावर समजेल म्हणोन पाटिलबावा बोलले. त्यास मसलत आहे तेथें पैका लागतच आहे. विनापैका मसलत कसी होईल ? शाहाजादा इंग्रजांकडे गेला हें बादशाहास जड वाटून, षुके पाटिलबावांस पाठविले, व अबदुल अहदखान व अफराशाबखान यांनीं पत्रें पाठविलीं कीं आम्हीं आगऱ्यास येतों, तुम्हीं तेथें येणें. त्यावरून भेटीस जाणें प्राप्त म्हणून लिहिलें. त्यास, ज्यापक्षीं बादशाहाचा षुका व अबदुल अहदखान व अफराशाबखान यांचीं पत्रें

*आवई.

यण्याविसीं आलीं, त्यापक्षीं जरूर पाटिलबावांनीं जाऊन, पातशाहाची भेट घेऊन, आपले लगामीं लाऊन इंग्रज हलके पाडावे, यांत मोठें काम आहे. बादशाहीचा बंदोबस्त सरकारांत राहतो. पातशाहानीं पत्रें पाठविलीं आणि पाटिलबावा न गेले, तर पातशाहास पेंच पडेल, ही गोष्ट खरी आहे. यास्तव जरूर जावें. पुढें टिकून बंदोबस्त करणें पैक्यावांचून होत नाहीं. पातशाहास दरमहाचा दरमहा खर्चास दिला पाहिजे. पैक्याची कुमक सरकारांतून जाल्यास आमचा पाय टिकून राहील. यश देणार श्रीमंतांचें दैव आहे. सरकारांत पैका आहे नाहीं हें समजलें आहे. यास्तव तोड सुचली आहे हें लिहून पाठवणें म्हणोन सांगितलें, त्यावरून लिहिलें. त्यास सरकारांत पैक्याची ओढ कोणे तऱ्हेची आहे हें पाटिलबावांचे ध्यानांत आहेच. अलीकडे पाटिलबावांचीं पत्रें येत गेलीं कीं, टिपूचे मसलतीवर फौज जावी, नाहीं तर इंग्रजांबरोबर आम्हांस जावें लागेल. त्यावरून फौज रवाना केली. लोकांचीं देणीं सरकारांत मबलग चढलीं. पैक्यास ठिकाण नाहीं. लोकांची तोड न पडे, तेव्हां जसें तसें करून थोडाबहुत पैका देऊन फौज रवाना केली. यास खर्च किती लागला हें व आजपर्यंत वीस हजार फौज व गारद व तोफखाना यांचा खर्च अंगावर किती चढला हें पाटिलबावांनीं ध्यानांत आणावें. पैक्याची तोड उत्तर अलाहिदा लिहिलें आहे त्यावरून कळेल. पातशाहास दरमहाचा दरमहा दिला पाहिजे म्हणून लिहिलें आहे. त्यास पातशाहा आपले लगामीं लागतात; इंग्रजांकडे संधान ठेवीत नाहींत; संधान लागलें असिलें तरी तोडितात; असें खातरजमेनें बोलत असले आणि पाटिलबावांची खातरजमा जाली, तर बादशाहास दरमहा खर्चास काय द्यावा लागेल याचें लिहून पाठवणें. त्याचा विचार करून लिहून पाठऊं. इंग्रजांच्या चाली सर्व पाटिलबावांचे ध्यानांत आल्याच आहेत. त्यापक्षीं जें करणें तें समजोनच करितील. भडोच, ग्वालेर व गोहदकराचा मुलूक पाटिलबावांकडे आला आहे, त्यांची बेरीज किती व ऐवज किती होईल हें लिहून पाठवणें. याशिवाय सरकारचे संस्थानिकांपासूनही कोठें कांहीं घेतलें कीं काय हें लिहून पाठवणें म्हणून आज्ञा.*ऐसियास राजश्री पाटिलबावा यानीं पत्र श्रवण करून उत्तर केलें कीं, त्यांनीं लिहिलें आहे तें प्रमाण. बादशाहाचे दरमहाचे मजकुराचीं तुमचीं आमचीं पत्रें अगोदरच रवाना जालीं आहेत. बादशाहाचे भेटीस आगऱ्यास जातच आहों. त्यांसीं बोलण्याचें पक्कें जाल्यावांचून दरमहा कबूल करूं असें कसें? पक्कें करून दरमहा कबूल होईल. इंग्रज तीन

*येथपर्यंत नानाचे पत्राचा मजकूर समजावा.

लक्ष दरमहा देतात तो कबूल करणें, त्यापक्षीं बळकटी करूनच करण्यांत येईल. परगणे भडोच ग्वालेर व गोहदकर यांचा वसूल व सरकारचे संस्थानाकडून कांहीं घेतलें हें लिहिलें आहे. तर स्वारीचा हिशेब सरकारांत द्यावयाचाच आहे. पैका आला तो मसलतीसच खर्च जाला. तो खर्च होऊन जुना सरंजाम पेस्तर तेस्तर सालें खर्च होऊन साहुकारांचीं कर्जें मबलग जालीं, आणि फौजेचीं देणीं चढलीं, तगादे आहेत, हें अगोदरचे पत्रींच लिहिलें आहे. पांचा वर्षांचे मसलतीस पैका किती खर्च जाला तो हिशेब पाहिल्यावर ध्यानास येईल. यावरून समजावें कीं, आम्हांसच हिशेब दाखवावयाचा आहे. हिशेब दिल्यावर कोणता ऐवज जमेस राहील त्याची पृच्छा करावी. स्वारी अखेर जाली नाहीं तों अगोदरच हिशेब तयार होत नाहीं. बादशाहाचें राजकारण सरकार आज्ञेप्रमाणें उपस्थित केलें आहे. त्याची समेट करणें प्राप्त आहे. ती होऊन माघारे फिरलों म्हणिजे हिशेब तयार होऊन सरकारांत येतील, त्यांत सारें समजल्यांत येईल. असें उत्तर केलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar at the instance of Mahadji explains to the Poona Minister that his expenditure on the last four years' campaigns far exceeded the receipts from his Jagir and conquests. So he expected the Poona Darbar to supply him funds for the imperial designs undertaken by him on their advocacy.*

No. 336 About September 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री त्रिंबकराव नारायण यांजकडून सरकारचा ऐवज येणें. त्यास त्यांजकडे सरकारची जमा किती, पैकीं वसूल जाऊन बाकी काय राहिली याची माहितगारी मजला नाहीं. कारकून व खिजमतगार सरदार मशारनिल्हेसमागमें आहेत. नित्य निकड करितात. त्यावरून जावसाल राजश्री पाटिलबावांकडे होतच असतो. मी आल्यानंतर बोलणें होतच आहे. त्रिंबकरावही आले होते. अर्थ मनास आणितां ऐवजास ठिकाण नाहीं. शिवराम नाईक ऐवजदार त्यांचा फडशा शपथक्रियापूर्वक राजश्री धोंडो महादेव व पांडुरंगपंत सरकारचा कारकून यांचे विद्यमानें जाला. आतां नाइकाजवळ ऐवज नाहीं. सरदारीचा बखेडा तपसील लिहितां विस्तारच आहे. सरकार ऐवजाची गति काय याज-

करितां बावांस विचारिलें. त्यांनीं त्रिंबकरायास बोलाऊन आणून झाडपछाड केली. त्रिंबकरायाचे मुद्देयाची यादी मखलासी प्रथम जाली आहे त्याअन्वयें परगणा जंबूसर त्याचे इंग्रजाकडे गेले, त्याचा मोबदला हिंदुस्थानांत महाल द्यावा हा एक मुद्दा. दुसरा मुद्दा शिवराम नाईक आदिकरून याचे पदरचे त्यांचे हिशेब यांनीं पाहावे. सरकारांतून कुमक त्यांची होऊं नये. दोन मतलब मातबर. वरकड मखलाशाप्रमाणें उरकावयास येतील. दोन मतलब पैकीं जंबूसरचा मोबदला सरदार हिंदुस्थानांत गेल्यानंतर देतील असा जाब आम्हीं दिला. मोबदला महाल यावाच यावा असा आशय त्रिंबकरायाचा. याचीं उत्तरें आम्हीं करावयाचीं केलीं. आज महाल द्यावयासच नाहीं, कोठून द्यावा? शेवटीं सरदार हिंदुस्थानांत गेल्यानंतर महाल देतील. बावांचे मतें मोबदल्याविसीं ओढच धरितात, तर रेवा मुकुंदपुर घेतील तर कबूल करावें. हें उगेंच खलबतांतील बोलणें, त्रिंबकरायासीं बोलण्यांत आलें नाहीं. राहतां सरकार ऐवजाचा फडशा राहिला. याची वाट काय म्हणोन बावांस विचारिलें. त्यांनीं मालकास बोलाऊन पृच्छा केली. ते उत्तर काय करितात? द्यावयास जागा नाहीं म्हणतात. मोठा भ्रम शिवराम नाइकाचा, ते नाईक हिशेबाचें निमित्त करून शपथक्रिया पुढें आणून अश्रुपातही करितात. त्रिंबकराव त्यांचे हिमायतीची* गोष्ट सांगत नाहींत. आम्ही नाइकास पुण्यास पाठवा म्हणतों. तेव्हां बावांचें म्हणणें जे, सरदारी बसली यांत संशय नाहीं. जाणतां कीं शिवराम नाइकाजवळ पैका निघतो तर पुण्यास न्यावा. जो त्याजवळ ऐवज निघेल तो घ्यावा. मग त्रिंबकरायास कांहीं म्हणूं नये. मुक्त करावें. हा एक पक्ष. दुसरा पक्ष नाइकाचा हिशेब शपथपूर्वक जाला खरा. आम्हांस विश्वास येत नाहीं. परंतु पत्यामुद्याखेरीज कांहीं म्हणवत नाहीं. मोरो गंगाधर व चिमणाजी माणकेश्वर दरबारीं आहेत, त्यांचे द्वारें कांहीं शोध लागला असल्यास त्यांस येथें पाठवावें. आनंदराव मामा आम्हीं आणिले आहेत, यांचे द्वारें कांहीं नाइकाकडे लागलें तर पत्तेमुद्दे लागल्यानंतर हातीं लागेल तें सरकारांत घ्यावें. बाकी राहील त्याची हप्तेबंदी त्रिंबकरायास करून देऊन वागऊन घ्यावें. तिसरा पक्ष शिवराम नाइकाजवळ कांहीं निघतच नाहीं. तेव्हां भ्रम दवडण्यांतही फळ नाहीं. त्रिंबकरायासच निभावावें. वायदेखायद्यानीं ऐवज वसूल करून घ्यावा. चौथी तोड दिसत नाहीं असें बावा म्हणतात. त्रिंबकरायाचा आशय घेऊनच बोलत असतील.

*मदतीची.

याचे उत्तरार्थीं आज्ञा आल्याप्रमाणें बावांस सांगूं. शिवराम नाइकास तेथें नेल्यास आमचा आब (अपूर्ण).

¶*Sadashiv Dinkar explains the financial difficulties of Trimbak Rao Raje Bahadur and proposes several methods of settling them.*

No. 337 End of September 1784.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—इष्टिणाची बावांची भेटी होऊन बादशाही बंदोबस्त यांचे त्यांचे एकात्मतेनें व्हावासें लक्षण दिसतें. एक दिवस मजसीं खलबतांत राजश्री पाटिलबावा व आबा चिटणीस बोलले जे, श्रीमंत राजश्री नाना यांनीं पेशजीं लिहिलें होतें जे, बादशाही बंदोबस्त इंग्रजांचे आपले विचारें व्हावा असे वर्ण निघाले. यावरून लक्षण असेंच दिसतें. खलबतांत तर कांहींच मजकूर बोलले नाहींत. बाहेर बाहेर ऐकण्यांत येतें जे, पांच हजार फौज इंग्रजांबरोबर द्यावी. सरदार तीन नेमले. उत्तम राजश्री राघो मल्हार. मध्यम सदाशिव मल्हार, कनिष्ठ आंबूजी इंगळे असें बाहेर ऐकतों. निदर्शनास येईल तें खरें. ऐकिलें विनंती केली. हे विज्ञाना.

¶*Sadashiv Dinkar reports a visit he had with Mahadji when there was a discussion of undertaking the imperial concern in co-operation with the English.*

No. 338 End of September 1784.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—धाकटा इंद्रसेन लखनऊहून येथें आला आहे. राजश्री पाटिलबावांचीं त्याचीं दोन खलबतें जालीं. वर्तमान ऐकिलें जे, अफराशाबखानानें अबदुल अहदखान कैद केल्यामुळें इंग्रजांचा मनसबा कच्चा पडला. बादशाहाजादा आपणाजवळ आला तो कशास ठेवावा? बादशाहींत आम्ही शिरत होतों, याकरितां पाटिलबावांस राग आला असेल, म्हणून समाधान करावयास इष्टिनानें धाकटा इंद्रसेन येथें पाठविला. बावांसीं भेटून, केल्या कर्मांचा परिहार करून, मनांतील विक्षेप दूर करावा; बादशाहाजादा आम्हांजवळ आहे याचा विचार काय तो पुसावा, म्हणून आला. भेटून दोन वेळ खलबतें जालीं. त्यांतील आशय

कळला जे, बावांनीं इष्टिनास पत्र पारसी लेहून दिलें कीं, बादशाहाजाद्यास आमचे स्वाधीन करावा. बादशाहा यासीं रुष्ट असतील तर चिंता नाहीं. आम्ही विनंती करून तकसीर* माफ करून घेऊं, आणि याचे खर्चाचा बंदोबस्त करून देऊं. बादशाहा नच मानीत, तर आम्ही आपणापासून खर्च चालऊं असें पत्र इंद्रसेनाजवळ दिलें. तेव्हां सफाईचीं बोलणीं जालीं असतीलच. इष्टिनाची बदली जाली. गौरनर पदावर आणखी आला आहे. तो चेनापट्टणाकडे आला आहे म्हणोन इष्टिन विकल आहे. लखनऊहून जावयाची त्वरा फार आहे. शाहाजादा याची बंदोबस्ती करून देऊन, आपण लौकर कलकत्त्यास जावें असा मनसबा ऐकतों. इंद्रसेन धाकटा येथेंच आहे. लखनऊचें वर्तमान आलें जे, इष्टिन व थोरला इंद्रसेन छ ११ सवालीं लखनऊहून कूच करून श्रीकाशीस गेले. शाहाजादा व मीर्जा अमानी वजीर काशीपावेतों पोंहचवावयास गेले. वदंता तर असी आहे जे, शाहाजादा यांचे स्वाधीन करणार. करितात कीं नाहीं पाहावें. लखनऊस पामरसाहेब स्थापिला. तफजुल हुसेनखान पामराजवळ कारभारी करून ठेविला. मातबर आहे, शाहणा, दूरअंदेश, मनसबेबाज आहे म्हणतात. थोरले इंद्रसेनाचें पाटिलबावांचें सख्य त्यानेंच करून दिलें. तहाचीं कलमें करारांत तोच आणून गेला. कलकत्त्याहून इष्टिनाची† बदली जाहली हें वर्तमान पहिलें आलें होतें. आतां कांहीं वर्तमान आलें नाहीं. आल्यावर विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the return of Anderson Jr. as British envoy to Sindia's camp and of his being closeted with Sindia for a long time. He thinks that important decisions were taken and the English agreed to withdraw and leave Sindia a free hand in the imperial affairs at Delhi.*

No. 339 End of September 1784.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांनीं बोलाऊन वर्तमान सांगितलें जे, सरकारांतून वारंवार पत्रें येत गेलीं कीं, दिल्लीचें राजकारण इंग्रजांचे हातास

---

*गुन्हा. †ता. ८ फेब्रुवारी १७८५ रोजीं हेस्टिंग्जनें आपल्या जागेचा राजीनामा देऊन इंग्लंडास प्रयाण केलें त्यापूर्वी बदलीचा हुकूम आला.

जाऊं न पावे, तेथील बंदोबस्त आपले हातीं राहावा. त्यास आम्हीं हिन्दुस्थानांत आल्यावर आरंभीं इंग्रजांची लढाई व सलूख जाल्यानंतर ग्वालेर घेणें प्राप्त जालें. घेतली. गोहदकर राणाचें पारपत्य जाल्याखेरीज किल्ला व प्रांत राहात नाहीं समजून, गोहदकराचें पारपत्य करून, गोहद घेऊन, राणा हस्तगत केला. या तीन्ही मोहिमी मातबरच जाल्या. यांस रुपया काय खर्च जाला तो हिशेब पाहिल्यावर कळेल. या तीन्ही कामांची उपेक्षा करून दिल्लीचेंच राजकारण करूं जातों, तर कांहींच न होतें. शत्रु दरम्यान टाकून पुढें गेल्यास कार्यसिद्धि कैची? यास्तव याच कामास नेट दिले ते श्रीमंतांचे प्रतापेंकरून सिद्धीस गेले. मध्यें मध्यें दिल्लीचेंही राजकारणाचें मनन होत होतें. गुदस्तां ग्वालेरीस मोचें लागले असतां, मोचें किल्लयावर बहाल ठेऊन शाहाजादा व मीर्जा शफी यांच्या भेटी घेतल्या. नंतर मीर्जा शफी आमदानीनें दगा करून मारिल्यावर मीर्जा शफीचे जागां अफरासियाबखान जाले. त्यांसीं अनुसंधान कागदीं पत्रीं चालऊन ग्वाल्लेर फत्ते केली, गोहद घेतली, दिल्लीचा सिलसिला चालतच होता. कूच करून तिकडे जावें, तर इंग्रजांचे जाबसालांची कड लागावयाची होती. कंपू त्यांचे येणार होते ते आले म्हणजे दक्षणेस बिदा करावे, आपण दिल्लीकडे जावें, कदाचित् कंपूचे सरदारांनीं आम्हांसच समागमें चालावें म्हटल्यास, त्यांबरोबर दक्षणेस यावें, या प्रतीक्षेकरितां गोहदेनजीकच राहिलों. दिल्लीचे राजकारणाची चालना चालतच होती. इंग्रजांचें इदंमिथ्य जाल्यानंतर दुसरे राजकारणास झोंबावें असें होतें. तों इंग्रजांनीं बुद्धि व इमान बदलून कंपू न पाठविले. भेटीकरितां इष्टिनच येतो अशी आवई घालून, तिकडे टिपूचा सलूख परभारा केला तो कळूं न देतां, आपण कलकत्त्याहून निघोन श्रीकाशीपावेतों आमचे भेटीचेंच संधान स्पष्ट केलें. तेथून लखनऊस जाऊन दिल्लीचा मनसबा उपस्थित करून, मग आम्हांस लेहून पाठविलें कीं, नववे कलमाप्रमाणें टिपूचा सलूख केला असें पत्रीं लिहिलें; व टिपूचे तहनाम्याची नक्कल पाठविली. इंद्रसेन धाकटा येथें आहे त्याजकडून कलमें शद्वाचीं बोलविलीं, तीं निराळे पुरवणींत लिहिलीं आहेत. दिल्लीहून शाहाजादा पळऊन लखनऊस नेला. राजे रजवाडे यांकडे वकील व पत्रें पाठविलीं हें स्पष्ट जालें. आम्ही गोहदचे मसलतीवर असतां गुंतलोंच होतों. इंग्रजांचे कंपूची प्रतीक्षा करीत असतां दिल्लीचा सिलसिला चालला होता. बादशाहाचें मानस, आम्हीं दिल्लीस येऊन बंदोबस्त करावा. बादशाहास खर्चास द्यावें तर गोहदेस अटकलों. यांचा व इंग्रजांचे कंपूचा निर्गम न होतां दिल्लीस कसें जावें? दिल्लीचे मन-

सब्यांत अफरासियाबखान व गोसावी, अबदुल अहदखान, हीं राजकारणें निरनिराळीं चालत असतां इंग्रज लखनऊस येऊन नमूद जाले. गोहद फत्ते जाली, व कंपूची बेइमानी इंग्रजांनीं केली. दोहींचा शेवट जाला. आतां बादशाहा व इष्टिन दोन संधानें राहिलीं आहेत. त्यांत इष्टिनाकडे कागदीं पत्रीं अनुसंधान चाललें आहे व सदाशिव मल्हारही रवाना केले. दिल्लीचे राजकारणाची जलदी केली. बादशाहासही, शाहाजादा इंग्रजांकडे लखनऊस गेला हें जड वाटून, आम्हांस पुके पाठविले जे, आम्ही आगऱ्यास येतों; तुम्ही भेटीस येणें. या अन्वयें अबदुल अहदखान व अफरासियाबखान यांचीं पत्रें आलीं कीं, बादशाहाचा खेमा*बाहेर जाला. आगऱ्यास येतात. तुम्हीं येथें भेटीस यावें. यावरून बादशाहाचे भेटीस जाणें प्राप्त जालें. आजपावेतों पत्रापत्रीं साधनें चाललीं होतीं. आतां जातीनें जावें लागतें. यास पैका पाहिजे. पैक्यास तों जागा नाहीं. दिल्ली–आगऱ्याकडे महागाई भारी. तीन वर्षांची अनावृष्टीमुळें दाणा, चारा जालाच नाहीं. महागाई अतिशय, म्हणून मुलूख हैराण होऊन विदेशास गेला. दाणा, चारा याचें संकट आणि जवळ पैका नाहीं. बादशाहास तों बाहेर काढिलें. ते सारेच निघोन आगऱ्यास येतात. आम्ही न गेल्यास बादशाहास सहजच पेंच पडेल. मग इंग्रजांकडे मिळणें प्राप्त होईल कीं कसा विचार करील? इंग्रज पैकेकरी आहेत. बादशाहा दुसरीकडे गेल्यास आपणास पेंच पडेल. यास्तव बादशाहास मेळऊन घेतील. बादशाहासही जाणें प्राप्त होईल. म्हणजे राजकारण आपले हातचें गेलें. यास्तव आगऱ्यास जाऊन भेट तर घेतों. पुढें टिकून राहून बंदोबस्त करणें पैक्यावांचून होत नाहीं. जामगांव सोडल्यापासोन पांच वर्षें होत आलीं. मेहनतेवर मेहनत पडते, ती अंगीकारिलीच आहे. पांचा वर्षांचे मेहनत केलेले फौजेंत हाल काय राहिला, कळतच आहे. प्रसंग मुठभेड† जाला. या कालीं नवी फौज मिळते कशी? जुने फौजेचा पैका द्यावा तेव्हां जुनी फौज जाईल. पैका मिळत नाहीं. जुनी फौज आहेच. तशा फौजेनें भेटीपावेतों हिंमत केली पाहिजे. सरकारआज्ञेप्रमाणें आम्हीं राजकारण सिद्ध केलें, तेव्हां हस्तगत होण्यांतच आहे. संरक्षण दो प्रकारचें ऐकतों. आपले फौजेस पैका पाहिजे. दुसरें शाहजादा इंग्रजांनीं नेला. बादशाहा आगऱ्यास आला. अफरासियाबखान वगैरे त्याजवळ आहेत. आम्हीही जाऊन भेटलों. यावरून इंग्रज पुढें कसा मनसबा करितात, शाहाजाद्यास सोडितात किंवा लढाईस उभे रहातात? लढाईस

*डेरे, तंबू वगैरे सामान. †एका जुटीचीं माणसें नसलेला, मुठ-भेद.

उभे जाले तर बादशाहास घेऊन आपणही समोर जालें पाहिजे. ते काळीं नवी फौज मेळविणें पैक्याखेरीज होत नाहीं. बादशाहाची अवस्था कळलीच आहे. पैका मागतील. सारांश रुपया पाहिजे, तरीच मसलत शेवटास जाईल. अंदेशे करूं जातां, श्रीमंतांचे पदरीं सरदार मसलती करावयाजोगे फार आहेत. आम्हीं पांच वर्षें मेहनत केली. श्रम करून रुपयांचे पेंचांत येऊन कर्जभरी जालों. पुढें ताकद राहिली नाहीं, म्हणून आपले घरास जावें, दुसरे सरदार मातबर फौज घेऊन येतील, राजकारण बनवितील, असें घडतें, परंतु इष्टीन लखनऊस आला, शाहाजादा जवळ नेला, यामुळें अवकाश राहिला नाहीं. फार करून तोरा इंग्रजांनीं हाताखालीं घातलाच आहे. आम्ही कूच करून माघारे फिरलों म्हणजे बादशाहास मेळऊन घेतील, अगर शाहाजाद्यास तख्तनशीन करून बादशाहास ज्ञानमठीं बसवितील. इंग्रजांचा बंदोबस्त दिल्लींत जाला, मग सारेच खुष्कीवाले पेंचांत येतील. यामुळें माघारा जाऊं शकत नाहीं. पैका जवळ नाहीं. फार लाचार जालों. या समयीं मदत पैक्याची सरकारांतून जाली, तरीच आमचा पाय येथें टिकून राहील. यश घेणार श्रीमंतांचें दैव व आमची निष्ठा. वर्तमान इथ्थंभूत कळावें म्हणून सांगितलें. मदत न जाल्यास आम्हांस बादशाहास सोडून देशाकडे फिरणें प्राप्त होईल. खावंदांचे घरांत पैका आहे नाहीं हेंही जाणतच आहों. यास्तव तोड सुचली तीही सांगतों. निराळे पुरवणींत लिहून पाठवणें. त्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji, through Sadashiv Dinkar, describes at length the serious political situation and repeats his request for financial support from Poona to carry out the imperial designs undertaken by him.*

No. 340 22nd November 1784.

पैवस्ती छ २२ सफर पौष, खंमस.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. श्रीमंत दादासाहेब यांस तळेगांवचे मुक्कामीं खर्चास देविला तो ऐवज आम्हीं दादासाहेबांस दिल्हा. त्यापैकीं आम्हीं राजश्री आबाजी गंगाधर वानवळे यांच्या चिटच्या दोन, एक पंचावन हजारांची व एक पांच हजा-

रांची एकूण साठ हजारांच्या चिट्या घेऊन हरि बाबाजी याजपाशीं दिल्ह्या. ऐवज उज्जनींत द्यावयाचा करार. त्यास, श्रीमंत नर्मदेवर आडले तेव्हां आम्हीं नाइकापासून साठ हजार रुपये घेऊन हरि बाबाजीकडे पाठविले. तो ऐवज हरि बाबाजींनीं श्रीमंतांस दिला. नाइकाच्या चिट्या माघाऱ्या द्याव्या, त्यास हरि बाबाजीवर श्रीमंतांनीं दगा केला तेव्हां ते मारले गेले. त्या समयीं नगदी रुपया व कागदपत्र कुल वस्तवानी श्रीमंतांकडे गेली. त्यांत चिट्या निघाल्या. त्यावरून श्रीमंतांनीं नाइकाचे घरीं ऐवजाचा तगादा केला. यास्तव चिट्याकरितां आम्हीं आपणांस तीन चार पत्रीं लिहिलें, परंतु आपलें उत्तर येत नाहीं. नाईक तों आम्हांस चिट्या मागतात. त्यास, श्रीमंतांचे कागदपत्र आपणांजवळ आले आहेत, त्यांत चिट्या पाहून पाठवून द्याव्या. चिट्या न सांपडल्या तर सरकारची फारकती नाइकांचे नांवें पाठवून द्यावी. म्हणजे इकडील चिट्याविसींचें मागणें दूर होईल. रवाना चंद्र ८ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to write off the account of Abaji Wanavle, the banker, and give him back the letters of credit issued by him years back in Raghoba's favour at the writer's request.*

No. 341 November 1784.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटीलबावा यांनीं बोलावून सांगितलें जे, श्रीमंत दादासाहेब यांस तळेगांवचे मुक्कामींहून झांशीस रवानगी केली ते समयीं दोन लक्ष रुपये खर्चास सरकारांतून दिले. तो ऐवज आम्हीं राा आबाजी नाईक वानवळे यांजकडून हरि बाबाजी यांजकडे देविला. त्याप्रों यांणीं भरणा केला. त्यापैकीं एक चिठी पंचावन हजार रुपयांची व एक पांच हजारांची अशा दोन चिठ्या नाइकाच्या हरि बाबाजीजवळ होत्या. त्याप्रमाणें नाइकांनीं हरि बाबाजीस ऐवज दिला. उज्जनींत तो त्यानेंही घेऊन दादासाहेबांस दिला. चिठ्या नाइकाच्या माघाऱ्या द्याव्या, इतक्यांत हरि बाबाजीवर गर्दी करून धरून नेले. वस्तवानी व रोकड रुपये व जिन्नस कागदपत्र लुटून नेलीं. हरि बाबाजी तों मृत्यु पावले. नगदी रुपये व वस्तवानी कागदपत्र दादासाहेबांजवळ राहिले. त्यांत नाइकाच्या चिठ्याही होत्या. दादासाहेब सुरतेहून गंगातीरास आले, तेव्हां या चिठ्या नाइकाच्या, याजकरितां श्रीमंत राजश्री नाना यांस आम्हीं

व तुम्हीं लेहून पाठविलें होतें. त्यांनीं दादासाहेबांस लिहिलें. त्यांनीं उत्तर पाठविलें तें आम्हांकडे आलें. चिठ्या त्यांजवळ राहिल्या. दादासाहेबांस स्वर्ग-वास जाल्यानंतर कागदपत्र त्यांचे सरकारांत नेले. त्यांत चिठ्या नाइकाच्या आहेत. ऐवज नाहक नाईक देऊन चुकले. चिठ्या हरि बाबाजीच्या गर्दीत मरण्या-मुळें अशा फंदांत पडल्या आहेत. ते आम्हांस मागतात. ऐवज त्यांनीं दिला. आम्हांस ठाऊक असतां तगादा कसा करावा? चिठ्या माघाऱ्या द्याव्या, न दिल्यास त्या चिठ्यांचे रुपये नाइकास.....सांगितले तर ते आम्हांस द्यावे लागतील. याजकरितां आम्हीं श्रीमंत राजश्री नाना यांस पत्र लिहिलें आहे. तुम्हीही विनंतिपत्र लेहून दोन्ही चिठ्या साठ हजारांच्या माघाऱ्या येत म्हणजे नाइकाच्या हवालीं करूं, असें बावांनीं सांगितल्यावरून विनंती केली असे. बावांनींही सेवेसीं पत्र लिहिलें आहे त्यावरून मजकूर ध्यानास येईल. बावांचे पत्राचें उत्तर व चिठ्या पाठवावयाविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.*

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana Mahadji's request to settle the account of Abaji Naik Wanavle for amounts paid to the late Raghunathrao.*

No. 342 8th December 1784.

पैवस्ती छ २२ सफर सन खंमस समानीन,
पौष, बराबर डांक.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक महादजी शिंदे साष्टांग दंडवत विज्ञापना तागाईत छ २४ माहे मोहरम मुक्काम नजीक आलोणा प्रांत जाटवाडा पर्यंत स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. बादशाहींत इंग्रजांचा पाय न शिरावा, बादशाहींत इंग्रज शिरल्यास झाडून खुष्कीस पेंच पडेल म्हणोन स्वामींची आज्ञा येत गेली. त्यावरून दहा महिने मोहिमेस कोठें न गुंततां एक जागा राहून, कारस्थानें करावयाचीं तेथवर करून, बादशाहास लगामीं लावून घेऊन दिल्लीहून

---

*याच मजकुराचें महादजीचें पत्र नानांस वर ता. २२ नोव्हेंबर १७८४ चें आहे.

आग्र्यास आणिलें. आम्हींही कूच ग्वाल्हेरीहून करून भेटीकरितां आलों. इंग्रजांचे खुळांत होते ते सर्व दफे* हमदानी मुद्धां दूर करून, बादशाहास आग्र्याहून येथून फौज पाठवून भेटीस यावें येविसीं अर्जी केली. त्यावरून बादशाहाही आले. स्वामींचे प्रतापें सर्व खुळें दूर होऊन इंग्रजांकडील नाद बादशाहीचा तोडला. बादशाहाची भेट जाल्यावर बक्षीगिरीची अर्जी केली. त्यांणीं बक्षीगिरी व नायब मुनायबी सुद्धां वस्त्रें, खिलत, सात पारचे, व चारकुबा† व दस्तार‡ सरबस्ता, जिगे व कलगी व शिर्पेच व माला मयवरीद व समशेर व सिपार§ नालकी व मोछिले दोन व झालरदार पालखी व माही व मरातब व तोग व आलम व साहेब-नौबत नकारे व हत्ती व घोडे याप्रमाणें इनायात$ हुजुरीहून जहाले, ते सेवेसीं रवाना केले आहेत, प्रविष्ट होतील. व राजश्री बाळाजीपंत नाना यांचे नांवें खिलत व शिर्पेच व जिगा व कंठी व हत्ती, घोडा याप्रमाणें पाठविलें आहे. बादशाहाची मुख्तारी सर्व स्वामींकडे आहे. स्वामींनीं त्यांस इनायत करावी. नायब मुनायबीचे†* पदाचीं वस्त्रें घेतल्यावर वकील मुतलकीचें पद मात्र राहिलें होतें, त्याविसींही स्वामींचे नांवें बादशाहास अर्जी केली. त्याजवर त्यांणीं दसकत केलें जे, वकील मुतलकी आपल्याकडून तुमचे नांवें दिल्ही, व श्रीमंत पेशवेसाहेब यांजकडूनही तुम्हांस आम्हींच सांगितली म्हणोन दसकत केलें. कोणीकडूनही साधावें जाणोन, त्यांणीं वस्त्रें व नालकी व मोछिलें दोन सेवकास दिल्हीं तीं ऐतलीं. स्वामींचे प्रतापेंकरून येथील कामकाजाचा बंदोबस्त सर्व होईल. इकडील उपराळ्याविसीं||कारभाऱ्यांस आज्ञा करून वरचेवर सांभाळणार स्वामी समर्थ आहेत. बादशाहांनीं फौज आणखी आणवावी म्हणोन सांगितलें, व बादशाही बंदोबस्तास फौजही तशीच पाहिजे. याकरितां देशीं फौजेकरितां पत्रें पाठविलीं आहेत. परंतु वोढघस्तीमुळें पैशाची सरबरा जाली पाहिजे यास्तव विनंती लिहिली आहे. तरी फौजेचे व बादशाहाचे खर्चाविसीं कारभाऱ्यांस आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. इंग्रज, बादशाहास तीन लक्ष रुपये द्यावयासी सिद्ध असतां, बाद-

---

*मुद्दे. †चारकुबा=एक अंगरखा असतो, त्यास बाह्या नाहींत, बाहूपावेतों आणि आगापिछा मात्र असतो; आणि आघाडीस व बाहूवर मोत्यांची झालर असते. ‡दस्तार=पागोटें. §सिपार=ढाल $बक्षीस मिळाले. †*प्रतिनिधित्वाचे. ||साह्य.

शाहास खर्चास द्यावयाचा करार येथून करून इंग्रजांकडील लक्ष तोडलें आहे. यास्तव बादशाहाचे खर्चाची पैरवी सत्वर होऊन यावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji writes to the Peshwa of his visit with the Emperor having successfully terminated and of the latter having conferred on him (the Peshwa) the office of Naib-munayabi; and the high office of Vakil-ul-Mutlaq was conferred on Mahadji. The Peshwa is pressed to supply funds.*

No. 343 10th December 1784.

पैवस्ती छ २२ सफर पौष खमस समानीन, डांकेबराबर.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २५ मोहरम मुक्काम भुसावर नजीक किल्ले वैर* जाटवाडा स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष :—बादशाहाकडून नायबमुनायब हें पद श्रीमंतांचे नांवें राजश्री पाटिलबावा यांनीं घेतलें. खिलत, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, माहीमरातब, तोग अलम, नकारा साहेबनौबत, नालकी व मोरछलें दोन व झालरदार पालकी व स्वामींस खिलत, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडा याप्रमाणें बादशाहापासून इनायत जाल्याचें वर्तमान तपशीलवार श्रीमंतांचे व स्वामींचे पत्रीं पाटिलबावांनीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. श्रेष्ठ पद वकीलमुतालकी आजपावेतों कोणास दिलें नवतें, तें बावांनीं श्रीमंतांचे नांवें मागितलें. सवाल म्हणिजे अर्जी लेहून दिली. त्याजवर दसखत बादशाहांनीं केलें कीं, वकिलीमुतलक आम्हीं आपणाकडून तुम्हांस दिलें. श्रीमंतांकडूनही आम्हीं तुम्हांस दिलें असे. अर्जीवर दसखत करून खिलत एक च्यारकुबा जरी व नालकी जुनी बरोबर होती ती व दोन मोरछलें बावांस वकीलमुतलकीचा खिलत दिला. सवाल वकीलमुतलकीचा म्हणिजे बावांची अर्जी त्याजवर

*Bhusavar is 30 miles s. w. and Weir 15 m. s. of Bharatpur.

बादशाहांनीं दसखत केलें. त्या अर्जीची नकलच सेवेसीं पाठविली आहे. नायब-मुनायबीचा खिलत व बक्षीगिरीचा श्रीमंतांचे नांवें बादशाहांनीं दिला, तो श्रीमंतांकडे रवाना करण्याविसीं बादशाहाची जलदी आहे. बावा म्हणतात, बादशाहाकडील गृहस्थ बरोबर येणार, त्याबरोबर तूं जाणें. मीं उत्तर दिलें जे, येथें सरकारचे जाबसाल पडतात ते कोणी करावे? मजपासीं दुसरा कारकून आपणासीं जाबसाल करावयाजोगा नाहीं. येथील काम कसें चालेल? कामें म्हटलीं तर इंग्रजांकडील जाबसाल अद्यापि निर्गमांत आला नाहीं. हबशाकडील नवेंच कारस्थान मुंबईकर इंग्रजांनीं उपस्थित केलें आहे. अशींच नवीं कामें पत्रीं लेहून येतात. त्यांचे जाबसाल कोण करितो? बावा म्हणतात, बादशाहाचा खिलत पदाचा गृहस्थ त्यांचा घेऊन जातो, तो सन्मानें यथापद्धत घेणें. गृहस्थ जातो त्याचा संतोष भेटींत व तेथील राहण्यांत व बिदागींत राखून रवाना करणें, तुजवांचून होणार नाहीं. वर्तमान तेथील बादशाहास कळेलच. त्यावरून बादशाहाची खुषी राहावी ही गोष्ट तुम्हांखेरीज होणार नाहीं. यास्तव जरूर जाणें लागेल. तेथील कामें आम्हीच करितों. स्मरण द्यावयास कोणी ठेवणें. गंगाजी हुजऱ्या आहेच. कारकून ठेविशील त्याचा निभाव आम्ही करूं. बादशाहाची मर्जी संतोष राखणें काम मोठें आहे. जाण्यास नाहीं म्हणूं नको. अशी रदबदल आठ रोज होत आहे. खिलताचा सरंजाम पैकीं बादशाहाचे येथें जिन्नस होती ती आली. हत्ती, घोडे बावांनीं विकत घेऊन तयार केले. नालकी, बमय मोरछल व झालरदार पालखी बादशाहांनीं आगऱ्यास नवी तयार करविली आहे. ती आठ दहा रोजांनीं तयार होऊन येईल इतका अवकाश आहे. आली म्हणजे रवाना करणार. चालेल तेथवर रदबदल होईल. बेमर्जीच होऊं लागल्यास उपाय नाहीं. जावेंच लागेल. छ ५ जिल्हेजचीं पत्रें आजच बावांस दाखविलीं. दिडा लक्ष्याच्या सनदा व पत्रें दाखविलीं नाहींत. इंग्रजांचा जाबसालच लाविला त्या बोलण्यांत दिडा लक्ष्याची आडचण दाखवितील, तर सनदा आणून देतों. जिमा करून घेऊन अडचण मोडावी या अर्थीं आज पत्रें दाखविलीं नाहींत. पुढें बोलतां बोलतां प्रसंग पडल्यासारखा विचार घडेल. बोलण्यांत भाव बावांचा निघाला जे, इंग्रज कलकत्त्यास गेले, आम्हीं बादशाही बंदोबस्तास हात घातला, पदें घेतलीं, हें इंग्रजांस दुःसह जालें आहे. येथें इंग्रज आहेत ते अफराशाबखाना-चा दिवाण नारायणदास याचे साधनांत लागले आहेत. रुपये देऊं करितात. आम्हांस आपटी द्यावी आणि आपण शिरावें असे फंदांत लागले आहेत. नारायण-

दासानेंच सांगितलें, तस्मात् इंग्रज मात्रागमनी यांत संदेह नाहीं. बोलण्यांत असा क्रोधच इंग्रजांवर दिसला. पुढें बोलतां बोलतां भाव समजेल. कांहीं इंग्रजांचें साधन आपले कामाचें दृष्टीस पडल्यास दीड लक्ष्याच्या सनदा व पत्रें दाखवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana Fadnis that Mahadji desired him to go to Poona to deliver properly the imperial marks of honour offered for the Peshwa.*

No. 344 10th December 1784.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ ५ जिल्हेजचीं पत्रें सादर जाहलीं, तीं छ २१ मोहरमीं पावलीं. त्यांत राजश्री पाटिलबावा यांस पत्रें, एक सरकारचें व चार स्वामींचीं, आहेत. त्यास सध्यां पाटिलबावा बादशाहीच्या कारभारांत दाट गुंत्यामध्यें आहेत. नित्यशा बादशाहाकडे जाणें. तेथून डेऱ्यास आले तरी बादशाही मंडळी बरोबर मातबर मातबर येत असते. रात्रंदिवस कारभार व खलबताखालीं दिवसरात्र जाते. गांठ पडत नाहीं. म्हणोन अद्यापि पत्रें दिलीं नाहींत. गांठ पडेल, पत्रेंही देईन, जाबसालही होईल. परंतु इंद्रसेनाचे जागिरीबद्दल दीड लक्षाच्या सनदा हमीरपूर वगैरेच्या सादर जाल्या त्याबद्दल मजकूर बावांचे पत्रांत आहेत. तीं पत्रें द्यावीं न द्यावीं हा विचार पडला आहे. कारण कीं, इंग्रज इष्टीन श्रीकाशीहून कलकत्यास इंद्रसेनासुद्धां गेले. शाहाजादा सदाशिव मल्हार याचे स्वाधीन केला. तो कूच करून लखनऊस आला. त्यासमागमें तीन चार पलटणें आहेत. सदाशिव मल्हार श्रीगयेस यात्रेनिमित्त गेले, अद्यापि आले नाहींत. आल्यावर लखनऊस येतील. पुढें शाहाजाद्याचें येणें होईल कीं अगोदर होईल न कळे. पलटणें त्याबरोबर आहेत तीं शाहाजाद्यास इकडे येण्याची जलदी करितात. बावांचे मतें पलटणांनीं येऊं नये. आम्ही आपली फौज पाठऊं त्यांबरोबर शाहाजाद्यानें यावें. बादशाहासीं करार जाला आहे जे, पलटणें शाहाजाद्यानें आणूं नयेत, आणिलीं तर आम्ही येऊं देणार नाहीं. ती गोष्ट मान्य करून, शाहाजाद्यास षुका लेहून दिला कीं पलटणें न आणावीं. यावरून सदाशिव

मल्हार याची प्रतिज्ञा राहील याचा विचार ठरेल तो विनंती करीन. बादशाही खिलत नायबमुनायब या पदाचा श्रीमंतांचे नांवें घेतला आहे, तो पुण्यास रवाना करावा; बादशाहाकडील कोणी बरोबर देतों; त्यासही तूं घेऊन जा, मजला म्हणतात. मीं उत्तर केलें, दुसरा कोणी जवळ असता तर त्यास ठेऊन मी जातों. तर दुसरा कारकून जवळ नाहीं. सरकारचीं पत्रें सादर होतात. जाबसाल आपणाजवळ पडतात ते कोणी करावे? माझें जाणें होणार नाहीं. तें बावांचे चित्तास येत नाहीं. बादशाहाची बजिदी* लौकर रवानगीविसीं आहे. तुजखेरीज बादशाहाकडील गृहस्थ कसा पाठवावा? नित्य रवानगीविसीं बोलणें करितात. नाहीं म्हणतों. कोठवर रदबदल करावी? आज्ञा स्वामींची तर असी आहे जे, इंग्रजांकडून टिपूसंबंधीं बोलणें शर्तीचें व आपले कुमकेचें व दंडा राजपुरी हबशाचें व साष्टीचें इतकीं कलमें पक्केपणें लेख दस्तऐवज आल्याखेरीज इंद्रसेनाच्या जागिरीच्या सनदा देऊं नयेत. असाच मजकूर बावांचे पत्रांत आहे. परंतु स्थिरबुद्धि किंवा उतावेळ हा प्रकार बावांचा स्वामींस विदित आहे. इंग्रजांचे तहनाम्याचे समयींचा प्रत्यय आलाच आहे. पत्रें देतांच सदरहू सनदा ठेऊन घेतील. त्यांस बोलण्यास जागाच आहे जे, इंग्रज कलकत्त्यास गेले, तेथें मजकूर लेहून जाब आणायास पाहिजेत किती दिवस? सदाशिव मल्हार येथें नाहींत. आल्यावर कलकत्त्यास पत्रांची रवानगी होईल. येथें धाकटा इंद्रसेन आहे, त्याच्यानें जाबसाल करारांत येत नाहींत. कलकत्त्यास थोरले इंद्रसेनास लिहील, त्याचें उत्तर येईल तसें बोलेल. तुम्हांस पुण्यास जाणें. जा म्हणतात. मी टाळितों. नालकी व झालरदार पालखी व मोर्छलें नवीं तयार करून आगऱ्याहून श्रीमंतांकरतां आणविलीं आहेत. आठ दा रोजांत येतील, म्हणजे रवाना करितात. तितक्या अवधींत इंग्रजांकडील जाबसाल उरकत नाहीं. सनदा आमचे हवाला करणें म्हणतील. मागून घेतील. न देतां संकट! तहनाम्याचे वेळेपासून एक वर्ष बावांचा माझा शुद्ध प्रकार नवताच. आतांशा बोलण्यांत कांहीं क्रम चालला. मध्यें झांशीवर हिसेरसिदीचे ऐवजाकरितां वरात होऊन पलटणें जात होतीं, ते समयीं रदबदल फार सख्त जाली. कसी तो तपसील समक्ष विदित करण्याचा, लिहितां येत नाहीं. पलटणें तों राहिलीं, गेलीं नाहींत. तेंही विक्षेपासच कारण जालें होतें. तो पडदा आजपावेतों चालतच आहे. टिपूसीं तह इंग्रजांनीं परभारा केल्यापासून कांहींसा क्रम उणा चालतो. आतां ह्या सनदांवरून पूर्वस्थितीस

*निकड.

येईलसें दिसतें. वर्तमान विदित व्हावें म्हणोन विनंति केली आहे. बादशाही बहुमानाबरोबर माझी रवानगी करतील. चुकणार नाहींत. हर बैठकेंत बोलणीं कमबेश होत असतात. निमित्त बादशाही बहुमानाचें मजला जाण्याविसीं असेल तर न कळे. पाठवितात खरे. यावच्छक्ती टाळीन. ऐकिलें उत्तम. नाईकत तर लाचार! खिलताबरोबर येणें पडलेंच तर उपाय नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that Mahadji was completely engrossed in the Delhi affairs and desires that the writer should accompany the robes of honour to Poona. He also explains why he did not think it expedient to deliver the sanads of the Jagir to Anderson. It is obvious how vexatious it was for Nana to have to deal with the English through the circuitous channel of Mahadji.*

No. 345 1784.

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—एके दिवशीं दरबारास बसलों होतों, तों राजश्री व्यंकटराव निंबाळकर येऊन श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस म्हणूं लागले कीं, घरींहून पत्रें आलीं कीं भाऊबंद पुण्यास जाऊन वादास उभे राहिले आहेत. त्याकरितां बापूजी निंबाळकर पुण्यास गेलेत, परंतु तो लेंकरूं, त्याच्यानें नेट धरून जाबसाल घडावयाचा नाहीं. आण भाऊबंद तों जिदीस* आले आहेत. पुण्यास जाऊन कोणाचा पक्षपात करून आपल्यास उपद्रव देणार. याकरितां तुमचें येणें देशीं घडल्यास उत्तम आहे, अशीं पत्रें घरींहून आलीं. त्यास याविसीं पर्वी एक दोन पत्रें आपलीं श्रीमंत राजश्री नानांस घेऊन पाठविलीं. परंतु तेथेंही स्मरण त्यांस कोण देतो? याकरितां आम्हांस निरोप द्यावा; म्हणजे मी पुण्यास जाऊन श्रीमंतांस विनंती करून गुंता उरकोन टाकीन. आम्ही देशीं असतां कोणी वादास उभे राहिले नाहींत. आम्ही इकडे आलों, तेव्हां जाबसालास कोणी नाहीं असें समजोन भाऊबंद पुण्यास गेले आहेत. हें कार्य विना माझ्या गेल्या वेगळें घडावयाचें नाहीं व या कामाकरितां वारंवार आपलीं पत्रें श्रीमंतांस घेऊन पाठवणें हाही पक्षपात दिसतो. हें वतनदारीस ठीक दिसत नाहीं. येणेंकरून संशय होतो जे क्षणक्षणा सिफारस पत्रें घेऊन पाठवितात. मी वादास सिद्ध आहें. परंतु इकडे आल्यामुळें लाच्यार! त्यावरून पाटीलबावा यांणीं त्यांची खातरजमा

*निकर, आग्रह.

केली कीं, पूर्वी तुमच्या कामाकरितां एक दोन पत्रें पुण्यास पाठविलीं आहेत; व त्याकरितां रामजी पाटील व गोविंदराम यांसही लिहिलें आहे कीं, तुम्हीं श्रीमंतांस विनंती करून व्यंकटराव देशीं येत तोंपर्यंत त्यांचे भाऊबंद गैरवाका समजावितील, तें न ऐकतां त्यांस निक्षून ताकीद व्हावी. त्या पत्राचीं उत्तरें आल्यानंतर मग त्याप्रमाणें तुम्हीं करावें. कार्य नच होय असें दिसल्यानंतर तुम्हांस निरोप देऊं. तूर्त उतावळी करूं नये. अशी त्यांची खातरजमा करून मला सांगितलें कीं, व्यंकटराव चाकरीचे कामास व लोकांच्या बोलण्याचे तोडीजोडीस यांचा उपयोग आहे. निरोप द्यावयाचा समय नाहीं. वेळ चाकरीची आहे. यामुळें हरएक निमित्य काढून निरोप घेऊन जातील अशांपैकीं नव्हत. भाऊबंद निकड करावयास पाहतात. त्यास श्रीमंतांनीं निक्षून ताकीद चांगले तऱ्हेनें करून, जोंपर्यंत व्यंकटराव देशीं जात तोंपर्यंत यांस तिळभर उपद्रव न व्हावा. येविसींचा बंदोबस्त होऊन उत्तर यावें म्हणजे व्यंकटरावाचें समाधान घडेल. याप्रमाणें सांगितलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar conveys to Nana Fadnis Mahadji's requestt for staying over the proceedings of the case of Nimbalkar brothers, as one of the parties, Vyankatrao could not then go to Poona as his services were required by Mahadji in the transaction of business in the north.*

No. 346 End of December 1884.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—बादशाही बंदोबस्त राजश्री पाटिलबावा करितात. साध्य होईलसें जाणून नवाबास* आशा उत्पन्न एखादें पद मिळावें असी जाली. बावांनीं पैगाम† केला कीं, साठ लक्षांची जागीर सरकारची घेतली, ती माघारी दिल्यास पदही मिळेल असें तुम्हीं लिहिलें होतें. हा उद्योग नवाब खाशांकडून जाला कीं दरम्यानच होता, शोध करून लिहिणें. तर बावांनीं नवाबाचे राजकारणाची एक गोष्ट बोलले नाहींत. पडदाच केला. आनंदीबाई निंबाळकर व बाबाराव वकील इंग्रजांचे सलुखाकरितां ग्वालेरचे मुक्कामीं आले, ते बोलत

---

*निजामलीस. †संधान.

होते. मुख्य अर्थ इंग्रजांकडील बोलण्याचा होता. येथें आल्यावर बादशाहाकडील बोलण्याचें सूत्र आढळलें. त्या संधींत हेंही बोलणें बोलत होते. ठरलें एकही नाहीं. इंग्रजांकडील क्रम कांहीं चालेना. मग बाबाराव वकील ब्रह्मावर्तास गेले. लखनऊस गृहस्थ इष्टिनाकडे पाठविला होता, त्यानें काय साधन केलें असेल, न कळे. बाबाराव ब्रह्मावर्तांतच होते. इष्टिन कूच करून श्रीकाशीस गेल्यावर मागाहून बाबाराव लखनऊस जाऊन काशीस गेले. तेथें इष्टिनासीं भेटून पैगाम केला कीं, नवाबाचा आपला हिशेबाचा फडशा होणें तो पाटिलबावांचे विद्यमानें व्हावा. इष्टिनानें उत्तर केलें कीं, आम्ही नवाबाचे कमाविसदार असतां, हिशेबाचा फडशा पाटिलबावांचे विद्यमानें करावा यास धन्याची आज्ञा असावी, येविसीं नवाबाचें पत्र आणून द्यावें. बाबारावांनीं मान्य करून इष्टिनासीं मुदत करून नवाबास लेहून पाठविलें. इष्टिनाकडील इंग्रज नवाबाजवळ वकिलीस गेलेच होते. त्यांस इष्टिनानें हें वर्तमान कळवून लिहिलें कीं, नवाबासीं जाबसाल या कलमाचा करून दस्ताऐवज अगर यादबूद कलमबंदीची करून घेणें. हा जाबसाल पाटिलबावांकडे न पडावा असें लेहून पाठविलें. त्याप्रमाणें त्या इंग्रजांनीं नवाबासीं बोलून यादी कलमबंदीची करून घेतली. कसी करून घेतली, तपसील कळला नाहीं. यादी घेतली. बाबारायाकडे पत्र नवाबाचें आलें नाहीं. कलमबंदीची यादी इंग्रजांनीं दस्ताऐवज गोऊन घेतला, हें वर्तमान बाबारायास कळल्यावर काशीहून निघोन माघारे लष्करांत आले, असें वर्तमान ऐकिलें. विनंती केली. पुढें ऐकण्यांत आलें आहे जे, इंग्रजांचे फडशाचा मजकूर बावांचे हातांतून गेला. त्यांनीं परभारा नवाबासीं गाठागाठ केली, तर आतां बावांसीं राजकारण करून वजिरीचे डौल उपस्थित करावे असें बाबारायाचें मानस आहे. अद्यापि पैगाम केला नाहीं. वकीलमुतलकी यानीं केली, तेथें वजिरी कबल करणें जडच आहे. यास पेंच फार आहेत. असें बाबाराव समजलेही आहेत. उपक्रम करतील न करतील पाहावें. कळेल ती विनंती करीन. हे विज्ञापना. मशारनिल्हेची बावांची गांठ पडली. यांनीं वजारतचा प्रश्न केला. उत्तर जालें जे, ही गोष्ट दुःसाध्य आहे. हें पद तुम्हांकडे जातें असें कळल्यावर फेट* इंग्रजांसीं बांधावा. दक्षणेंत तुम्हांवर लढाई पडेल. तिकडे इंग्रज चालून येतील. इकडेही तोच प्रसंग प्राप्त. दोन्ही प्रसंगीं तुम्ही फौज पाठऊन बाजी राखूं शकतां. यास करोडो

*वशीला, स्नेह.

रुपये पाहिजेत. बनतें कसें? गोष्ट सांगोन इंग्रजांची आमची लढाई लाऊन द्यावी इतकें दिसतें. यांत जीव काय? इतकें बोलणें जालें. याउपर होईल ती विनंती करीन. हे विज्ञप्ति.

¶*Sadashiv Dinkar informs Nana how Sindia cleverly turned down the proposal of the Nizam's agent for granting him an imperial dignity.*

No. 347 1st January 1785.

श्री

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १९ माहे सफर मुक्काम नजीक बहादरपुरा, तालुके ग्वालेर, स्वामींचे कृपावलोनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री पाटीलबावा यांनीं बोलाऊन नेऊन सांगितलें जे, राजश्री त्रिंबकराव नारायण राजेबहादर यांची सरदारीची स्थापना आपण केली त्या समयीं सरकारचे नजरेचा ठराव जाला त्याप्रमाणें फडशा व्हावा. चाकरी सरकारची व्हावी. महाल जंबूसर सुटल्यास यांचे स्वाधीन करावा, न सुटेल तर दुसरा मोबदला द्यावा. कराराप्रमाणें यांजकडून पार पडावें व सरकारांतूनही कराराप्रमाणें निर्वाह व्हावा. यास दरम्यान आम्ही. त्यास चाकरी तर हे करीतच आहेत. ऐवजही सरकारचा दिला. कांहीं बाकी ओढीमुळें राहिली असेल, तर कळल्यावर यांस सांगितलें जाईल. ओढ यांचीही राजश्री नानांस ठाऊक आहे. व सखारामबापूबद्दल लाख रुपय सोडावे. रया* करावी म्हणून राजश्री नारो शिवदेव यांजबरोबर सांगोन पाठविलें व वरचेवर पत्रेंही पाठविलीं परंतु घडलें नाहीं. सरदारी गळाठ्यांत आली. तिची उस्तवारी होऊन चाकरी घडावी, याजकरितां परगणा जंबूसर इंग्रजांपासोन सुटून सरकारांत आला आहे तो पेशजीचे कराराप्रमाणें यांजकडे द्यावा, सोडचिठी परगणामजकूरची पाठऊन द्यावी. आम्ही मध्यस्थींत आहों, त्या पक्षीं अंतर पडावयाचें नाहीं. चार माणसें सरदारींत भास भासवणारही असतच आहेत. कोणी कांहीं आर्जवबुद्धीनें बोलूं लागल्यास मंजूर होऊं नये, याअन्वयें आम्हीं पत्र लिहिलें आहे. तुम्हींही लेहून पाठऊन परगणेमजकरची

*कृपा.

सोडचिठी ये तें करणें. त्यावरून विनंती केली असे. येविसीं बावांनीं पत्र लिहिलें आहे. त्यांतील आशय ध्यानास येईल. महालची सोडचिठ्ठी देण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar, at the instance of Mahadji, requests Nana to consider favourably Trimbak Rao Raje Bahadur's case and reinstate him in his Jagir.*

No. 348 January 1785.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री आनंदराव शेषगीर कारकून यांस राजश्री आनंदराव पवार यांस आणावयास सरकारांतून रवानगी जाली. राजश्री पाटिलबावा यांस पत्रें सरकारचीं होतीं तीं दिलीं. आनंदराव पवार यांस हुजूर पाठवणें म्हणोन बावांचे पत्रीं आज्ञा होती, त्यावरून मर्जी फारच नाखूष जाली. भेटीचे समयींच पत्राचा जाब घेऊन माघारे जाणें म्हणूं लागले. आनंदराव शेषगीरही निग्रहास प्रवर्तावयास आले. तेव्हां मीं समजाऊन सांगून बिराडास लाऊन दिले. बादशाही शिरपाव वस्त्रें जवाहीर माहीमरातब मजला पुण्यास घेऊन जा म्हणून बावांची बजिदी आहे. या रवानगीचे संधीस जाबसाल विचारून घेईन. तंवपावेतों जलदी करूं नये. ग्वालेरचे मुक्कामपावेतों कांहींसा धर वृत्तीस होता. खटेमिठेपणा दोन्ही क्रम चालत होते. बादशाहाची भेट जाली. कारभार बादशाहाचा अंगास आल्यापासून मिठेपणा गेला. खटेपणाच फार करून रूढीस आहे. आम्ही कारकुनांनीं सख्त रदबदल करून नासल्यास लोक व धनी निमित्त ठेवितील. अशा चार गोष्टी युक्तीच्या सांगून राहविले आहेत. कार्यसिद्धि होतां दिसत नाहीं. जाबसाल मध्यें मध्यें केले. मी आपले यादीस आनंदराव पवाराचा मतलब लेहून दिला. बावांकडील जाबसाल तटाचाच निघतो. आनंदराव शेषगीर सरकारचे पदरचे म्हणून यांनीं तट घातल्यास लाऊन द्यावें. आनंदराव पवार चाकरीस असतां हुजूर काय समजून आणविलें आहे? त्यांस पाठवीत नाहीं. राजश्री सदाशिव पवार घरीं बसले, त्यांचे ऐवजीं चाकरी आनंदराव करितात. यांस हुजूर पाठवावयाचें नाहीं. आनंदराव शेषगीरही सेवकच, सरकारांत जाबसाल केला पाहिजे, या भयास्तव पाटिलबावांसीं उगें अधिक बोलूं लागल्यास येथें कांहीं पहिला रंग राहिला नाहीं. जर करितां आनंदराव शेषगीर यांसीं दुसरी

गोष्ट पाटिलबावांनीं सांगितली तर मजलाही बरदास्त* होणार नाहीं. मी आजपावेतों देशकाल वर्तमान लौकिक अंदेश पाहून, कधीं जलदी, कधीं नरमी, अशा रीतीनें वतणक करितों. आनंदराव यांस एकच काम म्हणून यांनीं जलदी केल्यास, बावांनीं क्षमा न करून वांकडी गोष्ट सांगितल्यास मजला आनंदरावजीचे शरीक होणें प्राप्त आहे. वस्तवानी लुटूं देऊन उत्तेर पंथ धरणें लागेल. मीं आजपावेतों फार बरदास्त केली आहे. तो अनुभव मी जाणें! समक्ष विनंती करीन. असे फार वेळ विनंती केली. येण्याविसीं आज्ञा येतच नाहीं. उपाय काय? आनंदराव शेषगीर यांनीं तट आनंदराव पवारासाठीं घातला. यांनीं सहन केल्यास उत्तम. अविवेक केला, तर एका आनंदराव पवाराकरितां आज स्पष्ट लौकिक दिसतो. येथें तर बोलण्यांत कोणती गोष्ट बाकी राहील असें तर्कास येत नाहीं. यास्तव आनंदराव शेषगीर यांस आज्ञा सादर होऊन येथून रंग राखून जात, असें जालें पाहिजे. सेवकासही येणें प्राप्तच आहे. शिरपाव घेऊन जा म्हणून जाबसाल आहेच. मीं सरकारचे जाबसाल दरम्यान घातले आहेत. त्यांचीं उत्तरें यथास्थित होत नाहींत म्हणून चार दिवस दम खादला आहे. शेवटवर अविवेकच होऊं लागल्यास मग येथें राहणें कारण कोणतें? याचे तपसील पत्रीं उचित नाहींत. समक्ष विनंती करीन. स्वामींची आज्ञा नाहीं, परंतु सरकारचीं कामें उगवल्यास मग शिरपाव घेऊन जाण्यास चिंता नाहीं. जाबसाल सरकारचे न उगवतां जात नाहीं असें उत्तर करितों. शेवट बांकूनच गोष्ट सांगतील तर गाऱ्हाणें सांगण्यांत शोभा काय आहे? आनंदराव शेषगीर यांनींही सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. त्यांस उत्तर सादर होईल त्याप्रमाणें वर्तणूक करतील. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports how greatly Mahadji had been displeased by the recall of Anand Rao Pawar to Poona and how he unceremoniously dismissed the agent sent from Poona for his recall.*

No. 349 10th February 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १७ सफरचीं आज्ञापत्रें सादर जाहलीं, राजश्री पाटिलबावांचे चौकडचाबरोबर, तीं छ २९ रबिलावलीं येथें डिगेच्या मुक्कामीं

*सहन.

पावलीं. पाटिलबावांनीं आपलीं पत्रें घेऊन माझा लाखोटा मजकडे पाठऊन दिला. तो मोठा व पोकळ होता. याचें कारण श्री जाणे! पाटिलबावांस राजश्री बाळाजी जनार्दन जांबगांवकर यांनीं काय लिहिलें असेल तें कळलें नाहीं. श्रीमंतांचें पत्र मरातब आद्यंत विनंती त्यांत शेवटील बहुत काय लिहिणें पासून हे विनंती पावेतों दस्तूर खासे श्रीमंतांचे हातें, त्यांतच बादशाही कारभारांतील पदें साधतील तीं साधून घ्यावीं; व पदें बादशाहाकडून सरकारचे नांवें घ्याल त्याची मुतालकी तुम्हांकडे दिली, तुम्ही तेथें राहून बादशाही सलतनतेचा बंदोबस्त करणें, असें स्वामिगौरवाचें व स्वामींचें पत्र येथून यांनीं पत्रें, अनेक प्रकारचे संदेह वाफगांवचे व पुण्याचे पत्रावरून घेऊन बाळाजी जनार्दन जांबगांवकर यांजकडे पाठविलीं होतीं. त्यांनीं सेवेसीं पावतीं केलीं. त्यांचें उत्तर यांचे संदेहाची निवृत्ति करून, व बादशाही कारभाराचा बंदोबस्त खातरजमेनें करण्याच्या अन्वयें असीं दोन्हीं पत्रें वाचून पाहिल्यानंतर सभा केली. तोफा केल्या. फार हर्षयुक्त होऊन नजरा घेतल्या. वर्तमान बादशाहाकडे सांगोन पाठविलें. त्यांनींही ऐकून फार खुषी होऊन मुबारकबाद* सांगोन पाठविली. आज्ञा सांगोन पाठविली. येथें हुजूर असतां कोणाचीही नौबत वाजत नाहीं, तुमचीही नौबत बंदच आहे ती वाजवायास परवानगी दिली. आठ रोज वाजवावी. मजला राहुटीहून बोलाऊन नेऊन स्वामिगौरवाचीं पत्रें श्रीमंत व स्वामींचीं दाखविलीं. एक प्रहर बैठक फार संतोषयुक्त जाली. नंतर प्रहर रात्रीस बावांनीं बरखास्त करून अंतःपुरांत गेले. दुसरे दिवशीं छ १ रबिलाखरीं बादशाहाची आज्ञा जाली कीं, श्रीमंतांचें पत्र स्वामिगौरव व मुतालकीचें आलें, तें घेऊन तुम्हीं दरबारास यावें. त्यावरून बावा स्वार होऊन बादशाहाकडे गेले. स्वामिगौरवाचीं पत्रें आलीं तीं वाचून दाखविलीं. त्यांनीं संतोष मानून मुबारकबाद व खिलत, वस्त्रें, जवाहीर, माळ, जगा† दिला. समागमीयांसही शालजोड्या दिल्या. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the great rejoicings in Sindia's camp over the approval of his policy and measures with regard to the Emperor conveyed in the Peshwa's letters.*

---

*अभिनंदन. †पागोटयावर बांधण्याचा अलंकार.

No. 350 22nd February 1785.

पैवस्ती छ १० जमादिलावल सुरूसन खमस समानीन, अधिक चैत्र मास.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १२ रबिलाखर मुक्काम किल्ले डीग प्रांत जाटवाडा स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—छ १७ सफरचीं आज्ञापत्रें राजश्री बाळाजी जनार्दन जांबगांवकर यांचे विद्यमानें राजश्री पाटिलबावांचे चौकडचाबरोबर सादर जाहलीं, तीं परभारीं बावांकडे येऊन, सेवकाचा लाखोटा त्यांजकडून, त्यांत पाटिलबावांस सरकारचीं पत्रें मरातब वाढऊन सादर जालीं, तीं परभारीं बावांस पावलीं. नकलांसहित माझा लाखोटा आला. त्यांत सरकारचे कागदांचे जाब येत नाहींत. दिनचर्येचें वर्तमान परभारें कळून तुजला लिहितों. तूं लिहीत नाहींस. सरकारकामाचे जाबसाल होत नाहीं म्हणोन आज्ञा सादर जाली. त्याचीं उत्तरें निरनिराळे विनंतीपत्रीं विनविलीं आहेत. वर्तमान दिनचर्येचें कळलें ऐकिलें तें विनविलें आहे. शरीर केवळ निसत्व जालें. सामर्थ्य किमपि नाहीं. वृत्ति बुद्धिही ठिकाणीं नाहीं. फार करून याद धरूनच लिहिलीं आहेतसें वाटतें. कदाचित् कोठें हस्तदोष, क्षीणबुद्धि व विस्मृतीनें आपली शुद्ध सोडून, अमर्यादा अथवा मतलब, गैरसाल मागें पुढें पडला असल्यास स्वामी, धनी, मायबाप क्षमा करणार समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar rebuked by Nana for not sending promp replies to his queries writes that he was reporting the various occurrences at Sindia's camp in separate dispatches.*

No. 351 February 1785.

(सदाशिव दिनकराचें पत्र)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १६ सफरचें आज्ञापत्र सादर जालें. त्यांत कलमबंदी कलमवार आज्ञा जाली बितपसील :—

सदाशिव मल्हार इष्टिनाकडे गेले. तेथें बोलणें चालणें कसकसें केलें, दिलें घेतलें काय, करारमदार कसकसा केला, शोध करून लिहिणें म्हणून आज्ञा.

ऐशास माारनिल्हे ग्वाल्हेरीहून लखनऊस गेले. तेथें जालें वर्तमान बावा सांगत होते तितकें विनवीत होतों. आतां बावा कांहीं बोलतच नाहींत. दिवसरात्र बादशाही कारभारांत निमग्न आहेत. एखादे समयीं गांठ घालून विचारावें तर आमचें इंग्रजांचें राजकारणच नाहीं, त्यांनीं मात्रागमन केलें, दगा करून टिपूसीं सलूख केला, आतां त्यांसीं राजकारण काय? असें म्हणतात. परभारा शोध तर येथें सदाशिव मल्हार आल्यावरच शोध लागेल.

लष्करांत वकील कोणकोणाचे आहेत, त्यांचीं बोलणीं काय होतात, शोध करून लिहिणें म्हणून आज्ञा. ऐसियास वकील येथें सारे राजेरजवाडे व लहान मोठे मोगले सरदार सर्वांचे आहेत. पैकीं :—

१ जैपूरकरांनीं यांचा* यशवंतराव वाबळे यास सहपुत्र जिवें मारिला. सबब जैपुरकरांवर मर्जी तलख† आहे. सध्या बादशाही कारभारांत वीस लक्ष रुपया घेऊन पैकीं नख्त दोन लक्ष, दोंचें जवाहीर, सोळा लक्षांचे भरणे यास मुलूख लाऊन घेतला. आज इतकाच काबू चालला. पुढें हात चालतां नेष्तनाबूद करावें मानस आहे. हें जैपूरकरांसही समजलें आहे.

वकीलही येथें आहे. जाबसाल कांहीं नाहीं.

१ मारवाडचे वकील आहेत ते जुनाच जाबसाल करितात. बिजेसिंगाचे ठायीं फार रुष्टता आहे. तोही समजला आहे.

१ गोहदकर राणा पळून गेला. त्यास करोलीकर राजा माणिकपाल यानें ठेविला होता. आमदानीचें पारपत्य जाल्यावर करोलकर राजानें राण्यास आणून लष्करांत बावांचे हवाला केला. यांनीं राण्यास घेऊन ग्वालेर किल्लचावर बेडघा घालून कैद सहकुटुंब ठेविला आहे. येथें त्याचें कोणी नाहीं.

१ भोपाळचा वकील येथें एक कायत‡ आहे. एक वेळ नजर घोडे, बंदुका, कमाना आणून दिल्या होत्या. तो येथेंच आहे. जाबसाल त्यासीं कांहीं दिसत नाहीं. शोध करितां कांहीं लागत नाहीं.

१ शिखांकडील वकील.

१ बुडिया सारणपूर यमुनातीरीं आहे. तेथील शिखांकडून भीमसेन म्हणून ब्राम्हण पचावलीचे मुक्कामापासोन वकील येथें होता. त्याचें राजकारण येथें

---

* यांचा म्हणजे महादजीचा नोकर. †रुष्ट. ‡कायस्थ.

कांहीं सिद्ध जालें नाहीं. यांनीं कांहीं त्यास खर्चास दिलें नाहीं. त्यानें लष्करचे लोकांचीं कर्जें खाऊन पळून गेला.

१ आतां पानपताकडील शिखांकडून एक दोन वकील यतात जातात. जाबसाल आपले पोटाचा करितात. हे मानीत नाहींत. शिखांनीं आजपावेतों लाहोरापासोन मुलूख दाबलाच आहे. सर्‌हिंद किंबहुना कुंजपुरा येथवर दरोबस्त मुलूख घेतलाच आहे. तल्हेटी दिल्लीचे सदर महालीं रखी म्हणिजे खंडणी दरसाल घेतात. तो क्रम चाललाच आहे. आंबूजी इंगळे दिल्लीकडे गेले. जमाव पाडिला आहे. शीखही जमा जाले आहेत. काय घडेल तें खरें. शीख आपणास जबरदस्त म्हणवितात.

१ मीर्जा अमानी वजीर याचा कारकून डांकेवर मात्र येथें आहे. जाबसाली वकील नाहीं.

१ दतियेकराकडील फत्तेसिंग कारभारी येख्त्यारी ग्वालेरीस छावणींत देखील होता. ग्वालेरीहून बावांचें कूच इकडे जालें, तो दतियास गेला. आतां एक कारकून वकिलीस आहे.

इंग्रजांकडून वकील

१ धाकटा इंद्रसेन पहिलाच आहे, तो विदितच आहे.

१ हल्लीं कलकत्त्यास फरासीस बहाल होऊन दाखल जाला. त्याजकडन एक इंग्रज आला आहे.

१ जाबतेखान रोहिलाचा लेक येथें होता, तो मागेंच घरास लाऊन दिल्हा. वकील जाबतेखानाचा आहे. सांप्रत जाबतेखान* मेला. त्याचा लेक तेथें आहे. कागदपत्र त्याचे येत असतात. त्या पुत्रास येथें यांनीं बोलाविलें व आंबुजी इंगळे यांसही सामील होणें असें लिहिलें आहे. काय करितो पहावें.

१ किरकोळ रोहिले पठाण यांचे वकील कोणी खासे बेरोजगारी आहेत. येतात, रोजगाराचा तलास करितात.

१ बुंदेलखंडपैकीं

१ हिंदुपताकडील आजपावेतों संस्थान बेणीहुजुरीनें चालविलें. सरनेतसिंग जेष्ठ पुत्रास राज्यापैकीं कांहीं हिसा देऊन बाहेरच ठेविला. अनुरुधसिंग धाकटा

*ता. २१-१-१७८५ रोजीं झाबतेखान मरण पावला.

पुत्र बेणीनें जवळ ठेऊन डौल चालविले. परंतु आंतून, राजा व चोब्या कालिंजर-गडांत आहे ते एक होऊन बेणीस कैद करावयाचे मनसब्यांत होते. आतां अनुरुधसिंग मेला. त्याचा धाकटा भाऊ धौकडसिंग बेणीजवळ असोन आंतून चोब्याचे मनांत आहे. परंतु काबूंत आहे. जाऊं पावत नाहीं. चोबे सरनेतसिंग गजसिंग कालिंजरीं मिळाले. फौज जमा केली. बेणीही फौजबंदी करून बाहेर निघाला आहे. लढतात काय करितात पहावें. इकडे वकील कोणी आला नाहीं.

१ चोबे व सरनेतसिंग गजसिंग एक होऊन फौजबंदी आहे. इकडे वकील कोणी आला नाहीं.

सदरहू दोघांचे वकील नाहींत. खुमानसिंग, गुमानसिंग यांनीं गजसिंगाचा मुलूख दाबला आहे. गुमानसिंग निपुत्रिक मेला. त्यानें जिवंत असतां भावबंदाचा पुत्र मधुकरसा दत्तक घेतला होता. खुमानसिंग म्हणतो माझा पुत्र घेऊन स्थानापन्न करणें. गुमानसिंगाचे कारभारी यखत्यारी आहेत ते मानीनात. म्हणन खुमानसिंगानें वकील बावांकडे पाठविला. खुमानसिंगाचा बावांचा पगडीबदल आहे, त्या हिमायतीवर वकील पाठविला. वर्तमान ऐकून बांदेकरांनीं वकील गुदस्तांच पाठवून, साडेपांच लक्ष शिवाय दरबारखर्च गजसिंगाचे मुलुखाचे ऐवजीं कबूल करून, निशा साहुकारी दिली. सावकाराचा रुपया दोघांनीं वारावा असा येथें करार ठराऊन सनदा दोघांचे नांवें यांच्या जाल्या. सदर बेरजेपैकीं वांटणी दरशेंकडा निमेनिम द्यावे. परंतु गुमानसिंगाचा पुत्र मधुकरसा ठराऊन टिका घेतला. सबब चौपन रुपये शेकडचांत टिक्या सुद्धां बांदेवाल्याकडे ठरले. त्याप्रमाणें त्यांनीं पैका साहुकराचा दिला. खुमानसिंग पैका देत नाहीं. वकील दोघांचेही येथें आहेत. पैक्याचे वसुलाकरितां एक कारकून, राऊत, गाडदी खुमानसिंगाचे येथें जाऊन बसले आहेत. रुपया देत नाहीं, म्हणून फौज खुमानसिंगावर पाठवावी. तजवीज आहे. जाते न जाते पाहावें.

१ बुंदीकोटें यांचे अमलींच आहेत. तेथें कमाविसदार यांचा आहे. सबब वकील नाहींत. कमाविसदाराचे वकील आहेत.

१ संस्थान नरवरचें वर्तमान पूर्वीच विनविलें आहे. फक्त नरवर किल्ला व शहर दोन चार गांव असतील तर न कळे, इतका ऐवज राजाकडे राहिला. त्यासच पोटाचें संकट जालें. वकील कशावर ठेवितील?

१ चंदेरीकर राजानें बेहट* किल्ला जबरदस्तीनें सोडऊन घेतला. हें वर्तमान पूर्वी विनविलें असावें. सबब तें संस्थान इतराजींत आहे. पुढें कधीं प्रसंग पडेल तो पहावा. वकील त्याचे येथें नाहीं.

१ यमुने ऐलीकडे एक रेवामुकुंदकर बघेले राहिले. त्याचा वकील येथें नाहीं.

१ संस्थान सोपार याचे कमाविसीस तेथें कमाविसदार असतो. सबब राजाचा वकील नाहीं.

१ उदेरपुरचा वकील येथें नाहीं. सिमथरकर गुजर खासाच येथें आहे. त्याचा मजकूर दुसरे कलमांत विनविला आहे.

१ यमुनेपार अंतरवेद व पुढें पूर्वेस समुद्रतीर बंगालापावेतों वजीर इंग्रज.

१ भदोरियाची भीड†सरकारांत पेशजींच घेऊन अटेर परगणा दिडा लक्षाची जागा त्यास कैलासवासी श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं दिली होती. ती अटेर हल्लीं बावांनीं घेतली.

पाटिलबावांचे वकील कोठें कोण गेले आहेत व जातात हें लिहिणें म्हणोन आज्ञा. ऐशास सध्यां वर्तणूक आहे बितपसील :—

१ बादशाहाजवळ आनंदराव नर्रासिंह येरूळकर गृहस्थ, पेशजीं सहा वर्षांचे स्वारींत बादशाहा आगऱ्याहून आणून दिल्लींत स्थापना केली ते समयीं वकिलीस होते, तेच आनंदराव आतांही आहेत. सध्यां खासा बावासमागमेंच आहेत. बादशाहाकडील बोलण्यांत आहेत. पैगाम‡ नेतात आणितात. बादशाहाकडील एक फकीर निजामुद्दीन म्हणून तोही निरोप आणतो नेतो.

१ इंग्रजांकडे सदाशिव मल्हार आहेत. इष्टिनाकडे मशारनिल्हे गेले ते अद्यापि लखनऊस आहेत. येतील. तेथें इंद्रसेन आहे. त्याजवळ मशारनिल्हेकडील आपा परभू म्हणून त्याजदेखतांच होता तसा आहे. निरोप आणतो नेतो.

१ नारो काशी म्हणून लखनऊस अखबारनवीसीवर आहे. लखनऊस कलकत्ते आदिकरून बातम्या येतात. लिहीत असतो.

१ मारवाडांत जोतपुरीं बाळराव याचे निसबतीचा वकील रामराव सदाशिव म्हणून फार दिवस आहे. त्यासीं बिजेसिंग राजाची नाखुषी आहे. ग्वालेरचे

*बिहट रेवाच्या वायव्येस २० मैल. †भिंड. ‡निरोप, बोलणें.

मुक्कामीहून गणेशपंत चक्रदेव निसबत बाळाराव यास जोतपुरास पाठविला होता. पैक्याचे वसुलास जयाजी शिंदे मारले त्याचा खंड दोन तीन लाख रुपये दरसाल द्यावे. अजमेर किल्लच्या सुद्धां याजकडे दिलीच आहे. खंडाचा रुपया दरसाल येत नाहीं म्हणून गणेशपंत पाठविला होता. चार महिने जोधपुरीं राहिला होता. राजानें थोडेंबहुत खर्चास दिलें. बाकी लागेल तें यानें कर्ज करून खर्च केला. सरकारचा रुपया राजानें कांहीं दिला नाहीं. निरोप घेऊन उठोन आल्यावर राजानें लाख रुपयांच्या हुंड्या आपले वकिलाकडे पाठविल्या. त्यांनीं बावांस दिल्या म्हणून ऐकतों. गणेशपंत खर्चाबद्दल कर्ज देण्याचें गाणें गातो. कोणी ऐकत नाहीं. सध्यां गणेशपंतास डीग किल्लचाची फडणिशी सांगितली आहे.

राजेरजवाडे संस्थानिक यांजकडील कोणाचें बोलणें कसें आहे, शोध करून लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास—

१ संस्थान जैपूर व मारवाड येथील जाबसाल वकील मंडळींत विनविला आहे अधिक नाहीं.

१ संस्थान दतिया याजपासोन पैवस्तां दो सालांत चार साडेचार लक्ष रुपये घेतले म्हणोन ऐकतों. पुर्ता शोध लागला नाहीं. वकील त्याचा येथें आहे, त्यास ताकीद आहे जे, शेवढें सरकारचें, पानपत जाल्यावर तुम्हीं घेतलें, त्याचा पैका तुम्हांकडे राहिला आहे तो घ्यावयाचा आहे. त्या ऐवजीं साठ हजार रुपयांची जागा गांव सिमथर राजधर गुजर यास देणें. त्यांत एक गढी मातबर राहावयास देणें असा तगादा आहे म्हणोन ऐकतों. पुर्ता शोध नाहीं.

१ राजधर गुजर सिमथरकर पचावलीवर इंग्रजांचे लढाईंत तीन चारशें स्वारांनसीं सामील जाला होता. त्याजवर कृपा करून परगणा महूमोहनी तालुके भांडेरपैकीं त्याजला नानकार* लिहून दिली, व कितेक मतलबांची यादी त्याची करार करून दिली. त्यानें चाकरींत हजर राहावें. करार ठरला त्याप्रमाणें तो दों तीनशांनसीं बरोबर होताच. ग्वाल्हेरीहून कूच करून चमेलपार आले. चार पांचशांनसीं गुजरमजकुरासही समागमें आणिला. हमदानीचें पारपत्य जालें. बादशाहाची भेट जाली. कारभार हातास आला. इतकें अनुपगीर गोसावी यानें केलें. सबब त्याचे नादांत शिरणें प्राप्त जालें. त्याजबरोबर आप्त दुसरा नाहीं. मागेल तें द्यावें असें जालें. त्यानें परगणा महूमोहनी मागितली ती दिली.

*नान=भाकर निर्वाहापुरती.

राजधर गुजर तो माहाल देईना. बळास आला. शेवटीं दारू अंथरून वर कुटुंब सुद्धां आपण बसून उडून जाऊं लागला. तेव्हां दतियेकराकडून शेवढें संस्थानचे ऐवजीं साठ हजार रुपयांची जागीर मातबर गढी सुद्धां करार करून समजूत पाडून महुमोहनी सोडऊन गोसावी यास देविली.

अनुपगीर गोसावी हिंमतबहादर यानें बादशाहातच आणून दिली, सबब तो मागेल तें देणें प्राप्त जाणोन त्यानें मागितलें तें दिलें. बितपसील :—

१ तालुके भांडेर सरकारांतून बावांस दिली, ती दरोबस्त परगणा महू-मोहनी गुजराकडील व झांशीचे गिर्दीचे* गांव सुद्धां दिले. आपला कमाविसदार उठऊन अमल स्वाधीन केला.

१ शेवढें संस्थान निराळें सरकारचें होतें, तें संस्थान भिन्न सरकारांत आलें होतें. पानपतानंतर दतियेकरांनीं घेतलें आहे. तें गोसावी यानें मागितलें. सनद लेहून दिली, त्यानें जबरदस्तीनें सोडवून घ्यावें.

१ मोट पहिलीच गोसावी यानें दाबली आहे. त्यापैकीं कांहीं गांव त्रिंबकराव नारायण राजेबहादर यांजकडे आहेत, तेही गोसावी मागतो. त्याचें काय ठरतें पाहावें.

३ मिळून ९

१ काशीकर राजा चेतसिंग यांजबरोबर आहे. त्यास बावांनीं पांच लक्ष रुपये कमाल बेरीज युगांतरीची काढून जागीर लाऊन दिल्ही, तपसील :—

१ तालुके मोरतवाव वगैरे गांव.

१ तालुके झांशीपैकीं तालुके राण्यानें दाबले होते, ते गोहद घेतल्यावर बावांनीं आपणाकडेसच ठेविले आहेत, त्यांपैकीं देवगड.

१ पंचमहालपैकीं परगणा पवया देहात सुद्धां. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

This important dispatch from Sadashiv Dinkar to the Poona Minister is a detailed report of the transactions effected by Mahadji. The items of interest are the negotiations with the agents of the Rajput States, Jaipur, Jodhpur, Datia, Narwar, Chanderi, Bundi Kota and of those of Bundela and Sikh chieftains. It also contains information of the doings of Mahadji's Uakils at various centres such as Delhi, Lucknow, Jodhpur, Ajmer, etc. The report is a review of the political situation of the time and was submitted at the express desire of Nana.

*परीघ, भोंवतालचा प्रदेश.

No. 352 February 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—नजफकुली दिल्लींत आहे. बादशाहींत सर्व यखत्यार मुखत्यार राजश्री पाटिलबावा जाले ऐकून नजफकुलीस वाईट वाटलें. त्याचें शिखांचें आंतून संधान लागलें. शीख जमा होऊन दिल्लीचे तल्हेटींत आले. पहिलेपासून देखील रखी* घेत आहेत. शहरांत बादशाहाचा अमल, बाहेर पुरे यांत अमल शीखांचा. या वेगळी धामधूम करितात. असे शीख प्रबल होऊन गेलेच होते. नजफकुलीचें वर्तमान आलें जे, शिखांसीं मिळोन पंचवीस तीस हजार जमाव त्यांचा दिल्लीचे आसपास आणिला. मुलूख लुटितात. या खबरेवरून बादशाहांनीं दिल्लीचे बंदोबस्ताविसीं आशंका घेतली कीं, बादशाहाजादे सिलेमगडांत फार आहेत. नजफकुलीनें एखादा शाहाजादा बाहेर काढून तख्तावर बसवितील मग तुम्हांस आटोपतील कीं काय? यास्तव बावांनीं राजश्री आंबूजी इंगळे यांची रवानगी दिल्लीस केली. समागमें जमियत आपली फौज पांच हजार, पांच पलटणें व अफ़राशाबखानाकडील फौज पांच हजार, चार पलटणें व माचेडीवाला राजा निसबत जैपूरकर दोनेक हजार, एकूण वीस हजार कंबेश पाठविले, ते दिल्लीस पोंचले. नजफकुलीची भेटी जाली म्हणोन वर्तमान ऐकतों. नजफकुलीचें पत्र बावांस आलें कीं, मी शिखांसीं मिळालों, असें कोणीं आपणांस सांगितलें? तर अशी हरामखोरी आमच्यानें होणार नाहीं. आंबूजी इंगळे आपण रवाना केले आहेत ते येथें येतात. भेटी जाल्यावर ही जागा त्यांचे स्वाधीन करून मी भेटीस येतों. नजफखानाचा आपला स्नेह, मजला त्यांचेच जागां आपण आहेत. बेइमानी सहसा होणार नाहीं. आंबूजी दिल्लीस पावले. पुढें कसा विचार होतो पहावा. नजफकुली आंबूजीस भेटला. एक जागांच आहेत. पानपताकडे शिखांनीं जमाव धरिला. आंबूजीचे लष्करचीं उन्टें कहीचीं कांहीं नेलीं. त्यावरून आंबूजी व नजफकुली व मोगली फौज पानिपतासुमारें डेरेदाखल जाले. शिखांवर जाणार ऐसें वर्तमान आलें आहे. दिल्लीचे आस गुजरजात† जमीदार आहे, तो दिल्लींत चोऱ्या करी, दरवडे घाली. गवते डोईभारा गवत आणावयास जात, त्यांजपासोन माणसीं पैसा दोन पैसे घ्यावे तेव्हां कापूं द्यावें, वाटा माराव्या, चालूं देईना. असा उपद्रव त्याचा होता. आंबूजी दिल्लीस गेल्यावर त्या गुजराचें वर्तमान आलें जे, हजार बाराशें जमावानसीं

*खंडणी. †जातीचा गुजर किंवा जेत्या गुजर?

कोठें लग्नास आला आहे. तो जागा जवळ होता. आंबूजी स्वार होऊन गेले. गुजरास कळलें. तोही तयार होऊन उभा राहिला. लढाई बरी जाली. तीन चारशें माणूस व खासा गुजर बमय पुत्र जिवें मारिला. बाकी पळून गेले. मोठा उपसर्ग दिल्लीचा तुटला. यश आंबूजीस आलें. जाबतेखान गौसगडांत होता तो लोणीतरल* होऊन मृत्यु पावला. ऐकून शीख गौसगडावर चालून गेले. तों जाबतेखान खराच मेला. त्याचा पुत्र होता. त्याजवळ कांहीं जमाव होता. तयार होऊन बाहेर निघोन शिखांसीं लढाई जाली. चार पांचशें शीख मारिले. बाकीचे पळून गेले. हें वर्तमान जाबतेखानाचे लेकानें बावांस लेहून पाठविलें. त्याचें उत्तर बावांनीं पाठविलें जे, उत्तम काम केलें. आतां आपले जमावानसीं आंबूजीस सामील होऊन राहावें, शिखांचें पारपत्य करावें. श्रीमंतांचे प्रतापेंकरून पाटिलबावांस आजपावेतों यश आलें. शिखांचे लढाईंत काय घडतें पहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana Mahadji's activities. He sent a force against the Sikhs who had started plundering in the vicinity of Delhi at the instigation of the Mughal Chief, Najaf Quli Khan. He also reports the death of Zabeta Khan at Ghosgarh on 21st Janvary* 1785 *and the destruction of the dacoit Jeta Gujar.*

No. 353. 27th March 1785.

पैवस्ती चंद्र ५ जमादिलाखर सन
खंमास समानीन अधिक चैत्र मास.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १५ जमादिलावल मुक्काम नजीक आगरें स्वामींचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—दिनचर्येचें वर्तमान वगैरे पुरवण्या निरनिराळ्या विनविल्या आहेत, त्यांवरून सकलार्थ विदित होतील. याउपर होत जाईल त्या वर्तमानाचे पत्राची रवानगी वरचेवर होत जाईल. शरीर-विकलतेमुळें लाचार आहें. उद्योगेंकरून आळसावर साहेबचाकरींत बेफिकीर राहीन असें होणार नाहीं. विकलतेमुळें अंतराय येतो. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a mere covering letter from Sadashiv Dinkar to Nana, communicating his ill-health in addition.*

---

*Blood-poisoning ?

No. 354. 29th March 1785.

पैवस्ती चंद्र १२ जमादिलाखर सन खमस समानीन चैत्र मास.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे, विशेष. डिगेचा किल्ला हस्तगत जाहल्यावर अकबराबादचे* किल्ल्यांत किल्लेदार होता, त्यास बादशाहाचा शुका, किल्ला खालीं करून देण्याविषयीं पाठविला असतां किल्लेदारानें बदमामलीची गोष्टी सांगितली. त्यावरून राजश्री रायाजी पाटील यांसमागमें फौज व पलटणें व तोफखाना देऊन आगरेस रवाना केलें. किल्लेदाराची नजर हरामखोरीची. त्यांत आगऱ्या सारिखा किल्ला हातीं; किल्ल्यांत सरंजाम पोख्त; तोफा मोठ्या चाळीस पन्नास शेर गोळ्यांच्या; दिडशे दोनशे पर्यंत जरब†; माणूसही फार लढाऊ; यामुळें किल्लेदारानें सुप्रवर्तीनें जाबसाल न करितां गोळी वाजविली. तेव्हां पारपत्यच करणें प्राप्त जहालें. रायाजी पाटील यांनीं मोर्चेबंदी करून लढाई सुरू केली. किल्लचाचे बाहेर लोक होते त्यांसीं लढाई करून मारून किल्ल्यांत घातलें. तोफांची व गरनाळांची व गर्भछाट तोफा गुबारासमागमें‡ होत्या त्यांची मार दिल्ही. वीस पंचवीस रोज किल्ला लढला. किल्ल्यांत सरंजाम पोक्त, माणूसही लढवयी चांगले होते, तोफाही भारी, परंतु श्रीमंतांचे प्रतापेंकरून छ १५ रोजीं§ किल्ल्यांत ठाणें बसलें. आपणांस कळावें याकरितां लिहिलें असे. शीख वीस पंचवीस हजार जमा होऊन दिल्लीपासून बारा पंधरा कोसांवरी आले आहेत. त्यांचे मुकाबल्यास राजश्री आंबाजी इंगळे फौजे सुद्धां पुढें रवाना केले होते ते आहेत. त्यांचे मदतीस फौज व पलटणेंही येथून पाठविलीं आहेत. मागाहून आम्हीही कूच करून जात असों. शिखांचें पारपत्य थोडक्याच दिवसांत होईल. रवाना चंद्र १७ जमादिलोवल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji communicates to Nana his capture of the for of Agra after severe fighting.*

---

*आग्रा. †नग. ‡गुबार.-a mortar for throwing shells.

§ता. २७-३-१७८५

No. 355. March 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—कलकत्त्याचें वर्तमान, इष्टीन कलकत्त्यास गेल्यावर कांहीं दिवस राहून, मागती इकडे यावयाचे उद्देशें कोस दीड कोस निघोन, इकडे मुकामास आला होता. त्यास कौसलदारांनीं माघारा नेला. विलायतीस जावयाची ताकीद केली. एक वर्तमान आहे जे, जाहजांत बसोन थोरला इंद्रसेन सुद्धां विलायतेस गेला. दुसरें वर्तमान आहे जे, आठा पंधरा रोजीं जाणार निश्चय. बदली जाली, दुसरा गौरनर आला, असीही बोली आहे. ऐकण्यांत आहे जे, इष्टीन आपला नायब ठेऊन जाणार. सिद्धांत वर्तमान येईल तें विनंती करीन. इंग्रजांकडील जाबसाल तहाचे होणें. सध्यां जंजिरेकर हबशाची कुमक मुंबईकर करितात. तहनाम्यांत कलम लिहिलें आहे जे, श्रीमंतांचा दोस्त तो इंग्रजांचा दोस्त. इकडील दुष्मन तो इंग्रजांचाही दुष्मन असें समजून, इंग्रजांनीं कुमक त्याची करूं नये. असेंही कलम लिहिलें असतां हबशी जंजिरेकर सरकारचे प्रांतांत दंगे करीत असतो. त्याचें पारपत्यही गोविंदराव मानकर करीत असतां मदगडचा किल्लेदार हबशाकडील माणकराकडे आला. माणकराचीं माणसें मदगडास गेलीं. मुंबईकर इंग्रज म्हणतात, जंजिरेकर कंपनीचे दोस्तींत आहेत, ते सरकारांतही दोस्त समजून मदगडचा किल्लेदार हबशाचे स्वाधीन करावा. आम्हास त्याची कुमक करणें प्राप्त आहे. त्यास, कलकत्तेकरांचें पत्र पाठवावें कीं, जंजिरेकर हबशाची कुमक न करणें. सरकारचे जाबसाल हबशाकडे असतील ते सरकारांतून समजून घेतील. अशा अन्वयें कलकत्तेकराचें पत्र मुंबईकरास पाठवावें, म्हणून स्वामींचीं पत्रें बावांस व सेवकास दोन तीन आलीं. त्यावरून बावांस बजिदी बहुत केली. उत्तर करितात कीं, टिपूसीं सलूख परभारा करूं नये तह टिपूचा होणें तो श्रीमंतांचे विद्यमानें होईल, असा इंग्रजांचा आमचा करार असतां इंग्रजांनीं परभारा टिपूसीं सलूख केला. हें मात्रागमनाचेंच पाऊल त्यांनीं टाकिलें. आतां त्यांसीं आह्मांसीं सलुखाचा अर्थ काय राहिला? बादशाही मनसब्यास इंग्रजांनीं हात घातला होता, तो आम्ही मनसब्यानें उखळून टाकिला. इष्टीन लाचार होऊन लखनऊहून कूच करून कलकत्त्यास गेला. हे पेंच इष्टिनाचे चित्तांत आलेच आहेत. तेव्हां सख्य इंग्रजांचें आमचें कशाचें राहिलें? आह्मीं अमदानीचें पारपत्य करून बादशाहासीं भेटून बादशाहा आपले आवर्णांत ठेविले यामुळें इंग्रज जळतात. तत्रापि बरवण* इंग्रज बादशाहाजवळ साधनास्तव आहेच.

*Brown.

काबू चालल्यास आमचा नाश करावयास चुकतात कीं काय? गोड गोष्टी कृत्रिमाचाराच्या सांगतात. आतां त्यांचे आमचे संदर्भास जागा कोठें राहिली? आतां आमचा इंग्रजांचा जाबसालच नाहीं. मग तहाची कलमबंदी अगर बादशाहाचा जाबसाल कोठें चालतो? टिपू चालून येतोच असें खरें असलें, तर चार दिवस जंजिरेकर हबशासीं घासूं नये. चार दिवस टाळा द्यावा. हबशी, इंग्रज मुंबईकर, एक होऊन शह देतील. दुसरा टिपूचा शह. असा दुरुख शह कसा सोसेल? तूर्त जंजिरेकर हबशासीं बोलूं नये. स्वामींनीं, गोविंद शिवरामतात्याचे समयीं इंग्रजांचे मारफत जंजिरेकराचा तह केला, त्या तहनाम्याची नकल पाठविली. वर्तमान लिहिलें कीं, तो तह मात्र जाला. त्याप्रमाणें जंजिरेकरानें वर्तणूक न करितां, श्रीमंत थोरले कैलासवासी रावसाहेब यांचे समयीं हबशी कजिये करीतच गेला. इकडून पारपत्यच होत गेलें. त्याजवर कलकत्त्याहून इपटीन वकिलीस पुरंदरास आला होता ते समयीं जंजिरेकरानें दंगा केला. इकडून पारपत्य जालें. आणखी वकील मुंबईकराचे सरकारांत येत गेले. त्यांनीं येथें असतां जंजिरेकर दंगा करीत गेले. इकडून पारपत्य होत गेलें. इंग्रजांचे वकील इपटीन वगैरे दरम्यान बोललेच नाहींत. आतां मुंबईकर त्याचा पक्ष करणार, त्यास मनाई कलकत्तेकराची पाठऊन द्यावी. असे मज़कूर स्वामींचे पत्रांत लिहिले ते बावांनीं ऐकिले. मी वारंवार बोललों असतां स्पष्ट उत्तर होतें कीं, इंग्रजांचें आमचें राजकारणच राहिलें नाहीं. कलकत्त्याचें पत्र येतें कसें? याप्रमाणें बावांचे पत्राचें उत्तर पाठवावें, तर जाबच मिळत नाहीं. गांठ पडते तेव्हां वजिदी करितों. जाब मिळत नाहीं, अशी दशा आहे. मजपासीं ऐवज वक्तृत्वाचा, तो खर्चं फार करितों. कांहीं कसर होत नाहीं. स्पष्ट विनंती करणें सेवाधर्मास अयोग्य. कारण कीं, पुढें मागें दोष व निमित्त, यामुळें दम खातों. तों वरचेवर शिक्षा सादर होते. यास्तव विनंती केली असे. बादशाहास नवा गौरनर फरासीन* पदाधिकारी, कलकत्तेकराची नजर एकशें एक अशरफी, पहिला बरवण इंग्रज बादशाहाजवळ आहे त्यानें केली, असें ऐकिलें. यावरून नवा अधिकारी कलकत्त्यास आला, स्थानापन्न जाला असेल तर नजर पाठविली. तेव्हां इष्टीन कलकत्त्याहून विलायतीस गेला असेल. गेल्याचें परिछिन्न कळलें नाहीं. हे विज्ञापना. सदाशिव मल्हार यांनीं शाहाजाद्यास काशीहून लखनऊस लाऊन देऊन आपण गयेस गेले. यात्रा करून फिरून काशीस येऊन अयोध्येस गेले. शाहाजादा व वजीर चाळीस

*Mac-Pherson.

पन्नास कोस शिकारीस गेले आहेत. तेथेंच सदाशिव मल्हारास बोलाविलें आहे. गेले. उत्तर आलें नाहीं. शाहाजादा अद्यापि आला नाहीं. सदाशिव मल्हार त्यांजवळ गेल्यावर काय ठरेल ते विनंती करीन. हे विज्ञप्ति. फरासीन कलकत्त्यास नवा गौरनर जाला. त्याचें पत्र पाटिलबावांस आलें; लिहिलें होतें जे, इष्टीन विलायतेस गेले, आम्ही येथें त्यांचे कामावर आलों; स्नेह करीत जावें. एक इंग्रज फरासिनाकडून नवा आला आहे. मग इंद्रसेन जाईल राहील पाहावें. कलकत्त्याहून सेवकराम याचे पत्रीं वर्तमान येत असेल. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the departure of Hastings from India and the assumption of office by the new Governor-General, Mac-Pherson. He also writes that Mahadji had expressed his unwillingness to intercede with the G. G. for the purpose of stopping British succour to the Sihi of Janjira from Bombay in his war on Maratha territory.*

No. 356. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे—वर्तमान ऐकिलें जे, राजश्री बाळाजी जनार्दन यांनीं लेहून पाठविलें कीं, पत्रें घेऊन पुण्यास जाऊन श्रीमंतांस दिल्हीं. तीं वाचल्यानंतर वाफगांव व पुणें यांचे बातमीपत्रावरून कल्पना घेऊन वर्तमान लिहिलें होतें. त्याची आशंका श्रीमंतांनीं घेतलीं कीं, सरकारचेच पदरचे जागीर खातात आणि येथून बातम्या मनस्वी लिहितात. यावरून तर्क राजश्री दादाजी गंगाधर याचा होतो कीं, ते मनस्वी बातम्या लिहितात. त्यास वाफगांव व पुणें येथील पत्रें दोन आलीं, तीं बजिन्नस सेवकास बावांनीं दाखविलीं. पुण्याचे पत्रांत नांवच होतें. वाफगांवचे पत्रांत नांव नवतें. दस्तूर ओळखीचें आहे. दोही जागां यांचे कारकून आहेत त्यांचीच हीं कामें. नवाबाच्या स्वामींच्या भेटी जाल्या, त्या प्रसंगांत दोघांसही बहुमान मिळाला नाहीं. ह्मणोन कष्टी होऊन त्यांनीं लेहून पाठविलें होतें, हेंही ऐकिलें होतें. आतांही त्यांचेंच कर्म ! मीं पत्रें पाहिलीं नसतीं तर विनंती न करितों. हा दोष दादाजीकडे नाहीं. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes that Mahadji's clerks at Poona were reporting false news to him from Wafgaum and Poona.*

No. 357. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—श्रीकाशीहून एका गृहस्थाचें पत्र येथें गृहस्थास आलें. लिहिलें होतें जे, इष्टीन जाहाजांत बसोन विलायतेस रवाना जाला. नंतर पंधरा रोजांनीं विलायतेचीं पत्रें इष्टिनाचे बहालीचीं खुष्कीच्या वाटेनें काशीस आलीं, तसीं कलकत्त्यास गेलीं. जहाजावरून त्यास खबर कधीं जाईल न कळे. वाट मुंबईवरून आहे म्हणतात. म्हणून काशीचे इंग्रजांनीं खुष्कीचे वाटेनें ही खबर मुंबईकरांस लेहून पाठविली. कदाचित् तेथेंही इष्टिनाची गांठ पडल्यास वर्तमान कळऊन माघारे फिरवावें. या गोष्टीस सा चार महिने लागतील असें लिहिलें होतें. ऐकिलें तें विनविलें. मग गोष्ट खरी आहे कीं उगाच लौकिक व्हावया-करितां साधन असेल, कळत नाहीं. मीं काशीचें पत्रच पाहिलें. हे विज्ञापना. या मजकुराचें पत्रच पाहिलें आणि असेंही ऐकितों कीं, कलकत्त्यांत सुतळीचा तोडा आपला ठेविला नाहीं. जाजमें देखील विकून पैका करून घेऊन गेला. येथें वर्तमान आहे जे, टिपूनें आरकाट वगैरे इंग्रजांचा मुलूख कांहीं सोडिला नाहीं. बंदवे कांहीं सोडिले. मातबर बंदीच आहेत. फरासीस, वलंदेज, टिपू एक होऊन इंग्रजांचे मदरासेस मोर्चे लाविले आहेत. मदरासचें पत्र कलकत्त्यास आलें कीं, लौकर खबरगिरी करावी, नाहीं तर मदरास गेलीच जाणावी. यावरून मदरास गेली असेल असी बावांचे दरबारची खबर ऐकितों. तेथेंही वर्तमान असेलच. येथें ऐकिलें विनविलें असे. हे विज्ञप्ति.

¶ *Sadashiv Dinkar sends to Nana a report current at Benares of Hastings being reappointed Governor-General and of Tipu having joined the French and the Dutch in an attack on Madras.*

No. 358. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १७ सफरचे आज्ञापत्रीं कलमबंदींत आज्ञा सादर जाली बिताः—

कोणाचा कारभार कसा विल्हेस लाविला, याची तन्हे कसी, कच्चें लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास छ १२ रबिलाखरचे विनंतिपत्रीं सविस्तर विनविलें आहे. एक संस्थान जैपूर याजवर मात्र दांत देऊन वीस लक्ष रुपये बादशाहाची नजर

करार केली. पैकीं दोन लक्ष नख्त, दोन लक्षांचें जवाहीर, सोळा बाकी राहिले. त्यांपैकीं साहा लक्ष रुपये परभारें पटैतापासोन* यांनीं वसूल करून घ्यावे. वसुलाकरितां फौज पाठवावी लागेल, त्याचा खर्च पटैतावर साधून आल्यास घ्यावा. बाकी दाहा लक्ष राहिले. त्याचे भरण्यास मुलूख महाल करार केले ते द्यावे. पैका वसूल जाहल्यानंतर महाल सोडावे. इतका एक फडशा होऊन विल्हेस लागलें. बाकी कारभार मोघम मोटेस चालत आहे. विल्हेस काय लावितात? कोणी रजवाडा नाहीं. बादशाही मुलूख, त्यांत खासगीचे महाल, व अफराशाबखानाकडे जागीर, व फौजेचे सरदार जागीरदार, त्यास फौजेचे सरदार कांहीं बहाल आहेत. एखाद्यावर जप्तीचा दाब दिल्हा आहे. लेपाटीच† चालली जाते. बादशाही खासगी महाल व अफराशाबखानाचे महालांचे बंदोबस्तास बापूजी मल्हार शेणवी निसबत आंबूजी इंगळे याजबरोबर फौज पलटणें मिळून चार पांच हजार इकडील जागीरदार सुद्धां देऊन रवानगी केली. त्यांनीं खुर्ज्यापासून‡ ठाणीं बसवीत चालले आहेत. मेरठेस ठाणें पाठविलें होतें. त्यासीं शिखांसीं कटकट जाली. शिखांनीं कांहीं बुणगे झांबडले होते. यांणीं पुढें सरून शिखांवर बाण टाकून उधळून दिल्हे. चाळीस पन्नास घोडे पाडाव करून आणिले. मेरठेंत ठाणें बसविलें. पुढें शीख जमा होऊन येतील यास्तव कांहीं फौज पाठवावी, म्हणून बापूजी मल्हार यांनीं लिहिलें होतें. येथून कांहीं फौजेची तरतूद होत नाहीं. बापूजी मल्हारास महालांत काय पैका मिळत असेल ते जाणत. यांस कांहीं पैका येत नाहीं. हा एक बंदोबस्त. आंबूजी इंगळे दिल्लीस पाठविले, त्यांजबरोबर मोगले जागीरदार, पलटणें माचेडीकर रावराजा, कांहीं यांची फौज, असे दिल्लीस पावले. नजफकुली यांस येऊन भेटला. एका गुजरावर तोंड टाकिलें होतें, तो मारला. त्याजबरोबर दोन तीनसें माणूस मेलें. तितकी लढाई जाली. आतां स्वस्थ दिल्लीवर आहेत. शीख पानपताकडे आहेत. लढाई बिडाई नाहीं. यांनीं डिगेचा किल्ला घेऊन हजारेक माणूस व गणेशपंत चक्रदेव तेथें ठेविले आहेत. बादशाहा व आपण खासा आगरेयांवर आले आहेत. आगरेयाचें वर्तमान निराळे पत्रीं विनविलें आहे. डिगेहून साहा कोस मेवातीयाचा मुलूख आहे. आधींच डिगेचा प्रांत ओस, कोठें कोठें एखादे गांवीं दाहा पांच घरें कंगाल आहेत. ते मेवाती लुटून मारून नेतात. बोभाट नित्य येतात. बंदोबस्त जाला नाहीं. पुढें काय करितील तें कळेल.

---

*जयपूरचा कारभारी. †लपेटी, सफाई, युक्ति (?).

‡Khurja, District Bulandshahar, 25 m. n. w. of Aligarh.

मुलूख किती सुटला याचे गुदस्तापासोन शोधांत आहें. चमेलपारचे हिशोबांत आहे. ठिकाण लागत नाहीं. माहितगारावांचून शोध कसा लागतो ? मी शोधांत आहें. ठिकाण लागल्यावर विनंती करीन. अजमास ऐकिला बाा :—

१ ताा गोहद ग्वालेर अंताजी माणकेश्वर व शिवाजी विठ्ठल अजमास नव लक्षांचा ऐकतों.

शिवाजी विठ्ठल यांस यंदा कांहीं गांव दिल्हे आहेत. चमेल उतरल्यावर सनदा दिल्या. याच्या बेरजा कळल्या नाहींत.

१ झांशीपैकीं तालुके दाबले त्यांच्या बेरजा आणविल्या आहेत.

१ पाा आटेर भदोरीयाकडे होती. तो महाल गोहदे अगोदर सोडविला. जमा दीड लक्षाची ऐकतों.

१ संस्थान करोली पोा पाा बिजेपूर यंदा नवें घेतलें. बेरजेचा शोध लागला नाहीं. इतके तालुके सुटले. खरे बेरजांचे शोधांत आहें. चमेलचे उत्तरेस पाा धवलपूर व बाडी अमदानीचे जागिरींत दोन महाल होते; ते यंदा बावांकडे आले. बेरीज पांचांपावेतों ऐकतों. वरकड मुलकाचे शोधांत आहें.

बादशाहासीं राजकारणें काय, करार कसकसे होतात, त्याचा पक्का शोध करून लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास, छ १२ रबिलाखरचे पत्रीं सविस्तर विनंती केलीच आहे. बादशाहा भेटून स्वाधीन होय पावेतों मर्जी दरकार* होती. भेटी होऊन आवर्ण सभोंवतें यांचें जालें. वकीलमुतलकीचें पद हातास आलें. कुलयखत्यारी जाली. आतां त्यांचे मर्जीसीं गरज काय ? गोसावी नारायणदास याजवर बादशाहाची मर्जी नाखूष. समक्ष किती वेळ बोलले कीं, गोसावी नारायणदासास जवळ न ठेवणें. यांनीं त्यासच पुढें करून त्याचे सांगितल्याप्रमाणें वर्तणूक करितात. बादशाहा फार श्रमी आहेत. हे खर्चास देतात, तें खाऊन आहेत. आज पावेतों चारेक लक्ष रुपये बादशाहास खर्चास दिल्हे. कांहीं शालजोडचा वगैरे कापड दिल्हें. खर्चास देणेंच लागेल. कारभार गोसावी नारायणदासाचे विचारें आपले घरीं होतो. शालजोडचा, सिरपेच, जिगे, तुरे, खोटे दागिने यांचा खर्च ते सांगतात. त्यास खर्च होत आहे. गोसाव्याकडे अफराचे समईं जागीर होती. आतां यांनीं कांहीं दिल्ही. हे बादशाहास कोटें पुसतात ? असा कारभार चालतो. यांत बादशाहासीं राजकारण, करार, संतोष सारें ध्यानांत येईल.

बादशाहांनीं सांगोन पाठविलें होतें जे, तुम्ही मुलूख थोडका आहे तो जागीर-खालीं देतां, आमचा खर्च तुम्हांस चालवावा लागतो तो कसा चालवाल ? तुमचे

*गरजू.

घरांत करोडो शा नाहींत. पुढें डौल कसें चालेल ? तुम्हीं आपले देशास जाल, तर आम्हांसही घेऊन जाल कीं काय ? असा निरोप आगरेयाचे मुक्कामीं सांगोन पाठविला म्हणोन ऐकिलें. उत्तर अद्यापि जालें नाहीं. उत्तर होईल तें कळल्यावर विनंती करीन. उत्तर यांनीं आजपावेतों जमाखर्च हिशेब पाठवून बादशाहास दाखविला. पुढें आणखी ऐकिलें, तें पक्कें जाल्यास विनंती करीन. अर्थ खोटा आहे.

अफराशाब व हमदानी यांचे सलतनतेंतील कोणी काय घेतलें, त्यांस काय दिल्हें, शोध करून लिहिणें म्हणून आज्ञा. त्यास, हमदानीजवळ काय होतें ? रुपयाचें नांव नवतें. उपाशी मरत होता म्हणून हातीं लागला. तोफा बाहात्तर निघाल्या. त्याचा झाडा पेशजींच सेवेसीं लिहिला होता. त्रेचाळीस यांनीं घेतल्या, पांच गोसाव्याकडे, पांच सात त्याजवळ राहिल्या. बाकी अफराशाबचे तोफखान्यांत आल्या. इतका झाडा जाला. कांहीं बंदुका हजार दोन हजार आल्या, त्या घेतल्या. अमदानीस काढून दिल्हें. तो गेला होता. मागतीं बोलाऊन चाकर ठेविला. दहा हजार रुपये दरमहा करार करून इंगळे यांचे स्वाधीन केला. तो आंबुजीचे भावाबरोबर गुगुरछबडे याकडे आहे. अफराशाबखानाची दौलत अगदीं घेण्यास पाहातात. तोच उद्योग आगरे याचे किल्लेदारासीं तीच भानगड आहे. अफराचा लेक बरोबर आहे. त्याचा कांहीं जाबसाल नाहीं. बरोबर फिरतो.

जाटाचा ठराव जाला म्हणोन ऐकिलें, तो कसा म्हणोन आज्ञा. त्यास नजफखानाचे रणजितसिंग जाटास दहा लक्षांचे महाल दिल्हे होते. भरतपूरचा किल्ला जाटाकडे ठेविला तो आहेच. महाल दहा लक्षांचे अफरा व अमदानी चालूं देईनात, म्हणून किशोरी* गोहदेवर आली, ती अद्यापि बरोबर आहे. दहा लक्षांचे महाल करार करून देऊं म्हणत होते. आतां ऐकतों करार करून दिल्हे. त्याजपासोन घेतलें काय, कळलें नाहीं. एक तोफ आटक म्हणून मोठी हस्तधाती,† उंच, महाकालीपेक्षां दुपट पल्लेदार, लांब तेरा चौदा हात, असी पंचवीस तिसा शेरांची होईल. च्यारशें बैल लागतात. दत्ताजी शिंद्यानें दिल्लीहून काढून यमुनेंत लावून दिल्ही होती. आतां यांनीं घेतली. च्यार तोफा आणखी येणार ऐकतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar summarises Mahadji's situation as the administrator of Delhi affairs and reports it to be not quite a pleasant one; most of the provinces were in a state of turbulence and did not own the king's authority; the relations between the King and Mahadji himself were not quite cordial, and that Mahadji's gains from the new venture were inconsiderable.*

*तोफेचें नांव ? †अष्ट-धातूंची ?).

No. 359. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १२ रबिलावलचीं आज्ञापत्रें सादर जालीं, तीं येथें पोंचलीं. त्यांत मजकूर :—

नायबमुनायबी व बक्षीगिरीचा खिलत श्रीमंतांचे नांवें बादशाहांनीं दिल्हा, तो येथें पावल्यास यथा पद्धत घेण्यांत येईल. परंतु साऱ्यांहून वरिष्ठ पद वकीलमुतलकीचें, तें राजश्री पाटिलबावांनीं घेतलें हें उचित कीं काय ? उच्च पद बावांनीं घ्यावें, नीच पदाचा खिलत श्रीमंतांनीं घ्यावा न घ्यावा, हें बावांस पुसणें; आणि त्यांसीं बोलून वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें करार करवून, खिलत घेऊन पाठवून देणें म्हणोन आज्ञा. ऐशास येथील प्रकार कसा जाला हें छ १२ रबिलाखरचे रवानगींत विस्तारयुक्त विनंती केली आहे. हल्लींही विनविलें आहे. वकीलमुतलकीचें पद घेणार, तेव्हां मजला बोलावून नेऊन बावांनीं मजकूर सांगितला. मीं उत्तर केलें कीं, हें वरिष्ठ पद श्रीमंतांचे नांवें व्हावें. उत्तर जालें जे, एकदांच सारीं पदें देत नाहींत. बक्षीगिरी कदीमच आपली आहे. सध्यां अफराशाबखानाचे लोकांस अमीरुलउमराईचा खिलत आम्हीं दिल्हा असतां, आजच उघडा बक्षीगिरीचा खिलत घेतां येत नाहीं. बादशाहाचे आमचे बोलण्यांत बक्षीगिरी कदीम तुमची आहे. आतां नवें पद नायबमुनायबी देतात. त्याचा खिलत श्रीमंतांचे नांवें घेतों. पुढें जसजसें साधन होईल तसें करा. याप्रमाणें बोलून नायबमुनायबीचा खिलत घेऊन आले. नजरा लोकांपासून घतल्या. चारपांचा दिवसांनंतर बादशाहाकडे गेले. तेथून वकीलमुतलकीचा घेऊन नालकींत बसून डेऱ्यास आले. नजरा लोकांच्या जाल्या. मीहि गेलों विचारिलें, वकीलमुतलकीचा खिलत कोणाचे नांवें जाला ? उत्तर जालें जे, सवाल दसखतास* गेला आहे. उद्यां येईल तेव्हां कळेल. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बोलाऊं आलें. गेलों. सवाल दाखविला. यांनीं श्रीमंतांचे नांवें लिहिला होता. बादशाहानीं बावांचेच नांवें दसखत केलें. त्याची नक्कल पूर्वीच सेवेसीं पाठविली आहे. वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें असावी, मीं पहिलेंच बोललों आहें. न जालें ! कारण मनन केल्यास ध्यानास येईल. आतां ही गोष्ट कशी घडते ?

*सहीकरतां.

आगरे याचा किल्ला व किल्ल्याखालील सरंजाम ऐसा श्रीमंतांचे सरकारांत यावा म्हणून आज्ञा. त्यास, आगऱ्यांत किल्लेदार सुज्याउद्दीनखां,* अफराशाबखानाचा सासरा, आहे. त्याचा भाऊ बजीदखान अफराशाबखानाचे तोफखान्यावर दारोगा होता. जाबसाल आगरेयाचे किल्ल्याचा लाविला. तेव्हां सुज्याउद्दीनखानाचें मानस होतें, आपला बंदोबस्त करून घेऊन किल्ला द्यावा. बादशाहाचेंही अनुसंधान त्यांसीं याच प्रकारें होतें कीं, त्याचा बंदोबस्त म्हणजे कांहीं जागीर द्यावी आणि किल्ला बावांस देवावा. बादशाहांनीं हा मजकूर आनंदराव नरसी यांजबरोबर सांगोन पाठविला. बावांनीं उत्तर दिल्हें जे, गोसावी हिंमतबहादर रामगड सुद्धां आगरें देवितात. जागीर द्यावी लागत नाहीं. असें असतां जागीर कां द्यावी? हें उत्तर गेल्यावर बादशाहा उगेच राहिले. गोसावी यांनीं बावांस सांगितलें जे, रामगडचा किल्ला व अफराशाबखानाचें द्रव्य सुद्धां, सुज्याउद्दीनखानापासोन आगरें घ्यावें, देवितों. याप्रमाणें सुज्याउद्दीनखानास पैगाम केला. त्यानें साफ जाब दिल्हा जे, रामगड व मालियेत माझे हातीं नाहीं. असें उत्तर करून आगरे याचा किल्ला मजबूत करून लढाई सुरू केली. गोसावी यानें बजीदखानास कैद करविला. तोफखाना त्याजकडे होता, तो बावांनीं आपणाकडे लाऊन घेतला. राजमहमदखान बावांचे तोफखान्याचा दारोगा आहे. त्यास तोफखान्याचा खिलत बादशाहाचा देविला. आतां आगरें मजबूत आहे. भांडतो. बावा व बादशाहा डिगेहून कूच करून आगरे यास आले. किल्ला भांडतो. राजकारणाची जात अद्यापि नाहीं. पुढें पहावें. जबरदस्तीनें घेतील अगर दार मदार होईल. किल्ला घेतील. सरकारांत घ्यावयाचें मनांत येईल हें पहावें.

सर्व प्रकारें नफा किफायत सरकारची व्हावी असी ज्याची कदरबंदी† त्याचें करणें त्याच धोरणावर अनुक्रमें चालत असतें. येथील चाल तर ध्यानास आली. पत्रें सरकारचीं आलीं, त्यांत आज्ञा जे, जेणेंकरून पाटिलबावांस विषाद येतो, कागद पुरवणी न दाखविणें. त्यावरून बावांचे पत्राचे जाबही दिल्हे नाहींत. कारण कीं वकीलमुतलकीचा मजकूर सदाशिव दिनकर याचे पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळेल असें लिहिलें आहे. ते माझे पत्रांतील मजकूर कळण्याकरितां पत्र मागतील, तर हे दोन्ही मजकूर विषम वाटावयाजोगेच आहेत.

---

*शुजाउद्दीन, किंवा शुजावलखान. †निष्ठा, दानत.

दर बैठकेस मी म्हणत असतों कीं, मजकडील पत्रें ऐकणें अगर बोलणें एकांतांत होत असावें. तें तर घडत नाहीं. दरबार पाहिजेच! त्यांत मनस्वी बोलणें चालतें. बहुवेळ असेंहि म्हटलें आहे जे, धण्याचे घरचें बोलणें कोणास कळूं नये. आपले देशचे लोकांसीं पडदा असावा. हिन्दुस्थान्यांसीं तर सुतराम पडदाच पाहिजे. आपण बोलूं लागतां, तेव्हां जवळ कोण बसलें हें धोरण रहात नाहीं. खट्टेमिट्टे भाव बोलण्यांत येतात. सेर* दरबार! रांगडेपणीं हे भाव समजल्यावर गोष्ट वाईट! श्रीमंतांचे दाबानें दबून चालतात. आपणांस कंगाल, नामर्द दिसतात म्हणून उपेक्षा होत आहे, ती होऊं नये. श्रीमंतांचें आपलें द्वैत समजल्यावर हेच बधावयाचे† नाहींत. फिरून गोष्ट सांगतील. असें फार वेळ म्हटलें असतां तोच धारा चालतो. आतां तर गोसावी नित्यशा स्तंभ‡ होऊन बसला असतो. त्याजदेखत पत्रें दाखवावीं. व्याख्यान व्हावें. खावंदांचीं पत्रें एकान्त करून ऐकतील तें घडत नाहीं. असें कां जालें कळत नाहीं. सरकारचे मतलबाची यादी कलमबंदीची करून दाखविली, तथीपासोन फारच विक्षेप आहे. मीहि दरबारास जात नाहीं. भाव समजला जे, यादीचे जाबसाल न बोलावे आणि बादशाही खिलत घेऊन जावें, हें मजला होत नाहीं. असें चालत आहे. याजकरितां पत्रें दाखविलीं नाहींत. इतक्यावर आज्ञा सादर जाल्यास पत्रें दाखवीन. जाब तर आज साहा महिने मिळत नाहीं. नसो. या दोही कलमांचा बखेडा न करीत असाही भरंवसा नाहीं. यास्तव आज्ञेचे प्रतीक्षेवर राहिलों आहें. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar explains to Nana how the supreme office of Vakil-ul-Mutlaq came to be conferred on Mahadji though demanded by him in the Peshwa's name. He adds news about the stout resistance put up by the commandant of Agra to Sindia's demand for its surrender. The writer is exasperated at the way in which Mahadji publicly discussed the several confidential topics referred to him from Poona.*

---

*शेर=वरिष्ठ, मुख्य. †आटपावयाचे. ‡खांबासारखा, न हालणारा.

No. 360. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—मुलखाची यादी पाठविली त्याजवर बेरजा नाहींत म्हणून आज्ञा. ऐशास ती याद तर मीं आपले यादीनें लेहून पाठविली. माहितगाराचा तलाष फार केला. शोध करतां करतां एक कायस्थ गुदस्तांच मेळऊन लेहावयास बसविला होता. त्यास दुखणें प्राप्त जालें. लिहिणें लिहिलें तितकेंच राहिलें. ग्वालेरीस होतों तंवपावेतों तो बरा जालाच नाहीं. नंतर बावांनीं कूच करून चमल उतरून आले. तेव्हां तिकडील इकडील दोन्हीकडील शोध प्राप्त जाला. त्यास तिकडील कामाकरितां ग्वालेरप्रांतीं एका गृहस्थास लेहून पाठविलें आहे. कागद हस्तगत जाल्यास पाठऊन देईन. इकडीलही शोधांत आहें. एका गृहस्थाचें नांव सेवेसीं विनविलें आहे. त्यास नित्य बजिदी करीत असतों. अद्यापि कागद हातास आला नाहीं. एक किताब हातास आली आहे, ती समजत नाहीं ! एका गृहस्थानें पारसी याद करून आणन दिली. ती येथें मजलाच उमजत नाहीं ! म्हणून त्यास हिंदवी लेहून आणावयास सांगितली आहे. तो गृहस्थ स्वामींचे दंडकाचा आहे. कागद सिद्ध होऊन हातास आल्यावर रवाना करीन. हिंगण्याकडील राजश्री शंकराजीपंत* दिल्लीहून येथें आले आहेत. त्यांसही हटकिलें होतें. त्यांनीं उत्तर दिलें जे, पहिले राजश्री विसाजीपंत इकडे सहा वर्षें होते, तेव्हां बादशाही शिरस्तेदार एक आहेत, त्यास दोन हजार रुपये देऊन कच्चा शिरस्ता कच्ची हकीकत लेहून घेतली. ती राजश्री बाबूराव केशव† यांजवळ दिली. त्यांजवळ असेल. तो शिरस्तेदार तर मेला. त्याचा एक पुत्र आहे. तो दिल्लींत राहिला. त्यास लेहून पाठवावें, तर पहिले दोन हजार दिले होते, आतां हजार पांचशें तर मागेल. तर पैका खर्च करण्याविषयीं आज्ञा पाहिजे. पैक्याखेरीज तलाशांत आहें. मोर्चेही लाविले आहेत. साध्य जाल्यावर सेवेसीं प्रविष्ट होतील. आज्ञा आल्यापासोन तलाष फार करितों. प्राप्त जालें नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that he was on the lookout for persons who could supply him with fairly correct estimates of revenues from Sindia's new conquests.*

*Shankaraji Sakhdev. †Baburao Keshav Thakur, Nana's confidential adviser.

No. 361. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—मजला राजश्री पाटिलबावांचे साधनाचें अगत्य असतें, तर इंग्रजांचे जागिरीच्या सनदा दीडा लक्षाच्या स्वामींनीं पाठविल्या, त्या येतांच स्वाधीन करून देतों. तें न केलें. कारण कीं, चित्तांत आंदेशा आला जे, इंद्रसेन कलकत्त्यास गेला; आपलीं कामें कांहीं होतां दिसत नाहींत. नाहक सनदा दाखऊन आज नुकसानी करून कशास घ्यावी ? जर हे कलकत्त्यास लेहून कामें करून आणूं लागतील, ते समयीं इंद्रसेन जागिरीचा पैगाम करील; तेव्हां बावा हटकतील. तर पक्की खातरजमा करावी कीं, इतके दिवसांत दिडा लक्षाच्या सनदा आणून देतों. सध्यां काम नाहीं. बावा आम्हांजवळ परिछिन्न बोलतात, इंग्रज बेइमान. त्यांनीं टिपूचा परभारा सलूख करून आम्हांकडे लबाडकी आणिली. त्यांसीं राजकारणच आमचें नाहीं. असें म्हणत असतां, आपण सनदा दाखवाव्या अगर वर्तमान सांगावें, तर हे नाहीं म्हणणार नाहींत. सनदा आमचे स्वाधीन करा, आम्ही इंग्रजांकडील कामें करून आणितों, असें ह्मणून सनदा मागितल्यावर नाहीं म्हणतां नये. इंग्रजांकडील दस्तऐवजही नाहींत, आणि सनदांप्रमाणें यांनींच दिडा लक्षाचे महाल आटोपले, तर कामेंही नाहींत आणि महाल दवडावे ? स्वामींचा शद्ब लागल्यास उत्तर काय करावें ? असें मनांत येऊन मजकूरच केला नाहीं. सनदा तशाच ठेऊन विनंती सेवेसीं लिहिली. उत्तर सादर जालें जे, इंग्रजांकडील सरकारकामाचे दस्तऐवज हातास कलमाकलमाचे आले, तर येथें पाठऊन देणें. मग सनदा त्यांस देणें. अगोदर सनदा दिल्यास इंग्रज बेइमान,कलकत्तेकराचे चित्तास येत नाहीं, अगर विलायतेस लेहून पाठविलें, म्हणतील. जागीर मात्र घेतील आणि काम कांहीं होणार नाहीं. सनदा दिल्या नसतील तर बरेंच जालें. न देणें. असी आज्ञा सादर जाली. त्यास, आरंभींच कल्पना आली, म्हणून सनदांचा मजकूरच केला नाहीं. सनदा न दाखविल्या, आणि जबानींच मजकूर बोलावा, तरी सनदा मागतील, देणें पडतील. तहनाम्याचे वेळेस अनुभव आलाच आहे. तेव्हां नारोपंत तरी होते. आतां मजसींच गांठ. काय निमित्त तोहमत* दोहीकडे येईल तेव्हां संरक्षण कोण करणार ? या भयास्तव कांहीं चर्चाच केली नाहीं. सनदापत्रें तशाच आहेत. याजविसीं आज्ञा जसी सादर होईल तसी वर्तणूक करीन. कामाचा जाबसाल एकही बावा करीत

*आरोप.

नाहींत. त्यांजकडून सदरहू जागिरीचा उजूर जाल्यास करारमदार सनदांचा बेशर्त दस्तऐवज इंग्रज करतां येईल. आम्ही इंग्रजांसीं सूत्रच ठेवीत नाहींत म्हणत असतां, आपण बजिदी करावी, तर सनदांकरितां मात्र गळां पडतील. काम ईश्वराधीन! सनदांचा तगादा लाऊन घ्यावा. आतां तर इष्टीन व इंद्रसेन दोघेही विलायतेस गेले. हे जाबसाल कोणासीं करतात? नवा गौरनर कलकत्त्यास आला आहे, त्याचें बोलणें चाललें तर बावा आपणासीं बोलूं लागल्यास बोलावें; तोंपावेतों बोलून फल काय? असें आहे. याहीवर आज्ञा प्रमाण. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar protests to Nana against his having ever cared to propitiate Mahadji's goodwill at the sacrifice of the interests of the Peshwa; and points as a proof of his integrity, to his not having delivered the sanads of the Jagir for the English envoy Anderson.*

No. 362. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री मोरो बापूजी, राजश्री हरिपंततात्याचे पुतणे, महायात्रेस गेले. त्रिस्थळीचे बंदोबस्ताकरितां आज्ञा सादर होती. त्यास मशारनिल्हे उजनीहून ऐलीकडे सुजाउलपूर परगण्यांत येऊन, तेथून पत्रें राजश्री पाटिलबावांस व मजला बजिन्नस कासद जोडीबराबर आलीं होतीं. त्याजबरोबर इंद्रसेन इंग्रजांकडील खानसामा, गुलाम मुर्तजाखान, पंचवीस माणसांनसीं मातबर माणूस, सारे इंग्रजांचे डौलांत व लखनऊस माहीत आहे, पूर्वी राजश्री शिवाजी विठ्ठल यांजबरोबर यात्रेकरितां बरोबर दिल्हा हें माहीत, म्हणून त्याचीच बावांनीं नेमणूक करून, मथुरेहून इटाव्याकडून प्रयागास रवाना केला. तो प्रयागीं मोरोपंताजवळ पावला असेल. प्रयाग व श्रीकाशी दो जाग्यांत सरकारची माफीच आहे. गंगापुत्र प्रयागवळ यांनीं आडऊं नये, यात्रेकर रजावंदीनें देतील तें घ्यावें असा बंदोबस्तच आहे. गयेस नवा इजारदार इष्टिनानें काशीचे मुक्कामीं करून कलकत्त्यास गेला. त्यावर आमचा हुकूम नाहीं. सबब आम्हीं कलकत्त्यास इष्टिनास लेहून पाठविलें होतें. त्याची परवानगी गयेच्या इंग्रजांस माफीची आली असली तर माफी करील. आतां इष्टिन विलायतेस गेला. गयेच्यानें माफी न केल्यास आमचा हुकूम त्याजवर नाहीं असें इंद्रसेनाचे सांगितल्या-

प्रमाणें बावांनीं सांगितलें. तसेंच मोरोपंतास लेहून पाठविलें. गयेंत मुरार चौकी व खापर मिळोन चौदा कीं सोळा रुपये पडतात, ते न सुटल्यास द्यावे लागतील, असें लेहून पाठविलें. त्याचें मत गयेचीही माफी व्हावी. येथें बावांनीं इंग्रजांचें बोलणें असें सांगितलें. सदाशिव मल्हार, बावांकडील वकील, इंग्रजांकडे वकिलीस असतात, ते त्रिस्थळी यात्रेस गेले होते. त्यास गयेचे रुपये इंग्रजानें घेतले. यांनीं दिले. असें वर्तमान आलें. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana of his having made necessary arrangements for the pilgrimage of Haripant's nephew, Moro Bapuji, to Benares.*

No. 363 March 1782.

श्री

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—नारायणदास व अनूपगीर गोसावी यांजवर बादशाहाची मर्जी फार कडवी. बहु वेळ बावांस सांगितलें जे, या दोघांचा विश्वास न धरणें. कामांत न घालणें. हे कोठें नाश करितील, दगा करितील, भरवसा नाहीं. एकंदर यांस कामांत न आणणें, असें बादशाहा वारंवार म्हणतात. त्याचें उत्तर करितात, यांस कामांतून काढितों. आपले डेऱ्यास आल्यावर तें विसरून दिवसरात्र त्यांबरोबर क्रमणूक आहे. राजे दयाराम, बादशाहाचा खाजगी दिवाण, खाजगी महालाचें कामकाज तो करीत होता. त्याजविसीं बादशाहांनीं समक्ष बावांसीं बोलले, कामकाज याचे हातें घेत जावें. तेथें मान्य केलें. डेऱ्यास आल्यावर गोसाव्यानें ती खाजगी दिवाणी नारायणदासास सांगिविली. बादशाहास न विचारितां बावांनीं आपले घरीं वस्त्रें खाजगी दिवाणीचीं नारायणदासास दिलीं. नारायणदास व गोसावी यांनीं बावांस सांगोन बादशाहाचे खाजगी महालांची जप्ती करविली. जुने आमील उठून नवे आमील बावांचे गले आहेत. हें बादशाहास विषम जालें म्हणोन ऐकतों. बादशाही मुलूख तों पुष्कळच आहे. त्याचा आक्रम शक्तिवांचून कळतच आहे! कुंजपुऱ्यापासोन पश्चम सरहद् लाहोर काश्मीर शिखांनीं दाबून, दिल्लीचे तलहेटींत*, अंतरवेदींत खुर्जा व मेरट वगैरे महाल पावेतों, महालोंमहालीं रखी घेत असतात. ते महाल

---

*जवळचा प्रदेश.

बादशाहाचे खाजगींत व नजफखानाचे जागिरींत. त्यांपैकीं अफराशाबखानाची जागीर, नजफकुलीची जागीर, गोसाव्याची जागीर व फौजेचे सरदारांची जागीर इतका मात्र अमली मुलूख, त्यांत हात पावेल तेथवर शीख महाल पाहून रखी दरसाल घेत असतात. गौसगड अंतरवेदींत आहे तो जाबतेखानाकडे. बारा पंधरा लक्ष रुपयांचा मुलूख त्याजकडे. तो शिखांचा चेला. राहिलें रोहीलखंड सुजाउद्दौलाकडे. रोहीलखंड अंतरवेदींत फरुखाबाद इटाव्यापासोन धुरमक्-सुद्धां बाद (हद्द ?) बंगाला वजीर इंग्रज. इतक्यांत दिल्लीच्या आसपास तीन दिशा आटोपल्या. राहतां दक्षण राहिली. त्यांत जाटाचा मुलूख नजफखानानें घेतला. एक भरतपूर मात्र रणजितसिंग जाट सुरजमलाचा पुत्र याजकडे ठेऊन, बाकी झाडून देश चमेलपावेतों नजफखानाकडे आगऱ्यासुद्धां होता. गोसावी, नारायण-दास यांनीं बावांचें आर्जव संपादिलें, यामुळें डिगेचा किल्ला बावांस दिला. सध्यां सर्वांचा मुक्काम डिगेवरच आहे. डिगेचें ठाणें पाटिलबावांस हस्तगत झालें. संरक्षणास श्रमच आहेत. असो. हस्तगत जालें. आगऱ्याचा किल्ला अफराशाबखानाचे सासऱ्यास सुजाउलखान म्हणून किल्लेदाराचे स्वाधीन आहे. त्यासीं गोसावी यानें राजकारण करून, तो किल्ला पाटिलबावांस द्यावयाचें ठराऊन, किल्ल्यांत ठाणें बसवावयास राजश्री रायाजी पाटील यांची रवानगी केली आहे. तो आगऱ्याचा किल्ला हस्तगत जाला म्हणजे कुटुंबें आगऱ्यास ठेऊन, बादशाहा व बावांनीं दिल्लीस जावें, असा मनसबा ऐकतों. आगऱ्याचा किल्ला हस्तगत जाला म्हणिजे पुढें विचार काय ठरेल ती विनंती करीन. रायाजी पाटील आगऱ्यास गेले. शहरांत मात्र माणसें जातात येतात. किल्ला हातास येत नाहीं. याचें कारण आफराशाबखानास तीन स्त्रिया. त्यांत एकीस पुत्र आहे. चौ वर्षांचें मूल. ते स्त्रीपासीं तितका मूलच ऐवज आहे. वरकड मायापुंजी, वित्तविषय, गड कोटकिल्ले दुसरीचे स्वाधीन. पाटिलबावांनीं अफराचा पुत्र येथें आणविला. त्याजला घेऊन त्याची आई येथें आली. ती निर्माल्यवत् आहे. स्त्रियांचा सवतमत्सर. दुसरी स्त्री जबरदस्त. तिचा बाप आगऱ्याचा किल्लेदार. चुलता बजीदखान, त्याजवळ अफराशाबाचा झाडून तोफखाना. तो तोफखाना घेऊन येथेंच आहे. अंतरवेदींत रामगड आहे त्याचें नांव अफरा-शाबखानानें अलीगड ठेविलें आहे. तोही किल्ला त्याच स्त्रीचे हातीं आहे. वित्तविषय औधा रामगडावरच आहे. याप्रमाणें अगदीं बंदोबस्त ज्या स्त्रीचा आहे ती म्हणती, मजला दत्तपुत्र घेऊन देऊन, सारी दौलत माझे पुत्राचे नांवें बहाल

करून द्यावी. गोसावी, नारायणदास ऐकत नाहींत. यांचें मत अगदीं किल्ले व वित्तविषय त्या स्त्रीपासून हिरून घ्यावीं. नव लाख रुपयांची जागीर त्यास द्यावी. त्यापैकीं आगऱ्याचा किल्लेदार सासरा व त्याचे दोघे बंधू एक बजीदखान तोफखानेवाला, दुसरा मेहरबानखान, या तिघांस लाख रुपयांची जागीर द्यावी. दोन लक्ष दोघी स्त्रिया. एकूण तीन लक्ष. सहा लक्ष रुपयांची जागीर अफराचा पुत्र येथें आला आहे त्यास द्यावी. त्यांत त्याचा संसार व फौज चालऊन असावें. ही गोष्ट आगऱ्याचे किल्लेदार व त्याची कन्या अफराची स्त्री तिचे चित्तास येत नाहीं. यामुळें आगऱ्याचा किल्लेदार बदलून आहे. बावांचे मंत्री गोसावी नारायणदास यांनीं तोफखान्यांत बजीदखान होता, तेथील बंदोबस्त आरंभिला. बजीदखान गोसाव्याचे घरीं बसला. आगऱ्याचा किल्लेदार माझा भाऊ खरा, परंतु माझें ऐकत नाहीं. तुम्ही मजला तोफेंत उडवा, माझा इलाज चालत नाहीं. असी गति आगऱ्याची जाली आहे. किल्ला हातास येत नाहीं. कांहीं मुख्याची खूण मुद्रा त्यासी आहे. मुख्य म्हणतात, आम्हीं किल्ला देवितों. बावांस गोसावी नारायणदासाखेरीज पाणी पिणें नाहीं. पुढें होईल तें खरें. किल्लेदार गोसाव्यास बधत नाहीं. हजार रोहिला चाकर ठेऊन किल्ल्यांत आणविला. तो किल्ल्यांत दाखल जाला. रायाजी पाटील यांनीं बाहेर मोर्चेबंदी केली असेंही वर्तमान आहे. हातास सध्यां येत नाहीं असें आहे. पुढें होईल ती विनंती करीन. बादशाहाचे विद्यमानें सूत्र लागलें असें ऐकतों. खरें जाल्यास विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the growing difference between Mahadji and the Emperor over the management of his private demesnes and mentions details af how things had come to a crisis at Agra.*

No. 364. March 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—राजे दयाराम कशमिरी ब्राह्मण बादशाहाचा खाजगी दिवाण आहे, त्याजवर बादशाहाची दया. त्याजकरतां बादशाहानीं स्वमुखें त्याचें चालवावयाकरितां बावांस सांगितलें असतां, बावांनीं त्याची खाजगी दिवाणी दूर करून नारायणदासास सांगितली. तो गृहस्थ तर खटा होईलच.

बादशाहा श्रमी आहेत. आधीं बादशाहा कोमलज्ञानी* आहेत. असो. दयाराम बादशाहाजवळ आहेच. त्याचें माझें अनुसंधान आंतून निरोपानिरोपीं कोणास न कळत चालतें. बादशाही मुलखाचे कागदाविसीं एक दोन वेळ आज्ञा सादर जाली, त्यावरून मशारनिल्हेस सदरहू कागदाविसीं प्रश्न केला. तो त्यानें मान्य केला आहे. कागद त्याजपासोन हातास आल्यास रवाना करीन. त्याचें अंतःकरण स्वामींचे ठायीं आहे. त्यास अनुमोदन बादशाहाचेंही आहे. त्याचें म्हणणें आहे कीं, कोठें प्रगटांत येऊं न देतां आम्हांस दृष्टींत ठेवावें. काम पडल्यास उपयोग. कामच न पडलें, तर न पडो. उगीच कृपादृष्टि स्वामींची असावी. आमचें वर्तमान हिंगण्यास देखील कळूं नये, असी त्याची विनंती आहे. हे विज्ञापना. आणखी एका गृहस्थानें एक याद पारसी लेहून आणून दिली आहे, ती समजून घेतल्यावर हिंदवी करून पाठवून देईन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana of his having secretly won over Dayaram Kashmiri, the Emperor's favourite, who had been dismissed by Mahadji.*

No. 365 31st March 1785.

इंद्रसेनानें बावांस सांगोन पाठविलें कीं, शिखांनीं वजिराचा तालुका संबळ मुरादाबादवगैरे पांच जागे लुटून मबलग मालीयत नेली. त्यांचे पारपत्यास आमचीं पलटणें येतात. आपण म्हणतील पलटणें कां येतात, यास्तव सूचना करितों. असें सांगोन पाठविलें. पलटणें इंग्रजी कांहीं अनुपशहर भागीरथीतीरीं आहे तिकडे आलीं चार पांच व इटाव्याकडे मखनपूर एक गढी आहे तेथें, मीर्जा अमानीकडील इलमास खोजा अंतरवेदीचा सुभाच आहे, त्याजबरोबर तीन चार हजार फौज व चार पांच पलटणें इंग्रजी यांचा मुक्काम आहे. दिसायास तर मखनपुरचे गढीस मोर्चे आहेत. लोकांच्या गप्पा अनेक प्रकारच्या आहेत. पुढें प्रत्ययास येईल तें खरें. दोन रूख धरून आहेत.

आगऱ्याचे किल्लचास रायाजी पाटील यांनीं तोफा लाविल्या; मोर्चे चालविले, खंदकपर्यंत गेले; किल्लचावरील चऱ्याही† कित्येका जागां पाडिल्या; बादशाहा व बावांचा मुक्कामही दोन अडीच कोसांवर जाला. किल्लेदार भांडतच होता. रायाजी पाटील यांनीं आंत सूत्र लावून शिबंदी फोडिली. वर्तमान

*Possessing only a small quantity of wisdom. †चरी-लहान चर, a small ditch.

किल्लेदारास कळल्यावर करितो काय? त्यानेंही अनुसंधान लाविलें. शिबंदीची तलब द्यावी. कबूल केलीच होती. किल्लेदारासही बावन हजार रुपयांची जागीर द्यावयास करार केला आहे. गोसाव्यानें फितुराचे कागद किल्लेदारास लिहिले, ते त्याजवळ आहेत. देतों म्हणून किल्लेदारानें कबूल केलें आहे. यांसही ते कागद हस्तगत कर्तव्य म्हणून किल्लेदारास जागीर कबूल केली. किल्ल्यावर निशाण बावांचें छ १४ जमादिलावलीं व शेपन्नास लोक तर किल्ल्यांत गेले. किल्लेदाराची वस्तवानी आणावयास उंट दोनेकशें किल्ल्यास पाठविले आहेत. वस्तवानी किल्लेदाराची सोडावी, करारच केला आहे. बाहेर आणून त्याचे स्वाधीन करावी म्हणून ऐकिलें आहे. किल्लेदार बाहेर निघाल्यावर होईल वर्तमान तें विनंती करीन. आज छ १९ जमादिलावलीं आगऱ्याचा किल्लेदार किल्ल्याबाहेर निघोन, रायाजी पाटील यांचे मारफत बावांस भेटला. लष्करांत राहिला. किल्ला खाली करून दिला. बावांचे लोक किल्ल्यांत गेले. किल्ला हस्तगत जाला. याउपर करारमदार किल्लेदार वगैरेचे निर्गमांत येतांना कळेल. गोसाव्याचे कागद फितुराचे किल्लेदारानें हवाला केले म्हणून ऐकिलें.

आंबुजी इंगळे यांचें पत्र बावांस आलें जे, शिखांचा जमाव फार आहे, परंतु एकमत नाहींत. फुटभिगार,* शेंपन्नासांचाही सरदार, हजार दों हजारांचाही सरदार, असे निरनिराळे व आपआपसांत बांकही† राखितात. लाहोराकडे शीख आहेत त्यांसीं व पाणिपताकडे शीख आहेत यांसीं विरुध आहे. पाणिपतवाले बारा पंधरा हजार यांचें अनुसंधान आलें आहे जे, आम्ही तुम्हांस सामील होतों, लाहोरचे शिखाचें पारपत्य करूं, असें म्हणतात. बावांचें उत्तर गेलें जे, ते आपसांत एकच असतील. दगाबाजीनें तुम्हांसही अनुसंधान करून लढाईचे समयीं शीख ते हे एक होऊन दगा करितील. त्याचेंही प्रत्युत्तर आंबुजीनें खातरजमेनेंच लिहिलें आहे. काय तऱ्हा ठरते पाहावें. बावांस विश्वास येत नाहीं. लढाई तर होईल. दोघे शीख एक होतील असा संदेहू राखितात.

कुटुंबें आगऱ्यांत ठेऊन बावा जाबतेखानाचे गौसगडाकडे जाणार. गौसगड वगैरे बारा पंधरा लक्षांचा मुलूख बक्षीगिरीचे सरंजामांत त्यानें नेला, तो सोडवावा असी वदंती आहे. आगऱ्याचा बंदोबस्त जाल्यावर रूख समजेल. बादशाहास समागमें घेतील, किंवा दिल्लीस वाटे लावितील, किंवा आणिकच मनसबा करतात, घडेल ती विनंती करीन.

*फाटाफूट असलेले. †वक्रता.

मेजर बुराण* यास इष्टिनानें बादशाहाजवळ ठेऊन आपण कलकत्त्यास गेला. तेथून तगीर† होऊन विलायतेस गेला. मेघफरसन कलकत्त्यास इष्टिनाचे जागां गौरनर पदावर स्थानापन्न होऊन बसला. त्यानें मेजर बुराणास बोलाविलें आहे. बदली केली ऐसी चर्चा आहे.

नवें पत्र आंबुजीचें आलें जे, शीख जमा होऊन आले. पांचा कोसांचें अंतर आहे. आम्ही सावध रात्रंदिवस जीव ठेऊन असतों. या पत्रावरून येथून चार पलटणांची रवानगी आंबुजीकडे केली.

मजला बावांनीं बोलाऊन नेलें होतें. जाबसाल जाल्याची पुरवणी वेगळी आहे. त्या बैठकेंत गोष्ट बावांनींच काढिली कीं, आगऱ्याचा किल्ला सरकारांत घ्यावयाची मर्जी आहे. तर दिल्ली बादशाहाचें घर, तसें आगरेंही दिल्लीप्रमाणें बादशाहाचें घरच आहे. तो किल्ला सरकारांत कसा येईल ? ते समयीं मीं कांहीं उत्तरच केलें नाहीं. पुढें बोलण्याचा प्रसंगच करणार आहेत, त्या काळीं बोलणें होईल.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar reports the depredations of the Sikhs north of Delhi, the surrender of Agra, the retirement of Major Brown from the capital, and other events of note in that quarter.*

No. 366. March 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—सदाशिव मल्हार श्रीकाशीहून शाहाजाद्याची रवानगी लखनऊस केली, आपण गयेस गेले. शाहाजाद्यास विनंती केली कीं, गयेहून लौकरीच खिजमतीस येतों. मग पुढें जाऊं. शाहाजादे लखनऊस दाखल जाल्याचें वर्तमान राजश्री पाटिलबावांस कळलें. बावांनीं त्यांसीं अनुसंधान लाविलें कीं, मुद्याची यादी पाठऊन द्यावी, करार करून पाठवितों. शाहाजाद्याकडून याद आली नाहीं. सदाशिव मल्हारची प्रतीक्षा असेल किंवा कारण असेल, कळलें नाहीं. सदाशिव मल्हार लखनऊस येत तंव इकडे बावांचे हातास पदें येऊन कारभारांत शिरकाव जाला. दिल्लींत आंबुजी इंगळ्यानीं बंदोबस्त केला. डीग हातास आली. आगरें घेण्यास आलेच आहेत. मोर्चे बसलेच आहेत.

*Brown. †Dismissed.

घेतील. सदाशिव मल्हार शाहाजाद्याचे मुद्याकरितां लिहितात. उत्तर जातें जे, शाहाजाद्यांनीं येथें यावें, मग मुद्दे करार ठरतील ते करून देऊं. ही गोष्ट शाहाजाद्याचे चित्तास येत नाहीं. सदाशिव मल्हारही तेथेंच आहेत. पुढें काय ठरेल तें खरें. हेंही वर्तमान बाहेरलें ऐकिलेलेंच आहे. बावा आतां बोलण्याची गांठच पडूं देत नाहींत. तेव्हां बाहेर तरी शोध करणें प्राप्त. ऐकिलें तर ठिकाण-बाध*, लटकें व्हावेंसें नाहीं. इतक्यावर न कळे. हे विज्ञप्ति.

¶*Sadashiv Dinkar writes that no terms have yet been settled with the Shahzada for his return to the Court.*

No. 367. March 1785.

लेखक सदांशिव दिनकर.

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १७ सफरचीं आज्ञापत्रें सादर जालीं, त्यांत एका पत्रीं आज्ञा जे, टिपूच्या फौजा नरगुंद अदवानीचे सुमारें आल्या. नरगुंद संस्थान सरकारचे पेटचांतील असतां उपद्रव करून घेण्याचा इरादा आहे याप्रमाणें बातम्या आल्या व येतात. त्यावरून सरकारची फौज जमा करविली आहे. पूर्वी तुम्हांस दोन वेळां लिहून पाठविलें कीं, टिपूस इंग्रजांनीं आश्रा देऊं नये. मदत करूं नये. पलटणें कुमकेस सरकारांत लागतील ते समयीं इंग्रजांनीं सर-कारांत पाठवावीं. हें कलम इंग्रजांपासून करार करून घ्यावयाचें तें लौकर घेऊन पाठवणें म्हणोन पूर्वी लिहिलीं गेलीं. मध्यें एक उत्तरही तुमचें आलें कीं, सदाशिव मल्हार राजश्री पाटिलबावांकडून इष्टिनाकडे गेले आहेत. त्यांचें पत्र पाटिल बावांस आलें कीं, सरकारचीं कामें करून घेतलीं असें मोघम लिहिलें आहे, म्हणोन लिहिलेंत. त्यास कलमें कोणकोणतीं कशीं करून घेतलीं ? तपसील तुम्हांस कळला आहे. लौकर लेहून पाठविणें. दस्ताऐवज घेतले असतील तेही पाठऊन देणें. जे होत नाहींत ते तसेच लेहून पाठवणें. त्यासारखा विचार करूं. व जंजिरे याचें व फत्तेसिंग गायकवाड यांजकडील पूर्वी लेहून पाठविलें, तेंही उत्तर चांगलें लेहून पाठविणें कीं पुढें पेंच न पडे. सरकारचे कामाचे मसलतीचे जाबसाल एकीकडे ठेऊन नवीन रचनायुक्त पत्रें बहुत चांगलीं लिहितां. यांत कामें तों

*ठिकाणबद्ध, having ground for foundation.

कांहींच नाहींत. उलटे विक्षेप आणि पान्हेरे* लिहीत असावे. टिपूकडील फौज नरगुंदाकडे आली याकरतां सरकारची फौज जमा करविली. हें तुम्हांस लिहिलें असतां, होळकर महेश्वरास येणार याकरतां फौज व पागा जमा करविल्या, म्हणून लिहितां. याचें उत्तर तेच समयीं करावें कीं, फौज टिपूकडील आली याकरतां सरकारची फौज जमा करविली, असें लिहिलें असतां संगत लावणारांनीं लाऊन बातमी विपरीत लिहिली असें बोलावयास सुचलें नाहीं. व होळकराचे दौलतीचा बंदोबस्त नाहीं, सरकारचाकरीही यामुळें घडत नाहीं, यास्तव निरोप मागतात. दसऱ्यापावेतों आम्हीं खातरजमा केली. इतक्यांत बाईकडून पैका यावा हे मजकूर पूर्वी तुम्हांस दोन वर्षें लिहून जात आहेत. तीं पत्रें धरून उत्तरें होत गेलीं. यावर वृक्ष संदेहाचे कशास असतील? ही गोष्ट घडत नाहीं. याकरतां रचनायुक्त कल्पित बातमीदाराचें प्रमाण मानून, त्यास अर्थावर बसवून लिहिण्यांत येतें. दुसरें, जेणेंकरून विक्षेप पाटीलबावांस वाटे ते पुरवणी दाखऊं नये म्हणून समक्ष सांगितलें व लिहिलें. त्याचीं उत्तरें आलीं असतां पुरवण्या दाखवितां आणि त्याचे विक्षेपाची व्याख्या लिहितां, हें तों मोठेंच अपूर्व वाटलें. जाबसाल करावयाजोगे उत्तरें चांगलीं असतां तुम्हीं करीत नाहींत, आणि मोठी कमरबंदी † इकडेच ल्याहावयाची चालते. असो. सरकारकामावर दृष्टि असावी म्हणून आज्ञा. ऐशास, नारो शिवदेव ग्वालेरचे मुक्कामीहून कूच करून देशास गेले तोंपावेतों येथील वहिवाट त्यांस ठाऊकच होती. नंतर वर्तमान होत गेलें तें काढून वाचून पाहणें. पत्रें जातात त्यांतील हासील मजकूर स्मरण, त्यास कच्चें लिहीत होतों. दर्शनांतीं इस्तकबिल स्वामींची आज्ञा घेऊन उजनीस आले. तथीपासोन पुन्हा दर्शनपावेतों व ऐलीकडे मी लिहीत होतों. त्यासुधां व इंग्रजांचे तहनाम्याचे समयीं जालें वर्तमान सेवेसीं निवेदन केलें असेल. सरकारांत विनंतिपत्रें पाठवीत होतों. त्यांत ही मर्जी येथील कसी हे प्रकार विनवीतच होतों. नारोपंतनाना गेल्यानंतर गोहदचे मुक्कामीं पाटीलबावांचें माझें बोलणें झांशीवर भांडेरचे हिसेरसिदीचे ऐवजाकरितां पाटिलबावा दोन पलटणें पाठवूं लागले, ते समयीं काय खडका घडला जाला तो तपसील राजश्री आपाजी राम दाभोळकर पांस ठाऊक आहे. कांहीं मर्यादा राहिली नाहीं. तेव्हां पलटणें मना जालीं.

---

*पाल्हाळ, पान्हेरा-a long-winded story, corrupted into पाल्हाळ.

†अवसान दृष्टीस पडेल.

झांशीकराचे कारकून नरसिंगराव व राघो गोविंद दोघेही लष्करांत होते. त्यांनीं राजश्री रघुनाथ हरि यांस लिहिलें. व नरसिंगराव तीन वेळ झांशीस आले गेले. समक्षही सांगितलें असेल. रघुनाथ हरि यांनीं सरकारांत विनंती करावी. सरकारकाम नमुदास* येईल ती चाकरी सेवकाची खरी. पाल्हाळ लिहिण्यांत प्रशंसा मात्र दिसावी. काम कांहींच दिसूं नये. लिहिण्यांत फल काय? आधींच तहनाम्यापासोन बावांचे मनांत वक्रता कसी होती? नारोपंतनाना गेले ते काळीं राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे पंचमहालचे जाबसालावरून तुफानें कसकसीं आरोपिलीं, हेही आपाजीराम यांस विदित आहेत. झांशीवरील पलटणें मना जाल्यामुळें तर फारच विक्षेप वाढला. नंतर राजश्री त्रिंबकराव नारायण यांचे जाबसालाचीं उत्तरें प्रत्युत्तरें कशीं होत होतीं? तपसील लिहिल्यास श्रुत व्हावें, तर ज्यांत अर्थ निष्पन्न नाहीं त्या लिहिण्यांत अर्थ सेवेचा काय दाखवावा म्हणोन विनंती कच्ची केली नाहीं. राजश्री बाबूराव भास्कर झांशीचे मामलतीचे उमेदवार येथें राजकारणें घाटीत होते. त्यांस हुजूर रवाना करण्याविसीं स्वामींचीं पत्रें बावांस व आपाजीराम व बाबूराव यांस सादर जालीं. त्याची सलाह आपाजीराम व मी कशी करून आपाजीराम यांनीं दोन हजार रुपये वाटखर्चा सुद्धां कबूल करून बाबूराव यांस कसे समागमें घेऊन गेले, त्यांनीं विनंती केलीच असेल. राजश्री बाळाजी गोविंद बुंदेले यांजविसीं विक्षेप कसा होता व आहे; कितेक वेळ भानगड आपाजीराम व मी समक्ष असतां कशी जाली, आपाजीराम गेल्यावर बावा छावणींत ग्वालेरीस आले, तेथें दसरेयापावेतों तेथेंच मुक्काम होते, त्यांत काय बोलणीं जालीं असतील, त्यास कोणी साक्षीसच नाहीं. ग्वालेरीवर असतां पाऱ्हेरे बोलणीं लिहिणींही जालीं. त्यांत एक तरी सोय होती कीं, जाबसाल नरमगरम दोन्ही प्रकार चालते होते. गांठ पडून बोलणीं होत होतीं. वर्तमान फार करून बावा सांगत असत. विनंती करीत होतों. गायकवाडाचे कलमाचें उत्तर बोलत होते कीं, सुखरूप गायकवाडासीं जाबसाल आपला असेल तो व्याऱ्याचे ऐवजा सुद्धां उगवावा. इंग्रज पक्ष करणार नाहींत, येविसीं पक्कें बोलून घेतलें आहे. मागील बाकी माफ करावी असा इंग्रजांसीं करार आहे, तें कलम तगाद्यांत न यावें. वरकड जाबसाल सुखरूप करून घ्यावे. गोहदकर राण्याचा पक्ष इंग्रज करीत होते. आम्हीं राण्याचें पारपत्य केलें. इंग्रज बोलले नाहींत. गायकवाडाविसींही बोलणार नाहींत असें बावांचें पत्र सेवेसीं आलें असेल.

*प्रत्ययास.

सेवकानेंही विनंती केली असेल. इंग्रजांकडील कलमाचे दस्तऐवज हातास यावे; याचें उत्तर, सदाशिव मल्हार लखनऊस गेले आहेत, त्यांचीं पत्रें येत, दाखवीत, सांगत, त्याप्रमाणें विनंती करीत होतों. शेवटीं इंद्रसेन वगैरे यास दीड लक्षाची जागीर दिली पाहिजे, हा मुद्दा सरकारांतून कबूल होऊन आलें नाहीं, इतके निमित्तावर त्यांचें आमचें राजकारण नाहीं, त्यांनीं बेइमानी टिपचे कलमांत परभारा सलूख केला हे लबाडी केली, आतां त्यांसीं राजकारण काय, असें म्हणों लागले. होळकराचा जाबसाल सुधा न करीत. बाईस पत्र ऐवजाकरितां पाठवितों म्हणत. त्यांस घरीं बसले असतां साडेदहा लक्ष रुपये कर्ज घेऊन दिलें. आम्ही सरकारचाकरीवर असतां आमचे खर्चाचा समाचार घेत नाहीं. खबर घ्यावी म्हणोन मजकडून पत्रीं विनंती करविली, व वरचेवर पत्रें पाठऊन खर्चाची मदत होईल तरीच बादशाहाचें राजकारण आमच्यानें होईल, नाहीं तर कांहीं होणार नाहीं असा नित्य तगादा होता. एक दोन वेळ विनंती केली. त्याचें उत्तर त्यांस दाखविलें पाहिजे. समक्ष पत्रें पाहून मग रवाना करणें म्हणत. उत्तरें दोन पुरवण्या एक वेळ आल्या. त्यांत मजकूर मुलुखाचा पैका, राजेरजवाडे यांच्या खंडण्या व राजश्री विसाजीपंताचे कारकिर्दीच्या दाखल्या त्या आल्या. दोही पुरवण्यांतील मजकूर वाजवीच होता. मीही जाणतच होतों. कवाईत करून* दाखविल्या. रागें भरले. त्याचें उत्तर जालें असेल. पिऊन (भिऊन) ऐकून घेतलें नसेल तरीच तगादा दूर जाला. खर्चाची मदत जाल्यावांचून आमचें कूच होणार नाहीं म्हणत होते. त्याजपासोन दूर जालों. मग बोलणें सोडिलें. हेंही विनंतिपत्रीं लिहिलें होतें. याच पुरवणीवरून विक्षेप वाढला नाहीं. याचा तपसील निराळे पत्रीं विनविला आहे, त्यावरून श्रुत होईल. मर्जी यांची फार दिवस फिरली आहे. श्रीमंतांचे मुंजीचे समयीं मनस्वी भाषणें जालीं. तेव्हांपासून क्रम चालत चालत दिवसेंदिवस वृद्धीस पावत आहे. जाबसालास कसूर होत आहे कीं नाहीं पत्रीं काय विनंती करूं? स्वामींचे प्रतापेंकरून सेवक कुंठित नसेल जाला. एके दिवशीं नारो शिवदेव व आपाजीराम यांज देखतां बावांनीं माझे मध्यमांगुलीचें पर्व धरून बोलले आहेत कीं, आजपावेतों तूं माझें लक्ष ठेवीत होतास. आतां आम्ही लक्ष तुझें ठेवितों. आमचेच शद्व धरून उलटून पडतोस. जसें एक पर्व हातीं सांपडलें म्हणजे कोंपर धरून खवाटा धरून गळचीप देतात, तद्वत् तुझे हातीं एक शद्व सांपडला पुरे, तितका धरून कोठें खळींत घालशील कळत नाहीं. हा शद्व जे दिवशीं उजनी बाहेरले मुक्कामीहून रामजी पाटील यांची रवानगी होळकराचे मजकुराकरितां स्वामींकडे केली, ते दिवशीं

*युक्तीनें.

बोलले. त्याचें स्मरण आपाजीराम यांस असेल नसेल श्री जाणें. बोलणें मात्र मजकडे. सत्ताबळें बावांनीं हुंडारल्यास* माझा इलाज नाहीं. हें लिहिणें मूर्खवाद असें समजलें आसतां प्रसंगोपात लिहिणें प्राप्त जालें. आतांही सत्ताबळें बावा ऐकत नाहींत, यास माझा उपाय नाहीं. बावांचें मत असें आहे जे, आम्हीं बोलत जावें तें लेहून पाठऊन उत्तर आणीत जावें. मग बोलावें. येथेंच उत्तर करीत जाऊं नये. तत्रापि उत्तर करीतच आहें. बादशाही खिलत नायबमुनायबीचा, माहीमरातब नालकी झालरदार पालखी, बरोबर तुवां जाऊन श्रीमंतांचे सेवेसीं प्रविष्ट करावा, बावा म्हणत होते. मी सरकारकामाची यादी लेहून दिली. मुद्दा घातला कीं, याचे जाबसाल दरबारीं विचारिले तर उत्तर काय करावें? कुंठित होईन. तर हे जाबसाल सरकारचे उरकोन द्यावे तर जाणें होईल. ती यादी कलमाची छ १२ रबिलाखरची रवानगी डिगेचे मुक्कामीहून डांकेंत केली. त्याबरोबर राजश्री बापू भावे यांचे पत्रांत पाठविली आहे. ते सेवेसीं गुजराणितील. त्या कलमावरून विदित होईल. कांहीं जुनीं कलमें सरकारचे यादीप्रमाणें आहेत. कांहीं नवीं कलमें येथेंच उपस्थित जालीं तीं लिहिलीं; म्हणोन बावांनीं उश्रमा† केला कीं, नवीं कलमें यानें लिहिलीं, सरकारांतून कोठें लिहिलीं आहेत? असे विषाद मानून कलमाचे जाबसाल टाकून दिले. बोलत नाहींत. खिलत घेऊन जा म्हणत होते, तेंही म्हणत नाहींत. वर्तमान कळावयाकरितां विनंती करणें प्राप्त जाली. पुरवणी दाखविली ती समजून दाखविली. तत्रापि चूकच ध्यानांत आली असेल तर माणूस आहे. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सदाशिव मल्हारानें पाटिलबावांस लेहून पाठविलें कीं, सरकारकामाचे दस्ताऐवज इंग्रजानें घेतले हें तुम्हीं लेहून पाठविणें, असी आज्ञा आली. तर हें वर्तमान बाहेर ऐकून विनंती केली. बावांनीं सांगितलें नाहीं. असी विनंतिपत्रीं लिहिली असेल. बावांनीं पत्रही दाखविलें नाहीं. मजकूरही सांगितला नाहीं. मीं विचारिलें होतें. उत्तर जालें जे, आतां त्यांचें आमचें बोलणेंच नाहीं, दस्ताऐवज कसे मिळतात, असें बोलले. दस्ताऐवज घेतले असतील तर सदाशिव मल्हार आल्यावर कळतील. घेतलेही बावा सांगणार नाहींत. देणें कळतच आहे. पहिला क्रमच बंद जाला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter contains an instructive remonstrance from Sadashiv Dinkar who had to satisfy two strong and opposite personalities, Nana and Mahadji. The letter supplies a clue to their characters and at the same time a sample of linguistic effort.*

*हुंडारणें-झिडकारणें. †उश्रमा=उस्मारा, उस्रमा—casting in one's teeth, तोंडावर फेंकणें, फजित करणें.

No. 368. 20th March 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—बळवंतराव धोंडदेव यांस शुळाची व्यथा चार पांच महिन्यांपासोन उत्पन्न जाली. त्यांत हगवणही होती. उपाय फार केले. साध्य जालें नाहीं. जेष्ठ स्त्री देशीहून कन्येचें लग्न करून निघोन आली. ती येथें पावली. दोघी स्त्रिया जवळच होत्या. औषधउपायांची सीमा जाली. कांहीं साध्य न जालें. निधनापावेतों आलें. तेव्हां राजश्री पाटीलबावांस सांगितलें कीं, आमची ही दशा आहे. यत्न फार करून पाहिला, कांहीं साध्य नाहीं. निदानच दिसतें. इतकीच आयुर्मर्यादा होती यास उपाय नाहीं. पांच लक्ष आह्मांस देणें तें वारावें, तर गति आमची होईल व सरदारी चालली पाहिजे. बावांनीं विचार पुसला. तेव्हां ह्मणों लागले, आमचे तीर्थरूप धोंडोपंत त्यांचे प्रत्यक्ष बंधु खंडोपंत त्यांचे पुत्र सदाशिवपंत येथेंच आहेत. परंतु आह्मांतून विभक्त जाले. त्यांची आमची वांटणी होऊन फारकत्या जाल्या. कजिया तुटला. केसोपंत धोंडोपंताचे चुलतबंधु परंतु एकत्र संसार चालतो. केसोपंताचे पुत्र हरबाजीपंत आह्मांजवळच आहेत. एकत्र संसार आहे. त्यांचा वांटा जाला नाहीं. सध्यां देवरी किल्ला त्यांजवळच आहे. त्यांचा पुत्र रघुनाथराव आह्मांजवळ आहे. त्याचें दत्तविधान करून पुत्रत्वांत देऊन डौल चालविले पाहिजे. बळवंतराव आपले डेऱ्यास विकलच होते. मध्यस्थ गृहस्थ बावांकडे पाठवून लिहिल्याअन्वयें जाबसाल केला. तो बावांनीं मान्य केला. दत्तपुत्र घेणें असी परवानगी दिली. त्यावरून बळवंतराव यांचे घरीं दत्तविधानाचा समारंभ करून बावांस सांगोन पाठविलें. बावांनीं राजश्री माधवराव गंगाधर व आबा चिटणीस पाठविले कीं दत्तविधान जालें म्हणजे त्या मुलास वस्त्रें द्यावीं. हे उभयतां बळवंतरावांचे डेऱ्यास गेल्यावर मजलाही बोलाऊं पाठविलें. गेलों तों दत्तविधान प्रसंग होता. पाहिलें, व उभयतांनीं वर्तमान सदरीं विनंती केल्याप्रमाणें सांगितलें. चैत्र अधिक शुद्ध १० चे दिवशीं प्रहर दीड प्रहर दिवस पावेतों बळवंतराव बोलत होते. तंव वैद्यही होतेच व दत्तविधानास आरंभही केला. पुढें फारच विकळ होत चालले. दोघी स्त्रिया मोठ्या सावध राहिल्या. त्यांनीं स्वांगें धनीपणा करून, औघा बंदोबस्त राखून, खेदाचा लेशही कोठें दिसूं न देतां, स्थिरबुद्धि व धैर्यबलें दत्तविधान यथास्थित करून मूल घेतला. सदाशिवपंत, खंडोपंताचे पुत्र, बळवंतरावाचे चुलत बंधु जवळ होते, तेही अनुकूल जाले. दत्तविधान जाल्यानंतर वस्त्रें आणिलीं. पागोटयाचा पदर माधवराव गंगाधर यांनीं घेऊन सेवकाचे हातीं दिला. मीं

उत्तर केलें कीं, बावा श्रीमंतांचे ठिकाणीं आहेत. त्यांचें केलें सर्वांस मान्य आहे. माधवराव यांनीं म्हणाले जे, बावांनीं कबूल करून हा प्रसंग संपादावयास आम्हांस पाठविलेंच आहे. तुमचे हातून वस्त्रें देवावीं असी मर्जी आहे. तेव्हां मीं पागोट्याचा पदर सदाशिव खंडेराव यांचे हातीं दिला. त्यांनीं दत्तपुत्र रघुनाथराव यास पुत्रत्वाचें पागोटें बांधिलें. शेला घातला. नंतर प्रहर दीड प्रहर बळवंतराव होते. दशमीसच आगऱ्याचे मुक्कामीं यमुनातीरीं संध्याकाळचा चार घटिका दिवस राहतां बळवंतरावास देवाज्ञा जाली. दोघी स्त्रियांनीं शाबुती धरून, दानधर्म आदिकरून सर्व कर्म यथाशक्ति यथास्थित आपले आज्ञेनें वंचकबुद्धि टाकून सांग करून सहगमन केलें. चिता रचून दोघी स्त्रिया दोहीकडे निजून स्वहस्तें अग्निप्रवेश करविला. लष्करांत सर्वतोमुखीं अशा सत्या शाबूत कोठें पाहिल्या नाहींत, असीं व्याख्यानें जालीं. ईश्वरइच्छा प्रधान. बळवंतराव समाप्त जाले. दत्तकपुत्र घेतला त्याचे बंदोबस्ताकरितां बावा सेवेसीं लिहितील. मजला सांगतील तर विनंतिपत्र लेहावें लागेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञपंना.

¶*Sadashiv Dinkar reports the death of Balwantrao Dhondadeo Nagaonkar, Peshwa's Sardar of note, serving in Sindia's army. His two wives showed the rare courage of burning themselves with the husband's body.*

No. 369. April 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे. एके रोजीं राजश्री पाटीलबावांकडे जाऊन वर्तमान विचारिलें. त्यांनीं सांगितलें :—

बादशाह क्षणभंगुर. आगऱ्याचे मुक्कामीं रुसून कूच करून जात होते. याचें कारण, आम्हीं शागिर्दपेशास खर्चास दिलें होतें त्यांत आनंदराव नरसिंह यानें शेंकडा कसरेची वाट ठराऊन, त्याप्रमाणें ऐवज ठेऊन घेऊन, बाकी रुपया शागिर्दपेशास वांटून दिला. हा गुन्हा पुढें करून रुसावा दाखविला. खासगीची जागीर आम्हीं जप्त केली होती, ती सोडवून घ्यावी हे चित्तांत कुरकूर होती. शागिर्दपेशाचें कसरेचें निमित्त करून, कूच करून चालूं लागले. ते समाधान करून ठेविले. कसरेचा रुपया दिला व जागीरही सोडून दिली. आतां इंग्रजांकडे सूत्र लाविलें आहे. कागदपत्र चोरून अनुसंधान चालत आहे. शाहाजादा

लखनऊस आहे, त्यास आणावयाची पहिली बजिदी करीत होते. आतां चर्चाच करीत नाहींत.

मालत* इंग्रज सुरतेहून आला. तो पुण्यास जाणार ऐकिलें होतें. वर्तमान सेवेसीं विनविलें होतें. एके रोजीं बावांस विचारिलें कीं, मालत इंग्रज सुरतेहून आपणास विचारावयास आला कीं, पुण्याहून मुंबईस वकील पाठऊन देणें म्हणून पत्र आलें आहे. पुण्याकडे जाबसाल आपले विद्यमानें म्हणून पुसावयास आलों म्हणतों, तर पुण्याचे कागद आपण पाहिले कीं काय? गतवर्षीं पुण्यास वकील गेला होता त्यास राहूं दिला नाहीं, म्हणून रुसून गेला हें वर्तमान लेहून आलें होतें. असें असतां आतां त्यांनीं वकील कसा बोलाविला? इंग्रज लबाड बोलत असला तर, यास्तव आपण पत्र आणवावें. त्यानें पत्रें दाखविल्यास खरें मानावें. मग पुण्यास लेहून जाब आणवावा. इंग्रजांचा वकील पाठऊन द्यावा. लिहितील तर रवाना करावा. गुदस्तां वकील लबाडीनें पाठविला होता, तसा आतांही पाठवीत असिले तर कळे काय? बावांनीं उत्तर दिलें जे, इतकी चौकशी करूं नये. इंग्रज पुण्यास जातो हें बरेंच आहे. आपलीं पांचा कलमांपैकीं कलमें कलकत्त्याहून उगऊन यावयाचीं आहेत, तीं उगऊन येतील. मीं म्हटलें आम्हांकडून वर्तमान हें तरी कळलें पाहिजे. आपण पत्र लेहावें, मीही लिहितों. वर्तमान कळवावें. उत्तर जालें जे, आम्ही लिहीत नाहीं. तुम्हींही न लिहिणें. यांत आशय काय असेल तो असो. वर्तमान कळावयाकरितां विनंती केली असे.

शाहाजादा इंग्रजांनीं सदाशिव मल्हार याचे स्वाधीन करून लखनऊस रवाना करून दिला. तो आम्हांकडेसच पाठविला. त्यानें मुद्दा घातला कीं, कदीम जागीर माझी आहे ती मजकडे चालवावी. नवी जागीर पन्नास हजार रुपये दरमहाप्रमाणें सहा लक्षांची नवी जागीर जातीस द्यावी, व तीन चार (हजार) फौज, तितकींच पलटणें, यांची जागीर लाऊन द्यावी. त्या ऐवजीं फौज आम्ही चाकर ठेऊं. याखेरीज तुम्हांकडून फौज नेहमीं दहा बारा हजार स्वार गाडद मिळोन आमचे तैनात राहावी. आम्हांबरोबरच चालत जावी. असे मुद्दे घालून येत नाहीं. इंग्रजांनीं वजिरांनीं खुशामत करून तोरा† हातीं ठेविला आहे. रामगडाविसीं इंग्रजांनीं आम्हांस सांगितलें, तुम्हीं फौज पाठऊन किल्ला घेणें. त्यावरून आम्ही फौज रवाना करितों. त्यांचें अनुसंधान आंतून रामगडकरासीं आहे. असे छद्मी आहेत.

*Charles Warre Malet. †मुद्दा, शह.

आणखी बोलणें बादशाही खिलताविसींचें फार जालें. तें निराळें विनविलें आहे. त्यावरून विदित होईल.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the growing unpleasantness between Sindia and the Emperor, the visit of Malet to Sindia's camp on his way to Calcutta and the refusal of the Shahzada to return to Delhi from his sojourn at Lucknow.*

No. 370. April 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—गोसाव्याचे खलबतापुढें राजश्री पाटिलबावांस दुसरें काम सुचूं नये. घरचीं कामें बंद. घरचे मुत्सद्यांची भेटी, बोलणें, कामकारभार कांहीं न व्हावें, तेथें माझी गांठ पडणें कळतच आहे. लाचार होऊन एके रोजीं राजश्री माधवराव गंगाधर यांजकडे जाऊन बोललों कीं, गोसाव्याचे खलबतापुढें इष्टतम बावांस कांहींच नाहीं. सरकारचे पत्रांची उत्तरें आठ दहा महिने जात नाहींत. मागतां थकलों. आतां तर गांठही पडत नाहीं. मग कारभार काय होतो, विचारावें कोणास? बावा सांगतील तें वर्तमान लेहावें. गांठ न पडतां वर्तमान कळणेंही राहिलें. यास्तव दिनचर्या लिहिणें राहिलें. यास्तव श्रीमंतांचा निषेध दर पत्रीं येत असतो. इतकी इतराजी सोसून मी कांहीं लिहीत नाहीं. आजपावेतों दम खाऊन राहिलों परंतु इतराजींत कोठवर राहावें? उत्तर मिळत नाहीं. गांठ पडून दिनचर्या समजत नाहीं. सरकारकामाकाजाची यादी दिली ते जाबसाल होत नाहींत हें आतां सरकारांत लेहून पाठवणें प्राप्त जालें. अतःपर मजकडे शद्ब नाहीं असें बोलून ठेविलें होतें. एके दिवशीं बावांनीं माधवराव यांस सांगितलें जे, वर्षप्रतिपदेचे दिवशीं बादशाही खिलता सुद्धां रवानगी सदाशिव दिनकर याची करावी लागते. तरतूद करणें. ते समयीं रावजींनीं सेवकाचे विनंतीप्रमाणें मजकूर बावांस श्रुत केला. तेव्हां सेवकास बोलाऊन नेऊन विचारिलें कीं, पत्रांचीं उत्तरें कधींपासोन राहिलीं आहेत? मीं उत्तर दिलें जे, आठ दा महिने जाले, ग्वालेरीवर छावणी जाल्यापासून सरकारचीं पत्रें आपणास व मजला आलीं व गेलीं. दर रवानगीचीं पत्रें माझे पत्रा सुद्धां चिटणीसांजवळ देत गेलों. उत्तरें निरंतर समक्ष म्हणत असतां मिळत नाहींत. चिटणीस जवळच होते, त्यांस विचारिलें. त्यांनींही मजप्रमाणेंच सांगितलें. पत्रें काढविलीं.

तीं त्यांनीं शोधून काढतां, सवाल*महिन्यापासोन जाब गेले नाहींत असें सिद्ध जालें. तेव्हां जाब लेहून देणें म्हणोन सांगितलें. कधीं देतात पाहावें. दिनचर्या वरचेवर आपणापासून कळावी ते मीं लेहून पाठवावी. गांठ पडत नाहीं, वर्तमान कळत नाहीं. लेहून काय पाठवावें ? याचें उत्तर बावांनीं केलें कीं, पत्रांचीं उत्तरें लेहून घेणें, नंतर तुमचे यादीचे जाबसाल करितों. आजपावेतों बादशाहींतील कारभार केला व पुढें कर्तव्य तें सविस्तर सांगतों; रवानगी करणें. मीं म्हटलें बादशाही कारभार जाला तो व पुढें कर्तव्य आपण श्रीमंतांस लिहीत जावें. मार्ग आहे. उत्तम आहे, आम्हीही लेहून देतों, असें बोलले आहेत. प्रसंग घडून अमलांत येईल तें खरें. बादशाही कारभाराची दाटी अतिशय असते. गोसाव्याचें खलबत, उदय अस्तमान, किंबहुना अतोर्ध्वही नित्यक्रम चालला आहे. त्यापुढें कोणे संगतीस जातें न कळे. मजला यावयाची आज्ञा नाहीं, तर मी होऊन कबूलही करीत नाहीं. आजपावेतों यादीवरच तट घातला आहे. पुढें क्रम जाण्याची उपश्रुति निघाली आहे. बादशाही शिरपाव घेऊन जाणें म्हणतील, तर आधीं यादीचे जाबसाल पुढें आहेत ते उलगडून दिले, तर मग उजूर करावयास† हीच पृच्छा आहे, जे आपण वकीलमुतलकीचें पद घेतलें, नायबमुनायबीचा खिलत श्रीमंतांनीं घ्यावा न घ्यावा हें पुसावें. याचें साळसूद उत्तर जालें जे, वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें करून घेतों. असें उत्तर जाल्यास आतांच सिद्धीस नेऊन शिरपाव रवाना करणें म्हणतां, क्रमेंकरून साध्य होईल असें म्हणतील. यथाक्रम सुमार्ग ध्यानांत असता, तर प्रथमच श्रीमंतांचे नांवें वकीलमुतलकी घेते. तें न करितां आपण घेतली, यावरून चित्तांत नाहीं स्पष्टच होत आहे. प्रश्न केल्यावर बाहणे होतील. न ऐकून जात नाहीं म्हटल्यास आग्रहपूर्वक जाच म्हणतील, तर मग मी लाचार आहें. शब्दपांडित्य मात्र आहे. वरकड बळ नाहीं. यादी कलमबंदीचे जाबसाल उगऊन न देतांही जाच म्हणतील, आग्रहच करितील, तरीही उपाय नाहीं. पुढें पर्जन्यकाल समीप आला. याकरतां त्वरा करितील, तर बळ बांधतां येणार नाहीं. यत्न चालेल तेथवर मोडती घालीन. ईश्वरइच्छा व अन्नोदक-ऋणानुबंधापुढें उपाय नाहीं. वर्तमान कळावें म्हणून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of his having remonstrated in strong terms with Mahadji for neglecting the affairs of the Poona Darbar entrusted to him and disregarding their instructions.*

*आगस्ट १७८४. †सबब दाखविण्यास.

No. 371. April 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांनीं बोलाऊन पृच्छा केली कीं, बादशाही खिलत आम्हीं घेऊन ठेविला, तो मागेंच तुम्हांबरोबर रवाना करीत होतों. तूं जाईनास? आतां रवाना करीत होतों, तूं मना करितोस. पुण्याचीं पत्रें आणून दाखविलीं, त्यांत अनमान दिसला तर रवानगीचा विचार कसा करावा? मीं उत्तर दिलें जे, आपण पहिलें लेहून पाठविलें आहे कीं, नायबमुनायबी व बक्षीगिरी श्रीमंतांचे नांवें घेऊन, खिलत माहीमरातब वगैरे घेतला तो रवाना केला आहे. हा प्रथम लेख आपला गेला. वकीलमुतलकी फर्द आपण दसखत बादशाहाचें करून घेतली, त्याची नक्कल पुण्यास पाठविली. त्यावरून हीं पत्रें अंदेशाचीं आलीं. प्रत्यक्ष लिहिलें आहे जे, उच्च पद बावांनीं घेतलें, कनिष्ट पद श्रीमंतांकडे ठेविलें. त्याचा खिलत पाठवितात, तो श्रीमंतांनीं घ्यावा? चौघां दौलतवंतांस व लौकिकांत कसें दिसेल? याची सलाह आपणास पुसावी म्हणोन पत्रीं लिहिलें आहे. हा मजकूर घरचा नाहीं. दरबार बादशाहीचा बहुमान. तो कसा, कोणे पदाचा असा लौकिक होईल. राहणार नाहीं. याचें कसें करावें? बरें, नायबमुनायबी व बक्षीगिरी श्रीमंतांचे नांवें घेतली, याचे फर्द दसखत कसे करून घेतले ते दाखवावे. हें ऐकून बावांनीं फर्दा काढिल्या, त्या पाहिल्या. फर्दांतील बितपसील :—

बक्षीगिरीची फर्द बावांनीं श्रीमंतांचे नांवें लेहून दिली. त्याजवर बादशाहांनीं दसखत केले आहेत जे बशर्त नायब मजबूत फर्जंद अर्जुमंद माधवराव शिंदे बहादर मंजूर आहे.

नायबमुनायबीची फर्द बावांचेच नांवाची आहे. त्याजवर बादशाहाचे दसखतही बावांचेच नांवें आहेत.

वकील मुतलकीचे फर्दाची नकल पूर्वींच सेवेसीं पाठविली आहे त्याप्रमाणेंच आहे.

सदरहू तिन्ही फर्दा पाहून त्याच्या नकला तिहींच्या मीं घेतल्या. नंतर दुसरे दिवशीं भाईकडे* जाऊन बोललों कीं, तिन्ही फर्दा बादशाही दसखत करून

*राणेखानभाई.

घेतल्या, यांत श्रीमंतांचे नांवें कोणतें पद आहे कीं, त्याचा खिलत श्रीमंतांस पाठवितां ? पहिले कागदीं तुम्हीं लिहिलें आहे जे नायबमुनायब हें पद व बक्षीगिरीचा खिलत रवाना केला. त्याप्रमाणें दोन्ही फर्दा श्रीमंतांचे नांवें दसखत करून घेतल्या असत्या, तर या दो पदांचा तरी खिलत पाठविला असता. मग वकीलमुतलकीचीच रदबदल राहती. तेंही नाहीं. तिन्ही फर्दा दसखत करून घेतल्या, त्या तुमचेच नांवाच्या. श्रीमंतांस त्यांत कांहीं नसतां उगाच खिलत काय म्हणोन पाठवितां ? त्यांनीं घेतल्यास उत्तम. न घेतल्यास कसें होईल ? उच्च नीच पदाचे अंदेशाचीं पत्रें आलीं तीं तुम्हांस दाखविलीं. या तिही फर्दांत तर श्रीमंतांकडे पदच नाहीं, मग खिलत कशाचा ? हें बोलणें भाईंनीं बावांस सांगितलें. त्यावरून बावा उश्रमा करीत होते कीं, दाजी उगाच आशंका घेतो. आम्हांस शक्ति श्रीमंतांची. प्रसंगोचित आम्हीं कसेंही कोणाचेही नांवें केलें, तें औघें श्रीमंतांचें. माझे पोटींपाठीं काय आहे ? सर्व श्रीमंतांचें. दाजी हिसके घालितो. असें माझे पाठीमागें बोलले. उदईक मजसीं प्रसंग करणार. केलाच तर स्वामींचे प्रतापेंकरून सुचेल तें उत्तर करीन. मजकडे बोलणें आहे. ऐकतील उत्तम; न ऐकत तर माझा उपाय नाहीं ! सारांश, खिलत रवाना करावा असा आग्रह दिसतो. मी तर सरकारी जाबसाल फडशांत आल्यावांचून जात नाहीं, हें त्यांस कळलेंच आहे. गंगाजी हुजऱ्या फार अत्यावस्थ जाला. भरंवसा त्याचा नाहीं म्हणून घरास बिदा करितों, म्हणून बावांस विचारिलें. बावा म्हणतात, यानें खिलताबरोबर जाऊन, दरबारीं पावता करून आपले घरास जावें. बंदुका, तरवारा, कमाना, तरकश,* खंजीर असे जिन्नस श्रीमंतांकरितां बावांनीं तयार केले, तेही पाठवावे असें आहे. बळेंच पाठऊं लागले आणि मजलाही पत्र मागितलें, तर द्यावेंच लागेल. आधींच विक्षेप माझा बावा वाहत होते. कारण कीं, जाबसाल खडखडित सख्त फार होतो. आतां या खिलतावरून तर फारच वाईट मानिलें आहे. नारो शिवदेव गेल्यापासून आजपावेतों सात महिने मात्र रोजमरा दिला. तेरा महिन्यांस ठिकाण नाहीं. दहा हजार रुपयांपावेतों कर्ज जालें. पुढें कर्जही मिळत नाहीं. बावांनीं मागेंच तेरा महिने दिले नाहींत. आतां विक्षेपांत काय देतात ! असो. वर्तमान विदित व्हावें म्हणोन विनंती केली असे. पुढें मजकूर होईल ती विनंती करीन. कर्ज मिळेल तंव चालवीतच आहें,

*तर्कश-तीरकश, बाणांचा भाता.

भरंवसा नाहीं. लोक तोडून जाब देतात. तत्रापि मिळेल तंव चालेल. ईश्वर-इच्छा प्रधान. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar enters a strong protest with Mahadji for having secured for himself from the King offices higher than those conferred on the Peshwa, who was his superior in rank and authority.*

No. 372. April 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—स्वामींचीं आज्ञापत्रें पूर्वी सादर जालीं होतीं कीं, वकीलमुतलकी श्रेष्ठ पद राजश्री पाटिलबावांनीं घेतलें, नायबमुनायबी व बक्षीगिरी कनिष्ट पदें श्रीमंतांचे नांवें घेऊन त्यांचा खिलत बादशाहाचा पाठवितात, ही गोष्ट चौघां दौलतवंतांत कसी दिसेल? लौकिक काय म्हणतील? याकरतां तुम्ही राजश्री पाटिलबावांस विचारणें कीं, कनिष्ट पदाचा खिलत पाठवितां, तो श्रीमंतांनीं घ्यावा कीं काय? हीं पत्रें येथें पावलीं. पाटिलबावांस दाखविलीं नवतीं. पुन्हां सेवेसीं विनंतीपत्र पाठविलें. त्याचे प्रत्युत्तरीं आज्ञा आल्याप्रमाणें वर्तणूक करावी. उत्तर सादर जालें नाहीं तोंच बावांनीं खिलत रवाना करावयाची जलदी करूं लागले. पहिलें मजलाच घेऊन जा म्हणत होते. मीं सरकारकामाचीं कलमें यांची यादी लेहून दिली. हे जाबसाल उलगडल्यास माझें जाणें होईल, नाहीं तर होत नाहीं. याजकरितां माझा त्रास घेऊन आनंदराव नरसिंह यांचे पुत्राबरोबर खिलत रवाना करूं लागले. तेव्हां मीं पत्रें बावांस दाखविलीं. वाचून पाहून विषम मानिलें कीं, यानेंच दरम्यान खूळ उभें केलें, असें समजून परभारीं पत्रें श्रीमंत व स्वामींस लेहून जामगांवास राजश्री बाळाजी जनार्दन याजकडे रवाना केलीं. तीं जामगांवास पाऊन जाब बाळाजीपंताचा आला. तेव्हां मजला बोलाऊन नेऊन तो जाब दाखविला. पहिला श्रीमंत व स्वामींचे पत्राचा कांहीं उल्लेखच नवता. त्यानें आपलाच मजकूर लिहिला होता जे, मी पुण्यास जाऊन श्रीमंत राजश्री नानांचें दर्शन घेऊन बादशाही खिलताविसीं विनंती केली. आज्ञा जाली कीं, आम्ही घराऊ रीतीनें सांगतों, वकीलमुतलकी श्रेष्ठ पद राजश्री पाटिलबावांनीं घेतलें. कनिष्ट पद श्रीमंतांचे नांवें घेऊन खिलत पाठवितां तो श्रीमंतांनीं कसा घ्यावा? वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें बादशाह-

पासून दसखत करून घेऊन वकीलमुतलकीचा व बक्षीगिरीचा खिलत पाठवावा. श्रीमंत प्रशस्तपणें घेतील. याचा लौकिक येथें तेथें न होतां वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें करार करून घ्यावी. असी आज्ञा स्वामींची जाली. तें पत्र मला दाखऊन मजसीं बोलले जे, आम्हीं जें करणें तें श्रीमंतांनिमित्तच करावें. करितों. आमची बिशात वडिलांची काय होती? प्रथम राणोजीबावांस खिजमतगारी सांगितली, नंतर कृपा करून पागा दिली, तेथून (वाढवीत वाढवीत) या पदवीस आणिलें कीं आम्हीं बादशाहाची स्थापना केली. श्रीमतांचे सेवक होऊन बादशाहा स्थापिले. आतां आम्हीं बादशाही पदांची इच्छा कां करावी? तत्रापि करण्याचें कारण द्रव्यसंचय व लौकिक मेळवावा असा अभिलाष धरावा, तर श्रीमंतांचे कृपेंकरून आम्हांस उणें काय आहे? लौकिक तों आहेच. पैका सांचला नाहीं तर बादशाही मुलूख उजाड. यांत मिळणें काय? सध्यां बादशाहाचा खाजगी खर्च व शागिर्दपेशा व फौज यांचाच खर्च चालणें परम संकट. तेथें पैक्याचा संचय होणें कळतच आहे! आणि संचय तरी किमर्थ करणें? आमचें जन्माचें सार्थक श्रीमंतांचे कृपेंकरून जालें. अवशिष्ट काल राहिला तो श्रीमंतांचे कृपेंकरून जाईल. द्रव्यसंचयाचा हव्यास कोणानिमित्त करावा? पुढें पोटींपाठीं तरी कोणी आहे, त्याबद्दल अभिलाषबुद्धि धरावी? तर पोटींपाठींही कोणी नाहीं. जें करणें तें श्रीमंतांचीच सेवा करावी या बुद्धीनें आम्हीं वकीलमुतलकीचा सवाल श्रीमंतांचे नांवें लेहून दिला. त्याजवर दसखत बादशाहांनीं केलें कीं, आम्हीं आपणाकडून वकीलमुतलकी तुम्हांस दिली. श्रीमंतांकडूनही तुम्हांसच दिली. ती करार तर श्रीमंतांचेच नांवें जाली. दसखतांत अगोदर आमचें नांव आणावयाचें कारण कीं, मागें सहा वर्षांचे स्वारींत बक्षीगिरींत श्रीमंतांचे नांवेंच आम्हीं करार करून घेतली. नंतर राजश्री विसाजी कृष्ण व होळकर यांनीं जाबतेखानाचा अभिमान धरून त्यास बक्षीगिरी द्या म्हणाले. आम्हीं देऊं ना म्हणून फौजबंदी करून, आम्हांवर चालून येऊन, आमची अबरू घेऊन, बक्षीगिरी जाबतेखानास देवविली. आतांही फक्त श्रीमंतांचेच नांवें दिल्यास त्यांनीं फिरून होळकर पाठविले तर पूर्वस्थितिच करून घ्यावी! इमान, वचनें, प्रमाणें म्हणावीं, तर खासा श्रीमंतांचें इमान. येथें विसाजीपंत व होळकर शिंदे आदिकरून लहान मोठे सारे सरदारांचीं इमानें आम्हांपासीं गुंतलीं असतां ही दशा जाली. पुढें होळकरास न पाठवीत, भरंवसा काय? यास्तव असें दसखत बोलून चालून केलें, त्यास आम्हीं काय करावें? उदंड खातरजमा केली परंतु ऐकेनात. तेव्हां तूर्त मर्जीवर घेऊन चाललों. सध्यां येथें बहुतांचे प्रवेश आहेत. त्यांस बाहेर काढावें,

सारा बंदोबस्त आपला करावा, मग म्हटलें तसें करून घ्यावें, अशा अन्वयें तो स्वाल जाला. आपले नांवें वकीलमुतलकीचा अभिलाष करून सवाल करून घेतला नाहीं. त्यासी सवालावर दसखत जाले आहेत कीं, श्रीमंतांचे तर्फेनें तुम्हांसच वकीलमुतलकी सांगितली आहे. असें विस्तारयुक्त फार बोलले. तात्पर्य, वकीलमुतलकीचा खिलत चारकुबा व नालकी व बक्षीगिरीस माहीमरातब वगैरे दोन्ही खिलत आहेत. ते खिलत श्रीमंतांनीं घ्यावे. न घेतले, उजनींतच राहिले, तर आमचा लौकिक राहत नाहीं आणि मोठे मोठे पेंच पडतात. त्याचा विस्तार आज ध्यानांत येत नाहीं. पेंच पडतील ते कालीं सांभाळले जाणार नाहींत. आणखी जालें तें निराळें विनविलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the explanation offered by Mahadji of the circumstances under which he accepted the dignity of Vakil-ul-Mutlaq.*

No. 373. 10th April 1785.

(ले. सदाशिव दिनकर.)

छ विज्ञापना ऐसीजे. दिनचर्येचें वर्तमान :—

आंबूजी इंगळे दिल्लीहून कूच करून पुढें गेले होते. तिकडून शीखहि जमा होऊन आले. यांचा त्यांचा तफावत थोडा राहिला होता. शीख फार आहेत. एक सरदार नाहीं. आपसांत फूट. असे तार पतार* आहेत. त्यांपैकीं दोघां सरदारांची आपसांमध्यें जीद† होती. त्या दोघांचीं राजकारणें इंगळ्यांकडे आलीं होतीं, कीं एकानें आंबूजीस सामील होऊन दुसरा सरदार शीख त्याचें पारपत्य करावें. याच अन्वयें दोघांचींही बोलणीं होतीं. बोलतां बोलतां करार ठरला जे, दोघांही शिखांचा सलूख करून द्यावा. शिखांनीं बादशाही सलूख नजफखानचे कारकीर्दीत चालत होता, त्यांत शीख राखी‡ घेत होते. आजपावेतों चालत आलें. आतां राखी घेऊं नये. राजश्री पाटिलबावांसीं भेटावें. सांगतील ती चाकरी करावी. याप्रमाणें करार ठरून आम्ही दोघांही शिखांचे डेऱ्यास गेलों. बहुमान प्रसंग जाला. त्यास आपले डेऱ्यास आणून बहुमान प्रसंग करूं. त्यांस भेटीस घेऊन येऊं. आज अगदींच मुलूख शिखांपासून सोडावा ही गोष्ट

---

*तारबतार-उद्ध्वस्त, विकीर्ण. †भांडण. ‡खंडणी.

थोरले मसलतीवांचून होत नाहीं. बरसातीस दिवस थोडे राहिले. फौज देशची नवी आली नाहीं. याजकरितां तूर्त इतकाच करार ठरवून समारोप केला असे. आंबूजीचें पत्र बावांस आलें. हें वर्तमान बावांनींच सांगितल्यावरून विनंती केली असे.

रामगड अंतर्वेदींतील अफराशाबखानाचा भाऊ व बायको यांजवळ आहे. तो वित्तविषया सुद्धां घ्यावा, असें बावांचें मानस आहे. ते म्हणत होते आम्हांजवळ वित्तविषय कांहीं नाहीं. फक्त किल्ला आहे. तो घ्यावयाचा असला, तर आमची सोय करून जागीर व राहण्यास जागा नेमून द्यावी. त्या जाग्यांत जाऊन राहूं, किल्ला खाली करूं. याप्रमाणें दों तीं द्वारें जाबसाल लाऊन भुलथाप दिली, आणि आंतून इंग्रजांचा कंपू अनुपशहरावर होता, त्यांसीं अनुसंधान लावून बोलावून घेतलें. ते अनुपशहराहून कूच करून रामगडानजीक पांचा कोसांवर येऊन मुक्काम करून राहिले आणि बावांस लेहून पाठविलें कीं, रामगडवाल्यासीं बोलूं नये. किल्ला वित्तविषय याचा याजकडे राहील. तुम्हांकडून तगादाच लागला तर आम्हांस कुमक करणें प्राप्त आहे. हें पत्र आल्यावर बावांनीं इंद्रसेनास बोलावून वर्तमान सांगितलें. त्यानें उत्तर केलें कीं, त्यास लेहून पाठऊन मना करितों. असें ऐकिलें. रामगडावर मीर्जा रहीमबेगाचा भाऊ याजबरोबर कांहीं फौज सुद्धां रवाना केला आहे, तो अद्यापि पावला नाहीं. त्यास माघारा बोलावितात कीं जाऊं देतात, वर्तमान होईल ती विनंती करीन. शीख दोन सरदार आंबूजी इंगळे यांचे विद्यमानें बावांस भेटले. बावांनीं त्यांस वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे दिले. तहाचा मजकूर सदरीं विनविला आहे.

अनुपगीर गोसावी याचें वर्तमान फंदफितुराचें पूर्वी विनविलेंच आहे. एक दिवस राजश्री पाटिलबावांचेही बोलण्यांत मोघम इकडील मंडळीची चाल फंदफितुराची असें आलें. सांप्रत आगऱ्याहून बादशाह व बावांचें कूच श्रीमथुरेच्या सुमारें जालें. शिकंदऱ्यास मुक्काम जाला. तेथून गोसावी मजकूर यानें कूच करून पुढें गौघाटावर गेला. कारण कीं, जुलाब घ्यावा लागतो, चार दिवस मुक्काम पाहिजे, म्हणून पुढें जातों असी रूढ* करून गेला. लौकिकांत वर्तमान आहे जे, अफराशाबखानाची स्त्री व पुत्र समागमें आहेत. गोसाव्याजवळ उतरत होती. गोसाव्यानें त्या मुलांचे पागेचीं घोडीं सोडून आणून आपले पागेस लाविलीं. बारगीर, शागिर्दपेशा, बाजारचे वाणी देखील फोडून आपणाकडे आणावे असा

*थाप.

विचार केला. तेव्हां ती स्त्री व मूल बावांकडे येऊन, वर्तमान सांगून प्रश्न केला कीं, अशी दशा गोसाव्यानें आमची केली, हें आपणास बरें दिसतें कीं काय? बंदोबस्त आमचा कसा करणें, पोटास काय नेमून देणें तें देवावें. यावरून बावांनीं गोसावी यास निषेध केला. म्हणून गोसावी कूच करून गेला. अशी लौकिकी वदंता आहे. गोसावी वृंदावनास आपले जागिरींतच गेला आहे. परस्परें कवाईतदारच आहेत. कोणाची सरस होते न कळे. आंबूजी इंगळे तीस चाळीस स्वारांनसीं दिल्लीहून निघोन, लांब लांब मजली करून येऊन, वर्षप्रतिपदेचे* दिवशीं प्रहर रात्रीस बावांस भेटले. शिखांचे वकील मागाहून येतात, ते येतील. भेटी होऊन वर्तमान होईल ती विनंती करीन. फौज आंबूजीची दिल्लीवरच आहे.

खंडेराव हरि यांची रवानगी बुंदेलखंडांत केली. समागमें पलटणें दहा व पांच सात हजार फौज, वीस पंचवीस तोफा दिल्या, ऐकतों. गणती किती असेल कळेना. मशारनिल्हे सडे श्रीमथुरेचे यात्रेकरितां चार रोज मागें राहिले. तोफखाना व पलटणें व कांहीं फौज पुढें जाणार. मागाहून यात्रा करून खासाही जातील. बिदा जाले. फिरून पुसावयाचें नाहीं.

रामगडाजवळ पलटणें आलीं होतीं तीं माघारीं अनुपशहरास गेलीं. हें ऐकून वर्तमान पाटिलबावांस विचारिलें. त्यांनीं सांगितलें जे, आम्हीं इंद्रसेनास विचारलें कीं, रामगडचे मदतीस तुमचीं पलटणें आलीं आहेत, तेव्हां तुमचे चित्तांत बिघाड करावयाचा आहे कीं काय? त्यानें उत्तर दिलें कीं, आम्हांस बिघाड करावयाचा नाहीं. मी वर्तमान कलकत्त्यास लिहितों. तेथून जाब येईल त्याप्रमाणें वर्ततील. असें ठरलें आहे. इंद्रसेनानें कलकत्त्यास लिहिलें आहे. तेथून उत्तर येईल त्याप्रमाणें वर्ततील. तूर्त पलटणें अनुपशहरास गेलीं आहेत.

सुजादिलखान आगरेकर किल्लेदार व त्याचा भाऊ बजीदखान दोघांस बावांनीं हत्ती, जवाहीर देऊन रजाबंद† केलें. त्यांचे विद्यमानें रामगडचा जाबसाल लागला. ते उभयतां रामगडास गेले आहेत. काय विचार करून येतात तो कळल्यावर विनंती करीन.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar details for Nana's information items of news from Sindia's camp, the principal of them being the pacification of the Sikhs by Ambaji Ingle, the dispatch of expeditions against Ramgad and Bundelkhand and the sudden desertion of Gosavi Anupgir, Himmat Bahadur.*

*१० एप्रिल १७८५. †खूष.

No. 374 April 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री माधवराव गंगाधर यांनीं मजला बोलाऊं (पाठऊन) भाईचे घरास घेऊन गेले. भाई व हे मिळोन मजसीं बोलूं लागले जे, पहिलेपासोन क्रम श्रीमंत राजश्री नानांपासून कागदपत्र येत असत. आतां यत नाहींत. ते येत जावे. तुमचा पहिलेपासून क्रम चालत आला आहे त्याप्रमाणें कागद लिहीत जावा. बोलत जावें. श्रीमंतांचें यांचें पहिले क्रमाप्रमाणें सुरळीत चालावें. बादशाही खिलत उज्जनींत पडला आहे, तो पुण्यास जावा, श्रीमंतांनीं घ्यावा असें व्हावें. असा मजला प्रश्न केला. मीं उत्तर दिलें जे, हे क्रम चालवण्याचा अखत्यार राजश्री पाटिलबावांकडे आहे. पहिलें मजला सांगत आले त्याअन्वयें मी वर्तणूक करीत होतों. आतांही करितों. आज नवें भाषण हें काय ? क्रमास प्रतिबंध तुम्हांकडून जाला, किंवा श्रीमंतांकडून अगर मजकडून कोणाकडून आहे, याचा विचार तुम्हींच करावा. श्रीमंतांचीं पत्रें निरंतर येतच होतीं. बारा महिने जाहले, पत्रें त्यांचीं बावांचे नांवें माझे नांवें यथानुक्रमें दर रवानगीस येत गेलीं. त्यांचे जाबच तुम्हीं देत नाहींत ! धन्याचे तुमचे संबंध फक्त स्नेहाचे नाहींत, दौलत चालवण्याचे राजकारणाचे आहेत. राजकारणी पत्रांचे जाब बारा महिने देत नाहींत. तेथें तुमचे उत्तराची प्रतीक्षा राहते. तुमचे विद्यमानचीं राजकारणें त्यांचीं उत्तरें तुम्हीं द्याना ! त्यांनीं कोणत्या आधारानें पुढें क्रम चालवावा ? तुमचीं उत्तरें जात नाहींत यावरून तुमची उपेक्षाही दिसली, त्यामुळें तेही पत्र लिहीत नसतील. सरकारचीं कामें तुम्हांकडून होणें; महाल सरकारचे तुम्हीं दाबले; याखेरीज पैकाही सरकारचा देणें आदिकरून जाबसाल तुम्हांकडून होत नाहींत. बादशाही खिलत तुम्हीं रवाना केला, ते समयीं श्रीमंतांचें पत्र याच मजकुराचें मजला आलें होतें, तें मीं तुम्हांस दाखऊन स्पष्ट सांगितलें कीं, पाया-शुद्ध काम करून मग खिलत रवाना करावा. त्याचा दुरारोप मजवरच केला कीं, यानेंच दरम्यान खूळ केलें. असें चित्तांत आणून, परभारा पत्रें श्रीमंतांस लेहून, जामगांवास बाळाजीपंताकडे पाठविलीं. त्यांचे जाब आल्यावर खातरजमा जाली असेल. श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें मी बोलत होतों कीं, आंगची कल्पना बोलत होतों, हें समजणें उघड आहे. श्रीमंतांचे नांवें पदाचें दसतखच पातशाहाचें नसतां, बादशाही षुका श्रीमंतांचे (नांवें) नसतां खिलत पाठविलात, तो कशाचा म्हणून श्रीमंतांनीं घ्यावा ? लौकिकांत दौलतवंतांस काय सांगावें ? हा विचार

पहिलेच बोलत असतां ऐकिलें नाहीं, यास काय करावें? हें ऐकून उभयतांही बोलले कीं, पत्राचे जाब घेणें. कामेंकाजें सरकारचीं, जीं तुमचीं अटकलीं असतील, खेडींपाडीं सोडून देतों, घेणें आणि पूर्वीलप्रमाणें मार्ग चालूं देणें. मीं उत्तर केलें कीं, तुम्हीं दौलता करितां, सूक्त असूक्त, वाजवी गैरवाजवी, विचार विवेक जाणतां, य मीही वरचेवर दुखऊन बोलत असतां ऐकत नाहींत. चित्तास येतें तें करितां, येणेंकरून मजला शद्व दरबारीं लागतो. त्यांतून सुटका माझी होत नाहीं. फजीत पावतों म्हणून तुम्हांसीं सख्त बोलतों. त्याचा उलट विषाद मानितां. आपणास शद्व कशांत लागतो याचा विचार न करून, चित्तास आलें तसें पाऊल टाकितां. या वर्तणुकेवरून मी खावंदाचा शद्व सोशीत आलों. मी चाकर आहें. धन्याची इतराजी जाल्यावर पारपत्यास विलंब काय आहे? आजवर जालें तें जालें. याउपर माझी हिंमत पुरत नाहीं. उभयतां म्हणाले, इकडील वर्तणुकेचा जिमा आम्हीं करितों; दरबारचा जिमा तुम्हीं घेणें. मीं प्रत्युत्तर केलें, आजपावेतों दरबारचें पाऊल वांकडें काय पडलें? तुमचो मर्जीच राखीत जातात. जंव जंव ते तुमचो मर्जी राखितात, तंव तंव तुम्ही मार्ग सोडून अमार्ग धरितां. जिमा घेतां तर भाई आजपावेतों तुमचेच भरंवशावर संधान चाललें व चालत असतां वांकडें पाऊल कां टाकिलेंत? हें तुम्हांस कळत नाहीं! कराल काय? तुमच्यानें बावांपुढें बोलवत नाहीं. असे निषेध शद्व फार कठिण बोलून मग म्हटलें कीं, धन्याची जामिनी चाकराची होत नसते. जाली तरी चालत नाहीं. तुम्हीं बोलत नसाल असें नाहीं. बावा वाईट मानतात, मग काय कराल? पुढेंही निभाव जिम्याचा काय होणें आहे? मी येथें आहें व खावंदांनीं ठेविलें, तें रहस्याकारणेंच ठेविलें असेल. मर्जी परस्परें राखीत जावी, प्रतिकूल चाल टाकून सुधा सरळ मार्ग ज्यांत परलोक इहलोक चांगला असा धरल्यास वांकडें दरम्यान कां येईल? येणारच नाहीं. मी ग्वालेरीवर एक वेळ बोललों होतों कीं, दरबारचा जिमा मी घेतों. तिकडून वांकडें जाल्यास होऊं देणार नाहीं. इकडील जिमा कोणी घेऊन दरम्यान व्हावें असें म्हटलें होतें. ते समयीं कांहीं जालें नाहीं. त्या तोडीवर आतां बोलले असतील तर सार्थक काय? बावा कोणाचें ऐकतात कीं यांचे भरंवशावर पाऊल धरावें? येविसीं साफ सांगितलें कीं, जिमा कोणी मंजूर करीतना. मी दरम्यान निरोप्या आहें. मजला मोठें करूं जातां, तर क्रियेवरून गोष्टी घडतील. वैद्य व स्वयंपाकी कुशल जाले तर त्यांचे हस्तक्रियेनें रस सिद्ध होत नाहीं. द्रव्यें पडतील तसा रस होऊन गुण येईल. द्रव्यें घातल्यावांचून हस्तक्रियेनेंच कांहीं होत नाहीं. तसाच पाक गोड रस पाहिजे, तर पुष्कळ शर्करा घालावी. पाहिजे तितकी गोडी घ्यावी. तिखट,

आंबट, कटु द्रव्यें घालून शर्करेची गोडी पाहाल, ती येणार नाहीं. सरकारची मर्जी संरक्षण करून चालल्यास सहजच गोड होईल. इतकें बोलणें जाहलें. तें त्यांनीं बावांजवळ सांगितलें असेल. नंतर बावांचें बोलाऊं आलें. गेलों. एकांत करून बोलूं लागले. पाठ भाईचाच! मींही उत्तरें भाईचे घरच्याप्रमाणें केलीं. तेव्हां बावांनीं माधवराव गंगाधर यांस सांगितलें कीं, याचे जाबसाल काय आहेत, मनास आणणें. हें जाल्यानंतर बोलूं लागले कीं, श्रीमंत राजश्री नाना यांचे लिहिल्यावरून आम्हीं बादशाही खटला डोईवर घेऊन सरकारकाम जाणून, चमल उतरून उत्तरतीरीं येऊन, श्रमसायास करून, बादशाही सलतनतेचा बंदोबस्त केला. यास खर्च आम्हांस आमचे फौजेचा व बादशाहाचा खासगी व फौजेचा व शागिर्दपेशाचा आजपावेतों काय पडला? पुढें नित्यानित्य चालतच आहे. यास आम्हीं काय करावें? असें म्हटल्यास तर उत्तर करणें प्राप्त आलें. तें केलें कीं, खावंदानें तोटयाचें कर्म कीं ज्यांत गांठचा पैका वेंचून अमदानी कांहीं न पाहतां खर्च करावा. साऱ्यांहून मोठी दौलत बादशाहाची, तिचा आटोप करावयास सांगितलें. बादशाहाचे डौलांत कोणी कर्ता नाहीं म्हणून आपला शिरकाव श्रीमंतांचे कृपें करून होऊन बंदोबस्त जाला. याचा लौकिक वलयांकित पृथ्वींत किती जाला? रुपया खर्च जाला तर हीं कर्में अशींच आहेत. बादशाहा जवळ आणून ठेविला, त्याचा खर्च तर सध्यांच चालवणें पडतो. त्याचे मुलूख महालांतून बंदोबस्त करून पैका उगऊन घ्यावा, ही सर्वा डौलांची* चालच आहे. आपण खर्च चालवितां; बादशाही मुलखाचा बंदोबस्त करून पैकाही वसूल केला. पहिले अनावृष्टीमुळें मुलूख वैराण जाला, व नवी जुनी हालीमाजींत† जुने अमलदारांनीं वसूल नेला, यामुळें वसूल थोडका आला असेल. त्याची यादबूद धरून जमा व खर्च हुजूर रवाना करावा. यंदां देणें राहील तर पुढें मुलखांत बंदोबस्त आपलाच आहे. आबादी लावणी जुंपणी जाल्यानंतर आतांचें देणें वारून, बादशाहाचा खर्च चालून आपणासही कसर राहील. असें म्हणतांच विषाद आला. बोलले कीं, जमा ते किती आली आहे? माधवराव यांस सांगितलें कीं, बादशाही मुलखाची जमा आकारून यांस समजावणें. मजला म्हणों लागले जे, हे जमा दाखवितील ती पाहणें. कांहीं तजावत तफावत मनांत येईल, तर ओलीं कातडीं या ब्राह्मणाचे डोईवर ठेवावीं, म्हणजे असेल तें सांगून देतील. मीं उत्तर केलें कीं, ओले कातडचापावेतों नौबद आल्यास ठेवावी आणि ठेविली तर

*कारभाराची. †हालीमाजी = क्रान्ति, हाल्लींचें व पूर्वीचें अंतर.

आपले ब्राह्मणाचे डोईवर किंवा बादशाही मंडळांतील ब्राह्मणाचे डोईवर ठेवावी ! इतकीं भाषणें होऊन राहोटीस आलों. नंतर कामाकाजाचे कलमबंदीची यादी जी सेवेसीं पाठविली, तीच पहिले दिली होती; व मी इकडे आज्ञा घेऊन येतांना परगणे जैनाबाद वगैरे ऐवजाची एक याद; दुसरी अहिरवाडचांतून ऐवज आंबूजी इंगळे आदिकरून लोकांनीं ऐवज इंग्रजांचे धुमेमध्यें* घेतला आहे ती, तिसरी याद, बुंदेल्यांकडील पठाण आदि करून कलमें खंडेराव हरि यांचे जिमेस आहेत. या तिन्ही यादी दफ्तरच्या स्वामींचे आज्ञेप्रमाणें मजबरोबर आल्या होत्या त्या, एकूण चार यादी. पांचवी यादी स्वामींचे कारकुनाची. अशा पांचही यादी माधवराव गंगाधर यांच्या स्वाधीन केल्या. त्यास चार रोज जाले. उत्तर अद्यापि येत नाहीं. आशय एक वेळ समजण्यांत आला होता कीं, आधीं पुण्याचे पत्रांची रवानगी करावी, मग यादींचे जाबसाल उरकतील. त्यांतही सारें एकदांच उरकण्याचा आग्रह धरूं नये. असा प्रश्न मजला जाला होता. मीं उत्तर केलें कीं, जाबसालास तोड लागावी. आज कोणते होतात, पुढें कसकशा क्रमानें राहिले जाबसाल उरकतील हें संधान समजावें, त्याअन्वयें मजला विनंतिपत्रीं लिहिणें लागेल. यास्तव आधीं यादी पाहून पुर्ती मर्जी समजली पाहिजे. पत्रें रवाना जालीं मग यादी पाहून जाबसाल उरकण्याचें अगत्य कोणास ? जाबसाल होत नाहींत. पत्रांचीच रवानगी करावी असी मर्जी असल्यास जाबसाल राहिले. पत्रेंच लेहून देतों असें बोलणें जालें होतें. नंतर यादी दिल्या. चार रोज उत्तर होत नाहीं. यावरून शुद्धता दिसत नाहीं. होईल ती विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana his two important interviews,—one with Mahadji's ministers and the other with Mahadji himself,—in which there were professions on the part of Sindia of great humility and readiness to carry out the instructions of the Poona Darbar. The writer, however, expresses himself sceptical of results.*

---

*धामधुमींत, इंग्रजांशीं युद्ध चालू असतां.

No. 375 April 1785.

॥ श्री ॥

छ याद जाबसाल सरकारचे येणेंप्रमाणें होणें :—

१ तालुके झांशी येथील—

१ मवासांनीं तालुके दाबल्यापासून रुपये देत नाहींत. त्यांस तंबी करून मुलूख सोडून देवावा व मागील सालाचे रुपये हिशेबाप्रमाणें त्यांजकडून देवावे.

१ आपणाकडे तालुके दबले आहेत ते वसूल सुद्धां सुभेदाराकडे देवावे.

१ संस्थान नरवरची खंडणी सालावाद असतां देत नाहींत. ती ताकीद करून देवावी.

———

३

१ संस्थान करोलीपैकीं—

१ करोलीकर राजाकडे दरसाल खंडणीचा ऐवज येणें. आपली स्वारी इकडे आल्यापासोन रुपया राहिला आहे, तो ताकीद करून देवावा सरकारचा. (करोली ही सरकारची नव्हे, बादशाहाची म्हणावी असें दिसतें.)

१ पेशजीची बाकी सरकारची संस्थानाकडे हिशेबीं निघेल, ती राजास ताकीद करून देवावी.

१ सिरमथुरा सुदामत महाल सरकारचा अमदानीनें वाडी परगण्या-खालीं दाबून ऐवज घेत होता. आतां वाडी परगणा आपणाकडे आला. सिरमथुरा सरकारची सरकारांत द्यावी. (बादशाहाची म्हणतात, सरकारची नाहीं.)

———

३

१ परगणा बिजेपूर करोलीपैकीं वाघोलीकर जाधवाकडे, त्यांत सरकारचाही हिसा आहे. तो महाल सोडावा. अगर जाधवाची वांटणी निमेनिम गांवें लाऊन द्यावे.

———

४

१ परगणा शाहडौरा महाल सरकारचा असतां, आपण खेचीराजाचे भाऊबंदांस दहा बिघे जमीन बागास व छत्री बांधावयास सनद करून देविली, त्यावरून त्यानें महालांत दंगा केला. कोतवाली

चौथ्याचा देखील दावा करितो म्हणून ऐकिलें. तर फौज पाठवून त्याचें पारपत्य करून दंगा दूर करावा.

१ रघुपतराव यांजकडे सरदारी सांगितल्यापासून प्रांत माळवा व अहीरवाडा व मोट वगैरेचा अमल करून वसूल त्रिंबकराव नारायण यांनीं नेला. त्यांचे चिरंजीवास ताकीद करून ऐवज देवावा.

१ संस्थान उदेपूर येथील फडशा जाला पाहिजे.

१ श्रीमंत राजश्री नाना यांचा खासगत ऐवजाचा फडशा करून देवावा.

१ आपाजीराम दाभोळकर यांजकडे मुतालकीची फडणिशी सरकारांतून आहे, तो दरख चालवावा.

१ आनंदराव पवार यांस हुजूर आणावयास सरकारांतून कारकून आनंदराव शेषगीर आले आहेत, त्यांजबराबर पवार मशारनिल्हे यांची रवानगी हुजूर करावी.

१ इंग्रजांकडील जाबसाल—

१ टिपूचे मसलतसंबंधीं पांच कलमें करारांत आलीं. पैकीं दोन कलमांचे दस्ताऐवज आले म्हणतां, बितपसील :—

१ जाहाजांची अमदरफ्त सुदामतप्रमाणें व्हावी.

१ गायकवाडास आश्रा देऊं नये. कुमक करूं नये.

—

२

एकूण दोन कलमांचे दस्ताऐवज आले म्हणतां. ते सरकारांत जावे. बाकी राहिलीं तीन, यांचा तपसील :—

१ टिपूचा सलूख श्रीमंतांचे मारफात व्हावा, सबब टिपूचे मोहिमेवर सरकारची फौज निघाली. इंग्रजांचीं पलटणें सामील व्हावीं. तीं न होतां परभारा टिपूसीं सलूख इंग्रजांनीं केला, म्हणून सरकारची फौज माघारी आणणें पडली. फौजखर्च आंगावर पडला. याची तोड इंग्रज काय करितात ?

१ कुमकेचें कलम ठरलें आहे त्याप्रमाणें लागेल ते समयीं पलटणें कुमकेस द्यावीं. खर्चाचा करार ठरला आहे त्याप्रमाणें द्यावें घ्यावें. याप्रमाणें इंग्रजांचा दस्ताऐवज.

१ श्रीमंत दादासाहेब यांचे दस्ताऐवजीं कागद असतील ते रद्द असत, असा इंग्रजांचा दस्ताऐवज पाहिजे.

३ एकूण कलमें तीन. यांचे दस्ताऐवज इंग्रजांचे असावे.

१ फौजखर्च सरकारचे आंगावर पडला त्यापक्षीं साष्टी सरकारांत द्यावी.

१ जंजिरेकर हबशी याची कुमक मुंबईकर करितात, त्यास इष्टिनाचें पत्र कलकत्त्याहून मनाईचें याअन्वयें कीं, जंजिरेकर हबशाची कुमक तुम्हीं न करणें. सरकारचा कझा हबशाकडे असेल तो सरकारांतून समजून घेतील, असें आणून द्यावें.

१ मौजे वेळास हा गांव श्रीमंत राजश्री नाना यांचा वतनी इंग्रजांनीं दाबला आहे तो माघारा देवावा. शेवटीं मोबदला त्या जमेचा गांव दुसरा देऊन वेळास गांव सोडवावा.

४

१ परगणा जैनाबाद वगैरेबद्दल ऐवज सरकारचा येणें. त्याच्या यादी सरकारचे दफ्तरच्या आहेत, त्या पाहून त्याप्रमाणें जाबसाल उरकून द्यावे. यादी २.

१ परगणा जैनाबाद वगैरे यादी ऐवजाची आहे.

१ परगणा अरुण वगैरे शाहडौरा येथील ऐवज खंडेराव हरि व आंबूजी इंगळे वगैरे यांनीं इंग्रजांचे लढाईंत घेतला तो व तालुका देपूर येथील सरदेशमुखी बाबतीचे जकातीसुद्धां यादी.

२

१ रातगड येथील ऐवज वगैरे खंडेराव हरि यांनीं पठाणापासून घेऊन फिरून उपद्रव करितात. त्यांस ताकीद करून घेतला ऐवज वगैरे माघारा देवावा. पुढें उपद्रव होऊं नये.

सदरहूप्रमाणें कलमांची यादी लेहून दिली. त्याचीं उत्तरें यथास्थित जालीं नाहींत. कसीं जालीं तो तपसील लिहिणें उचित नाहीं. पक्केपणें उत्तरें जाल्यास विनंती करावी. एक प्रकारेंच वृत्ति असेंही म्हणवत नाहीं. निश्चयात्मक एक

प्रकारेंच उत्तरें होतील तीं खरीं. तोड चालेल तंव लावीतच जावी. तोड न चाले तेव्हां निरोपाय जाणावा. या जाबसालाची तोड मार्गाची समंजसपणें करून देतील, तर मग देशास जाण्याविसीं आग्रह करणें युक्त नाहीं. तोड कामाची न करतां न जावें हा आग्रह प्राप्त आहे. खटेमिटेपणाच होऊं लागल्यास मग उपाय नाहीं. मीं सरकारी जाबसाल घातले यावरून बावांची मर्जी फार नाखुष जाली. बादशाही खिलत आणला, कारकुनाबरोबर रवाना करावा, जामगांवीं पावेल, तेथून बाळाजी जनार्दन हुजूर पावते करितील, असाही मनसबा होतो, ऐकिलें. यावरून हे जाबसाल सरकारी करावयाचे नाहींत असें वाटतें. प्रत्ययास येईल तें खरें. पुढें सरकारांत जाबसाल करण्याविसीं वकील बाळाजी जनार्दनासच नेमणार ऐकतों. त्रिंबकराव नारायण यांजकडे सरदारी पूर्ववत् बहाल करऊन वस्त्रें देण्याविसीं बाळाजी जनार्दन यांस पत्र जाणार. ही यादी श्रीमंतांस दाखवावी.

¶*Sadashiv Dinkar submits to Mahadji, for taking action, several outstanding questions and references from the Poona Darbar; one such refers to the management of the Peshwa's Mahals in the north and tribute from petty states; another to the additional articles which the Poona Darbar was anxious to conclude with the English.*

No. 376 April 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटीलबावा यांस सरकारचे कामाकाजाचे जाबसालांची यादी लेहून दिल्ही होती. त्याचीं उत्तरें बावांचीं, भाई व राजश्री माधवराव गंगाधर व आबा चिटणीस यांनीं मजला सांगितलीं बितपसील :— सध्यां करून देतों म्हणतात.

१ तालुके झांशीपैकीं—

१ मामलेदाराकडील गृहस्थानें येऊन मवासांकडील जमा वसूल समजाऊन द्यावा. खंडेराव हरि डंघाईहून माघारे फिरतील त्यांस सांगोन मवासांचा जाबसाल उरकून पैका देवितों. ठाणीं खालीं करून देतील.

१ आम्हांकडे सरकारचे तालुके आहेत त्यांपैकीं लोकांस जागीर दिल्या आहेत :—

१ साखणी रोहिल्यास,

१ देवगड काशीकर राजास,

२

हे गुंतले. बाकी आम्हांकडे असतील ते सोडून देतों.

१ नरवरची खंडणी सालाबाद काय आहे ते समजाऊन द्यावी. नरवरकरास ताकीद करूं.

३

१ तालुके करोलीपैकीं शिरमथुरा हमदानीनें बादशाही मुलखांत लाविली आहे. तो जाबसाल सध्यां होत नाहीं. बाकी जाबसाल करून देतों.

१ करोलीकर राजास ताकीदपत्र व पंचवीस गाडदी देऊन ऐवजाकरितां ताकीद करतों.

१ विजेपूर ब।। जाधवांचा हिसा सुदामत घेत असतील तो समजावणें. ऐवज लाऊन देतों.

---

२ याप्रमाणें बोलतात. अमलांत आणितां दिसत नाहीं. जाबसाल होत नाहींत. तूर्त

१ खेचीवाड्या ब।। रुपया इंग्रजांचे लढाईंतील कमाविसदारांनीं मजरा घेतला तो मागतां. तर कमाविसदार इंग्रजांस मिळून पुढाईत जाले होते, सबब रुपया घेतला. महालचा घेतला नाहीं. सरकारांतही मजरा देऊं नये. त्यांनीं खोटीं कर्में केलीं म्हणून रुपया त्यांजपासोन घेतला. तो फौजखर्चांत गेला.

१ आपाजीराम दाभोळकर यांचा दरख चालवावा असें कलम लेहून दिलें होतें. याचें उत्तर केलें कीं, आम्ही इकडे आलों तेव्हां इंग्रजांची लढाई, नंतर गोहद ग्वालेरची मसलत, यांत मुतालकीचा कारभार जाला. मुतालकीचा कारभार करूं तेव्हां दरखाचें लिहिणें चालेल. मीं उत्तर केलें कीं, मुतालकीचे कारभाराचे आंगीं दरखाचें लिहिणें चालावें हें तरी प्रमाण ? ग्वालेर गोहदपावेतों खंडण्या दंडण्या जाल्या असल्यास तें लिहिणें दरकाकडे. आतां बादशाही कारभार करितां, हा मुतालकीचा कीं खुद यखत्यारीचा ? मुतालकीचा असल्यास दरख कां न चालावा ? उत्तर त्रिवर्गांनीं दिलें जे, बादशाही कामांत त्यांचेच लिहिणार आहेत. आम्हांस दाखला असावा म्हणून आम्हीं रामचंद्रपंत ठेविले आहेत. येथें दरखाचें काय आहे ?

पुढें जाबसाल फडशांत येतील त्यांपैकीं देपूर तरफेचे जकातबद्दल ऐवजाची परवानगी दिलीच आहे. देशीं भाई रुपया देतील व पुढेंही देत जातील. दरसाल बाकीचे जाबसाल उरकून देऊं.

१ परगणे जैनाबादचा रुपया—

१ आम्हांकडे असेल तो पुढें देऊं.

१ मोरो सदाशिव माजी कमाविसदार यांजकडे रुपया राहिला असेल तो मशारनिल्हे येथें आल्यावर ताकीद करून देवऊं.

१ श्रीमंतांचे लग्नाबद्दल तीस हजार रुपये कापडाबद्दलचे व बराणपूर-बद्दल कापडाबद्दलचे दरसाल पांच हजार मागील सालाचें देणें राहिलें, तें पुढें देऊं. सध्या ओढ आहे. नवे सालचे बराणपुरबद्दल दरसाल पांच हजार रुपये घेत जाणें. त्याची वरात हल्लीं नवे कमाविसदारावर दरसाल देत जाणें म्हणोन दिलीच आहे.

१ इंग्रजांकडील जाबसाल इष्टिनासीं जाबसाल करावे, तो कलकत्त्याहून तगीर* होऊन विलायतेस गेला. इंद्रसेनही गेला. नवा मेघफरसन आला. याचा आमचा अद्यापि सिलसिला नाहीं. सिलसिला चालता जाल्यावर सारे जाबसाल होतील.

१ रातगडकर पठाण याचा जाबसाल खंडेराव हरीकडे आहे. तो डंघाईत गेला आहे. तेथून आल्यावर होईल. आम्ही पुण्यास गेल्यावर जाबसाल होतील.

१ उदेपुर निमे होळकरांकडे, निमे आम्हांकडे. जाबसाल दोघांकडून विल्हे लागेल. येथें कलम लिहिणें इतकेंच पुरे. माजी जाबसाल अनेक तऱ्हेचा केला. त्याचीं उत्तरें मीं केलीं. तीं फार जड पडायाजोगीं केलीं. ऐकून कष्टीही जाले. परंतु तूर्त लिहावयाचीं नाहींत.

१ श्रीमंत राजश्री नाना यांचा कारकुनीबद्दल ऐवज देणें. त्या ऐवजीं पंचवीस हजार रुपयांचे गांव आम्हीं दिले आहेत, ते दरसाल पदरीं पडतील. मागील ऐवज देणें त्याचा फडशा पुण्यास गेल्यावर करून देऊं.

सदरहूप्रमाणें उत्तरें त्यांनीं दिल्हीं. एक दोन वेळ भवति न भवति त्यांची माझी जाली. मीही त्यांत त्यांस लाजवाब† करीत गेलों. तो तपसील एकाएकीं

*बडतर्फ. †निरुत्तर.

लिहूं नये. शेवटीं उठते समयीं म्हटलें कीं, कलमबंदीचीं उत्तरें जालीं याप्रमाणें सरकारांत लिहावीं. येणेंकरून सुमार्ग दिसेल. मर्जी श्रीमंतांची राहील. असें ध्यानास आल्यास असेंच लेहून पाठवीन. इतकें म्हणून राहोटीस आलों. दमच खादला. आठा चौ रोजांनंतर माधवराव गंगाधर यांनीं मध्यस्ताबरोबर सांगोन पाठविलें कीं, उतावळी करून उत्तरें न लिहिणें. आम्ही सांगूं तसीं लिहिणें. लिहिण्याची जलदी न करणें. असा निरोप आला. तेव्हां बावांजवळ मनसबा आणखी जाला असेल किंवा दरम्यानच आहे कळत नाहीं. येथील कारभार दीर्घ. आतांचे कामास दोन महिने लागतात. माधवरावजीचें घरचें काम नाहीं. फिरून बावांनीं स्मरणच न केलें तर कोणी हटकावें, इतकी शक्ति कोणाची नाहीं. आम्हीं उत्तरें तेव्हांच केलीं असें म्हणतील. यास्तव जालें तें वर्तमान विनंती केली. ऐकण्यांत येतें कीं, केवळ शुष्क गोष्टी सांगितल्या हें ठीक नाहीं. कांहीं सोई व मार्ग दिसे असें बोलावें. असें ऐकण्यांत आलें खरें. दृष्टीस पडल्यास विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana informing him of Mahadji having promised to settle expeditiously the long pending affairs in dispute with the Poona Darbar.*

No. 377 14th April 1785 (?)

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १२ रबिलाखर मुक्काम डीग येथून तीन चार रवानग्यांत विनंतीपत्रें सेवेसीं रवाना केलीं, तीं पाऊन येथील दिनचर्या आदिकरून वर्तमानें विदित जालीं असतील. त्यांचीं उत्तरें सादर जालीं नाहींत तर सादर जालीं पाहिजेत. बादशाही खिलत, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, नालकी-पालखी, माहीमरातब यांची रवानगी पुण्यास करावी, हें राजश्री पाटिलबावांचे मनांत आहे. मजला घेऊन जा म्हणत होते. मीं सरकारी जाबसाल दरम्यान घातले यामुळें माझें जाणें राहिलें. आणि यांस तर उत्कंठा. प्रथम नायबमुनायब व वकीलमुतलकी बक्षीगिरी हीं पदें पाटिलबावा यांनीं बादशाहापासोन संपादून घेऊन, पत्रें श्रीमंतांचे व स्वामींचे सेवेसीं वर्तमान कळावें व खिलत रवाना केला याविसीं रवाना केलीं होतीं. त्यांचीं उत्तरें छ १२ रबिलावलचीं सादर जालीं. बावांस पत्रें फख्त जाब मानसन्मानार्थी लेख, वरकड हवाला सेवकाच्या पत्रावर

होता, तीं पत्रें येथें पावलीं. त्या काळीं पत्रें बावांचीं पावतीं करण्यांत सोय दिसली नाहीं. कारण कीं सेवकाचे पत्रीं आज्ञा होती जे, वरिष्ठ पद वकीलमुतलकीचें बावांनीं घेतलें. उर्णे पद वक्षीगिरीचें श्रीमंतांस नेमून, त्याचा शिरपाव बादशाही रवाना करणार. करतील. तो येथें आल्यावर श्रीमंतांनीं घ्यावा कीं काय? यांत स्वामि-सेवकपणाची मर्यादा कसी राहते? चौघां दौलतवंतांत कसें दिसेल? लोक काय म्हणतील? याची सलाह घराऊ रीतीनें बावांसच विचारणें. ते सांगतील त्या रीतीनें करावयास येईल. हा मजकूर ऐकून विक्षेप मानितील. तूर्त शिरपावाचीही रवानगी होत नाहीं. मजला बजिदी घेऊन जाण्याची करितील ते समयीं पूर्व पक्ष करावा, या बुद्धीनें पत्रें तशींच ठेविलीं होतीं. मध्यें असा उहू राजश्री माधवराव गंगाधर यांजवळ बावांनीं केला कीं, वर्षप्रतिपदेस खिलताची रवानगी सदाशिव दिनकर याजबरोबर करावी लागते, तयारी करणें. त्यांनीं माझें वर्तमान सांगितलें कीं, सरकारचे पत्रांचीं उत्तरें जात नाहींत; जाबसाल सरकारचे उरकत नाहींत; दिनचर्येचें वर्तमान कळत नाहीं; म्हणून पत्रें जात नाहींत म्हणून श्रीमंतांची इतराजी दर पत्रीं होते. ते मी किती दिवस सहन करावी? आजपावेतों दम धरून कांहीं लिहिलें नाहीं; उत्तरें प्राप्त होत नाहींत; दिनचर्याही कळत नाहीं; सरकारी जाबसालही होत नाहींत, असें लिहिणें मजला प्राप्त आलें, असें सदाशिवपंत म्हणतो. असें वर्तमान सांगतांच मजला चोपदार बोलाऊं पाठऊन बोलाऊन नेलें. गेलों. पुसों लागले, जाब कधींपासोन बंद आहेत? मीं हवाला चिटणिसांचा दिला जे, आपलीं व माझीं पत्रें यांजवळ आहेत तीं आणवावीं. त्यांवरच कळेल. तीं पत्रें चिटणिसांनीं आणिलीं. रमजान महिन्यापासोन निघालीं. तेव्हां म्हणाले, सारे पत्रांचीं उत्तरें देतों, सरकार कामाचे जाबसालही करितों, दिनचर्याही कच्ची सांगतों. ते दिवशीं जाब लिहिण्याविसीं चिटणिसास सांगितलें जे, जाब लिहिणें. नंतर दोन तीन वेळ गेलों. होय होयच जाली. आगऱ्याहून कूच करून मथुरेस आले. वर्षप्रतिपदाही जाली. उत्तरें जालीं नाहींत. तगादा निरोपानिरोपीं व समक्ष होताच. एके दिवशीं वर्तमान कळलें जे, नालकीपालखी आदिकरून खिलती जिनसांची तयारी होत आहे. चैत्र शुद्ध ५ चे दिवशीं आनंदराव नरसी बादशाहाजवळ वकिलीस आहेत, त्यांचा पुत्र बादशाहाचे तर्फेनें नेमून त्याजबरोबर खिलताची रवानगी करणार. त्यांनीं जामगांवास जावें. तेथून राजश्री बाळाजी जनार्दन यांनीं समागमें जाऊन, खिलत स्वामींजवळ पावता करावा असें ऐकिलें. तेव्हां अंदेशा प्राप्त जाला कीं, खिलत घ्यावा न घ्यावा, असे अनमानाचीं आज्ञा-

पत्रें आलीं, तीं बावांस न कळतां खिलत रवाना होतो. दरबारीं पावल्यास घेण्याविसीं अनमान जाल्यास तेंही वाईट. यास्तव वर्तमान बावांस श्रुत करून सलाह पुसावी. रागें भरून रवाना करतील तर सुखरूप करोत. मजकडील दोप दोही स्थळांचा उडाला. असें चित्तांत आणून राणेखानभाईकडे गेलों. त्यांस प्रश्न केला कीं, श्रीमंतांचीं पत्रें सलाह पुसणें म्हणून या प्रकारचीं आलीं, तीं आजपावेतों या अन्वयाकरितां मीं ठेऊन घेतलीं. बावाचीं पत्रेंही दिलीं नाहीं. जाण्याकरितां मजला बजिदी कराल तेव्हां बावांचीं पत्रें द्यावीं व श्रीमंतांचें आज्ञेप्रमाणें सलाहही पुसावी असें होतें. त्यास मीं सरकारी जाबसाल घातले, ते तुम्हांस करणेंच नाहींत. म्हणून माझें जाणें महकूफ करून दुसऱ्याबरोबर खिलताची रवानगी करितां, म्हणोन ऐकतों. उत्तम आहे. मजलाही जाण्याचें अगत्य नाहीं. सुखरूप कोणाची रवानगी करावी. परंतु हा खिलत तेथें श्रीमंतांनीं घ्यावा येविसीं बावांची सलाह पाहिजे. कसी म्हणाल तर वकीलमुतलकी उच्च पद बावांनीं घेतलें. नीच पद बक्षीगिरी श्रीमंतांस नेमून त्याचा खिलत पाठवितां. तो श्रीमंतांनीं घ्यावा, ही सलाह बावा देतात कीं, ही गोष्ट चौघां दौलतवंतांत डौलांत चांगली दिसेल. पुढें दाबानें कामें चालतील असें पुर्तें मनांत येत असल्यास सांगावें. लेहून द्यावें. मीही विनंतिपत्रीं लिहून पाठवीन. शिरपावाचीच रवानगी अगोदर करितां. तेथें जाऊन पोंचला आणि तेथें बावांचे सलाहपत्राची प्रतीक्षा राहिली, तर तिकडून श्रीमंत शद्ब लावितील कीं, अगोदर सदाशिवपंतांस लेहून पाठविलें असतां, याचा विचार न करितां एकाएकीं खिलतच पाठऊन दिला! असा अनमान तेथें जाला तर तुम्हीही म्हणाल कीं अगोदर आम्हांस कसें सांगितलें नाहीं? सांगतात तर खिलत रवाना कां करितों? असें म्हणू लागाल, याजकरितां सूचना केली आहे. याचें उत्तर बावांनीं मजसीं करावें. पक्की सलाह, देशकालवर्तमान, चित्तांत, लौकिकांत, चौघां दौलतवंतांत चांगलें दिसून दाबाखालीं कामें सरळ चालत असीं सांगावीं. तीं मी लेहून पाठवीन. बावांनीं त्याअन्वयें पत्र लेहून द्यावें. त्याची रवानगी पुढें करून मग खिलताची रवानगी करणें तर करावी. पुढें मागें अंदेशा आहेत. मी सांगून उत्तीर्ण जालों. आतां निमित्त मजकडे दोहींकडील नाहीं. ही गोष्ट भाईचे विचारास आली. त्यांनीं व माधवराव गंगाधर यांनीं बावांस श्रुत केलें. बावांनीं मजला बोलाऊन नेऊन वर्तमान विचारलें. पत्रें मागितलीं. तेव्हां त्यांचीं पत्रें दोन्ही दिलीं. तीं त्यांनीं वाचून पाहिलीं. त्यांत सेवकाचे पत्रावर हवाला दिला होता. माझें पत्र मागूं लागले. मीं जबानी वर्तमान सांगितलें. त्यांस विश्वास येईना.

पत्र दाखवा तरीच खरें, म्हणूं लागले. मग पत्र दाखविलें. तें वाचून पाहिल्यावर खरें वाटलें. इतका प्रसंग एक दिवस जाला. त्यानंतर खिलताची रवानगी करितात न करितात, कळेल तें विनंती करीन. बाबांचें म्हणणें आहे जे, वकील-मुतलकीचा सवाल आम्हीं श्रीमंतांचेच नांवें लेहून दिला होता. बादशाहांनीं दसखत केलें कीं, आम्हीं आपले तर्फेनें वकीलमुतलकी तुम्हांस सांगितली व श्रीमंतांचे तर्फेनेंही आम्हींच तुम्हांस सांगितली, असें दसखत केलें. याचें कारण, पहिले सहा वर्षांचे स्वारींत बक्षीगिरी श्रीमंत कैलासवासी नारायणरावसाहेबांचे नांवें दिली असतां, राजश्री विसाजीपंत व होळकर आम्हांसीं जुंझून जबरदस्तीनें बक्षीगिरी जाबतेखानास देऊन आमची बदनक्षी केली. आतांही तसेंच. ज्या पदाचा करार तुमचे मारफत जाला, त्या कामावर श्रीमंतांनीं आपणास पाठविलें तर जाबतेखानाचीच गति! इतका अंदेशा आहे. याजकरितां असें दसखत केलें. तुम्हीं सख्य राखिलें त्या इतबारावर पदें आम्हीं दिलीं. बशर्त कीं तुम्हींच येथें राहून कारभार करावा. तंबपावेतों आमचीं पदें. दुसरा आल्यास आम्हांस कोणाचा इतबार नाहीं. असें म्हणून बादशाहांनीं दसखत केलें. श्रीमंतांकडूनही तुम्हांकडे सांगितली असें वकीलमुतलकीचे फर्दावर दसखत केलें. तेव्हां पद श्रीमंतांकडे, गुमास्तगिरी आम्हांकडे, असा अर्थ उघड असतां, आम्हांकडे वकील-मुतलकीचा अधिकार लाविताता हें काय? पद वकीलमुतलकीचें श्रीमंतांकडे व गुमास्तगिरी आम्हांकडे असेंच आहे. असें बाबांचें म्हणणें आहे. याउपर काय बोलण्यांत येईल ती विनंती करीन. चैत्र शुद्ध ४ चे दिवशीं पत्रें दाखविलीं. रात्रौ ते समयीं भानगड बोलण्याची फार जाली. तपसील फारच आहे. त्या बोलण्यांत नालकीपालखी वगैरे रवाना करावाच असा शब्द निघाला नाहीं. सरकारचे जाबसाल उलगडायाचे ते उलगडून देतों, पत्रांचीं उत्तरेंही देतों, दिन-चर्येचें वर्तमान बादशाही कारभाराचें सांगतों, म्हणोन बोलले. दरबार बरखास्त करून देवदर्शनास गेले. नंतर दोन तीन रोज जाले, गांठही पडली नाहीं व खिलताचे रवानगीची चर्चा ऐकिली नाहीं. याउपर होईल तें विनंती करीन. चौ रोजां-नंतर खिलताचे रवानगीविसीं बाबांनीं उपक्रम केला, तो मजकूर निराळा विन-विला आहे. त्यावरून विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter again repeats the discussion between Mahadji and Sadashiv Dinkar over the acceptance of the offices of Vakil-ul-Mutlaq and Mir Bakshi. The Poona Darbar was unwilling to accept the inferior dignities for the Peshwa when the superior ones were conferred on Sindia who was his subordinate.*

No. 378. 11th May 1785.

छ विज्ञापना ऐसीजे:—छ १२ रबिलावलचीं आज्ञापत्रें सादर जालीं. त्यांत राजश्री पाटिलबावांस एक पत्र श्रीमंतांचें व एक स्वामींचें दोन्ही गौरवाचीं होतीं. वरकड हवाला सेवकाचे पत्रावर होता. तीं पत्रें येथें आलीं. सेवकाचे पत्रीं मजकूर आज्ञापिला होता कीं, वकीलमुतलकी उच्च पद पाटीलबावांनीं घेतलें. नायबमुनायबी व बक्षीगिरी कनिष्ट पद श्रीमंतांचे नांवें घेऊन त्याचा खिलत पाठवितात, तो श्रीमंतांनीं घ्यावा कीं काय? चौघां दौलतवंतांत हें कसें दिसेल याची सलाह पाटिलबावांसच विचारणें. असी आज्ञा असतां मीं पत्रें दिलींच नवतीं. कारण कीं, मजला खिलत माहीमरातब घेऊन जा म्हणतात. फिरून बजिदी करितील तेव्हां ही सलाह विचारावयास येईल. मीं सरकारचे कामाची जाबसालांची यादी लेहून दिली, ते कलमबंदीची नकलही सेवेसीं पाठविली होती. ते जाबसाल दरम्यान आणिले. तें बावांस फार विषम वाटलें. यादी मीं समक्ष दिली नाहीं. राजश्री माधवराव गंगाधर यांजवळ दिली आणि सांगितलें कीं, हीं कामें सरकारचीं व्हावीं म्हणून माझें राहणें. येथें वरचेवर जाबसाल पडतच आहेत, ते न होतां मी गेल्यास दरबारीं या कलमांच्या पृच्छा जाल्यास उत्तर काय करावें? दहा महिने कागद सरकारचे किती रवानग्यांचे आले, त्यांचे जाब गेले नाहींत. मी जाऊन काय करावें? आपले मर्जीकरितां जावें, दरबारीं विषमता आम्हांविसीं न यावी असें करणें. आपण म्हणतात तर यास साधन कोणतें? सरकारचीं कामें इंग्रज आदिकरून तहाचे जाबसाल होत नाहींत. रुपया सरकारचा जैनाबाद वगैरे यादीप्रमाणें प्राप्त होत नाहीं. झांशीपैकीं तालुके दाबले आहांत ते अद्यापि सोडीत नाहींत. करोलीपैकीं बिजेपूर आदिकरून जाबसाल उगवत नाहींत. शिरमथुराचें ठाणें सुटत नाहीं. तेव्हां मी दरबारीं गेल्यास हे जाबसाल विचारितील, तेव्हां कुंठित व्हावें यांतच लाजाब* जालों, मग साधन तें कोणे प्रकारें करावें? आधीं दरबारीं वक्रताच नाहीं, तत्रापि विनंती करून कांहीं सम विषम असिलें तर नीट करावें तें कसें होईल? कलमबंदी जाबसालाची यादी लेहून दिली, तिची नक्कल सेवेसीं पूर्वी पाठविली आहे. तितकेही जाबसाल जाले पाहिजेत. परंतु एकदांच उगवत नाहींत. उदेपुरचा फडशा चार दिवस मागें टाकल्यास ऐकावा. वरकड जाबसाल यांस जड नाहींत. परभारें आहेत. ते फडशा करून घ्यावे असें चित्तांत होतें. परंतु

*निरुत्तर.

कोणी फडशा करील तर होईल. यादी माधवराव गंगाधर यांनीं दाखऊन निरोपही सांगितला. त्यावरून मर्जी फारच नाखुष होऊन मनस्वी बोलणीं दाबाचीं लोकांजवळ व गंगाजीजवळ केलीं. मजला कळावें म्हणून बोलले. मीं स्वामींचे पाय पाहिले. या दाबास मीं काय करावें? हा रोष पोटांत भारी होताच. यामुळें नालकी वगैरे खिलती सरंजाम आनंदराव नरसिंह यांचे पुत्राबरोबर रवाना करूं लागले. स्वामींची आज्ञा सादर जाली कीं, उणाख* पदाचा खिलत श्रीमंतांनीं घ्यावा न घ्यावा ही सलाह पाटिलबावांस विचारणें. हे तर खिलत पाठवितात. तेथें आज्ञा होईल कीं, आम्हीं लेहून पाठविलें असतां खिलत आला, तो कसा पाठविला? पत्राचें उत्तर नाहीं. खिलत घ्यावा कसा? असें जाल्यास स्वामींची इतराजी होईल. बावाही शद्ध लाविताील कीं, आम्हांस अगोदर कळवितां तर कशास पाठवितों? असें समजून पत्रें बावांचीं नेऊन दिलीं. माझे पत्रावर हवाला होता. मागूं लागले तेव्हां जबानी सांगितलें. ऐकेनात. मग पत्रही दाखविलें. तें पाहून कांहीं दिवस विचारांतही पडले. बादशाही सवाल दसखत करून घेतले ते दाखविले. त्यांतही मीं दिकती काढिल्या. तें वर्तमान छ ४ जमादिलाखरचे पत्रीं विनविलें आहे. यावरून मर्जी बावांची फारच खप्पा जाली. चित्तांत आलें कीं, हें खूळ सदाशिव दिनकरच करितो. दरबारींहून कांहीं नाहीं. यास कशास पुसावें? परभारें दरबारीं पत्र पाठवावें. असी मसलत करून मजला कळूं न देतां, स्वामींस पत्र लेहून चौकडा रवाना केला. काय लिहिलें असेल तें न कळे. माझें मत कोणेही प्रकारें सरकारांत यांचें रहस्य असावें. मी नाश करितों म्हणून मजला गाळून यांनींच स्वामींची मर्जी संपादिली यापरतें विशेष कोणतें? तशी चालच धरितील तर तेथून कांहीं वांकडें नाहीं. यांस लोभ न सुटल्यास उपाय कोणाचा? असो. त्यांचीं पत्रेंच सेवेसीं पावलीं असतील, त्यांजवरून सकलार्थ ध्यानास येईल. पालखीनालकी आदिकरून सरंजामही अक्षत्रितीयेस† येथून हत्तीघोड्यां सुद्धां रवाना जाला. तो उज्जनींत राहील. स्वामींचे पत्राचें उत्तर आल्यासारखें पुढें वर्तावें असेंही ऐकिलें. आनंदराव नरसिंह यांचे पुत्राबरोबर खिलत रवाना जाला. तो गृहस्थ माझे येथें निरोपास आला होता. त्यास तन्हा विचारिली. त्यानें सांगितलें जे, हा सरंजाम जांमगांवास घेऊन जावा. बाळाजी जनार्दन आम्ही समागमें जाऊन श्रीमंतांस गुजराणावा असें सांगितलें आहे. यांत कोणतें खरें होईल पहावें. वर्तमान कळावें म्हणोन विनंती केली.

*हलक्या. †ता. ११ मे १७८५ रोजीं.

मजला कळूं न देतां रवानगी केली. गंगाजी दखणाईत, फार गळाठला, म्हणून घरास बिदा केला. तो बावांकडे गेला. बोलला कीं दहा महिने पत्राचीं उत्तरें सरकारांत जात नाहींत, याचें कारण मजला श्रीमंतांनीं विचारल्यास काय विनंती करावी? त्यांसीं सुधी गोष्टही सांगितली नाहीं. वरचेवर थटचावरच उडविलें. तोही दुखण्यांतून जगल्यास सेवेसीं येईल. सविस्तर विनंती करील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that Sindia had decided to send the marks of the imperial offices to Poona, with the son of Anandrao Narasinha, in spite of his protests.*

No. 379 20th May 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—छ २२ रबिलाखरचे पत्राचीं उत्तरें छ १ जमादिलाखरचीं सेवकास सादर जालीं. तीं छ १ रजबीं येथें पोहोंचलीं. त्यांपैकीं राजश्री पाटिलबावा यांसीं जाबसाल करावयाचे त्यास यांनीं मार्गच घातला आहे जे, जबानी सांगितल्यास प्रमाण मानूं नये, पत्र दाखवावें. एके दिवशीं पत्रें नेऊन दाखविलीं. बितपसील :—

इंग्रज प्रकरणीं दोन पुरवण्या होत्या बितपसील :—

हबशी जंजिरेकर याजविसीं बावांनीं सांगितल्यावरून सेवकानें विनंती पत्रीं लिहिली होती कीं, टिपूचा बिघाड आहे, त्यापक्षीं तूर्त हबशासीं घासूं नये. हबशी इंग्रज एक होऊन शह देतील. टिपूही चालून येईल. दुरुख शह सोसणार नाहीं. याचें उत्तर लिहिलें होतें कीं, तहनाम्यांत चौदावें कलम खोलून लिहिलें आहे कीं, परस्परें दुष्मानाची कुमक करूं नये. असें असतां कलकत्त्यास परिछिन्न लिहून मुंबईकरांस त्यांचें पत्र हबशाची कुमक न करावी असें आणावयास अंदेशा काय आहे? परिछिन्न कलकत्त्यास लेहून त्यांचें पत्र मुंबईकरांस आणून पाठऊन द्यावें.

जंजिरेकर हबशाचा मजकूर वर्ता आधीं आणून, खालीं पांचा कलमांचा मजकूर व बावांनीं सेवकाकडून लेहविलें होतें कीं, इंग्रजांनीं टिपूसीं परभारा सलूख केला; पाऊल मात्रागमनाचें टाकिलें असतां आतां इंग्रजांचा आमचा जाबसाल कशाचा असें बावा कसें म्हणतात? यांत नुकसानी सरकारची किती जाली

व होते? इंग्रजांनीं टिपूचे परभारें सलुखाची चूकही पदरीं घेतली. पांचा कलमांचीं लिहिलीं करून देतात. बादशाही मनसब्यांत मन घालणार नाहीं असें लेहून देतात. वारंवार पाटिलबावा बोलले असतां आतां नाहीं कसें म्हणतात? सदरहू पांच कलमांची व बादशाही मनसब्यांत शिरणार नाहीं हे दस्ताऐवज इंग्रजांचे घेऊन पाठऊन द्यावे.

एकूण दोन्ही पुरवण्या पाहून बोलले जे, स्वामीसेवेसीं कोणी अंतर करीत नाहीं. यावत्छक्ति चाकरी करीतच आहों. राजकारणीं मजकुराची सलाह आढळली ती लेहून पाठवीतच आहेत. युक्त ती करावी, न कर्तव्य ती न केली, असें समजून आम्हीं लिहितों. लेहवितों. तो दस्ताऐवज करून पत्रें पाठवितात. यास उपाय कोणता करावा? इतक्यावर सलाह लिहिणार नाहीं. सध्यां इंग्रजांविसीं शद्व लाऊन लिहितात. आम्हीं आजपावेतों भानगड इंद्रसेनाचे हातून केली. तो येथें आहे. त्यासच तेथें पाठऊन देतों. समक्ष बोलून समजून घेतील. आम्हीं त्यासीं पुढें बोलणें लाविलें आहे, तें तुम्हांजवळ सांगोन लेहवावें तर सिद्धीस जातें न जातें, कळे काय? तुम्हीं लेहून पाठविल्यास तोच दस्ताऐवज धरून कोंडून लेहूं लागतील. इंद्रसेनासच तेथें पाठविला म्हणजे समक्षच समजून घेतील. मीं उत्तर केलें कीं, आधीं ही गोष्ट घडणेंच कठिण. आपले सांगितल्यावर इंद्रसेन पुण्यास जात नाहीं. बावा म्हणाले, मागें पुण्याहूनच लिहिलें आलें होतें कीं, इंद्रसेनास हुजूर पाठऊन द्यावें. त्यानें सरकारांत येऊन श्रीमंतांसी भेटून जाण्यांत उज्म* राहतो, असें त्यांनींच लिहिलें होतें. ती गोष्ट अनायासें जाली. इंद्रसेनाचे जाण्यांत बरेंच आहे. मी उत्तर दिलें जे, इंद्रसेनानें हुजूर यावें असें मागें लेहून आलें होतें तो इंद्रसेन थोरला, ज्यानें घाट घडून तहनामा केला, दिला, घेतला. तसा हुजूर जाता, श्रीमंतांची भेटी घेता, पुढें टिपूचा सलूख श्रीमंतांचे हातें होता, अगर टिपू न ऐकता, तर श्रीमंतांचे फौजेबरोबर आपण जाता; अगर आपली फौज देऊन रवाना करिता. तर त्या कालीं त्या इंद्रसेनाचें जाणें सलाह होती. त्यानेंच तह केला असता. गोष्ट सिद्धीस न जातां सरकारची फौज बाहेर निघोन टिपूचे मुलखापावेतों गेली. त्याचे मुलखांत गलबलही केली. पुढें चल द्यावा. इंग्रजांचे पलटणांची वाट पाहात होते. पलटणें गेलीं नाहींत, उलटा इंग्रजांनीं परभारा टिपूशीं सलूख केला. यामुळें नुकसानी सरकारची किती जाली? बेरीज पाहिल्यावर कळेल. उफराटा टिपूसीं बिघाड फौज निघा-

*मोठेपणा.

ल्यामुळें ठरला. आपण सदाशिव मल्हार यास लखनऊस इष्टिनाकडे पाठविलें. त्यानें टिपूचे सलुखाचा व बादशाही मनसब्याचा शद्ब लाविला. तो इष्टिनानें पदरीं घेऊन बादशाही मनसब्यांत मन घालीत नाहीं, कबूल केलें लेहून देतों व पांच कलमें लेहून देतों. टिपूचे बिघाडास शरीक होतों. असें कबूल केलें असतां, कलकत्त्याहून कूच करून विलायतेस गेला. आपले दस्ताऐवज पाठविले नाहींत. असें जालें. त्यापक्षीं इंद्रसेन थोरला जाता, तर हे जाबसाल ठिकाणीं लाऊन देऊन श्रीमंतांची मर्जी प्रसन्न करून घेता. तर तो इंद्रसेन इष्टिनाबरोबर विलायतेस गेला. हा धाकटा इंद्रसेन दरबारीं जाऊन करितो काय? तहरहचे जाबसाल आपले विद्यमानें जाले. त्यांसीं करार करून घेऊन आपण सरकारांत लेहून पाठविलें. त्यांपैकीं कलमें शेवटास जावयाचीं राहिलीं, तीं येथें त्यांनीं पार पाडून द्यावीं. आपण कलमें त्याजपासोन उगऊन घेऊन सरकारांत पाठवावीं हा मार्ग आहे. मागील बोलणें सर्व आपणासीं त्यांनीं केलें. त्याचा रोहपोह* आपणासींच करावा. त्यांपैकीं सरकारांत काय बोलतात? तत्रापि बोलल्याप्रमाणें आपण निर्वाह करून घेत नाहींत म्हणून सरकारांत विदित करून पार पाडावें, हा एक क्रम आहे. अथवा पहिलें आपले विद्यमानाचें बोलणें राहिलें, इंग्रजांकडून निभावणी होत नाहीं म्हणून तो क्रम गाळून पुढें नवें बोलावयास जावें, तर मागें जे तह केले तितके लबाड जाले, असें सरकारांतून आपणास सुचविलें असतां, आपण विश्वास मानून, क्रम चालऊन तह केला. शेवटीं तोही लबाड पडला. इतके अनुभव आले असतां, पुढें नवें बोलणें त्यासीं लावावें असी प्रामाणिकता याची काय राहिली? याप्रमाणें मी उत्तर केल्यावर बावा म्हणाले, सरकारांतूनही आस्था दिसते कीं, इंग्रजांचा वकील हुजूर यावा. राजश्री मोरो बापूजी यांनीं श्रीकाशीहून कलकत्त्यास अनुसंधान लाविलें आहे. आम्हांस वर्तमान कलकत्त्याहून लिहिलें आलें. त्यावरून इंद्रसेनच तेथें पाठवावा हें बरें. मीं उत्तर दिलें कीं, सरकारांतून उदंड राजकारणें करितील. करोत. इंग्रजांसीं राजकारण करणार नाहींत. आपण बळेंच म्हणतात. विश्वास कशावरून मानावा? तत्रापि असो. आपण केला घाट तो शेवटास न्यावा म्हणजे आपण पार पडलेत. यानिराळें मग इंग्रजांसीं राजकारण करितील तर परभारें समजतील. हें इंग्रजप्रकरणीं बोलणें जालें.

*वाटाघाट.

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचें* त्रिस्थळी यात्रेचें मानस आहे. तर बंदोबस्त इंग्रजांपासोन करून पाटिलबावांनीं लेहून पाठवावें, व मथुरावृंदावनांत सरकाराचा धर्म असावा, व बाईंचें मानस तेथें रहावयाचें आहे, तर पाटिलबावांनीं बादशाहापासून मथुरावृंदावन सरकारांत घ्यावें, येणेंप्रमाणें कलमाची पुरवणी निराळीच होती. याचें उत्तर बावांनीं केलें कीं, त्रिस्थळी यात्रेचा बंदोबस्त काय करणें पडतो? मातुश्रींनीं स्वार होऊन यावें. इंग्रजांची प्राप्ति काय आहे कीं, वांकडी गोष्ट सांगतील? उफराटें सेवेंत हजर राहून बरोबर चाकरींत मेहनत करितील. मथुरावृंदावन आधींच धर्मांत खर्ची पडलें आहे. गोसाव्याकडे अधिकार नांवास मात्र आहे. शंभर सवाशें बिघे जमीन मात्र खालसा राहिली. वरकड कूल धर्मादाय खर्चच आहे. ती जमीनही धर्मादायांतच जाईल. असीं दोन्ही कलमांचीं उत्तरें जालीं. मी म्हटलें पत्रांचीं उत्तरें द्यावीं. उत्तर जालें जे, विचार करून याचे जाब देऊं. उत्तरें बोलल्याअन्वयेंच देतात, कीं आणखी प्रकारें ते जाब देतील, ते रवाना करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his discussion with Mahadji over the question of preventing succour going to the Sidi from the English at Bombay. Mahadji pleads his inability to secure further concessions from the English.*

No. 380 20th May 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—बळवंतराव धोंडदेव यांस दत्तपुत्र राजश्री रघुनाथराव नामें त्यांचेच वंशींचा राजश्री पाटिलबावांनीं घेऊन दिला होता. तें वर्तमान पूर्वी बळवंतराव निधन पाऊन स्त्रिया सहगमन केल्या ते समयीं विनंती केली होती. त्या पुत्रास पाटिलबावांनीं वस्त्रें सरदारीचीं वैशाख शुद्ध १२ शुक्रवारचे दिवशीं शेलापागोटें, महमुदी, किनखाब मिळून चार वस्त्रें, हत्ती, घोडे, जिगा, शिरपेंच खाशास व एक कारकुनास शालजोडी, पागोटें याप्रमाणें वस्त्रें दिलीं, म्हणोन ऐकिलें. मीं तहकीक केलें. वस्त्रें दिलीं खरीं. करारमदार कसे आहेत कांहीं कळलें नाहीं. कळल्यास विनंती करीन. मजलाही प्रसंगास बोलाविलें नाहीं. वर्तमान श्रुत व्हावें म्हणोन विनंती केली हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes of Mahadji having sent robes of honour to the adopted son of Balwantrao Dhondadeo in recognition of his succession to his deceased father's estates.*

---

*गोपिकाबाई, बाळाजी बाजीरावाची बायको.

No. 381 22nd May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १२ रजबीं राजश्री पाटिलबावां यांजकडे जाऊन पेशजीचे कागदांचे व हल्लींचे रवानगीचे जाब मागितले. परिछिन्न म्हटलें कीं, बादशाहीचा कारभार आपणास नित्य प्राप्त, त्या दाटीपुढें गांठ पडत नाहीं. कागद व जाबसाल सरकारचे तसेच तटले आहेत. जाब जात नाहींत म्हणून मजला निषेध येतात. उत्तरें मीं काय लिहावीं ? तेव्हां बोलले कीं, राजश्री आबा चिटणीस यांस ताप येत आहे. आराम जाला म्हणजे पहिले व हल्लींचे जाब देतों. वर्तमान दिनचर्येचें याजविसीं विचारिलें कीं, दिनचर्या आपणास विचारून लिहीत असतों. आतां गांठ पडत नाहीं. बाहेरलें ऐकून वर्तमान लिहिल्यास रुजू पडणार नाहीं. यास काय करावें ? तेव्हां बाबांनीं वर्तमान सांगितलें. बितपसील :—

बादशाहा शाश्वतबुद्धि नाहीं. पहिले करारमदार आम्हांशीं करून आजपावेतों जाला कारभार तो केला. पुढेंही क्रम चालतच आहे. परंतु मन स्वच्छ नाहीं. आंतून इंग्रजांसीं अनुसंधान ठेवीतच आहेत. रामगडास इंग्रजांचीं पलटणें पहिलीं आलीं होतीं, तीं आम्हीं इंद्रसेनास बोलून माघारीं लावविलीं. तीं आठ दहा कोस गेलीं. अद्यापि तेथेंच आहेत. बादशाही अनुसंधानावर लागून राहिले आहेत. शह सोडून जात नाहींत. असा बादशाहा खुळा आहे. तर काय चिंता आहे ? आम्हीं समजूनच आहों. श्रीमंतांचे प्रतापेंकरून याचाही बंदोबस्त होईल. ते नच ऐकत तर चालून आले तरी आम्ही समोरच होऊं.

परगणा मेरट वगैरे महाल पंधरा लक्षांचे जमेचे आहेत. त्यांत यंदा पाऊण लक्ष रुपये आकार जाला. तोही रुपया हातास येईल तेव्हां तूर्त जमा बांधिली.

नजफकुलीखान दिल्लीस होते. त्यांचीं पत्रें निरंतर येत होतीं कीं, भेटीस येतों. शिखांचा बंदोबस्त होईपावेतों बोलाविलेच नाहींत. शिखांचा बंदोबस्त जाल्यावर बोलाविलें तर येणें संकट जालें. रोग चहूंकडे पसरला. त्यांत उष्णानें तर सीमाच टाकिली. वाट चालतां माणसें मरतात. ही दशा जाल्यामुळें येणें होईना. मग ती ती कोशांचीं कूचें करून मशारनिल्हे व माचेडीकर राव असे आले. भेटी जाल्या. त्यांसीं बोलून चालून आणले. चाकरीवर पाठऊं.

बादशाहाचे खर्चाकरितां आम्हीं मागें पुण्यास लेहून पाठविलें होतें. उत्तरही आलें जे, मागाहून खर्चास पाठवितों, परंतु पाठविलें नाहीं. मीं उत्तर दिलें जे,

गुदस्तां टिपूवर फौज निघाली. इंग्रजांचीं पलटणें न पोंहचलीं, म्हणून फौज माघारी फिरून आली. खर्च अंगावर बसला. आतांही टिपूवर मसलत प्राप्त जाली. फौज जमा करून पुढें रवाना केली आणि आज पुणेयांत चाळीस हजार फौज आतां आहे. यास खर्च रुपया किती पाहिजे? जमेस जागा सरकारांत आहे नाहीं तें आपणास विदित आहे. यास उपाय काय करितील ?

बादशाहास दरमहा दोन लक्ष रुपये द्यावे. आम्ही लाख रुपये दरमहा देत आहोंत, तो पुरत नाहीं म्हणतात. कष्टी आहेत. मी विचारिलें कीं, बादशाहांनीं खासगी खर्चास निराळी जागीर करून ठेविलीच आहे, त्यापैकीं दरमहा देणें लागतो किंवा खेरीज ? उत्तर जालें जे, दरमहा त्या खासगी जागीरपैकींच, परंतु महिन्याचा खर्च किती आणि जागीर किती ? जागीरच त्यांचे खर्चास पुरत नाहीं. त्यांत जागिरीच्या बेरजा बादशाहांनीं कमाल धरिल्या आहेत, तो आकार कोठें आहे ? आधीं चार वर्षें अनावृष्टि जाली. त्यांत रयत अगदीं मेली. गुरेंढोरें मेलीं. किंचित् माणसें राहिलीं. तीं पोटास न मिळतां मेहनत काय करितील ? असें असतांही जी आबादी जाली ती लाखाचे जागां हजार होत नाहींत ! ही गति जागिरीची. तिजवर खर्च काय चालतो ? त्याखेरीज लाख रुपया नगदी दरमहा देतों, तो पुरत नाहीं ! याखेरीज शागिर्दपेशा व फौज हे निराळे रुपये देणें लागतात.

शिखांचा बंदोबस्त जाला. सोनपत पानिपता पलीकडे शीख आहेत ते येऊन भेटले. बादशाही मुलखांत रखी घेत होते, ती सोडविली. पुढें त्यांनीं रुजू राहावें. फौज आपणास लागेल ती त्यांची आणवावी. त्यांनीं फौज घेऊन यावें. सांगितली चाकरी करावी. त्यांस पोटास द्यावें. करार जाला.

इंग्रज जाहिराणा दोस्ती राखितात. आंतून बादशाहासीं सूत्रही ठेवितात. रामगडचा शह सोडीत नाहींत. आम्ही इंग्रजांसीं जाबसाल घातला आहे कीं, आम्ही रामगडास फौज पाठवितों. काय ठरेल पाहावें. शह सोडिला उत्तम. निटावतील तर नीट होणें आपणासही प्राप्तच आहे. पाटिलबावांनीं सांगितल्याप्रमाणें मजकूर विनविले आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji details, for Nana's information, an account of his administration of the Delhi affairs. He writes about the pacification of the Sikhs, about his not very friendly relations with the English, and about the secret intrigues of the Emperor with them. Mahadji begins to find his job bristling with difficulties all round.*

No. 382 27th May 1785.

छ विज्ञापना ऐसीजे:—बळवंतराव धोंडदेव यांस परलोकवास जाला. त्यांनीं राजश्री पाटिलबावा यांचे व चार वैदिक ब्राह्मण पंडित यांचे संमतें दत्तपुत्र राजश्री रघुनाथराव यांचें दत्तविधान करून पुत्रत्वांत घेतलें. हें वर्तमान तेच कालीं सेवेसीं विनविलें आहे. त्याजवर यांचें पथक मेरटेकडे चाकरीस गेलें होतें. तेथें गवगवा पडूं लागला. साहुकार मामलेदार यांसही हिंमत पुरेना. यामुळें क्रम चालेना. अंतर पडूं लागलें. हें समजल्यावर पाटिलबावांनीं रघुनाथराव यांस वस्त्रें बहुमान हत्ती दिल्यामुळें साहुकार मामलेदारांची खातरजमा जाली. कर्जवाम मिळोन गवगवाही दूर जाला. प्रस्तुत येथील प्रसंग विलग जाला होता तो मोडून क्रम चालता जाला. परंतु सरकारांतून बंदोबस्त जाल्यावांचून यांची खातरजमा पटत नाहीं.कारण कीं, ही दौलत अगर (जर?) दिलेली स्वामींची, तिचा बंदोबस्त स्वामींनीं करून दिल्याखेरीज निर्वाह नाहीं. येथें पाटिलबावांचे तैनातीस स्वामींचे आज्ञेप्रमाणें आहोंत. यांत असें खलल जालें. तो प्रसंग बावांनीं सुरळीत करून दिला. येणेंकरून प्रस्तुतचा उपयोग मात्र बंदोबस्त स्वामींपासून जाल्यासच शाश्वत आहे. रघुनाथराव तर दहा अकरा वर्षांचे आहेत. कारभारी यशवंतराव, अगोदर बळवंतराव यांचेच कारकीर्दीस होते, ते आहेत. त्यांनीं मनांत आणून सेवेसीं विनंतीपत्र रघुनाथराव यांचे नांवें लेहून दिलें, तें रवाना केलें आहे. त्यावरून सर्वार्थ विदित होतील. दरबारीं राजश्री कमलाकर राम आहेत. ते यशवंतराव यांचेच चुलते होत. ते व विठ्ठल सदाशिव हे दोघे बळवंतराव यांजपासोन दरबारीं आहेत. त्यास यशवंतराव यांनीं सेवेसीं विनंती करण्याविसीं लेहून पाठविलें आहे. रघुनाथराव यांचे नांवें सरदारी होणें तेव्हां बंदोबस्त पूर्ववत् नवाच होतो. यास्तव स्वामींस विनंती करून आपला हालहवाल विदित करावा. देण्याघेण्याचे आदिकरून जुने पेंच विदित करून, सविस्तर हृद्गत आपले तापत्रय समजून द्यावें. पुढील बंदोबस्तास स्वामींची मर्जी व कृपा संपादन करणें अगत्य आहे. आपली शक्ति पाहून, आज्ञा करतील त्याचा ठराव निर्वाह होणें, पार पडण्याजोगा करून सरकारांतून सरदारीचीं वस्त्रें, बहुमान व सनद रघुनाथराव यांचे नांवें जागिरीच्या सनदा सुद्धां घेऊन पाठऊन द्यावी, म्हणून यशवंतराव यांनीं त्या उभयतांस लिहिलेंच आहे. त्यांनीं विनंती केली असेल. विनंती केली आहे म्हणोन उभयतांनीं यांस लेहून पाठविलें. परंतु अद्यापि सनदा, वस्त्रें, बहुमान प्राप्त जाल्या नाहींत. यास्तव रघुनाथराव यांनीं व यशवंतराव यांनीं विनंतीपत्र

सेवेसीं लेहून दिलें, तें पाठविलें आहे. याचे उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सरदार पूर्ववयस्क तेव्हां डौल चालवणें, स्वामींचे मर्जीचें संपादन हें यशवंतराव यांसच प्राप्त आहे. यास्तव स्वामिगौरवही यांस असावा. सरदाराचे वस्त्रांबरोबर यांसही दोन वस्त्रें इनायत जालीं पाहिजेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar requests Nana to recognise the title of Raghunath Rao as the successor and heir to Balwant Rao Dhondadev.*

No. 383 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—खोजा इलमास, मीर्जा अमानीजवळ आहे. तो इंग्रजांसीं फटकून आहे. इंग्रजांचे काबूंत न यावें यास्तव राजश्री पाटिलबावांसीं पैगाम करून, शिफारसपत्र राजश्री बाळाजी गोविंद यांजवर बावांचें नेलें कीं, खोजा कुटुंब, वस्तभाव वगैरे तुमचे येथें ठेवणार, तर यास हवेल्या कालपींत खालीं करून रहावयास जागा देणें. त्या पत्रावरून त्यांनीं खोजास जागा दिली. खोजानें मुलेंमाणसें वस्तभाव कालपींत आणून ठेविलीं. हें वर्तमान इंग्रजांस कळलें. त्यांनीं पाटिलबावांस लिहिलें कीं, खोजा आमचा चोर आहे. कालपींत त्यास आश्रा दिला तो न द्यावा. यावरून त्यांनीं बाळाजी गोविंद यांचे नांवें पत्र कीं, खोजा अलमास इंग्रजांचा चोर आहे, त्यास कालपींत न ठेवणें, असीं पत्रें इंग्रजांकडे पाठविलीं आहेत. यावरून बाळाजी गोविंद अंदेशांत पडले आहेत कीं, खोजाचीं माणसें काढून देतां येत नाहींत. गांवांत ठेविले तर इंग्रज जबरदस्त. बळ बांधून त्यासीं भांडवत नाहीं. या अंदेशांत पडले आहेत. खोजास वर्तमान कळलें जे, बावांनीं इंग्रजांचे लिहिल्यावरून कालपींतील जागा मना करविला. त्यावरून खोजानें आपलीं माणसें नेलीं. मीर्जा अमानी शिकारीचें निमित्त करून गेला होता, तोही लखनऊस आला आहे. याउपर काय घडेल तें पाहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of the English having demanded of Sindia that he should not harbour at Kalpi Khoja Ilmas, the Diwan of Vazir Asaf-ud-Daulah.*

No. 384 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १ जमादिलाखरचे पत्रीं आज्ञा कीं, श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांचें मानस तीरस्थळीं यात्रेस जावयाचें आहे. याजकरितां राजश्री पाटिलबावांस सांगून इंद्रसेनासीं बोलून, कलकत्त्यास लिहून, कराची माफी व मार्गाचा वगैरे बंदोबस्त करून लिहून पाठवणें म्हणोन पूर्वी लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें नाहीं. त्यास, पूर्वी लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त करून लिहून पाठवणें. व हल्लीं पातशाही बंदोबस्त सरकारांतून जाला आहे. त्यास बाईसाहेबांचें मानस आहे कीं, श्रीमथुरावृंदावन पातशाहापासून सरकारांत घ्यावें आणि तेथें सरकारचा धर्म असावा व राहणेंही तेथें घडावें. असें मानस आहे. याजकरितां तुम्ही पाटिलबावांसीं बोलन, मथुरावृंदावन सरकारांत करार करून पातशाहापासून घ्यावें. काम होईसें आहे. याकरितां लिहिल्याप्रमाणें बोलून उत्तर लिहून पाठवावें. जरूर करून घ्यावें. म्हणून आज्ञापत्र पाहून उत्तर चिटणिसाकडून देविलें. त्यांनीं हीच मालुमात* जमा धरून उत्तर (अपूर्ण) . .

¶*Nana, through Sadashiv Dinkar, asks Sindia to secure the sacred places, Mathura and Brindaban, from the emperor and make arrangements for the pilgrimage of the Peshwa's grandmother.*

No. 385 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंडदेव व पवारमंडळीपैकीं राजश्री कृष्णाजी पवार हीं तीन पथकें सरकारचीं इकडे तनातीस आहेत. त्यांची स्थिति गति कीं कांहीं आब महत्व कांहीं राहिलें नाहीं. केवळ चाकराचेही चाकर ही दशा आजपावेतों जाली. त्यांपैकीं बळवंतराव धोंडदेव वारले. त्यांचे कारभारी यांस काय आश्रय सांपडला असेल तर न कळे. शिवाजी विठ्ठल व कृष्णाजी पवार हे केवळ कष्टी बेजार आहेत. लाचार आहेत.

शिवाजी विठ्ठल यांचा प्रथम पुत्र मेला† तेव्हां अष्टचांत होते. ते काळीं कर्जदारी, फौजेचें पागेचें देणें, धारणींपारणीं ही दशा असतां, राजश्री पाटिलबावा

*आलेल्या पत्राचा मतलब. †प्रथम पुत्र गणपतराव तारीख ९-९-१७८४ रोजीं वारला. दुसऱ्याच्या मृत्युबद्दल पहा ऐ. टि. ५-१.

इंग्रजांवर जातात यांचे तैनातीस जाणें, आज्ञा सादर जाली. मोहीम इंग्रजांची, न जातां ठीक नाहीं. फौज व पागा तसाच कजिया घेऊन बावांचे बरोबर आले. पांच वर्षें जालीं. यांजवळच आहेत. चाकरी करीत असतां पंचमहालीं त्यांचा अंमल उठऊन एक रुपया प्राप्त होऊं दिला नाहीं. परगणा उच्याड. दतियेकरानें गोहदकर राण्याचे पारिपत्याकरितां मागें शिवाजी विठ्ठल यांस शामील जाला होता त्या कालीं नानकार* करून मागितली होती. यांनीं प्रसंग व गरज जाणून नानकार सनद करून दिली. ती हातास येतांच कूच करून दतियेकर दतियास गेला. त्या सनदेवर दतियेकरच उच्याड महाल अनुभवीत होता. बावांसमागमें आल्यावर दतियेकरावर दाब बसऊन उच्याड महाल, एक वर्ष जालें, सोडवून घेतला. सनद नानकाराची अद्यापि माघारी देत नाहीं. मग मागील सालाचा रुपया कोठून देणार? मदत कोण करितो? सहजच फेंदींत† पडलें. पंचमहाल तर बावा इकडे आल्यापासून दाबले. त्यांपैकीं भितरवार वगैरे गांव भारथसाहा एक रांगड्याकडे एकोणीस हजार रुपये मख्त्यानें होते. त्यांची बेरीज पाऊण लक्ष रुपये बावांनीं धरून यांजकडे ठेविले होते. बाकी सारीं गांवखेडीं हिरून घेतलीं. त्यांचे रुपये बावांचे कमाविसदार घेत होते. पंचमहाल मागतां मागतां बापू दमले, परंतु साध्य न जालें. भितरवारकरानें पंचमहाल दाबलेसें पाहून, शिवाजी विठ्ठल यांसीं फिरून गोष्ट सांगितली. वर्तमान बावांस श्रुत केलें. तें ऐकून मोर्चे लाऊन भितरवार घ्यावी, बावांनीं भर दिला. यांनीं बावांची फौज व तोफा मागितल्या. त्या कबूल मात्र करून यांजकडून मोर्चे भितरवारेस लाविले. फौज म्हणायास बावांनीं भगीरथ शिंदे दोनेकशें स्वार दिले. ते व बापूंची फौज जाऊन मोर्चे लाविले. भितरवार गढी मातबर. जागा कठिण. एकरुखी लढाई. त्यांत भगीरथशिंद्यांनीं अंग भितरवारकराकडे दिलें. बावा ग्वालेर गोहदेवर वर्षभर होते. राजश्री चिमणाजी खंडेराव फौज व तोफा मागतां मागतां दीन जाले. मिळाल्या नाहींत. शेवटीं बावांनीं ग्वालेरीहून कूच करून चमल उतरून बादशाही मनसब्यास आले. मग तर भितरवारकर फारच बह-

*नान=भाकर, निर्वाह. In Bengal finance, a term applied to an assignment of a portion of land or revenue of an estate, made to the occupant or zamindar as an allowance for his subsistence, usually amounting to ten p. c. of the whole asses ment (Wilson). †फेंद=वांधा, abeyance.

कला. तेव्हां शहास गुंतल्यामुळें शिवाजीपंत बापूंनीं तीन चार हजार गोसावी व रोहिले पठाण हजार दोन हजार नवे ठेविले. झांशीहून तोफ आणून भितरवार जेर केली. धारराव शिंदे देशीहून त्या मार्गे आले. त्यांचे विद्यमानें भितरवारकर येऊन भेटला. तेव्हां भितरवार बापूंनीं घेतली. मदसुरा एक गढी मातबर भारथ-साहास राहावयास दिली. पांच सहा गांव त्या गांवाखालीं दिले. या मसलतींत तीन चार लक्षांचा पेंच बापूवर बसला. त्याचे कर्जदार तगादे करितात. बापू भितरवारेसच आहेत. गणपतरायासारखा पुत्र ज्यानें दौलत आटोपली होती तो मेला. वरती हे मसलत पडली. आतां भितरवारेंत आहेत. फौज व पागेचा गवगवा पडला आहे. धरणींपारणीं होतात. वर्तमान ऐकतों. करोलींत संबलगड यांचा, तो आंबूजी इंगळचाकडून बावांनीं घेवविला. एक रुपया येत नाहीं. म्हणून चिमणाजीपंत फौज घेऊन तिकडे गेले आहेत. ही फजिती त्यांची ! परम विपत्तींत आहेत. फार फजिती आहे. चिमणाजीपंतास करोलीकडे कांहीं प्राप्त जालें नाहीं. फौजेसहित फिरून भितरवारेस गेले. फौजेचा गवगवा आहे.

कृष्णाजी पवार यांची स्थितिगति येथें कांहीं नाहीं. पहिले स्वाऱ्यांत कांहीं हिसा मिळत असे. आतां तर कांहीं मिळत नाहीं. पूर्वी हुजुरून माळवेप्रांतीं तैनातीसच होते. नंतर बावांचे तैनातीची आज्ञा आल्यावरून यांजबरोबर आले. पांच वर्षें यांजवळ आहेत. यांचे चाकरास मान असेल तो या सरकारचे सरदारास नाहीं ! रसदेवर देखील याच्या आबरा (?) घेतल्या. आनंदराव पवार यांनीं इंग्रजांसीं कजिया केला, म्हणून त्यांजवर तोफ व पलटण बावांनीं पाठविलें होतें. तो अपमान कृष्णाजी पवार यांस सोसला नाहीं. तेच समयीं कूच करून जात होते. आपली बेमर्जी होईल म्हणून दम खाऊन राहिले. दहा वर्षें जालीं. लोकांचे फर्चे* नाहींत. गवगवे आहेत. धरणींपारणीं होतात. म्हणून कृष्णाजी पवार यांनीं बावांस म्हटलें, आमचे येथें गवगवे आहेत; येथें रुपया मिळत नाहीं; आज्ञा दिल्यास देवाशास जाऊं. महालचे कमाविसदारांचीं फाजलें देणें आहेत. ते पुढें रुपया देत नाहींत. आमचे दिवाण बाजीपंत त्रिस्थळी यात्रेस गेले. कारभार आम्हांवरच येऊन पडला. यास्तव देवाशास जाऊन चार महिने छावणींत कमा-विसदारांची समजूत पाडून, पुढें रुपया त्यांजपासोनच घेऊन लोकांची समजत करूं. लोक नवे जुने होतील ते ठेऊन, दसरा करून आपणाकडे येऊं म्हणून पैगाम केला. बावांनीं उत्तर दिलें जे, तुम्हीं देवाशास गेल्यास सदाशिव पवार सरकारांत

*फडशा=liquidation.

सांगतील. तेव्हां सरकारांत टिपूची मसलत. तुम्हांस बोलाऊं आलें, हुजरे आल्यास घेऊन जातील. तुमच्यानें नाहीं म्हणवणार नाहीं. आम्ही मोहिमीवर आहों. तुम्ही रिकामे तनातीस नाहींत. तिकडे बोलावल्यास आम्हांस लेहून पाठवाल, तर आम्हांस नको म्हणतां नये. असें म्हणून निरोप दिला नाहीं. याउपर होईल ते विनंती करीन. आनंदराव पवार तर यांच्या कश्यपींच आहेत.

पुरवणी.—शिवाजी विट्ठल पंचमहालपैकीं थोडीसी जागीर वैराण वैराण गांव, जे शंभर वर्षें आबाद जाले नाहींत, त्यांच्या जुन्या बेरजा कमाल आकाराच्या धरून, त्यांस गांव लाऊन दिले. शिवाजीपंतबापू घेईनात. यांनीं बजीद होऊन दिलें, न घेतल्यास बावांसीं विरुध पडेल जाणून, जे यांनीं दिले तितके गांव घेतले. करोलीपैकीं सबळगड यांचा तेथेंही इंगळ्याकडून कबजा करविला. ही दशा याची आहे! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports, to what great straits the Peshwa's Sardars, Shivaji Vithal and Krishnaji Pawar, serving in Sindia's army, had been reduced.*

No. 386 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—समल*, मुरादाबाद, चांदोसी, अनुपशहर हें रोहिलखंड रोहिल्यास मारून सुजाउद्दौलानें मुलूख घेतला. आतां वजीर इंग्रजांकड आहे. तीं पांच शहरें शिखांनीं मारून करोडोंचा माल नेला. जागांजागां पलटणांची तयारी होत आहे. ऐकून बावांनीं इंद्रसेनास विचारिलें याचें कारण काय? त्यानें उत्तर दिलें जे, शिखांनीं आमचीं पांच शहरें मारून करोडोंचा माल नेला, सबब आमची तयारी आहे, याचें उत्तर बावांनीं दिलें जे, याउपर शीख तुमचे मुलखांत दंगा करितील तर जिमा आमचा. दंगाच करणार नाहींत. इंद्रसेनानें म्हटलें, तुम्ही जामीन आहां? बावांनीं कबूल केलें आम्ही जामीन असों. लेहून दिलें असें ऐकतों. खरें खोटें न कळे. जामीन जाले. करार विलायतचे बादशाहाचा वकील आला आहे त्याजबरोबर बादशाहास पत्र आहे, व पाटिलबावांस पत्र आहे जे, तुम्हीं हिंदुस्तानचा बंदोबस्त केला, ऐकून खुषी जाली.

---

*संबळ.

आमचा हेत आहे जे, तिकड यावें. तुमची भेट व्हावी. असा मजकूर लिहिला म्हणून वर्तमान ऐकिलें. याचें उत्तर हे काय लिहितात पाहावें. कळल्यावर विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of the Sikhs having plundered the rich cities of Sambal, Moradabad, and Anupshahar in the Vazir's territory and of Mahadji having offered his guarantee to the English against further depredations. Mahadji was perhaps anxious that no troops were advanced by the English near his frontiers.*

No. 387 22nd May 1785.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ जमादिलाखर मुक्काम नजीक क्षेत्र मथुरा यमुनातीर स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष :—इकडील दिनचर्येचें वर्तमान वगैरे पुरवणीपत्रीं निरनिराळें विनविलें आहे, त्यावरून विदित होईल. इंद्रसेन इंग्रजांचें खलबत तीन चार रोज होत आहे. यादीबुदी होतात. छेकतात* काय मजकूर असेल तो कळल्यावर विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports Mahadji being closeted with Anderson in important discussions.*

No. 388 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—इंद्रसेन इंग्रज यासीं खलबत दाट होत होतें. वर्तमान पेशजीं विनविलें होतें. त्याचा शोध लागला जे, मेजर बरवण† इंग्रज इष्टिनाकडील बादशाहाजवळ वकिलीस होता. त्यानें बादशाहास काय भासऊन सांगितलें असेल न कळे. मेघफरसन हल्लीं कलकत्त्यास गौरनर होऊन आला. त्याचे नांवें बादशाहाचा षुका लेहून घतला कीं, आम्हीं प्रयागांत होतों तेव्हां दरसाल बंगाल्याचा रुपया तुम्ही देत होतां. प्रयागाहून आम्ही दिल्लीस आल्यापासून

*छेदकांत अगर शेवटांत; निष्पत्ति. †Maj. James Browne was appointed British agent to the Emperor on 3-10-1783 and had his first audience on February 5,th 1784.

रुपया देत नाहींत. तर आजपावेतों राहिले सालांचा रुपया पाठऊन देणें. पुढें साल दरसाल रुपया पाठवीत जाणें. असा षुका बादशाहाचा घेऊन तोच बरवण इंग्रज राजश्री पाटिलबावांकडे येऊन, पत्र मेघफरसन कलकत्तेवाल्याचे नांवें बादशाहाचे षुक्यावरून कळों येईल याअन्वयें मागितलें. यांनीं विचारलें जे, तुम्ही गौरनर पद घेऊन येऊन कलकत्त्यास दाखल जालां, याची खुषी फार जाली. आपले पत्राचाही अन्वय तोच निघेल. हें ऐकून बावांनीं बादशाहाचे षुक्यावरून कळों येईल असें पत्र लेहून दिलें. बरवणानें आपण पत्र न लिहितां, बादशाहाचा षुका व बावांचें पत्र कलकत्त्यास रवाना केलें. तें मेघफरसनास पावलें. त्यानें मजकूर पाहून इंद्रसेनास लेहून पाठविलें कीं, पाटिलबावांची आपली दोस्ती बेकिलाफ* जाली. तुम्ही त्यांजवळ राहिलां. पाटिलबावा बादशाहाचे वकील-मुतलक मुख्तार जाले असतां याअन्वयें पत्र त्यांचें तुम्हांस न कळत आलें. बादशाहाचा षुका असा बरवणास न कळत आला, तेव्हां तुम्ही तेथें राहण्याचें स्वरूप काय? असें पत्र पाठविलें. व षुका व बावांचें ऐसे दोहींच्या नकला पाठविल्या. तीं पत्रें इंद्रसेनानें पाहून पाटिलबावांस दाखऊन रुसवा करून जाऊं लागला. बावांस वर्तमान कळलें कीं, इंग्रजांचीं पलटणें जागांजागां आहेत, तेथें तयारी सरंजामाची आहे, बिघाड करणार. ऐसें ऐकून इंद्रसेनास बोलाऊन आणून, बरवणानें बादशाहाचा षुका घेतला त्याचा मजकूर आम्हांस या रीतीनें सांगितला. त्या षुक्याचा हवाला देऊन आम्हांस पत्र मागितलें, म्हणून दिलें. बंगाल्याचा रुपया मागावा आमचे मनींमानसींही नाहीं. असें बोलल्यावर त्यानें पुन्हा बादशाहाचा षुका मागितला. पैका मागत नाहीं. याअन्वयें तुम्हीं आपलेंही पत्र द्यावें. तें बावांनीं मान्य करून बंगाल्याचा रुपया मागत नाहीं, याअन्वयें बादशाहाचा षुका व पत्र इंद्रसेनानें घेतलें. कलकत्त्यास रवाना केलें. जागांजागांचे पलटणांची तयारी मना केली. बरवण बिदा होऊन कलकत्त्यास गेला. आतां वकील मेघफरसनाकडून इंद्रसेनच ठरला. त्यास हत्तीघोडा, जवाहीर, वस्त्रें देऊन संतोष केला. असें वर्तमान जालें. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that the negotiations with Anderson mentioned in his last dispatch referred to the appointment of Maj. Browne as British agent at Delhi and to the emperor's demand of the tribute from Bengal which he had formerly received and which the English now refused to pay him.*

*नि:संशय.

No. 389 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री मोरो बापूजी फडके यांचीं पत्रें राजश्री पाटिलबावा यांस व सेवकास श्रीगयेचे माफीकरितां मुजरद जोडीबरोबर आलीं होतींच. मागाहून आणखी जोडीबरोबर पत्रें बावांस, सेवकास आलीं. लिहिलें होतें कीं, कलकत्त्यांत इंग्रज म्हणतात कीं, आमचीं आठशें माणसें सोडावीं, तर आमचा घरसमुदायच आठशें होईल. वरकड यात्रेची माफी जाल्याखेरीज आमचें जाणें गयेस होणार नाहीं. पत्रें बावांस प्रविष्ट करून जाबसालही बहुत जाले. दीड महिनापर्यंत जोड्या राहिल्या. बावांचें उत्तर एकच होत गेलें कीं, प्रयाग व श्रीकाशीचे माफीकरितां सरकारचे यादींत लिहिलें होतें, त्याप्रमाणें दोही जागांचा कर सरकारचा माफ करविला. गयेंत जास्त होत होते. सरकारचे यादींत, मुरारचौकी व खापर मिळून तेरा रुपये घ्यावे असा करार ठरविणें, म्हणून लिहिलें होतें. आम्हीं शोध करितां, तेरा चौदा रुपयेच मुरारचौकी व खापर मिळून घेतात. याकरितां तोच करार बहाल राहिला. इष्टीन कलकत्त्याहून विलायतेस गेला. आमचें त्याचें बोलणें होतें. नवा आला त्याचा आमचा सिलसिला अद्यापि नाहीं. इंद्रसेन येथें आहे तोही इष्टिनाकडील, जाबसाल नवा कांहीं होत नाहीं. ते होऊन आठशें माणसें यांची माफी करीत असेल तीच मान्य करावी. नवें होत नाहीं. हेंच उत्तर शेवटपावेतों जालें. बावांनीं आपले पत्राचें उत्तर सरकारचे यादीचा मजकूर लेहून गयेचे माफीचा मजकूर नवा होत नाहीं सविस्तर सदाशिव दिनकराचे पत्रावरून कळेल म्हणून लेहून दिलें. एक कासदजोडी त्याची न पुसतांच उठून गेली. आणखी कोठें कागद आणिले म्हणत होते, तिकडे गेले असतील. मागाहून जोडी आली होती, त्याजबरोबर बावांचें उत्तर व सेवकाचें पत्र सदरहूअन्वयें रवाना केलें. वर्तमान कळावें म्हणून विनंती केली असे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that no further concessions could be secured from the English in the matter of the pilgrim tax at Gaya.*

No. 390 May 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—आनंदीबाई निंबाळकर व राजश्री बाबाराव वकील नवाब निजामअलीखान यांजकडून येथें आले. भेट जाली. बोलणीं राजश्री

पाटिलबावांचीं यांचीं ऐकिलीं तीं विनंती केली. त्याजवर खातरजमा होईना. स्वामींचीही आज्ञा होती कीं, बारकाईनें शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून शोधांत होतों. शोध काढितां ठिकाण लागलें जे, दोन कामें घेऊन आले आहेत. एक तों इंग्रजांनीं मुलूख दाबला आहे तो सोडऊन देवावा. दुसरा मतलब कीं, बादशाहाकडे इंग्रजांचें सूत्र लागलें आहे. जर ही बळकटी जाली तर सर्वांस संकट पडेल. आमची वजारत पिढीजाद आहेच. तुम्ही आम्ही एक होऊन बादशाहीचा बंदोबस्त करूं. हे जाबसाल बाईनीं व बाबारायांनीं बावांसीं केले. त्यांत इंग्रजांकडील मजकुराचें उत्तर साफच दिलें कीं, तुमचा मुलूख इंग्रजांकडे इजारेयानें आहे त्याचा पैका ते देत आहेत तसा देत जातील. हें बोलणें त्यांचें आमचें जालें आहे. मुलूख ते सोडीत नाहींत. बादशाही बंदोबस्तास तुम्ही आपले चिरंजिवास पाठवावा. त्यास वजारतेवर कायम करावयास उद्योग करूं. साहित्यास चुकणार नाहीं. हीं बोलणीं होऊन, बाई व बाबाराज यांचीं पत्रें नवाबास गेलीं आहेत. त्यांचे उत्तराची प्रतीक्षा आहे. नवाबाचा व पाटिलबावांचा पत्राचा सिलसिला चालला पाहिजे. मतलब उपस्थित होत जाईल तो लिहिण्यांत येत जाईल. अलकाब* परस्परें कसे लिहावे ते लिहून पाठविले आहेत. तेथून उत्तरांत अलकाबही ठरून येतील. नवाबाचें पत्र यांस नवतें. आतां अलकाब लेहून येईल त्याचें उत्तर बावांचें नवाबास पाठवावें आणि बाबाराव वकील यांनीं श्रीकाशीयात्रेस जावें असा शोध लागला. अधिकोत्तर ऐकिल्यास विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar sends a report to Nana about the activities and talks of the Nizam's Vakil, Baba Rao, in Sindia's Camp.*

No. 391 13th June 1785.

पैवस्ती छ १० रमजान सन सीत समानीन आषाढ मास.

बालाजी जनार्दन जामगांवकर यांनीं आणून दिल्हा.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष :—आपलीं पत्रें आल्यावरी पातशाहापासोन फर्दा,

*मायना.

वकील-मुतलकी व नायब मुनायब व मीर-बक्षीगिरी याप्रों तीन फर्दांवर दस्कत करून घेतल्या होत्या त्या काढ्वून पाहिल्या. त्यांत श्रीमंतांचे नांवें वकील-मुतलकी व मीर-बक्षीगिरी ऐसे दोन फर्दा दस्कत सुद्धां आहेत व नायब-मुनायबी आमचे नांवें याप्रमाणें आहेत. पहिलेच फर्दा करून घेणें त्या समजोनच घेतल्या. श्रेष्ठपद आपले नांवें, हलकें पद श्रीमंतांचे नांवें असें होणार नाहीं. पूर्वी आपणांकडे पत्रें पाठविलीं त्यांत लिहिण्यांत उलटें पडलें. फारसी फर्दा लिहिणारांस फारसी वाचतां येत नाहीं. श्रेष्ठ व हलकें पद कोणतें, नायब-मुनायब हेंच श्रेष्ठ असें जाणोन लिहिण्यांत हस्तदोष पडला. बजिन्नस फर्दाच्या नकलाच आपणांकडे पाठविल्या आहेत, त्यावरून कळेल. येथें आपलीं पत्रें आल्यानंतर राजश्री सदाशिव दिनकर यांसी बजिन्नस दस्कतच्या फर्दा दाखविल्या असतां, यांचे बोलण्यांत जे, या फर्दांत श्रीमंतांचे नांवें काय आहे? गुमास्तगिरी तुमचे नांवें. तेव्हां श्रीमंतांचे नांवें यांत काय आहे असा भाव दृष्टीस पडला. वकील-मुतलकीचा खिलत चार कुबाचा व नालकी व मीर-बक्षीगिरीचा खिलत वगैरे सरंजाम येथून रवाना केला. त्यावरी माारनिलेचे बोलण्यांतच भाव श्रीमंतांचे नांवें नसतां आपण काय समजोन रवाना केला? त्यावरून सरंजामाची रवानगी केली ते माघारा फिरविल्यास लौकिकांत वाईट दिसतें. याकरितां उज्जनीस सरंजाम तूर्त राहील. आपणांकडून पत्रांचीं उत्तरें आल्यावरी पुढें रवाना होईल. वकील-मुतलकी व मीर-बक्षीगिरीच्या फर्दा आम्हीं श्रीमंतांचे नांवेंच लेहून दस्कत करावयासी दिल्या. त्यावरी पातशाहानीं वकील-मुतलकीचे फर्दावरी दस्कत केलें आहे कीं, आम्हांकडून व श्रीमंतांकडून तुम्हांस मुकत्यारी दिल्ही व बक्षीगिरीचें दस्कत बशर्त तुम्हांकडे गुमास्तगिरी राहिल्यास मंजूर असे. त्या समईं पातशाहास अर्ज केला कीं, अर्जीप्रमाणें दस्कत हजर करून घ्यावें. श्रीमंतांकडून आम्ही चाकरीस आहों. त्याचें उत्तर त्यांनीं केलें कीं, श्रीमंतांचा व तुमचा धणीनोकराचा मुकदमा, त्यांनीं दुसरा कोणी सरदार पाठविल्यास आमचे मर्जीस माफक पडणार नाहीं. पेशजी विसाजी कृष्ण व होळकर यांनीं आम्हांस गीतेची पोथी व बेलभंडार दिल्हा असतां, उभयतांनीं बदमामली आम्हांसीं केली. दिल्लीचा किल्ला नजीक होता म्हणोन वांचलों गेलों. नाहीं तर मारले गेलों होतों. गीतेची पोथी व बेलभंडार हा कालपर्यंत आम्हांपाशीं आहे. इमान देऊन बेमानी केली. यामुळें दुसऱ्याचा इतबार पुरत नाहीं. याकरितां असें लिहिणें प्राप्त. श्रीमंतांचे तर्फेनें तुम्हीं आम्हांपासीं राहून मुकत्यारीनें बंदोबस्त करावा. त्यांचे मर्जीप्रमाणें करून घ्यावें तरी इंग्रजांकडे आंतून त्यांचीं राजकारणें होतीं. त्यावरून इष्टीन

कलकत्त्याहून धाऊन लखनौस आला होता. पातशाहाईत इंग्रजांचा पाय शिरकल्यास तमाम खुषकीस* पेंच पडेल. पातशाहींत इंग्रजांचा पाय न शिरे ते गोष्ट करावी अशीं आपलीं पत्रें वरचेवर येत गेलीं. त्यावरून आठ महिने मुक्काम ग्वालेरीनजीक करून आफराशाबखानासीं राजकारण लावून पातशाहास आग्रेस आणिलें. आम्हीं कूच करून आलों. भेटी जाहल्यावर आफराशाबखान आपसांत दगा होऊन मारला गेला.† अमदानी वगैरे ज्याचा जसा बंदोबस्त करावयाचा तो केला. येविषयींचें पूर्वीच लिहिण्यांत आलेंच आहे. बादशाहाचे भेटीस सात आठ महिने होत आले. सोळा महिने या मसलत संमंधीं खर्चाखालीं आलों. पातशाहास दरमाहाचा दरमाहा देत गेलों. पलटणी व फौज नजफखानी आहेत, ते सारे आपले लगामीं लागावे याकरितां त्यांस देखील खर्चास देवून लगीं लावून घेतलें. कंपेश आजपावेतों ऐशी पंचायशी लाखांचे खर्चाखालीं आलों. बादशाहाची मर्जी व सरकारचा नक्ष राहून इकडील बंदोबस्त व्हावा हें जाणोन, वकील-मुतलकी व मीर-बक्षीगिरी श्रीमंतांचे नांवें करून घेतली. नायब-मुनायबीची फर्द आमचे नांवें आहे. तीन्ही पदें सरकारांतच आहेत. आपले लिहिल्याप्रमाणें आम्हीं जेथवर सरकारची चाकरी करावयाची ती केली. आमचें येथें काम होईल तें नामंजूर असेंच आपले चित्तांत आलें हें अपूर्व आहे. चाकरी बरबाद,‡ गुन्हा लाजम ! § आम्हीं श्रीमंतांचे प्रतापें करून पातशाहास आणून स्थापना केली, हा प्रताप श्रीमंतांचा. यापेक्षां वकील-मुतलकीचें पद आपले नांवें करून घ्यावें हें विशेष नाहीं. असे जावसाल सदाशिव दिनकर यांसी केले. परंतु त्यांचे बोलण्यांतील अर्थ, तुम्हांकडेच गुमास्तगिरी, तेव्हां तीन पदें तुम्हांकडे यांत सरकारचें काय आहे ? रवानगी करणें ती समजोन करावी. यामुळें चित्तांत संशय येऊन आपलीही मर्जी अशीच असेल म्हणोन हे येथें बोलतात असें वाटलें. याकरितां सरंजाम उज्जनींत ठेवून आपणांस लिहिलें. जसें उत्तर येईल तसें करावयासी येईल. अगोदर वकील-मुतलकी, त्याहून दुसरा दरजा नायब-मुनायबी, तिसरा दरजा वजीर, या तिघांशिवाय नालकी चार कुबा कोणास होत नाहीं. येविसीं आपण हिशेब करावा. वकिलास सविस्तर समजाविलें असतां त्यांनीं हें उत्तर केलें यामुळें संदेहांत पडून आपणांस लिहिलें. याचें उत्तर लवकर यावें.

---

*हिंदुस्तानी सत्ताधीश, land-powers. †ता. १ नोव्हेंबर सन १७८४ रोजीं याचा खून झाला. ‡रद्द. §योग्य.

त्याप्रमाणें करावयासी येईल. रवाना चंद्र ५ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji regrets the mistake of his Munshi, and explains to Nana how it was erroneous to think that he had appropriated to himself dignities higher than those conferred on the Peshwa. While the Peshwa had been appointed high Vazir and Mir Bakshi, he was only his deputy and nothing more. He requests Nana that the offices should be accepted by the Peshwa.*

No. 392 17th June 1785.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसि :—

दंडवत विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. प्रथम दिवसापासोन तहाचें बोलणें पाटिलबावांचे विद्यमानें होत गेलें, व इंग्रजांसीं तहनामा जाला, त्यांतही विद्यमान पाटिलबावांचें लागलें आहे. असें असतां, आतां असें बोलतात व टिपूसीं परभारा सलूख केला, तेव्हां सलूख कोठें राहिला म्हणतात. त्यास तह जाहला तो कायमच आहे. सरकारचीं कलमें, इंग्रजांपासोन करार करून घ्यावयाचीं तीं, पूर्वी लिहिण्यांत आलीं आहेत. त्याप्रमाणें कलकत्त्याहून आणवून पाठवून द्यावीं, म्हणोन राजश्री सदाशिव दिनकराचे पत्रीं लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, इंग्रजांकडून कलमे कांहीं उगवल्यांत आलीं, तीं पेशजींच लिहिलीं आहेत. बाकी होऊन येणें, त्याविशीं इंद्रसेन साहेब यांसीं सांगोन लिहविलें होतें व सदाशिव मल्हार यांणीं यांसी लिहिलें होतें. परंतु इष्टिनाची बदली जाहली; यामुळें कलमें होऊन न आलीं. हल्लीं नवा मेकफरसन कलकत्त्यास आला. त्याजकडे पत्राचा सिलसिला पुर्तेपणें चालू जाहला, म्हणजे येविशीं त्यांस लिहिलें जाईल. रवाना छ ९ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia informs Nana that he would urge upon the English the additional articles proposed by the Poona Darbar at an opportune moment in the future.*

No. 393 June 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १ रजबाचें आज्ञापत्र सादर जालें जे, इंग्रजांच्या जागिरीच्या सनदा दीड लक्षांच्या पाठविल्या, त्यास इष्टीन व इंद्रसेन कलकत्त्यास गेला. तेव्हां आपलीं कामें होतां दिसत नाहींत. तर सनदा तुम्हीं आपणाजवळच ठेवणें. देऊं नयेत म्हणून आज्ञा. ऐशास इष्टीन व इंद्रसेन कलकत्त्यास गेले. तेथून निघोन इंग्रजांचे विलायतेस गेले. कामाची उमेद आतां कोणापासून होण्याची राहिली? मग सनदा येथें मजपासीं राहून तरी अर्थ कोणता? आज्ञा आल्यास त्या सनदा सेवेसीं पाठऊन देईन. पुन्हा राजकारण सजलें तर सनदा नव्या करणें पडतील. जुन्या सनदा काय कामाच्या? येथें सनदा ठेविल्यास फार अंदेशा चित्तांत येतात. आज्ञेखेरीज पाठवितां येत नाहींत. यास्तव विनंती केली असे. आज्ञा आल्यास सदरहू सनदा दिडा लक्षाच्या सेवेसीं पाठऊन देईन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar asks Nana's permission whether he should send back the Sanads that were meant for Anderson, but were not delivered.*

No. 394 June 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—चंद्र १ रजबचें पत्र सादर जाहलें, त्यांत आज्ञा जे, इष्टिन जहाजांत बसोन विलायतेस गेला. नंतर पंधरा रोजांनीं विलायतेचीं पत्रें इष्टनाचे बहालीचीं* खुषकीच्या वाटेनें आलीं. जहाजावरून त्यास कधीं जाईल न कळे. वाट मुंबईवरून आहे म्हणतात. म्हणोन काशीचे इंग्रजांनीं खुषकीचे वाटेनें खबर मुंबईकरास लिहून पाठविली. कदाचित् तेथें इष्टिनाची गांठ पडल्यास वर्तमान कळवून माघारें फिरवावें, असें लिहिलें होतें. या वर्तमानाचें पत्र एक गृहस्थाचें काशीहून आलें, त्यांत लिहिलें होतें. ऐकिलें तें विनविलें. मग गोष्ट खरी आहे कीं उगाच लौकिक व्हावा याकरितां साधन असेल, कळत नाहीं. या मजकुराचें पत्रच पाहिलें. आणि असेंही ऐकतों कीं, कलकत्त्यांत सुतळीचा तोडाही ठेविला नाहीं. जाजमेंही विकून पैका करून नेला. व येथें

---

*बढतीचे.

वर्तमान आहे जे, टिपूनें अरकाट वगैरे इंग्रजांचा मुलूख कांहीं सोडला नाहीं. बंदवे कांहीं सोडले. मातबर मातबर बंदीच आहेत. फरासीस, वलंदेज, टिपू एक होऊन, इंग्रजांचे मदराजेस मोर्चे लाविले आहेत. मदराज गेलीच असेल अशी खबर ऐकतों म्हणून लिहिली. त्यास, इंग्रजांचे तगिरी बहालीचे* प्रकार दोनीही तुमचे लिहिण्यांत आलेच आहेत. त्यावरून खरें लटकें काय असेल तें ध्यानांत आणून पाहावें. टिपूनें इंग्रजांचा मुलूख सोडला व इंग्रजांनीं टिपूचा सोडला. मदराजेस मोर्चे लाविले नाहीं. टिपूशीं इंग्रजांनीं, सरकारचा करार असतां परभारें तह केला, मग बिघाड कशास करतील ? फरासीस, वलंदेज यांची हालचाल कोठें नाहीं. कांहीं इंग्रजांचीं बंदवे सोडलीं इतकें मात्र ऐकतों. परस्परें वकील टिपूचे इंग्रजांकडे व इंग्रजांचे टिपूकडे जातात, येतात. मग काय यांत असेल तें असो. याकरितां पेशजीं वारंवार लिहिण्यांत येत गेलें कीं, इंग्रजांनीं टिपूस आश्रा देऊं नये व मदत आंतून बाहेरून करूं नये व कुमक आणूं तेव्हां पाठवून द्यावी. याप्रमाणें इंग्रजांसीं पक्कें करून घेऊन लिहून पाठवावें म्हणोन लिहिलें होतें. त्याचें उत्तरच कलम पक्कें करून घेतल्याचें आलें नाहीं. तर तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून इंग्रजांचा सदरहू कलमाचा वगैरे पेशजीं लिहिल्याप्रमाणें दस्तैवज आणून पाठवून द्यावा. टिपू व इंग्रज एक नसले तर करारांत सरकाराशिवाय परभारें टिपूसीं सलुखा करूं नये असें असतां इंग्रज टिपूसीं सलुखा कां करतो ? याकरितांच इंग्रजांपासोन पक्कें करून घेऊन लिहून पाठवावें म्हणून लिहिलें होतें. असो. हल्लीं इंग्रजांसीं बोलून पेशजीं लिहिल्याप्रमाणें टिपूचें कलम पक्कें करून घेणें. हें पत्र राजश्री पाटिलबावा यांस दाखवून जाब सांगितला. बावांनीं चिटणिसाकडून जाब देविला. त्यांनीं यापैकीं मालुमात जमा धरून जाब लेहून दिला आहे, तो पाठविला असे. त्यावरून सर्वार्थ विदित होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter from Sadashiv Dinkar to Nana once more refers to the additional article of mutual assistance which the Poona Darbar was anxious to conclude with the English.*

No. 395 June 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—सरकारी ऐवज परगणा जैनाबाद व बाबती सरदेशमुखीबद्दल जकात तालुका देपूर व खेचीवाडा येथील महाल शहाडौरा वगैरे

*बडतर्फीचे व बहालीचे.

महालापासून आंबुजी इंगळे वगैरे यांनीं रुपया घेतला तो आदिकरून रुपया सरकारचा राजश्री पाटिलबावांकडून येणें. सबब सरकारी ऐवज व जाबसाल कोणे कोण कलमांचे करणें ती यादी मीं पाटिलबावांस लेहून दिली. तिची नक्कल सेवेसीं पाठविली. ज्या पत्रांत तीं पत्रें सेवेसीं पाठविलीं तेव्हां यादीही पाठविली. तिची रसीद अगर पुढें जाबसाल कसे करावे येविसीं आज्ञा सादर जाली नाहीं. हे तर सुधा जाबसाल एकही करीत नाहींत. कळलेंच आहे! पुढें करतील न करीत कांहींच म्हणवत नाहीं. माझा तगादा सुटला नाहीं. शरीर माझें गळालें खरेंच, तत्रापि येथें आहे तर मी जाबसाल विचारीन हें यांसही कळलें आहे. एक मजकडून जाबसालच सुटला. बादशाही खिलतसंबंधीं बावांनीं परभारा पत्र सेवेसीं पाठविलें. त्यांत मी हलका पडलों, आणि बावांचे मर्जीप्रमाणें पत्र आलें, तर सहजच माझें बोलणें सुबक* पडलें. मग माझें राहणेंच येथें व्यर्थ! पत्राचे उत्तरापावेतों प्रतीक्षाही आहे. खर्चाचेंच बंद केलें यावरून समजावें. असो. घडेल तें स्वामींचे प्रतापें घडेल. एके दिवशीं भाईचे घरास गेलों होतों, तेव्हां भाई म्हणत होते कीं, देपूरचे जकातीचा ऐवज सरदेशमुखी बाबतीचा सरकारांत देण्याविसीं बावांची आज्ञा जाली, तो कोणाजवळ द्यावा? मीं उत्तर केलें जे, सरसुभा तों राजश्री नरसिंगराव बल्लाळ मांडवगणे यांजकडे आहे. त्यांनीं ऐवजाचाही तगादा देपूर तालुक्याचे जमीदारांस केला. तो जिल्हा त्यांचा आहे. त्यांजकडे रुपया मागील सालाचा द्यावा, पुढें दरसाल देत जावा. त्यांणीं कबूल केलें. लेहून पाठवितों म्हणाले. परगणा जैनाबाद येथील रुपया मोरो सदाशिव कमाविसदार मक्तेकरी याचे मारफात किती आला हें कळत नाहीं. त्यानें महाल वैराण केला. रयत तेथील परागंदा जाली. कितेक येथें फिर्याद येणार आहेत असें ऐकिलें. बावांनीं बहुत वेळ सांगितलें कीं, मोरोपंताजवळून रुपया सरकारचा घ्यावा. मीं रदबदल केली आहे कीं, तो गृहस्थपणें रुपया देणार नाहीं. सरकारांतून स्वार पाठवून निकड करितील, तो बोभाट आपणास लिहूं लागल्यास आपण शद्ब लाविताल. याचें उत्तर बावांनीं साफ सांगितलें आहे, आम्हांस या जाबसालासीं गरज नाहीं. आम्ही आपला रुपया घेऊन सरकारचा रुपया दरसालचा सरकारांत देत जाणें, प्रथमपासोन व पुढें दरसाल ताकीद करीत असतों. सरकारचा रुपया बेमुरवत घ्यावा असें बावांचें म्हणणें सेवेसीं विनविलें आहे. नारो शिवदेवादेखतांच जालें आहे. सरकारांतून मजकूर लेहून आल्यावांचून येथें

*हलकें.

बोलतां येत नाहीं. पत्र दाखवा म्हणतात. यास्तव मजकूर कसा आहे तो आज्ञापिला पाहिजे. माझी मालुमात जमा धरून उत्तर आल्यास शद्ध लावितील. तर जमेस मालुमात न धरतां मजकूर लेहून यावा. स्वामींचा ऐवज बावांकडे येणें त्याची यादी, राजश्री आपाजीराव यांजकडील जनार्दन लक्ष्मण वैद्य कारकून येथें आहेत, त्यांजवळ होती. त्यांत बाळाराव यानें फडशा करून ऐवज बाकीस काढून दोन हप्ते केले, परंतु रुपया दिला नाहीं. तो जमेस धरून खालीं नांवें सरंजाम सुद्धां कारकुनीचा आकार धरून साल आकारलें आहे. त्याअन्वयें खमस समानीनचे सालपावेतों, तीन लक्ष एकोणहत्तर हजार रुपय जाले. बावांस समजाविलें. बावा उत्तर कोणतेही कलमाचें करीत नाहींत. न करोत ! पंचवीस हजार रुपयांचे गांवच्या सनदा बावांनीं रामजी पाटिलाचे विद्यमानें सेवेसीं पाठविल्या, त्याप्रमाणें अमल तर बसला असेल. वसूल त्या गांवापैकीं काय पावला तो मज देणें लागेल. यास्तव तो वसूल देहबदेहीवार* मर्जीस आल्यास यादी लेहून पाठवावयास आज्ञा जाली, तर जाबसालाचा प्रसंग बाज खाईल†. तर हेंही कलम बोलावयास कामास येईल. यांनीं देहबदेही जमा कोणत्या धरून पंचवीस हजारांचा आकार केला असेल तो करोत. आपले येथें वसूल जाला तो खरा. बाळाराव यानें पुण्यांत फडशा केला, दोन हप्ते केले, परंतु रुपया दिला नाहीं. ते एक लक्ष नऊ हजार व पुढें सालास नवे सरंजामाच्या कारकुन्या जमेस आल्या. तीही यादी खमस समानीनपावेतों, जमा आकारून पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. मी बोललों यांत कदाचित् बेरीज कमी जाली असली तर हे तोच दस्ताऐवज धरावयाचे. या ऐवजाकरितां बहुत वेळ बावांची माझी खटपट जाली आहे. असो. परिणामास जाईल तें खरें. फडणिसीचे दरखाचें कलम लिहून दिलें, त्याचा जाबसाल करूं लागले. सरकारचे महाल मेरट वगैरे तेथील फडणिशी लिहावी. तेथें अमल बसल्यास लिहितील. मीं उत्तर केलें, कोल्हापुरावर राजश्री आपाजीराव आले. तेथें मेरट वगैरे महाल सुटतील, तेथील फडणिशी म्हणून उमेदवार करून सरकारांतून पाठविले नाहींत. ते रिकामे कां फिरत होते ? रोजमरा आपण कशाचा देत आहेत ? मुतालकीचें फडणिशीचें काम सांगून पाठविलें. आपले सरंजामाचें लिहिणें फडणिशीचें आपले कारकून करितील. आपले सरंजामाखेरीज जो कारभार होईल, आतां बादशाही कारभार होतो यासुद्धां, सरकारचे फडणिसांनीं लिहीत जावें. जमा

*दरएकगांववार. †विरुद्ध होईल.

व खर्च बादशाही सलतनतेचा व फौजेचा जो होईल तें पडलें पान, जमा व खर्च सरकारचे फडणिसांनीं लिहीत जावें. हिशेब सरकारांत मुतालकीचा समजावणें ते पक्षीं सरकारचे फडणिसांनीं लिहावें. आपण त्यांचेच हातें काम घ्यावें. सरकारांत हिशेब समजावयाचा नाहीं, तो घरचे फडणिसानीं लिहिला तर लिहोत. अशी खटपट बोलण्याची जाली. होतें उत्तर सुमागचिें होत नाहीं. याचें कारण काय असेल तें समजत नाहीं. उचित दिसेल तें करितील. समक्ष विनंती केली होती, त्या व्यतिरिक्त कारण दिसत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. यांनीं मोहर पारसी करून, बादशाही कारभार चालवितात ते मोहरेची नकल पारसी पाठविली आहे. पाहावी. हे विज्ञापना. तेथें प्रगट न व्हावी, हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his discussion with Mahadji about the revenue administration of the Peshwa's Mahals in the north.*

No. 396 June 1785.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

विज्ञापना ऐसीजे :—आनंदीबाई निंबाळकर व राजश्री बाबाराव येथें येऊन फार दिवस जाले. मतलब त्यांचे कांहीं साध्य जाले नाहींत म्हणोन विमनस्कच होतीं व शरीरही बाईचें व्यथिस्थ जालें. फारच पीडा भोगिली. त्रास पावली. उगेच कष्ट सोसून येथें राहून फल नाहीं, देशास जावें, असा बाईनीं निश्चय केला. बादशाही खिलताचा मजकूर जो जाला तो रवानगीपावेतों समग्र त्यांस कळला. मजलाही बोलाऊन नेऊन येथें राहिली, काम कांहीं न जालें, खावंदाजवळ स्वरूप काय राहिलें ? येथें दृष्टिच ठिकाणीं राहिली नाहीं, तेथें काय बोलावयाचें राहिलें ? आतां उगेंच राहूनही सार्थक नाहीं. बादशाही खिलताचा क्रम यांजपासोन चुकला असोन रवानगी केली ही केवढी चूक आहे ? मागें वर्तमान ऐकून आम्ही कुतर्क तिकडे करीत होतों. बादशाही मजकुरावरून दुरारोप इकडेच होतात. असो. ज्याचें तो भोगील असा प्रस्तावा केला. बादशाही खिलताचे सोबतीनें जावेसें होतें. शरीर प्रतिकूल म्हणून राहिली. शरीरप्रकृति केवळ गळाठली. चार पैसेभार अन्न जाईना. निरंतर शय्येवर असावें, बसवेना, येथवर दशा जाली. परंतु कामकाज कांहीं जालें नाहीं या विक्षेपामुळें त्रासून कूच करून आठ कोसांवर प्रस्थानीं जाऊन राहिली. बाबाराव यांस यथें ठेविलें. बाई प्रस्थानीं गेली तेथेंही बावा पहावयास गेले. अवस्था कठिण पाहून माघारे आले. बाई परतून आली. व्यथिस्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana about the serious illness of Anandi Bai Nimbalkar aggravated by the disappointment she felt.*

No. 397 June 1785.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—परगणे जैनाबाद मोरो सदाशिव यांजकडे सात साला मख्त्यानें दिली होती. पहिलें साल एक लक्ष अट्ठावीस हजार, पुढें दरसाल पांच हजार रुपये चड असा करार. परंतु तो मामलेदार जलाल.* त्यानें महाल वैराण केला. बदसलुकी व सख्त. दरसाल परगणा वैराण होत चालला. त्याचें हें साल सन खमस. एक लक्ष बेचाळीस हजार चौथे सालाचे जाले. जमीदारासीं बदसलूक, रयेत अद्यापि कैदेंत. असेंच करून लावणी बुडते, असें समजून त्याची तगिरी करून कमाविस राजश्री जिवाजी बल्लाळ यांचे फौजेचे बक्षी त्याजकडे सांगितली. त्यानें मख्त्याप्रमाणें आणकाचे गळां बांधला. दरसाल एक लक्ष त्रेचाळीस दर साल पांच सालां ठरविले. यांनीं आपले एक लक्ष दोमध्यें महाल मजकूर वजा करून बाकी ऐवजाची निशा दर सालाप्रमाणें यंदाही घेतली. सरकारचा रुपया एकेताळीस हजार येणें. त्याचा वायदा वैशाख मासचा ठरावून दिला आहे. पांच हजार रुपये चढ. त्यांत कांहीं नफा नाहीं. सरकारचा चढ बुडाला. असो. एक लक्ष त्रेताळीसच ठरले. त्यापैकीं सरकारचे एकताळीस जाले. त्यांत महाल मजकूर वजा होऊन बाकीचा ऐवज सरकारचा आला पाहिजे. मोरो सदाशिवाकडील चौ सालांपैकीं काय वसूल आला असेल कळेना. मीं राजश्री पाटिलबावांस हटकिलें कीं, मोरो सदाशिव कमाविसदार आपला. सरकारचा रुपया त्यानें दिला काय, राहिला काय ? त्याजकडे रुपया राहिला असेल त्याची वसूलबाकी सरकारची येईल ती आपणास समजावीन. बाकीचा रुपया त्याजपासून आपण घ्यावा. सरकारचा द्यावा. आतां नवा कमाविसदार केला, याजकडील रुपयाची वाट काय ? कमाविसदारापासून घ्यावा म्हणाले. तेव्हां कमाविसदारास तगादा केला. दफ्तरचा बेहडाही पाहिला. त्यांतच वैशाख मासचा वायदा ठरावून दिला आहे. मग तो तर बेउजूरच† जाला तर, स्वामींनीं वैशाखमासीं रुपया कमाविसदारास निकड लाऊन सालचे सालास वसूल करून घेण्याविषयीं आज्ञा व्हावी. सरकारऐवजाकरितां यांस काळजी आहे ते कळलीच आहे. हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar writes about the revenue collection of Pargana Zainabad, which was shared between Mahadji and the Poona Darbar.*

*जलाल=निर्घृण, कडक. †बिनतक्रारी.

No. 398 June 1785.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—बादशाही खिलत येथून राजश्री आनंदराव नरसिंह यांचे पुत्राबरोबर रवाना जाला, तो उज्जनीस ठेवावा असा निश्चय ठराऊन राजश्री पाटिलबावा यांनीं श्रीमंतांस व स्वामींस पत्रें लेहून पाठविलीं. मजकूर काय लिहिला तो कळला नाहीं. इतकें ऐकिलें जे, राजश्री बाळाजी जनार्दन यांजकडे जामगांवास पत्रें पाठविलीं होतीं. त्यांस लिहिलें होतें जे, तुम्हीं पुण्यास जाऊन विनंती करणें. बादशाही खिलत पाठऊन देण्याविसीं आज्ञा जाली तर आम्हांकडे पत्रें पाठवाल, तीं खुलीं रवाना करणें. एक पत्र आनंदराव नरसी यांचे पुत्रास लेहून पाठवणें कीं, बादशाही खिलत घेऊन येणें. तो आपलें पत्र पाहील. आमचीं खुलीं पत्रें पाहून आमचीं खुलीं पत्रें इकडे रवाना करील. आणि बादशाही खिलत घेऊन तुम्हांकडे येईल असीं पत्रें गेलीं, तीं जामगांवास पावलीं. रामजी पाटील जामगांवींच होते. त्यांनीं बाळाजीपंतांनीं पत्रें पाहून नापसंत केलीं. दरबारीं द्यावयाची सलाह नाहीं म्हणून उभयतांनीं बसून मसोदे करून बावांकडे पाठविले. या मसोद्याप्रमाणें पत्रें पाठवावीं असें पत्र खासगत लेहून इकडे रवाना केलें. मसोदे येथें पावले. त्याप्रमाणें बावांनीं पत्रें लेहून रवाना केलीं म्हणोन ऐकिलें. खरें खोटें श्री जाणे. मजकूरही कळला नाहीं. बाळाजी जनार्दन पुण्यास आले. स्वामींचें दर्शन घेऊन बादशाही खिलताविसीं विनंती केली. उत्तर जालें जे, वकीलमुतलकीचें पद बादशाहापासून श्रीमंतांचे नांवें करून घ्यावें हें उचित. कारभार सारा पाटिलबावांनींच करावा. कनिष्ठ पद बक्षीगिरीचें श्रीमंतांचे नांवें. उंच पद पाटिलबावांनीं घ्यावें हें ईश्वराजवळ व चौघां दौलतवंतांत लौकिकांत चांगलें नाहीं. आतां वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें दसखत करून घेऊन त्याचा खिलत व बक्षीगिरीचा खिलत बरोबर पाठवला तर श्रीमंत यथापद्धत घेतील. वकीलमुतलकीखेरीज खिलत पाठवाल तर घेणार नाहीं. हीं बोलणीं राजश्री विसाजी आपाजी यांचे विद्यमानें बाळाजीपंतांसीं जालीं. असें वर्तमान पाटिलबावांनीं ऐकून विक्षेप मानला. बोलले जे, आमचे वकिलासीं समक्ष बोलणें नाहीं. परभारें विसाजी आपाजी यांचे मध्यस्तीनें जाबसाल होऊं लागल्यास, आम्हीं दरबारीं वकील कशास ठेवावा? पाठवावा? असें वर्तमान ऐकिलें. खरें खोटें म्हणवत नाहीं. दुसरेंही ऐकिलें जे, बाळाजी जनार्दन यांनीं बावांस

लेहून पाठविलें कीं, रामजी पाटील पुण्यास वकिलीस होते. ते बरे दाबानें कुरहानें* होते. कोणास मोजीत नवते. कारभाऱ्यांसीं यांसीं रदबदल दाट नेटानें करून, आपले कुरहानें कोणताही जाबसाल करून, कामेंकाजें करून घेत होते. दरबारचे वकिलीस रामजी पाटीलच योग्य आहेत. आपला दाब व नक्ष तेच राखूं जाणत. असें लिहिल्यावरून बावांचे ध्यानास आलें. भाईसीं बोलले जे, रामजी पाटलांस पाठवावें. भाईनीं संमत दिलें नाहीं. उत्तर दिलें जे, बाळाजीपंतांनीं काय समजोन लिहिलें असेल तें लिहोत, परंतु रामजी पाटलांस दरबारीं पाठवणें आपले उपयोगी पडणार नाहीं. असें तों जालें. परंतु एकांशेंकरून बावांचे मनांत आलें आहे. हेंही वर्तमान ऐकलेंच आहे. सत्य अगर मिथ्या म्हणवत नाहीं. ऐकून विनंती केली. मातबर खलबतांतल्याचेच जबानीं ऐकिलें असे. इतक्यावर घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that Mahadji was displeased at the reply of the Poona Darbar communicating its unwillingness to accept the imperial dignities.*

No. 399 **July 1785.**

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—वर्तमान ऐकिलें जे, राजश्री पाटिलबावांनीं स्वामींस पत्रें बादशाही खिलताकरितां पाठविलीं होतीं, तीं बाळाजी जनार्दन जामगांवकर यांनीं सेवेसीं प्रविष्ट केलीं. त्यांचें उत्तर जालें जे, याचा विचार करून जाब देऊं. तें वर्तमान मशारनिलेनीं येथें लेहून पाठविलें. त्यावर फिरून बावांचीं पत्रें त्याच मजकुराचीं स्वामींस आलीं. तात्पर्य कीं, बादशाही खिलत कबूल करावा. त्याचें उत्तर स्वामींपासून सादर जालें जे, वकीलमुतलकीचा स्वाल बावांनीं श्रीमंतांचे नावें लेहून दिला खरा, परंतु वर दसखत केलें त्यांत, वकीलमुतलकी बादशाहानें पाटिलबावांस दिली हें खर, श्रीमंतांकडूनही तुम्हांसच दिली, असें लिहिलें आहे तें समजाविसीचें लिहिणें. श्रीमंतांस वकीलमुतलकी दिलीच नाहीं. मग श्रीमंतांकडून मुतालकी कशाची ? तें शोभेचें लिहिणें. नायबमुनायबी पाटिलबावांचेच नांवें दसखत आहेत. त्यांतही लिहिलें आहे जे, अख्त्यारीनें बादशाही सलतनतेचा बंदोबस्त करावा. बक्षीगिरी बशर्त गुमास्तगिरी पाटिलबावा श्रीमंतांकडे मंजूर असे दसखत

*कुऱ्हा=बुद्धिसामर्थ्य.

आहेत. त्यावे अर्थ असे आहेत, जंवपावेतों पाटिलबावांची गुमास्तगिरी, तंवपावेतों बक्षीगिरी. सारांश, अल्त्यारी मुख्त्यारी वकीलमुतलकी व नायबमनायबी ती पाटिलबावांकडे. बक्षीगिरीचें पद, त्या दों पदांचे तावे, तेव्हां तीन्ही पदें बावांकडेच जालीं! ही गोष्ट निष्ठेची कीं निष्ठा सुटली? जें करावे तें श्रीमंतांचेच नांवें करावें आणि श्रीमंतांपासून सर्व आपण मागून घ्यावें. देतच आहेत. असें असतां परभारें आपलेच नांवें तीन्ही पदें करून घेतलीं, हें ठीक नाहीं केलें. असें आहे त्यापक्षीं बादशाही खिलत येथें कशास आणितां? नालकीपालकी काय म्हणोन घ्यावी? येथ आणूं नका. आणाल तर श्रीमंत घेणार नाहींत. याअन्वयें पत्रें मागाहून बाळाजीपंतांचीं आलीं. तीं पाहून बावा फार नाखूष जाले. बादशाहापासून स्वाल तीन दसखत करून घेतले. ते यांनींच त्यांच्या नकला करून सेवेसीं पाठविल्या. त्या स्वामींनीं पाहून मुनशीस बोलाऊन फर्दा वाचऊन त्यांचे अर्थ करून असें उत्तर केलें. तें एकीकड गाळून निमित्त राजश्री माधवराव गंगाधर यांजवर आणिलें आहे कीं, माधवराव यांनीं वर्तमान सदाशिवपंताजवळ सांगोन लेहविलें आहे जे, स्वेच्छेनें बादशाहापासून हीं पदें दसखत करऊन घेतलीं आहेत. माधवराव तर मजजवळ वर्तमान कांहींच सांगत (नाहीं) आणि त्याजवर नाहक निमित्त आणिलें. त्याचें कारण काय असेल तें न कळे. असेंही वर्तमान ऐकतों जे, पुढें पत्र स्वामींस लेहूं नयेत. श्रीमंत थोर होत तंव बादशाही खिलत उज्जनींत राहील. श्रीमंत थोर जाल्यावर खिलत रुबरू द्यावा. पुसतील त्याचें उत्तर करावें. ही उगीच गपसी वाटते. वर्तणुकेंत दिसेल तें प्रमाण. वर्तमान विदित व्हावें म्हणून विनंती केली. येथील वकील तेथें आहेत. त्यांस येविशीं निषेध जाल्यास विस्तारासच जाईल. यास्तव त्यांस निषेध अगर कळूंच नये. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*To the same purport as above. The objection of the Poona Darbar to accept the dignities was their being conditioned by Sindia's appointment as deputy to administer the King's affairs at Delhi. The Darbar wanted these dignities without these conditions.*

No. 400 4th June 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा यांनीं बोलाऊन नेऊन सांगितलें जे, आम्ही येथून पत्रें श्रीमंत राजश्री नाना यांस लेहून राजश्री बाळाजीपंत जाम-

गांवकर याजकडे पाठविलीं होतीं, तीं त्यानें पुण्यास जाऊन प्रविष्ट केलीं. तीं पाहून उत्तरें नानांनीं सांगितल्याप्रमाणें लेहून पाठविलीं. मजकूर तपसीलवार सांगतां विस्तार फार आहे. सारांश आमच्या लिहिण्याचा कीं, बादशाही खिलत पाठविला, उज्जनींत आहे. अद्यापि श्रीमंतांनीं घेतला नाहीं हें ठीक नाहीं. यास्तव खिलत पुण्यास आणऊन यथापद्धत घ्यावा. खिलत घेतला नाहीं ही शोहरत* ऐकून इकडे नाना प्रकारचे संकल्पविकल्प लोकांस जाले. त्यावरून अनेक तऱ्हा, अनेक चाली, इकडील लोकांनीं आरंभिल्या. यास्तव आम्हीं लिहिलें होतें. तो खिलत त्यांनीं घेतला असता, तर येथील लोकांच्या कल्पना विरून स्तब्ध आपले जागां राहते. परंतु खिलत घेणें त्यांच्या विचारास न आलें. उफराटे शद्व लाऊन उत्तरें केलीं कीं, वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें केली नाहीं, तर खिलत कशाचा घ्यावा? याची भवति न भवति कागदीं पत्रीं होत नाहीं. समक्षच याचीं उत्तरें प्रत्युत्तरें होतील. कागदीं पाल्हाळ वृथा आहे, असें जाणून आम्हीं लिहिणेंच बंद केलें. परंतु खिलत न घेतल्यामुळें येथें अनेक तऱ्हा जाल्या आहेत. दक्षणेस टिपूची मसलत उपस्थित जाली ती प्रगटच आहे. तितकें निमित्त पुढें उभें करून, दिल्लीहून शाह निजामुद्दीन बादशाहाजवळ कारभारी आहेत त्यांनीं आम्हांस लेहून पाठविलें आहे कीं, वर्तमान ऐकतों कीं, तुम्हांस श्रीमंतांचें बोलाऊं स्वार खिसमतगार आले आहेत. यावरून फिकीर फार जाली. पातशाहीतील कामाचे बंदोबस्त होणें राहिलेच आहेत. असें आम्हांस लेहून पाठविलें, व आंतून बादशाहाचीं त्यांचीं खलबतें काय होत असतील तीं काय कळत? परंतु वर्तमान उघड कळतें कीं, आंत अंतःपुरांत बादशाहानीं षुके लेहावे, ते लखनऊस शाहजाद्यांस, वजिरास, शाह निजामुद्दीन याच्या बंधूबरोबर रवाना करावे, जबानी निरोप सांगोन पाठवावे, हा क्रम चालला आहे. यासही बाजीकार† शाह निजामुद्दीनच आहेत. आंतील ग्रंथरचना त्याची ते जाणत. उघड इतकें दिसतें कीं, शाहजादा, वजीर, इंग्रज यांची तयारी फौजेची होत आहे. कारण कीं, रामगडास आमचे मोर्चे लागले आहेत. निकड बरीच आहे. रामगडकरानें वजीर इंग्रजांकडे अनुसंधान लाविलें कीं, शाहजादा तुम्हांसंनिध आहे, त्यास घेऊन येऊन चौ कोसांवर मुक्काम करावा. आमचे पोटाची तऱ्हा करून द्यावी. रामगडकिल्ला तुमचे स्वाधीन करतों. या संधानावर शाहजादा, वजीर, इंग्रज यांची तयारी आहे. दसरा जाल्यानंतर लखनऊहून कूच करून रामगडास यणार. हें ऐकून आम्हांस

*बातमी. †उत्पादक, कर्ता.

रामगडचे मोर्चे उठवणें सलाह नाहीं. फौज तेथें आहे त्याची कुमक करणें सलाह आहे. दसरा जाला म्हणजे आम्ही यमुनापार होऊन रामगडास जाणें प्राप्त आहे. जातच आहों. होणें तें श्रीमंतांचे प्रतापेंकरून होईल. आमची निष्ठा श्रीमंतांचे पायीं सदृढ असेल तर यश येईल. आम्ही इंग्रजांचे पाठीमागें हिंदुस्थानांत आलों. त्याच अन्वयें ग्वालेर गोहद ह्या मसलती प्राप्त जाल्या. श्रीमंतांचे प्रतापेंकरून दोन्ही जागे व मुलूख सुटला. नंतर आम्हीं परतून देशास जावें असा मनसबा होता. श्रीमंतांचीं पत्रें वारंवार येत गेलीं कीं, बादशाही मनसब्यांत कोणाचा शिरकाव होऊं न पावे. जाला तर खुष्कीच्या दौलता साऱ्या इंग्रजांचे हातास जातात. यास्तव इंग्रज बादशाहींत न शिरे तें करणें असी आज्ञा जाली. इकडे इष्टिन इंग्रज लखनऊस बादशाहींत शिरावयासच येऊन बसला आहे. हें पाहून आम्ही श्रीमंतांची आज्ञा वंदून बादशाही मनसब्यास आरंभ केला. साधन कसें केलें, शेवटास कसें नेलें, हे विस्तार मागें लिहून पाठविलेच आहेत. सिद्धीस तों श्रीमंतांचे प्रतापेंकरूनच गेले. परंतु मसलतीस रुपया व कष्ट याअन्वयें कर्जदारी व खराबींत किती आलों हें आम्हांसच पुसलें पाहिजे. जो जें कर्म करितो, त्यासच सुखदुःखाचा अनुभव त्यांतील असतो. दरबारीं हाच अनुभव आहे जे, वकील-मुतलकीचा अभिलाष धरून आम्हीं असें पाऊल टाकिलें. आमच्या बुद्धीनें तर आम्ही तीन्ही पदें श्रीमंतांचेच नांवें बादशाही दसखत करून घेतलीं. दसखताचे पद्धतींत व्यंग अर्थ मोजितात, तर तो समय काबू गांठावयाचा* तसाच होता. हर तऱ्हा करून पदें हाताखालीं घातलीं. पुढें निर्वेध करून औधा आपला कबजा जाल्यावर जसी सलाह ठरेल तसें करावयास येईल, असें समजून क्रम चालविला. समक्ष गांठ पडती तर मजकूर समक्ष बोलण्यांत येता. तर जालें तें यथास्थित औधें श्रीमंतांचे नांवें पदें जालीं असें प्रत्ययास येतें. उलटें वैगुण्य दिसलें यामुळें बादशाही खिलत घेतला नाहीं. यामुळें इतका फंद उभा राहिला. असो. प्राप्त आलें तें जालें! बादशाहांनीं इंग्रजांस कोठीस जागा दिल्लींत जुना किल्ला व आणखी एक जागा अशा दोन जागा कोठीस दिल्या. हा कारभार शाह-निजामुद्दीन यांनीं केला. सेवेसीं विनंती करावी म्हणोन सांगितल्यावरून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that Mahadji was complaining that the stubborn attitude of the Poona Darbar on the question of the imperial dignities was encouraging his enemies to resist his authority at Delhi.*

*संधि साधावयाचा.

No. 401 4th July 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—जामगांवचीं पत्रें राजश्री बाळाजीपंतांचीं आलीं, तीं राजश्री पाटिलबावांनीं श्रवण करून मजला बोलाऊन नेऊन बोलणें केलें. नंतर दुसरे दिवशीं भाईचे राहोटीं गेलों. भाईनीं तोच क्रम लाविला. बावांचेच बोलण्याप्रमाणें स्वाल दसखतापासून शेवटपावेतों बोलून म्हणों लागले कीं, खिलत श्रीमंतांनीं न घेतल्यास येथें स्थितपत कोणाची राहत नाहीं. मनसबा साधला हातचा जातो. यास्तव तुम्ही अनकूल होऊन खिलत श्रीमंत घेत आणि कारभारी यांचें बावांचें गोड चाले असें जालें पाहिजे. विक्षेपांत उभयपक्षीं चांगलें नाहीं. मीं उत्तर केलें कीं, थोरले मनसब्यास अंदेशे साधकबाधकाचे फार असावे. सारे राजकारणाचा शिरोभाग बादशाही मनसबा, तो तुम्हीं अवलंब केला. बादशाहीचा कारभार करितां, वकीलमुतलकीचा स्वाल बादशाहानीं दसखत करतांच इहलोकीं यशकीर्ति कशांत, लौकिकांत चांगलें कोणतें, परलोक कशानें साधतो, इतकेही अर्थ ते समयीं ध्यानांत आणून, तेच कालीं बादशाहास अर्ज करून, तो स्वाल फाडून, औघे अंदेशे बोलून, नवा स्वाल वकीलमुतलकीचा श्रीमंतांचेच नांवें दसखत करून घ्यावयाचा होता. तुम्ही तर म्हणतां बादशाह वाईट मानितील; आमचे समजांत तर जितकी वरिष्ठता श्रीमंतांची दाखवाल, वाढवाल, तितकी निष्ठा तुमची सदृढ दिसोन, त्यावरून इतबार व पत तुमची वाढून, बादशाह मानऊन, यशकीर्तिच तुमची करिते. लोकांत यशकीर्तीचाच विस्तार होता. येविशीं आळस कां केला असेल तो तुम्ही जाणा. मागें राजश्री विसाजीपंतांनीं जाबतेखानाचा अभिमान धरून बादशाहाची अबरू घेतली, त्या विक्षेपाचें स्मरण धरून बादशाहानीं असें दसखत केलें म्हणतां; तर तो संदेह बादशाहाचा दूर केला असता, तर बोलण्याचे साधनाचे पर्याय पुष्कळ होते. बादशाह मान्य करतेच करते. तुमचेच चित्तांत करणें नाहीं म्हणोन स्मरण येऊन विसर घेतला असेल. तुम्ही जाणा! दसखताचें निमित्त बादशाहावर घालितां. वकीलमुतलकीची मोहर बावांनीं आपले नांवाची केली. बादशाहानें स्वाल दसखतांत श्रीमंतांचे तर्फेनें वकीलमुतलकी तुम्हांकड सांगितली असें लिहिलें आहे. तेव्हां बावा वकीलमुतलकीचे मुतालीक जाले असतां वकीलमुतलकीची मोहर श्रीमंतांचे नांवची असावी, त्या मोहरेवर तुम्हीं कारभार चालवावा हा उत्तम पक्ष. मध्यम पक्ष, बावांनीं आपले नांवें मोहर केली, त्यांत अन्वय 'श्रीमंत वकीलमुतलक त्यांचे मुतालीक तुम्ही' असें

असावें. तें न करतां तुम्हीं आपलेच नांवें 'वकीलमुतलकी फिदवी शाहअलम बादशाह' असें लिहिलें. येणेंकरून तुम्ही बादशाही चाकर कीं श्रीमंतांचे चाकर? मनन करावें. दसखत करणें बादशाहाचा अखत्यार. मोहर तुम्हीं आपले इच्छेनें केली हें एक. दुसरीं सरकारचीं कामें तुम्हांस उलगडन देयाचींच नाहींत, मग मीं साधन तरी कोणे प्रकारें करावें? वर्तमान श्रीमंतांस कळतें याचें निमित्त तुम्ही मजवरच देतां. श्रीमंतांचीं पत्रें मजला किती वेळ आलीं कीं लोकांकडून कच्चीं वर्तमानें कळावीं, तुम्ही सरकारतर्फेनें तेथें असोन वर्तमान लिहीत नाहींत, असीं पत्रें शद्ब लाऊन येतात. तीं तुम्हांस दाखविलीं, दाखवितों. येथन वर्तमानें कोण कोण लिहितात तुम्हांस ठाऊक आहे. मी लिहीत नाहीं हें पत्रावरून कळतच आहे. आतां मी साधनविशीं विनंति पत्र लिहिलें त्याचें उत्तर सरकारचें येईल, त्यांत सरकारचीं कामें जाबसाल उगऊन देत नाहींत, पत्राचे जाब येत नाहींत, वकीलमुतलकीचा शिक्का असा केला, हीं दूषणें लिहून आलीं तर पत्रें तुम्हांस दाखवावीं लागतील. तुम्हीं बालट मजवरच घ्यावें. यास्तव मजला साधन होत नाहीं. राजश्री बापू भाव्ये व चिरंजीव पांडुरंग बापू यांची रवानगी श्रीमंत इकडे करतात. ते येत तावत्काल येथें राहणेंच प्राप्त. जवळ असल्यास पहिलेपासून तुम्ही सांगतां, मसोदे करून देतां, त्याप्रमाणें पत्रें लिहितों. तीं समक्ष वाचन पाहतां, मग लाखोटे करून रवाना करावयास सांगतां. आतांही तोच क्रम चालेल. असावें तंव विलग दाखऊं नये. खर्चास चौदा महिने देतच नाहींत. कर्ज खातों. पुढें मिळेल तंवर चालवीतच आहें. सांगाल, मसोदे करून घ्याल, तसीं पत्रें लेहून देईन. असीं बोलणीं चाललीं. तीं त्यांनीं बावांजवळ सांगितलीं असतील. उत्तरें यांचीं कसीं होतात, मार्गावर येऊन सरकारकामें तरी उलगडन देतात न देतात, होईल वर्तमान तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his talk with Rane Khan Bhai about the vexed question of the imperial dignities.*

No. 402 4th July 1785.

पैवस्ती छ १९ रमजान सनसीत
समानीन, आषाढ मास हा डांक.

छ सेवेसीं विनंती. सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २६ साबान मुक्काम श्रीमथुरा स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें

वर्तमान यथास्थित असे. विशेष :—छ १ जमादिलाखरचीं पत्रें सादर सेवकास जालीं, तीं राजश्री पाटिलबावांस दाखविलीं होतीं. त्यांचीं उत्तरें मागतां मागतां आतां बावांनीं चिटणिसांकडून देवविलीं, तीं घेऊन सेवेसीं पाठविलीं आहेत. मागील रवानग्यांचीं पत्रें, कमपेश एक वर्ष होत आलें, जाब गेले नाहीं. मी जाब मागतों. चिटणिसांनीं मजकडून याद करून मागितली. मीं पत्रावरून याद लेहून दिली. जाब मागितले. बावांनीं जाब लेहून द्या म्हणोन सांगितलें असतां देत नाहींत. आतां त्यांचे जाब काय द्यावे, काय लिहावे, म्हणतात. बावांदेखतच म्हणों लागले. त्यास संमत बावाही देऊं लागले. मोठा मजकूर इंग्रजांचा लेहावा, तर आमचें राजकारण इष्टिनाशीं होतें. तो विलायतेस गेला. नवा मेघफरसन आला, त्याशीं अद्यापि कागदाचा सिलसिला चालला नाहीं. औष्या बदल्या त्यानें केल्या. लखनऊंत पामर जुना होता, तो काढून मेघफरसनानें आपले तर्फेचा पाठविला. आतां इंद्रसेन आम्हांजवळ आहे. त्याजवर त्याची दृष्टी आहे. त्याची बदली करावी असें त्याचें मानस आहे. तें होऊन नवा इंग्रज येथें आल्यावर मग सिलसिला चालेल तर न कळे. तंवपावेतों बंद आहे. मग जाब काय लिहावे ? मीं जाब देतों त्याचें दुःख फार वाटतें. कारण मी मुलाजा* धरीत नाहीं. यथार्थ व आंगीं डसऊन बोलतों म्हणून विषम मानितात. यास्तव उगाच राहिलों. तगादा आहेच. याउपर काय उत्तर होईल तें विनंती करीन. छ १ व छ १० रजबचीं आज्ञापत्रें सादर जालीं, त्यांत टिपूची रीत नीट नाहीं; फौजा नरगुंदास गेल्या होत्या, त्याचे वकिलाचे म्हटल्यावर कृष्णा उतरून आणिल्या; त्याच्या फौजा गेल्या नाहींत; आणखी मदत त्याची आली; त्यांनीं रामगड घेऊन नरगुंदास फिरून मोर्चे दिले, आपणही खासा निघणार, यास्तव पुढें मसलत त्याजवर प्राप्तच आहे. इंग्रज काय करतात, पाटिलबावांस पुसणें. मी तें पत्रच बजिन्नस दाखऊन जाब मागितला. बोलले जे, इंग्रज आपणाकडे व टिपकडे दोहींकडे जाणार नाहींतसें दिसतें. किंचित् बोलणें इंद्रसेनाशीं जालें होतें. आतांही बोलून मग जाब देऊं असें सांगितलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana how Sindia was delaying replies to letters from Poona.*

*पर्वा.

No. 403 July 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावा बोलले जे, वकीलमुतलकी हें पद श्रीमंतांचेच नांवें असावें. आमचेंही मानस पहिलें होतें म्हणून स्वाल लेहून दिला. त्याजवर बादशाहानीं दसखत वसवस खाऊन* आमचें नांव दरम्यान आणून केलें. तें आमचें नांव काढून फक्त श्रीमंतांचेच नांवें करूं जातां होईल न होय संदेह आहे. कारण कीं, आम्ही आटोप एक एक पदाचा, शेवटील पद देखील इतरांकडे राहूं देऊं नये. अबदुल अहदखान याजकडे खासगी दिवाणगिरी होती ती काढिली. कारण कीं, त्यानें इंग्रजांसीं अनुसंधान लाऊन वकीलमुतलकीचें पद हिष्टिनास योजलें होतें. त्या आशेवर हिष्टीन लखनऊस आला होता. बादशाहाची मुलाजमत करावी म्हणजे वकीलमुतलकीचा स्वाल त्याचे नांवें दसखत करून द्यावा. येथवर करार ठरला होता. एक वजीर बगलेंत घेतल्यानें इतका कबजा केला. वकीलमुतलक जाला असता तर काय करिता न कळे. परंतु श्रीमंतांची आज्ञा सादर जाली कीं, बादशाहींत कोणाचा पाय शिरूं न पावे असें करणें. ती आज्ञा वंदून उद्योगास लागलों. अफराशाबखान आम्ही एक होऊन अबदुल अहदखान कैद केला. म्हणून इंग्रजांचें सूत्र तुटून हिष्टीन माघारा कलकत्त्यास केला. ही गोष्ट श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून घडली. पुढें बादशाहा कबेंत† आला, तेव्हां पदें साधावयास लागलों. त्यांत बादशाहानें वकीलमुतलकीचे स्वालांत दसखत करतां दगाबाजी केली. बुद्धिही त्याची शाश्वत नाहीं. आम्हांसीं वचनप्रमाण केलें. कारभार आमचे स्वाधीन केला असतां इंग्रजासीं अनुसंधान चाललेंच आहे. इतरही अनुसंधानें करीतच आहे. असा क्षणभंगुर आहे. आजच श्रीमंतांचे नांवें स्वाल वकीलमुतलकीचा दसखत आग्रहें करून मागतां, कोणी कोणीकडे सूत्रें लावील, काय फंद उभे करील. तितकेही फंद याचे तोडून नंतर प्रश्न करावा. आग्रहच असेल कीं, आजच स्वाल दसखत व्हावा, तर आम्ही प्रश्न करितों, त्यानें फिरून गोष्ट सांगितल्यास मग कसें करावें ? बादशाह आहे फंदी. शाहाजादा हिष्टिनानें माघारा पाठविला, त्यास लखनऊंत खोळंबविला आहे. हें बादशाहाचेंच कर्म असे. फंद करावयास लागला आहे. चालतें तसें चालऊन, क्रमेंकरून पुढें वकीलमुतलकीकरितां बजिदी करून, अडवून, स्वाल

*संशय येऊन, भिऊन. †पकडींत.

श्रीमंतांचेच नांवें दसखत करून घेण्यास संधि कोणती कीं, त्या जवळील बुद्धि-नाशक अगदींच दूर होतील. कोणी मसलत सांगावयास राहाणार नाहीं. ते कालीचें साधन हें आहे. आधींच बादशाहा बहकला फिरतो, चित्तास येईल तसीं खलबतें करितो. आम्हांसीं उणी गोष्ट रहस्याचे क्रमानें काय सुचवील ती बोलो, उघड बोलूं पावत नाहीं. परंतु आंतून चित्तांतील तरंग नानाविध राजकारणा-वर चालतात, हें उमजलें आहे. या समयीं आजच वकीलमुतलकीचा स्वाल श्रीमंतांचे नांवें दसखत करून मागितला तर बरें जालें, न दिला आणि फिरून गोष्ट सांगितली, त्यानें आम्हांस दबविलेंसें होईल. याच क्रमावर चालला तर हातचा जाईल. मग सारेंच नासेल. घाटच नवा होऊन बहकेल. वकीलमुत-लकीचा खिलत चारकुबा व नालकी ते दोन्ही जिन्नस खिलतांत आहेत, हा खिलत येथेंच ठेवितों, तर बादशाहास समजल्यास काय तर्क व अंदेश घेईल याजकरितां येथून रवानगी केली. बहुतांस कळलें उजनींत राहिला, पुढें गेला नाहीं. यावरूनही नाना तर्क कुतर्क होऊन भट्टी नासेल. सारीं राजकारणें श्रीमंतांचीं. मी हस्तक, आज्ञाधारक, विश्वासु आणि बळकट समजोन इकडील लोक वश्य होऊन श्रीमंतांचे कृपेंकरून येथवर साधन करीत आलों. खिलत पाठविला तो श्रीमंतांनीं यथापद्धत घेतला, तर बादशाहा आदिकरून सर्वांस समज-ल्यास आजपावेतों दाबानें काम चालत आहे त्याची वृद्धि होईल. खिलत श्रीमंतांनीं न घतल्यास वर्तमान लोपणार नाहीं. उज्जनींत राहिला, श्रीमंत घेत नाहींत स्पष्ट जालें, तर सहजच आमचा दुर्लौकिक होऊन, चालते क्रमांत दाबांत अंतर पडलें, तर पुनः संधान प्राप्त कितीही बळ घातलें तर हा घाट येणार नाहीं. बाद-शाहा आपले आवर्णांत आहे तो काबूंतच आहे. असें असतां असी बुद्धि होऊन मनस्वी खलबतें करितो. आपले काबूंतून गेल्यास फिरून हातीं चढणें कठिण. यास्तव खिलत श्रीमंतांनीं घ्यावा. मसलत आहे. असे तपसील फार बोलत गेले. वर्तमान विदित व्हावें म्हणोन विनंती केली. उत्तर याचें मीं काय करावें? खिलत घेत नाहींत असें पहिलें पत्र सेवकास आलें, तें बावांनीं पाहिलें. तेव्हांच कळलें असतां दूरारोप मजवर करून, परभारीं पत्रें सेवेसीं लिहून जामगांवास बाळाजीपंतांकडे पाठऊन त्याजकडून जाबसाल करविला. त्याचेंही उत्तर खिलत घेत नाहींत असेंच आलें. विक्षेप जाला असतां तोच नाद विस्तारास नेऊन खिन्न करणें सलाह न जाणून ऐकूनच घेतलें. नीतिबुद्धि सुचली तितकी संक्षेपें बोललों. पुढें साधन खिलत घेण्याविशीं करण्यास मीं अनुकूल असावें असें बोलणें

आढळलें. मीं उत्तर एकही केलें नाहीं. याउपर होईल ती विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is Sadashiv Dinkar's dispatch to Nana. He reports how Mahadji once more pressed the acceptance of the marks of imperial dignities on the Poona Darbar. He argued that the king in his present mood would demur to issuing the titles exclusively in the Peshwa's name; but that he (Mahadji) would secure fresh letters patent at some future favourable moment.*

No. 404 19th July 1785

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—वकीलमुतल्की व नायबमुनायबी व बक्षीगिरी ऐसे तिही पदांचे स्वाल श्रीमंतांचे नांवें बादशाहापासून दसखत करून घेऊन मग खिलत रवाना व्हावे तर प्रशस्तपणें श्रीमंत घेतील. कारभार सारा राजश्री पाटिलबावांनींच करावा. स्वाल दसखत जाल्याखेरीज खिलत पाठविल्यास श्रीमंत घेणार नाहींत. पाटिलबावांस विषाद न वाटे अशा तऱ्हेनें तुवां बोलावें उत्तर होईल तें लिहिणें. म्हणोन छ १ रजब व छ १० चे आज्ञापत्रीं व अगोदरचीं व मागाहून पत्रें सादर आहेत त्यांत आज्ञा सादर जाली व होते. त्यास, या मजकुराचा ओठ हालतांच विषाद येतो, तेथें सगळा मजकूर बोलण्याची तऱ्हा कोणती करावी? आज्ञेप्रमाणें मजकूर बोलण्यांत आणिलाच पाहिजे. विषाद आला तर उपाय काय? पहिलीं पत्रें सादर जालीं, तीं मी दाखविलींच नवतीं. परंतु यांनींच शिरपाव खिलत रवाना करण्याची जलदी मांडिली, तेव्हां बोलणें प्राप्त जालें. बोललों. पत्रें दाखविलीं. त्यावरून विक्षेप फारच जाला. उत्तरें प्रत्युत्तरें जालीं, तीं दर रवानगीस विनवीतच आहें. दूरारोप सारा मजवरच केला कीं हाच दरम्यान खूळ करतो. हें चित्तांत बावांनीं आणून, परभारीं पत्रें स्वामींस लेहून जामगांवकर बाळाजीपंताकडे रवाना केलीं. मजला कळूं दिलें नाहीं. त्याचीं उत्तरें स्वामींचीं रुक्ष जालीं कीं, वकीलमुतलकी श्रीमंतांचे नांवें सवाल दसखत करून घ्यावा, मग खिलत पाठविला तर श्रीमंत घेतील. नाहीं तर घेणार नाहींत. असें पत्र बाळाजीपंताचें जामगांवींहून आल्यावर, सेवकास

बोलाऊन त्याचें पत्र दाखविलें आणि बोलले कीं, तुम्ही आपली वैष्णवी मायेचा* आवर करणें. आम्हीं जें करणें तें श्रीमंतांनिमित्तच करितों. आमची बिशाद श्रीमंतांची खिजमतगारी, तेथून चढत चढत या स्थितीस श्रीमंतांचे कृपेंकरून आलों कीं बादशाहाची स्थापना आम्हीं केली. ज्या कृपेनें बादशाहाचें स्थापन केलें, त्या कृपेचा अव्हेर करून, बादशाही पदाची आस्था धरून, अभिलाष-बुद्धीनें पदें आम्ही आपले नांवें करून घेऊं असें कसें घडेल? बादशाहानीं पूर्वील जाबतेखानाचे अभिमान कालाचें स्मरण धरून, आमचे नांवें स्वाल वकील-मुतलकीचा दसखत केला. त्याचीं साधकें, बाधकें, निष्ठा व अभिलाष कोणा कारणें धरावा? पोटींपाठीं कांहीं आहे कीं काय? आहे तें सर्व श्रीमंतांचें भोक्तृत्व, तितकें आमचें उर्वरित. शेष दौलत, सरदारी, पैका सर्व श्रीमंतांचें. आणखी जाणतच नाहीं. प्रस्तुतच आग्रहें श्रीमंतांचे नांवें वकीलमुतलकीचा स्वाल दसखतांविशींचा करूं जातां, येथें बादशाही डौलांत विलगें बहुत आहेत. तीं तपशीलवार सांगोन प्रस्तुत टाळाच दिला. विलगें आहेत तीं औघीं परिमार्जनांत आणून मग स्वाल श्रीमंतांचे नांवें दसखत करून मागावा. तुम्ही आजच उपक्रम करा म्हणाल तर करूं. परंतु व्यंग पडेल. केला मनसबा नासेल. आळा तुटल्यावर मग आळ्यांत येणें कठिण. बादशाही खिलत येथें राहून वर्तमान बादशाहास कळेल तें वाईट, म्हणोन खिलताची रवानगी केली. तो उजनींत राहिल्यासही वर्तमान बादशाहास कळेलच. तेंही प्रतिकूलच. आजपावेतों श्रम करून घाट रचून आळा केला, तो सर्व नासून पुढें जडच आहे. श्रीमंतांचे दैवेंकरून घाट व आळा जाला. एक वेळ बिघडला मग संचास येणें कठिण. यास्तव खिलत उजनी-हून पुण्यास जाऊन श्रीमंतांनीं घ्यावा. येणेंकरून घाट व आळा बहाल राहून दाबाखालीं काम चालेल. तोडावयाचे उद्योगांत आहे. त्याप्रमाणें सारीं खुळें तुटून, सारा आपला कबजा जाल्यावर, मग स्वाल दसखताचा उद्योग करावयास येईल. हीं बोलणीं विस्तारपूर्वक बावा बोलले. तें लिहितां दोन तीन बंद पाहिजेत. विस्तार फार होईल. छ २६ साबानचे† रवानगींत कांहीं विस्तार विनविलाच आहे. यास्तव आतां गोषवाऱ्यांत आणिलें. याचीं उत्तरेंही मीं तशीं तपसीलवार केलीं. तोही ग्रंथ तितकाच होईल आणि प्रशंसा दिसेल. ही गोष्ट खाविंदापुढें अयोग्य जाणून विनविलें नाहीं. दुसरे दिवशीं भाईचे घरास जाऊन बोलणें वकील-मुतलकीचे मोहरेविशीं जालें. एकूण दोहों दिवशींचें बोलणें छ २६ साबानचे

*सगळीं सूत्रें हालविणारी विष्णूची माया. †१३ जून १७८५.

रवानगींत विनविलें आहे. त्यांत मोहरेविशीं भाईसीं बोललों त्याचा तपसील कांहींसा विनविला आहे. त्या पत्रावरून मजकूर अवलोकनांत येईल. सारांश, बावांचें मानस कीं, बादशाही खिलत उजनीहून पुण्यास जाऊन श्रीमंतांनीं घ्यावा, तरीच आमचें वजन मंडळासुद्धां बादशाहावर राहील. तर आजपावेतों केलें, श्रमेंकरून घाट रचला, हा सिद्धीस जाईल. खिलत न घेतां आमचें वजन उडालें, म्हणिजे आजपावेतों केले श्रम व पैका वेंचला तो व्यर्थ होऊन, मसलत नवी प्राप्त होते. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji persuades the Poona Darbar to accept the imperia honours.*

No. 405 19th July 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—कामाकाजाचे जाबसाल याचे कलमबंदीची यादी लेहून दिली. बादशाही खिलताबरोबर मजला जा म्हणत असतां मी गेलों नाहीं. उलटचा सरकारकामाचे जाबसाल आट घातली, यामुळें राजश्री पाटिलबावांची मर्जी मजशीं फार नाखूष जाली. बादशाही खिलत उजनींत पडला आहे तो पुण्यास जावा आणि श्रीमंतांनीं व स्वामींनीं यथापद्धत घ्यावा, तें घडत नाहीं. वकील-मुतलकी श्रीमंतांचे नांवें व्हावी तर खिलत घ्यावें, या अर्थास्तव खिलत घेण्याचें श्रीमंतांस व स्वामींस मान्य होत नाहीं. यानीं येविसींचें निमित्त मजवरच आणिलें कीं, यानेंच लेहून हा फंद उभा केला. नारो शिवदेव येथून जाऊन पंचवीस महिने भाद्रपदअखेर होतील. त्यांत सात महिने रोजमरा मजला दिला. अठरा महिने एक रुपया देत नाहीं. कमाविसदारांपासोन दोन दोन सालें रसदा निशा करून घेतल्या. तिसरे सालची वरात घे म्हणतात. येथें पांच पांच शेरांची महागाई वर्षोवर्ष सोसली. यंदाचे फाल्गुनापासून वीस शेरांची धारण या व्रजभूमींत होती. पर्जन्याचे अतिवृष्टीमुळें फिरून महाग होत चाललें. पंधरा चौदा शेर मट जाले. हे महागाईचे संमंध. कर्ज घेतां थकलों. मागले कर्जदार चैन पाऊं देत नाहींत. नवें कर्ज पाहणें पडतें. मिळत नाहीं. परम संकट ! तेथें तिसरे सालची वरात घेऊन, वसूल कधीं होतो तंवपावेतों त्या कमाविसदारावर कमावीस बहाल कसी राहते ? पालखीचे सरंजामाची वरात परगणे शेलाणीचे कमाविसदारावर

तीनशें रुपयांची जेष्ठमासचे वायद्याची जन्मांत दिली. नारो शिवदेवाचे वकिली-पासून बारा वर्षांत इतकी वरात पालखीचे सरंजामाची दिली. जेष्ठमास गेला. शेलाणी परगणा भुसकुटे यांकडे होता, त्यांजवर वरात दिली होती. तो महाल त्यांजपासून काढून दुसरा महालावर कमाविसदार पाठविला. तीनशां रुपयांस ठिकाण नाहीं. मग रोजमऱ्याची वरात तीन वर्षांची कोणास मागावी? ही दशा रोजमरेयाची. कर्जाची अवस्था कोठवर विनऊं? कामाकाजाचे जाबसाल मनांत करावयाचेच नाहींत. न करतां उघड दिसतें म्हणून महिन्या दों महिन्या एक रोज प्रहर चार घटिका एखादा प्रसंग करावा. त्यांत मोघम मोघम, मळ-मळीत, ज्यांत कांहीं अर्थही स्पष्ट होऊं नये असें बोलावें. त्यांत कांहीं कामाची जात दिसावी, तर भवति न भवति करावी. शुष्क भाषण पोकळ ऐकून ुक बेदमाल (?) गोष्टी बोलून आपले घरास यावें. ही चाल येथील पडली आहे. कामास ठिकाण नाहीं आणि पोटाची विपत्ति कोठवर सोसावी? डोळ्यावर पापण्या लाऊन उगेंच बसावें, तर चार माणसें तरी जवळ कसीं राहतील? चढले दिवसाचे तलबेकरतां अबरू घेऊन उठोन जातील. तेव्हां सहजच दुर्दशा जाली. ही गति येथें राहणारांची आहे. मजवर निमित्तें कल्पिलीं यामुळें मजवर रुष्ट असतील, तर मी गेल्यास आणखी गृहस्थ येईल त्याशीं तरी सरळ चालतील तर न कळे! राजश्री बापू भाव्ये यांची रवानगी लौकर करितों. ते तेथें पावले म्हणिजे तूं निघोन येणें पूर्वी आज्ञा सादर जाली होती. त्याची प्रतीक्षा फार केली व करितों. येत नाहींत. मजवर रुष्ट. त्याशीं तरी सुष्ट होऊन चालतील. आज्ञेखेरीज तर उठून जावत नाहीं. रोजमऱ्याची व पोटाची गति ऐसी जाली. तेव्हां पुढें गति कोणती करावी? येथें राहणें संकट. निघोन येईन म्हणतां येथील देण्याची वारावार करावी, पुण्यास पोंचण्यापावेतों वाटखर्चाची बेगमी व शिबंदीचा फडशा करावा, तेव्हां येथून निघावयाचा भरवसा. समागम पाहून निघावें तर येथील देण्याची व शिबंदीचा पेंच येथें राहण्यास जाण्यास दोहोंसही आहे. हें संकट पहिलें नारो शिवदेव यांस होतें. आतां कोणास म्हणावें? तूर्त मी पेंचांत येथें आहें. कच्चें वर्तमान लिहितां बेमर्जी होईल हें कठिण. विनंती न करितांही संकट. वर्तमान कळविलें नाहीं असी आज्ञा होईल, यास्तव विनंती करणें प्राप्त जालें. नारो शिवदेव शरीरेंकरून विकल. कामकाजाची व खर्चाची हीच दशा जाली. त्रासून लाचार होऊन गेले. आतां मी संकटांत पडलों आहें. आज्ञा सादर होईल तसी वर्तणूक करीन. आतां तर मर्जी फारच कलली आहे. मग वरात

देणें हे वर्णही निघत नाहींत. बोलणें देखील सुधें नाहीं. रंगच फिरला. तें वर्तमान निराळें विनंतिपत्रीं विनविलें आहे. लाचारीमुळें जालें वर्तमान विनविलें. ही अमर्यादा घडोन आली खरी. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar requests Nana to recall him as his presence at Sindia's camp was no longer useful owing to the severe misunderstanding that had arisen between him and Sindia on the question of the imperial dignities.*

No. 406 July 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—बापूजी मल्हार नि।। आंबूजी इंगळे यांजबरोबर फौज व पलटणें मिळून दोन हजार जमीयत बावांची व दोन हजार जमीयत अफराशाबखानाकडील इतक्यानसीं मथुरेवरून अंतरवेदींत बिदा केले. तिकडे सीख दाहेक हजार जमा होऊन आले होते. बापूजी मल्हार यांची रवानगी जाली. हें वर्तमान ऐकून सीख श्रीभागीरथीपार होऊन समल मुरादाबाद हा प्रांत पहिले रोहिल्याकडे होता, तो सुज्याउद्दौलानें रोहिले मारून प्रांत आपण घेतला, तेथें अमल वजीर व इंग्रजांचा आहे, जमीयत वजीर इंग्रजांची तेथें थोडकी होती. सिखांनीं जाऊन समल* मुरादाबाद दोन्ही शहरेंहि मातबर मारिलीं. चंदोसी म्हणून एक पेठ फार मातबर होती. दोन हजार साहुकारांचीं दुकानें, तेथें किराण्याचीं मातबर दुकानें फार, आबाद पेठ होती, ती लुटून फस्त केली. तेथें पन्नास लक्षांचा साखर निघाली, आणखी किराणा वगैरे जिन्नस करोडों रुपयांचा माल, कापड व रुपया लुटिला. आणखी दोन शहरें मातबर, एकून पांच शहरें लुटून फस्त केलीं. महाल गमाल सांपडला तो घेऊन गंगातीरास आले. इकडन फौज यमुनापार होऊन बापूजी मल्हार अंतरवेदींत जाऊन, खुर्ज्या वगैरे महाल अफराशाबखानाकडील येथें अमल बसविला. ऐकून सीख गंगापारच आहेत. आपले देशास जाणार अशीहि वदंता बापूजी मल्हार यांनीं लिहिली होती. बापजी मल्हार यांजकडे सुभा सांगितला आहे. त्यांत बादशाही खासगी राणवासाकडील जागिरीचे महाल व मेरठ सरकारचे महाल वगैरे व अफराशाबखानाकडील

*संबळ, दिल्लीच्या पूर्वेस १०० मैल.

फौजेचे महाल असे सांगितले आहेत. खुर्ज्यापासून ठाणीं बसवीत चालले आहेत. रुपयाची जात कोठें दिसत नाहीं. आधींच मुसलमानांचा अमल सख्त, रयत परवरी* नाहीं म्हणून उजाड. वरती तीन चार वर्षें वृष्टि नाहीं. सधन रयत फार करून मेलीच. वांचली ती देशांतरास गेली. जुजबी मुलकांत राहिली. त्यांनीं कांहीं कीर्दी केली. यंदा किंचित् पाऊसही जाला, पीक आलें. तों माहालीं आमील होतेच. त्यांनीं हालीमाजीचा प्रकार पाहून रयतेपासून रुपया पिळून रगडून घतला असें बापूजी मल्हार लिहितो. पुर्ता अमल कायम होऊन चौकसी जाल्यावर, कोठें जागा राहिली असल्यास हातीं लागेल तर न कळे. तूर्त पैसा प्राप्त नाहीं. मुलखाची आवस्था पाहतां ढवळपुरानजीक चमल उतरले. तेथून रूपबसास† आले. अफराशाबची भेटी जाली. सवेंच गेला. नंतर तेथून कूच करून अमदानीवर गेले. त्याचें पारपत्य केलें. नंतर बादशाहा आगरेयाहून आले. त्यांच्या भेटी होऊन समागमेंच कूच करून किल्ले बैर पावेतों जाऊन जैपुरावर शह दिल्हा. त्याचे भाऊबंद यांच्या गढचा मुक्कामाजवळ होत्या. तोफा काढून घेतल्या. शह पडला. तेव्हां जैपूरकरांनीं मामलतीची भानगड गोसावी याचे विद्यमानें लाविली. एक मासपर्यंत प्रांत खराब जाल्यावर एकवीस लक्ष रुपये बादशाहाची नजर करार जाली. त्यांत दोन लक्ष रुपये नख्त व दोन लक्षांचें जवाहीर. बाकी रुपया राहिला त्याचे भरण्यास मुलूख दहा लक्षांचे महाल दिल्हे व सहा सात लक्ष रुपये आपले पटाइतावर‡ नेमून दिल्हे. त्याचे वसुलास शिबंदी पडेल ती पटाइतावर साधून घ्यावी असा करार होऊन फडशा जाला. येतांना दोन लक्ष रुपये मात्र नख्त आले. दोंचें जवाहीर. सत्रा लक्षांचा वसूल होणें. अफराशाबखान याजकडील एक मुसलमान जैपूरप्रांतीं रुपया वसूल करावयास बमय फौज पाठविला आहे. त्याजबरोबर हजार पांचशें बावांचीही फौज आहे. पैका पदरीं पडेल तेव्हां खरा. जैपूरचा फडशा करून कूच केलें. एक कूच, एक मुक्काम, असे करीत डिगेस आले. सारांश, चमेलपासून येथवर देश पाहिला. कोठें लावणी दृष्टीस पडलीच नाहीं. जोंधळा बाजरी कदाचित् दाहा पांचां कोसीं एक दोन शेत. बाकी पडच जमीन पाहिली. डिगेस येतांना मार्गांत एक गांव मातबर कसबा पाहिला. तेथें गहूं, विहिरीचें पाणी पाजलेला शें दोनशें बिघे लाविला होता, तो फौजेनें उडविला. आतां डिगेचे आसपास शुद्ध वैराणी आहे.

*पाळलेली. †About 20 miles south of Bharatpur. ‡दिवाण.

डिगेची आवस्था पाहतां आंत जाटाची हावेली मोठी आहे. त्यांत दोन तळीं व इमारत बाग मिळोन करोड रुपयांवर दोन पावेतों लागत लागली असेल, किंबहुना जास्त. इतकें पाहावयाजोगें आहे. वरकड शहर ज्याचे रखवाली चौकीबंदीस दहा हजार माणूस पाहिजे, येवढे शहरांत एक जवाहीरगंज म्हणून आहे, त्यांत तीनसें माणूस, घरें, दुकानें मिळून वस्ती आहे. बाकी शहर उजाड पडलें आहे. वस्ती कसी होईल ? रयेत कोठून येईल पहावें. डिगेहून सात आठ कोस पश्चमेस कामापाहाडी मेवात्यांचा मुलूख. ते चोर, जवाहीरमल जाटाचे सत्तेंत, डिगेंत दरवडे घालीत होते. जाट हमेष स्वाऱ्या करून मेवाती धरून आणून पेवांत घालून जाळीत होता. तत्रापि उणे जाले नाहींत. हमेष डाके घालीत होते. वाटा लुटीतच होते. आतांहि त्यांचें कर्म चालतच आहे. लष्करची लूटपाट करितात. शासन होत नाहीं. डीग कसी वसेल श्री जाणें. खुर्ज्या वगैरे ठाणीं बापू मल्हारानें बसविलीं. शें दोनशें स्वार मेरठेंत ठाणें बसवावयास पाठविले होते. त्यास सीख आडवे होऊन बुणगे लुटले. स्वार पळून बापूजी मल्हाराजवळ आले अशी खबर आली. पुढें वर्तमान येईल ती विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports how the new provinces that Mahadji was administering for the Emperor were all desolate and showed little sign of life or vegetation.*

No. 407 July 1785.

(ले. सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—येथील दिनचर्या आढळली ती बितपसील :—

बादशाहाचा आग्रह होता छावणीस आम्ही दिल्लीस जातों. तुम्ही मदारमुख्तार आहां. चित्तास येईल तेथें छावणी करून राहून बादशाही कारभार चालवणें. बाददिवाली* बलावाल तेथें येऊं. असा जाबसाल पडला होता. शेवीं निश्चय मथुरेवरच छावणीचा ठरला. बादशाह बावांपासून लांब राहिले होते, ते जवळ येऊन राहिले.

बादशाहाकडील शाह निजामुद्दीन फकीर तिकडील निरोप बावांकडे आणीत असतो. त्याजवर बादशाहाचा विश्वास नाहीं. रुष्ट असोन निरोपाचा क्रम

---

*दिवाळीनंतर.

तर चालतच आहे. बावांकडून आनंदराव नरसिंह बादशाहाजवळ असतो. तोही निरोप आणीत असतो. त्याजवरही बादशाह इतराज आहेत. तर निरोपाचा क्रम चालतच आहे. शाह निजामुद्दीन याची व आनंदराव नरसीची स्पर्धा आहे. कलह कजिया दोघांचा शेरदरबार होत असतो. बावांचे समक्षही वाद प्रतिवाद शिवीगाळी होते आणि क्रमही चालत आहे !

आनंदीबाई निंबाळकर येथें आली होती. नवाबांनीं रदबदलीस पाठविली होती. बंधूकडून नवाबाचे मतलब साधून देऊन यश मिळवावें म्हणून बाई आली, परंतु कांहीं साध्य जालें नाहीं, आणि शरीरेंकरून फार विकल जाली म्हणून त्रासून जात होती. शरीर स्वाधीन नाहीं म्हणून बावांनीं परतून आणली. आली. शेवटीं शरीर दिवसाचा दिवस विकल होत चाललें. मतलब तर कांहीं होतच नाहींत. फिरून त्रासून आग्रहेंकरून आनंदीबाईनें कूच करून दोन तीन कोस औरंगाबादेस जाऊन मुक्काम केला. पैका बावांपासोन लाखो मिळावे हेत होता. परंतु मिळाला नाहीं. येथील बाजारचें देणें सांप्रतच जालें होतें. त्याचे हवाले वीसेक हजार रुपयांचे घेतले. त्यासीं करार सावकारांसीं पंधरा महिन्यांचे मुदतीनें वराता महालावर देतों असा केला. दहा हजार रुपये नख्त वाटखर्चास घरपावेतों द्यावयास कबूल केले, ते मिळत नाहींत. त्याजबद्दल पंधरा रोज मुक्काम आहे. बाई जाईल. बाईबरोबर नवाबास बादशाहाकडून वस्त्रें, हत्ती-घोडा, ढालतलवार दिली म्हणोन ऐकतों. बाबाराव येथें आहेत. कारण कोणतें तें समजलें नाहीं. समजल्यावर विनंती करीन.

खेचीराजा राघोगडवाला यासीं गुगूर छाबड्याकरितां कजिया लाविला आहे. पंचवीस हजारपावेतों फौज पायदळ मिळोन त्याजवर रवाना जालें. तोफाही गेल्या आहेत. देवजी गौळी कांहीं देशीहून फौज घेऊन आले. तेही खेचीच्या मोहिमेवर आहेत. जागांजागां मोर्चे खेचीवाड्यांत आहेत. लढाया होतात यास्तव खेची राघोगडवाल्यानें आपला भाऊ बावांकडे रदबदलीस पाठविला. समागमें दोनेकशें भीड* होती. तो आगऱ्याअलीकडे आला. त्याजवर फौज पाठऊन लुटून आणून बेड्या घालून कैद केला आहे.

फाळके वगैरे पथकें यमुनेपार पंधरा रोज उतरले आहेत. रायाजी पाटिलानींही प्रस्थान केलें. फौजेची नेमणूक दहा हजारांची ऐकतों. लोकांनीं पैक्याची

*जमाव.

आड घातली आहे याकरितां खोळंबा आहे. तरतूद जाली म्हणजे रायाजी पाटिलही पार उतरतील. लोक कांहीं कांहीं पार उतरतात. पैका मिळाल्यावर पारून कूच होईल, नाहीं तर होत नाहीं. सबब रायाजी पाटील खोळंबले आहेत.

आगऱ्याचे मुक्कामीं यांनीं बादशाहास खर्चास खासगत व शागिर्दपेशास दिलें होतें, त्यास कसर घेतली होती. तो बोभाट बावांपावेतों जाला. बादशाह रुसले. कूच करून जात होते. खंडेराव हरि यांनीं समजाऊन ठेविले खरे, परंतु कसरेचा रुपया बादशाहांनीं सोडिला नाहीं. माघारा घेतला. यांनीं दिला. हें वर्तमान बावांनीं ही सांगितलें.

रामगडास पहिले मीर्जा रहीमबेग याचे बंधू अनवरबेग स्वार व पायदळ मिळोन दोनेक हजार गेले होते. ते रामगडापासून दहा कोस ऐलीकडे भयभीत होते. आतां राजश्री रायाजी पाटील यांची व धाररराव शिंदे यांची रवानगी केली. देशोहून नवीं पथकें फाळके वगैरे हजारेक स्वार आले. ते तैनात केले. यमुनेपार उतरून दिले. त्यांचा मुक्काम पार आहे. कांहीं इकडील मोगल पठाण नवे ठेविले. तेही पार उतरून दिले. आणखी पथकें नेमतात. एकूण पांच सहा हजार फौज जाईल. तूर्त येथें त्यांस खर्चास रुपया मिळत नाहीं. तरतूद होऊन रुपया पदरीं पडेल तेव्हां जातील. तिकडेही रामगडचे आसपास पांच पांच कोस पाणी नाहीं. पर्जन्य जाल्यावर पाणी रामगडचे आसपास मिळेल. इंग्रजांनीं बावांस सांगितलें आहे, रामगडची लगत* आम्हांकडे नाहीं. तुमचे चित्तास येईल तसा फौज पाठऊन रामगड घ्यावा. आम्ही बोलत नाहीं. त्यावरून फौजेची रवानगी केली. कांहीं लोक यमुनेपार उतरून दिले. बाकीचे जातच आहेत. बावा म्हणत होते कीं, इंग्रजाची लगत आंतून रामगडवाल्यासीं आहे. असें बावा सांगत होते. पुढें कसी तजवीज होईल पाहावी.

लष्करांत टांकसाळ केली. चार वर्षें जालीं. झांशींत नानाशाही रुपया चालतो. तो अर्धा आणा बट्ट्याचा आहे. तेंच नानाशाही नांव ठेऊन टंकसाळ चालते. आजपावेतों बारा आण्यांचा रुपया पडला. चालला. पक्क्या रुपयास बावीस पंचवीस चालत होता. आतां पस्तीस रुपये शेंकडा जाला आहे. तोच रुपया बाजारांत चालतो व फौजेसही तोच देतात.

फौज जी देशची समागमें आहे, त्यांत जुने कितेक गुजराथचे स्वारीपासून व नवे उजनी अलीकडील सारे कर्जभरी जाले. शिरस्त्याच्या बोल्या कोणाच्याही

*संबंध, संदर्भ.

नाहींत. महिनेमाला या बोल्या. रुपया नानाशाही देतात. हिशेबाची वाट पाहावी तर तिजाई वजा करून दोन हिसे द्यावे. त्यांत वजाया, कट्टेबट्टे जाऊन लोकांच्या पदरीं कांहीं पडत नाहीं. कित्येकांनीं सांगितलें, सहा वर्षें चाकरी जाली, तेरा महिने पदरीं पडतात, ते नानाशाही ! घोडीं विकूनही सावकारापासून सुटका होत नाहीं.

खंडेराव हरि बुंदेलखंडांत रवाना जाले. ते दरकूच जात असतां, अगोदर बेणीहजुरी पर्णेवाला व खुमानसिंग चरखारीवाला एक होऊन कालिंजरगडाशीं भांडत होते. तेथें दाल गळली नाहीं.* मग मनसबा करून दोघेही बांदेकर गुमानसिंगाचे पुत्र मधुकरसाह्यावर बेणी व खुमानसिंग चालून गेले. बांधेकर मजबूत आहेत. ते बाहेर निघोन युद्ध केलें. त्यांत तोफेचा गोळा लागून खुमानसिंग मारला पडला. फत्ते बांधेवाल्याची जाली. बेणी व खुमानसिंगाचा पुत्र पळून पुण्यास गेले. नंतर खंडेराव हरि बुंदेलखंडांत पावले. बांधेवाले आपले जमावानसीं खंडेरावास भेटले. राजश्री बाळाजी गोविंद मोहब्यास होते. तेही भेटले असतील. पुढें वर्तमान येईल ते विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar submits a diary of Sindia's activities from his camp at Mathura with the Emperor residing in his camp. The main items of interest are the punitive expeditions against Khechi, Ramgad and Bundelkhand, and the ill-paid condition of Sindia's soldiery.*

No. 408 July 1785.

छ विज्ञापना दिनचर्या :—

अनुपगीर गोसावी यानें अफराशाबखान मेल्यावर त्याचे जागिरीपैकीं किल्ले मुरसान† वगैरे दहा अकरा लक्ष रुपयांची जागीर बावांपासोन नवी यमुनेपार घेतली, आणि खुळेंही‡ करितो. कागद बावांनीं धरिले. त्यावरून बावांस राग येऊन किल्ले मुरसान वगैरे यमुनापारचे महालास जप्ती पाठविली. गोसाव्यापासोन सोडचिटया घेतल्या. परगणा भांडेरही घेणार असें वर्तमान ऐकतों.

---

*डाळ शिजली नाहीं, कांहीं चालेना. †Aligarh District, U. P., about 20 miles from Mathura. ‡भानगडी.

रामगडास* अनुसंधान लावावयास अफराशाबाचा चुलत सासरा बजीदखां गेला होता, तो माघारा आला. तो किल्ला हातास येत नाहीं. किल्लेदारानें फिरून गोष्ट सांगितली. त्याची तजवीज करावी, हेत आहे.

टिपूचे प्रबलतेच्या गप्पा येथें नानाप्रकारच्या उठतात. त्यावरून विकलता यते. तर त्याचे लढाईचें वर्तमान लिहिण्याविसीं आज्ञा जाली पाहिजे.

आगऱ्यास इंग्रज† आला होता. तो येथें येऊन पावला. बावा पुढें गेले होते, त्यास घऊन आपले डेऱ्यास आले. उपरांत आणखी एक दिवस त्याचे डेऱ्यास गले होते. कांहीं राजकारण त्यासीं होतें. तो इंग्रज सुरतेहून आला आहे. खलबतें होतात. वर्तमान कळल्यावर विनंती करीन. आम्हीं इंग्रजांसीं बोलणें लाविलें आहे असें बावा मजसीं बोलले आहेत.

रणजितसिंग जाटापासोन पाऊण लक्ष रुपये पेशजीं घेऊन, दहा लक्ष रुपयांचे महाल नजफखानानें करार केले होते त्यांवर अमल करून दिला. पांच तोफा द्याव्या करार जाला होता. त्यांपैकीं अटक तोफ एक मोठी आली. दोन आणखी अटकेपेक्षां लहान अशा आल्या. आणखी तोफा त्याचे येथें आहेत. ऐकून मागूं लागले. तों देईना म्हणून पुन्हा ते महाल जप्त केले. अद्यापि जप्तच आहेत.

एक इंग्रज मातबर येत आहे. कलकत्त्याहून किंवा लखनऊहून, कोठील येतो कळलें नाहीं. आगऱ्यास आला आहे. त्यास आणावयास येथून त्यांचा वकील इंद्रसेनाजवळ असतो तो गेला आहे. तो इंग्रज आल्यावर वर्तमान होईल. कळेल ती विनंती करीन.

विलायतचे बादशास या बादशाहाची वहीण दिली आहे, तिचें पत्र बंधूस संतोषाचें आलें; व त्या बादशाहाचें पत्र पाटिलबावांस आलें कीं, तुम्ही दिल्लीचे बादशाहातचा बंदोबस्त केला, ऐकून संतोष जाला. फार चांगलें केलें, असेंही बाहेर बोलून दाखवितात. मग गृहस्थ यावयाचें काम कोणतें ? आला तर आहे. कळेल वर्तमान तें विनंती करीन.

गुदस्तां स्वारी नवाबाचे भेटीस गेली होती. ते कालीं मुंबईहून वकील पुण्यास आला होता. त्यास राजश्री अमृतरावजींनीं पुण्यांत राहूं दिला नाहीं. तो उठून गेला. हें वर्तमान स्वामींचे पत्रीं लिहिलें होतें. सुरतकर इंग्रज बावांचे डेऱ्यास

*Now called Aligarh. †Malet, appointed Resident at Poona.

आला होता. ते दिवशीं ते मजकुराचें पत्र बावांनीं आणविलें होतें. मीं पाठविलें. पुढें कसें जालें, कळल्यावर विनंती करीन.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. राधाकृष्ण वकील निसबत जाट यानें लाखोटा दिला तो पाठविला आहे. पहिलेंही उत्तर त्याचें आलें नाहीं. प्रतीक्षा करितों. पहिले व हल्लींचें उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञप्ति.

¶*This is a continuation of the previous dispatch. More items such as the dismissal of Himmat Bahadur Gosai from his new Jagirs, Sindia's meeting with Malet going via Calcutta to Poona as Resident, his demand on the Jat Raja for guns, are mentioned.*

No. 409 July 1785.

छ विज्ञापना ऐसीजे, येथील दिनचर्या :—

राजश्री रायाजी पाटील यांची रवानगी रामगडास जाली. देशीहून कांहीं हजार दोन हजार फौज नवी आली, ती देखील यमुनापार केली. रामगडासच रवाना केली. तेथें कांहीं हिंदुमुसलमान नवे ठेऊन पार करून दिले. एकूण दाहेक हजार कागदची नेमणूक असेल. पार तर उतरले. रायाजी पाटील शिलकी पदरच्यांस उजूर नाहीं. पार तीन चार मुक्काम जाल्यावर बावांची ताकीद जाली, तेव्हां पाटिलबावांनीं कूच केलें. काय लोक त्याजबरोबर ज्यास पैका पावला असेल ते गेले. तितक्यानसींच गेले. त्यांनीं कोयल रामगडचेंच शहर आहे अलीकडे दो ती कोसांचे अंतऱ्यानें तेथें मोचें लाविले म्हणून वर्तमान ऐकतों. वरकड फौज यमुनापारच आहे. पैका पावल्यावर जातील. रामगडवाल्याचा पैगाम* शिबंदीचा रायाजी पाटिलासीं लागला. कांहीं शिबंदी फुटली ऐकतों.

मालत इंग्रज सुरतेहून आला तो पुण्यास जाणार होता. गेला न गेला म्हणून मी राजश्री पाटिलबावांस विचारलें. बावांनीं सांगितलें जे, तो कलकत्त्यास जातो. मेघफरसनासीं भेटून तिकडून पुण्यास जाईल. मी याचें कारण विचारलें. कांहीं सांगितलें नाहीं.

नजफकुली दिल्लीस होता. माचेडीवाला रावराजाही आंबुजीबरोबर दिल्लीसच गेला होता. आंबुजी शिखांचे दोन सरदार बरोबर घेऊन आल्यापासोन

---

*संधान.

तेथच आहे. शिखांचे दोन सरदार बरोबर आणिले होते, तेही दोन महिन येथेंच होते. त्यांस पोटास दिलें. दोघां सरदारांसीं बोलून चालून लगामी लाऊन घेतले. दोघांस सात आठ लाख रुपयांची जागीर दिली. ऐकतों, बिदा केलें. ते गेले. आणखी शीख पुष्कळ आहेत. ते बांकूनच आहेत. त्यांचा अंदेशा आहे. त्याचें कसें घडेल पाहावें. आतां दिल्लीकडे कांहीं काम नाहीं. आंबुजी येथेंच आहे. रावराजा व नजफकुलीही येथें आले. बहुधा बावांनींच बोलाविले असतील. आले. एक मास येथें होते. नजफकुलीची मुलाजमत करविली. कांहीं जागीरही त्यास दिली. बेरीज कळली नाहीं. कळेल. रावराजा व नजफकुली यांची रवानगी जैपुरावर केली हें बावांनींच सांगितलें.

बादशाह छावणीस दिल्लीस जाणार, ऐकतों. आनंदराव नरसिंह बावांकडून बादशाहाजवळ होता त्याजवर बादशाहाची इतराजी जाली. यांनींही त्यास मौकूफ केला. आतां तर बादशा दिल्लीस निश्चयें जाणार ऐकतों. त्याजबरोबरचा बंदोबस्त आवर्ण आदिकरून कसा होईल तो कळल्यास विनवीन.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is another page of Sindia's diary. The principal items of news are the dispatch of more contingents against Ramgad, Sindia's meeting with Najaf Quli and the Rao Raja of Macheri and their appointment to lead an expedition against Jaipur and the pacification of the Sikh Chieftains by grant of Jagirs. The emperor by way of expressing his displeasure of Anandrao Narsinh, had ordered him not to attend his court.*

No. 410. July 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—शाहाजादा लखनऊस आहे. त्याचें आदर तारतम्य खुषामद होत असते. वजीर तर देवापुढील देव आहेत. पामर साहेब इंग्रज येथें महा बडगा आहे. त्यानें शाहाजाद्यास नादीं लावून ठेविला आहे. इष्टीन तर शाहाजाद्यास सदाशिव मल्हार याचे स्वाधीनच करून गेला. पामरानें खूळ करून ठेवावयास कारण कीं, इष्टीन विलायतेस जाऊन नवा गौरनर मेघफरसन आला तो इष्टिनाचे केल्यास दोष आणील. शाहाजादा तोरा हाताखालीं ठेवील, जाऊं देणार नाहीं म्हणोन वर्तमानपत्रीं कलकत्त्यास लेहून पाठविलें आहे. मागाहून

तफजूल हुसेनखान याची रवानगी कलकत्त्यास करणार होता; केली असेल. शाहाजाद्याचाच मजकूर सांगून पाठविणार. मेघफरसन निश्चय सांगोन लेहून पाठवील त्याप्रमाणें वर्तणूक करावी, असा विचार लखनऊस जाहला म्हणून ऐकिलें आहे. येथें लोक बोलतात कीं, बादबरसाद राजश्री पाटिलबावांचे व इंग्रजांस बिगाड होईल. ऐकिलें वर्तमान आहे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports that the Shahzada's detention at Lucknow by the English was aimed at undermining Sindia's authority at Delhi and that there were rumours of hostilities breaking out between them in the near future.*

No. 411 August 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—येथील दिनचर्या :—

बादशाहांनीं दिल्लीस जाण्याचा आग्रह फार धरिला. राजश्री पाटिलबावांनीं अनेक तऱ्हा कामाकाजाच्या समजाविल्या, परंतु खातरेस आलें नाहीं. शेवटीं, छ १८ माहे रमजानीं* कूच करून बादशाहा दिल्लीस गेले. त्यांसमागमे बावांनीं आपले गृहस्थ कारभार व संरक्षणास दिले :—

१ लाडोजी शितोळे जांवई देशमुख, पुणें.

१ आनंदराव नरसिंह, वकील.

१ केशो अनंत निा। आबा चिटणीस, जो पांच लक्ष रुपयांकरितां दरबारीं ठेविला होता तो.

३

एकूण तीन आसाम्या व चार पांचशें फौज व पलटणें समागमें दिल्हे. दिल्लीस पावल्यानंतर लाडोजी देशमुखास बादशाहांनीं 'राजराजेन्द्र बहादर' किताब व महारबदार† पालकी दिल्ही.

बादशाहास दरमहा एक लक्ष तीस हजार रुपये दरमहा बांधिला आहे. बारा महिन्यांचे पंधरा लक्ष साठ हजार जाले. त्याचा तगादा बादशाहानें केला. हे महिनाचा महिना देऊं म्हणाले. बादशाहानें ऐकिलें नाहीं. तेव्हां सदाशिव नाईक भावे याचा गुमास्ता दुकानसहित समागमें आहे. प्रस्तुत पोतदारी त्याजकडे

---

*25th July 1785. †मेहराबदार, कमानदार.

यांचे साहित्यानें चालते. त्यास पंधरा लक्ष साठ हजार रुपये मागों लागले कीं, बादशाहाची निशा पंधरा लक्ष साठ हजारांची करून चिठी लिहून देणें. गुमास्ता बरोबर देऊन, दरमहाचा दरमहा दिल्लींत देत जाणें. गुमास्ते यानें मानिलें नाहीं. उत्तर केलें कीं, आम्ही वाणी, बादशाहास चिठी देऊन देणेदार व्हावें, रुपया आपण द्याल तर आम्ही द्यावा. उगीच चिठी गोऊन काढावी कशी? चिठी देणें अनुकूल पडत नाहीं. बारा महिन्यांच्या चिटचा बादशाहास करून द्याव्या. महिना महिन्यास चिटी आम्हांकडेस घेऊन येईल त्यास ऐवज देऊं. तेव्हां लाचार होऊन, एका महिन्याचे एक लक्ष तीस हजार शवाल महिन्याबद्दल भाव्यापासोन नख्त देऊन, बादशाहाची रवानगी केली. ते कूच करून गेल्यावर, फिरून भाव्यासीं संदर्भ लाऊन पंचवीस लक्ष मागूं लागले. त्यानें उत्तर एकच केलें जे, आम्हांजवळ रुपया नाहीं. आपले आज्ञेवर चालेल तितका फेरमोबदला करावयास तीन बशर्त्या पाहिजेत. श्रीमंतांची तुमची प्रशस्ता. बादशाहाची तुमची सफाई. आमचा रुपया वरचेवर देतां त्याप्रमाणें देत जावा. या तिन्ही शर्ता जाल्यास आज्ञेप्रों फेर मोबदला करावयास येईल. येथवर जाबसाल जाले. पुढें क्रम चालल्यास विनंती करीन.

खंडेराव हरि यांची रवानगी बुंदेलखंडांत कोणे कारणास्तव जाली म्हणोन आज्ञा सादर जाली. त्यास, मुख्यत्वें बाळाजी खुमानसिंगानें वाढविला. इकडे पाटिलबावांकडे वकील पाठऊन, गुमानसिंग मेला त्याचे कारभारी याचें पारपत्य करावें. नजरेचा जाबसाल लाविला. वर्तमान बांधेकरास कळल्यावर त्यांनीं वकील पाठवून बावांचे मर्जीचें संपादन केलें. चार रु।। कबूल केले कीं, त्याचा हिस्सा खुमानसिंगास देणें पडतें. बांधेकरांनीं आपल्या हिशाचा ऐवज दिल्हा. खुमानसिंग देईना. म्हणून खंडेराव हरींची रवानगी तिकडे जाली. हे फौज-सुद्धां वेत्रवती उतरून गेल्यावर बुंदेलखंडची मंडळी येऊन रुजू जाली. एक बेणीहजूरी भेटला नाहीं. फौजबंदी करून आहे. वकील त्याचाही रुजू जाला. स्वारी मातबर साधेल. वदंता आहे. खंडेराव हरीचा मुक्काम कालिजर गडा-खालीं होता. तेथून कूच होऊन पर्ण्याच्या घाटींखालीं गेले. बेणीहजुरी शहर पर्ण्यांत आहे. घाटीची बंदी केली आहे. पर्जन्य लागला आहे. तो उघडल्यावर हे घाटी चढूं म्हणतात. पुढें वर्तमान येईल ते विनंती करीन. जैपुरकरांनीं बादशाहाकडे अनुसंधान लाविलें आहे. अर्जी गेली होती. त्याचें उत्तर बादशाहाचें गेलें. हें वर्तमान बावांस कळलें आहे. बावा रामगड फत्ते व्हावयाची प्रतीक्षा

करितात. रामगड फत्ते जाला म्हणजे दिल्लीस जाणार. प्रस्तुत बादशाहाचा दरमहा जिल्काद महिन्याचा देणें, त्याची तरतूद होत आहे.

किल्ले मधुसूदनगड याजकरितां आंबुजी इंगळे यांस सांगितलें होतें जे, सरकारचा किल्ला तो अरुणकर कमाविसदारानें स्वाधीन करावा. त्यानें मान्य केलेंच होतें. तों सरकारचीं पत्रें पाटिलबावांस व आंबुजी इंगळे यांचे नांवें सादर जालीं. तीं अरुणाहून राजश्री नारो चिमणाजी कमाविसदार यांनीं येथें पाठविलीं. तीं उभयतांस दिल्हीं. बावांनीं आंबुजी इंगळे यांस सांगितलें कीं, किल्लामजकूर अरुणकर कमाविसदाराचे स्वाधीन करून रसीद घेणें. सरकारचे पत्रांचे जाब व खंडोजी इंगळे यांस पत्र मागितलें. लेहून देऊं लागले जे, मधुसूदनगड देणें. तेव्हां पाा खैरागडाविसीं रदबदल केली. उत्तर जालें जे, सुदामद पाा खैरागड नाहीं; एक मधुसूदनगडच सरकारांत आहे. मीं सरकारचे पत्रावरून रदबदल फार केली. तेव्हां सुदामद चालत असेल त्याप्रों देणें असें खंडोजी इंगळ्यास पत्र देतात. पुण्यास डांक पाटिलबावांची नवीच गेली आहे. त्याजबरोबर पत्रें बाळाजी जनार्दनांचीं आलीं. त्यावरून विक्षेप फार जाला. यामुळें याही जाबसालास हिसका पडला आहे. शेवटास जाईल ती विनंती करीन.

यंदा पर्जन्य सर्व देशींच फार जाला. प्रयागचें वर्तमान लोक बोलतात, व अखबारांतही खबर आहे जे, नवी वस्ती उंची आहे ती वांचली. जुनी वस्ती वाहून गेली. निम्मे किल्ल्यांत पाणी भरलें होतें. लखनऊ गोमती तीरीं आहे, तेथील वर्तमान उठलें आहे जे, निम्मे शहर वाहून गेलें.

मधुसूदनगडाखालीं खैरागड परगणा. त्या सुद्धां अरुणकराचे हवालीं करणें म्हणून सरकारचे पत्रीं बावांस व इंगळ्यांस व सेवकास आज्ञा. त्याप्रमाणें इंगळ्यानें पत्र प्रथमच दिल्हें. बावांचे चित्तास नये. भानगड फार जाली. शेवटीं सुदामत जागा असेल त्याप्रों देणें म्हणून खंडोजी इंगळे यांस पत्र दिल्हें. त्याप्रमाणेंच सरकारचेही पत्राचें उत्तर दिल्हें. मग आंबुजी इंगळे यानेंही तसेंच पत्र दिल्हें. तीं राजश्री नारो चिमणाजी अरुणकर कमाविसदार याजकडे पाठविलीं.

बावांनीं पहिला शिक्का बाद केला. नवा शिक्का पारसी केला आहे. त्याची नक्कल पाठविली आहे. नक्कल हातीं लागली नाहीं. मागाहून पाठवीन. श्रीमंतांचें नांव शिक्यांत आणिलें आहे. नक्कल मिळाल्यावर कळेल.

गंगाजी हुजऱ्या घरास गेला. तेथून पुण्यास गेला असें वर्तमान कळलें. आला असेल. येथील वर्तमान साकल्य विनंती केली असेल.

बादशाहा दिल्लीस दाखल जाल्यावर गुरदतसिंग शीख यमुनापार होता, तो यमुना उतरून पार अंतरवेदींत मेरठप्रांतीं हजार पांचशें जमावानसीं उतरला. धामधूम करितो. बापूजी मल्हार ते प्रांतें हजार दोन हजार फौज व गाडद ऐसे सरंजामानसीं सरसुभा सारे महालाचा होता, त्याची तगिरी केली. फौज त्याजवळील रामगडास रायाजी पाटलाजवळ पाठविली. बापूजी मल्हार हुजर बोलाविले. त्याचे महालास फुटकर कमाविसदार केले. आतां तिकडे गुरदतसिंग शिखानें दंगा मांडिला आहे, त्याचा बंदोबस्त पुढें होईल.

रामगड याजवर रायाजी पाटील याची रवानगी केली. दहा हजार फौज त्याजवळ आहे, यांनीं कोयल शहर रामगडापासोन दोन तीन कोस आहे, त्यास मोर्चे लावून कांहीं फोडफाडही केली होती. मग हल्ला करून घेऊन, ठाणें बसवून स्वाधीन केला. तेथून रामगडावर चाल केली. एका कोसाचे अंतऱ्यानें आहेत. मोर्चे खणून पुढें चालतात. किल्लऱ्याची बंदी आहे. माणूस बाहेर निघूं पावत नाहीं. आसपास सभोंवत्या कोसाचे पल्लऱ्यानें चौक्या आहेत. रामगडकर आंतून मजबुतीनें भांडतो. हा कालवर साबूत आहे.

जैपुरांत राजा विद्यमान आहे. त्याचा व माचेडीकर रावराजा याचा द्वेष आहे. तोही सरदार पटाईत जैपूरवाल्याचा होय. परंतु भारी पडला. त्यानें बावांस सांगितलें कीं, जैपूरकर राजा स्त्रीचा वेष घेऊन अंतःपुरांत पाईं घुंगरू बांधून नाचत असतो. त्यानें राज्य काय करावयाचें आहे ? स्वारी करून त्यास हस्तगत करून कैद करावा. त्याचे भाऊबंद दुसरे आहेत त्यांची स्थापना जैपुरांत करावी. यास मी अनुकूल आहें. त्यावरून बावांनीं रावराजा व नजफकुली या दोघांची रवानगी या मसलतीवर केली. दोघे निरोप घेऊन गेले.

रावराजा अलवर किल्लऱ्यास आपले घरीं. नजफकुली आपले घरीं, कानोड किल्ला नारनोल परगण्यांत आहे, तेथें आहे. आंबुजी इंगळे यास त्या मोहिमीवर पाठवावें असा करार. त्याची प्रतीक्षा दोघेही आहेत. त्यास प्रस्तुत आंबुजीची रवानगी राहिली. त्याचा भाऊ बाळोजी इंगळा याची रवानगी केली. अद्यापि कूच जालें नाहीं. जाईल. पुढें कसकसा विचार ठरतो पहावें. जैपूरचे राजास विद्यमानास वर्तमान कळलें. त्यास मारवाडकर राजा बिजेसिंगाची कन्या दिली आहे. यास्तव त्याजकडे जैपुराहून बोहराजी गेला आहे. बिजेसिंग जैपूरकरांस सामील होणार. वर्तमान येथें आलें आहे. पुढें काय ठरतें पाहावें.

लखनऊ येथून वर्तमान एका गृहस्थाकडे आलें. लिहिलें आहे जे, कलकत्त्यास गौरनर पद जें पद इष्टिनास होतें, त्या पदावर मेघफरसन येऊन स्थानापन्न जाला होता. हल्लीं नवा इष्ट्रूर नामें इंग्रज येऊन स्थानापन्न जाला. मेघफरसन कौंसलांत दाखल जाला. शहाजादा लखनौंत आहे. तो कलकत्त्यास जातो. नावांत बसून जावें यास्तव मीर्जा अमानीस नावांचे तयारीकरितां सांगोन पाठविलें. त्याचें उत्तर आलें जे, पहिले येथें पामर साहेब होता, त्याचे कामावर हापड* साहेब बाहाल होऊन येथें आला. पामर साहेब कलकत्त्यास गेला. त्याजबरोबर नावा चांगल्या गेल्या. आतां नावा चांगल्या नाहींत. आज्ञा जाल्यास नव्या तयार करूं. तेव्हां नव्या नावा तयार करावयास आज्ञा जाली. पांच लक्ष रुपये नव्या नावा तयार करावयास मीर्जा अमानीनें देविले. नावा तयार होत तंबपावेतों शहाजाद्याचें लग्न करावें; मीर्जा अमानीच्या दोन बहिणी उपवर आहेत. त्यांपैकीं एक शहाजाद्यास देतात; लग्नाचा सरंजाम होतो असें वर्तमान आलें आहे. बावांस हा मजकूर विचारल्यावर खरें खोटें कळेल. ऐकिली विनंती केली. कलकत्त्यास नवा इंग्रज आला. खबर दाट आहे.

बावांची छावणी मथुरेवरच आहे. आश्लेषा, मघा, दोन नक्षत्रांची झड पर्जन्याची वीस बावीस दिवस लागली. त्यांत मथुरेंतील हवेली फार पडून माणूस फार दबून मेलें. यमुना फार चढली, तेणेंकरून नाव बुडाली. त्यांतही शें दीडशें माणूस बुडालें. लष्करांत पर्जन्याची विपत्ति फार जाली. डेरे, कनाता, राहोटचा अगदीं सडून जाया होऊन मग छपरबंदी तमाम लष्करांत जाली. फरासखाना सारे लष्करभर नवा जाल्याखेरीज कूच होणार नाहीं. कापड मिळत नाहीं. फार महाग जालें. तेंही नापैद आहे. दाणा आठरा वीस शेरांची धारण आहे.

रामजी जाधव पाटील घरींहून निघून येथें आले. पाटिलबावांची भेट जाली. जन्माष्टमीचे उत्सवाची दाटी, सबब बोलणें जालें नाहीं. इतक्यावर बोलणें होईल. कळेल वर्तमान त्याची विनंती करीन. मर्जी तर कृष्ठच ऐकतों. बोलण्यांत सारा भाव समजण्यांत येईल. राजश्री रामजी पाटील लोकांजवळ बोलतात कीं, बादशाही खिलताविसीं श्रीमंतांची मर्जी नाखूष जाली आहे तर मजला पाठवावें. मी दरबारीं जाऊन खिलत पसंत करवितों व पुढें बंदोबस्त कसा करितों तेंही पाहावें. ही नासानास वकिलांनीं केली आहे. मी परिमार्जन

*Col. Harper (?)

करून सारा बंदोबस्त करितों, असें बोलतात म्हणोन ऐकतों. बावांजवळ अद्यापि जाबसाल नाहीं म्हणतात.

मारवाडकर बिजेसिंग व नजफकुलीचें अनुसंधान आहे. लिखावट होत आहे. बादशाहाचेंही कांहीं अनुसंधान ऐकतों. इंग्रज वजीरही या संमतांत आहेत. इंग्रजांकडील कोणी जैपुराकडे आले ऐकतों. अशीं सारीं संमतें एक जालीं तर गोष्ट फटकाल.* पाटिलबावा दैववान् व श्रीमंतांचे पायाचा आश्रय.

पा भडोच प्रांत गुजराथ व आंकलेश्वर येथील गांवाचे सिवेची कटकट आहे. त्याचा निवाडा राजश्री चिंतामण हरि सरसुभेदार यांणीं केला आहे. त्याप्रमाणें भडोचकर कमाविसदारास पत्र देऊन आंकलेश्वर वगैरे माहालचे गांवच्या सिवा सोडून देणें म्हणून बावांस व सेवकास आज्ञापत्रें सादर जालीं. तीं सरसुभेदारांनीं सेवकाकडे पाठविलीं. बावांस पत्र दिल्हें. तीं पत्रें पाठविलीं तीं अद्यापि पाहिलीं नाहींत. मर्जी रुक्षच आहे. पाहतील तर दाखवीन. उत्तर देतील तें रा करीन.

जैपुरकरांनीं मारेकरी सत्रा असामी बावांस दगा करावयास पाठविले म्हणून वर्तमान आलें. त्यावरून दरबारची बंदोबस्ती फार जाली आहे. हिंदुस्थानी कोणे कर्मास चुकणार नाहींत.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar details news from Sindia's camp at Mathura. He writes about the emperor's allowance being fixed at fifteen and a half lakhs of rupees annually and of his having retired to Delhi, of the appointment of MacPherson as G. G., of Khanderao Hari's activities in Bundelkhand, about the change in his seal effected by Sindia, about the Sikh ravages in Meerut Mahal, and about the progress of the siege of Aligad (Ramgad). He expresses his fears that the Jaipur expedition was growing into an ominous affair by the coalition of Jodhpur with Jaipur and by the enemy's position being further strengthened by secret encouragement from Delhi. Mahadji is reported to have dispatched reinforcements under Baloji Ingle to support Rao Raja and Najaf Quli in that quarter.*

*वाईट.

No. 412 August 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—गुर्गुर छबाडें प्रांत खेचीवाडा येथें राघोगडवाला खेची यानें मोर्चे लाऊन घेतलें. त्याजवर येथून फौज रवाना जाली. राजश्री आंबुजी इंगळे यांचा भाऊ खंडोजी इंगळा सरदार, हमदानीही त्याजवळच आहे. जैपुराकडील फौजही तिकडेच गेली. देशीहून देवजी गौळी फौज घेऊन—सात आठ हजार ऐकतों—तीही फौज तिकडेच. एकूण चाळीस हजार फौज खेचीच्या पारपत्यास आहे ऐकतों. गुर्गुर छबाडें खेच्यानें घेतलें होतें, तें पुन्हा इंगळे व हमदानी, गौळी आदिकरून यांनीं घेतलें. खेची पळून राघोगडास गेला. फौज यांची त्याजमागें खेचीवाडचांत आली. गडचा किल्ले खेच्यांच्यास मोर्चे लाऊन सोडऊन प्रांत अगदीं घेतला. राघोगडास मोर्चे लाऊन तोही घ्यावा, विचार आहे. मोर्चे लागले असतील कीं लागतील. राघोगड घ्यावा असा विचार आहे. प्रांत तर घेतलाच ऐकतों. राघोगड घेतला म्हणजे तेंही संस्थान सरकारांत आलेंसें जालें. वर्तमान तर परभारा श्रवणास आलेंच असेल. हे विज्ञापना.

¶*Sadashis Dinkar reports Mahadji having reduced the rebel chief of Khechi and having brought him to bay in his fort of Raghogad.*

No. 413 August 1785.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—शालजोडचा लष्करांत मिळतात. एक शालजोडी उंच अडीच तीनशें रुपयेपावेतों मिळाली तर श्रीमंतांकरितां मनाजोगी श्रीमंतांचे पसंतीची मिळाल्यास घ्यावी. मर्जीस आल्यास रंग कोणता, हशिया* किनारा कोणे तऱ्हेचा, तो लिहिला पाहिजे. हे विज्ञप्ति.

¶*Sadashiv Dinkar inquires what kind of shawls he should purchase for the Peshwa.*

No. 414 10th September 1785.

पैवस्ती छ १५ जिल्हेज सीत समानीन,

आश्विन मास.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ५ जिल्काद स्वामींचे कृपावलोकनें करून मुक्काम श्रीमथुरा येथें

*किनार

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—येथील वर्तमानें पुरवण्या निरनिराळ्यांत विनविलें आहे, त्यावरून विदित होतील. मागील रवानग्या येथून केल्या वितपसील :—१ छ १४ जमादिलाखर, १ छ २० रजब, १ छ २६ साबान, १ छ १२ रमजान.

एकूण चार रवानग्याचे लाखोटे डांकेंत येथून रवाना केले, त्यांचे जाब सादर होत नाहींत. यावरून संदेह निर्माण जाला कीं, लाखोटे सेवेसीं पावले कीं न पावले ? त्यांत वर्तमानें कच्चीं पक्कीं विनविलीं आहेत. येथें खटेमिटे जाबसाल फार दिवस चालले आहेत. बादशाही कारभार, त्यांत वकीलमुतलकीचे भानगडीमुळें आग्रह फार वाढले. दिवसेंदिवस वृद्धिगत आहेत. मार्गांत लखोटचास दगाफटका जाला तर पेंच पडेल असें आतां जालें, म्हणून डाकच चालवीत नाहीं. मागील रवानग्यांचे संदेह आहेत, त्यांचे जाबाविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar inquires whether letters dispatched by him were being received at Poona or not.*

No. 415 16th September 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—डिगेचे मुक्कामीं उमरावगीर व अनुपगीर गोसावी यांची जाहागीर माघारी घेऊन माहालाची जप्ती केली. उमरावगीर याचे माहालाचे जप्तीस केसोपंत निसबत आबाजी चिटणीस यास पाठविलें. त्यानें जाऊन लाहान लाहान ठाणीं बसविलीं. मातबर ठाणीं गढ्या हातास आल्या नाहीं. अनुपगीरही त्या डिगेचे मुक्कामपावेतों बरोबर होता. तोंपावेतों त्यास वसवास होता कीं, मजला धरून कैद करितील. म्हणून भयभीतच होता. बोलणींही होत होतीं. शेवटीं अनुपगिरीची समजाविणी केली. दहा हजार रुपये दरमाहा जातीस करार करून वीस हजार रुपये नख्त खर्चास दिल्हे. त्यानें वृंदावनीं राहावें. शंभर घोडे घरपागेपैकीं जवळ ठेवावे. बाकी पागेचीं घोडीं, हत्ती, उंटें, चेल्याबरोबर लष्करास पाठवावे. त्यांची हजरी घेऊन जागीर लाऊन द्यावी, असा करार करून अनुपगीर यास निरोप दिला. व तो कूच करून वृंदावनास गेला. बावांनीं कूच करून इकडे आल्यानंतर, उमरावगिरीची फौज केसोपंतावर चालून आली. लढाई झाली. केसोपंत मारला. पडला. नंतर अनुपगीरही वृंदावनाहून कूच

करून यमनापार अंतरवेदींत गेला. पेरोजाबादचेंही ठाणें मारून घेतलें.आतां दोघेही गोसावी सात आठ हजार फौज व तोफा अशा सरंजामानिसीं आपले जागिरींत आहेत असें बोलतात. असेंही वर्तमान आहे जे, ते मीर्जा आमानीकडे चाकर राहिले, यांचे कुमकेस तीन कंपू कानपुरास इंग्रजांचे आले आहेत. जैपुरकराचे वकील लखनऊस इंग्रजांकडे गेले आहेत. पंचवीस लक्ष रुपये देऊन कुमक मागतात असेंही लोक बोलतात. तथ्य वर्तमान कळल्यावर विनंती करीन. अनुपगीर उमरावगिरीनीं केसोपंतास मारल्यामुळें बांकून भागीरथी तीरास गेला. उमरावगीर जाहागीरींत आहे. नवीन सरंजाम दोन हजार फौज व पायदळ इतक्यानिसीं आहे. राधोगड फत्ते जाला. फौज तेथील रिकामी जाली. पंचवीस तीस हजार म्हणतात. त्यांपैकीं निमे उमरावगिरीचे पारपत्यास पाठविली तोफखान्यासहित, व निमे फौज आपणाजवळ आणविली, म्हणून राजश्री पाटिलबावाच सांगत होते. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana about the Gosavi brothers having rebelled and plundered Sindia's territory, and of the Rajput coalition having sent agents to the English to secure their assistance in their war against Sindia.*

No. 416 20th September 1785.

पत्र बापू भावे यांस)

छ सेवेसीं सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत भादवा शुद्ध २ रुजू वद्य २ मुक्काम श्रीमथुरा वर्तमान यथास्थित असे. विशेष :—फार दिवस स्वामींकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. मागें एक पत्र आलें, त्यांत लिहिलें होतें तें, श्रीमंतांनीं आज्ञा केली होती कीं, तुम्हीं व पांडुरंग बापू राजश्री पाटिलबावांचे लष्करास जाणें. आम्हीं रदबदल केली ती मर्जीस पसंत न पडली. जावेंच लागेल म्हणोन आज्ञा जाली. तेव्हां येणें प्राप्त जाणून मान्य केलें. वैशाखमासीं लग्नें घरीं कर्तव्य आहेत. कारण कीं, दूरदेशचें जाणें. फिरून येणें कधीं होतें ? यास्तव लग्नें वैशाखमासीं करून आम्हीं व बापू तिकडे येतों. त्याजवर एक पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें कीं, अणाचे व राजश्री गोविंदराव यांच्या मुलींचीं लग्नें केलीं. संबंध अमक्या अमक्याशीं जाले. मातबरच यामुळें रुपया

खर्च जास्त जाला. राजश्री नरसोबाचें लग्न जालें. सखारामपंतांचें लग्न कर्तव्य तेंही करून येतों, असेंही पत्र आलें. त्याजवर पत्र येत नाहीं. मी येथून दररवानगीस श्रीमंतांचे पत्राबरोबर पत्रें पाठवीत आहें. त्याचे जाब येत नाहींत. श्रीमंतांचींही उत्तरें येत नाहींत. याचें कारण समजत नाहीं. आपले येण्याचाही मजकूर समजत नाहीं. तर येणें होतें न होतें समजलें पाहिजे. श्रीमंतांची चिठी मजला सादर जाली होती कीं, तूं आपले शरीरप्रकृतीचें व इकडे येण्याचें लिहिलेंस, त्यावरून राजश्री बापू भावे यांची रवानगी लौकर करितों. ते येथें आले म्हणजे तूं निघोन येणें. त्यावरून आपली प्रतीक्षा केली व करितों, परंतु येणें होत नाहीं. कधीं येतों असें पत्रही येत नाहीं. काय समजावें ? दिवसेंदिवस माझी प्रकृति क्षीण होत आहे. जो ऋतु येतो तो विकलच करीत असतो. शरीर क्षीण. सरकारकामाचे जाबसाल पाटिलबावांसीं घातले याजकरितां त्यांची बेमर्जी. आठरा महिने रोजमरा नाहीं. नित्य खर्च कर्जावर चालतो. दहा हजारांचे बेरजेपावेतों थोडके श्रमांत कर्ज मिळत होतें. आतां तर दहांवर कर्ज वाढत चाललें. दहा हजारांचे तगाददारांनीं प्राण घेतला ! त्यांचे तगादे सोसून पुढें पोटाकरितां कर्ज मेळवणें. यास शरीरसामर्थ्य असावें तें कोठें आहे ? बाहेर निघणें संकट, तेथें फिरणें कळतच आहे. जवळ माणूस कोणी असें नाहीं कीं बाहेर फिरून माझें काम चालवी. असा माणूस तरी कोणते ऐवजावर ठेवावा ? शंभर दीडशें रुपयांचा कारकून जवळ आहे. त्याच्यानें येवढें काम कसें होतें. चिरंजीव पांडुरंगबापूचें पत्र मलकापुराहून आलें. त्यानेंही स्वामींचे पत्राप्रमाणेंच श्रीमंतांचे आज्ञेचा प्रकार व लग्नाचे प्रसंग लिहून, त्यानें आपला मजकूर लिहिला होता कीं, मी आपले घरीं एकला, घरचा बंदोबस्त केला पाहिजे. म्हणून स्वामींची आज्ञा मागून घरास आलों. घरचा बंदोबस्त करितों. बापूसाहेबानीं लग्नें वैशाखमासीं केलीं असतील. ते घरीहून निघोन बराणपुरास आले म्हणजे मीही त्यांजवळ येऊन समागमें येईन. एका गृहस्थानें सांगितलें कीं, श्रावणमास पावेतों बापूसाहेब राहिले. यावरून पर्जन्याचा संदेह उघडाच आहे. दसऱ्यास तरी निघणें होऊन इकडे येणें घडावें. श्रीमंतांचे आज्ञेची प्रतीक्षा असल्यास आतां टिपूचे मोहिमेची दाटी. या संधींत आपली गांठ निश्चित कोठें पडते कीं सालंकृत जाबसाल होईल. अर्थ कसा आहे तो खरा कळला पाहिजे. माझी अवस्था खरी खोलून लिहिली आहे. मागेंपासूनच दिवसेंदिवस संकट आहे. हें पूर्वीही लिहितच आलों. त्याजवर आपलें पत्र आलें कीं, आम्ही येतों. त्या धिवंशानें* दिवस काढिले, काढितों.

*धिवसा-प्रबळ इच्छा.

अशाही फजितीनें आश्विन काढणें प्राप्तच आहे. निभाव जाला पाहिजे. श्रीमंतांचे परवानगीखेरीज निघोन जातां येत नाहीं. राहण्यास पोटास पाहिजे. यद्यपि येथून निघालों तर येथील देणें वारावें, शिबंदी वारावी, पुण्यास पोंहचावयाची खर्ची मेळवावी, तेव्हां समागम पाहून निघावें तर पैका कोठून मेळवावा? यांतून सुटकेस दोन प्रकारच. देह सुटेल तर सुटका. किंवा कोणास न पुसत उठून एखादीकडे उठून जावें. पैका मिळत नाहीं त्यापक्षीं दोनच प्रकार प्राप्त होतील. शरीरसुटका हातीं नाहीं. तगाद्यापुढें त्रासून न पुसत उठून जावें. दिवाळीपावेतों आपलें येणें न जालें, तर नंतर हीच गति प्राप्त होईल. पालखी, उंट, वस्तभाव याचा वाली ईश्वर आहे. श्रीमंतांस व आपणास लिहितां थकलों. सीमा जाली. वारंवार तेंच तें लिहिणें काय? ज्यांचे सेवक होऊन येथें राहावें त्यांचें कांहीं तरी काम पाहावें. यास्तव सरकारी जाबसाल मी घातले. यांस सरकारचें काम करणें नाहीं म्हणून माझें वाईट मानिलें. सुखरूप मानोत. मी आशा ठेवीत नाहीं. मसीं रुष्ट आपण आले तर आपणासीं सुष्टपणें चालतील तर होऊं शकतें. आजपावेतों यांचें मनोरंजन केलें; सरकारकाम व खासगत दोहींचें स्वरूप कळलें. सरकारकामें होत नाहींत. श्रीमंतांचे निषेध येऊं लागले, तेव्हां सरकारकामें हटकणें पडलें. वाईट मानिलें. मानोत. श्रीमंतांसही सविस्तर लिहिलें आहे. आम्ही आपले दुराशेकरितां हटकूं तर शद्व लागेल. ते दुराशा नाहीं. मग कोणास भीतही नाहीं. निर्वाह जाला तेथवर केला. पुढें होईल तेथवर करीन. निदानचा प्रकार लिहिलाच आहे. एखादीकडे उठून जाणें. उंटें, तट्टें, वस्तभावेची गति होईल ती हो. खोलून लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Bapu Bhave about his ill-health and requests him to expedite his journey to Sindia's camp and relieve him.*

No. 417 27th September 1785.

सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २२ जिल्काद सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—पत्र सादर जालें. तेथें आज्ञा जे, गोपाळ संभाजी यांचे गांव राजश्री खंडेराव हरि यांनीं जप्त केले आहेत. ते मोकळे करऊन यांचे हवालीं करवावे म्हणोन राजश्री पाटिलबावांस पत्र पाठविलें होतें. गोपाळ संभाजी वारले, त्यांचे मुलामाणसाचें चालवणें अवश्यक

याजकरितां बावांस सांगोन यांचे गांव सोडन देवणें. ऐशास त्यांजकडील कारकून राजश्री त्रिंबकराव सदाशिव येथें आले होते. त्यांचे विद्यमानें जाबसाल केला. तेव्हां करार ठरला जे, राजश्री परशरामपंत कमाविसदार परगणा शिरोंज यांचे विद्यमानें खंडेराव हरि व गोपाळ संभाजी यांचे हिशेबाचा फडशा जाला. त्यांत पंधरा हजार रुपये गोपाळ संभाजीकडे बाकी निघाली. त्याचें खत गोपाळपंताचे कारकुनाचें व्याजमनोतीचें खंडेराव हरीजवळ आहे. त्याऐवजीं गांव जप्त केले आहेत, त्याचा वसूल एक साला पावला. हें साल चाललेंच आहे. रुजुवातीनें वसूल खेडयाचा ठरेल त्यापैकीं महालमजकर वजा होऊन, बाकी वसूल पंधरा हजार पैकीं मजरा पडोन, बाकी व्याज मनोतीसुद्धां निघेल त्याची निशा साहुकारी द्यावी, याप्रमाणें ठराव जाला आहे. तर गोपाळपंताकडील कारभारी यांस आज्ञा होऊन निशा साहुकारी आली म्हणजे बावांस विनंती करून गांव सोडून द्यावया-करितां खंडेराव हरि यांस पत्र द्यावयास येईल. जास्त शिबंदी सोळा हजार घेतली म्हणतात. याचा जावसाल ठरेल तसा ठरो. तूर्त पंधरा हजार व व्याज मनोतीपैकीं गांवचा वसूल मजरा घेऊन बाकीचा ऐवज देऊं असी निशा आली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar replies to Nana that the villages belonging to the late Gopal Sambhaji would be released by Khanderao Hari after the recovery of his debts.*

No. 418 September 1785.

छ विज्ञापना ऐसीजे :—छ २९ सवालचीं* रवानगीचीं पत्रें सादर जालीं. त्यांत छ १९ रमजानपासून तेरखेचीं पत्रें आहेत. त्यांत राजश्री पाटिलबावांचे नांवें दोन पत्रें स्वामींचीं सादर होतीं. तीं प्रविष्ट केलीं. मजकूर दोन, एका पत्रीं इंग्रजांचा मजकूर इत्थंभूत लेहून शेवटीं लिहिलें होतें जे, पांच पलटणें इंग्रजांचीं पहिले खर्चास द्यावयाचा करार ठरला आहे, त्याप्रमाणें कबूल करून पांच पलटणें जरूर पाठवावीं. दुसरे पत्रीं फरासिसांचा मजकूर कीं, मुसा भुसी फरासीस फुलचरीस होता. त्यानें नाद आम्हांसीं लाविला होता. आम्हीं साफ जाब दिल्हा. मुसा भुसी मेल्यानंतर दुसरा जनरल त्याचे जागां आला. त्यानेंही सरकारांत पत्रें पाठविलीं. त्याचा जाबच आम्हीं दिला नाहीं. कारण कीं, इंग्रजांचे तह-

*4th September 1785.

नाम्यांत दुसरे टोपीकरांसीं सिलसिला नसावा, यास्तव आम्हीं जाब दिल्हा नाहीं. आतां तिसरा फरासीस मदार मुखतार फुलचरीस आला आहे. त्यानें टिपूसींही सिलसिला चालविला आहे व सरकारांतही पत्रें पाठवीत आहे. त्याचें कसें कराव? आम्हीं तहाप्रमाणें दुसरे टोपीकरासीं सिलसिला ठेऊं नये. तसा दुसरा टोपीकर श्रीमंतांचे दुषमनाची कुमक करूं लागल्यास इंग्रजांसही अभिमान असावा. इंग्रजांनीं श्रीमंतांचे दुषमनाचे कुमकेस टोपीकर जाईल त्याचे पारपत्याजोगा सरंजाम बिनखर्ची श्रीमंतांकडे पाठवावा. असे दोन मजकूर लिहिले होते. त्यांचे जाब मागावयास शरिराची गति अशी असतांही दोन वेळ जाऊन जाब मागितले. उत्तर बावांनीं साफच दिल्हें जे, आतां आम्हीं लिहिणेंच बंद केलें. जाबसाल होणें ते आम्हीं पुण्यास जाऊं तेव्हांच होतील. कागदींपत्रीं विस्तार लिहून फल नाहीं. इंग्रजांसीं बोलावें तर ते व वजीर रामगडाचे कुमकेस येतात. दिल्लींत कोठीस जागा बादशाहाजवळून इंग्रजांनीं घेतला. तेव्हां इंग्रजांचें आमचें रहस्य कोणतें राहिलें? असें असतां जाब काय लिहावा असें सांगितलें. तें विनविलें असे. श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचें राहणें त्रिस्थळीं अगर मथुरावृंदावन येथें जाल्यास पेंच न पडावा येविसीं बादशाहींतून व इंग्रजांकडील कागदपत्र आणून अमिलाचे नांवें वगैरे सनदा पाठवून देवणें म्हणून आज्ञा. याचें उत्तर काय लिहूं म्हणून विचारिलें. त्याचेंही उत्तर स्पष्टच केलें कीं, आमचें कोठें शुधच नाहीं तर जाब लिहावयास काय सांगावें? हे विज्ञापना.

¶ *To Nana's letter urging the request of English assistance to the Peshwa against Tipu, Sadashiv Dinkar replies that Sindia declined negotiating with the English on that subject as he was not on terms of cordiality with them as before.*

No. 419 September 1785

छ विज्ञापना ऐसीजे :—छ ३० सवालचीं आज्ञापत्रें सादर जालीं, तीं छ २४ जिल्कादीं येथें पावलीं. कलकत्त्यास इष्टिनाचे तगिरीवर गौरनर पदाधिकारी मेघफरसन विलायतेहून आल्याचें वर्तमान सेवकानें लेहून पाठविलें होतें. त्याचें उत्तर सादर जालें जे, मेघफरसनाचें पत्र कलकत्त्याहून हुजूर आलें होतें. त्यास पद्धतीप्रमाणें वस्त्रें पाठविलीं. सांप्रत ऐकण्यांत येतें, जे, चेनापट्टणाहून इंग्रज कलकत्त्यास अधिकारी होऊन गेला आहे; याचा शोध तेथें करून वर्तमान लिहिणें.

ऐशास पूर्वी लखनऊचे अखबारेंत वर्तमान आलें होतें जे, मेघफरसनाचे तगिरीं इष्टुर म्हणून इंग्रज गौरनर पदावर आला तो कलकत्त्यास दाखल होऊन स्थानापन्न जाला. मेघफरसन कौंसल्यांत दाखल जाला. हें वर्तमान पूर्वी विनविलेंच आहे. सांप्रतचे आज्ञापत्रीं आज्ञा आली, त्यावरून राजश्री पाटिलबावांस हा मजकूर विचारिला. बावांनीं सांगितलें जे, गौरनर पदाधिकारी मेघफरसनच आहे. त्याची मातबरी विलायतेंत अधिक आहे. इष्टिन गौरनरच होता. मेघफरसनास गौरनर पद व कौंसलाची अमिनी अशीं दोन पदें आहेत. याजवर गौरनर दुसरा आला नाहीं. इष्टिनाचे येथें जनरेल कोट* फौजेचा बक्षी होता. तो चेनाप ट्टणास हैदरखानाचे लढाईत गेला होता. तेथें कामास आला. मृत्यु पावला. त्याचे जागां फौजेचे बक्षीगिरीवर दुसरा इंग्रज जनरेल कोट होऊन आला आहे. मेघफरसनच गौरनर बहाल आहे. अखबारांत खबर तशी होती. आणखी शोध लागल्यास विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar confirms, for Nana's information, the report of the appointment of MacPherson as Governor-General.*

No. 420 1785

छ विज्ञापना ऐसीजे:—श्रीमंतांचें पत्र आपले नांवें सादर जालें जे, राजश्री पाटिलबावांची फौज किती, व सरकारचे सरदार बराबर आहेत त्यांची फौज किती, व राजेरजवाडे सामील जाले त्यांची फौज किती, हा शोध करून आजमास लिहून पाठवणें म्हणोन छ २९ जमादिलावलचे पत्रीं आज्ञा. ऐसियास चांगले शोधानें फौजेचा आजमास तर, श्रीमंत राजश्री पाटिलबावांची फौज व इंगळे व बक्षी मिळोन दहा हजार, गोसावी व बैरागी मिळून दहा हजार, व इंगळ्याबरोबर पेंढारी तीन हजार, याप्रमाणें पाटिलबावांचा जमाव आहे. व सरकारचे सरदारांपैकीं राजश्री शिवाजीपंत बापू बराबर सात आठशें स्वार व बळवंतराव धोंडदेव चारशें व राजश्री कृष्णाजी पवार व सदाशिवराव पवार मिळोन चारशें. यांखेरीज राजेरजवाडचांची फौज म्हणायापैकीं सिमथरकर गुजर दोन अडीचशें, व जालमसिंग कोटेकर ठेवून गेले ते दोनशें स्वार व दोनशें प्यादे, याप्रमाणें जमाव गणतीचा आहे. एकूण सारा जमाव बारा हजार फौज व पेंढारी तीन हजार

*Sir Eyre Coote.

व गोसावी व बैरागी मिळोन दहा हजार याप्रमाणें आजमास आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar computes the strength of the army with Sindia at Mathura at about twelve thousand regulars with three thousand Pindaris.*

No. 421 9th October 1785.

पैवस्ती छ १ मोहरम सन सीत
समानीन, कार्तिक मास.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ५ जिल्हेज मुक्काम श्रीमथुरा स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—सरकारचे जाबसाल होणें, त्याची यादी कलमबंदीची पेशजीं राजश्री पाटिलबावांस लेहून दिली आहे. त्याचे जाबसाल करितों करवितों असें निरंतर होतच आहे. होतील तेव्हां खरे. त्यांपैकीं शहर बराणपूरबद्दल कापडाचे दरसालीना पांच हजार रुपये हेंही कलम लिहिलें आहे. त्यास अगोदर करार बेहडेयास* कलम लिहून द्यावें म्हणजे दरसाल ऐवज सरकारांत पावत जाईल. यंदा कमाविसदार ओंकारमल उज्जनकर जाला, ते समयीं बावांस हटकिलें. बावांनीं दिवाण फडणीस यांस सांगितलें कीं, सदरहू पांच हजार रुपये कलम बेहडच्यांत लेहून देणें. असें सांगितलें असतां शहरचा बेहडा करून दिला त्यांत कलम लिहिलें नाहीं. मीं तगादा केला. तेव्हां दिवाण फडणीस बोलले कीं, चुकोन कलम राहिलें. म्हणून बावांस हटकिलें. बावांनीं कारभारी यांस सांगोन दरसालीं पांच हजार रुपये महाल चलणी याची वरात ओंकारमल कमाविसदार शहर मजकूर याचे नांवें देविली. ती दिवाण फडणिसांनीं छ २१ सवालची करून दिली. राजश्री विठ्ठल नारायण गोखले यांस दरसाल पांच हजार रुपये देत जाणें अशी वरात जाली. ती घेऊन सेवेसीं पाठविली आहे. हुजुरून विठ्ठल नारायण गोखले याजकडे रवाना करावयास आज्ञा जाली पाहिजे. वरात हुजूर विदित व्हावयाकरितां पाठविली, तेथून विठ्ठल नारायण याजला पावली म्हणजे ते दरसाल ऐवज घेत जातील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports his having secured Mahadji's instructions to his Kamavisdar at Burhanpur to recognise the Peshwa's share of customs in that city.*

---

* अजमास, अंदाजपत्रक.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं :—

No. 422 20th December 1785.

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ १७ सफर मुक्काम चिरघांट नजीक सेरगढ* जाणोन स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—परणेवाला राजा याचा पुत्र वडील, राज्याचा अधिकारी सरनेतसिंग असतां, बेणी हजूरी यानें अनिरुद्धसिंग धाकटा पुत्र यासच गादीवर बसवून आपण कारभार करूं लागला. तेव्हां सरनेतसिंग कालिंजर दुसरी जागा आहे तेथें येऊन खेमराज चोबे यांचे विद्यमानें इकडे संदर्भ, आपली मदत करून बेणीचें पारपत्य करावें म्हणोन, लाविला. त्यावरून राजश्री खंडेराव हरि यांसमागमें फौज व पलटणें व तोफखाना देऊन रवानगी केली. बेणीनें सात आठ महिने राजश्री बाळाजी गोविंद यांचे विद्यमानें मामलतीचा जाबसाल लावून शेवटीं फिरोन गोष्ट सांगितली. त्यावरून खंडेराव हरि यांणीं लढाईचा निश्चय करून परणेवर फौज तोफखाना सुद्धां चालून जाऊन लढाई शुरू केली. परण्यांतून ढोकलसिंग व बेणी यांची फौज मातबर स्वार, प्यादा पंचवीस हजार अधिकच होती, ते चालून आले. त्यांसीं लढाई घेऊन मारून काढिले. पांच रोज लढाई तोफांचा मार देऊन सभोंवतीं फौज उभी करून केली. मार्गशीर्ष शु।। षष्ठीस हल्ला करावयाचा निश्चय केला. त्यावरून बेणी व ढोकलसिंग परण्याचे किल्लचांतून रात्रींच निघोन गेले. मागें फौज धावली. परंतु अंधारी रात्र याजमुळें गांठ न पडली. परणें जागा डोंगरांत, बहुत बिकट, आसपास झाडी, किल्लचास तीन खंदक; आजपर्यंत कोणाचा हात लागला नव्हता. असें असतां सांप्रत एक श्रीमंतांचे प्रतापें जागा हस्तगत जाहली. स्वामींस श्रुत व्हावें म्हणून विनंती लिहिली आहे. वरकड इकडील राजश्री बाळाजीपंत नाना यांचे पत्रीं लिहिलें आहे. विनंती करितील. सदैव कृपा पत्रीं तोषविणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji reports to the Peshwa his success over the Bundela Chief Beni. Hajuri and the occupation of Panna by his troops.*

*मथुरेच्या उत्तरेस, यमुनातिरीं.

No. 423 1785

॥ श्री ॥

छ यादी हिंदुस्थानचे स्वारी समागमें फौज व पलटणें :—

२९००० राघोगडचे मसलतीस—
१०००० फौज
७००० पलटणें ७
१२००० गोसावी व बैरागी ठेविले

२९०००
सिवाय तोफखाना.

२००० बुंदेलखंडांत खंडेराव हरीसमागमें—
६००० फौज
१०००० पलटणें १०
४००० मसलतीमुळें मशारनिलेनीं ठेविलीं

२००००
सिवाय तोफखाना.

१६००० जैपूरप्रांतीं—
८००० फौज
८००० पलटणें

१६०००
सिवाय तोफखाना.

२१००० रामगडास रायाजी पाटील यांजसमागमें—
१०००० फौज
११००० पलटणें

२१०००

१९००० सिखांचे तोंडावरी धाररावं शिंदे यांजसमागमें—
८००० फौज
११००० पलटणें ११
———
१९०००
सिवाय तोफखाना.

१०००० बादशाहाजवळ—
४००० फौज
६००० पलटणें ६
———
१००००
सिवाय तोफखाना.

४००० दिल्लीस नेहमीं—
१००० फौज
३००० पलटणें
———
४०००

१७००० समागमें नेहमीं—
१०००० फौज
७००० पलटणें
———
१७०००
सिवाय तोफखाना.

७००० मेरट प्रांतीं हैबतराव फाळके यांसमागमें—
२००० फौज
५००० पलटणें ५
———
७०००
सिवाय तोफखाना.

१४००० याखेरीज

६००० शीख बघेलसिंग व डलेवाले माहितगार या प्रांतीचे सबब पाणिपतचे प्रांतीं जागा सरंजाम लावून देऊन ठेविले.

३००० बघेलसिंग

३००० डलेवाले

६०००

८००० रावराजा प्रतापसिंग

४००० प्यादे

४००० स्वार

८०००

१४०००

१५७०००

तपसील

७३००० फौज

६२००० पलटणें

८१००० गोसावी व बैरागी

४००० प्यादे

१५७०००

¶*This is an abstract (probably sent to Poona) showing the strength of forces, horse and foot, working under Mahadji Sindia and armies engaged on different expeditions.*

No. 424 2nd January 1786.

पैवस्ती चन्द्र ४ रबिलाखर सीत समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १ माहे रबिलावल मुकाम चीरघाट यमुना तीर नजीक सेरगड

मथुरा वृंदावनाहून पश्चिमेस दाहा कोस, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—चंद्र २९ माहे जिल्काद व चंद्र २० माहे जिल्हेज या तारखांचीं पत्रें सादर जाहलीं, तीं येथें पावलीं. त्यांत राजश्री पाटिलबावा यांस पत्रें होतीं तीं प्रविष्ट केलीं. मुख्य मजकूर दोन. एक मजकूर इंग्रजांचीं पलटणें कुमकी लवकर बिदा करावीं. दुसरा मजकूर, फरासीस टिपूस सामील होतात, ते न होत येविसींचा बंदोबस्त इंग्रजांनीं करावा. हे दोन मजकूर बावांस लिहिले होते. त्यावरून बावाचें व इंद्रसेन याचें बोलणें होऊन कलकत्त्यास पत्रें गेलीं. स्वामींचे पत्राचीं उत्तरें बावांस मागितलीं. ते चिटणिसास लिहावयास आज्ञा जाहली आहे. एका दो रोजीं तयार होऊन रवाना होतील. बावांनीं बोलून सांगितलें कीं, कलकत्त्याहून मेघफरसन इंग्रज यानें वकील श्रीमंतांचे दरबारास रवाना केला आहे. जवळपास पोंहचलाच असेल. तो इंग्रज मातबर फार थोर आहे. त्याचा आदर सन्मान उत्तम रीतीनें जाला पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes that Mahadji Sindia had referred the question of British assistance against Tipu to the authorities at Calcutta. Sindia also asks the Poona Darbar to give a good reception to Malet, appointed to the Poona Residency.*

No. 425 2nd January 1786.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन लिहीत-असिलें पाहिजे. विशेष :—गौरनेर मेघफरसन साहेब यांणीं श्रीमंतांपासीं आपले कडील मातबर असावा याकरितां मालेटसाहेब नामें मातबर माणूस दर्याचे मार्गें परभारा मुंबईस पाठविले आहेत. मुंबईस पोहोंचोन श्रीमंतांस अर्जी व आपणांस पत्र पाठवितील. त्यास, आपलें उत्तर श्रीमंतांचे पत्रासहित गेलें म्हणजे पुण्यास येतील. त्यांचा सन्मान यथास्थित जाहला पाहिजे. मातबर माणूस आहे येविसीं गौरनेर साहेब यांणीं येथ लिहिलें होतें, त्यावरून आपणांस लिहिलें आहे. रवाना चंद्र १ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia requests Nana to offer a warm reception to Malet on his arrival at Poona.*

No. 426 4th January 1786.

पैवस्ती छ ४ रबिलाखर

सीत समानीन माघ मु।। ता। सगर.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष :—कलकत्त्याहून मेघफरसन साहेब यांचें पत्र आपले कडील मातबर श्रीमंतांपासीं असावा याजकरितां परभारा कलकत्त्याहून जहाजाचे मार्गे मालत साहेब नामें मातबर रवाना केले आहेत. मुंबईस पोहोंचोन श्रीमंतांस व राजश्री नानांस पत्र लिहिणार. त्यांचें उत्तर गेलें म्हणजे पुण्यास येतील. त्यांचा सन्मान व्हावा. येविसीं आपलींही पत्रें श्रीमंतांस व नानांस जावीं म्हणोन आलें. त्यावरून व या समयीं टिपूची मसलत रुबकार* आहे, इंग्रजांकडील मातबर सरकारांत आला हें टिपू व फरासीस यांस समजलें त्यावरून लिहिलें असे. तरी मालत साहेब मुंबईस पोहोंचोन पत्र लिहिलें, त्याचें उत्तर जाऊन तेथें आल्यावरी त्यांचा सन्मान सरकारांतून यथास्थित व्हावा, इंग्रजांकडील पलटणें टिपूकडील मसलतीवरी मदतीस यावीं, येविसीं इंद्रसेन साहेब यासीं बोलोन व येथूनही पत्रें गौरनेर यांस लेहून कलकत्त्यास रवाना केलीं आहेत. इंद्रसेनाचे बोलण्यांत पलटणें लवकरच येतील, अथवा मुंबईस त्यांची फौज आहे त्यांस पत्रें पाठवितील असें आहे. त्यास, त्यांचीं पलटणें अथवा मुंबईस पत्र येईल तें लवकर रवाना केलें जाईल. छ ३ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia writes to Nana about Malet's reception and thinks that the Resident's arrival in Poona at that hour would prove a timely check against Tippu's aggressions.*

No. 427 12th January 1786.

छ १९ राखर सीत.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—इंग्रजांकडे वर्तमान फरासिसांचें संधान मुसा मुतीन†

---

* येऊन ठेपलेली. † Montigne.

याचे विद्यमानें सरकारांत लागलें आहे म्हणोन आलें. त्यावरून इंद्रसेनसाहेब येथ विचारीत होते. त्यास, मुसा मुतीन याचे विद्यमानें फुलचरीस फरासीस आहेत त्यांचें संधान आहे, किंवा फुटकर फरासीस चाकरीचे उमेदवारीनें फिरतात त्यांचें बोलणें सरकारांत चाकर रहावयाचें आहे, हें लिहिलें पाहिजे. त्याप्रमाणें इंद्रसेनसाहेब यांसीं जाबसाल केला जाईल. फुलचरीस मुख्त्यार फरासीस आहे त्याचें संधान सरकारांत लागोन त्याचें पत्र आलें असिल्यास, त्याचें संधान लावून ठेवून त्याचे पत्राची नकल असल बमोजिब व त्याचें बोलणें जसें असेल तसें ल्याहावें म्हणजे इंद्रसेन यासीं बोलावयासीं येईल कीं, फरासीसांस नाहीं म्हटल्यास टिपूकडील संधान करतील. तेव्हां तुम्हीं आम्हीं मिळोन टिपूचें व फरासिसांचें पारपत्य करणें लागेल. याप्रमाणें यासीं बोलण्याचा निश्चय पोक्त करून आपणांस लिहिलें जाईल. फरासीस तुटपुंजी आहेत, व इंग्रज पैकेपूर व जमियतीनें पोख्त आहेत. यास्तव यांसीं पक्कें करून सत्वर लेहून पाठवूं. फरासिसांचें बोलणें फुलचरीस मुख्तार आहे त्याचें, किंवा फुटकर उमेदवारीनें फिरतात याचें, हें सत्वर उगवून लेहून पाठवावें. कुमक लौकर यावी येविसीं इंद्रसेन यास बोलोन कलकत्त्यास पत्रें गेलीं आहेत. त्यांचें उत्तर आलें म्हणजे आपणांस लिहिलें जाईल. मालतसाहेब परभारें कलकत्त्याहून पुण्यास यावयाकरितां मुंबईस रवाना जाला आहे. त्यास, मुंबईस आला असेल. त्यास पत्र लेहून बोलावून घ्यावें. मुंबईस जनराल असेल त्यासही पत्रें मालतसाहेब याचे रवानगीविसीं ल्याहावें. रा॥ छ ११ रा॥वल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji inquires from Nana the nature of Monsieu Montigne's mission to Poona, whether he was an accredited French ambassador or an adventurer seeking service. The information was required by the G. G.*

No. 428 17th January 1786.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी :—आपण पत्र पाठविलें तें पावलें. टिपूचे कलमाविसीं आपण लिहिल्यावरून इंद्रसेन यास बोलावून त्यासीं जाबसाल टिपचे कलमाबाबत व टिपूचे बदमामलीचे चालीचे जाले. त्यास त्याणें उत्तर केलें कीं, कलकत्त्यास लेहून पाठवितों; उत्तर आणवून बोलूं. बोलण्यांत भवति न भवति होतां, उभय-

पक्षीं कुमकेचा प्रकार होणार नाहीं असा भाव बोलण्यांत दिसोन आला, म्हणन लिांा तें कळलें. त्यास, टिपूच्या मसलतीविसीं पेशजी वारंवार लिहिण्यांत गेलें आहे कीं, टिपूची चाल दुरुस्त नाहीं. इकडे मसलत करण्याविसीं गाडद व तोफखाना व फौजेचा सरंजामही भारी करीत आहे. कृष्णेचें पाणी उतरतांच इकडे मसलत पाडावी अशी योजना आहे, म्हणून बातम्या येतात. व कित्येक उजमाचीं* भाषणें मनस्वी बातमींत लिहिलीं येतात. असें टिपू करीत असतां सरकारांतून मसलत करणें प्राप्त. त्याची तयारी होत आहे. सरकारांत पैक्याची वोढ भारी. मागील देणीं मुबलग. पुढें दरमाहाचा खर्च चालणें व मसलतही लहान नव्हे. लांबली तरी वर्षोविरीष लागणार. होईल तेथवरीं करीतच आहों. या मसलतीस इंग्रजांचीं पलटणें जरूर असावीं. येणेंकरून मसलतीस उपयोग व टिपूकडे इंग्रज मिळतील असा संदेह राहणार नाहीं. हे भाव लिहिण्यांत येत गेले. त्याचें उत्तर हल्लीं वर लिहिल्याअन्वयें आलें. त्यांत उभयपक्षीं कुमकेचा प्रकार होणार नाहीं म्हणून लिांा आहे. त्यास, हें तर तहनाम्यांतच आहे कीं, परस्परें दुष्मनाची कुमक करूं नये. तेव्हां टिपूची कुमक करणार नाहीं. परंतु हैदरखानासीं तह परभारें करूं नये असें करारांत असतां केला. हैदरखान श्रीमंतांचे दोस्तींत राहील तोंपावेतों इंग्रज त्यासीं खलष† करणार नाहींत असेंही तहनाम्यांत एका कलमांत आहे. तेव्हां टिपूनें दोस्ती सोडून बिघाड केला, यास्तव इंग्रजांनीं पलटणें सरकारच्या मदतीस द्यावीं असेंही या कलमावरून होतें. यास्तव हल्लीं आपण इंग्रजांसीं चांगले रीतीनें बोलून टिपूचे मसलतीस इंग्रजांचीं पलटणें लौकर येतें करावें. पेशजीचे रवानगींत येविसींचे विस्तार लिहून पाठविले आहेत, ते ध्यानांत आणून त्याप्रांा लौकर अमलांत यावें. आपल्या लिहिल्यांत नवा जनराल कलकत्त्यास आला आहे; इंद्रसेनासीं बोलून पत्रें पाठविलीं आहेत; परंतु इंग्रज कोणाचीच कुमक करणार नाहीं असें इंद्रसेनाचे बोलण्यांत दिसलें, असें लिहिलें आहे. त्यास, जनरल नवा आला तरी कारभार करारमदार जे चालत आले त्याअन्वयेंच होत असतात. असो. अलीकडे चेनापटण वगैरे जागांच्या बातम्या आल्या, त्यांत फरासिसासीं टिपूनें राजकारण करून चार हजार गोरा, दहा हजार बार, याप्रांा फरासिसांनीं टिपूस द्यावा याप्रांा ठरून, टिपू बेंगरुळास आला. फरासीस फुलचरीहून बेंगरुळास आणविले, ते आलियावरी पुढें येणार. येविषईं पूर्वी एक पत्र पाठविलें व सदाशिव दिनकर यांसही लिहिलें त्यावरून कळलेंच

* उजम=गर्व, दर्पोक्ति. † कलह.

असेल. त्यास, फरासिसांचा जनराल मोरस बंदराहून* जमाव घेऊन फुलचरीस आला. त्याणें सरकारांत पत्र पाठविलें कीं, अमेरिकाचा मुलूक इंग्रजांस जरबेंत आणन आम्हीं घेऊन तह केला. या मसलतीकरतां आमचा भारी जमाव पूर्वी इकडे न आला. हल्लीं तिकडील काम तमाम जाहलें. याकरतां भारी जमाव इकडे आला व मागाहून येत आहे. त्यास, आम्ही सरकारासीं स्नेह चहातों. याप्रों मजकूर लिहून फरासिसांकडील वकील येथें मुसा मुतीन आहे त्यासही ये विषईं राजकारणाचे अर्थ लिहिले, ते त्याणेंही सांगितले.त्यास, सरकारचा व इंग्रजांचा तह ठरला त्यांत फरासिसासीं राजकारण करूं नये असें आहे. याकरतां आम्हीं उपेक्षाच केली. हल्लीं बातम्यांवरून फरासीस टिपूस सामील जाले हें कळलें. त्यास इंग्रजांचे तहांत कलम आलें, याकरतां आम्हीं राजकारण न केलें कीं, असें करतां फरासीस टिपूस मिळाले तरी इंग्रज त्याचे पारपत्याजोगा सरंजाम पाठवून पारपत्य करतील. त्यास, आपलें बोलणें इंद्रसेनासीं होऊन कोणाचीच कुमक करणार नाहींत हें लिहिलें आलें. तेव्हां तहनाम्यांत दुसरे टोपीकरांसीं राजकारण करूं नये, आणि दुसरे टोपीकर सरकारचे दुष्मनाची कुमक करूं लागले तरी इंग्रजांनीं उगेच असावें, असें होतें कीं काय? या करतां आपण इंद्रसेनासीं चांगले रीतीनें बोलून, आपलीं व त्याचीं पत्रें दोन तीन जलदीनें कलकत्त्यास पाठवून, फरासीस टिपूस सामील होऊन आले तरी त्यांचे पारपत्याजोगा सरंजाम इंग्रजांनीं फरासिसांस लिहून टिपूची कुमक कोणेही प्रकारें न करीत असें करावें; आणि पूर्वी ठरावांत आलें होतें त्याप्रों दरमहाचा करार करून, पाच पलटणें तरी निदानी टिपूचे मसलतीस लौकर इंग्रजांनीं पाठवावीं, तीं लौकर येऊन पोंहचेत असें करावें. फरासिसांचा मातबर एक सरदार फिरंग्याचे गोव्यास येणार. याकरतां फरासिसांचा वकील येथें आहे त्यास त्याचें पत्र आलें आहे कीं, तुम्ही गोव्यास येणें. तो निरोप मागूं लागला तेव्हां त्यासीं चार गोष्टी स्नेहाच्या बोलून सांगितलें कीं, फरासिसांनीं टिपूची कुमक करूं नये याप्रों करावें. तो बोलिला आहे कीं, मी जाऊन करतों. परंतु ते जनराल आहेत. जर करारमदार त्यांचे जाले असले तरी मी विलायतेस लिहून पाठवीन. तेव्हां उगाच प्रयत्न करावा म्हणोन केला आहे. विलायतेस काय लिहितो, आणि तेथून उत्तर कधीं येणार, तोंपावेतों इकडील मसलत कसी काय होईल आणि उपयोगी काय पडणार, समजलेंच

*Mauritius.

आहे. इंग्रजांचा जाबसाल आपले विद्यमानें, तेव्हां लिहिल्याअन्वयें मन घालून करावे. राजश्री हरिपंततात्या आश्विन शु। एकादशीस* मुहूर्तेंकरून डेरेदाखल जाहले. नवाब मोहरम महिन्यांत निघणार, तो सुमार पाहून आम्हींही निघों. श्रीमंतांचें दैव आहे. होईल तेथवरी करीतच आहों. इंग्रजांचीं पलटणें जरूर कुमकेस येत तें लवकर करावें. म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, आपण छ २० जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं छ २४ सफरीं पावलीं. टिपूचे मसलतीस इंग्रजांची कुमक यावी येविसीं इंद्रसेनासीं बोलून कलकत्त्यास पत्रें पाठविलीं आहेत. त्याचें उत्तर लौकर यावें अशी ताकीद केली आहे. उत्तर आलें म्हणजे सत्वर आपणांस लिहिण्यांत येईल. इंग्रजांकडे वर्तमान फरासिसांचें संधान मुसा मुतीन याचे विद्यमानें सरकारांत लागलें आहे, म्हणोन आलें. त्यावरून इंद्रसेनसाहेब येथें विचारीत होते. त्यास, मुसा मुतीन याचे विद्यमानें फुलचरीस फरासीस आहेत त्यांचें संधान आहे, किंवा फुटकर फरासीस चाकरीचे उमेदवारीनें फिरतात त्याचें बोलणें सरकारांत चाकर राहावयाचें आहे, हें लिहिलें पाहिजे. त्याप्रों इंद्रसेनसाहेब यांसी जाबसाल केला जाईल. फुलचरीस मुख्तार फरासीस आहे त्याचें संधान सरकारांत लागोन त्याचें पत्र आलें असिल्यास, त्याचें संधान आंतून ठेवून त्याचे पत्राची नक्कल असल-बमोजिब व त्याचें बोलणें जसें असेल तसें त्याहावें. म्हणजे इंद्रसेन यांसी बोलावयासीं येईल कीं, फरासिसांस नाहीं म्हटल्यास टिपूकडील संधान करतील. तेव्हां तुम्हीं आम्हीं मिळोन टिपूचें व फरासिसांचें पारपत्य करणें लागेल. याप्रमाणें यांसीं बोलण्याचा निश्चय पोख्त करून आपणांस लिहिलें जाईल. फरासीस तुटपुंजी आहेत व इंग्रज पैकेपूर व जमियतीनें पोख्त आहेत. यास्तव यांसीं पक्कें करून सत्वर लेहून पाठवूं. फरासिसांचें बोलणें फुलचरीस मुख्तार आहे त्याचें, किंवा फुटकर उमेदवारीनें फिरतात याचें, हें सत्वर उगवून लेहून पाठवावें. कुमक लौकर यावी येविसीं इंद्रसेन यांसी बोलून कलकत्त्यास पत्रें गेलीं आहेत. त्यांचें उत्तर आलें म्हणजे आपणांस लिहिलें जाईल. मालतसाहेब परभारें कलकत्त्याहून पुण्यास यावयाकरितां मुंबईस रवाना जाला आहे. त्यास, मुंबईस आला असिल्यास त्यांस पत्र लेहून बोलावून घ्यावें. मुंबईस जनराल असेल त्यांसही पत्र मालतसाहेब याचे रवानगीविसीं त्याहावें. राजश्री हरिपंततात्या मुहूर्तेंकरून बाहेर निघाले. त्यास पुढें कूच करून

* ता. १४ ऑक्टोबर १७८५.

गेलेच असतील. नवाब व भोसले वगैरे सामील जाहलेच असतील. सविस्तर लेहून कळवावें. रा॥ छ १६ रावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In reply to Nana's appeal for military help from the Company, as stipulated in the late treaty, against Tipu's hostile preparations, Mahadji replies he was agitating the point and was expecting an answer from Calcutta.*

No. 429 January 1786.

॥ श्री ॥

छ विज्ञापना ऐसीजे :—छ ९ सफरचें* आज्ञापत्र सादर जालें त्यांत आज्ञा बितपसील :—

बादशाहापासोन दक्षणेंत कोणास पत्र अगर किताबवस्त्रें बहुमान नवीन होणें तो श्रीमंतांस लिहून उत्तर जाईल तसें घडावें, ही मार्गाची गोष्ट आहे. पूर्वी सांवतांस बहुमान आला. आतां राघोजी आंगरे यांस आला. याउपर कोणासही येऊं नये हें राजश्री पाटिलबावांसीं बोलून उत्तर पाठविणें.

बादशाहाजवळ बंदोबस्त राजश्री पाटिलबावांचा. कोठेंही बादशाहाचें पत्र जाणें तें पाटिलबावांस कळऊन जावें. असें असतां कांहीं दरज† आढळली म्हणोन लिहिलें. युक्तीनें सुचवणें.

टिपूचा वकील तिकडे गेला आहे, त्यासीं जाबसाल न करितां परिछिन्न घालऊन देवणें.

एकूण तीन कलमांची आज्ञा आली. याजकरितां मीच पाटिलबावांकडे दुखणकरच जाऊन, आज्ञेप्रमाणें मजकूर निवेदन केले. ते त्यांनीं मान्य करून उत्तर दिलें जे, याउपर दक्षणेस बहुमान किताब सरकारचे आज्ञे खेरीज जाणार नाहीं. बादशाहाचे पत्रांचा बंदोबस्त असावा. आमचे इतल्याखेरीज कोठें कोणासही जाऊं नये. युक्त लिहिलें आहे. परंतु बादशाह कोमल-ज्ञानी, बहु-मति, क्षणभंगुर. शद्धाचें प्रमाण नाहीं. करार बहुत वेळ जाले. फिरून मनस्वी वर्तणूक आहे. याचा बंदोबस्त करावयाचे विचारांत आहोंत. विलग दिसल्यास उमजतील. यास्तव त्यांचे मर्जीनुरूपच या पल्यावर आणून बंदोबस्त करावा या विचारांत

---

* ता. १२-१२-१७८५. † फूट, भेद.

असों. टिपूचा वकील दिल्लींत होता. बादशाहासीं जाबसाल करीत होता. नजर-नियाजही* देत होता. त्याचे जाबसाल कांहीं होऊं न देतां काढून दिला. तो येथून गेल्यास एक महिना जाला. आतां येथें त्याचा वकील नाहीं. असें उत्तर केलें. हे विज्ञापना.

पाटिलबावांनीं नवा शिक्का दोन महिने जाले केला आहे. तो लाल कागदावर करून घेऊन पाठविला आहे. बावांस कळनच घेतला आहे. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana informing him of Sindia having dismissed Tipu's agent at Delhi, and having insisted on the Emperor's intercourse passing through no other channel than his.*

No. 430 January 1786.

पै॥ छ ८ सवाल सवा समानीन.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—येथें पैक्याची ओढ फार जाली. सबब राजश्री पाटिलबावा यांची मर्जी कारभारी यांवर फारच नाखुष जाली. यांचें मानस कीं, कारभारी यांनीं कोठें ओढ पडूं न देतां खर्च चालवावा. तें कोणाच्यानें होत नाहीं. याकरतां सर्वांवरच मर्जी नाखूष आहे. त्यांत राजश्री माधवराव गंगाधर यांजवर तर फारच बेमर्जी आहे. आश्विनमासीं तगिरी करावीसें होतें तेव्हां प्रसंग राहिला. आतां फारच खफा ! त्यांचे शरीरीं समाधान नवतें, म्हणून आठ पंधरा रोज दरबारास गेले नाहींत. यांनीं अगोदर त्यांजवर निमित्त ठेविलें कीं, मजसीं मिळाले आहेत. खलबतांतील वर्तमान सांगतात. हें दुर्निमित्त फार दिवस लावितात. हल्लीं दुखण्यामुळें दरबारास न जात. तितकेंच निमित्त ठेऊन त्यांजकडील मखलासी व द्यावें हे कायदे खासगीकडील बाळाजी सखाराम जामगांवकर कुलकरणी याजकडे सांगितले. तो करीत असतो. माधवराव घरींच असतात. पुढें होईल तें विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. मजवर मर्जी फार रुष्ट आहे. निमित्त ठेविलें आहे जे, बादशाही पदांचें निमित्त व बादशाही खिलत

---

* नजराणा.

उजनीस खोळंबविला आहे हें यानेंच केलें, असें म्हणतात. वर्तमान श्रुत असावें हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes of the suspension from duty of his Diwan, Madhavrao Gangadhar, by Sindia on account of his being suspected to be in secret sympathy with Nana's agent.*

No. 431 January 1786.

पैवस्ती छ १ रविलाखर.

(लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—

राजश्री आंबाजी इंगळे यांचें समाधान राजश्री पाटिलबावा यांणीं करून त्यांस दोन कामें सांगितलीं. पाणिपताकडे धारराव शिंदे यांची फौज होती व मशारनिल्हेचे चिरंजीव तिकडे होते. त्यास धारराव येथें आल्यानंतर दुखणाईत पडले. वाखा फार जाहला. याकरितां त्यांचे चिरंजीव येथें आले. पुढें त्यांच्यानें तिकडील काम होत नाहीं हें समजून, तें काम इंगळे यांजकडे सांगितलें. त्या कामावर आंबोजी इंगळे यांचे धाकटे बंधू बाळोजी इंगळे रवाना होणार. व दुसरें काम या प्रांतीं मेवातीयांचें पारपत्य करून चार रुपये मेळवावे. हें काम खासा जातीनें जाऊन करावें याप्रमाणें ठराव होऊन अंबाजी इंगळे यांची रवानगी जाली. गेले.

राजश्री लालाजी बल्लाळ कोटेकर यांचें वर्तमान पूर्वी सेवेसीं विनविलें आहे. मेवाडच्या मसलतीमुळें मशारनिल्हे दों चंव लक्षांचे पेंचांत आले. त्याविसीं येथें पाटिलबावांसीं बोलून परिणाम लावावा याजकरितां येथें येऊन दोन महिने बसले. नित्य उठोन दरबार करावा, मंडळीचे आर्जव करावे. कोण्याही तऱ्हेनें आपण पेंचांतून निघावें या उद्योगांत होते. तें अवघें एकीकडे राहून आणखी दोन लक्ष रुपये त्याजवळ नवे मागतात. ते म्हणतात, ज्या मसलतीमुळें मी पेंचांत आहें त्याची वाट काय? उत्तर होतें जे, मेवाडची मसलत चांगले नेट देऊन आमचे मनांत करावयाचीच आहे. घडेल. त्याचा इतका अंदेशा काय? प्रस्तुत आमचें काम दोहो लक्षांचें करावें. तुम्हांकडे कोटें व राघोगड दोन संस्थानें आहेत. त्याचे ऐवजीं काम करावें. ते म्हणतात ऐवज पाहून आज्ञा करावी. अशी भानगड लागली आहे. निश्चय अद्याप नाहीं. लालाजी बल्लाळ अंत:करणीं श्रमी आहेत.

राजश्री माधवराव गंगाधर यांचा कारभार निघाल्यानंतर येथें होते. त्याजवर कांहींका दिवसांनीं त्यांस भ्रांति होऊन बोलणें अगदीं राहिलें. अन्न चार चार दिवस नाहीं. बळेंच दुसऱ्यानें उचलून स्नान घालावें, शौचास न्यावें. मागतीं तेथून दुसरा उठवील तेव्हां उठावें. राहुटींत बसले तर बिछाना सोडून भूमीवर बसावें. तेथेंच निजावें. रात्रीस बाहेर पळावें. ते बळेंच माणसांनीं ओढून आणावें. अशी दुर्दशा फारच जाहली. हें सविस्तर दिनचर्येचें वर्तमान पाटिलबावांस वरचेवर कळतच होतें. कोणी म्हणत कारभार निघाल्यामुळें धास्त खाऊन हौलदील जाहले. कोणी देवाचें सांगत. दोन महिने अडीच महिने अशा तऱ्हेनें येथें होते. साऱ्यांनीं बावांस विनंती केली कीं, आपण एक वेळ समक्ष पाहून त्यांची खातरजमा करावी म्हणजे उलगडलें तर न कळे. त्यावरून बावा व भाई आदिकरून समस्त मंडळी त्यांचे राहुटीस जाऊन चार घटका बसले बोलले. परंतु वृत्तीच परस्वाधीन जाहली, असें पाहून बावांनीं सर्वस्व माफ करून देशास जावयास निरोप दिला. त्यांसमागमें कारकून मंडळी वगैरे होते ते रावजीस घेऊन देशास गेले.

राजश्री खंडेराव हरि यांजकडे ग्वालेर सुभा कछवाघार, भिंडभांडेर, गोहद ह्या मामलती दरोबस्त आहेत. त्यांजवर लाला नौबतराय म्हणून खत्री, ज्यानें दत्तू खिजमतगाराचें मर्म पाटिलबावांच्या दृष्टीस पाडलें, त्यावरून दत्तू कैदेंत घालून पुढें तोफखान्याचें व पलटणचें काम बाळाजीपंत निसबत मीर्जा यांनीं त्याकडे सांगविलें, त्याणें प्रस्तुत खंडेराव हरीच्या मामलतीवर तचकरा* बावांस समजाविला आहे. त्यामुळें बखेडा प्रस्तुत पडला आहे. खंडेराव आपाकडील कारकून येथें आहेत. ते म्हणतात, आम्हांस मामलत नको. दुसऱ्यास पाठवा. रुजुवात होऊन येईल तो पैका आमचे फाजिलांत वजा घ्या. बाळाजीपंत सध्यां येथें कारभार अवघाच करितात. त्यांचे हस्तक नौबतराय. अशी भानगड त्या मामलतीची आहे. पुढें पहावें. या लष्करांत इतके दिवस मामलेदारावर तचकरे होत नवते. आतां नौबतरायानें चाल पाडली. पुढें पाहावें पुढें तचकरे खरे होतात किंवा खोटे होतात, सेवेसीं विनंती करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana news from Sindia's camp —the main items being the expedition sent towards Panipat under the command of Ambuji Ingle, and the demand made upon Khanderao Hari for arrears.*

*पैशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें.

No. 432 1st February 1786.

पौ छ ९ जमादिलावल सन सीत,

फाल्गुनमास.

छ सेवेसीं विनंती सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १ रबिलाखर मुक्काम नजीक डीग स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—छ ९ मोहरम व छ ९ सफरचीं आज्ञापत्रें सादर जालीं, त्यांत राजश्री पाटिलबावांस पत्रें होतीं तीं प्रविष्ट केलीं. छ ९ मोहरमचे पत्राचें उत्तर पाटिलबावांनीं इंग्रज फरासिसांचे मजकुराचें दिल्हें तें पाठविलें आहे. वरकड पत्रें दोही रवानग्यांत पाटिलबावांचे व सेवकाचे नांवचीं त्यांचीं उत्तरें बावा देणार आहेत. लेहून सिध होऊन आलीं म्हणजे रवाना होतील. नजफकुली, माचेडीवाला राव व आंबुजी इंगळे यांचा बंधु जैपूर प्रांतांत गेले आहेत. त्यांनीं माधोसिंग राजा जैपुरकर याचा जेष्ठ पुत्र पृथ्वीसिंग ज्यानें राज्य करून मृत्यु पावला. नंतर धाकटा बंधू प्रतापसिंग प्रस्तुत जैपुरांत गादीवर आहे. पृथ्वीसिंगाचा पुत्र कृष्णगडांत होता तो टिकाईत* असतां प्रतापसिंगानें गादी घेतली, हें गैरसाल जालें आहे. त्यास गादीवर बसवावें हा मनसबा माचेडीवाला राव यानें पाटिलबावांसीं करून, नजफकुली व इंगळे यांसहवर्तमान गेला. त्यानें कृष्णगडाहून पृथ्वीसिंगाचा पुत्र चार हजार फौजेनसीं आपणाजवळ आणून बावांस लेहून पाठविलें कीं, आपण येऊन याजला गादीवर बसवावें. बावा बादशाहासहित कूच करून जाणार आहेत. कूच जाल्यावर विनंती करीन. शेरगडानजीक चिरघाट यमुनातीरीं दीड महिना मुक्काम जाला. तेथें बादशाहा येऊन भेटून मुक्काम करून होते. रामगडही सर जाल्याचें वर्तमान येथेंच आलें. त्या किल्ल्यांत अफराशाबखानाचा माल बहुत आहे असें बादशाहा आदिकरून सारेच म्हणत होते. किल्ला घेतला तो इमान प्रमाण देऊन. राजश्री रायाजी पाटील अफराशाबखानाचा भाऊ जहांगीरखान यास बावांचे भेटीस घेऊन आले. त्याची बायको वस्तभाव सारें किल्ल्यांतून काढून दुसरी गढी त्यांस रहावयास दिली. तेथें वस्तभावेसुधां जाऊन राहिली. जाहांगीरखानाची भेट जाल्यानंतर बावांनीं त्याजवर चौक्या बसविल्या व ती बायको आदिकरून गढींतून आणून कैद केले. जवाहीर वगैरे मालाचा तगादा केला. जहांगीरखान व ती बायको नाकबूल जाऊन,

* टिक्याचा मालक, हक्कदार.

नारायणदासावर अदावल (त) घातली कीं, हा कारभारी नजफखानापासून आहे; याजपासोन माल घ्यावा. त्यावरून नारायणदास कैद केला. त्याचे सुटकेकरितां अनुपगीर गोसावी यानें रदबदल केली, ती बावांनीं मानिली नाहीं. म्हणून गोसावी यानें वसवास* खाऊन दरबारचें येणें सोडिलें. तें निमित्त लाऊन, गोसाव्याची जागीर उमरावगिरी सुधां कंबेष विसा लक्षांची आहे, ती बावांनीं जप्ती केली. गोसाव्यानें सोडचिठ्या दिल्या. त्या घेऊन भांडेर सुधां कमाविसदार पाठविले. मोट व वृंदावन गोसाव्याकडे आहे तेंही घेतीलसें वाटतें. राजश्री राघोपंत गुरुजी स्वामींची आज्ञा घेऊन आले. त्यांजवळ स्वामींचें भाषण फार जालें आहे. ते पौषी अमावास्येचे दिवशीं ग्रहपर्वानिमित्त मथुरेस पावले. येथें आल्यावर भेटीनंतर वर्तमान कळेल. ऐकण्यांत आलें आहे जे, बादशाही खिलत उज्जनींत आटकून राहिला आहे, त्याची रवानगी पुण्यास करावयाची सलाह आहे असें ऐकतों. प्रत्ययास येईल तें खरें. बावांचें पत्र पाठविलें त्याचें उत्तर लौकर यावें म्हणोन बावांनीं सांगितलें आहे. तर उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. अफराशाबखानाचे मालाचें ठिकाण लागत नाहीं. जाहांगीरखान व ती बायको नारायणदास सुधां ग्वालेरीस पाठवणार ऐकतों. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana Sindia's decision to march in person to Jaipur to install the minor son of Prithvising and the success of his troops at Ramgad, without, however, acquiring the wealth of Afrasiyab Khan. Sindia is reported to have imprisoned the wife and brother of the Khan to make them discover his treasures. Sindia is also mentioned to have resumed the Jagirs granted to the Gosai brothers.*

॥ श्री ॥

No. 433 19th February 1786.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १९ माहे रबिलाखरपर्यंत मुक्काम लष्कर नजीक किल्ले ग्वाल्हेर चार कोस

---

* धास्ती.

येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :— स्वामींकडून बहुत दिवस पत्रें येऊन सांभाळ होत नाहीं. तरी असें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासीं आज्ञा जाली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वगैरे वर्तमान, राजश्री जनार्दनपंत वैद्य सेवेसीं निवेदन करतील, त्याजवरून श्रुत होईल. मशारनिल्हे चिरंजिवाचे लग्नाकरितां राजश्री पाटिलबावांचा निरोप घेऊन सेवेसीं आले आहेत. कार्यं उरकोन लौकरच मागतीं येतील. मशारनिल्हेचे घरीं लग्नाचें प्रयोजन होईल त्या समयीं स्वामींस कळेल त्याप्रमाणें साहित्य करण्याविसीं आज्ञा जाहली पाहिजे. स्वामींची आज्ञा घेऊन देशींहून सैन्यांत आलों, तेव्हां खासगत जागा पागेसाठीं पाहिजे म्हणोन विनंती केली होती, आणि स्वामींचीही परवानगी राजश्री बाळाजीपंत लेले यांजकडे जाहली होती. परंतु अद्याप जागा सेवकाचे हस्तगत जाली नाहीं. मौजे..... येथील सरकारचे नजरेचे रुपये सरकारांत नेवासकर घेत असतात, येविसींची माफी करावी म्हणोन विनंती केली होती. त्याचीही परवानगी मशारनिल्हेकडे राजश्री तात्या पेंडसे याजकडून सांगविली होती. परंतु तेंही काम होऊन सेवकास पत्र आलें नाहीं. त्यास येविसीं राजश्री जनार्दनपंत सेवेसीं विनंती करतील, त्याप्रमाणें बंदोबस्त करून देणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar asks a personal favour of Nana for rendering all possible help in the marriage ceremony of Janardanpant Vaidya's son.*

No. 434 19th February 1786.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष :—राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांजकडे सन आर्बा समानीनची बाकी व सन खंमस व सालमजकूर दुसाला कराराप्रमाणें पैका येणें तो येत नाहीं, व फौज चाकरीस यावयाचा करार आहे त्याप्रमाणें येत नाहीं व आमदाबाद वगैरे सरकार तालुक्यांत मनस्वी उपद्रव करून पैका घेतात, वगैरे कित्येक जाबसाल त्यांजकडे सरकारचे आहेत, त्यांचाही फडशा होत नाहीं. याजकरितां याचा बंदोबस्त करावा लागेल. येविषयीं इंग्रजांची दिक्कत नसावी,

म्हणून पूर्वी लिहिलें होतें; परंतु उत्तर आलें नाहीं. व त्यांची वर्तणूकही सुधी नाहीं. इंग्रजांचे तहनाम्यांत तर पाटिलबावांनीं उगवून घेतलें आहे कीं, महालांच्या बाकीचा तगादा होऊं नये व पुढें कराराप्रमाणें पैका देतील व चाकरीही करतील. असें असतां त्यासही ठिकाण नाहीं. त्यापक्षीं येविषयींचा बंदोबस्त सरकारांतून करावा लागेल. करितां इंग्रजांची मात्र दिक्कत नसावी. येविषयीं पक्कें करून पेशजीं लिहिल्याअन्वयें इंग्रजांसीं बोलून ठेविलेंच असेल. नसल्यास बोलून पक्कें करून ठेवावें. फत्तेसिंगांनीं पुण्यास यावें, म्हणून उद्योग करविला आहे. पहावें. म्हणून सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें तें कळलें. ऐसियास, गायकवाडाचें कलम इंग्रजांचे तहनाम्यांत उगवून घेतलेंच आहे; व सरकारचे जाबसाल त्यांजकडे आहेत त्यांस पुसावें आणि फडशे करून घ्यावे, असें पूर्वी लिहिलेंच आहे. वाजवी जाबसाल सरकारचे आहेत ते गायकवाड फत्तेसिंगराव यांजकडून करून घ्यावे. येविषयीं इंग्रजांनीं अभिमान काय धरावयाचा आहे? रवाना चंद्र १९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia assures the Poona Darbar that the English would raise no objection to their reasonable demands on Fatesing Gaikwad, the latter being a feudatory of the Darbar.*

No. 435 19th February 1786.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी :—आपण पत्र पाठविलें तें पावलें. आम्ही मार्गशीर्ष शुद्ध १० दशमीचे* मुहूर्तेंकरून श्रीमंतांची आज्ञा घेऊन डेरे दाखल जाहलों. राजश्री हरिपंत तात्या फौज सुद्धां पुढें जात आहेत. मागाहून आम्हींही जाणार. राजश्री तुकोजी होळकरही पुढें गेले. नवाब चंद्र २३ मोहरमीं† डेरेदाखल जाहले. भोसलेही लौकरच येणार. टिपूचा जमाव पन्नास हजार गाडदी व साठ हजार प्यादा, बार व तीस हजार फौज, शिवाय तोफा दीडशें याप्रमाणें सरंजामानिसीं कृष्णातीरीं येणार, याप्रमाणें बातम्या आहेत. पंचवीस हजार गाडदी बार व दहा हजार फौज पुढें कितुराकडे आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं, म्हणोन

---

* ११ डिसेंबर १७८५. † २६ नोव्हेंबर १७८५.

लिहिलें तें कळलें. ऐसियास, टिपू मातबर फौजेनिसीं कृष्णातीरीं येणार, यावरून हरिपंततात्या व होळकर यांची रवानगी फौज सुद्धां पुढें करून, मागाहून आपण मार्गशीर्ष शुद्ध दशमीचे मुहूर्तें डेरेदाखल जाहलां. राजश्री मुधोजी भोसले येणार होते. मातबर फौजेनिसीं येऊन आपले सामील जाहलेच असतील. नवाब चंद्र २३ मोहरमीं डेरेदाखल जाहले, तेव्हां पुढें येऊन आपल्या त्यांच्या भेटी जाहल्याचें सविस्तर लिहून कळवावें. नवाब व भोसले व सरकारची फौज इतक्यानिसीं आपण आहेत. टिपूचें पारपत्य होण्यास अगाध काय आहे? श्रीमंतांचा प्रताप थोर आहे. लढाईची तर्तूद कसकसी योजिली हें लिहून कळवावें. रवाना चंद्र १९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji learns from Nana of Tipu having mobilised his forces towards his northern frontiers and of the Poona army marching to meet them. He asks from Nana further news about the campaign.*

No. 436 25th February 1786.

पैवस्ती चंद्र २९ जमादिलाखर सीत

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—राजश्री आपाजी राम दाभोळकर यांसीं येण्याविसीं पेशजी पत्रें पाठविलीं आहेत, परंतु अद्यापि त्यांचें येणें जाहलें नाहीं. त्यास, आपण मशारनिल्हे पुण्यांत असतील त्यांस पत्र पाठवन त्यांचें येणें होय तें करावें. रवाना चंद्र २५ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks Nana to expedite the departure of Appaji Ram from Poona so that he may arrive in his camp early.*

No. 437 February 1786.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ २४ रबिलावलचीं पत्रें सादर जालीं. त्यांत राजश्री पाटिलबावा यांचे नांवें पत्रें तीन होतीं तीं प्रविष्ट केलीं. त्यांचीं उत्तरें दिलीं तीं घेऊन पाठविलीं आहेत. सेवकाचे पत्रीं आज्ञा कीं, मुंबईहून मुंबईकर

जनराल यांचें व मालिट इंग्रज याचीं पत्रें सरकारचे नांवें व आमचे नांवें आलीं. त्यांत मालिट याचे पत्रांत लिहिलें आहे जे, कलकत्तेकर जनराल याचा हुकूम आम्हांस आला आहे कीं, श्रीमंतांजवळ वकिलीस राहणें. त्यावरून आपणास लिहिलें आहे. आपलीं पत्रें येण्याविसीं आलीं म्हणजे येऊं असें लिहिलें होतें. त्यावरून सरकारचीं व आम्हीं आपलीं पत्रें त्यास येण्याविसीं पाठविलीं आहेत. आल्यावर लिहिलें जाईल. नवाब यादगिरीचे मुक्कामीं आले. बराबर सरंजाम भारी आहे. राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर फौजसुधां लष्करांत आले. आम्ही भीमातीरीं सागर तालुक्यांत आलों. आठा चौ दिवशीं नवाबाच्या भेटी होणार. टिपूनें मगरुरी फार केली आहे. लढवई सरंजाम फौज गारद तोफा वगैरे पोख्त केला आहे. कांहीं फौज व गारद तोफा याप्रमाणें कितुराकडे सरंजाम आला आहे. कांहीं अदवानीचे रोखें आला आहे. खासा मागें कोणत्या कारणास्तव कोणे तजविजेवर आहे ही बातमी पक्की कळली नाहीं. सरकारांतूनही फौज व गारद तोफखाना भारी केला आहे. राजश्री पाटिलबावांस पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठवणें. श्रीमंतांचे प्रतापें पारपत्य घडेल. इंग्रजांचा वकील येतो यांत कुमकेस मसलतीकरितां इंग्रजांचीं पलटणें चाकरीचे रीतीनें येण्याचें बोलणें सरकारकार्यास उपयोगी असल्यास बरें. उगेंच पुण्यांत राहून बातमी ल्याहावी, फितूर वगैरे त्यांच्या चाली आहेत त्या करीत असाव्या, असें असल्यास फल काय ? आल्यावर काय तें समजेल म्हणून आज्ञा. ऐशास पाटिल-बावांनीं हेंही पत्र आणऊन पाहिलें आणि उत्तर केलें कीं, कलकत्त्याहून मेघफरसन याचें पत्र आलें आहे कीं, चार पलटणें मुंबईहून कुमकेस येतील, तीं श्रीमंतांचे मुलखाचे सर्देपावेतों येतील. टिपूचे सर्देंत येणार नाहींत. कंपणीचे येथें पलटणास खर्चास देतात त्याप्रमाणें तुम्हींही खर्चास द्यावें असें लिहिलें आहे. त्या पत्राची नकल देतों. पाठऊन देणें. पलटणें तर देतात तीं सरकारचे मुलखाचे सर्देपावेतों येणार. टिपूचे मुलखांत येत नाहींत. तस्मात् टिपूस भितात असें दिसतें. वकिलाचे जाबसालेवरूनही विदित होईल. वकीलही बरोबरच आहे. पलटणें आणितों असें बोलेलच. काम पडेल तर आणवावीं. असाही विचार आहे कीं, फरासिसांचा इंग्रजांचा दावा आहे. त्यास, फरासीस टिपूची कुमक करीत नाहीं असें मुसा-मुतीन याचें बोलणें आहे. तें प्रमाण असल्यास ज्यापक्षीं फरासीस टिपूची कुमक करीत नाहीं, त्यापक्षीं इंग्रजी पलटणें आपणास कशास पाहिजेत ? सरकारची फौज, गाडद, तोफखाना व नवाब भोसले यांचे सरंजामानेंच टिपूचें पारपत्य जाल्यास

उत्तम आहे. सलाह जाणून सांगतों. आम्हीं आपले पत्रीं लिहिलें आहे. तुम्हींही लिहिणें. फरासिसानें टिपूची कुमक केली तर इंग्रजी पलटणें आणवावीं. असेंही दिसतें कीं, फरासीस आपणाकडे आले तर इंग्रजांचा त्यांचा दावा, मग इंग्रज टिपूची कुमक करितील, असे मजकूर आहेत. सुचलें तें सलाह जाणून सांगितलें. तेथें प्रसंग पडेल त्या साधनास युक्तीस पडेल तसें करावें. असें बावांनीं सांगितल्यावरून विनंती केली असे. बावांनीं पत्राचीं उत्तरें व कलकत्त्याचे पत्राची नकल पारसी दिली, ती पाठविली आहे. त्यावरून मजकूर विदित होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana Sindia's views discouraging hopes of assistance from the English to the Peshwa in his war against Tipu.*

No. 438 9th April 1786.

पै॥ छ ८ साबान सबा

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १७ जमादिलावलचें पत्र सादर जालें त्यांत आज्ञा जे, तुम्हीं छ १ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. छ ९ मोहरमचे पत्राचें उत्तर राजश्री पाटिलबावांनीं दिल्हें तें पाठविलें आहे. दुसरे दोन रवानग्यांचीं उत्तरें देणार आहेत. दिलीं म्हणजे रवाना होतील म्हणोन व नजफकुली, माचेडीवाला राव व आंबुजी इंगळे याचे बंधु जैपूर प्रांतीं रवाना केले आहेत. त्याचा मजकूर व अफराशाबखानाचे भावास कैद केलें, व अफराशाबखानाचे बायकोस कैद करून दरोबस्त माल आणिला, माल किती आला त्याचें ठिकाण लागत नाहीं म्हणोन, व राजश्री राघोपंत गुरुजी मथुरेस आले, लष्करांत आल्यावर भेटीनंतर वर्तमान कळेल. बादशाही खिलत उजनीस अटकून राहिला आहे, तो पुण्यास रवाना करणार. पाटिलबावांचे पत्राचें उत्तर लौकर यावें म्हणोन लिहिलें, तें सर्व कळलें. त्यास माचेडीवाल्याचें काय जालें तें लिहून पाठवावें. अफराशाबखानाचे मालाचें ठिकाण लागत नाहीं म्हणोन त्यास बारीक शोध करून लिहून पाठवावें. राघोपंत गुरुजी लष्करांत पोंहचून पाटिलबावांची भेट जालीच असेल. होईल तें लिहून पाठवावें. पाटिलबावांचे पत्राचें उत्तर

पाठविलें आहे. तुम्हीं पाहून प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठवावें. इकडील वर्तमान नवाबाच्या भेटी यादगिरीवर जाल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. नवाबासुद्धां हल्लीं कूच करून कृष्णातीरास आलों. पुढें लौकरच कपाटसंगमचे* रोखें जाणार. टिपू खासा फौजेसुधां चित्रदुर्गास आल्याची बातमी आहे. कपाटसंगमास गेल्यावर होईल तें लिहून पाठऊं. अफराशाबखानाचा माल फार आला असें येथें ऐकण्यांत आहे म्हणून आज्ञा. ऐशास पाटिलबावांचे पत्राचीं उत्तरें मागील चौदा पंधरा महिन्यांचीं मिळालीं नाहींत. अलीकडे तमाम रवानग्यांचीं उत्तरें चार रोज मागेंपुढें मिळतात, तीं घेऊन कुल सेवेसीं रवाना जालीं. हल्लीं छ ७ व छ १७ जमादिलावल दो रवानग्यांचे जाब बावांचे व सेवकाचीं विनंतीपत्रें या जोडीबरोबर रवाना केलीं आहेत. त्यांत माचेडीवाल्याचा व नजफकुली व अफराशाबखान याचा भाऊ व बेगम मालसुधां हे मजकूर निराळे विनविले आहेत. राजश्री राघोपंत गुरुजीचें बावांचें बोलणें होऊन स्वामींचे कलमबंदीचे यादीचे कलमाचीं उत्तरें कलमबंदी गुरुजी मशारनिल्हे यांनींच सेवेसीं विनविलीं आहेत. त्याबरोबर इकडील जमाखर्च, बादशाही कारभाराच्या यादी, इजमाइली† आकारून दोन्हीं कामें आकारून लेहून मजपासींच देणार होते. लौकर पावणार नाहींत म्हणन बावांचे डाकेंत रवाना जालीं. मजलाही दाखविलें होतें. त्या रवानगीबरोबर माझेंही विनंतीपत्र घेऊन त्यांनीं पाठविलें आहे. तीं पत्रें व यादी सेवेसीं प्रविष्ट जाल्या असतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*These two letters repeat the several queries of the Poona Minister and inform him of replies having been sent under separate covers.*

No. 439 18th March 1786.

पैवस्ती छ २९ जमादिलाखर सीत

॥ श्री ॥

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ जमादिलावल मुक्काम नजीक नेवाळी लालसोट‡, प्रांत जैपूर,

---

* कृष्णाभीमासंगम. † अजमास, estimates of receipts and expenditure. ‡ 40 miles south-east of *Jaipur*, Lat. 76°2', Long. 26°2' in the Jaipur State.

स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:—छ २४ रबिलावलचीं पत्रें सादर जालीं, त्यांत राजश्री पाटिलबावांचे नांवें पत्रें होतीं तीं प्रविष्ट करून, त्यांचे जाब व मागील पत्रांचे जाब बावांनीं दिले, ते पाठविले आहेत व आणखी मजकूर दिनचर्येचे इकडील पुरवण्या निरनिराळ्या विनविल्या आहेत त्यांवरून वर्तमानें विदित होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports despatch of replies to official letters from Poona.*

No. 440 18th March 1786.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण छ २४ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. मुंबईहून मुंबईकर जनराल व मालीट इंग्रज यांचीं पत्रें सरकारचे नांवें व आमचे नांवें आलीं, त्यांत मालीट याणें लिहिलें आहे कीं, कलकत्तेकर जनराल यांचा हुकूम आम्हांस जाहला आहे कीं, श्रीमंतांजवळ वकिलीस राहाणें, त्यावरून आपणास लिहिलें आहे. आपलीं पत्रें येण्याविसीं आलीं म्हणजे येऊं असें लिहिलें होतें. त्यावरून सरकारचीं व आम्हीं आपलीं पत्रें त्यांस येण्याविसीं पाठविलीं आहेत. आलियावर लिहून पाठवूं म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियास मालीट साहेब याचीं व मुंबईकर जनराल यांचीं पत्रें मालीट श्रीमंतांपासीं यावयाचीं आलीं, त्यांवरून आपलीं पत्रें मालीट यासीं येण्याविसीं गेलीं. मालीट पुण्यास आलाच असेल. लेहून कळवावें. रा छ १७ जोवल. हे विनंती.

¶*Mahadji hopes that Malet has arrived in Poona.*

No. 441 24th April 1786.

पैवस्ती चंद्र २१ रजब सीत

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—सांप्रत आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं

तरी टिपूकडील मसलतीचें वगैरे सविस्तर लिहावें. टिपू मैत जाहला म्हणोन इंग्रजांकडील बातमी पै दर पै येती. यावरून पक्कें असें दिसतें. आपल्याकडेही बातमी आलीच असेल. टिपूचें वर्तमान खरें असल्यास हा समय मसलत साधावयाचा आहे. छावणीही त्या प्रांतीं जाहल्यास चिंता नाहीं. श्रीमंतांचे प्रतापें शत्रूचें पारपत्य होऊन मुलूख सुटून बंदोबस्त सरकारचा होईल, येविसीं पूर्वी लिहिलें आहे. सविस्तरें लिहून कळवावें. रवाना चंद्र २४ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks for news about the fighting with Tipu and his reported death.*

No. 442 11th May 1786.

पैवस्ती छ ८ साबान सबा समानीन.

हस्ते कासीद सरकार.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष :—आपण पत्र चंद्र ७ जमादिलावलचें पाठविलें तें पावलें. नवाब येदगिरीवर आले, आम्हीं सगर प्रांतांत आलों हें पूर्वी लेहून पाठविलेंच आहे. त्यानंतर कितुराकडे टिपूची फौज दहा हजार, व गाडद व बार वीस हजार व तोफा याप्रमाणें सरंजाम आला होता. त्यांनीं जांबोटीकर जमीदार याचीं ठाणीं जांबोटी व सडें दोन्हीं घेतलीं. पुढें पेशकदमी* करणार. याकरितां राजश्री गणेशपंत बेहरे येडूर मांजरीवर फौज सुद्धां होते, ते कृष्णा उतरोन पलीकडे गेले. त्यांचा सरंजाम भारी व आम्ही फौज सुद्धां इकडे लांब आलों, याकरितां राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांची रवानगी तिकडे केली. नवाबाच्या आमच्या भेटी जाहल्या. नवाबाचेंही नेट बरेंच आहे म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियासी, बेहरे व राजश्री तुकोजी होळकर पुढें रवाना फौजसुद्धां जाहलेच आहेत. मागें आपण व नवाब आहेत. टिपूचेंही वर्तमान मेल्याचें आहे. श्रीमंतांचें दैव समर्थ आहे. छावणीचा विचार केला आहे, त्याअर्थीं दुष्टांचें

---

* पुढें पाऊल टाकणें; प्रगति; आगळिक.

पारिपत्य यथास्थित होऊन मसलत चांगली होईल. वरकड अलाहिदा लिहिलें आहे त्यावरून कळेल. रवाना चंद्र १२ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji learns from Poona of the meeting between Nana and the Nizam and of a few detachments of Maratha horse having crossed the Krishna. He asks about the truth or otherwise of the rumour of the death of Tipu.*

No. 443 11th May 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन

ह।। कासीद सरकार.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—तिगस्ता इंग्रजांनीं परभारा तह टिपूसीं करूं नये असा करार असतां, तह परभारें केला. तो करारही गेला. असो. सालमाारीं टिपूचे मसलतीस इंग्रजांनीं पलटणें दरमाहा पेशजीं लिहिण्यांत आलें त्याप्रमाणें करून कुमकेस पाठवावीं येविसीं गुदस्ता जेष्ठमासापासून लिहीत गेलों. एक दोन उत्तरेंही आलीं, कीं इंद्रसेनासीं बोलून कलकत्त्यास लेहून पाठविलें आहे; उत्तरें आल्यावर लेहून पाठवूं. त्यास इंग्रजांचे कुमकेची दरकार* आहे असें नाहीं. परंतु याचीं कारणें कदाचित् टिपूसीं सामील जाले तर ठीक नाहीं. तह असतां होणार नाहीं असें म्हणावें, तर तहनामे दोनदां जाले असतां त्यांणीं तहनाम्याकडे कोठें पाहिलें ? याकरितां आपण कांहीं पलटणें आणिलीं असतां टिपूस मिळणार नाहींत व कदाचित् दुसरा टोपीकर कोणी टिपूनें सामील करून घेतला तर त्याबराबर लढाईस इंग्रजांचा सरंजाम उपयोगी, असें जाणोन लिहीत गेलों. अलीकडे राजश्री पाटिलबावांचें पत्र, मालत इंग्रज कलकत्त्याहून मुंबईस गेला, तो सरकारांत येणार, त्यास पत्रें पाठवून आणवावा. कलकत्त्यास पलटणाविसीं लिहिलें आहे, तेथून पाठवितील, अथवा मुंबईहून देवितील म्हणोन लिहिलें आहे. त्यास, मालत इंग्रज मुंबईहून पुण्यास आला. तेथेंच रहातो किंवा स्वारींत येतो पाहावें. उगाच वकिली बातमीचे कामास आला आहे, किंवा कांहीं कुमकेचें बोलण्यास आला

---

* गरज, पर्वा.

आहे, हें समजल्यावर लिहून पाठवूं. फुलचरीकर फरासिसांसीं राजकारण केलें असतां ते येते. परंतु इंग्रजांचे तहांत फरासिसांसीं राजकारण करूं नये, याकरितां आणावयाचा उद्योग केला नाहीं. पुढें टिपूचे फरासिसांचे दारमदार* होऊन टिपूची कुमक करणार म्हणोन बातम्या आल्या. तेव्हां फरासिसांकडील वकील मुसा मुतीन यासीं चार गोष्टी बोलून फरासिसांनीं कुमक टिपूची करूं नये असें केलें. येविसीं पूर्वीही लिहून पाठविलें आहेच. इंग्रज सरकारांत मदतीस आले, तरी फरासीस टिपूची कुमक करणार असें आहे. यामुळें इंग्रजांस न आणावें तर फरासिसांचा भरंवसा वाटत नाहीं, व इंग्रजांची सरकारची दोस्ती याकरितां इंग्रजांसच आपल्याकडे आणावें हें चांगलें. मग फरासीस कांहीं करोत; चिंता नाहीं. दोघांसींही संबंध नसावा. परंतु मसलत टिपूची लांबली असतां हे उगेच राहाणार नाहींत, कोणी तरी त्यास सामील होईल. याकरितां इंग्रजांचीं कांहीं पलटणें आपलेकडे आणावीं हें चांगलें. याप्रमाणें तुम्हीं पाटिलबावांसीं बोलून उत्तर होईल तें लिहून पाठवावें म्हणोन, राजश्री सदाशिव दिनकर यांस पत्र छ ७ जाावलचें लिहिलें, त्यावरून कळलें. ऐसियास, इंग्रजांचीं पलटणें कुमकेस यावीं येविसीं पत्रें आलीं. त्यापूर्वी इंद्रसेनासीं बोलून कलकत्त्यास लेहून पाठविलें व कुमक यावयासी दिवसगत लागेल. याकरितां दर्याचे मार्गें मालत साहेबाची रवानगी व्हावी म्हणोन ताकीद केली. त्यावरून मालत साहेबाची रवानगी जाहली, तो पोंहचोन श्रीमंतांची भेट जाहली, हें आपले लिहिल्यावरून कळलें. व हल्लीं मालत दोन पलटणें सुद्धां पुण्याहून निघोन आपणाकडे गेला म्हणोन ही बातमी लिहिणाराचे लिहिल्यावरून समजलें. पुण्याहून निघाला त्यापक्षीं आपल्याजवळ पावला असेल. मालत साहेब दोन पलटणां सुद्धां पोंहोचला, तेव्हां टिपूसही समजेल. मालत आपलेजवळ असतां इंग्रज टिपूसीं संधान करणारच नाहींत. फरासीस टिपूकडे जातील तर नकळे? तेंही आपणांस समजेल. लेहून कळवावें. कुमकेविसीं पलटणें राा करितों म्हणोन कलकत्त्याचीं पत्रें आलीं होतीं. हें वर्तमान पेशजीं आपणांस लिहिलेंच आहे. राा छ १२ रजब. हे विनंती.

¶*This letter from Mahadji to Nana shows how very anxious the latter was to secure military help from the Company, though he affected to look upon British succour with indifference.*

---

* करार.

No. 444 11th May 1786.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—टिपू सरकारावर मसलत करावयाकरितां श्रीरंगपट्टणाहून निघोन बेंगरुळास आला. तो श्रीरंगपट्टणाकडे पलीकडे कोडग* नायमार म्हणोन जमीनदार पाळेगारीनें आहे. झाडींत त्याचा मुलूक व राहणें, त्यावर टिपूनें कांहीं फौजा पाठवून दोन चार हजार माणसें धरून आणून वाटविलीं. त्याजवरून ते याचे फौजेवर येऊन, लढाई करून, टिपूची फौज थोडीसी शिकस्त केली. याकरितां खासा टिपू फौज सुद्धां त्यावर गेला. त्याच्या याच्या लढाया दोन तीन जाहल्या. त्यांत टिपूचें माणूस फार जायां जाहलें व कांहीं तोफाही त्याच्या नेल्या. कार्तिक मासीं याप्रमाणें जालें. तेव्हांपासून तमाम वाटा बंद करून माणूस तिकडील इकडे येणें बंद केलें. वर्तमान कोठेंच कांहीं कळेना. बारकाईनें बातम्या मोठ्या प्रयत्नें आणितां याप्रमाणें आली. त्या लढाईंतून टिपू श्रीरंगपट्टणास आला. त्यास गोळीची जखम लागली. पट्टणास आल्यावर बारा दिवस होता. नंतर मेला असेंही म्हणतात, व रूमचे बादशाहाकडे आंतून संधान करून कुमक आणविणार असेंही आहे. मेल्याची बातमी वारीक येऊं पावत नाहीं. म्हणोन वगैरे राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, टिपू मेला म्हणोन इंग्रजांकडील बातम्या कलकत्त्याहून पांच सात आल्या. त्यावरून आपणांस पेशजी लिहिलेंच आहे. आपणांकडेही वर्तमानें हींच येतात. यावरून टिपू मेला हेंच भासतें. या कालीं छावणी करून, पुरतेपणें पारपत्य करून, मुलूख सोडवून चार रुपये मिळवून सरकार नक्ष व्हावयाची गोष्ट आहे. नवाब सुद्धां फौजाही मुबलक आहेत. श्रीमंतांचे प्रतापें टिपू सहजांत वाताहत जाहला आहे. छावणी जाहली असतां सर्व गोष्टी घडतील. तोच विचार आपणही योजिला आहे. रवाना छ १२ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji inquires about the reverses suffered by Tipu in the territory of Coorg and about the rumour of his death.*

* Coorg.

No. 445 15th May 1786.

पैवस्ती छ. ८ सवाल सबा समानीन

हस्ते कासीद सरकार.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

दंडवत विनंती उपरी. तिगस्ता इंग्रजांचे कंपू येतात, मसलत सरकारांतून करावी म्हणोन राजश्री पाटिलबावांचीं व तुमचीं पत्रें येत गेलीं. त्यावरून मसलत करतों याप्रमाणें उत्तरें पाठवून, सरकारांत फौजेचीं देणीं मुबलग, तत्रापि कर्ज-वाम करून सिद्धटेकचे सुमारें आलों. तों इंग्रजांनीं परभारें टिपूसीं तह केला. खर्च अंगावर आला. नवाबाची भेटी होऊन पुढें टिपूची मसलत पडली त्यास अनुकूल असावें असें करून माघारे आलों. पुढें टिपूनें पहिले करार टाकून बोलूं लागला. त्यावर फौज पाठवून नरगुंदास मोर्चे लाविले. त्याजवर राजश्री परशरामपंतभाऊ व गणेशपंत बेहरे पंचवीस हजार फौजेनिसीं पाठविले. हे जवळ जातांच शह पडतांच मोर्चे उठविले. त्याजवर टिपूकडील वकिलांनीं रद-बदली केली कीं मोर्चे त्यांनीं उठविले, तेव्हां सरकारची फौज माघारी आणवावी. टिपूकडीलही फौज माघारी जाईल. त्यावरून कृष्णेस पाणी यावयाची आमद* जाणोन भाऊंस व गणेशपंतांस लिहोन माघारें बोलविलें. कृष्णेस पाणी येतांच फिरोन मोर्चे नरगुंदास बसविले आणि नरगुंद घेतलें. हें वर्तमान वगैरे जें होत गेलें तें लिहीत गेलों. परंतु पत्राचें उत्तरच येईना, तेव्हां काय उपाय? असो. त्यांनीं कितूर घेतलें. सरकारचें जाबसालाचें बोलणें कांहींच नाहीं. पुढें तर्तूद भारी केली. चालून येणार व उन्मादाचीं करणीं व बोलणीं व लिहिणीं याचा तपशील काय लिहावयाचा? तेव्हां मसलत करणें प्राप्त असें ठरवून, नवाब निजामअलीखान यांस पत्रें लिहिलीं. तेव्हां तेही सरकारचे मसलतीस अनुकूल होऊन मसलतीवर यावें असें ठरलें. त्याप्रमाणें तेही येदगिरीवर आले. आम्हींही आलों. छ १५ रविलाखरीं† भेटी जाहल्या. नवाबांनीं सरंजाम मसलतीकरितां चांगला केला आहे. सवाशें तोफ, चाळीस हजार गारद, व पंचवीस हजार फौज याप्रों नवाबाची आहे. सरकारची फौज चाळीस सहस्त्र व चाळीस तोफा व दहा हजार गारद, यांशिवाय होळकराची फौज बारा हजार व भोसले दहा हजार एकूण सरकारची बासष्ट हजार फौज. याप्रमाणें सरंजाम जमा जाला आहे. टिपूकडील जमाव पन्नास हजार गाडद व साठ हजार बार व दोनशें तोफा व पंचवीस तीस हजार फौज याप्रमाणें सरंजाम आहे. तेव्हां इकडूनही भारीच करणें प्राप्त जाहलें. ऐवजाची ओढ भारी, मागील देणीं फार, तत्रापि, कळलें

* पाणी येण्याचा समय. † १५ फेब्रुवारी १७८६.

तसें करून गाडा चालविला आहे. छावणी करून मसलत करावी हाच इरादा आहे. पार पाडणार श्रीमंतांचें दैव आहे. पांच सहा रवानगीचीं उत्तरें आलीं नाहींत. म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लि॥ त्यावरून कळलें. ऐसियासीं इंग्रजांचा तह जाला या समयीं सरकारची फौज व इंग्रजांची टिपूवर जाऊन टिपूचें पारिपत्य करावें, त्यास सहा महिन्याआंत सरकारचे फौजेची तयारी होऊन टिपूवर मसलत नमूद व्हावी असें होतें. त्या वायद्यास सरकारची फौज न निघाली. आम्हांवर शिबंदी चढून नुकसान कंपनीचें होतें, यास्तव टिपूसीं परभारें सलूख केला. फौज लवकर करारप्रों न निघाली हें निमित्य इंग्रजांनीं केलें. याचें सविस्तर पेशजी लिहिण्यांत आलेंच आहे. आपण बाहेर निघाल्यावर नवाबाचे भेटीस जाऊन पुढें टिपूवर मसलत करावी असें ठरवून, परशुरामपंतभाऊ व बेहरे यांसीं पुढें रवाना केलें. त्यावरून नरगुंदचे मोर्चे टिपूनें उठविले. कृष्णेस पाणी आल्यावरून उभयतांस माघारें बोलाविलें. कृष्णेस पाणी येतांच फिरोन मोर्चे लाविले. त्यास, टिपूची चाल बदमामली, उजम भारी. हें आपल्या लिहिल्यावरून व त्याचे चालीवरून समजतच होतें. आपलीं पत्रें येत गेलीं त्यांचीं उत्तरें मागें पुढें रवाना होत गेलीं. टिपूनें पेशकदमी* केली, त्याचे पारपत्यास नवाब सुद्धां आपण मोहिमेस निघालां. पुढें होळकर, गणेशपंत यांची रवानगी केलीच आहे. मागें नवाब आपण आहेत व श्रीमंतांचे प्रतापें टिपू मेल्याचेंही वर्तमान आहे. आपण छावणी करून मसलत करावी ही योजना केलीच आहे. श्रीमंतांचें दैव समर्थ आहे. मसलत यथास्थित होईल. रवाना चंद्र १६ रजब. हे विनंती.

¶*Mahadji learns from the Poona Darbar how the war was forced upon it by Tipu by his several acts of hostility. He asks Nana to pursue the war relentlessly.*

No. 446 15th May 1786.

पैवस्ती चंद्र ८ सवाल सबा समानीन

ह॥ कासीद सरकार.

॥ श्री ॥

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—सरकारांत ओढ कोणे रीतीची हें लोपलें नाहीं.

---

* पुढें चाल.

तत्रापि टिपूची मसलत प्राप्त जाहली. न करितां परिणाम ठीक नाहीं म्हणोन करणें लागलें. नवाब भोसले उदंड जाले तरी आपला सरंजाम मजबूद असला तरच चांगलें. तेव्हां मागें पुढें न पाहातां केलें. खर्च भारी, टिपूची मसलत सामान्य नव्हे कीं होईल. त्यास या समयीं राजश्री पाटिलबावांकडून पैक्याची मदत जाहल्यास उपयोगावर पडेल. हिंदुस्थान प्रांतीं मुलूकही फार सुटला आहे व ऐवज मिळण्यास जागा आहेत. दक्षणेंत मसलत इंग्रज किंवा टिपू. इंग्रज सर्वांवर गालब,* त्यासही टिपू हटविणार, असे दोन. त्यांत इंग्रजांसीं तहच आहे. टिपूची मसलत प्राप्त जाहली. दुसरे कोणीकडे जागा नाहीं. ऐकिल्यांत आलें कीं, आफरासियाबखानाचा भाऊ व बेगम यांस राजेश्री पाटिलबावांनीं हस्तगत केलें. त्याचा खजाना व जवाहीर मिळोन वगैरे दीड दोन करोडीची मत्ता आली. त्यास, ही गोष्ट चांगली जाहली. पाटिलबावांसही उपयोग ओढीस पडला. यांतून निमे ऐवज सरकारांत पाठविल्यास फारच उपयोगी पडेल. श्रीमंतांचे प्रतापें पाटिलबावांस येश येऊन बादशाही बंदोबस्त करितात, हें एकनिष्ठतेचें फल. व पूर्वी शिद्यांनीं हिंदुस्थानांतून ऐवज पाठवीतही गेले आहेत. प्रस्तुत मसलतीचा समय आहे. हें जाणोन लिहिलें आहे. तुम्हीं बोलावें व तेही करतील म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें त्यावरून कळलें. ऐसियासी, सरकारांत ऐवजाची ओढ, तशांत टिपूची मसलत करणें पडली, त्यावरून आपण मसलतीची चाल बांधोन, नवाब, भोसले, व होळकर वगैरे फौज एकत्र करून मोहिमेस निघोन टिपूवर शह दिल्हा. हे गोष्ट मनसब्यास ठीक, तीच आपण केली. ओढीचा प्रकार, त्यास श्रीमंतांचे ताले शिकंदर आहेत. टिपूची मसलत साधल्यानें सरकारांत ओढ आहे तीही दूर होईल. मुलूख सुटेल. टिपूची मसलत सामान्य नव्हे असें आपले लिहिण्यांत. यास, यामागें हैदरअलीखान याजवर एक श्रीमंतांचीच फौज जाऊन जेर करून मुलूख सोडवीत होती, तीच जमियेत सांप्रत टिपूजवळ आहे, व आपला सरंजाम नवाब, भोसले, होळकर, गायकवाड व हुजरात सुद्धां आहे. त्या अर्थी टिपूचें पारपत्यही चांगलेंच होईल. सरकारांत ओढ यामुळें इकडून कांहीं पैक्याची मदत व्हावी. त्यास ठीकच आहे. यामागें इकडीलही मोहीम साधून चार रुपये श्रीमंतांचे प्रतापें मिळत गेले; तेव्हां सरकारांत पावतही गेले असतील. सांप्रत हिंदुस्थानची मोहीम साधून चार रुपये मिळाले, हें कांहीं लोपलें नाहीं. ही दौलत श्रीमंतांचीच आहे. इकडे मसलत पडल्यास

* वरचढ.

सरकारांतून साहित्य होत आलें आहे व सरकारांवर मसलत पडल्यास इकडूनही सेवेंत अंतर जालें नाहीं, हें सर्व आपणांसही माहीतच आहे. आलीकडे कोल्हापूर व गुजराथ व इंग्रज व ग्वाल्हेर व गोहद या मसलती पडन गेल्या. त्यामुळें ओढ किती जहाली ही लिहून कळवावीसी काय आहे? तत्रापि अर्थें, प्राणें जिवाकडे न पहातां जेथवर जहाली तेथवर करून, श्रीमंतांचे प्रतापें, ज्यांत सरकार अर्थ व नक्ष तीच गोष्ट होत गेली. गोहदची मसलत जाहल्यावर दम टाकावयास उज्जनीस जावें, कर्ज वाम करून लोकांस निरोप द्यावे, आसुदे* व्हावें, ही योजना केली होती. इतक्यांत आपलीं पत्रें इंग्रज दिल्लीस येणार, इंग्रजांचे हातीं दिल्लीचें संस्थान लागलें असतां झाडोन हिंदुस्थान जावोन खुपकीवाल्यास पेंच पडेल; तरी ही गोष्ट होऊं न द्यावी; जसें कळेल तसें करून दिल्लीचें संस्थान आपले हातीं ठेवून, बादशाहास आपले लक्षीं लावोन घ्यावें, याअन्वयें वरचेवर येत गेलीं. तेव्हां ओढ म्हणोन मागें पुढें पहावें, तरी इंग्रजांचा फैलाव दिल्लीस जाहला म्हणजे खुपकी रहाणें समजतच आहे. यास्तव कर्ज वाम करून, तीन तीन सालें अगाऊ माहालकऱ्यांपासून व्याज मनोत्या मनस्वी देवून काम चालविलें. दिल्लीस राजकारण करून बादशाहाचें संधान इंग्रजांकडे लागलें होतें तें तोडून, बादशाहा दिल्लीहून आगऱ्यास आणावयास आठ महिने गोहद घेतलेवर बसणें पडलें. बादशाहा आगऱ्यास आल्यावर ग्वालेरीहून पडत्या पावसांत कूच करून चमेल उतरलों. पुढें हामदानीची मसलत पडली. त्याचेंही पारपत्य केलें. बादशाहाची भेट जहाली. अफरासियाब मेल्यापासून बादशाही फौजेचा व बादशाहाचा खर्च गळां पडला. बादशाहाचे खर्चाविसीं आपलीं पत्रें, बादशाहाचे खर्चाचे नेमणोकीचा अजमास लिहून पाठवावा त्याप्रमाणें तरतूद करून पाठविली जाईल, म्हणोन येत गेलीं. इकडील मुलूख बादशाही म्हणावा तरी तीन सालें अनावृष्टीमुळें काळ पडला. त्याणें माणसें मेलीं गेलीं. तेव्हां मुलुखांत वस्ती होणें कठिण, तेथें पैसा येणें कळतच आहे. बादशाही फौज दूर करून खर्च हलका करावा, तरी इंग्रज लखनऊजवळ, त्याजवळ बादशाहाजादा. तमाम हिंदुस्थानास दक्षिण्यांचा पाय बादशाहींत शिरला हें असाह्य जालें. इंग्रज तरी दावाच बाळगितात. फौज दूर केली म्हणजे तीच जमियेत जाऊन खूळ उभें राहील. जहांगीरखान, आफरासियाबखान याचा भाऊ, रामगडास आठ नऊ महिने लढला. हिंमतबहादर व नारायणदास दोन खुळें बगलेंतच. आपला बंदोबस्त पुरता जाले खेरीज

* सडे, मोकळे.

कोणतीच गोष्ट करतां येत नाहीं. यास्तव जमियेत जसीचे तसीच बाळगणें प्राप्त. चोवीस पलटणें व बारा हजार फौज व तोफखाना बादशाही याखेरीज दक्षिणी फौज व तोफखाना व खासगत पलटणें हीं तरी पाहिजेच. यांस खर्ची काय पाहिजे हें आपले ध्यानांत नाहींसें नाहीं. परस्परें समजल्यांतही येतच असेल. आफरासियाबखान व त्याची बेगम इचा भ्रम आपण लिहिल्याप्रमाणेंच येथेंही होता. यामुळें रामगडास निकड करून इंग्रजांकडे त्यांचें संधान आहे तें न लागावें, चिजवस्त न जावी, म्हणून प्रयत्न केला; परंतु इकडील फौज रामगडावर गेली, त्याचे पूर्वीच भवानसिंग मुनसी आफरासियाबखान याचा मुखत्यार होता, त्यानें इंग्रजांसीं संधान करून, त्यांची कुमक आणवावी असें करून, चार पांच पलटणें आंत्रोली हळद्यागंज येथें घेऊन आला. चार रुपये होते त्यापैकीं कांहीं पलटणें आणलीं त्यांस दिल्हे. बाकीचा माल रामगडांतून इंग्रजांचे आमलांत लखनऊस घेऊन गेला. पलटणें आलीं होतीं त्याजविसीं, राजश्री सदाशिव मल्हार लखनऊस होते त्यांस इंग्रज स्नेहाच्या गोष्टी सांगत असतां, जहांगीरखानाचे कुमकेस पलटणें पाठवितात; तेव्हां तह कोठें राहिला असें लिहिलें. तेव्हां त्याणीं इंग्रजांसीं जाबसाल केल्यावरून पलटणें माघारीं घेऊन गेले. चीजवस्त, जडजवाहीर, रोकड भवानीप्रसाद मुनसी घेऊन गेला. तो अद्यापि लखनऊस आहे. त्याजपासीं तीस चाळीस लक्ष माल आहे असें म्हणतात. जहांगीरखान व बेगम धरल्यावर चाळीस हजारांचें जवाहीर निघालें, तें परभारां बादशाहास दिल्हें. बादशाहांनीं आधींच करार करून घेतला होता, नजफखानाचे वेळचें माझें जवाहीर रकमा जबरदस्तीनें पलटणें बसवून घेतलें आहे, तें हल्लीं आफरासियाब यांजकडे आहे, रामगडांतून निघेल तें आपलें आपल्यास द्यावें. त्यावरून आलें तसें परभारें त्यांचे स्वाधीन केलें. दीड दोन करोडीचा ऐवजाचा भ्रम येथेंही होता. त्याप्रमाणें येते तर ओढ वारत. परंतु ते गोष्ट न जहाली ! उलटा जहांगीरखान व बेगम कैदेंत आहे, त्यांस खर्च देणें लागतो. येविसींचे व फौज खर्च व बादशाहा खर्च यांच्या यादी आलाहिदा पाठविल्या आहेत त्यावरून सर्व समजेल. राजश्री सदाशिव दिनकरही येथें आहेत, यांसही माहीत आहे. लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ १६ रजब. हे विनंती.

¶*Mahadji informs the Poona Darbar that he had been disillusioned about the fabulous wealth of Afra Siyab Khan and pleads his inability to help the Darbar with funds in its war with Tipu.*

No. 447 20th May 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन

बराबर कासीद सरकार.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २१ रजब मुक्काम लालसोट,* प्रांत जैपूर, जाणोन स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः—छ ७ जमादिलावलचें आज्ञापत्र सादर जालें, त्यांत आज्ञा जे, सरकारांत ओढ कोणे रीतीची हें लोपलें नाहीं. तत्रापि टिपूची मसलत प्राप्त जाली. न करितां परिणाम ठीक नाहीं जाणोन करणें लागलें. नवाब, भोसले, उदंड जाले, तरी आपला सरंजाम मजबूद असला तरच चांगलें. तेव्हां मागें पुढें न पाहतां केले खर्च भारी. टिपूची मसलत सामान्य नव्हे कीं होईल ! त्यास या समयीं राजश्री पाटिलबावांकडून कांहीं पैक्याची मदत जाल्यास उपयोगावर पडेल. हिंदुस्थान प्रांतीं मुलूखही फार सुटला आहे व ऐवज मिळण्यास जागे आहेत. दक्षणेंत मसलत इंग्रज किंवा टिपू, इंग्रज सर्वांवर गालब†. त्यासही टिपू हटविणार. असे दोन. त्यांत इंग्रजांसीं तहच आहे. टिपूची मसलत प्राप्त जाहली. दुसरे कोणीकडे जागा नाहीं. ऐकिल्यांत आलें कीं, अफरासियाबखानाचा भाऊ व बेगम यांस राजश्री पाटिलबावांनीं हस्तगत केलें. त्याचा खजिना व जवाहीर मिळोन वगैरे दीड दोन करोडीची मत्ता आली. त्यास हे गोष्ट चांगली जाली. पाटिलबावांसही उपयोग ओढीस पडला. यांतून निमे ऐवज सरकारांत पाठविल्यास फारच उपयोगी पडेल. श्रीमंतांचे प्रतापें पाटिलबावांस यश येऊन बादशाही बंदोबस्त करितात हें एकनिष्ठतेचें फल; व पूर्वी शिंद्यांनीं हिंदुस्थानांतून ऐवज पाठवीतही गेले आहेत. प्रस्तुत मसलतीचा समय आहे हें जाणोन लिहिलें आहे. तुम्हीं बोलावें. तेही करितील म्हणोन. ऐशास आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावा यांसीं बोललों. पत्र दाखवा म्हणाले. दाखविलें. तें पाहून तीच मालुमात त्यांनीं जमा धरून, उत्तर लिहिलें तें पाठविलें आहे. बाहेरही वर्तमान ऐकण्यांत असेंच आहे जे, चाळीस पन्नास हजारांचें जवाहीर त्या बेगमेजवळ निघालें, तें बादशाहास दिलें. माल फार निघावा असा भ्रम फार होता. तें अगोदरच लांबविलेंसें कळलें.‡ अद्यापि अफराशाबखानाचा भाऊ जाहांगीरखान व ते बेगम

---

* जयपूरच्या आग्नेयीस ४० मैल. †वरचढ. ‡ या ठिकाणीं महादजीला विशेष द्रव्यप्राप्ति झाली नाहीं असेंच जेम्स अंडरसननें कलकत्त्यास ग० ज० ला कळविलें. See No. 18 of Vol. I, Poona Residency Correspondence.

व तिचा बाप आगऱ्यांत किल्लेदार होता तो व बजीदखान किल्लेदाराचा भाऊ इतके कैदेत आहेत. त्या बेगमेनें नारायणदासाचें नांव घेतलें कीं, नजफखानाचे वेळेचा हाच कारभारी, याची माहितगारी आहे. याजवळ काय असेल तें घ्यावें. त्यावरून नारायणदासही कैद केला. अद्यापि स्वारीबरोबर इतकेही कैदेंत आहेत. त्यांचा खर्च हजारो रुपयांचा चालवावा लागतो. ही दशा त्या मालाची! येथें ओढ भारी. रुपये कोठून येत नाहीं. अंमल बसलेले मुलखांतून आश्विनमासीं रसदा घेतल्या, तो रुपया खर्ची पडला. आतां रुपया कोठून यावा? जैपूरची मामलत उपस्थित. त्यांतील रुपया यावा त्याचें वर्तमान निराळें विनविलें आहे, त्यावरून विदित होईल. रुपयाची मोठी खेंच आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Poona about Sindia's crippled finances and his inability to help the Darbar with funds.*

No. 448 26th May 1786.

पैवस्ती चंद्र १७ साबान सबा समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २७ रजब मुक्काम नजीक लालसोट, प्रांत जयपूर. स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री राघोपंत गुरुजी आज्ञा घेऊन इकडे येतांना कित्येक मजकूर राजश्री पाटिलबावा यांसीं बोलून उत्तरें पाठवावीं म्हणोन मशारनिल्हे यांस आज्ञा जाली होती. याप्रमाणें गुरुजोबावांचें बोलणें पाटिलबावांसीं होऊन, उत्तरें कलमवार गुरुजींनीं सेवेसीं विनविलीं आहेत. उत्तरें लेहून सेवकाजवळ द्यावीं असें ठरलें होतें. परंतु डांक सरकारची उठली. जोड्या जातात येतात, त्यांस विलंब लागतो, आणि पत्रें लौकर पावलीं पाहिजेत. म्हणोन पाटिलबावांचे डांकेबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत. इकडील बादशाही कारभाराचा जमाखर्च यांच्या यादी इजमाइली* त्याही पाठविल्या आहेत. त्यावरून सकल मजकूर विदित होतील. चंद्र ७ व चंद्र १७ जमादिलावलचीं पत्रें सादर जालीं. मुजरद जोड्यांबरोबर त्यांचे जाब राजश्री पाटिलबावांकडील कांहीं सिद्ध जाले आहेत. कांहीं राहिले आहेत ते

---

* अंदाजाच्या.

तयार जाले म्हणजे जोडीबरोबर रवाना करितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. गुरुजींचीं उत्तरें कलमबंदीचीं व बादशाही जमाखर्चाच्या यादी मजला दाखविल्या, त्या पाहून रवाना केल्या आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana that several of his queries have been replied to in the letter sent by Raghopant Guruji.*

No. 449 29th May 1786.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी :—

दंडवत विनंती. उपरी आपण पेशजीं पत्रें पाठविलीं, त्यांत अफरासियाब याचा भाऊ जहांगीरखान व त्याची बेगम रामगडाहून बाहेर काढली; त्यांचा माल दीड दो क्रोडींचा हस्तगत जाहला; व बादशाही मुलूकही सुटला आहे; पाटिलबावांचीही ओढ दूर होऊन सरकारांत मसलत टिपूची पडली आहे हेही दूर व्हावी म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें होतें. त्यास, इकडे चार रुपये अफरासियाबचे मिळाले व मुलूक सुटून फुरसत पडली असी आपली समज जाहाली असें समजल्यांत येतें. ऐसियास, येविसीं उत्तरें सविस्तर पेशजीं लिहिलीं आहेत त्यांवरून कळेल व हल्लीं इकडील पादशाही मुलूक, बादशाही त्याची जमा, व बादशाही खर्चाचा अजमास, व जहागीरदार व जायदादवाले* वगैरे यांच्या यादी वगैरे एकूण तीन गुंडाळीं पाठविलीं आहेत, त्यांवरून सर्व आपल्या ध्यानांत येईल. राजश्री गोविंदराव यांजकडे अजमासाच्या यादी पाठविल्या आहेत, प्रविष्ट करितील. उत्तरें यावीं. रा छ. १ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे ही विनंती.

¶*Mahadji asks Nana not to be deceived by reports about the wealth of the late Afra Siyab Khan acquired by him on the fall of Ramgad. The treasure he obtained, he says, was inconsiderable.*

No. 450 June 1786.

(पत्र लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे :—छ १ रजबचें आज्ञापत्र सादर जालें जे, आपले शरिराची अशक्तता लेहून इकडे येण्याविसीं लिहिलेंस, त्यास राजश्री बापू भावे यांची

---

* भाईबंद.

रवानगी तिकडे लौकर करितों. ते येथें पावले, मग तूं निघोन येणें. ऐसियास आषाढमास प्रवेश जाला. पर्जन्यास आरंभ, चातुर्मास्याचें जाणें, पांचाशें कोसांचे पल्ल्याचें कसें घडेल? येथील हवा तिन्ही ऋतूंची विलक्षण. तपसील काय विनऊं? कोणत्याही ऋतूंत प्रकृति नीट राहत नाहीं. त्यांत ही व्रजभूमि तर केवळ शीतळ. आतां शरिराची गति काय आहे? नित्य विकलतेची विनंती कोठवर करावी? दिवस जातो तो पार पडला असें होतें. असो. प्रारब्ध प्रधान आहे. बापू भावे यांची रवानगी होऊन इकडे येतीलच. ते आले म्हणजे येथील अर्थ त्यांस समजाऊन देईन. मजमध्यें शक्ति कांहीं नाहीं. जन्मांत एक वेळ तरी त्रिस्थळी यात्रा गया श्राद्ध घडावें. पितृऋणापासून सुटावयास तीन श्राद्धें व्हावीं. तो विचार एखादे दैववानास घडला असिल्यास सगळा जन्म पाहिजे. माझी अवधि किती? एक वेळ तरी विधि घडावा. फार दूर मार्ग क्रमून प्रयागाजवळ आलों आहे. मथुरेहून श्री काशी विसा रोजांची वाट आहे. आज्ञा सादर जाल्यास त्रिस्थळी यात्रा स्वामींच्या प्रसादें घडेल. देशीं येऊन फिरून महायात्रा होण्यास शरीर कटाक्ष व द्रव्य दोन्ही मजपासीं नाहींत, तेव्हां असाध्यच. कटाक्ष अथवा धन एक तरी अनकूल असल्यास घडण्याची संभूत. दोन्ही प्रतिकूल. तेव्हां अलं मग राहिलेच असें आहे. दैवांत स्वामींचे पाय जोडले आहेत ते सुटावे इच्छा कोण करील? शरीरक्षीणतेमुळें देशीं आल्यावर दुःसाध्यच आहे. यास्तव विनंती केली असे. आज्ञा सादर जाली पाहिजे. स्वामींचे पाय मस्तकीं धरण्यासही कटाक्षच पाहिजे. त्रिस्थळीं यात्रा करून आयुष्य व कटाक्ष आहे तर पुन्हां स्वामींचे पाय पाहीन. उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar requests Nana to expedite the journey of his successor Bapu Bhave, and asks permission to visit the three holy places in the north.*

No. 451 5th June 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरीः—नरगुंद टिपूनें घेतलें; पुढें चाल करून मसलत करणार; तेव्हां सरकारांतून मसलत करणें प्राप्त, तेव्हां नवाब निजामअल्लीखान

यांस लिहिलें. त्यांणीं लिहिलें कीं सरकार व आम्ही मिळोन मसलत होईल, परंतु इंग्रजांचीं कांहीं पलटणें दरमाहा देऊन आणवावीं म्हणजे इंग्रजांविसीं दिकत राहाणार नाहीं. येविसीं आपण उद्योग केलाच असेल. आम्हांजवळ कलकत्तेकरांचा वकील ज्यानसेन* आहे, तो कलकत्त्यास जाणार. यासींही आम्हीं बोललों आहों. त्यास कलकत्तेकर जनरालास एक पत्र सरकारचें व एक आपले नांवें असीं पाठवावीं. त्यावरून सरकारचें व आम्हीं आपलें एकूण दोन पत्रें जनरालास, पांच पलटणें पाठवावीं म्हणोन, लिहून पाठविलीं आहेत. हें वर्तमान राजश्री पाटिलबावांस सांगावें म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें त्यावरून कळलें. ऐसीयास नवाबांनीं व आपण पांच पलटणें कुमकेस पाठवावीं म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. टिपूचे मसलतीचा आरंभ समजतांच येथून कलकत्तेकरांस कुमकेविसीं तगादा होतच होता. त्यावरून कलकत्त्याहून मालट साहेबही आपल्याकडे रवाना जाहला. तो येऊन पोंचलाच आहे. कांहीं पलटणें घेऊनही पुण्याहून स्वार होऊन आपल्याकडे गेला, असें यखबारेहून समजलें. मालट आपलेजवळ पोंचला तेव्हां टिपू वगैरे सर्वांस इंग्रज मदतीस आले, हें समजलें असें वाटतें. नवाबांनीं आपण टिपूवर मसलत छावणी कसून करावी हें विचारिलें, तें मसलतीस फार ठीक आहे. योजिल्याप्रमाणें नवाबसुद्धां छावणी होऊन मसलत शेवटास जावी. श्रीमंतांचें पुण्य समर्थ आहे. टिपू मेल्याची आवई दाटच ऐकिल्यांत येती. रा छ ८ साबान. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*The Poona Darbar secures the co-operation of the Nizam in the war against Tipu and asks the English Government to provide it with a few battalions. Mahadji in acknowledging this news inquires about the rumours of Tipu's death.*

No. 452 5th June 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—मालीट इंग्रज परभारें कलकत्त्याहून पुण्यास जावयाकरितां रवाना जाहला आहे. त्यास, हा पुण्यास आलियावर त्याचा बहु-

---

* R. Johnson was Resident at Hyderabad since January 20, 1784.

मान करावा म्हणून राजश्री पाटिलबावांचें पत्र व तुमचें पत्र आलें. त्यास, बहुमान म्हणजे काय, कसा करावा, हें लिहिलें नाहीं. सरकारांत शिरस्ता आहे त्याप्रमाणें होतच आहे. अधिक तें काय करावयाचें तें लिहून पाठवावें. दुसरें, मालिटाचें म्हणणें आहे कीं, पातशाहानें हत्ती, जीगा, शिर्पेच, व पाटिलबावांनीं जेगा, शिर्पेच, माळ, हत्ती, याप्रमाणें दिल्हे आहेत म्हणोन. त्यास याप्रमाणें जालें आहे कीं काय तें लिहून पाठवावें म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसीयास, मालतसाहेब येथें आला, त्या समयीं त्यांस बहुमान मोत्यांची माळ, जीगा, शिर्पेच, वस्त्रें, घोडा, हत्तीची परवानगी, याप्रमाणें दिल्हे. याच अन्वयें पातशाहाकडूनही दिल्हें होतें. आपल्यास त्यांजकडून पलटणें आणवून चाकरी घेणें, त्यापक्षीं हत्ती, घोडा, जीगा, शिर्पेच, वस्त्रें देऊन बहुमान करावा लागेल. रवाना छ ८ साबान. हे विनंती.

¶*Mahadji informs Nana in what manner the English ambassador Malet should be received at Poona.*

No. 453 5th June 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—तिगस्ता पातशाहाकडून राजश्री देवराव हिंगणे यांचे विद्यमानें श्रीमंतांस टिक्याचीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती, व मीर्जा अमानीकडून वस्त्रें, जवाहीर, हत्ती याप्रमाणें व पत्रें आलीं होतीं, व आम्हांस राजश्री हरिपंततात्यांस पातशाहाकडून वस्त्रें, जवाहीर व पत्रें याप्रों आलीं होतीं. त्या पत्रांचीं उत्तरें व वस्त्रें, जवाहीर व हत्ती व नजर श्रीमंतांकडून पातशाहास व वजिरास वस्त्रें, जवाहीर, हत्ती याप्रों व आम्हांकडील व हरिपंततात्यांकडील पातशाहास वस्त्रें, जवाहीर व नजर व पत्रांचीं उत्तरें याप्रों देवराव यांचे चिरंजिवाबरोबर रवाना केलीं आहेत व राजश्री पाटिलबावांस पत्रें पातशहास प्रविष्ट करण्याविसीं मशारनिल्हेजवळ दिल्हीं आहेत. घेऊन येतील. पातशाहाची व पाटीलबावांची भेट नव्हती त्यापूर्वी तेथून आले. याकरितां तुम्हांस कळावें म्हणून लिों आहे म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें त्यावरून कळलें. ऐसियास, श्रीमंतांकडील व आपल्याकडील पातशाहास नजर वगैरे सरंजाम राजश्री देवराव

हिंगणे यांचे चिरंजिवासमागमें रवाना जाहला तो अद्यापि येथें येऊन पावला नाहीं. आल्यावर लिहून पाठवूं. रवाना चंद्र ८ साबान. हे विनंती.

¶*Mahadji is informed of presents being sent to the Emperor from the Peshwa.*

No. 454 5th June 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—श्रीमथुरा, वृंदावन हीं दोन्हीं स्थळें सरकारचे नांवें पातशाहापासून करार करून घ्यावीं, म्हणून पूर्वी राजश्री पाटिलबावांस व तुम्हांस लिहिलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, दोन्हीं स्थळें गोसावी यांस जहागीर दिल्ही त्यांत लावून दिल्हीं. त्यास, हल्लीं गोसावी फितुरांत सांपडले. याजकडील जहागीर जप्त केली आहे. त्यास हीं दोन्हीं स्थळें पातशाहापासून हल्लीं सरकारचे नांवें करार करून घ्यावीं म्हणून पाटीलबावांस पूर्वी लिहून पाठविलें आहे. हल्लीं तुम्हीं लिहिल्याअन्वयें बोलून करून घ्यावें. उत्तर होईल तें लिहून पाठवावें. म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें तें कळलें. ऐसियास, येविसीं एक दोन वेळ आपलीं पत्रें पूर्वी आलीं, त्यांचें उत्तर मथुरा वृंदावन, नंदगांव बरसानें या जागा तीर्थाच्या अविंधाकडे होत्या, त्या घेऊन तीर्थींच्या ब्राह्मणांसच द्याव्या हा पूर्व संकल्प होता. त्याप्रमाणें घेऊन सदरहू क्षेत्रींच्या ब्राह्मणांकडे तेथील उत्पन्न पोंहचतें. देखरेखीस अंमल मात्र ठेविला आहे. पातशाहाजादा व मीर्जा सफी चमेलपर्यंत भेटीस आले. त्यांजपासून मथुरा, वृंदावन या स्थळांचा करार करून घेतला. त्या समयीं त्या जिल्ह्यांत अनुपगीर गोसावी त्याचीं ठाणीं नजीक होतीं, याकरितां तेथील देखरेख मात्र त्याजकडे सांगितली होती. मीर्जा सफीकडून घेतलीं त्याच समयीं ब्राह्मणांस दिल्हीं होतीं. देखरेख मात्र गोसावी करून ऐवज ब्राह्मणास पाववीत होते. सांप्रत गोसावी याजकडून दूर जाहल्यापासून एक एक कारकून मात्र क्षेत्रीं ठेविले आहेत. ते ऐवज ब्राह्मणांस पावता करितात. दानपत्रें करून दिल्ह्याचें पूर्वी आपलें लिहिलें आलें असतें तरी श्रीमंतांचे नांवें स्थळांच्या सनदा करावयास ठीकच होतें. रवाना चंद्र ८ साबान. हे विनंती.

¶*Mahadji regrets his inability to secure the holy places of Muthura and Brindaban for the Peshwa, as they had been already assigned to the local Brahmins for worship of the deities.*

No. 455 5th June 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—टिपूकडील वर्तमान पूर्वी जखमी आहे, जिवंत आहे, किंवा मेला, याचा निश्चय एकही होत नाहीं, हें विस्तारें लेहून पाठविलें होतें. अलीकडे चित्रदुर्गावर फौज भारी सरंजामनसीं आला, अशाही बातम्या आल्या. वकील त्याचे येथें होते. त्यांस पत्रें आलीं कीं, बिघाड जाला त्यापक्षीं तुम्हीं उठोन येणें. अद्याप निश्चय एकही होत नाहीं. पुढें बातमी कळेल ती लिहून पाठवूं. दो, चौ दिवसीं कृष्णापार होऊन त्याचे तालुक्यांत गेल्यावर स्पष्ट काय तें समजेल. कांहीं बातम्या गुप्त होऊन अकस्मात फौजेवरी यावें, अशा येतात. कांहीं उंटावरील स्वार हजार बाराशें करून, त्यांत आपण उंटावरी स्वार होऊन अकस्मात येऊन दगा करावा अशा नानाप्रकारच्या बातम्या येतात. तथ्य समजत नांहीं. म्हणोन राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रीं लिहिलें, त्यावरून सविस्तर कळलें. ऐसियास, टिपू मेला ही बातमी दाट आहे, दगा करावयास उंटावर बसून यावें ह्या आवया येतात. त्यास गनीमाई* रीतीनें सावध असल्यास चिंता काय आहे? पूर्वी हैदरनाईकही छलछिद्रें अशीं बहुत करीत होता. परंतु श्रीमंतांचे प्रतापें फौजा टिपूचें पारपत्यच करीत गेल्या आहेत. आपलीही सावधगिरी व फौजेवर दाब बराच आहे. बातमी चांगली राखून टिपूचें पारपत्य करावें. आजपर्यंत त्याची फौज मुकाबल्यास येत नाहीं तेव्हां मेलाच असेल. असिल्यास चिंता काय आहे? श्रीमंतांचे प्रतापें त्याचें पारपत्य होईल. रवाना चंद्र ८ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

Mahadji advises Nana to guard against being surprised by Tipu.

No. 456 21st June 1786.

छ ८ सवाल

(सदाशिव दिनकराचे पत्र)

छ विज्ञापना ऐसीजे :—इंद्रसेन इंग्रज येथें वकिलीस होता, तो नजीक लालसोट येथील मुक्कामींहून रुसून गेला तसा आजपावेतों आगरेयांत होता. वर्तमान

---

* गनिमी कावा.

कलकत्तेकरांस कळल्यावर त्यांनीं इंद्रसेनास लेहून राजश्री पाटिलबावांकडे पाठविला. त्यानें बावांस वर्तमान लेहून पाठविलें कीं, राजश्री सदाशिव मल्हार यांस पाठवावें. ते आले म्हणजे मी स्वार होऊन येईन. त्यावरून येथून सदाशिव मल्हार यांची रवानगी केली. गेले. आजपावेतों आगरेयासच होते. बावांचा मुक्काम डिगेस आला, ते दिवशीं इंद्रसेनही सदाशिव मल्हार सुधां गोवर्धनास आला. बादशाहाचें कूच दिल्लीस छ २५ सावानीं आहे. दरमजल दहा कोसानें चौ मजलीनें दिल्लीस पोंहचणार. त्याचे रवानगीची निकड आहे. बादशाहाचें कूच होऊन गेल्यावर बावा कूच करून छावणीस यमुनातीरास जाणार. मथुरा वृंदावन अगर चिरघांट यांतून एके जागां छावणी होईल. आज छ २४ सावान गुरुवारीं इंद्रसेनास सामोरे जाऊन, घेऊन येऊन, बादशाचे भेटीस घेऊन जाऊन खिलत देवणार. उदईक बादशाहाचें कूच होणार हे विज्ञापना.*

Sadashiv Dinkar reports the return of Anderson, the English Resident, to Sindia's camp, which he had left in anger some days back.

No. 457 23rd June 1786.

पैवस्ती चंद्र ८ सवाल सबा समानीन,

हस्ते काशीद जोडी सरकार.

श्री

छ सेवेसीं विनंती सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २६ साबान मुक्काम डिग, प्रांत जाठवाडा, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—चंद्र ७ जमादिलावल व चंद्र १७ जमादिलावल एकूण दो रवानग्यांत पत्रें सादर जाहलीं. त्यांत राजश्री पाटिलबावा यांचे नांवें पत्रें होतीं तीं प्रविष्ट करून दिल्हीं. त्यांचीं उत्तरें त्यांनीं आपले पत्राचीं

---

* आपल्या बडतर्फ केलेल्या मुनशीशीं महादजी आंतून कारस्थानें करतो या संशयावरून रेसिडेन्टानें कांहीं काळ शिंद्याचा दरबार वर्ज्य केला होता. प्रकरण चांगलें रंगलें. पहा ले. नं. ३१, Vol. I, Poona Residency Correspondence.

व कित्येक मजकुराचीं सेवकाचे नांवें त्यांच्याही मालुमाता* त्यांनीं जमा धरून उत्तरें लिहून दिल्हीं, तीं पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर मजकूर विदित होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is merely a c vering letter enclosing replies to all the queri s from Poona.*

No. 458 23rd June 1786.

पौ॥ चंद्र ८ सवाल सबा समानीन.

छ विज्ञापना ऐसीजे:—छ ७ जमादिलावल आज्ञापत्रें सादर जालीं. त्यांत इतके मजकुराची आज्ञा सेवकाचे पत्रीं—

१ इंग्रज फरासीस टिपूस सामील होतील. फरासीस म्हणतात टिपूची कुमक करीत नाहीं. त्याचा भरोंसा काय ? इंग्रजांचीं पलटणें आपणांत सामील असल्यास टिपूचे सामील होऊं पावणार नाहींत. यास्तव पाटिलबावांस सांगोन पलटणें इंग्रजांचीं कांहीं पाठवावीं. याप्रमाणें पाटिलबावांसीं बोलणें, उत्तर होईल तें लिहून पाठवणें.

१ तिगस्तां इंग्रजांचे कंपू येतात, मसलत सरकारांतून करावी, म्हणोन राजश्री पाटिलबावांचीं, तुमचीं, पत्रें आलीं. त्यावरून मसलत करतों याप्रमाणें उत्तर पाठवून, सरकारांत फौजेचीं देणीं मबलग असतां, कर्जवाम करून सिद्धटेकचे सुमारें आलों. तों इंग्रजांनीं परभारें टिपूसीं तह केला. खर्च अंगावर आला. नवाबाची भेट होऊन, टिपूचे मसलतीस अनकूल असावें असें करून माघारे आलों. पुढें टिपूचे मसलतीचा तपसील व नवाब व भोसले व सरकारचे फौजेचे जथांचा तपसील लिहिण्यांत येऊन, ऐवजाची ओढ भारी, मागील देणीं फार, तत्रापि कळेल तसें करून गाडा चालविला आहे. छावणी करून मसलत करावी हाच इरादा आहे. पार पाडणार श्रीमंतांचें दैव आहे. पांच साहा रवानग्यांचीं उत्तरें आलीं नाहींत.

१ छ १७ जमादिलावलचीं पत्रें सेवकाचे नांवें सादर होतीं. त्याच्या मालुमाता बावांनीं जमा धरून उत्तरें लिहिलीं आहेत. त्यांचा लाखोटाही निराळाच आहे.

---

* आलेल्या पत्रांचा मतलब.

१ टिपू सरकारावर मसलत करावयाकरितां पटणाहून निघोन बेंगरुळास आला. कोडगनायमार म्हणोन जमीदार पाळेगारीनें आहे, त्यासीं लढाई जाली. त्यांत गोळीची जखम लागली. पटणास माघारा आला. बारा दिवस होता मग मेला. काळीपुळी होऊन मेला. कोणी आहे म्हणतात. परंतु तो जिवंत आहे असें समजून आम्ही मसलत करितों.

१ सरकारांत ओढ कोणे रीतची हें लोपलें नाहीं. तत्रापि टिपूची मसलत प्राप्त जाली. न करितां परिणाम ठीक नाहीं जाणोन करणें लागलें. ऐकिल्यांत आलें कीं, अफराशाबखानाचा भाऊ व बेगम यांस राजश्री पाटिलबावांनीं हस्तगत केलें. त्यांचा खजाना व जवाहीर मिळोन वगैरे दीड दोन करोडींची मत्ता आली. ही गोष्ट चांगली. पहिलेपासून हिंदुस्थानांतून शिंदे ऐवज पाठवीतही गेले आहेत. प्रस्तुत मसलतीचा समय जाणून लिहिलें आहे. तुम्हीं बोलावें. तेही करितील.

१ आम्ही सगर तालुक्यांत आलों. तों कितुराकडे टिपूची फौज आली होती त्यांनीं जांबोटी व सडें दोन ठाणीं जांबोटीकरांचीं घेतलीं व सांवताचे वाडीवर गलबल करणार. तिकडे होळकरांची रवानगी केली. होळकर व राजश्री गणेशपंत यांची रवानगी ऐकून वाडीकडील शह सोडून कितुराकडे त्याची फौज गेली.

याच्या मालुमाता राजश्री पाटिलबावांनीं जमा धरून जाब दिले ते पाठविले आहेत, त्यांवरून वर्तमान श्रुत होईल. मजपासीं लिहिणार दुसरा नाहीं. स्वयें शक्ति नाहीं. म्हणून मी निराळचा मालुमाता जमा धरून जाब लिहिले नाहींत. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar acknowledges receipt of several letters from Poona reporting the serious situation caused by Tipu's aggressions.*

No. 459 June 1786.

चंद्र ८ सवाल सबा समानीन

(3rd August 1786.)

(लेखक सदाशिव दिनकर)

विज्ञापना ऐसीजे:—महेश्वरास आल्यावर मातुश्री अहल्याबाई यांची भेट घेऊन तिकडील मसलतीचा अर्थ निदान पराकाष्टा पंधरा लक्षपावेतों तरी जरूर ऐवज पाठवावा म्हणून स्वामींचे आज्ञेप्रमाणें त्यांसीं बोललों. उत्तरें जाहलीं

कीं, छावणी कर्नाटकांत जाहल्याखेरीज टिपूचें पारिपत्य यथास्थित होत नाहीं, आणि छावणी जाहली असतां फौजेस पैका पाहिजे. याकरितां निदान पंधरा लक्ष रुपयेपावेतों ऐवज पाठवावा म्हणून पत्रें येतात. येथील प्रकार श्रीमंतांसीं लोपला नाहीं. इकडील महालांचा आकार किती आहे तो त्यांचे ध्यानांत आहे व आम्हीही वरचेवर लिहीतच आहों. पूर्वी हिशेबही पाठविले होते. असें असून पंधरा लक्ष रुपये पाठवावे म्हणून म्हणतात यास काय करावें? वोढा करून कर्ज करून कसेही तऱ्हेनें मसलतीची वेळ राखल्यानें सरकारचाकरी होऊन सरदारीचा नक्ष आपलाच आहे म्हणून बोललों. उत्तर जाहलें जे, नक्ष गैर नक्ष सर्व सोडून तीर्थाचे कांठीं स्नान संध्या करून श्रीमंतांस अभीष्ट चिंतून कालाचे दिवस काढतों. कर्जवाम करून पांच रुपये मसलतीच्या वेळेस पाठवावे तर आतां आमचा वृद्धापकाळ, पोटीं पुत्र नाहीं कीं तो काळजी धरून आमच्या हातचें कर्ज वारील. सर्व अर्थ श्रीमंतांचे ध्यानांत आहेत. तथापि ते लिहितात, तेव्हां त्यांचे आज्ञेवरून पेस्तर दुसाला ऐवज मामलेदारांजवळून घ्यावयाचे करून, त्यांत पांच लक्ष रुपये पूर्वी पाठविले व दोन लक्ष रुपयांच्या चिठ्या हल्लीं पाठविल्या. आणखीही दोन तीन लक्ष रुपयेपावेतों पाठवावयाचे तरतूदेंत आहें. ऐवज जमा जाहल्यास पाठवीन. हे श्रीमंतांचे आज्ञेवरून तोड काढली. याचा निर्वाह करणार तेच आहेत. याप्रमाणें उत्तरें जाहलीं. छावणी तिकडे जाहल्यास तीन लक्षपावेतों ऐवज पाठवितील, असा बोलण्यांतील आशय दिसला. स्वामींनीं कित्येक प्रकारें खातरजमेचे अर्थ बाईस बोलावयाविषयीं आज्ञा केली होती, त्याप्रमाणें बोललों. त्यांनीं उत्तर केलें कीं, माझें लक्ष दुसरें नाहीं. मजला सर्व प्रकारें त्यांचाच भरंवसा आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar succeeds in persuading Ahalyabai to remit a few lakhs of Rupees to Poona to support the preparations against Tipu.*

No. 460 26th July 1786.

पैवस्ती छ जिल्काद सबा समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती:—आपण पत्र पाठविलें तें पावलें. मुंबईहून मालीट इंग्रज पुण्यास आला. श्रीमंतांची भेट घेतली. पुढें मसलतीस कांहीं उपयोगी बोलणें

कसें हें कळलें पाहिजे, याजकरितां त्यास लष्करांत बोलाविलें आहे. त्यावरून मालीट पुण्याहून लष्करांत यावयासी निघाला आहे. कलकत्त्यास आपण पत्रें सरकारांत कुमक येण्याविसीं पाठविलीं. त्यावरून कलकत्तेकरांचें पत्र सरकारांत मालिटाकडे आलें. त्याणें येथें पाठविलें. त्याची नक्कल पाठविली आहे त्यावरून कळेल. त्यांत कुमक द्यावयाविसीं मुंबईकरांस लिहिलें आहे. जी पाहिजे ती पाठवून देतील. त्यावरून मुंबईकरांस दहा पलटणें पाठवावयाविसीं लिहून पत्र पाठविलें आहे. मग कधीं पाठवितात, काय लिहितात, हें उत्तर आलियावरी लिहून पाठवूं. नवाब खुद्द रहाते तरी इतकी पलटणाची गरज नव्हती. हे गेल्यामुळें दहा पलटणांविसीं लिहिलें आहे. उत्तर काय येतें व मालिट काय बोलतो पहावें म्हणोन वगैरे लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, मालिट पुण्यास आला. त्यास आपण बोलावूं पाठविलें. त्यावरून आपणांपासीं येऊन त्याची आपली भेट जालीच असेल. कलकत्त्यास येथून कुमकेकरितां वरचेवर पत्रें जात होतीं. त्यास, हल्लीं कलकत्त्याहून मालिट याजकडे पत्र मुंबईकरांस कुमकेविसीं आलें, हें आपण लिहिल्यावरून कळलें. दहा पलटणें पाठवावयाविसीं मुंबईस आपलीं पत्रें गेलीं. त्यांचें उत्तर काय आलें तें लिहून कळवावें. त्यासारखी इंद्रसेनास ताकीद केली जाईल. नवाब असते, तरी इतके पलटणांचें प्रयोजन नव्हतें म्हणोन लिहिलें, त्यास येविसींचें अलाहिदा लिहिलें आहे, त्यावरून कळेल. रवाना छ २९ रमजान. हे विनंती.

¶*Mahadji learns from Nana about his having invited Malet to his camp at Badami and having asked the Bombay Government for a loan of some battalions by way of help against Tipu.*

No. 461 26th July 1786.

पैवस्ती छ १२ जिल्काद सबा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण पत्र चंद्र २ सावानचें पाठविलें तें पावलें. बदामीचा किल्ला घेतल्याचें वर्तमान पेशजी आपणांस लेहून पाठविलेंच आहे. सांप्रत पर्जन्यकाल आला, फौज छावणीस राहील, त्याचे खर्चाची बेगमी व्हावी

व श्रीमंतांजवळही असिलें पाहिजे, यास्तव राजश्री हरिपंततात्या व राजश्री तुकोजी होळकर वगैरे सरदार, फौज सुद्धां व गाडद व तोफखाना छावणीस ठेवून आम्हीं दरमजल पुण्यास जात आहों म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियास, बदामीचा किल्ला घेतल्यावर फौज छावणीस राहील त्याचे खर्चाची तर्तूद व्हावी व श्रीमंतांजवळही असिलें पाहिजे. याकरितां राजश्री हरिपंततात्या व होळकर वगैरे सरदार फौज सुद्धां व गाडद व तोफखाना ठेवून आपण पुण्यास यावयाचा विचार केला, तो समजोनच केला असेल. त्यास पुण्यास येणें होऊन श्रीमंतांची भेट जाहल्याचें कळवावें. फौजा मोहिमेवर छावणीस ठेविल्या, येणेंकरून टिपूवर जरब बसोन सरकार कामें होतील. बादबरसाद टिपूचें पारपत्य पुरतेपणें व्हावें. येविसींची तर्तूद आतांपासून होतच असेल. राजश्री हरिपंततात्या, होळकर वगैरे सरदार तिकडे मोहिमशीर आहेत. त्यांची पुस्तपुन्हा वरचेवर व्हावी. आपलें येणें पुण्यास होईलच. तिकडील वरचेवर वर्तमान येत जाईल तें लिहून कळवावें. रवाना चंद्र २९ रमजान. हे विनंती.

¶ *Mahadji learns from Nana the capture of Badami and of the quartering of the Maratha armies in Karnatak during the monsoon.*

No. 462 28th July 1786.

पैवस्ती छ १२ जिल्काद सबा समानीन.

राजश्री बाळाजीपैत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—राजश्री कृष्णाजी पवार व सदाशिवराव पवार यांजकडे पोा देवासें प्रांत माळवा हा महाल आहे. त्यास, तेथील चौधरीपणा पूर्वी मोगलाई अमलापासून कामकारभार वडीलकी रघुनाथसिंग यांचेच वडील करीत आले. त्यामागें आजपावेतों रघुनाथसिंग याणेंच वहिवाट पहिलें चालत आलें त्याप्रोांच केली. हक्क रुसूम याजकडे चालतो. वरकड भावांस पूर्वीपासून नेमणूक मात्र आहे. त्याप्रमाणें चालत असतां, हल्लीं किसनसिंग यानें पुण्यास जाऊन, सरकारांत गैरवाका समजावून, सरकारांतून रघुनाथसिंग यास न्यावयास खासबारदार देवाशास आले आहेत. त्यास रघुनाथसिंगाचा काल जहाला. त्याचीं मुलें लहान आहेत. पहिलेपासून जहागीरदारांकडील फिर्यादी सरकारांत मनास आणल्या नाहींत. जिकडील कजिया तिकडे लावून

द्यावा, जहागीरदारांनींच मनास आणोन विल्हे लावावें, असेंच चालत आलें आहे. सांप्रत पवार इकडे आहेत. कृष्णसिंग तेथें राहिल्यामुळें महालांचा बखेडा होतो, लावणी होत नाहीं, तेव्हां पवार यांचें नुकसान होतें. यास्तव रघुनाथसिंग याचे घरीं मुलांमाणसांस तगादा सरकारचे खासबारदार करीत बसले आहेत. त्यांस मनाचिठी जाऊन माघारें आणवावें. किसनसिंग यास ताकीद होऊन पूर्वीपासून चालत आलें आहे त्याप्रमाणें नेमणूक घेऊन, गैरवाजवी खटला न करितां प्रगणे मजकुरीं राहून, महालांचा बखेडा न करी तें केलें पाहिजे. रवाना चंद्र २ शवाल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to do justice to the heirs of Raghunath Singh, the Chaudhari of Dewas, and not to upset the previous settlement concerning the internal affairs of the Dewas Jagir.*

No. 463

July 1786.

पै॥ छ ८ सवाल सबा समानीन.

(पुढील ले. ४७७ पावेतोंचीं सर्व पत्रें सदाशिव दिनकराचीं)

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री राजेश्वरराव, सदाशिव रामचंद्राचे चिरंजीव, येथें आहेत. त्यांस दीड हजार रुपये दरमहा खर्चास द्यावा लागतो. राजश्री पाटिलबावा समागमें आहेत. त्याजकरितां बावांचें बोलणें दर बैठकीस होत आहे कीं, मशारनिल्हेविसीं आम्हीं किती पत्रें श्रीमंत राजश्री नाना यांस पाठविलीं कीं, हे सरकारचे पदरचे; यांस सरकारचें पत्र पाठऊन घेऊन जावें; यांचें चालवावें, असें किती वेळ लिहिलें. परंतु जाबच येत नाहीं. याचें कारण कळत नाहीं. सदाशिव रामचंद्र यांचा संदेह होता ते गेले. तो विचार चिरंजीवांकडे राहिला नाहीं. यास्तव यांस सरकारचें पत्र पाठऊन द्यावें, म्हणजे पुण्यास येतील. गांवखेडीं, बाग, मळे, कुरणें, कदीम यांचीं यांस देऊन सध्यां चालवावें. पुढें सेवा करितील तेव्हां कृपा होईल असें वारंवार म्हणतात. या मजकुराचें उत्तर येत नाहीं. तरी उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji recommends the restoration of his ancestral property to the son and heir of Sadashiv Ramchandra, a staunch partisan of Raghoba.*

No. 464 July 1786.

पैा छ ८ सवाल सबा समानीन.

छ विज्ञापना ऐसीजे :—छ ७ जमादिलावलचें पत्र सादर जालें. त्यांत आज्ञा जे, राजश्री रघुपतराव नारायण यांजकडे सरदारी, राजश्री पाटिलबावांकडील रामजी पाटील यांणीं सांगितलें व चिटी दाखविली व खातरजमा केली, त्यावरून सांगितली. येविसीं विस्तारें पत्रें पूर्वी लिहून पाठविलीं. परंतु बंदोबस्त होऊन हिंदुस्थानांतील महाल त्यांचे त्यांजकडे चालावे ते चालत नाहीं. सरकारावर मसलत भारी पडली असतां पथकाचा उपयोग चाकरीचा पडावा, परंतु हिसक्यामुळें कांहींच होत नाहीं. ते महाल यांजकडे चालते करावे. समयास चाकरी होईल म्हणोन तुम्हीं पाटिलबावांशीं बोलणें करून उत्तर पाठवणें म्हणोन. त्यास आज्ञेप्रमाणें पाटिलबावांसीं बोललों. यांचें उत्तर एकच आहे. राजश्री त्रिंबकराव नारायण यांचा जाबसाल आमचे विद्यमानचा, सरदारी दिली ते समयीं आम्ही पैक्याच्या दरम्यान आलों, त्याचा फडशा अद्यापि नाहीं. त्रिंबकराव याजकडे दोष असतां आम्हांस लेहावें होतें. रामजी पाटिलाचा मजकूर वारंवार लिहिण्यांत येतो याचे जाबसाल पहिलेच जाले. आम्हांस रघुपतरायाकडे सरदारी द्यावयाची असती तर श्रीमंत राजश्री नाना यांस (कां) न लिहितों. रामजी पाटलानें काय कावित्र* केलें असेल ते जाणत. आम्हांस किमपि ठाऊक नाहीं. उगीच त्रिंबकरायाची अबरू घेतली. कुटुंब सुद्धां कैद करून आब दवडला. बरें, रघुपतरायानें सरदारी करून सरकारचाकरी केली किंवा आपले घरचा तरी बंदोबस्त केला ? एकही नाहीं. सरकारचाकरी होत नाहीं. असें असतां अद्यापि त्रिंबकराव पेंचांतच आहेत. परम आश्चर्य वाटतें. त्रिंबकरायाची ही दशा जाल्यानें आमचा केवळ दुर्लोकिक जाला, तो काय सांगावा ! तेव्हां पुन्हां डौल सरदारी त्रिंबकराव यांजकडे द्यावी. दिवसगतीवर टाकून सरकारचाकरी बुडवावी युक्त नाहीं. पुन्हां सरदारी त्रिंबकराव याजकडे दिल्यासच आमची स्थित व सरकारचाकरी दोन्ही होतात. यास्तव त्रिंबकराव यास सरदारीचीं वस्त्रें देऊन फंद तोडून टाकावा असें म्हणतात. या अगोदर याच अन्वयें आज्ञापत्र सादर जालें होतें, त्यावरून पाटिलबावांस विचारिलें. ते समयीं त्रिंबकराव याजकडे सरदारी बहाल जाल्यासच आमचें स्वरूप. आणखीही मजकूर सेवकास लिहावयास सांगि-

* कसब.

तल्याप्रमाणें पत्राचे उत्तरीं विनंती केली. त्याजबरोबर बावांचेंही पत्र स्वामींचे पत्राची मालुमात जमा धरून उत्तराचा हवाला सेवकाचे पत्रावर लिहिला आहे. सरदारी त्रिंबकराव यास सांगावी हेंच यांचें बोलणें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji again recommends to Nana Trimbak Rao Raje Bahadur for being restored to his Jagir. Sadashiv Dinkar says that Mahadji was inexorable on the point.*

No. 465 July 1786.

छ ८ सवाल सबा समानीन.

श्री

छ विज्ञापना ऐसीजे :—छ ७ जमादिलावलचें आज्ञापत्र सादर जालें. त्यांत आज्ञा जे, पुण्याहून पत्रें आम्हीं स्वारीस निघणार म्हणोन पाठविलीं. त्यांत कितेक मजकूर होते त्यांचीं उत्तरें आलीं नाहींत. त्यावर बाहेर निघाल्यावरही पत्रें पाठविलीं. त्यांचींही उत्तरें आलीं नाहींत हें काय ? उत्तरें वरचेवर येत जावीं. राजश्री बापू भावे यांची रवानगी केली. ते तुम्हांपासीं पावल्यावर तुमचें राहणें तेथें जाल्यास चांगलेंच आहे. कदाचित् शरीरप्रकृतिमुळें राहणें न होय, तर मागीलपुढील जावसालांची माहितगारी करून मशारनिल्हेस समजाऊन देणें म्हणोन आज्ञा. ऐशास पहिले चौदा पंधरा महिने जाब मिळाले नाहींत. त्याअलीकडे जाब वरचेवर मिळत नाहींत. चार दिवस मागाहून मिळतात. ते रवाना जालेत व होतात. आतां जाब कोणी राहिले नाहींत. कुल रवानग्यांचे जाब रवाना केले व करीत असतों. बावांकडील जाबांस विलंब लागला, अगर माझे शरीरविकलतेमुळें काय विलंब लागत असेल तो लागतो. उत्तरें अगदीं रवानग्यांचीं पाठविलीं आहेत. बापू भावे, मुकुंददऱ्यापावेतों आल्याचें पत्र आलें. कोटचास आले म्हणून वर्तमान ऐकिलें. येथें आल्यावर स्मरण असेल तितकी माहितगारी करून देईन. कागद फाडले ते समयीं माझे शरीराची दशा ईश्वरच जाणें. शुद्धि देहाची देखील नवती. वस्तवानी कोण आटोपील याची स्मृति नवती. मोठी काळजी सरकारचे पत्राची जाली कीं, राजकारणी मजकुराचे कागद, मजला एक एक घटिका कसी जाईल संदेह वारंवार. विस्मृति पडत होती. निधनाचे काठा-

सच आलों. कागद कोणाचे हातीं पडतील? संरक्षणास जवळ जमाव पुष्कळ होता. भरवशाचा एकही नाहीं. जाणून कागद फाडिले. त्याच्या नकला कोणी करून ठेवाव्या? माझें आयुष्य उर्वरीत हें तों खरेंच. वस्तुतः स्वामींच्या सदय कृपावलोकनेंकरून हा कालवर जिवंत आहें. मात्र शरीर श्लथच* जालें. पहिलें एका प्रहराचे लिहिण्यास आतां आठा रोजांत लिहितां जड पडतें. अशी दशा जाली आहे. यामुळें लाचार आहें व लाचार जाल्यानिमित्तच कागद फाडावे लागले. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सविस्तर मजकूर वेदमूर्ति राजश्री पांडुरंग भटजीस लिहिले आहेत, तेही विनंती करितील. बापू भावे आल्यावर तेही शरीर अवस्था पाहून विनंतीपत्रीं विनंती करितील. एक वेळ स्वामींचे पाय पहावे, माझे अंतःकरणीं फार आस्था होती. परंतु शरीरानें फार सोडलें, यास्तव विनंती कीं, त्रिस्थलीं यात्रेची आज्ञा सादर व्हावी. श्रीहरीनें निभाऊन नेऊन यात्रा करविली, आणि त्या तीर्थ व देवतादर्शनेंकरून शरीरांत कटाक्ष आला तर सेवेसीं यावें. त्या पायांवांचून मजला आश्रयच नाहीं. बापू भावे जैपूरप्रांतीं ब्राह्मणवास येथील मुक्कामीं लष्करास पावले. राजश्री पाटिलबावांची भेटी जाली. या रवानगीचीं पत्रें अगदीं त्यांनीं पाहून रवाना केलीं. त्यांनींही सेवेसीं विनंतीपत्र लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar writes to Nana about his recovery from a very serious illness. His successor Bapu Bhave's arrival in Sindia's camp is also communicated.*

No. 466 July 1786.

पैवस्ती चंद्र ८ सवाल सबा समानीन

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री बाबाराव वकील नि।। नवाब निजाम-अलीखां यांजकडे मौजे चांदेपूर परगणे नेवासें इनामी आहे. जकात सुद्धां अमल चालतो. पा मजकूर सरकारांत आल्यापासोन आजपावेतों जकातीचा तगादा नेवाशाचे कमाविसदारानीं केला नाहीं. हल्लीं नेवासेकर कमाविसदारांनीं जकातीबद्दल पस्तीसशें रुपयांची वरात गांवावर करून वसूल घेतात. मशारनिल्हेनीं वर्तमान राजश्री पाटिलबावांस सांगितलें. त्यावरून बावांनीं स्वामींस पत्र सदर्हू

---

* ढिलें.

वरात मना करण्याविसीं व कदाचित् वसूल घेतला असेल तो माघारा देण्याविसीं पेशजीं मशारनिल्हेजवळ दिल्हें व सेवकाकडूनही विनंतीपत्र देविल्यावरून दिल्हें. दोन्हीं पत्रें सेवेसीं पाठविलीं असतील. हल्लींही बावांनीं सांगितल्यावरून विनंती केली असे. व बाबाराव यांनींही विनंतीपत्र सेवेसीं लिहिलें आहे, त्यावरून मजकूर विदित होईल. मशारनिल्हेचे पत्राचें उत्तर व ऐवजाची माफी करण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar requests Nana to remit the customs revenue from Pargana Newasa to Baba Rao Govind, the Nizam's Vakeel in Sindia's camp, who owned it as his Watan.*

No. 467 July 1786

छ ८ सवाल सबा समानीन.

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री पाटिलबावा यांचे डांकेत वर्तमान आलें जे, नवाब निजामअलीखान बदामीपासोन माघारा कूच करून हैदराबादेस गेले. यावरून बावा फार श्रमी जाले. नवाब शेवट करितील आम्हांस भरवसा नवताच. तत्रापि मनसबा करून जय पाडून भोसल्यासुधां जुटीनें चालले होते. फार चांगलें होतें. नवाब मागें अंतर शीतल जाल्यावांचून माघारें कूच केलें नसेल. खरें वर्तमान कळल्यावांचून कसें म्हणावें? मसलतीस धक्का बसला. गोष्ट बरी न जाली. हा मजकूर कसा जाला? तुम्हीं श्रीमंत राजश्री नाना यांस विनंती लेहून उत्तर आणवणें म्हणाले. त्यावरून विनंती केली असे. उत्तराविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. बदामी किल्ला स्वामींनीं हल्ला करून हैदराचे लोकांवर मोठी सख्ती करून घेतला*. हैदराचे लोकांनीं किल्याचे दरवाज्यास आग दिल्ही. किल्यावर पाणी नवतें. आपले लोकांनीं खालून पाणी आणून, दरवाजा विझऊन, आंत शिरून हैदराचे लोक धरून बाहेर काढिले. त्यांपैकीं किल्लेदार कैदेंत घातला. वरकड सर्वांचा कटा केला. हें ऐकून फार खूष जाले. नवाब हैदराबादेस गेले असतां त्याजमागें हल्ला करून मोठे

*बदामी किल्ला मराठ्यांनीं २१ मे १७८६ रोजीं निकराचा हल्ला करून घेतला.

जबरदस्तीनें बदामीसारखा किल्ला हस्तगत करून कटा केला. फार चांगलें जालें असें बोलले. स्वामींची स्वारी माघारी पुण्यास आली व राजश्री मुधोजी भोसले नागपुरास गेले हेंही वर्तमान डांकेंत आलें. ऐकून विमनस्क जाले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates to Nana Sindia's satisfaction over the capture of Badami by the Poona army; he is, however, perturbed over the Nizam's return to his capital in the midst of the campaign.*

No. 468 July 1786.

छ ८ सवाल.

छ विज्ञापना-ऐसीज :—जैपूरकर दौलतराम* लखनऊस गेला आहे, तो व गोसावी अनुपगीर† कांहीं विचारांत आहेत. जैपुरांतही कांहीं जमाव होत आहे, असें म्हणतात. पक्कें वर्तमान ऐकिल्यावर विनंती करीन. राजश्री पाटिलबावा त्याचें पारपत्य करितील. चिंता नाहीं, हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the visits of agents from Jaipur to Lucknow to incite the Gosavi brothers and other disaffected elements against Sindia.*

No. 469 July 1786.

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री यादवराव पवार यांजविसीं बावांनीं निक्षून भिडेनें सांगितलें व पाटलांनीं सांगितलें, तेव्हां याचें कारण शोधलें. तों संगमनेरच्या सोयरिकेचे वेळेस भोजनास लोक उठेनात, तेव्हां आधीं यादवराव पवार यांचा भाऊ खंडेराव पवार, साऱ्यांचे आधीं भोजनास उठला. तें अगत्य व त्या समयीं बोलून घेतलें आहे जे, तुमच्या सरंजामावर कर्जपटीची माफी करवीन. त्यामुळें आतां भिडेनें सांगत असतात. हें वर्तमान वडिलांच्या श्रवणांत असेल. याकरितां रावजीपंत नानांनीं सांगितलें, व पाटलांनीं सांगोन त्यांणीं आपलें

---

* जयपूरकरांनीं इंग्रजांकडे महादजी विरुद्ध संधान बांधण्याकरितां पाठविलेला वकील. † यावेळीं जहागीर जप्त झाल्यामुळें अनुपगीरानें महादजी विरुद्ध कारस्थानें चालविलीं.

पत्र दिल्हें, तें यादवराव पवाराकडील कोण कारकून तेथें आला असेल तो घेऊन आला असेल. त्याचें वर्तमान याप्रमाणें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar attributes Sindia's earnestness in pleading for Yadav Rao Pawar to the readiness with which the latter joined in a dinner given by Mahadji. This is a reference to Mahadji being excluded in social matters by high class Marathas.*

No. 470 May 1786.

छ विज्ञापना ऐसीजे :—नजफकुलीखान व बाळाजी इंगळे व माचेडीवाला राव जैपूर प्रांतांत गेलेच होते. डिगेचे मुक्कामींहून सरकारचीं पथकें चारी यांची फौज सडी करून, त्यांजकडे राजश्री चिमणाजी खंडेराव निसबत राजश्री शिवाजी विठ्ठल यांजबरोबर रवाना केलीं. सवेंच बादशाह सुद्धां राजश्री पाटिलबावांचें कूच जालें. पंधरा वीस रोजां लालसोट नजीकचे मुक्कामीं आले. येथून सत्तावीस कोस जैपूर आहे. रावराजा वगैरे सांगानेरच्या किल्याजवळ मुक्काम करून होते. त्याजकडे राज्याची बसिटी(?) होती. वर्तमान ऐकिल्यांत आलें आहे जे, पृथ्वीसिंगाचा पुत्र मानराजा, रावराजानें कृष्णगडींहून आणिला होता, त्यास फिरून कृष्णगडास बिदा केला; आणि रावराजा व बाळाजी इंगळे यांनीं फौज बुलगे सांगानेराजवळ ठेऊन सडे व जैपूरकर राजाकडील बाळानंद महंत व खुशालीराम बोहरा यांस समागमें घेऊन येथें आले आहेत. बावांची भेटी जाली. खलबतें होतात. बहुधा मामलतीचा ठराव करितीलसें दिसतें. ठरण्यांत येईल ते विनंती करीन. राजश्री रामचंद्र तुकदेव जैपुराहून येथें आले आहेत. सरकारचे वकील म्हणतात, बहुत गळाठ्यांत आहे म्हणून सांगतात. बावांसीं भेटले आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. जैपुरकरावर बेरीज तीं करोडीची घातली म्हणोन ऐकतों. ठरावांत येईल तें खरें. हे विज्ञप्ति. जैपुरकराचे वकील गोसाव्याजवळ व लखनौस गेले आहेत, त्या संधानावर लांबणीवर टाकून आहेत. दौलतराम हलद्या जैपुरांत आहे. त्याचें मत भांडावयाचें ऐकतों. अद्याप मामलतीचा ठराव जाला नाहीं. वीस लक्ष बोलतात. यांनीं बादशाहाची नजर व घासदाणा व वाहालेयाचा जागा व गुदस्ताची बाकी मिळून ती करोडीची बेरीज धपका* टाकिला आहे. हे विज्ञप्ति.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana Sindia's advance to Lalsont to back up his heavy demands on the Jaipur State.*

---

* मोठा आघात, जबर मागणी.

No. 471 July 1786.

छ विज्ञापना ऐसीजे:—छ १७ साबानचें पत्र कलमबंदीचें सादर जालें. राजश्री विसाजीपंत बिनी यांची उपमा देऊन बुंदेलखंड व झांशीचा ऐवज देविल्यास कालहरण होईल म्हणोन लिहिलें. त्यास, जे सरदार सरकारांतून पूर्वी जाऊन मसलती केल्या, त्या आपलेकडे मुलूख सुटायाच्या केल्या नाहींत. मुलूख व ऐवज वगैरे सरकारांत आला वगैरे कितेक रीती यांची उपमा कशास बोलण्यांत आणावी? तशा रीतीचें करणें असल्यावर मग काय पाहिजे? म्हणून आज्ञा. ऐशास सदर्हू मजकुराची पुरवणी निराळी आज्ञापिली होती, ती राजश्री पाटिलबावांस दाखविली. उत्तर प्रत्युत्तर त्यांनीं केलें. त्याचा जाबही निराळा विनविला आहे, त्यावरून विदित होईल.

राजश्री पाटिलबावा येथें होते तेव्हां सरकारांत ऐवजाची ओढ व मुलूख नाहीं, कमी जाला; याकरतां हिंदुस्थानांत आम्ही गेलियावर ऐवज किती पाठऊं व मुलूख किती सोडऊं याच्या बेरजा वारंवार बोलण्यांत येत होत्या. तें एकीकडे राहून बुंदेलखंड व झांशीचे ऐवजाविसीं बोलण्यांत आलें. कदाचित् म्हणतील कीं, मसलती पडत गेल्या यास उपाय काय? तर मसलतींतील अर्थ अलाहिदा कलमीं लिहिलाच आहे. म्हणून आज्ञा. ऐशास हें कलम उघड बोलण्यांत येत होतें. त्याचें स्मरण राजश्री पाटिलबावांस नसावें? नसेलसें नाहीं. परंतु आज या गोष्टी बोलावयाचा प्रसंग नाहीं, सबब बोलण्यांत आणीत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji refuses to comply with certain demands made upon him by the Poona Darbar in connection with Bundelkhand.*

No. 472 July 1786.

(पत्र सदाशिव दिनकराचें)

छ विज्ञापना ऐसीजे:—छ १७ साबानचें पत्र सादर जालें, त्यांत आज्ञा जे, राजश्री पाटिलबावांचें व तुमचें बोलणें मसलतसंबंधीं वगैरे बारीक मोठें जालें. त्याचा तपसील पत्रीं लिहिला तो सर्व कळला व या पुरवणीचें उत्तर त्यांचे दृष्टीस पडलें पाहिजे म्हणोन लिहिलें, तें सर्व कळलें. त्यास, टिपू व इंग्रज दोन मनसबे लिहिले आहेत, त्यांचीं उत्तरें अलाहिदा लिहिलीं आहेत, त्यांवरून कळतील.

पत्रें दाखवावयाजोगीं असतात तीं दाखवितों म्हणून लिहितां, तर उत्तम आहे. दाखवावयाजोगीं असतील तीं दाखवीत जाणें म्हणोन आज्ञा. ऐशास ज्याचा प्रसंग पुढें न पडे असा मजकूर असल्यास पत्र दाखवीत नाहीं. खासगत फौजेचे खर्चाकरितां मजला विनंती करावयास सांगितलें. एका पत्राचें उत्तर हें सादर जालें. बावांनीं उत्तराची प्रतीक्षा न करितां फिरून विनंतीपत्र त्याहावयास सांगितलें. त्या वेळेस म्हटलें कीं, एक पत्र गेलें आहे त्याचें उत्तर येईल. मग दुसरें लिहावयाचें जाल्यास लिहावें. असें म्हणत असतां विनंतीपत्र लेहविलेंच. तें रवाना जालें. पहिले पत्राचें उत्तर परगणे भडोच, ग्वालेर, गोहद येथील वसूल काय आला, हें एक पत्र. दुसरें राजश्री बिसाजी कृष्ण यांच्या दृष्टांताचें एक. एकूण दोनी पत्रें उत्तरें सादर जालीं, तीं दाखविल्यानें विक्षेप होईल, म्हणून न दाखवावीं तर मागतीं खर्चाचें बोलणें बोलून पत्र त्याहा म्हणतील, तेव्हां दाखवणें पडतीलच. यास्तव आतांच दाखऊन तूर्त तगादा सोडविला. फिरून म्हणतीलसें वाटत नाहीं. दोन्ही पत्रें दाखविलीं. त्याचा मजकूर निराळे पत्रीं विनविला आहे त्यावरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*This letter from Sadashiv Dinkar to Nana refers to some verbal point of dispute between Mahadji and the Poona Darbar.*

No. 473 July 1786.

पैवस्ती छ ८ सवाल सबा समानीन.

छ विज्ञापना ऐसीजे:—अनुपगीर* गोसावी वृंदावनाहून कूच करून गेला. उमरावगीर अंतरवेदींत होता. त्याजवर देवजी गौळी वगैरे फौज पांच सात हजार रवाना जाली. जाबतेखानाचा लेक गुलामकादर वगैरेस सामील जाला. इकडील फौजेचा जय भारी पाहून उमरावगीर फौज व तोफा जिन्नस अजबाबसुधां गंगापार निघोन गेला. याचीं ठाणीं त्याचे सारे माहलांत बसलीं. अद्यापि फौज तिकडेच आहे. लहानसहान मवासांचीं पारिपत्यें करितात. गोसावी मीर्जा अमानीचे साधनांत आहेत. घडेल तें खरें. जैपुरचा दौलतराम लखनऊस गेला. गोसावीही तिकडेच गेले. याचा अंदेशा हे करितात कीं, जो उठतो तो लखनऊस जाऊन आश्रा करितो. धारराव शिंदे सरहद्देपावेतों गेले होते. आलाजाटाच्या

---

* अनुपगीर हिंमत बहादर मार्चांत पळून जाऊन वजिराचे मलखांत शिरला.

पुतण्याचा मुलूख शीखांनीं घेतला होता, त्यानें यांस नेऊन जोर पोहचाऊन मुलूख सोडऊन घेतला. यांचे फौजेस खावयास दिल्हें. दिवस छावणीचे समीप पाहून माघारे येऊन पाणिपताचे जिल्यांत आहेत. किरकोळ शीख कांहीं लबाडया करीत आहेत. त्यांजवर फौज जाणार ऐकतों. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes about the expeditions sent by Mahadji against the rebels, the Gosai brothers and against the Sikhs.*

No. 474 July 1786.

पैा छ ८ सवाल सबा.

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री पाटिलबावा यांनीं बोलाऊन सांगितलें जे, राजश्री बाबूराव राम मिरीकर यांजकडे कसबे मिरी व मौजे सिंगवें परगणे सेवगांव हे दोन गांव रामराव यांजपासोन श्रीमंतांकडून इनाम वंशपरंपरा आहेत. रामराव वारल्यावर बाबूराव राम आमचे समागमें राहून मामलता करीत असत. कोणीं याजकडून अंतर समजाविलें, त्यावरून आम्ही आपले येथील असाम्या वेतन गांव यांजकडे चालत होते ते बंद करून, मिरी व सिंगवें सरकारांतून जप्ती करविली. मशारनिल्हे आम्हांसमागमें आहेत. अपराधाचा शोध करतां कांहीं ठिकाण लागलें नाहीं. पुरातन पदरचे असतां निरापराध जप्ती जाली जाणून, आम्ही आसाम्या, वेतनें गांव मोकळे करून देऊन, श्रीमंत राजश्री नाना यांस पत्र मिरी व सिंगवें यांची जप्ती मोकळी करण्याविसीं लेहून मशारनिल्हेजवळ दिलें. त्याप्रमाणें तुमचेंही पत्र देविलें, आणि बाबूराव याची बिदा केली. हल्लीं तुमचे पत्राबरोबर पत्र याच मजकुराचें लेहून दिलें आहे. तुम्हीं लेहून पाठवणें. जप्तीमुळें मशारनिल्हेची खराबी फार जाली. जप्तीचा वसूल सरकारांत आलाच आहे. जप्ती मोकळी करतां नजराण्याचा तगादा न होतां, जप्ती मोकळी होऊन गांव त्याचे त्याजकडे वंशपरंपरा चालत तें जालें पाहिजे. म्हणोन सांगितल्यावरून विनंती केली असे. बावांनीं हेच अर्थ सेवेसीं लिहिले आहेत. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar communicates Mahadji's desire that Baburao Ram Mirikar should be pardoned and his inam villages which had been confiscated, be released.*

No. 475 July 1786.

छ ८ सवाल

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री त्रिंबकपंत गोडबोले महायात्रेच्या उद्देशें निघोन उजनीस गेले. तेथें चार महिने बरसात राहतील. त्यास घर जाग्याविसीं राजश्री पाटिलबावांचे पत्र उजनचे कमाविसदारास पाठवणें असी आज्ञा सादर जाली. त्याप्रमाणें बावांस हटकिलें. बावांनीं सांगितलें जे, डिगेचे मुक्कामीं त्यांचें पत्र आलें होतें, तेव्हां उजनचे कमाविसदारास पत्र साहित्याविसीं दिलें होतें. आतांही देतों. पावतें करणें. त्यावरून उजनचे कमाविसदारास पत्र घेऊन त्रिंबकपंतांचे पत्रांत घालून, याच जोडीबरोबर त्रिंबकपंतांकडे उजनीस रवाना केलें. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar informs Nana of arrangements having been made for the residence of one Trimbak Rao Godbole at Ujjain. This Trimbak Rao seems to be one of Nana's officials.*

No. 476 July 1786.

पै॥ छ ८ सवाल सबा समानीन, बराबर
कासीद सरकार (३ आगष्ट १७८६).

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री पाटिलबावा यांचें कूच बादशाह सुधां होऊन जैपूर प्रांतांत येऊन नवाली लालसोट येथें मुक्काम जाले. मोहीम जैपुरावर माचेडीकर रावराजा व नजफकुलीखान व राजश्री बाळोजी इंगळे यांची रवानगी गुदस्तांच जाली होती. ते जैपूर प्रांतांत झुंझत भांडत गढ्या घेत होते. मागाहून सरकारचीं पथकें रवाना जालीं. खासा बादशाहसहित या मुक्कामीं आले. चहूंकडोन मुलखांत दंगा माजला. जैपूरकर राजा प्रतापसिंग, माधोसिंगाचा पुत्र स्थानापन्न आहे, त्याचें वय अठरा वीस वर्षांचें. स्वता ज्ञान नाहीं. कार्यकर्ते अख्त्यार मुखतार, ते आपसांत परस्परें विरोध राखितात. खुशालीराम हलद्या गुदस्तां फौज घेऊन बावांचे दर्शनास आला होता. अफराशाबखान दगा होऊन मारला तेव्हांच खुशालीराम मजकूर दग्यानें मारला गेला. त्याचा भाऊ दवलतराम हलद्या जैपूरकराजवळ बक्षी होता, तो फौज जमा करून शहराबाहेर मुक्काम करून होता. एक दरजी रोडजी नामें पहिले राजाची खवासी* करीत होता. जैपूरकराचे घरीं दस्तूर आहे

---

* अंबारींत मानकरी बसण्याची जागा.

कीं, अन्नपाण्याचें काम ज्याचे स्वाधीन, त्यानें सारा कारभार अख्त्यारीनें करावा अशी चाल आहे. प्रतापसिंग यानें अन्नपान, उदकपान दरजाकडे अख्त्यार दिला, तेव्हां कुल कारभारी दरजी जाला. हें सारें भावाबंदांस सोसेना. त्यांनीं पैगाम केला कीं, दरजी कामांतून निघेल तर आम्ही तुम्हांस अनकूलच असों. दरजी कारभारांत असतां आम्हीं जैपुरास येणार नाहीं. राजानें दरजाकडेसच अखत्यारी चालविली. तरवारीचे कामास दौलतराम हलद्या. हे दोघे मात्र राजाजवळ एकदील. वरकड आपापले जागां संदेहांत. खुशालीराम बेहरा जुना कारभारी त्याजवर विश्वास नाहीं. उगाच माचेडीवाल्याकडे जाबसालास पाठवीत होते. जाई, परंतु हातीं कांहीं नाहीं. बादशाहा व बावांचा मुक्काम येथें आला. तमाम मुलखांत जफत्या पाठविल्या. महालोमहाल कमाविसदार गेले. जागांजागां मवास गढ्यांस मोर्चे लागले. तेव्हां रावराजा व महंत बाळानंद बैरागी माधोसिंगाचा गुरु व खुशालीराम बेहरा* व बाळाजी इंगळे येथें आले. मामलतीचा ठराव साठ लक्षांचा जाला. ऐवजाचा फडशा होणें, याजकरितां खुशालीराम बेहरा यास बाळानंद महंत बैरागी यानें व रावराजानें जैपुरास रवाना केला. त्यानें जाऊन प्रतापसिंग राजाची भेटी घेऊन वर्तमान सांगितलें. ऐवजाचा फडशा करून दिला पाहिजे असें म्हटलें. तेव्हां राजानें उत्तर केलें कीं, कुल कारभाराचा अख्त्यार तुम्हांवरच ठेविला. कळेल तसा उलगडा पाडा. रावराजा व नजफकुली व बाळाजी इंगळे गुदस्तांपासोन जैपूर प्रांतांत फिरतच होते. तथींच दौलतराम हलद्यानें आपलीं कटुंबें जैपुराबाहेर काढून, यमुनेपार लाऊन देऊन, आपण दहा बारा हजार फौज नवी चाकर ठेऊन, शहराबाहेर मुक्काम करून होता. शहरांत पट्टीचा डौल घालून साहुकार धरले. कैद केले. मनस्वी रुपया मागों लागले. यामुळें जैपुरांत आकांत वर्तला. लोक पळूं लागले. ही अवस्था शहरांत जाली. खुशालीराम बेहरा याजवर कारभाराचा अखत्यार दिला. तेच समयीं राजानें दौलतराम हलद्यास बोलाऊन निरोप दिला. खर्चासही दिलें, ऐकतों. संध्याकाळपावेतों दौलतराम आपले घरीं होता. रात्रौ घोडयावर बसोन, शहराबाहेर जाऊन, फौजेंत चार घटिका राहून, चार पांचशें स्वार समागमें घेऊन निघोन मारवाडांत गेला. बिजेसिंग राजा जोधपूरकरासीं भेटला. त्यानें शें दीडशें स्वार समागमें दिले. तेथून कूच करून दरमजल यमुनापार होऊन, तेथून कुटुंब समागमें

* वर दग्यानें मारला गेला असा मजकूर आहे त्याचा अर्थ काय ?

घेऊन लखनऊस गेला असें ऐकतों. काय मनसब्यांत असेल तो जाणे. जैपुरांत राजानें खुशालीराम बेहरा यास कुलअख्त्यारी बोलून वस्त्रें मात्र दिलीं. तितक्यावर बेहऱ्यानें, जुने कारभारी, मुत्सद्दी, दिवाण आदिकरून घरीं बसले होते त्यांस त्यांचे कामावर बहाल करून वस्त्रें देविलीं. नवे कारभारी मुत्सद्दी यांस कैद केलें. साहुकार व वाणी वगैरे शहरची रयत कैद केली होती त्यांस मोकळें केलें. दीलदिलासा देऊन दुकानें बंद होतीं तीं मोकळीं करविलीं. उदीम व्यवहार चालता केला. अन्नपान, उदकपान हा अख्त्यार ज्याकडे त्यानें सारा कारभार अखत्यारीनें करावा अशी जैपुरची चाल आहे. तो अधिकार दरजी यावरच राहिला. खुशालीराम बेहरे यास सांगितला नाहीं. यामुळें कामांत फंद राहिला. खुशालीरामाची खातरजमा होईना. मग ऐवजाचा फडशा कसा होतो? खुशालीराम येथें असतां कांहीं ऐवजाच्या हुंड्या व कांहीं जवाहीर आलें होतें, व बेहरा जैपुरास गेला तेथून कांहीं ऐवज व कांहीं जवाहीर पाठविलें. एकूण पहिल्या हुंड्या, जवाहीर व हल्लींच्या हुंड्या, जवाहीर मिळून पांच लक्षांचा भरणा होईल. बाकी ऐवजास ठिकाण नाहीं. साठी लक्षांचा करार ठरला ते समयीं तपसील जाला आहे, वीस लक्ष रुपये सध्यां दो ती महिनीयांनीं द्यावे; वीस लक्ष रुपये भाऊबंद पटाइतापासोन घ्यावे; वीस लक्ष रुपयांचा मुलूख लाऊन द्यावा, असा करार जाला. त्याप्रमाणें यादीबुदी जाल्या नाहींत. यांचे कमाविसदार जागांजागां बसले आहेत. तसें मोघमांत चालतें व फौज प्रांतांत जुंझत भांडत फिरते. जुजबी कोटें वसूल येतो तो पटाइतांपासून घेतात. नगदीचा फडशा करावयाकरितां खुशालीराम बेहरा जैपुरास गेला. तेथील अवस्था वर विनविली आहे. ही मामलतीची दशा आणि येथें फौजेंत ताण खर्चाचा मोठा वाढतो. तपसील काय विनऊं? बादशाहाचे साहा महिने रोजमरा चढला आहे त्याचा तगादा आहे. दिवस छावणीचे जवळ आले. दिल्लीस जातों म्हणतो. रुपयाची सरबरा* होऊन बादशाची रवानगी दिल्लीस व्हावी तें घडत नाहीं, म्हणून बादशाहा अजुर्दा† ! पृथ्वीसिंगाचा लेक मानसिंग कृष्णगडांत आहे, त्यास नजफकुली घेऊन आला. पाटिलबावांची त्याची भेटी जाली. मुक्काम लालसोटाहून तीन कोस दक्षिणेस होता. मामलतेचा फडशा न पडे. दिवस छावणीचे. रोहिणी अखेर जाल्या. मोठा विचार पडला. पुढें जैपुराकडे कूच करणार होते, तों खुशालीराम बेहरा आला. नगदी वीस लक्ष रुपये द्यावे. त्याचे दोन हप्ते, निमे सध्यां, निमे चौ महिनीयां, असा करार

* तरतूद. † रुष्ट.

आहे. पहिल्या हप्त्यांत चार लक्ष रुपये बाकी राहिली. त्यापैकीं बाळानंद महंत मजकूर यानें दों लक्षांचा आपला जिमा करून घेतला. बाकी दोन राहिले. त्याचा भरणा हत्ती घोडे उंट द्यावे, करार केला आहे. याप्रमाणें कबूल करून माघारा कूच करून बादशाहाचा एक कूच हो तों दुसरे दिवशीं मुक्काम करून पेशखेमा* व खासा पुढें मजलीस रवाना करावा. दुसरे दिवशीं येथून कूच करून त्या डेऱ्यास दाखल व्हावें. याप्रमाणें एक कूच एक मुक्काम करीत छावणीस जातात. मथुरेवर छावणी करावी म्हणतात. मग डीग, आगरा, मथुरा कोठेंही छावणी करितील. जैपूरचा भरणा एकशें पांच घोडे व नऊ दहा हत्ती आले आहेत. त्यांची किंमत ठरणें आहे. रावराजा व बाळानंद महंत व खुशालीराम बेहरा समागमेंच आहेत. हिशेबाचा फडशा कोणे मुक्कामीं होईल पाहावें. रायाजी पाटील यांस फौजेसुधां ऐवजाचे वसुलाकरितां जैपूर प्रांतीं ठेविले आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. जैपूरकर बाळानंद महंत व खुशालीराम बेहरा हे निरोप घेऊन जैपुरास गेले. माचेडीकर व नजफकुली हेही निरोप घेऊन गेले. मानसिंगराजा, पृथ्वीसिंगाचा पुत्र, कृष्णगडाहून आला होता त्यास समागमें ठेविला म्हणून ऐकतों. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana the situation at Jaipur and the difficulties of Sindia in that region. Sindia quartered a large part of his army on the state to realise the stipulated tribute.*

No. 477 June 1786.

पै॥ छ ८ सवाल सबा समानीन
(3rd August 1786).

छ विज्ञापना ऐसीजे :—राजश्री आंबूजी इंगळे यानें सरकारचाकरीवर लक्ष फार ठेविलें आहे तें कसें? इकडे सरकारचे महाल व कामें किती आहेत? गोहदकर राण्याचें पारपत्य होऊन गोहद सरकारांत आल्यावर, झांशी संस्थानपैकीं तालुके गोहदकरांनीं घेतले होते ते झांशीचे मामलेदाराकडे द्यावे. करोली संस्थान सरकारचें, तेथील ऐवज उगऊन देवावा. सिरमथुरा सरकारची, तेथील ऐवज अमदानी घेऊन जात होता. सरकारचे कमाविसदारास ऐवज प्राप्त होईना. म्हणोन मी रदबदल राजश्री पाटिलबावांसीं किती केली आहे. सार्थक कांहींच

---

* प्रवासांत पुढें पाठवावयाचें सामान.

जालें नाहीं. उलटें करोली संस्थानपैकीं बिजैपूर मोचें लाऊन आंबूजीकडून घेवविलें. त्याजविसीं स्वामींची आज्ञा आली कीं, करोलीसंस्थानपैकीं कांहीं घेऊं नये. बिजैपूर त्याचें घेतलें तें माघारा द्यावें. येविसीं रदबदल फार केली. चार सालां रुपया करोलीचे राजानें दिला नाहीं. परिछिन्न जाबसाल केला कीं, आम्हीं मुलखाचा पैका द्यावा; तुम्हीं मुलूखच आमचा घेत चाललां. बिजैपूर घेतलें. सबलगडचे गांव दाबले, ते सोडून देवणें. आम्ही पैका तुमचा देतों. मुलूख माझा घेतला! पैका कोठून द्यावा? हें वर्तमान बावांस श्रुत केलें. उत्तर जालें तें विनवितां येत नाहीं. मग काय करावें? उगाच राहिलों. करोलकर कमाविसदार करोलीस गेले. पाटिलबावा चमल उतरून बादशाही मनसब्यास गेले. तेव्हां आंबूजी इंगळ्यास अनुपगीर गोसाव्याबरोबर बादशाहाकडे व अफराशाबखानाकडे रवाना केला. ते समयीं आंबूजीनें कारस्थान करून अगदीं मनसबा सजऊन दिला. तेव्हां चाल आंबूजीची बरीच जाली. ते काळीं मीं आंबूजीस करोलीचे ऐवजाकरितां भीड फारच घातली. ती त्यानें मानून, त्याचा कमाविसदार सोबतसिंग नामें गुजर सबळगड तालुक्यांत होता त्यास सांगून, पांच हजार रुपये आपले तहसिलेंतून नख्त देविले, व सबळगड तालुक्यापैकीं मागरूल तालुका सरकारचे कमाविसदाराचे स्वाधीन करविला. कमाविसदार सरकारचे यांनीं राजास आप्तकी दाखवून मागरूल तालुका राजाकडून कमाविसीनें आपलेकडे मागोन घेतला. राजानें इमानप्रमाण लिहिलें करून मागितलें कीं, आम्ही मागूं ते समयीं मागरूल तालुका आमचा आमचे हवाला करावा. तें मान्य करून, राजश्री गोपाळ आनंदराव कमाविसदार करोलकर निसबत राजश्री रामचंद्र नाईक परांजपे यांनीं मान्य करून, राजास इमानप्रमाण दिलें. लिहिलें करून दिलें कीं, मागरूल तालुका मागाल ते समयीं तुमचे हवाला करून देऊं. त्याप्रमाणें लिहिलें करून दिलें. तत्रापि विश्वास येईना. जामीन मागितला. गोपाळराव यांनीं किसनसिंग राजाकडील कारभारी यास जामीन देऊन मागरूल करून घेतलें. तेथील राजाचा रुपया आपले ऐवजांत घेतला. मागरूलचा ऐवज राजाचा व पांच हजार रुपयेच आंबूजीनें आपले तहसिलेंतून रोख सबळगडकर कमाविसदाराकडून देविले होते. असें करून एक साल संवत १८३९ चे ऐवजाचा फडशा जाला. पुढें संवत १८४० पासून तागाईत संवत १८४३ म्हणजे सबा समानीन एकूण चौ सालां फडशा होणें, त्यास, पाटिलबावांनीं आंबूजी इंगळे यास राघोगडास रवाना केलें डिगेचे मुक्कामींहून, ते समयीं मीं आंबूजीस करोलीचे ऐवजाकरितां

बहुत म्हटलें. आंबूजी करोलीवरूनच गेले. एक मुक्काम करोलीस केला. गोपाळ आनंदराव कमाविसदार भेटीस गेले होते. त्यांची खातरजमा केली कीं, राजास ताकीद प्रखर करून तुमचा ऐवज देवितों. राजा माणिकपालही भेटीस आला. त्यासीं अगोदर शिष्टाचार बोलून सरकारचे ऐवजाची अशी ताकीद सक्त केली कीं, तुम्हीं सरकार ऐवजाचा फडशा करून दिल्यासच बरें आहे. न दिल्यास पाटिलबावांची स्वारी जैपूरप्रांतीं चालली. तुमचेजवळूनच जातील. राज्य तुमचें राहणार नाहीं. असा दाटा भारी देऊन, कूच करून आंबूजी राघोगडास गेले. राघोगड घेऊन माघारा फिरून करोलीस आले. तेव्हांही राजास गोषमाली* ऐवजाकरितां करून, लालसोट नवालीचे मुक्कामास आले. पाठीमागें राजाचा गोपाळ आनंदराव यांसीं जाबसाल लाविला. संवत १८४० चे सालीं आफत पडली. निदान निमे आफत घालावी असेंही दिसतें. संवत १८४१ व १८४२ दो सालांचे ऐवजाचे गांव लाऊन दिले. इतकें काम आंबूजीनेंच केलें. बावांचा मुक्काम नवाली लालसोटावर जाला. तेथें करोलीचे ऐवजाकरितां बावांस हटकिलें. कमाविसदारास बोलावणें, हिशेब पाहून फडशा करून देवितों म्हणाले. तेव्हां कमाविसदारास बोलाऊन आणून भेटवून यादीबूद समजाविली. करोलीकराचे वकील येथें आलेच होते. त्यांस ताकीद होत गेली कीं, चाळसाचे सालचा फडशा करून देणें. एकचाळीस बेचाळीस दुसाला ऐवजाचे गांव लाऊन दिले आहांत, त्या गांवांपैकीं तुम्हीं कांहीं न घेतां रुपया कमाविसदाराचे पदरीं घालणें. संवत १८४३ पासून सरकार ऐवजाचे गांव नेहमीं कमाविसदाराकडे देणें. वकिलांनीं राजास लिहिलें, परंतु उत्तर राजाचें साळसूद आलें नाहीं. राजश्री राघोपंत गुरुजींनींही करोलीचे कामाचें साहित्य केलें. जाबसाल निरास† येईना, तेव्हां बावांनीं पंचवीस स्वार समागमें देऊन कमाविसदाराची रवानगी केली. आंबूजीनें एक सालचा फडशाच करून देविला होता. राघोगडास जातां येतां राजास दाब बराच दिला. त्यावरून दोन सालांचे पट राजानें लाऊन दिले. संवत ४० चा मात्र फडशा होणें त्यांत आफत गातात. कसा होतो पहावें? संवत ४३ हें साल याचे गांव लाऊन द्यावे कमाविसदाराचे मनांत आहे. बावांनीं तसेंच सांगितलें आहे. परंतु राजाकडे देश किंचितच राहिला आहे. फार करून बावांनीं दाबला आहे. कसें निर्गमांत येईल पहावें. आंबूजी माणूस फार कामाचा. सेवेयोग्य आहे. स्वरूप जवळ असल्यास ध्यानांत येईल. तूर्त त्याचीं कामें दोन. एक मौजे

* कानपिळी, शिक्षा, समज. † निकालास.

देहू येथील पाटिलकी त्यानें घेतली आहे त्याचीं पत्र सरकारांतून होत नाहींत. नजर सरकारची देईल. वतनपत्र सरकारचें जालें पाहिजे. व मौजे माहाळुंगे येथील शीव व कुरणाचा बखेडा. दोन कामाविसीं त्याजवर कृपा जाली पाहिजे. कालेंकरून पायांजवळ आल्यास परीक्षेसही येईल. मागें परगणा अरुण वगैरेचा मजकूर जाला, तो याचे फडनिसापासून जाला. आणखीही तपसील आहे तो समक्ष विनंती करावयाचा आहे. आतां तर फार जपत आहे. हे विज्ञापना. मधुसूदनगड प्रांत खेचीवाडा राजश्री नारो चिमणाजीचे स्वाधीन केला. येविसींही सरकार चाकरी केली. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. किंचित् जरबही असावी. दो कामांतून एक तरी करून देण्याविसीं आज्ञा जाली पाहिजे. हे विज्ञप्ति.

¶ *Sadashiv Dinkar writes how Ambaji Ingle helped in the realisation of revenue from certain districts in Bundelkhand belonging to the Peshwa. He recommends Ambaji to Nana's favourable attention.*

No. 478 July 1786.

छ विज्ञापना ऐसीजे :—छ १ रजबचीं आज्ञापत्रें सादर जालीं. बितपसील :—

बाबाराव वकील याचीं व राजश्री पाटिलबावांचीं बोलणीं होऊन ठराव काय जाला तो लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास, हा मजकूर पेशजीचे पत्रीं विनविला आहे. बाबाराव याचा मतलब कांहीं साधला नाहीं. येणें व्यर्थ जालें. इंग्रजांकडील जाबसाल जाला नाहीं. बादशाही डौलांत* कांहीं साध्य जालें नाहीं. आनंदीबाई निंबाळकर ही याच विक्षेपामुळें रुष्ट होऊन, व्यथिस्थ अशी कीं केवळ अत्यावस्थ असतांही कूच करून गेली. तेथें ठिकाणास पावल्यावर, तेथून पत्र आल्यावर त्यांनीं कूच करून जावें असें ठरलें होतें. आनंदीबाई ग्वालेरीस पावली. नवाबाचे मेजवानीबद्दल व बादशाहाकडील खिलत याचा सरंजाम कापड, जवाहीर, हत्ती तेव्हां प्राप्त जाला नवता. मागाहून बाबाराव याजबरोबर ग्वालेरीस आनंदीबाई-जवळ पावता करावा असें होतें. सरंजामाची तजवीज होत होती, तों वर्तमान आनंदीबाईचे निधनाचें आलें. खरेंच ऐकतों. याउपर काय ठरेल तें विनंती करीन.

---

* कारभारांत.

मुलूख किती सुटला तो बेरजा घालून लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास हाही मजकर पेशजीं पत्रीं विनविला आहे. पेशजीं मोघम विनविलें तें स्मरणानें विनविलें. माहीतगाराखेरीज बेरजांचें ठिकाण लागतें कसें? यास्तव शोधांत आहें. चमलेवारपार दोहीकडील शोधत आहें. हातास आल्यावर विनंती करीन. उद्योग आहे.

आनंदीबाई* निंबाळकर ग्वालेरीच्या मुक्कामीं मृत पावली. कारकुनाबरोबर अस्थी देखील आठवे रोजीं येथें आल्या. बावांनीं सुतक धरिलें. क्रिया येथें सुरू जाली. बाईच्या दोघी नाती कन्येच्या कन्या दोघी समागमें होत्या. त्या व कारकून व कारखाना सर्व ग्वालेरीस आहेत. त्यांस देशीं जाण्याची आज्ञा जाली. नवाबाकडे बादशाही खिलत व यांचे मेजवानीचा जिन्नस मागाहून बाईकडे जाणार होता. आतां कारकुनाबरोबर रवाना करितात. तोही बाईचे खटल्याबरोबरच जाणार. बाबाराव संकटांत पडले. देशीं जाण्यास अनमान ऐकतों. होईल तें विनंती करीन.

आबाजी नाईक वानवळे यांचा रुपया बावांकडे मबलग निघतो. त्यास, खंडेराव हरि बरोबर दिले, ते गेले. काय देविलें असेल कळलें नाहीं. मोहिमीचा परिणाम कसा होतो, यांचे दैवेंकरून काय हातीं लागतें, कळेना.

सदाशिव मल्हार शाहजाद्याचे मुद्याकरितां लखनऊंत आहेत. त्या शाहजाद्याचे मुद्याचें काय ठरलें तें लिहिणें म्हणोन आज्ञा. ऐशास हाही मजकूर पेशजीं पत्रीं विनविला आहे. त्यावरून तपसीलवार विदित होईल. बावांचे सांगितल्याप्रमाणेंच लिहून पाठविलें आहे. शाहजादा येत नाहीं. लखनऊंत वजीर व इंग्रजांची मंडळी सर्वांचें मत आहे जे, शाहजादा तो हातीं असावा. फार आर्जव शाहजाद्याचें करितात. तो कालहरण करीत राहिलाच आहे. मेघफरसन कलकत्त्यास नवा गौरनर आला आहे. तो या पल्ल्यावर आला पाहिजे. यास्तव तफजुल हुसेनखान याची रवानगी लखनऊहून कलकत्त्यास करणार होते. केली असेल. तो तेथें पावल्यावर काय ठरतें कळल्यावर विनंती करीन. सदाशिव मल्हार यांस इंग्रज दीड हजार रुपया दरमहा खर्चास देतात. तो खाऊन लखनऊंत खुशाल आहे. याउपर ठरेल व वर्तमान कळेल ती विनंती करीन.

---

* महादजीची बहीण, रावरंभा निंबाळकरास दिलेली.

सरकारचे जाबसाली कलमांची याद पाठविली ती पावली. जाबसाल तुवां घातले ते ठीकच आहेत. हटकीत जाणें. त्यांनीं उलगडून द्यावे हें चांगलें. मग त्यांस बरें दिसेल तें करतील म्हणून आज्ञा. त्यास, हें कलम सतंतर निराळें विनविलें आहे. त्यावरून वर्तमान विदित होईल.

खंडेराव हरि यांस फौजेसुधां बुंदेलखंडांत बिदा केलें याचें कारण काय? तें शोध करून लिहिणें म्हणोन आज्ञा. ऐशास हें वर्तमान मागें तपसीलवार कारण लाऊन विनविलें आहे. अर्थ प्राप्त व्हावा हा मुख्य पक्ष. बुंदेल्यांची आपसांत सारे भावबंदांची फूट. येरयेरावर* चालून जातात. भांडतात. बांधेकर गुमानसिंग मेला. तो निपुत्रिक होता. त्यानें जिवंत असतांच मधुकरसाह पुत्र घेतला होता. त्याचेच आज्ञेंत कारभारी यांनीं चालावें. गुमानसिंग मेल्यावर खुमानसिंग म्हणूं लागला, माझा पुत्र, गुमानसिंगाचा पुत्र करून, राज्यीं स्थापावा. गुमानसिंगाचे कारभारी मजबूत व कर्ते आहेत. त्यांनीं बावांकडे अनुसंधान लाऊन, पन्नास हजार रुपये टिक्याची नजर व पांच लक्ष रुपये जैतगडवाल्याचा मुलूख खुमान गुमान दोघांनीं दावला त्याची नजर सावकारी निशा दिली, आणि मधुकरास टिका नेला. पांच लक्ष रुपये जैतगडवाला गर्जसिंग याचे मुलखाबद्दल नजर कबूल केली. शिवाय दरबारखर्च. याचा हिसा खुमानसिंग देईना म्हणून बावांनीं कारकून व शंभर स्वार वसुलाकरतां पाठविले. त्यांसही एक वर्ष खुमानसिंगानें बहकाविलें. रुपया देईना. व बेणी हजुरीजवळ हिंदुपताचा धाकटा पुत्र राज्यावर होता, त्यासीं बेणीसीं बिघाड जाला. तोही मेला. त्याजहून धाकटा बंधु कैदेंत बेणीजवळच होता, त्यास पुढें केलें. त्यासीं बेणी हजुरी यासीं विरुद्ध पडून कालिंजरगडावर खेमराज चोब्या, ज्यासीं बेणी हजुरीसीं वैर आहे त्यासीं, आंतून सख्य जालें. आतां सरनेतसिंग बांधेवाले कालिंजरकर चोब्या व गजसिंग असे एक जाले. त्यांचे पैगाम बावांकडे आले. यांनीं खंडेराव हरीची रवानगी केली. तिकडे बेणी हजुरी व खुमानसिंग एक जाले. कालिंजरगडासीं लढाई करून बांधेवाल्यावर चालून आले. मग बांधेवालेही बाहीर निघाले. लढाई जाली. त्यांत खमानसिंग मारला. पडला. त्याचे पुत्रांनीं चरखारी उजाड करून बेणीकडे गेले. तों खंडेराव हरि प्रांतांत पावले. बांधेकर सरनेतसिंग, गजसिंग व कालिंजरवाला चोब्या सारे खंडेरायास भेटले. फौज भारी जाणून खुमानसिंगाचा

* एकमेकांवर.

पुत्रही याच्या मेळचांत येऊन खंडेरायासीं भेटला. बेणी हजुरी मात्र आपले जमावानसीं निराळा आहे. बाळाजी गोविंदही याच जमावांत आहेत असें वर्तमान आलें. याउपर होईल ती विनंती करीन.

सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar details to Nana the death of Anandibai Nimbalkar, the intrigues at Lucknow fostered by the Shahzada and the complicated situation in Bundelkhand.*

No. 479 26th July 1786.

पै।। छ १२ जिल्काद सबा

छ विज्ञापना ऐसीजे :—छ २ साबानचें पत्र सादर जाहलें तें छ २५ रमजानचे दिवशीं पावलें. त्यांत बदामीचा किल्ला घेतल्याचा मजकूर पूर्वी लिहून पाठविलाच आहे. सांप्रत पर्जन्यकाल आला, फौज छावणीस राहील त्याचे खर्चाची बेगमी जाली पाहिजे, व श्रीमंतांजवळही असावें लागतें, यास्तव राजश्री हरिपंत तात्या व राजश्री तुकोजी होळकर वगैरे सरदार व गाडद व तोफखाना छावणीस ठेऊन, आम्ही दरमजल पुण्यास जात आहों, येविसींच्या मजकुराचें पत्र राजश्री पाटिलबावांस लिहिलें आहे. प्रविष्ट करणें म्हणोन आज्ञा सादर जाली. त्याप्रमाणें राजश्री पाटिलबावा यांचें पत्र प्रविष्ट करून त्याचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. माझे नांवें पत्र सादर होतें, तेंही पाटिलबावांस दाखविलें. उत्तर जालें जे, फौज तिकडे छावगीस राहिली त्याचे खर्चाची बेगमी जाली पाहिजे व श्रीमंतांजवळही असावें लागतें, याजकरितां श्रीमंत राजश्री नाना पुण्यास आले, उत्तम केलें. वरचेवर फौजेचा उगराळा* होत जावा. बावांनींही जाब लिहिले आहेत त्यांवरून विदित होईल. पूर्वी डांक उजनीपावेतों होती. उजनीहून इकडे छुटी जोडी येई, तत्रापि उजनीपावेतों डांक होती यामुळें कागद लौकर येत होते. आतां डांक उठली. छुट्या जोड्या रवाना होतात. फौज तुंगभद्रातीरीं तेथून पत्रें रवाना होत गेलीं. पावणे दोन महिनेयानें जोड्या येथें येऊन पत्रें देत. पाटिलबावांची डांक पुण्यापावेतों आहे. तेथून बारा तेरा दिवसांत डाकवाल्याचें पत्र येथें येऊन वर्तमान कळत असतें. उपरांत महिना सवा महिन्यानीं स्वामींचीं

---

* साह्य, पाठपुरावा.

पत्रें येतात तें यांस सुखकर होत नाहींत. बाबा म्हणतही होते कीं, मसलत भारी उपस्थित, फौजा मोहिमेवर, शत्रु जबरदस्त, कोण प्रसंग कसा, वर्तमान वरचेवर कळत जावें, तें होत नाहीं. ही गोष्ट चांगली नाहीं. यावरून डांक सरकारची बसावी असा आशय बाबांचा दिसला. स्पष्ट तर म्हटलें नाहीं. व्यंगोक्तीनें भाव दाखविला. वर्तमान श्रुत व्हावें म्हणून विनंती केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar informs Nana of Mahadji's desire for having a regular dawk established to convey to him rapidly news about the fighting in Karnatak.*

No. 480 24th September 1786.

पै॥ छ २ मोहरम सबा.

छ सेवेसीं विनंती सेवक कृष्णराव महादेव व सदाशिव दिनकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १ जिल्हेज मुक्काम नजीक श्रीमथुरा स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—सरकारांतून आज्ञापत्र छ ९ सवालचें सदाशिव दिनकर याचे नांवें सादर जाहालें, तें छ २२ जिल्कादीं मुक्काम मजकुरीं पावलें. त्यांत आज्ञा जे, रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांचे हिंदुस्थानचे स्वारीकीं तोफखाना भेलशांत आहे, तो सरकारचा सरकारांत आणविला जाईल. तेथें आहे तोंपर्यंत माफजतीनें ठेवावा म्हणोन. परगणे मजकूर हा माहाल राजश्री महादजी शिंदे यांजकडे फौजेचे बेगमीस सन समान सबैनांत दिल्हा. ते समयींचा करार आहे व मशारनिल्हे यांस सनदही सादर आहे. हल्लीं फत्तेअलीखान* याची मसलत दरपेश† आहे. याजकरितां तोफखाना, बैल व गाडे वगैरे सरंजाम लागेल तो तर्तूद करून देऊन, दसरियापर्यंत पुणियास पोहचवावयाविसीं मशारनिल्हे यांस सनद सादर केली असे. तरी तुम्हीं त्यांसीं बोलून, तोफखाना जलद येऊन पुणियास पोहचे तें करणें म्हणून. ऐसियास आज्ञेप्रमाणें सरकारची सनद राजश्री पाटिलबावा यांस प्रविष्ट केली. त्यांनीं वाचून पाहून उत्तर केलें कीं, फत्तेअलीखानाची मसलत दरपेश तेथें तोफखाना जावा म्हणून दसरियापावेतों पुणेंयास तोफखाना आणविणें, तर

* टिपू सुलतान. † जवळ ठेपलेली.

एक तों अखेर भाद्रपदीं सनद सरकारची आह्मांस पावली. दसरेयास पंधरा रोज बाकी. तोफखाना विसाजीपंताचे स्वारीपैकीं कांहीं तोफा आहेत; व गंगापार होऊन रोहिल्यांचें पारपत्य करून पथरगडांतून मोठ्या तोफा आणिल्या, त्याही भेलशांतच आहेत. इतक्यांस सरंजाम किती पाहिजे? त्याचे मेळवावयास दिवस व रुपया किती पाहिजे? व भेलशाहून रवाना जाल्यावर पुण्यास पोहचावयास किती महिने लागतील? आडवळसा किती होईल कळतच आहे. मसलतीचे समयास कशा पावतात? अशेरीस सरकारचा तोफखाना होता, तो न्यावयास हुजूरून कारकून व बैल वगैरे सरंजाम सरकारचा आला, त्याचे स्वाधीन तोफा केल्या. ते घेऊन लौकर पुण्यास पावले. तोफा लहान असतां किती दिवस लागले, आटाआट किती जाली, हीं बासनें* मोठीं आणि डोंगर कसकसे? दरम्यान नर्मदेसारखी थोरली गंगा मध्यें, ती पार होणें मोठा आयास व सरंजामही ब्रह्मांड पाहिजे. बैल, गाडे वगैरे सरंजाम नवा करण्यास मोठा प्रयत्न लागेल. सरंजाम सिद्ध असावा, तर या भांडेयास हात लावावा. आमचे स्वारीतील सरंजाम तोफखान्याचा पाहतां थोडका, तत्रापि आम्हांस नित्य खडका† आहे. ओढही भारी आहे. सरकारांत सरंजाम तयार असेल तो आला तर घेऊन जातील. असें उत्तर केलें. आमचीही रदबदल बहुत जाली. शेवटीं हाच निश्चय करून उत्तर सरकारचें पाटिलबावांनीं लेहून दिलें तें पाठविलें आहे. त्यावरून विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji points out the great difficulty of sending to Poona the heavy artillery deposited at Bhilsa by Visaji Krishna on the conclusion of his 1773 campaign. The guns were requisitioned by Nana for prosecuting the war against Tipu.*

No. 481 28th September 1786.

पैवस्ती छ १३ सफर सबा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—आपण छ ५ रमजानचें पत्र पाठविलें तें पावलें.

---

* वस्तू. † त्रास.

वदामीचा किल्ला घेतल्याचें वर्तमान पेशजी आपणांकडे लेहून पाठविलेंच आहे. त्यास, तेथील बंदोबस्त करून राजश्री हरिपंततात्या समागमें फौज व गाडद व तोफखाना वगैरे सरंजाम देऊन कर्नाटक प्रांतीं छावणीस ठेविलें, आणि आम्हीं निघोन पुण्यास येऊन श्रीमंतांचें दर्शन घेतलें. मशारनिल्हे बदामीहून कूच करून गजेंद्रगड घ्यावयाचे इराद्यानें किल्लचानजीक गेले. तों फत्तेआलीखान खासाच फौजेसुद्धां तोफखाना वगैरे सरंजाम घेऊन येऊन अदवानीस लागल्याची बातमी आली. तेव्हां चिरंजीव राजश्री कृष्णराव बळवंत* यांजबराबर वीस हजार फौज देऊन पुढें पाठविलें. नवाब निजामअलीखान बहादूर यांणीं भागानगराहून मोगल-अली यांचे हमराहा† मोइनुदौला व तेगजंग यांस देऊन, फौज व गाडद मिळोन वीस पंचवीस हजारांचे जमावानसीं अदवानीकडे रवाना केलें. परंतु सरकारचे फौजेखेरीज त्यांच्या हातून होणें कळतच आहे. नवाबांनीं पत्रें पाठविलीं कीं, सरकारांतून कुमक व्हावी. त्याजवरून आपांस लिहिलें. आपांच्या व त्यांच्या भेटी रायचुराजवळ जाहल्यानंतर उभयतांहीं कूच करून तुंगभद्रा उतरून गेले. गजेंद्रगडसमीप हरिपंततात्यांचा मुक्काम. त्यास, तेथील किल्लेदारानीं विचार केला कीं, हल्ला करून कापून काढितील; कौल घ्यावा. लढल्यानें परिणाम नाहीं. असें जाणून प्राण वांचवावा म्हणून बहुत अजीजी करून कौल मागितला. त्याजवरून त्यांची खातरजमा करून किल्लेदार खालीं उतरून सरकारचें निशाण चढविलें. पूर्वी हा किल्ला राजश्री दौलतराव हिंदुराव घोरपडे यांजकडे होता. तो हैदरअलीखान यांणीं घेऊन किल्लचाची बंदिस्त चांगली बांधोन, अडीच तीन हजार मनुष्य ठेवून बंदोबस्त पक्का केला होता. परंतु श्रीमंतांचे प्रतापेंकरून किल्ला हस्तगत जाहला. उपरांत हरिपंततात्याही तेथून कूच करून पुढें गेले. अदवानींत बसालतजंग यांचे लेक माहाबतजंग आहेत. ते बरे मजबुतीनें लढतात. टिपूनें तीन दिवस तीन हल्ला मातबर केल्या. त्या माहाबतजंग यांणीं मारून काढिल्या. व टिपूकडील बुऱ्हाणुद्दीन याची व होळकर व बेहरे यांची गांठ पडोन लढाई जाहली. त्यांजकडील घोडीं कांहीं पाडून आणिलीं म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, बदामीचा किल्ला आपण हल्ला करून घेतला, हें काम चांगलेंच जाहलें. बदामी घेतल्याचें व राजश्री हरिपंततात्यांस छावणीस ठेवल्याचीं आपलीं पत्रें पेशजी येऊन समजलें व त्यांचीं उत्तरेंही येथून पाठविलीं आहेत, पावलीं असतील. गजेंद्रगडावर हरिपंततात्यांनीं शह दिला. त्यावरून किल्ले-

* ऊर्फ आपा मेंहेंदळे. † बरोबर.

दारास जरब पोंहोंचोन कापून काहडतील, प्राण वांचवावे, या भयानें कौल मागितला. बहुत अजीजी केली. तेव्हां खातरजमा करून बाहेर काहडला. किल्लयावर सरकारचें निशाण चढविलें. उत्तम जाहलें. तिकडे फौजा ठेऊन छावणीची योजना जाहली या योगेंकरून, शत्रूचें पारिपत्य होऊन, तमाम ठाणीं खालीं होऊन सरकारचा अंमल होईल. फौजेंत महागाई फार जाहली म्हणोन ऐकिल्यांत येतें. त्यास, रसद पोंहचावी येविसींची तर्तूद जाहलीच असेल. अदवानीस मोर्चे टिपूनें लावले यास्तव नवाब निजामअलीखान यांणीं मोगलआलीखान मौनुदवला यांची रवानगी केली, व आपणांस कळतांच आपण राजश्री कृष्णराव बलवंत यांची रवानगी केली; ठीक केलें. सरकारचे फौजेखेरीज त्यांचे फौजेनें दम निघावयाचा नाहीं. अलीकडे तुंगभद्रेस पाणी आल्यावरून माहबतजंग यांसीं आदवानींतून अलीकडे आणिलें म्हणोन ऐकिल्यांत आलें. सविस्तर तिकडील लिहून कळवावें. रा छ ५ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*The letter reports the progress of the war against Tipu, the capture of Gajendragad by Haripant and the sudden attack made by Tipu on Adoni. Mahadji inquires what arrangements had been made to relieve the scarcity of supplies felt by the cantoning army.*

No. 482 November 1786.

छ विज्ञापना ऐसीजे :—टिपूकडील तहनाम्याचा व पुढें चालीचा मजकूर विस्तारेंकरून स्वामींनीं छ १० जिल्हेजचे* पत्रीं आज्ञापिला, ते पुरवणीच बजिन्नस राजश्री पाटिलबावा यांस वाचून दाखविली. उत्तर जालें जे, अर्थ समजला. टिपूची चाल दगाबाजीची आहे. दारमदार होऊन तह परस्परें ठरला, त्याप्रमाणें सरकारचा तहनामा त्यांचे वकिलांनीं खातरजमा करून घेऊन गेले. पुढें त्याजकडील तहनामा अद्यापिवर येत नाहीं व पुढें चालीही दगाबाजीच्या दिसून येतात. तत्रापि उघड त्याजकडून होय, तोंवर सरकारांतून स्नेहाचा सिलसिला कागदीं-पत्रीं चालत जावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.†

¶*Mahadji inquires about the exchange of treaties with Tipu and warns the Poona Darbar against trusting implicitly in Tipu's words.*

---

* ता. ३०-१०-१७८६.

† हें पत्र कोणत्या तहास अनुलक्षून समजावें याचा बोध होत नाहीं. ले. ४८७ त संदर्भ आहे तोच हा असावा.

No. 483 24th October 1786

पैवस्ती चंद्र १३ सफर सबा समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक नारो हरि साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १ मोहरम मुक्काम श्री क्षेत्र मथुरा येथें आपले कृपेंकरून सुखरूप असों. विशेषः--पेशजी येथून तीन चार पत्रें सेवेसीं रवाना केलीं तीं हुजूर पावलींच असतील. राजश्री पाटिलबावांची स्वारी आगऱ्यास गेली व विजयादशमीचे* दिवशीं जयपूरच्या रोखें डेरे दिले. ते पत्रें आलाहिदा ते दिवशीं लिहिलीं होतीं, ते सेवेसीं रवाना केलीं. त्यावरून वर्तमान कळेल. त्या अलीकडे वर्तमान तरी, पाटिलबावा आगऱ्याहून कूच करून यमुनेपलीकडे श्री बळदेवाचें दर्शन घेऊन आश्विन वद्य ११ एकादशीस डेऱ्यास दाखल जाहले. पातशाहाकडील कारभारी येणार होते ते न आले, सबब राजश्री कृष्णाजी अंबादास मुजुमदार याज हस्तें शंभर दीडशें स्वार देऊन आश्विन वद्य १३ त्रयोदशीस दिल्लीस रवाना केले. पातशाहांनीं फिरून जयपुरावर स्वारी करावी ऐसा बेत. या प्रांतीं मेवात्यांचा उपद्रव भारी. याकरितां राजश्री आंबोजी इंगळे यांज हस्तें फौज देऊन मेवात्यांवर रवाना केलें आहे व तेथून भागीरथी चाळीस कोस, सबब गंगास्नानास मी गेलों होतों. रामगड व हासनगड व कोल वगैरे ठाणें अंतरवेदींत पाडिलें. कोठें कोठें जमेदार मवास होऊन गढ्या लढवितात, तेथें बावांकडील चार पांच हजार फौज लढती. एक दोन गढ्या हस्तगत जाहल्या. जमेदार गंगापार पळोन गेले. नजीक रामघाटापासून आठ कोसांवर सुरुमच्या घाटावर हिंमतबहादर व उमरावगीर गोसावी चार पांच हजार फौजेनिसीं आहे. दुसरें, श्रीमंत राजश्री रावसाहेबांसाठीं खबुतराचे जोड एका दो दिवसांनीं बावा रवाना करणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sindia prepares for an expedition against Jaipur on the cessation of rains.*

No. 484 26th October 1786.

पैवस्ती छ २३ सफर सबा समानीन.

मा॥ निल्हेकडील कारकुनांनीं

लखोटा दिला.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ ३ माहे मोहरम पो॥ मुक्काम श्रीमथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान

---

* ता: २०-१०-१७८६.

यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं, यास्तव चित्त स्वस्थ नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतरी येथें राजश्री पाटिलबावांसीं आलियानंतर ज्याप्रमाणें स्वामींनीं आज्ञा केली होती त्याप्रमाणें बोलणीं बोललों. त्यांचीं उत्तरें साऱ्या जाबसालांचीं एकच केलें कीं, हे मजकूर तपसीलवार राजश्री राघो बल्लाळ यांणीं आलियानंतर सविस्तर निवेदन केले; त्यांचीं उत्तरें मशारनिल्हेनीं लिहिलीं आहेत. पुढें कोणते जाबसाल असतील ते बोलावे. तेव्हां मीं विनंती केली कीं, हीं उत्तरें गेलींच आहेत, परंतु आपण आम्हांस दोन तीन पत्रें पाठविलीं कीं सत्वर येणें. त्यास आज्ञेप्रमाणें येऊन दाखल जाहलों. पुढें आम्हांस काय आज्ञा करणें ती करावी. फडणिसीचे कामावा बंदोबस्त कैसा करून द्यावयाचा तो द्यावा. तेव्हां उत्तर केलें कीं, याचें मनन करून आठा चोहो दिवसांत राणेखानभाई व राजश्री राघोपंत असे बसोन, याचा विचार करून, तुम्हांस जें सांगणें तें सांगूं. तुमच्या विचाराखेरीज येथें दुसरी गोष्ट घडणार नाहीं. यांत शिष्टाचार आहे किंवा कांहीं गोष्ट घडण्यांत येते, हा अर्थ समजलाच आहे. परंतु मायावादी बोलणीं बहुत दिसतात. तेव्हां काय तोड बोलतात, ती समजल्यानंतर सेवेसीं तपसीलवार लिहून पाठवीन. स्वामींचा निरोप लोणीचे मुक्कामीं घेतला ते समयीं खासगत बोलणीं निरोप-समयीं बोलावयाचीं तीं घरकृत्याच्या भाऊगणाच्या घालमेलीमुळें तैसींच राहिलीं. तरी चिंता नाहीं. स्वामींचें कल्याण ईश्वरें उत्तरोत्तर करावें म्हणजे त्यांत सेवकाचे मनोरथ सर्व सिद्धीस जातील. चिंता नाहीं. राजश्री रघुपतराव नारायण यांज-विषयींचें बोलणें राजश्री पाटिलबावांसीं कसें बोलावें? त्यांणीं जाबसाल पुसिल्यानंतर उत्तर काय करावें म्हणोन विनंती केली. तेव्हां स्वामींनीं आज्ञा केली कीं, तुमच्या व राजश्री राघोपंताच्या समक्ष इंग्रजप्रकरणीं व पातशाहा-संबंधीं पदाचे वगैरे सरकारी जाबसाल व हैदरखान याजकडील वगैरे जाबसाल बोलिलों आहों, त्याप्रमाणें अमलांत येतात असी गोष्ट दृष्टीस पडल्यास, राजश्री रघुपतराव व त्रिंबकराव यांचे निमेनिमे करून द्यावें असी आज्ञा होती. त्याजवरून येथें आलियानंतर दोन चार बैठका मुख्यांच्या व आमच्या जाहल्या. त्यांत कित्येक गोष्टी सफाईच्या दृष्टीस पडल्या. व कित्येक बजाऊन सांगितल्या. तेव्हांच त्यांचीं उतरें करूं लागल्यानंतर मर्जी ठीक राहात नाहीं. तेव्हां मुख्यांचीं बोलणीं ऐकोन मात्र घेतलीं, आणि पुढें राजेश्री त्र्यंबकराव नारायण यांचा जाबसाल बोलिलों. तेव्हां त्यांचें उत्तर मख्यांनीं केलें कीं, यांजविषयीं आपण श्रम करावे

न लागेत. हुजूर श्रीमंतांपासीं, राजश्री दाजीबा फडके याचे विद्यमानें, राजश्री नानापासीं त्रिंबकराव नारायण यांस पूर्ववत्प्रमाणें सरदारी सांगावी, याप्रमाणें करार ठरोन राजश्री हरिपंततात्यास लिहून, त्यांचें देखील संमत आणविलें. तेथें तथा कांहीं राहिली नाहीं. याप्रमाणें जाबसाल केला. तेव्हां पुन्हां एक दोन वेळ मागतीं हीच गोष्ट काढली. तेव्हां फिरोन, मागतीं उत्तर केलें कीं, पुण्यांतच त्र्यंबकराव यांजकडे झाडून सरदारीचें काम सांगतात; मग तुम्हीं येथें बोलोन फळ नाहीं. असें उत्तर जाहलें. तेव्हां पुढें काय बोलावें ? आम्हीं आलों ते समयीं निदानीं दोन करावीं असी मर्जी होती, आणि आतां असें ऐकितों ! तेव्हां याचें उत्तर पुढें कोणतें करावयाचें तें लिहून आलें म्हणजे त्याप्रमाणें सेवकास करावयास येईल. आश्विन वद्यांत राजश्री पाटिलबावांची स्वारी आगऱ्याचा किल्ला पाहावयास गेली होती. याजमुळें मध्यें सेवेसीं पत्र ल्याहावयासी सोय पडली नाहीं. पेशजी सरकारची डांक येयें होती याजमुळें बारीक मोठें वर्तमान ल्याहावयास सोय पडत होती. आतां मुजरद आसामीदार करून पाठवावा तरी सोय... (फाटलें आहे.).....त्यास मर्जीस आल्यास डांक पहिल्याप्रमाणें पोंचावी ही गोष्ट बरी आहे. मग मर्जी स्वामींची. येथून किंवा तेथून, सरकारचीं पत्रें वकिलाकडे येतात, तीं महिन्या दिडाच्या छटयानें दाखल होतात. आणि यांचीं पत्रें नेहमीं डांक बसली आहे याजमुळें आठवे दिवशीं पुण्याचें वर्तमान येयें येतें. तेव्हां येथून डांकेखेरीज पत्र लिहिणें तें शिळें पडतें म्हणोन तपसीलवार विनंती लिहिली आहे. स्वामी म्हणतील कीं विशेष कामच नाहीं, त्यापक्षीं डांकेचें प्रयोजन तें काय ? ही गोष्ट प्रमाणच आहे. परंतु जेथें धनीपणा आहे तेथें बातमी सर्वत्रांकडील असावी. पुण्यांत राजश्री पाटिलबावांकडील.....(फाटलें आहे.).....डांकेबराबर बातमी लिहिली आली कीं, लाडोजी शितोळे देशमुखांचा भाऊ घरीं आहे, त्याचा व आणखी भाऊबंद देशमुखीचे निम्याचे आहेत त्यांचा वतनसंबंधें कज्या होऊन मारामारी जाहाली. त्यांत खून जाहला. सबब सरकारांतून लाडोजी शितोळे यांचे भावास सरकारांत आणोन, गुन्हेगारी पंचवीस हजार रुपये लाविली आहे व बेअब्रू करून उन्हामध्यें उभा करून, पायाचे आंगठे धरविले, असें लिहिलें आहे. याजवरून येथील मर्जी बहुत खट्टी आहे. कळावें म्हणोन सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports his first interview with Mahadji after his return. He finds him not much amenable to Nana's views on the various questions entrusted to his personal management.*

No. 485 30th October 1786.

श्रीमंत-राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :--

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ माहे मोहरमपावेतों मुक्काम श्रीमथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असों. विशेष :--स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन सेवकाचा सांभाळ जाला नव्हता. त्यास छ २७ माहे रमजानचें पत्र आलें, तें येथें छ ३ मोहरमीं सेवकास पावलें. पावोन बहुत आनंद जाहला. असेंच निरंतर कृपा करून पत्रीं सांभाळिलें पाहिजे. यानंतरी पत्रीं आज्ञा कीं, तुम्हीं आपलेकडील बारीक मोठें वर्तमान लिहिणें तें लाखोटा करून, तुमचे घरच्या लाखोटयांत लाखोटा घालून पाठवीत जाणें अथवा आजुरदाराबरोबर* पत्रें पाठवीत जाणें. आजुरदार मात्र चांगले निशेचे† पाहून पाठवीत जावे. तेथील बारीक मोठें वर्तमान कच्चें वरचेवर लिहीत जावें म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें वर्तणूक पत्रें पाठवावयाची करूं. इकडील दरबारी वर्तमान तरी, राजेश्री पाटिलबावा विजयादशमीचे मुहूर्तें डेरेदाखल जाहले. नंतर आश्विन वद्यपक्षीं आगरेयाचा किल्ला पाहावयासी स्वारी गेली होती. तूर्त जयपूर प्रांतीं जावयाचा रोंख आहे. त्यास जयपुराकडे समागमें पातशाहासुद्धां जावें हा विचार आहे. हल्लीं पातशाहा दिल्लीसच आहेत. तूर्त स्वारीस निघावें असी मर्जी हजरतांची दिसत नाहीं. येथून नेमणूक खर्चाची केली आहे तिचेही दोन तीन महिने पावले नाहींत. आणि पातशाही खर्च भारी. वरचीवर खर्चास मिळालें म्हणजे मर्जी प्रसन्न राहते. तूर्त सार्वभौमाकडे राजेश्री कृष्णाजी अंबादास मजमूचें काम त्यांजकडे आहे त्यांजला पाठविले आहेत. ते अथवा त्यांचें पत्र आलियाखेरीज येथून कूच होणार नाहीं असा विचार आहे. मग पुढें जसी मसलत घडेल ती पाहावी. कलकत्त्यास नवा इंग्रज‡ विलायतेहून आला. इष्टिणाची बदली जाहली. याची योग्यता इष्टिणापेक्षां ज्यास्ती आहे. म्हणोन धाकटा इंद्रसेन याच्या बोलण्यांत आहे कीं, इष्टिण होता तो कंपिनीच्या आज्ञेप्रमाणें आठ कौंसलदार असतात त्यांच्या संमतेंकरून जी मसलत करणें ती करीत असत. हल्लीं जो आला आहे याचा हुकुम कौंसलदारांवरही आहे. याजला

---

* अमुक मुदतींत पत्र पोंहचविल्यास अमुक रुपये मिळतील अशा शर्तीवर ठेवलेला कासीद. † खात्रीचे.

‡ लॉर्ड कॉर्नवॉलिस ता. १२ सेप्टेंबर १७८६ रोजीं अधिकारापन्न झाला.

मसलत करणें ती याची याणेंच करावी. कौंसलदारांस पुसावयाचें कारण नाहीं. त्यांचींही पत्रें राजेश्री पाटिलबावांस आलीं कीं, पूर्वी इंग्रजांचा व श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेब यांचा तह जाला आहे त्याप्रमाणें आम्हांस मान्य आहे. तूर्त इंग्रजांच्या तहांत अंतर एकच मात्र दिसतें कीं, टिपूची मसलत सरकारांत पडली, लढाई देखील सुरू जाहली, परंतु आद्याप इंग्रजांकडील कुमक पेशजीचे करारा-प्रमाणें यावी ती आली नाहीं. यावरून इंग्रज सरकारांत कुमकेस येतां दिसत नाहीं; व येथीलही मुख्यांच्य बोलण्यांत भास दिसोन आला कीं इंग्रज टिपूच्या लढाईस दिक* आहेत. इंग्रजांस आजपर्यंत लढाईचा व मर्दुमीचा जोम विशेष होता, परंतु हैदरखानाचे मसलतीमुळें जेर जाहले. तेव्हां आपल्यास इतल्ला न देतां हैदरखानासीं सलूख परभारें केला. हींच बोलणीं मागें ऐकत होतों कीं, सर्व प्रकारें सरकारांतून मसलतीस आळस होतो. हंगामशीर मसलत केल्यानंतर इंग्रज सिद्धच आहेत असें बोलण्यांत होतें. आणि प्रस्तुत श्रीमंतांस मसलत प्राप्त जाली असतां, आतां बोलणीं वर लिहिल्याअन्वयें दृष्टीस पडतात. याजवरून अपूर्व भासलें. सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें असे. खासगत फर्मासीविषयीं† आज्ञा केली त्यास याचा तलास करितों. मग चौहो फर्मासीपैकीं जी चांगली मर्जीलायख मिळेल ती घेऊन सेवेसीं पाठवूं. मिन्याचे दागिने, सोन्याचा चौफुला व गुलाबदाणी व अत्तरदाणी व तबक असे दागिने चार त्यांजवर मिना असे पाठवावे. त्यास हे दागिने कोटचास करवावे, किंवा दिल्लीस मिळाले तरी पाहावे, याची आज्ञा कोणती ती केली पो. कोटचास दागिने होतात ही माहितगारी आम्हांस आहे. दिल्लीची वाकबकारी आद्याप आम्हांस नाहीं. शोध करून करणें तें करूं. श्रीमंतांस नालकी व माही मरातब व झालरदार पालखी करून, सर्व सरंजाम तयार करून पाठविला; परंतु आपलीं पत्रें श्रीमंतांकडे सरंजाम पाठविणें तो विना सरकारचे मर्जीप्रमाणें पदाची व्यवस्था जाहलियाखेरीज सरंजाम पाठविला तरी, सरकारांत घ्यावयासी ठीक पडणार नाहीं, तेव्हां तो सरंजाम झाडून उज्जनीस येथून रवाना केला. तो क्षेत्र मजकुरीं ठेवणें प्राप्त जाहला. याजमुळें बहुत मर्जी खट्टी आहे. सरंजाम श्रीमंतांसाठीं बहुत पोक्त श्रीमंतांलायख पंचवीस हजार रुपये खर्चून तयार करविला, आणि तो सरंजाम मार्गीं आपले पत्रांवरून तहकूब ठेवणें प्राप्त जाहला. याजमुळें मात्र वाईट वाटतें म्हणोन आम्हांपासीं दाहा पांच वेळ गोष्टी काढिल्या. म्हणोन सूचनार्थ सेवेसीं लिहिलें असे. खासगत

* नाखूष. † निवडक वस्तु.

कामाचा आद्याप बंदोबस्त किमपि नाहीं. आम्ही येथें आलियानंतर दोन चार वेळ प्रसंग बोलण्याचा केला. त्यास मध्यें आठ पंधरा दिवस राणेखानभाई यांसी बरें वाटत नव्हतें व मध्यें आगरेयासी स्वारी केली होती, याजमुळें तपसिलाखालींच गेलें. आतां पुन्हां बोलणें बोलोन काय बंदोबस्त करून देतात तो अर्थ समजल्यानंतर तपसीलवार सेवेसीं लिहून पाठवीन. येथें कर्नाटकचें वर्तमान लढाईचें आकबार-नवीस राजश्री पाटिलबावांकडील पुण्यांतच श्रीमंतांजवळ आहे तो लिहितो, परंतु सरकारचें लिहिलें कांहींच येत नाहीं, याजमुळें चित्त स्वस्थ नाहीं. तर तपसीलवार ल्याहावयासी आज्ञा करावी. येथें राजश्री पाटिलबावांकडे पुण्यास डांक बसविली आहे तिचें वर्तमान लिहिलें आलें कीं, टिपूची व राजश्री हरिपंततात्यांची लढाई मातबर जाहली. होळकरांकडे दहा तोफा व साहा हत्ती पाडाव जाले व हुजरातीवर लढाई भारी पडली, परंतु श्रीमंतांची फत्ते जाहली म्हणोन लिहिलें; त्याजवरून येथें राजश्री पाटिलबावांनीं तोफाही खुषीच्या केल्या. परंतु स्वामींचें लिहिलें कांहींच आलें नाहीं, तरी वर्तमान ल्याहावयासीं आज्ञा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana, Mahadji having planned an expedition against Jaipur and his preparations. He also communicates the appointment of Cornwallis as G. G. and the desire of the Company's Government not to involve itself in the war between Tipu and the Marathas.*

No. 486 31st October 1786.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ८ मोहरम स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—जासूद जोडीबरोबर पत्र सादर जालें. आज्ञा जे, राजश्री पाटिलबावांस पत्र पाठविलें आहे. पावतें करून जाब घेऊन पाठविणें. जोधपूरचे राजाचे पत्रांची थैली व वकिलाचें पत्र सरकारांत आलीं. तीं बावांस पहावय स पाठविलीं आहेत. दाखवून माघारीं पाठवून देणें. ऐसियासी आज्ञेप्रमाणें बावांस पत्र प्रविष्ट करून जाब घेऊन पाठविला आहे. जोधपूरचे राजाचें पत्र व वकिलाचें पत्र बावांस दाखवून माघारी थैली व पत्र पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. गुरुवार

षष्ठीचा मुहूर्त बावांनीं निघावयाचा नेमिला होता, परंतु घरांत चहूं दिवसांचा प्रतिबंध जाला. याजकरितां डेरे दाखल जाले नाहींत. डेरे बाहेर त्या मुहूर्तानें करून, तोफखाना व लोक डेऱ्याजवळ उतरविले. हें वर्तमान पूर्वी गुरुवारींच पत्रीं विनंती केली आहे. प्रस्थानास दुसरा मुहूर्त त्रयोदशी नेमिली आहे. ते दिवशीं बाहिर निघतात. मसलतीस जावयाकरितां येथें म्हणायास बोलायास कमी करीत नाहींत. घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. भोसले उंदरीचे घाटाखालींच आहेत. पत्रें त्यांचीं सरकारांत आलींत जे, आम्ही घाट चढत नाहीं. खालूनच कूच करून बंगाल्यास जातों म्हणोन गंगाजीनें सांगितलें. त्यास, अशा मजकुराचीं पत्रें आलीं असल्यास बावांस पहावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

Sadashiv Dinkar informs Nana that Mahadji's departure against Jaipur was postponed for a few days owing to private reasons.

No. 487 October 1786.

पैवस्ती छ १३ सफर सबा समानीन.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष:—आपण छ १५ रजबचें पत्र पाठविलें तें छ १ जिल्कादीं पावलें. राजश्री सदाशिव दिनकर यांचे पत्रावरून मजकूर कळला, व कलकत्त्याचे पत्राची नक्कल पाहिली. इंग्रजी पलटणें सरकारचे मुलखाचे सर्देपावेतों येणार, असें आपण लिहिलें. त्यास, हें नवें दिसतें. पूर्वी कुमकेविसीं पत्रें येथून लेहून पाठविलीं, परंतु हा मजकूरच नाहीं. पलटणांस दरमहा करून कुमकेस आणावीं हेंच लिहिलें गेलें म्हणोन वगैरे मजकूर लिहिला, तो सविस्तर कळला. ऐसियास, पलटणें इंग्रजाकडील सरहद्देपर्यंत येतील, म्हणोन इंग्रजांकडील वकिलाचें बोलणें पडत गेलें. टिपूची जरब त्यांजवर. इंग्रजांच्या टिपूच्या लढाया जहाल्या, त्यांत इंग्रजांनीं हारच मानली. कोणेही प्रकारें टिपूचे मसलतीवर मदत पाठवावयास नेट धरीनात. करारमदारांचे वाटेनें कायम राहतील म्हणावें, तरी टिपूशीं तह

परभारें न करावा असें असतां, परभारें तह केला, हे गोष्ट उघडच आहे. यांचा तह अगर करारमदार एक आपले जबरदस्तीवरील आहे. टिपूचे जरबेमुळें कुमकेविसीं चुकाऊं लागले, येविसीं मालिटानें टिपूचा आमचा स्नेह असतां टिपूचे शत्रूची कुमक कसी करावी म्हणोन आपल्यासीं जाबसाल केला. याजवरूनच आपल्यासही न समजेसें नाहीं. इंग्रजी पलटणें येऊन लढाईचे उपयोगी पडतील हें समजलेंच आहे. फरासिसांचें सूत्र टिपूकडे. हें निराळें राहिल्यास कुचेष्टा करावयास चुकणार नाहींत. याजकरितां जसें कळेल तसें आणून गोवून टाकावें, म्हणजे छळछिद्र करूं पावणार नाहींत. सरकारचे मुलखाचे हद्देपर्यंत यावयाचें त्यांचें बोलणें, त्यास आमचे बोलण्यांत हद्द, पेशजी त्रिंबकराव मामा यांणीं मुलूख सोडवून सरकारचा अंमल केला आहे तेथपर्यंत आमची हद्द, याप्रमाणें आहे. खर्चास पलटणें येतील त्यांस देणें तें त्यांचे कंपनीचे येथून शिरस्ता मिळत असेल त्याप्रमाणें द्यावें असा ठराव आहे. त्रिंबकराव मामा यांणीं मुलूख पेशजी सोडविला, त्याचे पुढें, इंग्रजांचा सरंजाम पलटणें वगैरे पोख्त सरकारचे सरंजामाप्रमाणें ठेवून, टिपूचे पारपत्यास पुरतेपणें सामील जाहल्यास मुलूख टिपूचा सरकारचे हद्देखेरीज सुटेल त्यांत वाटा निमे द्यावा, असें वकिलाचें बोलणें. त्यावरून तुम्ही बोलतां याप्रमाणें कलकत्त्यास लेहून जाब आणवणें त्यासारखें याचें उत्तर पुण्यास लिहून आणवूं म्हणून बोलण्यांत आलें. आम्ही लिहितों. आपलें एक पत्र गव्हर्नरास द्यावें म्हणून वकिलांनीं रदबदली केली. तेव्हां येथून पत्र या गोष्टीचा खुलासा कळावा इतकें लिहिलें आहे. यांत करारमदार अथवा दस्तऐवज त्यांनीं धरावा असें कांहीं नाहीं. जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Sindia learns of the negotiations of the Poona Darbar with Malet for the Company's military help. The Company's desire to maintain strict neutrality became apparent in the negotiations.*

No. 488 10th November 1786.

पैवस्ती छ १६ सफर सबा मशार-
निल्हेचें कारकुनानें दिल्हा.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता. छ १८ माहे मोहरमपावेतों मुक्काम श्री मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें

वर्तमान यथास्थित असे विशेष:—स्वामींची आज्ञा घेऊन निघालों ते पर्जन्यामुळें दिवसगतीनें लष्करांत पोहोंचलों. वाटेनें लष्करांत मिळोन दोन तीन पत्रें पाठविलीं. स्वामीकडील एक पत्र आलें, त्यास बहुत दिवस जाहाले. तर वरचेवर पत्रें ल्याहावयासी आज्ञा जाहली पाहिजे. यानंतरी येथें तों आपली सरकारची डांक नाहीं, यामुळें वकिलाचीं पत्रें वरचेवर येऊन वर्तमान समजत नाहीं. राजश्री पाटिलबावांकडील डाक आहे, त्यांचीं पत्रें येतात. तीं एकबाराचीं येतात. त्यांत मजकूर लिहिला येतो तो एक वेळ खरा होतो, एक वेळ बातलही* पडतो. याजमुळें राजश्री पाटिलबावा बोलत होते कीं, राजकारणी कारभार, त्यांजला परस्परें वर्तमानें समजलीं पाहिजेत. आम्ही इकडे मसलतीवर आहों. पातशाहाचा कारभार गळां पडला आहे. फिरंगी व वजीर संधि पाहातच आहेत. कांहीं कमती पडल्यास दिल्लीचा कारभार आपण साधावा. पहिल्यानें कारभाराच्या मोहोऱ्यानें इष्टीण आला होता, तें साधलें नाहीं. तें त्याचें चित्तांत आहे. परंतु तहाचे संधीस कमती पाहोन, मग कर्तव्य तें करावें ऐसें त्यांचे चित्तांत आहे. सीक व जैपूरवाले व मारवाडी हेहि तिघे सभोंवते आहेत. तत्रापि युक्ती प्रयुक्तीनें व दाबानें आजपर्यंत पाऊल कमती पडों दिल्हें नाहीं. पुढेंही श्रीमंतांचे पुण्यप्रतापें करून पडणार नाहीं. परंतु मसलतीस दुरोख शह पडले आहेत. इकडील मसलत या प्रकारची आहे. तिकडील मसलत तों भारी प्राप्त जाहाली आहे. यास्तव कच्चीं वर्तमानें समजण्यांत यावीं. त्यास, राजश्री गोविंदपंत वकील, राजश्री नानांस पुसावयासीं जातात, त्यांजला निखालस वर्तमान सांगत नाहीं. त्याजमुळें गोविंदपंत लिहितात कीं, राजश्री नानास पुसिलें नाना सांगतात कीं, एका दोहीं दिवसीं पक्कें वर्तमान आलियावर सांगों ऐसें सांगतात. परंतु निखालस पहिलें वर्तमान सांगत होते त्याप्रमाणें गोविंदपंतास सांगोन, गोविंदपंताचीं पत्रें तपसीलवार येत नाहींत. गोविन्दपंतास न सांगावयाचें असल्यास, वकिलास पत्रें वरचेवर यावीं. वर्तमान समजावें, तेंहि येत नाहीं. सरकारची डांक नसली तरी, आपल्याकडील डांक आहे ही सरकारचीच आहे. वर्तमानाचीं पत्रें लेहून वकिलांचे नांवे पाठविलीं तरी कार्यास येतील. सारांश, आमचे व राजश्री नानांचें भेटीस फार दिवस जाहाले, याजमुळें कागदपत्रांत व परस्परें कोणी सांगितल्यांत चित्तांत कल्पविकल्प आले असले, तरी त्याची चिंता नाहीं. नानांची आमची भेट जाल्यानंतर निघोन जातील. परंतु श्रीमंतांचे मसलतीस मध्यें कल्पविकल्प नसावे. कच्चें वर्तमान आमचें त्यांस समजावें व तिकडील आम्हांस समजावें. याचें कारण, तिकडील मसलतीचा विचार पाहोन इकडे मसलत एखादी करावी लागते.

* खोटा.

यास्तव वर्तमान समजत नाहीं ऐसें बोलत होते. व पातशाहाचा बंदोबस्त यथास्थित खर्चावेंचाचा चालला पाहिजे. त्यांत कमती पडल्यास पैका मिळो किंवा न मिळो, परंतु हजरतांची नेमणूक आहे त्याप्रों ऐवज दिल्हा पाहिजे. त्यांत अंतर पडल्यास कोण्हे समयीं कैसी मर्जी होईल, आणि काय विचार करतील, हाही भरंवसा येत नाहीं. तेव्हां आम्हीं पुसिलें कीं, आपण बोलतां हें वर्तमान ल्याहावें कीं काय ? तेव्हां उत्तर केलें कीं, लिहिलें तरी कांहीं चिंता नाहीं; परंतु दुसरा समज चित्तांत आल्यास उपाय नाहीं. ऐसें बोलले. उदासीन भाव मर्जीचा आहे. स्वामींची आज्ञा कीं, कच्चें पक्कें वर्तमान वरचेवर लिहीत जावें. त्याजवरून जें वर्तमान समजण्यांत आलें, तें सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें आहे. राजश्री लाडोजी सितोळे देशमुख यांचा व त्यांचे तक्षीमदार भाऊ आहेत त्यांचा, सिवेचा कजिया कोण्हे एका गांवचा होता. त्यास उभयतांचा कजिया सिवेस मध्यें भारी होऊन, खून लाडोजी सितोळे यांचे माणसांनीं त्याचा केला. हें वर्तमान सरकारांत कळल्यावर सरकारांतून देशमुखांचे वाडयावर चौक्या पाठविल्या व गुन्हेगारीही लाविली. त्याजपैकीं थोडा बहुत ऐवज घेतला व बाकीचे ऐवजाविसीं चौक्या आहेतच. व सितोळे यांचा धाकटा भाऊ घरीं होता, त्याजला नेऊन, उभा करून आंगटे धरविले, आणि डोकीवर दगड घ्यावयासीं सांगितलें व उन्हांतही उभें केलें. तरी ही गोष्ट धनीपणास उत्तमच आहे. परंतु सिवेचे कजिये गांवोगांव बहुत होतात, व खुनाखूनही होतात, व जे खून करितात त्यांजपासून गुन्हेगाऱ्याही घेतात. परंतु जें होणें तें विचारें करून होत असतें. त्याजमध्यें लाडोजी सितोळे आमचे आप्त, ते नानांचे आप्त, तत्रापि लाडोजी सितोळे यांचे बंधु, वय लहान, पोक्त बुद्धिहि नाहीं; ऐसें असतां त्यास नेऊन, उन्हांत उभे करून, पायांचे आंगठे धरून, डोकीवर दगड घ्यावयासी उभें केलें. याप्रों बेअब्रू केली. यांत आमचाच बदलौकिक जाहाला ऐसा अर्थ नाहीं. नानांचा आमचा भाऊपणा, त्याअर्थीं जन त्यांसच शद्ब लावतील; व लौकिकांतहि भाऊपण्याचे संमंधास विरुद्ध दिसेल. बरें असो. केलें तें बरेंच केलें. त्याचा आम्हीं विधिनिषेध काय मानावा ? याप्रों एक दोन वेळ बोलले. त्याजवरून येविसींचें वर्तमान पेशजीं सेवकानें लिहिलेंच आहे. परंतु त्याचें उत्तर सेवकास अद्याप न आलें; याजकरितां मागतीं सेवेसीं विनंती पत्र लिहिलें आहे. तरी पत्रार्थ संपूर्ण ध्यानांत आणोन, तपसीलवार उत्तर ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sindia insists on rapid transmission of news between his camp and Poona on account of the gravity of the general situation.*

No. 489 24th November 1786.

पैवस्ती छ २७ सफर सबा समानीन,
मशारनिल्हेकडील कारकुनानें दिल्हा.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा. छ २ माहे सफर पोा मुक्काम लष्कर नजीक चीरघांट येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं. यास्तव चित्त उदास असे. तरी सदैव पत्रीं सांभाळिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावा मथुरेहून कूच करून, जैपूर प्रांतीं जावें या मसलतीनें मुक्काम मजकुरीं येऊन दाखल जाहाले. या प्रांतीं मेवाती यांचा उपद्रव भारी आहे. याजकरितां त्यांचे पारपत्यास राजश्री आंबाजी इंगळे यांची रवानगी करणार. नंतर पुढें नंदगांव बरसाना याचे सुमारें जाणार. मग पुढें जसा मसलतीचा रंग, जैपूरवाले यांजकडील वगैरे, दृष्टीस पडेल त्याप्रों जाणें घडेल. तूर्त नवी मसलत करीत नाहींत. राजश्री खंडेराव हरि यांजला डंघाईत परण्याकडे पाठविलें होतें. त्यांणीं दोन वर्षें कस्त मेहनत केली. परंतु त्यांचा अद्याप प्रथम दिवसच्च आहे. येविसींचें तपसीलवार वर्तमान मागाऊन सेवेसीं पक्कें समजल्यानंतर लेहून पाठवूं. स्वामींनीं पेशजीं छ २७ रमजानचें पत्र पाठविलें होतें, तेथें फर्मासीविसीं आज्ञा जाहाली होती. त्याजवरून येथें शोध लावून आणतां, तूर्त दागिने तयार होऊन स्वामींचे मर्जीप्रों होत ऐसीं स्थळें पाहातां, प्रस्तुत कोठेंच दिसेनात, यास्तव तेथील कामदार राजश्री लालाजी बल्लाळ येथें आले आहेत त्यांजला दागिन्याचा मजकूर पुसिला. त्याजवरून मशारनिल्हे बोलिले कीं, आपण ज्याप्रों दागिने करावयासी सांगितलें, त्याजप्रों करून देऊं. परंतु सोन्याचे दागिने आणि त्याजवर मिन्याचें काम, तेव्हां त्या दागिन्यांवर कांहीं नकासगिरीचें काम करूं; मग त्यांत मिना करावा किंवा साधे दागिने (अपूर्ण).

¶ *Appaji Ram communicates to Nana Sindia's decision to invade Jaipur territory. Another expedition under Ambuji Ingle was dispatched against the Mewati banditti.*

No. 490 November 1786.

पो छ १३ सफर

विज्ञापना ऐसीजे:—कलकत्त्याहून मेघफरसन याचें पत्र आलें, त्याची नक्कल बावांस पाठविली; त्यांनीं वाचून पाहिली. गजेंद्रगड घेतल्याचें वर्तमान छ ५

रमजानचीं* पत्रें राजश्री पाटिलबावा यांचे नांवें एक व राजश्री सदाशिवपंत यांचे नांवें एक एकूण दोन पत्रें सादर जालीं. त्यांत पाटिलबावांचे नांवें पत्र होतें तें प्रविष्ट करून, त्याचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. प्रविष्ट होईल. यापूर्वी बदामीचा किल्ला घेतल्याचें वर्तमान आलें. हल्लीं गजेंद्रगड सरकारांत आला हें वर्तमान बावांस कळल्यावर फार संतोष पावले.

राजश्री पाटिलबावांकडील नेहमीं डांक पुण्यापावेतों बसली आहे, त्यामुळें त्यांस तिकडील वर्तमान पै दरपै वरचेवर येत आहे. आपलीं पत्रें बहुता दिवशीं येतात. वर्तमान बासी† होतें. याजमुळें रुचकर होत नाहीं. सरकारचीं पत्रें मुजरद जोड्यांबराबर येतात तीं येथें कधीं पावणे दोन महिने, कधीं दोन महिनेयांनीं येतात. त्याचें वर्तमान डांकेबराबर जलद येऊन पोहचतें. आपलीं पत्रें आल्यानंतर आम्हीं सांगावयास जावें, तेव्हां म्हणतात जे, हें वर्तमान आमचे येथें येऊन एक मास जाहला; कधीं म्हणतात सवा महिना जाहला; याप्रमाणें बोलतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The happy tidings of the capture of Gajendragad by Haripant Phadke reaches Sindia.*

No. 491 November 1786.

छ विज्ञापना ऐसीजे:—राजश्री पाटिलबावा म्हणत होते, टिपूचा तह जाल्याचें वर्तमान आहे. साठी लक्षांची खंडणी जाहली. पंधरा लक्ष नक्त द्यावयाचें ठरलें. बाकीचे हप्ते करार जाहले. बदामी गजेंद्रगड वगैरे किरकोळ जागा घेतली आहे, ती सरकारची सरकारांत राखावी. आदवानी नवाबाकडे राखावी. होळकरांस मध्यस्थींत ती लक्षांचा मुलूख दिला. याप्रमाणें तिकडील मसलत आटोपिली म्हणोन डांकेचें वर्तमान आहे. सरकारचीं पत्रें आल्यावर तथ्य समजेल. परंतु ये वेळेस राजश्री हरिपंततात्या यांनीं चांगली केली. आपले लष्करांत महागाईचा ताण व छाप्यापासून लोकांची हिंमत कमी पडली. तशांत मरीचा उपद्रव जाहला. लष्करांत फितूर. असें असतां थोप‡ सांभाळून तह केला आणि यश घेतलें ही गोष्ट या समयीं तात्यांचे कारस्थानानें जाहली. वरकड पाहतां मसलत याप्रमाणें शेवटास जाईल भरंवसा नव्हता. पूर्वी सरकारांतून वरचेवर

---

*२-७-१७८६ चीं. † जुनें. ‡ अब्रू.

पत्रें येत होतीं त्यांजवरून वर्तमान कळत होतें. तो सिलसिला प्रस्तुत काळीं कमी आहे व कार्याकारण आहे. पत्रें येतात तीं बहुता दिवसांनीं येतात. वर्तमान वरचेवर कळत जावें. याप्रमाणें बोलत होते. तह कोणी साठीचा, कोणी चाळसाचा, याप्रमाणें बोलतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadji inquires of Appaji Ram about the terms of the treaty reported to be concluded with Tipu.*

No. 492 4th December 1786.

पैवस्ती छ १ राखर सन सबा समानीन
माघमास.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण छ २७ जिलकादचें पत्र पाठविलें तें पावलें. बहादूरबिंडा फत्तेआलीखान* याजकडे होता, तो घ्यावयासी फौज रवाना केली. तो किल्लेकरी यांणीं सरकारचे फौजेची सलाबत† खाऊन राजकारण लावून आपण खालीं उतरोन किल्ला सरकारांत दिल्हा. किल्ला बांका. आलीकडे त्यांणीं पैका खर्च करून मजबूत केला होता. परंतु श्रीमंतांचे प्रतापेंकरून किल्ला फत्ते जाला. पुढें टिपूकडील कांहीं फौज वाढून आली. त्यासीं लढाई होऊन चार पांचशें माणूस त्याजकडील ठार जाहलें. शें दीडशें घोडीं त्याजकडील पाडाव करून आणिलीं. मागाहून राजश्री हरिपंत तात्याही फौजसुद्धां जाऊन पोंहचले. टिपू अडचण पाहून राहिला आहे. याजकरितां हरिपंत तात्या चहूं कोसांचे तफावतीनें आहेत. नित्य फौजसुद्धां तयार होऊन जातात. तोफा इकडून मारितात. म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, बहादूरबिंडा किल्ला बांका व अलीकडे फत्तेआलीखान यांणीं पैका खर्च करून मजबूत केला असतां, सरकारची फौज जातांच आंतील लोकांनीं दहशत खाऊन किल्ला खालीं करून दिल्हा, सरकारचें निशाण चढलें, हें व टिपू वाढून आला असतां सरकारचे फौजेनें त्यासीं

---

* टिपू सुलतान. † धास्ती.

लढाई घेऊन चार पांचशें माणूस टिपूचें ठार करून, शें दीडशें घोडीं पाडाव करून आणिलीं, हें ऐकून संतोष जाहला. श्रीमंतांचे प्रतापें शत्रूचें पारपत्य होईल. आपणांकडूनही वरचेवर पुढें फौजा आहेत त्यांचा पुस्तपन्हा* होत आहेच. वरचेवर वर्तमान लेहून कळवीत असावें. रा छ १२ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji congratulates Nana on the capture of Bahadur Binda and on the impression made by Maratha troops on Tipu.*

No. 493 10th December 1786.

पैवस्ती छ १ रबिलाखर.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत मार्गशीर्ष वद्य ५ मुक्काम नजीक कामा मेवाती याचे मुलखांत स्वामींचे कृप वलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सेवकास त्रिस्थलीं यात्रेस जाण्याविसीं आज्ञा राजश्री कृष्णराव बापू भावे यांजवळ जाली. आज्ञे-प्रमाणें बापू येथें जेष्ठमासीं पावले. तेच कालीं स्वार होऊन जावें, परंतु पंधरा सोळा हजार रुपये लोकांचें देणें. ते ऐवज घेतल्याखेरीज जाऊं न देत आणि पुढें पर्जन्यकाल, सहजच राहणें प्राप्त जालें. तधीपासून रोजमरेयाचे ऐवजाची बजिदी करीत असतां हा कालवर रुपया प्राप्त जाला नाहीं. कंबेश वीस हजार रुपये रोजमरेयाचा ऐवज येणें असतां प्राप्त कांहीं होईना. अटकून कर्जदारांनीं पाडिलें. हेंही समजलें. तत्रापि दया न ये. मोठें संकट! तेरा महिन्यांचे नव हजार साडे सातशें रुपयांच्या वराता कमाविसदारावर वैशाखमासचे वाइद्याच्या वराता दिल्या. त्या विकतां तोटेबाटे व पांच सा महिन्यांचें व्याज जाऊन हातीं काय लागलें? साहुकारांचे देण्यांत काय दिल्हें? आणि यात्रेस काय नेलें, याचा विस्तार काय विनऊं? दैवयोगें जें प्राप्त तें भोग्य भाऊन† भोगणें प्राप्त! स्वामींचे पाय स्मरोन आणखी कर्जाचाच उद्योग करून मी यात्रेस निघालों. उदईक स्वार होऊन जाईन. ही दशा येथील रोजमरेयाची! बापू भावे येथें आल्यावर अद्यापि रोजमरा त्यांस मिळाला नाहीं. माझे विद्यमानचें देणें व यात्रे-संबंधीं कर्ज यांचे माथां मारिलें. यांची दशा काय होईल श्री जाणें! मी यात्रेस

---

* पाठपुरावा. † मानून

गेलों. आयुष्य आणि शक्ति शरीर चालण्यास दोनच आधार. स्वामींचे कृपेंकरून व तीर्थदेवताप्रसादें दोन्ही प्राप्त जाल्यास श्रीपतिन्यायें माझी गति स्वामींचे पायच आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar complains of not having received his salary from Sindia's Darbar for over a year. He sets out on his contemplated pilgrimage.*

No. 494 December 1786.

(ले. ४९२-४९४ चा लेखक सदाशिव दिनकर)

छ विज्ञापना ऐसीजे:—छ १७* सफरचीं आज्ञापत्रें बाळाजी जनार्दन जांबगांवकर यांचे विद्यमानें राजश्री पाटिलबावांचे चौकडचांबरोबर सादर जालीं. त्यांत सरकारचे जाबसाल पाटिलबावांकडे लिहितों त्यांचें स्मरण धरून उगवीत नाहींस. कच्चें पक्कें वर्तमान तिकडील तुम्हीं लेहून पाठवावें, तें लिहीत नाहीं. परभारें ऐकतों तें येथून लिहितों. तूं लिहीत नाहींस. येविसीं निषेधयुक्त आज्ञा सादर जाली. त्यास, प्रथम आज्ञा घेऊन येतेसमयीं म ज्ञे शरिराची अवस्था दृष्टिगोचर व मीही विनंती केली. खामखा† जाणेंच आज्ञा जाली. आलों. मार्गीं येतां दशा जाली ती विनंती केली. नंतर ग्वालेरीजवळ गिरगांवचे मुक्कामीं लष्करांत पाऊन, पाटिलबावांची व नारो शिवदेव यांच्या भेटी जाल्या. नंतर एक वर्ष नारोपंतनाना एकत्र होतों. काय गति व अवस्था दुखण्यानें जाली, त्यांनीं पाहिली. आज्ञेप्रमाणें नारोपंत देशास गेले. मजला येथें ठेवूं लागले. मीं त्यांस विनंती केली कीं, एक वर्ष माझी स्थितिगति आपण अवलोकन केली असतां ठेवितां. सरकारचाकरी जाबसालाची. तहनाम्यापासोन पाटिलबावांचे मर्जीचा विचार ध्यानांत आला आहे. त्यांत जाबसाल कसे चालतील बरें? जाबसाल खटेमिठे होतील ते होत. लिहिण्याचें काम कसें चालेल? विनंतिपत्रें जावीं, वर्तमान वरचेवर खावंदांस कळावें हा सेवाधर्म. तो मार्ग न चालतां इतराजी होईल, तर खावंदांची इतराजी सेवकास श्रेयस्करच होय. सेवकाचें स्मरण खावंदांस होणें कल्याणदायक. मग पत्रीं आज्ञा सरोप अगर सकृप गौरवच होय. वरचेवर पत्र न जाणें, वर्तमान धन्यास न कळणें, केवढा दोष? येणेंकरून परलोक तरी

---

*ता. ९-१२ १७८६ चीं. †अवश्य.

कसा बरा होईल? असें म्हटलें. तत्रापि यांनीं ठेविलेंच. करतील काय? आणखी कोणी येथें ठेवावयायोग्य माणूसच जवळ नाहीं. लाचार होऊन सेवकास ठेऊन गेले. मी राहिलों. माझें बोलणें पाटिलबावांशीं कोणे तऱ्हेचें होतें, हें गुजराथचे स्वारींत राजश्री विसाजी आपाजीही किंचित् माहीत असतील. राजश्री आपाजीराम तर कोल्हापुरापासून बावांचे स्वारीसमागमेंच आहेत. त्यांचे समक्षही बहुत वेळ बोलणीं देशीं व गुजराथ व हिंदुस्थानांत नारोपंतनाना गेल्यानंतरही जाहलीं. बावांनीं मनस्वी कल्पना घेतल्या त्या साहून घेतल्या, किंवा पेंच कुपेंच त्यांचेच बोलण्यांतील धरून, उलटून उत्तरें संकल्प विकल्प दूर होण्याचीं व सरकारकामाचे जावसाल स्वामींचे पत्राप्रमाणें व पत्राखेरीजही सुचले ते करीत गेलों न गेलों, यांत जितके आपाजीराम समक्ष असतां जाले असतील तितक्यांची माहितगारी त्यांस असेलच. मी भिऊन विसरून दबत गेलों, किंवा जाबसाल करीत गेलों, ही विनंती उभयतांनीं केलीच असेल. मी तपसीलवार विनंती करण्यांत फल काय? किंचित् किंचित् पत्रीं विनंती करीत गेलों. बोलण्याची स्थिति मात्र पक्की लिहावी तर बोलणें पक्षी पिंजऱ्यांत असतो त्याचें गोड. सेवक चाकरीवर योजिला त्याच्यानें सरकारचे जाबसाल होऊन कामें निघत जावीं. जावसाल उरकले हीच चाकरीची शर्त खावंदांचे दृष्टीस यावी. जावसाल कामाचे तुटले नाहींत, संदेहाची निवृत्ति न होतां उफराटे संदेहाची वृद्धि होऊं लागल्यास नुस्तें बोलण्यांत फल नाहीं. सरकारकामाचे जाबसाल होणें अगर सरकारचे पत्रांचीं उत्तरें वरचेवर घेऊन पाठवणें हें एकीकडे राहून, उलटें पाटिलबावांचे संकल्पविकल्प त्यांनीं मसोदे करून दिल्याप्रमाणें पत्रीं विनंती करणें, सेवकास अयोग्य असतां विनंती केली. यावरून मी निषेध व इतराजीस पात्र जालोंच. त्यांचे मसोद्याप्रमाणें मी विनंती न करावी परंतु उपाय नाहीं! सरकारकामें एकीकडे राहिलीं. उलटे संदेह निर्माण जाले. हें ऐकून यांस न विचारतां वर्तम न स्वामींस कळावें या बुद्धीनें परभारें पत्रीं विनंती केली, तर डाक यांचे मुलखांतून आहे. पत्र धरलें गेलें तर सध्यां निरंतर कर्तरींत* आहेंच. सहन करीतच आहें. पत्रांतील मजकूर पाहून सरकारांत चुगल्या लिहितां, नाश करितां, हें काय निमित्त देतील, त्यात तेथें काय निमित्त येईल, निषेध कसे पडतील, आजपावेतों श्रम जाले ते केले. तत्संबंधीं प्रसन्नता इकडील होऊन कृतार्थता अशी जाली कीं, पुन्हां प्रपंचाचें नांवच घेऊं नये! रोजमरा करार केला आहे त्याचा फडशा नारो-

*कात्रींत.

पंतनाना येथून गेले ते समयीं तीस महिन्यांचा फडशा जाला. कर्ज घेऊन कालक्षेप जाला. त्यांत व्याजबट्टे, मनोती जाऊन, दरमहा चारशें हातास आले. नारोपंत गेल्यावर सोळा महिने कर्जासींच गांठ आहे. या लष्करांत दाहा रुपये शेंकडा व्याज व मनोती, बट्टा, गरजेस ते देऊन कालहरणाकरतां कर्ज घेणें पडतें; ही दशा सरदारांचे प्रसन्नतेची! शरीराची दशा ग्वालेर गोहद प्रांतीं हवा फार वाईट म्हणतात. ऋतुत्रय तर मोठे सख्तीचे गुजरले. तत्रापि शरीर कांहीं तरी वागत होतें. चमल उतरून उत्तरेस आल्यावर सध्यां जाटवाडा मथुरावृंदावन-पावेतों ब्रिजदेश ही संज्ञा आहे. येथील हवा केवळ नाकारी. तारीफ काय लिहावी? ग्वालेरचे हवेस चांगलें म्हणविलें. लष्करांत फार करून दुखणीं आहेत. चांगल्या धडचाच्या ह्या गति! मी तर क्षयरोगीच. बादशाहाची भेटी होय पावेतों कांहीं चालत फिरत होतों. नंतर गलितवृत्ति जालों. अन्नाचें दर्शन मात्र होतें. त्यांत भोग्य आदपाव तरी होत असेल कीं नसेल! मग कटाक्ष शरीरांत काय पाहणें? ही दशा माझी आहे. कागद लिहावयास बसावें तर परम मर्यादा दाहा वळी. जास्त लिहवत नाहीं! इतकीं पत्रें लिहिण्यास दिवस किती लागले तें ध्यानास येईल. हिंदुस्थानची हवा. शीतकाल भारी. त्यापेक्षां उष्ण-काल कठिण. सोसणार नाहीं. विनंती केलीच होती. अन्नोदक ऋणानुबंध इकडे घेऊनच आला. अवस्था शरीराची नारोपंतनाना पाहूनच गेले. नंतर पत्रीं लेहून पाठवीत होतों. औषधउपाय करा म्हणून नाना लिहीत. तो उपायही चालतो. मनस्वी रुपया खर्च होऊन सार्थक नाहीं. शरीर वागेचना. त्यास मीं काय करावें? सरकार चाकरीस न पोचतां शिक्षा वाजवीच आहे. परंतु मी लाचार आहें. वर्तमान श्रुत व्हावें याजकरितां विनंती केली. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. शरीराची स्थितिगति, आहारविहार पाहून, आयुर्दायाचें लक्षण समजण्यांत येऊन विनंती केली कीं, फार दिवस अशा स्थितीनें कालक्षेप जाला. आतांही तोच तर्क ध्यानांत राहील तर न राहावा. यामागें कांहीं आवाका होता. आतां निसत्व जालें. इकडे शरीरच राहील कीं स्वामींचे पाय दृष्टीस पडतील निश्चय होत नाहीं. बुद्धि पुरली तितकी विनंती केली. याउपर खावंदांची मर्जी! कदाचित् आयुर्दाय मर्यादा घेण्यापर्यंत कलेवर* निसत्व राहून पाप भोगीत कालहरण करील, तर न कळे. स्वामिसेवेस अंतराययुक्त वांचणें धिःकार आहे. हें शरीर पडो कीं राहो, सरकारची सावधता व्हावी. हरवख्त विनंती

*शरीर.

मागेंच होत गेली. आतां निदानची विनंती शरीरस्थितिप्रमाणें केली असे. कामाचा, मेहनतीचा, लिहिण्याचा भरंवसा या शरीरापासोन संभवत नाहीं. गंगाजी जवळ जाण्यायेण्यास आहे. त्यास एक मास असें दुखणें जालें, गतच जाला होता. काळाचे दाढेंतून निघाला. अद्यापि अशक्तच आहे. त्याजवांचूनही खोळंबा जाला. स्वामीकृपेंकरून वांचला. आठा पंधरा रोजांत शक्ति येईल. मी लाचार जालों. शरीर केवळ गलित जालें. कामाचें राहिलें नाहीं हें खरें व येथें राहण्यांत कांहीं सार्थक व स्वरूप नाहीं. कामें निघत नाहींत. गांठ पडून बोलणें होत नाहीं. कागदाचा जाब मिळत नाहीं. वृत्तिही लिहवत नाहीं. याजकरितां विनंती केली. यांत दिसती अमर्यादा ती क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes about his ill-health and enlarges on his difficulties in transacting business with Mahadji.*

No. 495 December 1786.

छ १ रबिलाखर.

विज्ञापना ऐसीजे:—इंद्रसेन* इंग्रज येथें होता त्याची बदली जाहली. वीं पंधरा दिवस जाहले, दोन इंग्रज नवे कलकत्त्याहून येथें आलेच आहेत. ते राहाणार इंद्रसेनाचे जागां. मागाहून दुसरा कोणी येणार आहे. अद्याप आला नाहीं. इंद्रसेन येथून कलकत्त्यास जाणार. तेथून पुढें विलायतेस जाणार. बावा त्याचे डेऱ्यास गेले होते. तोही आला होता. एका दोहो दिवसांनीं निरोप घेऊन जाणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anderson's retirement and Kirkpatrick's appointment at Sindia's Darbar are communicated to Nana in this letter.*

No. 496 December 1786.

छ विज्ञापना ऐसीजे:—सरकारचें कूच होऊन भीमातीरीं मुक्काम करावा याजविसीं पत्रीं आज्ञा जाल्याप्रमाणें बावांस विचारिलें. उत्तर जालें जे, परंतु

---

* जेम्स् अंडर्सन नंतर कॅ. कर्कपॅट्रिकची शिंद्याच्या दरबारीं रेसिडेंट म्हणून नेमणक झाली. त्यानें २२ डिसेंबरला अंडर्सनपासून चार्ज घेतला व ५ जानेवारी १७८७ ला तो शिंद्याच्या लष्करांत दाखल जाहला.

भीमातीराहून महिमाजी (?) जवळ पडतील. संशयास पावतील. आज प्रसंग कोणताही नाहीं. काबखेरीज गोष्ट एखादी करूं जातां साध्य जाल्यास उत्तम. न जाल्यास वाईट पडेल. याजकरितां तार्तम्यें ध्यानांत आणून जें करणें तें, पुढें विचार न पडे तें, करावें म्हणून बोलले. हे विज्ञापना.

¶*This refers to some enemy near Poona against whom hostilities were proposed by Nana who consulted Mahadji on the subject.*

No. 497 2nd January 1787.

छ सेवेसीं आपाजीराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ रबिलावल मुा श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींनीं छ २२ मोहरमचें पत्र पाठविलें, तेथें आज्ञा कीं, राजश्री सदाशिव दिनकर याचीं पत्रें उज्जनीहून आलीं, त्यांचीं उत्तरें लिहिलीं. त्यांत राजश्री पाटिलबावांस मजकूर कळवावयाचा लिहिला आहे. मशारनिल्हेकडे पत्रें पाठवावीं तरी ते उज्जनीहून पुणियास यावयाकरितां निघाले, तेव्हां पत्रें त्यांजकडे पाठविलीं असतां पावतील न पावतील. याजकरितां त्यांचे नांवचीं पत्रें तुम्हांकडे पाठविलीं आहेत. तीं तुम्हीं पाहून पाटिलबावांसीं मजकूर बोलून, उत्तरें होतील तीं लेहून पाठवावीं. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें तीन पुरवण्या होत्या. त्यांतील मजकूर तपसीलवार राजश्री पाटिलबावांस निवेदन करून, त्यांजपैकीं दोहो पुरवण्यांचीं उत्तरें पेशजीं सेवेसीं लिहिलींच आहेत. इंग्रज प्रकर्णींचा मजकूर ल्याहावयाचा होता, त्यास हल्लीं पामरसाहेब व कर्नल* लखनौहून आले होते. तेव्हां त्यांजला मुंबईचें वगैरे वर्तमान मुख्यांनीं पुसिलें. नंतर पामरसाहेबानें उत्तर केलें कीं, तीन हजार गोरा विलायतेहून पातशाहानें पाठविले आहेत. त्याजला 'रजमण'† म्हणतात. जसें हजार प्याद्यांचें पलटण एक, तैसे हजार गोरे म्हणजे एक रजमण. ऐसे तीन रजमण पाठविले आहेत. यांजपैकीं एक पलटण मुंबईस ठेवावें व एक मद्रासेस ठेवावें व एक बंगाल्यास पाठवावें, याप्रमाणें पातशाहाचा हुकूम आहे. आणि आणखीही पामरसाहेबाचे बोलण्यांत आलें कीं, आतां एकंदर हुकूम कंपनीचा व पातशाहाचा आहे कीं, तुम्हीं होऊन कोणासीं विघाड करूं

*Col. Kirkpatrick. †Regiment.

नये. दुसरा आपल्या गळीं पडों लागल्यास मग लढाई करावी. त्यास, टिपू पुढें आम्हांसीं खलश करणार ही चाल त्याची आहे. व कुपिया* बातमीही आम्हांपासीं खलश जरूर करावा ऐसी येत आहे. यास्तव पोक्त सरंजाम मुंबईस व मद्रासेस केला आहे. वरकड श्रीमंत पेशवेसाहेबांचे घरासीं आम्हांस बिघाडाची गोष्ट एकंदर करावयाची नाहीं. हें उत्तर जाहल्यानंतर मग राजश्री पाटिलबावांनीं पामरसाहेबास पुसिलें कीं, तुम्हीं दक्षणेकडील जाबसाल निखालस सांगितलात; याप्रमाणेंच पुढें अटकेकडील दुराणी याची फौज काश्मीरपावेतों येणार म्हणन अकबारनवीस याचीं लिहिलीं आमचीं व तुमचीं आलीं. त्याचा याचा विचार पुढें कसा करावा? त्याचें उत्तर इंग्रजांनीं वर लिहिल्याअन्वयेंच केलें. आणि हेंही बोलिले कीं, ज्यापक्षीं गिलचे दिल्लीस येऊन बंदोबस्त करतील, तेव्हां ती गोष्ट दक्षण्यांस व आम्हांस ठीक पडणार नाहीं. त्यास येविसीं तुमची फौज सुद्धां तयारी असों द्यावी. आम्हींही आपलीं सारीं पलटणें एके जागां जमा करून तुम्हांस सामील होऊं, व हा मजकूर कलकत्त्यास बडा साहेब आहे त्याजलाही लेहून पाठऊं. तेथील उत्तर येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सारांश पामरसाहेबाचे बोलण्यांतील भाव हाच कीं, विना दुसरा आपल्या गळीं पडल्याशिवाय आपण होऊन कोणाशीं खलश करीत नाहीं. हा विचार त्याचे बोलण्यावरून दिसोन आला, व हीं भाषणें सेवकाचे समक्षच जाहलीं. जें वर्तमान इंग्रजांचे बोलण्यांत आलें त्याप्रमाणें स्वामींस ल्याहावें म्हणोन मुख्यांनीं सांगितलें. त्याजवरून सेवेसीं विनंतिपत्रीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. वरकड वर्तमान सविस्तरें दुसरे पुरवणीबंदीं लिहिलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports a conversation between Sindia and Palmer in which the latter enunciated the policy of neutrality and non-interference enjoined on the Company's government by the British Parliament.*

No. 498 January 1787.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ऐसीजे:— पामरसाहेब इंग्रजांकडील वकील येथें आला, ते समयीं बोलणीं राजश्री पाटिल-

---

* गुप्त.

बावांचीं व पामरसाहेबांचीं दोन तीन वेळां जाहलीं. तो मजकूर सेवेसीं पेशजी लिहिलाच होता. त्याचीं उत्तरें स्वामींनीं पाठविलीं. त्यांत शेवटीं लिहिलें कीं, या पत्राचीं उत्तरें तपसीलवार राजश्री पाटिलबावांसीं बोलन लिहून पाठवावीं. नंतर येथोन लिहून पाठऊं त्याप्रमाणें तेथें बोलण्यांत यावें, म्हणोन आज्ञा. त्यास येविसीचें बोलणें हालीं व पेशजीं जाहलें. त्यास हालींच्या बोलण्यांत बावांनीं सांगितलें कीं, पेशजीं इंग्रजांचा सलूख जाहाला, तेव्हां परस्परें करार होता कीं, काम पडल्यास कुमक करावी. त्यास पामर साहेब येथें आलियानंतर टिपूचे मसलतीविषयीं बोलूं लागला. तेव्हां तो मजकूर, जो त्याचे आमचे बोलण्यांत आला होता तो, लिहावयासी तुम्हांस सांगितला होता. त्यास, ते समयीं करार पामरसाहेब याणें केला कीं, हा मजकूर आम्ही कलकत्त्यास लिहून पाठवितों आणि तुम्हीं पुण्यास लिहून पाठवावें. दोहीकडील जाब आले म्हणजे परस्परें कराराची याद व्हावी. त्यास, इंग्रजांकडील कलकत्त्याचे जाब त्यांजकडे आले. त्यांत भाव त्यांचे बोलण्यांतील दिसोन आला कीं, तूर्त मसलत कोणतीही करावयाची नाहीं व कुमकही प्रस्तुत होत नाहीं. असें स्पष्ट बोलोन तर दाखविलें नाहीं, परंतु जें बोलणें त्यांचें पहिलें नेटाचें होतें त्या बोलण्याप्रमाणें हल्लीं निकड दिसत नाहीं. तेव्हां तुमच्या पत्राचे जाब विशेषात्कारें करून लिहून द्यावे, तरी तो पर्यायच तूर्त लांबणीवर पडला. त्यापक्षीं प्रस्तुत विशेष कांहींच लिहावेंसें नाहीं. आपण मात्र इंग्रजांकडील मालीट वकील पुण्यांत आहे त्यासीं बोलणें तें सांभाळून बोलावें. याप्रमाणें लिहावयासी सांगितलें. त्याजवरून सेवेसीं कळावें म्हणोन विनंती लिहिली असे. सारांश, येथें परस्परें सेवकाचेही समजण्यांत बारकाईनें शोध केला, तेव्हां हाच मजकूर आला कीं, इंग्रज कुमक राजश्री पाटिलबावांची करीत नाहींत, व पातशाहा व जैपूरवाले वगैरे मोगले यांचीही कुमक करीत नाहींत, हें स्पष्ट समजण्यांत आलें. इंग्रज विना नफ्याखेरीज कोणाचीही कुमक करीत नाहींत. हिंदुस्थान खराब जाहालें. पातशाहत बुडाली, पैका कोठें नाहीं, तेव्हां उगीच मसलत उभी करून पैका खर्चून पलटणें आणून कुमक करावी याचें कारण तें काय ! यास्तव तूर्त सारीच मसलत इंग्रजांकडील राहिली. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram communicates to Nana the refusal of the Company's government to involve itself in the wars of Sindia or of the Poona Darbar.*

No. 499 14th June 1787.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक सा टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २७ साबानपर्यंत मुक्काम लष्कर नजीक लालसोट प्रांत जयपूर येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर प्रांत राजपुरी येथें जमेनिसीकडील दफ्तरदारीची आसामी राजश्री लक्ष्मण हरि धामणकर यांजकडे होती. त्यास ते मृत्यु पावले. नक्कल जाहलें. तेव्हां ती असामी सुभारजेस* ओढत होती. सबब साल तिगस्तां सन सीत समानीनांत राजश्री नारो कृष्ण भाटे यांजपासून, सुभा राजश्री गोविंदराव माणकर व राजश्री चिमाजी माणकर व राजश्री जयराम त्रिंबक यांणीं रुपये ५०० रसद घेऊन, अवल साल सन सीत समानीनापासून ती आसामी करार करून दिली. पुढें सुरसुभ्यांनीं विनंती करून सनद घ्यावा तों सुरसुभेदार खासा स्वारीसमागमें कर्नाटक प्रांतीं गेले. याजमुळें सनद घेणें राहिली. पुढें सरसुभेदार पुणियास आलियावर सनद घ्यावी, तों लष्करांत स्वारीसमागमें राजश्री बाळाजी नारायण लवाटे होते, त्यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन धामणकर याची असामी आपले नांवें करार करून सनद घेतली. त्यास पांचशें रुपये रसद सुभा नारो कृष्ण भाटे यांजपासून घेतली. हें वर्तमान मशारनिल्हेस ठाऊक ऐसें असतां, ती असामी आपण परभारें करून घेतली म्हणोन मशारनिल्हेनीं येथें सांगितलें. त्यास मामलेदार यांणीं सुभा रसद घेऊन मशारनिल्हेचे नांवें प्रांत राजपुरी येथील जमेनिसीकडील दफ्तरदारीची असामी करार करून दिली आहे, त्याप्रमाणें सरकारांतून ताकीद होऊन बंदोबस्त करून देविणार स्वामी समर्थ आहेत. मशारनिल्हे राजश्री राघोपंत गुरुजी यांजपासीं दफ्तरांत असतात. त्यांचे बंधु लिहिणार चांगले, सरकारचाकरीचे उपयोगी पडत ऐसे आहेत, यास्तव सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. मान्य करून मशारनिल्हेचा बंदोबस्त वर लिहिल्या-अन्वयें करून द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana on behalf of one Naro Krishna Bhate for appointing him as Jamenis of Rajpuri.*

* सुभाचे बेरजेस ?

No. 500 30th July 1787.

पवस्ती ९ जिल्काद

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

*छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—जैपूरवाले व मारवाडवाले व हमदानी एकत्र होऊन मातबर जमाव पन्नास हजार करून मुकाबल्यास आले. त्यावरून इकडूनही त्यांचे पारपत्याकरितां सडे होऊन राजश्री खंडेराव हरि व राजश्री अंबोजी इंगळे यांसीं येण्याविसीं पत्रें पाठविलीं होतीं, हें पेशजी पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून कळलेंच असेल. खंडेराव हरि व अंबाजी इंगळे येऊन पोंचल्यावर सड्या फौजा मुकाबल्यास होत्या, त्या सुद्धां चालून जाऊन गांठ घालावी हें ठरवून अधिक शुद्ध चतुर्दशीस फौज व तोफखाना सुद्धां चालून गेले. राठोड जोधपूरकर व जयपूरवाले व हमदानी हेही, इकडील फौजा त्यांचे मोकाबल्यास जातांच गोट सोडून पुढें आले. पन्नास पंचावन हजार फौज त्यांची व साठ जरब तोफ समागमें होती. प्रथम दोन प्रहरपर्यंत दुतर्फा तोफांची मारगिरी जहाली. इकडील तोफांची मारगिरी जहाली तेव्हां रांगड्यांनीं तीन टोळ्या करून पलटण तोफखान्याचे तोंडावर न येतां बाजूनें गोडवें सामान पाहून, डावे बाजूस अंबाजी इंगळे यांचे मुकाबल्यावर उठावणी केली. इंगळे वगैरे यांणींही घोडे चालवून त्यांचा गोल होता तो फोडून दोन तुकडे केले. व इकडून राजश्री शिवाजी विठ्ठलबापू यांची फौज व चिरंजीव धारराव शिंदे व रायाजी पाटील व खंडेराव हरि यांसीं कंबरक्यांत† घोडे घालावयासीं सांगितलें. यांणीं कंबरक्यांत उठोन जोधपूरवाले राठोड व कछवे जयपूरवाल्यांचें तोंड फिरवून पाऊण कोस मारीत गेले. राणेखानभाई यांचे तोंडावर राजा खासा व हमदानी होता, त्यांसीं आडवी मार देऊन त्याची मदत करूं दिल्ही नाहीं. हमदानी गोल बांधून उठावणी करावी या विचारांत होता. इतक्यांत इकडील तोफांची मारगिरी दिल्ही, त्यांत हमदानी खाशासच गोळा लागून ठार जहाला. डावे बाजूस राठोड व कछवे यांचें तोंड ठेंचलें, व राणेखानभाई यांणीं तोफांचा मार देऊन हमदानी ठार करून, राजाचा व त्याचा मोहला‡

* ऐ. टि. २.४९ व ऐ. पत्रव्यवहार ले. २६१ पहा.

† कटिभाग, सेनामध्य. ‡ व्यूह, जमाव.

मोडला. तसेंच चालून गोटावर जावें इतक्यांत पर्जन्य आला व त्यांचे तोंडापुढें नाला व खळचा होत्या त्या आसऱ्यास गेले. तीन प्रहर लढाई जहाली, आणि आपले फौजेस पाणी नजीक नव्हतें, पाऊण कोस मागें नदी होती, तेथून पखालीनें पाणी लोकांस पुरविलें. घोडयांस पाण्याचा ताण बसला, याकरितां ते दिवशीं रांगडे वांचले. परंतु श्रीमंतांचे प्रतापें पारपत्य रांगडयांचें चांगलें जहालें. हजार मुडदा राठोडांचा व जयपूरवाल्यांचा खेतांत* राहिला. नामी माणूस मारलें गेलें. शिवाय जखमी दोन हजार गेलें. शिवाजी विठ्ठलबापू यांचे लोकांचें कामकाज चांगलें जहालें. बापूंकडील व चिरंजीव धारराव शिंदे व राजश्री रायाजी पाटील व राजश्री खंडेराव हरि व अंबाजी इंगळे यांजकडील जखमी व जाया जाहाले त्यांची यादी पाठविली आहे, त्यावरून कळेल. जयपूर व जोधपर दोन्हीं राज्यें एक होऊन चालून आले. सरंजाम पोख्त व माणूस लढवाई एक जुटीचे, परंतु श्रीमंतांचे प्रतापें पारपत्यच त्यांचें जहालें. दुसरे दिवशींही फौज तयार होऊन गेली, परंतु गोट सोडून पुढें वाढून आले नाहींत. गोटानजीकच संगर खोदून उभे राहिले. जागा अडचणीची. तोंडापुढें नाला व पाठीमागें डोंगर व बाजूनें खळचा अशी जागा पाहून राहिले आहेत. श्रीमंतांचे प्रतापें थोडक्याच दिवसांत पुरतेपणें शत्रूचें पारपत्य होऊन येईल. रवाना छ १४ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reports the heavy fighting at Lalsot and his success over the Rajput armies.*

No. 501 18th August 1787

पैवस्ती छ ८ जिल्हेज सन समान
समानीन. भाद्रपद मास. हस्ते डाक शिंदे.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक हमहादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ ४ माहे जिल्काद मक्काम नजीक डीग पर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :—इकडील वर्तमान, लढाई रजपुतांची मारली असतां पलटणांनीं

---

* क्षेत्र, रणांगण.

वगैरे हिंदुस्थानी यांनीं फितूर केला. हें सविस्तर दोन तीन विनंतिपत्रीं लिहिलें आहे, त्यावरून श्रुत जालेंच असेल. सांप्रत डिगेचे मुक्कामीं येऊन, कुटुंब वगैरे खटला मार्गस्त ग्वाल्हेरीस करून सडे जाहलों. याउपरी शत्रूंस घेराघेरी करून जेर करावें हाच इरादा आहे. ओढीमुळें मोठा पेंच पडला आहे. बादशाहाचे नऊ महिने चढले आहेत, त्यांचा तगादा. या समयीं बादशाहा बाहेर निघून आपलेजवळ आल्यास हातीं सर्व गोष्टी राहातील. बादशाहा बाहेर निघून आपले जवळ न आल्यास सर्वांस राजकारणें करावयासी जागा आहे. बादशाहाही कायम-मिजाज* नाहीं, लोभी, याकरितां त्याचे महिने तरी त्यास कसेंही करून पावते करावे, येविसीं सावकारांसीं बोलून जितका प्रयत्न करावयाचा तितका केला. परंतु सावकारांचीं मागील देणीं, त्यांचीच निर्गत नाहीं; यामुळें कोणी उभा रहात नाहीं. नाइलाज गोष्ट जाणून विनंती लिहिण्यांत येती. त्यास, बादशाहाचे नऊ महिने चढले. त्यांचे ऐवजाची तर्तूद सरकारांतून जरूर जाली पाहिजे. येविसीं राजश्री कृष्णाजी महादेव यांसीं बोलण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें बुंदेले यांजवर वरात होऊन आली पाहिजे. या गोष्टीनें उपयोग बहुत पडेल व आख-बारेवरून पेशजी हिंदुस्थानास व बादशाहास सरकारांत आम्हांसीं नीट नाहीं हें समजलें आहे, तें दूर होऊन, एक नाद आहे, इकडे मसलत पडतांच ऐवजाची तर्तूद करून पाठविली, फौजही रवाना केली, हें सर्वांस समजोन दबतील. इंग्रज, वजीर आदिकरून हवा बिघडली आहे, यांत शिरूं पावणार नाहींत. यास्तव वारंवार सेवेसीं विनंती लिहिण्यांत आली आहे. लिहिल्याप्रमाणें आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia reports the sudden adverse turn in his situation owing to the defection of the Mughal battalions, at Lalsot and beseeches the Poona Darbar to assist him at once with men and money.*

No. 502 August 1787.

(पत्र आपाजी रामाचें)

श्री

छ विज्ञापना ऐसीजे:—फौज पाठविण्याविसीं राजश्री पाटिलबावा वरचेवर सरकारांत लिहितात व आम्हांसीं बोलतात त्याप्रमाणें विनवितों. सारांश, सर-

---

* एकनिश्चयी, करारी.

दाराच्या तोंडावाटें विशेष घाबरून शद्व निघणें मरणप्राय. या अर्थी कुमकेची जलदी करावी इतकेंच म्हणतात. परंतु पाहातां अर्थी मसलत बहुत पेंचाची दिसते. लवकर सरकारची फौज यावी. भारी सरंजाम आल्याखेरीज परिणाम लागतां दिसत नाहीं. तूर्त रावराजानें आश्रय दिल्हा म्हणून मासपक्ष दिवस निघाले. नाहीं तर आजपावेतों गुंता उरकला असता. चमेल भरली, चहूंकडून शत्रची दाटी, जावें कोणीकडे, असें संकट प्राप्त होतें. रावराजानें आश्रय निखालस दिल्यामुळें बचाव जाला. पुढें सरकारांतून फौज वगैरे उपराळा होण्याविसीं चातकन्यायें मार्ग लक्षितात. एक वेळ असेही शद्व निघाले कीं, आमचे शिंद्यांचे वंशांत सारे पुरुष सरकारचाकरीवरच मेले. आम्हांस लहानथोर सारे म्हणतात, चार दिवस मसलतीस टाळा देऊन ग्वालेरीस जावें. त्यास शत्रूस समरांगणीं टाळा देऊन पळून जाऊन वांचावें, त्यापरीस मरणें काय वाईट ? वांचन पुढें तरी काय करावयाचें आहे ? पुढें मागें आशा असावी तोही अर्थ समजलाच आहे. त्याचीही क्षीत नाहीं. ये समयीं मजवर संकट, त्यापक्षीं सरकारांतून उपराळा करितील. उपेक्षा करावयाचे नाहींत. याप्रमाणें बोललेत. त्यास ये समयीं उपराळा फौजेचा वगैरे जाहल्यानेंच परिणाम लागून सरदारी व सरदार कायम राहतील. नाहीं तर दिवसगत लागल्यानें बचाव होतां दिसत नाहीं, व हेही येथून निघोन तिकडे येतील असें दिसत नाहीं. मोठा भरंवसा ये समयीं स्वामींचा मात्र त्यांचे अंतःकरणीं आहे. समक्षापरोक्ष बोलण्यांत हेंच निघतें. असलेले प्रकार विनविले आहेत. ये समयीं यांचा पुस्तपन्हा केल्यानें सरकारउपयोग व भाऊपण्याची शर्त होऊन लौकिक स्वामींचा होईल. सरदारावर ये समयीं महत् संकट आहे. हिंदुस्थानी फौज चहूंकडून लाख जमा आहे. त्यांत दक्षणी माणूस दाहा हजार पावेतों मध्यें सांपडलें आहे. येथें गजेंद्राप्रमाणें दिवस प्राप्त आहे. सर्वांच्या दृष्टी स्वामींकडील उपराळ्यावर लागल्या आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. उदेपुरवाल्याचे व बिजेसिंगाचे विचारें माळव्यांत उज्जैनपावेतों दुही करावी, असा बेत ठरून मेवाड प्रांतीं पंचमहालांत उपद्रव सुरू करून एक दोन ठाणीं घेतल्याचें वर्तमान आलें. आगऱ्याकडील चिमणाजीपंताचा पुतण्या धरून नेला. ऐसी चहूंकडून दाटी केली आहे. श्रत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana how very essential it was for the Poona Darbar to support Mahadji in his present hour of extreme danger caused by the treachery of the Mughal regiments.*

No. 503 August 1787.

श्री

छ विज्ञापना ऐसीजः—छ १२ शवाल* शनवारचे दिवशीं लढाई राजश्री पाटिलबावा यांच्या फौजेची व जैपूर मारवाडकर हमदानी यांची लढाई जाली. खासा पाटिलबावा लढाई चढून भाईच्या मुक्कामापुढें जाऊन उभे राहिले. तिकडून तेही खासा चढून आले. ते दिवशीं राजश्री शिवाजीपंत वापू यांच्या फौजेनें वगैरे, पाटिलबावांकडील सरदारांनीं मिळोन, राठोड पुढें वाढून आले होते ते शिकस्त करून, मोडून माघारा घातले. चार पांचशें राठोड लढाईत ठार पडले. चार पांच सरदार त्यांजकडील ठार जाहाले. पांच सातशें जखमी होऊन ते माघारा निघाले. वापूकडील फौज वगैरे पाटिलबावांकडील फौज एक कोसपावेतों पाठीमागें लागून मारीत गेले. राठोडांचा मोड जाहाला. तेव्हां महमदबेग हमदानी राजाचे डावे बाजूस उभा होता, तो राठोडांचे कुमकेस तेथून निघाला. त्यास वाटेंत अकस्मात् तोफेचा गोळा लागून मृत्यु पावला. पुढें तेही कोणी आले नाहींत. इकडील फौजांनीं चालून जावें तेंही जालें नाहीं. पर्जन्य आला व पुढें खळचा, नाला, संध्याकाळचा समय जाणून परस्परें आपले जागां उभे राहून अस्तमानपावेतों तोफांची मारगिरी परस्परें जाहाली. भाई उभे होते त्यांजवर दोन तीन तोफा जैपूरकरांनीं थोरल्या लागू केल्या होत्या. गोळेही बहुत आले. शेंपन्नास घोडीं, माणसें मेलीं, जखमी जालीं, परंतु भाई ठिकाणावरून हालले नाहींत. तोफेच्या गोळ्यानें भाईचे तरवारेच्या कबजाची वाटी उडाली, आणि तोच गोळा शिकारबंदाजवळ मोतदार उभा होता त्यास लागला. ईश्वरें भाईस कुशल केलें. इतकेंही जालें परंतु भाई ठिकाण सोडून अलीकडे पलीकडे जाहले नाहींत. प्रातःकाळचे प्रहर दिवसापासोन तें दोन घटका अवशीचे रात्रपावेतों तोफा परस्परें चालत होत्या. उपरांतिक तेही सरून चवकी ठेऊन आपले गोटांत गेले. हे ी चवकी ठऊन गोटांत आले. परंतु सरसी तें दिवशीं आपले इकडील चांगली जाहाली. राठोड मोडून घातले. हमदानी मेला. पुढें एक लढाई आणखी चांगली घ्यावी ही उमेद इकडील लोकांची, परंतु आंतून त्यांनीं फौजेंत फितुर केला हें समजलें नवतें. पलटणें व मोगले यांजकडे संधानें करून खासा पाटिलबावांस व भाई आदिकरून सरदारांस दगा करावा, लढाईत घालवावें; हें न साधल्यास, लढाईचे वेळेस आम्ही चालून घेऊं, ते वेळेस तोफांची मारगिरी चुकवून आम्हो त्यांचे

* २८ जुलै १७८७.

फौजेंत शिरलों म्हणजे आम्हांस शरीख* होऊन दक्षण्यांची लढाई मारावी, अशा तऱ्हेनें त्यांचीं संधानें सिद्ध जालीं होतीं. शनवारचेच लढाईंत त्यांनीं संधान करून घालवावें असें होतें. परंतु राठोड मोडून घातले. हमदानी मेला. बाजू इकडील सेर† पाहिली म्हणून तोफांची मारगिरी करूं लागले. तेही तोफांचे मोहरे‡ जमीदोज धरून गोळा जाई तो कोणीं त्यांचे गोळ्यापावेतों पोहोंचे, कोणी न पोहोंचे. गोळे हजारों चालतात, अद्याप राजांकडील फौज उभी आहे, तेथून हलत नाहीं, तेव्हां गोळे जातात कोणीकडे हा भाईस संदेह येऊन बातमीदार पाठविले. ते येऊन सांगूं लागले, गोळा तेथपावेतों जात नाहीं. तेव्हां गोलंदाजांस पुसूं लागले गोळा तेथवर कां जात नाहीं? ते म्हणूं लागले, तोफा धाकट्या, गोळा तेथवर पोहचत नाहीं. तेव्हां बिडी थोरल्या दोन तोफा नेऊन तेथें लाविल्या. त्यांचाच गोळा हमदानीस लागून ठार जाल्याची बातमी आली. पुढें गोळे जाऊन राजांचे फौजेंतील पांच सातशें घोडीं, माणसें मेलीं. जखमी जालीं. हें शनवारचें लढाईचें वर्तमान. उपरांतिक दुसरे दिवशीं, छ १३ शवाल आदितवारचे दिवशीं, भाई वगैरे फौजा चढून, लढाईचे जाग्यापुढें वाढून जाऊन, दोन चार गोळे तोफांचे मारले. ते कोणी बाहेर आले नाहींत. तिसरा प्रहरपावेतों उभें राहून अस्तमानी गोटांत आले. बावा तेथेंच भाईजवळ मुक्काम करून राहिले होते. त्याजवर छ १४ शवाल सोमवारचे दिवशीं सारे पलटणांनीं तलब आमची साता आठां महिन्यांची चुकून द्या, म्हणून बोलणें तटाचें घालून मलई¶ केली. सात हजार माणूस एके जागां जाहलें. वरकड आपलाले जागां बइदा† करून बसले. तेव्हां बावांनीं बहुता प्रकारच्या तोडीजोडी त्यांसीं मध्यस्थाकडून बोलविल्या. शेवटीं सौ० बायांवरील वस्ता ठेऊन तुम्हांस तीन रोजमरेयांचा ऐवज देऊं; वरकड हिसेब लढाईआखर जाल्यानंतर चुकून देऊं, असेंहि बोलले. कांहीं नख्तही द्यावयास लागले. त्यांत वरकड पलटणांनीं थोडा बहुत नख्त ऐवज घेऊन तोड पाडली. सात हजार माणसांची मलई एके जागां जाली होती ते कोणताही जाबसाल ऐकेनात. लढाईचे वेळेस व आधीं त्या पलटणांचे निसबतीस मिळोन सवाशें तोफा त्यांच्या जिमेस दारू गोळा छरे सुद्धां होत्या. त्याच तोफांचीं तोंडें यांजवर फिरवून, तलब चुकून द्या, नाहीं तर तोफा आम्ही घेऊन जाऊं. यांनीं बहुत

* मदतनीस. † वरचढ. ‡ मोहरे जमीदोज धरून = तोफांचा रोख खालीं धरून. ¶ दंगा. †बैदा = तंटा, भांडण.

सांगितलें, परंतु न ऐकतां छ १५ शवालचे दिवशीं तिसरा प्रहरां कूच करून सवाशें तोफा, दारूगोळे, गाडीवान, गोलंदाज सुद्धां घेऊन चालले. तेव्हां बावांनीं शिवाजीपंत बापू व रावराजा आदिकरून तमाम सरदार बोलावून सल्हा पुसली. आपल्या तोफा व सात हजार बंदूक घेऊन चालले, पुढें याचें कसें करावें ? कंपूनें कूच केलें त्यापूर्वी त्यांनीं जैपूरकरांकडे सूचना करून, त्यांची फौज चार पांच हजार चवकी पुढें येऊन उभी राहिली. मागून गोटांत तमाम फौजेची तयारी जाली. याप्रमाणें बातम्या पै दरपै येऊन पोंचल्या. तेव्हां सर्वांचे विचारें ठरलें जे, लष्करांत फितूर जाला. न कळे हिंदुस्थानी कोण कोण फितुरांत मिळाले आहेत ? साऱ्याच पलटणांनीं तलबेचा बइदा केला होता. परंतु वरकड राहिले. तोंच कंपू सात हजार माणूस कूच करून चाललें. वरकड लष्करांत पलटणें व मोगले वगैरे हिंदुस्थानी येथें आहेत, यांचा विश्वास काय ? ये समयीं लढाई घेणें सलाह नाहीं. लष्करांत एकच गर्दी होऊन आपले, पारखे, कोणाचा विश्वास कोणास न येतां पाणिपत होईल. कंपू तोफा घेऊन जातो. जाऊं द्यावा. या वेळेस त्यासीं लढाई घेऊं नये, याप्रमाणें समस्तांनीं बावांसीं बोलून, तेथेंच बसले आहेत तों कंपू कूच करून दीड कोस इकडून गेला. तिकडून राजाची फौज पुढें येऊन तोफा व कंपूस घेऊन, त्यांची चवकी उभी राहात होती तेथें त्यांस उतरविलें. त्याजवर अस्तमान जाला. तितकियांत बातमी आली जे, कंपू दाखल जाहल्याचें वर्तमान राजास जाऊन पोंहचलें. त्यावरून राठोड सुद्धां त्यांच्या फौजा तमाम तयार होऊन लढाईचे इराद्यानें येतात. दुसरी बातमी आली जे, दवलतराम, पहाडसिंग फौजा घेऊन पुढें आले. राजा अद्यापि आला नाहीं. तेव्हां येथेंही जिनबंदी होऊन चार शेरांची धारण, शिलेदारांस उपास, परंतु तसे भाईसमागमें तमाम सरदार फौज सुद्धां लढाईचे जाग्यावर जाऊन उभे राहिले. मागाहून बावांनींही सिद्धता केली. पुढें चार पांच घटका रात्र गेल्यानंतर कंपूनें एक शिलक तोफांची केली. तेव्हां सर्वांस समजलें, आतां ते चालून येतात. कोणी तर्क केले कंपू त्याकडे गेला, त्याणें सलामी तोफांची सिलक केली. त्यावर बातमीही या अन्वयेंच आली. परंतु फौजा राठोड सुद्धां तमाम उभे आहेत. तेव्हां बावांनींही आपलें चिलखत आणविलें, आणि निश्चय केला जे, ते तिकडून पुढें वाढून आले म्हणजे इकडून आपण चालून जावें. ईश्वरानें नेमिलें असेल तें होईल. त्याजवर बातमी आली जे, त्यांच्या फौजा माघारा गेल्या. तोफखान्याजवळ चवकी हजार पांचशें स्वार आहेत. तेव्हां यांनींही चवकी ठेऊन भाई गोटांत बावांजवळ आले. त्याउपरांतिक प्रहर

साहा घटिकांनीं शिवाजीपंतबापू पाटिलबावांजवळ येऊन, बावा व भाई यांस एकांतीं घेऊन बसून बोलले, "समय पाणिपतासारखा प्राप्त जाला. आज रात्रीस ते चालून येते म्हणजे मरणें प्राप्त! उद्यां प्रातःकाळीं कछवे राठोड तमाम त्यांच्या फौजा चालून येणार. आपलीं पलटणें, तोफा त्यांजकडे गेल्यानें त्यांस हुशारी येऊन ते हांवभरी* जाहले. आपले फौजेची हुशारी मंदावली. फौजेंत पलटणें व मोगले, रांगडे, हिंदुस्थानी आहेत, त्यांचा विश्वास नाहीं. परिछिन्न ते लढाईचे समयीं घालवितील. अजून परीक्षा पाहण्याची बाकी राहिली नाहीं. दक्षिणी फौज किती आहे ती आपली आपले ध्यानांत आहे. चार शेरांची धारण! बाहेरून रसद येत नाहीं. शिलेदार उपासानें मेले! घोडीं मेलीं! राहिलीं त्यांत सामर्थ्य नाहीं! वैरणीचा काळ! लढाई कशाचे बळावर घेणार? ये वेळेस चार दिवस येथून निघावें. मसलतीस टाळा द्यावा. पुढें पाहून घेऊं. याप्रमाणें चांगले रीतीनें समयोचित बोलून, कूच करावयाचा निश्चय ठरावून, मागील प्रहर रात्र राहातां सडचा फौजा तोंडावर ठेऊन, बावा व आपण मागें राहून, बुणग्यांचें †कूच माघारा करविलें. थोरले बुणगे, चार पांच कोस मागें लालसोटानजीक होते तेथें सांडणीस्वार पाठवून त्यांचेंही कूच करविलें. तितकियांत मागील घटका रात्र राहातां सडचा फौजेचेही बुणगे थोरल्या बुणग्यांत येऊन सामील जाहले. लोक आपापले लादायाचे गडबडींत. त्या संधींत बुणग्यांत तोफा होत्या त्यांतील एक संदूख‡ दारूचा कोणे पलटणच्या प्याद्यानें बत्ती लावून उडविला. त्याचा प्रकाश व बार थोरल्या तोफांप्रमाणें कडाखा होऊन जवळ दारू आणखी होती तेही उडाली. बाणाच्या गाडचा तेथें होत्या, त्यांस मात्र बत्ती जाऊन पोंचली नाहीं. संधान करणारानें कसूर केला नाहीं. परंतु ईश्वरें मोठें कुशल केलें. बाणांस बत्ती जाऊन पोंचती म्हणजे लष्कर ते दिवशींच बुडालें होतें. संदूख उडाला त्यावरून तमाम बुणग्यांतील लोकांस वाटलें जे, येथें पलटणें होतीं त्यांणीं तोफा लष्करावर फिरविल्या. आधींच समय पळणेचा, त्यांत हें साहित्य जाहाल्यानें वसवास खाऊन धडका केला. पळूं लागले. वस्तभाव लादालाद ज्यांची जाली होती ते घेऊन निघाले. ज्यांची राहिली त्यांनीं कार्याकारण घेऊन वरकड तसेच टाकून पळाले. फार करून बाजारकऱ्यांचा दाणादुणा, कापड, कोणाची राहुटी, कोणाचीं पालें, खाशा पाटिलबावांच्या मुदपाखाचीं भांडीं, फरासखान्यांतील ओझीं स्वाऱ्यांची वगैरे तळावर तशींच राहून, लोक जीव घेऊन

*युद्धोत्सुक. †Followers and baggage of an army. ‡पेटी.

पळतात, तशासारखे पळूं लागले. कित्येक तळावर आहेतच, तों अफरासियाब-खानाचा बाजार लष्करचे सोद्यांनीं व पेंढारी यांनीं लुटला. बिना लढाई एकच गर्दी चहूंकडून विलग तन्हेची होऊन बुणगे तेथून निघाले. त्याजवर पाठीमागून चौ साहा घटकांनीं पाटिलबावा तळावर आले. पाहातात तों पळाल्याप्रों अवस्था दिसली. तेव्हां तेथें उभे राहून खाशा मुदपाखाचीं भांडीं व फरासखान्याचीं ओझीं, सांडण्या सुतरनालाचे उंटावर घालून लोकांस सांगितलें, तळावरील तुमचे उपयोगी असेल तें घ्या. वरकड जमा करून फुंकून द्या. अफरासियाब-खानाची स्त्री व मूल तळावरच राहिले होते. ओझीं त्यांचीं नित्य भाड्याचे उंटावर चालत. ते दिवशीं उंट मिळाले नाहींत, तेव्हां बावांनीं हत्तीवर त्यांचीं ओझीं लादून त्यांस मार्गस्त करून, आपण चार घटका तळावर बसून तळास आग देविली. ते दिवशीं पिंपळाईस येऊन तिसरा प्रहरीं मुक्काम जाहला. बुणग्यांस बारा कोसांची मजल पडली. सडचा स्वारीचे लोकांस सोळा सत्रा कोसांची मजल जाहली. अस्तमानीं बावा बुणग्यांत आले. पाठीमागून चारसहा घटका रात्रीस भाई वगैरे फौजा तोफखाना सांभाळून घेऊन गोटांत आले. दयाराम पुरब्याचीं दोन पलटणें अडून उभीं राहिलीं होतीं. तलब आमची द्या, नाहीं तर आम्हीं येत नाहीं. सरकारच्या दहापंधरा तोफा त्यांचे निसबतीस. बावांनीं बहुता प्रकारें सांगितलें. न ऐकत. पाठीमागून भाई आले. त्यांनीं बावांस पुढें बिदा केले आणि सांगितलें जे, यांसीं बोलून पाहातों. आले तर उत्तम, नाहीं तर हीं दोन्हीं पलटणें कापून काढून तोफा आपल्या घेऊन येतों. आपण पुढें जावें. त्यावरून बावा पुढें आले. भाई तेथें उभे राहून पलटणांसीं सख्त रीतीनें बोलून, तोफा पलटणें लष्करांत घेऊन आले. दुसरे दिवशीं त्याच अन्वयें बुणगे पुढें घालून आपण पाठीमागें राहून आठा कोसांवर येऊन मुक्काम केला. खुशालगडांत एक दोन तोफा व फरासखाना वगैरे होतें, तें तेथील तेथेंच राहिलें. आणायास बनलें नाहीं. कमाविसदार जीव घेऊन पळून आला. रांगड्यांनीं ठाणें आटोपलें. पाठीमागून हमदानीचा पुतण्या व पहाडसिंग, दवलतराम हलद्या, पंधरा हजार फौजेनसीं पाठलाग करावयास येतात. बातमी आली. त्यावरून नित्य खासा बावा व भाई वगैरे सरदार पाठीमागें फौज सुद्धां राहून बुणगे पुढें घालून, मजल दरमजल मोठ्यामोठ्या मजली करीत, या अन्वयें डिगेपावेतों आले. रांग-ड्यांची फौज पिंपळाईपावेतों आली होती. तेथून माघारा परतून गेले. नित्य लष्करांत अवया पडत, आतां स्वस्थ आहे. परंतु लष्करानें अवाई खादली आहे.

पुढें पहावें. येथून पुढें फितुराची चवकशी व फितुरी यांचे पारपत्याचा विचार होणें तो होईल. नौबतरायचे जिमेस तोफखाना पलटणें होतीं. इतका फितुर केवळ एका दोहों रोजांत जाहला नाहीं. दोनचार महिने संधान चाललें आहे हें आतां समजण्यांत आलें. रात्रंदिवस नौबतराय तेथें असतां, त्यास न समजतां जाहालें, किंवा तोही यांत आहे कळे काय ? परंतु याचा संदेह बावांच्या अंतःकरणीं आला. वरकडीस तो परिछिन्न आहेच. चवकसी होते. बाहेरून त्याजवर चवकी स्वारांची आहे. पुढें काय निवडेल तें पहावें. परंतु याउपर फितुरियांचीं पारिपत्यें होतील. बावांनीं कुटुंबें वगैरे कुल कारखाने, बुणगे, ग्वालेरीस रवाना करून सडे होऊन आहेत. प्रसंगीचें सविस्तर वृत्त निवेदन व्हावें यदर्थीं तपसिलेंकडून विनविलें आहे. नौबतराय याजकडे तोफखाना पलटणें बक्षीगिरी सांगितली. अलीकडे त्याजवर येरुत्यार पाटिलबावांनीं बराच दिल्हा आहे. परंतु हिंदुस्थानी माणूस आर्जवी फार. तऱ्हेतऱ्हेनें आर्जवून कामकाज करून दाखवून मेळवून घ्यावें, समयास बनेल तशी वर्तणूक करावी, अशी चाल आहे. याकरितां पाटिलबावांनीं बहुत सावधपणें वर्तत जावें म्हणून स्वामींनीं पूर्वी लिहिलें होतें, व बाळाजीपंत जामगांवकर यांजवळ बोलणें जाहाल्यावरून त्यांनींही याअन्वये येथें लिहून पाठविलें. आम्ही स्वामींची बजिन्नस चिठी पाटिलबावांस एकांतीं वाचून दाखवून मजकूर बोललों. ते समयीं म्हणूं लागले, येविसींचा बंदोबस्त आहे, काळजी न करावी. निदान स्वामींच्या लिहिल्याअन्वयेंच प्रत्ययास आलें. आतां स्मरतात ! हिंदुस्थानी यांनीं दवलतच गारद केली होती. पाणपत होण्यांत बाकी नवती. परंतु श्रीमंतांचे पुण्येंकरून व पाटिलबावांचे दैवेंकरून वचाव जाहला. ही गोष्ट थोरली जाहाली. सांप्रत बावाही आपले जागां खिन्न आहेत. श्रीमंतांनीं लिहिलें व घरच्या मंडळीनेंही सांगितलें, परंतु होणारा सारखी बुद्धि जाली. हिंदुस्थानी यांचे विश्वासावर गेलों, त्याचें फल पावलों, असें म्हणत असतात. होणारास कोणाचा उपाय नाहीं. वाईट व्हावें याकरितां त्यांणीं संग्रह केला नवता. परंतु हिंदुस्थानी वेइमान, वेळेस त्यांणीं घालविलें, हें आतां प्रत्ययास आलें. पुढें दौलतीचा वगैरे बंदोबस्त कसा करितात तो जाहल्यावर मागाहून लिहून पाठवूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram gives graphic details of the engagement of Lalsot and of the subsequent desertion of the Hindustani battalions. Mahadji found his position untenable in face of the defection of the artillery and infantry, and ordered an immediate retreat in the direction of Gwalior.*

No. 504 22nd September 1787.

पैवस्ती छ १५ मोहोरम समान.

पत्र बाळाजीपंतांनीं आणून दिल्हें.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—इकडील वर्तमान डिगेनजीक येऊन तेथून कुटुंबें वगैरे अटाळा चंमेलपार ग्वाल्हेरीस रवाना करून, सडे होऊन, तेथून कूच करून अलवरे-नजीक रावराजाचे मुलुखांत आलों. येथून जयपूरवाल्याचे मुलुखांत फौज पाठविली. त्यावरून राठोड व जयपूरवाले यांसीं हिसका बसला. विचारांत पडले आहेत. हें पूर्वी पांच सात पत्रीं लिहिलें होतें. तीं पत्रें पावोन सविस्तर कळलेंच असेल. राठोड व जयपूरवाले यांणीं जयपूरचे सुमारें कूच करून चार पांच मजली माघारें आले. इस्माइलबेग, हमदानीचा पुतण्या, यासमागमें तीन पलटणें, साठ तोफा व फौजा देऊन आग्र्यास रांगडयांनीं रवाना केला. तो दरकूच तिकडे चालला. त्याचे मागें राजश्री रायाजी पाटील यांसी फौज सुद्धां रवाना केलें. मशारनिल्हेनीं लगट केला. परंतु त्यांजपासीं जंगी सरंजाम भारी, यामुळें गट बांधोन तोफांची मारगिरी करीत आग्र्यानजीक गेला. तेथें किल्लचाचे रख-वालीस एक पलटण फरासीसांचें कदीम होतें तें व किल्लेदार आपले जमीयती-निसीं इस्माईल याचे मुकाबल्यास आले. पिछाडीस रायाजी पाटील होते. चहूंकडून घेरून जकड बसविली. इस्माईलबेग चालोन गेला असतां, तीन वेळ लढाई करून माघारा फिरविला. दोन तीनशें माणूस त्याचें मारिलें. दोन कोस हटवून माघारा घातला. तीन शेर धारण त्यास जहाली. एका दों दिवसांत पारपत्य करावें असें होतें. परंतु किल्याचे रखवालीस इकडील पलटण मुसा लुस्तुनो* फरासीस याचें होतें. तो कदीम देशीं होता ते समयीं चाकर ठेवून वाढविला असतां, फितुरांत मिळोन समयास इस्माईलबेग यासीं मिळोन आपले फौजेवर छन्याचे गोळे मारले आणि इस्माईलबेग यासीं शहरांत घेतला. शहरांतही मोगले वगैरे रहाणार होते, त्यांस सामील जहाले. यामुळें फिरोन मसलत लांबणी-वर पडली. यांचें पारपत्य जहालें असतें तरी थोडक्यांत बंदोबस्त होता. सांप्रत हवा सर्वांची बदलली. याचें पारपत्य देशाहून फौज आली म्हणजे लौकर होऊन

* Monsr. Lesteneaux.

पूर्ववत् बंदोबस्त होईल. येविसीं राजश्री कृष्णराव महादेव यांसीं बोलण्यांत आलें आहे. सविस्तर लिहितील. रवाना छ ९ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reports to Nana his movementsand those of the enemy after his retreat from Lalsot. The investment of Agra and defection in the ranks of the defending force are also communicated.*

No. 505 5th October 1787.

चंद्र २६ मोहरम समान समानीन.
गोविंदपंत यांनीं खुलें आणून दिल्हें.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण छ २४ जिल्कादचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. ऐसियास, येथें मसलत पडली, या समयीं फौजेचा व खर्चाचा उपराळा व्हावा येविसीं आपल्यास वारंवार लिहिण्यांत आलें. त्यास पत्र पावतांच आपण निकडीचा प्रकार जाणोन फौजेची तर्तूद करून अलीबहादर यांची रवानगी केली, व पांच लाखपर्यंत ऐवजाची तर्तूद करून राजश्री बाळाजी जनार्दन यांजकडे जांबगांवास प्रविष्ट करावयाचें केलें, त्याप्रमाणें मशारनिल्हेकडे ऐवज पावलाच असेल. मशारनिल्हे इकडे रवानगी करतील. ऐवजाची मोठी वोढ. मसलत एक प्रकारची. या प्रसंगीं आपण सरकारांत वोढ असतां मदत केली. या उपरी इकडील मसलतीची चिंता नाहीं. श्रीमंतांचे प्रतापें रजपूत वगैरेनीं बदमामली केली यांचीं पारपत्यें होऊन पूर्ववत् बंदोबस्त होईल. सरकारांत कर्नाटकाचे स्वारीमुळें वोढ हें येथेंही समजल्यांत होतें, परंतु मसलत फितुरामुळें कुपेचीं* पडली. पैशास ठिकाण नाहीं. कोणेही प्रकारें कोठें हात न चाले. निरुपाय जाणोन आपणांस लिहिणें प्राप्त जालें. जोंपर्यंत चालेल तोंपर्यंत जसें कळेल तसें करून चालविणेंच होतें. असो. पुढेंही इकडील बंद यथास्थित बसून सुरळीत जाहलें म्हणजे, व लागण मुलकाची जाहली म्हणजे, इकडील फौजांचा खर्च पुरा पडून सरकारांतही किफायत व्हावी असें आहे. चिंता

---

* अवघड, वाईट पेंचाची.

नाहीं. श्रीमंतांचे प्रतापें सर्व गोष्टी यथास्थित घडतील. फौजेस ताकीद होऊन जलद रवानगी व्हावी. रवाना चंद्र २२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji expresses his gratitude for the timely help that was being sent to him from Poona under the command of Ali Bahadur.*

No. 506 5th October 1787.

पैवस्ती चंद्र २६ मोहरम समान समानीन.
गोविंदपंत यांनीं खुलें आणून दिल्हें.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—इकडील वर्तमान वरचेवर लिहिलेंच आहे. सांप्रत गोहद ग्वालेर प्रांतीं भदावरवाले वगैरे रांगडयांनीं भीड जमा करून दुंदी* केली. फौजा झाडून जयपूरचे मुलकांत व आगऱ्यानजीक हमदानीचे पुतण्याचे मुकाबल्यांत आहेत. पलीकडील बंदोबस्ताकरितां राजश्री खंडेराव हरि यांची रवानगी केली आहे. परंतु पारचे रांगडे यांनीं जागजागांच जमीयत करून दुंदी केली. तेव्हां सर्वांचीं पारपत्यें करावयासी पोख्त सरंजाम पाहिजे. याजकरितां राजश्री बाळाजी गोविंद बुंदेले व रघुनाथराव हरि झांसीवाले यांसीं सरंजाम सुद्धां सत्वर येऊन अटेरवाले, भदोरे वगैरे यांचीं पारपत्यें करण्याविसीं पत्रें गेलीं आहेत. परंतु त्यांचें येणें अद्याप होत नाहीं. त्यास, येविसीं उभयतांस निक्षून पत्रें व हुजरे सरकारचे येऊन खंडेराव हरि व उभयतां मिळोन पारचा बंदोबस्त करीत तें जालें पाहिजे. तिकडे काम काज पडल्यास पत्रें येतील त्याप्रमाणें जलद जाऊन सामील होत जाणें, इकडील पत्राचा आक्षेप न करणें, असें निक्षून लिहिण्यांत यावें. रवाना चंद्र २२ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji requests Nana to send stern instructions to the Peshwa's Kamavisdars in the north to support his struggle against the Rajputs and other chieftains who had risen in rebellion against his authority.*

---

* दंगा.

No. 507 6th October 1787.

श्री

राजश्री गोविंदराव गोसावी यांसीं:—

छ दंडवत सु।। समान समानेन मया व आलफ. तुम्हीं छ २६ जिल्कादचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बाळाजीपंतनाना यांणीं तुम्हांसीं बोलण्यांत आणिलें त्याचा मजकूर लिहिला तो सविस्तर विदित जाहला. ऐसियास, आम्ही भरोशानें लिहीत गेलों त्याप्रमाणें फौजेची व खर्चाची तरतूद होऊन आली. उत्तम आहे. खर्चाचे तरतुदीचे लिहिल्याप्रमाणें जामगांवीं राा बाळाजी जनार्दन यांजकडे पावते जाहलेच असेल. फौजेची तरतूद जहालीच आहे. त्यास हल्लींही येथून राा नानांस पत्र लिहिलें आहे. त्यांस देऊन आणखी फौजेस ताकीद करवून फौजेची जलद रवानगी होय तें करणें. जाणिजे. छ २३ जिल्हेज. हे विनंती.

¶*Mahadji requests Govindrao to expedite the dispatch of reinforcements that were being sent from Poona.*

No. 508 27th October 1787.

पैवस्ती चंद्र १९ सफर. मशारनिल्हेकडील
गोविंदपंत यांनीं खुला कागद आणून दिला.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—फौजेचा व खर्चाचा उपराळा लवकर व्हावा म्हणजे मसलतीस आब बसून पूर्ववत् बंदोबस्त होईल म्हणोन पै दरपै पत्रें सात आठ रवानग्या आपणांकडे केल्या, त्या पावोन आपण फौजेची तर्तूद करून, अलीबहादर यांची रवानगी मुहूर्तेंकरून केली, व खर्चाकरितां राजश्री बाळाजी जनार्दन यांजकडे जामगांवीं पांच लाखपर्यंत पावते करितों म्हणून लिहिलें, तीं पत्रें पावून संतोष जाहला. सर्वांस समजलें देशींहून फौजेची रवानगी जाहली. परंतु रांगड्यांच्या बातम्या थेट पुण्यापर्यंत आहेत. त्यांचीं वर्तमानें फौज अद्याप चालली नाहीं म्हणोन येतात. त्यावरून रजपूत वगैरे सर्वांनीं एक विचार करून, फौज येऊन पोंहचली नाहीं व येण्यासही दिवसगत आहे, या संधींत चहूंकडून हुल्लड

करून चमेल पार करून द्यावें हा इरादा ठेवितात. त्यास, आम्हीही गनिमीनें घेराघेरी करून कजाखीनें रजपूत व मोगले व पलटणवाले यांचा मुकाबला करीतच आहों. आमचे पाय इकडे ठरावे असें असल्यास फौजेस जलद जलद दरमजल येऊन पोंहचे अशी ताकीद जाली पाहिजे. ऐवज बाळाजी जनार्दन यांजकड जांबगांवीं प्रविष्ट जाहला असल्यास मशारनिल्हे इकडे रवाना करितील. नसल्यास पेशजी लिहिल्याप्रमाणें दहा बारा लक्षपर्यंत ऐवज जांबगांवीं बाळाजी जनार्दन यांजकडे देवावा. येथील ओढीचा प्रकार राजश्री कृष्णराव महादेव लिहितील त्यावरून कळेल. रवाना छ १५ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks Nana to be prompt in sending him effective succour in money and men.*

No. 509 28th October 1787.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत ले १६ माहे मोहरमपर्यंत मुक्काम लष्कर नजीक किल्ले आलवर प्रांत जैपूर येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ १० जिल्हेजचें पत्र पाठविलें, तें पावोन बहुत समाधान जाहलें. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून सेवकाचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर स्वामींनीं पत्रीं लिहिलें कीं, राजश्री पाटिलबावांनीं लढाईंत निकड करून राठोड कछवे यांचें पारिपत्य केलें. मोठीच गोष्ट केली राजश्री शिवाजीपंत बापू व राणेखानभाई व रायाजी पाटील व धारराव शिंदे. व खंडेराव हरि यांणीं मेहनत चांगली केली. लढाईत चांगले चांगले माणसांचा बचाव होऊन शत्रूचा मोड जाहला. मोठीच गोष्ट जाहली. अमदानीस इकडील तोफेचा गोळा लागोन ठार जाहला. त्यास हरामखोरी करून गेला त्याचें फळ जाहलें. हरामखोरीनें परिणाम कोणाचाही लागत नाहीं. रांगडयांचा मोड होऊन नामोहरम जाहले. चांगलें जाहलें. इकडील पलटणांनीं तलबेचा दंगा दाखऊन सवाशें तोफा घेऊन त्यांजकडे गेले, ही गोष्ट पूर्वील अनुसंधानाशिवाय व्हावयाची नाहीं. प्रसंग पाहून, राजश्री शिवाजीपंत बापूनीं निघावयाची सलाह सांगितल्यावरून पाटिलबावा माघारे फिरले. उत्तम केलें. श्रीमंतांचे कृपेंकरून

पाटिलबावांचा सर्व लहान मोठ्यांचा बचाव जाहला. येणेंकरून पुढें मसलती जशा म्हटल्या तशा होतील. फौजेच्या उपराळ्याविसींचा मजकूर तर, जैपूरवाले बिघाडाच्या इराद्यानें बाहेर निघाले, ही बातमी येतांच फौज पाठवावी हा विचार केला. तों पाटिलबावांचींही पत्रें या मजकुराचीं आलीं. तेव्हां थोडे फौजेनें काम व्हावयाचें नाहीं याजकरितां राजश्री अलीबहादर यांस श्रावण वद्य द्वादशीस* मुहूर्तेंकरून बाहेर काढलें. बराबर वोढेकर वगैरे सरंजामी पथकें व इतलाख† मिळोन दहा बारा हजारांची तर्तूद केली आहे. लौकरच रवानगी होईल. आजपावेतों मसलतीवर मसलती पडत गेल्या. त्या पाटिलबावांनींच सांभाळून केल्या व पुढेंही करतील. पैक्याचे सरबरेविसींचा प्रकार तरी, सरकारांत ओढ कोणे प्रकारची याची माहितगारी तुम्हांसही आहेच, व पाटिलबावांस व वकिलास येविसींचा मजकूर सविस्तर लिहिला आहे त्याजवरून कळेल. पाटिलबावांनीं निदान भाऊपण्याची शर्त घालून लिहिलें, त्याजवरून जातीनसीं सावकारांची खातरजमा करून पांच लक्ष रुपयांची तर्तूद केली आहे. पाटिलबावांकडील राजश्री बाळाजीपंत जामगांवास आहेत त्यांजकडे पावते होतील. ऐवज सावकारांचा क्षेपनिक्षेप पावला पाहिजे. याकरतां त्यांस देशचे महाल लाऊन देऊन सनदा पाठवून द्याव्या. पातशाहा आपले हातीं. गोहोद घेतल्याचा दबाव बसून सर्वांवर दाब सहजांत बसला होता. दाबाचे पोटीं बरेंच चाललें होतें. ऐसें असतां, आपली खर्चाची ओढ व हिंदुस्थानी फौज व पलटणें यांचा भरणा फार. देशची फौज खातरजमेची थोडी. सरकारांत आधीं ओढ. त्यावर टिपूचे मसलतीनें तर फारच पेंच बसला. न करतां गत नाहीं म्हणोन केली. ही माहितगारी सर्व असतां, आपण होऊन जैपूरची मसलत उभी करून खुद्द जैपुराजवळ गेले. लढाईतही ते नामोहरम ते दिवशीं जाहले. पुढें फितुरानें दगा जाहल्यामुळें सारे हिंदुस्थानवाले यांच्या नजरा फिरल्या असतील. असो. पुढें तरी सावधगिरी असावी. येथोन फौजेची रवानगी करीत आहों. त्यास पैका पाहिजे व पाटिलबावांनीं भाऊपण्याची शर्त लेहून पत्रें पाठविलीं. येथें तों अवस्था लिहितां येत नाहीं. परंतु तर्तूद लिहिल्याप्रमाणें करून देतों. पाटिलबावांकडील वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जावें. इकडे टिपूचीही चाल ठीक दिसत नाहीं. लढाईची तर्तूद भारी करतो म्हणोन बातम्या येतात. पुढें कैसें करतो पाहावें. पातशाहास तरी पाटिलबावांनीं आपलेजवळ आणावें, हें मनसब्यास बरें दिसतें. तेही समजून

* ता. ८-९-१७८७. † सरकारचा पगार खाणारी फौज.

करणें तें करतीलच. सविस्तर कृष्णरावास लिहिलें आहे त्याजवरून कळेल, म्हणोन स्वामींनीं लिहिलें. त्यास, स्वामींचे पत्राचा मजकूर अक्षरशा वाचून नंतर राजश्री पाटिलबावांस सांगितला. तेव्हां आज्ञा केली जे, पत्रच आम्हांस वाचून दाखवावें. त्याजवरून बजिन्नस पत्र दाखविलें. नंतर मर्जी बहुत खुष जाहली. नंतर सेवकास आज्ञा केली कीं, राजश्री नानांनीं तुम्हांस मजकूर लिहिला तो ध्यानांत आला. त्यास फौजेची तर्तूद नानांनीं लौकर करून पाठवावी. याउपर लांबणीवर टाकूं नये. येथें नित्य नवा दिवस येतो. सारे हिंदुस्थानची हवा फिरली आहे. याजमुळें आपले फौजेस पुढें टिकाव होऊन राहणें कठिण आहे. याचें कारण आणखी कांहींच नाहीं. एका पैक्याच्या तर्तुदीमुळें आम्ही लाचार आहों. यास्तव श्रीमंतांस व राजश्री नानांस तपसीलवार पत्रें इकडील मसलतीचीं व ऐवजाची तर्तुदीचे व फौज पाठविण्याविसीं वारंवार पाठवितों व तुम्हांकडूनही लिहिवितों. ऐसें असतां ऐवजाची तर्तूद थोडीसी कमी जाहली. आमचे मतें सरकारांतून श्रीमंतांनीं पांचा लक्षांची तर्तूद करोन पाठवावी, आणि नानांचा व आमचा भाऊपणा त्याअर्थीं पांचा लक्षांची तर्तूद खासगत करून पाठवावी. म्हणजे दहा लक्षांत निमे ऐवजावर आम्ही फौज ठेऊन देशची आणितों, आणि निमे ऐवज येथें तूर्त खर्चावयासी या फौजेस कामास येता. ती तर गोष्ट न घडली ! पांचांची तर्तूद राजश्री नानांनीं मात्र प्रसंग जाणोन खासगत सावकारांची निशा करून, बाळाजीपंत जामगांवकर यांजकडेस ऐवजाचा भरणा पांच लक्षांचा करितों म्हणोन आम्हांस लिहिलें. त्यास अद्याप ऐवज मशारनिल्हेचे पदरीं पडला नाहीं. तरी जो ऐवज नानांनीं दिल्हा, तो तरी सत्वर बाळाजीपंताकडे यावा, म्हणजे फौजेची तर्तूद करून सत्वर इकडे रवाना होईल. सरकारांत ओढ आहे म्हणूनच राजश्री नानांस लिहिलें. त्यास त्यांणीं भाऊपण्याचे रीतीनें ऐवजाची तर्तूद व फौजेची तर्तूद केली, येणेंकरून आम्हांस संतोष जाहला. त्याचा विस्तार पत्रीं ल्याहावासा नाहीं. परंतु आणखी कैसीही अडचण सोसून, या प्रसंगीं पांचांची आणखी तर्तूद एकूण दहा लक्षांची तर्तूद जरूर करावी. येणेंकरून या मसलतीस उपयोग बहुत पडेल. वरकड आम्हीं राजश्री नानांस ऐवजाविसीं फिरोन ल्याहावें ऐसा अर्थ नव्हता, परंतु मसलतीनुरूप लिहिणें प्राप्त जाहलें. वरकड तुमचे पत्रीं सावकाराचा ऐवज क्षेपनिक्षेप पावला पाहिजे, त्यास महाल लावून घेऊन सनदा पाठवाव्या म्हणोन लिहिलें. त्यास महाल लावून द्यावे हा पक्ष बरा, किंवा महालचा ऐवज एका वर्षांचे

मुदतीनें बाळाजीपंत याणें द्यावा हा पक्ष बरा, याचा विचार करून उत्तर पाठवावें. म्हणजे त्याप्रमाणें तर्तूद करून मशारनिल्हेस त्याहावयासी येईल. याचें उत्तर तुम्हीं पत्र पाठऊन सत्वर आणवावें, म्हणजे त्याप्रमाणें करतां येईल. सरकारची फौज कुमकेस राजश्री अलीबहादर यांजबराबर वोढेकर वगैरे सरंजामी यांची रवानगी दहा बारा हजारांची होणार म्हणोन तुमचे पत्रीं लिहिलें. त्यास येविसींचा मजकूर आम्हांस नानांनीं दोन तीन रवानग्यांत लिहिला व श्रावण वद्यांत अलीबहादर यांची रवानगी करून डेरेदाखल देखील जाहले म्हणोन लिहिलें. परंतु अद्याप दीड मास होत आला, तत्रापि फौजेचें कूच होऊन दरकूच येणें घडत नाहीं; आणि येथें तरी काय विचार आहे तो तुम्ही नित्य पाहातच आहां. येविसीं दहा पांच रवानग्या आम्हीं केल्या व वकिलांस व तुम्हांसही सांगितलें कीं, फौजेची रवानगी सत्वर करावी, तरच परिणाम ठीक आहे. नाहीं तर जोंपर्यंत आमचा प्रयत्न आहे तोंपर्यंत करीतच आहों. पुढें पैकाही नाहीं व फौजही येत नाहीं, तेव्हां याउपर राहणें कठिण आहे. दरोबस्त अंतरवेदींतील अंमल आपला झाडन उठला. एक रामगड मात्र राहिला आहे. यमुनेअलीकडेही आपला अंमल उठला. आगऱ्याचे किल्यास इस्माईलबेग अमदानीचा पुतण्या याणें मोर्चे दीड महिने लाविले आहेत. तेव्हां विना फौजेशिवाय अंमलही बसत नाहीं व जैपूरवाले व मारवाडी यांचेंही पारिपत्य होत नाहीं. यास्तव फौज सत्वर रवाना करावी यांतच उत्तम आहे. ऐसें उत्तर मजजवळ होऊन सदरहूअन्वयें मजकूर स्वामींस लेहून पाठवावा म्हणोन सांगितलें. त्याजवरून सेवेसीं विनंतिपत्रीं लिहलें आहे. तर पत्रार्थ ध्यानास आणोन, उत्तर तपसीलवार त्याहावयासीं आज्ञा केली पाहिजे. राजश्री तुकोजी होळकर यांचा मजकूर अलाहिदा पुरवणीपत्रीं सेवेसीं लिहिला आहे. परंतु सारें हिंदुस्थान एक जाहलें, तेव्हां थोडक्या सरंजामानें होतें तें काय ? यास्तव स्वामींनीं जो विचार होळकरांचे रवानगीवसीं लिहिला तो पक्का आहे. त्यास होळकर यांचे घरीं सर्व खेळ करणार नकारपूर्वक* आहेत. त्यांशीं पक्कें सरकारकामाचें बोलणें करून घ्यावें आणि रवानगी करणें तर सत्वर व्हावी. याउपरी फौज पाठवावयास विलंब न घडावा. येथें जो दिवस येतो तो विलक्षण येतो. यास्तव तपसीलवार विनंती सेवेसीं लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram repeats Mahadji's request for reinforcements being rushed to him in the shortest possible time.*

* नारोगणेश.

No. 510 October 1787.

(लेखक आप्पाजी राम)

छ विज्ञापना ऐसीजे:—पोहणार नर्दीत बुडतो. त्यास कांठीं उभा आहे तो म्हणतो धैर्य सोडूं नको. मी येऊन पोंहचलों. तितक्यानें तो किती हुशार होतो. तसा हा समय स्वामींनीं सरदारीचा रक्षिला. येणेंकरून प्रस्तुत किती हुशारी आहे. चंद्र २४ जिल्कादचें* पत्र आल्यापासून पाटिलबावा फार संतोष आहेत. मुत्सद्दी आदिकरून अवघ्या लष्करांत गृहस्थसमुदाय, बाजारचे वाणी देखील, स्वामींचा स्तुतिभाव वर्णितात. दक्षणेंतून श्रीमंतांनीं यांचा उपराळा केला. फौज पाठवितात, पैका पाठवितात, ह्या बातम्या शत्रूचे येथेंही गेल्या. स्वामींचीं पत्रें आल्यावरून शौरत चांगलीच पडली आहे. परंतु सरंजाम पोख्त यावा. थोड्या फौजेनें मसलत पार पडत नाहीं. सरकारच्या फौजेसमागमें सरदार अलीबहादर यांची नेमणूक जाली म्हणोन पाटिलबावांस गोविंदराव यांणीं लिहिलें होतें. ही गोष्ट त्यांचेही विचारास आली व स्वामींनींही फार दुरंदेशीचे विचारेंकरून ही योजना केली. अलीबहादूर इकडे आल्यावर त्यांचें मान महत्त्व साऱ्याच गोष्टी सरकारआज्ञेप्रमाणें घडूं लागतील. हिंदुस्थानी मोगले व रांगडे राजेरजवाडे आदिकरून यांजवरही त्यांचे नांवाची सलाबत पडेल. इतकी एकाएकी ब्राम्हण सरदाराची पडावयाची नाहीं. योजना जाहली ती फार चांगली जहाली. जयपूर मारवाडवाले यांचेही वकील पुण्यास आले आहेत. तेही फौजेच्या वगैरे बातम्या त्यांस लिहीत असतील. सरकारची फौज आल्या उपरांतिक हे भारी होतील. याकरितां ती फौज येऊन मिळाली नाहीं तों यांजवर निकड करावी असा विचार त्यांचेही घरीं होईल. यास्तव सरकारची फौज लवकर यावी. पाटिलबावा घरच्या बाहेरल्यांस साऱ्यांस लाजवितात कीं, संकटसमयीं मला कोणी कामास आलें नाहीं. एक नानांचा भाऊपणा कामास आला. उदंड जाले तरी थोर ते थोरच. याप्रमाणें भाषणें होत असतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram writes how delighted Mahadji was at the prompt help arranged by Nana and how eagerly he was watching for reinforcements reaching him from Poona.*

* ता. ७-९-१७८७.

No. 511 28th October 1787.

पैवस्ती छ ९ सफर कार्तिक.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी आपण छ १० जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावलें. आपण मसलत जी करितां तिचा आगा पिछा पाहून, तोड जोड कारस्थान चांगलें करण्यांत येतें. अलीकडे हिंदुस्थानच्या मसलतींत संस्थानचा अगदींच उच्छेद करणें, यावरून अवघ्यांस वशा* पडला आहे, व भाषणांतही येतें कीं,अवघ्यांचेंच पारपत्य करावयाचें आहे. त्या बातम्या त्यांस कळतात. यामुळें ते खट्टे होऊन विलग पडावयाच्या दिवसाची वाट पाहत असतात. त्यास, मसलतीची रीत आहे कीं, मनांत करावयाचेंही असेल तथापि तो दिवस येई तोंपर्यंत बोलून दाखवूं नये. सर्व बंदोबस्त होय तों कोणांस वहमा पडे असें दिसूं नये. हिंदुस्थानची माहितगिरी आपल्यास आहे अशी कोणास नाहीं. हिंदुस्थानी माणूस बोलून बजावून बहुत दाखवितें, त्यावरच विश्वास ठेवूं नये. उगेच सुचले प्रकार लिहिले आहेत. प्रस्तुत गलबल जाल्यामुळें पातशाहाकडेही जयपूरवाले वगैरे राजकारणें करितील. पातशाहा जाऊन एकाद्या संस्थानिकास मिळाल्यास मसलत आपल्यास जड पडेल. याकरितां पातशाहाचें येणें आपल्याजवळ जाल्यास बरें दिसतें. सर्वही विचार आपल्या ध्यानांत आहेत. प्रसंग पाहून आपण करणें तेंच करतील. येथून सुचलें तें लिहिलें आहे. लाडोजी देशमुख पातशाहाजवळ आहेत. तेथें पलटणांनीं दंगा तलबेकरितां केला म्हणून ऐकलें. यावरून तेथेंही त्यांचा फितूर असेल. याकरितां याची सावधता असावी म्हणून लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियासी, मसलत आजपर्यंत जी योजनेंत येत गेली, ती रीतीनेंच होऊन श्रीमंतांचे प्रतापें नीटच होत गेली. संस्थानिकांचा उच्छेद आग्रहपुरःसर करावा ही गोष्ट यापूर्वी विचारली असती तरी, जयपुरास सालगुदस्तां बादशाहा सुद्धां जाणें जाहलें होतें तेव्हां जयपुरास जमीयत कायम होती. मारवाडवाले अगर मोगले कोणी त्यास सामील नव्हते. दबाव देऊन मामलतीचा ठराव सुदामत करून घ्यावा इतकेंच होतें. त्याप्रमाणें त्यांनीं ठराव करून दिल्हा. त्यांचे हप्ते करून घेतले, आणि कूच करून बादशाहा सुद्धां मथुरेस आलों. पुढें कराराप्रमाणें ऐवज त्याजकडून न आला, तेव्हां फिरून येणें प्राप्त जाहलें. फिरून आल्यावरही त्यांजकडे

*धास्ती.

मातबर कराराप्रमाणें मामलतीचा फडशा तुम्हीं करून द्यावा म्हणून पाठविलें. त्याची चाल पहिली नाहीं. आंतून राठोड व आपण व मोगले वगैरे हिंदुस्तानी एक होऊन मामलतीचा पैसा न देतां लढाई घ्यावी, दुंडी करावी हाच इरादा. तेव्हां पारपत्य करणें प्राप्त; तेंही श्रीमंतांचे प्रतापें जाहलें होतें. एक फितुरानें पेंच पडला त्याचीही चिंता नाहीं. फौज आली म्हणजे रांगड्यांचें पारपत्य होऊन बंदोबस्त होईल. पातशाहाचें येणें आपले जवळ जाल्यास बरें दिसतें म्हणून लिहिलें. त्यास, बादशाहाचें लक्ष इकडे लावून ठेविलें आहे. परंतु त्यास खर्चास ऐवज दरमहाचा दरमहा दिल्हा पाहिजे. ऐवज त्यास मागील दरमहाचा देऊन पुढें दरमहाचा द्यावयाचें केलें म्हणजे आपले जवळ येण्यास गुंता पडणार नाहीं. सांप्रत एवजाचा प्रकार म्हणावा तरी दिनचर्येचें संकट पडलें आहे. तेव्हां येथून त्यास दरमहा चढले आहेत ते देऊन, पुढें दरमहाचा दरमहा देण्यास सोय कशी पडती ? याकरितां सरकारांतही वोढ हें समजलें असतां प्रसंग जरुरीचा, बादशाहा हातीं रहावा, म्हणून खर्चाचा उपराळा व्हावा याकरितां वारंवार लिहिण्यांत आलें आहे व हल्लींही अलाहिदा लिहिलें आहे. रवाना छ १६ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In this important letter Mahadji refutes the charge of drawing on himself the ruinous Rajput war. He replies, he resorted to arms in the last extremity when Jaipur refused to pay the stipulated tribute.*

No. 512 21st December 1787.

राजश्री रघुनाथराव हरि गोसावी यांसीं:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यें स्नेहा महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष:—तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. भिंडभदावर वगैरे जागा भदोरे वगैरे गव्हारांनीं दुंदी केली, त्यावरून आपले लिहिल्याप्रमाणें जमीयत गोसावी वगैरे पाठविली म्हणोन व झांसी तालुक्यांत मवासांनीं उपद्रव केल्याचा मजकर लिहिला तो सविस्तर कळला. ऐसियासी ग्वाल्हेर प्रांतांत गव्हारांनीं दुंदी केली त्यावरून तुम्हांस लिहिलें होतें. त्याजवरून तुम्हीं जमीयत बेहटेकडे पाठविली. येविसीं तुमचा भरंवसाच होता. त्याप्रमाणें तुम्हीं राा गोपाळ बापूजी यांसमागमें जमीयत देऊन पाठविलें, उत्तम केलें.

येथूनही आणखी तोफा सरंजाम राजश्री खंडेराव हरि यांणीं पाठविला आहे. हरामखोरांचें पारपत्य करून बंदोबस्त करतील. तुमची जमीयत समयास उपयोगी पडली, फार चांगलें केलें. खासा स्वारी आग्र्याकडे इस्माईल याचे पारपत्यास होती. त्यास बादशाहाही त्यांत मिळोन बादशाहजाद्याची व गुलामकादराची जमीयत सुद्धां इस्माईल याचे मदतीकरितां रवानगी केली. तिकडून आले. जैपूरवाले व मारवाडवाले यांचेंही संधान त्यांतच. सर्व हिंदुस्थानी एक जाहाले. त्यापक्षीं चार दिवस टाळा द्यावा हा विचार करून चमेल दक्षिणतीरीं स्वारी आली. येथें राहून आपला मुलूक पाठिसीं देऊन, पलीकडे सडचा फौजा पाठवून, मुलकांत जाळपोळ गनिमीनें करावी हें आहे. देशींहून फौजा आणविल्या त्याही येत आहेत. त्या येऊन पोंचत तोंपर्यंत स्वारी इकडेच राहील, आणि ग्वाल्हेर प्रांतांतील रांगड्यांनीं दुंदी केली आहे त्यांचीं पारपत्यें करून बंदोबस्त होईल. झांसी तालुक्यांत मवासांनीं उपद्रव केला म्हणोन लिोा, त्यास त्यांचेंही पारपत्य करून बंदोबस्त करण्यांत येईल, चिंता नाहीं. फौजा चमेलपार पाठवून तिकडे धामधूम करून शत्रूस पायबंद बसवावयाचा विचार आहे. तुम्हांस कळावें म्हणोन लिोा असे. रा छ १० राबिल सुा समान समानीन, मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji thanks Raghunath Hari of Jhansi for relieving Gwalior and informs him of his having fallen back upon the Chambal on account of the emperor having joined the rebels.*

No. 513 21st December 1787.

राजश्री रघुनाथराव हरि गोसावी यांसीः—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेषः—खासा स्वारी मोहिमशीर आणि ग्वाल्हेर प्रांतांत भदोरे वगैरे गव्हारांनीं दुंदी केली. त्याजवरून तुम्हांस पेशजी लिहिलें होतें. त्यावरून तुम्ही राजश्री खंडेराव हरि यांजकडे जमीयत पाठविली, ती समयास येऊन पोंहचली म्हणोन मशारनिल्हे यांनीं सांगितलें. त्यास स्वारी मोहिमशीर जाणोन तुम्ही जमीयत पाठविली ते उपयोगी पडली. हें चांगलें केलें. सरकार कामच केलें. येविसीं तुमची खातर-जमा होती. त्याप्रमाणें जमीयत सुद्धां राजश्री गोपाळ बापूजी यांस पाठविलें.

त्यांनीं बाहटेस येऊन रांगड्यांस घेरिले आहेत. तोफाही त्यांजकडे पाठविल्या आहेत. रांगडे हरामखोरांचें पारपत्य करितील. स्वारी आग्र्यास होती, इस्माल्यासीं एक दोन लढाया जाल्या. डावांत आणून त्याचें पारपत्य करावें, तोफखाना त्याजपासीं याकरितां जमल्या जागेहून बाहेर काढून पारपत्य करावें, ऐसें होतें. त्यास पातशाहानीं पातशाहाजादा व गुलामकादर रोहिला यांची रवानगी इस्माईल याचे मदतीस केली. रजपूत, मारवाडी, जैपूरवाले त्यांतच मुकाबल्यास राहिल्यानें सान्यांचा एका होऊन जमाव पडतो. याकरितां तूर्त आपला मुलूख पाठिसीं देऊन रहावें, आणि पुढें सडचा फौजा पाठवून जाळपोळ गनिमीनें करावी, म्हणजे आपले प्रांताचा बंदोबस्त राहून शत्रूसही ताण बसेल. याकरितां हा विचार ठरवितों. अतःपर सडचा फौजा चमेलपार जाऊन जाळपोळ केली जाईल. तोंपर्यंत नव्या फौजाही येऊन पोंहचतील. फौजा आल्या म्हणजे इस्माइल्या वगैरेनीं बदमामली केली आहे त्यांचीं पारपत्यें होतील. तुम्हास कळावें म्हणून लिहिलें आहे. रा छ १० शावल सुा समान समानीन मया व अल्लफ.

¶*Mahadji in this letter to Raghunath Hari explains his new strategy for harassing the enemy.*

No. 514 21st January 1788.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—आपण छ ५ सफरचें पत्र पाठविलें तें पावलें. आपण फौजेच्या रवानगीविसीं लिहिलें. त्यास, अलीबहादर बाहेर निघाले आहेत; फौजही बहुतकरून जमा जाली; इतलाख* फौज जमा होणें. त्यास सरकारांत वोढ कोणे तऱ्हेची हें लिहिलेंच आहे व आपणांसही माहीत आहे. तत्रापि तर्तूद करून फौज लौकर रवाना होईल म्हणोन वगैरे लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, आपण फौजेची तर्तूद करून अलीबहादर यांची रवानगी केली, तेव्हां दरमजल येऊन पोंहचतील. चमेलपार पांच महिने दम खाऊन राहिलों. फौजेची प्रतीक्षा केली त्या दिवसांत फौज येऊन पोंहचली असती तरी शत्रूंचीं पारपत्यें होऊन एकांत एक मिळों न पावते. पारचे मुलकांतील वसूल पदरीं पडता.

---

* पगारी.

दिवसगत लागल्यामुळें शत्रू सारे एकत्र होऊन बळवान जाहाले आहेत. आमच्यानें मेहनत होईल तेथवर करीतच आहों. एकदोन जागां शत्रूवर निकडही करून पाहिली. परंतु फौजेस सात आठ वर्षें होऊन माणूस जुनें जहालें, यामुळें लोकांकडून मेहनत चांगली होऊन शत्रूवर जरब न बसली. सर्वांचें मानस चमेलपार जाऊन नवी फौज येऊं द्यावी. त्यावरून चमलेअलीकडे येणें प्राप्त जाहालें. येविसीं सविस्तर कृष्णराव महादेव लिहितील, त्यावरून कळेल. इतःपर फौज लौकर आल्यानें श्रीमंतांचे प्रतापें हिंदुस्थानी, मोगले वगैरे जमा जहाले आहेत, यांचीं पारपत्यें होऊन बंदोबस्त होईल. रा. छ ११ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे ही विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his having fallen back upon the Chambal and waiting for reinforcements to reach him from Poona.*

No. 515 21st January 1788.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ ११ रबिलाखर मुक्काम नजीक ग्वाल्हेर पर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींनीं कृपा करून छ ५ सफरचें पत्र पाठविलें, तें उत्तम समयीं पावोन संतोष जाहला. तुम्हीं राजश्री बाळाजी जनार्दन यांचे पत्रीं सविस्तर लिहिलें तें विदित जाहलें. त्यास, अलीबहाद्दर यांजबराबर फौज देऊन रवाना केले आहेत, लौकर येऊन पोहोंचतील. वरचेवर होईल तें लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. ऐसियास, इकडे मसलत पडली यास्तव फौजेची रवानगी सत्वर व्हावी येविसीं विनंती लिहिली होती. त्यावरून स्वामींनीं कृपा करून अलीबहाद्दर यांची रवानगी केली. यावरून संतोष जाहला. पत्रें रवाना केलीं त्या समयीं रवानगी ताकिदीनें फौजेची जाहाली असती, तरी थोडक्याच दिवसांत बंदोबस्त होऊन येता. हल्लींही स्वामींचे प्रतापें शत्रूंचीं पारपत्यें होतील. फौज जलद येऊन पोहोंचे असी ताकीद करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji requests the Peshwa to expedite the dispatch of reinforcements from Poona.*

No. 516 12th March 1788.

पैवस्ती छ १४ रजब समान
समानीन चैत्र.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ माहे जमादिलाखरपर्यंत मुक्काम तुरवली प्रांत शिकरवार नजीक किल्ले पहारगड तीन कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त उदास असे. तरी असें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांचा मुक्काम तूर्त शिकरवारेंत आहे. पुढें सडचा फौजा करून चमेलपार घालाव्या, हा विचार महिना पंधरा दिवस होत आहे. परंतु अद्याप ही गोष्ट सिद्धांतांत येत नाहीं. याचें कारण काय तरी फौज देशची आहे. तिजला विना पोटास दिल्याशिवाय पार उतरत नाहीं; आणि पैक्याची तों ओढ बहुत आहे. तिचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा ! सारांश, पौष माघपर्यंत सरकारची फौज रवाना केली होती ती येऊन पोंहचली असती, तरी आजपर्यंत एखादें काम जाहलें असतें. या फौजेनें अतःपर कांहीं कामकाज घडावें ऐसा अर्थ दिसत नाहीं. हें समजोन पेशजीं अलवारचे मुक्कामीं गेलिया तागाईत फिरोन चमेल उतरोन, मार्गशीर्ष मासीं ग्वालेर प्रांतीं आलों. तोंपावेतों या मजकुराचीं पत्रें पांच सात रवानग्यांत पाठविलीं, त्यांचे जाबही स्वामींचे आले कीं, फौज लौकरच रवाना होते. आणि फौज तर हा कालपर्यंत येत नाहीं ! याजमुळें राजश्री पाटिलबावा आम्हांस व वकिलास दोहों चोहों दिवशीं पुसत असतात कीं, अद्याप फौज येत नाहीं, तेव्हां पुढें विचार काय करावा ? फौज पाठवावयाची नव्हती तर, आम्ही लालसोटाहून माघारे डिगेस आलों, तेव्हां इकडील मजकूर तपसीलवार जैपूरवाल्याचे लढाईचा वगैरे हिंदुस्थानचे हवेचा लिहिला, त्याचीं उत्तरें खातरजमेचीं येत गेलीं; व रोकडही ऐवज राजश्री बाळाजीपंत जामगांवकर यांजकडे प्रविष्ट केला; आणि फौज तर अद्याप येत नाहीं. याचा विचार काय ? ही गोष्ट प्रथमच आम्हांस समजली असती, तरी ज्या तऱ्हेनें कळेल तैसाच विचार करून, आपली ठाकुरकी राखोन चमेल उतरोन अलीकडे येतों. आतां सर्व प्रकारें अब्रूही गेली आणि सरकारनक्षही गेला ! तेव्हां या फौजेस पैका देऊन फल नाहीं;

आणि पैकाही हाताखालीं नाहीं. त्यामुळें नित्यशा लोकांच्या देण्याघेण्याचा घोळ पडोन कांहींच काम घडोन येत नाहीं. ऐसीं बहुत प्रकारचीं भाषणें वारंवार होत असतात. ह्या गोष्टी उग्याच ते म्हणतात म्हणोन आम्ही सेवेसीं लिहितों ऐसा अर्थ नाहीं. हे पर्याय मसलतीचे सर्व स्वामींसही विदित आहेत. सारांश गोष्ट कीं, या समयीं सरकारांतून उपराळा होणें तो सत्वर घडावा. खासगत फौज देशची जामगांवींहून आणविली, ती उज्जनीस आल्यानंतर परभारें मेवाड प्रांतीं पाठविली. फौज मेवाडांत जाते हें वर्तमान राठोडास व जैपुरवाल्यास कळल्यानंतर त्यांनीं उदेपूरवाल्याची कुमक करणार म्हणून वर्तमान आहे. राजश्री तुकोजी होळकर यांची रवानगी सरकारांतून जाहाली म्हणून येथें लोकांचीं लिहिलीं येतात. त्यास हाही पर्याय होणें तो त्वरेनें घडल्यास उपयोगच आहे. हल्लीं नवें वर्तमान आलें कीं, अमदानीचा लेक व इस्माईलबेग व उमरावगीर गोसावी ऐसे एकत्र होऊन, ढवलपुरास येऊन, पुढें चमेल उतरोन अलीकडे यावे हाही विचार, मग काय घडेल तें पहावें. सारांश, या सरदारीची अब्रू याउपर राहून कामकाज होणें तें श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून काय घडेल तें खरें. खासगत मजकूर ल्याहावा तरी स्वामी म्हणतील कीं, खिसे* लिहितात. याजकरितां ल्याहावयासही विचार पडतो. न ल्याहावें तर, आतां पुढें येथें कर्जही मिळत नाहीं. तेव्हां ईश्वर या संकटांतून पार पाडून स्वामींचे पाय दृष्टीस पडतील तो सुदिन. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*The Poona minister's agent, Appaji Ram, earnestly solicits his master to support Sindia in his hour of trial.*

No. 517 April 1788.

सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ जमादिलाखरपर्यंत स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींनीं छ ११† मजकूरचें पत्र पाठविलें, तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. पेशजीं राजश्री पाटिलबावांनीं इकडील होळकरांचा व जयपुरवाले व मारवाडी यांचा ऐक्यतेचा मजकूर स्वामींस ल्याहावयासीं सांगितला होता. त्याजवरून इकडील सविस्तर मजकूर पेशजीं स्वामींस लिहिला होता. तीं पत्रें

*सबबी. † ता. २०-३-१७८८.

सेवेसीं पावोन त्यांचें उत्तर हल्लींचे रवानगींत आलें कीं, राजश्री पाटिलबावा बोलले तें खरें. परस्परें राज्यासीं विरुद्ध असल्यानें सरकार उपयोग आहे. एकी जाहल्यानें तिकडील बंदोबस्तास जे राहतील, त्यांस ठीक पडणार नाहीं. या गोष्टी होळकरांचे मनांत यावयाजोग्या आहेत. ऐसें असतां सर्वांची एकी करितात यावरून आश्चर्य वाटतें. होळकर सरकारचे सरदार; त्यांत पाटिलबावांचा त्यांचा भाऊपणा पूर्वीपासून; व पाटिलबावा सरकार काम करितात, त्या अर्थीं ही गोष्ट करणार नाहींत ऐसें वाटतें. रांगड्यांचे विश्वासावर जाऊन केलें असतांही वाईट गोष्ट व परिणामही लागणार नाहीं. पाटिलबावा इकडे आले असतां होळकरांचे हातून तिकडील बंदोबस्त राहाणें याचा विचार कशास पाहिजे? पाटिलबावांचे घरीं मनसबा वागतो. ही जात तेथें आहे कीं काय? पाटिलबावा सरकारनक्षावर नजर देऊन, श्रीमंतांचे पायांसीं लक्ष ठेऊन मनसबा करितात, त्या अर्थीं रांगड्यांच्यानें काय होणें? त्यांचे तेच फजीत पावतील. आजपर्यंत रांगडे व मोगल यांनीं जितकीं खुळें करावयाचीं तितकीं केलीं, परंतु पाटिलबावांची निष्ठा श्रीमंतांचे पायांपासीं, तेणेंकरून त्यांचीं पारिपत्यें होऊन फजित पावले व पुढेंही पावतील. सरकारांतून याची विचारणा व्हावी म्हणोन लिहिलें. त्यास तुमचीं पत्रें आलियावर येविषयींचा मजकूर लेहून होळकरांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें आल्यावर अर्थ समजेल. तेमुरशाकडील वगैरे बातमीचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. पुढें होईल वर्तमान तें लिहून पाठविणें. व याखेरीज दुसरी पुरवणी स्वामींनीं पाठविली, त्यांत लिहिलें कीं, राजश्री अलीबहादर यांचे गळां हिंदुस्थानचा बंदोबस्त घालून राजश्री पाटिलबावा देशीं येणार म्हणोन तुम्हांस त्याहावयासीं सांगितलें. त्यास अलीबहादरच्यानें हें काम होणार नाहीं व केलें असतां शेवटासही जाणार नाहीं. याजकरितां पाटिलबावांनींच या गोष्टीचा विचार करून तिकडे राहावयाचें करावें. अलीबहादरचे गळां घालूं नये. इतकें असोन येऊं लागले तरी अलीबहादरही पाटिलबावांबराबर येतील. तिकडे राहाणार नाहींत. याप्रमाणें तुम्हीं पाटिलबावांसीं बोलावें म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐसियासी राजश्री पाटिलबावांपासीं स्वामींचे लिहिल्याअन्वयें मजकूर बोललों. तेव्हां त्यांनीं उत्तर केलें जे,आम्हीं सर्व प्रकारें साहेबचाकरी करीत असतां धनी कुमकही करीत नाहींत, आणि आमचे बरोबरीचे सरदार त्यांजला धनीपणाचे रीतीनें स्पष्ट ताकीद करून सरकार चाकरीवरही पाठवीत नाहींत! उलटी त्यांची चाल समजली असतां शिफारसच होते. तेव्हां चाकरी करून फल नाहीं! प्रत्यक्ष जयपूरवाले व मारवाडी यांचे

वकील नेहेमीं जवळ आहेत.अलीबहादर आम्हांकडेस येऊं लागले,तेव्हां अनेक प्रकारें त्यांचे बुद्धीस भ्रंश करून राहावीत होते; परंतु ते राहिले नाहींत. तेव्हां भय प्रीतही दाखविली; परंतु त्यांनीं तें कांहींच न ऐकितां तेथून कूच करून आम्हांकडे आले. त्यास आम्हीं त्यांचा सर्व प्रकारें बंदोबस्त करून द्यावयासीं सिद्ध असतां, सरकारची आज्ञा येते कीं, मशारनिल्हे, तुम्ही इकडे आलियानंतर तेही समागमें येतील. याजवरून अपूर्व वाटतें. ही गोष्ट धनीपणाचे लिहिण्यास विलग दिसते. तस्मात् आम्हीं चाकरी आजपर्यंत बरी वाईट केली, तिचें सार्थक हेंच आहे. अस्तु. याचा विस्तार पत्रीं विशेषात्कारें काय लिहावा ? ज्या गोष्टी आहेत त्या उत्तमच आहेत. ज्यापक्षीं मर्जी धन्याची ऐशीच आहे, त्यापक्षीं आम्हांस कळेल तैसा बंदोबस्त करून, श्रीमंतांचे दर्शनास एक वेळ जाऊं. मग पुढें जैशी आज्ञा धनी करितील त्याप्रमाणें वर्तणूक करूं. ऐसें उत्तर जालें व सदरहूअन्वयें ल्याहावयासींही सांगितलें. त्यावरून सेवेसीं लिहिलें आहे. स्वामींनीं पत्रांचे जाब सत्वर पाठवावे म्हणोन आज्ञा केली होती. त्याजवरून पांच सात वेळ जाबाविषयीं राजश्री पाटिलबावांस विनंती केली. परंतु उत्तरें द्यावयासीं मर्जी दिसेना आणि बहुत दिवस जाले. यास्तव तूर्त जीं उत्तरें जालीं त्यांचे भाव मात्र लिहिले आहेत. मागाहून आणखी काय उत्तरें होतील त्याप्रमाणें सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana Sindia's resentment at the imprudent conduct of Holkar in intriguing with his enemies and defeating the object for which he was dispatched northward from Poona.*

No. 518 11th April 1788.

पैवस्ती छ २३ साबान समान
समानीन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ४ माहे रजबपर्यंत मुक्काम लष्कर नजीक चमेल सात कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नव्हता. त्यास छ ६ रबिलाखरचें पत्र व मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले ते, येथें छ १५ माहे

जमादिलाखरीं पावले. बहुत संतोष जाहला. असेच निरंतर पत्रीं सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावा फौजे सुद्धां मार्गशीर्ष मासीं चमेल उतरोन ग्वालेर प्रांतीं आले. त्या तागाईत सेवेसीं पांच सहा रवानग्या पत्रांच्या केल्या. परंतु त्या पत्रांचे जाब ल्याहावयासी आज्ञा होऊन उत्तरें येत नाहींत. तेव्हां आम्ही येथून जीं पत्रें पाठवितों तीं सेवेसीं पावतात किंवा न पावतात, हें कांहींच समजत नाहीं. यास्तव चित्त उदास असे. तरी स्वामींस जीं पत्रें पावलीं असतील, त्यांत जे मजकूर येथील मुख्यांनीं लिहावयासी सांगितले व सेवकाचे दृष्टीस जे पडत गेले तितकेच लिहिले आहेत. परंतु उत्तरें कांहींच आलीं नाहींत. आणि येथें तों दोहों दिवसीं राजश्री पाटिलबावा आम्हांस व वकिलास पुसतात कीं, तुमचे पत्राचे जाब कां येत नाहींत ? आम्ही उत्तर करावयासी कुंठित होतों. यास्तव स्वामींची मर्जी जैसी असेल त्याप्रमाणेंच सेवकास उत्तर आलें, म्हणजे त्याप्रमाणें येथें उत्तर करावयास येईल. आम्ही सेवक स्वामींचे. तेव्हां सेवकास जें लिहिणें तें लिहिण्यांत यावें, म्हणजे त्याप्रमाणें वर्तणूक होईल. चार महिने ग्वालेर प्रांतीं घालविले, तों इस्माईलबेग याणें आगऱ्याच्या मोर्च्याचा बंदोबस्त करून, फौज व तोफखाना व पलटणें सुद्धां चमेल उत्तरतीरीं येऊन दाखल जाला. तेव्हां त्याच्या मोकाबल्यास फौज पाठविणें प्राप्त जाहलें. हल्लीं इस्माईलबेग याच्या मोकाबल्यावर राणेखानभाई व रायाजी पाटील व जिवाजी बल्लाळ बक्षी फौजसुद्धां पाठविले आहेत. मग श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून काय घडेल तें पाहावें. येथें फौजेचीं देणीं मनस्वी चढलीं आहेत. नित्य धरणीं पारणीं होत आहेत. खाशांस देखील एकेक उपास घडला. सर्व हिंदुस्थान एकीकडे आणि फक्त दक्षणी फौज आपली, तेव्हां याच फौजेनें बंदोबस्त होऊन शत्रूचें पारिपत्य होणें हा अर्थ समजलाच आहे ! परंतु राजश्री पाटिलबावा थोर सरदार आणि हिंमत जबरदस्त, याजमुळें आजपर्यंत दम धरून राहिले. आतां या मुलखांत राहणें कठिण आहे. राजश्री पाटिलबावांनीं आम्हांस व वकिलास बोलावून बहुत प्रकारें भाषणें केलीं, त्याचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा ? त्यांतील सारांश अर्थ हाच कीं, "ज्यापक्षीं धन्यास आमची कुमक करावयाची नवती, तर तसेंच आम्हांस साफ ल्याहावयाचें होतें, कीं सरकारांतून फौजेची कुमक होत नाहीं. कारण काय म्हणाल, तरी साल गुदस्तां टिपूचे मसलतीस राजश्री हरिपंततात्या फौज सुद्धां गेले होते. त्या वोढीमुळें तुम्हांकडे फौज पाठवावयास सवड पडत नाहीं. तुम्हांस कळेल तसें राज-

कारण करून समेटून घ्यावें. असें लिहिलें असतें, म्हणजे जैसें आम्हांस कळतें त्याप्रमाणें मारून घेतों. वारंवार श्रीमंतांचे नांवाचीं पत्रें व राजश्री नानांचीं पत्रें येत गेलीं. त्यांत अलीबहाद्दराची फौज सुद्धां रवानगी करितों, सत्वरच फौज येऊन पोंहोचेल, म्हणोन रवानगींत लिहिलें येत गेलें. व तुम्हां उभयतांसही याप्रमाणेंच लिहीत गेले. या भरंवशावर आम्ही दुराशेस गुंतोन, आजपर्यंत दम धरून राहिलों. आतां आम्हांपासीं पैकाही नाहीं आणि लोकही पैक्याखेरीज ऐकत नाहीं; आणि शत्रू जबरदस्त. तेव्हां पुढें करावें तें काय? आम्हांस भरंवसा राजश्री नानांचे भाऊपण्याचा होता कीं, आम्हांवर समय आहे, तेव्हां या समयीं सरकारांतून कुमक होईल; न होय तर नानांचा व आपला ऐक्यभाव आहे, तेव्हां कसेंही जाहलें तत्रापि त्यांजकडून कमती पडणार नाहीं. याजमुळें हिम्मत धरून होतों. आतां चैत्र आला, अद्याप फौजेचे कोठें येण्याचा मार्ग दिसत नाहीं. त्यापक्षीं आतां फौज येऊन फलही काय? हंगामी* फौज आली असती, तरी जो मुलूख शत्रूनें घेतला होता तो घेऊन शत्रूचें पारिपत्य होतें, आणि सरकारनक्षही होता. आणि लौकिकांतही होतें कीं, यांचें व सरकारचें वाकडें होतें, तत्रापि प्रसंग प्राप्त जाहला तेव्हां श्रीमंतांनीं सरदाराची कुमक केली. तेव्हां ह्या गोष्टी सर्व मिथ्या आहेत. आतां स्पष्ट हिंदुस्थानाच्या दृष्टीस पडलें कीं, दक्षणची फौज शिंदे यांचे कुमकेस येत नाहीं. ऐसा जाहिराणा उघड जाहला." अस्तु. ऐसीं भाषणें बहुत वेळ जाहलीं, व पत्रेंही आम्हांस ल्याहावयासी बहुत वेळ सांगितलीं. परंतु सेवकास अंदेशा वारंवार प्राप्त होतो कीं पेशजीं रवानग्या तपसीलवार केल्या, त्यांत ल्याहावयासी कमती कोणती केली होती? त्यांचीं उत्तरें अद्याप ल्याहावयासी आज्ञा होत नाहीं. तेव्हां स्वामींची मर्जी हे खिसे लिहिल्यामुळें दिःक होत असेल, किंवा काय मजकूर आहे याचा अर्थ समजत नाहीं. याजमुळें ल्याहावयासी भय प्राप्त होतें. आणि न ल्याहावें तर येथील मर्जी खट्टी होत्ये. आणि सूक्ष्म रीतीनें विचार पाहिला असतां, वर्तमान काळचा प्रसंग वर लिहिल्या-अन्वयें प्राप्त आहे. सारांश, या सरदारावर धन्यांनीं येहेसान† करावें हा अर्थ दिसण्यांत बरा होता. परंतु सरकारची मर्जी कैसी असेल हें न कळे. स्वामी पुढें मागें म्हणतील कीं तुम्हीं आमचे होतेत, त्यापक्षीं तपसीलवार वर्तमान ल्याहावयाचें होतें. मग आम्हांस जें करणें तें करितों. साऱ्या हिंदुस्थानांत दोन स्तोमें

* वेळेवर. † कृपा.

जाहलीं आहेत. इतके दिवस सारे हिंदु मुसलमान एकच होते. प्रस्तुत आपल्या फौजा चमेल उतरोन दक्षणतीरीं आलिया तागाईत, रांगड्यांचा, जयपुरवाले व मारवाडी वगैरे यांचा स्तोम एक, व इस्माईलबेग व गुलामकादर वगैरे यांचें स्तोम एक. जयपुरवाल्याच्या व पातशाहाच्या भेटी रेवाडीवर जाहाल्या, तेव्हां जयपुरवाल्यांनीं करार मदार केले होते त्याप्रमाणें अमलांत आले नाहींत. तेव्हां दिल्लीश्वराचें व रांगड्यांचें ठीक बनलें नाहीं. तेव्हां पंचवीस हजार रुपये पातशाहास देऊन, जयपुरवाले लग्नाचें निमित्य करून जयपुरास गेले. पातशाहाची व नजफकुलीची लढाई जाहली. त्यांत नजफकुलीनें हजरतांस दाविलें. तेव्हां हजरतांनीं नजफकुलीसीं सलुखा करून दिल्लीस गेले. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. गुलामकादर यानें दरोबस्त अंतरवेदींत अंमल वसवून, रामगड सुद्धां घेऊन बंदोबस्त केला. आतां चमेल पार आपला अंमल कोठें आग्र्याशिवाय राहिला नाहीं. पुढें आपला दाब ईश्वरकृपेंकरून व श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून राहिला, तर सर्व गोष्टी बऱ्याच आहेत. नाहीं तर उज्जन पहाणें प्राप्त आहे. मग हिंदुस्थानची आशा कोणींच धरावी नलगे ! इतका तपसील ल्याहावयाचा कारण काय ऐसें स्वामी म्हणतील, तरी ज्यापक्षीं सरकारची फौज कुमकेस येणार आहे, ती हंगामावर येऊन पोंहचली असती म्हणजे सरकार काम झालें असतें. म्हणजे येथील मुख्यांस पुढें बोलावयासी जागा नव्हती. आतां फौज रवाना जाहली आहे. गंगातीरावर* आली म्हणोन लोकांची लि॥ येतात. परंतु फौज अद्याप येऊन दाखल होत नाहीं. आणि येथील तों मसलतीचा समय गेला. तेव्हां फौजेनें यावें कधीं व येथील मसलत सुधारावी कधीं ? असो. इतकें सेवकानें लिहावें ही योग्यता नाहीं. परंतु स्वामींनीं येथें ठेविलें आहे, यास्तव मर्जीची अवज्ञा करून लिहिलें आहे. म्हणोन सेवकावर मर्जी खट्टी न व्हावी. येथील विचार दृष्टीस पडतो यास्तव कच्चें पक्कें वर्तमान सेवेसीं लिहावें लागतें. मग जें करणें न करणें तें स्वामींकडे. खासगत मजकूर तरी, रोजमरा देखील दरमहाचे दरमहा मिळत नाहीं. कर्ज काढून नित्य कृत चालविलें पाहिजे. ऐसा विचार येथें घडत आहे. परंतु चाकरीचा प्रकार. त्याअर्थीं जैसा प्रसंग पडेल तैसें चाललें पाहिजे. दोन वर्षें देशींहून येथें आलियास जाहालीं. अद्याप मसलतीचा प्रथमच दिवस आहे. तेव्हां सेवकाचा खर्च चालोन परिणाम कैसा लागतो ? येविसींची आज्ञा जाहाली पाहिजे. आतां लष्करांत म्हटल्यास कर्ज देखील मिळत नाहीं. स्वामींस कळावें

* गोदावरी.

म्हणोन विनंतिपत्र लिहिलें आहे. मनन करून पेशजीचे पत्रांचीं उत्तरें व हल्लींचे पत्राचें उत्तर त्याहावयासीं आज्ञा केली पाहिजे. म्हणजे चित्ताचें समाधान होईल. पत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहें. हल्लीं छ ४ माहे मिनहूस राणेखानभाई यांणीं पत्र पाठविलें. त्यांत लिहिलें कीं, आम्ही फौज सुद्धां आगऱ्यास जाऊन, इस्माईलबेग याणें मोर्चे बसविले होते ते कापून काढिले. त्या मोर्च्यांत लढाईमध्यें उमरावगीर गोसावी पाडाव धरून आणिले. गोसावी याची सलतनत, हत्ती, घोडे, सर्व लुटून फस्त केले. सहा हत्ती व दोनशें घोडे पाडाव आले. शिवाय चार पांचशें घोडे व शेंपन्नास उंट फौजेंत आले. तूर्त आपल्या फौजेचे कुमकेस रणजितसिंग जाट भरतपुरवाला यांणीं दहा हजार प्यादा व दहा हजार फौज व दोन पलटणें पाठविलीं; व इस्माइलबेग याचे कुमकेस गुलामकादर रोहिला येऊन सामील जाला. पुढें होईल वर्तमान तें मागाहून सेवेसीं लेहून पाठवूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is another urgent appeal from Appaji Ram to Nana to succour Sindia and save him from a greater disaster. It contains news of a slight advantage gained by Sindia's horse over Ismail Beg at Agra.*

No. 519 16th April 1788.

श्री

छ विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चैत्र शुद्ध ११ बुधवार मुक्काम लष्कर नजीक चमल दक्षणतीर दहा कोस स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—मी गया करून येऊन श्रीकाशीमध्यें येऊन राहिलों. तों इकडे राजश्री पाटिलबावांची मसलत बिघडली. बावांचीं पत्रें वरचेवर दोन तीन लष्करास येण्याकरितां आलीं. परंतु शरीर स्वाधीन नाहीं, व यात्राही काशींतील करण्याच्या राहिल्या होत्या, व बावांची मसलत नासल्यामुळें मार्ग नासले, असे अंदेशे करतां पौषमास गेला. नंतर बंधु व कुटुंब राजश्री बाबूजी नाईक, चिंतामण नाईक उंकार आदिकरून यात्रा देशास जायास निघाली, यांजबरोबर बिदा केलें. मी काशींतच होतों. इतक्यांत बावांचें पत्र, आपाजी राम आदिकरून गृहस्थांचीं पत्रें, कृष्णराव महादेव बापू भावे यांचे अत्यावस्थतेचीं आलीं व येण्याकरितां निषेध लिहिले. तेव्हां शरीर स्वाधीन नसतांहीं निघणें प्राप्त जालें. लष्करांत पामरसाहेब इंग्रजांकडील वकील आहे, त्याचें पत्र काशीकर इंग्रजांस, मजला काल्पीस पोहचवावयाकरितां पाठविलें होतें. त्यावरून काशीकर इंग्रजानें दोन पाहरे चौदा तेलंगे दिले. ते

घेऊन माघ वद्य चतुर्थीस* काशीहून निघालों. दरमजल कुराजाबादेजवळ घाटपूर काल्पीपलीकडे दोन मजलीवर आलों. तेथें लष्करचीं पत्रें आलीं. त्यांत कृष्णराव वापू भावे परधामास गेल्याचें वर्तमान लिहिलें आलें. त्यावरून स्थिति गति जाल्याचा विस्तार किती विनवावा? काल्पीस येऊन इंग्रजांचे पाहरे बिदा केले. पुढें जागाजागांहून जमीयत स्वार प्यादे घेऊन दरमजल फाल्गुन वद्य १३ चे दिवशीं कोतवालचे मुक्कामीं लष्करांत पावलों. बावा सडे स्वारींत चमलतीराऐलीकडे होते. तेथून सडी फौज राणेखानभाई, रायाजी पाटील, जिवबा बक्षी, खंडेराव हरि व कांहीं पलटणें चमेलपार करून देऊन, बावांचे मुक्कामीं अडचण होती सबब कुवारी नदीचे पाण्यावर आले. बुणगेही जवळ बोलाविले. त्यांसमागमें मीही आलों. चैत्र शुद्ध ५ शुक्रवारीं बावांची भेट जाली. बोलण्यांत अर्थ मसलत नासल्याचे व फौज देशीहून सरकारची आली नाहीं हेच तपसील जाले. दोन वेळ बोलाऊन नेऊन मागील वृत्तांत सर्व सांगितला. तुम्हीं पुण्यास जाऊन आशय सांगितल्याचें मनन करणें. आम्ही इतक्या संकटांत आलों, त्याचीं वर्तमानें पुण्यास विपरीत गेलीं. त्यावरून तेथें घाबरले. येथवर तर दाखले त्यांस पुरले. आम्हीं फौज पाठवावयाकरितां लिहिलें, त्याचीं उत्तरें आलीं कीं, फौज जलदी रवाना करितों. अलीबहादूर डेरेदाखल करून अवाईही घातली. परंतु फौज अद्यापि येतच आहे, याचें कारण काय? फौज येते या आश्रयानें आम्हीं नेटच राखिला. राजकारणें येत असतां फौजेकडे पहात राहिलों, त्याचा शेवट असा जाला! प्रथमच भरवशाचें उत्तर न येतें तर राजकारण करून अथवा कळतें त्या रीतीनें वर्तणूक करितों. अखेर साल आलें, एक मास पर्जन्य राहिला, अद्यापि भरवसाच आहे! फौजेस ठिकाण नाहीं. याचें कारण काय? तें समजेल तर तुम्हीं लौकर जाणें असा प्रश्न जाला आहे. समक्ष इतकेंच जालें. परस्परें ऐकण्यांत येतें कीं, बावांची मर्जी त्वरेनें बिदा करावयाची आहे. बादशाही खिलत रवाना केले ते समयीं मजला जा म्हणाले. मी नाहीं म्हणून राहिलों. गेलोंच नाहीं. आतांचा दिवस नाहीं म्हणावयाचा नाहीं. जावेंच लागेल. याचीं कारणें समक्ष विनंती करीन. सर्व विलग! घरचे, राजकारणाचे, खर्चवेच माणसांचे देखील अनुष्टुप जाले. तपसीलवार विनंती समक्ष करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writes to Nana that he was urgently called by Mahadji from Benares to his camp and asked to go to Poona and press the Darbar to expedite the despatch of forces.*

* ता. २५-२-१७८८.

No. 520 24th April 1788.

पैवस्ती छ २३ साबान समान समानीन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १७ रजबपर्यंत मुक्काम पिंपरवा नजीक चमेल येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त उदास असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतरी राजश्री पाटिलबावांनीं साल-गुदस्तां फडणिसीचें कामकाज घ्यावयाचें ठरावून सेवकास आज्ञा केली, तो मजकूर सविस्तरें पेशजीं सेवेसीं लिहिलाच होता. त्याजवरून स्वामींचीं उत्तरेंही आलीं कीं, तुम्हांस कामकाज सांगतील त्याप्रमाणें करावें. त्यास, हल्लीं कमाविसदार यांजकडील हिशेब व रायाजी पाटील वगैरे सुभे करून जैपूर प्रांतीं पाठविले होते, त्यांचेही हिशेब पाहावे आणि मखलाशा करून द्याव्या, म्हणोन राजश्री पाटिल-बावांनीं दोन चार वेळां सांगितलें. त्यास आम्हीं आजपर्यंत त्यांचे मर्जीप्रमाणेंच होय म्हणत गेलों. परंतु हल्लीं हिशेबवार मखलाशाच करून देण्याविसीं निकड आहे. फडशे करून घ्यावे तेव्हां आपले कारकुनीचा जाबसाल उरकोन घ्यावा. त्यास येथील कारभार प्रस्तुत एके प्रकारचा जाहला आहे. तेव्हां कारकुनीचा वगैरे जाबसाल यथास्थित होईल न होईल, हें समजलेंच आहे. आणि हिशेबवार तों मखलाशा करून द्याव्या म्हणोन तर नित्यश: बोलणीं होतच आहेत. तेव्हां दोहीकडून पेंचच. यांचे मर्जीप्रमाणें सध्यां करावें तर आपला कारकुनीचा वगैरे जाबसाल तसाच राहतो. यास्तव विनंतिपत्र सेवेसीं लिहिलें आहे. तरी याची व्यवस्था पुढें कशी करावी येविसींची आज्ञा जाहली पाहिजे. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक होईल. कारकुनीचा जाबसाल जाहाल्याखेरीज हिशेबवार मखलाशा होत नाहींत, ऐसें म्हटलें तरी सध्यांच मर्जी खट्टी होईल. यास्तव मर्जीनुरूपच आज उद्यां करून चालविलें आहे आणि त्यांजला न कळतां सेवेसीं पत्र लिहिलें आहे. तरी येविसींचें उत्तर तपसीलवार त्याहावयासीं आज्ञा केली पाहिजे. स्वामी म्हणतात कीं, येविसींचे जाबसाल पेशजीं तुम्हांस एक वेळ पत्रीं लिहिलाच आहे आणि फिरोन लिहिणें तें काय आहे? त्यास, पेशजीं स्वामींचीं पत्रें आलीं होतीं,

त्या पत्रीं हा मजकूर नाहीं. यास्तव पुन्हां विनंतिपत्र लिहिणें जाहलें. साल तिगस्तां जैपूरवाल्याची खंडणी जाहाली त्याचे हिशेब व रायाजी पाटील सुभे करून जैपूरप्रांतीं खंडणीचे वसुलास वगैरे बंदोबस्तास पाठविले होते त्यांचे स्वारीचे हिशेब ऐसे हल्लीं येथें आले आहेत, त्यांजवर मखलाशा करून घ्याव्या, तेव्हां कारकुनीचा जावसाल उरकोन घ्यावा हें मानस सेवकाचें आहे. परंतु येथील प्रकार ऐसा आहे. याजकरितां सेवेसीं विनंतिपत्र तपसीलवार लिहिलें आहे. मनन होऊन उत्तर त्याहाववासीं आज्ञा केली पाहिजे. वरकड हिकडील कच्ची पक्की माहितगारी सर्व राजश्री जनार्दन लक्ष्मण वैद्य यांनीं सेवेसीं निवेदन केलीच असेल. यास्तव सविस्तर मजकूर हल्लींचे पत्रीं न लिहिला. दरबारी मजकूर तर मागाहून सविस्तरें लिहून पाठवीन. राणेखानभाई सडी फौज सुद्धां इस्माइल-बेग याजवर जाऊन चैत्र वद्य द्वितियेस* सोमवारीं दोन प्रहरापासून सा घटका रात्रपर्यंत गुलाम कादर व इस्माइलबेग यांसी लढाई जाहली. चार पांचशें माणस ठार व जखमी आपलेकडील जाहालें, व दोनशेंपर्यंत घोडे जखमी व ठार जाहाले. इस्माइलबेग व गुलामकादर यांजकडील मोगले सातआठशें व रोहिले पंधराशें-पर्यंत ठार जखमी जाहाले. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं मागाहून लिहून पाठ-वीन. या समयीं आपले फौजेची जाट रणजितसिंग यानीं कुमक चांगली केली. सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें असे. या समयीं आपली फौज येऊन पोहोंचती, तरी मोठीच गोष्ट होती. सारांश, श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूचें पारिपत्य सत्वर घडेल असें वाटतें. बहुत काय लिहिणें? सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports a heavy engagement between Sindia's horse and the forces of Ismail Beg and Gulam Kadar at Agra.*

No. 521 4th June 1788.

पै॥ छ २५ रमजान तिसा समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २८ साबान मुक्काम ग्वालेर स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—मी महायात्रेहून आल्यानंतर राजश्री पाटिल-बाबा यांची भेट जाहली. तेव्हांपासून दरबैठकेंत मसलतीचा मजकूर काढून

---

* ता. २१-४-१७८८.

सरकारांतून जलद फौजेची रवानगी करितों म्हणून वारंवार खातरजमेनें श्रीमंतांचीं पत्रें येत गेलीं, त्या भरवशावर आजपावेतों राहून पेंचाखालीं आलों. शेवट फौजेचा परिणाम पाहतां, होळकर व अलीबहादूर उभयतां समागमें महेश्वरास येऊन एक मास जाला, राहिले आहेत. पुढें यावयाचें मानस तूर्त कांहीं दिसत नाहीं. उभयतांचे विचारें सल्लामसलत ठरेल त्याप्रमाणें करीन. सालगुदस्ताचे आषाढ-मासीं जैपूर प्रांतीं मसलतीवर होतों, तेव्हांपासून फौजेकरितां सरकारांत लिहीत गेलों. त्याचीं उत्तरें आलीं, श्रावण मासीं अलीबहादूर डेरेदाखल केले. लौकरच रवाना होतील. त्यास सगळें एक वर्ष होत आलें. याप्रमाणें मनसब्याची चाल आहे. फौज येत नाहीं हें पूर्वीच निखालस समजतें म्हणजे तसेच डौल धरून, मसलत कळेल त्या रीतीनें समेटावयास येती. भरवसा देऊन गोत देणें असा प्रकार घडण्यांत आला. ओढीचा प्रकार येथील तेथील परस्परें लोपला नाहीं. असें असतां ही गोष्ट घडावयाची नवती. परंतु मसलतीचे प्रकार करून, तेथें जो निश्चय ठरला असेल तो खरा करून पत्रीं इकडील मसलतीचें वर्तमान वारंवार लिहिलें, तथापि तेथून होतें तें विचारेंकरूनच होत आहे! याजकरितां आमचे मनांत तुम्हीं पुण्यास जाऊन एक वेळ इकडील सविस्तर वर्तमान श्रीमंतांस श्रुत करावें. पुढें त्यांचे विचारास येऊन उत्तरें येतील तसें करावयास येईल. याप्रमाणें चार पांच बैठकांत बोलून, निश्चयांत आणून, वैशाख वद्य ७ चे* दिवशीं निरोप दिला. दोन तीन दिवस तेथें होतों. उपरांतिक बिदा होऊन काल ग्वालेरीस आलों. आजचे दिवस येथें मुक्काम जाला. उदईक येथून निघोन मजल दरमजल शरिराचे शक्तीप्रमाणें उजनीवरून सेवेसीं येतों. भेटीनंतर सविस्तर निवेदन करीन. राजश्री राणेखानभाई वगैरे फौज पहिली पार होतीच. मागाहून मेवाड-प्रांताकडे देशीहून राजश्री बाळाजी जनार्दन यांजकडून जांबगांवींहून फौज आणविली. ती फौज इकडेच आणून त्यांचीही रवानगी पार भाईकडे केली. गुलाम कादर व इस्माईलबेग उभयतां एका जुटीनें यांसीं लढतात. त्यांजवळ तोफखान्याचें बळ भारी. परंतु यांनींही लढाईनें व गनीमीनें आयास† आणिले आहेत. नित्य याअन्वयें प्रस्तुत कालीं चाललें आहे. नवी देशची फौज पार रवाना केली. त्यांनीं यमुना उतरून पार अंतरवेदींत जाऊन मूलूख ताराज करावा, भाईनीं आगरे प्रांतीं उभयतांचे मोहऱ्यावर राहावें, पारचे मुलखांत ताण बसल्यावर दोघे एके जागां राहणार नाहींत, फुटतील, पुढें पाहावें तसें

* ता. २७–५–१७८८. † दमविले आहेत.

करावें असा बेत आहे. घडोन येईल तें खरें. उमरावगीर गोसावी आगऱ्यांतून पाडाव करून धरून आणिला. लष्करांत आणल्यानंतर बावा सामोरा जाऊन त्यास घेऊन आले. वस्त्रें, जवाहीर, घोडा, हत्ती बहुमान करून, हत्तीघोडे लुटींत आले होते ते माघारे देविले, आणि ते दिवशींच म्हणूं लागले कीं, तुमचें अंतःकरण येथें राहण्याविसीं प्रशस्त नसलें तर पोहचाऊन देऊं. त्यानें उत्तर केलें, पोटास मिळाल्यावर दुसरे जागांच आमचें काय आहे ? पहिलेपासून आपलेच आश्रित आहों. बंदोबस्त करून देऊं म्हणून बावांचें त्याचें बोलणें होऊन गोसावी मशारनिल्हे लष्करांत राहिले. साहित्य सरंजाम सरकारांतून करून दिला. पुढें पारचे महालच्या पेरोजाबाद वगैरेच्या सनदा करून दिल्या. कुटुंब ठेवण्यास जागा कछवाधार प्रांतीं द्यावी असेंही बोलण्यांत होतें. याप्रमाणें नाद कांहीं दिवस चालून शेवटीं एके दिवशीं गोसावीबावा रात्रीचे निघोन गेले. फौजेचा बोभाट खर्चाविसींचा फार आहे. जुनी फौज होतीच. नवी देशाहून फौज आली, तीही पार घातली. आणखी बोलावण्याखेरीज हजार पांचशें स्वार असेही एक दोन फौजेचे थोक* आले, तेही ठेऊन पार घातले. एकूण फौजेचा भरणा भारी जाला, व यतात त्यास ठेवीतच आहेत. साहस व हिंमत, धैर्यास चुकत नाहींत. पैका मिळत नाहीं यामुळें परिणाम अंदेशांत नाहीं. श्रीमंतांचे प्रतापेंकरून घडेल तें खरें. देशास जाण्याकरितां मजला बावांनीं बजिदी फार केली. मी अनमान करीत होतों. आग्रहेंकरून रवाना केलें. तेव्हां मान्य करणें लागलें. शरीर माझें स्वाधीन नाहीं, दिवस निभणें कठिण, व लिहिण्याचीही शक्ति नाहींसें पाहून, चिरंजीव पांडुरंग रघुनाथ माझा भाचा यास समागमें दिलें. त्या सहित निघोन ग्वालेरीस आलों. पुढें दरमजल येत आहें. गंगाजी खिजमतगार सरकारचा लष्करांत ठेविला. त्याजवळ एक कारकून विठ्ठल हरि म्हणून लिहिण्याकरितां ठेविला असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar writing to Nana from Gwalior explains Sindia's strategy as aiming at dividing the forces of the enemy concentrated on Agra and then fighting them singly. Sadashiv Dinkar is going to Poona at Sindia's request.*

* ठेका, जमाव.

No. 522 15th June 1788.

पैवस्ती छ ९ सवाल तिसा समानीन.

आषाढ मास.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :--

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १० मास रमजानपर्यंत मुक्काम पिंपरवा नजीक चमेल सहा कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:---स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नव्हता, त्यास छ २५ जमादिलावल व छ २ व छ १५ जमादिलाखर व छ २० रजब एकूण दोन रवानग्या स्वामींनीं कृपा करून पाठविल्या, त्या सेवकास पावल्या. त्यांचीं उत्तरें तपसीलवार राजश्री पाटिलबावांपासीं बोलून पत्रही त्यांजला दाखवून जाब काय द्यावे म्हणून पुसिलें. त्याजवरून बावांनीं उत्तर केलें कीं, याचें उत्तर विचार करून सांगं त्याप्रमाणें ल्याहावें. त्यास एक दोन वेळां जाबाविसीं फिरोन पुसोन, इंग्रजप्रकर्णी वगैरे काय ल्याहावयासी सांगतात तें ऐकून घेऊन, सेवेसीं विनंतिपत्र लिहून पाठवूं. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांकडील फौज चमेलपार राणेखानभाई यांजबराबर देऊन रवाना केली आहे. त्या फौजेचा व इस्माईलबेग व गुलामकादर यांचा मुकाबला होऊन लढाया जाहल्याचें वर्तमान पेशजीचे रवानगींत सेवेसीं लिहिलेंच आहे. हल्लीं इस्माइलबेग व गुलामकादर आगऱ्यास जाऊन बसले आहेत. आपल्या फौजा नित्य उठोन चौफेर गनिमी करून रस्त बंद केली आहे. तेव्हां यमुनापार अंतरवेदींतून उभयतांस रस्त* येऊं लागली. यास्तव नवी फौज जामगांवींहून आणविली होती, ती येऊन वैशाखमासीं दाखल जाहाली. ती फौज मथुरावृंदावन येथें जाऊन हरामखोरांचीं ठाणीं कापून काढिलीं. व एक पलटण सातसें लोकांचें व दोन तोफा होत्या, त्यास नव्या फौजेचें वर्तमान पलटणानें ऐकोन यमुनापार जाऊं लागले. तों नव्या फौजेच्या लोकांनीं चार पांचशें माणूस पलटणचें मारून, दोन तोफा व बंदुका व पंचवीस घोडे व बाणांची कैची घेऊन लुटून मारून फस्त केलें. बाकी लोक राहिले ते यमुनेमध्यें बुडोन मेले व नांवाही दोन बुडाल्या. याप्रमाणें फत्ते जाहाली. नंतर चिरघाटांवर

---

* धान्य सामुग्री.

तीच फौज जाऊन यमुनापार उतरली. तों पलीकडे मोट व महाबन येथें पलटण व तोफा होत्या, तेथें लढाई मारून पलटण कापून काढिलें. व मोट महाबन दोन्हीं ठाणीं गुलामकादर याचीं घेऊन आपलीं ठाणीं बसविलीं. तेथें ठाण्यांत तोफा दोन व पलटणांपैकीं तोफा सात, एकूण नऊ तोफा तेथें सांपडल्या. आपली फौज पलीकडे गेली याजमुळें गुलामकादर याजला विचार पडोन, यमुनापार आपलेकडील फौज दोन हजार व दोन पलटणें व दहाबारा तोफा अंतरवेदींत उतरल्या, व आपणही पार जाणार ऐसें वर्तमान दाट आहे. शिवाय शिखांनीं रोहिल्यांचा किल्ला गोसगड वगैरे जागा आहेत तेथें तमाम दुंडी करून, मुलूक लुटून दंगा मांडिला आहे. प्रस्तुत दोन शह शत्रूचे फौजेस पडले, याजमुळें बहुत घाबरे जाहाले आहेत. परंतु पर्जन्यकाल आला; मृगाचे पाऊस दोन चार चांगले पडून लहानसहान नद्यांस पाणीं देखील आलें. आणि खर्चाची ओढ भारी. तेव्हां ईश्वर ही मसलत पार कैसी पाडील ती पहावी. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व अलीबहादर उभयतां महेश्वरास दाखल होऊन आज दोन महिने जाले. अद्याप इकडे येण्याचा विचार कांहीं दिसत नाहीं. मग पुढें काय घडेल तें पाहावें. सुभेदारांस पत्रें येथून राजश्री पाटिलबावांनीं पांच सात सत्वर येण्याविसीं पाठविलीं, परंतु त्यांचीं उत्तरें यथास्थित येण्याविसींचीं आलीं नाहींत. वरकड तूर्त अधिकोत्तर वर्तमान ल्याहावेसें नाहीं. राजश्री सदाशिवपंत दाजी व राजश्री पांडुरंग रघुनाथ उभयतां राजश्री पाटिलबावांचा निरोप घेऊन देशास वैशाख वद्य १० शुक्रवारीं येथोन निघोन गेले. येथें गंगाजी हुजरे व मशारनिल्हेनीं आपले तर्फेचा कारकून राजश्री विठ्ठलपंत म्हणोन ठेविले आहेत. स्वामींस कळावें म्हणून सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. इंग्रजप्रकर्णी मजकूर मागाहून लिहून पाठवूं म्हणोन वर लिहिलें आहे. त्यास बावांनीं मागतीं बोलावून जो मजकूर ल्याहावयासीं सांगितला, तो अलाहिदा पुरवणी बंदीं लिहिला आहे त्याजवरून श्रुत होईल. पातशाहाजादा* इंग्रजांकडे होता, तो काशीमध्यें मृत्यु पावला. स्वामींस कळावें म्हणून लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

* *Appaji Ram informs Nana of Mahadji having opened the counter-offensive against Ismail Beg and Gulam Kadar.*

---

* पातशाहजादा जवानबख्त ता. १ जून १७८८ रोजीं एकाएकीं मरण पावला.

No. 523 17th June 1788.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी:—येथील ओढीचा प्रकार आहे तो आपणास लेहून कळवावा असा अर्थ नाहीं. मागील फौजेचे समजाविसीचा ऐवज देणें व हल्लीं मसलत उभी राहिली यामुळें ओढीचा प्रकार बहुतच जाला. येविसीं राजश्री सदाशिव दिनकर यांस पेशजीं दोन तीन पत्रीं लिहून पाठविलें आहे. त्यांणीं आपणांस सांगितलें असेल. सांप्रत येथें खर्चाची निकड जाणून, दहा लाख रुपये येथें खुशालचन्द अंबादास सावकार याजपासीं घ्यावयाचें ठरवून, तूर्त पांच लाख रुपये घेऊन, चिट्ठी सावकारमजकुरास सदाशिव दिनकर यांचे नांवें लिहून दिली आहे. ते आपणांस सांगतील. त्याप्रमाणें पांच लाख रुपये चिट्ठीप्रमाणें सावकारमजकुरास द्यावे. मागाहून पांचाची चिट्ठी होईल. येथें दहा लाख रुपये देविले पाहिजेत. ज्या सावकाराकडून ऐवज कर्जाऊ देवाल, त्या ऐवजाच्या वराता कमाविसदारावरी करून पाठवून देऊं. निकडीचें काम जाणून आपणांस लिहिलें आहे. लिहिल्याप्रमाणें ऐवज जरूर सावकारास देविला पाहिजे. राा छ १२ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *Mahadji asks for a loan of ten lakhs from Poona.*

No. 524 19th June 1788.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १४ माहे रमजानपर्यंत मुक्काम पिंपरवा नजीक चमेल दक्षणतीर येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून सांप्रत पत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारा सांभाळ करावयासीं आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, इस्माइलबेग व गुलामकादर डिगेहून शिकस्त खाऊन, माघारें आगऱ्यास दाखल जहाले. नंतर आग्रचाची मोर्चेबंदी पक्की करून तोफांची मारगिरी सुरू केली. नंतर आठ दिवसपर्यंत इस्माइलबेग व गुलामकादर एकत्रच होते. आणि रस्त इकडून चौतर्फ बंद केली. तेव्हां यमुनापारीहून रस्त येऊं लागली. त्याजमुळें हरामखोरांचे

फौजेंत हुशारी होऊन किल्ल्यावर जकड भारी बसविली. तेव्हां नवी फौज जाम-गांवची आली, ती अंतरवेदींत रवाना केली. त्यांनीं जाऊन, मथुरा वृंदावन येथील ठाणीं इस्माइलबेग यांचीं मारून, तेथें पलटण होतें तें झाडून कापून काढिलें. त्याजमध्यें दोन तोफा वगैरे सरंजाम सांपडला. तो घेऊन पार उतरोन, मोट माहाबन हीं दोन्ही ठाणीं कापून काढिलीं. तेथेंही पलटण होतें. त्याचें पारिपत्य सदरहूअन्वयें करून पांच तोफा पाडाव आणिल्या. नंतर मुलखांत हंगामा करून तमाम जमीदारांस सामील केलें आणि मुलूख लुटावयासी प्रारंभ केला. हें वर्तमान गुलामकादर यास कळतांच, आगऱ्याजवळ राजघांट आहे तेथें नावा जवळ करून, तमाम गुलामकादर यानें आपली फौज व पलटणें व तोफखाना वगैरे सरंजाम यमुनापार उतरला. हें वर्तमान राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी व रागेखानभाई यांजला कळतांच राजश्री पाटिलबावांस लिहिलें, आणि नवी फौज पार गेली होती तिजला लिहून पाठविलें कीं, देखतपत्र तुम्ही यमुना उतरोन आम्हांस येऊन सामील होणें. तें पत्र फौजेंत पावतांच फौज आलीकडे ठेऊन ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेस आपले फौजेची व इस्माइलबेगाची लढाई जाहाली. प्रातःकाला-पासून सायंकालपर्यंत परस्परें युद्ध होऊन, तृतीय प्रहरीं मुसा लस्तुंभ फरासीस व डबाई साहेब या दोन्ही पलटणांनीं मारगिरी बहुतच केला. आणि आपल्या फौजेच्या चार टोळ्या केल्या होत्या. तेव्हां चोहींकडून हल्ला केली, तेव्हां शत्रूचा पराजय जाहला. दरोबस्त तोफखाना व बंदुका पलटणाच्या व डेरे, दांडे, बुणगे सुद्धां लुटून फस्त केलें. इस्माइलबेग जातीनसीं पन्नासा स्वारांनिसीं पळोन गेला. त्यास पार उतरोन गेला किंवा आगऱ्याचे शहरांत आहे, हें वर्तमान अद्याप पक्कें लिहिलें भाईचें आलें नाहीं. सारांश गोष्ट, श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून राजश्री पाटिलबावांस महद्यश ईश्वरी कृपेंकरून आलें. राजश्री तुकोजी होळकर व अलीबहादर यांचा मुक्काम आजपर्यंत महेश्वरींच होता. हल्लीं राजश्री आंबाजी इंगळे यांचें पत्र आलें, त्यांत लिहिलें होतें जे, सुभेदार व अल्लीबहादर यांचें कूच होऊन जांबाचे घांटाखालीं आले, म्हणून लिहिलें होतें. वरकड वर्तमान तपसीलवार होईल तें व या लढाईमध्यें आपलेकडील घोडे माणूस ठार वजखमी किती जाहाले, आणि शत्रूंकडील घोडे माणूस ठार व जखमी किती जाहाले, त्याचें वर्तमान तपसीलवार भाईकडील लिहिलें आलें म्हणजे त्याप्रमाणें सेवेसीं, पुढील मसलतीचा काय विचार करितात तो, व लढाईचें वर्तमान कच्चें पक्कें मागाहून सेवेसीं लिहून

पाठवूं. आजपर्यंत होळकराचा मजकूर इकडे यावयाचा त्यांच्या लिहिल्याअन्वयें दिसत नव्हता. आतां लढाईचें वर्तमान ऐकिल्यानंतर काय विचार घडेल तो पाहावा. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Appaji Ram reports to Nana Sindia's grand success over Ismail Beg at Agra.*

No. 525 Just after 21st June 1788.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— इकडील दरबारी वर्तमान तरी, चमेलपार राजश्री पाटिलबावांनीं राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी व राणेखानभाई, यांजबरोबर फौज देऊन इस्माइलबेग व गुलामकादर यांचे मुकाबल्यास रवाना केले. त्यास गुलामकादर उभयतां एकत्र होऊन आगऱ्यास मोर्चे बसवून तोफांची मारगिरी करूं लागले. आपले फौजेनीं चौफेर रस्त बंद करून होतेच. परंतु यमुना पारीहून गुलामकादर याचे मुलखांतून रस्त येऊं लागली, तेव्हां हरामखोर हुशार होऊन अगऱ्यावर जकडबंदी* विशेष करूं लागले. तेव्हां जामगांवची फौज नवी आली, तिजला राजश्री पाटिलबावांनीं मथुरा वृंदावनाकडे स्वतंत्र पाठविली. त्या फौजेनें मथुरेस ठाणें इस्माईलबेग याचें होतें तें, वृंदावनास एक पलटण व दोन तोफा होत्या, त्यास मथुरेचें ठाणें नव्या फौजेनें कापून काढिलें, नंतर तेथून वृंदावनास जाऊन पलटणाचें पारिपत्य केलें; आणि दोन तोफा व बाणांची कैची वगैरे सरंजाम घेऊन, यमुनापार तीच फौज जाऊन, मोट माहाबन येथें गुलामकादर याचीं ठाणीं होतीं व दोन पलटणें व सात तोफा होत्या, त्यास ठाणींही कापून काढिलीं आणि पलटणही कापून काढिलें व सात तोफा वगैरे सरंजाम ठाण्यांत होता तो झाडून लुटून आणिला; आणि तमाम मुलखांत ताख्तताराज† करून झाडून जमीदार सामील जाले. हें वर्तमान गुलामकादर याजला कळल्यानंतर इस्माइलबेग याची खातरजमा करून आपण फौज सुद्धां यमुनापार गेला. हें वर्तमान राणेखानभाईस व राजश्री जिवाजी बल्लाळ यांस कळतांच, नवी फौज यमुनापार पाठविली होती तिजला अलीकडे

---

* वेढा. † बेचिराख, उध्वस्त.

आणोन, ती फौज व पहिली येथील फौज ऐसी एकत्र करून, तमाम लहान मोठे सरदार यांची खातरजमा करून, जेष्ठ शुद्ध १५ पोर्णिमेस* बुधवारीं इस्माइलबेग यासीं लढाई केली. प्रातःकालापासून सायंकाळपर्यंत युद्ध जालें. त्यास मुसा लस्तुंब फरासीस व डबईसाहेब† यांचें पलटण एकत्र करून, मध्यें पलटणें व तोफा ठेऊन, फौजेच्या टोळ्या तीन चार करून, एक टोळी पलटणांचे दुमाल्यावर‡ ठेविली, आणि दोहो बाजूस दोन टोळ्या व एक हरामखोरांचे पिछाडीस ठेऊन, लढाई घेतली. त्यास श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून व ईश्वरकृपेंकरून राजश्री पाटिलबावांस महत यश आलें. लोकांनीं व पलटणांनीं बहुत शर्त केली. इस्माइलबेग याजबरावर वीस बेवीस पलटणें होतीं, तीं झाडून लुटून फस्त केलीं. व पलटणांचा सरदार इस्माईलबेग यानें ठेविला होता त्यांचीं पलटणें तीन काढून काढिलीं, व तोफा वीस व आपलेकडील पलटणें ठाकुरप्रसाद वगैरे जयपूरवाल्यांचीं दहा पलटणें आपलेकडूनच उठून गेलीं होतीं, त्यांजपैकीं साहा पलटणें आणि इतर आणखी पलटणें जागजागां होतीं तीं झाडून हरामखोरांस सामील जालीं होतीं तीं, व याखेरीज पांच हजार फौज मोगली होती त्यां सुद्धां लढाई मारून, तोफा ऐंशी मोजदादीस आल्या. व याशिवाय आगऱ्याचे मोर्चात वगैरे आपले पलटणांत तोफा पाडाव आल्या आहेत, त्यांचा तपशील लिहिण्यांत आल्यानंतर दुसरे पत्रीं विनंती लेहून पाठवीन. याशिवाय फौजेमध्यें लूट. उंटें पांच हजार व घोडीं दोन अडीच हजार व हत्ती बारा चौदा व हत्तीवरील नौबत चौघडचा सुद्धां व नौबतीचे उंट व बंदुका व डेरे व दोर व बुणगे वगैरे सरंजाम झाडून लुटन आणिले. याखेरीज मोगल व पलटणाचे प्यादे, यमुनेमध्यें दोन अडीच हजारपर्यंत लढाई इस्माईल्याची मोडली ते समयीं पळोन यमुनापार जात होते ते बुडाले, आणि फक्त लढाईमध्यें तोफांचे मारानें व आपले फौजेनें आठ हजार माणूस पलटणचें कापून काढिलें. एक कोसभरपर्यंत घोडे माणूस एके जागां पडलें आहे. आपल्याकडील मातवर सरदारांपैकीं राजश्री धारराव शिंदे यांचे भाऊ नारायणराव शिंदे व नव्या फौजेंतील तीन चार सरदार ठार पडले. याशिवाय जखमी जिवाजी बल्लाळ यांचे गळ्याजवळ छर्ऱ्याची गोळी चाटून गेली व बसती घोडी पडली. विठोजी शिंदे यांजला जखम आहे. जिवबादादा यांचे बंधु नव्या फौजेंत आहेत, त्यांजला हातास दंडाजवळ गोळीची जखम लागली आहे. व्यंकटराव निंबाळकर यांचा

* १८ जून १७८८. † Monsr. Lesteneau and De Boigne

‡ पिछाडीस.

भाऊ धाररात्र निंबाळकर याजला दोन जखमा आहेत. शिवबा बाजी निंबाळकर व मावजी जठार वगैरे दोन तीनशें माणूस ठार पडलें. पांचसातशेंपर्यंत लोक जखमी झाले. शिवाय घोडीं आराब्याचे* लढाईमुळें दोन हजारपर्यंत आपले फौजेंतील पडले. बाकी ईश्वरें फार खैर केली. इस्माईलबेग यानें लढाईमध्यें शिकस्त खाऊन पंचवीसां स्वारांनसीं तो व त्याचा बाप व अमदानीचा लेक ऐसे त्रिवर्ग पळोन यमुनापार गुलामकादर याजकडे गेला. इस्माइलबेग याचे कुमकेस गुलामकादर यानें लढाईचे समयीं दोन हजारपर्यंत फौज व दोन पलटणें पाठविलीं. त्यास फौज रोहिल्याची कुमकेस यमुनेंतून उतरून अलीकडे येत होती, तों इस्माईल्याचा मोड होऊन पळोन यमुनापार जाऊं लागला. तों रोहिल्याचे फौजेस बातमी कळली. नंतर ती फौज हालदिल होऊन फिरोन माघारीं यमुनापार जाऊं लागली. त्यास जें माणूस यमुनेअलीकडे आलें होतें तें पांच सातशेंपर्यंत यमुनेमध्यें बुडालें. नंतर इस्माइल्या गुलामकादर याजपासीं गेला. तेथें त्यानें बहुमान करून हत्ती घोडा व पोषाख दिला व रहावयासी एक डेरा दिला. याप्रमाणें वर्तमान झालें. त्यास आज मागतीं राणेखानभाई यांचें पत्र आलें आहे, त्याजमध्यें लिहिलें होतें कीं, गुलामकादर कूच करून शाहाजाबादेस गेला आणि इस्माइलबेग याजला सांगितलें कों तुझी सोय पडेल तिकडे जाणें. याप्रमाणें सांगितल्यानंतर इस्माइल्या शेंपन्नास स्वारांनसीं लखनौकडे गेला, याप्रमाणें लिहिलें आलें. वरकड, आग्र्याचे किल्लयास मोचें हरामखोरांचे बसले होते, ते लढाईचा मोड होतांच मोर्चे पळोन गेले. हें वर्तमान पेशजीं संकलितार्थ सेवेसीं विनंतिपत्रीं लिहिलेंच आहे त्याजवरून सर्व समजण्यांत येईल. हल्लींही कच्चें पक्कें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. इकडील फत्ते झाली, आतां पुढें कामकाज आपले हातून कोणे तऱ्हेनें घेतात हे विचार दृष्टीस पडून, वहिवाटींत जे जाबसाल येतील व पेशजी कैलासवासी राघोपंत यांचे विद्यमानें निखालस कामकाज आमचे हातून दरकाचें घ्यावें असें ठरण्यांत आलें होतें, तें वर्तमान सविस्तरें पेशजीं स्वामींस लिहिलेंच होतें. त्यास हल्लीं श्रीमंतांचें पुण्याप्रतापेंकरून यांस येश आलें. आतां पुढें आमचे हातून कामकाज कैसें घेतात हें दृष्टीस पडेल, त्याप्रमाणें सेवेसीं लेहून पाठवीत जाऊं. राजश्री जनार्दनपंत वैद्य देशीं चिरंजिवाचे लग्नाकरितां गेले आहेत. त्यास मशारनिल्हेची रवानगी इकडे येण्याविषयीं आज्ञा होऊन लौकर येणें घडलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports in graphic details the sanguinary fighting at Agra and Sindia's success over Ismail Beg. The enemy was routed and Agra was relieved.*

---

* तोफांचा मारा.

No. 526 June 1788

(लेखक सदाशिव दिनकर.)

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री पाटिलबावा यांणीं सांगितलें जे, जैपूर मारवाडकर यांचे वकील होळकरांच्या येथें आहेत व रोहिल्यांचाही वकील तेथें आहे. तिकडून इकडे सर्वांस सूचना जाली जे, तुम्हीं सर्वांनीं मिळून पाटिलबावांस तिकडून उधळून द्यावें, लढाई घ्यावी, विचारास येईल. त्याप्रमाणें आगळीक केली असतां इकडून दक्षणेंतून उपराळा त्यांचा होत नाहीं. सरकारचें पाटिलबावांचें नीट नाहीं, होळकराचें नीट नाहीं, त्यापक्षीं असंतोष येथें वाटावयाचा नाहीं. त्यावरून तमाम परस्परें राजेरजवाडे नाजराचे व रोहिल्यांचे अनुमतें बादशाहा आदिकरून सर्वांस सूचना होऊन अवघ्यांनीं आम्हांवर जूट बांधली आहे. असो. आम्हीं आपले तोंडानें हा मजकूर बोलूं नये. तेथून जागजागां वकिलांच्या सूचना जाल्यामुळें राजेरजवाडे आपलाले घरीं स्पष्ट बोलतात. अखबारनवीस येथें लिहितात. त्यास येविसींचें निराकरण शत्रूचे दृष्टीस पडल्याखेरीज शोहरत* मोडत नाहीं. याजकरितां सरकारची फौज लवकर येऊन पोंहचावी. जमा होत जाईल ते वरचेवर रवाना व्हावी. फितूर भारी जाहल्यानें आजपावेतों श्रमसाहास केले ते विफल होतात, यास्तव फौज येण्यास दिवसगत लागूं नये. व राजश्री नाना यांनीं अथवा राजश्री तात्यांनीं इकडील स्वारीची अवाई पाडून गंगेपावेतों निदान ब्रह्माणपूरपावेतों आल्यानें, शत्रूचे दृष्टीस एकोपा पडून, सरकार मसलतीचा उपयोग होईल. कुमक पलटणें पाठवावयाविसीं इंग्रजांसही लिहिलें आहे. खासा कलकत्तेकर इंग्रज† प्रयागास आला. पुढें कानपुरास येणार. राजश्री सदाशिव मल्हार त्यांकडे रवाना केले आहेत. उत्तर आल्यावर समजेल. ते लोभी आहेत. उत्तर कसें लिहितात तें समजल्यावर पुण्यास लिहून पाठवायास येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadji complains of the perfidious conduct of Holkar in inciting his enemies against him and asks the Poona Darbar to expedite the dispatch of reinforcements to impress the enemy with their unity.*

---

* आवई. † कॉर्नवालिस.

No. 527 5th July 1788.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १ सवाल मुक्काम उज्जन, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—राजश्री पाटिलबावा यांचा निरोप घेऊन लष्करांतून निघाल्यावर ग्वालेरचे मुक्कामींहून विनंतिपत्र पाठविलें, तें प्रविष्ट होऊन चमलपारचें वर्तमान व माझे येण्याचा मजकूर श्रुत जाहला असेल. ग्वालेरीहून पुढें येतांना, वाटेनें पावसानें जागांजागां खोळंबा केला. त्यामुळें आठ दिवस अधिक लागले. जेष्ठ वद्य एकादशीचे दिवशीं मुक्काम मजकुरीं पावलों. सरकारांतून होळकर प्रकरणीं पाटिलबावांचे नांवें पत्र सादर जाहलें. तें मजला वाटेंत पावलें. तेथून लष्करांत पाठविलें. तें गंगाजी अव्हाड व विठ्ठल हरि कारकून यांनीं पाटिलबावांस प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें, तें सेवेसीं पाठविलें आहे, प्रविष्ट होईल. व चमेल पारचें वर्तमान चंद्र ९ व चंद्र १४ व चंद्र १५ रमजानचीं पत्रें गंगाजी व विठ्ठल हरि यांजकडून आलीं, तीं व पाटिलबावांचें पत्र माझे नांवें चंद्र १५ रमजानचें इस्माईलबेगाचें पारिपत्य होऊन आपल्यास यश आल्याचें आलें, तेंच बजिन्नस सेवेसीं पाठविलें आहे, त्यावरून वर्तमान निवेदन होईल. येथें राजश्री सदाशिवपंत फडणीस व बाळाजीपंत निाा मीर्जा आहेत, त्यांचींही पत्रें आलीं. इस्माइलबेगासीं लढाई फार भारी जाहली. तीन टोळ्या फौजेच्या, एक पलटणाची, याप्रमाणें लढाईचे समयीं करून, प्रथम तोफांची लढाई सुरू जाहली. त्यावर इस्माईलबेगानें चालून घेतलें. ते समयीं तीहींकडून फौजांनीं बेलाशक घोडे घालून खेत भारी जाहलें. पलटणें कापून काढून पन्नास पंचावन तोफा व बंदुका व निशाणाचा हत्ती, नौबतीचा हत्ती, अंबाऱ्याचे हौद्याचे एकूण सात आठ हत्ती वगैरे लूट फार आली. कित्येक लोक धरले. खासा इस्माइलबेगास एक तरवारीची, दुसरी भाल्याची जखम आहे. खासा जातीनें वीस रावतांनसीं पळून यमुनापार गुलामकादराजवळ गेला. त्याचे पाठीमागें फौजा गेल्या आहेत. ईश्वरें मोठें यश बावांस दिल्हें. फौजेनें लढाईची शर्त केली. तोफखान्यावर चालून घेऊन लढाई मारिली. शत्रचा पराभव जाहला. याउपर राणेखानभाई वगैरे सरदार फौजसुद्धां पार गुलामकादरावर जाणार. इकडील लोक लढाईंत ठार जखमी फार जाहले आहेत. त्यांची नांवनिशी मागाहून लिहून येईल. जिवाजी बल्लाळ बक्षी यांस छऱ्यांची जखम आहे. रवळोजी शिंदे जखमी आहेत. नारायणराव शिंदे कामास आले. वरकड आणखीही नामी

माणसें जखमी जाहले. पांच सातसें लोक ठार जखमी मिळोन जाहले आहेत. याप्रमाणें लष्करांतून वर्तमान उज्जनीस आलें आहे. या वर्तमानाचीं पत्रें सरकारांत चवदा दिवसांचे वायद्याचीं पाटिलबावांनीं रवाना केलीं आहेत, म्हणून गंगाजीनें लिहिलें आहे. सविस्तर इत्थंभूत त्यांनीं सेवेसीं लिहून पाठविलेंच असेल. आधींच पैक्याची ओढ भारी होती. परंतु इस्माइलबेगापुढें फौज उभी राहीना, येणेंकरून बोलावयास जागा होती. आतां पहावें. फौज पैक्याकरितां निकड करील. घोडीं माणसें ठार, जखमी, फार जाहलीं आहेत. याची तोड पडणें कठिण आहे. त्यामुळें फौजेची छावणी पार होईल किंवा चमल उतरोन अलीकडे येतील हें मागाहून सविस्तर लिहून येईल, तें विनंती करण्यांत येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the great victory over Ismail Beg.*

No. 528 10th July 1788.

पवस्ती छ ४ जिल्काद तिसा समानीन

श्रावण मास.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ शुद्ध ७ पर्यंत मुक्काम श्रीमथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, इस्माइलबेग लखनौस जाणार होता. त्यास इंग्रजांकडील कारभारी येलमास खोजा अंतरवेदींतील आहे, त्यानें साफच इस्माइल्यास सांगितलें कीं, तुम्हीं आमचे मुलुखांत न राहणें. राजश्री पाटिलबावांची व इंग्रजांची दोस्ती आहे त्यापक्षीं येथें राहावयाचें प्रयोजन नाहीं. त्यानंतर पुनः गुलामकादर याजपासीं येऊन, उभयतांचा विचार होऊन, इस्माइलबेग दिल्लीस गेला. तेथें यमुनापार होता. तेथून यमुना उतरोन, शंभर स्वारांनिसीं पातशाहाचे भेटीस जात होता. त्यास दिल्लींत हिंमतबहादर गोसावी वगैरे होते, त्यांनीं माघारा यमुनापार घातला. शहरांत येऊं दिला नाहीं व हजरतांची भेटही जाहली नाहीं. लढाई जाहलियानंतर पांच

सात रोज़ांनीं, राजश्री रायाजी पाटील व नवी फौज देशीहून आली ती सुद्धां पाटलांची रवानगी यमुनापार अंतरवेदींत गुलामकादर याजवर पाठविली. फौजेचा उतारा नावांवरून पार लागला हें वर्तमान गुलामकादरास कळल्यानंतर रामगडास जाऊन, किल्लयावरील तोफा चाळीसपर्यंत उतरून, गोसगडास पाठविल्या, आणि आपण दिल्लीकडे गेला. पडपडगंजचे मुक्कामीं दाखल जाहल्याचें वर्तमान येथें लिहिलें आलें. पातशाहाकडील रामरतन व शीतळदास वगैरे तीन असामी खिलत वस्त्रें घेऊन राजश्री पाटिलबावांकडे येणार आहेत. आल्यावर काय वर्तमान होईल तें सेवेसीं मागाहून लिहून पाठवूं. रणजितसिंग जाट भरतपुराहून चार हजार फौजेनिसीं परवां पंचमीस मंगळवारी* येऊन मथुरेच्या मुक्कामीं भेटी जाहल्या. रामगडासही ठाणें लौकरच बसेल. आंतील किल्लेदार आहे तो पांच सात हजार रुपये सिबंदी खर्चाचे मागतो. त्यास लौकरच हस्तगत होईल. राजश्री पाटिलबावांनीं रवळोजी शिंदे व भगीरथराव शिंदे यांजबरोबर तीन हजार फौज देऊन दिल्लीस रवाना केले आहेत. तेही आज उद्यां जाऊन दिल्लीस पोंहचतील. स्वामींस कळावें म्हणोन लिहिलें असे. मागाहून धारराव शिंदे यांस पाठविलें. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram communicates Gulam Kadar's movements in the direction of Delhi. Sindia advances upon Mathura.*

No. 529 16th July 1788.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १२ सवाल मुक्काम उज्जन, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—मी येथें आल्यानंतर विनंतिपत्र सेवेसीं पाठविलें, तें प्रविष्ट होऊन वर्तमान निवेदन जाहलें असेल. राजश्री पाटिलबावा यांचे फौजेनें स्माइलबेगाची लढाई मारल्यानंतर, फौज बारा पंधरा हजार राजश्री रायाजी पाटील वगैरे सरदार यमुनेपार उतरोन गुलामकादरखान याजवर शह दिल्हा. राजश्री राणेखानभाई व जिवाजी बल्लाळ बक्षी मथुरेवर होते. मागाहून पाटिलबावा खासा कुवारी नदीहून कूच करून चमेल उतरोन मथुरेस गेले. पुढें तोफखाना यमुनापार उतारा लागला आहे. मागाहून खासा पाटिल-

---

* ता. ८ जुलै १७८८.

बावा जाणार म्हणोन येथें वर्तमान आहे. पातशाहाकडून मातबर पाटिलबावांकडे येणार, येविसीं पूर्वी आपलीं पत्रें लष्करांतून आलीं. त्यांत मजकूर लिहून आला होता. हल्लीं पाटिलबावा चमेल उतरोन पार गेले. तेव्हां अनुसंधान लागलेंच असेल. राजश्री अलीबहादूरबावा महेश्वराहून कूच करून नालशाचे घाटानें धारेस येऊन, तेथून आषाढ शुद्ध नवमीस येथें उज्जनीस आले. भेटीस गेलों होतों. भेट जाहाली. चार दिवस येथें मुक्काम होता. पाटिलबावांच्या वाडयांत दोन तीन वेळ आले. मेजवानी जाहली. मागाहून राजश्री तुकोजी होळकर सुभेदार इंदुराहून कूच करून, सांवेर परगण्यांत येथून सहा कोसांवर आले. त्यांनीं राजश्री पाराजीपंत येथें पाठवून, अलीबहादर यांचें आषाढ शुद्ध द्वादशीचे दिवशीं कूच करून मेवाडचे मार्गे गेले. तिकडून सुभेदार येऊन यांच्या त्यांच्या भेटी, होळकरांकडील महितपूर येथून बारा कोस आहे, तेथें होऊन, उभयतां मेवाडाकडून जैपरचे मेंडावर* जाणार याप्रमाणें निश्चय ठरला. चार दिवस येथें होते तोंपर्यंत तेथें नित्य जात होतों. त्यांनींही पाटिलबावांच्या लष्करचें वर्तमान विचारिलें. सविस्तर सांगितलें. महेश्वराहून धारेस आले. तेथून पाटिलबावांकडील आमझरे म्हणून जागा आहे,—राजा तेथील निराळा आहे, परंतु खंडणी पाटिलबावांस देत असतो,—तेथील कारभारी कोणी बाहदर मशारनिल्हे यांजकडे फिर्याद गेली होती. त्यावरून खासा स्वारी आमझरेचे मुलखांत जाऊन, तसनस करून पांच रुपये खंडणी घेतली. बोभाट लष्करांत पाटिलबावांकडे गेला. तेथून परभारा स्वामींस पत्रें त्यांचीं आलींच आहेत. मजला पत्र आलें होतें, त्यांत स्वामींस विनंतिपत्र लिहून उत्तर आणवावें, म्हणून मजकूर होता. यास्तव तें पत्रच बजिन्नस सेवेसीं पाठविलें आहे. त्याजवरून भावार्थ ध्यानास येईल. उत्तर पाठवावयाविसीं आज्ञा सादर व्हावी. मेवाड प्रांतीं जाण्याचा विचार महेश्वरासच स्वारी असतां ठरला होता. मग अमझऱ्याहून वांकडे उज्जनीस येऊन फिरोन येथून तिकडे गेले. वाटेंत पाटिलबावांकडील माहालीं कही कबाडाचा उपद्रवही जाहला. हा बोभाट पाटिलबावांकडे मामलेदारांचीं पत्रें गेलीं असतील येविसीं आणखी त्यांचीं पत्रें तिकडून स्वामींकडे आलीं असतील, अथवा येतील. फौजेंत कितीही ताकीद असली, तत्रापि ज्या महालांतून फौज जाईल तेथें थोडा बहुत उपद्रव लागतच आहे. तींत कांहीं न लागावा म्हटल्यास उडोन तर जातां येत नाहीं. परंतु

* उंचवटचाची सरहद्द.

मामलेदारांची रीत आहे, थोडें फार करून दाखवावें. त्यांत माळव्याची रयत मशहूर आहे. मेवाडचे मार्गें जाण्याचें ठरलें असतां उलटून उज्जनीस येऊन फिरोन तिकडे गेले. हा फेर काय म्हणोन घेतला न कळे. येरवीं फौज जाईल तिकडून कही कबाडाचा उपसर्ग थोडाबहुत लागतच आहे. अलीबहादर व होळकर महेश्वरास चैत्रमासांत आले. तेथें दोन महिने मुक्काम जाहले. चमेलपार इस्माइल गुलामकादर एक जाहले. दीडशें तोफ, पलटणें वीस पंचवीस. फौज* कितीही असली तर तरवारची लढाई होते.तोफखाना भारी व पलटणें फार, त्यांजपुढें ग्रीष्मकाळांत इलाज चालेना. सबब अलीबहादर व होळकर यांची प्रतीक्षा फार करीत होते. महेश्वरास आल्याचें वर्तमान कळल्यावर पाटिलबावांनीं पत्रें येण्याकरितां पाठविलीं. शेवटीं आंबुजी इंगळे यांस मुजरद आणावयाकरितां पाठविलें. फौजेचें जुळणें व मनसब्यानें चालवणें, यामुळें समयास पावणें जालें नाहीं. पाटिलबावा विकलच होते. तों श्रीमंतांचे प्रतापेंकरून एकाएकीं पाटिलबावांस यश आलें. गुलामकादराचे मुलखांत फौज जाऊन उपद्रव लागून, मुलूख मारूं लागले. सबब गुलामकादर यमुना उतरला. राहिला एकटा इस्माइलबेग. त्याजवर भाई आदिकरून फौज चालून गेली. तोही तोफखाना व पलटणें सजवून, चालून जाऊन लढाई बरीच घेतली. ईश्वर बावांचे फौजेस अनकूल जाहला. इस्माइलबेगाचा मोड होऊन, तोफखाना, पलटणाच्या बंदुका, हत्ती घोडे, निशाणें, नगारे, डेरे देखील संपदा बावांचे फौजेंत आली. यांचें माणूस फार जाया जाहलें. या लढाईंत कोणी शरीक न होतां उलटा आमचा मुलूख मारतात असें चित्तांत आणून, बावांनीं विक्षेपाचीं पत्रें पाठविलीं. अलीबहादर यांचें बोलणें मार्गाचें आहे. होळकर हे मिळोन कोटचाचे मुलखांतून जातात. तिकडे गेल्यावर बावांच्या भेटी होऊन, अगर कागदींपत्रीं बावांचे सल्हेनें वर्तणूक जाल्यास, परस्परें स्वच्छता होईल. येविसीं बहादर व होळकर यांस वरचेवर पत्र जाऊन एकविचारें वर्तणक बावांची व होळकर बहादराची घडे असें जाहल्यास मग रहस्यच आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar criticises the dilatory and evasive methods pursued by the commanders of the relieving force, Holkar and Ali Bahadur. Instead of succouring Sindia, they were doing everything possible to weaken his position.*

* Mounted cavalry without artillery.

No. 530 13th August 1788.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० माहे जिल्कादपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतरी इकडील दरबारी वर्तमान तरी, इस्माइलबेग याची लढाई मारून फत्ते जाहल्याचें वर्तमान पेशजीं एकदोन पत्रीं सेवेसीं लिहिलेंच आहे, त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल. राणेखानभाई व राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांणीं इस्माइल्याचें पारिपत्य केल्यानंतर, आग्र्याहून कूच करून मथुरेस फौज सुद्धां आले. नवी फौज देशीहून आली होती, ती राजश्री रायाजी पाटील यांजबरोबर देऊन यमुनापार रामगडचे सुमारें पाठविलें. मागाहून राजश्री रवळोजी शिंदे व भगीरथराव शिंदे यांजला दोन तीन हजार फौजेनसीं रवाना केलें. मागाहून भाईंनीं व जिवाजी बल्लाळ यांनीं मथुरेहून कूच करून दिल्लीस जावें, तों फौजेनें खर्चाचा गवगवा केला. याखेरीज लढाईमध्यें घोडीं पडलीं त्याचा व जखम्यांचे खर्चाचा आड घातला. तेव्हां उभयतांचें जाणें थोडेसें विचारावर पडलें. तों राजश्री पाटिलबावांचीही स्वारी आपाढ शुद्ध प्रतिपदेस श्रीमथुरेस दाखल जाहाली. नंतर पुढें फौज पाठवावयाची तर्तूद करीत होते, तों गुलामकादर व इस्माइलबेग दिल्लीस गेले. पातशाहाकडील मौलवी अतुल्ला व रामरतन मोघी यांजला मथुरेचे मुक्कामीं हजरतांनीं पाठविलें कीं, तुम्हीं जाऊन राजश्री पाटिलबावांसीं बोलून, फौज लौकर पाठवून बंदोबस्त करावा, अगर खासा स्वारीनिसीं यावें. त्यास, पातशाहाचें राजकारण निखालस इकडे होतें; परंतु नाजरखोजा* सारा कारभार हजरतापासीं करितो, त्याचें व राजश्री पाटिलबावांचें चित्त शुद्ध पहिल्यापासून नाहीं. याजमुळें नाजरानें जलदी करून आपली फौज दिल्लीस जाऊन पावली नाहीं, तों गुलामकादर व इस्माइलबेग यांजला दिल्लींत घेतलें. तों याच्यापूर्वी रवळोजी शिंदे यांची रवानगी केलीच होती, तेही जाऊन दिल्लीस पोंहचले. तेव्हां यांची त्याची परस्परें लढाई व्हावी, तरी आपली फौज

* नाझीर, मंझूर आली.

थोडी आणि रोहिल्यांची फौज भारी, याजमुळें रवळोजी शिंदे यांचा टिकाव न जाहला. तेव्हां फरिदाबादेस माघारें आले. तेव्हां दिल्ली मोकळी सहजच पडली. हें वर्तमान येथें येतांच पलटणें पुढें रवाना केलीं. तों गुलामकादर यानें शहरचा बंदोबस्त व पातशाहातीचा बंदोबस्त केला, आणि हजरतास कैद केलें; आणि तमाम दौलत जडजवाहिरासुद्धां नाणें व रोकडसुद्धां घेतलें; व जनानेयाचाही झाडा घेऊन बेगमांस मार दिल्हे; व कित्येकांवर जुलूम जाजतीही केली; आणि बेगमा जनानखान्यापैकीं दहा पांच रोहिल्यानें आपले गोसगडास पाठविल्या. ऐसी अनेक प्रकारची बेअदबी केली ती पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. सारांश गोष्ट, पातशाहात बुडाली. पांचशें वर्षें दिल्लीचे पातशाहातीस जाहालीं, परंतु गुलामकादर यानें बेअदबी केली याप्रमाणें कोणींच केली नाहीं. एक आपली फौज लवकर जाऊन पोंहचली नाहीं यास्तव इतक्या गोष्टी घडल्या. फौजेचा गरगशा* बहुत पडला आहे. लोकांची समजूत एकमासपर्यंत येथें आलियापासून होतच आहे. परंतु अद्याप तोड पडोन, शत्रूचे पारिपत्यास फौज जाऊन पावत नाहीं. पुढें ईश्वरइच्छेंकरून काय घडेल तें पाहावें. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व राजश्री अलीबहादर इस्माइल्याचे लढाईचें वर्तमान कळल्यानंतर इंदुराहून कूच करून मजल दरमजल मेवाड प्रांतांतून, कृष्णगडास मारवाडी यांनीं मोर्चे लाविले आहेत तेथपर्यंत जाणार. राजश्री पाटिलबावांनीं सुभेदारांस व अलीबहादर यांजला इकडे येण्याविषयीं पत्रें बहुत पाठविलीं व त्यांचे आड मुद्दे होते तेही लिहून पाठविले. तत्रापि उभयतांचें येणें न जाहालें. पुढें बाजत बरसात† एकत्र होतील तर न कळे. अलीबहादर यांणीं माळव्यांतील महाल आमझरें व रतलाम वगैरे येथील घासदाणे व खंडण्या घेतल्या व कांहीं गांवही लुटले, एविसींचें वर्तमान पेशजीं सेवेसीं लिहिलेंच आहे, त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल. सारांश, ईश्वरी सत्तेपुढें उपाय कोणाचाही नाहीं. बाकी चाळीस हजार फौज आज रोजमऱ्यास असोन एक पैक्याखेरीज यश आलेलें गमावून, शत्रूचा पराजय जाहला असतां मागतीं शत्रू बळावून पातशाहातची खराबी केली. पुढें फौज दोहों चौहों रोजीं रवाना करावी हा निश्चय जाहला आहे. परंतु फौज जाईल तेव्हां खरी. पहिला पातशाहा शाहाअलम तक्तीं बसला होता, त्यास हल्लीं गुलामकादर यानें कैद केला; आणि दुसरा पातशाहा, अहमदशाहा पातशाहा मागें होता त्याचा लेक, महंमदशाहा,

* गोंधळ, घोटाळा. † पावसाळ्यानंतर.

हल्लीं पातशाहातीवर बसविला. त्याजपासून दहा लक्ष रुपये तक्तीं बसल्यानंतर गुलामकादर याजला द्यावे ऐसा करार हल्लीं पातशाहातीवर बसविला आहे त्यांणीं करार केला आहे. परंतु अद्याप ऐवज दिल्हा नाहीं. सबब गुलामकादर यानें त्याजला दहा लक्ष रुपयांकरितां हजरतास तगादा केला आहे. या माणें वर्तमान दिल्लीचें जाहालें. हें सेवेसीं कळावें म्हणन लिहिलें आहे. वरकड होईल वर्तमान तें सविस्तरें मागाहून सेवेसीं लिहून पाठवूं. बहुत त्याहावें तरी पाल्हाळ दिसतो, म्हणून थोडक्यांतच विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana the sudden march of Gulam Kadar on Delhi, and the atrocities committed by him on the imperial household.*

No. 531 18th August 1788.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ जिल्काद मुक्काम उज्जैन स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री पाटिलबावा यांचे लष्करांतून राजश्री विठ्ठल हरि व गंगाजी अव्हाड यांचीं पत्रें बातमीचीं आलीं, तीं सेवेसीं पाठविलीं आहेत, त्यांवरून तिकडील वर्तमान श्रुत होईल. मजला येथें उज्जनीस येऊन दीड पावण दोन महिने जाहले. रोजमऱ्याचे ऐवजाची वरात माळव्याचे मामलेदारावर दिली होती, तो ऐवज पटत नाहीं. मामलतीची घालमेल होऊन ज्या मामलेदाराकडे वरात होती त्याची मामलत तगीर होऊन दुसरीकडे जाली. सबब वरातीस हिसका बसला. माझे स्वारीखर्चाबाबद व कैलासवासी कृष्णराव महादेव भावे यांच्या स्वारीखर्चाबाबदचें देणें, त्या सावकारांचे तगादे, त्यांची तोडजोड पाडल्याखेरीज निघणें होत नाहीं. यास्तव येथें राहून मागतीं पाटिलबावांकडे लष्करांत पत्रें पाठविलीं आहेत. उत्तराची वाट पाहतों. सरकारच्या पांचा लाखांच्या वराता पाटिलबावांनीं मजसमागमें दिल्या आहेत. त्यांत बऱ्हाणपूर, खांडवे, हांडे व यावल चार महाल भुसकुट्यांकडे होते, त्यांचे नांवें वराता दिल्या. हल्लीं यांजकडून दूर होऊन बऱ्हाणपूर विनायक विठ्ठल याजकडे जाहलें, तेव्हां खांडवे व हांडे राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांजकडे जाहलें. तेव्हां सरकारच्या वरातांचा पैका कोणास मागावा? भुसकुट्यांची तों तगिरी

जाहली. सरकारच्या ऐवजास दिकत पडल्यास श्रीमंत शद्ध ठेवितील, याप्रमाणें पाटिलबावांस लिहून पाठविलें आहे. उत्तरें अद्यापि आलीं नाहींत. आल्यावर येथील देण्यापासून सुटोन सेवेसीं येतों. गुलामकादरखान व इस्माईलबेग एक होऊन जमीयत भारी केली आहे. पातशाहा कैद केले. त्यांचा माल खणतात. भ्रम पातशाहाचा आहे. पाहावें. पैका मोगल्याचे हातीं लागल्यावर जमतील. मसलत भारी पडेल. ये समयीं होळकर व अलीबहाद्दर जलदीनें पाटिलबावांच्या मसलतीस सामील जाल्यास बरें आहे. पुढें भारी पडेल. सांप्रत होळकर व अलीबहाद्दर मेवाड प्रांतांत आहेत. त्यांचीं पत्रें सेवेसीं येत असतील. उजनींत जोड्या डाकेंत सात आहेत. फौज लांब गेली. तितक्या जोड्या पुरत नाहींत. आणखी जोड्या पाठवावयाविसीं आज्ञा जाली पाहिजे. जोड्याखेरीज वर्तमान लौकर येत नाहीं. दहा जोड्या तरी आणखी आल्या पाहिजेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports the bloody search for treasure made by Gulam Kadar, and says that Holkar's relieving force had not advanced beyond Mewad.*

No. 532 28th August 1788.

श्री

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाइत चंद्र २५ जिल्काद मुक्काम उज्जैन स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री पाटिलबावा यांचे लष्करांतून गंगाजी अव्हाड व विट्ठल हरि यांचीं पत्रें चंद्र १० जिल्कादचीं आलीं, तीं सेवेसीं पाठविलीं आहेत. त्यांवरून तिकडील वर्तमान निवेदन होईल. पाटिलबावांचे येथें पैक्याची अडचण आणि मसलत तों नेटाची प्राप्त जाणोन, सांप्रत फौजेस पैका द्यावयास नाहीं त्याअर्थीं मुलूक जाहागीर लावून देतात. राजश्री धारराव निंबाळकर यांस पाठविलें. यावल प्रांत खानदेश महाल त्यांजकडे दिल्हा. माळव्यांतील महालीं एका दोघांस सनदा दिल्ह्या. ग्वाल्हेर प्रांतांत सरंजाम देतात, परंतु लोक घेत नाहींत. लाचारी जाणोन देश माळवे प्रांतीं देतात. पैक्याचे ओढीमुळें ह्या तोडीजोडी आहेत. पुढें पहावें. गुलामकादर रोहिल्यानें बादशाहासीं फार अमर्याद केली. इस्माइलबेगनें दिल्ली शहर लुटून फन्ना केलें. बादशाही माला-

करितां गुलामकादरासीं वाद सांगू लागला. तेव्हां दोन हजार रुपये दररोज द्यावयास केला असें ऐकतों. पैक्याचें बळ जालें. आतां बहबाहे*(?) होऊन चाल करतील. यास्तव पाटिलबावांनीं आपले फौजेचे समजुतीस मुलूक द्यावयाची तोड विचारिली आहे. होळकर व अलीबहादर शादडी प्रांत मेवाड येथें मुक्काम करून आहेत. त्यांजवळ अद्यापि कोणी जमा होत नाहीं. ते फौजेची वाट पाहत आहेत. साहेबखान टोक्या भाईपासून उज्जनीचा निरोप घेऊन आला, तो परभारा खानदेशांत जाऊन, डांगरी परगण्याचे शिरसाल्याची गढी दग्यानें घेऊन, तेथील बंदोबस्त करून, आपण पुण्यास दरबारीं आला आहे. बाकी मजकूर पूर्वी दों पत्रीं विनविला आहे. महादजी पाटील बावीकर साहेबखान टोक्याचे आणावयाकरितां सेवेसीं आले आहेत. लष्करांतून भाईनींही सेवेसीं पत्रें पाठविलीं असतील. येविसीं भाईची खातर आहे. याजकरितां मशारनिल्हे यांस ताकीद होऊन भाईकडे जाण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

Sadashiv Dinkar reports the sack of Delhi by Gulam Kadar and the difficulties Sindia was experiencing in marching his army to relieve the city owing to want of funds.

No. 533 24th September 1788.

पै॥ छ २ मोहरम तिसा.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २३ जिल्हेज मुक्काम उज्जेन स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेषः—गुलामकादरखान यांणीं पातशाहाची अमर्यादा करून डोळे काढून महमदशाचा नातू तख्तीं बसविला होता. ऐलीकडे वर्तमान ऐकिलें कीं, त्यासही कैद करून खासा आपण तख्तीं बसणार. नाजरखोजास कद करून त्याचें घर लुटलें. चाळीस पन्नास हजार रुपयांची मालियत निघाली, ते इस्माईलबेगास देऊन त्याची समजूत पाडली. परंतु तो अद्याप समजला नाहीं. आंतून परस्परें वाकडें आहे असेंही बातमीचे वर्तमानांत आहे. सारांश, पृथ्वीपतीची असी अमर्यादा आजपावेतों कोणी केली नवती. राजश्री पाटिलबावा मथुरेवर आहेत. फौज कांहीं दिल्लीकडे आहेच. मागाहून आणखी सरदार

---

* बदराह—कुमार्गी.

रवाना होणार. पैक्याची अडचण भारी आहे. त्याजमुळें मसलतीचें कसें पडेल पाहावें. आजपावेतों जसी तसी थोप* संभाळली, परंतु याउपर पैक्याची ओढ दिवसेंदिवस भारीच आहे. होळकर व अलीबहादर शादडी मेवाड प्रांतीं मुक्काम करून आहेत. तूर्त पाटिलबावांकडे जाण्याचें मानस उभयतां सरदारांचेंही दिसत नाहीं ह्मणोन ऐकतों. दुसरें, पुण्याकडील वर्तमान येथें लोक बोलतात कीं, कांहीं गलबल जाली होती. परंतु बातमी श्रीमंतांस कळतांच बंदोबस्त होऊन दोन चार गृहस्थ किल्लचावर घातले. त्यास तेथील गलबलीचें वर्तमान ऐकिल्यापासून अंतःकर्णास चैन पडत नाहीं. स्वामींकडून ऐलीकडे पत्रही आलें नाहीं. तरी ल्याहावयासी आज्ञा जाली पाहिजे. पुण्याहून पत्रें पाटिलबावांकडे फार जात असतात, तें प्रमाण मानूं नये ह्मणोन बहुत वेळ बोलण्यांत आणिलें. परंतु खमीरच तसा पडला, उपाय काय? आतां कांहीं फंदफितूर जाला असला तर तेथें लिहिणार काय लिहितील? ओढघस्त आणि मोहिमेचा पेंच. अगोदर विमनस्क. पाटिलबावांचें शरीर विकल. वृत्ति त्यांतच निमग्न असते. तशांत हे फितुराची विकलता प्राप्त जाल्यास काय मनांत आणितील कळेना. यास्तव तेथील फितुराचें वर्तमान कळल्यासारखें पाटिलबावांस लिहून विकलता दूर करणें प्राप्त आहे. यास्तव पत्रीं वर्तमान लिहिण्याविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The blinding of the old Emperor, the insults inflicted on the inmates of the Royal Household by the Gulam and his split with Ismail Beg are reported to Nana by Sadashiv Dinkar.*

No. 534 3rd October 1788.

पैवस्ती चंद्र १० मोहरम तिसा समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र २ मोहरम मुक्काम उज्जन, स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—राजश्री पाटिलबावा यांचे लष्करांतून राजश्री विठ्ठल हरि व गंगाजी अव्हाड यांचीं पत्रें आलीं, तीं पाठविलीं आहेत. त्यावरून

*मर्यादा, अब्रची जतन.

तिकडील वर्तमान सविस्तर निवेदन होईल. दुसरें वर्तमान येथें लोक दाट बोलतात कीं, पुण्यांत कांहीं फितूर जाहला होता. परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापें हरामखोरांचीं पारपत्यें होऊन बंदोबस्त जाहला. याप्रमाणें दहाबारा दिवस जाहले, वर्तमान येथें आलें. आणखी एके दोहों जागेहून कोणी गृहस्थ आले गेले, त्यांनींही सांगितलें. तेव्हांपासोन अंतकरण व्यग्र जाहलें आहे. अलीकडे सरकारचीं पत्रेंही आलीं नाहींत. लौकिकांत अवयी उठली आहे त्यापक्षीं कांहीं असेलसें वाटतें. वर्तमान जागांजागांहून याच अन्वयें आलें. येथें आलें तेव्हां लष्करांतही जाईल. सरदार मसलतसीर. अधींच वेध मसलतीचा. खर्चाचे अडचणीचा. त्यांत ह्या अवया गेल्यावर हिंमत कच्ची पडून सरकारचे मसलतीस एखादें व्यंग पडेल. पत्रें फार दिवस आलीं नाहींत. त्यास, फितुराचें वगैरे सविस्तर वर्तमान पाटिलबावांस कळलें पाहिजे. यास्तव लिहावयासी आज्ञा जाहली पाहिजे. मर्जीस आलें तर पाटिलबावांसही पत्र या मजकुराचें यावें म्हणजे चित्त स्वस्थ होईल. कांहीं नसतां लोक मनस्वी पुण्याहून लिहीत असतात. आतां कांहीं जाहलें असेल तर लिहितीलच. कळून व्यग्रता मनांत येईल. कांहीं नसलें तर लिहावयाचें प्रयोजन नाहीं. इस्माइलबेगची लढाई मारली, त्याविसीं सरकारचें गौरव पत्र आलें नाहीं, म्हणून उस्मरा करीत आहेत. तरी पत्र पाठवावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar makes anxious inquiries about the dastardly attempt on the life of Nana.*

No. 535 8th October 1788.

राजश्री सदाशिव दिनकर गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरीः—बादशाही जागा सरकारांत ठेवावा हें आमचें बोलणें आहे तेंच आहे. हल्लींही अलीबहादर यासीं याच अन्वयें पत्रें यावीं येविसीं तुम्हीं बोलणें. अलीबहादर यांस ठेवून सरकारचा बंदोबस्त करावा म्हणतां, त्यास आजपर्यंत तुम्हीं बंदोबस्त केला, त्यांत किफायत काय जाहली? उलटें कर्ज सरकारावरी जाहलें, हें सरकारांतून तुम्हापासीं बोलतील. तरी याचें उत्तर तुम्हीं करणें. बादशाहींत इंग्रजांनीं आपला पाय घालावा असें केलें होतें. तेव्हां इंग्रजांकडून राजकारण तोडणें पडलें त्यास, व बादशाहा आपले काबूंत करणें यांसी, व बादशाहींत खुळें हमदानी, अफरासियाब, अबदुल हयादखान, वगैरे होतीं

तीं मोडणें यांस खर्च, व बादशाहाचा खर्च जातीचा वगैरे मनस्वी, व स्वारीसमागमें बादशाहास बाळगणें पडलें त्याचा खर्च, व पलटणें व मोगले वगैरे हिंदुस्थानी फौज व बादशाही सरदार प्राचीन चाकर होते त्यांच्या जायदादी वगैरे खर्च जसा होता तसा चालवणें पडला. बादशाही मुलकांतच इतकाही खर्च फिटता, परंतु काळामुळें मुलूक दरोबस्त उजाड जाहला, माणसें बहुतेक मेलीं, यामुळें सोय न पडली. कर्ज खाऊन बंदोबस्त करणें पडला. इतःपर खुलें मोडलीं. बादशाहाचा खर्च जसा ठेविला तसा आपले काबूंत आहे, व मुलखाचीही लावणी केली आहे. पूर्ववत् बंद बसोन फौज व दिल्लीचा खर्च संस्थानचा आदा होईल असें आहे. जो राहील त्याजकडूनच तर्तूद व्हावी. आमचें बोलणें पहिलेपासून बादशाही मुलक सरकारांत असावा हेंच आहे. याकरितां लिहिलें आहे. रा छ ७ मोहरम सुा तिसा समानीन मया व अल्लफ. हे विनंती.

¶*Mahadji explains to Sadashiv Dinkar how he had made the task a Delhi quite a pleasant one for his successor by triumphing over numerous difficulties. He asks him to request the Poona Darbar to transfer the charge of the Delhi affairs to Ali Bahadur.*

No. 536 8th October 1788.

पुरवणी राजश्री सदाशिव दिनकर गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—बादशाही जागा महाल सरकारांत ठेवावे, हें आमचें बोलणें आहे तेंच आहे. हल्लींही अलीबहादर यांस याच अन्वयें पत्रें यावीं, येविसीं तुम्हीं बोलणें. अलीबहादर यांस ठेऊन सरकारचा बंदोबस्त करावा म्हणतां, त्यास तुम्हीं आजपर्यंत मेहनत केली, तुमचा तुम्हीं बंदोबस्त राखावा. सरकारांतून उपराळा न पोंहचतां तुम्हीं बंदोबस्त राखिला, हल्लीं सरकारांतून बंदोबस्त करावा असें म्हणतील. असें तरी बोलणारच नाहींत. कदाचित बोलले तरी याचीं उत्तरें तुम्हीं करणें. आजपर्यंत मेहनत केली ती सरकार नक्ष राहून हिंदुस्थानांत इंग्रजांचा पाय न शिरला. मुलखांत दस्त होईल तिथवर करावा, याच अर्थें केली. हे अर्थ सारे देशीं येऊन श्रीमंतांस श्रुत करावे, आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी, असें होतें. परंतु तेथें भास आणखी प्रकारचा पडत गेला. तथापि चिंता नव्हती. समक्ष आल्यानंतर सर्व समजतें. दरम्यान फितुरानें

मसलत विलग पडली. यामुळें गोष्टी विलग पडल्या होत्या. परंतु आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांसीं होती. त्यानें सर्व पार पडून, पूर्वी होता त्यापेक्षां बंदोबस्त जाहला. फितुरी दूर जहाले. खर्चही बादशहा आदिकरून सोईवार पडले. याकरितां सरकारांतूनच बंदोबस्त व्हावा व आमची फौज पैसाच देण्यास नाहीं तेव्हां रहाती कशी ? आणि ज्या गोष्टीनें तेथें संशय पडतो, ती गोष्ट करावयाचें कारण काय ? तुम्हांसीं बोलले तरी हेंच उत्तर करणें, आणि अलीबहाद्दरास पत्रें परभारें जलद पाठवीत तें करणें. एकटे अलीबहाद्दर राहिल्यानें बंदोबस्त कसा रहातो हें म्हणतील, त्यास आजपर्यंत आम्हीं राहून बंदोबस्त राखिला. इतःपर होळकरांनीं आपले सरंजामानसीं राहून चाकरी करावी. उभयतां सरंजामासुद्धां राहिले असतां इकडील बंदोबस्त राहील याचें अशक्य काय आहे ? आमचें बोलणें सरकारांत हा मुलूख रहावा हें पूर्वीपासून आहे व बंदोबस्तही तसाच राहिला आहे. याउपर अलीबहाद्दर यांची पुस्तपन्हां होळकर यांनीं करावी, अथवा सरकार मर्जी होळकर व अलीबहाद्दर मिळोन बंदोबस्त करावा, असें असल्यास आमचा आग्रह नाहीं. सारांश, जलद बंदोबस्त व्हावा. रा छ ७ मोहरम सुा तिसा समानीन मया व अल्लफ. हे विनंती.

¶*Sindia complains of weariness and asks Sadashiv Dinkar, who was going to Poona, to request the Darbar to appoint some other person to relieve him of his onerous duties.*

No. 537 8th October 1788.

राजश्री सदाशिव दिनकर गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—इस्मइालबेग व गुलामकादर एकत्र होऊन दिल्लींत नाजर व मोगले यांचे फितुरानें शिरोन बादशाहास दग्यानें धरून डोळे काढिले; अमर्याद केली; व बादशाही किल्ला वगैरे मालमालियत गुलामकादर याचे हातीं लागोन बळावला. त्याची उपेक्षा जाहल्यास दिल्ली संस्थान त्याचे हातीं लागेल, त्याजवर जड* बांधोन कोणासच मोजणार नाहीं, अशांत पारपत्य केल्यास पुढें फौजा इकडे निवेध रहातील, व जसें कळेल तसें पारपत्य उभयतांचें करून दिल्ली संस्थान हातीं लागावें, सरकार नक्ष रहावा, याकरितां फौजा रवाना करावयाची योजना केली. प्रस्थान मुहूर्तेंकरून डेरा बाहेर दिल्हा. कूच करावें

* भांडवल, मूळ आधार.

तों लोकांनीं पोटाचा व पडल्या घोड्याचा व जखम्याचे खर्चाचा वगैरे गवगवा मनस्वी केला. त्यांचे मुद्याप्रमाणें द्यावें, तरी गुजराथचे स्वारीपासोन मसलती फिरंगी, ग्वाल्हेर, गोहद आदिकरून इकडे आल्यापासून पडत गेल्या. एक दिवस सुभता* पडला नाहीं. यामुळें अत्यंत पैशाची ओढ पडली. ती वारंवार पुण्यास लिहिण्यांत आलीच आहे व परस्परेंही राजश्री बाळाजीपंत नानांस समजतच असेल. तथापि आजपर्यंत हिंदुस्थानांत शत्रूंचीं पारपत्यें होऊन नक्षच सरकारचा रहात गेला आहे. त्यांत उणें न पडावें यास्तव लोकांच्या मिनती न करावयाच्या त्याही प्रसंग जाणोन केल्या. सावकार मिळाला त्याची खुशामत करून, कर्जवाम आडले वेळेस जसें मिळालें तसें घेऊन, लोकांस दिल्हें, आणि दिल्लीस उभयतांचे पारपत्याकरितां रवाना केलें. अगोदर चिरंजीव रवळोजी शिंदे व भगीरथराव शिंदे व पलटणें दिल्लीपासून दहा अकरा कोसांवर मुकाबल्यास ठेविलींच होतीं. मागाहून फौजेची रवानगी जाहाली, व पार अंतरवेदींत फौज रवाना केली, ती दिल्लीचे पार पोहोंचली. दरोबस्त गुलामकादराचीं ठाणीं उठवून अंमल आपला केला. गोसगडपर्यंत लुटोन ताराज केलें. दोन्ही तोंडें दावलीं. रसद बंदही होत चालली. तेव्हां गुलामकादराचे हातीं दिल्लींतील माल आमाल लागला होता तो घेऊन, गोसगडाकडे जावयाचा विचार करून उतारा लाविला. तेव्हां निकड करून पारपत्य करणें हेच फौजेस ताकीद केली. उभयतांत फूट पाडून फोड तोड करावी, हें राजकारण जाहल्यास पारपत्यास हलकें पडेल, यास्तव नाद इस्माइल्यासीं लावून ठेविला होता. त्याणें मुद्दे, मुलूख वगैरे नगदीचे घातले, ते कबूल करून उमेदवार केले. उभयतांचें जूग फोडलें, आणि फौजेस ताकीद बेलाशक किल्लचाखालीं असल्यास आमचा आग्रह नाहीं?. सारांश, जलद बंदोबस्त जाऊन मोर्चे लावणें म्हणोन केली. त्यावरून फौजा पलटणें किल्लचाखालीं रेतींत गाजुदीखानाचे हवेलीनजीक जाऊन मोर्चे लागू केले. अलीकडे जुन्या किल्लचांत गुलामकादराचें ठाणें होतें, तो किल्ला घेऊन आपलें ठाणें कायम केलें. इकडील मोर्चे कायम जाहले. इस्माइलबेग उमेदवार केला होता तोही शहरांत होताच. जागजागां नाकेबंदी करून किल्लचास मोर्चे बसविले. तोफ चालू केली. इकडील सरदार रवळोजी शिंदे व भगीरथराव शिंदे व हिंमतबहादर गोसावी वगैरे गेले होते; त्यांजकडे इस्माइलबेगानें आपले मातबर पाठवून भेटला. गुलामकादर याणें उतारा अगोदर किल्लचाखालीं किल्लचाचे माराखालीं लाविला होता.

* शांतिसुखाचा.

कांहीं सरंजाम पार उतरला. तिकडून पारचे फौजेनें त्यास ताण बसवावा तरी अंतर त्याचे व आपले फौजेस ती कोसांचें; परंतु हिंडन नदी दरम्यान, तीस पूर मातबर झड लागल्यामुळें येऊन उतार मोडला. नावा नदीस नाहींत यामुळें पार उतरण्यास सवड सांपडली. सात आठ हजार लोक त्याचे पार उतरले होते. किल्लचांत दहा हजारपर्यंत होता. मोर्चाची निकड बसतांच लोक किल्लचांत ठेवून, गुलाम कादर आपण नावेंतून पार उतरून, त्याची फौज होती त्यांत गेला. मोर्चे कायम आहेत. एका दों दिवशीं किल्ला खालीं होईल. परंतु त्याचा पिच्छा करावा याकरितां नावा येथून रवाना केल्या आहेत. पार फौज आहे ती व इकडील फौज उतरून त्याचें पारपत्य करतील. दिल्ली रोहिल्याचे हातीं लागल्यामुळें थोडीशी गोष्ट विलग* पडली होती. परंतु श्रीमंतांचे प्रतापें पूर्ववत् बंदोबस्त सरकारचा बादशाही याउपरी करणें तो करावा असें आहे. परंतु या उपरी आमचे लोक कोणी रहाणार नाहींत. याचें कारण पैशाची ओढ. नाहीं तरी बंदोबस्त आजपर्यंत खस्त खाऊन केला. मुलूख काळामुळें पडला होता, तो कौल बिन तगाई देऊन लाविला होता. दरम्यान फितुरामुळें मसलत फसली होती, तीही सरकार नक्ष राहून सुधारली आहे. इतःपर राहून बंदोबस्त करण्यास जडही पडावयाचें नाहीं. होळकर व अलीबहादर महेश्वरीं आलियापासोन पत्रें जलद येण्याविसीं पाठवावयाचीं तितकीं पाठविलीं, परंतु त्यांचे येण्याचा विचार अद्यापि समजत नाहीं. इकडे यावयाचा मार्ग सोडून उदेपुराच्या रानांत गेले. सांप्रत तेथें राजकारण होऊन मामलती चुकतात. तेव्हां त्यांचें येणें समजतच आहे. अद्यापिही पत्रें दररोज येण्याविसीं जातच आहेत. आलियास सांप्रत बंदोबस्त सर्व प्रकारें जाला आहे. एक फौज पार शिखांचे तोंडावर व एक दिल्लींत राहिल्यानें जावता राहील. आम्हांस एक पैशाची ओढ. दुसरें, लोकांस बहुत दिवस जहाले, इतःपर राहण्यास कोणी तन देणार नाहींत; तरी पत्र पावतांच तुम्हीं राजश्री बाळाजीपंत नानांसीं बोलोन, अलीबहादर व होळकर यांसीं जलद येऊन पोंहचणें, म्हणोन पत्रें रवाना होत तें करणें. येथून पत्रें लिहिण्याची पराकाष्टा जहाली. याकरितां लिहिलें आहे. तरी जलद पत्रें उभयतांस पोहोंचत तें करणें. रवाना छ ७ मोहरम. तुम्हीं अद्यापि उज्जनींत. हें काम निकडीचें जाणोन राजश्री बाळाजी जनार्दन यांसी व भाईचे जांवई टोके पळोन गेला त्या

* विरुद्ध.

कामाकरितां राजश्री रामजी पाा पुण्यास पाठविले आहेत, त्यांसही लिहिलें आहे. तरी ते व तुम्हीही जलद पोंहचोन, लिहिल्याप्रमाणें बोलोन उत्तरें व अलीबहादूर यांस पत्रें पाठवावीं. छ मजकूर सुा तिसा समानीन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji drives Gulam Kadar out of Delhi and sends a division in his pursuit. His great difficulty is lack of funds for paying his troops. He expresses his desire to be relieved of the heavy responsibilities of the Delhi affairs.*

No. 538 8th October 1788.

पैवस्ती छ २७ सफर सन तिसा

समानीन कार्तिक मास.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ माहे मोहरमपर्यंत श्रीक्षेत्रमथुरा येथें स्वामींचें कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासीं आज्ञा जाहाली पाहिजे. यानंतर इकडील दरबारीं वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांची खासा स्वारी अद्याप मुक्काम मजकुरींच आहे. पुढें मसलतीनुरूप कोणीकडे जाणें घडेल तें पाहावें. गुलामकादर रोहिला व इस्माइलबेग एकत्र होऊन, दिल्लीस फौज सुद्धां जाऊन, पातशाहास कैद करून हजरताची दौलत झाडून हस्तगत करून, त्यानें आपले गोसगडास पाठविली, व जनानखान्यांत जाऊन बहुत बेअदबी केली, व पातशाहाचे डोळेही काढले, वगैरे वर्तमान पेशजीं एक दोन रवानग्यांत लिहिलेंच आहे. त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल. उभयतां हरामखोर यांनीं दिल्लींत दंगा बहुत केला. यास्तव त्यांचे पारिपत्यास येथोन राणेखानभाई यांजबरोबर तमाम फौजा देऊन दिल्लीस रवाना केले आहेत. राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी मागें येथें लोकांचे समजुतीस्तव राहिले होते. त्यास लोकांची समजूत थोडी बहुत पडोन, मशारनिल्हेनींही कूच करून, मजल दरमजल राणे-खानभाईकडे गेले. दिल्लीचे आसपास आपल्या फौजा तमाम जमा जाहल्या

आहेत. परंतु अद्याप हरामखोरांचें पारिपत्य जाहालें नाहीं. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें-करून पारिपत्य लौकरच होईल. गुलामकादर याजवर फौजा भारी गेल्या, याजमुळें त्यांनीं आपला सरंजाम झाडून घेऊन, दिल्ली सोडून यमुनापार जाऊन उतरला आहे. इस्माइलबेग आजपावेतों गुलामाकडेच होता. मध्यें याचें त्याचें न बने, तेव्हां इस्माइल्यानें आपल्याकडे राजकारण लाऊन, हिंमतबहादर गोसावी, हल्लीं आपल्याकडे दिल्लीस रवळोजी शिंदे वगैरे सरदार लहान मोठे प्रथम राणेखानभाई गेल्याचे पूर्वी गुलामकादर याचे मोहल्यावर पाठविले आहेत, त्यांचे मार्फतीनें यांजकडे येऊन मिळाला आहे. पुढें त्याचा इरादा कोणता आहे हें समजत नाहीं. परंतु तूर्त गुलामकादर याजला सोडून सलूख करून आला आहे. मग काय घडेल तें पहावें. आपल्या फौजा दिल्लीकडे रवाना केल्या आहेत. त्याजपैकीं राजश्री रवळोजी शिंदे वगैरे सरदार मिळोन पांच चार हजार फौज, शिवाय पलटणें ऐशी मिळोन, दिल्लीचे शहरांत जाऊन दाखल जाहाले. गुलाम कादर यानें पातशाहाचे वाड्यांत बंदोवस्त करून आजपर्यंत तेथेंच होता. हल्लीं आपल्याकडील फौजा गेल्या याजमुळें त्या वाड्याची मजबुदी करून निघोन यमुनापार गेला. त्या वाड्यास हल्लीं आपले फौजेनें घेरा घातला आहे. अद्याप हस्तगत जाहाला नाहीं. परंतु हस्तगत लौकरच होईल. सारांश, तो सांभाळून पार गेला आहे, मग पुढें काय घडेल तें पहावें. हरामखोराचे पाठोपाठ आपल्याही फौजा यमुनापार उतरत आहेत. तिकडे फौजा जमा जाहल्यावर मग तो तेथेंच ठरेल किंवा निघोन जाईल तें पाहावें. राजश्री पाटिलबावांनीं इकडील मसलतीचा विचार करून स्वामींस तपसीलवार मजकुराचीं पत्रें लिहिलीं आहेत, व येविसीं राजश्री बाळाजीपंत जामगांवकर व राजश्री पाटील यांजला स्वामींपासीं जाऊन, इकडील मसलत प्रकर्णीं तपसीलवार मजकूर समजावून, आपलीं उत्तरें होतील त्याप्रमाणें येथें विचार घडेल. सारांश, त्या पत्रांतील अर्थ हाच कीं, आतां आपल्या-च्यानें पैक्याखेरीज येथें राहून परिणाम लागत नाहीं आणि सरकारचीही कुमक येत नाहीं, त्यापक्षीं एक वेळ यजमानास लिहून पाठवावें आणि त्यांचा जाब आणवावा. तोंपर्यंत होळकर व अलीबहादर यांजलाही इकडे येण्याविषयीं निक्षून पत्रें लिहिलीं आहेत. त्यांनीं येऊन इकडील मसलत आटोपून बंदोबस्त केला, तर उत्तम आहे. आणि कदाचित् त्यांची मर्जीच असली कीं यांची कुमक करूं नये, तरी नवी फौज देशीहून आणविली आहे ती व कांहीं जुनी फौज ठेवावी, आणि त्यांत एक मातबर सरदार करून, त्यास येथें ठेऊन आपण निघोन उज्जनीस

जावें हा सिद्धांत जाहाला आहे. मग पुढें काय विचार ठरोन मसलत कोणते घाटावर बसेल ती पहावी. राजश्री जनार्दनपंत वैद्य यांजला देशीं जाऊन आज दहा महिने जाले. अद्याप इकडे येत नाहींत. यास्तव त्यांजला मी अलाहिदा पत्र लिहिलेंच आहे. परंतु स्वामींनीं इकडे येण्याविसीं एकवेळ ताकीद करावयासी आज्ञा जाली पाहिजे. प्रस्तुत थोडें बहुत कामकाज आमचे हातें घ्यावें ऐसें आहे. यास्तव मशारनिल्हेची रवानगी जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the flight of Gulam Kadar from Delhi and the arrival of Mahadji's forces at the outskirts of the city. He also reports Mahadji's dissatisfaction with his situation on account of his unrelieved wants.*

No. 539 19th November 1788.

पैवस्ती छ १६ रबिलावल सन तिसा समानीन.

मार्गशीर्ष मास बरोबर मुजरद जोडी.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २० माहे सफरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तेणेंकरून चित्त उदास असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री अलीबहादर यांच्या व राजश्री पाटिलबावांच्या भेटी कार्तिक शुद्ध सप्तमी गुरुवारीं* जाहाल्यानंतर परस्परें आपआपल्या डेऱ्यास गेले. तिसरे दिवशीं शुद्ध दशमीस राजश्री पाटिलबावांनीं राजश्री अलीबहादर यांजला मेजवानी करून हत्ती व घोडा व खाशास कंठी, शिरपेंच, जेगा दिला, तमाम मंडळीस वस्त्रें दिलीं. उपरांत दुसरे दिवशीं राजश्री अलीबहादर राजश्री पाटिलबावांचे डेऱ्यास आले. चार घटिका खलबत जालें. ते समयीं इकडील वर्तमान सविस्तर आजपर्यंत जाहालें तें राजश्री बावांनीं त्यांजला सांगितलें, आणि राजश्री अलीबहादर यांनीं, स्वामींनीं हिंदुस्थानांत रवानगी केलियापासून

---

* ६ नोव्हेंबर १७८८.

ते आजपर्यंत जाहालें वर्तमान त्यांजला सांगितलें. त्यांतील सारांश अर्थ हाच कीं, श्रीमंतांनीं आपले कुमकेस आम्हांस पाठविलें, ते समयीं आज्ञा केली जे, तुम्ही राजश्री पाटिलबावांजवळ जाऊन लौकर पोहोंचावें आणि ते ज्याप्रमाणें तुम्हांस कामकाज सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करावी, याप्रमाणें आम्हास आज्ञा आहे व राजश्री नानांनींही याप्रमाणेंच सांगितलें आहे. त्यास मार्गीं मात्र आम्हांस बहुत दिवस लागले. त्यास श्रीमंतांचीं पत्रें बऱ्हाणपुरच्या मुक्कामापावेतों आलीं कीं, तुम्ही व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार ऐसे एकत्र होऊन, हिंदुस्थानांत जाऊन शिंद्यांची कुमक करावी. याजकरितां महेश्वराहून जाणें, तों राजश्री तुकोजी होळकर सुभेदारही तुम्हांस येऊन सामील होतील. नंतर दरकूच पुढें जावें. त्याजखेरीज पुढें जाऊं नये. यास्तव इतके दिवस लागले. त्यास महेश्वरीं आलियानंतर सुभेदारांनीं लग्नाकरितां बहुत आग्रह करून राहविलें. तेव्हां मासपक्ष रहाणें जाहलें. पुढें उभयतां मेवाडप्रांतीं आलों. तेथें दोन महिने लागले. पुढें त्यांचा विचार इकडे येण्याचा दृष्टीस सत्वर न पडे, आणि यजमानांचीं पत्रें निकडीचीं येत, आणि आपणांकडीलही पत्रें लौकर येण्याविसीं येत; तेव्हां आम्हीं निकड करून कूच करून येऊं लागलों. तेव्हां मागतीं सुभेदारांनीं आम्हांस आठा दिवसांचे मुदतीनें राहाविलें. तों इतकियांत आपलीं पत्रें बहुत निकडीचीं आलीं. त्याजवरून कूच करून आपणांपासीं आलों. पुढें सांगाल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. हा मजकूर सविस्तरें राजश्री पाटिलबावांनीं ऐकून घेतला. नंतर मग पुढें बावांनीं आपले जागां विचार केला कीं, राजश्री अलीबहादर यांची रवानगी दिल्लीस करावी. त्यास श्रीमंतांनीं मातबर सरदार आपले कुमकेस पाठविले, आणि उगीच रवानगी पुढें करावी तें ठीक लौकिकांत दिसत नाहीं. यास्तव साहेबनोबत व जरीपटका समागमें देऊन दिल्लींत रवाना करावें. हा सिद्धांत करून कार्तिक वद्य द्वितियेस मंदवारीं साहेबनोबत त्यांचे डेऱ्यास नेऊन आपण खासा स्वारी जाऊन दिली. नंतर इंदुवारीं चतुर्थीस जरीपटका व वस्त्रें देऊन रवानगी दिल्लीचे रोंखावर करविली. पुढें राणेखानभाई व रायाजी पाटील व जिवाजी बल्लाळ बक्षी वगैरे तमाम फौजा व पलटणें तोफा सुद्धां गुलामकादर याजला मेरठेमध्यें कोंडला आहे. चौफेर आपल्या फौजा आहेत. गुलामकादर याजपासीं तोफखान्याचें सामान भारी आहे, आणि गांवचा आश्रा धरून वसला आहे. याजकरितां हल्ला करून लढाई मारावी हा विचार आहे. परंतु घोडें माणूस जाया फार होईल, यास्तव चार दिवस रसत बंद केलियानंतर सहजच कायेल होईल, ऐसे दुरोख

विचार आहेत. मग श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून काय घडेल तें पहावें. येथून यांची रवानगी जाहाली. पुढें हें वर्तमान ऐकून त्याच फौजेनें पारिपत्य केल्यास उत्तमच आहे. नाहीं तरी यांनींही राणेखानभाई यांजला सामील होऊन शत्रूचें पारिपत्य करावें हा निश्चय ठरोन, मशारनिल्हेची रवानगी पुढें जाहली. याखेरीज इस्माइलबेग व नजफकुली यांची लढाई लागली आहे. त्यास गुलामकादर याजपासून इस्माइलबेग फुटून, राणेखानभाई यांजला भेटून आपला सरंजाम नेमून घेतला आहे. त्या सरंजामाचे बंदोबस्तास निरोप घेऊन गेला. ते महाल पहिले नजफकुलीकडे होते. तेव्हां परस्परें उभयतांची लढाई सुरू जाहाली आहे. आजपर्यंत पांच सात लढाया जाहाल्या. हल्लीं इस्माइलबेग यानें नजफकुलीस गांवामध्यें कोंडिलें आहे. मग पुढें काय होईल तें पाहावें. उभयतांच्या कटाक्षामुळें दोन्ही विल्हेस लागले, तत्रापि सरकारचें कामच आहे. कदाचित् एकच विल्हेस लागला, तरी तितकाच खलश कमी जाहाला. तूर्त मोगल्यांमधीं जबरदस्त गुलामकादराशिवाय हेच होते. यास्तव परस्परें त्यांची लढाई लाविली आहे. पुढें ईश्वरइच्छेकरून होईल वर्तमान तें सेवेसीं लिहून पाठवूं. सारांश गोष्ट हीच कीं, स्वामींनीं राजश्री अलीबहाद्दर यांची रवानगी केली आणि मागीं चार दिवस होळकरांचे सोबतीमुळें अधिक उणें लागले. परंतु हल्लीं यांचें येणें बहुत प्रसंगीं उपयोगीच पडलें. आणि मशारनिल्हेची खबरदारी जातीची बहुत दृष्टीस पडली. बोलण्याच्या रीती व उमदेपणा फारच चांगला आहे. याप्रमाणें उभयपक्षीं सर्व गोष्टी पार पाडाव्या आणि श्रीमंतांचे पुण्येंकरून पारही पडतील असें वाटतें. आजपर्यंत आम्हांजवळ राजश्री पाटिलबावांचीं बोलणीं बहुत प्रकारें श्रीमंतांचे पायापासीं निखालसपणाचीं होत होतीं. त्याची प्रतीत आतां दृष्टीस पडावयाचा समय आला. त्यास राजश्री पाटिलबावांनीं प्रस्तुत पाऊल बोलल्याप्रमाणेंच घातलें आहे. मग पुढें काय घडेल तें पाहावें. सारांश, तूर्त सरदारांची चाल बरीच दिसत आहे. याप्रमाणें निभावल्यास कोणा गोष्टीस जड भारी पडणार नाहीं, ऐसें दिसण्यांत येतें. राजश्री अलीबहाद्दर यांच्या भेटी जाहल्यानंतर मागतीं, उभयतांनीं राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांजला सत्वर येण्याविसीं पत्रें पाठविलीं आहेत. परंतु त्यांचे येण्याचा विचार तूर्त कांहींच दिसत नाहीं. यास्तव स्वामींचीं इकडे येण्याविसीं सरकारचीं पत्रें होळकरांस तिकडचीं आलीं पाहिजेत. तरच कदाचित् आले तर येतील. वरकड यापुढें जें होईल वर्तमान तें मागाहून सेवेशीं लिहून पाठऊं. सारांश गोष्ट प्रस्तुत दिल्लीचा बंदोबस्त साताऱ्याचे संस्थाना-

सारखा आनायासें करून जाहला आहे. हल्लीं यांची रवानगी येथून केलीच आहे. जर करितां दिल्लीस दाखल होत तोंपावेतों गुलामकादर याचें पारिपत्य जाहालें तर उत्तमच आहे. मग दिल्लीस राहून तेथील बंदोबस्त करावा हा विचार ठरला आहे; आणि त्या फौजेनें पारिपत्य न होय, तरी यांनींही फौज सुद्धां यमुनापार जाऊन त्या फौजेस सामील व्हावें, ऐसा दुरोख मसलतीचा आहे. याप्रमाणें विचार येथें ठरोन मशारनिल्हेची रवानगी दिल्लीस केली. स्वामीस कळावें म्हणोन लिहिलें असे. पुढें राजश्री पाटिलबावांचा विचार आहे जे, येथील बंदोबस्त हल्लीं सरदार आले आहेत यांचा यथास्थित करून द्यावा, आणि आपण यांचा निरोप घेऊन उज्जनीस जाऊन फौजेच्या देण्याचा फडशा करून, नंतर श्रीमंतांचे दर्शनास व साहेबांचे भेटीस जावें हा विचार आहे. या बंदोबस्तास दोन चार महिने लागतील, असें बोलण्यांत बहुत वेळ येत आहे. मग काय घडेल तें पहावें. सारांश गोष्ट यांतील हीच कीं, मुख्य मसलतीस पैका पाहिजे. त्यास तर कोठें ठिकाण दिसत नाहीं, आणि फौज तर यांची भारी. शिवाय हल्लीं नवीन फौज आली, हिचीही सरबरा खर्चाची जाहाली पाहिजे. स्वामी म्हणतील कीं, तीन चार वर्षें पाटिलबावांचा बंदोबस्त होत होता. असें असतां अद्याप खर्चाचाच खिसा लिहितां याचा अर्थ काय! तरी गुदस्तां पांच रुपये महालों महालचे यावे. तरी तमाम मुलुखांत दुंदी जाहाली. शत्रू जबरदस्त पडले. त्यांचें पारिपत्य अद्याप होतच आहे. तेव्हां येथें पैका उत्पन्न होऊन तूर्त उपयोगी पडे, हा अर्थ समजलाच आहे. तेव्हां पुढें कैसें चालेल याचा मात्र आंदेशा वाटतो. येविसींचा तपसीलवार मजकूर राजश्री पाटिलबावांनीं श्रीमंतांचे पत्रीं व स्वामींचे पत्रीं लिहिला आहे. त्याजवरून श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Appaji Ram reports the long delayed meeting between Mahadji and Ali Bahadur having taken place. Ali Bahadur was thereafter sent to Delhi to support the besieging force.*

No. 540 28th November 1788.

वस्ती छ ७ रबिलाखर रामजी पाटील यांजकडून.

पुरवणी राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी:—उभयतां सरदार होळकर व अलीबहादूर यांची रवानगी सरकारांतून जाहली, त्याप्रमाणें अलीबहादूर येऊन पोंहोचले. भेटी जाहल्या.

इतःपर इकडील बंदोबस्त यांचे हातें व्हावा; दिल्ली आगरें संस्थानची जागा, तेथें बंदोबस्त यांचा करून द्यावा तो महत्त्व वाढवून करून द्यावा, म्हणजे सर्वांस समजोन सर्वांवर दाब पडेल, याकरितां अलीबहादर यांचे डेऱ्यास जाऊन, कार्तिक वद्य तृतिया स्थिरवारीं*नगारखान्याचा सरंजाम करून देऊन, साहेब नौबत दिल्ही. जरीपटक्याचा मुहूर्त पंचमी इंदुवारीं आहे, त्याप्रमाणें दिल्हा जाईल. अलीबहादर यांणीं सरकारची आज्ञा येऊन कर्तव्य तें करावें म्हणोन दोन तीन रोज येथील सांगणें मान्य करीत नव्हते. परंतु इकडील माहितगारी होऊन बंदोबस्त जाला पाहिजे यास्तव उमजोन सांगितलें. आमचें राहणें या उपरी इकडे व्हावयाचें नाहीं. या मागेंच लोकांनीं बैदा केला होता. डेरे पाडून कूच करवून घेऊन चालावें या विचारांत होते. त्यास दाबून सांगावें तरी पैसा जवळ नाहीं, शत्रूचें पारपत्य पुर्तेपणें जाहलें नाहीं. रोहिल्यानें दिल्लींत शिरून बादशाहांसीं बेकैदी केली. संस्थान बादशाही त्याचे हातीं गेलें. तेव्हां इतके दिवस इकडे श्रम जिवा अगोचर करून, क्रोडों रुपयांचे पेंचांत आलों तें व्यर्थ होतें. याकरितां लोकांचीं आर्जवें करून, महा प्रयासें ज्यागें महाल, जागा, गांव, खेडें, जें मागितलें तें देऊन, एकवेळ शत्रूसीं दिल्लीहून काढून यांचें पारपत्य करावें, उपरांतिक इकडे रहावयाचें नाहीं, याप्रमाणें लोकांसीं (करार) करून दिल्लीस रवाना केलें. त्यांणींही जाऊन शत्रूस दिल्लींतून काढला. सांप्रत मेरठेंत घेरला आहे. चहूंकडून रसद बंद केली आहे. डाव घाव पाहून एका दो दिवसांत हल्ला करितील, अगर बाहेर लढाईस आल्यास निकड करून पारपत्य करितील. गुलामकादर याचें पारपत्य जाहल्यावरी लोक एक दिवस राहणार नाहींत. बैदा करून घेऊन येतील. सांप्रत काळीं रोहिला इकडे जबरदस्त पडला होता. त्याचें पारपत्य जाहल्यावरी डोईजड कोणी राहिला नाहीं. एक नजफकुली आहे. त्याजवरी इस्माइलबेग यास आपले पक्षीं लावून घेऊन रवाना केला. याची व त्याची लढाई लागली आहे. नजफकुलीस घेरला आहे. त्याचें पारपत्य लौकरच करील. नंतर इस्माइलबेग याजपासीं पलटणें वगैरे आहेत तीं इकडे येतील. अलीबहादर यांजसमागमें सरकारची फौज आहे व आणखी इकडील बादशाही पलटणें व सरंजाम फौज आहे तीं रहातील. परंतु सरकारांतून पुरवणी फौजेनें व खर्चानें जाहली पाहिजे. एक वर्ष पुरवणी तेथून करणें लागेल. खुळें मोडलींच आहेत. मुलूक एक दोन वर्षांनें चांगला आबाद

* शनिवार.

होऊन, सरकार किफायतीची गोष्ट आहे. होळकर यांसही सरकारांतून पत्रें वरचेवरी रवाना होऊन, याचे उपराळ्यास येऊन पोहोंचत तें जाहलें पाहिजे. दिल्लीचें संस्थान आधीं दक्षिण्यांनीं जबरदस्तीनें पातशाहास खेरीज करून आपले काबूंत केलें. हें निमित्य आपल्यावरी न येतां, बादशाहा याणें दक्षिण्यांसीं दगाबाजी करून, रोहिल्यास बोलावून, व रोहिल्यानें हरामखोरी बादशाहासीं करून बुडविला, हें जाहलें. श्रीमंतांचे प्रतापें कोणतेंही निमित्य आपल्याकडे न येतां जसें साताऱ्याचें संस्थान तसें हें जाहलें आहे. या उपरी बंदोबस्ताची पैरवी जाली पाहिजे. राजेरजवाडे बैदा करितील हा संशय किमपि नाहीं. आपली हद्द सोडून बाहेर यावयाचे नाहींत. अलीबहादर यांसी जरीपटका देऊन, मुहूर्तेंकरून पुढें दिल्लीस रवाना केलें. कळावें. रवाना छ २९ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his having surrounded Gulam Kadar at Meerut and having advanced Ali Bahadur to support the besieging force. He expresses his desire to retire to the south leaving Ali Bahadur in charge of affairs at Delhi.*

No. 541 28th November 1788.

पैवस्ती छ ७ रबिलाखर रामजी पाटील

यांजकडून.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—सरकारांतून अलीबहादर व होळकर यांची रवानगी इकडे आम्हांवरी मसलत पडली याजमुळें जाहली. होळकरांचे रवानगीचे समयीं त्यांनीं वांटणीचा मुद्दा सरकारांत घातला. तेथें आपलेही ध्यानांत इकडून होळकरांविसीं दिकती पडतात. त्यास, होळकरांचा व आमचा भाऊपणा वडिलांपासोन चालत आला, त्याप्रमाणें उभयपक्षीं चाली चालाव्या. त्यास, इकडून दुसरी गोष्ट असावयाचें कारण नाहीं. धन्याचे घरांत जागा राहिली नाहीं उभयतांनींही कस्त मेहनत करून ज्या गोष्टीनें सरकारांत नवी जागा येऊन सुबत्ता पडे तें करावें, येविसीं आम्हीं पुण्याचे मुक्कामीं बोललों होतों. त्यावरून आपलें

लिहिलें वकिलाचे पत्रीं आलें होतें जे, पाटिलाबावा बोलले आहेत त्याप्रमाणें क्रोडों रुपयांचा मुलूक सरकारांत यावा येविसीं विचारणा केलीच असेल. त्यास, वडिलांपासोन ज्यांत सरकार किफायत त्याच गोष्टी घडत आल्या आहेत, व इकडूनही तीच चाल आहे. होळकरांनीं आपणासीं वांटणीची जिकीर केली, व आपलेही विचारें त्यांचे वांटचास दिक्कत नसावी. त्यास, इकडून आग्रहाचें कारण काय ? जाणोन वडिलांपासोन रीति चालत आल्या त्याप्रमाणें उभयपक्षीं चालाव्या, इकडन नवीन व्हावयाचें नाहीं, आपण यावें म्हणोन पत्रें लिहिलीं, त्यावरून होळकरही सरकारांतून निरोप घेऊन आले. अलीबहादूर व होळकर यांची गांठ महेश्वरीं पडली. तेथें त्यांस बहुत दिवस लागले. उभयतांस सत्वर यावें म्हणोन पत्रेंही पाठविलीं. त्यास दिवसगत लागली. परभारें मेवाडांत गेले. इकडे इस्माइलबेग व गुलामकादर एक होऊन चमेलपर्यंत चालोन आले. इस्माइलबेगाचें पारपत्यही श्रीमंतांचे प्रतापें जाहलें. दिल्लींत अंमल सरकारचा जाहला. गुलामकादर यांजवर फौजा अंतर्वेदींत उतरोन त्यास मेरठेंत घेरला आहे, हें पेशजीचे पत्रीं लिहिलें, त्यावरून कळलेंच असेल. होळकर अद्यापि मेवाडांतच आहेत. येविसींचे परभारें अलीबहादूर यांणीं लिहिलें असेल त्याजवरून कळेल. अलीबहादूर इकडे येऊन कार्तिक शुद्ध ८ स भेटी जाहल्या. पुढें इकडील कर्तव्याचा अर्थ अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिला आहे. रा छ. २९ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji expresses his willingness to share the new conquests with Holkar provided the latter responded to his call for support and gave it freely.*

No. 542 29th November 1788.

पैवस्ती छ २२ रबिलावल तिस्सा समानीन.

याच लखोटचांतील दुसरी पुरवणी.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३० सफरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र

येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास, छ २२ मोहरमचें पत्र पाठविलें तें पावलें. पावून बहुत संतोष जहाला. तरी याप्रमाणें निरंतर कृपापत्र पाठवून सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर स्वामींचे पत्रीं मजकूर कीं, गुलामकादर यानें हरामखोरी करून स्वामिद्रोही जाहाला. त्याचें पारिपत्य ईश्वर करीतच आहे. परंतु मसलत आटोपली होती ती फिरोन वाढली. पाटिलबावांस सर्व मसलती व दूरंदेशीं समजतात. त्याअर्थीं जसें पहातील, तसें करितील. पुढें होईल तें लिहून पाठविणें. दुसरें, तिकडे वखेडे जाहाले आहेत, त्याअर्थीं राजेरजवाडे यांसीं विरुद्ध दाखवूं नये. होळकर व अलीबहादर पाटिलबावांजवळ पोहोंचले नाहींत. त्यास पाटिलबावांचीं पत्रें उभयतांस आलीं. त्यांत अंबाजी इंगळे सांगतील त्याजप्रमाणें यावें म्हणोन. त्यास अंबाजी इंगळे आल्यावर सांगितलें कीं, इस्माइलबेगाची लढाई फत्ते जहाली. याजकरितां आपण मेवाडांतून जैपूरचे व जोधपूरचे सर्देनें यावें. कृष्णगडचे मोर्चे उठवावे. त्याजवरून उभयतां मेवाडच्या मार्गें जाहाले. अगोदर दरकूच पाटिलबावांकडे जावें हेंच मानस उभयतांचें होतें व याप्रमाणें येथें पत्रेंही आलीं होतीं. परंतु इंगळे यांचे सांगितल्यावरून हा मार्ग धरिला. तिकडे गेल्यावर चार रोज राजेरजवाडे यांचीं संधानें लागून वकील आले; बोलणें लागलें; याजमुळें दिवसगत लागली. हल्लीं लवकर पाटिलबावांकडे जातों म्हणून उभयतांचीं पत्रें आलीं आहेत, व येथून लवकर जाण्याविसीं पत्रें जात आहेत. आजपर्यंत गेले असतील. पाटिलबावांनीं तिकडीचीं पत्रें पाठवून बोलावून घ्यावें, म्हणजे फौजेचा जथ पडोत काम होईल व दाबही पडेल. प्रस्तुत मनसबा काय आहे तें सविस्तर लिहून पाठविणें म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास स्वामींनीं जो मजकूर पत्रीं लिहिला, तो सविस्तरेंकरून राजश्री पाटिलबावांस श्रुत केला. जो मजकूर इंगळे यांचे बोलण्याचा स्वामींस उभयतांनीं लिहिला होता, त्याचा तपसील, बजिन्नस हल्लीं राजश्री अलीबहादर यांजबरोबर राजश्री अंबाजी इंगळे आले, त्यांजला पुसिला. तेव्हां मशारनिल्हेनीं, राजश्री भिकोबा पाळंदे यांचे गुजारतीनें जें वर्तमान उभयतां सरदारांपासीं बोलण्यांत आलें होतें, तें आमचे समक्ष सांगितलें. त्यांतील सारांश अर्थ पाहतां, होळकरांनीं इंगळे यांजवर निमित्त मात्र घालून श्रीमंतांस बजावून लिहिलें. थोर सरदार. त्यांजला खरें खोटें कोणी म्हणावें! हें बोलणें इंगळयांचें येथें कोणासच मुख्या सुद्धां प्रमाण वाटतेना. परंतु राजश्री भिकोबा पाळंदे यांची साक्ष सुभेदारांचे चालीविसीं पडली, त्याजवरून सेवकाचीही खातरजमा जाहाली. या गोष्टी

लिहूनही फळ नाहीं. परंतु स्वामींस त्यांतील अर्थ ध्यानांत यावयाकरितां सूचनार्थ विनंती लिहिली आहे. वरकड तपसीलवार मजकूर सुभेदार यांचे येण्याचा व इस्माइलबेग व नजफकुली यांचा सविस्तरें मजकूर दुसरे पुरवणीबंदीं लिहिला आहे, त्याजवरून श्रुत होईल. वरकड इकडील बंदोबस्ताविसींचें बोलणें खाजगत वगैरे सर्व राजश्री जनार्दनपंत वैद्य सेवेसीं निवेदन करितील, त्याजप्रमाणें बंदोबस्त करून देणार स्वामी समर्थ आहेत. पुणियांत फितुराची गडबड जाहाली होती. त्यांत मातबर गृहस्थही कोणी आहेत, म्हणून येथें मनस्वी वर्तमानें ऐकत होतों, व कोणकोणाचीं लिहिलींही आलीं होतीं. त्याजवरून उज्जनीहून राजश्री सदाशिवपंत दाजींनीं स्वामींस हा मजकूर पेशजीं लिहिला होता. त्याचें उत्तर स्वामींनीं मशारनिल्हेस लिहिलें. तें बजिन्नस पत्र पाहिल्यानंतर चित्त स्वस्थ जाहालें. कोलटकर यांणीं कैलासवासी श्रीमंत माधवराव साहेब यांजपासीं राहून लौकिक मिळविला होता. त्याचें स्वरूप फंदफितूर करावी हें नव्हतें. परंतु पुण्याई थोडी, तेव्हां या बुद्धीस प्रवर्तले. त्याचें फलही हरामखोरीचें ईश्वरें सत्वरच दिल्हें. सारांश, स्वामींचा बंदोबस्त यथास्थित होता म्हणोन या गोष्टी बाहेर आल्या. यांतील भाव सेवकाचे ऐकण्यांत बहुत खोल आहेत, परंतु ते पत्रीं लिहावयाचे नाहींत. मुख्य स्वामींनीं बंदोबस्त या गोष्टीचा राखिला पाहिजे. बहुत विस्तारें सेवकानें लिहावें ऐसा अर्थ नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram bitterly complains against the dilatoriness of Holkar in joining Sindia. Towards the end Nana is congratulated on his lucky escape from the hands of assassins.*

No. 543 29th November 1788.

पैवस्ती छ २२ रबिलावल समानीन.

डांकेबराबरील मशारनिल्हेकडील कारकुनानीं आणून दिल्हा.

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे:— इकडील दरबारी वर्तमान तर गुलामकादर याजला मेरठेमध्यें कोंडला आहे. त्याजपासीं जमेत दहा हजार फौज व पांचसात हजार रोहिले पलटणां सुद्धां आहेत. शिवाय शंभर तोफा समागमें आहे. आपले फौजेनें चौफेर घेराघेरी करून रस्त

बंद केली आहे. लढायाही कहीवर दोन चार जाहाल्या. पुढें काय होईल तें पाहावें. राजश्री अलीबहाद्दर कार्तिक शुद्ध अष्टमीस श्रीमथुरेस येऊन दाखल जाहाले. तेच दिवशीं उभयतांच्या भेटी जाहाल्या, वगैरे बहुमान परस्परें जाहाले येविसींचें सविस्तर वर्तमान पेशजीचे रवानगींत लिहिलेंच आहे, त्याजवरून श्रुत होईल. हल्लीं मशारनिल्हेची रवानगी दिल्लीस केली आहे व गुलामकादर याचेही पारिपत्यास पुढें फौज राणेखानभाईबरोबर गेली आहे. त्यांनीं यांनीं मिळोन हरामखोराचें पारिपत्य करावें हा निश्चय ठरोन मशारनिल्हेची रवानगी केली आहे. इस्माइलबेग व नजफकुली यांची लढाई लागली होती. त्यास हल्लीं वर्तमान लिहिलें आलें कीं, उभयतांचा सलूख जाहला. मग पुढें त्याजकडील होईल वर्तमान तें सेवेसीं मागाहून लिहून पाठऊं. राजश्री अलीबहाद्दर होळकरांपासून निघून राजश्री पाटिलबावांकडे आले. तेव्हां परस्परें इकडे येण्यामुळें यथास्थित रंग राहिला नाहीं. येविसींचें तपसीलवार वर्तमान राजश्री अलीबहाद्दर बाबा स्वामींस आलाहिदा पत्रीं लिहितील, त्याजवरून श्रुत होईल. सारांश, यांचे बोलण्यांतील तेथील रीत वर्तणूक जी आहे, ती सेवक लोकांनीं पत्रीं लिहावी ऐसा अर्थ नाहीं. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून राजश्री अलीबहाद्दर जोरबजोर* राजश्री अंबाजी इंगळे यांचे वाकबगारीनें लष्करांत येऊन पोंहचले. जर करितां वाकबगार बराबर नसते, तरी एखादे जागां फौजेस दगा होता. परंतु सर्वही गोष्टी आजपर्यंत श्रीमंतांचे प्रतापेंकरून पार पडल्या. हल्लीं राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांजकडील बातमी वकिलाची आली, त्यांत मजकूर लिहिला कीं, होळकरांनीं मारवाडी व जैपूरवाले यांसीं सलूक करून उदेपूरचा बंदोबस्त मारवाडी याचे हातून करावा; त्यांची दोन हजार फौज नेहमीं उदेपुरास राहावी; याप्रमाणें करारांत गोष्ट आणिली आहे. व कोटेवाले आजपर्यंत राजश्री पाटिलबावांचे लक्षांत होते, त्यांजला होळकरांनीं जरब बसवून जैपूरवाले व मारवाडी यांजला सामील करावें, म्हणजे सहजच कोणीही संस्थानिक शिद्यांचे लक्षांत राहिला नाहीं, हा मनसबा होत आहे. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं आम्हांस व वकिलांकडील राजश्री विठ्ठलपंत व गंगाजीस बोलावून सांगितलें कीं, हा मजकर तुम्हीं पुण्यास ल्याहावा कीं, कोटयाचें संस्थान आजपर्यंत सरकारासीं बदलन नव्हतें. सालगुदस्तां तमाम हिंदुस्थानांत दुंडी राजेरजवाडे यांनीं केली, परंतु कोटेवाल्यांनीं आपली हद्द सोडिली नाहीं; आणि मारवाडी व जैपूरवाले

*जोरावरीनें, जबरदस्तीनें.

यांजलाही साफच सांगितलें कीं आम्हीं तुमच्या मलईत*नाहीं. त्याजवरून उभयतां राजांचा कोटेवाल्यावर दांत होताच. हल्लीं होळकरांनीं सालाबादची आपली खंडणी घ्यावी आणि त्याचें स्वरूप रक्षावें, ती गोष्ट न घडे. तेव्हां त्याजला उभयतां राजांस सामील होणें प्राप्तच जाहालें. तेव्हां आजपर्यंत जीं राजकारणें बरीं वाईट राखून आपले लगामीं होतीं, तीं सरकारउपयोगींच होतीं. ती चाल मोडली. तेव्हां पुढें सारे रांगडे एक जाहाल्यावर मागतीं पेंच पडेल. उदेपूरचे संस्थानापासून आपली खंडणी घेऊन पुढें आमची कुमक करावी, ती गोष्ट एकीचकडे राहून, उदेपूरचे संस्थानाचा बंदोबस्त मारवाडचाचे हातून करणार. तेव्हां मारवाडी उदेपूरच्या संस्थानास एकदां घुसले म्हणजे मग निघणें कठिण आहे. तेव्हां उदेपूरवाले व कोटेवाले, जैपूर, मारवाड एक होऊन माळवे प्रांतास पेंच पाडतील, आणि इकडील मसलतीसही विलग पडेल. तेव्हां कोणे गोष्टीचा आळा राहाणार नाहीं. आम्हांसीं होळकरांचें बनत नाहीं, अथवा आमचे हस्तें साहेबचाकरी करावयाची नाहीं, तरी या गोष्टीची कांहीं दिक्कत नाहीं. त्यांनीं येऊन इकडील सारा बंदोबस्त राखावा आणि आपली वांटणी घेऊन, जो नवा मुलूख सुटला आहे त्याचा बंदोबस्त आपण व अलीबहाद्दर मिळोन करावा, आणि श्रीमंतांचा नक्ष राखावा, यांत उत्तम आहे. कदाचित् राजश्री अलीबहाद्दर त्यांजपासोन उठोन आले, यास्तव त्यांचेही सोबतीचा त्यांजला कंटाळा असला, तर त्याचीही चिंता नाहीं. आम्ही त्या गोष्टीची एकादी तोड काढून त्याची देऊं. परंतु ज्यापक्षीं आम्हांमध्यें सामर्थ्य फौजेस पैका देऊन चाकरी करावयाचें राहिलें नाहीं, त्यापक्षीं आपल्याकरितां सरकारच्या कामाचा नाश करावा ही गोष्ट ठीक नव्हे. याजकरितां हा तपसीलवार मजकूर तुम्ही उभयतां लिहून पाठवावा व राजश्री अलीबहाद्दर यांचे फडणीस राजश्री भिकोबा पाळंदे यांजलांही बोलावून आणून सविस्तर मजकूर त्यांजला सांगून त्यांजकडूनही या मजकुराचीं पत्रें पाठवावीं, याप्रमाणें सांगितलें. त्याजवरून तपसीलवार मजकूर सेवेसीं लिहिला आहे. सारांश गोष्ट यांतील हीच कीं, राजश्री पाटिलबावांनीं आजपर्यंत जो कारभार चार वर्षें चमेलपार केला आहे, तो मुख्त्यारीनें केला आहे. त्याजपैकीं तोटा किंवा नफा जो आहे, तो श्रीमंतांचा. त्यांत आपल्यास मुलकांपैकीं वांटणी घ्यावयाची नाहीं व कोणास द्यावयाची नाहीं. सर्व श्रीमंतांस नेऊन

*दंग्यांत, बंडखोरींत.

नजर करावी हा खंबीर; परंतु ज्यापक्षीं आतां पुढें राहून बंदोबस्त खर्चाशिवाय होत नाहीं, तेव्हां होळकरांचे मुद्देही वांटणीचे कबूल करून सत्वर यावें म्हणोन लिहिलें असतां त्यांची खातरजमा होत नाहीं आणि राजकारणें करितात. यास्तव स्वामींस ल्याहावयासीं सदर्हू मजकूर सांगितला. त्याजवरून सेवेसीं सविस्तरें मजकूर लिहिला आहे. त्याजवरून श्रुत होईल. तर पत्राचें उत्तर तपसीलवार ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. उत्तर येईल त्याजप्रमाणें राजश्री पाटिलबावांस निवेदन करूं. सारांश, होळकरांस इकडील मसलत प्रकर्णीं सरकारचीं पत्रें यथास्थित बंदोवस्त करण्याविसींची आलियाखेरीज इकडील बंदोबस्त यथास्थित राहणार नाहीं. यास्तव सेवेसीं सूचनार्थ जाणून लिहिलें आहे. इंग्रजप्रकर्णींचा मजकूर व साहेबखान टोके याचा वगैरे सविस्तरें स्वामींनीं राजश्री सदाशिवपंत दाजीचे पत्रीं अलाहिदा लिहिला होता, तो सेवकानें सर्व अक्षरशा वाचून पाहिला, आणि त्याअन्वयें राजश्री पाटिलबावांजवळ बोलिलों. त्यास बावांनीं उत्तर केलें कीं, इंग्रजप्रकर्णींचा मजकूर तूर्त लिहून पाठवावयाचा नाहीं. लखनऊचा सुभा आगऱ्यास आला आहे, तो आपले भेटीस येणार आहे. आल्यानंतर त्याची आमची बैठक होऊन, त्यांतील अर्थ समजोन घेऊन मग तुम्हांस ज्याप्रमाणें लिहावयासीं सांगूं, त्याप्रमाणें लिहून पाठवावें. तोंपर्यंत इग्रजप्रकर्णींचा मजकूर ल्याहावयाचा नाहीं. ऐसें उत्तर जाहलें. त्याजवरून इंग्रजप्रकर्णीं मजकूर सेवेसीं न लिहिला. मागाहून सविस्तर मजकूर लिहून पाठवीन. साहेबखान टोके याचा मजकूर लिहिला, त्यास येविसींचें सविस्तर उत्तर राजश्री विठ्ठल हरि यांनीं आपले पत्रीं अलाहिदा लिहिलें आहे, त्याजवरून श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*This letter from Appaji Ram to Nana contains a protest from Sindia against the impolitic policy pursued by Holkar towards his (Sindia's) Rajput enemies defeating his objects and undoing his work in the Rajput quarter.*

No. 544 6th December 1788.

पैवस्तो छ १२ रबिलावल तिसा समानीन.

छ सेवेसीं विनंती सेवक सदाशिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा. छ ७ रबिलावल मुा चांगदेव स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान

यथास्थित असे. विशेषः—छ १० सफरचें पत्र सादर जालें. त्यांत आज्ञा जे, तुम्हांस वाटेंत फार दिवस लागले. हल्लीं राजश्री बाळाजी जनार्दन व रामजी पाटील पुण्यास आले आहेत. तरी विलंब न करितां तुम्हीं येणें. त्यास वाटेंत इतके दिवस अडचणीमुळें लागले. येविसींचें सविस्तर तेथें आल्यावर विनंती करीन. बऱ्हाणपुराहून काल निघोन मध्यें राहिलों. आज छ मजकुरीं मुक्काम मजकुरास आलों. स्वामींचे पुण्येंकरून महायात्रा घडली. मावंदें घरास जाऊन करावें असा मनोदय होता. परंतु मुख्य स्वामींचे चरण पाहिले म्हणजे यांतच यात्रेची परिपूर्णता आहे. हाच अंतःकरणीं निश्चय. त्यावरून घरचें जाणें तसेंच ठेऊन, परभारा पुण्यास येत आहें. आतां वाटेंत दिवसगत लागावयाची नाहीं. शरीर माझें अशक्त, त्यामुळें मजली मोठ्या होत नाहींत. म्हणोन चार दिवस अधिक उणे लागतील. वरकड कोठें मुक्काम व्हावयाचें प्रयोजन नाहीं. शिबंदी एका वर्षाची देणें. जवळ पैका नाहीं. याजकरितां येथें दिवस लागले. शिबंदीचा गवगवा जाला तो दूर करण्यामुळें दिवस लागले. हरप्रकारें निघाली तशी तोड काढिली. मावंदेंहि येथेंच करून निघालों. दर मजल येत आहें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar on his way to Poona from Sindia's camp reports his arrival at Changdev on the Tapti.*

No. 545. 8th December 1788.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ९ रबिलावलपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तर, राजश्री पाटिलबावांनीं आम्हांस व वकिलाकडील राजश्री विठ्ठल हरि व गंगाजीस बोलावून सांगितलें कीं, राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांजकडील वर्तमान अखबारेवरून ऐकिल्यांत येतें जे, मारवाडी व जैपूरवाले यांसीं वचन कथन पक्केपणें जाहालें जे, आम्ही सारे एकत्र होऊन तुम्हांस हिंदुस्थानचे मालक करितों; शिंदे यांसीं तुम्ही व आम्ही मिळोन

काढून देऊं. त्याजवरून होळकर यांसींही त्यांचे बोलण्याचा विश्वास पडोन साऱ्या रांगड्यांस एकत्र करून देतात. त्यास आमचें लक्ष एक सरकारनक्ष व सरकारचा बंदोबस्त यांजवर आहे. इंग्रजांचा प्रवेश खुपकींत होऊं न द्यावयाकरितां इतका प्रयत्न वित्ताकडे जिवाकडे न पाहतां सरकारआज्ञेप्रमाणें केला तो लोपला नाहीं. झाडून हिंदुस्थान उठलें होतें परंतु सरकार नक्षावरच नजर ठेऊन वर्तणूक केली. सारे सारे एकत्र जाले म्हणोन दबून ते म्हणत होते तैसें केलें असतें, तरी तितक्यावरच शेर होऊन, इकडे कोणाचे पाय जमिनीस लागों न देते. ती गोष्ट त्यांची शेवटास न गेली. श्रीमंतांचे प्रतापें त्यांजवर जरब पूर्वी होती त्याहून विशेष जरब बसली आहे. सांप्रत आपसांतील फुटीची तऱ्हा या प्रकारची. रांगड्यांनीं एकत्र होऊन आम्हांस काढून देण्याविसीं कमती केली नाहीं, परंतु आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांपासीं, तेव्हां त्या गोष्टी शत्रूच्या शेवटास न गेल्या. सांप्रत होळकर त्यांत मिळाल्यावर फिरोन उपद्व्याप करूं लागल्यास न कळे. तथापि ते विचारच करितील. आपले आहेत त्यांनीं मात्र विचार करावा. या गोष्टीची विचारणा सरकारांतून करणें ती जाहली पाहिजे. आमचे लोक अथःपर आम्हांस इकडे राहूं देणार नाहींत. आम्हांकडे शब्द नाहीं. राजश्री अलीबहादर यांचा बंदोबस्त करून देऊं. त्याचा उपराळा खर्चानें व फौजेनें करावा. याप्रमाणें तपसीलवार तुम्हीं लिहून पाठविणें म्हणोन राजश्री पाटिलबावांनीं सांगितलें, व त्यांचे लष्करांतून वर्तमान याप्रमाणें आलें व परस्परें ऐकिल्यांतही येतें, यास्तव सेवेसीं लिहिलें आहे. वरकड इकडील दरबारी बारीक मोठें वर्तमान पेशजीचे रवानगींत सेवेसीं लिहून पाठविलेंच आहे, त्याजवरून श्रुत होईल. वरकड वर्तमान सविस्तरें मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. आजच वर्तमान एखबारेचें लाहुराहून लिहिलें आलें. त्यांत मजकूर शाहांचे येण्याचा लिहिला आहे कीं, तैमूरशाहा त्याचा लेक दोन दस्ते* घेऊन आटक उतरोन अलीकडे आला आहे. मागाहून खासा तैमूरशाहा दस्ते घेऊन उतरणार. याप्रमाणें राजश्री पाटिलबावांकडील एखबारनवीस शिखांपासीं लाहुरास आहे, तेथून वर्तमान लिहिलें आलें. याजखेरीज पामरसाहेब इंग्रज यांचीही अखबार सदरहू अन्वयेंच आली. तीही त्यांनीं पहावयासी पाठविली होती. त्याजवरून ही गोष्ट स्वामींस ल्याहावी किंवा नाहीं ऐसा विचार होत होता. शेवटीं निदानीं हेंच ठरलें कीं तूर्त हें वर्तमान लिहूं नये. फिरोन हाच

* पलटणें.

मजकूर पक्का लिहिण्यांत व बातमींत आला, म्हणजे मग हा मजकूर लिहिणें तो ल्याहावा. त्यास हें वर्तमान अद्याप पक्केपणांत नाहीं. परंतु उगेच सूचनार्थ विनंती लिहिलें आहे. राजश्री अलीबहादूर यांची रवानगी दिल्लीस केली होती, त्यास गुलामकादर याचें पारिपत्य अद्याप जाहलें नाहीं. यास्तव यांजलाही यमुना उतरोन हरामखोरांचें पारिपत्य करावें म्हणून राजश्री पाटिलबावांनीं लिहून पाठविलें आहे. त्याजवरून मशारनिल्हेनीं बुलगें फरिदाबादेस ठेऊन, सडी स्वारी यमुनापार उतरली. एका दोहों दिवसांत जाऊन राणेखानभाईस सामील होतील. लखनऊन इंग्रज कर्णेल† म्हणोन हल्लीं आगऱ्यास आला होता. त्याचा इरादा राजश्री पाटिलबावांची भेट घ्यावी म्हणोन होता. त्यास हल्लीं मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस भेटी जाहल्यानंतर कर्नलाचे बोलण्यांत आलें जे, आगऱ्याचा किल्ला पाहिला. दिल्लीची जागा पहावयाची आहे. त्याजवरून त्याची रवानगी दिल्लीस केली. तेथून आलियानंतर बोलणीं काय होतील तीं मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji charges Holkar of having joined his Rajput enemies and plotting with them for his overthrow. There is also news of Ali Bahadur having crossed the Jumna to strengthen the investing force at Meerut.*

No. 546 8th December 1788.

पैवस्ती छ ७ रबिलाखर. रामजी पाटील

याजकडून.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती. उपरीः—होळकरांकडील वर्तमान अखबारेंवरून ऐकिल्यांत येतें जे, मारवाडी व जैपुरवाले यांसीं वचन कथन पक्केपणें जाहलें. आम्हीं सारे एकत्र होऊन तुम्हांस हिंदुस्तानचे मालक करितों. शिंदे यांसीं तुम्हीं आम्हीं मिळोन काढून देऊं × × × बोलण्याचा विश्वास पडून सारे रांगड्यांस एकत्र करून देतात. त्यास, आमचें लक्ष एक सरकार नक्ष, सरकारचा बंदोबस्त याजवर आहे. इंग्रजांचा प्रवेश खुष्कींत होऊं न द्यावा याकरितां इतका

† Col. Macleod.

प्रयत्न, वित्ता जीवाकडे न पाहतां सरकार आज्ञेप्रमाणें केला, तो लोपला नाहीं. झाडून हिंदुस्तान उलटलें होतें, परंतु सरकार नशावरच नजर ठेवून वर्तणूक केली. सारे एकत्र जाले म्हणोन दबून ते म्हणत तसें केलें असतें तरी, तितक्यावर शेर होऊन इकडे पुढें कोणाचे पाय जमिनीस लागूं न देते. ती गोष्ट त्यांची शेवटास न गेली. श्रीमंतांचे प्रतापें त्यांजवर जरब पूर्वी होती त्याहून विशेष जरब बसली आहे. सांप्रत आसपासीचे फुटीची तऱ्हा या प्रकारची. रांगड्यांनीं एकत्र होऊन आम्हांस काढून देणें याविसीं कमती केली नाहीं. परंतु आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांसीं. तेव्हां त्या गोष्टी शत्रूच्या शेवटास न गेल्या. सांप्रत होळकर त्यांत मिळाल्यावर फिरून उपद्व्याप करूं लागल्यास न कळे! तथापि विचारच करतील. आपले आहेत त्यांनीं मात्र विचार करावा. या गोष्टीची विचारणा काय ते सरकारांतून जाली पाहिजे. आमचे लोक इतःपर आम्हांस इकडे राहूं देणार नाहींत. आम्हांकडे शद्ब नाहीं. अलीबहादर यांचा बंदोबस्त करून देऊं, त्यांचा उपराळा खर्चानें फौजेनें करावा. रा।। छ ९ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji communicates to Nana Holkar's perfidious dealings with his Rajput enemies and asks the minister to take measures to check them.*

No. 547 8th December 1788.

पवस्ती छ ७ रबिलाखर रामजी
पाटील याजकडून.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—होळकर यांस येण्याविसीं पत्रें अलीबहादर आल्यानंतरही दोन तीन पत्रें पाठविलीं, परंतु त्यांचे येण्याचा योग अद्यापि दिसत नाहीं. उदेपूर प्रांतींच आहेत. उदेपूरचें संस्थान सरकारचें, मारवाडी यांणीं उदेपूरवाले यांचें गोंडवाड दाबलें आहे, त्याबद्दल उभयतांचा दावा. उदेपूरचा राणा मूल लहान, पटाईत कारभारी यांनीं आपल्या हातीं पडल्या त्या जागा दाबून बसले. भीमसिंग कारभारी असतां चितोड किल्ला वगैरे जागा दाबून आहे. राण्याचा बंदोबस्त कांहींच नाहीं. सरकारचे मामलतीचा पैसा न ये. तेव्हां राण्यास आपले हातांखालें

ठेवून पटाईत वगैरे यांस दाबून संस्थानचा बंदोबस्त करून द्यावा व आपले मामलतीचा जाबसाल करून घ्यावा, संस्थान हातीं राहिल्यानें सरकारची मामलत सुरळीत येईल, याकरितां व कांहीं फौज पाठवावी व कांहीं पटाईताचे भाऊबंद हातांखालें घ्यावे ही योजना करून, जालमसिंग कोटेवाले यांचें लक्ष आपल्यापासीं जाणोन, त्यांचे हातें भीमसिंग चौडावत याचा भाऊ सख्तावत यांसीं मेळवून घेतलें. राणाजी यांसीं कोटेवाल्याचा बंदोबस्त करून दिल्हा. फौज पाठवून बंदोबस्त कर्तव्य होता. सांप्रत होळकर मेवाडांत गेले. प्रथम रागाजीकडील कारभारी बोलावून त्यासीं वचन कथन करून, भीमसिंगाचें पारपत्य करून, राणाजीचा बंदोबस्त करून द्यावा हें ठरविलें. आलोट जागा पटाईतांची, त्याजवर फौज पाठविली. हें मारवाडे व जैपूरवाले यांस कळतांच, भीमसिंगाचें त्यांचें सूत्र होतेंच, त्यांचें बोलणें आपले विद्यमानें करून, राण्याकडील कारभारी याजपासून तीन लक्ष रुपये करार केले होते, ते करार मोडून, मारवाडयांचे सांगितल्यावरून कोटेवाल्याची जमीयत राणाजीपासीं आहे ती काढून द्यावी हें ठराविलें. मारवाडी यांणीं उदेपूरचे गोंडवाड पांच लक्षांची जागा दाबली. पुढेंही आणखी सांपडेल तें दाबावें हें त्याचें लक्ष; व साऱ्यांचा एका असावा, आपण बळवान जाहलों, साऱ्यांची एकात्मता जाहली म्हणजे रक्षणास जाब घ्यावा. या गोष्टीचें आवश्यक मारवाडयांस आहेच. तूर्त गोंडवाड मारवाडयांनीं दाबलें तशी आणखी जागा दाबीत जातील. तेव्हां सरकारची मामलत बुडती. याचा विचार होळकरांनीं करावा हें त्यांचे ध्यानांत येत नाहीं. आजपर्यंत रांगडयांच्या फुटी आपसांत पाडल्या तेव्हां आपला प्रवेश इकडे जाला. त्याच चालीनें रांगडे कोणांत कोणी मिळों न द्यावे. ज्याचे घरांत फूट नसेल तेथें युक्तीचे वाटेनें फूट पाडावी, तें न होतां उलटे एकत्र रांगडे करून देतात. उदेपूरवाला राणा याचें लक्ष व कोटेवाल्याचें सरकारांत. त्यास उदेपूरवाल्याचा कारभारी मारवाडयांचे मिळणींत. त्यास उभा करून उदेपूर त्याचे स्वाधीन करून देतात. राणाही त्याचे स्वाधीन कारणार. तेव्हां सहजच त्यास मारवाडी सांगतील तें करणें प्राप्त. कोटेवाले याचे वकिलास तरी साफच सांगतात, उदेपुरांतील जमीयत राण्यापासीं आहे ती घेऊन जाणें. हरकत केल्यास आम्हीं मारवाडी व जैपूरवाले एक आहों, तुम्हांसी समजावून घेऊं. तेव्हां कोटेवाल्याचें सामर्थ्य किती? तथापि मारवाडी जैपूरवाले यासीं कोटेकर न दबेत. आपले आश्रयावर आजपर्यंत त्यांत न मिळाले. असें असतां सांप्रत दक्षणी यांणींच मारवाडी यांचा पक्ष अंगीकार केला. तेव्हां

त्यांसही मारवाडी जैपूरवाले यांत मिळणें प्राप्त आहे. मारवाडयांसही जे आपल्यांत नाहींत ते दबावून मेळवून घ्यावे हें अगत्यच आहे. परंतु करणारांनीं मात्र हे सारखे आपले हातें एक करून दिल्यानें पुढें आपला परिणाम कसा हें ध्यानांत आणावें. आपसांत आपली फूट दिसों न द्यावी. अलीबहादूर इकडे येऊं लागले तेव्हां त्यांसीं विपर्यास दाखविले. सेर* कचेरींत रांगडयांचे वकील अलीबहादूर आमचे रानांतून† गेल्यास लुटून घेऊं हें बोलत गेले. त्यासीं उत्तर कांहीं न केलें व आपलेजवळ ठेवून ते सांगतात तेंच करितात. अलीबहादूर सरकारांतून रवाना जाले. दुसरे त्यांचे खातरदारीकरितां त्यांसमागमें राहिले, त्यांची रीत राखली, ती त्यांणीं लिहिलीच असेल. आम्हांस आखबरेवरून समजल्यांत येतें. अलीबहादूर यांचा प्रकार असा, तेव्हां आमचा त्यांचा तर भाऊपणाच. देसीं होते तेव्हांपासून इकडे येण्याविसीं लिहीत गेलों व महेश्वरीं आल्यावर इंगळे पाठविले. पत्रांमागें पत्रें रवाना केलीं. इंगळयांनीं इकडे यावें येविसीं समजाविलें. वाटघाचा मुद्दा होता त्याविसींही सरळपणानें लिहिलें. इस्माइल्याची लढाई मारल्यावरही इकडे यावें. मेवाडचे मार्गें आपण न जावें, कांहीं फौज व आम्हांकडील इंगळे कृष्णगडचे मोर्चे उठवावयाकरितां पाठवावे म्हणून पै दर पै लिहिलें असतां, इस्माइल्याची लढाई मारल्यावर तुम्हीं इकडे न येणें अशीं पत्र आलीं म्हणोन सरकारांत लिहिलें, यावरून सर्व अर्थ आपले ध्यानांत येतील. सरकारची आज्ञा कोणासीं बिघाड न करावा असी आहे, म्हणून होळकर बोलतात. त्यास, सर्वांवर दाब दाखवून ज्याजकडे जे जाबसाल आपले असतील ते उगवून घेऊन नंतर मेळवून घ्यावें. तेंही रीतीप्रमाणें ते सांगतात. त्याचा विचार न करितां, सर्वांस एक करून देऊन आपल्यास शत्रू करून घ्यावें येविसीं सरकारची आज्ञा नसेल असें दिसतें. ऐकिलें तें लिहिलें. आल्या बातम्या दुहीरी तिहीरी असतील. तेव्हां हें वर्तमानही ऐकिल्यांत येतच असेल. नसल्यास शोध व्हावा, आणि ज्यांत सरकार नक्ष, दाबाची गोष्ट, ती व्हावी. उत्तम पक्ष, होळकरांकडे कारकून हुजरे जाऊन त्यांनीं इकडे यावें. या गोष्टीनें दुही दिसणार नाहीं आणि सर्व हिंदुस्तानीही दबून इकडे राहील त्याचे जरबेंत राहतील. आमचे लोकांस बहुत दिवस जाहले व दिल्ली आदिकरून बखेडा जाला होता तोही बंदोबस्त पूर्ववत् श्रीमंतांचे प्रतापें जाला. इतःपर अलीबहादूर याचा बंदोबस्त करून उज्जनीस येऊं. आम्हांस इकडे अतःपर राहणें नाहीं. परंतु अलीबहादूर, सरकारची फौज राहील त्याचें

* भर कचेरींत. † हद्दींतून.

वजन राहिलें पाहिजे. फूट न दिसावी याकरितां लिहिण्यांत येतें. तरी आपणही होळकरांस लिहून इकडे येऊन पोंहचत तें करावें. रा॥ छ. ९ रबिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji censures Holkar's late dealings with the Rajputs which threatened to undo all his good work in that region. He wants the Poona Darbar to restrain Holkar in his impolitic course.*

No. 548 15th December 1788.

पैवस्ती छ ७ रबिलाखर. सदाशिव
दिनकर यांजकडून.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—आजपर्यंत पांच चार खाजगी पत्रें पाठविलीं, परंतु उत्तर एकही पत्राचें येत नाहीं. इकडील मसलतीचा मजकूर तरी, मसलत भारीच पडली होती. परंतु श्रीमंतांचे प्रतापें इस्माइल्याचें पारपत्य जाहलें, व रोहिल्यानें बादशाहासीं बेकैदी केली, त्यासही दिल्लींतून काढून मेरठेंत घेरला आहे. अलीबहाद्दर येथें येतांच भेटी होऊन पुढें रवानगी केली, तेही जाऊन पोंहचले. अलीबहाद्दर पोंहोंचून गुलामाचें पारपत्य करावें म्हणजे लौकिकांत अलीबहाद्दर यांचा दाब बसेल, याकरितां राणेखानभाई यांसीं हल्ला न करणें, चौक्या मजबूत बसवून रसद बंद करणें, म्हणोन लिहिलें. हल्लीं अलीबहाद्दर पोंचले. एका दो दिवसांत लढाई करून गुलामाचें पारपत्य करितील. रसद बंद केल्यामुळें चार शेर धारण गुलामाकडे जाहली आहे. गुलामाचें पारपत्य जाल्यावर आम्हांस लोक इकडे राहूं देणार नाहींत. अलीबहाद्दर यांची पुरवणी फौजेनें व रुपयानें सरकारांतून व्हावी म्हणोन दोन चार पत्रीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें तर्तूद जाहलीच असेल. गुलामकादर याचें पारपत्य जाहल्यानें इकडील खूळ मोडलेंच आहे. एक वर्षपर्यंत अलीबहाद्दर यांचा उपराळा जाहल्यानें पुढें मुलकाची आबादी होऊन सुबत्ता पडेल असें आहे. आगरें, दिल्ली, रामगड या जागां अंमल सरकारचा जाला आहे. बादशाहाचें निमित्य आपल्याकडे न येतां रभारें रोहिल्याकडून जाहल्यानें दिल्ली संस्थान साताऱ्या प्रों जाहालें आहे.

पत्र पावतांच अलीबहादूर यांची पुरवणी होऊन बंदोबस्त होणें तें जाहलें पाहिजे. आमच्यानें जाहलें तेथपर्यंत ज्यांत स रकारनक्ष व सरकारचा बंदोबस्त तें केलें. होळकर, अलीबहादूर आल्यावर त्यांचे स्वाधीन करावें असें होतें. त्यास एक अलीबहादूर आले. त्यामुळें लिहिणें पडलें !.....राा छ १६ राावल.

¶*Mahadji informs Nana his having reduced Gulam Kadar's force to starvation. He expresses his disappointment about Holkar's failure in supporting his efforts.*

No. 549 15th December 1788.

पैवस्ती छ ७ रबिलाखर.

सदाशिव दिनकर यांजकडून.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ० रबिलावल मुक्काम मथुरा स्वामीकृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. सेवेसीं विज्ञापना ऐसीजे:—इकडील मसलतीचा मजकूर तरी मसलत भारीच पडली होती, परंतु स्वामींचे प्रतापें इस्माइलबेग याचें पारपत्य जाहलें, व रोहिल्यानें बादशाहासीं बेकैदी केली, त्यासही दिल्लीहून काढून मेरठेंत घेरला आहे. अलीबहादूर येथें येतांच भेटी होऊन पुढें रवानगी केली. तेही जाऊन पोंहचले. अलीबहादूर पोंहचोन गुलाम कादराचें पारिपत्य करावें म्हणजे लौकिकांत अलीबहादूर यांचा दाब बसेल. याकरितां राणेखानभाई यांसीं, हल्ला न करणें, चौक्या मजबूत बसवून रसद बंद करणें, म्हणोन लिहिलें. हल्लीं अलीबहादूर पोंहचले. एका दों दिवसांत लढाई करून गुलामाचें पारपत्य करितील. रसद बंद केल्यामुळें चार शेर धारण गुलामाकडे जाहली आहे. गुलामाचें पारपत्य जाहल्यावर आम्हांस लोक इकडे राहूं देणार नाहींत. अलीबहादूर यांची पुरवणी फौजेनें, रुपयानें, सरकारांतून जाहली पाहिजे. गुलामकादर याचें पारपत्य जाहल्यानें इकडील खूळ मोडलें आहे. एक वर्षपर्यंत अलीबहादूर याचा उपराळा जाहल्यानें पुढें मुलकाची आबादी होऊन सुबत्ता पडेल असें आहे. आगरें, दिल्ली, रामगड या जागां अंमल सरकारचा जाहला आहे. बादशाहाचें निमित्य आपल्याकडे न येतां परभारा रोहिल्याकडून जाहल्यानें दिल्ली संस्थान साताऱ्याप्रमाणें

जाहलें आहे. अलीबहाद्दर यांची पुरवणी होऊन बंदोबस्त होय तें जाहलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji informs the Peshwa of his having closely invested Gulam Kadar in the fort of Meerut.*

No. 550 19th December 1788.

पैवस्ती छ १० रबिलाखर सन तिसा पौष डाक हस्तें सदाशिव दिनकर यांणीं आणून दिल्हें.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष:—गुलामकादर मेरठेंत घेरला आहे म्हणोन पूर्वी आपणांस लिहिलेंच होतें. राजश्री अलीबहाद्दर यांचा हिंदुस्थानांत दाब वाढावा, यांचे हातें गुलामकादराचें पारपत्य जालें म्हणजे हिंदुस्थानांत दाब वाढेल, म्हणून यांची रवानगी येथून जलद केली. पुढें फौजा होत्या त्यास लिहिलें जें, अलीबहाद्दर बाबा तेथें आल्यानंतर यांचे सांगितल्याप्रमाणें सरकार काम निकडीनें करून हरामखोराचें पारपत्य करणें. त्यास भोंवतालें घेरून होतेच. छ १७* रबिलावल बुधवारीं हल्ला करून त्याचें पारपत्य श्रीमंतांचे प्रतापेंकरून जाहलें. त्याजवरी हल्ला जाहला ते समयीं त्याचें माणूस बहुत मारलें गेलें. त्यांत हरामखोर मारला गेला, किंवा कोठें लपाला, किंवा पळाला, ही बातमी पुर्ती आली नाहीं. त्याच्या शोधास लोक लाविले आहेत. येविसींचें सविस्तर मागाहून लिहिण्यांत येईल. आपणांस कळावें याकरितां लिहिलें आहे. रवाना छ २० रबिलावल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji reports to Nana the storming of the Gulam's defences by his troops.*

No. 551 21st December 1788.

पैवस्ती छ १० रबिलाखर सन तिसा पौष बारा डांक.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २२ माहे रबिलावलपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्रमथुरा येथें स्वामींचे कृपें-

*ता: १६ डिसेंबर १७८८.

करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, गुलामकादर याजला मेरठेमध्यें कोंडला होता आणि चौफेर रस्त बंद करून तोफांची मारगिरी नित्यशा बाहेरून चालली होती. या करण्यास दीड महिना जाहला. तों राजश्री अलीबहादूर यांचेंही फौज सुद्धां येणें जाहलें. तेव्हां खासे सुद्धां त्याच मसलतीवर राजश्री पाटिलबाबांनीं रवाना केले. नंतर त्यांची स्वारी फौज सुद्धां तेथें गेलियानंतर जो रस्ता गोसगडाकडे गुलामकादर याचा जावयाचा होता, त्याच रस्त्यावर अलीबहादूर यांनीं मुक्काम केला. उपरांत चौफेर फौजेनें बंदी विशेष होऊन, मेरठेमध्यें महर्गता बहुत पडोन, तिही शेरांची धारण जाहाली. पांचा शेरांची धारण होती तोंपर्यंत रोहिले तमाम होते. विशेष महर्गता पडली, अन्न कोणास न मिळे, तेव्हां नित्य उठोन तीन चारशेंपर्यंत आंतील लोक रोहिले वगैरे मिळोन बाहेर येत. तेव्हां त्यांजकडील फौजेनें धर सोडिला. हें गुलाम कादर याजला समजल्यानंतर, मग हरामखोरानीं राजश्री रायाजी पाटील यांजकडे भेटीचें संधान लाविलें. त्यास येथील मुख्यांची एकंदर ताकीद राणेखानभाई वगैरे सरदार यांजला कीं, गुलामकादर याजला हरकसें धरून आणा व सलुखाची वगैरे एकंदर गोष्ट कोणीही बोलूं नये व करूं नये. त्याजविसीं कोणी रदबदली केल्यास जी रोहिल्यांची गत तीच गत त्याची होईल. याप्रमाणें निक्षून पत्रें झाडून सरदारांस येथून पाठविलीं. तेव्हां लोकांनीं निकड बहुत बसविली, आणि आपली फौज देशची नवी आली या रेनें आठचार दिवस जखड* फार बसली. त्यामुळें गुलामकादर यानें मार्गशीर्ष वद्य ६† पष्टीस गुरुवारीं दिवसास बाहेर येऊन, लढाई देऊन, हजार दीड हजार फौजेनसीं दिवस अस्तमान जाहालियानंतर हरामखोर पळोन गेला. ही बातमी अलीबहादूर यांजला कळतांच त्यांनीं आपली फौज त्याचे पाठीस लाविली, आणि राजश्री पाटिलबाबांकडील पागनीस राजश्री बाळोबातात्या त्यांजकडील धोंडो रामचंद्र हेही दोन तीन हजार फौजेनसीं पाठीस लागले. तेव्हां रोहिल्यांचे फौजेचा पाठलाग दोन्ही फौजा मिळोन मेरठेपासून दहा कोसांवर गुलामकादर यासीं गांठ घातली. तेथून दुतर्फा लढाई होत होत, पुढें आणखी पांच सात कोस चाललाच. तेव्हां आपल्या दोन्हींकडील फौजांनीं

* जखडणें, आवळणें. † १७ डिसेंबर १७८८.

बहुत निकड करून गुलाम कादरास जिवंत धरून आणिला. मेरठेंतून पळाला तेव्हां दरोबस्त तोफखाना व त्याजकडील बक्षी व दिवाण व कुल कारभारी व नाजरखोजा व आणखी पातशाहाकडील फितुरांतील होते ते झाडून सांपडले. यांशिवाय तोफा व हत्ती वगैरे त्यांजकडील सरंजाम पाडावा आला, त्याची याद तपसीलवार अलाहिदा लिहिली आहे, त्याजवरून सेवेसीं श्रुत होईल. सारांश गोष्ट हीच कीं, श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूचें पारिपत्य यथास्थित होऊन जिवंत सांपडला. येणेंकरून दिल्लीश्वराचा बदला यथासांग उगविला. पुढें गोसगडास देखील फौजांनीं जाऊन मुलूख लुटून फस्त करावा आणि किल्लाही घ्यावा, याप्रमाणें येथील आज्ञा आहे. वरकड तपसीलवार वर्तमान लढाईचें वगैरे लुटीचा जिन्नस सरकारांत काय आला, त्याचें कच्चें पक्कें वर्तमान सविस्तर मागाहून सेवेसीं डांकेबरोबर लिहून पाठवीन. इस्माइलबेग यानें, गुलामकादर याचें पारिपत्य जाहल्याचे पूर्वी, राणेखानभाई यांचे विद्यमानें सलूख करून, नजफकुलीवर थोडी बहुत फौज देऊन त्यांजवर रवाना केला आहे. त्याच्या व याच्या तीन चार लढाया जाहाल्या, वगैरे सविस्तर वर्तमान पेशजीं सेवेसीं लिहिलेंच आहे त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल, अथवा पत्रें पावल्यावर श्रुत होईल. सारांश एका हरामखोराचें पारिपत्य यथासांग जाहलें. बाकी नजफकुली मात्र राहिला आहे. त्याचेंही पारिपत्य हरतऱ्हेनें होईल. इस्माइल्या प्रस्तुत सलूख करून आहे. परंतु त्याचेंही पारिपत्य युक्तिप्रयुक्तीनें करितील, येविसीं गुंता नाहीं. सर्व गोष्टी श्रीमंतांचे पुण्यप्रतापें घडतील आणि राजश्री पाटिलबावांस यश येईल. स्वामींनीं राजश्री अलीबहादर यांची रवानगी केली. त्यांजला येथें यावयासीं दिवसगत जाली. परंतु या प्रसंगींही फौज येऊन, शत्रूचें पारिपत्य होऊन जिवंत धरून आणिला, येणेंकरून सर्व हिंदुस्थानीं लौकिक अलीबहादर यांचा ईश्वरें उत्तम केला. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the dispersion of the Gulam's force and his capture while trying to escape.*

No. 552 23rd December 1788.

पैवस्ती छ रबिलाखर सन तिसा समानीन.

ह॥ डाक सदाशिव दिनकर यांणीं आणून दिल्हा.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष:—गुलामकादर यानें बादशाहासीं बेकैदी व आणखी हराम-

खोरी केली. त्याचा नतीजा* त्यास तसाच देऊन, जिवंत धरून पारपत्य करावें याकरितां फौजेनें, पैक्यानें, मेहेनतीनें जितके प्रयत्न होते तितके केले. त्याचें सार्थक श्रीमंतांचे प्रतापें होऊन, मार्गशीर्ष वद्य †सप्तमीस गुलामकादर यास जिवंत धरिला. संतोषाचें वर्तमान श्रुत व्हावें याकरितां लिहिलें आहे. गुलामकादर याचे हातीं बादशाहाची सलतनत, माल मालियेत सुद्धां लागल्यामुळें बलवान होऊन, फौजेचा जमाव भारी केला होता. वीस पंचवीस पलटणें, आठ दहा हजार फौज घोड्यावरील व याखेरीज रोहिले, एकूण चाळीस पन्नास हजारांचा भरणा होता. मेरठेस आसरा धरून लढाई गुलामानें पाडली. ऐशीं तोफा, याशिवाय पलटणें, तशांत किल्ल्याचा आसरा यामुळें दोन महिने लढला. परंतु लोकांनीं रात्रंदिवस मेहेनत करून दररोज तोफा, बंदुका, हत्यार, जसा डाव पडला तसें करून, शत्रूस जरबच देत गेले. शेवटीं निकड करून हल्ला करून, पलटणें कापून काढलीं. त्या गडबडींत गुलाम पळून जात होता. तों, पंचवीस कोसांवर फौजेनें धावून जाऊन, शामलीचे गढींत धरून फौजेंत आणिला. त्यासमागमें रोहिले पांच सातशें निघून पळत होते, ते कापून काढले. याउपरी त्याचे अपराधानुरूप त्यास फळ देऊन, त्याचें पारपत्य होईल. या मागेंच हल्ला करून पारपत्य केलें असतें; परंतु अलीबहादर पोहोंचून, त्यांचे हातें गुलामाचें पारपत्य जालें, हें हिंदुस्थानी राजेरजवाडे यांस सर्वांस समजावें, त्यावरून हल्ला न करणें, रसद बंद करून चौक्यांचा बंदोवस्त करणें म्हणोन लिहिलें. अलीबहादर यांची रवानगी येथें येतांच केली. ते पोहोंचल्यावर निकड करून गुलामाचें पारपत्य जालें. पुढें गोसगड व साहरनपूर येथें धावून जाऊन दोही जागा गुलामाचा लवाजमा व गोसगडांत त्याची आई आहे त्यांस हस्तगत करणें म्हणून लिहून पाठविलें. आज गोसगडास फौजा पोहोंचल्याचें वर्तमानही आलें आहे. गोसगड व साहरनपूर हस्तगत करितील. आम्हांकडील लोकांस हिंदुस्तानचे स्वारीसमागमें आठ नऊ वर्षें जाहलीं. इतःपर लोक इकडे रहाणार नाहींत. यामागेंच लोकांनीं गवगवा करून देशीं घेऊन यावें असें केलें होतें. परंतु रोहिल्यानें हरामखोरी केली याचें पारपत्य न जाल्यास दाबांत उणें पडतें. व हिंदुस्थानांत दक्षिणी फौजा रहाण्यासही पेंच, जाणोन जसें कळलें तसें लोकांची खातरी केली. ज्यानें जें गांवखेडें महाल मागितला तो देऊन पुढें दिल्लीस रवाना केलें. त्याप्रमाणें लोकांनींही रात्रंदिवस मेहनत करून, शत्रूचें पारपत्य करून हस्तगत केला. तेव्हां पोटाविसीं

* शिक्षा. † १९ डिसेंबर १७८८.

गवगवा करून घेऊन चालतील. पैसा असता तरी या फौजेचे फडशे करून, नवी फौज ठेवून अलीबहादूर यांचा बंदोबस्त करून द्यावयासी येता. त्यास, येथील ओढीचा अर्थ वारंवार लिहिण्यांत आलाच आहे. त्यावरून कळतच आहे. सारांश, अलीबहादूर यांची पुरवणी फौजेनें व खर्चानें करावी. बादशाही संस्थान आपल्याकडे निमित्त न येतां साताऱ्याप्रमाणें जाहलें आहे. बादशाहाचे लवाजम्याचा खर्च थोडा बहुत उणा जाहला. खूळ रोहिल्याचें मोठें होतें तें मोडलें. तेव्हां मुलुखाची लावणी चांगली जाहल्यानें एका वर्षानें सुबत्ता पडेल. होळकर इकडे आहेत, त्यापक्षीं रांगडे राजे रजवाडे सांगतात त्याप्रमाणें करून, सरकार लक्षीं आहेत त्यांस उपद्रव करितात. या गोष्टीनें आपसांतील फूट दिसून, साधले मसलतीस पेंच पडतात. हें लिहून कळवावें असें नाहीं. आपलेही ध्यानांत येईल. त्यास होळकरांस पत्र येऊन, अलीबहादूर यांस अनुकूल राहून, इकडील बंदोबस्त राखीत तें जालें पाहिजे. मुख्य बादशाही संस्थान दिल्ली, आगरें, रामगड हें सरकारांत येऊन, क्रोडों रुपयांचा मुलूख सरकारांत आला. याचा बंदोबस्त होय ते पैरवी* व्हावी. रवाना छ २४ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In a letter to Nana Mahadji expresses relief at the capture of the monster of the Ruhela, Gulam Kadar, and asks Nana to make arrangements for the settlement of Delhi affairs and allow him to retire from the scene.*

No. 553 2nd January 1789.

पैवस्ती छ १५ जमादिलावल तिसा समानीन.

गोविंदपंत यांणीं आणून दिल्हा खुला.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—इकडून पांच सात रवानग्या पत्रें इकडील सविस्तर लिहून पाठविलीं, परंतु उत्तर एकाही पत्राचें येत नाहीं. तरी पत्रांचीं उत्तरें लौकर आल्यानें मसलतीस ठीक पडतें. उत्तरें लौकर न येत व राजश्री सदाशिव दिनकर यांची रवानगी केली तेही लौकर न पोंहचेत. इकडील बंदोबस्त

---

* तजवीज.

पुढील जाहला पाहिजे याकरितां सदाशिव दिनकर यांसी सांगोन रवानगी केली होती. पत्रें त्यांजकडे रवाना केलीं. त्याच अन्वयें बाळाजी जनार्दन व रामजी पाटील जाधव यांसी लेहून आपल्याकडे जावयासी लिहिलें. उभयतां पोंचले व पत्रेंही पावलीं असतां दिवसगतीवर टाकोन उत्तरें न आलीं. त्यास जो मजकूर सदाशिव दिनकर यांसी लिहिला व येथून सांगितला तोच उभयतांस लिहिला आहे. तरी उत्तरें सत्वर पाठवावीं व राजश्री अलीबहादर यांची पुरवणी करावी. येविसीं रामजी पाटील जाधव व बाळाजी जनार्दन यांचे पत्रीं लिहिलें आहे. त्यांचीं उत्तरें सत्वर रामजी पाटील जाधव यांजपासीं द्यावीं म्हणजे इकडे रवाना करितील. रा छ ५ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji complains of delay of the Poona Darbar in replying to his dispatches.*

No. 554 6th January 1789.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष:—सांप्रत आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर इकडून वरचेवरी पत्रें रवाना जाहलीं आहेत त्यांचीं उत्तरें यावीं. इकडील बंदोबस्ताची पैरवी होळकर व अलीबहादर यांसी पत्रें येऊन व्हावी. त्या उत्तराची प्रतीक्षा आजपर्यंत जाहली. सांप्रत रांगड्यांची नजर इकडे राहूं न द्यावें; चमेल पार ठिकाणास घेऊन जाऊन, आपले फडशा करून घ्यावें हीच पाहिली. लोकांसीं वायदेही बहुत होऊन गेले. सवड बोलण्याची कांहींच राहिली नाहीं. तेव्हां अलीबहादरबाबा यांसी इकडील माहितगारी करून दिल्ही आहे. रोहिला शत्रु भारी होता. त्याचेंही पारपत्य जाहलें. जिवंत धरून आणिला. खूळ मोडलें. याउपरी अलीबहादरबाबा इकडील बंदोबस्त राखतील. सरकारांतून आपण अलीबहादर यांची पुरवणी पैक्यानें व फौजेनें करावी. इकडील मुलूक निर्वेध जालाच आहे. एक वर्षानें पुढें इकडे फौजा राहतात त्याचे खर्चाचा सुभत्ता इकडे पडेल. सारांश, आम्ही लोकांपुढें आपले स्वाधीन असें नाहीं. गेलेली मसलत श्रीमंतांचे प्रतापें सुधारली आहे. साताऱ्याप्रमाणें दिल्लीचें संस्थान जालें

आहे. बंदोबस्ताची पैरवी करणें आपल्याकडे आहे. येविसीं वरचेवर पत्रें पाठविलीं आहेत, तीं पावोन तर्तूद जाहलीच असेल. रा छ ९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sindia reports "all quiet" in the Delhi quarter and requests the Darbar to appoint a successor to take over the charge of affairs and relieve him.*

No. 555 January 1789.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ माहे रबिलाखरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त उदास असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासीं आज्ञा केली पाहिजे. या नंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, गुलामकादर याजला जिवंत धरून आणिल्याचा मजकूर संकलितार्थ पेशजी सेवेसीं लिहिलाच आहे. परंतु तपशीलवार मजकुराचें वर्तमान लिहिलें नव्हतें. यास्तव हल्लीं हरामखोर कैसा धरून आणिला त्याचें कच्चें वर्तमान सेवेसीं श्रुत व्हावें यास्तव लिहिलें आहे. गुलामकादर याजला मेरठेमध्यें महिना दीड महिना कोंडिला होता, आणि चौफेर रस्त बंद करून तोफांची मारगिरी नित्यशा बाहेरून चाललीच होती. त्यामुळें आंत तो घाबरा होऊन पळोन जावें हा बेत केला, आणि आपले जागां तयारी केली. परंतु विचार पाहतां, तमाम फौजा बाहेर, तेव्हां पळोन गेले असतां निभाव होईल न होईल हा मनांत आंदेशा आणून, मागतीं विचार केला कीं, विना सलुखाचें बोलणें लाविल्याशिवाय ठीक पडत नाहीं. यास्तव सलुखाचें बोलणें लाऊन त्यांस विसर पाडावा, मग आपण निघोन पळोन जावें, तरच निभाव होईल. ऐसा आपले जागां त्यानें पक्केपणें विचार करून, मण्यारसिंग पलटणवाला याजला, शहराबाहेर सूर्यकुंड आहे तेथें, बमेय पलटण तोफा सुद्धां तयारी करून तेथें उभा केला; आणि इकडे बिलासराय, त्याचा मुख्य कारभारी, त्याजला राजश्री रायाजी पाटील यांजकडेस सलुकाचें बोलण्यासाठीं

पाठविला कीं, आम्हांस अब्रूनसीं सोडावें आणि पातशाजादे सुद्धां सुनळीचा तोडा आदिकरून तोफा व हत्ती वगैरे सलतनत जी असेल ती घ्यावी आणि आम्हास जमेयत सुद्धां सोडावें, आणि जाइदाद*पहिल्यापासून जी आम्हांकडे चालली आहे ती मात्र द्यावी. वगैरे जाबसाल जतके मतलबी बोलायाचे ते सांगोन बिलासराय यास इकडे रवाना केला. तो राजश्री रायाजी पाटील यांजकडेस येऊन सलुकाचे बोलण्याचे डौल घातले, आणि इकडे हरामखोरानें चार पांचशें स्वार चांगले, आपले जिवाचे सोबती, ऐसे निवडून गोसगडास पळोन जावें हा विचार करून, मार्गशीर्ष वद्य पंचमीस† बुधवारीं, सायंकाळच्या तीन घटिका दिवस राहिला होता तेव्हां आंतून बाहेर निघोन गोसगडाचे मार्गे चालला. कोस पाऊण कोस गेला, तों राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी मोर्चांचा बंदोबस्त करीत करीत, तिकडून ज्या मार्गे गुलामकादर पळोन गेला तेथें आले. तों हरामखोर तीन चारशें स्वारांनिसीं पळोन गेला, हें वर्तमान ऐकिलें. मग तेच क्षणीं पांच सातशें स्वारांनिसीं तयारी करून, राजश्री अलीबहादरबाबा व राणेखानभाई वगैरे सरदार लहान मोठे होते त्यांजला सांगोन पाठविलें कीं, "गुलामकादर पळोन गेला. तुम्हीं आपल्या फौजा तयार करून गुलामाच्या शोधास चहूंकडे पाठवाव्या. आम्हीं त्याचा पाठलाग करीत जातों," ऐसें सांगून सर्वांस पाठविलें, आणि आपण तैसेच गुलामकादर याचा पाठलाग करीत करीत गेले. तों मेरठेपासून शामली परगणा म्हणोन आहे तो वीसबावीस कोस आहे, त्याचे अलीकडे निकडेनें जाऊन गांठ घातली. तों रात्र दोन अडीच प्रहरपर्यंत जाहाली होती. तत्रापि मशारनल्हेनीं तैसीच निकड करून लढाईसीच गांठ घालोन, तेवढ्या रात्रीस तीन चारशें रोहिले कापून काढिले व कांहीं पळोन गेले. त्या समयीं गुलामकादर हौलदिल‡ होऊन घोडयाखालीं आला. नंतर एका स्वारानिसीं तसाच पाय उतारा असोन एका बोळांत जाऊन दडून राहिला. आपले फौजेस कोणासही सांपडला नाहीं. त्याच वेळेस शोध करावा तर रात्रीचा प्रकार जाणून तलास करणें राहिला. तेव्हां हरामखोरास फुरसत सांपडली, त्यामुळें निघोन गेला. दुसरे दिवशीं अलीकडे पलीकडे शोध केला परंतु ठिकाणा लागला नाहीं. तेव्हां मशारनिल्हेनीं इतकी लढाई मारून मागती आले. फौजा आपल्या तिकडे आसपास नाहींत ऐसें जाहल्यावर, मग गुलामकादर जेथें बोळांत दडून राहिला होता

*जागीर. †ता. १७ डिसेंबर १७८८. ‡हवालदिल.

तेथून निघोन, पायउतारा शामली परगण्यापासून दोनतीन कोसीं एक गांव आहे तेथें ब्राम्हणाचे घरीं जाऊन, त्या ब्राम्हणास सांगितलें कीं मी अमका आहें. मजला दोन तट्टू देऊन गोसगडास पोंहोचाऊन देणें. तूं जें मागसील तें मी तुजला देईन. तेव्हां त्या ब्राम्हणानें त्याची खातरजमा हरतऱ्हेनें करून गुलामास आपले घरांत खोलीमध्यें कोंडून ठेविला, आणि त्याजला म्हणाला कीं, तूं येथें स्वस्थ बसणें. फौजा बाहेर गलीमाच्या फिरत आहेत. एक दोन दिवस विसर पडोन, मग तुजला दोन तट्टू देऊन गोसगडास पोंहोंचाऊन देऊं. ऐसें म्हणोन आपण तसाच निघोन, लष्करांत राणेखानभाई यांजकडे खुषीचें वर्तमान सांगावयासीं मुजरद* येत होता. तों दरम्यान राजश्री अलीबहादूर यांची फौज गुलामाचे शोधाकरितां फिरत होती. तों इतक्यांत तो ब्राम्हण जलद चालला होता, तों प्रथमच या फौजेची गांठ पडली. तेव्हां त्या लोकांनीं त्या ब्राम्हणास उभें केलें आणि पुसों लागले कीं, तूं इतका जलदीनें कोठें जातोस ? तेव्हां त्यानीं सांगितलें कीं, गुलामकादर एके जागां आहे; तो तुम्हांस दाखवून देतों. ऐसें म्हणतांच त्या लोकांनीं त्या ब्राम्हणास घेऊन राजश्री अलीबहादूर यांजकडे आले. तेव्हां तेथें चौकशी होऊन, तेच वेळेस अलीबहादूर यांनीं आपले पागेपैकीं तीनशें स्वार व हुजरे व राजश्री सिधोपंत कारकून बरोबर देऊन रवाना केले. तेथेंच त्या ब्राम्हणाचे घरीं गेले. नंतर गुलामकादरास दाखवून दिलें. उपरांत तैसाच कैद करून धरून आणिला. नंतर राणेखानभाई वगैरे यांचे चित्तांत हरामखोरास आपले स्वाधीन करून घ्यावें ऐसें होतें. परंतु पत्रें राजश्री अलीबहादूर यांस व राणेखानभाईस पाठविलीं कीं, गुलामकादर व नाजरखोजा वगैरे पाडाव जे आले असतील, ते झाडून येथें पाठवून देणें. त्याजवरून गुलामकादर याची रवानगी अलीबहादूर यांनीं केली. ते येथें पौष शुद्ध ४ चतुर्थीस† बुधवारीं मुक्काम मजकुरीं येऊन पावले. नंतर तैसेच कैदेंत ठेविले. दुसरे दिवशीं गुलामकादरास व नाजरखोजास व बिलासराय व मण्यारसिंग पलटणवाला या चौघांस वाडयामध्यें नेऊन चौकशी प्रथक प्रथक करविली. त्यांत विशेष बोलणें कांहीं दिसोन आलें नाहीं. त्याजवरून दंड करण्याची तऱ्हाही बहुत प्रकारची दाखविली. परंतु त्याचें बोलणें काईममिजाजीचें. अद्याप कांहीं दृष्टीस पडलें नाहीं. यास्तव अद्याप चौकशी होतच आहे. वरकड गुलामकादर याजला धरून आणिला ते समयीं बिलासराय दिवाण हाही धरून आणिला. तेव्हां

*मुद्दाम. † ता. ३१ डिसेंबर १७८८.

त्याजपासीं जव्हाहीर सांपडलें, तें राजश्री पाटिलबावांनीं यादी बा॥ आम्हांस व गंगाजी हुजरे यांजला बोलावून दाखविलें. आणि त्यांजकडील मोजदादीची याद आली होती तिची नक्कल करून एक आपणांजवळ ठेविली, आणि एक याद सेवेसीं पाठविली आहे. त्याजवरून श्रुत होईल. पातशाई जव्हाहिराचा भ्रम फारच होता. परंतु आजपर्यंत यांचे हातीं इतकेंच लागलें. याखेरीज जे समयीं हरामखोर पळाला, तेव्हां राजश्री पाटिलबावांकडील फौज व राजश्री अलीबहादर यांची फौज शहरांत मेरठेच्या शिरली. तेव्हां कोणाचे हातीं काय लागलें तें ईश्वर जाणें. येथें जें जव्हाहीर आलें, तें आम्हांस दाखविलें. त्याची किंमत अजमासें पांच हजारपर्यंत होईल अथवा जोव्हारी याचे पारखीमुळें हजार दोन हजार जास्ती होतील. यापेक्षां जास्ती आकार होणें नाहीं. मग याशिवाय आणखी जवाहीर गुप्त ठेविलें असेल तर ईश्वर जाणें! त्याचा शोध आम्हांस लागला नाहीं. वरकड गुलामकादर याचे सांगण्यांत आलें कीं, चौदा लक्षांचें कापड कुली सांपडलें व जवाहीर व सोनें व चांदी वगैरे पांच सात लक्षांचें सांपडलें. त्याजपैकीं कापड व जवाहीर वगैरे बहुतेक शिबंदीस वांटलें गेलें. थोडें बहुत गोसगडासही पाठविलें ऐसें सांगतो. परंतु पक्कें समजोन हातीं काय लागलें असेल तें नकळे. सारांश गोष्ट हीच कीं, ईश्वरकृपेकरून व श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून यश यथास्थित येऊन, शत्रूचें पारिपत्य यथासांग जाहालें, आणि जिवंतही सांपडला. येणेंकरून तमाम हिंदुस्थानी यांस दाब बसला. आतां एक इस्माइलबेग मात्र राहिला आहे. त्यास त्याचेही तरतुदींत लागले आहेत. मग काय घडेल तें पहावें. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार मेवाडांत आहेत. त्यांजपासीं मारवाडवाल्यांचे व जैपुरवाल्यांचे वकील बसलेच आहेत. तेथील वर्तमान कच्चें पक्कें हमेशा लिहिलें येतें, यांत अर्थ दिसोन हाच येतो कीं, उभयतां राजांस सामील करून राजश्री पाटिलबावांसी विरुद्ध परस्परें करवावें, आणि आपण अलग असावें, ऐसा विचार दिसतो. त्यास मागें कैलासवासी श्रीमंत रावसाहेब यांचे वेळेस सरकारचे सरदार हिंदुस्थानांत आले होते, तेव्हां उभयतां सरदारांनीं आपसामध्यें कलह केला. त्या समयीं शिंदे होळकरांनींही आपसामध्यें द्वेष करून सरकारकाम नासलें. तोच विचार हल्लीं दिसत आहे. जे समयीं राजश्री अलीबहादर यांची व सुभेदारांची रवानगी सरकारांतून केली, तेव्हां तमाम हिंदुस्थानी यांस दाब बसला होता कीं, या दोन्ही फौजा राजश्री पाटिलबावांस सामील जाहल्यानंतर सर्वांचीं पारिपत्यें करून बंदोबस्त करितील, हा भ्रम होता. त्यास श्रीमंतांचे

पुण्यप्रतापेंकरून आजपर्यंत जी चाकरी बरी वाईट जाहली, ती राजश्री बावांनीं केली; आणि यशही श्रीमंतांचे पुण्येंकरून घेतलें; आणि होळकर अद्याप तमाशाच पहात बसले आहेत. येविसीं सरकारांतून त्यांस निकडीचीं पत्रें आल्यास कदाचित् इकडील मसलतीस सामील जाहले तर होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram in this letter to Nana, gives minute and interesting details of the capture of Gulam Kadar. He expresses regret for the jealousy and total indifference of Holkar.*

No. 556 January 1789.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. गुलामकादर याजला धरून आणिला. त्याची आई वगैरे कबिले दौलत सुद्धां गोसगडांतून पळून शिखांचे मुलुखांत गेली आहे. यास्तव तमाम शीखांस व पहाडवाले, नाणेवाले, वगैरे संस्थानिक यांजला येथून पत्रें पाठविलीं आहेत कीं, हरामखोराची आई व कबिले त्या प्रांतीं पळोन गेले आहेत. ते बमय* सरंजामसुद्धां पाठवून देणें. नाहीं तर तुमचे पारिपत्यास फौजा येथून पाठविल्या जातील. याप्रमाणें बंदोबस्त कागदोपत्रीं केला आहे. व गोसगड व सारंगपूर या प्रांतीं दरोबस्त अंमल बसवावयाकरितां राजश्री रायाजी पाटील व राजश्री अलीबहादर यांची फौज रवाना करून, सरदार गोसगडास मुक्काम करून आहेत. गुलाम कादर याचें पारिपत्य जाहलें. आतां अंतरवेदींत व यमुना अलीकडे खूळ एकच इस्माइलबेगाचें मात्र राहिलें आहे. त्याखेरीज दुसरा प्रस्तुत कोणीही नाहीं. याचा बंदोबस्त पुढें कसकसा काय होतो तो पाहोन, मग आपण उज्जनीस जावें, हा विचार करून राजश्री अलीबहादर यांस इकडे येण्याविसींचीं पत्रें राजश्री पाटिलबावांनीं पाठविलीं आहेत. ते सडचा फौजेंतून येथें आलियानंतर काय मसलत ठरेल ती पहावी. आपले जागां येथील विचार आहे कीं, झाडून मुलखाचा बंदोबस्त करून यांजला द्यावा, आणि आपण फौज सुद्धां उज्जनीस जावें. तेथें गेलियानंतर लोकांचा फडशा जैसा होईल तैसा करावा, आणि आपण खासा स्वारी पुढें देशास श्रीमंतांचे व साहेबांचे दर्शनास जावें. हा विचार प्रस्तुत फार चालला आहे.

---

* सुद्धां.

परंतु उभयतांचे विचारें काय ठरेल तें पहावें. येविसींचा तपसीलवार मजकूर चार पांच रवानग्यांत राजश्री पाटिलबावांनीं लिहून, सेवेसीं व श्रीमंतांस पाठविलाच आहे व वकिलाकडून व राजश्री भिकाजी नारायण पाळंदे* याजकडून अलाहिदा लिहविला आहे त्याजवरून श्रुत जाहलाच असेल. परंतु लहान मोठ्याचे विचारेंकरून कीं, जैसें गुलामकादराचें पारिपत्य जाहलें, त्याप्रमाणें इस्माइल्याचें पारिपत्य जाहल्याखेरीज राजश्री पाटिलबावा उज्जनीस गेले, तर राजश्री अलीबहादर यांच्यानें मुलुखाचा बंदोबस्त राखून, फौजेचें पोट भरून, शत्रूवर दाब रहाणें ही गोष्ट कठिण दिसत्ये. याचें कारण तरी, या मसलतीस पैका बहुत पाहिजे. तेव्हां इकडे फौजा घेऊन राहणें ठीक पडेल. मुलखाचा पैका वसूल करून, फौजेची वेगमी करूं म्हटलें असतां अर्थ समजलाच आहे. किमान पक्ष दहावीस लक्ष रुपये मुबदल्यास असल्याशिवाय ठीक पडणार नाहीं. यास्तव पैका मसलतीस असोन, राजश्री पाटिलबावांकडील फौज व पलटणें मिळोन दहा पंधरा हजार जमाव व एक मातबर नांवाचा सरदार असल्याखेरीज बंदोबस्त यथास्थित राहणार नाहीं. मुळींच पैका नाहीं. त्यांत शत्रू उशापायथ्यास वसलेच आहेत. यास्तव सरंजाम पोक्त असला तरच परिणाम आहे. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार इकडे येऊन बंदोबस्त करितील हाही अर्थ दिसण्यांत येत नाहीं. मग इतक्यावर न कळे. परंतु हल्लींचे चालींवरून येतां दिसत नाहीं. वरकड वर्तमान जें होईल तें सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Mahadji concerts measures to capture Gulam Kadar's family. The writer Appaji Ram expresses his opinion that affairs in the North could not be left in charge of a man less capable than Sindia.*

No. 557 February 1789.

पैवस्ती छ १९ जमादिलाखर सन तिसा समानीन फाल्गुन बरोबर डांक.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मजकूरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान

---

* अलीबहादराचा कारभारी.

यथास्थित असे विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नव्हता. छ १० रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री अलीबहाद्दरांची दिल्लीस रवानगी करावयाची ठरावून चौघडा व जरीपटका दिला. त्यास अलीबहाद्दरांच्यानें बंदोबस्त होईल न होईल याचा विचार पाटिलबावांनींच करावा. पाटिलबावांचा तिकडे दाब व जरब सर्वांवर असतां, मोगले व रांगडे खेळ करावयासी चुकले नाहींत. तेथें अलीबहाद्दर तर नवे, यांचा परिणाम कसा लागेल; याजकरितां पाटिलबावांनीं यांचे गळां घालूं नये. इकडे येण्याचें करून इकडे आले असतां, आजपर्यंत श्रम साहास व मेहनत करून मुलूख मिळविला, व पातशाहातीचा बंदोबस्त केला, तितकाही व्यर्थ होऊन नक्ष राहणार नाहीं. याजकरितां पाटिलबावांनीं इकडे यावयाचें करूं नये. येविसींचे पर्याय पूर्वी सविस्तरें लिहून, पत्रें तुम्हांकडे पाठविलीं आहेत, तीं पावलींच असतील. त्यांजवरून ध्यानांत आलेंच असेल. व पाटिलबावांस पत्रें दाखवून त्याअन्वयें बोलणेंही जालें असेल. तें सविस्तरें लिहून पाठविणें म्हणोन आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावांपासीं बोलोन, पेशजींचे पत्रांचीं सविस्तरें उत्तरें मागितलीं, व हल्लीं स्वामींनीं मजकूर लिहिला, याचेही भाव बोलण्यांत दाखविले. तेव्हां त्यांचीं उत्तरें बहुत जाहलीं, तीं पत्रीं लिहितां येत नाहींत. सारांश, येथें निश्चय हाच जाहाला कीं, तुमच्या पत्रांचे जाब आम्हीं त्याहावे तर ठीक नाहीं. उत्तरास प्रतिउत्तर करूं लागूं, तेव्हां त्या गोष्टी बहुत विलग पडतील. याजकरितां त्यांचीं उत्तरें द्यावयाचीं नाहींत. ईश्वरइच्छेंकरून आमचें देशीं जाणें घडेल, तेव्हां समक्ष आमची गांठ पडेल, ते समयीं काय उत्तरें द्यावयाचीं तीं देऊं. आतां कागदोपत्रीं लिहून फळ नाहीं. ऐसें उत्तर आलें, तें स्वामीस कळावें म्हणोन सेवेसीं लिहिलें आहे. त्याजवरून ध्यानास येईल. राजश्री अलीबहाद्दर यांजला राजश्री पाटिलबावांनीं सडचा फौजेंतून माघारें येण्याविसीं पेशजी पत्रें पाठविलीं होतीं त्याजवरून राजश्री अलीबहाद्दर सडे पांचसांतशें राऊतांनसीं, माघ वद्य चतुर्थीला* मंगळवारीं, मुक्काम मजकुरीं येऊन दाखल जाहले. नंतर दुसरे दिवशीं भेटी जाहल्या. पुढें इकडील बंदोबस्ताविसींचीं बोलणीं जाहलीं. त्यांचीं उत्तरें परस्पर होऊन सिद्धांत जाहाला तो मजकूर तपसीलवार स्वामींस अलीबहाद्दर

* या वर्षाच्या माघ वद्य ४ ला तारीख १३ फेब्रुवारी १७८९, शुक्रवार येतो, मंगळवार नाहीं.

यांनीं मुजरद अजुरदार याजबरोबर पेशजीं लिहून पाठविला आहे. आपली आज्ञा येईल त्याजप्रमाणें वर्तणूक करावी, याप्रमाणें बोलणें ठरलें आहे. स्वामींस कळावें म्हणोन सेवेसीं लिहिलें आहे. हल्लीं मारवाडी यांनीं राजश्री पाटिलबावांचे लष्करांत बजाज* व सराफ, जैपूर मारवाड येथील आहेत, त्यांसीं संधान करून मारेकरी राजश्री पाटिलबावांस दगा करावा या सूत्रावर पाठविले होते. त्यांजमध्यें मोठामल म्हणोन मातबर माणूस गोहदेच्या राण्याकडील चाकर होता, तो या राजकारणांत सामील जाहला होता. तो हल्लीं धरून कैद केला. सारांश, श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून खैर जाहाली. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes how very anxious Sindia was to resign his command into other hands.*

No. 558 July 1789.

पैवस्ती छ ६ जिल्हेज तिसैन.

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— इकडील दरवारी वर्तमान तर, राजश्री पाटिलबावांचे शरीरीं बहुतच समाधान नव्हतें. या दुखण्यांत पुनर्जन्म जाहाला; व प्रेत्नही आरोग्यतेविसीं फार केला. परंतु गुणास कांहीं पडेना. तेव्हां थोर थोर ज्योतिषी वगैरे मंडळी यांच्या विचारें ठरलें कीं, शरीरास इतके उपाय करीत असतां गुण पडत नाहीं; तेव्हां हा शरीररोग नव्हे ! कोण्ही प्रयोगादिक केलें आहे. हाच विचार सर्वांचे अनुमतें जाहाला. तेव्हां अनुष्ठानास ब्राम्हणही घातले. तेव्हां आरोग्यता होऊन, थोडेसें शरीरास आराम वाटों लागलें. तेव्हां याचा शोध बारकाईनें करितां, जैपूरवाल्यांनीं अनुष्ठानास ब्राम्हण घालून हा प्रयोग नेहमीं चालविला आहे. आणि येथेंही हल्लीं हिंमतबहादर आला आहे, त्याणींही अनुष्ठानाचा प्रयोग, मुख्यास समाधान नसावें, याकरितां केला आहे. तेव्हां ही गोष्ट प्रसिद्धतेंत आली. तेव्हां याची चौकसी करावयासी राजश्री अलीबहादर यांजकडील कारभारी व राजश्री शिवाजी विठ्ठल बापू, व राजश्री गोपाळराव त्रिबक यांजकडील कारभारी, ऐसे त्रिवर्गांस बोलावून नेऊन सांगितलें कीं, ही गोष्ट खरी किंवा खोटी याची पुर्तेपणें चौकसी करून आम्हांस सांगणें. मग त्याप्रमाणें बंदोबस्त करावयासी येईल.

---

* कापडाचा दुकानदार.

म्हणून राजश्री पाटिलबावांनीं सांगितलें. आपले घरचे मुत्सद्दी यांजलाही सांगितलें कीं, त्रिवर्गांकडील कारभारी व तुम्ही एकत्र बसोन याचा सिद्धांत करावा, म्हणजे त्याप्रमाणें बंदोबस्त केला जाईल. त्याजवरून सर्वत्रांनीं एके जागां बैठका करून या गोष्टीचा शोध व चौकसी बहुत केली. तेथें सर्वांचे विचारें ठरलें कीं, हिंमतबहाद्दर गोसावी याणें अनुष्ठानास ब्राम्हण घालून प्रयोग केला खरा. ही गोष्ट सर्वांचे मुखें ठरली. नंतर राजश्री पाटिलबावांस सांगितलें कीं, हिंमत-बहाद्दर गोसावी याणें प्रयोग केला खरा; तरी येविसींचा बंदोबस्त अविलंबें व्हावा. त्याजवरून राजश्री रायाजी पाटील व राजश्री लखबादादा आग्र्यास होते, त्या उभयतांस गोसावी यांजला धरून आणावयाकरितां पाठविले. त्यास हे उभयतां तयार होऊन त्याजकडे जात आहेत, तों त्यांची बातमी आगोदर दरबारांत होतीच, त्याजमुळें हिंमतबहाद्दर आपले जागां सावध होऊन, आपले डेऱ्यांत शेंदोनशें खाशांनसीं तयार होऊन बसला. तों इतकियांत हे उभयतां जाऊन पोंचले. तेव्हां त्याणें तितकियांतच जलदी करून, घोडयावर स्वार होऊन बाहेर निघाला; आणि म्हणों लागला कीं, मी राजश्री पाटिलबावांकडे जातों. ऐसें म्हणोन बाजाराचे आघाडी पावेतों, ते व हे उभयतां मिळोन आले. आणि तेथून जलदी करून राजश्री अलीबहाद्दर यांचे डेऱ्यास चालला. तेव्हां या उभयतांनीं त्याजला मनाही केलें. परंतु तो तैसाच रेटाई करून डेऱ्यांत जाऊन बसला, आणि म्हणूं लागला कीं, मी श्रीमंतांच्या जरीपटक्याजवळ आलों. आतां माझे आंगीं मुद्दा शाबूद करा, व नंतर जें करणें तें करावें. तेव्हां सारीच मसलत विलग पडली. नंतर राजश्री अलीबहाद्दर यांणीं गोसावी याजला धरून, कैद करून, राजश्री पाटिलबावांचे स्वाधीन करावा, तरी लौकिकास ठीक पडेना. यास्तव पाटिलबावांस सांगोन पाठविलें कीं, हिंमतबहाद्दर गोसावी याजला इकडे येऊं न देतां परभारें आपले तेथें न्यावा, तो तर अर्थ घडलाच नाहीं. असो. हल्लीं गोसावी येथें बसला आहे. आपल्यास कळेल त्याप्रमाणें बंदोबस्त करून न्यावा. त्याजवर पाटिलबावांचें उत्तर आलें कीं, तो चोर आमचा आहे; तो आमचा आम्हांकडे पाठवून द्यावा, अगर त्याणें आमचे डेऱ्यास यावें. मग जो विचार करणें तो करूं. याप्रमाणें परस्परें बोलणीं जालीं. त्याजवर पुन्हां अलीबहाद्दर बोलले कीं, आपला चोर आहे तो घेऊन जावा. आम्हीं येविसीं अडथळा करीत नाहीं. त्याजवरून मुख्यास दुराग्रह पडोन, फौज तयार करावी आणि हिंमत-

बहादरास कैद करावें ही मसलत ठरावून, तीन चार हजार स्वार तयार करून, गोसावी याजकडे अलीबहादर यांचे गोटांत पाठविले. त्यास, ते स्वार समग्र तीन चार दिवस त्यांचेच गोटाभोंवतें चौकी देऊन होते; परंतु हिंमतबहादर गोसावी तिळमात्र डगमगला नाहीं. हल्ला करावी तर, अलीबहादर यांचे लष्करात गर्दी होऊन लष्कर लुटलें जाईल, याअर्थी हल्लचाचाही उपाय न चाले. याप्रमाणें तीन चार रोज घालमेल जाहाली. तत्रापि कोणताही जाबसाल शेवटास गेला नाहीं, आणि त्यानें लष्करांत मात्र उगाच दंगा. तेव्हां अलीबहादरबाबा यांणीं राा सदाशिवपंत आसबलकर यांचे पुत्र बळवंतराव व राजश्री आपाजीपंत दामले व राजश्री भिकोबा पाळंदे या त्रिवर्गास राजश्री पाटिलबावांकडे बोलावयासी पाठविलें कीं, हिंमतबहादर आमचे लष्करांत येऊन आज तीन चार दिवस जाले, अद्याप त्याजला नेत नाहीं, आणि कांहीं तोडही पडत नाहीं. तेव्हां पुढें आम्हीं कोणता विचार करावा? यास्तव त्याजला कांहीं वचन कथन देऊन, वैदा मोडून टाकावा. अगर आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. परंतु याउपर वैदा नसाव. त्यास हे त्रिवर्ग तेथें जाऊन, वर लिहिल्याअन्वयें बोलले. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं उत्तर केलें कीं, तुम्हीं तोड पाडून टाकणें. त्याजवर पुन्हां हे त्रिवर्ग बोलले कीं, त्याजला वचन कथन देऊन तोड कोणते प्रकारें पाडावी, त्याची आज्ञा व्हावी. तत्रापि मुख्यांनीं उघडून सांगितलेंच नाहीं. मोघमच जाबसाल केला व यादही थोडीशी ठरावून घेतली. परंतु जाबसाल निश्चयाचा ठरोन निर्णय जाहाला नाहीं. सेवटीं भिकोबा पाळंदे बोलले कीं, आम्हांस तोड पाडावी म्हणोन आज्ञा होते, त्यास उत्तम आहे. परंतु आपलेकडील दोन गृहस्थ चांगले द्यावे, म्हणजे ते व आम्ही मिळोन, गोसावी यास वचन कथन देऊन, जाबसाल कोणते तोडीवर येतो तें पाहूं. त्याजवर बावांनीं मान्य करून, राजश्री रायाजी पाटील व राजश्री कृष्णोबा बाबा चिटणीस यांस आज्ञा केली कीं, तुम्हीं या त्रिवर्गांबरावर जाऊन, जाबसाल कोणते रंगावर येतो तें पहावें.

इतकें मुख्यांचें बोलणें जाहल्यावर हे त्रिवर्ग आपले गोटांत जाऊं लागले. ते समयीं रायाजी पाटील व कृष्णोबा चिटणीस यांजला समागमें घेऊन जावें, तें न होतां आपण निघोन गेले, आणि या उभयतांस न्याययाकरितां राजश्री विठ्ठल हरि वकील यांजला तेथें ठेविलें. त्यास हे त्रिवर्ग आपले गोटांत पोंचले नाहींत, तों इतक्यांत हेही उभयतां तेथें गेले. तों हे त्रिवर्ग आपआपले राहुटीस गेले. हे आल्यावर त्यांणीं बैठक करून एखादा जाबसाल निर्णयांत आणावा, तो प्रकार

न घडतां, हे आपले गोटांत फिरोन माघारें आले. नंतर मुख्यास सांगितलें कीं, आपले आज्ञेप्रमाणें गेलों, परंतु तेथें बैठक होऊन जाबसाल एकही जाहला नाहीं. त्याजवर तो जाबसाल तैसाच राहिला. मागाहून अलीबहाद्दर यांणीं बावांकडे सांगोन पाठविलें कीं, आम्हीं हिंमतबहाद्दर याजला वचन कथन दिल्हें कीं, तुजला पाटिलबावांचे हातीं देत नाहीं, परंतु तुझी दौलत येथें जितकी असेल ती झाडून आम्हांजवळ आणोन द्यावी, आणि तूं मुलांमाणसां सुद्धां आमचे कैदेंत राहणें. त्याजवरून गोसावी याणें मान्य करून उत्तर केलें कीं, मी आपले कैदेंत राहातों; परंतु माझी चौकशी पुर्तेपणें करावी. जरकरितां मजकडे दोषच आला, तर जितकी माझी दौलत आहे ती आपण सरकारांत लावणें, आणि मजला कैदेंत ठेवणें. याप्रमाणें जाबसाल रण्यांत आला म्हणून निरोप जातांच, पाटिलबावांची मर्जी बहुतच खट्टी होऊन, मनस्वी भाषणें होऊं लागलीं, आणि सर्वांजवळ बोलूं लागले कीं, अलीबहाद्दर यांजकडील कारभारी येऊन बोलले कीं, गोसावी याची तोड अद्यापि पडत नाहीं. त्याअर्थीं त्याजला कांहीं वचन कथन देऊन, बैदा जाहला आहे तो मोडून टाकावा. अथवा आपलेकडील दोन गृहस्थ चांगले द्यावे, म्हणजे ते व आम्हीं मिळोन एखादा जाबसाल तोडीवर आगून बैदा मोडून टाकूं. त्याजवरून रायाजी पाटील व कृष्णोबा चिटणीस यांजला पाठविलें असतां, त्यांचे विद्यमानें जाबसाल न होतां, यांणींच आपले जागां गोसावी यास वचन कथन काय म्हणून दिल्हें? ऐसें म्हणोन मुख्यांची मर्जी बहुतच खट्टी जाहाली. सारांश, येथील मुख्यांचें म्हणणें कीं, आमचा चोर आम्हांकडे पाठवून द्यावा, तरच ठीक आहे. अलीबहाद्दर यांचें म्हणणें कीं, गोसावी आमचे डेऱ्यास चालोन आला, त्याअर्थीं आम्हीं कसा द्यावा? त्यांस प्रथम आला तेव्हांच आम्हीं सांगून पाठविलें कीं, चोर आपला घेऊन जावा. तेव्हां आपली आज्ञा जाहाली कीं, त्याची तोड तुम्हीं पाडणें. त्याजवरून आम्हीं त्याजला सदरहू अन्वयें वचन कथन देऊन जाबसाल ठरण्यांत आणिला, त्याअर्थीं आम्हीं आतां हातीं देत नाहीं. ऐसें हे बोलतात आणि त्यांचा तर हा दुराग्रह आहे. तेव्हां याचा परिणाम पुढें कैसा होईल तें पाहावें. परंतु विचार पाहतां, ही गोष्ट लौकर निर्गमांत आली तरच बरें आहे. नाहीं तर दुराग्रहामुळें काय होईल न कळे. असो. होईल वर्तमान तें सविस्तर वरचेवर लिहीत जाईन. सारांश लिहिणें हेंच कीं, गोसावी याचें इतकें प्रकर्ण जाहालें, परंतु मजला तिळमात्र ठाऊक नव्हतें! शेवटीं वाद प्रतिवाद होऊं लागले, तेव्हां मुख्यांनीं

आपले परी सांगितलें, व अलीबहादर यांणींही आपले परी सांगितलें, व बाह्या-त्कारींही थोड थोडें ऐकिलें; परंतु आंतील कच्चें पक्कें यथास्थित समजण्यांत आलें नाहीं. परंतु जें वर्तमान लहान मोठें आढळलें, तें सेवेसीं लिहिलें आहे. व येविसींचें वर्तमान तेही लिहितील, त्याजवरून श्रुत होईल. वरकड मी ह्या बोलण्यांत किमपि नाहीं. यास्तव जें वर्तमान लिहिलें आहे तें स्वामींनींच ध्यानांत धरून ठेवावें. केवळ ह्याच लिहिण्यावर पट्कर्णी न व्हावें. मागाहून सविस्तरें लिहून पाठवीन. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांच्या व राजश्री पाटिल-बावांच्या भेटी श्रावण शु।। दशमीस* होणार आहेत. भेटी जाहालियानंतर जें वर्तमान होईल तें मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. राजश्री नारो गणेश येथें लष्करांत येऊन आज पांच सात दिवस जाहाले. प्रथम राजश्री आबा चिटणीस सुभेदाराकडे पाठविले होते. त्यांचें यांचें बोलणें ठरोन, मग पुढें नारो गणेश आले. मागाहून ते येणार. सेवेसीं कळावें म्हणोन विनंतिपत्र लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadji takes exception to the detention of his prisoner, Himmat Bahadur Gosavi, by Ali Bahadur. Mahadji found the Gosavi guilty of evil practices to which he attributed his illness and had ordered the Gosavi's arrest.*

No. 559 Just after 14th August 1789.

सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— राजश्री पाटिलबावांस श्रीमंतांचीं व स्वामींचीं पत्रें आलीं. तेथें आज्ञा जे बुंदेल-खंडाचा बंदोबस्त जाहला पाहिजे. परणेवाले राजे यांचे कारभारी यांचें व राजाचें बनत नाहीं, याजमुळें संस्थानाचा बखेडा जाहला आहे. त्याचे बंदोबस्तास राजश्री अलीबहादर यांची रवानगी करावी म्हणोन लिहिलें आलें. त्याजवरून येथें सेवकापासीं भाषणें बहुत जाहलीं. त्याचा विस्तार श्रीमंतांचे पत्रीं व स्वामींचे पत्रीं मुख्यांनीं आलाहिदा लिहिला आहे त्याजवरून श्रुत होईल. सारांश, येथील लिहिण्याचा भाव कीं, अलीबहादर यांजला बुंदेलखंडांत सरकार आज्ञे-प्रमाणें रवाना करावें हा अर्थ त्यांचे मर्जीचा दिसत नाहीं. मग याउपर काय घडेल

---

* ता. ३१ जुलई १७८९.

तें खरें. तूर्त हिंमतबाहाद्दर गोसावी याजला अलीबहाद्दर यांणीं आपले जवळ ठेविला आहे. याजमुळें मर्जी बहुत दि:क* आहे. तोही मजकूर स्वामींचे पत्रांत मुख्यांनीं लिहिलाच आहे. राजश्री जनार्दन लक्ष्मण वैद्य स्वामींचा निरोप घेऊन इकडे आले, ते येथें श्रावण वद्य ८ † स सुखरूप पावले. सविस्तर वृत्त सांगितलें. त्याजवरून संतोष जाहला. वरकड इकडील बारीक मोठें वर्तमान होईल तें मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. सेवकास देशीहून इकडे येऊन साडेतीन वर्षें जालीं, आणि येथेंही पुढें राहून विशेष सरकारकामाचाही अर्थ दिसत नाहीं. जर मुख्य निखालसपणें आपलें दरकाचें काम आमचे हातून घेते, तरी सरकारचाकरी दृष्टीस पडती. तो तर अर्थ मुळींच येथें नाहीं. सर्व गोष्टी आपल्या मतलबाच्या सांगतात. जर यांचीच मर्जी निखालस सरकारलक्ष सोडून रक्षावी, तर स्वामिद्रोह कबूल करणें प्राप्त होतो. तेव्हां ही गोष्ट सेवकाचासून घडावयाची नाहीं. स्वामींचे प्रतापेंकरून सेवकाचा कालक्षेप कसाही बरा वाईट चालेल यांविसीं खातरखा आहे. परंतु सरकारलक्ष सोडून दुसरा अर्थ व्हावयाचा नाहीं. सारांश, इकडे येऊन फार दिवस जाले, त्यांत घरीं बखेडे बहुत जाणोन सेवेसीं पांच चार वेळ विनंतिपत्रें लिहिलीं, परंतु देशीं येण्याचीं पत्रें अद्याप आलीं नाहींत. यास्तव हल्लीं विनंतिपत्र लिहिलें आहे. तरी सदर्हू लिहिल्याअन्वयें सेवकास देशीं येण्याविसीं पत्रें लिहावयासीं आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram informs Nana that Sindia did not favour the idea of detaching Ali Bahadur to Bundelkhand.*

No. 560 8th September 1789.

पैवस्ती छ १० मोहरम तिस्सैन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे तागायत छ १७ माहे जिल्हेजपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथूरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:—स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ २० सव्वालचें पत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा कीं, शहाजादे‡ येथें उरलीस आले म्हणोन पूर्वी लिहिलें आहे. त्याजवर

---

* नाराज. † ता. १४ ऑगस्ट १७८९. ‡मीर्झा मुझफ्फरबख्त.

त्यांचा आग्रह श्रीमंतांचे भेटीचा बहुत पाहिला. त्याजवरून भेट घ्यावयाचें ठरावून, श्रीमंतांची स्वारी छ पंधरावे सव्वालीं त्यांचे डेऱ्यास जाऊन भेटी जाहल्या. पुढें राजश्री माधवराव रामचंद्र यांसीं बोलणें जालें. त्यांत भाव दृष्टीस पडले कीं, श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब यांनीं आमचे तीर्थरूपास वलीअहद* केलें होतें. त्याजवर प्रयागाहून अलीगौर पातशाहा दिल्लीस आले, त्या समयीं तुम्हींच बंदोबस्त केला. अलीकडे गुलाम कादरानें हरामखोरी केली, त्याचें पारिपत्य यथायोग्य तुमचे सरकारांतून करून बंदोबस्त केला, त्याप्रमाणें करणें. हें समजोन सातशें कोसांवरून घर जाणोन तुम्हांजवळ आलों. याउपर तुम्हांस उचित नेकनामी† तें करावें. ऐसें जालें. यांत भाव कीं, आपल्यास वलीअहद करावें. त्यास, श्रीमंत कैलासवासींनीं यांचे तीर्थरूपांस वलीअहद केलें होतें. हेही योग्य आहेत व सरकारांत आले. दुसरें, श्रीमंत भेटले. लौकिक जाहला. त्यापक्षीं यांस वलीअहद करावें हा उत्तम पक्ष. सरकारांत आले, त्यांस बसविलें, येणेंकरून मोठा लौकिक होईल. यांचे बंधु लखनऊस आहेत. ते वलीअहद करावया योग्य नाहींत, असें ऐकण्यांत आहे. दुसरें ऐकिलें कीं, अलीगौर पातशाहा याचें मानस आहे कीं, अकबरशाहा यास वलीअहद करावें. त्यास अकबरशाहास गुलामकादरानें तक्तनशीन केलें होतें, त्यास आपण करावें. तेथें योजना जाली असली तर याची कांहीं तरी सोय जाली पाहिजे. यास्तव नवा पातशाही मुलूख सुटला आहे त्याजपैकीं, अंतरवेदींत चार पांच लक्षांची जाहागीर लाऊन देऊन, बंदोबस्त करून द्यावा. हा दुसरा पक्ष. येविसीं सविस्तर राजश्री पाटिलबावांसीं बोलून पाटिलबावांसीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांचीं उत्तरें लौकर घेऊन पाठवावीं. शाहाजादे सरकारांत आले आणि कांहीं न होतां गेले, म्हणजे लौकिकांत ठीक दिसणार नाहीं. यास्तव वलीअहद करावें हा उत्तम पक्ष. तेथें योजना जाली असली आणि याचें न होय, त्यापक्षीं जाहागिरीचें व्हावें. सविस्तर पाटिलबावांस लिहिलें आहे. तुम्हींही बोलावें. उत्तर लौकर पाठवावें. जाहागिरीचा प्रकार लिहिला आहे, परंतु तुम्हीं अगदीं बोलूं नये. वरकड मजकूर लिहिला आहे त्याअन्वयें बोलावा, आणि लौकर उत्तरें पाठवावीं. वलीअहद करावें हें राजश्री पाटिलबावांस लिहिलें आहे. तुम्हींही वलीअहदीचेंच बोलावें आणि पत्रांचीं उत्तरें सत्वरें पाठवावीं म्हणोन आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावांसीं बोलणें जालें. त्यास येविसींचीं सविस्तर उत्तरें पेशजी डांकेबरोबर सेवेसीं रवाना केलींच आहेत.

* युवराज, राज्यवारस. † नांव लौकिकास योग्य.

त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल. हल्लींचेही पत्रांचा मजकूर सविस्तर मुख्यांपासीं बोललों. त्यास, राजश्री पाटिलबावांनीं उत्तर केलें कीं, पेशजी ह्या मजकुराचीं उत्तरें लिहिलीं गेलीं आहेत, त्याप्रमाणेंच हल्लीं मजकूर लिहावा म्हणोन सांगितलें. परंतु येथें बारकाईनें शोध मनास आणितां, शाहाजीस* दिल्लीस पातशाहाचे बंदोबस्तास पाठविलें. त्यास त्यांनीं जाऊन येथील आज्ञेप्रमाणें पातशाहास नवें तख्त करून, अलीगौर यांसच छ. २० जिल्कादीं बसविलें. त्यांचे हाताखालीं अकबरशाहा यांजला वलीअहद केलें असें वर्तमान अकबारेंत लिहिलें आलें. तेंही मुख्यांचे समक्षच ऐकिलें. तेव्हां सेवकानें ही गोष्ट पुनः काढिली कीं, पुण्यास मजकूर पातशाहाजाद्याविषयीं लिहिला काय आणि येथें तर ऐसी गोष्ट जाली! तेव्हां ही वहिवाट पुढें कैसी घडेल? त्याजवरून पाटिलबावांनीं शाहाजादे यांची वाकबगारी सांगितली कीं, जो पातशाहाजादा मुख्य वडील, लग्नाचे बायकोचा, तो काशींत आहे. लखनऊंत व पुण्यास गेला आहे तो वेश्येचे पोटचे आहेत. ती वेश्या नेहमी पहिली ठेवलेली नव्हे. हे लेक जाहाल्यानंतर मग जनान्यांत ठेविलीं, तोंपर्यंत फिरस्तीच होती. त्यास ज्या पक्षीं श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब यांनीं जवांबक्ष पातशाहाजादा यांजला वलीअहद केलें होतें, तेव्हां हल्लीं त्यांचा वडील पुत्र आणि लग्नाचे बायकोचा, तो वलीअहद करावा हा उत्तम पक्ष. येणेंकरून इंग्रजांसही संतोष वाटेल, आणि जें पूर्वी श्रीमंतांनीं केलें होतें त्याच रीतीनें हल्लींही बंदोबस्त करून दिल्यास उत्तम आहे. वरकड आम्हांस सरकारचे मर्जीशिवाय कोणतीही गोष्ट आग्रहेंकरून करावी ऐसा अर्थ नाहीं. अकबरशाहाचा मजकूर म्हणावा, तरी हल्लीं शाहाजीस दिल्लीस पाठविलें. त्यांनीं जाऊन तक्ताची तयारी करून, आंगहीन पातशाहास तक्तीं बसविलें. तेव्हां अकबरशाहा यानें शाहाजीस व पातशाहास म्हटलें कीं, तुमच्या डोळ्यांनीं दिसत नाहीं. आतां तुम्हीं तक्तावर कशास बसतां? मीच तक्तावर बसून पातशहात करितों. तेव्हां ज्याणें बापाचा मुलाहिजा राखिला नाहीं, तो आमचे लक्षांत चालेल किंवा नाहीं, ही खातरजमा आहे. यास्तव तूर्त वृद्धासच पदारूढ करून, त्याचे हाताखालीं अकबरशाहा यांजला कारभारी करून ठेविले आहेत. याचें कारण काय तरी येणेंकरून फंदफितूर होणार नाहीं. यास्तव तूर्त याप्रमाणें वहिवाट केली आहे. म्हणोन तुम्ही आपले पत्रीं लिहून पाठवावें. हल्लीं श्रीमंतांजवळ जो शाहाजादा

* निजामुद्दीन, महादजीचा दिल्ली एथील कारभारी.

गेला आहे, त्याचा बंदोबस्त कांहीं जाहगीर देऊन करूं, म्हणोन बोलले. त्याजवरून सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें. त्याजवरून श्रुत होईल. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांच्या भेटी श्रावण शुद्ध दशमीस जाहाल्यानंतर उभयतां सरदार परस्परें डेऱ्यास गेले होते. होळकरांस मेजवानगी करून वस्त्रें जवाहीर दिल्हें. वर्तमानकाळीं उभयपक्षीं गोडी बरीच आहे. वांटणीचाही प्रकार निघाला आहे. त्यास पुढें याचा ठराव होऊन काय सिद्धांत ठरेल तो पहावा. मागाहून सविस्तर मजकूर सेवेसीं लिहून पाठऊं. मौजे खेडलें परमानंदाचें हा गांव आम्हांकडे इनाम आहे. त्याचे बंदोबस्ताविसीं पेशजी दोन तीन वेळां स्वामींस विनंतिपत्रें लिहिलीं आहेत. तीं पावोन बंदोबस्त जाहलाच असेल, अथवा होईल. सारांश लिहिणें हेंच कीं, पूर्वीपासून स्वामी चालवीत आले आहेत त्यापक्षीं विशेषात्कारेंच त्याहावेंसें नाहीं. वरकड खेडल्याचा अभिमान सर्व प्रकारें स्वामींसच आहे. पूर्वी बंदोबस्त करून स्वामींनींच चालविलें, आणि पुढेंही बंदोबस्त करून चालविणार स्वामी समर्थ आहेत. देशीं येण्याविसीं मी विनंतिपत्रें बहुत पाठविलीं. यांत कारणें बहुत आहेत. स्वामी कोणतीं म्हणतील, तर एक घरीं बखेडे बहुत, आणि तीर्थरूप मातुश्री ताईचा हेत बहुत कीं, श्री महायात्रेस जावें; आणि येथीलही चालीचा प्रकार सर्व स्वामींस विदित. यास्तव देशीं येण्याविसीं वारंवार सेवेसीं लिहितों. यास्तव देशीं येण्याचीं पत्रें ल्याहावयासीं आज्ञा जाली पाहिजे. विना मी घरीं आलियाशिवाय मातुश्रींचें श्री यात्रेस जाणें घडत नाहीं आणि त्यांची तों जाण्याची जरूरी बहुत. यास्तव दरपत्रीं हा मजकूर लिहीत आहों. मग स्वामींची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक होईल. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram forwards Mahadji's explanation why the Shahzada visiting Poona could not be recognised as heir-apparent to the throne of Delhi. He also reports the meeting of Holkar with Sindia.*

No. 561 30th September 1789.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी :—अनुपगीर गोसावी यासीं राजश्री अल्लीबहादूर यांणीं आपल्याजवळ ठेऊन घेतला, येविसीं पांच सात पत्रें, जाल्या वर्तमानाचीं

लिहून पाठविलीं आहेत. तीं पावून सविस्तर कळलें असेल. अलीबहाद्दर यांणीं आपणांस लिहून पाठविलें, त्याजवरून त्यांजकडे आमचे नांवें पत्रें दोन पाठविलीं; तीं त्यांनीं आणून दिल्हीं. त्यांत मजकूर लिहिला त्याचें उत्तर छ ७ मोहरमचें रवानगी पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून कळेल. गोसावी यानें प्रयोग केला, तेणेंकरून शरिरास उपद्रव होऊन दोन तीन महिने शरीर स्वस्थ नव्हतें. हें वर्तमान आपण ऐकिलें नसेल असें नाहीं. अशा गोष्टी असोन, गोसावी यासीं झांशीस पाठवावें, त्याची सलतनत घेऊं नये, पुढें त्याचे आचरणाप्रमाणें होणें तसें होईल म्हणोन आपण लिहिलें, यावरून आश्चर्य वाटलें. गोसावी यानें आम्हांवर प्रयोग करून आम्हांस मारावयाचा विचार करावा, याचें साहित्य आपणांकडून असें व्हावें, हें भाऊपण्यास उचितच आहे! अलीबहाद्दर यांचे पत्रांचीं उत्तरें व त्यांचे लिहिल्यावरून आम्हांस पत्रांवर पत्रें यावीं, आणि आम्हीं पांच सात पाठविलीं असतां त्यांचें उत्तर येऊं नये! ज्याचा वशिला असेल त्यांचें साहित्य होऊन उत्तरें यावीं, आमचा वशिला एक धनी किंवा ईश्वर आहे. आपला आमचा भाऊपणा आम्हांकडून देसीं असतां उपयोग पडला न पडला, हें सर्व ध्यानांतच आहे. इकडून धन्याचें काम पडलें त्यास व भाऊपणा म्हटला, तेथें दुसरें जालें नाहीं. आपलाही भाऊपणा शर्तीचाच होता. सांप्रत पत्रें येऊं लागलीं याअन्वयें पहातां, शर्तच जहालीसी दिसल्यांत आली. असो. पेशजीं पत्रें पांच सात रवानग्या जाल्या आहेत, त्यांचीं उत्तरें लौकर यावीं. रवाना छ १० मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji protests against the partiality shown by the Poona Darbar to Ali Bahadur in the matter of his refusal to deliver the person of the Gosavi.*

No. 562 30th September 1789.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—आपण छ २४ जिल्कादचें पत्र पाठविलें, तें पावलें. हिंमतबहाद्दर गोसावी याचा मजकूर पहिलेपासून जाला तो राजश्री अलीबहाद्दर यांचे लिहिल्यावरून सर्व कळला. त्यास, गोसाव्याचें पारपत्य करावयाचें होतें,

तरी तसीच सूचना अलीबहादूर यांस करावयाची होती, त्याप्रमाणें करते. आपले सांगितल्यावरून त्यांनीं गोसावी यासीं करार करून इमान दिल्हें, त्याची निभावणी करून पार पाडणें आपणांकडे आहे. आपलीं पत्रें पूर्वी फौज पाठविण्याविसीं आलीं, त्यावरून अलीबहादूरांस फौज सुद्धां आपणांकडे पाठविलें. आपल्यापाशीं आल्यावरी आपणही त्यांचे स्वरूपाप्रमाणें गौरव सत्कार चांगला केला. हल्लीं गोसावी आपण होऊन त्यांचे डेऱ्यास आला. त्यासीं बोलणें तें आपलेंच सांगितल्याप्रमाणें बोलत गेले. इमानप्रमाणही आपल्याच सांगितल्यावरून त्यास दिल्हें. त्यापक्षीं तें आपण पार पाडावें. आपण व अलीबहादूर दोन नाहींत. आपला त्यांचा स्नेह पूर्वीपासून चालत आला आहे, त्याप्रमाणें हल्लीही आपण चालवीत आहेत. त्याप्रमाणेंच लौकिकांत दिसे असें करावें. वचन देऊन दुसरी गोष्ट सांगितली असतां लौकिकांत कसें दिसतें, हें आपल्यास त्याहावें असें नाहीं. सर्व आपले ध्यानांत आहेच. अलीबहादूरांनीं वचन दिल्हें तें आपणच दिल्हें, त्यापक्षीं याची निभावणी आपणच करावी म्हणून लिहिलें, तें कळलें. ऐसियास, अलीबहादूर यांसीं गोसावी याचें पारपत्य करावें असी सूचना करते तें काय? प्रथम गोसाव्याचे अंगीं कृत्रिमाचा मुद्दा लागला, तेव्हां त्याचें पारपत्यच करावें म्हणून शिवाजीपंत बापू व अलीबहादूर यांणीं सांगितलें. त्यावर गोसावी अलीबहादूर यांचे डेऱ्यावर आल्यावरी फौज पाठवावी, गोसाव्याचे लोक आहेत त्यां सुद्धां पारपत्य करूं, म्हणोन निरोप आला. त्याप्रमाणें फौजही पाठविली व निरोप गोसाव्याचे पारपत्याचे साहित्याविसीं येत गेला, त्याप्रमाणें पायदळ सुद्धां पाठविलें. संध्याकाळ जाला, प्रातःकाळीं पारपत्य करूं, म्हणोन निरोप आला. तेव्हां फौजही बोलावून घेतली. नंतर फौज माघारीं येतांच बोलणें गोसाव्याचें घेऊन भिकाजी नारायण व आपाजी दामले आले. त्याचा पर्याय आलाहिदा लिहिलाच आहे. इकडील गृहस्थ वचन द्यावयासी घेऊन गेले. त्याजबरोबर यादी दिल्ही होती, त्याप्रमाणें जाबसाल उगवून गेले होते. त्यांचे विद्यमानें वचन दिल्हें असतें तरी त्याची दिक्कत कशास पडती? इकडे मसलत पडल्यामुळें फौज पाठवावयाविसीं लिहीत गेलों. त्यावरून अलीबहादूर यांची रवानगी जाली. ते इस्माइलबेगाचें पारपत्य जाल्यावरी येऊन पोंहचले. तथापि येथें आल्यावरी यांचा गौरव व्हावा याकरितां सन्मान करण्यांत आला. तो सर्व आपल्यास समजलाच आहे. व त्यांजकडून वर्तणूक जहाली हेंही पांच सात पत्रीं लिहिलें आहे. परंतु त्याचें उत्तर न येतां, ते लिहितात त्याचप्रमाणें पत्रें आम्हांस येतात. तेव्हां लिहिण्याचीही

पराकाष्ठा जहाली. लौकिकांत दुही न दिसावी हेही अर्थ ध्यानांत नाहींत असें नाहीं. परंतु हिंदुस्तानांत बदवकरीची* गोष्ट कधींही घडली नाहीं, तीच घडों लागल्यास कसें ठीक पडेल? याचा विचार आपणच ध्यानांत आणोन लिहिणें तें ल्याहावें व आम्हीं लिहिलें तें ध्यानांत यावें. गोसाव्याचा अगत्यवाद, त्यापक्षीं उत्तर आलें म्हणजे धन्याचे पायांपासीं येऊन विनंती करण्यांत येईल. रवाना छ १० मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji seems to have made the Gosavi question a point of honour, on which the Poona Darbar wanted him (M.) to compromise.*

No. 563 October 1789.

श्री

यादी पाटिलबावांसीं बोल.वयाचीं कलमें शिवाजी विठ्ठल यांजपासीं सांगितलीं.

१ हिंमतबाहद्दूर गोसावी बायकामुलें सुद्धां आमचे स्वाधीन असावा. चार सहा महिने याचे आंत फंदफितूर दस्ताऐवजीं सांपडल्यास पारपत्य करूं. मुदतींत फंदफितूर न जालियास करारप्रों आपण नवाजीस† करावी.

१ गोसावी याजकडील घोडे, हत्ती, मर्जीस येतील तेथें ठेवावे. त्याजवळ कारकून आम्हांकडील असावा.

१ सिलेदार, गोसावी याजकडील आपलाले रास जातील त्यांस दस्तक देऊन वाटे लावावें. घोडीं, हत्यारें वस्तभाव सुद्धां.

१ हिंमतबहादूर याज प्रकर्णीं खर्चाचा बेजमीचा बंदोबस्त करावा.

सदरहूप्रों चार कलमांचे अन्वयें निदान पक्ष ठराव जाहाल्यास करावा म्हणोन शिवाजी विठ्ठल यांस सांगितलें आहे.

¶*The paper refers to the controversy about the possession of the Gosavi's person. These articles appear to be the terms proposed by Ali Bahadur.*

---

* दुर्वर्तनाची. † परामर्श.

No. 564 10th November 1789.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत छ २१ माहे सफरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष:—स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ ५ जिल्हेजचें पत्र पाठविलें, तें येथें छ २७ मोहरमीं पावलें. तेथें आज्ञा कीं, तुम्ही देशीं येण्याचें लिहिलेंत, त्यास दसरा दिपवाळीपर्यंत राहावें. पुढें जैसा रंग दृष्टीस पडेल त्यासारखें लिहून पाठवूं, त्याप्रमाणें करावें. वरचीवर होईल तें लिहीत जावें म्हणोन आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेशिवाय देशीं येण्याचा विचार करीत नाहीं. परंतु घरींहून तीर्थरूप मातुश्री ताईचीं पत्रें बहुत येतात कीं, तुम्हांस साडेतीन वर्षें जालीं, अद्याप घरीं येण्याचा विचार होत नाहीं, आणि आम्हांसही श्री महायात्रेस जाऊं देत नाहीं. आमचा तर वृद्धापकाळ. तेव्हां आमचा मनोदय कसा घडतो? तरी तुम्हीं येथील यजमानांची आज्ञा घेऊन सत्वर यावें आणि आमची रवानगी करावी यांत उत्तम आहे. म्हणून वारंवार पत्रें येतात. आणि मजलाही फार दिवस इकडे येऊन जाले, आणि स्वामींचेही आज्ञेप्रमाणें दसरा दिपवाळी येथें जाली. त्यास हल्लीं कृपाळु होऊन देशीं येण्याविसीं आज्ञा जाली पाहिजे. वरकड दरबारी वर्तमान वरचीवर लिहीत जाणें म्हणून आज्ञा. त्यास राजश्री पाटिलबावांचें व राजश्री अलीबहादर यांचें अद्याप चित्त शुद्ध नाहीं. येविसीं सेवकानेंही यथाबुद्धि यत्न करून पाहिला. परंतु ती गोष्ट कांहींच घडोन न आली. प्रस्तुत राजश्री तुकोजी होळकर सुभेदार या जाबसालांत पडले आहेत. मग काय घडेल तें पहावें. राणेखानभाई यांचा जांवई साहेबखान ठोक्या यांजपासून रुसून देशीं न पुसतां गेला. येथून भाईनीं साहेबखानाची व आपले चिरंजिवाची रवानगी उज्जनीस केली. आणि साहेबखान याची स्त्री उज्जनीसच होती, तेव्हां येथून राजश्री पाटिलबावांची आज्ञा घेऊन उज्जनीस जातों म्हणून गेला, आणि माळव्यांत गेल्यानंतर परस्परें खानमजकूर देशीं गेले. नंतर स्वामींकडेस भेटीचें संधान करून भेट घेतली. नंतर खानमजकुराची सरकारांतून खातरजमाही केली. म्हणोन येथें वकिलाच्या वगैरे लिहिण्यांत आलें. त्यास ठोक्या सरकारचा चाकर, ही गोष्ट खरीच आहे. त्यास धन्यापाशीं गेला असतां त्याचा बंदोबस्त

करूं नये, असें म्हणणें ही प्राज्ञा कोणाची आहे? परंतु खानमजकूर सरदारीचा बंदोबस्त करून सरकारचाकरीचे उपयोगी पडतील न पडतील हा अर्थ प्रसंगानुसार सर्व ध्यानास येईल, म्हणोन येथील मुख्याच्या वगैरे मंडळीच्या बोलण्यांत आहे; आणि दिसण्यांतही पांच सात वर्षांत खानमजकुराचा लौकिक कोठें शिपाईगिरी करून जाहाला नाहीं. यांतील सारांश हाच कीं, आजपर्यंत त्या सरदारीचे कारभाराची वहिवाट झाडून भाईकडेच चालली, व सर्व गोष्टी ज्या होणें त्या भाईकरितांच जाहाल्या. येविसींची माहितगारी सर्व स्वामींस आहेच. तेथें सेवकानें विस्तारेंकरून ल्याहावेसें नाहीं. परंतु हल्लीं दोन चार वेळ हा मजकूर ल्याहावा म्हणून सांगितलें. येविसीं भाईचीही विनंती आहे कीं, सर्व प्रकारें जसा पाटिलबावांचा चाकर, तैसाच श्रीमंत राजश्री नानांचाही आहे. माझें पोर न पुसतां मजपासून गेलें तरी तें माझें मजकडे धन्यांनीं कृपा करून पाठवन द्यावें. कदाचित् स्वामींस येविसींचा माझा विश्वास नसेल, तरी येविसीं तुम्हीं आम्हांविषयींची खातरजमा करावी. यास्तव हल्लीं सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. तरी कृपा करून खानमजकुराचा बंदोबस्त स्वामींचे मर्जीस येईल तैसा करून देऊन, इकडे राजश्री पाटिलबावांचे तैनातीस पेशजीप्रमाणें रवाना करावयासी आज्ञा जाली पाहिजे. मुख्य गोष्टी हेच कीं, भाईचा अगत्यवाद व आपल्या सरकार उपयोगीं जाणोन सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे. तर पत्रार्थ ध्यानास आणोन उत्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana of the misunderstanding between Sindia and Ali Bahadur, over the Gosavi's possession, persisting in spite of his own mediation as well as that of Holkar.*

No. 565 11th November 1789.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— इकडील नूतन वर्तमान तरी, राजश्री अलीबहाद्दरबाबा यांजला येथें दरमाहा रुपये सत्याहत्तर हजार द्यावयाचा ठराव राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांचे विद्यमानें होऊन, सफर महिन्याची चिट्ठी आम्हांकडून खुशालचंदावर वर लिहिल्याअन्वयें देविली. मशारनिल्हेनीं गोसावी याजला किल्ले अरुण येथें पाठवन द्यावा. नंतर पुढें आमचीं पत्रें श्रीमंतांस गेलीं आहेत, त्यांचीं उत्तरें येतील,

त्याप्रमाणें मग जो विचार करणें तो करावयासी येईल. याप्रमाणें ठराव होऊन तूर्त तोड पडली आहे. पुढें यांचें व त्यांचें चित्त शुद्ध होऊन काय ठरेल तें पहावें. इस्माइलबेग याची व नजफकुलीची लढाई एक वर्ष चालली होती. त्यास नजफकुलीनें दोन तीन वेळा लढाईत शिकस्त खाल्ली. तेव्हां हल्लीं इस्माइल यासीं नजफकुलीनें तह केला. जयपूरवाल्यांचें व मारवाडचांचें सूत्र इस्माइल याकडे पूर्वीचें होतेंच. त्यास नजफकुलीच्या शहामुळें आजपर्यंत इस्माइल्या त्या मसलतीस आडकला होता. तो हल्लीं त्या मसलतीपासून मोकळा जाहला. तेव्हां पुढें काय मसलत करितो तें पहावें. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांजला दाहा लक्षांची जाहागीर येथें राजश्री पाटिलबावांनीं दिली. तूर्त होळकरांसीं व यासीं स्नेहभाव वराच आहे. परंतु आतां मसलत प्राप्त आहे. याजमध्यें त्रिवर्गाच्या चाली कशा पडतात हें पाहावें. राजश्री पाटिलबावांची खासा स्वारी सूर्यग्रहणाकरितां श्रीभागीरथी स्नानास रामघाट येथें जावयाचें ठरोन, कार्तिक वद्य षष्ठीस रविवारीं डेरे मुमुहूर्तेंकरून यमुनापार दिले. एक कुटुंब काल भोमवारीं यमुनापार डेऱ्यादाखल जालें. एकादशीस उदईक खासा स्वारी कुटुंबसहवर्तमान निघोन जाणार. सेवेसीं कळावें म्हणून वर्तमान लिहिलें आहे. मागाहून होईल वर्तमान तें सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the cessation of hostilities between Ismail Beg and Najaf Quli Khan and the possibility of their alliance with the Rajputs. The three Maratha chiefs, Ali Bahadur, Holkar and Sindia appear to have healed up their breach.*

No. 566 16th November 1789.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २७ माहे सफरपर्यंत मुक्काम कामर नजीक होडल साहा कोस येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त सापेक्षित असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रीं सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर

स्वामींनीं पेशजीं छ २७ जमादिलावलचें पत्र राजश्री पाटिलबावांस राजश्री अलीबहाद्दरबाबा यांचा बंदोबस्त करून देण्याविसींचें पाठविलें होतें, त्याच पत्राबराबर सेवकासही चिट्ठी छ मजकूरची होती. तीं पत्रें येथें आम्हांस छ २० जमादिलाखरीं पावलीं. सेवकाचे चिट्ठींत स्वामींनीं इतकाच मजकूर लिहिला होता कीं, राजश्री पाटिलबावांस पत्र लेहून पाठविलें आहे, हें त्यांस पावतें करून उत्तर घेऊन पाठवावें, म्हणून चिट्ठींत आज्ञा होती. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावांस पत्रें दिलीं. एक दोन दिवस गेलियानंतर स्वामींचे पत्रांचीं उत्तरें मागितलीं. ते समयीं उत्तर केलें कीं, याचा विचार करून मग तुम्हांस जाब लेहून देऊं, व तुम्हांस त्याहावयासी सांगूं त्याप्रमाणें लेहून पाठवणें. त्याजवर चार पांच दिवस जाऊं दिले. नंतर पुन्हां उत्तरें मागितलीं, तत्रापि जाब न दिले. आज जाबसाल देतों, उद्यां जाबसाल देतों, याप्रमाणेंच म्हणत गेले. एके दिवशीं पत्राचे जाब घेण्याविसीं अमळसी निकड दर्शविली. तेव्हां निखालस उत्तर केलें कीं, राजश्री अलीबहाद्दर यांचा काय जाबसाल ठरतो, तो पाहून नंतर तुम्हांस उत्तरें लेहून देऊं. तोंपर्यंत काय म्हणून जाब लेहून द्यावे? याप्रमाणें दहा पांच वेळ बोलणीं जाहलीं. पुढें बोलण्याचा विचार होऊन उत्तरें घेऊन पाठवावीं, तों उभयतां सरदारांचाच बेबनाव जाहला. तेव्हां पत्रांचीं उत्तरें घेणें राहिलीं. इकडील बेबनावाचा मजकूर सविस्तरें लेहून पेशजींच पाठवावा, त्यास उभयतां सरदारांचा जाबसाल आजपर्यंत होतच होता. तेव्हां कोणता मजकूर म्हणून ल्याहावा? यास्तव सेवकाकडून मजकूर लिहिण्यांत न आला. हल्लीं सर्व जाबसाल दुतर्फा समजण्यांत आला. ह्याच पत्रांत कच्चा मजकूर लिहिणार होतों, परंतु राजश्री रामचंद्र केशव भट यांणीं जाब घेण्याविसीं जलदी केली. त्याअर्थीं कच्चा मजकूर न लिहिला. आज उद्यां पत्रें तयार करून राजश्री विठ्ठलपंत वकील निसवत सरकार यांचे डांकेबराबर अति सत्वर रवाना करितों. तीं पत्रें येऊन पावलियानंतर सर्व मजकूर इकडील श्रुत होईल. सारांश लिहिणें हेंच कीं, इतका बेबनाव व्हावयाचें कारण एक हिंमतबहाद्दर गोसावी. त्यास येविसींचा मजकर कच्चा पेशजीं सेवकानें दोन तीन वेळ लिहिलाच आहे. त्याजवरून सर्व समजण्यांत आलेंच असेल व हल्लींही लेहून पाठविलें त्याजवरून सर्व श्रुत होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This dispatch from Appaji Ram to Nana again refers to the Himmat Bahadur dispute.*

No. 567 7th December 1789.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी :—आपण पत्र पाठविलें तें पावलें. दौलतीचा भार आपणांवर. श्रीमंतांस व दौलतीस चांगलें, पुढें मागें आपणांसही चांगलें, व लौकिकास व करण्यास व आपले एकनिष्ठेस योग्य असें सुचतें तें लिहितों. आपणही विचार करून मनांत आणिलें असतां चांगलें असेंच मनांत येईल. वरचेवरी पत्रें पाठवीत जावीं, जाबसाल होत जावे, सविस्तर राजश्री सदाशिवपंत यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसियास, आजपर्यंत वडिलांपासून श्रीमंतांची सेवा एकनिष्ठतेनें होत आली. ज्यांत श्रीमंतांचे दौलतीस चांगलें अशाच गोष्टी घडत आल्या आहेत. पुढेंही आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांसीं तशीच आहे, व कामेंही त्याप्रमाणेंच घडतील. हें सर्व आपली भेट जाहल्यावर ध्यानांत येईल. रा॥ छ. १९ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶ *In reply to a letter of pious sentiments from Nana Mahadji expresses his loyalty to the Peshwa and professes himself a well-wisher of his government.*

No. 568 15th December 1789.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ२७ माहे रबिलावलपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर राजश्री कृष्णराव महादेव निसबत चिटणीस व त्यांचे चुलतभाऊ जयराम मल्हार व चुलते नारायणराव प्रयाग हे एकत्र असतां त्यांचे वडिलोपार्जित आसाम्या दोन पैकीं किल्ले सज्जनगड ऊर्फ परळी येथील सुभ्याची एक, व अमरसिंग जाधवराव यांजकडील जमेनिसीची एक, ह्या दोन आसाम्या समाईक. त्यास कृष्णराव महादेव याचें घर वडील. सा॥ किल्ले मजकूरची आसामी

याचे वाटणीस दिल्ही. व अमरसिंग जाधवराव यांजकडील जमेनिसीचीं आसामी जयराम मल्हार व चुलते नारायणराव प्रयाग यांचे वांटणीस घातली. याप्रमाणें दोहों आसाम्यांची वांटणी होऊन परस्परें फारखती जाहाल्या. नंतर कृष्णराव महादेव यांनीं आपला गुमास्ता प्रथम किल्ले मजकूरचे आसामीवर पाठविला. तेथें दीड दोन वर्षें होता. जयराम मल्हार याची उपजीविका न चाले. तेव्हां मशारनिल्हेनीं रावजी आपाजीकडून कृष्णराव महादेव यांजकडे बोलणें लाविलें कीं, तुमची आसामी किल्ले मजकुराची आहे, ती आम्हांस गुमास्तगिरीनें सांगावी. त्या असामीचें वेतन आम्ही घेत जाऊं. तेव्हां कृष्णराव महादेव यांनीं रावजी आपाजीस जामीन घेऊन जयराम मल्हार याजपासून गुमास्तेपत्र लिहून घेतलें. नंतर ती आसामी त्यांजला सांगितली. कराराप्रमाणें वेतनही दिलें. कृष्णराव महादेव यांचे वडील बंधु घरीं होते. त्यांचा काल तेथें जाहला. मशारनिल्हे येथें लष्करांत होते. मागें जयराम मल्हार यांनीं संधि पाहून, किल्लेमजकूरची आसामी त्यांनीं आपले नांवें सरकारांतून बेहेडचास उगऊन घेतली. पुढें सन आर्बा समानीनांत मशारनिल्हे लष्करांतून देशीं पुण्यास गेले. तेव्हां आसामीची घालमेल जाली हें समजलें. तेव्हां कृष्णराव महादेव यांनीं स्वामींस कच्चें वर्तमान निवेदन केलें. त्याजवरून स्वामींनीं मनसुबी राजश्री राघोपंत गडबोले यांस सांगितली. त्यांनीं सरकार आज्ञेप्रमाणें मनास आणोन, जयराम मल्हार यांजला खोटें ठरावून खोटें लिहून घेतलें. तें पत्र बजिन्नस राघोपंतीं स्वामींस दाखविलें. त्यास ती आसामी पूर्ववत्प्रमाणें कृष्णराव महादेव याची याजकडे करार करून देऊन सरकारची सनद दिली. नंतर मशारनिल्हेनीं त्या आसामीवर आपला गुमास्ता पुनः पाठविला. मशारनिल्हे देशीं असतां दोन वर्षें त्या आसामीची वहिवाट पूर्ववत्प्रमाणें चालली. साल्मजकुरीं कृष्णराव इकडे लष्करांत आपले रोजगारावर येथें आले. मागें जयराम मल्हार एक वेळ सरकारांत खोटे पडले असतां, व भाऊपण्याची वांटणीही पंचाइतांनीं करून फारकती जाहाल्या असतां, पुनः जयराम मल्हार सरकारांत उभे राहून दुसऱ्याची असामी घेतात, यास्तव सेवेसीं लहिलें आहे. तर स्वामींनीं कृपा करून कृष्णराव महादेव याची आसामी पूर्ववत्प्रमाणें चालत आली असेल त्याप्रमाणें चालून, जयराम मल्हार पुन्हां या आसामीची खलेल न करीत तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. सारांश लिहिणें हेंच कीं, जयराम मल्हार यानीं गुमास्तेपत्र लिहून दिलें असतां, दरबारांत गैरवाका समजाऊन आसामी करून घेतली. हें वर्तमान स्वामींस श्रुत व्हावें या अर्थीं

विनंतिपत्रीं लिहिलें आहे. तरी वर लिहिल्याअन्वयें बंदोबस्त करून देवावयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram requests Nana to reinstate one Krishna Rao Mahadeo in his post.*

No. 569 3rd March 1790.

पैवस्ती छ १५ रजब तिस्सैन चैत्र.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १६ माहे जमादिलाखरपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष :—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा जाली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांनीं मजला बोलावून पुसिलें कीं, आजकाल तुमचीं पत्रें पुणियाहून आलीं कीं नाहींत? तेव्हां सेवकानें उत्तर केलें कीं, आमचीं पत्रें कांहीं आलीं नाहींत. तेव्हां आपणच वर्तमान सांगों लागले कीं, टिपूचा व सरकारचा तह जाहला होता. त्यास हल्लीं टिपूनें सरकारची जागा शहापूर बेळगांव, कैलासवासी विसाजी कृष्ण यांजकडे होतें ती जागा घेतली, म्हणोन एकबारचें आमचें लिहिलें आलें. त्यास हें वर्तमान तुम्हांस सांगावयाचें कारण नवतें. परंतु यांतील मजकूर जो आम्हांपासीं आला आहे हा तुम्हीं ऐकोन घ्यावा, आणि त्याप्रमाणें पुणियास पत्रें जरूर लेहून पाठवावीं. इंग्रजांचीं पलटणें तीन हजार गोरा मुंबईस व मद्रासेस आलीं आहेत. येविसींचीं पत्रें तिगस्तां आम्हांस व तुम्हांस व वकिलांस आलीं होतीं. तेव्हां त्यांचीं उत्तरें येथोन आम्हीं पाठविलींच होतीं. परंतु त्या समयीं आमचे लिहिण्याचें शाश्वत वाटलें नाहीं. त्यास हल्लीं इंग्रजांचा व टिपूचा बिघाड होऊन लढाई सुरू जाली. याचें कारण काय म्हणाल, तरी पेशजी इंग्रजांचा व टिपूचा बिघाड जाहला होता, ते समयीं चेनापट्टणास लढाई सुरू होतीच. इतक्यामध्यें इंग्रजांनीं बिदनुरास फितूर करून बिदनुरची जागा घेतली. तेव्हां टिपूनें चेनापट्टणाची लढाई रुबकार* राखून, आपण खासा बिदनुरास येऊन,

---

* चालूठेवून.

लढाई मारून, बिदनूर संस्थानांत आपला अंमल बसविला; आणि गोरे मातबर सरदार लढाईमध्यें पाडाव आले, ते झाडून कैदेंत ठेविले; आणि पुन्हां चेनापट्टणास जाऊन लढाई केली. पुढें इंग्रजांचा व टिपूचा तह जाहला, परंतु लढाईंत पाडाव जे गेले, ते पुन्हां सोडिले नाहींत. हा रोष इंग्रजांचे चित्तांत होताच. त्यास हल्लीं इंग्रजांनीं सरंजाम दोहो तिही लष्करांत पक्का करून लढाई सुरू करावी ह्या विचारांत होतेच. परंतु तह बिघडावयासी कांहीं तरी निमित्य पाहिजे. त्यास, चंदावरचें संस्थान टिपूनें घेऊन राजास फक्त जातीस खावयासीं देऊन ठेविला होता. प्रस्तुत त्यासही ठिकाण नाहीं. तेव्हां चंदावरचे राजानें इंग्रजांसीं सूत्र लाऊन तह केला, माझी राज्यावर स्थापना करावी, मी सर्व प्रकारें तुमचा आहें. त्याजवरून इंग्रजांनीं त्याचा पक्ष करून, टिपूसीं लढाई सुरू केली. त्यास इंग्रजांचें म्हणणें आहे कीं, श्रीमंतांचा व आमचा तह आहे, त्यास आमची कुमक सरकारांतून करावी. ही गोष्ट दोस्तीस युक्त आहे. येविसींचीं बोलणीं व तहनामा होणें तो कुमकेचा सिद्धांत ठरल्यानंतर तोही होईल. याविषयीं पामरसाहेबाचें बोलणें .....लागू आहे. त्यास ह्या मजकुराचीं पत्रें आम्हीं श्रीमंतांस व नानांस दोन रवानग्यांत पाठविलीं आहेत. परंतु हा मजकूर तुम्हांसीं बोलण्यांत आणिला नवता. त्यास आतां तरी सरकारांतच मसलत प्राप्त आहे. मिरजकराची रवानगी देखील कर्नाटकचे मसलतीस केली. त्यापक्षीं इंग्रजांच्या मनोगताचीच गोष्ट घडेल ऐसें दिसतें. आणि मुख्य गोष्ट ही घडली असतां, सरकारचे नफे बहुत आहेत. येविसींचा अनुभव नाहीं म्हणावा, तरी सर्वांस आहे. यास्तव हा मजकूर तुम्हीं तपसीलवार राजश्री नानांस लिहावा, आणि तेथून उत्तर आणवावें. म्हणजे पुढें तहनामा टिपूचे मसलतीचा जो त्याचे विचारें ठरेल त्याप्रमाणें करावयासी येईल. सारांश यांतील अर्थ हाच कीं, इंग्रजांस टिपूचें पारिपत्य जरूर करणें; आणि सरकारचाही टिपूनें बिघाड हकनाहक केला. त्यापक्षीं आपण इंग्रजां..... करून घ्यावे आणि.....टिपूचें पारिपत्य करावें..... अनायासें करून इंग्रज युद्ध करितात. त्यापक्षीं आपण केल्यास वाद नाहीं. कदाचित् तुम्हीं म्हणाल कीं, यामागें इंग्रजांनीं बिघाड केला होता, तेव्हां सरकारचा व इंग्रजांचा करार होता कीं, सलूक करणें तो श्रीमंतांचे सरकारांत इतल्ला दिल्याखेरीज करूं नये. ऐसें ठरलें असतां, इंग्रजांनीं सलूक केला. तेव्हां आम्हींच मात्र टिपूस दिसों लागलों. त्यांस त्याचे पर्याय बहुत आहेत. ते हल्लीं बोलोन त्याचा साफल्यार्थ नाहीं. ते कालीं टिपूस कुमक फरासिसांची भारी होती. आतां फक्त

टिपूच मात्र आहे. आतां टिपू व फरासीस दोनीं एकत्र जाले तत्रापि इंग्रज दोघांचेंही पारिपत्य करावयास इरादा बाळगतात. आणि मागील लढायामध्यें बिदनूरच्या इंग्रजांचे सरदार पाडाव केले आहेत, ते तर जबरदस्तीशिवाय सोडीतच नाहींत. तेव्हां इंग्रजांचे.....गोष्ट अपेक्षां अधिक.....तेव्हां त्यांना बिघाड करणें.....आहे. वरकड हल्लीं सरकारांतून कुमक जाहली असतां पुन्हां.....मुलूख इंग्रज परस्परें तर येविसींचा बंदोबस्त तुम्हांस जैसा खातरजमेचा पाहिजे तैसाच इंग्रज करून देतील. येविसींची आमची खातरजमा आहे. श्रीमंत काका दादासाहेब वगैरे सरकारचे जाबसाल तहनाम्यांत पेशजीच्या लिहिले नवते. तेव्हां आम्ही त्यांचें बोलणें करून साऱ्या गोष्टी अमलांत आणून दिल्या तैशा पुढेंही येतील. यास्तव हा मजकूर सत्वर त्याहावा आणि उत्तर आणवावें. इतकेंही असोन सरकारची मर्जी ही गोष्ट नच करावी हाच सिद्धान्त असिला, तरी पुढें या गोष्टीचा विचार भारी पडेल. कां कीं इंग्रजांनीं चारी दिशा व्यापिल्या आहेत; आणि टिपूचा प्रसर फक्त कर्नाटकप्रांतींच आहे. तेव्हां त्याचें पारिपत्य जालियानंतर तोच मेड† इंग्रज आपणांस लावतील तेव्हां आपल्यास तें संभाळणार नाहीं. याजकरितां तपसीलवार उगऊन लिहावें याप्रकारची मर्जी. याप्रमाणें सेवकास आज्ञा जाली. त्याजवरून कच्चें वर्तमान सेवेसीं तपसीलवार लिहिलें आहे. तर पत्रार्थ संपूर्ण ध्यानास आणोन उत्तरें आलीं, म्हणजे त्याप्रमाणें येथील मुख्यांपासीं निवेदन करीन. सारांश लिहिणें हेंच कीं, सदर्हू मजकूर लिहिला आहे खरा, परंतु याचें बलाबल पाहून जें करावयाचें तें स्वामींनीं केलें पाहिजे. मी सेवकानें विशेष पर्यायेंकरून त्याहावेसें नाहीं. येथील आज्ञा जाली त्याजवरून सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें असे. राजश्री त्रिंबकराव नारायण यांचे सरदारीच्या बंदोबस्ताविषयीं स्वामींनीं आज्ञा देशीहून येतेसमयीं सेवकास केली होती. त्याप्रमाणें येथें आलियानंतर दहा पांच वेळ येविसींचें बोलणें राजश्री पाटिलबावांसीं जाहलें. परंतु स्वामींनीं ज्याप्रमाणें आज्ञा सेवकास केली होती, तो विचार यांचे मर्जीस कांहीं येत नाहीं; व येविसीं स्वामींनीं पत्रेंही मजला व वकिलास पाठविलीं तींही वजिन्नस दाखविलीं. परंतु उत्तर कांहीं यथास्थित न जाहलें. त्यास आणखीही एक वेळ येतेसमयीं येविसींचें बोलणें बोलूं. मग ज्याप्रमाणें उत्तर देतील तें सेवेसीं येऊन

†प्रकार.

निवेदन करीन. मथुरा वृंदावनाच्या पातशाही सनदा श्रीमंतांचे नांवाच्या सेवकाबरोबर द्याव्या, म्हणजे श्रीमंतांजवळ नेऊन देऊं याप्रमाणें बोलणें जालें. त्याजवरून शाहाजीस दिल्लीस पत्रें पाठवून सनदा आणवितों याप्रमाणें कबूल केलें आहे. परंतु सनदा आमचे हातीं येतील तेव्हां खऱ्या ! जाहलें वर्तमान तें सेवेसीं लिहिलें आहे. पातशाजादा श्रीमंतांकडे पुणियास गेलियानंतर त्याचे बंदोबस्ताविसीं स्वामींचीं पत्रें तीन चार रवानग्यांत सेवकास आलीं होतीं. त्यास येविसींचें बोलणें पक्केपणांत अद्याप आलें नाहीं. सिद्धांताचें बोलणें ठरल्यानंतर त्याचें उत्तर सेवेसीं येईन ते समयीं निवेदन करीन. वरकड येविसीचीं बोलणीं जीं जालीं होतीं, तीं पेशजीच्या रवानगींत एक दोन वेळां सेवेसीं लिहिलींच आहेत. त्याजवरून श्रुत जाहलेंच असेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*In this letter from Appaji Ram to Nana Mahadji advises the Poona Darbar to co-operate with the English against Tipu.*

No. 570 March 1790.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— इकडील दरबारी वर्तमान तरी, इस्माइलबेग याचा बिघाड जाहला. त्यानें रावराजांचे मुलुखांत हंगामा केला व जयपुरवाल्यांकडील वकील भेट नजराणा घेऊन आले, ती घेऊन दुसरे चाळीस हजार रुपये रोख घेतले. ह्या गोष्टी आपलेकडील वकिलाचे समक्ष जाहल्या व चालही इस्माइल्याची दगाबाजीची. तेव्हां यांचें पारिपत्य केल्याखेरीज ठीक पडत नाहीं ऐसें समजून मसलतीस प्रारंभ जाहला. पुढें इस्माइल्याचा मुलूख लुटावयासीं राजश्री आंबाजी इंगळे यांजबरोबर फौज देऊन रवानगी होत आहे. वस्त्रें देखील दिलीं. आणि कंपू नवा डबाई* साहेब यानें इस्माइल्याचे व गुलामकादराचे लढाईमध्यें पांच सात वेळ लढाया चांगल्या केल्या, मागें पलटणांनीं फितूर केला ते समयीं हा कोणाचे फितुरांत लागू जाहला नाहीं, फक्त सरकारचाकरीच केली, त्याजवरून हल्लीं आकरा पलटणांचा कंपू तयार करून इस्माइल्यावरी रवाना केला. बरोबर फौजेंत सरदार राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांजला नेमले आहेत. वर्ष प्रतिपदेस येथून कूच करून

---

* De Boigne.

पुढें जाणार, हा सिद्धांत ठरला आहे. बाकी खासा स्वारी मुक्काम मजकुरींच राहणार. हा विचार तूर्त गैरहंगामी करावयाचें प्रयोजन नव्हतें. परंतु राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांची फौज पागिरताकडे शिखांनीं हंगाम* केला यास्तव रवाना केली. त्यांनीं जाऊन इस्माइलबेग याचा परगणा नुनिमकसर महाल होता त्यावी जप्ती केली. तेव्हां राजश्री पाटिलबावांनीं सुभेदारांस समजाऊन सांगितलें कीं, तूर्त तुम्हीं या गोष्टी करूं नयेत. जर करितां तुम्हांस इस्माइल्याचें व जयपूर मारवाड्यांचें पारिपत्यच करणें असल्यास पेस्तर सालीं दसऱ्यापासून ही मसलत करावी म्हणजे ठीक पडेल. ती गोष्ट सुभेदारांनीं न ऐकतां इस्माइल्याचे महालाची जप्ती केली. तेव्हां इस्माइल्यानें आपलेकडील सरदार मुराद बेगखान यांजला पाठवून, नुनिमकसरचें ठाणें होळकरांनीं बसविलें होतें तें उठविलें, आणि आपल्याकडील वकील इस्माइल्याबरोबर होता त्याजपासीं मनस्वी वल्गना केल्या† .....

कीं गोसावी याजविषयींचा जिमा तुमचा आहे. आम्हांस गोसावी याजविषयीं तुम्हांसीं बोलावयाचें कारण किमपि नाहीं. हे जाबसाल हुजूर श्रीमंतांसीं कारभाऱ्यासीं करून घेऊं. तुमचे जिमेस हिंमतबहादूर गोसावी आहे. तुम्हांस कळेल त्याप्रमाणें करणें. आम्हांस येविषयीं काय समजून विचारितां? त्याजवरून अलीबहादूरबावा यांनीं गोसावी याची मुक्तता केली. गोसावी याचीं मुलें माणसें राजश्री पाटिलबावांचे जप्तीस आजपावेतों होतीं, तीं हल्लीं पाटिलबावांनीं अलीबहादूर यांचे स्वाधीन केलीं. तूर्त परस्परें याप्रमाणें वहिवाट जाली आहे. मग पुढें काय घडेल तें पाहावें. सारांश, तूर्त इस्माइलबेग याची मसलत उभी राहिली आहे. मग काय घडेल तें पहावें. वरकड वर्तमान मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the revolt of Ismail Beg and Mahadji's having sent against him an expedition under De Boigne and Jiwba Bakshi.*

No. 571 24th April 1790.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ९ माहे साबानपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें

---

* दंगा. † येथें एक बंद गहाळ असावा.

वर्तमान यथास्थित असे. विशेष :—स्वामींकडून सांप्रत कृपापत्र येऊन सांभाळ होत नव्हता, त्यास छ १७ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा कीं, प्रस्तुत इस्माइलबेग कोठें आहे व काय वर्तमान? कोणीकडे जाणार? हें लिहून पाठवावें. प्रस्तुत होळकरांसीं व पाटिलबावांसीं चित्त शुद्ध चांगलें आहे. परंतु आतां मसलत आहे. या त्रिवर्गाच्या चाली कशा पडतील पाहावें. त्यास तुम्हीं लिहिलें हें खरें आहे. काय घडेल तें पाहावें. होईल तें लिहून पाठवावें. पाटिलबावा गंगास्नानास जाणार होते, ते जाऊन आलेच असतील. पुढें मनसबा काय करणार हें लिहून पाठविणें. गांवचे बंदोबस्ताविसीं लिहिलें, त्यास बंदोबस्त करून दिल्हा. आतां खटलें पडावयाचें नाहीं. वरचीवर वर्तमान लिहून पाठविणें म्हणोन आज्ञा.

त्यास इस्माइलबेगचा व आपला बिघाड जाहला. याचें कारण काय म्हणोन स्वामी म्हणतील, तर शिखांचा व गुलामकादराचा, रोहिला याचा, भाऊ व त्याची आई यांणीं जमेत करून, पाणिपत व सोनपत व कर्नालपर्यंत दुंडी केली, व यमुनापार गोसगड सारंगपुराकडे हंगामा केला. त्याजवर राजश्री आंबाजी इंगळे यांचे भाऊ बाळोजी इंगळे यांजला श्रावणमासीं रवाना केलें होतें. त्यांगीं जाऊन शिखासीं व गुलामकादर याचे भावासीं लढाया घेऊन जरब बसविली. तेव्हां त्यांणीं तें तोंड सोडून पाणिपताकडे दंगा केला. तेव्हां बाळोजी इंगळे यांणीं गोसगड व सारंगपुरचा बंदोबस्त करून, तिकडे फौज ठेऊन, यमुनेवर उतरोन पाणिपताकडे गेले. तेव्हां दुरोख शह तितक्या फौजेनें राखावयासी भारी पडों लागलें. याजकरितां येशोन सुभेदारांची फौज कासीबा होळकर यांजबरोबर देऊन, पाणिपताकडे बाळोजी इंगळे यांचे कुमकेस रवाना केली. तेव्हां कासीबा होळकर यांणीं दिल्लीस जाऊन दोन चार मुक्काम केले. तेव्हां दरोबस्त कही इस्माइलबेगाचे मुलकांत जाऊं लागली. तो प्रांत झाडून मेवात. तेव्हां होळकरांचे लष्कराचीं उंटें व तट्टें मेवाती यांणीं पाडाव करून नेलीं. त्याजवरून सुभेदाराकडील स्वार जाऊन, नुनीमकशर येथील ठाणें इस्माइल्याचें उठवून, आपलें ठाणें बसविलें. त्याजवरून इस्माइलबेग यास संशय प्राप्त होऊन, राजश्री पाटिलबावांस पत्रें लिहिलीं कीं, मी सर्व प्रकारें चाकरीस हजीर असतां माझीं ठाणीं होळकरास उठवावयाचें प्रयोजन तें काय? तेव्हां सुभेदारास पाटिलबावांनीं दोन चार वेळ सांगून पाठविलें कीं, इस्माइलबेग हरामखोर खरा, त्याचें पारिपत्य आम्हांसही जरूर करणें आहे; परंतु सालमजकुरीं ही मसलत करावयाची नाहीं. पेस्तर

सालीं फौजेचा बंदोबस्त करून मग काय मसलत करणें ती करावी. सध्याच मसलत करावी ऐसें सामर्थ्य राहिलें नाहीं. याजकरितां तूर्त मसलत उभी न करावी. त्याचें ठाणें घेऊन आपला अंमल वसविला आहे तो उठवून घ्यावा, ऐसें बहुत वेळ सांगोन पाठविलें. परंतु ती गोष्ट मर्जीस नये. तेव्हां मुजरद* राजश्री सुभेदाराकडे राजश्री आबा चिटणीस यांजला पाठविलें. त्यास आबांनींही जाऊन साऱ्या गोष्टी मसलतीच्या सांगितल्या. त्याजवरून सुभेदारांनीं कबूलही केलें कीं ठाणीं उठवून आणवितों. परंतु शेवटीं ठाणींही उठवून आणिलीं नाहींत, आणि त्याचा तर दररोज तगादा कीं, आपले चित्तांत बिघाडच करावयाचा असिला, तर तसेंच सांगावें. चाकरीस हजीर आहों. ऐसीं बोलणीं सक्तच पडत गेलीं. घरामध्यें हे न ऐकत, आणि बाहेर तरी शत्रू जबरदस्त; दोहीकडून संकटच प्राप्त जालें. हीं बोलणीं बोलतच आहेत तों इस्माइल्यानें होळकरचें ठाणें उठवून दिल्हें. ठाण्यामध्यें कमाविसदार होता त्याची थोडीसी बेअब्रूही केली. इतक्यावरूनच इस्माइल्यानें, जैपूरकर व मारवाडी यांजकडील वकील त्याजपासीं होतेच, त्यांचीं बोलणीं परस्परें होऊन वस्त्रें सन्मान जाहालें. जैपूरकरांनीं इस्माइलबेग यास पंचवीस हजार रुपये दिल्हे. तेव्हां राजश्री पाटिलबावांकडील वकील केसोपंत म्हणून इस्माइल्याजवळ ठेविला होता, त्याणें पुसिलें कीं हें काय? तेव्हां इस्माइलबेग याणें उत्तर केलें कीं, तुमचे चित्तांत आमचा बंदोबस्तच करून पारिपत्य करावें हा अर्थ आहे. त्याअर्थीं आम्हांस उभयतां राजांसीं सलूक करणें प्राप्त आहे. जर तुमचे चित्तांत आम्हांविषयीं वाकडें नसतें, तरी आमचा वकील व माझ्या अर्ज्या नित्य जात असतां होळकरांकडील ठाणें उठेना. तेव्हां जबरदस्तीनें ठाणें उठविलें. अशा गोष्टी प्राप्त जाहल्या. तेव्हां फौज व कंपू इस्माइल याचे पारिपत्यास रवाना करणें प्राप्त जाहलें.

चैत्र शुद्धांत राजश्री आबा चिटणीस यांचे कनिष्ठ बंधु राजश्री गोपाळराव रघुनाथ व राजश्री जिउबादादा बक्षी व आंबाजी इंगळे या त्रिवर्गांचे रवानगीचा सिद्धांत होऊन डेरेदाखल जाले. हल्लीं गोपाळराव व जिउबादादा फौज सुद्धां इस्माइल्याचे लष्करापासून विसा पंचविसा कोसांचे आंत्र्यानें आहेत. या फौजेचे उपराळचास बाळोजी इंगळे पाणिपताकडे होते त्यांजला त्या तोंडावर फौज ठेऊन बोलाविलें. तेही येऊन दिल्लीपलीकडे

* मुद्दाम.

दाखल जाले. आठा चोहों दिवसांत युद्धप्रसंग व्हावा ऐसा प्रकार दिसतो. मग काय घडेल तें पाहावें. राजश्री सुभेदाराकडे व अलीबहादर यांजकडे जैपूरवाले व मारवाडी यांचे वकील व इस्माइल्याचे बसलेच आहेत. तेव्हां पुढें कोणत्या डौलास गोष्ट येते ती पाहावी. सारांश, मसलत भारी आहे. पेशजी फक्त एकच सरदार होते, तेव्हां जैपूरची मसलत बिघडून माघारे आलों, आणि सारें हिंदुस्थान बिघडलें होतें परंतु एक हुकमी कारभार चालत होता, याजमुळें पुन्हां शत्रूचीं पारिपत्यें करून बंदोबस्तही जाहला. हल्लीं त्रिवर्ग यांची एकवाक्यता होऊन एकादी गोष्ट घडावी ती अद्याप घडत नाहीं. तेव्हां पुढें कोणत्या थाऱ्यास ही मसलत जाईल ती पहावी. प्रस्तुत मसलत प्राप्त जाली, याजमुळें तूर्त पेंच पाहतां पाटिलबावांवरच आहे. होळकरांकडील फौज बापूजी होळकर यांजबरोबर देऊन, आपले फौजेबरोबर रवाना केले. ते अद्याप समीपच आहेत. तूर्त ही मसलत होळकरांचे चालीनें उभी जाली. नाहींतरी साल मजकुरीं राजश्री पाटिलबावांचा मसलत करण्याविषयींचा किमपि आग्रह नव्हता. परंतु आतां न करितां परिणाम नाहीं, सबब मसलत करणें आली. सारांश लिहिणें हेंच कीं सर्व गोष्टी श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून उत्तमच घडतील. चिंता नाहीं. आपल्याकडील फडणिसीचें काम चालू जालें आहे. परंतु यादीबद्दल सरकारच्या चालीप्रमाणें कामकाज यथास्थित चालत नाहीं, आणि स्वच्छ यादी बाा बंदोबस्त करून देत नाहींत ऐसेंही उत्तर स्पष्ट होत नाहीं. याजमुळें तपसीलवार मजकूर ल्याहावयासी दिक्कत पडते. हल्लीं सेवकास त्यांणीं निरोप देतों ऐसें कबूल केलें असतां, फिरोन त्यांणींच होऊन आपले कामाकरितां राहविलें आहे. ते समयींच सेवकानें मुख्यांपासीं सांगितलें. त्याचे पर्याय तपसीलवार दुसरे पत्रीं आलाहिदा लिहिले आहेत. त्यांजवरून श्रुत होतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes to Nana how the rupture with Ismail Beg was precipitated by the indiscreet conduct of Holkar.*

No. 572 30th May 1790.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ १५ रमजानपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींच्या कृपेंकरून सेवकाचें

वर्तमान यथास्थित असे. विशेष :—स्वामींकडून सांप्रत पत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ १ साबानचीं पत्रें पाठविलीं, तीं पावोन बहुत संतोष जाहाला. पत्रीं आज्ञा कीं, शाहाजादे प्रकर्णीं राजश्री पाटिलबावांसीं बोलोन, त्यांचीं उत्तरें तपसीलवार लिहून पाठविणें, म्हणोन आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें मुख्यांपासीं बोलणीं होऊन त्यांचीं उत्तरें त्याहावयासीं सांगितलीं, तीं सेवेसीं लिहिलीं आहेत. येणेंप्रमाणें कलमें :—

शाहाजादे यांचे बंदोबस्त प्रकर्णीं तुम्हांस पेशजीं लिहिलें होतें, परंतु उत्तरें कोणतेही गोष्टीची शाहाजादे प्रकर्णीं सिद्धांतावीं आलीं नाहींत, म्हणोन लिहिल्यांत आलें. त्यास येविसीं बोलणीं मुख्यांसीं पेशजी दहा पांच वेळ स्वामींचे लिहिल्याअन्वयें जालीं, परंतु सिद्धांताचें बोलणें अमलांत न आलें. त्याचे पर्याय सविस्तरें पेशजी पांच चार पत्रीं सेवेसीं लिहिलेच आहेत. हल्लीं स्वामींचे आज्ञेप्रमाणें बावांसीं बोलणीं बहुत जालीं. त्याचा विस्तार पत्रीं लिहितां येत नाहीं. परंतु या वेळेस जाबसाल यथास्थित सिद्धांताचे बोलण्यांत आले कीं, आजपर्यंत श्रीमंतांची जी आज्ञा आली, त्यास अमान्य कोणतीही गोष्ट न केली; आणि ज्यांत सरकार नुकसानी आहे ऐसें समजलें तेथें सरकार आज्ञेस उजूरही* केला. त्यास येविसीं आम्हांसही सरकारची आज्ञा आली व तुम्हांस येविसीं दोन चार वेळां राजश्री नानांचें लिहिलें आलें. त्यास हल्लीं तुम्ही नानांचे पत्राचे जाब त्याहाल, त्यांजमध्यें पातशाहाजादे यांचे रवानगीचा मजकूर आम्हीं सांगितल्याअन्वयें लिहून, शाहाजादे यांची रवानगी इकडे करावी. ते येथें आलियानंतर, सरकार आज्ञेप्रमाणें त्यांजला वलीअहद करावयासी येईल. पुढें कांहीं लढा पडावयाचा नाहीं. तेथें शाहाजादे आहेत, त्यांजमध्यें कोणी वलीअहद करावा ऐसा कोणी नाहीं. त्याअर्थीं सरकारचे मर्जीप्रमाणें करावें यांत उत्तम आहे, आणि लौकिकांतही चांगलें दिसेल. आमचेंही मानस याप्रमाणेंच आहे. त्यापक्षीं शाहाजादे यांची रवानगी इकडे करावी, म्हणोन मुख्यांचें बोलणें निखालसपणें जालें व येविसींचीं सविस्तर उत्तरें सरदारांनींही स्वामींस लिहिलीं आहेत, त्याजवरून सर्व ध्यानास येईल. सारांश लिहिणें हेंच कीं, शाहाजादे प्रकर्णीं सर्व बोलणीं यथास्थित होऊन, इकडील व तिकडील पत्रें लिहिलीं आहेत. परंतु पुढें काय घडेल तें पाहावें. कलम १

---

* विरोध.

कैलासवासी नारोशंकर यांजवर झांशी सुभ्याचे मामलतीसंबंधें चाळीस पन्नास लक्षांचा हिशेबाचा पेंच सरकारचा आला होता. ते समयीं कैलासवासी श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांजपासीं, कैलासवासी दत्ताजी सिंदे यांनीं विनंती करून, नारोशंकर आपलेपासीं मागोन घेतले. व गोविंदबाबा पैठणकर यांजवरही सरकारची इतराजी बहुत होती. त्यांजलाही श्रीमंतांस विनंती करून मागोन घेतलें. दोन्ही आसाम्यांकडे लाखोंच रुपयांचे पेंच असतां धन्यापासून सोडवून घेतले आणि मुक्त केले. त्याजबद्दल पांच रुपये सरकारचे त्यांजकडे येणें होतें, तेंही दिल्हें. धन्याची मर्जी या उभयतांस सोडावयाची नव्हती; आणि कांहीं ठोकून यांजपासून घ्यावा हाच सरकारचा निश्चय होता. परंतु सरदारांचे भिडेवर उभयतांसही सोडून दिलें. तरी श्रीमंतांचें केलेलें तें आम्हीं सरदारांनीं मोडलें आहे; परंतु आमचें केलेलें धन्यांनीं प्रतिपाद्यच केलें आहे. त्यास येविसींची माहितगारी राजश्री नानांसही असेलच. त्यास इतका तपशील तुम्हांकडून ल्याहावयाचें प्रयोजन नव्हतें. परंतु तुमचें म्हणणें येविसींचें वारंवार पडतें कीं, ज्यांत सरकारची मर्जी राहे,.....(अपूर्ण).

मथुरा वृंदावन दोन्ही महालच्या सनदा जाल्या तर चांगलें. फक्त दोन गांवच्या सनदा घेऊन फल नाहीं. तेथील देवस्थानचा व धर्मादाय वगैरे खर्च जाहाला पाहिजे. याजकरितां दरोबस्त महालच्या सनदा घेऊन पाठवाव्या. म्हणून पूर्वी राजश्री पाटिलबावांस लिहिलेंच आहे. तुम्ही बोलोन, दोन्ही महालच्या सनदा घेऊन पाठवाव्या म्हणोन आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें मुख्यांपासीं बोलिलों. त्याजवरून त्यांनीं उत्तर केलें कीं, मथुरा परगण्याच्या सनदा दरोबस्त महालच्या वृंदावनसुद्धां आणविल्या आहेत. त्या आल्या म्हणजे पाठवून देऊं. वृंदावन स्वतंत्र परगणा नाहीं. मथुरा परगण्यांतीलच गांव आहे. तो मथुरेखालींच गांव वोढतो. त्यासुद्धां सनदा येथें आलियानंतर सरकारांत रवाना होतील, म्हणून उत्तरें जालीं. कलम १

राजश्री त्रिंबकराव नारायण यांचे सरदारीचे बंदोबस्ताविसीं राजश्री पाटिलबावांजवळ बोलोन उत्तरें पाठवावीं, म्हणोन स्वामींनीं सेवकास, मी देशीं असतां समक्ष आज्ञा केली होती. मो इकडे आलियानंतरही दोन चार वेळ पत्रीं आज्ञा जाली. त्याजवरून मी मुख्यापासीं येविसींचीं बोलणीं दहा पांच बैठकींत चांगलींच जालीं. परंतु सिद्धांतांत कोणताही जाबसाल न येई. त्यास येविसींचा मजकूर पेशजीं पांच चार वेळ स्वामींस लिहिलाच होता. त्याजवरून सर्व ध्यानांत

आलें असेल. हल्लीं स्वामींनीं पुनः सरदारीचे बंदोबस्ताविसीं सरदारांस व मजला लिहिलें. त्याजवरून बावांपासीं निमे सरदारीचें बोलिलों. त्याजवरून मुख्यांनीं उत्तर केलें कीं, तुम्ही बोलतां व येविसीं सरकारचींही लिहिलीं येतात, ही गोष्ट यथार्थ आहे; परंतु आजपर्यंत श्रीमंतांचे घरीं सरदारीचे वांटे दोन ऐसे कोणासही करून दिले नाहींत, आणि ही तों नवीन चाल दिसण्यांत येते. दुसरी गोष्ट, धन्यांनीं त्याजविसींचा आग्रह धरिला आहे, आणि आम्हीच शेवटपर्यंत वोढीत असावें हेंही ठीक नाहीं. वरकड त्यांची चाल कशी आहे व मागें त्यांनीं फंद फितूर केवढेले केले आहेत, व तुम्हांस आम्हांस काय घोरांत घातलें, हें सर्व कच्चें पक्कें राजश्री नानांस व हरिपंततात्यांस ठाऊक असतां, उगाच आग्रह धरावा ही गोष्ट विलग दिसते. हल्लीं त्यांनीं राजश्री त्रिंबकराव यांचे चिरंजीव यांजला रस्त्यामध्यें दगा करावा याप्रमाणें मसलत करून, रंगराव त्रिंबक घोडीं फिरवावयासी नदीपार गेले होते, ते मागतीं नारो शंकराचे वाड्याचे पाठीमागें शिवराम-बावाचा बाग आहे, त्या बागाचे कोपऱ्यावर नदीचे कांठीं कुवा आहे, त्या रस्त्यानें येत होते. तेथून नारो शंकराचे वाड्याचा दरवाजा समीपच होता. तों इतक्यांत केसोपंत दातार यांनीं बातमी राखून रंगराव यांस मार्गीं अवरोध केला. त्यास श्रीमंतांचे नगरांत सर्वही जन रहातें, आणि मार्गेकरून हजारों येतात जातात, परंतु शहरांत कोणी दगा फटका करितो ऐसा अर्थ नाहीं. ज्याचें विरुद्ध आहे त्यांनीं ह्या गोष्टी सरकारांत निवेदन करून मग जें करणें तें करावें. तें न करितां, मध्येंच या गोष्टी कराव्या यांत धनीपणाचा दाब कैसा राहतो? एवढी गोष्ट बेअदबीची केली असतां, धनी त्याचें पारिपत्य करीत नाहींत! तस्मात् ईश्वरी इच्छा ऐसीच आहे. वरकड भाऊपणाचे वाद सर्वत्र आहेत. परंतु श्रीमंत धनीसाहेबांनीं × असतां ह्या बेअदबीचा.....(अपूर्ण).

¶*The letter from Appaji Ram to Nana contains replies to several queries of the Poona Darbar. The granting of a Jagir to the Shahzada, the dispute about the Raje Bahadur's Jagir, are discussed. Mahadji secures Sanads of Mathura and Brindaban for the Peshwa. He is set against the division of Raje Bahadur's Saranjam.*

No. 573 23rd June 1790.

श्री

पुरवणी राजश्री रामजी पाटील जाधव गोसावी यांसः—

छ रामराम विनंती उपरी :—इस्माइल व दोन्ही राजे यांच्या फौजा यांचें पारपत्य आपल्या फौजेनें हल्ला करून केलें, हें तपशीलवार अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. श्रीमंतांस व राजश्री बाळाजीपंत नाना यांस पत्रें लिहिलीं आहेत हीं प्रविष्ट करणें. शत्रूच्या पारपत्यास घरच्या अडचणीमुळें मोठा पेंच होता. इकडून फौजा लढाईस रवाना जाहाल्या. लढाई सुरू जाहाली असतां सरदारांकडे वकिलांसीं खलबतें नित्य; व घोडे, बंदुखा वगैरे उंट, बैल, रांगडे आणून देत, त्यांचें ग्रहण व्हावें; वकिलांनीं अष्टोप्रहर जवळ राहून कच्चें पक्कें येथील लिहीत असावें, असे पेंच होते. वकील ठेवणें अगर त्यांसीं खलबतें करणें, त्यांजकडील घोडे वगैरे कबूल करणें, हें लढाई सुरू जहाली नाहीं तोपर्यंत असिल्यास असो. परंतु लढाई सुरू जहाल्यावर या गोष्टी जहाल्या आहेत. तेव्हां पेंचास कारण असें सर्व बोलत होते. परंतु या गोष्टी पेश* न जातां श्रीमंतांचे प्रतापें शत्रूचें पारपत्य जहालें. सरकार पत्रीं मोघम शत्रूचे पारपत्यास जागा, अडचण पेंच होते, म्हणोन लिहिलें आहे. पेंच, अडचण कोणती येविसींचा उल्लेख निघाल्यास हें पत्रच दाखवावें. रवाना छ ९ सवाल सुा इहिदे तिसैन मया व अल्लफ. हे विनंती.

¶*Mahadji communicates to his Poona Agent his success over the armies of Ismail Beg and his Rajput confederates despite Holkar's understanding with the enemies. He instructs him to expose to the Darbar Holkar's treachery in the affair.*

No. 574 25th June 1790.

पैवस्ती छ १५ जिल्काद इहिदे तिस्सैन.

आषाढमास.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ११ माहे सवालपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें

---

* सिद्धीस.

वर्तमान यथास्थित असे. विशेष:— स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त उदास असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळिलें पाहिजे. यानंतरी इकडील दरबारी वर्तमान तरी, इस्माइलबेग व मारवाडी व जैपूरवाले ऐसे एकत्र होऊन पाटणचे* मुक्कामीं डोंगराचा आसरा धरून येक मासपर्यंत होते. त्यास डोंगराचे आसऱ्यामुळें आपले फौजेचो काबू कांहीं न चाले. यास्तव आपली फौज मागें हटून चार कोस आली होती. आणि जेथें सडे स्वारीचा मुक्काम डोंगराचे बाहेर आपले फौजेचा होता, तेथें आपले फौजे वे छबिने† दिवसाचे व रात्रीचे राहात होते. त्यास जोशांनीं वगैरे अधिक आषाढ शुद्ध अष्टमी‡ रविवारीं लढाई केल्यास आपले फौजेस यश येईल, म्हणोन स्पष्टच सांगितलें होतें. त्यास ईश्वरी इच्छेंकरून त्याचाही मुहूर्त रविवारचाच आपले फौजेसीं लढावयाचा ठरला. तदनंतर मिति मजकुरीं राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ बक्षी यांणीं आपले फौजेची व कंपूची तयारी करून, लढाईचा बंदोबस्त मिसलबंदी करून, तयार होऊन गेले. जेथें आपले फौजेचे छबिने नित्य उभे राहात होते, तेथें फौज पलटणें सुद्धां जाऊन उभे राहिले. नंतर डोंगराचे आंत आपलेकडील लोक व कांहीं पलटण जाऊन हरामखोराचे फौजेवर मारगिरी केली. तेव्हां ते चालोन आपले फौजेवर आले. नंतर परस्परें युद्ध प्रसंग तोफखान्यासीं होऊं लागला. परंतु त्यांची फौज मैदानामध्यें न निघे. तेव्हां आपली फौज जी पुढें गेली होती, ती मागें हटवन घेतली; आणि कांहीं पथकें मारवाडयांचे तोंडावर, भाईचें पथक व आणखी पांच सात पथकें पाठवून, करोली§ मारवाडयांचे फौजेसीं करूं लागले. तेव्हां त्यांचे फौजेनें आपले पथकावर चालोन घेतलें. हें पथकांचे लोकांस समजलें. तेव्हां यांणीं शत्रूची फौज आपले पाठीवर घेऊन आपले फौजेंत येऊं लागले. तेव्हां मारवाडी यांस समजलें कीं दक्षणी पळों लागले. हें मनांत आणोन त्यांणीं आपले पथकावर चालोन घेतलें. पुढें वाढून आले तों आपले कंपूनें तोफांची मारगिरी केली; आणि इकडून आपले पथकास कुमक राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी व लखबादादा. निाा पागेनीस यांणीं फौजेनसीं उठावणी केली. ही लढाई उजवे बाजूस मारवाडयांसीं भारी होतच आहे, तों डावे बाजूस इस्माइल्या पलटण व मोगली फौज सुद्धां तयार होताच. तों इतांकयांत त्यांणीही आपले फौजेवर चालोन घेतलें. ते समयीं त्यांजकडील जैपूर व मारवाडी व इस्माइल्या या त्रिवर्गांचे

* जयपुरचे उत्तरेस ५० मैल. † पाहारे. ‡ ता. २० जून १७९०.
§ बंदुकांचा मारा.

फौजेंतून शें सवाशें तोफा सुरू होऊन कंपूवर आपले चालोन घेतलें. ते समयीं डबाईसाहेब फिरंगी यांणीं उजवे बाजूस मारवाडचांची लढाई संभाळून, डावे बाजूस तोफांची मार बेतन्हा केली; आणि चोहोंकडून आपले फौजेनेंही दम एकदांच करून हरामखोरांसीं लढाई करून उधळून दिल्हे. तेव्हां इस्माइल्या व जैपूरवाले व मारवाडी यांणीं तमाम पळ काढून पळों लागले. तेव्हां आपले फौजेनें त्यांची पाठलाग केली. राजश्री जिवाजी बल्लाळ व आंबाजी इंगळे व शिवाजी विठ्ठल बापू यांचें पथक, वगैरे पथकें आणखी होतीं, त्या सुद्धां झाडून पाठीस लागले. तों एक रात्र प्रहर जाली. तथापि जिवाजी बल्लाळ बक्षी यांणीं बारा कोसपर्यंत त्याची पाठलाग केली. परंतु तो हातीं लागला नाहीं. जैपुरांत पळोन गेला. मारवाडी यांचा सरदार गंगाराम भंडारी मुख्य फौजेंत होता, तो ह्या लढाईंत पडला म्हणून वर्तमान आहे. परंतु अद्याप पक्कें लिहिण्यांत आलें नाहीं. बातमी जैपुरची एकबार येईल, तेव्हां कोण कोण सरदार त्यांजकडील पडले, हें पक्केपणें लिहिल्यांत आलियानंतर मागाहून सेवेसीं लिहीन. इस्माइलबेग व मारवाडी व जैपूरवाले कंपू सुद्धां शंभर तोफा, लहान मोठ्या पाडाव आल्या. शिवाय पलटणच्या बंदुका वगैरे लूट लष्करांत आपले बहुत आली. हत्ती पाडाव चौदा पंधरापर्यंत आले. सारांश, हें यश श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून राजश्री पाटिलबावांस आलें. राजश्री अलीबहादर आजपर्यंत फौज सुद्धां येथेंच होते. अलीकडे त्यांजकडील राजश्री सदाशिवपंत आसवलकर दिवाणजी यांचे चिरंजीव राजश्री बळवंतराव यांची रवानगी दोन हजार फौजेनसीं सडे स्वारींत केली. ते रविवारीं अष्टमीस माहे मजकुरीं लढाईचे दिवशीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजपासीं जाऊन दाखल जाहाले. होळकरांची फौज कासीबा होळकर व बापू होळकर मिळोन चार पांच हजार फौजेनसीं तेथें आहेत. त्यांजवर मारवाडी यांणीं चालोन घेतलें. तेव्हां आपलीं पथकें त्यांचे कुमकेस बारभाई वगैरे यांचीं पथकें पाठविलीं. तेव्हां लढाईचें तोंड लाविलें, आणि वर लिहिल्याअन्वयें आपली फत्ते जाहाली. आपलेकडील व शत्रूकडील ठार व जखमी किती जाले, त्याचें लिहिलें अद्याप खचित आलें नाहीं. आज उद्यां लिहिलें आलें, म्हणजे मागाहून सविस्तारें लिहिण्यांत येईल. सडे स्वारींत सरदार नवेच होते. परंतु लहान मोठे सरदार यांणीं एकचित्त करून लढाई मारून दिल्ही. नवा कंपू डबाईसाहेब याची जरब चांगलीच पडली आहे, आणि जातीनेंही मर्द माणूस आहे. सारांश इस्माइल्याची मसलत तूर्त

लांबणीची होती, परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूचें पारपत्य लौकरच जाहालें. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं लिहीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

Appaji Ram reports the brilliant action of Patan in which Ismail Beg's force and the Rajput armies were annihilated by Sindia's trained battalions under De Boigne.

No. 575 20th July 1970.

पैवस्ती छ ५ जिल्काद इहिदे तिस्सेन.

श्रावण.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कुर्नानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ जिल्कादपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून सांप्रत कृपापत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नव्हता. त्यास छ ३ सवालचें पत्र पाठविलें, तें येथें छ ३ माहे मिनहूस पावलें. पावोन बहुत संतोष जाहला. याप्रमाणें निरंतर कृपापत्र पाठवून सांभाळ करावयासी आज्ञा जाली पाहिजे. यानंतर स्वामींनीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, इस्माइल-बेगाची मसलत उभी राहिली. त्याजवर फौजा रवाना जाहल्या. त्यास आज-तागाईत लढाई जाली न जाली, हें लिहून पाठवावें. वर्ष दोन वर्षें उगेंच मसलत न करतां राहून, हुशार व्हावयाचें होतें. पैक्याची अमदानी* होती, मग एखादा मनसबा करावयाचा होता म्हणजे ठीक पडतें. परंतु तूर्तच मसलत प्राप्तच जाली, तेव्हां करणें लागली. त्यास श्रीमंतांचा प्रताप थोर आहे. शत्रूचें पारिपत्य होईल. चिंता नाहीं. फडणिसीचा दरक थोडासा चालता जाहला आहे. उत्तम जालें. आतां पक्केपणें बंदोबस्त करून घ्यावा. राजश्री पाटिलबावांचे सांगितल्यावरून चार महिने राहिलों. बरें केलें. पवारापासून नजर काय घेतली तें लिहून पाठवावें. शाहाजादे याजविसीं पूर्वी तुम्हांस पत्रें पाठविलीं व पाटिलबावांसही लिहिलें होतें, परंतु अद्याप बंदोबस्त होत नाहीं. त्यास येथें त्यांणीं किती दिवस राहावें? जाबसाल कधीं व्हावा? सरकारांत आले, जाबसाल न होतां निरोप दिला, तरी

---

* सोय.

कैसें दिसेल? याजकरितां मुख्य गोष्ट वलीअहद व्हावी. याजविसींचा आग्रहच असल्यास जाहागिरीचें पूर्वी लिहिलें आहे त्याप्रमाणें घडावें. तुम्हीं बोलोन उत्तर पाठवावें. मथुरा वृंदावन येथील दरोबस्त महालच्या सनदा करून घेण्याविसीं पूर्वी वारंवार लिहिलें. त्याचें उत्तरही आलें कीं, दिल्लीस लिहिलें आहे. त्यास दिवस फार जाहले. वारंवार पाटिलबावांस स्मरण देऊन सनदा दरोबस दोही महालच्या पातशाही करून घेऊन पाठवाव्या म्हणोन आज्ञा.

पेशजी सेवकास स्वामींनीं शाहाजादे याचे मजकुराविसीं तीन चार रवानग्या पाठविल्या; तेथें आज्ञा कीं, शाहाजादे यास वलीअहद करावें. ही गोष्ट न घडे, त्यापक्षीं दोहो चोहो लक्षांची जाहगीर देऊन त्यांचें सांगोपन करावें. हा मजकूर स्वामींनीं राजश्री पाटिलबावांस व राजश्री अलीबहादर यांजला लिहिला होता. त्यास सेवकानें स्वामींचे आज्ञेप्रमाणें पांच सात वेळ शाहाजादे यांचे मजकुराविसीं राजश्री पाटिलबावांजवळ बहुत बोलिलों. तेव्हां उत्तर केलें कीं, तुम्हीं येविसींचा मजकूर राजश्री नानांस ल्याहावा कीं, पातशाहाजादे यांची रवानगी इकडे लष्करांत करावी. येथें आलियानंतर त्यांजला वलीअहद करूं. याउपर या गोष्टीचा संशय न धरावा. याप्रमाणें येथील मुख्यांचें बोलणें होऊन, स्वामींस पत्रें ल्याहावयासीं सांगितलीं. त्याजवरून शाहाजादे यांचे मजकुराचीं पत्रें सविस्तरें लेहून, पेशजीं छ २१ रमजान ज्येष्ठ मासीं सरकारचे डांकेसमागमें रवाना केलींच आहेत. तीं येऊन पावलींच असतील, अथवा पावतील. परंतु हल्लीं स्वामींचें पत्र या मजकुराविसींचें आलें. त्याजवरून मागतीं मुख्यांपासीं हा मजकूर बोलिलों. फिरोन उत्तर जालें कीं, आम्हीं आपले पत्रीं शाहाजादे यांची रवानगी इकडे करावी म्हणोन लिहितों, व तुम्हींही आपले पत्रीं सविस्तरें लिहावें. त्याजवरून सेवेसीं लिहिलें आहे. त्यास येथील मुख्याचे पत्राअन्वयें शाहाजादे याची रवानगी इकडे केली पाहिजे. येथें आलियानंतर शाहाजादे यास वलीअहद करतील. यांत गुंता नाहीं. ऐसें खचित बोलण्यांत येऊन सेवेसीं लिहिलें आहे. येविसीं राजश्री पाटिलबावांनींही स्वामींस अलाहिदा पत्र लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल.

इकडील दरबारी वर्तमान तर, इस्माइलबेग यासीं लढाई ज्येष्ठ* शुद्ध अष्टमीस रविवारीं मातबर जाली. शत्रूचें पारिपत्य जालें. शेवटीं इस्माइल्या व गंगाराम भंडारी मारवाडी यांजकडील, व जैपूरवाल्यांकडील दौलतराम हलद्या याचा लेक,

* अधिक आषाढ पाहिजे. मागील पत्र पहा.

एकूण तिन्ही खासे लढाईतून मोड जाहला ते समयीं पळोन गेले. लढाईमध्यें आपलेकडील शिलेदार मंडळीपैकीं जखमी व ठार व घोडीं जखमी व ठार जालीं, याची याद अलाहिदा लेहून सेवेसीं पाठविली आहे त्याजवरून ध्यानास येईल. इस्माइल्याचे लढाईचें वर्तमान पेशजीं सेवेसीं लिहिलेंच आहे, त्याजवरून श्रुत जालेंच असेल. परंतु हल्लीही सेवेसीं लिहिलें आहे. हरामखोरांकडील लढाईमध्यें तोफा पंच्यासी व हत्ती वीस पंचवीस, शिवाय बंदुका वगैरे सरंजाम आपलेकडे पाडाव आला. बाकीचें लष्कर त्याचें दरोबस्त लुटलें गेलें. परंतु शेवटीं शत्रू पळोन गेला. असो. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून शत्रूचें पारिपत्यही होऊन येईल. चिंता नाहीं.

पवाराकडून नजर काय घेतली त्याचा शोध करून लेहून पाठवावें म्हणोन आज्ञा. त्यास येविसींचा मजकूर सविस्तरें मागाहून सेवेसीं लेहून पाठवीन.

आपल्या फौजांनीं जैपूरचे व मारवाडचे दुरोब्या शहावर जाऊन मुक्काम केला आहे. जैपुरापासून अलीकडे आपल्या फौजा पंचवीस तीस कोसांवर आहेत. लक्ष्मण अनंत पागेनिसाकडील व आंबाजी इंगळे यांचे भाऊ वगैरे सरदार सडी फौज व पेंढारी यांची रवानगी अजमेरीकडे केली आहे. त्यांणीं जाऊन मारवाडयांचा मुलूख लुटून जाळून फस्त करावा, व जैपूरचे दुसरे बाजूस रवळोजी शिंदे यांची रवानगी येथून होत आहे.

मथुरा वृंदावन येथील दरोबस्त सनदा पातशाही करून घेऊन पाठवाव्या म्हणून आज्ञा. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें सनदा मागेंच तयार होऊन राहिल्या आहेत. परंतु शाहाजी दिल्लीहून येथें येणार होते, यास्तव त्यांणींच सनदा पातशाहाजवळून घेऊन आपलेपासीं ठेविल्या आहेत. त्यास शाहाजी येथें लष्करांत यावयाकरितां कालच दिल्लीहून निघाले म्हणून लिहिलें आलें, व शाहाजीचा वकील येथें आहे त्यांणींही सांगितलें. त्यास ते येथें आलियानंतर सनदा घेऊन सेवेसीं पाठवितों.

फडणिसीचे दरकाचा मजकूर तरी कानुकायद्याची याद पूर्वी स्वामींनीं करून दिली आहे, त्याप्रमाणें बंदोबस्त होऊन वहिवाट लिहिण्याची चालावी. तो अर्थ घडावयासी अवघड पडों लागलें. तेव्हां सेवकानें विनंती केली कीं, सरकार निसबतीचें काम आपण आमचे हातून घेतात, त्यापक्षीं तेथील वहिवाटीप्रमाणें घ्यावें, हा पक्ष उत्तम आहे. आणि त्या चालीप्रमाणें गोष्ट अमलांत येत नाहीं. तेव्हां आपण कोणता पाया घालून देतात तो घालून द्यावा. म्हणजे त्याप्रमाणें वहिवाट कामाकाजाची करावयासी येईल,

आणि जी वाहवाट दरकसंबंधें येथें चालेल, त्याप्रमाणें मजला यजमानास ल्याहावें लागेल. याप्रमाणें बोलणीं बहुत जालीं. त्यास हल्लीं यादी तयार करून त्याजवर मखलाशा राजश्री सदाशिव मल्हार यांचे हातच्या जाहल्या आहेत. कांहीं कलमांच्या मखलाशा होणें राहिल्या आहेत. त्या जालियानंतर सेवेसीं तपसीलवार लेहून पाठवूं. सारांश, वर्तमानकालीं आमचे उपयोगी या मंडळांत तूर्त सदाशिव मल्हार पडतात, आणि सरकारलक्षही त्यांचें बरें दिसतें. वरकड थोर आहेत. परंतु कोणे वेळेस प्रसंग पडल्यास मशारनिल्हे आपले कामास अंतर करीत नाहींत. याप्रमाणें तूर्त चाललें आहे. स्वामींस पेशजीं येथोन मेवा विलायती दाळिंबें व द्राक्षें पाठविलीं होतीं, त्याचा पावलियाचा जाब सेवकास आला नव्हता. त्यास हल्लींचे रवानगींत पावलियाचा जाब अलाहिदा आला, तो पावोन बहुत संतोष जाहला. सारांश, स्वामींचे मर्जीस आला, येणेंकरून फार संतोष वाटला. वरकड वर्तमान मागाहून सेवेसीं लेहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *In reply to Nana's letter Appaji Ram, among other things, reports some more details of the battle of Patan.*

No. 576 22nd July 1790.

श्री

यादी छ ६ मुक्काम नजीक पाटण येथें इस्माईलबेग यासीं लढाई होऊन, सिलेदार हुजरातपैकीं ठार व जखमी जाहाले, त्यांचा तपसील सुरसन इहिदे तिस्सैन. हस्ते याद सडे स्वारींतून आली त्याजवरून लिहिलें येणेंप्रों :—

३६१ खासे व स्वार
३०९ जखमी
७२ तरवारेचे
३४ भाल्याचे
९ बरचीचे
६ तीराचे
१५७ गोळीचे
३१ गोळ्याचे व दगडाचे मिळोन

३०९

५२ ठार जाले

३६१

१७३ घोडीं
१०४ जखमी
६९ ठार

१७३

५३४

येणेंप्रमाणें ठार व जखमी यांची याद लेहून पाठविली आहे. रा छ ९ जिल्काद.

The paper enumerates the dead and wounded in the battle of Patan.

No. 577 11th August 1790.

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन गोसावी यांसीं*:—

छ दंडवत उपरी:—तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. अठरा दिवसांचे वायद्याचीं पत्रें येतांच पुण्यास आलों. राजश्री नानांची गांठ पडून बोलणें जाहालें. फर्दा वकीलमुतलकी व नायब मुनायबी व बक्षीगिरीच्या करून घेतल्या त्याच्या नकला पाठविल्या त्याच नेऊन प्रविष्ट केल्या. त्याजवरून मुनशीस बोलावून फर्दा वाचवून त्याच्या नकला हिंदवींत केल्या. त्यास वकील मुतलकीचे फर्देवर दसकत जहालें, हें ठीक दिसत नाहींत. व नायब मुनायबीचे फर्देवर दसकत जुन्या सुलकुत (?) पावेतों. तें पद तुमचे नांवाचें, त्याजहून लहान पद बक्षीगिरीचें तें श्रीमंतांचे नांवचें. त्याजवरही दसकत तुमची गुमास्तगीर तोंपावेतों बक्षीगिरी असे. यांत श्रीमंतांचें धनीपण कोणतें रहातें? या पदाचें कारण काय होतें? श्रीमंतांचे पेशवाईपेक्षां प्रतिनिधीचें श्रेष्ठ पद आहे. परंतु प्रतापापुढें पदें काय करितात? या पदापूर्वीही बादशाहा तुम्हांस कसें मानितात हें ध्यानांतच असेल. तीन पदें करून घेणें, तरी हल्लीं नकला करून देतों याप्रमाणें तीन पदांच्या फर्दा श्रीमंतांचे

---

* हा बाळाजी जनार्दन पुणें येथील महादजीचा वकील. पत्रलेखक महादजी शिंदे.

नांवें करून घ्याव्या; नंतर नालकी वगैरे सरंजाम पाठवणें तर पाठवावा. याप्रमाणें नानांनीं सांगोन फर्दाचे मसुदे दिल्हे, हे पाठविले आहेत. याप्रमाणें फर्दा होऊन याव्या म्हणोन वगैरे लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, वकील मुतलकीची अर्जी श्रीमंतांचे नांवें केली, त्याजवर बादशाहांनीं दसकत केलें. ते समयीं बादशाहास अर्ज स्पष्ट दसकत श्रीमंतांचे नांवें करून द्यावें म्हणोन केला. परंतु त्यांनीं फर्दांत तुमची नायबी न लिहितां दसकत केल्यास दुसरा नायब कोणी आल्यास, विसाजी कृष्ण व होळकर यांणीं बंदगी* केली तें ध्यानांतच आहे. तुम्ही ते समयीं वचन राखिलें, याकरितां तुमचा इतबार मजला आहे. जाणोन नायबी तुमची लिहिली आहे. पद श्रीमंतांचे नांवें करार आहेच. कोणीकडूनही श्रेष्ठ पदें आहेत तीं दुसऱ्याचे हातीं न पडावीं, फर्दा करून घेऊन आडथळून टाकावी, याजवर दृष्टि देऊन विशेष दिक्कत केली नाहीं. पुढें इतका अंदेशा पडून आमचे नांवें नायबी असली तरी सरकारांत गोष्ट मंजूर पडणार नाहीं हें ध्यानांत आलें नाहीं. श्रीमंतांचे पायांसीं प्रतारणा असावी तर इतक्या गोष्टीचा अंदेशा घ्यावा. आमची बारगिरीची आसामी, त्यापक्षीं चाकरीवर मात्र नजर. नायब मुनायबीचें पद, वकील मुतलकीहून दुसरा दर्जा, तोही दुसऱ्याचे हातास न जावा; दुसरीकडे गेल्यास बक्षीगिरीहून श्रेष्ठ आहे. श्रीमंतांचे नांवें अर्जी करावी तर एक पद श्रीमंतांचे नांवें दिल्हें, दुसऱ्यास दिक्कत करितील, याकरितां आपले नांवें अर्जी दिल्ही. त्यांत अर्जीचे समयीं सुचला तसा मतलब साधून घेतला. आमचे नांवें दसकत करून घेतलें म्हणोन पद सरकारांत न आलें, हे समजच नाहीं. त्यापक्षीं ध्यानांतही न आलें. असो. आमचें केलें प्रशस्त न वाटतां त्यांत कल्पना निघाव्या असी गोष्ट तर एकही अंतरबाह्य इकडून नाहीं. हल्लीं फर्दा करून पाठविल्या याप्रमाणें दसकत करून श्रीमंतांचे नांवें घ्याव्या हेही गोष्ट चांगलीच आहे. यांतही संतोषच आहे. परंतु हल्लीं बादशाहा दिल्लीस आहेत. आपले काबूंत पेशजी होते व नजफखानी मंडळी सर्व कायम होती त्यांचा दबाव होता, यामुळें ते समयीं केल्या गोष्टी त्या साधल्या. हल्लीं दिल्लीस गेले आहेत व राजकारणें इंग्रज व जयपूर, जोधपूर आदिकरून चालवितात. अर्जी केल्याप्रमाणें करून दिल्यास उत्तम. दिक्कत घेतल्यास जी गोष्ट जाली आहे तीसही हिसका बसला असें जालें; व आमची नायबी पदांत, याकरितां फिरोन फर्दा करून मागतात हें समजलें, तेव्हां आमचे

* सेवा.

करण्याची प्रतीत नाहीं, व आंतून यांचें त्यांचें नीट नाहीं असें समजोन, राजकारणें करीत आहेत तीं अधिकच बळावतील. याअर्थी फर्दा देणेंही ठीक नाहीं. श्रीमंतांचे प्रतापापुढें पदें काय करितात, ही गोष्ट खरीच आहे. फर्दा इतःपर द्यावयाचें कारण नाहीं. नालकी वगैरे सरंजाम उज्जनीस ठेविला आहे, तो आम्ही येऊं तेव्हां घेऊन येऊं व जाबसालही होईल. चिंता नाहीं. लौकिकांत फूट दिसोन राजकारणें करणार त्यांस संधि होईल. याकरितां उत्तरें लिहिणें व सरंजाम पाठवणें.....थोरल्या कामाचा नाश न व्हावा याजकरितां लिहिलें आहे. याउपरी समक्षच आल्यावर जाबसाल होतील. येविसीं सदाशिव दिनकर यांसीही बोलण्यांत आलें आहे. जाणिजे. छ २९ जिल्काद. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji protests his innocence and good intentions in the matter of the grant of the imperial dignities of Vakil-ul-Mutlaq and Bakshi by the Emperor.*

No. 578 11th August 1790.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २९ जिल्कादपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतरी इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांनीं सेवकास एकांतीं चार घटका घेऊन वर्तमान सांगितलें कीं, साल मजकुरीं मसलतीचा प्रकार विशेषात्कारें करून, भारीच मसलत पडावी ऐसा अर्थ नव्हता. परंतु आप्त फितुरामुळें मारवाडी व जैपूरवाले व इस्माइल्या या त्रिवर्गांनीं एकत्र होऊन, इस्माइल्यास मात्र पुढें जाहिराण्यांत करून, आंतून उभयतां राजे याप्रमाणें मसलत नमूद जाली. तेव्हां येथून राजश्री गोपाळराव रघुनाथ व राजश्री जिउबा दादा बक्षी या उभयतांची रवानगी केली. फौज व कंपूही समागमें दिला. त्यांनीं जाऊन, पाटणावर इस्माइल्यासीं गांठ घालून लढाई ज्येष्ठ* शुा अष्टमी

---

* अधिक आषाढ पाहिजे.

रविवारीं करून शत्रूचें पारिपत्य केलें. पुढें जैपूर व मारवाड प्रांतीं फौजा पाठवून दोहीं राजांचें पारिपत्य करावें हा इरादा आहे. या तरतुदीस लाखोंच रुपये खर्च होणार. तेव्हां बरोबरीचे सरदार होळकर त्यांजलाही सलाह पुसावी, आणि फौजा उभयतां सरदारांच्या व राजश्री अलीबहादूर यांची फौज ऐशा तिन्ही फौजा रवाना कराव्या, म्हणून राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांस बोलावून हे मसलतीचे विचार त्यांस पुसिले. तेव्हां आमचे मुखदाक्षिण्यार्थ साऱ्या गोष्टी समक्ष कबूल केल्या, परंतु अमलांत एकही गोष्ट न आली. तेव्हां पुन्हां सुभेदाराकडील कारभारी बोलावून आणोन त्यांजला पुसिलें कीं, सुभेदारांनीं येथें येऊन, जैपूर व मारवाडची मसलत करून, उभयतां राजांचें इस्माइल्या सुद्धां पारिपत्य करावें, याप्रमाणें ठराव जाहाला. नंतर आम्हीं आपले फौजेची तयारी केली, व पलटणें येथें हो ीं त्यांचीही तयारी करविली, व समरुचीं* पलटणें सारंगपुराकडे होतीं तींही आणविलीं. एकूण सात पलटणें व दहा बारा हजार फौज याप्रमाणें तयारी केली. तुमची फौज आली म्हणजे या फौजेची रवानगी करावी, याप्रमाणें इकडून उत्तर जाहालें. तेव्हां सुभेदारांकडील कारभारी यांणीं त्याचें प्रत्योत्तर केलें कीं, आमची फौज पुढें गेली आहे. आतां येथून दुसरी फौज जाणें हा अर्थ समजलाच आहे. पुढें सडया फौजा आहेत, त्यांतून राजश्री बापू होळकर यांजला आणवून तिकडे पाठवूं. तेव्हां सुभेदारांकडील दुसरी फौज येऊन तिकडे रवाना करणें हा अर्थ समजलाच आहे. आणि वांटणीचा मात्र तगादा नित्य उठोन होत आहे. जो मुलूख सुटेल त्याची निमे वांटणी द्यावी, याप्रमाणें सुभेदार म्हणतात. त्यास, त्याचेंही उत्तर इकडून जाहालें कीं, तुम्हीं वांटणी मागतां ही गोष्ट यथार्थ आहे. परंतु पेशजी कैलासवासी मल्हारजी होळकर सुभेदार झांशीस लागले होते, ते समयीं आम्हीं कोटचास होतों. तेथें सुभेदारांचीं पत्रें आम्हांस आलीं कीं, आम्ही झांशीच्या शहास गुंतलों आहों, तरी तुम्हीं येऊन कुमक करावी. तेव्हां तेथील मसलत जसी कळेल तसी उरकोन घेऊन फौज सुद्धां सुभेदारांपासीं आलों पुढें झांशी घेतल्यानंतर वांटणीचा प्रकार पडिला, तेव्हां सुभेदारांनीं आपले तोफखान्याचा खर्च आजीच वजा घालून, बाकी राहिला त्याची वांटणी मात्र आम्हांस दिल्ही. त्यास हल्लीं सुभेदार येथें येतांच वांटणीही दिल्ही. इकडून कोणत्याही गोष्टीची दिकत घेतली नाहीं. त्यांनीं जैसें म्हटलें, तैसें त्यांचें ऐकोन वांटणीही

* Begam Samroo.

दिल्ही. ते समयीं करारमदार ठरले कीं, आजपर्यंत ज्या गोष्टी वऱ्या वाईट जाहल्या, त्या वऱ्याच जाहल्या. परंतु याउपर तरी निखालसपणें परस्परें वहिवाट घडावी, आणि सरकारचाकरी व्हावी. याप्रमाणें वाफथपुरस्कर बोलणें होऊन, नंतर वांटणीही पातशाही मुलूख सुटला त्याजपैकीं दिल्ही. तथापि छलछिद्रें व मसलती करावयासी आद्याप चुकत नाहींत.

इस्माइलबेग चाकर आमचा म्हणोन राहिला. तेव्हां त्याजला जाइदाद देऊन ठेविला. नंतर मेवात प्रांतीं तो राहिला. ऐसें असतां त्यासीं सुभेदारांनीं खलश करून, तुलीमकसहूर बेथील ठाणें इस्माइल्याचें उठविलें. तेव्हां आम्हीं सुभेदारास बहुत प्रकारें सांगितलें कीं, तो हरामी आहे. त्यासीं थोडक्यासाठीं उगाच खलश करूं नये. असें बहुत प्रकारें सांगितलें. तत्रापि आमची गोष्ट न ऐकिली. शेवटीं इस्माइल्यानें फौज पाठवून सुभेदारांचें ठाणें उठविलें, आणि ठाण्यांतील लोकही छिन्नभिन्न केले. तेव्हां पुन्हां हरामखोराचें पारिपत्य करावें, ती तर गोष्ट दूरच राहिली, आणि बदनक्ष मात्र केला. तेव्हां ही गोष्ट लौकिकास वाईट पडली. असो. आम्ही आजपर्यंत श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून दाहा वर्षें एकटेच आहों, आणि मसलतीही वऱ्या वाईट लहान थोर पडल्या, त्या श्रीमंतांचे प्रतापेंकरूनच शेवटासही गेल्या, आणि नक्षच संपादिला. असें असतां ही गोष्ट विलग होऊन, तमाम जमिदारांनीं दुंडया* केल्यानंतर, फौजेची व कंपूची तयारी करून इस्माइल्याचें पारिपत्यास रवाना केली; आणि इस्माइल्यासही तिकडून कुमक उभयतां राजांनीं केली. तेव्हां त्यां मुद्दां पारिपत्य केलें. इतका कारभार होई तोंपर्यंत उभयतां सरदारांस आमची फौज इस्माइल्याचें पारिपत्य करील किंवा न करील हा अंदेशाच होता; आणि मारवाडवाले व जैपूरवाले यांचे वकील उभयतांकडे नेहमीं वसलेच होते. त्यास येविसीं आम्हीं उभयतांस बहुत वेळ सांगितलें कीं, मारवाड व जैपूर या दोहों राजांकडील वकील तुम्हांजवळ आहेत त्यांजला काढून द्यावें. ती गोष्ट आमची न ऐकिली. जेव्हां आम्हीं इस्माइल्यापासीं लढाई मारिली, तेव्हां उभयतां सरदारांनीं त्या वकिलांस निरोप परस्परें दिल्हे. तथापि ते वकील आद्याप जवळपासच आहेत. निखालस कूच करून गेले नाहींत. त्यास ज्यापक्षीं आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांपासीं आहे, त्याअर्थीं त्यांणीं वकील ठेवून राजकारणें करून फितूर करावे, येणेंकरून

* बंडखोऱ्या.

होणें तें काय? परंतु यांणीं राजकारणें करावयाचीं तीं परभारें केलींच होतीं. धन्याचा प्रताप थोर, याजमुळें त्यांचे खेळ त्यांजपासींच राहिले; आणि आम्हींच त्रिवर्गाचें पारिपत्य केलें, व पुढेंही शेष राहिलें आहे त्याचेंही पारिपत्य होईल. चिंता नाहीं. परंतु यांच्या चाली या प्रकारच्या नसाव्या, आणि या सर्व गोष्टी तुम्हांस समजाव्या म्हणून बोलतों. तुम्हींही जी वहिवाट होत आहे ती पाहातच आहां. यास्तव तुम्हांस या गोष्टीची वाकबगारी पक्की असावी म्हणन हें बोलण्यांत आणिलें. वरकड आम्हांस या उभयतांच्या चालीसीं गरज नाहीं. परंतु धन्याचे कामास हिसके बसतात, यास्तव बोलणें प्राप्त होतें.

सुभेदारांस वांटणी घेणें तर, आमचा फौज खर्च व तोफखाना व पलटणें याचा खर्च वजा घालून, बाकी राहील त्याजपैकीं मग वांटणी देणें तर देऊं. इस्माइल्याची मसलत प्राप्त जाली, तेव्हां फौज व कंपूची रवानगी करतेसमयीं राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व राजश्री अलीबहादर यांस फौज पाठविण्याविषयीं सांगून पाठविलें. तेव्हां होळकरांनीं फौज आपली कासिबा होळकर यांजबरोबर देऊन इस्माइल्यावर पाठविली व बापू होळकर यांस राजश्री आंबाजी इंगळे यांजबरोबर पाठविलें; आणि राजश्री अलीबहादर यांजला फौज पाठविण्याविषयीं पांच सात वेळ सांगोन पाठविलें कीं, तुम्हीं आपली फौज सरकार चाकरीस पाठवावी. त्यांस त्यांनीं पैक्याची आड घातली कीं, बिना आम्हांस पैका दिल्याखेरीज आमची फौज जात नाहीं. तथापि आम्हीं इकडून वारंवार सांगतच गेलों. तेव्हां शेवटीं ज्या दिवशीं इस्माइल्यासीं लढाई मारिली, त्या दिवशीं त्यांजकडील फौज अजमासें दोनेक हजार लढाईच्या समयीं जाऊन पोहोंचली. हीच फौज अगोदर गेली असती तर किती उपयोगी पडती? परंतु ती गोष्ट न घडली. मनस्वी विचार, तेथें उपाय क.य?

होळकरांचा विचार म्हणावा तरी, पहिल्यापासून पथरगडचे स्वारी तागाईत त्यांणीं आम्हांसीं वांकड्याच चाली धरिल्या आहेत. परंतु ईश्वरी सत्तेकरून तितक्याही वेळेस त्यांचीच कमती पडत गेली; असें असतां हल्लींही त्याचअन्वयें चालतात, तेव्हां त्यांस फळही तसेंच प्राप्त होईल. या गोष्टीची चिंता नाहीं. परंतु यांचे चालीप्रमाणें राजश्री अलीबहादर यांणीं न चालावें. त्यास त्यांणींही गोसावी यांचे राजकारणापासून होळकरांचीच चाल धरिली आहे. इस्माइल्यासीं व आमचे फौजेसीं लढाई नित्य उठोन पाटणावर चालली होती,

त्या समयीं राजाराम गोधा जैपुरवाल्यांचा वकील याचे मार्फतीनें वस्त्रें, घोडा आणि बंदुका वगैरे जैपुरवाल्यांनीं पाठविल्या. तो जिन्नस वकील मजकूर याणें आणून अलीबहादरबाबांस दिल्हा आणि त्यांणीं घेतला. त्यास श्रीमंतांनीं आमचे कुमकेस अलीबहादरास पाठविलें. असें असतां, चाकरीचा अन्वय वर लिहिल्या-अन्वयें घडतो, आणि राजकारणाच्या चाली ह्या प्रत्यक्ष घडतात! आमचे फौजेनें लढाया माराव्या आणि शत्रुंचीं पारिपत्यें करावीं, आणि त्यांणीं आमचे दुस्मान त्यांचीं वस्त्रें घ्यावीं, घोडे बंदुका वगैरे बहुमान घ्याव्या, ह्या गोष्टी त्यांस बऱ्या कीं काय? याजमध्यें लौकिक हिंदुस्थानांत कैसा होतो हे अर्थ ध्यानांत येऊंच नयेत आणि मनस्वी वर्तणुका कराव्या? ह्या गोष्टी परिणामास कशा जातील? अस्तु. या गोष्टीचा विधिनिषेध आम्हीं बाळगीत नाहीं. परंतु ह्या चाली येथें प्रस्तुत चालल्या आहेत. ह्या तुम्हांस परम्परें समजल्याच असतील. किंवा कच्चें पक्कें ठाऊक नसलें तर ऐकोन घ्यावें, आणि याचा विचार काय तो आम्हांस सांगावा, म्हणोन मुख्यांनीं सेवकास एकांतीं बोलावून चार घटिका हाच मजकूर सांगत होते. ह्या गोष्टी इतक्या खऱ्या खोट्या म्हणाव्या, तर बहुतकरून खरेपणा राजश्री पाटिलबाबांचाच पडेल; आणि त्या उभयतांकडे सालमजकूरचे चालींत दोषच लागेल, असें वाटतें. परंतु आम्हांसारिख्यास श्रीमंतांच्या गोष्टी बोलावयासी कारण नाहीं. परंतु ज्या पक्षीं त्यांणीं कच्ची वहिवाट आजपर्यंत जाहली ती सांगितली, तेव्हां त्यांतील अर्थ हाच कीं, हें वर्तमान स्वामींस कळावें. हाच त्यांतील आशय. या गोष्टीचा शोधही बारकाईनें मनास आणिला व राजश्री अलीबहादरबाबा यांसही सेवकानें जाऊन एकांतीं समक्ष पुसिलें कीं, पाटिलबाबा आपले घरीं म्हणतात कीं, तुम्हांस श्रीमंतांनीं आमचे कुमकेस पाठविलें असें असतां, त्यांणीं जैपूरवाल्याकडील परभारें वस्त्रें बहुमान घ्यावा कीं काय? त्यास ही गोष्ट खरी किंवा खोटी? तेव्हां बाबांनीं उत्तर केलें कीं, ही गोष्ट जाली खरी. तेव्हां सेवकानें पुन्हां विनंती केली कीं, आजपर्यंत गोसावी वगैरे यांचीं राजकारणें व पक्ष केलेत, ते समजून जाहाले किंवा असमजून वहिवाट घडली हें न कळे. परंतु याउपर तरी आपण या गोष्टींत पडों नये. येविसीं आपणांस श्रीमंतांचा शद्ध लागेल. तेव्हां उगेच राहिले. प्रस्तुत राजश्री सदाशिवपंत असवलकर दिवाणजी यांचें व त्यांचें चित्त शुद्ध नाहीं असें दिसतें. मग याचें कारण काय हें न कळे. वरकड मशारनिल्हेची वहिवाट बरीच दिसते. परंतु यांचें व त्यांचें कां बनत नाहीं हें न कळे. सारांश, आज तागाईत राजश्री तुकोजी होळकर

सुभेदार व राजश्री अलीबहाद्दरबावा यांजकडील मजकूर आजपर्यंत कांहींच लिहिण्यांत न आणिला व मी कोणाच्या खटल्यांतही पडत नाहीं. कारण काय, तर मोठ्यामोठ्यांच्या गोष्टी सहजांत होतात, परंतु मध्यें गोरगरीबें असतात तीं मात्र मारलीं जातात. यास्तव कोणाचीही गोष्ट बरी वाईट लिहीत नाहीं. परंतु हल्लीं राजश्री पाटिलबावांनीं हा मजकूर सविस्तर सांगितला. त्या बोलण्यांतील भाव कीं, हा मजकूर सेवकानें स्वामींस ल्याहावा. त्याजवरून विनंतिपत्रीं लिहिला आहे. मनन होऊन उत्तर ल्याहावयासी आज्ञा जाली पाहिजे. स्वामींनीं पेशजीं मथुरावृंदावन येथील पातशाही फरमान श्रीमंतांचे नांवाचें करून पाठवावें म्हणोन सेवकास व राजश्री पाटिलबावांस लिहिलें होतें. त्यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें राजश्री पाटिलबावांसीं दहा पांच वेळ बोलणें जाहालें. पुढें दिल्लीचे बंदोबस्तास सालगुदस्तां शाहाजीस रवाना केलें, तेव्हां हा मजकूर त्यांसीं बोलण्यांत आणिला होता. त्यांस शाहाजीनीं दिल्लीस जाऊन हा मजकूर सारा हजरतांचे कानावर घातला. त्यानंतर त्यांचा हुकूम जाला कीं, श्रीमंतांचे मर्जीप्रमाणें मथुरावृंदावन व नंदगांव बरसाना येथील सनदा अहलतमगा* करून द्याव्या. त्याजवरून सनदा लिहून तयार केल्या होत्या, परंतु मध्यें इस्माइल्याचा बैदा जाला, याजमुळें शाहाजीचे येण्यास दिवसगत लागली. हल्लीं शाहाजीनीं चहूं स्थळांच्या सनदा घेऊन मथुरेस यावयाची तयारी केली. तेव्हां पातशाहांनीं श्रीमंतांस वकीलमुतलकीचा खिलत चार कुबजेचा पाठविला, तोही समागमें घेऊन आले. ते येथें आषाढ शुा † दशमीस येऊन दाखल जाले. नंतर भेटीचा समारंभ जाहाला. दुसरे दिवशीं शाहाजीनीं तो सरंजाम व सनदा घेऊन राजश्री पाटिलबावांस आणून दाखविल्या. तेव्हां सेवकासही बोलावून सनदा व खिलत दाखविला. नंतर सलाह ठरविली कीं हा खिलत श्रीमंतांचे नांवाचा आला, तेव्हां उगाच श्रीमंतांकडे पाठवावा ही गोष्ट ठीक नव्हे. याची फर्मानबाडी‡ करून, श्रीमंतांच्या नांवाच्या अहलतमग्याचे फर्मान आले आहेत ते, व वकीलमुतलकीचा खिलत आला तो, ऐसा समारंभेंकरून घ्यावा, आणि श्रीमंतांकडे रवाना करावा. हा खिलत पातशाहांनीं बहुत खूष होऊन आपल्या स्वसंतोषें आपले बरोबरीचा खिलत श्रीमंतांस पाठविला आहे. या खिलताचा दरज्या उत्कृष्ट आहे व येविसीं पातशाही शुका

---

* राजानें दिलेली जमीन; बक्षिसाची सनद.

† ता. २१ जुलै १७९०. ‡ वस्त्राचा दरबार.

श्रीमंतांचे नांवचा आलाहिदा आहे. तो स्वामींपासीं आल्यानंतर सर्व अर्थ ध्यानांत येतील. त्यांतही लिहिलें आहे कीं, वकीलमुतलक हें पद श्रीमंतांस अहलनमगा करून दिल्हें असे. याप्रमाणें शुक्याची नक्कल श्रीमंतांच्या फर्मानबाडीचे वेळेस वाचून दाखविली. त्याजमध्यें हा अर्थ नियतो असें सर्वांस समजाविलें. फर्मानबाडीचे समयीं राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व राजश्री अलीबहादरबाबा व राजश्री शिवाजी विठ्ठल बापू वगैरे सरकारचीं पथकें तैनातीस आहेत, यांजला बोलावून खिलत व फर्मान घेण्याचा समारंभ चांगला केला, व तोफांचीही सरबत्ती केली. सबाशें तोफ सुटली. सारांश, समारंभ चांगला केला. फर्मानबाडी केली ते समयीं सुभेदार मात्र आले नव्हते. वरकड राजश्री अलीबहादर व राजश्री शिवाजी विठ्ठल बापू वगैरे पथकें सरकारचीं व पाटिलबाबांकडील झाडून मंडळ होतें. चार घटिका समारंभ फार चांगला केला. पुढें खिलत व फर्मान याची रवानगी करावी, तर पर्जन्य काळ. त्यांत दुरचा पल्ला. वास्तव तूर्त रवानगी न जाहाली. पुढें पर्जन्य हलका जाहालियानंतर रवानगी होईल. वरकड दरबारी वर्तमान विशेष ल्याहावेंसें नाहीं. मागाहून होईल वर्तमान तें सेवेसीं लिहून पाठवीन. फर्मानबाडीचे समारंभांत राजश्री अलीबहादरबाबा आले होते, परंतु मर्जी ते समयीं खट्टी होती. यांतील भाव काय असतील ते ईश्वर जाणें. बहुत विस्तारें ल्याहावेंसें नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

**In an interview with Appaji Ram, Mahadji condemns Holkar's general policy of thwarting his plans and vehemently attacks his late dealings with his Rajput enemies. The ceremony of accepting Imperial dignities in behalf of the Peshwa is also reported.*

No. 579 21st September 1790.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ ११ मोहरमपर्यंत मुक्काम श्रीक्षेत्र मथुरा येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.—स्वामींकडून अलीकडे कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षित असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासीं आज्ञा केली पाहिजे. यानंतरी इकडील दरबारी वर्तमान तर,

राजश्री पाटिलबावांची खासा स्वारी श्रावण वद्य ४ मंदवारीं* मुमुहूर्तेंकरून डेऱ्यादाखल जाहाली. उपरांत गोकुळ आष्टमीचा उत्साहही† त्याच मुक्कामावर जाहाला. नंतर तेथून कूच करून, शांतनुकुंड म्हणून तीर्थ आहे तेथें जाऊन मुक्काम केला. मथुरेचे मुक्कामापासून तो मुक्काम तीन कोस आहे. पुढें कूच करून जैपूर, मारवाड या दोहों संस्थानावर जावें हा इरादा आहे. पेशजी मारवाडांत आपली फौज इस्माइल्याचें पारपत्य करून गेली आहे. त्या फौजेनें जाऊन सांवर वगैरे ठाणीं, परवतसर सुद्धां घेऊन, आजमेरीस जाऊन चढ्या घोडचांनसीं हल्ला करून शहर घेतलें. नंतर किल्लचास मोर्चे लावून दहाबारा दिवस जाहले. तों तिकडे मारवाडचांचा जमाव झाडून एकत्र होऊन मेडत्याचे मुक्कामीं जमा जाहाले. उपरांत त्यांणीं आपले फौजेसीं येऊन लढाई द्यावी हा सिद्धांत होऊन, मेडत्याहून पांच कोस कूच करून आजमेरीचे सुमारें आले. तेव्हां राजश्री गोपाळराव रघुनाथ व राजश्री जिउबादादा बक्षी व राजश्री लखबादादा पागेनीस यांणीं विचार करून, किल्लचाचे मोर्च्याचा बंदोबस्त करून, तेथून कूच करून राठोडांचे फौजेवर गेले. नंतर भाद्रपद शुा. त्रितियेस‡ शुक्रवारीं मारवाडचांसीं लढाई मातबर जाहाली. लढाईचे समयीं आपली फौज त्याचे फौजेवर चालून गेली. इकडील फौजेच्या टोळचा तीन केल्या होत्या. मध्यें तोफखाना कंप सुद्धां पलटणाची लेण उभी करून, पिछाडीस गोपाळराव रघुनाथ, व उजवे बाजूस जिउबादादा व डावे बाजूस लखबादादा याप्रों मिसळबंदीनें चालोन गेले. तों मारवाडचांनींही तिकडे आपले फौजेच्या सात टोळचा करून आपले फौजेवर नीट चालोन घेतलें. ते समयीं प्रथमच डावे बाजूवर येऊन लढाई येऊन दिल्ही. तेथें मारवाडचांनीं सिकस्त§ खाऊन राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजवर चालोन आले. तेथेंही कंपूपुढें टिकाव न जाहला. तेव्हां उजवे बाजूस साऱ्या राठोडांनीं एकदांच एलगार‖ केला. ते समयीं आपले फौजेनें थोडेसें काढतेंही घेतलें. परंतु श्रीमंतांचा प्रताप थोर. त्यांचे पुण्येंकरून राजश्री पाटिलबावांस यश आलें. कंपूवाल्यांनीं व फौजेनें आपल्या लढाईची शर्त केली व तिकडे मारवाडचांनींही लढाईची पराकाष्टा केली. परंतु शेवटीं यश आपले फौजेस आलें, आणि मारवाडचांचा मोड होऊन नागोरास वगैरे जागां पळोन गेले. मारवाडचांकडील मातबर सरदार भिवराज

* २८ आगष्ट १७९०. † उत्सव. ‡ ११ सेप्टेंबर १७९० मेडत्याची लढाई झाली. § मार; पराभव. ‖ हल्ला.

बक्षी व त्याचा पुत्र व चापावत शिवसिंग आठ पटाईत होते. त्यांजपैकीं वगैरे सरदार लढाईंत पांच सात चांगले पडले व त्यांचा मोड जाहाला. ते समयीं मेडत्यास गंगाराम भंडारी व आलीयारबेग खान वगैरे दोन चार सरदार मारवाडचांकडील पळोन गेले. त्यास मेडतेंही खालीं जालें व सरदारही त्यांतील धरले आले. याप्रों राठोडाचें पारपत्य होऊन आपली फौज हल्लीं मेडत्यावर आहे. लढाईंत तोफा पंचवीस सत्तावीस व गंजीफांच्या गाडचा पांच सात पाडाव आल्या. सिवाय मारवाडचाकडील हत्ती, घोडे, उंटें, वगैरे यांचा तपसील पाडावाचा अद्याप वर लिहिल्यांत आला नाहीं. लिहिल्यांत आलियानंतर मागाहून सेवेसीं लिहीन. आपलेकडील लढाईमध्यें जखमी, ठार, लोक व घोडीं किती जाहालीं, याचीही याद अद्याप न आली. याजमुळें सविस्तारें सेवेसीं न लिहिलें. जो मजकूर लढाईप्रकर्णीं लिहिल्यांत आला व परस्परें ऐकिला, तो मात्र लिहिला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports further successes gained by Mahadji's arms over the Rajputs at Sambhar, Ajmer and Merta.*

No. 580 September 1790.

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— राजश्री अलीबहादरबावा यांची व राजश्री पाटिलबावा यांची चित्तशुद्धता नाहीं. त्यास, राजश्री गोपाळराव रघुनाथ व राजश्री जिउबादादा बक्षी, फौज कंपू सुद्धां इस्माइल्याचे पारिपत्यास रवाना केले,ते समयीं राजश्री पाटिलबावांनीं त्यांजकडील कारभारी यांजला बोलावून आणून, तुमची फौज आमचे फौजेबराबरच चाकरीस जाऊं द्या म्हणून सांगितलें. परंतु फौज पाठवावयासी अनकूळ पडलें नाहीं. मागाहून फौज पाठविली, ती ज्या दिवशीं इस्माइल्यासीं लढाई होऊन हरामखोराचें पारिपत्य केलें, त्या दिवशीं जाऊन पोंहचली. तेव्हां त्या लढाईंत कामकाज होणें हा अर्थ समजलाच आहे. त्याजवर राजश्री लाडोजी शितोळे देशमुख यांची रवानगी जयपूरप्रांतीं आषाढ वद्य त्रयोदशीस केली. त्याजबराबर राजश्री सदाशिवपंत दिवाणजी यांजबरोबर फौज झाडून देऊन, रवानगी करावी म्हणून इकडून सांगितलें. येविषयींचे मध्यस्तीस राजश्री तुकोजी होळकर सुभेदारही होते. परंतु देण्या घेण्याच्या घालमिलीमुळें कांहींच तोड न पडे. राजश्री पाटिलबावा म्हणत जे, आम्ही लाख रुपये देऊं आणि तुम्हीं मसलतीस जावें.

फौज चाकरीस गेलियानंतर दरमहाचा दरमहा देत जाऊं. ज्यापक्षीं फौज चाकरीस जात नाहीं, त्याअर्थीं आम्हांस खर्चास द्यावयासी अनकूळ पडणार नाहीं. ऐसींही बोलणीं परस्पर जालीं. तेव्हां सेवकासही एक दोन वेळ बावांनीं सांगितलें कीं, तुम्हीं जाऊन त्यांसीं चार गोष्टी समजावून सांगाव्या, आणि एकादी गोष्ट तोडजोडीची काढून फौज चाकरीस जायी तो अर्थ करावा. तेव्हां राजश्री अलीबहादूर यांजकडेस जाऊन चार गोष्टी समजून सांगितल्या. लढाईच्या समयींचे दाखलेही दिले कीं, पूर्वीही फौज पाठवावी म्हणून दोन चार वेळ आम्हीं आपलेपासीं विनंती केली, परंतु ती गोष्ट मर्जीस न आली. शेवटीं आपली फौज जवळ असतां, यश.....त्यास आतां तरी फौज त्यांचे म्हटल्याप्रमाणें आपण चाकरीस पाठवावी. मग पैका फौजेस खर्चावयासी न देत, तरी कोणी तरी चार गोष्टी त्यांजलाही समजून सांगेल. लाख रुपये तूर्त ते देतात. त्यास तुमची फौज निश्चयरूप जाते हा निश्चय असल्यास, आणखीही लाख पन्नास हजार रुपय देतील. असें उत्तर केल्यानंतर मग बोलले कीं, आम्ही आपली फौज निश्चयरूप पाठवितों. त्यांनीं आमचे ऐवजाची निशा करावी. याप्रमाणें तेथें ठरावून त्याजकडून मुख्यांपासीं आलों. नंतर जाहलें वर्तमान तें सर्व सांगितलें. तेव्हां त्यांनीं कबूल केलें कीं, ते बशर्त ऐवजाची निशा मागतात, त्यापक्षीं आम्हांसही निशा फौज पाठवितों म्हणून पाहिजे. याचें कारण कीं, पेशजी आम्हीं एक वेळ ऐवज होळकरांचे मध्यस्तीनें दिला, परंतु शेवटीं फौज चाकरीस गेली नाहीं. पैका मात्र आम्हांपासून घेतला. तैसीच गोष्ट आतां तरी जाहली, तरी उगेच दोन लाख रुपये कां खर्च करावे? तरी यांनीं आपली फौज पांच सात हजारपर्यंत पाठवावी, आणि खुशालचंद सावकार याजपासून दोन लक्ष रुपये घ्यावे. जर करारप्रमाणें फौज न पाठविली, तर रविकर्ण सावकार त्यांजकडील आहे, त्यानें दोहो लक्षांची निशा खुशालचंदाची करावी. याप्रमाणें पक्कें करावें म्हणजे ऐवज परस्पर सावकारांकडून देवितों. याप्रमाणें सिद्धांत जाहला. दोहो लक्षांचा जमाखर्च सावकारी करून दिला. असें असतां फौज सारी अद्याप जात नाहीं. याजमुळें राजश्री पाटिलबावांची मर्जी खट्टी आहे. आणि सेवकावरीही उल्हाणा* वारंवार देतात कीं, तुम्हीं मध्यस्ती करून दोन लक्ष रुपये देविलेत, आणि फौज तर अद्याप चाकरीस गेली नाहीं. तेव्हां याचा जाबसाल कोणास

* दोष; आरोप.

पुसावा? याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. त्यास सारांश गोष्ट कीं, राजश्री पाटिलबावांचें दैव थोर आहे आणि कर्तेपणाहि चांगला. तेणेंकरून चार गोष्टी बऱ्या वाईट जाहल्या असतां सर्व पार पडतात. वरकड याप्रमाणें दुसरे करावयासी जातात, परंतु सर्वांस त्या गोष्टी साधत नाहींत. याउपर येथें उभयतां सरदार आहेत तोंपर्यंत लहान मोठा कोणीहि जाबसाल करावयासी गेला असतां, स्थिति यथास्थित राहणार नाहीं. ज्याची गोष्ट त्यासारखी सांगावी, तर सरकार नुकसानी होते. निखालसपणें बोलावें तरी कोणास चांगलें वाटतें, कोणास वाईट वाटतें. तेव्हां तिन्हाइतांवर उगाच शद्ब मात्र येतो. असें असतां यथा बुद्धीनें सुचेल तितकी वर्तणूक करितों. नंतर ईश्वरी इच्छा. राजश्री पाटिलबावा मसलतीस बाहेर निघाले, हा विचार सर्वत्रांच्या चित्तास न आला. ज्योतिषी वगैरे महापुरुष देवधर्म या सर्वांचे मतें आहे कीं, मुख्यांनीं येथें मुकाम मजकुरीं असावें, आणि पुढें फौजा, सरदार पाठवावे. तेणेंकरूनच फत्ते होईल. याप्रमाणें बहुतांचें सांगणें आहे. परंतु मुख्यांचे चित्तास हा विचार न येतां, खासा स्वारीच पुढें जयपूर मारवाड प्रांतीं जाणार आहे. त्यास, राज्यभारासही गोष्टी जैसा समय पडेल तैशा कराव्या लागतील. अस्तु. सेवकानें पेशजीं निरोप मागितला होता, ते समयीं इस्माइल्याचे मसलतीची कोणतीही गोष्ट बरी वाईट शेवटास जाऊं द्यावी, नंतर निरोप देऊं, याप्रमाणें कबूल केलें. तूर्त निरोप देत नाहीं असें स्पष्ट उत्तर जालें. याजकरितां त्यांचे मर्जीस्तव राहणें प्राप्त जाहलें. हल्लीं ईश्वरें दोन वेळ फत्तेही केली, असें असतां पुढें मसलतीचा निग्रहच दिसतो; आणि सेवकास तर येऊन चार साडेचार वर्षें जाहलीं. त्यास दसरा दिपवाळी आंत निरोप मागून देशीं यावें याप्रमाणें मानस आहे. मग ईश्वर काय घडवील तें पाहावें. राजश्री अलीबहादरबाबा यांजकडील मजकूर आजपर्यंत कोणताही लिहिला नव्हता. हल्लीं उभयतांनीं सेवकास बोलावून, फौजेचे खर्चाची तोडजोड पाडावी म्हणून सांगितलें. त्यावरून कामामध्यें येणें प्राप्त जालें; आणि आतां तर अमलांत येत नाहीं. तेव्हां इकडील मजकूर कच्चा लिहिणें प्राप्त झालें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports serious dissensions among the three Sardars, Sindia, Holkar and Ali Bahadur.*

No. 581 30th November 1790.

स्वती छ १ पैजमादिलावल इहिदे तिस्सैन.

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम कार्तिक वद्य ९ पर्यंत स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील दरबारी वर्तमान तरी, तुकोजी होळकर सुभेदार गुदस्तां मथुरेचे मुक्कामीं येणार, तेव्हां अगोदर राजश्री नारायण गणेश दिवाण यांजला पुढें पाठविलें. नंतर राजश्री पाटिलबावा यांनीं राजश्री आबा चिटणीस यांस सुभेदारांकडे पाठविलें. तेथें गेल्यानंतर सुभेदारांनीं भाऊपणाचीं बोलणीं जीं बोलावयाचीं होतीं तीं बोलून, वांटणीचा वगैरे भाऊपणाचे जाबसालाचा ठराव करून मागतीं चिटणीस मुक्काम मजकुरीं आले. नंतर सुभेदारांच्या व पाटिलबावांच्या भेटी श्रावण शुद्ध १० दशमीस* जाहल्यानंतर महालची वांटणी व इनामसुद्धां घ्यावयाचें तें राजश्री पाटिलबावांनीं दिलें. नंतर पांच सात महिने उभयतांचें रहस्य चांगलेंच होतें. पुढें इस्माइलबेगाची मसलत उभी राहिली. त्याजवर राजश्री पाटिलबावांनीं फौज तयार करून, राजश्री गोपाळ रघुनाथ व जिवाजी बल्लाळ बक्षी यांजबरोबर कंपूसुद्धां पाठविली. तेव्हां राजश्री अलीबहादरबाबा व सुभेदार या उभयतांसही सांगितलें कीं, फौजसुद्धां कोणी मातबर सरदार रवाना करावे. तेव्हां होळकर यांजकडून राजश्री बापूजी होळकर याजबरोबर पांच सातशें स्वार देऊन त्याची रवानगी केली व बाबांकडून राजश्री सदाशिवपंत दिवाणजी यांचे चिरंजीव समागमें कांहीं फौज देऊन पाठविले. पुढें श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून पाटणचे लढाईंत यश आलें. उपरांत पुढें मसलत कोणती कशी काय करावी येविसीं राजश्री तुकोजीबावांस दोन चार वेळ बोलाविलें. कोणे समयीं खासे आले, कोणे समयीं कारभारी आले, परंतु मनसब्याचा सिद्धांत होऊन त्याप्रमाणें गोष्टी अमलांत न येत. तेव्हां पुढें सडे स्वारींत गोपाळ रघुनाथ व जिवाजी बल्लाळ होते, त्यांस सांगून पाठविलें कीं, तुम्हीं कूच करून जैपूर व मारवाड या दोहींचे सर्देस जाऊन सामरेनजीक मुक्काम करावा. मग तुम्हांस लिहोन पाठवूं त्याप्रमाणें करावें. येथें तुकोजीबावांच्या चित्तांत जैपूरवाल्यासीं व मारवाडवाल्यासीं कलह करावा हें ठीक नाहीं. तेव्हां राजश्री पाटिलबावांचें बोलणें पडलें कीं, आम्हीं आज दोन वर्षें गुलामकादराचें व इस्माइल्याचें

* ता. ३१ जुलै १७८९.

पारिपत्य केलें. नंतर इस्माइल्या चाकरीस फिरोन राहिला. तेव्हां त्याजला मेवातची जाइदाद लावून दिली. त्यानें सरकारचाकरी करावी याप्रमाणें निखालस जाबसाल करून दिला असतां, त्यानें हरामखोरीवर मागतीं नजर देऊन फंद मांडला. तेव्हां त्याचें पारिपत्य करणें प्राप्तच जालें. आम्हीं आजपर्यंत हिंदुस्थानांत राहोन श्रीमंतांचे पुण्येंकरून नक्षच संपादिला. तेव्हां हा तर चाकरच. याचें पारिपत्य न केलें, तरी वरकड आमचें भय कसें बाळगतील? यास्तव त्याचे पारिपत्यास फौज पाठविली. तेव्हां जैपरवाल्यांनीं व मारवाडवाल्यांनीं इस्माइल्याची कुमक केली. मारवाडवाल्यांनीं इस्माइल्याचा पुरतेपणें अभिमान धरून, दहा हजार फौजेनसीं गंगाराम भंडारी यास पाठविलें व जैपूरवाल्यांचीही दोन तीन हजार फौज आली होती. तेव्हां पुन्हा बिघाडाची चाल आम्हांकडून किंवा राजांकडून जाहली, हें तुम्हींच सांगावें. तेव्हां शरीक हरामखोरीस प्रवर्तले. ऐसें असतां त्यांचें पारिपत्य कां न करावें? तुम्हांस कोणती गोष्ट कर्तव्य आहे ती आम्हांस साफच सांगावें. तेव्हां सुभेदारांनीं पाटिलबावांची खातरजमा बहुत प्रकारें केली, कीं जी गोष्ट करणें तीच आम्हांस कर्तव्य; दुसरा विचार किमपि नाहीं. आम्हांकडून तुमचे लक्षाशिवाय दुसरी गोष्ट कोणतीही घडावयाची नाहीं. याप्रमाणें खातरजमा केली. त्याजवरून पुढील फौजेस लिहून पाठविलें कीं तुम्ही मारवाडांत जावें. समागमें या उभयतांच्या फौजा होत्या त्याही गेल्या. नंतर ज्याप्रमाणें बोलण्यांत सुभेदार व अलीबहादरबावांच्या येत गेलें, त्याप्रमाणें अमलांत न ये. राजश्री लाडोजी शितोळे देशमुख यांजला आषाढ मासीं फौज बरोबर देऊन जैपूरचे मसलतीस डेरेदाखल केलें. तेव्हां पुन्हां उभयतां सरदारांचे कारभारी बोलावून त्यांजला सांगितलें कीं, जैपूरचे रोंखावर देशमुखांची रवानगी करितों. तुम्हां उभयतांकडील फौज यांजबराबर द्यावी. तेव्हां सुभेदारांकडील कारभाऱ्यांनीं सांगितलें कीं, आमची फौज थोडी बहुत सिद्धच आहे. फिरोन सुभेदारांस पुसोन खचित सांगितलें कीं, आपली फौज निघाली म्हणजे आमचाही सरदार त्यांजबराबरच जाईल. राजश्री अलीबहादर यांचें बोलणें जे, आमचा बंदोबस्त जाल्याखेरीज आम्हांस तुम्हांबराबर राहण्याचें नाहीं. तुम्हांस श्रीमंतांचें पत्र आमचा बंदोबस्त करून देण्याविसीं आलें. आम्हांसही सरकारची आज्ञा आहे कीं, तुमचा बंदोबस्त यथास्थित करून दिल्यास फौजसुद्धां तेथें चाकरी करून असावें. कदाचित् बंदोबस्त तुमचे खर्चाचा करून देत नसल्यास तुम्ही हुजूर येणें. इकडे टिपूची मसलत सरकारांत आहे. तेव्हां

येथेंही प्रसंग सरकारचाकरीचाच आहे. तेव्हां यांच्या त्यांच्या भवत्या न भवत्या बहुत प्रकारें जाहाल्या. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे. सारांश, एका हिम्मतबहाद्दरामुळें यांचे त्यांचे चित्तांत विकल्प येऊन वांकडें पडलें. तत्रापि बाबांचें म्हणणें आमचे फौजेस खर्चास द्यावें. आम्ही फौज देशमुखांसमागमें देतों. तेव्हां सेवकाचे मार्फतीनें दोन लक्ष रुपयांचें बोलणें नक्तीचें होऊन, ऐवज मशारनिल्हेस फौजेचे खर्चाबद्दल देविला. नंतर ऐवज घेऊन फौज चाकरीस न जाई, तेव्हां मागतीं कटकट पडली. आम्हांस नित्य उठोन राजश्री पाटिलबावा म्हणत कीं, तुमच्या मार्फतीनें दोन लक्ष रुपये दिले असतां, फौज चाकरीस जात नाहीं, यास काय म्हणावें? आणि आम्हांस तों दोहींकडे निक्षून बोलतां नये. त्यांनीं आम्हांजवळ कबूल केलें कीं, दोन लक्ष रुपये दिले म्हणजे आमची फौज चाकरीस जाते. त्याजवरून दरम्यान आम्हीं खचित बोलोन रुपये देविले. त्याचा परिणाम असा जाहला. तेव्हां होळकरांकडीलही फौज लाडोजी देशमुख यांजबराबर न गेली. पंधरा वीस रोजपर्यंत फौजेची वाट उभयतांच्या पाहिली, परंतु एकाही सरदाराची फौज बाहेर न पडे. तेव्हां खासा पाटिलबावांनींच डेरे तोफखान्याचे सराईजवळ देऊन आंगप्रस्थानेंकरून कूच केलें. त्याच मुक्कामावर गोकुळाष्टमीचा उत्साव जाहला. मग कूच करून शंतनु कुंडावर आले. परंतु उभयतांही सरदार पाटिलबावा डेरेदाखल जाले, दोन कुचेंही जाहालीं असतां यांच्या डेऱ्यांस न आले. इतक्यामध्यें मारवाडवाल्यांची आपल्या फौजेशीं लढाई होऊन ईश्वरें श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून यश दिल्हें. आपली फत्ते जाहाली. हें वर्तमान आल्यानंतर राजश्री पाटिलबावा होळकरांकडे आपण जातीनिसीं जाऊन, चार गोष्टी विचाराच्या सांगितल्या कीं, याही लढाईत आपली फत्ते जाहाली; तरी या समयीं आपली फौज जैपूरप्रांतीं जावी. म्हणजे दोहीं राज्यांवर जरब बसोन, सलुखाची गोष्ट घडोन, खंडणीचा फैसला होईल तर करूं; नाहीं तरी एक लढाई देणें प्राप्त. आमची फौज शहास गुंतली आहे. तेव्हां तिची कुमक न केली, तरी तीही गोष्ट विलग पडेल. यास्तव तुमची फौज पाठवावयाची सोय पडत नसल्यास आपणच जाऊन त्यांचें पारिपत्य करूं. आपण याउपरीं कूच करावें. तेव्हां डेरे बाहेर मुहूर्तेकरून देऊन विजया दशमीस भिकाजी होळकर याजला डेरेदाखल केलें, आणि करार केला कीं, आम्हीं तुम्हांसमागमें येतों. नंतर गोवर्धनावर कूच करून पाटिलबाबा आले. नंतर अलीबहाद्दरबाबांचें उत्तर स्पष्टच जाहालें कीं, आमचा बंदोबस्त तुम्हीं करून देत नाहीं, तर आम्हीं कळेल तसें करूं हा

जाबसाल गोवर्धनचे मुक्कामीं साफच जाहाला. नंतर अलीबहाद्दरबाबांनीं मारवाडास फौज कुमकेस गेली होती त्यास माघारीं बोलाविली; व सदाशिवपंत दिवाणजी देशमुखाबरोबर पाठविले, व यासीं डेरेदाखल केलें होतें त्यांस माघारें आणून औरंगाबादेवर मुक्काम करविला. नंतर आपण खुद्द मथुरेहून कूच करून करोलीकडे गेले; आणि होळकर यांनींही कूच करून सदरहूअन्वयें मारवाडची फौज माघारीं बोलावून, खाशांनीं मथुरेचे मुक्कामींहून कूच करून डीग व गोवर्धनाचे सुमारें आले. पुढें राजश्री अलीबहाद्दर यांस सामील होणार असा रोंख दिसतो. राजश्री पाटिलबावा गोवर्धनाहून कूच करतेसमयीं राणेखानभाई व आबा चिटणीस यांस सुभेदारांनीं बोलावून सांगितलें कीं, तुम्हीं आमचे जाबसालाचा जिम्मा करून घ्यावा. पहिल्यापासून आमच्या बोलण्यांत तुम्हीं आहां, त्यापक्षीं आमचे जाबसाल, आमची मेवाडची व सहारणपुरची वांटणी यादी व पुढें जो मुलूख सुटेल त्याची निम्मे वांटणी द्यावी, अशी आमची खातरजमा करावी. म्हणजे आम्ही तुमच्या रूबरू कूच करितों. याप्रमाणें ठरोन चिटणीस होळकरांकडून माघारे येऊन मुख्यांचें खलबत जाहालें. परस्परें खातरजमेचीं बोलणीं वांटणीचीं होऊन मागतीं चिटणीस होळकरांकडे गेले. निखालसता करून कुचाचा सिद्धांत ठरवून नंतर यांचें कूच गोवर्धनाहून होऊन रेवाडीस आले. फिरोन सुभेदारांनीं उलटी खाऊन इकडे न आले आणि उलटा उपद्रव कहीचा वगैरे आपले मुलखास देतात. त्रिवर्गांची एक वाक्यता असावी यास्तव राजश्री शिवाजीपंत बापूंनीं व सेवकानें बहुत कस्त केली, परंतु नाइलाज! भिकाजीपंत पाळंदे निधन पावले. त्यास तेथें कोणी तरी सरकारतर्फेनें तेरखेचे कामास पाठवावें. तें काम आतां कोणी करावें हें राजश्री अलीबहाद्दर यांस लिहिलें जावें म्हणजे ठीक पडेल. याचें कारण थोडेसें सेवकाचे दृष्टीस पडलें यास्तव विनंती लिहिली आहे. राजश्री बचाजीपंत फडके व राघोपंत गोखले लिहिण्याचे कामास आहेत ते उपयोगीच आहेत. येविसीं पंत मशारनिल्हे यांनीं त्याहावयासीं पत्र लिहिलें, त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports to Nana the serious split among the three Maratha commanders and the consequent withdrawal of their contingents by Holkar and Ali Bahadur in the midst of the Rajputana campaign.*

No. 582 1st December 1790.

पैवस्ती छ १ ज।।वल इहिदे तिस्सैन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २३ माहे र।।वलपर्यंत मुक्काम नजीक रेवाडी दाहा कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं यास्तव चित्त सापेक्षित असे, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासीं आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी, राजश्री अलीबहाद्दरबाबा यांची व राजश्री पाटिलबावांची एक हिंमतबहाद्दर गोसावी यांजमुळें चित्तशुद्धता नाहींसी जाली. त्यास येविसींचीं पत्रें पेशजीं स्वामींस केलींच आहेत. अलीकडे उभयतांची सफाई होऊन सरकार उपयोगाच्या गोष्टी घडाव्या, ती तर गोष्ट कांहींच दिसोन न येई; आणि उभयतांचा तर गोसाव्यामुळें आग्रह पडला. तेव्हां राजश्री शिवाजीपंत बापू व मी पंधरा दिवस उभयतांच्या दरम्यान पडोन, परस्परें उभयतांचें सख्यत्व करावें याजकरितां बहुत श्रम केले. परंतु यशाची जात कांहींच न घडे, तेव्हां स्वस्थ बसलों. राजश्री अलीबहाद्दरबाबा यांचीं व राजश्री पाटिलबावांची शपथ राजश्री आबा चिटणीस व नवाबाकडील राजश्री बाबाराव गोविंद यांचे विद्यमानें जाहाली. ही गोष्ट आजपर्यंत गुप्तच होती. जेव्हां पाटिलबावांचें कूच मथुरेहून जाहालें आणि अलीबहाद्दरबाबा यांचें कूच न होय, तेव्हां याचें कारण काय हा शोध घेतला. तेव्हां राजश्री पाटिलबावांनीं शंतनु कुंडाचे मुक्कामीं सेवकास एकीकडे घेऊन बसले, आणि कच्चें वर्तमान अलीबहाद्दर प्रकर्णीं सांगितलें. त्यांतील हसील कलम हेंच सांगितलें कीं, अलीबहाद्दर यांणीं आम्हांपासीं श्रीमंतांचे पायाची शपथ वाहिली कीं, गोसावी आपण आम्हांपासून घ्यावा, आणि आमचे खर्चाचा बंदोबस्त यथास्थित करून द्यावा. याप्रमाणें करार असतां गोसावी आमचे हवालीं करीत नाहींत, व चाकरीसही जात नाहीं. दोन लक्ष रुपये तुमचेच विद्यमानें द्यावे, आणि फौज त्यांणीं आम्हांकडील जो कोणी सरदार जाईल त्याजब।। रवाना करावी, याप्रमाणें सिद्धांत जाहाला असतां रुपये मात्र घेतले, आणि फौज तर अद्याप पाठवीत नाहींत. तेव्हां ह्या गोष्टीनें परिणाम कसा लागेल? आणि आम्हांसच तुम्ही फिरोन शद्ध ठेवितां कीं, त्यांची खातरजमा करून चाकरीस पाठवावें. त्यास आमची

निखालसता त्यांणीं केली ते समयीं गोसाव्यांच्या स्त्रिया आमचे कैदेंत होत्या, त्यादेखील आम्हीं सोडून दिल्या. त्यास आतां विना गोसावी आमचे स्वाधीन केल्याखेरीज आमची खातरखा होत नाहीं. आम्ही श्रीमंतांचे घरीं लहान मोठी सरदारी करितों. परंतु कारभारसंबंधें जी गोष्ट संकटाची प्राप्त आहे, आणि केल्याखेरीज परिणामच नाहीं, तरी शफथा वेलभंडाराच्या देतों आगर घेतों, परंतु श्रीमंतांचे पायाची शफथ कधींही वाहात नाहीं. ऐसें असतां त्यांणीं आम्हांपासीं श्रीमंतांचे पायांची शफथ वाहिली, तेव्हां आमची खातरजमा जाहली; आणि आम्हीही त्यांजपासीं बोलिलों कीं, तुम्हीं गोसावी आमचे स्वाधीन केल्यानंतर आम्ही तुमचा बंदोबस्त यथास्थित करून देऊं. ही गोष्ट पटकर्णी न होतां ठरली. ऐसें असतां पुढें षडमासपर्यंत वाट पाहिली, परंतु गोष्ट कांहींच अमलांत येईना. इस्माइलबेग याजवर फौज पाठवा म्हणून बहुत वेळ सांगितलें; परंतु समयास फौज न पाठविली. शेवटीं राजश्री सदाशिवपंत आसवलकर दिवाणजी यांचे चिरंजिवास रवाना केलें. ते इस्माइल्याची लढाई जाली त्या दिवशीं जाऊन पोंहचले. पुढें इस्माइल्याचें पारिपत्य होऊन मारवाडांत फौज गेली. तेव्हांही पुन्हां होळकरांच्या व अलीबहादर यांच्या फौजा रवाना करण्याविसीं किती प्रयत्न केला, तो तुम्हांस ठाऊकच आहे. निदान राजश्री लाडोजी शितोळे देशमुख यांजलाही जैपूरप्रांतीं रवाना करावें, या इराद्यानें डेऱ्यादाखल केले. ते समयींही फौज पाठविण्याविसीं निकड केली. तेव्हां वर लिहिल्याअन्वयें ऐवजाची निशा सावकारी करून घेतली. आणि फौज झाडून मसलतीस देशमुखांबरोबर पाठवावी याप्रमाणें करार केला असतां, ऐवज घेऊन फौज जात नाहीं, या गोष्टीस काय म्हणावें? तेव्हां कोणतीही गोष्ट बोलण्यांत, वचनांत, करारांत आली, आणि तिची वहिवाट पुढें यथास्थित घडली, ती तर गोष्ट घडतच नाहीं. इस्माइल्याकडील मुलूख मेवातचा सुटला, त्याजपैकीं पंधरा लक्षांची जागा लाऊन द्यावी याप्रमाणें ठराव जाहाला, आणि चार लक्ष रुपये खंडणी जैपूरची, अथवा जप्ती होईल त्याजपैकीं जो वसूल होईल तो, आधीं अलीबहादर यांस द्यावा, याजप्रमाणेंही बोलणीं होळकरांचे विद्यमानें जाहलीं. तथापि कांहींच गोष्ट अमलात न येई. त्यापक्षीं आम्हांकडे दोष तो काय? त्याजवर राजश्री शिवाजीपंत बापू व मी ऐसे उभयतां अलीबहादरबाबा यांजकडेस गेलों. हे सर्व जाबसाल त्यांस पुसिले. नंतर त्यांणीं उत्तर केलें कीं, आम्हीं ह्या गोष्टी कबल केल्या अथवा न केल्या, त्याचा पर्याय काय सांगावा? आम्हींच खोटे ऐसें तुमच्या समजण्यांत

आलें, व तेही तुम्हांस सांगतात त्याजवरून तेंच खरें! परंतु आमचीं बोलणीं शफथपुरस्कर जालीं आहेत. ते मध्यस्थ आहेत. त्यांजला आमच्या समक्ष बोलावून त्यांणींच क्रिया करावी. म्हणजे जे करार ठरले आहेत त्याप्रमाणें करूं. उगाच आम्हांवर दोष ठेऊं म्हणाल तर आम्ही ऐकणार नाहीं. तेव्हां उभयपक्षीं वादाचीच गोष्ट दिसोन आली. तेव्हां शिवाजीपंत बापूंनीं उभयतां सरदारांस निषेध बहुत केला. राजश्री पाटिलबावांसही पुन्हां चार गोष्टी विचाराच्या सांगोन, पहिली बारा लक्षांची जाहागीर द्यावी ऐसें ठरलें होतें, परंतु ती गोष्ट त्यांजला न मानली. तेव्हां विसा लक्षांचे महाल मेवात प्रांतींचे लावून द्यावे, त्यांत मेरटही लावून द्यावी, याप्रमाणें इकडे ठराव करून, मग अलीबहाद्दरबाबा यांजकडे बोलावयासी गेले. तेथें गेलियानंतर बोलिले कीं, राजश्री पाटिलबावा तुम्हांस विसा लक्षांचे महाल लावून देतात हे घ्यावे, आणि चार लक्ष रुपये जैपूरचे ऐवजीं घ्यावे, आणि वरकड तुमचा जाबसाल नालबंदीचा वगैरे श्रीमंतांस लिहून पाठवूं. तेथून आमचें पत्राचे उत्तर येईल त्याप्रमाणें पुढें घडेल. याप्रमाणें तूर्त आपला बंदोबस्त करून देतात हें तुम्हीं कबूल करावें, आणि मसलतीस चलावें, यांत उत्तम आहे. येविसीं बोलणीं फार जालीं. तेव्हां तिकडून त्यांणीं प्रत्योत्तर केलें कीं, आम्हांस इतक्या ऐवजांत परिणाम लागत नाहीं. इतक्या ऐवजाचे महाल वसुली लावून देतील तरी आमचा परिणाम लागेल. नाहीं तर आम्हांस श्रीमंतांचीं पत्रें आलींच आहेत, व तुम्हांसही आमचा बंदोबस्त करून देण्याविसींचीं पत्रें परभारें आलींच आहेत; त्याप्रमाणें तुम्हीं आमचा बंदोबस्त करून दिल्यास आमचें राहणें होईल. आणि बंदोबस्तच करून देणें नाहीं, त्यापक्षीं आमची फौज उपासीं मरते. येणेंकरून आपला बदनक्ष करून राहाणें हेंही ठीक नाहीं. कां कीं जेथें देणें नाहीं आणि सन्मानही नाहीं, तेथें राहाणें ही गोष्ट उत्तम नाहीं. ऐसें स्पष्टच उत्तर जालें. आणि गोसावी याचा मजकूर म्हणाल, तरी बिना आमचा बंदोबस्त करून दिल्याखेरीज गोसावी द्यावयाचा नाहीं. याप्रमाणें जाबसाल जाहाले. आणि इकडील तरी हाच सिद्धांत कीं, बिना गोसावी आमचे स्वाधीन केल्याखेरीज आमची खातरजमा होत नाहीं. पाटिलबावांचें म्हणणें कीं, त्यांणीं होऊन आम्हांपासीं गोसाव्याविसीं निखालसता केली. ऐसें असतां पुन्हां त्या गोष्टीस नाकबूल होतात. तेव्हां वरकड जाबसालाची आमची खातरजमा होत नाहीं, आणि ती तर गोष्ट त्यांजला करावयाचीच नाहीं. वरकडही करार पैका देऊन फौज चाकरीस पाठविण्याविसीं ठरलें होतें, तेही जाबसाल सारेच घडत

नाहींत. दोन चार जावसाल करारांत आले असतां एकही गोष्ट घडेना. तेव्हां येथें आम्हांपासीं राहून तें फळ काय ? त्यापक्षीं श्रीमंतांचीं पत्रें आम्हांस व त्यांजला आलींच आहेत. त्यापक्षीं त्यांणीं आमचा निरोप घेऊन मुखरूप जावें. याप्रमाणें ठरावांत गोष्ट आली.

या गोष्टीस राजश्री अलीबहाद्दरबाबाही सिद्ध जाहाले. निरोप घेऊन जावें हें ठरलें. ऐसें असतां, निरोप न घेतां परभारें जात होते. तेव्हां राजश्री शिवाजीपंत बापूंनीं अलीबहाद्दरबाबा यांजला सांगितलें कीं, निरोप न घेतां जावें हें लौकिकांत ठीक दिसत नाहीं; यास्तव त्यांजला भेटन जावें हा पक्ष बरा दिसतो; व याप्रमाणें राजश्री पाटिलबावांचाही निरोप राजश्री अलीबहाद्दरबाबा यांस आला कीं, तुम्हीं देशीं श्रीमंतांकडे जाणार, त्यापेक्षां आम्हांस भेटून जावें. परभारें तिकडे न जावें. याप्रमाणें इकडील सिद्धांत जाहला. नंतर अलीबहाद्दरबाबा यांणीं राजश्री शिवाजीपंत बापूस पुसिलें कीं, आम्हीं निरोपास कधीं यावें ? त्याजवरून बापूंनीं मुख्यास विचारिलें. नंतर तेथें बोलणें ठरोन, बापूंकडील कारकून राजश्री गोविंद नागनाथ पाठविले, आणि सांगितलें कीं, आपलेकडील मंडळी स्वारीबराबर निरोपास येईल ती कार्याकारण यावी, आणि त्यांची याद लिहून द्यावी. त्याप्रमाणें करावयासी येईल. त्याजवर अलीबहाद्दरबाबांनीं उत्तर केलें कीं, आम्हीं पांच सातशें खाशांनसीं येऊं. तितके बाडाचे आंत उतरोन निरोप घेऊं. त्याजवर गोविंदपंतीं उत्तर केलें कीं, आपण निरोपास येणार, तेव्हां पांच सातशें खाशांचें काम तें काय ? ज्याप्रमाणें आपण हमेशा येत असतात, त्याप्रमाणें आज स्वारी निरोपास यावी. अगर निरोपाचा समय आहे, त्यापक्षीं जी मंडळी समागमें पेशजीं आली होती त्याप्रमाणें आतांही यावी. म्हणजे निरोपाचा समारंभ यथास्थित होईल. याप्रमाणें बोलणें परस्परें होऊन, तेथील सविस्तर वृत्त गोविंद नागनाथ यांणीं इकडे लिहून पाठविलें कीं, इकडील निरोपास यावयाचा इरादा याप्रमाणें आहे. पुढें जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणें येथें बोलण्यांत आणोन सेवेसीं येतों. याप्रमाणें लिहिलें आलें. नंतर येथें विचार ठरोन मशारनिल्हेस इकडून लिहिलें जावें, तों मशारनिल्हेच येथें येऊन पोंहचले. तेव्हां त्यांणीं तिकडील भलें वृत्त सांगितलें. तेव्हां पाटिलबावांनीं राजश्री शिवाजीपंत बापूंस बोलावून आणिलें आणि त्यांजकडील सविस्तर मजकूर सांगितला, आणि पुढें निरोपाची सलाह कैसी करावी ऐसें पुसिलें. तेव्हां सर्वांचे मतें ठरलें कीं, पुन्हां दुसरा कोणी गृहस्थ त्यांजकडे पाठवावा आणि त्यांजला सांगावें कीं,

जी सर्वत्र मेजवानगी अथवा रवानगी करण्याचा सांप्रदाय जो आहे, त्याप्रमाणें आपण याद लिहून द्यावी आणि निरोपास यावें, हा विचार चांगला दिसतो. आणि पांच सातशें जमावानसीं येणें ही सलाह यथास्थित दिसत नाहीं. याप्रमाणें येथें विचार ठरोन पुन्हां राजश्री मुरारराव दौलत यांजला त्यांजकडेस पाठविलें कीं, आपण पांच सांतशें खाशांनसीं निरोपास येणार, ते थेट बाडांत कचेरीपावेतों यावें याप्रमाणें आपण सांगोन पाठविलें. त्यास निरोप घेऊन जाणें त्याअर्थीं इतक्या लोकांचें प्रयोजन तें काय ? शेंपन्नास आपले जे मानकरी असतील ते मात्र समागमें आणावे. बाकीच्या लोकांचें प्रयोजन नाहीं. याप्रमाणें मुरारराव दौलत तेथें जाऊन बोलले. त्याजवर त्यांणीं उत्तर केलें कीं, आम्ही बहुत मंडळी घेऊन आलों तत्रापि चिंता नाहीं. तुम्हांस जितका निरोपाचा समारंभ करावयाचा असेल तितकाच करावा. बाकीचे लोक राहतील त्यांस देण्याघेण्याचें प्रयोजन तें काय ? याप्रमाणें मुरारराव दौलत यांचें लिहिलें आलें. त्याजवर मागतीं इकडून मशारनिल्हेस लिहिलें गेलें कीं, ज्यापक्षीं त्यांची मर्जी विशेष लोकांनसींच यावी ऐसेंच आहे, त्याअर्थीं इकडे येण्याचा प्रकार तहकूब करावा. इतक्या जमावानसीं येणें हा विचार ठीक नाहीं. याप्रमाणें स्पष्टच येथोन मुरारराव दौलत यांस लिहिलें गेलें. ती चिठी बजिन्नस मशारनिल्हेनीं मुख्यांस दाखविली. तथापि उत्तर यथास्थित न जाहालें. पुन्हां हेंच बोलण्यांत आणिलें कीं, आम्ही आपले जमावानसीं येऊं. फौज झाडून गोटाबाहेर उभी राहील. शें दीडशें खासा मात्र निरोपास येईल. आम्हांस वस्त्रांचें प्रयोजन नाहीं. रामराम करून जावें इतकाच प्रकार आहे. याप्रमाणें दोन तीन वेळ बोलणें जाहालें, आणि इतक्या लोकांनसीं यावें हा आग्रह दृष्टीस पडिला. त्याजवरून पाटिलबावांनीं आपले जागीं बंदोबस्त केला, राजश्री लाडोजी शितोळे देशमुख पुढें डिगेवर फौजसुद्धां होते त्यांजला बोलावून आणिलें, येथील फौजेची गोटांत तयारी करून दोन तीन हजार लोक डेऱ्यांत आणून बसविलें, आणि खाशा डेऱ्याभोवतीं पलटणें एक दोन तोफासुद्धां उभीं केलीं. हा विचार राजश्री शिवाजीपंत बापूंस किंवा सेवकास पुसिला नाहीं. इतका कारभार परस्परेंच जाहाला. जेव्हां गडबड दृष्टीस पडली, तेव्हां राजश्री पाटिलबावांनीं शिवाजीपंत बापूंस बोलावून आणिलें, आणि राजश्री अलीबहादरबाबा यांचे येण्याचा मजकूर सांगितला कीं, त्यांचा आग्रह हजार दीड हजार लोकांनसीं निरोपास यावें, त्याजवरून आम्हांस आपले जागां हुशारी राखणें प्राप्त जाली. यास्तव ही तरतूद केली. हें बोलणें

होऊन कचेरीच्या डेऱ्यांत बसले होते, तोंच अलीबहादूरबाबा यांची स्वारी आंडीग म्हणून गांव होता, तो आमचे मुक्कामापासून दोन अडीच कोस होता, तेथपर्यंत येऊन स्वारी उभी केली. आणि तेथून पुढें बाळोजी हुजरे व राजश्री विठ्ठलपंत कारकून निसबत आपाजीपंत दामले या उभयतांस इकडेस बातमीस पाठविलें. त्यांणीं येथें येऊन ही तरतूद पाहून माघारे न बोलतां गेले. येथील वृत्त जें त्यांचे दृष्टीस पडलें, तें मुख्यांपासीं सांगितलें. नंतर अलीबहादूरबाबा यांणीं राजश्री सदाशिवपंत दिवाणजी व राजश्री आपाजीपंत दामले या उभयतांस इकडे पाटिल-बावांकडे पाठविलें कीं, आम्हीं निरोप घ्यावयासीं येणार होतों. त्यास आमचे येण्याचा आपल्यास संशय प्राप्त जाला, त्याअर्थीं आम्हीं निरोपास यावें हें ठीक नाहीं. यास्तव उभयतांस आपणाकडे पाठविले आहेत. यांजबरोबर निरोपाचे विडे द्यावे. म्हणून उभयतां कारभाऱ्यांबरोबर सांगून पाठविलें. नंतर उभयतां कारभारी येथें येऊन तेथील आज्ञेप्रमाणें बोलून निरोपाचे विडे मागूं लागले. त्याजवर पाटिलबावांनीं सांगितलें कीं, तुम्हीं उभयतां जाऊन राजश्री अलीबहादूर-बाबा यांस घेऊन यावें. नंतर उभयतां मशारनिल्हेनीं पुन्हां उत्तर केलें कीं, याउपर अलीबहादूरबाबा यावयाचे नाहींत. आपण आम्हांपासीं निरोपाचे विडे द्यावे; आणखी आमचें बोलणें नाहीं. आपण कदाचित् आणखी कोणी बाबाकडे गृहस्थ पाठविला असतां त्यांचें येणें घडत नाहीं. मग आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. त्याजवर पाटिलबावांनीं राजश्री शिवाजीपंत बापूस व राजश्री आबा चिटणीस व राणेखानभाई व मजला ऐसे अलीबहादूरबाबा यांजकडेस समजावून आणावयासीं पाठविलें. तेव्हां त्यांचे मर्जीकरितां सर्वांस जाणें प्राप्त जालें. तेथें गेलियानंतर जैसीं यांचीं आजपर्यंत मनस्वी बोलणीं होत, तैसीं आजच्या चाली-वरून तेही अनेक प्रकारें बोलणीं बोलूं लागले. नंतर शिवाजीपंत बापूंनीं व भांईंनीं वगैरे सर्वांनीं मिळोन बहुत प्रकारें त्यांचे खातरजमा केली. तथापि त्यांचे विचारास ती गोष्ट न आली. निदान शिवाजीपंत बापूंनीं स्पष्टच सांगितलें कीं, तुमच्या जाण्यास व त्यांचे तर्फेनें बहुमानास अंतर पडलें, तरी त्याचा जिमा आमचा आहे. आम्हीं आपणांस घेऊन जातों. आपली उभयतांची गांठ पडोन, बोलणीं होऊन, मग निरोप घेऊन जावें. अथवा आम्हीं आपले लोकांमध्यें राहतों. आपण जाऊन उगाच रामराम करून यावें. त्यांजवर बाबांनीं साफच उत्तर केलें कीं, अत:पर आम्हांस कोणाचाच भरंवसा पुरत नाहीं. तुम्हीं आम्हांस आपल्या समागमें नेऊन त्यांजला भेटवावें ऐसा कांहीं अर्थ राहिला नाहीं. त्यास आम्हीं आपले

गोटांत आज जातों. तुम्हांस आमची गरज असली तर उदईक तुम्हीं साऱ्यांनीं यावें आणि आमची खातरखा करावी. आणि जो आमचा बंदोबस्त करून घेणें आहे त्याचा जिमा शिवाजीपंत बापूंनींच करून घ्यावा. आणि आम्हांकडे त्यांचे जाबसाल करून द्यावयाचे जे असतील त्याचाही जिमा बापूंनींच करून घ्यावा. आणि दुतर्फा जाबसालाची वहिवाट करून अमलांत आणावी तरच आमचें येणें घडेल. नाहीं तर आमचा हाच रामराम आहे. याप्रमाणें स्पष्टच उत्तर जाहालें. तथापि पुन्हा बापूनीं बहुत प्रकारें सांगितलें, तत्रापि त्यांचे विचारास ती गोष्ट न आली. आणि कूच करून माघारें लष्करांत मथुरेचे मुक्कामीं गेले.... (अपूर्ण).

¶ *Appaji Ram reports to what extreme the dissensions among the Sardars had gone and how the farewell-ceremony in honour of Ali Bahadur ended in further misunderstanding.*

No. 583 7th December 1790.

श्री

राजश्री रामजी पाटील जाधव गोसावी यांसीं:—

छ रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. तुम्हीं छ ५ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ २८ रबिलावलीं प्रविष्ट जहालें. श्रीमंतांच्या व राजश्री नानांच्या नांवाच्या दोन रवानग्या व माझे नांवें पुरवण्या होत्या, त्या अक्षरशः नानांनीं वाचून पाहून, बोलणीं जाहलीं तीं काल तपशीलवार लिहून पाठविलें आहे. शेवटीं सांगितलें होतें कीं, उद्यां हरिपंत, आम्ही विचार करून तुम्हांस उचित सांगूं. त्यावरून दुसरे दिवशीं तात्यांची प्रकृति नीट नव्हती. पोट दुखत होतें. .....मग बाबा फडके यांजपासीं अवघीं पत्रें व मसीं बोलणें जाहलें होतें तें देऊन, सांगून, त्यांकडे पहाण्यासी व सांगावयास पाठविलें. त्यांनीं पत्रें पाहून, बोलणें ऐकून, नानांस सांगून पाठविलें. त्यावरून नानांनीं दोन घटिका रात्र गेल्यावरी मजला बोलावूं पाठविलें आणि सांगितलें कीं, हरिपंतांची प्रकृति यावयाजोगी नव्हती, म्हणोन तुम्हांसीं बोलणें जाहलें ते अवघे कागद बाबा बरोबर देऊन यांजकडे सांगून पाठविलें. त्यांनीं बाबाबरोबर सांगून पाठविलें. त्यास आम्ही अलीबहादरबाबास राहा म्हणोन लिहितों, आणि गोसावी बावांचे स्वाधीन करवितों, परंतु घाण आपसांमध्यें फार जहाली. बाकी राहिली नाहीं. कोणी

परक्यासारखें परस्पर किंतू, दग्या फटक्याचे संशय, खतरे* आले, येथपावेतों जहालें. पुढें बावांच्या व अलीबहाद्दरांच्या मनांतील खतरे जाऊन पूर्ववत्सारखे उभयतांच्या मनाची स्वच्छता निर्मळता जहाली पाहिजे. अलीबहाद्दरांस लिहोन राहावें, गोसावी हवालीं करावा, असें आम्हीं करवितों. तुम्ही बावांस लिहोन रोजमऱ्यापैकीं ऐवज राहिला असेल त्याची तोड पाडून द्यावी आणि विसा लक्षांचे महाल चांगले लावून द्यावे. बावांचे मनांत बहाद्दरांविसीं किंतु राहूं नये आणि बहाद्दरही पुढें बावांचे मर्जीप्रमाणें वर्तणूक करतील, असें पक्केपणें लिहोन करवावें. पुनः जालें तें एखादें निमित्य दोष ठेऊन वांकडे पर्याय पडूं नयेत असें जहालें म्हणजे उभयपक्षीं चांगलें. बहाद्दरांनीं कूच करून येतों म्हणून लिहिलें होतें. त्यास, कदापि कूच करून दोन चार मजली आलेही असले तरी, राहा म्हणोन लिहितों. तुम्हीही याप्रमाणें जलद लिहोन पाठवा, आम्ही जलद लिहितों, याप्रमाणें सांगितलें. याप्रमाणें बोलणें जहालें तें साहेबांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहाद्दर निरोप न घेतां कूच करणार आणि यांचेंही पत्र यावें म्हणून अगोदर गेलें होतें, आणि बहाद्दरांचेंही पत्र कूच करून येतों म्हणून आलें. यांसी अरसा† फार पडला. कदापि यापूर्वीच कूच करून आले असले, तेव्हां गोसावी बरोबर आणिलाच असेल. तेव्हां कसें करावें? मुक्काम करून असले तरी बरेंच जालें. येविसींचें उत्तर उगवून येण्याविसीं आज्ञा व्हावी, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियासी, गोसावी त्यांणीं आपलेजवळ ठेविला त्यामुळें वाकडें पडलें. ज्यानें आम्हांवरी दगा करावा त्याचा पक्ष सरकारांतून होऊं लागला, तेव्हांच सर्व समजोन चुकलें. एक निष्ठेनें सरकारची चाकरी करावी त्याची सर्फराजी या तऱ्हेची दिसोन आली. त्या दिवसापासून त्याजविसीं लिहिणेंच सोडलें. त्याजवर अलीबहाद्दर यांणीं, नबाबांकडील बाबाराव गोविंद यांचे विद्यमानें पैगाम लावून, गोसावी स्वाधीन करितों, पुढें निखालसप्रों वर्तणूक करूं; अंतर किमपि पडणार नाहीं; येविसीं श्रीमंतांचे पायांची शपथ केली असतां कांहींच अमलांत आलें नाहीं. तथापि दोन लक्ष रुपये दिल्हे; चार लक्ष रुपये जैपूर प्रांतीं गेल्यावरी आधीं ऐवज येईल तो देऊं असें बोलण्यांत आलें. फौज पुढें पाठवावयाचा करार केला, तेही रुपये घेऊन न पाठविली. मारवाडांत थोडेसे लोकानिसीं बळवंतराव सदाशिव होते, त्यांसही बोलावून घेतलें. निरोपास फौज व जंबुऱ्याचे उंट व बाणांच्या कैच्या-

* वांकडेपणा. † अंतर.

सुद्धां येऊं लागले. श्रीमंतांचे पायाचे शपथेची पराकाष्टा; शपथेची हद्द जहाली असतां दगाबाजीची चाल; तेव्हां विश्वास कसा पुरेल? आणि मनाची स्वच्छता कशी होईल? मथुरेहून कूच करून होळकरही मथुरेनजीक होते, तेव्हां यांचा त्यांचा संकेत जाहला असेल, तो ते जाणोत. अलीबहादर कूच करून हिंडोणेकडे करोलीचे सुमारें गेले. होळकर छावणीवरी मुक्काम करून होते. त्यांजकडे आम्ही बाहेर निघाल्यावरी जाऊन कूच करून यावयाविसीं सांगितलें. येतों म्हणून करार केला, परंतु कूच न जाहालें. सहारणपूर व मेवातचे महालचे वांटणीविसीं बोलूं लागले. त्यावरून तेथील वांटणीही द्यावयाची कबूल केली. पातशाही मुलकाचा बंदोबस्त सरकार आज्ञेवरून केला. किती खुळें होतीं तीं मोडलीं. लढाया किती जहाल्या. करोडों रुपयांचे पेंचांत आलों. होळकर देशीहून आले, त्यास खर्चाचा जाबसाल त्यांणीं आपले हिश्शाप्रमाणें करून देऊन वांटणी घ्यावी. परंतु तो जाबसाल पुढें देसीं श्रीमंतांपासीं गेल्यावरी तेथें ठरेल, त्याप्रमाणें करावयासी येईल. तूर्त तुम्ही वांटणी मागतां ते घ्यावी. याप्रमाणें बोलून वांटणी देऊन पांच लक्षांचा मुलूख जाजती दिला, तरी समाधान नाहीं. सहारणपूर व मेवातची वांटणी मागूं लागले. तेंही कबूल केलें असतां इकडे येतों म्हणून करार केला असतां आले नाहींत. येविसीं पेशजी दोन पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सविस्तर कळलें असेल. मारवाडांत फौज होळकरांची, काशीबा होळकर व बापू होळकर होते ते त्यांनीं माघारें बोलावून घेतलें. माघारें येतांना कृष्णगड-वाले वगैरे आमचे लक्षांत आहेत, पुढें मारवाडांतील फौजेस रसद पोंचवितात व आपले जमीयतसुद्धां अजमेरीच्या मोर्चास सामील आहेत, त्यांचे गांव लुटले, जाळले. रसद पुढील फौजेंत जात होती ती लुटली. मारवाड्यांचे वकील त्यांज-पासीं आहेतच. इस्माइल्या व मारवाड्यांची फौज नागोरास आहे. त्यास त्यांनीं पत्रें लिहून पाठविलीं कीं, आम्हीं आपली फौज व पेंढारी माघारें बोलाविले. त्यांचे फौजेंतील लोक फोडून आणवितों. तुम्हीं दबाव द्यावा म्हणजे त्याचे पाय ठरणार नाहींत. याप्रमाणें करीत माघारें आले. हें वर्तमान राजश्री गोपाळ रघुनाथ व जिवाजी बल्लाळ यांस कळतांच, मेडत्याहून कूच करून कंपूसुद्धां बारा कोस जोधपुरचे सुमारें गेले. आम्हीही कूच दर कूच जैपूरप्रांतांत सेखावटींत आलों. या दबावानें जोधपुराहून वकील पुढील फौजेंत आले आहेत. मामलतीचे बोलतात. खातरखां मामलत जहाल्यास होईल. नाहीं तरी स्वारी जातच आहे. मारवाड्यांचें पारपत्य होईल, चिंता नाहीं. होळकर मथुरेहून कच करून कुंभेरीवरून भुसावरास

गेले. अलीबहादर यांचा त्यांचा पूर्व संकेत होता त्याप्रमाणें तिकडे गेले. उभयतां एकत्र होणार म्हणोन वर्तमान आलें आहे. उभयतांच्या चाली या प्रकारच्या. मसलतीचे समयीं उभयतांनीं घालविलें. परकी कोणी पाहुणाही असला तरी मसलतीचे समयीं सोबत सोडून जात नाहीं. होळकर भाऊ, अलीबहादर काका पुतण्याचें नातें, म्हणोन तुम्हीं लिहिलें. त्यास, त्यांची ही चाल. तेव्हां चित्तांतील संशय जाऊन स्वच्छता होणें कळतच आहे. आमच्यानें लहान मोठी सरकारची चाकरी होईल ती करीतच आहों. उभयतां सरकारचे सरदार, त्यास जी चाकरी सांगणें ती सांगावी. याउपरी त्यांनीं आम्ही एकत्र राहून कामेंकाजें घडावीं हा प्रकार राहिला नाहीं. गोसावी त्यांणीं बरोबर घेऊन गेल्यास चिंता नाहीं. तेथें अलीबहादर आल्यावरी गोसावी सरकारांत ठेवावा. आम्ही देसीं आल्यावरी आमचें अगत्य धन्यांस असलें तरी आमचे हवालीं करितील. सदर्हू लिहिल्याप्रमाणें तुम्हीं तेथें बोलून उत्तर होईल तें लिहून पाठविणें. काल पत्रें रवाना केलीं आहेत म्हणोन तुम्हीं लिहिलें, त्यास तीं पत्रें अद्याप येऊन पोंहचलीं नाहींत. पत्रें आल्यावरी त्यांतील आशय समजल्यानंतर त्याचेंही उत्तर पाठविलें जाईल. रा॥ छ २९ रबिलावल. सु॥ इहिदे तिसैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें ही विनंती.

¶*Mahadji asks his Poona Agent to inform the Darbar that his dissensions with Holkar and Ali Bahadur were past the stage of compromise or conciliation, and that they should be recalled.*

No. 584 7th December 179[illegible].

पुरवणी राजश्री रामजी पाटील जाधव गोसावी यांसीः—

(पत्रलेखक महादजी शिंदे)

छ रामराम विनंती उपरी. राजश्री अलीबहादर निरोपास न येतां कूच करून जाऊं लागले. भरतपुरास पावले. तेथून राजश्री यशवंतराव नाईक निंबाळकर यांणीं राजश्री राणोजी निंबाळकर यांसमागमें चिरंजीव राजश्री लाडोजी नरसिंगराव सितोळे यांचे विद्यमानें निरोप पाठविला. अलीबहादर यांसीं समजावून न्यावें. गोसाव्यामुळें अट. त्यास, मीं दरम्यान येऊन गोसावी आपलेजवळ घेऊन पावतां आपलेजवळ करीन. अलीबहादर यांचे खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा, समजावून न्यावें, म्हणोन. त्याजवरून विचाराचे बाटेनें

पहातां आपसांतील फूट दिसोन लौकिक एक प्रकारचा जहाला हें ठीक नाहीं. मथुरेचे आसपास आहों तोंपर्यंत पेशजी बोलण्यांत आल्याप्रमाणें जहाल्यास ठीक. असें समजोन यशवंतराव नाईक यांसीं, गोसावी तुम्हीं आपलेपासीं घेऊन, फिरोन गोष्टींत दुसरें न होय असें असल्यास येणें. येथून खर्चाचे वगैरे पेशजीं बोलण्यांत आलें आहे त्याप्रमाणें तोड निघेल म्हणोन लिहिलें. तथापि ती गोष्ट न घडली. कूच करून करोलीस गेले. पुढें फौज मेडत्यास होती तीही बोलावून घेतली. राजेरजवाडे यांसही समजोन चुकलें. तेव्हां आम्हांस दरकूच मारवाडांत येणें प्राप्त जालें. सांबरेनजीक येणें जाहालें, तेव्हां अलीबहादर यांचे लष्करांतून वकिलाचें पत्र यशवंतराव नाईक निंबाळकर येतात म्हणोन आलें. त्यास दुई दिसली, याचा समेट लौकर व्हावा, आमचें येणें मारवाडपर्यंत न होतां, दबावानें रांगडचांकडील मामलतीचें बोलणें बोलतात, तें खातरखा उरकोन घ्यावें याकरितां नाइकास येणें म्हणोन लिहिलें. ती गोष्ट न घडली. हल्लीं दुई दिसावयाची ती दिसोन चुकली. आम्हांस मारवाडांत येणें पडलें तेव्हां नाइकाचें येण्याचें कारण नाहीं, कागदपत्रीं लिहिणें तें लिहून कळावें, म्हणून वकिलांस पाठविलें. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. तेथें नाइकास बोलाविलें असतां न येणें असें लिहिलें म्हणोन लिहितील. तेव्हां तुम्हांस माहितगारी असावी याकरितां लिहिलें आहे. प्रथम येण्याचाही पैगाम त्यांजकडूनच होता. इकडून नाहीं. बोलावल्याप्रमाणें न आले व बोलण्याचेंही शाश्वत पडत नाहीं. श्रीमंतांचे पायाचे शपथीचें प्रमाण न राहिलें. तेव्हां यशवंतराव यांचे बोलल्याप्रमाणें अमलांत आणतील हें कळतच आहे. याप्रमाणें तेथें जाबसाल निघाल्यास बोलणें. रा। छ २९ रबिलावल सु॥ इहिदे तिसैन मया व अल्लफ. हे विनंती.

¶*Mahadji informs his Agent at Poona how Ali Bahadur declined to meet him in spite of repeated requests to do so.*

No. 585 16th December 1790.

श्री

राजश्री रामजी पाटील जाधव गोसावी यांसीं:—

छ रामराम* विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. होळकर व अलीबहादर प्रकर्णीं मजकूर दोन तीन पत्रीं अलीकडील लिहिला आहे

---

* पत्र महादजीचें आपल्या पुण्याच्या वकिलांस.

त्यावरून कळलें असेल. शहावर पुढें फौज असतां उभयतांनीं आपली फौज बलावून घेतली. कासीराव होळकर यांसीं बिजेसिंगानें फोडातोड फौजेची करावी याकरितां चार लाख रुपये अंतस्थ देणें केले. कासीराव व बापू होळकर यांणीं मान्य करून कूच केलें. मार्गीं येतां कृष्णगडवाले इकडील लक्षांत पूर्वीपासून; व सांप्रत तरी अजमेरीस मोर्चे लाविले त्यांत तेच आपले जमीयतीनसीं इकडील फौजेस सामील आहेत. असें असतां कासीराव यांणीं त्यांचे गांव मारून जाळून ताख्ततराज* केले आणि खंडणीही मागीत होते. आपला मुक्काम सांबरेनजीक आला, तेव्हां त्याचे जाग्यांतून निघोन टोक तोडचाकडे गेले. होळकर अलीबहादर हिंडोणे-नजीक आहेत. तेथून रावराजा प्रतापसिंग यांचा काल जाहला, त्यांचे जाग्यांत जाऊन उपद्रव द्यावा व खंडणी घ्यावी म्हणोन विचार केला आहे. त्यास जयपूर-वाले व जोधपूरवाले यांची लढाई मारल्यावर, फितूर करून पलटणें फोडून नेलीं, आपलें कूच मागें जाहलें, ते समयीं झाडून हिंदुस्थानी राजेरजवाडे एक एक गांव फिरला असतां रावराजा यापेंं आलवर किल्ला स्वाधीन करून दाणादुणा वगैरे आपले संग्रहापैकीं लष्करांत पोंहोचतें केलें. रसद आणविली. जीव जाग्यानिसीं हजर राहिला. सांप्रत त्याचा चिरंजीव बखतावरसिंग यासीं, रेवाडीस इस्माइलबेगाचा बाप मुनीबेग गोकुळगडांत आहे, त्यानें महालीं दंगा केला म्हणून त्याचे पारपत्यास नजफकुलीखान सुद्धां रवाना केला आहे. नजफकुली व रावराजा दोघेही जायदादवाले, जायदादीचे महाल त्यांजकडे आहेत, तेव्हां त्यांजपासून चाकरीही घेतली पाहिजे. मुनीबेग याचे हातीं गोकुलगड किल्ला पडला आहे, त्या आसऱ्यानें महालीं दंगा करितो. त्याचे पारपत्याचा जिमा उभय-तांनीं केला आहे. मुनीबेगाचें पारपत्य करणें सरकार काम, असें असतां राव-राजाचा पुत्र बखतावरसिंग यासीं उपद्रव देणार. यास्तव येथून बखतावरसिंग सरकार कामावरी आहे, त्यास उपसर्ग कोणेविसीं न लागावा, वरकड जायदाद-वाले तसा हाही, व रावराजापासून त्याचें लक्ष सरकार कामावर, तेव्हां ज्यानें सरकारचें म्हणविलें आणि आमचे उपयोगी पडला, तो सरकारकामावरच. त्यास उपद्रव न द्यावा म्हणोन लिहिलें आहे. परंतु येथील लिहिलें उभयतांचे विचारास आलें तरी उत्तमच जहालें. विचारास न येतां आग्रह करूं लागल्यास, त्याची उपेक्षा जाहल्यास दुसरा कोणीं उपयोगी पडावयासी विचार करील.

* उध्वस्त.

तिसरें, सांप्रत उभयतांनीं मेडत्यांतील फौजेंतून आपल्या फौजा बोलावून घेतल्या. यामुळें जोधपूरवाले मामल्याचें बोलणें गळां पडून बोलत असतां फिरोन गोष्ट सांगितली. तेव्हां दर कूच फौजसुद्धां आम्हांसच येणें पडलें. येतां मार्गीं जयपुरापासून नवा कोसांवरून आलों. तेव्हां जयपूरवाले यांणीं मातबर मामल्याचें बोलणें बोलावयासी पाठविलें. बोलावयासी आले तेव्हां त्यांसीं बोललें पाहिजे. श्रीमंतांचा प्रताप, त्या योगें दाबावर येऊन बोलतात. त्यांसीं न बोलावें तरी ठीक दिसत नाहीं. बोलावें तरी मामला जाहल्यावरी दुसऱ्यानें फिरोन त्यांसी कोणी उपद्रव न द्यावा. ज्यांनीं मामला घेतला त्यांनीं वांटणी हिस्सेरसीद घ्यावी. समयास नसतील त्यांनींही हिस्सेरसीद घ्यावी असी चाल पूर्वीची आहे. परंतु सांप्रत त्या चालीचा अभाव. तेव्हां उभयतां येऊन जैपूरवाल्यास मामला जाहला असतां फिरोन उपद्रव करूं लागल्यास ठीक पडगार नाहीं. अशा अडचणीकरून अंदेशे पडतात. जैपूरचे मातबर येऊन मामलतीचें बोलणें बोलत आहेत. कळावें म्हणोन लिहिलें असे. जैपूरचा जाबसाल उरकला म्हणजे एक मारवाडचा राहिला; तोही उरकेल. मा वाडग्यांनीं लांबणीवर टाकिल्यास, जैपूरचा गुंता उरकल्यानें रसद येण्यास पेंच पडावयाचा नाहीं. मागाहून अंतरवेदींतून जैपूरचे मार्गें रसद येऊन पोंहोचेल. याकरितां आधीं जैपूरचा गुंता उरकल्यानें ठीक पडेल. बोलणें होत आहे. ठरावांत येईल त्याप्रमाणें लिहिलें जाईल. रा॥ छ ९ रबिलाखर सु॥ इहिदे तिसैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Mahadji writes to his Poona Vakil how Holkar and Ali Bahadur continued their evil machinations of exciting his enemies after separating from his army.*

No. 586 31st December 1790.

पैवस्ती छ १५ जमादिलावल इहिदे तिस्सैन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ माहे रबिलाखरपर्यंत मुक्काम सांबर नजीक अजमेर वीस कोस येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:—स्वामींकडून

बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तेणेंकरून चित्त सापेक्षित असे. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांची खासा स्वारी दरकूच मारवाडांत मुक्काम मजकूर पावेतों दाखल जाली. पुढें अजमेरपर्यंत जावें हा इरादा आहे. हल्लीं मारवाडचांकडील वकील बुर्दासिंग म्हणून जोधपुराहून आला आहे. कल सरदारांचे भेटीस आला होता. सलुखाचें बोलणें लागलें आहे. अद्याप ठरण्यांत आलें नाहीं. परंतु सल्ला लौकरच व्हावा ऐसा रंग आहे. पुढें काय ठरेल तें पाहावें. जैपूरवाल्यांकडील वकील राजश्री लक्ष्मण संभाजी आले आहेत. त्यास त्यांचेंही बोलणें सदरहूअन्वयेंच आहे. परंतु अद्याप कोणताही जाबसाल पक्केपणांत आला नाहीं. आलियानंतर मारवाडचें व जैपूरचें वर्तमान सविस्तर सेवेसीं लिहीन.

राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व राजश्री अलीबहादरबाबा या उभयतांच्या भेटी होऊन जैपूरवाल्यांकडील गढचा किरकोळी घ्याव्या हा विचार करून गढचांस मोर्चे लाविले आहेत. होळकरांकडील व अलीबहादरांकडील एकबार नित्य येत आहे. त्यांस बहुतकरून खर्चाचीच ओढ. तोच किल्ला लिहिल्यांत येत असतो. प्रस्तुत उभयतां सरदार एके विचारें करून वर्तत आहेत. राजश्री अलीबहादर यांजकडील संदर्भ अलीकडे लिहिण्यांत येतो कीं, गोसावी करारापमाणें आपले जिमेस करून घ्यावा, आणि आमचे पोटापाण्याचा बंदोबस्त करून द्यावा, म्हणजे आम्हीं उभयतांही आपलेपासीं येतों. याप्रमाणें सुभेदारांचेंही बोलणें आहे. परंतु गोवर्धनाहून कूच करते समयीं अलीबहादर यांची बंदत बसेना. कूच करून चालले. त्याविसींचा मजकूर सविस्तरें पेशजीं सेवेसीं लिहिलाच आहे. जेव्हां अलीबहादर यांजकडील जाबसाल तुटक होऊन कूच केलें, तेव्हां सुभेदार यांनीं राजश्री आबा चिटणीस यांजला आपले घरीं बोलाविलें. मशारनिल्हेची रवानगी येथूनही केली. तेथें गेलियानंतर सुभेदारांनीं चिटणिसांपासीं करार केला कीं, आमची वांटणी सारंगपूरची व मेवाडचे महालची आम्हांस द्यावी, म्हणजे आम्हीं कूच करून येतों. येविसींचें तुमचें व तुमचे यजमानांचें बोलणें पक्कें करून, फिरोन तुम्हीं आम्हांपासीं यावें, आणि आमची खातरजमा करावी, आणि आमचे येथून कूच करवावें. याप्रमाणें सुभेदारांचें व लेखकाचें पक्कें होऊन फिरोन गोवर्धनास आले. येथें येऊन तेथील बोलण्याचे भावगर्भ सर्व मुख्यांस सांगितले. नंतर त्याचें उत्तर येथून निखालस जाहालें कीं

आम्हीं मुलुखाची वांटणी दोहींकडील देतों. त्यांनीं आपलेकडील फौज व दोन मातबर गृहस्थ दोहींकडील महालांत पाठवावयाचे असतील ते पाठवावे, म्हणजे × × आम्हींही आपलेकडील फौज व तोफा व सरदार देऊन मुलखाचा बंदोबस्त करवूं. याप्रमाणें कबूल केलें. परंतु सर्व गोष्टी, एक तुमची चाल यथास्थित असली तरी इकडून दुसरा अर्थ नाहीं. याप्रमाणें खातरजमा लेखकाची करून पुनः सुभेदारांकडेस पाठविलें. नंतर येथील आज्ञेप्रमाणें तेथें जाऊन सुभेदारांची खातरजमा केली, आणि कबूल केलें कीं, याउपर आम्हीं दिन शुद्ध उत्तम पाहून निघतों आणि तुम्हांपासीं येऊन दाखल होतों. तुम्हीं गोवर्धनाहून कूच करून दोन, चार मजला मुक्काम करीत चलावें, तों आम्हीं येऊन पोंहचतों. यांत अंतर पडावयाचें नाहीं. याप्रमाणें सुभेदारांनीं तिन्हाइत गृहस्थाचे विद्यमानें चिटणीसांसीं करार करून, नंतर इकडेस रवाना केलें. येथें गोवर्धनचे मुक्कामीं येऊन सुभेदारांकडील सविस्तर वृत्त पाटिलबावांजवळ सांगितलें. नंतर गोवर्धनाहून कूच करून रेवाडीपर्यंत आले. तोंपर्यंत सुभेदारांची इकडेस येण्याची वाट पाहिली. परंतु तेथून कूच करून इकडे येणें न जाहालें. तेव्हां दरकूच मारवाडच्या शहावर चालले. रेवाडीहून कूच जाहल्याचें वर्तमान सुभेदारांस कळतांच, मथुरेहून कूच करून अलीबहादरबाबा यांजला हिंडोणचे मुक्कामीं जाऊन सामील जाले. सारांश गोष्ट त्यांतील हेच निघाली कीं, आजपर्यंत सर्वांचें म्हणणें असें कीं, बट्टेबाजीची* चाल इकडीलच आहे ऐसें म्हणत होते आणि आम्हासही असाच भ्रम होता, परंतु सालमजकुराचे वहिवाटीवरून उभयतां सरदारांचीच दगाबाजीची चाल बहुतच आढळली; त्याचा तपसील कोठवर ल्याहावा?

उभयतांच्या सरदारीमध्यें स्वतां समज नाहीं आणि पदरीं कोणी कारभारीही नाहीं. तशांतही कोणी गोरगरीब आहेत, परंतु त्यांचें कोणी ऐकत नाहीं. अलीबहादरांबरोबर राजश्री सदाशिवपंत आसवलकर यांजला स्वामींनीं दिवाणगिरी सांगोन पाठविले आहेत. त्यास मशारनिल्हेची चाल सुधोट† आणि यजमान छलछिद्री पडले, तेव्हां त्यांचें शहाणपण यांचे पसंतीस कसें येतें? तेव्हां सहजच तें सांगितल्या कामाचे ठरले. राहतांपैकीं उभयतां कारभारी फडणीस दिवाण राहिले. त्यांजपैकीं फडणीस गढीवर पाठविले. तेथें त्यांचा‡ काल जाहला.

---

* लबाडी. † सरळ. ‡ भिकाजी पाळंदे.

सर्व प्रकारें जिवानसीं गेले. आतां त्या सरदारी × × × ऐश्वर्य खास दिवाणाचेंच आहे.

सुभेदारांकडील प्रकार म्हणावा तरी, राजश्री नारोपंत यांचा दाव व चाल यथास्थित बरी अथवा वाईट होती; परंतु सुभेदारांचा आब रक्षून सर्वांची मर्जी रक्षण केली होती. गुदस्तांपासून येथें आलिया तागाईत पाटिलबावांसीं स्नेह संपादून, थोडी बहुत पांच लक्षांची वांटणीही घेतली व पांचा लक्षांचें इनामही करून घेतलें, आणि फिरोन भयप्रीतही राखिली होती, व दरबारांतही सर्वांसीं स्नेह लहान मोठ्यांसीं ठेविला होता. ऐसें असतां, सुभेदारांनीं मशारनिल्हेची अब्रू बेतन्हा घेतली. ब्राम्हणाचें पारिपत्य श्रीमंतांचे राज्यांत ऐसें कोणीच केलें नाहीं. श्रीमंतांचे घरीं मुत्सद्द्यावर अथवा सरदारावर इतराजी जाली तर दरबार मात्र मना होतो. घरीं बसलेनंतर त्यास शिक्षा जाहालियानंतर पांच रुपये त्याजपासून जागा असल्यास घ्यावे, नाहीं तर सरकार कामाचाच नसला तर दूर करावा. ही गोष्ट निदान जेथें तोडच नाहीं तेथें ह्या गोष्टी घडतात. बहुतच हरामखोर असला तरी किल्ला कोटही प्राप्त होतो. परंतु मातबर माणसास अथवा छोटेखान्यास ब्राम्हणास मारहाण करणें अथवा बंदुखेचे जामगीनें आंग भाजावें, हें कोठें ऐकण्यांत नव्हतें. तें नारोपंतांस येथें प्राप्त जाहालें.* मशारनिल्हेची जप्ती केली. घोडीं, उंटें, दौलत सर्व सरकारांत लाविलीं. त्यांस कैद केलें. पुत्र व स्त्री या उभयतांस निरनिराळीं आणि नारोपंतांस स्वतंत्र याप्रमाणें ठेवून, मागतीं जे समयीं नारोपंतांचें पारिपत्य भिकाजी होळकर यांजकडून करविलें, तेव्हां त्यांनीं मशारनिल्हेचे स्त्रीस व पुत्रास उष्णामध्यें उभें करून, त्यांचे रूबरू मशारनिल्हेस तव्यावर उभें केलें आणि कानास चाप लाविले. खांद्यावर बंदुका दिल्या. ऐसी बहुत प्रकारें विटंबना केली. प्रस्तुत कारभार राजश्री पाराशरपंत वाघ करीत असतात. जे समयीं बहुतच निग्रह मशारनिल्हेवर केला, तेव्हां गोवर्धनचे मुक्कामींहून पाटिलबावांनीं राजश्री राणेखानभाई व राजश्री सदाशिव मल्हार यांस पाठविलें. त्यांनीं जाऊन सुभेदारांस बहुत निषेध केला. तेव्हां बोलले कीं, याउपर त्यांस मारहाण करणार नाहीं. इतकी मात्र गोष्ट कबूल केली. परंतु खाण्यापिण्याची जैसी आटक होती, त्याप्रमाणेंच आठ पंधा दिवस होती.

* तुकोजी होळकरानें ऑक्टोबर १७९० त आपला दिवाण नारो गणेश शौचे यास बडतर्फ करून त्याचे मनस्वी हाल केले.

एक मार मात्र बंद जाहला होता. नंतर मशारनिल्हेपासीं पन्नास लक्ष रुपये मागों लागले. निदान पंचवीसपर्यंत आले. तेव्हां मशारनिल्हेनीं उत्तर साफच केलें कीं, माझी अब्रू राहती तर पांच रुपये तुम्हांस, माझे पदरीं होते किंवा नव्हते, परंतु अब्रूकरितां देणें प्राप्त होतें. आतां कांहींच मिळत नाहीं. प्राण घ्या वा इतकी मात्र गोष्ट आहे. तेव्हां चोहोंकडून उपराळा नाहीं, हक्कनाहक्क प्राण जातो आणि विपत्य होतात, ऐसें जाणून पंध्रा लक्षांचा ठराव जाहाला. शिवाय दरबार खर्च काय पडला तो न कळे. याजमुळें पाटिलबावांस बहुतच वाईट वाटलें. याप्रमाणें उभयतां सरदारांची वहिवाट आहे. तेथें कोणाचेंही शहाणपण चालावयाचें नाहीं. या गोष्टी ईश्वरइच्छेंकरून ज्या घडावयाच्या त्या घडल्या, व पुढेंही घडतील. परंतु उभयतां सरदारांस कुमकेस पाठविलें असतां, ती गोष्ट सोडून आपलें स्वरूप वाढवावें या चाली धरिल्या. त्या चालीचें स्वरूप लोकांचे निदर्शनास ऐसें आलें. यांत अन्य अर्थ असतील ते स्वामींचे ध्यानांतच असतील. तेथें विचारेंकरून ल्याहावेसें नाहीं. इतका तपसील ल्याहावयाचें कारण नव्हतें, परंतु दोन तीन वेळ पाटिलबावांनीं सांगितलें, त्याजवरून लिहिणें लागलें; व सेवकाचेही उभयतां सरदारांची चाल दृष्टीस पडली, यास्तव विनंती लिहिली आहे.

हल्लीं दुसरी चाल धरली आहे. जैपूरवाल्याचे मुलखांत थोडा बहुत कजिया लाविला आहे; आणि रावराजा माचाडीवाला होता तो मृत्यु पावला, त्याचे लेकास येथून टिका व हत्ती वस्त्रें वगैरे जव्हाहीर पाठविलें. रावराजांकडील वकील नेहमीं येथें सरदारांजवळ राहातच आहे. त्यांनीं विनंती केली कीं, सरकारची या संस्थानावर कृपा पहिल्यापासूनच आहे. त्याप्रमाणें टिका वस्त्रें गेलीं म्हणजे सर्व भावबंदांस व जैपूरवाल्यांस समजेल कीं, राजश्री पाटिलबावांनीं रावराजा वर्तमान असतां त्याचा पक्ष करीतच होते; त्याचे पाठीमागें त्यांचे लेकाचाही त्याप्रमाणेंच अगत्य वाद धरिला. येणेंकरून त्या संस्थानाची अब्रू आहे. तेव्हां त्यांची खात्री करून, वस्त्रें बहुमान देऊन, स कारचा कारकून पाठविला आहे. आणि कारकुनाबरोबर हेंही सांगून पाठविलें आहे कीं, तुम्हांकडील मुलूख किल्ले तुम्हांस बहाल आहेत. तुम्हीं आपले घरचा बंदोबस्त करून, रेवाडीस जाऊन, गोकुळगडास इस्माइल्याचा बाप आहे, त्याचें पारिपत्य नजफकुली व तुम्हीं मिळोन करावें. याप्रमाणें त्यास चाकरीही सांगून पाठविली. ऐसें असतां उभयतां सरदार एक होऊन रावराजा यांचेच मुलकांत कूच करून जाणार. त्याजकडे हिंमतबहादर

गोसावी याचे विद्यमानें लिहून पाठविलें आहे कीं, तुम्हीं फौजसुद्धां आम्हांपासीं येऊन रुजू व्हावें, आणि जैपूरवाल्याचा व आमचा सलूख करून द्यावा, आणि तुम्हीं पाटिलबावांकडेस जाऊं नये व त्यांचा हुकूम मानूं नये. आम्हीं सरकारचे मुखत्यार आहों. ऐसें असोन तुम्हीं तिकडे गेलियानंतर तुमचे मुलखाची खराबी करूं. याप्रमाणें रावराजांकडील वर्तमान आहे. मारवाडांत कृष्णगडवाले यांचें संस्थान रूपनगर वगैरे आहे. तेंही राज्य पहिल्याप सून शिंद्यांचेच लगामीं आहे. त्यास तें राज्य आपले ममतेचें यास्तव बिजेसिंगानें जे समयीं राजश्री पाटिलबावा चमेलपार गेले, तेव्हां रूपनगर वगैरे येथें फौजा पाठवून रूपनगर घेतलें. चार महिने तमाम जागा रूपनगरसुद्धां मारवाड्यांबरोबर लढल्या. निदान त्याची कुमक न होय, तेव्हां मारवाड्यांसीं सलूख करून, कृष्णगड व सुरवाड हे दो ही जागे मजबूत होते, ते कृष्णगडवाल्यानें आपलेकडेस ठेऊन वरकड मुलखाच्या सोडचिटया मारवाड्यांस दिल्या. हल्लीं आपली फौज मारवाड्यांचे पारिपत्यास जिवाजी बल्लाळ वगैरे गेले, तेव्हां मारवाड्यांकडील तमाम ठाणीं उठवून आपलीं ठाणीं बसविलीं. पुढें मारवाड्यांसीं लढाईही मारिली. नंतर सुभेदारांचें व पाटिलबावांचें चित्त शुद्ध न होतां इकडेस कूच जाहालें. तेव्हां सुभेदारांनीं व अलीबहादरबाबा यांणीं मसलतीवरून फौजा आपआपल्या माघारा आणविल्या. त्या फौजा माघारां येते वेळेस काशीबा होळकर व बापू होळकर यांनीं कृष्णगडवाले यांचे गांव वीस पंचवीस जाळून लुटून फस्त केले, आणि पुढें सुभेदारांकडेस गेले. याप्रमाणें येथील वृत्त आहे.

सारांश, सरकारची फौज कुमकेस पाठविली, त्यांणीं सरकारचाकरी करावी आणि स्वस्थ असावें, आणि यांनीं सरकारचे फौजेस खर्चावयासीं द्यावें. ही गोष्ट न घडे तरी उठोन धन्याचे धन्याकडेस जावें, याप्रमाणें सरकारची आज्ञा होती. ऐसें असतां, या उभयतांच्या चाली अशा पडतात. तेव्हां येविसींचा विचार हुजूरूनच जो होणें तो होत असावा. यांत सरकारनक्षच आहे. ही गोष्ट घडत नाहीं त्यापक्षीं मारवाड्यांची मसलत जैसी कळेल, तैसी हे सरदार उरकोन घेतील. नंतर पुढें देखील विचार करणें प्राप्त आहे. ऐसीं भाषणें होत असतात. या उभयतांच्या चालीवरून येथील मर्जी बहुतच खट्टी* आहे. आणि आम्हांवरी नित्य उठोन तुकें† शद्धाचे चालवीत

---

* रुष्ट. † बोथट बाण, वाग्बाण.

असतात. त्यास श्रीमंतांचे प्रतापेंकरून छोट्या मोठ्यांनीं येथें नक्ष राखून असूनें होते. त्यास ह्या चालीस व त्या चालीस फारच अंतर पडलें. असो. सेवकासही इकडे येऊन आज पांच वर्षें होत आलीं. या उपर येथें राहणें हेंही ठीक नाहीं. यास्तव येथील सरदारांचा निरोप घेऊन देशीं येण्याचा विचार करितों. येविसीं स्वामींची आज्ञा पेशजीं एक दोन पत्रें आलींच होतीं, परंतु येथील मर्जीमुळें राहिलों. हल्लीं मारवाडयांकडील मजकूरही लोकरच सुधारेल ऐसें दिसण्यांत आहे. मग पुढें काय घडतां घडेल तें पहावें. मुख्य लिहिणें हेंच कीं, देशीं येण्याचा विचार येथील मर्जीनुरूपच घडेल. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports Mahadji's arrival in Marwad, and negotiations having been opened by envoys from Jaipur and Jodhpur. He explains that the conduct and actions of Holkar and Ali Bahadur belied their words and manifested hatred for Sindia whose plans they were intent on defeating. He also adds an account of the tortures inflicted by Holkar on his Diwan.*

No. 587 6th January 1791.

पैवस्ती छ १५ जमादिलाखर इहिदे तिस्सैन.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता. १ जमादिलावलमर्यंत मुक्काम लष्कर नजीक किल्ले अजमेर बारा कोस येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष.—मारवाडयांकडील वकील बुधसिंग म्हणून आला आहे. त्याणें येथें सलुखाचें बोलणें लाविलें आहे. त्यास, तें वर्तमान वगैरे पुरवणीबंदीं तपशीलवार लिहिलें आहे, त्याजवरून श्रुत होईल. त्याअलीकडील वर्तमान तरी, मारवाडयांचे वकिलांचें व राजश्री पाटिलबावांचें सलुखाचें बोलणें होऊन ठराव जाहला आहे. येणेंप्रमाणें कलमें वगैरे:—

ऐन चुकोती पन्नास व दरबार खर्च पांच व बावांचा नजराणा पांच, एकूण साठ लक्ष रुपये ठरले. त्याची

किस्तबंदी येणेंप्रमाणें केली आहे. रु।। :—

४०००००० सालमजकुरीं घ्यावें.

७००००० माघ शु।। १

८००००० फाल्गुन ता।। जेष्ठ चार महिन्यांत दरमहा दोन लक्षां-प्रमाणें आठ लक्ष.

१५००००० वोली पंधरा लक्षास जेष्ठ पावेतों भरणा करावा.

१०००००० कापड व बैल व उंटें वगैरे मिळोन घ्यावें.

४०००००००

२०००००० पेस्तर सालापासून दरसाल पांच लक्ष घ्यावे. याप्रमाणें चार सालांत फडशा करावा वीस लक्ष.

६०००००००

येणेंप्रमाणें साठ लक्षांचा ठराव होऊन यादीबुदी जाहल्या आहेत. येथून वकील गेल्यानंतर तिकडून सदरहू ऐवजाचा भरणा कसा होईल तो पाहावा. वरकड कागदोपत्रीं मात्र वकिलांनीं लेहून दिलें आहे. मग काय घडतां घडेल तें पहावें.

शिवाय कलमें.

१ सामर निमें अंमल द्यावा. जमा साहा लक्ष पैकीं तीन लक्ष द्यावे. याप्रमाणें करार कलम.

१ महाल दोन दोहो लक्षांचे दिल्हे येणेंप्रमाणें :—

१ पो। गोधा लाख रुपयांचा.

१ दुसरा महाल लाख रुपयांचा द्यावा. व महाल अमूक ऐसा ठरला नाहीं.

२

कलम.

१ अजमेराचा किल्ला यांचा यांजकडे द्यावा. पहिला किल्ला शिंद्यांकडे होता, ते वेळेस किल्लेदाकडे फुटगांव वगैरे सरंजाम होताच. मध्यें राजानें अजमेरचा किल्ला घेतला, तेव्हां राजानें पहिला सरंजाम फटगांव वगैरे किल्लेदाचे

किल्लचाकडे राखून, दुसरे गांव आपलेकडील लाऊन देऊन, किल्लचाची मजबुती करून राहिला. हल्लीं अजमेर द्यावी ऐसें ठरलें. तेव्हां यांणीं आट घातली कीं, हल्लीं अजमरखालीं जो मुलूख आहे, त्यासुद्धां अजमेर द्यावी. तेव्हां ते लाचार होऊन, पहिला सरंजाम जो शिंद्यांचे वेळेस होता तो व हल्लीं राजांनीं आपले तर्फेचा गांव वगैरे दिल्हे होते त्यासुद्धां अजमेर हवालीं करावी, ऐसा करार केला. कलम.

सदरहूप्रमाणें सलुखाचें बोलणें होऊन, यादीबुदी देखील जाल्या. परंतु अद्याप अजमेरीचा किल्ला हस्तगत जाहला नाहीं व रोकडीपैकीं एक पैसा वसुलांत आला नाहीं. मारवाडचे वकिलांस आजच निरोप दिल्हा. उदईक ते वकील येथून निघोन जातील. सारांश लिहिणें कीं, श्रीमंतांचा प्रताप थोर. येणेंकरून मोठ्यामोठ्या मसलती सिद्धीस जाऊन राजश्री पाटिलबावांस यशें येतात. जैपुरवाल्यांकडीलही वकील आला आहे. त्याचेंही सलूख प्रकर्णीं बोलणें लागलें आहे. अद्याप ठरण्यांत आलें नाहीं. परंतु तोही जाबसाल लौकरच निर्गमांत येईल. वरकड वर्तमान कच्चें पक्कें जें होईल तें मागाहून सेवेसीं लिहीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the terms granted to the Raja of Jodhpur by Sindia.*

No. 588 31st January 1791.

पैवस्ती छ १५ जमादिलाखर इहिदे तिसैन.

श्री

छ सेवेसीं आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे :— स्वामींनीं छ २२ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, राजश्री अलीबहादूर प्रकर्णीं अलीकडे जो मजकूर जाहला असेल तो व पुढें काय घडणार तो सविस्तर लिहून पाठविणें म्हणून आज्ञा. त्यास स्वामींचीं पत्रें आलीं नव्हतीं, त्यापूर्वीच उभयतांचें वाकडें पडोन राजश्री अलीबहादूर श्रीमथुरेहून कूच करून गेले. त्या तागाईत आजपर्यंत आमची सेवकपणाची रीत होती तितकी खर्च केली. कां ? राजश्री अलीबहादूरबाबा यांची समजूत व्हावी. एतद्विषयीं राजश्री पाटिलबावांजवळ बहुत वेळ बोलण्यांत आणिलें. तथापि ती गोष्ट विचारास न

येई. तेव्हां उगेंच राहिलों. नंतर स्वामींचें पत्र आलें. त्याजवरून पुनः मागतीं अलीबहाद्दरबाबा यांचे येण्याविसीं उद्योग केला. परंतु येथील खंबीर एकच ठरला कीं, आम्हीं सरकारचे सरदार व तेही सरकारचे सरदार, त्याअर्थीं श्रीमंतांनीं माझे लिहिण्यावरून आमचे कुमकेस बहाद्दरांस व होळकरांस पाठविलें. त्यास उभयतां सरदार सरकारआज्ञेप्रमाणें येथें आले. नंतर उभयतांचा सन्मान यथास्थित राहिला. ऐसें असतां त्यांनीं चित्तास येतील तैशा वर्तणुका केल्या. अस्तु ! त्यांचें आमचें वाकडेंच, त्यापक्षीं त्यांनीं आम्हांस प्रथमच सांगावयाचें होतें कीं, तुमचें आमचें बनत नाहीं. तुम्हांस कळेल त्याप्रमाणें तुम्ही करावें. मग आम्हांस कळता तैसा बंदोबस्त करून येतों. ती गोष्ट न करतां, पुढें फौज सरकारचाकरीवर होती ती, आम्हीं गोवर्धनाहून कूच केलें ते समयीं, उभयतांनीं सडया फौजेंतून आपली फौज बोलावून घेतली. त्यास हें काम आमचे घरचें नव्हतें. सरकारचाकरी होती. ही चाकरी करून मग फौजा माघाऱ्या आणावयाच्या होत्या. ती गोष्ट न करितां उभयतांनीं आपली फौज माघारी आणिली. तेव्हां सारी मसलत दगा खात होती. परंतु आमची निष्ठा श्रीमंतांचे पायांसीं, तेणेंकरून मारवाडी व जैपूरवाले दोन्ही रुजू होऊन सलूख केला, आणि दोहीं राजांची मसलत आटोपून घेतली. आपलीं कामेंही अजमेरचा किल्ला मुलूखसुद्धां हस्तगत करून घ्यावयाचा ठराव केला आहे, आणि जैपूरवाल्यांचाही जावसाल करण्यांत लौकरच येईल. परंतु इतक्याही गोष्टी एक श्रीमंतांचे प्रतापेंकरून यथास्थित होतील. परंतु या उभयतांनीं आमचा नाश करून नुकसानी करावी हाच इरादा धरिला होता, आणि अद्यापही तीच चाल आहे, त्यापक्षीं आमचें त्यांचें कदापि बनावयाचें नाहीं. आम्हांस आमचे अब्रूची दरकार आहे. त्याअर्थीं जी धन्यांनीं चाकरी सांगितली, ती कबल करून बजाऊन दाखविली आहे, व पुढेंही अर्थप्राणें करून स्वामिसेवेंत अंतर पडावयाचें नाहीं. परंतु या उभयतांनीं इतका द्वेश आमचा करून हिंदुस्थानामध्यें आमची अब्रू घेतली होती. परंतु एक स्वामिसेवा एकनिष्ठेनें करितों याजमुळें सर्व यश येतें. तेणेंकरून सर्व गोष्टी पार पडतात. याजकरितां आतां यांचा आमचा सहवास उपयोगाचा नाहीं. एविसीं आम्हींही श्रीमंतांस व राजश्री नानांस पत्रें पेशजी लिहिलीं आहेत व हल्लींही लिहितों, तुम्हींही या पत्राप्रमाणें त्याहावें, म्हणून पाटिलबावांनीं सांगितलें. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. वरकड यांतील आणखी बारीक मोठया गोष्टी बहुत आहेत, त्या पत्रीं लिहितां येत नाहींत. त्यांची विनंती समक्ष आलियानंतर

करीन. सारांश गोष्ट हीच कीं, या उभयतांची पुढें स्वच्छता होऊन राजश्री पाटिल-बावांचें बनावें ऐसा अर्थ राहिला नाहीं. वरकड आम्हीं सेवक लोकांनीं जी मदत करावयाची होती तितकी केली, परंतु ईश्वरें या कारभारांत यश न दिलें. पुढें ईश्वरइच्छेंकरून काय घडेल तें पहावें. याउपर सरकारची फौज या प्रांतीं राहून सरकार उपयोग नाहीं, ऐसें इकडील चालीवरून दिसतें. मग सरकारचे विचारास येईल त्याप्रमाणें घडून येईल. सारांश, उभयतां सरदारांचें चित्तशुद्धता नाहीं. यास्तव सेवेसीं लिहिलें आहे. यानंतर खासगत स्वामींचे दरकसंबंधें जाबसाल दोन वर्षें करीत आहें. परंतु अद्याप यथास्थित बंदोबस्त होऊन आला नाहीं. यास्तव हल्लीं निकड दरकसंबंधें जाबसालाची बहुत केली आहे. त्यास काय घडेल तें पहावें. तूर्त बक्षीगिरीच्या जाबसालावर नेट फार पडला आहे. त्यांचें म्हणणें व बोलणें जाहिराण्यांत सरळ दिसतें. परंतु आंतून बक्षीगिरीचें काम आमचे हातून घ्यावें न घ्यावें याचा विचार पडला आहे. ही गोष्ट त्यांच्या चालीवरून दृष्टीस पडते. आणि सेवकानें तरी निखालस जाबसाल सांगितला कीं, श्रीमंतांचे घरीं बक्षीगिरी निराळी नाहीं, त्यापक्षीं जी फौज सरकारनिसबतीची आहे, तितक्याचीच वहिवाट आमचे हातून घडावी. हें बोलणें जाहलें. ही गोष्ट अमलांत येत नाहीं, त्यापक्षीं आमचे हातून आपण कामकाजाची वहिवाट घेतां ती काय? याजवरून त्यांनीं उत्तर केलें कीं, याचा विचार करून सांगूं. त्यास हा जाबसाल आपल्या दरबारच्या चालीप्रमाणें घडला तर उत्तमच जाहालें. जर या गोष्टीस बळ लागलें तरी पुढें कसें करावें? वरकड कित्येक जाबसाल आणखी कलमांचे आहेत ते जसे उरकण्यांत येतील तसे उरकोन घेतों. सारांश गोष्ट हीच कीं, पहिल्या काळीं सरदार धन्याचे आज्ञाशक्तींत चालत होते, तेव्हां सर्व गोष्टी सरकारमर्जीप्रमाणें घडत होत्या. परंतु त्याकाळीं दिवाणगिरीचा कारभार सरकारचा होता. तो अर्थ आतां नाहीं. तेव्हां सरकारनिसबतीचें बोलणें अथवा कैदकानूचा जाबसाल होणें, तो फक्त आपण करावा. उगाच वकिलाचा सिलसिला होता, तोही अर्थ आतां राहिला नाहीं. आजपर्यंत श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून स्वामींच्या सेवेंत नक्षच राखून येथें आहे. परंतु सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं; आणि या दरबारीं जो कोणी आग्रसर कारभारी मुख्यत्वें होतो, त्यासीं प्रथम वाद पडतो. तेव्हां त्या कारभा[illegible]याची मर्जी प्रसन्न यजमान सुद्धां राहत नाहीं. श्रीमथुरावृंदावन, नंदगांव बरसाना येथील पातशाही सनदा श्रीमंतांचे नांवें करून आणिल्या आहेत, त्या श्रीमंतांकडेस रवाना कराव्यात म्हणून

दोन चार वेळां विनंती केली; परंतु अद्याप सनदा येथेंच आहेत; आणि त्या क्षेत्रापैकीं रोजरोजीना अगर गांव खेडें आतां करून येथून देणें हें ठीक नाहीं म्हणून बोलिलों, परंतु ती गोष्ट यांजला चांगली वाटत नाहीं. अशा अनेक गोष्टी घडतात. तेथें न बोलावें तरी सरकार नुकसानी व सरकार नक्ष राहत नाहीं. यास्तव जेथपर्यंत आपले यथाबुद्धीनें सेवा घडेल ती करीत आहे. नंतर ईश्वरीच्छा ! सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Appaji Ram informs Nana that Mahadji turned down his fresh proposals of a compromise with Ali Bahadur and Holkar, and adds that there was now littl possibility of conciliation being ever effected between the three Sardars.*

No. 589 2nd February 1791.

पैवस्ती छ १५ जमादिलावल इहिदे तिसैन.

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २८ जमादिलावलपर्यंत मुक्काम लष्कर नजीक शाहापुरा प्रांत किल्ले आजमेर वीस कोस येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नव्हता, त्यास छ २२ रावलचें पत्र पाठविलें तें पाहोन बहुत समाधान जाहालें. तरी याप्रमाणें निरंतर पत्रीं सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतरी स्वामींनीं पत्र पाठविलें, तेथें आज्ञा कीं, राजश्री अलीबहादर यांस विसा लक्षांची जाहागीर द्यावयाचा मध्यें करार केला होता. अगोदर पंचवीस लक्षांचें बोलणें होतें, त्याजवर विसाचें जाहालें. नंतर साडेबारा बोलूं लागले; पैका चढला आहे त्याची सोई न होय. तेव्हां त्यांणीं तरी कसें करावें ? गोसावी हवालीं करीत नाहींत हें मात्र दिसतें. परंतु आंतील अर्थ कराराचा पाहिला असतां अलीबहादरांकडे दोष लागेल किंवा कसें हें तुम्हींच मनन करून पाहावें. अलीकडे तों दग्यापर्यंत गोष्टी, तेव्हां बाकी काय राहिली ? इतकें जालें असतां, आतां स्वच्छता होऊन अलीबहादरांचें तेथें राहणें घडणें ही गोष्ट कठिण दिसते. आलीकडे अलीबहादरांनीं कूच केलें आहे. त्यास राजश्री पाटिलबावा समजूत करितात किंवा कसें, हें

तुमचे दृष्टीस पडेलच, तें लिहून पाठवावें. कूच करून अलीकडे आले असले तरी मग सारेंच राहिलें. होईल तें वर्तमान लिहून पाठवावें. स्वच्छता परस्परें व्हावी हें चांगलें. येविषीं रामजी पाटील यांचें बोलणें जाहलें. त्याजवरून बहादरांस लिहिलें आहे म्हणोन. त्यास स्वामींचे लिहिल्याअन्वयें पत्रार्थ मनन केला. ऐसियासी उभयतां सरदारांचे दोष अदोष सेवकानें काय लिहावें? तथापि आजपर्यंत जी वहिवाट दुतर्फा दिसण्यांत येत गेली, त्याप्रमाणें सेवेसीं लिहीत गेलों. त्यास त्या पत्रांपैकीं कांहीं पत्रांचीं उत्तरें स्वामींकडून आलीं, कांहीं पत्रांचीं उत्तरें येणें राहिलीं आहेत, तींही मागाहून येतील. सारांश उभयतां सरदारांचे दर पत्रीं खिसेच लिहावें तें ठीक न दिसे. यास्तव हल्लींचे पत्रीं तपसीलवार मजकूर लिहिण्यांत न आणिला. वरकड कच्चें पक्कें वर्तमान जें समजलें आहे तें पत्रीं कोठवर लिहावें! मी सेवेसीं येईन तेव्हां निवेदन करीन. होईल वर्तमान तें मागाहून लिहीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram writes he had nothing to add to his previous correspondence regarding the dissensions between Mahadji and Ali Bahadur.*

No. 590 3rd February 1791.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीः—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण छ २० रावलचें पत्र पाठविलें तें पावलें. अलीबहादर यांसीं ठेवणें तरी खर्चाची सोय करून ठेवावें, नाहीं तरी निरोप द्यावा. येविसीं पूर्वी पत्रें गेलीं. त्यावर आपण जागा लावून द्यावयाचें त्यांजकडे सांगोन पाठविलें. ती बेजमीपुरती न जाणोन निरोपाचें ठरलें. मध्यें परस्परें संशय आले त्याचा पर्याय रामजी पाटील यांसीं बोलण्यांत आला. व मशारनिल्हेही येथें आलेले त्यांणीं लिहिलेंच असेल, म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, इकडून जागा लावून द्यावयाचें व खर्चाचें बोलण्यांत आलें व निरोपास यण्याचा संशय याचें कारण हें सविस्तर पेशजी लेहून पाठविलें आहे, त्यावरून व रामजी पाटील जाधव यांचे सांगितल्यावरून सविस्तर आपणांस कळलेंच असेल. परस्परें

संशय आले त्याची स्वच्छता होऊन त्यांणीं आम्हीं एकत्र रहावें हा अर्थ राहिला नाहीं. जाहल्या गोष्टीची स्वच्छता व्हावयासी प्रमाण आण, शफत. त्यास, श्रीमंतांचे पायांची शफत होऊन त्यांत अंतर पडलें, तेव्हांपासून दुसरें प्रमाण बुद्धीस प्रत नाहीं. सविस्तर राजश्री रामजी पाटील जाधव यांसीं लिहिलें आहे. ते आपणांस सांगतील. रा।। छ २९ जावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji informs the Poona Minister that compromise with Ali Bahadur was impossible and that he was sending him back.*

No. 591 12th February 1791.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं.—

छ विनंती सेवक आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ माहे जमादिलाखरपर्यंत मुक्काम फुला नजीक शाहापुरा प्रांत किल्ले आजमेर, येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून बहुत दिवस कृपापत्र येऊन सांभाळ होत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर इकडील दरबारी वर्तमान तरी, जैपूरवाल्याचा व मारवाडवाल्याचा तह जाहला. त्यास मारवाडचाचा तह जाहल्याचें वर्तमान पेशजीं डांके ब।।लेहून सेवेसीं पाठविलेंच आहे. त्याजवरून विदित जाहालेंच असेल. हल्लीं येथें जैपूरवाल्याचे वकील पहाडसिंग खंगोरात व रोडजी खवास हे उभयतां जैपुराहून राजश्री लक्ष्मण संभाजी याजबरोबर आले. नंतर तहाचा ठराव होऊन यादी परस्परें जाहाल्या. खंडणीचा करार रुपये पंधरा लक्ष ठरले. त्याचा तपशील येणेंप्रों :—

३००००० रोख द्यावे.

१००००० जवाहीर व कापड व घोडे व हत्ती वगैरे मिळोन भरणा करून द्यावा.

११००००० पटाईत जहागिरदार यांजकडे मुलुख आहे त्यांजपैकीं वसूल करून घ्यावे, फौज आपली द्यावी. याप्रमाणें करार.

१५०००००

येणेंप्रमाणें पंधरा लक्षांचा ठराव होऊन सलूख जाहला. पेशजी जैपूरवाल्याची मसलत केली, ते समयीं पलटणवाले फितूर करून तोफा घेऊन गेले, त्याबद्दल पंधरा लक्ष रुपये द्यावे, आणि याशिवाय पातशाही खंडणी त्रेसष्ट लक्ष ते सालीं जाहाली होती, त्यांजपैकीं जो वसूल आपल्याकडे पडला असेल तो त्यांस मजुरा द्यावा; आणि बाकी जी राहिली असेल ती साल दर साल वसूल करून देत जावी. याप्रमाणें करार ठरला आहे. पुढें ईश्वरइच्छेंकरून काय घडेल तें पहावें. सारांश गोष्ट हेच कीं, आतां फितूर होळकर व राजश्री अलीबहादूर यांचा असतां, जैपूरवाल्यांनीं तह केला व मारवाडी यांनीं सलूख केला. या दोन्ही गोष्टी मोठ्याच जाहाल्या. या उभयतांचें पारपत्य सालमजकुरीं यथास्थित होऊन, दोन्ही राज्यें च खालीं व्हावीं हाच प्रसंग होता. परंतु घरचे फितुरामुळें, देखला विचार तैसा करून, प्रसंगानुरूप आपला नक्ष राखून, सरकारकाम करून घेतलें. ह्या गोष्टी सर्व श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून जाहाल्या. तूर्त राजश्री अलीबहादूर-बाबा व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार जैपुरप्रांतीं देवासें म्हणून परगणा आहे, त्याचे नजीक मुक्काम आहे. पुढें मसलत विचार म्हणावा तरी, जैपुरचे वकील त्या उभयतांकडेस सलूखाचें बोलणें बोलावयासीं गेले. आधीं त्यांजपासीं पेशजीपासून सिलसिला दोही राज्यांचा होताच. त्यामुळें राजश्री पाटिलबावांचा गिल्ला उभयतां सरदारांपासीं बहुत केला. तेव्हां उभयतांनीं जैपुरवाल्याचे वकिलास साफच सांगितलें कीं, तुम्हीं राजश्री पाटिलबावांसीं सलूख करावा आणि आमचा जाबसाल स्वतंत्र करावा. त्यांचा जाबसाल तुम्हीं जाणा. तेव्हां त्या वकिलास येथें येणें प्राप्त जाहालें. त्याजवर इकडील साधन करून, जाबसाल तहाचा ठरोन, वर लिहिल्याअन्वयें तह जाहला. हल्लीं पुन्हां उभयतां सरदार जैपुरवाल्यास म्हणतात कीं, आम्हीं येथें असतां तुम्हीं पाटिलबावांचा जाबसाल अगोदर कैसा उरकलात ? तेव्हां राजांकडील वकिलांनीं त्या उभयतां सरदारांसीं उत्तर केलें कीं, येविसींचें बोलणें आमचें पहिलेंच होतें. तेव्हां तुम्हींच जाबसाल फोडून सांगितलात. तेव्हां आम्हांस शिद्यांचें साधन करणें प्राप्तच जाहालें. आतां तुम्हीं आपला जाबसाल उरकोन घ्यावा; उगाच बैदा करून फल नाहीं. ऐसें उत्तर जाहालें. हा मजकूर खरा खोटा ईश्वर जाणें. परंतु पहाडसिंग व रोडजी खवास आले आहेत, ते हें वर्तमान बोलतात. सारांश यांतील हाच कीं, होळकरांचे सरदारींत जो कर्तेपणा होता, तो फक्त नारो गणेश याचे आंगीं होता. सरदाराचें दैव मात्र, इतकाच अर्थ. आणि राजश्री अलीबहादूर यांजकडील प्रकार म्हणावा तरी, येविसींचें वर्तमान सर्व स्वामींस विदितच असेल.

आजमेरचा किल्ला हस्तगत जाहाला म्हणजे पुन्हां इंद्रप्रस्थाकडे जावें हा विचार दिसतो. नंतर पुढें काय घडेल तें पहावें. शाहाकडील वकील काबूल खंदाराहून राजश्री पाटिलबावांकडे आला आहे. त्याणें वस्त्रें बहुमान भारी मरातबाचा आणून दिल्हा; आणि पुढें बोलणें सलुखाचें आहे कीं, लाहोरपर्यंत श्रीमंतांचा अम्मल बसवावा, आणि लाहोरापलीकडे आटकपर्यंत आमचा अम्मल असेल. याजप्रमाणें तहनामा श्रीमंतांचा व्हावा. ज्या समई श्रीमंतांचे सरकारांत फौजेचे कुमकेचें प्रयोजन पडेल, ते समई आम्हांस हुकूम करावा. म्हणजे दोन चार दस्ते पाहिजेत तेव्हां पाठऊन देत जाऊं. अथवा आम्हांस इकडे मसलतीचें कामकाज पडेल ते समई आपण आमची कुमक करावी. स्वामी म्हणतील कीं, दस्ता किती फौजेचा? त्यास दहा हजार स्वारांचा असतो. याप्रमाणें त्याची चाल आहे व बोलणेंही खचित आहे. इतकी गोष्ट व्हावयाचें कारण तरी, गुलामकादराचें पारिपत्य कोणाच्यानें जाहालें नव्हतें, आणि ती गोष्ट यांचे हातून जाहली. याजमुळें शाहानें खुसी बहुत मानिली. हल्लीं शाहाकडील खिलत वकील घेऊन आला आहे. हाही सरदार एका दस्त्याचा आहे. सारांश गोष्ट हेच कीं, या गोष्टी मागें घडल्या नवत्या. परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून याप्रसंगीं या गोष्टी घडत आहेत. वरकड अर्थ सर्व येथील स्वामींस विदितच आहेत. यास्तव हल्लीं विनंती पत्रीं तपसीलवार न लिहिणें. मागाहून होईल वर्तमान तें सेवेसीं लिहीन.

फडणिसीचे दरकसंबंधें कामाकाजाचा बंदोबस्त करून घेण्याविसीं आजकाल बहुत निकड करितों, परंतु बंदोबस्त करून देत नाहींत, आणि जाबसालही साफ सांगत नाहींत. आधीं सरकारकामाविसीं कळकळ फारच राखितात. त्यांजमध्यें ह्या कामाकाजांचा जाबसाल करून देण्याविसीं बहुतच हर्ष आहे. परंतु लाचार जाणोन वर्तणूक करावी लागते. शिष्टाचार बहुत करितात. परंतु अर्थीं तात्पर्य घडोन येत नाहीं. देशास येण्याविसीं बहुत निकड आहे, आणि गुदस्ता स्वामींचें पत्रही आणविलें होतें, परंतु त्या दिवसांत निरोप न देत. तेव्हां चातुर्मास राहाणें प्राप्त जाहालें. व स्वामींचेंही लिहिलें आलें कीं, चार जाबसाल सरकारनिसबतीचे आहेत. ते करून घ्यावे, नंतर यावें. उगेंच येऊं नये. त्यांजवरून राहाणें प्राप्त जाहालें व येथीलही मर्जी निरोप द्यावयाची नाहीं, ऐसें दिसोन आलें. तेव्हां राहाणें प्राप्त जाहालें.

गोपाळराव सोलसकर याचे निसबतीच्या एकांडचाच्या आसाम्या वीस पंचवीसपर्यंत राजश्री पाटिलबावांकडे चाकरीस होत्या. त्यांस त्यांचे रोजमरे

सरकारांत पांच चार चढले होते. यास्तव त्यांचें धरणें वाड्यांत खाशा गोपाळराव सुद्धां एक दोन दिवस बसलें होतें. परंतु तोड न पडली. शेवटीं राजश्री कृष्णोबा चिटणीस यांजकडून बोलणें लाविलें, तथापि जाबसाल तोडीवर न येई. तेव्हां ते कृष्णोबास म्हणूं लागले कीं, सरकारचा कारभार राजश्री आबा व तुम्हीं करितां, त्याअर्थीं आमचे रोजमऱ्याची तोड पाडावी. त्याजवरून मशारनिल्हेची व यांची बोलाचाली होऊन, एकांड्यांनीं कृष्णोबावर तरवार चालवून, तीन चार जखमा केल्या. तेव्हां कृष्णोबांनींही त्याजवर तरवार करून दोन तीन जखमा केल्या. याजमुळें वाड्यांत दोन चार घटिका बैदा जाहाला. तेव्हां बारगीर व भालेकरी व खिसमतगार चालून जाऊन, त्या येकांड्यास खाशा गोपाळराव सुद्धां कैद केलें. नंतर राजश्री पाटिलबावांचा हुकूम जाहाला कीं, त्यांचीं डोकीं मारावीं. त्यास येविसीं रदबदली कोणी न करितां नवजणांचीं डोकीं छ १३* माहे मिनहूस सायंकाळीं तीन घटिका दिवसास मारलीं. सारांश ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. मागाहून होईल वर्तमान सेवेसीं लिहीन. येकांड्याची व कृष्णोबाची तरवार चालली ते समयीं भाई जवळ होते, यास्तव मशारनिल्हे वांचले गेले. राणेखान जवळ न होते, तर कृष्णोबा मारले जाते. सेवेसीं कळावें म्हणून लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Appaji Ram reports the terms granted by Sindia to the Raja of Jaipur and the arrival in his camp of envoys from the Shah of Kabul.*

No. 592 7th March 1791.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. राजश्री अलीबहादूर प्रकरणीं मजकूर जाहला तो एथून वरचेवरी लिहिण्यांत आला, त्यावरून कळलाच असेल. आपलें व राजश्री रामजी पाटील जाधव यांचें बोलणें जाहलें तें मानिल्हेनीं लिहिलें त्यावरून कळलें. येसिवास अलीबहादूर यांचे चालीचा प्रकार हल्लींही रामजी पाटील जाधव यांसीं

---

* ता. १० फेब्रुवारी १७९१.

लिहिला आहे. ते आपणांस सांगतील त्यावरून कळेल. पत्रांचीं उत्तरें येत जावीं. अजमेरच्या किल्ल्यावरी ठाणें बसून बंदोबस्त जाहला. आपणांस कळावें. रा छ १ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji reports to Nana the occupation of Ajmer fort, and for the Ali Bahadur dispute, refers him to his Poona agent.*

No. 593 22nd July 1791.

पैवस्ती चंद्र १७ जिल्हेज इसने तिस्सैन.

रामजी पाटील यांणीं दिल्हा.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:--

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत चंद्र २० माहे जिल्काद मुक्काम नजीक भिलाडचा प्रांत मेवाड येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं चंद्र २२ सवालचें आज्ञापत्र पाठविलें तें सुसमयीं पावोन संतोष जाहला. राजे बिजेसिंग जोधपूरकर यांजवळ इस्माइलबेग होता, त्याजला व राजाचे कारभारी याजबरोबर फौज व तोफखाना भारी जमीयत देऊन सुरई* व पालनपूर व राधणपूर व पट्टण व आमदाबाद वगैरे गुजराथ प्रांतींचीं संस्थानें हस्तगत करावीं, खंडण्या घ्याव्या याजकरितां पाठविलें. ते पट्टणाहून चाळीस कोसांवर येऊन दाखल जाहले. सुरईवाला संस्थानिक जागा सोडून अबूच्या पहाडांत गेला, म्हणून गुजराथेहून बातमीचीं पत्रें आलीं. त्यास सरकारचा व राजे बिजेसिंग जोधपूरकर यांचा तह तुमचे विद्यमानें जाहला. ते समयीं इस्माइलबेगाचा बंदोबस्त करून घेतलाच असेल. हल्लीं इस्माइलबेग फौजसुद्धां गुजराथप्रांतीं येऊन दंगा करीत आहे व ठाणीं प्रांत घेगार हें काय? याचा बंदोबस्त तुम्हीं केलाच असेल. नसल्यास लौकर करणें म्हणोन पत्रीं आज्ञापिलें. ऐसियास, इस्माइलबेग पाटणचे लढाईंतून पांच सात स्वारांनिसीं पळोन जयपुरास गेला. उपरांतिक इकडील फौज मारवाडचांचे पारपत्याकरितां मेडत्यास मारवाडचाची फौज होती, त्याजवरी जाऊन मारवाडचाची फौज मोडली, मेडतें घेतलें. त्या वेळेस जयपुरवाल्याकडन दौलतराम

---

* सिरोही.

हलग्या व इस्माइलबेग मारवाडयावे कुमकेकरितां नागोरास गेले. याकरितां तसेंच पुढें जाऊन, राजे बिजेसिंग जोधपुरीं होते त्यांसीं गांठ घालून मारवाडयांचें पारपत्य करावें असाच विचार केला. त्या समयीं होळकरांकडील फौज व राजश्री अलीबहादर यांजकडील बळवंतराव सदाशिव हजार बाराशें स्वारांनिसीं होते, ते मेडत्याहून माघारें कूच करून आले. हें वर्तमान आम्हांस मथुरेस कळलें. त्यावरून आम्हीं मथुरेहून कूच करून निघालों. ते समयीं उभयतां सरदारही न आले. आम्हीं दरकूच सांबरानजीक आलों. मारवाडयाचें पुरतेपणें पारपत्य करावें असाच विचार होता. परंतु उभयतांचा फितूर. याकरितां आम्हीं जसा प्रसंग पाहिला तसा सलूख केला. नाहीं तरी मारवाडी व इस्माइलबेग यांचें नांव न राहावें असाच प्रसंग होता. येविसीं जालें वर्तमान तें पूर्वी सेवेसीं विनंती पत्रें लिहिल्यांत आलेंच आहे. हल्लीं आज्ञा आली त्यावरून राजे बिजेसिंग यांस निक्षून लेहून पाठविलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*To the query of the Poona Darbar why Ismail Beg was allowed to roam at large and to its request to check his depradations in Gujarat, Mahadji replies that he could not carry out his design against this arch enemy owing to the sudden defection of the contingents of Holkar and Ali Bahadur. He however assures the Darbar of his taking measures to isolate him.*

No. 594 21st July 1791.

पैवस्ती छ २१ जिल्हेज इसने तिस्सैन.

रामजी पाटोल यांणीं दिल्हा.

श्री

श्रीमंत राजश्री रंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:--

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ १९ माहे जिल्काद मुक्काम नजीक पिलाडया प्रांत मेवाडपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं छ २० सव्वालचें आज्ञापत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहला. मिर्जा मुजफरबख्त शाहाजादे जवांबख्ताचे पुत्र पुण्यास आले. त्यांस वलीआहदीचें पद मुकर करावें म्हणून पेशजी तुम्हांस

सरकारचें पत्र गेलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, उत्तम आहे; शहाजादे यांची रवानगी इकडे करावी. सरकारच्या मर्जीप्रमाणें त्यांचा बंदोबस्त करून देण्यांत येईल. त्यास शाहाजादे यांच्या बोलण्यांत आलें कीं, आपण वलीआहदीचें पद आम्हांकडे मुकर केलें हें बहुत उत्तम जालें. हल्लीं शिंदे यांजकडून दिल्लीचा कारभार शाहा निजामुद्दीन याजकडे आहे, तो त्यांणीं बेवसवसा आम्हांकडे सांगावा. आ ही सर्वाविषयीं त्यांचे लक्षांत राहून त्यांच्या अनुमतें वर्तणूक करीत जाऊं. त्यास काडीमात्र प्रतारणा करणार नाहीं. कामकाजांत कोणाचा बोभाट पडं न देतां, ज्यांत शिंदे यांचा संतोष तेंच आम्हांकडून अमलांत येईल. याप्रमाणें त्यांचें बोलणें आहे. याजकरितां तुम्हांस लिहिलें असे. तरी तुम्हांकडून उत्तर आलें म्हणजे शाहाजादे यांस तिकडे मार्गस्थ केले जातील. उत्तर लौकर पाठवणें म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास मिर्जा मुजफरबख्त शाहाजादे यांचे बापाकडे वली-आहद होती त्याप्रमाणें यांजकडे वलीआहद चालेल. पातशाहा जिवंत आहेत तोंपर्यंत काम कारभार त्यांजकडे चालेल. वकील मुतलकी सरकारची. सरकार-तर्फेनें तेथील बंदोबस्तास जो राहील तो पातशाहांपासीं राहून काम कारभार करील. यांणीं वलीआहदचे रुतब्याप्रमाणें* असावें. याअन्वयें त्यांसीं तेथें बोल-ण्यांत येऊन रवानगी व्हावयाविसीं आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji asks the Peshwa to send to him prince Mirza Muzaffar Bakht. The affairs of Delhi, he adds, would continue to be administered under the control of Maratha agents.*

No. 595 31st July 1791.

पैवस्ती छ २८ जिल्हेज इसन्ने तिस्सेन.
बराबर अजुरदार श्रावण.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण छ २६ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें.

---

* वहिवाटीप्रमाणें.

राजश्री हरिपंततात्या व राजश्री परशरामपंतभाऊ तुंगभद्रापार गेले. ते नागमंगळास एकत्र होऊन पुढें फौज सुद्धां मेलकोट श्रीरंगपट्टणापासून दहा कोस तेथें गेले, व लॉर्ड कार्नवालीस जनराल कलकत्तेकर जमावसुद्धां बेंगरुळांतून निघोन श्रीरंगपट्टणास आले. तेथें टिपूची व इंग्रजांची लढाई जहाली. त्यास इंग्रजांचे लष्करांत महर्गता बहुत होऊन बैल व माणसें मेलीं, व नवाबांची दहा बारा हजार फौज इंग्रजांबराबर होती, त्यांचीं कांहीं घोडीं, उंटें, तटें, महर्गतेमुळें मेलीं. कांहीं फौज उठोन गेली. तेव्हां इंग्रजांनीं माघारे बेंगरुळास जावयाचा विचार करून जमावसुद्धां कोसभर माघारें येऊन मुक्काम केला. इतकियांत हरिपंततात्या व परशरामपंतभाऊ पन्नास हजार फौज शिवाय गाडद तोफखान्यानसीं इंग्रजांचे उपराळ्यास जाऊन पोहोंचले. हरिपंततात्या व परशरामपंतभाऊ यांच्या व इंग्रेज यांच्या भेटी मोती तलाव येथें जहाल्या. सरकारची फौज हरवख्त येऊन पोंहचली. याजवरून जनरालास हिंमत येऊन संतोष होऊन बहुत खुसी केली. सरकारची मदत इंग्रजांस येऊन पोंहचलियावरी, इंग्रज बेंगरुळास माघारे जात होते, ते श्रीरंगपट्टणापासून बारा पंधरा कोसांवरी रहावयाचा विचार केला. पट्टणास महसरा करावा तरी कावेरीस पाणी आलें व बरसातीचे दिवस, याजकरितां आसपास दहा पांच कोसांवर छावणी करावयाचा विचार करीत आहेत. इकडून ठाणीं बसवीत गेले यामुळें चार दिवस अधिक लागले, परंतु मागून थोडीबहुत रसद जावयास सोय पडली. समयास जाऊन पोंहचले. होईल तें लिहून पाठवूं. म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, राजश्री हरिपंततात्या व राजश्री परशरामपंतभाऊ फौजसुद्धां तुंगभद्रापार उतरून, टिपूकडील ठाणीं घेऊन सरकारचा अंमल करून नागमंगळास फौजसुद्धां एकत्र जाले. तेथून मळेकोटास गेले. इंग्रज बेंगरुळांतून निघोन श्रीरंगपट्टणास आले. त्यांची व टिपूची लढाई जाली. इंग्रजांचे लष्करांत महर्गतेमुळें बैल व माणसें मेलीं याकरितां माघारें कूच करून आले असतां, हरिपंततात्या व परशरामपंतभाऊ फौज, गाडद, तोफखान्यानसीं इंग्रजांचे उपराळ्यास जाऊन पोंचले. त्यावरून इंग्रजांस हिंमत चढून, माघारे बेंगरुळास यावयाचा विचार करीत होते, तो राहिला. ही गोष्ट बहुत चांगली जहाली. सरकारची फौज व इंग्रेज व नवाबाकडील फौज एकत्र जहालीच आहे. बरसातीचे दिवस याकरितां दाणाचाऱ्याची सुबत्ता असी जागा पाहून छावणी करावयाविसीं सरकारांतून लिहिण्यांत यावें. बादबरसात सरकारांतून

लिहिलें जाईल त्याप्रमाणें करतील. रा छ २९ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji learns of the relief brought by the Maratha army under Haripant and Bhau to the English army at Seringapatam.*

No. 596 3rd August 1791.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं:—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण छ २२ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. मीर्जा मुजफरबख्त शाहाजादे जवांबख्तांचे पुत्र पुण्यास आले. त्यास वलीआहदीचें पद मुकर करावें म्हणून पेशजी आपणांस सरकारचें पत्र गेलें होतें. त्याचें उत्तर आलें कीं, उत्तम आहे; शाहाजादे यांची रवानगी इकडे करावी; सरकारच्या मर्जीप्रमाणें त्यांचा बंदोवस्त करून देण्यांत येईल. त्यास, शाहाजादे यांच्या बोलण्यांत आलें कीं, आपण वलीआहदीचें पद आम्हांकडे मुकर केलें. बहुत उत्तम जालें. हल्लीं शिंदे यांजकडून दिल्लीचा कारभार शाहा निजामुद्दीन यांजकडे आहे तो त्यांनीं बेवसवसा आम्हांकडे सांगावा. आम्हीं सर्व विषयीं त्यांचे लक्षांत राहून त्यांच्या अनुमतें वर्तणूक करीत जाऊं. त्यांत काडीमात्र अंतरणार नाहीं. कामकाजांत कोणाचा बोभाट पडूं न देतां ज्यांत शिंदे यांचा संतोष तेंच आम्हांकडून अमलांत येईल. याप्रमाणें बोलणें आहे. याजकरितां आपणांस लिहिलें आहे. आपलेकडून उत्तर आलें म्हणजे शाहाजादे यांस तिकडे मार्गस्त केले जातील. म्हणोन व राजश्री वि × × × याचे पत्रीं आपण लिहिलें कीं, याप्रमाणें घडल्यास उत्तम, कदाचित् हें शक्कल तूर्त न घडे तर सरकारांतून वलीआहदीची नजर श्रीमंतांनीं पुण्याचे मुक्कामीं करून आम्हांस तिकडे रवाना करावें. तेथें पावल्यावर पाटिलबावा यांणीं वलीआहदीचा समारंभ यथाविधि करून घ्यावा. तो घेऊनच चार दिवस तेथें स्वस्थ राहूं. समयोचित करावयाचें असेल तेव्हां तुम्हीं कराल. याअन्वयें शाहाजादे यांचे मर्जीचा भाव बोलण्यांत आला. त्यास, त्यांतून कोणती तऱ्हा चांगली पडेल त्याप्रमाणें पाटिलबावांसीं बोलून त्यांचें उत्तर लौकर पाठवावें म्हणोन लिहिलें, तें सविस्तर कळलें. ऐसियास, पूर्वी सरकारांत लिहून पाठविलें त्या वेळेस शाहाजादे यांची रवानगी जाहली असती

तरी त्यांस दिल्लीस घेऊन जाऊन पातशाहांस भेटवन, वलीआहदीचे पदावरी त्यांस मुक्रर केलें असतें. सांप्रत आम्हीं मेवाडांत आलों. आठां दहा रोजांनीं उज्जनीस पोंहचून पुढें श्रीमंतांचे दर्शनास येत असों. हल्लीं त्यांची रवानगी जाहल्यास आमचें येणें देसीं, तेव्हां त्यांचा बंदोबस्त यथास्थित होणार नाहीं. का × × शाहाजादे तेथें आहेत तसेच असावे. श्रीमंतांची आज्ञा घेऊन माघारें येऊं ते समयीं शाहाजादे यांस समागमें घेऊन यऊन सरकार आज्ञेप्रमाणें दिल्लीस जाऊन त्यांचा बंदोबस्त करून देण्यांत येईल. हाच उत्तम पक्ष आहे. रा॥ छ २ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji asks Nana not to send the Shahzada to Delhi as he was himself going to Poona to meet the Peshwa.*

No. 597 22nd August 1791.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं —

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ २१ माहे जिल्हेजपर्यंत मुकाम नजीक बनास नदी प्रांत मेवाड येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. जालमसिंग यांस जमावसुद्धां येण्याविसीं इस्माइलबेग याणें पत्र पाठविलें तें, राजश्री मानाजी गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर यांस सांपडलें. त्यांणीं सरकारांत पाठविलें. त्याची नकल तुम्हांकडे पाठविली आहे. त्यास, इस्माइलबेग याचा बंदोबस्त करावयाविसीं पेशजी तुम्हांस लिहिलें आहे. त्याप्रों बंदोबस्त केलाच असेल. केला नसल्यास लौकर करणें. पटणाअलीकडे आल्यावरी सरकारचे महालास उपद्रव लागोन नुकसानी होईल. याजकरितां बंदोबस्त लौकर करणें म्हणोन आज्ञा. त्यास, पूर्वी सरकारचें पत्र आलें त्याचें उत्तर पाठविलें आहे. त्यावरून विदित जहालें असेल. मेडत्यावर लढाई होऊन मारवाडचांची फौज मोडली. मेडतें घेतलें. त्या वेळेस जयपरवाल्याकडून दौलतराम हलद्या व इस्माइलबेग मारवाडचांचे कुमकेकरितां नागोरास गेले. याकरितां तसेंच पुढें जाऊन राजे बिजेसिंग जोतपुरीं होते, त्यांसीं गांठ घालून इस्माइलबेगसुद्धां मारवाडचांचें पारपत्य करावें असा विचार, इकडील फौजेंत सरदार होते त्यांणीं केला. त्या समयीं होळकरांकडील फौज व अलीबहादर यांजकडील जमीयत जे

होती, ते मेडत्याहून माघारें कूच करून आले. त्यांजपासीं मारवाडचांचे व इस्माइलबेगाचे वकील होतेच, व राजश्री तुकोजी होळकर व अलीबहादर यांजपासींही वकील इस्माइलबेगसुद्धां होते. त्यांचा कागदींपत्रीं सिलसिला चालूं लागला असें समजलें. त्यावरून आम्हीं मथुरेहून कूच करून निघालों. ते समयीं उभयतां सरदारही न आले. आम्हीं दरकूच सामरानजीक आलों. मारवाडचांचें इस्माइलबेगसुद्धां पारपत्य करावें असा विचार होता. परंतु उभयतांचा फितूर, याकरितां आम्हीं जसा प्रसंग पाहिला तसा सलूख केला. त्या समयीं यांचा फितूर नसता तरी मारवाडी व इस्माइलबेग यांचें नांव न रहावें असाच प्रसंग होता. सांप्रतही इस्माइलबेग याचे वकील उभयपक्षीं आहेत व जयपुरीं इस्माइल याचे कबिले आहेत. त्यास उभयतां सरदार जयपुरानजीक आहेतच. त्यास इस्माइलबेग याचे कबिले हस्तगत करून,इस्माइलबेग व त्यांचे बंदोबस्ताविसीं आज्ञा व्हावी. इस्माइलबेग याचा बाप गोकुलगडीं जागा बळकावून होता. त्याचें पारपत्य करून गोकुळगड घेऊन त्यास धरून कैदेंत ठेविला आहे. आज्ञा आल्यास हुजूर पाठवून देऊं. इस्माइल दोन तीन वेळ लढाईत मोडला, पळोन गेला. पहिल्यासारखी जमियत, तोफा, पलटणें, त्याजपासीं नाहींत. जमियत त्याजपासीं राहिली ती मारली, पळालेली आहे. राजश्री मानाजी गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर एवढे मोठे सरदार त्या प्रांतें असतां, त्यांच्यानें इस्माइल याचें पारपत्य होत नाहीं, हें अपूर्व आहे. सरकारांतून त्यांस आज्ञा गेलीच असेल. पूर्वी आज्ञापत्र आलें त्यावरून राजे बिजेसिंग जोतपूरकर यांस पत्र पाठविलें. त्यावरून त्यांणीही आपली जमीयत माघारी आणावयासी भला माणूस पाठविला व इस्माइलबेग यांस निरोप देतों म्हणन पत्राचें उत्तर पाठविलें. बिजेसिंगाचा कारभारी खूबचंद संगई होता त्यानें आपला भाऊ इस्माइलबेग याजवरावर देऊन पाठविला. इस्माइलबेग आपण एक मतें राहून राजावरी व वरकड कारभारी यांजवर जबर असावें,असा संगईचा विचार राजे बिजेसिंग यांस समजला. त्यावरून खूबचंद संगईस धरून आणून मारून टाकिला. त्याचा भाऊ व लेक मारून रांडापोरें कैद केलीं, आणि इस्माइलबेग याजपासीं जमियत होती ते माघारीं आणविली. याप्रमाणें जोतपुराहून वर्तमान आलें व बिजेसिंग याचेंही पत्र या मजकुराचें आलें. सेवेसीं विदित व्हावें म्हणोन लिहिलें असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji writes to the Peshwa of Ismail Beg's army being reduced to a mere handful of dispirited men and of his being incapable of being a source of danger any more.*

No. 598 28th September 1791.

पैवस्ती छ ४ रबिलावल इसन्ने तिस्सैन.

कार्तिक नजीक वांई.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागायत छ २९ माहे मोहरमपर्यंत मुक्काम नजीक चितोड प्रांत मेवाड येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं कृपा करून छ २३ जिल्हेजचें आज्ञापत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. प्रस्तुत सरकारांत, हत्ती चांगले, खासे अंबारी योग्य नाहींत, याजकरितां दोन हत्ती थोर, चांगले, खुबसुरत, निझोल*, जलद चालणार, लांबपल्लेयांचे, खासे अंबारीचे उपयोगी असे पाहून तुम्हीं आपले परीक्षेचे पाठवून देणें, म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास, स्वामींचे आज्ञेप्रमाणें हत्ती सिद्ध आहेत. मागाहून सेवेसीं रवाना करण्यांत येतील. येविसीं सविस्तर राजश्री रामजी पाटील जाधव यांस लिहिलें आहे. सेवेसीं विनंती करितील. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Mahadji readily complies with the Peshwa's request for two good elephants.*

No. 599 4th December 1791.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागायत छ ७ माहे रबिलाखर, मुक्काम नजीक चितोडपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वतमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं छ २९ सफरचें आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा जे, शाहाजादे यांचें म्हणणें आमची रवानगी दिल्लीकडे सत्वर व्हावी; नाहीं तरी मीं मक्केस जातों हणोन. त्यास शाहाजादे यांचा बंदोबस्त तुम्हीं सांप्रत मेवाडांत आहांत तेथून केल्यास होणार नाहीं असें काय आहे ?

---

* चालतांना झोल किंवा अचका न देणारे (?)

शहाजादे यांची रवानगी होईल. तुम्हीं दिल्लीस लिहून यांचा वलीआहदीचा बंदोबस्त करून ठेवणें म्हणोन आज्ञा. त्यास आम्हांस देसीं येण्यास विलंब अतां, तरी आज्ञेप्रमाणें शाहाजादे यांचा बंदोबस्त येथूनही होता. परंतु सांप्रत आमचे येण्यास दिवसगत नाहीं. कार्तिकमासींच देसीं येऊन स्वामींचें दर्शन घ्यावें असा बेत करून मेवाडांतून येत होतों. त्यास उदेपूरकर राणाजींचे राज्याचा बंदोबस्त नाहीं. उमराव × × × × आपलाले जागां मुलूक बळकावून राहिले. भीमसिंगाकडे चितोडचा किल्ला, तोही राणाजींचे लक्षांत नाहीं. याकरितां राणाजी येऊन भेटले. चितोड वगैरे बंदोबस्त करून देऊन जावें म्हणोन बजिदी केली. त्यावरून राणाजीसह चितोडानजीक येऊन मुक्काम केला. भीमसिंगानें गोळी वाजविली, सबब मोर्चे लावून तोफा लागू करून निकड केली. त्याजवर घाबरा होऊन बारावे दिवसीं वोलणें लावून कार्तिक वद्य षष्ठी गुरुवारीं* येऊन भेटला. किल्ला हस्तगत करून राणाजींचा बंदोबस्त किल्लेघावरी करून दिल्हा. चितोडचा किल्ला ह्यापूर्वी अकबर बादशाहांनीं बारा वर्षांनीं महत्प्रयासें घेतला. तोच स्वामींचे प्रतापें थोडक्याच दिवसांत हस्तगत जाहाला. इतक्यावर रागाजीजवळ फौज पलटणसुद्धां सरदार ठेवून, येथून निघून उज्जनीसही विशेष दिवस न राहतां दरमजल स्वामींचे दर्शनास येत असों. यावरही शाहाजादे यांची रवानगी सरकारांतून जालियास मार्गांत गांठ पडेल. कागदींपत्रीं बंदोबस्त खातरखां† होणार नाहीं. याकरितां तूर्त तेथेंच असों द्यावयाची आज्ञा व्हावी. देशीहून इकडे येते समयीं शाहाजादे यांस समागमें घेऊन येऊन त्यांचा बंदोबस्त आज्ञेप्रमाणें करून देण्यांत येईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadji informs the Peshwa of his success at Chitore and his intention to go south. He requests the Peshwa to delay the departure of the Shahzada in view of his own visit to Poona.*

No. 600 14th December 1791.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागायत छ १७ रबिलाखर मुक्काम नजीक घोसडा प्रांत मेवाडपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें

*ता. १७ नोव्हेंबर १७९१. † खात्रीपूर्वक, निःसंशय.

वर्तमान यथास्थित असे विशेष. इस्माइलबेग यास मारवाडवाले राजे बिजेसिंग यांणीं निरोप दिल्यावर तेथून निघोन सेखावटींत प्रांत जैपूर येथें आला. जैपुरवाल्याकडे येण्याविसीं सांगोन पाठविलें. त्यांगींही जाब साफच दिल्हा, आणि त्याचीं रांडापोरें होतीं तीं त्याजकडे लावून दिल्हीं. दोहीं राजांकडील आश्रय तुटला. तेव्हां उपाय नाहीं. कानोडचा किल्ला नजफकुलीकडील, तेथें इकडील फौजसुद्धां राजश्री खंडेराव हरि यांणीं जाऊन मोर्चे लाविले होते. त्यावरून नजफकुलीची बेगम किल्लयांत होती, तिजकडे संधान लावून इस्माइलबेग यानें सेखावटींतून कूच करून दरकूच कानोडाकडे गेला. इस्माइलबेगापासीं सहा सात हजार फौज, पंचवीस तोफा होत्या. कानोडापासून पांच कोसांवरी आल्याचें वर्तमान खंडेराव हरि यांनीं ऐकून, मोर्चे उठवून, फौज पलटणेंसुद्धां एकजागा होऊन, इस्माइलबेग पहाडाचे वाटेनें कानोडानजीक येऊन राहिला. दुसरे दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध नवमी* रविवारीं प्रातःकालींच खंडेराव हरि फौज पलटणेंसुद्धां तयार होऊन गेले. इस्माइलबेगही तोफासुद्धां लढाईस आला. दोन्हींकडून तोफांची मार जाली. दोनप्रहरापासून तृतीय प्रहरपर्यंत गोळागोळीची लढाई जाली. उपरांतिक खंडेराव हरि यांणीं फौज पलटणांसुद्धां चालून घेतलें. इस्माइलबेगास मोडून तोफा झाडून पाडाव केल्या. इस्माइलबेग सडा चार स्वारांनिसीं पळोन कानोडचे किल्लयांत गेला. त्यास खंडेराव हरि फौज पलटणेंसुद्धां तेथेंच आहेत. त्यांचे मदतीसही मथुरेहून फौज रवाना जाली. ती येऊन पोंहचेल आणि घेरून त्याचें पारपत्य करतील. स्वामींचे प्रतापें हरामखोराचें पारपत्य जाहालें. राहिलें तेंही होईल. सेवेसीं विदित व्हावें म्हणोन विनंती लिहिली असे. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶ *Mahadji reports having once more defeated Ismail Beg near Kanod.*

No. 601 14th December 1791.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. इस्माइलबेग यास मारवाडवाले राजे बिजेसिंग

---

* ता. ४ डिसेंबर १७९१.

यांणीं निरोप दिल्यावर तेथून निघोन सेखावटींत प्रांत जैपूर येथें आला. जैपूरवाल्याकडे येण्याविसीं सांगून पाठविलें. त्यांनींही जाब साफच दिल्हा आणि त्याचीं रांडापोरें होतीं तीं त्यांजकडे लाऊन दिल्हीं. दोन्हीं राजांकडील आश्रय तुटला तेव्हां उपाय नाहीं. कानोडचा किल्ला नजफकुलीकडील. तेथें इकडील फौज पलटणेंसुद्धां राजश्री खंडेराव हरि यांणीं जाऊन मोर्चे लाविले होते. त्यावरून नजफकुलीची बेगम किल्लयांत होती, तिजकडे संधान लावून इस्माइलबेग यानें सेखावटींतून कूच करून दरकूच कानोडाकडे गेला. इस्माइलबेगापासीं सहा सात हजार फौज पंचवीस तोफा होत्या. कानोडापासोन पांच कोसांवरी आल्याचें वर्तमान खंडेराव हरि यांणीं ऐकून, मोर्चे उठवून फौज पलटणसुद्धां एकत्र होऊन इस्माइलबेगाचे मुकाबल्यास तयार जहाले. इस्माइलबेग पहाडाचे वाटेनें कानोडानजीक येऊन राहिला. दुसरे दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध नवमी रविवारीं प्रातःकालींच खंडेराव हरि फौज पलटणेंसुद्धां तयार होऊन गेले. इस्माइलबेगही तोफांसुद्धां लढाईस आला. दोहींकडून तोफांची मार जहाली. दो प्रहरांपासून तृतीय प्रहरपर्यंत गोळागोळीची लढाई जाली. उपरांतिक खंडेराव हरि यांनीं फौज पलटणासुद्धां चालून घेतलें. इस्माइलबेगास मोडून तोफा झाडून पाडाव केल्या. इस्माइलबेग सडचा चार स्वारांनिसीं पळोन कानोडचे किल्लयांत गेला. त्यास खंडेराव हरि फौज पलटणासुद्धां तेथें आहेतच. त्यांचे मदतीस मथुरेहून फौज रवाना जाहाली, तीही येऊन पोंहचेल आणि त्यास किल्लयांत घेरून पारपत्य करितील. श्रीमंतांचे प्रतापें हरामखोराचें पारपत्य जहालें. राहिलें तेंही होईल. आपणांस कळावें म्हणोन लिहिलें असे. इस्माइलबेग याचा वकील होळकरांकडे यावा जावा हा सिलसिला पहिले पासोन होताच. अलीकडे इस्माइल्या सेखावटींत आल्यावरी पुनः त्याचा वकील होळकराकडे गेला होता. त्यांचें याचें बोलणें होऊन वकील माघारा येतांच तो कच करून दरकूच कानोडास आला. येविसीं सविस्तर राजश्री रामजी पाटील जाधव यांसीं लिहिलें आहे. बोलतील. आपणास कळावें यास्तव लिहिलें असे. रा छ १७ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji writes to Nana of his troops having defeated Ismail Beg and having surrounded him at Kanod. He expresses his suspicion that Holkar had a hand in Ismail Beg's movement towards Kanod.*

No. 602 December 1791.

(पत्र महादजीचें पेशव्यांस.)

छ पुरवणी सेवेसीं विज्ञापना ऐसीजे :—तुमचें येणें देशीं हें मनसुब्याचे विचारें पहातां येणें देशीं जाल्यावरी तिकडील बंदोबस्त राहणार नाहीं. अनेक प्रकारचे बखेडे उभे राहतील. फौजा ठेवन बंदोबस्त करून देशीं येऊं म्हटल्यास फौजाच राहून बंदोबस्त राहणार नाहीं. आजपर्यंत श्रम साहास केले, मुलख व कित्येक स्थळें मातबर घेऊन शत्रू पादाक्रांत करून पातशाहीचा बंदोबस्त केला, तो राहणार नाहीं. फिरोन श्रम पडतील. हिंदुस्थानीयांचा इतबार नाहीं, ही सर्व माहितगारी तुम्हांस आहे. याजकरितां तुमचें येणें मसलतीचें विचारें पाहतां चांगलें दिसत नाहीं म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास, इकडील बंदोबस्तास फौज व कंपूसुद्धां सरदार पोक्त सरंजामानिसीं ठेविले आहेत. स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून कोणी बखेडा करावा अशी जुरत* राहूं दिल्ही नाहीं. स्वामींचें दर्शनास बहुत दिवस जाहले. एक दिवस चरण-दर्शन घ्यावें ही लालसा आहे, व देवाचाही उपद्रव वारंवार होतो, याकरितां येणें जरूर जाणोन येत असों. सरदार इकडे आहेत. बंदोबस्त राखतील. इस्माइलबेगाचें खूळ थोडकेसें होतें. त्याचेंही पारपत्य राजश्री खंडेराव हरि यांणीं केलें. तोफा चोवीस त्यांच्या पाडाव आल्या. कानोडच्या किल्लचाचे आसऱ्यास पळून गेला, हें वर्तमान सेवेसीं पूर्वीच लिहिलें आहे. बाहेर मैदानांत येऊन लढाई करावी हे ताकद त्यांत राहिली नाहीं. मथुरेहून फौजा व कंपू कानोडास येऊन कानोडचे किल्लयांतच त्यास घेरून पारपत्य करतील. घरच्या फितुरानेंच इस्माइलबेग कानोडास गेला. परंतु स्वामींचें पुण्यप्रतापें त्याचें पारपत्य जाहलें. पुढें बाहेरील कोणी बखेडा करील असा दिसत नाहीं. घरचा फितूर जाल्यास न कळे ! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji insists on coming to Poona to meet the Peshwa in spite of the latter's advice and wish to the contrary.*

No. 603 15th March 1792.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण छ १ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. जनराल

---

* ताकद.

लॉर्ड कार्नवालीस व राजश्री हरिपंततात्या फौजसुद्धां, टिपूकडील मागडी किल्ला झाडींत आहे त्या नजीक जाऊन, किल्लचास मोर्चे लावून छ २४ रबिलाखरीं इंग्रजांनीं हल्ला करून मागडीचा किल्ला घेतला. चेनापट्टणापासून श्रीरंगपट्टणा-पावेतों रस्त यावयासीं इंग्रजांनीं टिपूकडील मकानें घेऊन रस्ता मोकळा केला. पुढें पट्टणावर लौकरच जाणार. नवाबाकडील भारामल दोन हजार फौजेनिसीं होते. सरंजाम थोडा याकरितां इंग्रजांचीं पत्रें आलीं, त्यावरून नवाबांनीं आपले पुत्र पोलादजंग* व मौनुतद्दौला† कारभारी यांसीं कांहीं जमियतीनिसीं ×× रवाना केलें. ते गुरुमकुंड्यापुढें ×× कोस गेले. तेही जाऊन मिळणार. महागाई फार. दहा महिने एकसारखी दोन शेर ××× जहाली. तरी तीन शेर. यामुळें अडचण फार जाली आहे म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसि-यास, राजश्री हरिपंत तात्या व जनराल लॉर्ड कार्नवालीस यांणीं मागडी किल्ला मातबारी व किल्लचावर जंगी सरंजाम असतां मोर्चे लावून हल्ला करून घेतला हें ऐकोन संतोष जाहला. मार्गांत रसदेचा रोध मागडी किल्लचामुळें होता. हल्लीं मार्ग रस्त जावयासीं निर्वेध जाहला. नवाबांनीं आपले चिरंजीव व मौनतद्दवला यांची रवानगी केली. तेही जाऊन पावले असतील. रा॥ छ २१ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे ही विनंती.

¶ *Sindia learns of the progress of the allies' war against Tipu Sultan.*

No. 604 15th March 1792.

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं :—

छ दंडवत विनंती उपरी कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष :—आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री परशरामपंतभाऊ यांणीं होलहोनूर व बंकापूर, तालुके बिदनूर, हीं ठाणीं घेऊन शिवमोघ्याकडे टिपूकडील जमाव आला ही बातमी समजल्यावरून, तिकडे रूख करून दोन कोसांचे तफा-वतीनें तुंगातीरीं राहिले होते. टिपूकडील रजाअल्ली, दहा हजार जमाव व बारा पंधराशें स्वार व तोफा व जंगी सरंजाम घेऊन शिवमोघ्यानजीक झाडीचे आश्रयानें

---

* सिकंदरजाह. † मशिर-उल-मल्क, अझिम-उलू-उमरा.

गोटास दक बातेऱ्या वगैरे मजबुती करून राहिला होता. ही बातमी आल्यावरून पुढें मशारनिल्हेंनीं कांहीं पागा फौज तलाब्यास* पाठविली. त्यांचा व शत्रूकडील मुकाबला होऊन तेथें गोळागोळी व थोडीसी हातघाई जाहाली. नंतर दुसरे दिवशीं राजश्री रघुनाथराव नीलकंठ व रामचंद्र परशराम व गणपत आनंदराव वगैरे फौज व गाडदसुद्धां त्यांजवर रवाना केले. मागाहून परशरामपंतभाऊही गेले. त्यांणीं शत्रूकडील जमावासीं गांठ घालून, लढाई सुरू करून पागा व सारे फौजेनें लगट केला. तेव्हां रजाअल्ली झाडीचे तोंडीं आश्रयास गेला. शत्रूकडील दहा अकरा तोफा व घोडीं व बंदुका पाडाव करून, तळावरील डेरे, राहुटया, वगैरे लुटून आणलीं. त्यांचा जमाव सिकस्त करून लोक कापून काढिले. ते समयीं रजाअल्ली सडा पळोन गेला. नंतर परशरामपंतभाऊ यांणीं शिवमोघ्यास मोर्चे बसवून, तोफांची मारगिरी सुरू करून हल्ला करावा, तों ठाणेकरी कौलास आले, त्यांस बाहेर काढून देऊन सरकारचें निशाण चढवून ठाणें सरकारांत हस्तगत जहालें. पुढें होईल वर्तमान तें लिहिण्यांत येईल म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसियास, टिपूकडील रजाअल्ली मातबर सरंजामानिसीं होता. त्याजवर राजश्री परशरामपंतभाऊ यांणीं पुढें रवाना करून, मागाहून आपण जातीनें जाऊन गांठ घातली. लढाई करून रजाअल्लीचा मोड करून झाडींत घातला. तोफा व बंदुका घेऊन तळ डेरेदांडेसुद्धां दरोबस्त लुटला. हें ऐकोन संतोष जाहला. श्रीमंतांचे प्रतापें शत्रूकडील फौज सरदार जंगी सरंजामानिसीं मुकाबल्यास आला असतां त्याचें पारपत्य चांगलें जाहलें. शिवमोघा जागा हल्ला करून घ्यावा असा होता. तोही जरबेनेंच खालीं होऊन सरकारचें निशाण चढलें. अलीकडे श्रीरंगपट्टणावर फौजा सरकारच्या राजश्री हरिपंततात्या, व नवाबाचे सरदार आपले जमीयतीसुद्धां इंग्रज चालोन गेले. टिपू पट्टणाअलीकडे बातेऱ्या बांधून होता. त्यासीं लढाई मातबर घेऊन टिपूच्या तोफा वगैरे जंगी सरंजाम सोडविला. टिपू पळोन झाडींत गेला, म्हणोन आखबारी वर्तमानावरून ऐकिलें. लिहून कळविलें पाहिजे. रवाना छ २१ रजब. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji congratulates Nana on the victory gained by Parashuram Bhau over Raza Ali at Shimoga.*

---

* टेहेळणीस.

No. 605 3rd April 1792.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

छ विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागायत छ १० माहे साबानपर्यंत मुक्काम नजीक अंबाड येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.—स्वामींनीं कृपा करून पत्र छ २७ रजबचें पाठविलें तें पावोन संतोष जाहला. राजश्री हरि बल्लाळ व निजामअल्लीखान-बहादर यांचे पुत्र पोलादजंग व इंग्रज मिळोन फौजसुद्धां पट्टणानजीक तीन कोसांवर गेले. तेथून छ १३ जमादिलाखरीं रात्रीस इंग्रजांनीं सडीं पंधरा पलटणें तोफा खेरीज घेऊन पुढें चालून गेले. टिपूस खबर कळली. तोही तयार होता. इंग्रजांची व टिपूची लढाई सुरूं जाहली तों दुसरा दिवस उगवला. प्रहर दिवस आला तोंपावेतों जहाली. दोहीकडील माणूस ठार व जखमी तीन हजार जाहलें. प्रातःकाळीं लढाई होतच आहे, तों सरकारची व नवाबाकडीलही फौज जाऊन पोंहचली. टिपू माघारा हटून गेला. नंतर टिपूनें सलूखाचा पैगाम* लाविला. वकील पाठविले. त्यांसीं सरकार व नवाब व इंग्रज मिळोन बोलणें होऊन तहाचा जाबसाल ठरला.† टिपूकडील मुलकापैकीं निमे मुलूक व तीन क्रोड रुपये तिन्ही सरकारांस द्यावे याप्रमाणें ठरोन, सदरहू जाबसालाचा फडशा होय तोंपावेतों टिपूचे दोघे पुत्र ओलीस ठेवावे असें ठरलें. त्याप्रमाणें दोघे पुत्र ओलीस आले. येऊन भेटले. याप्रमाणें हरि बल्लाळ यांजकडून पत्रें आलीं. तुम्हांस कळावें याकरितां लिहिलें आहे म्हणोन पत्रीं आज्ञापिलें. ऐसियास, टिपू पैकेपूर, यामुळें उन्माद होऊन अलीकडे अमर्याद वर्तणूक करूं लागला. त्यावरून त्याचे पारपत्याचा विचार, सरकारांतून नवाब, इंग्रज यांच्या फौजा सरकार फौजेस सामील करून ठरला. त्याप्रमाणें सवा वर्ष टिपूचे पारपत्याचा लगट फौजांनीं महागाई मन-मानेसी खाऊन केला. टिपूचा मुलूख गडकोट किल्ले घेऊन फौजा लढत राहिल्या. टिपूचा सरंजाम जंगी मातबर असतां व पट्टण त्याची रहावयाची जागा, कलब‡ तेथवर फौजा जाऊन लढाई केली. पट्टणानजीकच्या बातेऱ्या§ घेतल्या, आणि शत्रूस जेर केला. हा प्रताप एक स्वामींचाच. टिपू आयास येऊन मामलतीचें बोलणें लाविलें. त्यावरून मामल्याची आज्ञा होऊन तीन क्रोड रुपये सरकार

* बोलणें. † 7th February 1792. ‡ काळीज. § Batteries.

व नवाब इंग्रजसुद्धां, शिवाय निमे मुलूक द्यावा याप्रमाणें लिहिलीं होऊन, टिपूचे पुत्र ओलीस दोघे आले. तेव्हां फौजा शहापासून मोकळ्या होऊन अलीकडे आल्याच असतील. लिहून कळविणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji is informed of the terms of the treaty concluded by the allies with Tipu and congratulates Nana on the successful termination of the war.*

No. 606 About 18th November 1784.

(पत्र सदाशिव दिनकराचें.)

विज्ञापना ऐसीजे :—आफरासियाबखान यास आमदानीनें दगा करून जिवें मारिला, हें वर्तमान छ १९ जिल्हेजचे* रवानगींत पत्रीं विनंती केली आहे. याचा शोध लागला जे, गुदस्तां मिर्जा शफी यास अमदानीनेंच दगा करून मारिला. त्या संमतांत आफरासियाबखानही होता. आतां राजश्री पाटिलबावा यांचे साहित्यानें, मदतीनें, बादशाहजवळ कारभारी मुख्तार आफराशाबखानच होऊन, बक्षीगिरीस किताब अमिरुलउमरा आहे, तो किताबहि मिळाला. नजफखानाजवळील फौज मोगले वगैरे मिर्जा शफीजवळ होती. मिर्जा मजकूर जबरदस्त; कोणाचें चालूं देईना. हें विषम सर्वांस जालें. तेव्हां त्याजवळचे मोगले, फौजेचे सरदार, जागीरदार, सारे अमदानींत मिळून मिर्जा शफीस ठिकाणीं लाविलें, तेच सरदार मोगल जागीरदारच होते. आफराशाबखानाजवळ ते व आमदानी एक होते. मिर्जा शफीचा भाऊ जैनुलआबदीखान राजश्री पाटिलबावांजवळ सहा महिने येऊन राहिला होता. मातबर, आल्याचें चालविलें पाहिजे, म्हणून बावा खर्चास देऊन त्याचें चालवीत असतां, अमदानीचें मतांत मिळाला. आमदानी, जैनुलआबदीखान, व मोगले, सर्वांचा मनसबा ठरला जे, आफराशाबखान दक्षणियांसीं मिळाला; पाटिलबावांचे सलहेनें चालतो; बादशाही दौलत दक्षण्यांचे घरांत घालतो; यास जैनुलआबदीखानानें मारावा, म्हणजे पाटिलबावा सहजच राहिले. बादशाही बंदोबस्त करण्याचा विचार, अमिरुलउमराई जैनुलआबदीखानास द्यावी. ज्ञान यांचें कळलेंच आहे. नांवाचा

*3rd November 1784.

धनी यास करावा. कारभारांत यख्त्यार मुख्तार आमदानी होऊन काम चालवावें. मोगले सरदार फौजेचे आहेतच. असा घाट करून जैनुल आबदीखानास उमेदवार केला. त्यानेंही मान्य केलें, आणि आपले घरचा बारगीर मोगल यांजकडून हें काम करविलें. जैनुलआबदीखान बारगिरास बरोबर घेऊन आफराशाबखानाचे डेऱ्यास गेला. दोन चार घटिका बरोबर फिरून, आफराशाबखान एकटा डेऱ्यांत पाहून, बारगिरानें झटपट करून, गलची धरून, कटार स्कंधावर उभा चालवून, वरून भार घालून दाबला. तो स्तनाभावेतों आला. कारगर जाला. काम आखेर जालें. कांहींसा जीव अंशमात्र राहिला. तेव्हां लोक मिळाले. त्यांनीं बारगीर मोगल्या मारिला. त्या गलबलींत जैनुदीखान तेथून निघोन पाटिलबावांजवळ डेऱ्यांत येऊन वर्तमान सांगितलें :—"मी जवळ होतों. तो बारगीरही माझाच. मजलाच कोणी बदनाम करितील, तुफान घेतील, यास्तव आपणाकडे वर्तमान सांगावयास आलों." तें श्रवण करून बावांनीं जैनुलआबदीखानास धरून पाहऱ्यांत तेच समयीं दिलें. तसेंच आपले खिजमतगार पाठऊन खबर आणविली. तो आफराशाबखानाचें काम झालें. अंश मात्र बाकी आहे. वर्तमान कळल्यावर विचार प्राप्त झाला कीं आफराशाबखानाची फौज, मोगले, आमदानींत मिळालेच आहेत. ते हे एक जाले म्हणजे तोफखानाही मेळऊन घेतील. मग संकटच पडेल. राजश्री आंबूजी इंगळे याजबरोबर दोन तीन हजार फौज व दोन पलटणें त्यांचे फौजेचे संरक्षणास पाठऊन, चौकीबंदी करून, त्यांचे लोकांची खातरजमा केली. तों संध्याकाळ जाला. आफराशाबखानाचा अंश उरला होता तोही जाऊन मृत्यु पावला. त्याचा ताबूत शिकरीफत्तेपुरास न्यावयाचा, तो मोगले व फलटणवाले साऱ्यानींच बंद केला. 'तलबेची निशा होईल तेव्हां नेऊं देऊं', म्हणाले. बावांनीं विचार केला कीं, आम्ही आंगानिराळें टाकिलें म्हणजे आमदानी व मोगले तोफखान्यासुद्धां एक जाल्यास गोष्ट बाईट. यासमयीं हिंमत करणें सलाह जाणून, मोगले, तोफखाना, पलटणवाले यांची खातरजमा केली कीं, 'तुमची तलब निघेल ती बादशाहाकडून आम्ही देवऊं.' त्यांनीं मुद्दा घातला कीं पुढें आम्हास चाकर ठेऊन जागिरी बहाल करून द्याव्या. तेंही बावांनीं मान्य केलें कीं, आफराशाबखान चालवीत होता, त्याप्रमाणें बादशाहास सांगोन तुमचें चालऊं. आंबूजी इंगळे फौजसुद्धां पलटणसुद्धां त्यांचे लष्करांत राहिले, म्हणून वसवास खाऊं लागले. त्याजविसीं खातरजमा केली जे, तुमचे संरक्षणार्थ फौज, पलटणें आम्ही ठेविलीं आहेत. स्वस्थ राहावें. फौज उठवन आणावी तर सलतनत लुटली जाते. गोसावी

हिंमतबहादर याचा आमदानीचा दावा. आफराशाबखानाचा कारभारी नारायणदास यांचें संरक्षण होगार नाहीं. ते दोघे ठिकाणीं लागले तर सारा मनसबा बूडतो. यांचें संरक्षण आमच्यानें न जाल्यास दाब उठून आमदानी व हे सारे फितुरी एक होऊन फिरून गोष्ट सांगतील. यास्तव फौज पलटणें तसींच त्यांचे फौजेंत ठेऊन दोघांचें संरक्षण केलें. सारे फितुऱ्यांनीं, जैनुलआबदीखान बावांचे चौकींत बंद केला, त्यास कोणेही प्रकारें काढून न्यावें, येविसीं युक्तिप्रयुक्ति करून पाहिल्या. परंतु साध्य न जालें. अद्यापवर जैनुलआबदीखान बावांचे बंदांत आहेच.

रात्रीस बावांनीं कारभारी मेळऊन मसलत केली कीं, 'यांत त्या गरमींतच दाब बसविल्यास बसेल. एक दोन रोज उगेच स्वस्थ राहिल्यानें, सारे फितुरी एक होऊन शेर जाले, तर मग दबणार नाहींत. प्रातःकाळींच सडी स्वारी करून आमदानीवर जावें.' राजश्री रायाजी पाटील व जिवाजी बल्लाळ बक्षी यांची रवानगी दोन दिवस अगोदरच फौजसुद्धां आमदानीवर केलीच होती. दोन तीन कोस पुढें जाऊन मुक्काम केलाच होता. आफराशाबखानाची फौज, तोफखाना, येथून कूच करून त्यांत सामील जाला, म्हणिजे रायाजी पाटील व बक्षी यांनीं अमदानीवर जावें, ही सलाह आफराशाबखान व गोसावी यांचे विचारेंच ठरून, पाटील व जिवबा बक्षी यांची रवानगी फौजसुद्धां केली. दुसरे दिवशीं खानमरहूम याची फौज तोफखाना जावा, तों त्याचा मृत्यु जाला. मग आमदानीचें पारपत्य जातीनसींच करणें प्राप्त जालें. रात्रीस चिट्ठी रायाजी पाटील व जिवबा बक्षीस पाठविली कीं, उदईक आमचा मुक्काम तुमचे जागां होईल. तुम्ही कूच करून, एक कोस पुढें जाऊन मुक्काम करणें. आमदानीचे वकील जाबसालास आले होते. एक घोडा चांगला आणून नजर केला होता. त्यास वकिलांस रात्रीसच बोलावून आणून, घोडा त्यांचे स्वाधीन करून, निरोप दिला कीं, तुम्ही आमदानीकडे जाणें. घोडा माघारा देणें. उत्तर आमचें सांगणें ज, "तुम्हाजवळ तोफखाना, हत्ती, घोडे, उंट आदिकरून कारखाने असतील ते आमचे हवालीं करणें, आणि आपले कबिले घेऊन निघोन जाणें असेल तिकडे जाणें. असें कराल तर तुमचे अब्रूस खता होणार नाहीं. हें कबूल नसेल तर लढाईस उभे राहणें." हें कृत्य छ १९ चे रात्रीस केलें. मागील सहा घटका रात्र राहतां बुणगे रुपबसावर टाकून सडी स्वारी करून निघोन रायाजी पाटील व बक्षीचे तळावर मक्काम केला. पाटील व बक्षी पुढें कोसभर गेले. जलदी करून जाऊन गळीं पडावें तर वकील काल

बिदा केले, त्यांनीं जाऊन वर्तमान धन्यास सांगून जाब आणिला नाहीं. याचकरितां दम खादला. वकिलांनीं अमदानीकडे जाऊन वर्तमान सांगोन उत्तर आणलें जे, 'बादशाही सरंजाम मजजवळ पंधरा तोफा मात्र आहेत त्या देतों. वरकड ××× आहे तो मी देणार नाहीं. मेल्यानंतर कोणी घेऊन ××× बावांनीं सांगोन पाठविलें कीं, तोफखाना, हत्ती ××× तुम्हांजवळ असतील ते झाडून द्यावे लागतील. खासे घोडे बसावयाचे असतील तितके तुम्हांजवळ राहतील. बाकी बिलकुल देणें पडेल. या जाबसालामुळें दोन तीन रोज टाळा दिला. त्यात नारायणदास व गोसावी यांस बोलावून आणून त्यांचे फौजेची तन्हा काढून रुपये तूर्तचे खर्चास नक्त आपणांपासून देऊन त्यांची फौज, पलटणें, तोफखाना आपल्यांजवळ आणिला.

मोगलेच काय, हिंदुस्थानी माणूस ब्राम्हणापासून अतिशूद्रपावेतों दगाबाज, मात्रागमनी, बेइमान, खुशामदी, व तत्कालच निर्दय प्राण घेणार, पोटच्या संतानापावेतों. त्यांतही विलायती मोगल व काशमिरी हे तर आधी खुशामद इतकी दाखवावी कीं आप्तच केवळ, आणशफतही करावी. तेच समयीं काबू फावला तर तेच समयीं मान कापावी. आफराशाबखानाचे फौजेंत दिल्लीवाला विलायती मोगल व कशमिरी झाडून यांशींच गांठ. अमदानीचें अनुसंधान अगोदरचेंच त्यांच्याशीं होतें. मग जाबसाल काय लाविला? "आफराशाबखान मेला. आतां बादशाही बंदोबस्त पाटिलबावा करितील. बादशाहाची दौलत हिंदूंच्या घरांत जात आहे. तुमचा धनी आफराशाबखान मेला. आतां तेथें राहणें तुमचें सलाह नाहीं. उठून मजकडे येणें. तुमचा रुपयाही मी देतों." असा फंद टाकून फितूर माजविला. बावांनीं धैर्य धरून, दम खाऊन, बाहिरून दाब घालून, नारायणदास व गोसावी यांचे हातून अनुसंधानें लाऊन, लोभ दाखऊन, कारस्थानानें फौज, तोफखाना, पलटणें आपणांजवळ आणऊन, तोफा लाऊन अमदानीचें पारपत्य करावें असें ठराविलें. अंतर पाहतां भरतपुरा-अलीकडे दोन अडीच कोसांवर अमदानी; त्या अलीकडे तीन साडेतीन कोसांवर बावांचे सडे स्वारीचा मुक्काम. आफराशाबखानाचे मोगले आदिकरून फंदी. बुद्धीचें शाश्वत नाहीं. जलदी करून मतलब गाठला तरीच वरें, असें समजून, बुणगे रूपबसावर होते ते सडे स्वारीस मिळविलें. शेजारीं आद कोसांवर यवनांचे बुणगे याचा मुक्काम करविला, आणि फौजेचा घेरा आद आद कोसाचे अंतऱ्यानें आपली फौज, आफराशाबखानाची फौज, जैपूरवाले, माचेडीवाला अशा

फौजेचा ताटवा पुरला तितका उभा करून, आपण खासा पाटिलबावांनीं एक कोसांवर उभे राहून, आपला आणि आफराशाबखानाचा ऐसे दोन्ही तोफखाने अमदानीवर सुरूं केले. रसद बंद केली. लढाई सुरूं जाहली. ××× थोडी मारगिरी केली. त्यांच्याही ५ तोफा सुरूं जाल्या ×× संध्याकाळीं तोफा व फौजेच्या ××× बणग्यांत आले. आफराशाबखानाचा तोफखाना×× बुणग्यांत आला.

दुसरे दिवशीं उजाडतांच बावांनीं तोफांजवळ जाऊन तोफा सुरूं केल्या. नंतर आवाज आफराशाबकडील तोफखाना जाऊन लागूं जाला. इकडे लढाई होत्ये; मोगले आफराशाबचे उभे आहेत; अमदानीचे फौजेंतून राऊत निघोन मोगल्यांकडे यावे; मोगल्यांनीं दोघा चौघांनीं निघोन त्या रावतांकडे जाऊन परस्परें बोलून माघारें जावें; हे जाबसाल अमदानीकडे चालले. बावांसीं जाबसाल घातला कीं, "बादशाहीचा बंदोबस्त तुम्ही करणार. आम्ही तुमचे शरीक होऊन भांडावें, मरावें कशास?" बावांनीं उत्तर केलें कीं, "आम्हांस बादशाहीचा अगर कारभाराचा लोभ असता तर मागें किती वेळ काबू आमचे लागले; बादशाहतच घेतों अगर कारभारांत कबजा करितों! उरफाटें बादशाहच्याच स्थापना व मदती करीत गेलों. आतांही आम्हांस लोभ नाहीं. बादशाहांचीं दरसाल पत्रें देशीं येत गेलीं. ग्वालेरीस असतां मिर्जा शफी आदिकरून बोलाऊं लागले. आलों. भेटी घेऊन ग्वालेरीस माघारें गेलों. आतां पुनः बादशाह व आफराशाबखान यांचीं पत्रें वकील येऊन आम्हांस घेऊन आले. बादशाह आगऱ्यांत ठेवून आफराशाबखान पुढें आले. भेटले. बादशाही बंदोबस्ताचें बोलत होते. आम्ही बोलत होतों. त्यांची दशा आम्ही जवळ असतां अशी जाली. बादशाहाचे पुके वरचेवर येत आहेत. असें असतां टाकून जाणें उचित नाहीं. बंदोवस्त करून देऊन माघारे जावें. येथें कारभारास आफराशाबखानाचा पुत्र आहे, त्याची स्थापना करून द्यावी". हें उत्तर करून आफराशाबखानाचे पुत्राचे नांवेंकरून पत्र मातंपुरसी व पुढील बंदोबस्ताचें, व वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे दिले. ते त्यांनीं, रामगड अंतरवेदींत आहे, तेथें आफराशाबखानाचे पुत्राकडे रवाना केले. मग तोफखाना लागूं करून मारगिरी भारी केली. आसपास घेरा पडला. त्यामुळें आंत दाणा नाहीं. अडीच शेर, तीन शेर, धारण अमदानीचे फौजेंत झाली. पदरीं रुपया नाहीं. तीन चार रोज गुरें मार मारून खादलीं. तेव्हां लाचार होऊन आंबूजी इंगळे यांजकडे पैगाम लागून त्यांस दरम्यान घालून

करार केला कीं, 'माझे घरचे घोडे, उंट, हत्ती असतील, ते मजला द्यावे; आणि तोफखाना, हत्ती, घोडे असतील ते घ्यावे. मोगल, पठाण, रोहिले, पलटणें, यांस हत्यारें सुद्धां जाऊं द्यावें. स्वार बरोबर देऊन पोहचावून द्यावें." एक दोन रोज बावांनीं ऐकिलेंच नाहीं. नंतर मान्य करुन तोफा मवकूफ केल्या. दुसरे दिवशीं आमदानीस बाहेर काढावयास भाई व दिवाणजी व चिटणीस, इंगळे ऐसें जाऊन, त्यास वचनप्रमाण देऊन, शेंपन्नास स्वारांनिशीं बाहेर आणून, भाई आदिकरुन सर्वां भेटी घेऊन, आंबूजी इंगळ्याचे गोटांत उतरला. रोहिले, मोगल व चाकर पलटणें होतीं तीं, यांस स्वार जासूद बरोबर देऊन, हत्यारांसुद्धां कुंभेरीपार करून दिलें. नंतर हदू† खिजमतगार वगैरे पाठवून, तोफखाना व पलटणांत बंदुका आमदानीच्या होत्या व हत्तीघोडे यांची मोजदाद करुन आंबूजीच्या गोटांत ठेविलें आहे. त्यांची सुमारी कळल्यावर विनंती करीन. तोफा वगैरे सरंजाम बादशाहाकडे जातो, किंवा आफराशाबखानाकडे जाईल, किंवा हे घेतील, अगर वाटणी होईल. चाळीस पंचेचाळीस तोफ आहे ऐकतों. त्याचा निर्णय कसा होतो पहावा.

बादशाह आग्र्यास होते, त्यांस आणावयास राजश्री खंडेराव हरि व आणखी पथकें, पलटणें पाठवून, आणून दो कोसांवर मुक्काम करविला. बादशाहजवळ कांहीं नाहीं. सभोंवतें आवर्ण, खंडेराव हरि आदिकरून फौज पलटणें बावांचीं, यांचें आहे. जिल्हेजचे चंद्रदर्शनाचे दिवशीं बादशाहांची बावांची भेटी जाली. मीही गेलों होतों. बादशाहजादा पुढें आला होता. त्यांस बावांनीं आकरा खवाज व जगा, शिरपेच, कलगी, मोत्यांची माळ, हत्ती, घोडा दिला. मग मुख्य बादशाहकडे जाऊन भेटी घेतली. समागमें पवार मंडळी, बळवंतराव धोंडदेव वगैरे होते. त्यांस एक निमअस्तीन सारें सनंग, वरकड चिंधोट्या चिंधोट्या, एकून पांच वस्त्रें, कोणास जेगा शिरपेंच अशीं दिलीं. संध्याकाळीं बावा आपले डेऱ्यास आले. छ २ मोहरमीं‡ बादशाहांचें कूच जालें. पाटिलबावा प्रातःकाळींच सडे स्वार होऊन, जाऊन बादशाहांस स्वार करून घेऊन आले. आपलेपुढें बादशाहाचा मुक्काम करविला. तेथें डेरेदाखल करून आपले डेऱ्यास आले. हिंदुस्थानाप्रमाणें बेइमान, बेपीर, बेपरवा माणूस कोठें पाहिलें नाहीं. आफराशाब मारल्यावर, खुशालीराम जैपुरकराचे

†दत्तू. (?) ‡(16th November 1784)

फौजेबरोबर; मातबर, शाहणा, त्यासही मारेकऱ्यांनीं मारिला. तेच दिवशीं आफराशाबखानाकडील एक मोगल तोही कारभारीच होता, त्यासही जखमा केल्या. दग्यानेंच! परंतु अद्यापिवर तो जिवंत आहे. अशी दग्याची प्रवृत्ति चालली आहे. बादशाहांचें म्हणणें आफराशाब असता तरी आम्हांस यांपैकीं कोणाचा भरंवसा नाहीं. तुम्हीं बंदोबस्त करावा, असें बावांस म्हणतात. बावांचा विचार $\times\times\times\times$ कीं येथील राहण्यास पैका पाहिजे. आपणाजवळ रुपया नाहीं. कर्ज मिळत नाहीं. राहणें कसें होईल? भलतासा तोडजोड बादशाहांचा करून देऊन आपण निघावें, देशास जावें, असें बाहेर ऐकतों. पुढें होईल वर्तमान ती विनंती करीन. रवानग्याचे पत्रांचीं उत्तरें जालीं नाहींत. मी मागतों. तयार होऊन आलीं म्हणजे रवाना होतील. मेरट वगैरे महाल व बक्षीगिरीचा मजकूर बावांचे पत्रीं होता. पत्रेंच त्यांस दिलीं. मींही मेरट वगैरे व बक्षीगिरीविषयीं सूचना केली. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dinkar reports to Nana Fadnis the details of the murder of Afrasiyab Khan, showing that the crime was instigated by Hamdani and that Sindia had no hand in it. He narrates in detail how very skilfully Sindia brought the dangerous situation under control by suppressing a mutiny among Afrasiyab's masterless troops and completely subduing Hamdani and disarming his formidable force.*

No. 607 About July 1785.

"विज्ञापना ऐसीजे :—राजश्री पाटिलबावांस खर्चाची ओढ फार. बादशाहांसही खर्च दिला पाहिजे. याचें कारण काय? पाटिलबावा देशीहून हिंदुस्थानांत गेल्यापासून मुलूख किती सुटला व पातशाही मुलूख हातास किती आला? त्या मुलखाचा पैसा येत नाहीं म्हणोन लिहितोस. तो पैका जातो कोणीकडे? याचा शोध करून पाठवणें म्हणोन आज्ञा. एसियास आधीं जमेस ठिकाण असावें, नंतर खर्चास बंद असावा. नियत नीट असावी. प्रथम तीन विचार कायम असावे. तेणेंकरून चालतें. ग्वालेर गोहद प्रांतचा पैका तर यांनीं घेतला. पांच रुपये कमी अगर जास्त. ग्वालेर व गोहद व भिंडभदावर असे हे प्रांत राजश्री खंडेराव हरि यांजकडे बमय परगणा भांडेर मामलता सांगोन, दहा लक्ष रुपये रसद त्यांजपासोन

घेतली. दीड हजार फौज व पलटणें त्यांजबरोबर खर्च व महालचे खर्च याची नेमणूक निराळी. चमेलपार दक्षणतीर नवा मुलूख सुटला, त्यापैकीं कमाविसी मुलूख खंडेराव हरिकडे दिला त्याचीही रसद घेतली. काशीकर राजा यांस पांच लक्षांची बेरीज धरून जागीर दिली. बेरजा त्याच्या मनस्वी धरून पांच लक्ष आकार धरला. पंचमहालपैकीं राजश्री शिवाजी विठ्ठल यांस गांव दिले. सरकार सनदेंत त्यांची जागीर एक लक्ष पांच हजार ऐन जागीर, व एक लक्ष पांच हजार महालखर्च, एकूण दोन्हीं कलमें मिळून दोन लक्ष दहा हजार कीं वीस हजार आहेत. त्याअन्वयें त्यांस खेडीं लाऊन द्यावीं. असें असतां उमप बेरजा मागील दों दोशां वर्षांच्या कमाल जमा धरून गांव दिले आहेत. त्यांत पन्नास साठ हजार आकारले तर फार! इतका मुलूख सुटला, यांत तालुक झांसीपैकीं सरकारचे तालुके दाबले ते देखील आले. चमेलपलीकडे मुलूख सुटला, त्यापैकीं शिवाजी विठ्ठल व काशीकर राजा दोघांस जागिरी देऊन दहा लक्ष रुपये खंडेराव हरि पासोन रसद यांस आली. त्यांतही फाजल निघतें म्हणोन ऐकतों. हिशोबाचा फडशा झाल्यावर काय तें कळेल. तूर्त दहा लक्ष यांस आले.

खंडण्याचा ऐवज एक दतियेकर यांजपासोन दुसाला खंडण्याच्या बेरजा झांशीकराकडून गृहस्थ येथें आहेत त्याचे जबानी ऐकून सेवेसीं विनविलें होतें. यांत कांहीं माहितगारी राजश्री आपाजीराम यांस असावीसें वाटतें. याखेरीज किरोलीकरापासोन पैवस्ता पन्नास हजार घेतले व गुजरलेकर जमीदार गुजर आहे, त्यापासोन पैवस्ता लाख रुपये घेतले म्हणोन ऐकतों. इतकी जमा दों सालांत. यांत खर्च दुसाला ग्वालेर गोहदच्या मोहिमींत फौजखर्च व याचे वरंगळ वेबंदीचे, त्याचे तपसील खर्चाचे ऐकतां आश्चर्य वाटतें. फौजखर्चांत देशचे फौजेस पावतीचा विचार अगोदर विनविलाच आहे. देशचे मराठे यांचे हाल पाहतां बेहाल आहेत. घोडीं विकूनहि सावकारांपासोन सुटत नाहींत! दहा रुपये नानाशाही दर रावतास दरमाहा पावत असेल नसेल! मग त्याची स्थित कशानें राहावी? पलटणें म्हणजे पायदळ शिबंदीवर फार संतुष्ट होते, त्यास रुपया पुष्कळ दिला. ग्वालेर गोहदप्रांतीं कामें पायदळांनींच केलीं अशी समज आहे. मराठे जागां जागां गढ्यावर खासखासेच शेंकडों मेले असतां नाकारे झाले, आणि मोठी पसंत पायदळावर पलटणावर रून त्यास रुपया दिला! त्याची तरी चौकसी हाजरी गणती लिहिण्याचा बंद? रुपया दिला तो यथापद्धत, ज्याचा त्यास, जमादारास जमादारापासून प्याद्यास रुपया

पावला तरी कोठें? ब्रम्हगोळ! तोफखान्याचा मनस्वी खर्च. त्यांतील चौकसी पाहतां अयाळ तसेंच. इतर कारखानें पागा, हत्ती, उंट यांच्या चंद्या व लागाडे खर्च व खरिद्या चौकसीची विश्रांत बदलमुशाहिरा झाडून आदा झाला नाहीं. बारगीर आतां उठउठून देशास गेले. वरंगळ खर्च बेबंदच. मोतादच नाहीं. यास जमा म्हणावयास वरती लिहिलीच आहे. बाकी कर्जे साहुकारांचीं. त्यांत आबाजी नाईकच तीस लक्ष गातात. आदिकरून इतर साहुकार सोरटी व गद्रे आदिकरून व बाजारचे सावकार रांगडे गुजराथी निराळे, त्यांच्या बेरजाची माहितगारी कोठील? श्रमी आहेत! लाखोच सांगतात. सरंजाम पेस्तर तेस्तरसाल ती देखील खर्चीं पडेल म्हणतात. कांहीं खासगी पंचवीस लक्ष केली होती, ती खर्च पडली. इतकें वर्तमान चमेलपार दक्षणतीरचे मोहिमेचें व जमा व खर्चाचे ऐकतों. तत्वतां माहितगारी कोठून होणार? ऐकिल्या गोष्टी.

यंदा चमेल उतरल्या पासून जमा म्हणावयास परगणा ढवलपूर व वही दोन महाल अफराशाबखान असतांच यांनीं घेतले होते. त्यांचा आकार पांचसाताचा ऐकत होतों. आधीं चार वर्ष इकडे अनावृष्टि! अंमलदार हमदानी जलाद. ज्यानें कामांत माणसें मातबर गरीबांच्या अंगास चिरगुटें लपेटून, वर तेल घालून, अग्नि लाऊन उभीं माणसें जाळून रुपया घेतला, तो अंमलदार झाल्यावर त्या मुलखाची दशा आबादी वैराणीची काय पाहावी! दुष्काळांत रयत तमाम हिंदुस्थानांतील मेली. लावणीस कोणी राहिलेच नाहीं. जुजबी वस्ती राहिली, त्यांनीं लावणी केली. त्याचा पैका हमदानीकडील अमलदारांनीं नेला. सबब याचे अमलांत कमती आकार आला. बादशाही मुलखाची अवस्था चमेलपासून अगदीं जाटाचे मुलखांतून बादशाह व बावा समागमें फिरत होते. आगऱ्यावर येऊन मथुरेस आले. येथवर मुलूख सारे लष्करानें पाहिला. लावणीचें शेत कोठें पाहिलें नाहीं. डिगेहून कूच होऊन आगऱ्यास येतांना दहापांच गांवीं गहूं जव आगऱ्यापावेतों जंगलांत दिसले. वरकड जंगल वैराण, गवतच दिसत होतें. बादशाहाची भेटी जाटवाडयांत झाल्यापासून कंपेश जैपूरच्या सर्देवर दोन महिने मुक्काम होते. त्या काळांत बादशाही मुलखांत आफराशाबखानाचे अंमलदार होते, त्यांनीं वसूल घेऊन गेले. त्यास सवड दों तीं महिन्यांची सांपडली. आधीच रयत दुकाळानें मेल्यामुळें लावणी बुडाली. कांहीं जुजबी लावणीचा वसूल जुन्यांनीं नेला. नंतर यांचे अंमलदार यमुनाद्वारपार गेले. त्यांनीं जमा सख्ती करकरून धरिल्या. पैका कफलकापासोन येणें कळतच

आहे! निघाला तितका घेतला. तो त्याचेच खर्चास पुरला. यांस काय हातीं लागलें असेल तें न कळे! मेरट वगैरे महाल सरकारचे पंधरा लक्षांचे. तेथील आकार यांचे बापूजी मल्हारानें पाऊण लक्ष केला, तोही झाडून वसूल नाहीं! अशी दशा मुलखाची! यांचे कारकिर्दी अगोदर आफती, एक तर अनावृष्टि-मुळें रयत झाडून येथवर मेली कीं, एकला गांव निमाणसी जाला. एके घरचीं माणसें दहावीस जीं असतील तीं झाडून घरांत मेलीं. प्रेतें उचलावयास कोणी राहिलें नाहीं! हाडांचे सांपळे घरांत तसेंच पडून राहिले! ही गति चमेलपासून सरहद्द लाहोर काश्मीरपर्यंत पश्चमेस. पूर्वेस लखनऊपावेतों, किवहुना पुढेंही असा लोक मेला फार! बांचले ते लौकर अधिर होऊन निघोन देशांतरास गेले. पूर्वेस फार गेले. दक्षणेस लाखों माणूस गेलें. ग्वालेरचे मुक्कामीं लष्करांतून पुढें जात. हजारों हजारांच्या झुंडी एकामागें एक जात होत्या. मारवाडची हीच दशा! माळवा, नेमाड, बराणपूर हीं टाकून पुढें झुंडी गेल्या. ही थोरली आफत. कांहीं वस्तीस राहिले, त्यांस अंमलदार सख्त मुसलमान मिळाले. त्यांनीं बहालींत व हालीमाजींत लोक लुटून फस्त केले. या दोन्ही आफती भारीच पडल्या. यांचेहि अंमलदार मुलखांत गेले, तेहि जलाद, सख्त. मुसलमानास कमी नाहींत. सख्ती करावयास चुकले नाहींत. जमा मात्र सख्तीनें बांधल्या. वसूल घेण्यास सख्ती करतां कोताई केली नाहीं. रुपया मिळाल्यास घ्यावा. लोकच कफल्लक, यास काय करतात, यामुळें रुपया मिळाला नाहीं.

रजवाडचाच्या खंडण्या म्हणायास एक जैपूर, त्याची खंडणी बादशाही नजरेची बीस एकबीस लक्ष बेरीज मात्र ठराविली. वसुलाचा ठराव दोन लक्ष नख्त व दों लक्षांचें जवाहीर, तो वसूल मुदतीनें आला. बाकी सोळा सत्रा राहिली. ते मुलखांतून वसूल करून घ्यावे. पैकीं दहा लक्षांचे महाल द्यावे, सहासात लक्ष जैपूरकराचे पटैतावर वसूल करून घ्यावे, असा तपसील खंडणीचे वेळेस करारांत आला. त्याजबद्दल फौज हजार दोन हजार जैपूर प्रांतांत रवाना केली. त्यास पैका मिळत नाहीं. ही दशा एका खंडणीची! दुसरी खंडणीच झाली नाहीं. आतां बादशाहचा खर्च खासगीचा व फौजेचा, पैकीं, कांहीं जागीरदार आहेत ते महालचे ऐवजीं चाकरी करितात. इतकी कीं यांस पैका देणें पडतो. आपले फौजेचा खर्च जाती-वर, कर्जावर चालतो. कर्ज मिळालें तें घेतलें. पदरीं खासगी होती तीही खर्चीं पडली. शेष राहिलें असेल तर ज्याचें त्यास ठाऊक! आतां नवें साल लागलें.

कमाविसदार करून इकडील महालावर रसदा मागतात. तर दक्षणी यांची हिंमत कशी होते ? आधीं माहीत नाहींत. दुसरें टिकून या मुलकांत फौज राहील कीं नाहीं असे अंदेशे ! यांत हिंमत कोण करतो ? साहुकाराचे तलाशांत आहेत कीं त्याजकडे महालचे कमाविसदार लाऊन द्यावे, त्या साहुकारानें बादशाहाचा खर्च दरमाहाचा दरमाहा देत जावा. असा साहुकार कोण मिळतो ? यांनीं आपले येथील साहुकार आधींच खालीं करून ठेविले. यांत शक्ति राहिलीच नाहीं. हें वर्तमान येथील आहे. खरें आहे. एकिलें वर्तमान, खरी वहिवाट पाहतां कांहीं अंतर असलें तरी किती तफावत पडेल ? वर्तमानाची जात अशी आहे. मुख्य पक्षीं धनी, साहुकार व फौज राजी, व रयत आबाद, अशी नियत असावी. ती नसल्यास परिणाम काय ? त्याला वाली ईश्वरच आहे. त्याचे इच्छेनें घडेल तें खरें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Sadashiv Dinkar presents a graphic picture of the famine, depopulation, desolation of villages and fall of revenue collection in northern India, and the various difficulties which beset Mahadji Sindia in consequence of his accepting the regency of the Emperor of Delhi,—the internal disputes in his camp between Deccani troops and Hindustani Sepoys, his extreme financial stringency and the atrocities committed by Muhammad Beg, Hamdani's collector.*

No. 608* 20th December 1791.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीः—

विनंती सेवक महादजी शिंदे कृतानेक विज्ञापना तागाईत छ २३ माहे रबिलाखर मुक्काम नजीक घोसंडा प्रांत मेवाडपर्यंत स्वामींचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपा करून छ २७

---

*This letter remained to be placed in its proper order through inadvertence and is now printed last. The two preceding letters Nos. 606 and 607 have been added here from Parasnis's Itihasa-Sangraha, as they were important ones.

रबिलावलचें पत्र पाठविलें तें उत्तम समयीं पावोन आनंद जाहला. पत्रीं सरकारांत बाजांचें प्रयोजन आहे याजकरितां बाज चांगले पाठविणें म्हणोन पेशजीं तुम्हांस लिहिलें होतें. याचें उत्तर आलें कीं बाज कार्तिक मासीं पाठवून देतों. त्यास अद्यापि आले नाहींत, यास्तव लिहिलें आहे. तरी बाज चांगले तयार, कंबरेंत दुखावले नसतील असे पाठवून देणें म्हणून आज्ञा. तरी ऐसियास आज्ञापत्र आल्यापूर्वीच बाज दोन व जुरे दोन तरुण तयार येथें आहेत, त्यांपैकीं सर्वांत उत्तम पाहून मीर सिकारी याजबरोबर सेवेसीं रवाना केले ते उज्जनीस पोंचून पुढें गेल्याचें पत्र आलें. आजपर्यंत ते शहर बन्हागपुरास पोंचले असतील. तेथून दरमजल सेवेसीं येऊन पोंचतील. वरकड राजश्री रामजी पाटील जाधव यांसी लिहिलें आहे. सेवेसीं विदित करतील मग अवगत होईल. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Mahadji informs the Peshwa that he has already despatched the best tamed hawks that were ordered by him for his own use at Poona.*

HISTORICAL PAPERS

RELATING TO

MAHADJI SINDIA

INDEX

(Figures denote numbers of letters and not pages)

A

Aba Chitnis, Mahadji's Brahmin Secretary—263; 317; 337; 368; 370; 553; in vain attempts to reconcile Ali Bahadur to Mahadji 532.

Abaji Naik Wanawale, a banker—181; 259; 340; 341.

Abdul Ahad Khan—invites Mahadji to Delhi 250; inclined to an alliance with the English 311; 335; in prison 338; 339.

Abdul Hayat Khan (*mistake for* Abdul Ahad Khan)—69; 318.

Afrasiyab Khan, Delhi Minister—joins Hamdani's party 263, 270; makes overtures to Mahadji Sindia for his support 311, 318; his origin and character 323; 335; gives a setback to English intrigues 333; 339; 343; 352; 353; 359; 363; Sindia fails to secure his treasure 446, 447, 449; distressed condition of his family after Sindia's reverse at Lalsot 503; murdered at the instigation of Hamdani 606.

Ahalya Bai Holkar—her differences with Tukoji 121, 122; refuses to surrender her power 129; the Darbar suggests a compromise 132; Sindia's mediation with 164; Sindia's attitude suspected by 168, her attitude clarified 178; 181; Tukoji's increasing

demands 192; declines to make concessions to Tukoji 215, 217; Sindia unwilling to intercede 221, 224; dispute with Tukoji for control of administration 245, 253, 269, 271, 274, 296, 303, 307, 367; 459.

Akbar Shah—appointed heir-apparent of Delhi 560.

Ali Bahadur—appointed to command the relieving force from Poona 505, 508, 509, 510; 514, 515, 517; his slow march northward 522, 524, 529-533, 536-537; meeting with Sindia—despatched to capture Ghulam Qadir 539-41, 543, 545; arrives among the besiegers 548-49, 551; 552, 554; captures Ghulam Qadir 555; 556; recalled by Sindia 557; offends Sindia by giving protecion to Gosavi Himmat Bahadur 558, 559; his action upheld by the Poona Darbar 561, 562, 564-66; sets the Gosavi free 570; his indifferent conduct in the battle of Patan 574, 578; rupture with Sindia 580, 590; declines the farewell ceremony 582; his activities in Rajputana 591 and his intrigues with Ismail Beg 597.

Aligarh—See under Ramgarh.

Ali Yar Beg Khan—defeated at Merta 579.

Alwar—See under Macheri.

Ambaji Anandrao—82.

Ambaji Ingle—posted at Gwalior and threatened by the English 69, 92, 106, 107; loses Gwalior to the English 109, 111; 120, 122; opposes the British advance in Malwa 124, 131, 135, 145, 155, 163, 174; 261; dispatched to Dig 266; sent to negotiate with the Emperor 289; 322; 337; watches the movements of the Sikhs 351, 352, 354, 358, 365, 366, 373; pacifies the Sikhs 409; appointed for the Jaipur expedition 411; sent against the Mewatis 431; 477; 483; 489; the battle of Lalsot 500; 529; 542; sent against Ismail Beg 570, 571; 600.

Amrut Rao, Raghoba's son—2; attacks Ahmedabad 80; with the English army on the Mahi 86, 90; 129; 130.

Anand Rao Pawar—348; 375; 385.

Anand Rao Nimbaji, Maratha Vakil with Tipu—276;292; 311; 316; 317; 319; 326.

Anand Rao Sheshgir, Nana's agent—348.

Anand Rao Narsingh Yerulkar—Sindia's Vakil with the Emperor 207, 351, 359; 369; 372; 407; 409; 411.

Anirudh Singh Bundela—351, 422.

Anandi Bai Nimbalkar, Mahadji's sister—301; 317; 346, 390 396; disappointed in her mission to Sindia 407; dies 478.

Anandi Bai, wife of Raghoba—330.

Anderson, David (*Senior*), English envoy—dispatched to Sindia to negotiate peace 180, 188, 190; opens negotiations 191-92, 194-96, 198-99, 202, 209, 213; presses for the ratification of the treaty 216, 218, 219; 265; reward of a Jagir suggested for him 255-56, 261, 264, 265; 268; 271; retires from Sindia's court (December 1783) 272; 273; 284; 285; 288; 344.

Anderson, James (*Junior*)—succeeds his brother at Sindia's court (in December 1783) 272, 290, 292-94; objects to the non-fulfilment of the terms of Salbai by the Poona Darbar 307, 310, 330; 311; 316; 320; 321; question of the grant of Jagir discussed 329, 330, 333, 334, 338, 339, 344, 351, 355, 361-62, 365, 367; Jagir declined 393; conciliated and returns to Sindia's camp 456; his retirement 495.

Anup Gir Gosavi—See Himmat Bahadur.

Appaji Ganesh—43.

Appaji Nimbalkar—279.

Appaji Pant Damle, Ali Bahadur's Fadnis—558; 562; 582.

Appaji Ram Dabholkar, Nana's agent with Sindia—44; 45; 59 75; 103; 104; 112-13; 124; meets Ahalyabai 181; suggests basis for the treaty with the English 188, 193, 194, 202; 208, 209; 216, 245; his difficulties at Sindia's court 260-263, 270; 277-278; 283; 290; 317; 324; 367; 375; 376; 484; reports

to Poona Sindia's precarious position 502, 503, 510, 518, 520; reports graphic details of the battle of Agra 525; exposes Holkar's falsehood 542; 551; 555; advises the Darbar against Sindia's retirement from Delhi 556; 559; 560; makes a futile attempt at Ali Bahadur's conciliation 582; 588.

Asaf-ud-daula, Vazir of Oudh—saves Hastings during Chait-singh's revolt 181; 292; 309; receives the Shahzada 310, 311; 316; 318; 338; 351; 355; 365; 383; 478.

Ataulla, Maulvi—requests Sindia to save Delhi 530.

B

Babarao Govind Karmalekar, Nizam's Vakil with Sindia—295; 301; 346; 390; 466; returns unsuccessful in his mission 478.

Baburao Bhaskar, Nana's agent in Bundelkhand—262; 317; 324; 367.

Baburao Keshav Thakur, Nana's agent—46; 360.

Baburao Mirikar—474.

Baburao Vishwanath Vaidya, Nana's Vakil.—132; 182; 215; 274.

Bachaji Barve, son of Bajirao Govind Barve (?)—18.

Bahirji Takpir, Mahadji's son-in-law—2; 16.

Bajhudi Khan—266.

Bajipant Anna Joshi—sent into Konkan to quell the Pretender's rising 30; 38; attacks the English near Kalyan 105; 123.

Bajirao Govind Barve, Raghoba's partisan—his activities in, Gujarat 128, 129; in Karvir 167; joins Raghoba 170, 172 192.

Baji Vithal, Ahalya Bai's agent at Poona—179.

Bajeed Khan, in charge of Afrasiyab Khan's artillery—makes overtures for surrendering Agra to Sindia 359, 363, 373; 408; imprisoned by Mahadji 447.

Bakhtavar Singh, son of Rao Raja of Macheri—585, 586.

Balaji Anant Pagnis—283.

Balaji Govind Bundele—7; 8; 10-12; 58; 153; 302; 309; 367.

Balaji Mahadeo—78.

Balajipant Ranade, Fatesingh Gaikwad's agent at Poona—91.

Balanand Mahant, Jaipur envoy—search for a peaceful settlement 470, 476.

Balarao Govind, Sindia's Diwan—present at capture of the Pretender 21-24, 26; 32; 33; clears up misunderstanding between Nana and Mahadji 75; 159; 165.

Baloji Ingle—sent against Jaipur 411, 431, 432, 470; reducing Jaipur territory 476; engages the Sikhs 571; 575.

Balwantrao Aswalkar, Ali Bahadur's Diwan—558, 574.

Balwant Rao Dhondadeo Naogaonkar, Peshwa's Sardar in the north—126; 135; 155; his services in the war 163; 312; his death, his two wives become *sati* 368.

Balwant Rao Patwardhan—implicated in a plot against Nana Fadnis 101.

Bapu Bhave, Nana's agent—367; 450; 465; 493; his death 519.

Bapuji Holkar—72; 574; recalled by Tukoji 583; bribed by Bijay Singh of Marwar 585, 586.

Bapu Malhar, Sindia's Sardar—154; takes over Afrasiyab's Jagirs 358; 406.

Bapuji Nimbalkar—279, 345.

Beni Hazuri, Diwan of Panna—351; 407; 411; defeated by Khanderao Hari 422; 478.

Bhagirath Rao Sindia, Sindia's Sardar—fighting in Khandesh 50-53; sent to Gujarat 56, 57, 61-62, 68, 72, 79; 84, 86, 95; leads expedition against Gulzar Khan 114; despatched to relieve Delhi 528, 530, 537.

Bhapkar—115; 128; 160; 170.

Bharamal, Nizam's Sardar—603.

Bhavani Kuvar—315.

Bhavani Shivram—121.

Bhavani Singh Munshi—absconds with Afrasiyab's treasure 446.

Bhimsen, Vakil of the Sikhs—351.

Bhim Singh, Diwan of Udepur—submits to Sindia 599.

Bhikaji Holkar—inflicts torture on the Diwan 586.

Bhikaji Palande, Ali Bahadur's Fadnis—exposes Holkar 542; 558; 562; his death 581.

Bhivraj Bakhshi of Jodhpur—defeated at Merta 579.

Bhivrao Panshe—in pursuit of the Pretender 18, 19, 22; 24; 37; 48.

Bhonsle of Nagpur—107; 110; 117; 130; gives passage to English troops 170; his double dealing policy in the war 174, 175; his mediation rejected 183; 185; 191; his treachery 194-196; 199; 202; 214.

Bijay Singh—See Jodhpur, Raja of.

Bilas Ray, Ghulam Qadir's Diwan—captured 555.

Boddam, R. H.—97; appointed Governor of Bombay 314.

Browne, Major, English Resident with the Emperor—355; retires 365; 388.

Budh Singh, Diwan of Keroli—289.

Budh Singh, Jodhpur envoy—arrives in Sindia's camp 586.

Burhan-ud-din, Tipu's officer—481.

Bussy, Monsieur—252; 260.

C

Camac, Major—campaign in Malwa 130, 138.

Chanderi, Raja of—155; joins Sindia 157; 169.

Changoji Kadam—315; 328; 334.

Chandrarao Pawar, Raghoba's partisan—creates disturbances in Khandesh 68, 108, 111.

Chait Singh of Benares—attacks Hastings 171, 173-74, 175-76; flies and seeks Sindia's protection 181, 192, 194, 198; efforts made to drive him from Sindia's court 214; 351.

Chimapa Panse—40, 41, 47; 85; 121.

Chimnaji Khanderao—385.

Chimnaji Mankeshwar—336.

Chintaman Dikshit—68.

Chintaman Hari—67, 71.

Chinto Anant Devasthale, Raghoba's partisan—101.

Chinto Vithal Rairikar, Raghoba's partisan—92; foiled in the attempt to escape 96, 97; 101; another attempt to escape 120.

Coote, Sir Eyre—his arrival at Madras 130; engages Haidar 170; 174, 175.

Cornwallis, Lord, G. G.—declines military aid to the Marathas 485; war with Tipu Sultan 595, 603, 605.

D

Dadaji Gangadhar—356.

Dada Potnis—implicated in the plot against Nana Fadnis 101.

Datia, Raja of—146; joins Mahadji 153-57.

Daulat Ram Haladya of Jaipur—negotiates alliances hostile to Sindia 468, 470, 473, 476; pursues Sindia after the disaster of Lalsot 503.

Dayaram Purbi—mutinies against Sindia 503.

Dayaram, Raja, Emperor's Diwan—363; removed from office by Sindia 364.

De Boigne, General—distinguishes himself in the fighting at Agra 524, 525; battle of Patan 570, 574; his success at Merta 579.

Devji Gauli—invests Raghavgad 407, 412; dispatched against the Gosavis 473.

Delhi Politics—rivalry between Maratha and British interests 294, 297, 304-5, 311-12, 316, 318, 321, 330, 337-39, the English withdraw; Sindia's meeting with the Emperor 342; the Poona Darbar's support to Sindia's measures 349, opposition to Sindia growing 358, 363, 369, 381, 406, 407; Rajput opposition straitens 409, 411. (For subsequent development see Mahadji Sindia, Rajputs, Jaipur campaign, etc.)

Dhar Rao Nimbalkar—279; wounded in the fighting at Agra 525.

Dhar Rao Sindia—sent against Ramgad 407; 431; leads expedition against the Sikhs 473; at Lalsot 500; sent to relieve Delhi 528.

Dhokal Singh, brother of Anirudh Singh—351; 422.

Dhondo Ramchandra—551.

Dhulap—243.

Divakar Pant Chorghode, Diwan of the Nagpur Raja—47; 50; 60.

Durlab Shet.—88.

E

Emperor Shah Alam—Sindia's futile negotiations for his aid against the English 106-11, 117, 119, 131, 135, 160, 161, 167, 192; rivalry between the Marathas and the English for his control 297, 311-12, 316-18; meets Sindia at Agra 325, 330, 332, 335, 338, 339; appoints Sindia his regent 342-44; 351-52; 355; 358; his differences with Sindia 363-64, 369; 371; his vacillating temper 381; 388; his intrigues against Sindia

400, 403; 407; 409; his secret encouragement to the Rajputs 411; his intercourse strictly watched 429; his demands on Sindia 476, 485; his volatile character 488; 501; 511; joins the rebels 512, 513; defeated by Najaf Kuli 518; his savage treatment by Ghulam Qadir 530-31, 533; re-instated on the throne 560; 606.

English, the—24; 48; fighting in Gujarat 52, 61, 68, 69, 70; 76; attack Ahmedabad 79-82; capture Ahmedabad 84-85; advance to the Mahi and Baroda 86-91; surprise Maratha forces 92; 95-97; retire on Baroda 98; 99-101; 105; attack Sindia's territory in Malwa 106, 107; capture Gwalior 108, 109; 111; 117; 119; advance on Ujjain 121-22; attack on Bassein 125; 126; 133; press on towards Sironj 135; attacked by Sindia 136; retreat towards Chanderi 137-40; surprise Sindia 141-43, 145-46; 147-49; 151-52; the strength of their Malwa force and its strategy 153; 154; 157-61; 162; 166-67; ask for terms 169; deserted by their allies 171, 173; 174-75; 181; 184-85; their peace-parleys with Sindia 188-89, 191, 193-96, 199, 202, 209; 208, 213-14, 216, 218-19; urge the Darbar to declare hostilities with Tipu 228, 251-52, 260, 267-68, 273, 276; 243; their ready performance of the treaty of Salbai 248; 254; 256, 257, 258; make peace with Tipu 292-93; 294; 297; their views towards Delhi suspected 305, 314; 375, 376; 379; 381; 383; 386; turn down Sindia's demand of tribute from Bengal 388; 389; intrigue against Sindia 400, their neutral attitude in Maratha-Tipu war 402; 410; 411; 418; 428; 437, 443; 446; 478; decline military aid to the Marathas 485, 487, 497, 498; war with Tipu 569.

F

Farmer, English hostage—released 90, 97, 100.

Fate Singh Gaikwad.—6; his dispute with Govind Rao Gaikwad 43; 53; 56; 61; 67-8; joins Raghoba and his English friends 73,

79; captures Ahmedabad 80, 81-2, 84-7; his Diwan's machinations 88; rejects Sindia's overtures 89-92, 97, 100; 101; 128; 132; 176-77; 192; his feudatory position to the Poona Government 208, 214, 248; 220; 225; 310; 316; 326; his relations with the Poona Darbar 330; 337; 434.

French, the—94; 128; 209; 251, 252, 257, 260; their negotiations with the Poona Darbar 428.

G

Gaj Singh—351.

Gamaji Patil, agent of Fate Singh Gaikwad—330.

Ganeshpant Behere, Peshwa's General—engages Raghoba 19; 24; sent to relieve pressure in Gujarat 75, 80, 82, 84, 87-8, 90; posted at Kondai Bari in Khandesh 112, 115, 122, 128; 131; engages the English near Songad 160; 170; reinforced 192; 442; 445; 481.

Ganeshpant Chakradeo—351; 358.

Gangabai, wife of Narayan Rao Peshwa—3.

Gangadhar Govind Bundela—146; 153; 156-57, 175-77.

Gangaram Bhandari, Jodhpur Sardar—defeated at Patan 574, 575; defeated at Merta 579.

Ganoji Kadam—2.

Gautama Bai Holkar, Malhar Rao's wife—253.

Ghazi-ud-din—302.

Ghulam Murtaza Khan—362.

Ghulam Qadir, a Rohila Chief—351; joins the rebel Gosavis 473; joins Ismail Beg at Agra 512, 513; his revolt spreading 518; engaged by Rana Khan 520, 521, 522; separates from Ismail Beg 524, 525, 527; 529; sudden march on Delhi 528, 530; his atrocities on the Royal family 531, 533; sacks the capital 532; escapes from the capital 537, 538; is surrounded at Meerut

539, 540, 541, 543, 545, 548-49; his defences stormed 550; is captured 551, 552, 555; measures to seize his family 556.

Girmaji Malhar—155.

Goddard, English General—47, 50; engages Sindia near Pawagad 101; presses towards Maratha capital 128, 130, 131; engages the Marathas near Kalyan 134, 135; ascends the Bhor Ghat 136; arrives at Khopoli 140, 148, 160; retires 166-67; 169; 173; makes overtures of peace 174, 175; threatens Sindia's rear 176, 177, 186; his negotiations 190; 192; 194-96; 208-09; his meeting with Sindia 247.

Gohad, Jat Rana Chhatrasal of—joins the English and threatens Sindia's territory 69, 70, 92, 106-09, 111; 121, 140; 144; makes advances to Sindia 146; 153-55, 169; deserts the English 171, 173-74; 181; attacked by Sindia 192; 247; 265; offers to surrender 266; besieged at Gohad 278, 280; surrenders the fortress 283, 284, 285, 288; flies to Keroli 289; 351; 357.

Gopal Ballal Deo—310; 316; 330.

Gopal Joshi—plots against Nana 101.

Gopal Rao Ramchandra, Fate Singh's agent at Poona—88; 97; 101.

Gopal Rao Raghunath Chitnis—sent against the Rajputs 571, 574; at the battle of Merta 579, 581; marches towards Jodhpur 583.

Gopal Rao Solaskar—591.

Gopal Sambhaji Khandekar—417.

Gopika Bai, Peshwa's grandmother—8; 379.

Govind Gopal Kamtekar, Gaikwad's Diwan—86; his intrigues with the English exposed 88, 90, 91; rejects Mahadji's overtures 97.

Govind Rao Deshmukh—97.

Govind Rao Gaikwad—opposes Fate Singh and joins the ministerial party 43; 90; 107; 110; 116; 155.

Govind Rao Mankar—355.

Govind Shivaram Khasgiwale—355.

Gujarat Campaign—See under the English and Mahadji Sindia.

Gulzar Khan, Pathan, Raghoba's partisan—his revolt in Khandesh 50-1, 53; 108; 111; 114; 129; defeated 178.

Guman Singh Bundela—291; 351.

H

Haider Ali of Mysore—50, 52, 76; treaty of alliance with the Marathas 83, 94, 100; his success in the Karnatak 106, 107, 110; 117; 121; 128; 130; demands Sindia's guarantee 133, 149; 169; attacked by Coote 170; attempts to detach him from the alliance 174-76, 180; 181; 184-85; attempt to exclude him from the treaty 183, 191, 193, 194, 202, 209, 214, 220, 329.

Hamdani—See Muhammad Beg Hamdani.

Hanmant Rao Jadhav—308.

Hari Babaji Ketkar—340, 341.

Haripant Bhide, Raghoba's partisan—11.

Haripant Phadke—1; in pursuit of Raghoba 5, 7; 11; 16; 41; 43; 49; 60; plot against his life 101, 118; 127; opposes Goddard in Konkan 134, 140; his relations with Sindia 150; 160; engages the English near Chauk 166, 167; 170; 173; 184; 187; 194; 229; 272; persuades Raghoba to surrender to the Poona Ministry 275; 276; 284; his expedition against Tipu 325; 331; 428; 435; 461; 481; 485; captures Gajendragad 490; 491; 492; 595; 603; 604-05.

Hastings, Warren, G. G.—his anxiety for peace 169; attacked at Benares 170-71, 176-77; deputes an envoy to Sindia 180; his escape from Benares 181; 189; 194; 195-97;199; 209; 216;

226; 284; prospective meeting with Sindia 285; 292; 293; 294; 305; 309; offers protection to the Shahzada 310, 313; intrigues at Delhi 311; 314; 316; effects a settlement with Tipu 321; 324; 325; 330; 335; withdraws from Delhi affairs 337-39; 344; 346; 351; his retirement 355; 357; 361; 362; 365; 367; 394.

Himmat Bahadur, Anup Gir Gosavi—192; 207; 250; 262; 270; 280; mediates between Sindia and the King 311; 323, 339, 351, 359; under the displeasure of the Emperor 363; 365; deserts Sindia 373; his Jagirs confiscated 408; revolts against Sindia 415; 432; 473; 483; 537; evil practices against Sindia and takes asylum with Ali Bahadur 558, 561-63, 566; set at liberty 570; 586; 583; 606.

Hindupat Bundela—351.

I

Ilmas Khoja—309; 311; 365; 383.

Ismail Beg, a Hindustani Chief and Hamdani's nephew—follows Sindia after the disaster of Lalsot 503; invests Agra 504, 509; joined by Ghulam Qadir 512, 513; advances to the Chambal 516, 518; engaged by Sindia's horse 520, 521, 522; is defeated and his army destroyed 525; 527, 528; 529; joins Ghulam Qadir in the Delhi adventure 530, 531, 532; quarrels with Ghulam Qadir 533 and joins Sindia 537, 538; engaged with Najaf Kuli Khan 539, 540, 543; 551; a thorn in the Maratha side 556; intrigues with the Rajputs 565; breaks with Sindia 570, 571; defeated in the Battle of Patan 573; his force destroyed 574, 575; 533; creates trouble in Gujarat 583; a mere fugitive 597; defeated near Kanod 600-02.

Ismail Khan of Ellichpur—6.

J

Jahangir Khan, Afrasiyab Khan's brother—imprisoned by Sindia to discover the treasure 432, 446, 447.

Jaipur expedition—411; the Rajput coalition seeks aid from the English 418; rival claimant supported by Sindia 432; 468; search for a peaceful settlement 470; the Jaipur prince rejects Sindia's terms 476; 483; 489; battle of Lalsot and M. Sindia's retreat 500-03; Agra invested by Hindustani battalions 504; Mahadji promised aid from Poona 505-09; 510; 511; 514-15; denied relief from Poona 516; division in the rank of the rebels; the Rajputs separate from the Hindustanis 518 (For subsequent developments see under Rajputs and M Sindia).

Jaipur, Raja of, Pratap Singh—218; agrees to pay tribute 406; his mismanagement : expedition against him by Sindia 411; 415; setback at Lalsot 500; opens negotiations with Sindia 585; makes peace 591.

Janardan Lakshman Vaidya—559.

Janjira, Sidi of—375; 379.

Jawan Bakht—See Shahzada.

Jiwaji Ballal alias *Jiwba Dada Bakhshi*—45; conducts siege of Gohad 280, 283; dispatched against Ismail Beg 518, 524; wounded at Agra 525, 527; 529; 530; dispatched to the relief of Delhi 538; invests Ghulam Qadir in Meerut 539; captures Ghulam Qadir 555; dispatched against the Rajputs 570-71; battle of Patan 574; battle of Merta 579, 581; marches towards Jodhpur 583; 606.

Jiwaji Gopal—34; 39; 64.

Jodhpur, Raja of, Bijay Singh—under Sindia's displeasure 351; 411; 476; battle of Lalsot 500-02; his attempt on Sindia's life 557; his army defeated at Patan 574 and at Merta 579; terms granted by Sindia 587; withdraws support from Ismail Beg 597.

Johnson, Capt.—210; 451.

K

Kalyan Rao Sindia—35, 37.

Kapur Singh—144.

Kasiba Holkar—provokes Ismail Beg 571, 574; 583; bribed by Bijay Singh 585; 586.

Keroli, Raja Manikpal of—shelters Rana of Gohad 289.

Keso Anant, Sindia's agent—51; 97; 222; visits Raghoba at Surat 275, 411.

Keso Krishna Datar, Raghoba's partisan—50; 108; 109; 112; 131; 315; 328.

Khairat Khan, Emperor's servant—332.

Khanderao Hari Bhalerao—59; opposes the advance of the Rana of Gohad 69, 92, 106-07; 154; his expedition to Bundelkhand 373, 407, 411; 478, reduces Panna 422; 431; 489; battle of Lalsot 500; 506; 512; defeats Ismail Beg near Kanod 600-02 606.

Khanderao Nimbalkar—279.

Khando Avji—43.

Khanduji Ingle—412.

Khechi, Raja of—invested Raghavgarh 407, 412, surrenders 415.

Khem Raj Chaube—478.

Khubchand Sangai, Marwadi Sardar—killed for supporting Ismail Beg 597.

Khuman Singh Bundela—291, 351, 407, 411; killed 478.

Khushali Ram Bohra, of Jaipur—470; tries a peaceful settlement with Sindia 476.

Khushali Ram Halalya—murdered 15th November 1784, 606.

Kirkpatrick, Capt., W.—appointed Resident at Sindia's court 495.

Kolhapur, Raja of—Mahadji's expedition against, 121.

Kolhatkar—542.

Krishnaji Ambadas Mujumdar—483, 485.

Krishnaji Narayan Joshi, Poona Vakil to Haidar—94; 133.

Krishnaji Pawar—126, 127, 140; 155; 188; 312; 385, 606.

Krishna Rao Kale—64; 76; 180; 187.

Krishna Rao Mehendale—5; 481.

Krishna Rao Bapu Bhave—(See Bapu Bhave).

Krishnoba Chitnis—558; his scuffle with the cavalry 591.

L

Ladoji Shitole Deshmukh, Mahadji's son-in-law—332; royal title conferred on 411; 484, 488; dispatched against Jaipur 580, 581, 582.

Lakhba Dada—558; battle of Patan 574; battle of Merta 579.

Lakshman Anant—575.

Lakshman Pant Kolhatkar—28.

Lakshman Rao Chitnis—52; 57; 61-62; 68; 77.

Lakshman Sambhaji, Jaipur envoy—586, 591.

Lala Fatechand Munshi—47, 52.

Lala Naubat Ray—431.

Lalaji Ballal Gulgule—persuades Zalim Singh to join Sindia 142; 431.

Lesteneau, Monsieur, French adventurer—deserts Sindia 504; 524; 525.

M

Macheri, Rao Raja of, Sindia's ally—218; 407; dispatched against Jaipur 409; his hatred of Jaipur; instigates Sindia to attack the state 411; 432; 470; 476; offers shelter to Sindia on his retreat from Lalsot 502.

Macleod, Col.—545.

Macpherson, John—succeeds Warren Hastings as G. G. 355; 365; 392, 411; 419.

Madhav Rao Gangadhar, Sindia's Diwan—263; 328; 368; 370; 374; disgraced 430; insane 431.

Madhavrao Narayan—See Peshwa Madhvarao Narayan.

Madhavrao Ramchandra (Kanade)—560.

Madhukar Shah Bundela—351; 407; 478.

Mahabat Jang—surrounded at Adoni 481.

Mahadajipant Gogte, Raghoba's partisan—92; 97; imprisoned 101.

Mahadji Pant Guruji—1, 4, 5-7; 10-12; 17; 32; 35-73; 42.

Mahadji Sindia alias *Patil Bawa*—concerts measures to seize Raghoba 1; 2-3; negotiates for his return 4-12; his terms for support against Raghoba 14; 15-17; defeats the Pretender 18-20; the fugitive captured 21-23; 24-26; leads expedition against Kolhapur 37-40, 42, 44-45; 50; his differences with Nana Fadnis 59, 60, 77; Gujarat campaign 50-53, 56-57, 61, 68-70; marches towards Gujarat 71, 74; 75; fails to relieve Ahmedabad 79-82, 84-85; his views about alliance with Haidar 83; draws near the enemy 86-88; his futile overtures to Gaikwad 89-91; releases the hostages 89; surprised by the enemy 92; 95; protests against the minister's treatment 97; an attack on the enemy miscarried 98, 99; releases British hostages 100, 101; retires to Malwa 103-06; anxious over the enemy's advance in Malwa 107-08; his strategy to meet the new situation 109; 110-15; fighting in Malwa 121-28; offers a guarantee to Haidar 133; moves towards Sipri 134; engages the English at Sironj 136-40; surprised by the enemy 141-43, 146; 149; irritated with Nana 150; his army depressed 152; 153-54; his weakness in artillery 157; 158-61; 164; 167; his attitude to the dispute between Ahalya

bai and Tukoji Holkar 168; peace-parleys with the British 169, 173, 174-79, 182-84, 188-95; receives Anderson 196, 198, 199, 202; additional articles suggested by the Poona Darbar 208; presses for the ratification of the treaty 209, 210, 214, 216, 217; expedition against Gohad 218, 219; 221; invites Raghoba to his protection 222; 224; captures Gwalior 244; his attitude in the Holkar dispute 248, 253; his meeting with Goddard 247; and meeting with Mirza Shafi, discussing control of imperial affairs 207, 250; urges Nana to start hostilities against Tipu 251,252;260,268,272; advises the grant of a Jagir to the English ambassador 255, 261, 264, 334, 344; 266; 267; 269, 274; 275; invests Gohad 277, 278, 280; captures Gohad 283; prospective meeting with Hastings 285; resents Peshwa's partiality to Holkar 291; 292; his manner of conducting business 293; suspicious of the activities of the English 304-05, 310, 313, 316, 321; 319; his view of the situation at Delhi 297, 312, 318, 322, 335,339; marches to Agra to meet the king 332, 335, 339; his meeting with the Emperor and acceptance of the regency 342-44, 349; 351-53; captures Agra fort 354; his administration of the imperial affairs 358-69; protests his innocence in the matter of the royal dignities 372, 374, 377-78, 391; 398-01, 403-04; his difficulties as regent 381, 406; his demand of tribute from Bengal turned down by the English 388; his expeditions against Ramgad, Khechiwada and Bundelkhand 373, 407, 408; change in his seal 411, 429; the strength of his army 420, 423; his success at Ramgad, fails to secure Afrasiyab Khan's treasure 432, 446-49; his expedition against Jaipur 409, 411, arrives at Lalsot : his heavy demands on Jaipur 470, quarters an army on the Jaipur State 476, 483, 485, 486, 489; battle of Lalsot 500; retires on account of defection in his Hindustani battalions 501-03; adopts guerilla tactics 504, 512, 513; calls for aid from Poona 507-09, 510, falls back on the Chambal 514; the Poona Darbar neglects to re-inforce him 516, 519; resumes the offensive : his strategy for breaking up the enemy's

combination 521-22; defeats Ismail Beg at Agra 524, 525; fails to save the capital during Ghulam Qadir's atrocities 530-32; drives Ghulam Qadir out of Delhi 535-38; his meeting with Ali Bahadur 539, 540; Holkar's attempt to frustrate his Rajput policy 541, 543, 545-47; wishes to retire from the regency 548, 549; details of his capture of Ghulam Qadir 551, 552, 555; attempt on his life by the Jodhpur Raja 557; his differences with Ali Bahadur over Himmat Bahadur's possession 558, 559, 561, 562, 564-66; his meeting with Tukoji Holkar 560; expedition against the Rajputs and Ismail Beg 570, 571; the battle of Patan : Holkar's treachery against him 573-76; his victory at Merta 579; his split with Holkar and Ali Bahadur 580-84, 588-90; arrives in Marwar 586; terms granted to Jodhpur 587 and to Jaipur 591; takes Ajmere 592; goes south to meet the Peshwa 596, 597; captures Chitore 599; his skilful handling of the situation on Afrasiyab Khan's murder 606; 607.

Malet, Charles Warre—visits Sindia 369, 408-09; his appointment to the Poona Residency 424-28; arrives at Poona 437, 440; 443; 451; 452; 460; 487.

Malharji Holkar—253.

Malhar Rao Pawar—Wounded at Kolhapur 44.

Malhar Rao Sumant—36.

Manaji Gaikwad, brother to Fate Singh—597.

Manaji Sindia, Raghoba's partisan—170.

Man Singh of Jaipur—476.

Manyar Singh, Ghulam Qadir's Sardar—captured 555.

Manzur Ali—See Nazir Manzur Ali.

Meherban Khan—363.

Merta, battle of—579

Mir Ali Naki Khan, Sindia's agent to the King of Delhi—153.

Mirza Amani—See Asaf-ud-daula.

Mirza Rahim Beg—325; 407.

Mirza Shafi—meets Sindia 207, 250; 262; murdered 266, 270; 318.

Moin-ud-daula—183; 481.

Montigny, Monsr. French envoy—makes overtures to the Poona Court 128; his mission to Poona 427, 428.

Moro Baburao Fadnis—59.

Moro Bapuji Phadke—362; 379; 389.

Moro Gangadhar—336.

Moro Hari—implicated in the plot against Nana Fadnis 101.

Moro Vyankatesh—1.

Motamal—tries to assassinate Sindia 557.

Mudhoji Bhonsle—2; 6; 65; 435; 437; 445; 467.

Muhammad Ali of Arcot—214.

Muhammad Beg Hamdani, Mughal chief—218; murders Mirza Shafi 266, 270; defeated 339; 351; taken into service by Sindia 358; 412; killed in the battle of Lalsot 500, 503; instigates the murder of Afrasiyab Khan 606.

Muir, Col.—opens peace negotiations with Mahadji 169, 180.

Muni Beg, Ismail Beg's father—585, 586; captured at Goku garh 597.

Murar Daulat (a slave)—582.

Muzaffar Bakht, Mirza, Shahzada—visits Poona for being appointed heir-apparent 560, 569, 572, 575, 594, 596, 599.

N

Najaf Khan, Vazir of Delhi—6; 69; 70; 106-09; 111; 117; 119; 131; 156; 160-61; 167; 173; his sickness 192; overtures to Sindia 197, 198; 250; his death 318; 323.

Najaf Quli Khan, Mughal chief—266; 311; his jealousy of Sindia 352; meeting with Ambuji Ingle at Delhi 358; 363; meets Sindia 381; dispatched against Jaipur 409, 411, 432; 470; 476; defeats the Emperor 518; his fighting with Ismail Beg 539, 540; his difference with Ismail Beg composed 543; 551; 585; 586.

Nana Fadnis—takes measures to prevent Raghoba's escape 1; 2; 7-8; 11; 13; 28; 41; 59; 75; forms a treaty of alliance with Haidar 83; 92-96; his double-dealing policy towards Sindia 97; plot against his life 101; 102; his confidence in Sindia 110; 119; 121-23; mutual jealousy of Maratha Sardars 125; receives overtures from the French envoy 128; 131; 134-35; perturbed over Goddard's advance 140; 150; 158; 160; advises not to abandon the Gujarat campaign 161; 164; Goddard defeated 166-67; defeats the enemy's attempt to break up the alliance 174-75; 179; 180; 182; 184-87; discusses terms of the treaty of Salbai 188-92; 194-99; 215-16, 219; 224; calls for military aid from the English 252; composes the Holkar dispute 253; 254; urges ratification of additional articles 256, 258; his opinion about a Jagir to Anderson 261, 264; 268; 273; 276; offers terms to Raghoba Dada 275; a Jagir to Anderson again discussed 310, 315, 329; 327; 330-31; 334; 337; 340; 341; 342; 345; 347; 354; 372; 446; 447; 451; sends presents to the Emperor 453, 454; his anxiety about British aid against Tipu 479-80; his love of collection of rarities from the north 485, 489; promises Sindia assistance after Lalsot disaster 505, 509; delays reinforcements 514, 516; an attempt on his life 533, 534, 542, his partiality to Ali Bahadur in the Gosavi dispute 561-62 (Also see Poona Darbar).

Narayan Das, Diwan of Afrasiyab Khan—343; 358; 363; 364; imprisoned by Sindia 432, 447; 606.

Narayan Rao Sindia—killed at Agra 525, 527.

Naro Ganesh Shauche, Holkar's Diwan—7; 49; 79; 90; arrives in Sindia's camp 558; disgraced 586.

Naro Gopal, Raghoba's partisan—92; 97; imprisoned at Mandosar 101.

Naro Krishna Bhate—499.

Naro Shankar, Mahadji's agent—13; 33; 38; 43.

Naro Shivdeo, Nana's agent with Sindia—16; 33; 59; 64; 75; 77; 91-2; 111-12; 118; 124; deputed to Ahalya Bai 129; 132; 168; 203-04; 216-18; 287; 317; 347; 367.

Narsingh Rao Ballal—395.

Narsingh Rao Deshmukh, father of Ladoji Shitole—332.

Narsingh Rao, Haidar's Vakil at Poona—83, 133.

Narsingh Rao Govind—167.

Narwar, Raja of—joins Sindia in the war 140, 169, 171-74.

Naubat Rai—503.

Nazir Manzur Ali—admits Ghulam Qadir's force in the capital 530; plundered by the Rohilla 533; captured at Meerut 551, 555.

Nizam Ali Khan—1; 3; 107; 110; 117; his treacherous conduct in the war 174-75; offers mediation 180; 183; his shifting conduct in the alliance 184-85; 191; 195-96; 199; 202; 214; his meeting with Nana Fadnis at Yadgiri 314, 319; 326; 331; 346; campaign against Tipu 435, 437, 438, 442, 445, 451, 467.

Nizam-ud-din, Shah, Sindia's Vakil with the Emperor—351; 407.

Noor Muhammad Khan, Tipu's Vakil—251; 268; 316; 326; 331.

Naronha, a Portuguese gunner in Peshwa's employ—121.

Nyahal Pal, brother of the Raja of Keroli—289.

P

Padam Singh—144.

Pahad Singh—503.

Pahad Singh, Khangorat, Jaipur envoy—591.

Palmer, Major William, in charge of the Lucknow Residency—338; 410; explains the Company's policy of neutrality 497-98.

Parashar Dadaji Wagh—51; 53; 56-7; 61-2; 68; 72; 79; 84-6; 114; 148; 586.

Parashuram Bhau Patwardhan—40; his hostile attitude to Sindia 60; 121; conduct fighting in Konkan: checks Goddard's advance 140, 148, 158, 160-67, 170, 173; 276, 277; 445; conducts war with Tipu 595, his victory over Reza Al at Shimoga 604.

Parwati Bai, wife of Sadashiv Rao Bhau—implicated in the plot against Nana 101.

Patan, Battle of—Maratha strategy, De Boigne distinguishes himself 574.

Peshwa, Madhav Rao Narayan—75; removed to Purandhar on Goddard's approach 140; imperial dignities conferred on him 349, 359, 367; 371-72; his anxiety to possess Mathura and Brindaban 385; sends presents to the Emperor 453; 454; 572.

Poona Darbar—desires to modify Sindia's peace proposal 208, 209, 214-16, 219-20; 224; 227; 228; 275; relations with Mahadji 253, 261-64, 267-69, 284-86; 287-90, 291, 293, 374, 376, 379, 394, 399, 400, 402, 404, 411, 418, 427, 429, 443, 446, 471, 484, 488; war with Tipu Sultan 445-47, 451, 455, 458, 460, 461, 467, 471, 480, 491; recognises the necessity of Sindia remaining in the north 517, 557, 602; neglect, assisting Sindia 521; 559; its partiality to Ali Bahadur 561 562.

ol.—takes Gwalior 111; 144; 265; 267-68, 272-73,

h of Jaipur—See Jaipur.

adashiv Rao Bhau—his defeat and capture 18-28; 77.

R

hna, Vakil of Ranjit Singh Jat—307.

da Peshwa—his flight to Malwa 1-4; efforts to con-im 5-11; 14; engaged by Behere 19; his arrival at 24; deserted by Govind Rao Gaikwad 43; 50; 59; 7; 101; 128; 132; 170; 173; his surrender declined by ish 214; 220; 222; 248; 259; his terms for surrender-310; 316; 326; 330; 340-41.

aji, Peshwa's Kamavisdar—loses Ahmedabad to the 80, 84-85.

, *Raja of*—155; joins Sindia 157.

ar—appointed Diwan by Sindia 165; 337.

gria—captures the Pretender 21-29 32.

Hari of Jhansi—146; 153; assists Sindia 156; 188; ; 367; his exertions in the Rajput crisis 512, 513.

Ramchandra, Killadar of Gwalior—killed 108, 109,

Rao Balwant Naogaonkar—adopted by Balwantrao leo 368, 380; 382.

Rao Peshwa—See Raghoba Dada.

Rao Mirajkar Patwardhan—134.

ingh Chaudhari of Dewas—462.

rayan, Raje Bahadur—his recognition to the Jagir, ndia 300, 314, 315, 320, 327-28, 375, 464, 484.

zo, son of Sadashiv Ramchandra—463.

Rajmuhammad Khan, Sindia's artillery officer—359.

Rajputs—avail themselves of dissensions in the Maratha camp 545-47; their intrigues with Ismail Beg 565, 570; their secret negotiations with Holkar and Ali Bahadur 571; defeated at Patan 573-74; Sindia's army overruns their country 575; defeated at Merta 579; open negotiations with Sindia 585; withdraw support from Ismail Beg 600, 601.

Ramchandra Tukdeo—470.

Ramchandra Ganesh Kanade, Peshwa's general—38, sent to relieve Bassein 123.

Ramgarh (Aligarh)—invested by Rayaji Patil 411; surrenders 432.

Ramji Patil Jadhav—124; 131, 215; 219; 287; 314; 327; 328; 334; 345; 367; 398; 538.

Ram Ratan Modi, Emperor's agent—528; requests Sindia to save the capital 530.

Rana Khan Bhai, Sindia's Sardar and confidant—captures the Pretender 21-4, 26; assures to Nana about Mahadji's loyalty 75; 96; 263; besieges Gohad 283; 371; persuades the acceptance of Khilat by the Peshwa 371, 374, 401; covers Sindia's retreat from Lalsot and then retires 500, 503; despatched against Ismail Beg 518; gains success over Ismail Beg at the battle of Agra 520, 521, 524; 529-30; dispatched to the relief of Delhi 538; invests Ghulam Qadir in Meerut 539, 543, 545, 551, 555; 564; his futile attempt to reconcile Ali Bahadur and Mahadji 582; 586; 591.

Ranoji Ghorpade—205.

Rangrao Raje Bahadur—287-88; 315; 572.

Ranjit Singh Jat of Bharatpur—358; 363; 408; assists Sindia in the Rajput crisis 518, 520; 528.

Rastia—187.

Ravaloji Sindia—wounded at Agra 527; sent to relieve Delhi

528, 530; 537; attacks Ghulam Qadir's posts in Delhi 538; sent against the Rajputs 575.

Rayaji Jadhav, son-in-law of Rayaji Patil—308.

Rayaji Patil, Sindia's Sardar—25; 145; 263; at the siege of Gohad 280; 308; captures Agra fort 363-65; sent against Ramgarh 407, 409, 411; sent against Jaipur 476; present at the battle of Lalsot 500; 504; dispatched against Ismail Beg 518 and against Ghulam Qadir 528, 529; invests Meerut 539; opens negotiations with Ghulam Qadir 551; captures Ghulam Qadir 555; dispatched to Ghausgarh 556; 558; 606.

Reza Ali, Tipu's officer—604.

Rodoji Khawas, Jaipur Raja's confidant—his low character 476; 591.

S

Sabaji Bhonsle—1-3; 63.

Sadashiv Dinkar, Nana's agent with Sindia—15; 16; 40; 52; 54; 59-60, 62-3; 71-2; 77; 112; 124; 160; important discussions with Holkar's agent 179; 212; reports Ahalya Bai's unwillingness to concede control 215; 218-19; his suspicion of the policy of the English 294; 307; 318-19; 328; 330-33; 343-47; 350; his ill-health 353; 359; 370; his delicate position as mediatory 374, 376-78; 393; opposes the acceptance of royal titles by the Peshwa 401, 402, 404, 405; his declining health 416; 430; dispels the myth of the acquisition of Afrasiyab's wealth by Sindia 447; 450; 459; 465; 472; 493; his difficulty of transacting business with Sindia 494; 521; his meeting with Ali Bahadur at Ujjain 529; 531; 544.

lashiv Malhar Bakhshi, Sindia's Vakil to Hastings—84; 122; 131; 135; 147; 154; 175; 177-81; 188; 285; 288; 304; 310-11; 324; 329; 330; 334-37; 339; 344; 351; 355; 362; 363; 367; 369; 586.

ashiv Pant, Poona envoy to Fate Singh Gaikwad—89.

Sadashiv Pant Aswalkar, Ali Bahadur's Diwan—578, 582.

Sadashiv Pawar—312; 348.

Sadashiv Ramchandra—11; 17; 92; 97; 315.

Sadashiv Rao Bhau—See Pretender.

Sahib Khan Toke—532, 537, 564.

Sakharam Bapu alias *Sakharam Bhagwant Bokil*—4; 6; 9; 10; 12; 28; 59; 347.

Sakharam Ghorpade—205.

Sakharam Panse—192.

Salbai, Treaty of—162, 169, 173, 174, 179, 182, 188-92, 195, 196, 198-99, 202, 208, 209, 211, 213-16, 219-20, 248, 254, 257, 258.

Santaji Ghorpade—205.

Sarnet Singh Bundela—351; 422; 478.

Satwaji Bhonsle—44; 121; 128; 129; 167; 170; 173; 192.

Scott—310.

Sewak Ram, Peshwa's Vakil at Calcutta—355.

Shah Alam.—See Emperor Shah Alam.

Shahzada (Jawan Bakht)—his flight to Lucknow 310, 313, 316, 318; 330; 335; 338; 339; 344; 355; 366; 369; 410; 478; death at Benares 522.

Shankaraji Sakhdeo, clerk of the Hingnes—360.

Shivaji Vithal alias *Bapu Vinchurkar*—95; 100; 125-27; 131; 135; 140; joins Sindia 155; 171, 173-88, 194; 255; 258; 299; 312; 328; 358; 367; 385; at Lalsot 500; advises Sindia to retire 503; mediates in the Ali Bahadur dispute 562-63; 578; 581-82.

Shivrao Hari of Jhansi—175.

Sikhs—372; 381; their depredations in Rohilkhand 386, 406 their pacification 409; 411; 473; 522; 570; 571.

Simthar, Raja of—joins Sindia 155; 157, 187; 351.

Sital Das, Emperor's agent—528.

Stuart, Charles, English hostage—released by Sindia 90, 100.

Subrao Ghorpade—205.

Shujadil Khan, Afrasiyab's father-in-law—surrenders Agra fort 359, 363; 373.

Shuja-ud-daula—250.

Sultanji Lambhate—31; 79; 122; 124.

T

Tafazzul Husain Khan, Palmer's Secretary—338.

Taimur Shah Abdali—545.

Tipu Sultan—208; 227; Poona Court urge to start hostilities against him 228, 248; refuses to surrender his conquests 250; 256; 260; 262-65, 267 271-73; receives overtures of peace from both parties 276; 284; treaty concluded by him with the English 292;293; 310-11; 316-17; 319; 321; 325; 326; 329; 330; his atrocities on the Hindu population 331; 334-35; 339; 344; 351; 355; 357, 361; his aggressive policy towards the Marathas 367; 394; attacks Nargund 402; conducts war against the Marathas 435-38, 441-42, his reverses in the Coorg country 444; 445, 455, 458, 461, 479, 481, 482; 485; British policy towards Tipu's war with Marathas 487; 491; 492; his war with the allies 569, 595, 603, 605.

Trimbakji Bhalerao, Raghoba's partisan—92; 97; imprisoned at Mandsor 101.

Trimbakji Ingle—135.

Trimbak Narayan Raje Bahadur, Sindia's protege—88; 100; disgraced by the Poona ministry 287-90, 299, 300, 312; 314; 315; 317; 320; 327; 334; 336; 347; 367; 375; his restoration recommended by Sindia 464; 484; 569; 572.

Trimbak Rao Pethe—defeated and captured by Raghoba 1, 2.

Tukoji Holkar—concerned in Raghoba's flight to Malwa 1, 3,

5, 7; 43; 72, 75; 79; 85; 88; his Gujarat expedition 90; his indolence censured 95; takes part in fighting near Baroda 98-100; 107-09; 111; 115; 117; his jealousy of Sindia 125; 131; dispatched against Goddard in Konkan 134, 136, 140, 158, 160, 164; engages Goddard near Chauk 166, 167; 168; his differences with Ahalya Bai 179; 186-87; 192- desires full control of the Holkar State 215, 217, 221, 224, 228, 245, 250, 253; 269; 271; 274; 291; 303; his growing demands on Ahalya Bai for funds 296; 303; 317; 367; his expedition against Tipu 435, 437, 442, 445, 461, 481, 485-491; sent to relieve Sindia 516; his jealousy of Sindia; slow march 517, 522, 524, 526, 529-33, 537, 539-40; his jealousy of Sindia's conquests 541; his falsehood exposed 542; impolitic move towards Sindia's Rajput enemies 543-47; his intrigues with Rajput princes 552, 555, 558; his meeting with Sindia 560; 564; granted a share in the conquests 565; provokes Ismail Beg to hostilities 570, 571; his treacherous policy 578; his rupture with Sindia 580, 581, 583, 585, 586, 588, 590; his activities in Rajputana 591, 597, 601.

U

Udepur, Rana of—547; seeks Sindia's alliance 599.

Umrao Gir Gosavi—revolts against Sindia 415, 473, 483, 516; captured at Agra 518; escapes from Sindia's camp 521.

Upton, Col.—195.

V

Veniram Shivbhadra—183.

Visaji Appaji—78, 79, 84, 86, 88; 97; 105; 112.

Visaji Govind—153.

Visaji Keshav—53; 61; 68; 72.

Visaji Pant Athavale—89.

Visaji Pant Biniwale—250.

Vishnu Narhar—101.

Vishnu Mahadeo—4.

Vishwambhar Pandit, Nagpur agent at Calcutta—183.

Vyankat Rao Nimbalkar—345.

W

Waman Rao Patwardhan—5.

Wasudeo Bhat Karve—implicated in the plot against Nana 101.

Watherstone, Goddard's agent at the Poona Darbar—196; 198.

Y

Yadav Rao Hari—141.

Yadav Rao Pawar—469.

Yesaji Sindia—39, 45.

Yeshwant Rao Narsingh—276, 277.

Yeshwant Rao Nimbalkar—584.

Yeshwant Rao Wable—351.

Z

Zalim Singh of Kotah—assists Sindia 142, 153, 155-57; 543; 547.

Zabita Khan Rohila—his death by cholera 351; 352; 365.

Zain-ul-abiddin Khan—murders Afrasiyab Khan 606.

CENTRAL ARCHAEOLOGICAL LIBRARY New Delhi